SMT. HANSA MEHTA LIBRARY
The Maharaja Sayajirao University
of Baroda
Call No. 7 BF
1651
·J9-3
M·2133

GIFT FROM SHRI DAJI NAGESH APTE
Date 21-5-57
Initial

॥ श्रीसद्गुरवे नमः ॥

M. 2133
Rs.

ज्योतिर्माला

7BF
1651
·J9-3

आप्राचः कामरूपाद्दुहिणसुतनदप्लावितादाप्रतीचो
गान्धारात् सिंधुसार्द्रद्रघुवररचितादाचसेतोरवाचः ।
आकेदारादुदीचस्तुहिनगहनतः सन्तिविद्वत्समाजा
ये ये तानेष यत्नः सुखयतु समजान्कश्रमत्कर्तुमीष्टे ॥ १ ॥

अभिनवाऽऽब्दवृत्ति वर्ष ३ रें. | फेब्रुवारी १९१८. | अंक ११ वा.

स्फुट विचार.

भारतीय प्राचीन ज्योतिर्विदांनीं उज्जयिनी हें स्थान हिंदुस्थानाच्या मध्य
गीं मानिलें असून हेंच मध्यरेषा ग्रहगणितास योग्य अशी ठरविली आहे.
ोपीय राष्ट्रांस जसा **ग्रीनविचचा** अभिमान आहे तसाच अभिमान भार-
तीयांस आपल्या **उज्जनीचा** आहे. येथेंच पूर्वी जयपुरचे महाराज
सवाई जयसिंह यांनीं वेधशाळा बांधलेली आहे. ही हल्लीं भग्नावस्थेत
ह. तिचा जीर्णोद्धार करण्याकरितां उज्जनी येथें स्थापन झालेल्या **पंडि-
श्रम सभे**संबंधानें माहिती आम्हीं ज्योतिर्माला वर्ष १ लें अंक १० मध्यें
ी आहे. या वेधशाळेचें दुरुस्तीचें काम व **साधन वेधशालेची** कोण-
ठ्या सुमुहूर्तावर बसविण्यांत यावी या हेतूनें पंडिताश्रमसभेनें खालीलप्रमाणें

जाहिर विनंतिपत्र काढिलें असून त्याच्या कांहीं प्रति आमचेकडे वांटण्यास पाठविल्या आहेत. हें जाहिर विनंतिपत्र आम्हीं आमच्या वाचकांच्या सोईकरितां मालेंत प्रसिद्ध करीत आहों. ज्या कोणास या संस्थेस मदत करणें असेल त्यांनीं ती परभारें पंडिताश्रम सभेचे प्रधान मंत्री यांचेकडे पाठवावी. वेधशाळा ही सर्वांसच हवी आहे. भरतखंडामध्यें एकही वेधशाळा उत्तम स्थितीमध्यें असूं नये ही मोठी खेदाची गोष्ट आहे. या गोष्टीकडे आमचे राजे, महाराजे, सरदार, सावकार व दानशूर लोक लक्ष देतील काय ?

विनंति पत्रिका. पंडिताश्रम सभा उज्जयिनी मालवा.

विदित होकि, उज्जयिनी में सभा द्वारा यंत्रशाला स्थापन पूर्वक पंचांग गणित शोधन का कार्य आरंभ होगया है. इस विषय में उज्जयिनी में सन १९१९ में जो आलइंडिया ज्योतिर्वित्कान्फरेन्स हुई थी उस में उज्जयिनी यह स्थान हिन्दुस्थान में ज्योतिर्विद्या का केन्द्रस्थान मानकर यहां पर ही प्राचीन व नवीन पद्धति की बडी वेधशाला कायम की जाकर उसका नाम "माधव वेधशाला" रखा जावे ऐसा ठहराव हुवा था. इस वेधशाला का फाउंडेशन के (कोनशिला स्थापन करने के) साथ यहां की प्राचीन वेधशाला की दुरुस्ती करने का कार्य सुमुहूर्त पर करने का निश्चित हुवा है. श्रीमान् शिंदे महाराज ने सभा का प्रधान संरक्षक पद स्वीकार करके इस भग्न वेधशाला की मरम्मत करने का हुकुम देदिया है. सबब सब ज्योतिर्विदों की सेवा में प्रार्थना है कि आगामी चैत्र या वैशाख में अपनी संमति के अनुसार मुहूर्त निश्चित करके माघ कृष्ण ३० अर्थात् तारीख १२ मार्च सन १९१८ तक पत्रिका भेजना चाहिये. एक मत से मुहूर्त निश्चित करने का कार्य ज्योतिर्विन्महा मंडल करेगा. मुहूर्त निश्चत हो जाने पर उत्सव में उपस्थित होने के लिये पंडितों की सेवा में निमंत्रण पत्रिका भेजी जावेगी.

मुहूर्त पत्रिका भेजने का पता—ज्योतिर्विद्विभूषण पंडित विष्णुदेवजी अध्यक्ष ज्योतिर्विन्महा मंडळ लष्कर ग्वालियर ठि० खासगी.

ग्रह विचार.

सप्तमस्थ रविफल.

(मागील अंकावरून पुढें चालू)

द्युनाथो यदा द्यून यातो नरस्य प्रियातापनं पिण्डपीडाविचित्या ॥
भवेत्तुच्छलब्धिः क्रयेविक्रयेपि प्रतिस्पर्द्धयानेतिनिद्रांकदाचित् ॥

सप्तम (मेष)—अतिशय फिरणारा, व्यापारांत यशस्वी, कायद्याचीं कामें करण्याची आवड जास्त; द्विभार्यत्व अथवा विधुरता. स्त्रीसौख्य मध्यम मानावें.

सप्तम (वृषभ)—भागीनें धंदा करणारा, स्त्रीजित, ऐषआराम व भोग यांची इच्छा करणारा व मनमिळाऊ आणि आपमतलबी असतो.

सप्तम (मिथुन)—ऐतिहासिक वाङ्मयाची आवड, प्रवासवर्णनें लिहिण्यांत कुशल, कायदेपंडित, स्त्रीलोलुप, दोन धंदे करणारा, स्त्री देखणी व कुशल, कायद्याचीं भांडणें भांडणारा.

सप्तम (कर्क)—स्त्री सुंदर व चंचल, कौटुंबिक कलह करणारा, भागीनें धंदे केल्यास नुकसान पावणारा व प्रवासी होतो, खेळण्यांत पटाईत.

सप्तम (सिंह)—व्यापारांत यशस्वी, कलहप्रिय, वादविवाद करणारा, उत्तम शिपाईबाण्याचा, कोर्टातील कामीं यशस्वी होणारा, निश्चयी.

सप्तम (कन्या)—व्यापारांत नुकसान, स्त्रीशीं प्रतारणा करणारा, कुटिल, कारस्थानी, पोटव्यथा.

सप्तम (तुला)—स्त्री सद्गुणी, विचारी, व्यापारांत सामान्य यश मिळविणारा, विद्वत्तेचा भोक्ता, प्रवास, कवि, कल्पक, विमानें वगैरेंतून हिंडणारा.

सप्तम (वृश्चिक)—गुह्य रोगी, द्विभार्य, स्त्रीस अस्वस्थता, तेढ्या मार्गानें जाणारा, नाहक कलह करणारा, व्यापारांत गुंतागुंती करणारा होतो.

सप्तम (धनु)—स्त्रीसुदृढ व सशक्त, आप्तांशीं मित्रभावानें वागणारा द्विभार्य, साहसानें व चिकाटीनें व्यापार करणारा.

सप्तम (मकर)—प्रवासांत त्रास, नेत्र व पाय यांस विकार असलेला स्त्रीसौख्य कमी, भागीदारीनें धंदा केल्यास अपयश व तंटे.

सप्तम (कुंभ)—स्त्रीशीं विरोधीवृत्ति, उत्तम कायदेपंडित, भागीनें धंदा केल्यास नुकसान, नेत्रदोषी, प्रवासांत अडचणी.

सप्तम (मीन)—स्त्रीस वारंवार आजार, खर्चिक, फसणुकीमुळें नुकसान, स्वतंत्र धंद्यापेक्षां नोकरींत यश उत्तम, लांबलांबचे प्रवास फार होतील.

अष्टमस्थ रविफल.

क्रियालंपटत्वेऽष्टमे कष्टभाजं विदेशीय दारान्भजेद्वाथवस्तु ॥
वसुक्षीणता दस्युतो वा विलंबा द्विपद्रुद्वजाभानुरग्रं विधत्ते ॥ ९ ॥

अष्टम (मेष)—गुह्यरोगी, कारस्थानी, ज्योतिषादि गुह्यविद्यांनीं उपजीवन चालविणारा, गुप्तधनाची सामान्य प्राप्ति ज्यास होते असा, मेंदूच्या विकारानें अथवा अतिप्रवासाचे श्रमानें किंवा प्रवासांत मृत्यु येतो ज्यास असा.

अष्टम (वृषभ)—मित्रधनाची प्राप्ति, गळ्याचे विकारानें अथवा शुक्रदोषानें मृत्यु येतो ज्यास असा, वाद्यविद्येच्या नादानें सर्वस्वाची हानि करून घेणारा.

अष्टम (मिथुन)—मोहिनीविद्या, मंत्रविद्या यांचीं मूलतत्वें जाणणारा पण त्याचा दुरुपयोग करणारा, अभागी अथवा अपयशी, दम्याखोकल्याच्या विकारानें मृत्यु

अष्टम (कर्क)—बालपणीं प्रकृति अशक्त, पाण्यापासून भय, अपघाताची धास्ती. मानसशास्त्राचीं तत्वें जाणणारा. चंचल वृत्तीचा, स्वप्नें जास्त पडतात असा. उदरासारख्या विकारानें मृत्यु.

अष्टम (सिंह)—गुप्तधनाची प्राप्ति, मृत्यु पित्तप्रकोपानें अथवा हृदयक्रियेच्या अव्यवस्थेनें; गूढविद्या–रमलादि विद्येचा अभिमानी.

अष्टम (कन्या)—परस्त्रीलंपट, मायावी, खोटी कारस्थानें रचणारा,

कळलाव्या, स्त्रीसाठीं खर्च जास्त करणारा. भागीनें व्यवहार करून नुकसान पावणारा; ओटीपोटांतील अव्यवस्थेनें त्रास पावणारा.

अष्टम (तुला)—मोठाली दुखणीं येतील, उन्नतीसाठीं फार धडपड करावी लागेल, गुप्तधन मिळण्यांत अडथळे येतील; मातुलपक्षाची मदत, पोटांतील व्यथेनें मृत्यु.

अष्टम (वृश्चिक)—संततिसौख्य फार अडचणीचें मिळेल, विद्येंत अडथळे जास्त येतील, गुह्य विकारानें मृत्यु होतो.

अष्टम (धनु)—खाणींतील काम करणारा; भूमिगत द्रव्य अथवा मातृपक्षाकडून द्रव्यप्राप्ति, शर्यतींत द्रव्य कमविणारा, अपघातानें किंवा रक्तदोषानें मृत्यु पावणारा.

अष्टम (मकर)—त्रास व दगदग फार, स्त्रीसौख्य कमी, भावंडांचें सौख्य कमी, गुदव्यास इजा, प्रवासांस मृत्यु.

अष्टम (कुंभ)—पायांस इजा, सट्टे, लॉटरींत धनप्राप्ति (सामान्य), बौद्धिक विषयांत गति, विद्येचा दुरुपयोग करणारा, वातोष्ण प्रकोपानें मृत्यु.

अष्टम (मीन)—शारीरसौख्य कमी, दगदगी, रुग्णालयांत वावरणारा, जुगाराचा नादी व अपयशी, जलापघात अथवा मद्यपानाचें व्यसन जडवून घेणारा, शीतज्वरानें मृत्यु पावणारा होतो.

नवमस्थ रविफल.

दिवानाथके दुष्टता कोणयाते न चाप्नोति चिंताविरामोऽस्यचेतः ॥
तपश्चर्ययाऽनिश्चयापिप्रयाति क्रियातुंगतां तप्यते सोदरेण ॥ १० ॥

नवम (मेष)—परोपकारी, दैवीसंपत्तीनें युक्त, भाग्यवान्, कीर्तिशाली, धर्मसंस्थापक; साधुसमागमाची इच्छा करणारा; राजमान्यत्व मिळविणारा, स्वतंत्र डोक्याचा व प्रवासी; पूर्वेकडे भाग्योदय, अनोळखी इसमांकडून द्रव्यलाभ.

नवम (वृषभ)—चांगल्या कार्यांत द्रव्याचा व्यय करणारा, अडचणींतून सोडविणारा, यशस्वी रीतीनें गुंतागुंती सोडविणारा, गुप्त कारस्थानें उघडकीस आणणारा, गायनविद्येची आवड असणारा; खुष्कीचे प्रवास फार करणारा.

नवम (मिथुन)—पूर्वी दरिद्रीपणा पुढें मोठी श्रीमंती व वैभव भोगणारा, मित्र फार, शास्त्रीय विषय व संस्कृत वाङ्मयांचा पुरस्कर्ता, तत्वज्ञानी,

नवम (कर्क)—स्वतंत्रतेनें उन्नति करून घेणारा, धार्मिक बुद्धीचा, पुण्यकर्में करणारा, खेळण्याची आवड, स्तुतिप्रिय, भाग्यवान्, पितृधन मिळविणारा.

नवम (सिंह)—भाग्यवान्, राजमान्य, यशस्वी, प्रतिभासंपन्न स्वधर्मनिष्ठ, मुत्सद्दी.

नवम (कन्या)—साक्षकारी करणारा, जूररचें व ट्रस्टीचें काम करणारा, धर्मविचाराची शाब्दिक चर्चा करणारा, यांत्रिक कामांत भाग्योदय.

नवम (तुला)—न्याय करण्यांत कुशल, भाग्यशाली, विवाहानंतर भाग्योदय, तत्वज्ञानी व ऐहिक सौख्य व पारलौकिक कल्याण यांची जोड मिळविण्याची इच्छा करणारा; बुद्धिबळें खेळणारा.

नवम (वृश्चिक)—दुर्दैवी, डॉक्टरी विद्येंत प्रवीण, रसायणशास्त्रज्ञ, धर्माचरण कमी अथवा भ्रष्टासारखें. गूढविद्याव्यासंगी. खाणीचे धंद्यांत यशस्वी.

नवम (धनु)—विद्वान्, राजकारण पटु, शिक्षक, ग्रंथकार (उदात्त ग्रंथ रचणारा), धर्मासंबंधानें विशिष्ट मताचा, सांपत्तिक स्थिति साधारण, क्रिकेटादि बाह्य खेळांत कुशल.

नवम (मकर)—पत्रव्यवहार करण्यांत कुशल, मातृभक्त, उपासना करणारा, प्रवासी, शेतकी करणारा, परबुद्धीनें चालणारा, वारंवार मतें बदलणारा, गृहसौख्यास साधारण.

नवम (कुंभ)—स्वतःच्या बुद्धिसामर्थ्यावर कीर्ति मिळविणारा, उत्तम ग्रंथकार, वकील, कायद्याचें ज्ञान मिळविणारा, नीतिज्ञ.

नवम (मीन)—धनाढ्य, सत्कर्मी व्यय करणारा, देवालयें बांधणारा, सूर्योपासक, जलप्रवास करणारा, कौटुंबिक स्वास्थ्यास जपणारा.

पत्रव्यवहार.

श्रीयुत रा. रा. संपादक ज्योतिर्माला यांस—

सा. न. वि. वि.

आपणाकडेस एका जन्मान्ध मनुष्याची कुंडली मी पाठवीत आहें ती येत्या अंकीं प्रसिद्ध कराल अशी आशा आहे. मी आपले विचारानें जे योग जन्मान्ध योगाला कारणीभूत झालेले दर्शविले आहेत त्यांशिवाय इतर योग आपणास सुचतील तेही प्रसिद्ध करण्याची कृपा करावी.

जन्म:—संवत १९३२ शके १७९७ पौष शुक्ल १३ रविवार तारीख ९ जानेवारी सन १८७६ रात्रीं दहा वाजतां. जन्म दिल्लीचेजवळ अक्षांश २८ अ. ३९ क. उत्तर. रेखांश ७७ अं. १६ क. पूर्व.



ग्रहांच्या क्रांति

रवि २२।७ द.	बुध २२।४९ द.	शनि १४।४६ द.
चंद्र २८।१९ उ.	गुरु १८।१४ द.	हर्षल १९।४६ द.
मंगल २।३० द.	शुक्र १७।५६ द.	नेपच्युन ९।५५ उ.

ग्रहांचे दृष्टियोग.

चंद्र केन्द्रयोग मंगळ; चंद्र १९० अंश किंवा षडाष्टक योग बुध व गुरूबरोबर; चंद्र १३९ अंश किंवा सार्धचतुष्टयराश्यंतरयोग शुक्राबरोबर, चंद्र त्रिकोण किंवा १२० अंश शनि.

बुध ६० अंश किंवा द्विराश्यंतर गुरु; बुध ३० अंश किंवा एकराश्यंतर शनि; द्विराश्यंतर योग मंगळाबरोबर.

रवि १२० अंश किंवा त्रिकोण दृष्टियोग लग्नाचे उदित अंश रवि शुक्र ३० अंश. रवि हर्शल १९० अंश किंवा षडाष्टकयोग. रवि मंगळ ६० अं. किंवा द्विराश्यंतर; रवि गुरु द्विराश्यंतर.

शुक्र प्रतियोग हर्शल.

मंगळ ३० अंश शनि त्रिकोणयोग गुरु.

गुरु केंद्रयोग शनि.

शनि हर्शलप्रतियोग.

रवि बुध समक्रांतियोग; शनि हर्शल समक्रांति योग; शुक्र गुरु समक्रांति.

या कुंडलींत हर्शलचे योग विशेष लक्षांत घेण्यासारखे झालेले आहेत. लग्नाला व्ययस्थानीं रवि, मंगळ व बुधाला षडाष्टकीं, गुरूला केंद्रीं शुक्र व शनीला १८० अंशांच्या योगांत (प्रतियोग) राहूच्या १३९ अंशांत व केतूच्या ४९ अंशांत आहे. येणेंप्रमाणें एक चंद्र खेरीज करून इतर सर्व ग्रहांना हर्शलनें आपल्या क्रूर दृष्टीनें पीडिलें आहे. हर्शल नुसत्या डोळ्यानें दिसणारा ग्रह नाहीं व याचीं फलें अद्भुत व अलौकिक अशीं आहेत. याप्रमाणें हर्शल या अदृश्य ग्रहाकडून इतर सर्व ग्रह निर्बली झाल्याकारणानें हा जन्मान्ध

निपजला, मात्र हा संस्कृत विद्येंत निष्णात आहे. शेखर मनोरमा महाभाष्यापर्यंत व्याकरण शिकलेला आहे. तसेंच वैद्यक, ज्योतिष व मंत्रशास्त्रांतही याची गति आहे. याचे कारण पंचमस्थानांतील बुध, शुक्र व त्यांचे रवि, मंगळ, गुरु व शनि यांजबरोबर झालेले शुभ योग होत. सप्तमांत मंगळ व राहु असल्या कारणानें लग्न झालें नाहीं. तृतीय स्थानीं गुरु असल्यामुळें वडील भाऊ व बहिण आहे. षष्टांत शनि असल्याकारणानें शरीर रोगयुक्त आहे व शत्रुही पुष्कळ आहेत. कारण याला वादाची फार हौस असून त्यांत पराजय मानून घेत नाहीं. स्वभावांत हट्टीपणा जास्त आहे. अष्टमांत नेपच्युन असल्यामुळें पाण्यांत बुडून मरण्याची वेळ आली होती परंतु संकट बचावलें, या कुंडलींत सिंह राशीचा पराक्रमी हर्शल समस्त ग्रहांशीं योगकारक झाल्यामुळें योगसिद्धीकडे याचें मन कांहीं दिवसांपासून वेधलें आहे. चंद्राचा मंगळाबरोबर केन्द्रयोग झाल्यामुळें स्वभाव चंचल व कलहप्रिय, रागीट, व भीट आहे. दशमस्थानामधील चंद्र याला एके ठिकाणीं बसूं देत नाहीं. यात्रांत भ्रमण होत असतें. वृत्ति भिक्षान्देहीची आहे. कळावें हें विनंति

आपला,

मन्नालाल दुबे.

[कुंडलीमधील ग्रहांचे अंशात्मक दृष्टियोग कसे पाहावे यासंबंधानें बराच पत्रव्यवहार आमचेकडे आला असल्याकारणानें ह्या कुंडलींतील योग स्पष्ट कळण्याकरितां वर दर्शविले आहेत. या विषयावर एक विस्तृत निबंध पुढील वर्षाचे अंकामध्यें देण्याचा विचार आहे.

द्वादश भावांपैकीं धन व व्यय स्थानाचा अंमल दक्षिण व वामनेत्रावर असल्याचें ग्रंथांतरीं वर्णन आहे; व ग्रहांपैकीं रवि व चंद्र यांचा नेत्रांबरोब

संबंध आहे, राशिचक्रामधील सिंह व कुंभ राशींचा दृष्टीबरोबर विशेष संबंध असलेला पाहण्यास मिळतो. येथें चंद्र केन्द्रामध्यें मंगळानें पीडित असून सिंह व कुंभ राशीमध्यें पापग्रह आहेत. व्ययस्थानामध्यें पापग्रह धनाधिपति शुक्र पीडित व रवि हर्शलनें दूषित असे योग झाल्याकारणानें हा मनुष्य जन्मान्ध झाला असावा.

बुधाचे राशीचें लग्न उदय पावत असून चंद्रही बुधाचे राशीमध्यें आहे. लग्नाधिपति बुध पंचमांत, बौधिक स्थानामध्यें गुरु, नवमेश शुक्र पंचमांत, शुक्र, शनि व चंद्र हे शास्त्रीय राशीमध्यें; शनि, चंद्र शुभसंबंधित व बुध, गुरु शुभसंबंधित असल्यामुळें या माणसाची बुद्धिमत्ता उत्तम असून शेखर मनोरमा महाभाष्यापर्यंत अध्ययन झालें आहे.

लग्नीं वंध्या राशि उदय पावत आहे; चंद्रही वंध्या राशीमध्यें आहे. स्त्रीसुखाचे कारक शुक्र व चंद्र हेही पीडित आहेत. सप्तमेश गुरु शनीनें पीडित असून सप्तमांत पापग्रह त्यामुळें विवाह झाला नाहीं.

लग्नीं निर्बली राशि उदय पावत असून रवि चंद्र पीडित असल्यामुळें शरीर दुर्बल व रोगयुक्त.

रवि मकर या चर राशीमध्यें चंद्र मिथुन या द्विस्वभाव राशीमध्यें, चंद्रमंगळ केन्द्रयोग; लग्नमंगळ प्रतियोग असल्यामुळें स्वभाव मानी, महत्वाकांक्षी, हट्टी, चंचल, वादाची आवड बाळगणारा कलहप्रिय, रागीट व धीट असून त्याचमुळें शत्रुत्व पुष्कळ होईल.]

संपादक—

—o—

प्रसिद्ध ज्योतिर्विदांच्या कुंडल्यांचा संग्रह.

(१) मि. ॲलन लिओ.

डिसेंबर महिन्याच्या अंकांत प्रसिद्ध केल्याप्रमाणें प्रसिद्ध ज्योतिर्विदांच्या कुंडल्या त्रोटक वर्णनासह देण्याचा उपक्रम चालू अंकापासून करीत आहों. "ज्योतिर्विद्ये" संबंधानें दोन लहानशा लेखांत जे नियम सांगितले त्यांची सत्यता ह्या कुंडल्यांवरून पटण्यास मुळींच कठीण जाणार नाहीं. ॲलन लिओनें फलज्योतिष शास्त्राचा सार्वत्रिक प्रसार करण्यांत सर्व जगांतील ज्योतिर्विदांत अग्रस्थान पटकाविलें होतें तेव्हां त्याच्याच कुंडलीचा विचार प्रथम करीत आहों. ॲलन लिओच्या जन्मकाळीं सिंह राशीचा २८ वा अंश पूर्व केंद्रावर उदय पावत असून उदित अंशाबरोबरच शनि संलग्न झाला आहे. पूर्व केंद्रावर नुकताच बुध ग्रह उदय पावला असून त्याच्या बरोबर नवमस्थ चंद्र त्रिकोण योग करीत होता. सिंह राशीचें लग्न व रविसुद्धां सिंह राशींत असल्यामुळें मि. लिओची शरीरप्रकृति निकोप व सुदृढ, स्वभाव गंभीर, धीरोदात्त आणि निर्भय होता; अग्नि राशींतील रवि-चंद्रांमुळें काम करण्याची धमक वाखाणण्यासारखी होती. लग्नांतील शनीमुळें चिकाटीनें सतत श्रम करण्याचा गुण त्याच्या अंगीं विशेष होता. जगांतील ज्योतिर्विदांच्या समाजांत त्याला जें महत्व प्राप्त झालें होतें तें ह्या वरील गुणांमुळेंच होय. मि. लिओचा जन्म अगदीं गरीब कुळांत झाला होता परंतु दीर्घ श्रमानें त्यानें आपली स्थिति सुधारून घेतली. रवि-गुरूंची बादशाही राशींतील युति व या युतीबरोबर भाग्यभुवनांतील चंद्राचा त्रिकोण योग हे दोन योग भाग्याचे द्योतक आहेत. रवि-गुरूची युति व्ययस्थानांत झाली असल्यामुळें तिचें कमी झालेलें महत्व भाग्यभुवनांतील चंद्राच्या त्रिकोण योगानें पुष्कळ अंशानें भरून आलें आहे. रवीकडे तन्वाधिपत्य असून कर्तृत्ववान राशींत शुभ योग झाला असल्यामुळें लिओचा भाग्यारंभ केवळ स्वतःच्या कर्तबगारी-

वर झाला व चंद्र प्रथम रवीबरोबर शुभ योग करण्यास जात आहे. ह्या योगानें त्याच्या लग्नसंबंधामुळें त्याची सांपत्तिक स्थिति फारच चांगल्या स्वरूपाला आली.

दशमांतील हर्शलमुळें लिओनें ज्योतिषाचा धंदा करण्यापूर्वी इतर बरेच धंदे केले होते पण त्यांमध्यें त्याला म्हणण्यासारखें यश आलें नाहीं. अखेरीस त्याच्या दशमस्थ हर्शलनें ज्योतिषशास्त्राकडे वळविलें. लिओच्या कुंडलींत ज्योतिर्विद्येचे योग झाले आहेत ते असेः—(१) हर्शल—चंद्र द्विराश्यंतर योग, (२) बुध—हर्शल द्विराश्यंतर योग आणि (३) दशम केंद्रीं मिथुन राशीचा हर्शल. या महत्वाच्या योगानें लिओस ज्योतिषशास्त्राची आवड फार लवकर म्हणजे विसाव्या वर्षापूर्वीच उत्पन्न झाली. सन १८८६ नंतर तो फिरत्या एजंटाचा धंदा करीत असतां इंग्लंडांतील तत्कालीन ज्योतिषशास्त्राच्या विद्यार्थ्यांबरोबर त्याचा परिचय घडला व ज्योतिष शास्त्राध्ययनास जोरानें सुरवात झाली व त्याचें पर्यवसान १८९० सालीं एक मासिक काढण्यांत झालें. मासिकाचें नांव "Astrologers' Magazine" असें होतें. लिओ या मासिकाचा दुय्यम संपादक होता. पुढें पांच वर्षानें या मासिकाच्या मुख्य सपादकानें राजिनामा दिला व मासिक पुढें चालविण्याची जबाबदारी लिओनें आपल्या अंगावर घेतली. मासिकाचें पूर्वीचें नांव बदलून "Modern Astrology" या नूतन नांवानें लिओनें मासिक पुढें चालविलें. या वेळीं लिओच्या कुंडलींत अत्यंत महत्वाचा योग घडून येत होता. त्याच्या कुंडलींत रवि-गुरूंची युति आहे व गुरु रवीच्या पाठीमागें सुमारें सात अंश आहे तो त्याच्या ३० व्या वर्षाच्या सुमारास म्हणजे १८९० मध्यें मूळच्या रविबरोबर युतियोग करीत होता. गुरूची गति अतिशय अल्प असल्यामुळें चलित गुरु व मूळे रवि यांचा युतियोग अनेक वर्षेपर्यंत चालणार होता. हा योग सुरू झाला आणि लिओ मासिकाचा संपादक झाला. इतक्या महत्वाच्या योगावर त्यानें ज्या कार्यास सुरवात केली तें कार्य त्यानें आमरणांत चाल-

विलें होतें. त्यानें २७ वर्षें आपलें मासिक उत्कृष्ट रीतीनें चालविलें. ज्योतिषशास्त्राला वाहिलेलें इतकें अव्याहत व दीर्घकाल टिकलेलें उच्च दर्जाचें मासिक आंग्ल भाषेंत तर काय पण जगाच्या कोणत्याही भाषेंत नाहीं असें प्रसिद्ध झालें आहे. लिओचें हें मासिक त्याच्या पाठीमागेंही पूर्ववत् चालू रहाण्याची योग्य व्यवस्था झाली आहे. एखादें मासिक दीर्घकाळपर्यंत टिकणें यामध्यें कांहीं विशेष नाहीं परंतु ज्योतिषशास्त्राची २५ वर्षांपूर्वीची स्थिति व आतांची स्थिति यामध्यें जे महदंतर पडलें आहे आणि असें होण्यास ज्या

सा. ल.



मासिकानें सर्वस्वी पुढाकार घेतला होता त्याची किंमत विशेष आहे. वर नमूद केलेले बुध, चंद्र व हर्शल यांच्या योगानें ज्योतिषवाङ्मयामध्यें लिओच्या हातून कार्य घडण्याचा योग आला व या योगांच्या जोडीस रवि, चंद्र व गुरु यांच्या शुभ योगानें त्या लिओला यश आलें. लिओनें स्वतः पुरीं सत्तावीस वर्षें उत्कृष्ट रीतीनें मासिक चालविलें, सात मोठमोठाले ग्रंथ, शेंसवाशें पानांचीं पंधराव्या वर पुस्तकें लिहिलीं, ज्योतिर्विदांची संस्था काढिली आणि ज्योतिष वाङ्मयाचें संशोधन पुढें चालू रहाण्यासाठीं एक संघ तयार केला. ज्योतिष वाङ्मयाच्या क्षेत्रांत इतकें कार्य करणारा ज्योतिषी हल्लीं तरी खास नाहीं. (१) बुध–चंद्रांचा त्रिकोण योग (२) चंद्र हर्शल तृतीय–एकादश योग (३) बुध हर्शल तृतीय–एकादश योग (४) रवि चंद्र त्रिकोण योग, (५) रवि गुरूंचा युति योग व (६) गुरु–चंद्रांचा नवम पंचम इतके महत्वाचे योग लिओच्या कुंडलींत झाले होते तेव्हांच त्याच्या हातून वर सांगितल्याप्रमाणें चिरस्थायी कार्य झालें.

लिओच्या कुंडलींत यशकारक योग होऊन ते ज्योतिष वाङ्मयाच्या क्षेत्रांत फलद्रूप झाले याचें कारण राजभुवनांतील शास्त्रीय राशींतील हर्शल ग्रह बुध–चंद्रांच्या शुभ दृष्टींत आहे हें स्पष्टच आहे.

लिओच्या कुंडलींत उदित अंशाच्या युतींतच शनि आहे. ह्या शनीच्या धर्माप्रमाणें वयाचीं तीस वर्षेंपर्यंत कोठेंच ठाम बसला नाहीं. शनीचें एक भ्रमण पुरें झाल्यावर त्याच्या आयुष्यांतील मुख्य कार्यास आरंभ झाला व ३६ व्या वर्षीं भाग्योदयास सुरुवात झाली हें लक्ष्यांत ठेवण्यासारखें आहे. लिओच्या कुंडलींत प्रबळ अशा शुभ योगांचें दिग्दर्शन वर केलें आहे त्याबरोबर चंद्र–मंगळ केंद्रयोग, शुक्र–चंद्र केंद्रयोग व शुक्र मंगळ प्रतियोग ह्या तीन अशुभ योगांचींही फलें लक्ष्यांत घेण्यासारखीं आहेत. पंचमांत वक्री

मंगळ असून दोन ग्रहांबरोबर अशुभ दृष्टियोग करीत आहे, त्याचप्रमाणें लाभस्थानांतील ग्रहसुद्धां पीडितच आहे व पंचमेश शनि निर्बळी आहे म्हणून लिओला संतति झालीच नाहीं. नवम स्थानांतील चंद्र शुक्र–मंगळांनीं पीडित आहे यामुळें कोर्टांत जाण्याचे प्रसंग आले, दिनवर्ष पद्धतीनें ज्या वेळीं शुभदृष्टि योग चालले होते तेव्हां लिओला कोर्टातील कज्यांमध्यें यश आलें. व शेवटीं म्हणजे रवि–शनींच्या अर्धकेंद्र योगासारखे योग चालू असून त्याचा आत्मकारक रवि व्ययस्थानांत शनि व हर्शल याच्याकडून पीडित असतां "Vagrant" Act भविष्य वर्तवून पैसे घेतल्याच्या आरोपावरून लिओला २५ पौंड दंड झाला. या खटल्याच्या वेळीं फल ज्योतिषासंबंधानें इंग्लंडांतील जनसमूहाचें मत पुष्कळसें अनुकूल होत चालल्याचें दिसून आलें. ज्याच्या समोर ही शेवटची फिर्याद चाललेली होती त्या लंडनच्या मेयर साहेबांनीं स्पष्ट कबूल केलें कीं "फल ज्योतिष हें इतर शास्त्रांप्रमाणेंच अनुभवसिद्ध शास्त्र आहे पण कायद्याच्या दृष्टीनें भविष्य वर्तवून पैसे घेतल्यामुळें गुन्हा घडला आहे" लिओच्या विरुद्ध हा दुसरा खटला होता. या पूर्वी एक खटला झाला होता पण त्यामध्यें तो निर्दोषी ठरला. इंग्लंडातील सध्यांच्या कायद्यामुळें अशी स्थिति झाली आहे कीं भविष्य करण्याबद्दल पैसे घेतले तर शिक्षा होते पण कुंडलीचें गणित करण्याबद्दल कितीही पैसे घेतले तरी तो गुन्हा होत नाहीं.

नवम स्थानांतील चंद्रामुळ लिओचा दूर देशांतील प्रवासही घडला. तो ज्योतिष शास्त्राच्या माहेरघरीं–भरतखंडांत आला होता. मुंबई येथें त्याचा मुक्काम असतां येथील ज्योतिर्विदमंडळांतील कांहीं मंडळी त्याच्या भेटीस गेली होती. या भेटीच्या वेळीं हल्लीचे मंडळाचे–अध्यक्ष यांनीं लिओच्या चेहेऱ्यावर तनुस्थानीं शनि आहे हें सांगून त्यास चकित केल्याचें "मंडळाच्या"

सभासदांच्या लक्ष्यांत चांगलें राहिलें असेल. लिओच्या कुंडलींत १९१७ सालांत अनिष्ट योग चालले होते त्यांमध्यें चलित रवि मूळ उदिन अंश व शनि यांबरोबर अर्धकेंद्र योग करीत होता व शनि नेपच्युनची युति मूळच्या रवीजवळच होत होती. परिभ्रमणकाळचे रविशनि युतींत होते. मूळचा शनि वाईट राशींत असल्यामुळें व रवीपासून फक्त १३ अंशांच्या अंतरावर आहे म्हणून रवि–शनींच्या अर्ध केंद्रयोगावर मृत्यु झाला. मृत्युकाळीं भाग्यस्थानचें वर्ष होतें. *मृत्युकाळीं तूला लग्न उदय पावत असून शुक्र–बुध लग्नांत होते व दोन्ही ग्रहांबरोबर चंद्र, गुरु, शनि व नेपच्यून यांचे शुभ दृष्टियोग असून कोणत्या ग्रहामुळें ते बिघडले नव्हते. मरणानंतर कीर्ति-रूपें उरणाऱ्या व्यक्तींच्या मरणसमयीं ग्रहस्थिति अशीच असावयास नको काय?

* ३०–८–१९१७ रोजीं सकाळीं १० वाजतां कॉर्नवाल कौंटीतील ब्युड येथें.

ज्योतिर्माला

मासिक–पुस्तक.

अप्रत्यक्षाणि शास्त्राणि विवादस्तेषु केवलम् ।
प्रत्यक्ष्यं ज्योतिषं शास्त्रं चंद्रार्कौ यत्र साक्षिणौ ॥ १ ॥
आप्राचः कामरूपाद्द्रुहिणसुतनदप्लावितादाप्रतीचो
गान्धारात् सिंधुसाद्रांद्रघुवररचितादाचसेतोरवाचः ।
आकेदारादुदीचस्तुहिनगहनतः सन्तिविद्वत्समाजा
ये ये तानेष यत्नः सुखयतु समजान्कश्चमत्कर्तुमीष्टे ॥ १ ॥

अभिनवाऽऽवृत्ति वर्ष चवथें.
(पृष्ठें २१२)

—:o:—

संपादकः—यशवंत केशव प्रधान.
मुंबई येथें
मेसर्स वैद्य ब्रदर्स यांचे छापखान्यांत रा. रा गजानन भास्कर वैद्य,
बी. ए. यांनीं ठाकुरद्वार, मुंबई येथें छापून रा. रा. यशवंत
केशव प्रधान यांनीं दादर राऊताची वाडी,
येथें प्रसिद्ध केलें.
इ. स. १९१९

(वार्षिक वर्गणी ट. ख. सह रु. १॥)

ज्योतिर्माला.

(वर्ष चवथें एप्रिल १९१८ ते मार्च १९१९)

विषयांचीं अनुक्रमणिका.

विषय.		पृष्ठें.
१. अभिनंदनीय प्रयत्न.	अंक ११ वा.	१८३
२. इन्फ्ल्युएंझा.	,, ७ वा.	१०३
३. इन्फ्ल्युएंझा व ज्योतिषशास्त्र.	,, ७ वा.	१०५
४. ईशप्रार्थना.	,, १ ला.	१
५. कालनिर्णय व दिनवर्षपद्धति.	,, ९ वा व ११ वा.	१२९ व १८६
६. ग्रहदृष्टिविचार.	,, ६ वा व ७ वा.	८१ व १११
७. ग्रहविचार.	,, ५ वा.	९८
८. लो. टिळकांची कुंडली. ३ रा, ४ था, अंक ९ व ११ वा		११९ व १८६
९. द्विर्द्वादशयोग	,, ५ वा.	६५
१०. परिभ्रमणपद्धति.	६ वा, ७ वा, ८ वा.	
११. मातृपितृस्थानविचार.	,, ४ था.	४९
१२. शेतकी, बागायत, जिराईत इत्यादि गोष्टींचा फळज्योतिषशास्त्रदृष्ट्याविचार	अंक १ ला, १२ वा.	३१
१३. सन १९१९ साल कसें जाणार.	अंक १० वा.	१५१
१४. सात वार.	,, २ रा.	१७
१५. स्फुट विचार.	,, ३ रा, ७ वा.	४५ व ९७

॥ श्रीसद्गुरवे नमः ॥

ज्योतिर्माला

आमाचः कामरूपाद्द्रुहिणसुतनदप्लावितादाप्रतीचो
गान्धारात् सिंधुसार्द्रद्रुवररचितादाचसेतोरवाचः ।
आकेदारादुदीचस्तुहिनगहनतः सन्तिविद्वत्समाजा
ये ये तानेष यत्नः सुखयतु समजान्कश्श्रमत्कर्तुमीष्टे ॥ १ ॥

अभिनवाऽऽवृत्ति वर्ष ४ थें. } एप्रिल १९१८. { अंक १ ला.

ईशप्रार्थना.

(ले. रामचंद्र राजाराम मोकाशी, ठाणे.)

चाल—मोदहराचा प्रेम वाढवो

उ यि ! जगदंबे ! "ज्योतिर्माला"
अखंड भूषण नील नभाला ॥ धृ० ॥
स्वामी जीचा रवीच झाला ।
दावुनि रात्रीं निज तेजाला ।
सुमार्ग दावी पांथस्थाला ।
ठेवि सुखी हे मंगल वाला ॥ १ ॥
तारका नया संतमालिका ।
कीर्तिरूप कर देती लोकां ।
अज्ञान तमीं चराचराला ।
कृपा दृष्टीनें तारायाला ॥ २ ॥

सद्गुणरूपें फुलें विखुरलीं ! ।
मौक्तिकतति त्यांहीं उधळीलीं ! ।
दैववलें तीं मिळति कुणाला ।
धन्य ! धन्य ! तो जगिं या झाला ॥ ३ ॥
भूत भविष्या बाला जाणे ।
प्रतिकाराला जपतप दानें ।
सांगे लावी उद्योगाला ।
आचरुनी जे व्रत नियमांला ॥ ४ ॥
नेमें प्रतिमासीं प्रेमानें ।
होवो हीचें सदैव येणें ।
प्रकाशुनी देवो मोदाला ।
विनति अशी हे अंबे तुजला ॥ ५ ॥

(२)

कालाकाश अनंत नांदति तिथें चंद्रार्क नारीनर ।
प्राणी अन्य सुतारका विलसती विश्वांत या सुंदर ।
राहू केतु अनेक दुष्ट ग्रह ते कामादि जाणा अरी ।
दैवें जी बदले परिस्थिति तिला उल्का म्हणावें तरी ॥ १ ॥
येतां सुस्थिति भासते प्रगटली आकाशगंगा शुभा ।
सारीजे दुरितांस मेघपटला जी शोभवीते नभा ।
सूर्याला दिवसास ताप म्हणुनी रात्रीं पडे चांदणें ।
सारें हें समतोल विश्व प्रभुनें केलें अम्हां कारणें ॥ २ ॥
हे माते जगदंब अंक सुमनें प्रेमें निजांकीं धरी ।
माला अर्पुनियां तुला विनवितों तींतील हीं गोजिरीं ।
होवो ती प्रिय बालिकेसम तुला, ज्योतिर्विदांची जरी ।
प्रेमें ठेवि जपूनि ती, तिज करीं दीर्घायु या भूवरी ॥ ३ ॥

शेतकी, बागायत, जिराईत

इत्यादि गोष्टींचा फलज्योतिषदृष्ट्या विचार.

तस्माद्वा एतस्मादात्मन आकाशः संभूतः ॥
आकाशाद्वायुः ॥ वायोरग्निः ॥ अग्नेरापः ॥ अद्भ्यः पृथिवी ॥
पृथिव्या ओषधयः ॥ ओषधिभ्योऽन्नं ॥ अन्नात् पुरुषः ॥

'तैतिरीयोपनिषद्'

"To every thing there is a season, a **time** for every purpose, a time to be born, a time to die, a time to pluck up that which is planted; a time to get, and a time to lose; a time of war, and a time of peace.' Ecl. iii 1, 26, 8.

"Yes ! in the poor man's garden grow
Far more than herbs and flowers,—
Kind thoughts, contentment, peace of mind
And joy for many hours !"

सर्व प्राणिमात्राच्या जीवनास अन्नाची अत्यंत आवश्यकता आहे. व तें अन्न आपणांस जमिनीपासून मिळत आहे. जमिनीपासून अन्न तयार किंवा उत्पन्न करण्याचें जें शास्त्र तें कृषिकर्मशास्त्र होय. अनेक शतकांच्या अनुभवानें मानवजातीस ह्या विद्येसंबंधानें पुष्कळ माहिती प्राप्त झाली आहे. कृषिकर्मविद्येस **भूस्तरशास्त्र, वनस्पतिशास्त्र, रसायनशास्त्र, ज्योतिषशास्त्र,** यांचे योगानें मोठी मदत झाली आहे. सर्व फलें, पुष्पें, धान्यें हीं ज्या जमिनीपासून प्राप्त होतात ती जमीन कशी उत्पन्न झाली, तिचे घटक

कोणकोणते आहेत, त्यांतील त्यांस जमिनीपासून कोणते मिळतात, हे घटक त्यांस जमिनीपासून मिळण्याकरितां ती कोणत्या स्थितींत आणली पाहिजे त्यांस दुसऱ्या कोणत्या साधनांची मदत केली पाहिजे, जमिनींतील वनस्पतींच्या पोषणास अवश्य असे घटक कमी झाले असतां त्यांची पुनः कोणत्या रीतीनें पूर्तता केली पाहिजे वगैरे गोष्टींची ज्याप्रमाणें उत्तम पीक मिळण्याकरितां जरूर आहे त्याचप्रमाणें पाऊस केव्हां व कसा पडेल, हवेमध्यें कसकसे फेरफार होतील, योग्य कालीं कोणतीं कृत्यें करावींत, पेरणी केव्हां करावी, मळणी केव्हां करावी, धान्य घरीं केव्हां न्यावें, कोणत्या वर्षी दुष्काळ पडेल, त्या कालीं काय काय उपाय योजावेत, याबद्दलही ज्ञान होणें अत्यंत जरूरीचें आहे व हें ज्ञान ज्योतिषशास्त्राखेरीज इतर कोणत्याही शास्त्रानें प्राप्त होणार नसल्याकारणानें शेतकीस योग्य कालज्ञान करून देणाऱ्या या शास्त्राची जोड अवश्य पाहिजे असें कोणाही विचारी माणसास वाटेल. कारण प्रत्येक गोष्टीला काल हा आहेच. जन्मकाल, मृत्युकाल, लाभकाल, हानिकाल, पेरणीचा काल, लढाईचा काल, शांततेचा काल, याप्रमाणें विश्वांतील चराचर सर्व गोष्टी कालाधीन आहेत. या कालाच महिमा अगाध आहे. जो मनुष्य आपलें आचरण स्वैर न ठेवितां कालाच्या अनुरोधानें ठेवील त्याची ऐहिक व पारमार्थिक उन्नति सहज अल्प सायासानें होऊन सहसा पश्चात्ताप करण्याचा प्रसंग येणार नाहीं. भारतीय आर्यांस कालाची पूर्ण माहिती होती. कालाचें ज्ञान होण्यास ज्योतिषशास्त्र हाच राजमार्ग आहे. व याचकरितां आपल्या आर्य पूर्वजांनीं या शास्त्राची महती गाईली व यास वेदशास्त्राचें नेत्रत्व देऊन सर्व शास्त्राचें अग्रेसरत्व दिलें आहे. ग्रहनक्षत्रें अमुक अमुक असतां अमुक कृत्यें करावींत म्हणजे तीं

विशेष फलद्रुप होतात असें त्यांनीं जागोजाग प्रतिपादन करून स्वैरचरणास शक्य तेवढा आळा घालण्याचा प्रयत्न केला आहे.

शेतकीचें सर्वस्व जीवन ज्या पावसावर आहे तो पाऊस कधीं व किती पडेल हें कळणें फारच महत्वाचें आहे व म्हणून फलज्योतिषशास्त्रदृष्ट्या शेतकीसंबंधानें विचार करण्यापूर्वी कोणत्या वर्षी किती पाऊस पडेल, अवर्षण कधीं पडेल, ग्रहांचे योगानें हवेमधील फेरफार केव्हां व कसे घडतील, वादळें केव्हां होतील इत्यादि गोष्टींचा विचार चालू लेखामध्यें करावयास पाहिजे होता परंतु त्यासंबंधानें अद्याप जी माहिती—पावसासंबंधानें आंकडे —मिळण्यास पाहिजे होती ती न मिळाल्यामुळें सदरहू गोष्टींबदल विचार पुढील एखाद्या मालेच्या अंकामध्यें करण्याचें योजिलें आहे. भारतीय आर्यांनीं इतर ज्योतिषशास्त्राचे अंगाप्रमाणें याही विभागामध्यें चांगलेंच प्राविण्य मिळविलेलें त्यांच्या ठिकठिकाणच्या वचनांवरून आढळण्यांत येतें. त्यांच्याइतकें बारीक निरीक्षण आधुनिक काळांतील पाश्चिमात्य विद्वानांच्या हातून देखील झालेलें दिसत नाहीं. अमुक नक्षत्र, तिथि व मास असून अमूक एक प्रकारचे वारे वाहिलें असतां त्यांचे परिणाम काय काय पाहण्यास मिळतात यासंबंधानें त्यांनीं सविस्तर विवेचन केलेलें आहे. हल्लीं सरकारी मेट्रालॉजिकल (वातावरण विवेचन) खातें जें काम करीत आहे त्यापेक्षां किती तरी कमी खर्चामध्यें व पुष्कळ महिने अगोदर वातावरणासंबंधी किंवा पावसासंबंधानें अचुक असें भविष्य करण्याची मूलभूत तत्वें त्यांनीं आपल्या ग्रथांमध्यें सांगितलेलीं आहेत. सर्व प्रकारची उत्तम यंत्रसामुग्री व भरपूर राजाश्रय असूनही या वातावरण-विवेचन-मेट्रालॉजिकल खात्याच्या हातून तुफानी वारे, भूकंप, पाऊस इत्यादि गोष्टींसंबंधानें भविष्यें किंवा अंदाज फक्त कांहीं तास किंवा एखादा दिवस अगोदर होत आहे. हें पाहून चालू ज्ञानयुगांतील या शास्त्राची कींव

करण्याचा प्रसंग येतो. फलज्योतिषशास्त्राच्या योगानें वादळें, भूकंप, वृष्टी, अनावृष्टी, अवर्षण व महर्घता यांसंबंधानें भविष्यें किती स्वल्प साधनानें महिनेचे महिने अगोदर करितां येतात याबद्दल सवडी सवडीनें मालेमध्यें विचार करण्याचा विचार आहे. राष्ट्रामध्यें घडणाऱ्या घडामोडी, भूकंप इत्यादि कांहीं गोष्टींचा विचार करण्याची मूलतत्वें सुलभ व सोप्या भाषेमध्यें आम्हीं आमच्या **मेदिनीय** किंवा **राष्ट्रीयज्योतिष** या पुस्तकामध्यें सांगितलीं आहेत तीं पहावीं.

शेतकीस किंवा बागाईतास योग्य कालाची जरूरी आहे किंवा काय असा प्रश्न कालच नाहीं असें म्हणणाऱ्या व्यक्तीकडून येईल करितां त्यांनीं शरदृतूमध्यें पेरण्यास सांगितलेल्या धान्यांची पेरणी वसंतामध्यें करून स्वानुभवानें आपली खात्री करून घ्यावी. ज्योतिषशास्त्रामध्यें त्याचप्रमाणें कृषिकर्मविद्येमध्यें कांहीं धान्यांची पेरणी ग्रीष्मऋतू झाल्यानंतर म्हणजे वृषभ संक्रमण झाल्यानंतर करण्यास सांगितली असून कांहीं वृश्चिकसंक्रमण झाल्यानंतर करण्यास सांगितली आहे. योग्य काली म्हणजे योग्य तूकमध्यें ज्या धान्यांची पेरणी करण्यास सांगितली आहे त्या धान्यांचा देखील शुभ अशा वेळीं पेरणी वगैरे कृत्यें केलीं असता तीं विशेष फलद्रुप होतात किंवा काय हें ज्यांस पाहणें असेल त्यांनीं खालील प्रमाणें प्रयोग करून पाहावा म्हणजे त्यांची ज्योतिषशास्त्राच्या सत्यतेबद्दल सहज खात्री होईल.

योग्य हंगामामध्यें आपल्या मळ्यामध्यें उत्तम प्रकारें जमीन तयार करून नंतर तीमध्यें पेरण्यास बेताचें असें निवडक चांगलें वाटाण्याचें किंवा हरभऱ्याचें बीं घ्यावें व त्यांचे चार स्वतंत्र भाग करून निरनिराळ्या पुड्या करून ठेवाव्या. व योग्य पेरणीचा हंगाम येतांच त्या बियाण्यांतील प्रथम एका पुडीमधील बीं शुक्लपक्षाच्या प्रतिपदेस किंवा द्वितीयेस पेरावें; नंतर

दुसऱ्या पुडीमधील बीं त्याचे शेजारच्या वाफ्यामध्यें शुक्लपक्षाच्या अष्टमीस किंवा नवमीस पेरावें; तिसऱ्या पुडीमधील बीं त्याच जमिनीमधील तिसऱ्या वाफ्यामध्यें शुक्लपक्षाच्या त्रयोदशीस किंवा चतुर्दशीस पेरावें व नंतर चवथ्या पुडीमधील बीं चवथ्या वाफ्यामध्यें कृष्णपक्षाच्या त्रयोदशीस किंवा कृष्णचतुर्दशीस पेरावें. जमीन एकच, बींही एकच व पेरणारा एकच असें असूनही फक्त बीं निरनिराळ्या काळामध्यें पेरलें आहे. वस्तुतः काळ नाहीं. शुक्लपक्ष नाहीं. कृष्णपक्ष नाहीं व त्याचें शुभाशुभत्व नाहीं असें प्रतिपादन करणारांच्या मताप्रमाणें वरील च्यारही वाफ्यांमध्यें सर्वत्र सारखीच झाडांची किंवा रोपांची व त्यापासून मिळणाऱ्या पिकाची स्थिति असावयास पाहिजे होती. परंतु असा प्रकार मुळींच पाहण्यास मिळणार नाहीं. शुक्लपक्षाच्या प्रतिपदेस किंवा द्वितीयेस पेरलेल्या वाफ्यामधील रोपे फारच जोमानें व सुंदर वाढलेले दिसून त्यांस बांझ फुलें पुष्कळच आलेलीं आढळण्यांत येतील. तर शुक्लपक्षाच्या अष्टमी नवमीस लावलेल्या वाफ्यामधील रोपे पूर्वीच्या वाफ्याप्रमाणेंच जोमदार असून त्यांस पहिल्या वाफ्यापेक्षां कांहीं तरी शेंगा जास्त लागलेल्या दिसतील तर तिसऱ्या म्हणजे पौर्णिमेच्या अगोदर एकदोन दिवस लावलेल्या वाफ्यामधील रोपे फारच जोरानें वाढलेले असून त्यांस फुलागणित शेंगा लागलेल्या आढळतील. परंतु याच्या उलट प्रकार जो वाफा अमावास्येच्या एकदोन दिवसांपूर्वी पेरून तयार केला असेल त्यामध्यें आढळेल. त्यांतील रोपे रोगट, व करपून गेलेले दिसतील. असें कां व्हावें यांचें उत्तर ज्योतिषशास्त्र झूट मानणारे लोक देऊं शकतील काय ? व हाच प्रकार फलझाडामध्यें पाहण्यास मिळतो. जीं फलझाडें शुक्लपक्षाच्या द्वितीया किंवा तृतीयेस लावलीं जातात त्यांस फुलें मात्र सडकून येतात परंतु फुलें फार धरत नाहींत परंतु याचे उलट जीं फळझाडें पौर्णिमेच्या सुमारास

एकदोन दिवस अगोदर लावलीं जातात त्यांस फळें व पुष्पें दोन्हीही पुष्कळ येतात. व याच प्रकारचा अनुभव झाडांच्या किंवा कित्येक वेलांच्या वार्षिक छाटणीमध्यें येतो. जीं झाडें शुक्ल पक्षाच्या प्रतिपदा द्वितीयेस छाटलीं जातात त्यांस नवीन पालवी व फांद्या फार लवकर येतात, परंतु फळें मात्र फारच थोडीं लागतात. याचे उलट जीं झाडें पौर्णिमेच्या सुमारास एकदोन दिवस अगोदर छाटलीं जातात त्यांना ज्या नवीन फांद्या फुटतात त्या करकरून फलभारानें लवलेल्या आढळतात. फलज्योतिष शास्त्रामध्यें चंद्र हा वनस्पतीपोषक मानलेला आहे त्यामुळें तो ज्या कालीं बलिष्ठ असतो त्या वेळीं लावलेलीं झाडें जास्त जोमानें वाढून त्यांस फलें, पुष्पें जास्त येणें हें नैसर्गिक नियमांच्या विरुद्ध आहे असें कोणाच्यानें म्हणवेल काय ? चंद्र हा अमावास्येपासून पौर्णिमेपर्यंत हळू हळू वाढत असतो व या काळामध्यें वनस्पतींच्या अंगीं रसाधिक्य जास्त असतें व त्याचमुळें त्यांना जास्त फलें किंवा पुष्पें येतात असें म्हणणें प्राप्त होतें. पौर्णिमेपासून अमावास्येपर्यंत तो रोज तेजानें कमी कमी होत जाऊन जणूं काय रोगग्रस्त झाला आहे असें भासतें व ह्या त्याच्या बलहीन किंवा अशुभ स्थितीमध्यें वनस्पतींस पोषक असें द्रव्य किंवा रस कमी प्रमाणांत मिळाल्यानें या काळांत लावलेलीं झाडें खुरटीं व रोगट दिसणें नैसर्गिकच आहे.

आर्यऋषींनां शुभकालाची आवश्यकता भासली व त्यांनीं प्रत्येक कार्यास शुभकाल कसा पहावा याबद्दल ज्योतिषशास्त्राधारें नियम घालून दिलेले आहेत त्या नियमाप्रमाणें आचरण ठेविलें असतां मानवी प्राण्यांस दास्यत्व उत्पन्न होतें किंवा स्वैरवर्तनानें फायदा होतो याबद्दल वादविचार करण्याचें हें स्थळ नाहीं फक्त प्रस्तुतच्या लेखामध्यें शेतकी बागाईत इत्यादि संबंधानें योग्यकाल कसा निवडावा याबद्दल मुहूर्त ग्रंथामध्यें सांगितलेली माहिती

कोणत्या शास्त्रीय तत्वावर बसविलेली आहे इत्यादि गोष्टींचा विचार करून सदरहू नियमान्वयें योग्य काल निवडून प्रत्येकास आपआपला फायदा करून संसारांतील ऐहिक यात्रा जास्त सुखकर कशी करतां येईल हें पाहणें आहे. ज्योतिषशास्त्रामध्यें द्वादश राशि व नवग्रह हे प्रधान आहेत. नवग्रह हे नव महाशक्तयांचे द्योतक आहेत असें आपण मानूं व द्वादश राशि ह्या त्यांचीं उपांगें, साधनें किंवा उपशक्ति आहेत असें म्हणूं. ग्रह ज्या राशीमध्यें असतात त्या त्या राशींचे धर्माप्रमाणें आपली शक्ति निदर्शनास आणीत असतात. व ह्याच करितां फलज्योतिषशास्त्राचा अभ्यास करणारांस ग्रहांचे व राशींचे गुणधर्म चांगले समजले पाहिजेत. ज्यांस हे गुणधर्म चांगले समजले असतील त्यांसच या शास्त्राचा उत्तम उपयोग करतां येईल. खालील प्रमाणें पूर्वाचार्यांनीं ग्रहांचे व राशींचे गुणधर्म सांगितलेले आहेत. हे गुणधर्म सायन किंवा निरयन अशा कोणत्या एका विवक्षित पद्धतीस धरून दिलेले नाहींत. ते राशींच्या मूळ आर्य ग्रंथांत सांगितलेल्या गुणधर्मावरून दिलेले असून त्यांत कित्येक ठिकाणीं स्वानुभवाची जोड दिलेली आहे.

(१) फलज्योतिष शास्त्रामध्यें रवि, चंद्र, मंगळ, बुध, गुरु, शुक्र, शनि, हर्शल (प्रजापति) व नेपच्यून (वरुण) असे नऊ ग्रह मानिले आहेत. राहु व केतु ग्रह नसून पृथ्वीची व चंद्राची कक्षा ज्या दोन ठिकाणीं एकमेकांस छेदिते ते बिंदु आहेत.

कित्येक लोक यांस ग्रह असें मानतात व त्याप्रमाणें मानलें असतां विशेष हरकत दिसत नाहीं. ग्रहांमध्यें चंद्र, बुध, शुक्र, व गुरु हे शुभ असून हे वनस्पतींस पोषक असे आहेत.

रवि, मंगळ, शनि, हर्शल व नेपच्यून हे अशुभ असून नाशकारक

आहेत. त्यांतलेत्यांत मंगळ व शनि यांचा नाशकारक धर्म फारच जोराचा पाहण्यास मिळतो.

सूर्य पृथ्वीभोंवतीं (वस्तुतः पृथ्वी सूर्याभोंवतीं) ज्या दीर्घ वर्तुळ मार्गानें फिरतोसा दिसतो त्यास क्रांतिवृत्त म्हणतात. याचे १२ भाग केले म्हणजे त्या प्रत्येक भागास राशि म्हणतात. प्रत्येक राशि ३० अंशांचा असतो, मेष, वृषभ, मिथुन, कर्क, सिंह, कन्या, तूळ, वृश्चिक, धनु, मकर, कुंभ, व मीन अशीं बारा राशींचीं नांवें आहेत.

राशींचे स्वामी.

मेष,	वृश्चिक,	मंगळ.
वृषभ,	तूळ,	शुक्र.
मिथुन,	कन्या,	बुध.
धनु,	मीन,	गुरु.
मकर,	कुंभ,	शनि.
सिंह,		रवि.
कर्क,		चंद्र.

कुंभ स्वामी हर्शल (प्रजापति)

मीन स्वामी नेपच्युन (वरुण)

(४) राशींचे गुणधर्मः—

पृथ्वीराशि—वृषभ, कन्या, मकर.

जलराशि—कर्क, वृश्चिक, मीन.

अग्निराशि—मेष, सिंह, धनु.

वायुराशि—मिथुन, तूळ, कुंभ.

अतिप्रसवराशि—कर्क, वृश्चिक, मीन.

मध्यम प्रसवराशि—वृषभ, तूळ, मकर.

वंध्याराशि—मेष, सिंह, कन्या, कुंभ.

मध्यमवंध्याराशि—मिथुन, धनु.

यावरून असें आढळून येईल कीं जर आपण **वंध्या** (मेष, सिंह, कुंभ, किंवा कन्या) राशीमध्यें वनस्पति पोषक **चंद्र** असतां बीं पेरलें तर त्यापासून उत्पन्न होणाऱ्या झाडास त्या त्या राशीच्या नैसर्गिक गुणधर्माप्रमाणें फार फळें येणार नाहींत. व हा अनुभव कृष्णपक्षामध्यें अमावास्येच्या अगोदर एक दोन दिवसांत पेरलेल्या बियांसंबंधानें जास्त स्पष्ट रीतीनें पाहण्यास मिळेल. परंतु तेंच बीं आपण **चंद्र प्रसव** (कर्क, मीन, वृश्चिक वृषभ व तूळ) राशीमध्यें असतां लावलें तर त्यापासून उत्तम वृक्ष निर्माण होऊन त्यांस फळें व पुष्पेंही पुष्कळच आलेलीं आढळतील व हा अनुभव शुक्लपक्षांत लावलेल्या झाडांसंबंधानें फारच उत्तम पाहण्यास मिळेल. त्याचप्रमाणें वंध्या राशीमध्यें चंद्र असतां शेतांतील किंवा बागेंतील लहान लहान उपद्रवी झाडें उपटून टाकली तर तीं पुन्हा कमी जोमानें उगवलेलीं आढळतील, परंतु तींच प्रसव राशींत चंद्र असतां उपटून टाकलीं तर पुन्हा प्रसव राशीचे संजीवनी धर्माप्रमाणें पुन्हा जोरानें फुटलेलीं दिसतील. असो, आतां आपण प्रत्येक राशींत चंद्र असतां शेतकीचे किंवा बागाईत संबंधी कोणकोणतीं कृत्यें केलीं असतां जास्त फायदेशीर होतील याचा राशिपरत्वें विचार करूं.

(५) **मेष**—हा आर्द्र व वंध्या या गुणांनीं युक्त असा राशि आहे. म्हणून या राशींत चंद्र असतां झाडें लावणें, लावणी अगर पेरणी हीं कामें उपयोगाचीं दिसत नाहींत. परंतु या दिवसांत निरुपयोगी झाडें उपटून टाकणें, शेतांची मशागत करणें, रावणी करणें, बेणणी करणें इ०

कामें केलीं असतां चालतील. कित्येक या राशींतील चंद्र कांद्याची लागवड करण्यास चांगला मानतात.

(६) **वृषभ**—हा बराच आर्द्र व प्रसव राशि आहे हा राशि पृथ्वी तत्वाचा असून यामध्यें चंद्र शुक्लपक्षामध्यें फारच बलिष्ठ मानतात. या कारणानें हे दिवस कोणत्याहि प्रकारची लागवड करण्यास उत्तम असतात. त्यांत बटाटे, कोबी किंवा राताळ्या सारखे कंदमय व लवकर वाढणाऱ्या झाडांची लागवड या दिवसांत केली असतां विशेष फायदेशीर होते.

(७) **मिथुन**—हा शुष्क व वंध्या राशि असल्याकारणानें या राशींत चंद्र असतां पेरणी किंवा लावणी करणें अथवा एखादें झाड उपटून दुसरीकडे लावणें फायदेशीर होणार नाहीं. परंतु या दिवसांत बेणणी करणें, उपद्रवी रानटी झाडें उपटून टाकणें, राब करणें इ० गोष्टी करण्यास हरकत नाहीं.

(८) **कर्क**—हा क्रांतिवृत्तांतील सर्व राशींत अतिप्रसव, फलद्रुप व आर्द्र रास असल्याकारणानें या राशींत चंद्र असतां कोणतेंही बीं पेरलें तर त्यापासून उत्तम झाडें, फळें व फुलें मिळालीं पाहिजेत. शुक्लपक्षांतील ज्या दिवशीं या राशीमध्यें चंद्र असतो ते दिवस पेरणीस किंवा लावणीस फारच उत्तम असतात.

(९) **सिंह**—हा राशि वंध्यातम असल्याकारणानें या दिवसांत पेरणें कधींही फायदेशीर होणार नाहीं. बेणणीं, नाशकारक झाडेंझुडपें तोडणें, उपटणें, झाडांच्या मुळांचा नाश करणें, मोठमोठे वृक्ष तोडणें या गोष्टी शास्त्रसिद्ध होतील.

(१०) **कन्या**—हा वंध्या राशि आहे. पण थोडा आर्द्र असावा असें वाटतें तरी पण हा बीं पेरण्यास, रोप करण्यास, किंवा एका ठिकाणाचीं

झाडें उपटून दुसरीकडे लावण्यास उपयोगी नाहीं. बेणणी, राबणी, झाडांचा नाश इ० कृत्यांस मात्र योग्य आहे.

(११) **तूळ**—हा राशि म्हणण्यासारखा प्रसवशील नाहीं, या राशींत चंद्र असतां पेरलेल्या बियांचे रोपास शेंगा किंवा धान्याचीं कणसें म्हणण्यासारखीं पुष्कळ येत नाहींत, परंतु झाडें मात्र सुरेख रीतीनें पोसलेलीं पाहण्यास मिळतात, म्हणून दिखाऊ झाडें, विलायती गवत, कडबा किंवा गुरांचे चाऱ्याचें बीं या काळांत पेरले असतां शास्त्रोक्त होणार नाहीं काय ? चंद्र तुळेमध्यें असतो त्या दिवशीं कोबी, बटाटे यांची लागवड करणें चांगलें असें कित्येकांचें मत आहे परंतु वृषभ राशींतील चंद्र हा कंदमय पदार्थांस जितका पोषक तितका तुळेंतील आढळत नाहीं करितां कंदमय पदार्थाची लागवड या दिवसांत करण्यापेक्षां या दिवसांत पाळक, कोबी, मेथी, आलु वगैरे पाले भाजीची लागवड केली असतां त्यापासून जास्त फायदा होईल.

(१२) **वृश्चिक**—या राशीतील जरी कर्केंतील चंद्र इतका प्रसव नाहीं तरी पुष्कळ अंशीं प्रसव असल्याकारणानें जीं कामें कर्क राशींत चंद्राचे दिवशीं करण्यास सांगितलीं आहत तीं करण्यास हरकत नाहीं.

(१३) **धनु**—हा वंध्या राशि आहे, म्हणून या दिवसांत कांदे, विलायती गवत इ० ची लागवड करावी. ज्या वनस्पतींच उत्तम बीं पाहिजे असेल तें बीं या दिवशीं पेरावें व त्यापासून बीं धरावें.

(१४) **मकर**—हा राशि पृथ्वीतत्वाचा असून शेवटाल थोडा भाग जलतत्वाचा मानला आहे व हा प्रसवशील आहे, त्यामुळें या राशींत चंद्र असतां बटाटे वगैरेंची लागवड करावी, व वृषभस्थ चंद्र असतां सांगितलेल्या गोष्टी कराव्या.

(१५) **कुंभ**—हा वंध्या राशि असल्याकारणानें राबणी, बेणणी, झाडें उपटणें, जमिनीची मशागत करणें या कामास या राशीचा चंद्र फायदेशीर होतो.

(१६) **मीन**—हा राशि अतिप्रसव आहे, त्यामुळें कोणत्याही प्रकारची लागवड करण्यास या राशींत चंद्र असतां ते दिवस योग्य आहेत. कर्कस्थ चंद्र असतां जीं कृत्यें करावयास सांगितलेलीं आहेत तीं करावीं.

(१७) वरील विवेचनावरून आपणास सहज कळून येईल कीं कोणत्याही प्रकारचें बीं पेरणें असतां किंवा एका ठिकाणचीं झाडें दुसऱ्या ठिकाणीं लावणें असतां किंवा झाडाचीं कलमें करणें असतां ज्या दिवशीं चंद्र कर्क, मीन व वृश्चिक राशींमध्यें असतो ते दिवस जास्त शुभ होत. याचे खालोखाल वृषभ व मकर राशीचे चंद्राचे दिवस होत, नंतर तुला व धनु ह्या राशीचे चंद्राचे दिवस येतात. कुंभ, मेष, कन्या मिथुन व सिंह या राशींच्या चंद्राचे दिवस अनुक्रमानें कमी कमी योग्यतेचे आहेत.

(१८) साधारणपणें सर्व धान्याची पेरणी योग्य हंगामामध्यें शुक्ल पक्षाच्या पौर्णिमेपर्यंत करावी. त्यांतलेल्यांत नेहमीं अष्टमीपासून पौर्णिमेपर्यंतचे दिवस उपयोगांत आणावेत. व ह्या दिवसांत चंद्र कर्क, मीन, वृश्चिक, वृषभ, तुला व मकर या राशींमधील अनुक्रमान्वयें शुभाशुभ असतो. कर्क व मीन राशींमधील सर्वांत श्रेष्ठ जाणावा. या कालांतील धान्याचीं रोपें जोमानें वाढून त्यांपासून धान्याच्या लोंब्या जोरदार व भरींव लागतात.

(१९) फलझाडें नेहमी कर्क, मीन, वृषभ, तुला व मकर राशींच्या चंद्रावर व शुक्लपक्षाचे पौर्णिमेच्या अगोदर एकदोन दिवस लावावीं. हाच नियम फलभाज्यांचे लागवडीस आहे. उदाहरणार्थ घोसाळीं, भेंडे, गोवार, तोंडलीं वगैरे भाज्या शुक्लपक्षामध्यें पौर्णिमेच्या एकदोन दिवस अगोदर लावाव्या व त्या वेळीं चंद्र कर्क, मीन, वृषभ, तुला किंवा मकर राशींमध्यें असावा.

(२०) फुलझाडें नेहमी शुक्लपक्षामध्यें प्रतिपदा, द्वितीया किंवा तृतीया या तिथीचे सुमारास लावावीं व त्या काळीं चंद्र कर्क, वृश्चिक, मीन, वृषभ, मकर व तुला या राशींमध्यें असावा.

(२१) कृष्णपक्षामध्यें साधारणपणें झाडें तोडणें, धान्य सांठवून ठेवणें

वगैरे करणें, खळ्यांत धान्य नेणें, शेतामधील किंवा बागेमधील रानटी झाडें उपटून काढणें इत्यादि कामें करावींत व त्या कामास मेष, सिंह, धनु व कन्या ह्या राशींचा चंद्र जास्त चांगला असतो. शुक्लपक्षामध्यें झाडें तोडलीं तर त्या लांकडांस लवकर कीड लागते व त्यापासून हरभऱ्याचे पिठासारखा भुसा पडतो.

(२२) वेली फार पसरूं नयेत म्हणून त्या कृष्णपक्षामध्यें छाटाव्यात कारण कृष्णपक्षामध्यें वनस्पतीमध्यें रसाधिक्य कमी प्रमाणामध्यें असतें व त्यामुळें त्यांची वाढ आंखूड होते.

(२३) बगीच्यामध्यें किंवा मळ्यामध्यें होणाऱ्या कॉली, बटाटे, कोबी, मुळे, अलकोल, फ्लावर, वांगीं इत्यादि भाज्यांची लागवड शुक्लपक्षामध्यें ज्या दिवशीं चंद्र कर्क, मीन, वृषभ, किंवा वृश्चिक राशींमध्यें असतो त्या वेळीं करावी.

(२४) कोबी, घेवडा, वाटाणें, सर्वप्रकारचीं धान्यें, गहूं, बाजरी, नागली किंवा भात यांची लागवड विशेषेंकरून शुक्ल पक्षांतील पौर्णिमेच्या अगोदर एक दोन तीन दिवसांत ज्या काळीं चंद्र कर्क किंवा तुला राशींमध्यें असतो त्या वेळीं करावी.

(२५) गुरांच्या कडब्याकरितां किंवा चाऱ्याकरितां जें बीं पेरावयाचे असेल ते शुक्लपक्षामध्यें चंद्र ज्या दिवशीं तुला राशीमध्यें असेल त्या दिवशीं पेरावें.

(२६) जीं झाडें आपणांस नुसतीं दिखाऊ व पोसलेलीं व पुष्कळ फलांनीं युक्त अशीं पाहिजे असतील तीं शुक्लपक्षाच्या द्वितीयेनंतर व पौर्णिमेच्या आत चंद्र ज्या काळीं तुला राशीमध्यें असेल त्या वेळीं लावावीं.

(२७) बहुशः गुलाब, मोगरा, शेवती, इत्यादि फुलझाडें शुक्ल पक्षामध्यें द्वितीयेनंतर व अष्टमीच्या आत ज्या दिवशीं चंद्र तुला, कर्क, मीन व वृषभ राशींमध्यें आहे अशा दिवशीं लावावीं.

(२८) मुळे, बटाटे, गाजरें, बिट, इत्यादि ज्या भाज्या कंदमय अस-

तात त्यांची लागवड योग्य हंगामामध्यें शुक्लपक्षामध्यें पौर्णिमेच्या अगोदर ज्या दिवशीं चंद्र तुला किंवा मकर राशीमध्यें असतो त्या वेळीं करावी. परंतु कर्क, वृश्चिक व मीन या राशींतील चंद्र असतां देखील करण्यास हरकत नाहीं.

(२९) मेथी, चाकोत, पालक, अळु वगैरे पालेभाजी शुक्लपक्षामध्यें चंद्र तुला राशीमध्यें असतां लावावी. कारण या दिवसांत लावलेली भाजी फार लवकर व चांगली पोसते.

(३०) ज्या फळामध्यें रसप्राधान्यत्व जास्त आहे अशीं फलें कलिंगडें, कोहोळे, भोपळे, काकडया, टरबुजें, इत्यादि वेलांस येणाऱ्या फलांचें बीं योग्य हंगामामध्यें शुक्लपक्षामध्यें चंद्र ज्या वेळीं कर्क, वृश्चिक किंवा मीन राशींमध्यें असतो त्या वेळीं लावावें.

(३१) फलझाडांची वार्षिक छाटणी नेहमी शुक्लपक्षामध्यें करावी. त्याचप्रमाणें कोणत्याही झाडांपासून कलमें तयार करणें असता ती शुक्लपक्षांत करावीं.

कोणत्याही फलझाडांचीं कलमें करणें असतां तीं खालील प्रमाणें योग्य हंगामामध्यें शुभ दिवशीं करावींत. नेहमी कलमें जोमदार व फळें भरपूर देणाऱ्या झाडापासून करावींत. कलमे केव्हांही खुरटट, रोगट व कमी फल देणाऱ्या झाडापासून करूं नयेत. शुक्लपक्षामध्यें चंद्र ज्या वेळीं राशिचक्रामधील सर्वांत अतिप्रसव अशा कर्क राशीमध्यें असतां बांधावींत. त्यानंतर वृश्चिक व मीन राशी ह्या योग्य होत. ह्या तीन राशींमध्यें कलमें करण्यास नच जमल्यास मकरराशींत चंद्र ज्या दिवशीं आहे तो दिवस उपयोगामध्यें आणावा. कलमें तोडून इतर ठिकाणीं लावणें असतां वरील प्रमाणेंच दिवस योजावा. सर्व प्रकारची भाजी लावणें, बीं पेरणें; कलमें लावणें, एकाठिकाणचीं रोपे उपटून दुसरीकडे लावणें हीं सर्व कामें शुक्लपक्षामध्यें ज्या दिवशी चंद्र कर्क, वृश्चिक, मीन वृषभ किंवा मकर राशींमध्यें असेल त्या दिवशीं करावींत. (अपूर्ण)

॥ श्रीसद्गुरवे नमः ॥

ज्योतिर्माला

आप्राचः कामरूपाद्द्रुहिणसुतनदप्लावितादाप्रतीचो
गान्धारात् सिंधुसार्द्रांद्रघुवररचितादाचसेतोरवाचः ।
आकेदारादुदीचस्तुहिनगहनतः सन्तिविद्वत्समाजा
ये ये तानेष यत्नः सुखयतु समजान्कश्चमत्कर्तुमीष्टे ॥ १ ॥

अभिनवाऽऽवृत्ति वर्ष ४ थें. } जून १९१८. { अंक ३ रा.

परीभ्रमण पद्धति

अर्थात्

भविष्य निर्णयाचें सुलभ साधन.

लेखकः—राम नारायण.

भविष्यकाल कळावा म्हणून फलज्योतिषाचा अवतार आहे परंतु गेल्या दोन हजार वर्षांत ह्या शास्त्रासंबंधानें हजारो ग्रंथ होऊनही संपूर्ण व तंतोतंत भविष्य करतां येईल अशी एकही पद्धति उपलब्ध झाली नाहीं ! आर्यांच्या दशा, यवनांचें ताजिक व पाश्चिमात्यांच्या डायरेक्शन्स यांपैकीं कोणत्याही पद्धतीनें अगदीं बिनचूक व तंतोतंत भविष्यनिर्णय करतां येईल असें वाटत

नाहीं. सूक्ष्म गणिताच्या सहायानें वरील पद्धतीनें भविष्यनिर्णय झालाच पाहिजे अशी कोणाची समजूत असल्यास ती चुकीची ठरेल. पूर्वोक्त पद्धतीनें भविष्यनिर्णय कांहीं आणेवारीनेंच बरोबर येतो. अशी हल्लीं भविष्य निर्णयाच्या बाबतींत फलज्योतिष वाङ्मयाची स्थिति आहे. दशा, ताजिक व डायरेक्शन्स यांपैकीं कोणत्या पद्धतीनें अधिक अनुभव येतो याचा निर्णय हल्लीं जवळ जवळ झाल्यासारखाच आहे. दशा व ताजिक या दोन्ही पद्धतींपेक्षां डायरेक्शन्स अधिक अनुभवास येतात असा निर्णय पुष्कळ ज्योतिर्विदांचा आहे. हा निर्णय तिन्हीही पद्धतींच्या केवळ ग्रथोक्त फलावरून झालेला आहे. हा निर्णय खरा किंवा खोटा आहे यासंबंधानें आम्ही आतां कांहींच मत देत नाहीं परंतु दशा कमी दर्जाच्या ठरण्यापूर्वी त्यांच्या संबंधानें व्हावें तितकें संशोधन झालें नाहीं येवढें मात्र येथें नमूद करून ठेवितों.

भविष्यनिर्णयासंबंधानें एक गोष्ट विशेष लक्ष्यांत ठेविली पाहिजे कीं ग्रंथांमध्यें कोणत्याही पद्धतीचें विवेचन तात्विक दृष्ट्याच केलेलें असतें. या तात्विक विवेचनावरून ज्योतिषांना विवक्षित कुंडल्यांतील योगांचें भविष्य करावें लागतें. तात्विक फलांच्या आधारावर विशिष्ट फलें वर्तविण्यांत पराकाष्ठेची कुशलता असावी लागते. हें कौशल्य कांहीं व्यक्तिनिष्ठ प्रयत्नावर व कांहीं अंशीं विशिष्ट पद्धतीच्या सत्यतेवर अवलंबून असतें. पद्धतीमध्यें ज्या मानानें सत्यांश असेल त्या मानानें व्यक्तिनिष्ठ कौशल्यास कळा चढते. दशा, ताजिक व डायरेक्शन्स या तिन्हीही पद्धतींमध्यें सत्यांश कमी अधिक प्रमाणानें आहेच यासंबंधानें [illegible] उपस्थित होईल असें वाटत नाहीं. पण अलीकडे प्रसिद्ध होत असलेल्या ज्योतिष वाङ्मयावरून असें दिसतें कीं पाश्चिमात्यांच्या डायरेक्शन्स पद्धतीची सत्यता विशेष अनुभवास येते. हा निर्णय तिन्ही पद्धतींच्या केवळ ग्रंथोक्त फलावरून झालेला आहे. डायरेक्शन्सची माहिती आपणास ग्रंथांवरून सहज करून घेतां येते. परंतु दशा पद्धतींसंबंधानें निश्चित माहिती मिळत नाहीं. हल्लीं आम्ही ज्या दशा विचारांत घेतों त्या दशा वराहमिहिर [illegible] त्याच्या पूर्वीचे आचार्य विचारांत घेत

नव्हते. फार प्राचीन काळापासून दशा आमच्या देशांत प्रचलित आहेत हें खरें परंतु हल्लींच्याच दशा पूर्वी प्रचारांत होत्या किंवा काय हा प्रश्न आहे. प्राचीन व अर्वाचीन दशा पहाण्याच्या प्रकारामध्यें बरीच तफावत आहे याची बरोबर कल्पना बृहत् जातकांत दिलेली पद्धति पाहिली असतां होईल. वराहोक्त पद्धति हल्लीं प्रचारांत नाहीं याचें कारण ती अविश्वसनीय आहे म्हणून किंवा तिचें ज्ञान नाहीं म्हणून ? ती अविश्वसनीय आहे असें म्हणण्यास तिचा अनुभव कितो ज्योतिषांनीं घेतला आहे ? आम्हीं वराहोक्त पद्धति केवळ उदाहरणार्थ म्हणून घेतली आहे त्याशिवाय दशापद्धतीच्या उपपत्तीसंबंधानेंही आमच्याजवळ कांहींच माहिती नाहीं. सारांश हल्लीं आम्हांला दशांची म्हणण्यासारखी—निदान डायरेक्शन्सची जितकी माहिती आपणास करून घेतां येते तितकी—माहिती आम्हांस नाहीं आणि म्हणून पाश्चात्यांच्या डायरेक्शन्स अधिक अनुभवास येतात असें म्हणणें प्राप्त होतें.

डायरेक्शन्सवरून केलेलीं भविष्यें अगदीं तंतोतंत नसलीं तरी समाधानकारक असतात याचा अनुभव पुष्कळांस आहे पण ह्या डायरेक्शन्स काढण्यांत पुष्कळच मेहनत करावी लागते. डायरेक्शनपैकीं ज्यांना "प्रायमरी" अशी संज्ञा आहे त्या काढण्यास तर त्रिकोणमितीचें ज्ञान चांगलेंच असावें लागतें. डायरेक्शन पहाणाऱ्या ज्योतिषांमध्यें शेंकडा दहा तरी प्रायमरी डायरेक्शन्स पहात असतील किंवा नाहीं याची शंका आहे. याचें मुख्य कारण पद्धतीचें काठिण्य हें आहे. डायरेक्शन्स पहाणाऱ्याचा भर दिनवर्ष पद्धतीकडे विशेष असतो कारण ही पद्धति प्रायमरी डायरेक्शनपेक्षां सोपी आहे. वास्तविक पहातां दिनवर्षपद्धतीमध्यें काठिण्य कमी आहे असें नाहीं पण सामान्य मनुष्यालासुद्धां परिश्रमानें ती साध्य करून घेतां येईल इतकेंच. ह्या पद्धतीलासुद्धां साधनानुकूलता चांगली असावी लागते. ती सर्व वेळीं आमच्या इकडील ज्योतिषांजवळ असणें शक्य नाहीं आणि यामुळें पुष्कळ वेळां तिचा कांहींच उपयोग करून घेतां येत नाहीं. भविष्य निर्णयाची पद्धति सोपी तर अवश्य पाहिजे आणि येवढें असून तिला शक्य तितकी

कमी साधनें लागावींत. नुसत्या जन्मकाळच्या कुंडलीवरून भविष्य निर्णय करतां यावा. दिनवर्ष पद्धतीसाठीं जन्मवर्षीचें दैनिक ग्रहांचें पंचांग अवश्य पाहिजे व ताजिकांत दरवर्षाचें पंचांग पाहिजे व त्यानंतर गणिताची उभारणी. प्राथमरी डायरेक्शन्सची गोष्ट बोलावयासच नको. सारांश कोणतीही पद्धति नुसत्या जन्मकुंडलीवरून कोणत्याही वर्षाचें भविष्यज्ञान करून घेतां येईल इतकी सोपी पद्धति ज्योतिषाजवळ अवश्य पाहिजे. ग्रंथांमध्यें उपलब्ध असलेल्या अनेक पद्धती पाहिल्या असतां **निव्वळ जन्मकुंडलीवरून विश्वसनीय भविष्यें करतां येतील अशी एकच "परिभ्रमण पद्धति" दिसते.** दिनवर्ष पद्धतीपेक्षां अतिशय सोपी, साधनांची यत्किंचितही जरूर नाहीं आणि इतकें असून अनुभवाच्या कामांत दिनवर्ष पद्धतीप्रमाणेंच विश्वसनीय असल्यामुळें "परिभ्रमण पद्धती"ची योग्यता विशेष आहे. ह्या पद्धतीसंबंधानें गेल्या तीन वर्षांत आम्हीं आपल्या लेखांत पुष्कळ वेळां उल्लेख केलेला आहे त्यावरून कांहीं जिज्ञासु वाचकांनीं ह्या पद्धतीची माहिती प्रसिद्ध व्हावी म्हणून लिहिलें होतें परंतु आजपर्यंत अनेक कारणामुळें आमच्या जिज्ञासु वाचकांची इच्छा आम्हांस पुरी करतां आली नाहीं. शेवटीं ह्या पद्धतीच्या पुरस्कर्त्याचा ज्योतिष्यात्मक चरित्रलेख लिहिल्यावर तिची संकलित माहिती देण्यास प्रवृत्त होत आहोंत.

"परिभ्रमण पद्धतीची परंपरा."

जुन्या संस्कृत ग्रंथांत ग्रहांचे योग कोणत्या काळीं फलद्रूप होतील हें सांगितलेलें असतें हें पुष्कळ वाचकांच्या पहाण्यांत आलें असेलच. ग्रहयोग त्या त्या ग्रहाच्या दशाकाळीं फलद्रूप होतात हा सिद्धांत आर्य ज्योतिषग्रंथांत ठळक रीतीनें नमूद केलेला आहे, त्या खेरीज दशाकाळ लक्षांत न घेतां ग्रहयोग फलद्रूप होतात असेही उल्लेख अनेक ठिकाणीं आहेत. अशा रीतीनें सांगितलेल्या ग्रहयोगांच्या फलद्रूपतेचे काळ कोणत्या तत्वावर बसविलेले आहेत हें अद्यापि गूढच आहे पण हें गूढ सोडविण्याच्या प्रयत्नामुळेंच परिभ्रमणपद्धतीची सिद्धता होत गेलेली आहे. कै. चिटणीसांनीं ज्या वेळीं जुन्या ग्रंथांतील ग्रहयोगांच्या फलद्रूपतेच्या काळासंबंधानें विचार करण्यास सुरुवात केली त्या वेळीं ग्रहांचे कांहीं विशिष्ट काळ आहेत असें त्यांच्या दृष्टोत्पत्तीस आलें. मात्र हे काल निरनिराळ्या ग्रंथांत निरनिराळे आढळून आले. अर्थातच निरनिराळ्या ग्रंथांतील ग्रहांचे निरनिराळे काल घेऊन अनुभवाच्या कसोटीस लावल्यावर ग्रहांच्या परिभ्रमणामुळें होणारे परिणाम दिसून आले. आंग्लज्योतिर्विद पहिला राफेल यांनीं दिलेल्या ग्रहांच्या परिभ्रमणकाळाचा अनुभव आल्यावर त्यांनीं त्याच कालसंख्या कायम केल्या पण नुसत्या परिभ्रमणकालांनीं भविष्य निर्णय होत नाहीं असें जेव्हां त्यांच्या अनुभवास आलें तेव्हां वर्षानुरोधानें लग्नचलन व मुख्यतः रविचंद्रादिकांच्या गोचर भ्रमणांमुळें मूळच्या आणि भ्रमणकालीन ग्रहयोगांवर होणारा परिणाम या दोन गोष्टींची जोड चिटणीसांनीं दिली. ह्या दोन्ही गोष्टी परिभ्रमणासंबंधानें तरी राफेलच्या स्वप्नींही नव्हत्या. असो. कै. चिटणीसांनीं यापुढें हजारो कुंडल्या पाहून स्वतः नियम बसविले व नंतर ह्या पद्धतीसंबंधानें उघडपणें आपला अनुभव लोकांपुढें मांडण्यास सुरुवात केली. ते केवळ परिभ्रमणपद्धतीनें भविष्य वर्तवीत व त्यांचीं भविष्यें आश्चर्यकारक रीतीनें बरोबर येत. अस्ट्रालॉजर्स मॅगेझीनमध्यें किंवा आंग्लज्योतिर्विदांबरोबर ह्या पद्धतीसंबंधानें झालेल्या चर्चेमुळें ह्या पद्धतीवर कांहीं निराळाच प्रकाश पडला. रा. चिटणीसांनी ह्या पद्धतीसंबंधानें चर्चा करून केवळ तिच्यासंबंधानें औत्सुक्य मात्र वाढविलें. तिच्या प्रसारास अनुभविक सिद्धांताचा ग्रंथ असणें आवश्यक होतें. ह्या पद्धतीवर संग्रहात्मक कांहींच लिहिलें न गेल्यामुळें पद्धतीचा प्रसार मुळींच झाला नाहीं. त्यांचा अनुभव, त्यांची तर्कशक्ति व शोधक बुद्धि हीं सर्व कांहीं अपूर्व होतीं परंतु त्यांना ग्रंथरूपानें स्थैर्यत्व न आल्यामुळें सर्व कांहीं असून नसल्यासारखेंच झालें आहे. प्रत्यक्ष त्यांच्या लेखणींतून जर ह्या पद्धतीची माहिती उतरती तर फार उत्तम झालें असतें परंतु तसा योग घडून न आल्यामुळें त्यांचा अनुभव त्यांच्याबरोबरच नष्ट झाला. आज फक्त पद्धतीचा सांगाडा आपल्या-

समोर आहे. कै. चिटणीसांनीं ज्या पद्धतीनें भविष्यें वर्तवून परकीयांसही थक्क करून सोडलें. त्या पद्धतीची हल्लींची स्थिति म्हणजे सांचलेल्या पाण्याच्या डबक्याप्रमाणें झाली आहे. चर्चारूप जिवंत झरा उत्पन्न झाल्याखेरीज ती लोकोपयोगी होणार नाहीं अशी खात्री झाल्यावर जी कांहीं माहिती आम्हांस आमचे गुरु. रा. रा. लक्ष्मण बा. राजे यांचेकडून मिळाली तीमध्यें आमच्या अल्प समजुतीप्रमाणें स्वानुभवानुरूप शक्य ती सुधारणा करून लोकोपयोगार्थ चर्चा व्हावी म्हणून जिज्ञासु वाचकांस सादर करीत आहों.

(१) ग्रहांचे भ्रमणकाळ.

जन्मकुंडलींतील ग्रहयोग ग्रहांच्या भ्रमणानुरूप फलद्रूप होत असतात. हे भ्रमणकाळ पुढें लिहिल्याप्रमाणें आहेत:—

रवि	चंद्र	बुध	शुक्र
१९	४	१०	८
मंगळ	गुरु	शनि	हर्शल
१९	१२	३०	८४

नेपच्युन १६४ राहु १८ केतु १८.

वर दिलेल्या भ्रमणकाळांत गुरु, शनि, हर्शल व नेपच्युन यांचे भ्रमणकाळ गोचर भ्रमणांच्या इतकेच आहेत ह्यावरून कित्येक ज्योतिर्विदांच्या मतें परिभ्रमण पद्धतींत गोचर पद्धतीपेक्षां म्हणण्यासारखा फरक कांहीं नाहीं. पण ज्या अर्थी परिभ्रमणपद्धतींत कोणताही ग्रह वक्री होत नाहीं इतकेंच नव्हे तर मूळ कुंडलींत ग्रह वक्री असला तरीसुद्धां तो भ्रमणकालाच्या गतीनें नेहेमीं मार्गीच असतो त्या अर्थी प्रस्तुत पद्धतींतील भ्रमणकाळाच्या ऐवजीं गोचर ग्रहांचीं भ्रमणें घेऊन चालावयाचें नाहीं. कोणत्याही वेळीं गुरु वगैरे ग्रह प्रस्तुत पद्धतीप्रमाणें मांडावयाचे असतील तेव्हां भ्रमणकालगतीनें जेथें येतील तेथेंच मांडले पाहिजेत.

वरील भ्रमणकाळापैकीं मंगळाच्या भ्रमणकाळासंबंधानें दोन मतें आहेत. दुसऱ्या मतानें मंगळाचा भ्रमणकाळ १९ वर्षांचा आहे. या काळासंबंधानें आज नक्की कांहींच निर्णय लागला नाहीं. एवढें मात्र म्हणतां येईल कीं १९ वर्षांच्या काळानें कांहीं प्रसंगीं फलें दृष्टोत्पत्तीस येतात. पण उलटपक्षीं अनेक कुंडल्यांमध्यें १९ वर्षांनीं फलें अनुभवास येतात. प्रस्तुत आम्हीं १९ वर्षांचा काळ अधिक ग्राह्य मानतों पण यापुढें जर कोणी १९ वर्षांचा काळ अधिक अनुभवास मिळतो असें दाखवून देईल तर आम्हीं आमचें मत बदलूं. चिटणीसांनीं जुन्या ज्योतिर्मालेंत मंगळाचा परिभ्रमण काळ १९ चा दिला आहे.

कांहीं ज्योतिषांनीं चंद्राच्या ४ वर्षांच्या भ्रमणकाळासंबंधानें संशय दर्शविला आहे पण आमच्या मतें चंद्राचा भ्रमणकाळ बरोबर आहे.

(२) वार्षिक लग्न.

परिभ्रमण पद्धतीमध्यें नांवाप्रमाणें केवळ भ्रमणकाळचे नुसते ग्रह घेऊन भागत नाहीं तर एक महत्वाची गोष्ट लक्ष्यांत घेतली पाहिजे कीं वर्षारंभ कोणत्या स्थानापासून होतो हें ठरवून त्याप्रमाणें ग्रहांचीं फलें लक्ष्यांत घ्यावयाचीं असतात. पहिलें वर्ष तनुस्थानाचें, दुसरें धनस्थानाचें, तिसरें तृतीयस्थानाचें याप्रमाणें १२ वर्षें बारा स्थानांचीं झाल्यावर १३ वें वर्ष पुन्हा तनुस्थानाचें १४ वें धनस्थानाचें याप्रमाणें परिभ्रमण पद्धतींत वर्षारंभ होत असतो. दर वर्षास तनुस्थान बदलत जातें. अशा रीतीनें बदललेल्या वर्षास **"वार्षिक लग्न"** असें म्हणतात

प्रस्तुत पद्धतींत सूक्ष्म रीतीनें पहाणाऱ्या ज्योतिषांमध्यें वर्षलग्नासंबंधानें कांहींसा मतभेद आहे. वर्षास जें स्थान चलन होतें त्याप्रमाणें कांहींच्या मतें मूळकुंडलींतील विवक्षितस्थानाचा आरंभ करावा, कांहींच्या मतें दर वर्षास लग्नामध्यें ३० अंश मिळवून जें लग्न येईल तें लग्न समजावें आणि कांहींच्या

मतें लग्नामध्यें तीस अंश न मिळवितां दशमस्थानामध्यें दर वर्षास ३० अंश याप्रमाणें मिळवून जें दशमस्थान येईल त्याप्रमाणें वर्षलग्न घ्यावें. ह्या तीन प्रकारांत किती फरक पडतो हें एक उदाहरण घेऊन दाखवितों.

जन्मलग्न मकर २ अंश आहे आणि २७ व्या वर्षाचें वार्षिक लग्न काढणें आहे. जन्मस्थळ मुंबई.

(१) २७ वें वर्ष तृतीयस्थानाचें आहे व मूळ कुंडलींत तृतीय स्थानावर मीन राशीचा ८ वा अंश आहे म्हणून मीनेच्या ८ व्या अंशापासून २७ व्या वर्षाचा आरंभ होतो.

(२) पंचवीसावे वर्षाचा आरंभ तनुस्थानापासून म्हणजे मकरेच्या २ व्या अंशापासून, २६ व्या वर्षाचा आरंभ कुंभेच्या २ व्या अंशापासून आणि २७ व्या वर्षाचा आरंभ मीनेच्या २ व्या अंशापासून होतो.

(३) पंचवीसाव्या वर्षारंभीं तूळेचा १२ वा अंश दशमारंभीं आहे तेव्हां २७ व्या वर्षारंभीं धनेचा १२ वा अंश येईल. धनु १२ दशमारंभीं असतां तनुस्थानीं मीनेचा ९ वा अंश उदय पावेल.

सूक्ष्म रीतीनें फलें पाहण्यासाठीं वरीलप्रमाणें तीन प्रकार होतील. हे तीन्हीही प्रकार विचारणीय आहेत यांत शंका नाहीं. तीन्ही प्रकारांस कांहीं-तरी कारणें हीं आहेतच पण त्यांतले त्यांत आम्ही शेवटचा प्रकार पसंत करतों.

ज्यांना सूक्ष्म गणित करावयाचें नसेल त्यांनीं २७ वें वर्ष तृतीय स्थानाचें आहे येवढें घेऊन त्याप्रमाण ग्रहयोग पाहिले म्हणजे पुरें होईल.

ग्रहांचें भ्रमणकाळ आणि वार्षिक स्थानचलन ह्या दोन्ही गोष्टी वर सांगितल्या आहेत. आतां या पुढची माहिती म्हणजे त्यावरून भविष्य निर्णय कसा करतां येतो हें सांगावयाचें आहे. प्रथम ज्या काळाचे—वर्षाचे—भविष्य-ज्ञान करून घ्यावयाचें असेल त्या काळचे परिभ्रमणानें ग्रह कोठें आहेत हें काढले पाहिजे. परिभ्रमणानें आलेल्या ग्रहांचे मूळ व वार्षिक कुंडल्यांमध्यें

जे योग होतात त्यावरून भविष्य निर्णय केला जातो. ग्रहांचीं परिभ्रमणें व त्यामुळें होणारे योग या सर्वांचा बरोबर विचार झाल्याखेरीज भविष्यनिर्णय करतां येणार नाहीं. भ्रमणकाळचे ग्रह (१) मूळ कुंडलीच्या कोणत्या स्थानांतून भ्रमण करीत आहेत व (२) मूळच्या ग्रहांशीं कोणतें योग करीत आहेत त्याचप्रमाणें (३) वर्ष कुंडलींत कोणत्या स्थानांत आहेत व (४) परस्परांशीं कोणते योग करीत आहेत याचा सूक्ष्म विचार झाला पाहिजे. ह्या चार प्रकारांपैकीं मूळ व वार्षिक कुंडल्यांतील ग्रहांच्या भ्रमणांचा विचार प्रथम केला पाहिजे. हा विचार कसा करावा याचें थोडेसें विवेचन येथें करणें जरूर आहे.

ग्रहांचे बलाबल, गुणधर्म आणि मूळ व वार्षिक कुंडल्यांतील स्थानाधिपत्य ह्यांस अनुसरून त्यांच्या भ्रमणांचीं फलें दृग्गोचर होतात. भ्रमणफलें पाहतांना हे तीन्ही प्रकार—बलाबल, गुणधर्म व स्थानाधिपत्य—अवश्य लक्ष्यांत पाहिजेत. ग्रहांचें बलाबल कसें लक्ष्यांत घ्यावें ह्यासंबंधानें आम्हीं ज्योतिर्मालेच्या २ ऱ्या वर्षाच्या अंकांत एक विस्तृत लेख लिहिला आहे त्यावरून वाचकांनीं प्रथम माहिती करून घ्यावी. ग्रहांच्या बलाबलाप्रमाणें भ्रमणफलें मिळतात म्हणजे मूळ कुंडलींतील बलवान ग्रह ज्या ज्या वेळीं उच्च, स्वगृहीं किंवा शुभस्थानीं येतात त्या त्या वेळीं गुणधर्म व स्थानाधिपत्य यांस अनुसरून शुभफलें देतात. ग्रहांचीं ग्रंथोक्त स्वगृहें, उच्चनीचादि राशि अमुकच कां व त्या राशि सायन किंवा निरयन घ्याव्यात याची साक्षही परिभ्रमणपद्धति चांगली देते. रवि जन्मकालीं बलवान असून ज्या वेळीं सायन, मेष किंवा सिंह राशीमध्यें येतो त्या वेळीं खात्रीपूर्वक चांगलीं फलें पाहण्यास मिळतात. बलहीन ग्रह भ्रमणानें जरी उच्च स्वगृहीं आला तरी शुभफलें देऊं शकत नाहींत व शनिमंगळांसारखे पापग्रह जर मूळ कुंडलींत बलहीन असून परिभ्रमणानें बलवान होत असतील तर अशुभ फलेंच दृष्टोत्पत्तीस येतील. सारांश भ्रमणकाळचे परिणाम पहातांना ग्रहांचें मूळ बलाबल विशेष लक्ष्यांत घेतलें पाहिजे. असो. ग्रहबल पाहिल्यानंतर गुणधर्म व

स्थानाधिपत्य याप्रमाणें भ्रमणफलें लक्ष्यांत घ्यावयाचीं असतात. ग्रहांचे गुण-धर्मानुरूप दृष्टोत्पत्तीस येणाऱ्या फलांचीं वर्णनें पुष्कळ ठिकाणीं आलेलीं आहेत. अशांपैकीं गोचरीचें विस्तृत वर्णन ज्योतिर्मालेंत नुकतेंच येऊन गेलें असल्यामुळें त्याच प्रकारच्या मजकुरानें जागा अडविण्याचें कारण नाहीं. गोचरीच्या वर्णनांत ग्रहांचीं जीं फलें दिलीं आहेत तींच येथें लक्ष्यांत घेतलीं पाहिजेत. उदाहरणार्थ, मंगळ द्वादश स्थानांतून जात असतांना जीं फलें उत्पन्न होतात असें तेथें म्हटलेलें आहे त्या फलाप्रमाणेंच भ्रमणकाळचाही मंगळ फलें उत्पन्न करितो. स्थानाधिपत्य लक्ष्यांत घेऊन जीं फलें पहावयाचीं असतात तीं मात्र येथें देतों. हीं फलें मूळ कुंडलींचे स्थानाधिपती मूळच्या किंवा वार्षिक कुंडलीच्या स्थानांतून भ्रमण करीत असतां दृष्टोत्पत्तीस येतील. त्याच प्रमाणें वार्षिक कुंडलींतील स्थानाधिपती वार्षिक कुंडलीच्या स्थानांतून भ्रमण करीत असतांना थोड्या बहुत प्रमाणानें पहावयास सांपडतील. उदाहरणार्थ—जन्मलग्नेश मूळच्या किंवा वार्षिक तनुस्थानांतून भ्रमण करीत असतां जीं फलें मिळतील तशींच थोड्याबहुत प्रमाणानें वार्षिक लग्नेश वार्षिक तनुस्थानीं भ्रमण करीत असतां पहावयास सांपडतील. महत्वाच्या मानानें मूळ-स्थानाधिपतींचीं मूळ कुंडलीच्या स्थानांतून होणारीं भ्रमणें विशेष महत्वाचीं असतात त्यानंतर वार्षिक कुंडलीच्या स्थानांतून होणारीं भ्रमणें व शेवटीं वार्षिक स्थानाधिपतींचीं वार्षिक स्थानांतून होणारीं भ्रमणें महत्वाचीं असतात. भ्रमणांच्या महत्वांतील हा तरतम भाव वाचकांनीं लक्ष्यांत ठेवावा. स्थानाधिपतींच्या भ्रमणाचीं फलें देतांना जन्मकालीन लग्नेश, जन्मकालीन धनेश वगैरे न म्हणतां नुसतें लग्नेश, धनेश अमक्या स्थानांतून भ्रमण करीत असतां असें म्हणून फलें दिलीं आहेत. फलें पहातांना स्थानाधिपत्य—मूळ व वार्षिक—दोन्ही प्रकारचें पहावयाचें असल्यामुळें दोहोंलाही पुढें दिलेलें वर्णन सारखेंच लागू पडेल.

लग्नेशाचीं द्वादश स्थानांतील भ्रमणांचीं फलें.

(१) लग्नेश तनुस्थानांतून भ्रमण करीत असतां शरीरप्रकृति उत्तम रहाते व मनस्वास्थ्य प्राप्त होतें.

(२) लग्नेश धनस्थानांत भ्रमण करीत असतां स्वतःच्या हिंमतीवर अर्थप्राप्ति होते.

(३) लग्नेश तृतीयस्थानांत भ्रमण करीत असतां लहान सहान प्रवास व मित्रांच्या भेटी होतात.

(४) लग्नेश चतुर्थांत भ्रमण करीत असतां परिस्थितीप्रमाणें घर बांधणें, विकत घेणें किंवा दुरुस्ती करणें होईल.

(५) लग्नेश पंचमांत भ्रमण करीत असल्यास संतानप्राप्ति होते, मुलांवरील प्रेम वाढतें व लॉटरी वगैरेंत लक्ष्य लागतें. या काळांत ख्यालीखुशालीकडे मन वळतें; विद्येमध्यें यशप्राप्ति होते.

(६) लग्नेश षष्ठांत भ्रमण करीत असल्यास शरीरप्रकृति ठीक रहात नाहीं, नोकर चाकर ठेवितो.

(७) लग्नेश सप्तमस्थानांत भ्रमण करीत असतां स्त्रीसौख्य प्राप्त होतें.

(८) लग्नेश अष्टमांत भ्रमण करीत असतां कष्ट होतात.

(९) लग्नेश नवमस्थानांत भ्रमण करीत असतां धर्म, तत्वज्ञानाकडे लक्ष्य लागतें, वाचनाकडे प्रवृत्ति होते; प्रवास व तीर्थयात्रा घडतात. हातून ग्रंथ-प्रकाशन होतें; परीक्षा उतरतात.

(१०) लग्नेश दशमांत भ्रमण करीत असल्यास व्यापारधंद्यांत, नोकरींत किंवा राजदरबारीं यश येतें, मान वाढतो. हा काळ यशस्वी असतो.

(११) लग्नेश लाभस्थानीं भ्रमण करीत असतां व्यापारांत यश, मित्रलाभ व धनलाभ होतात.

(१२) लग्नेश व्ययस्थानीं भ्रमण करीत असतां शत्रु उत्पन्न होतात.

* पूर्वोक्त फलें बलवान लग्नेशाचीं आहेत. लग्नेश बलहीन असल्यास शुभफलांच्या ऐवजीं अशुभ फलें प्राप्त होतील. याप्रमाणें इतर स्थानाधिपतींचें समजावें. *

धनेश द्वादशस्थानामध्यें.

(१) धनेश तनुस्थानीं असल्यास धनप्राप्ति होईल. धनेश बलवान असल्यास पतीवर मोठाले व्यवहार होतात.

(२) धनेश धनस्थानीं भ्रमण करीत असतां धनप्राप्ति उत्तम होते; व्यापारांत फायदा होतो.

(३) धनेश तृतीयांत भ्रमण करीत असतां भाऊ, शेजारी, व लहानसहान प्रवास यामुळें धनप्राप्ति होईल; धनेश बलहीन असल्यास त्याचकारणानें धनहानि होईल.

(४) धनेश चतुर्थांत भ्रमण करीत असतां पूर्वार्जित जमीनजुमला मिळतो; मातेमुळें लाभ होतात.

(५) धनेश पंचमांत भ्रमण करीत असतां (बलवान असल्यास) पुत्रप्राप्ति होते. लॉटरी, सट्टे यांमध्यें पैसे मिळतात.

(६) धनेश षष्ठांत भ्रमण करीत असतां लहान जनावरें व नोकर यांपासून द्रव्यप्राप्ति होईल. सामान्यतः हें भ्रमण महत्वाचें नाहीं

(७) बलवान धनेश सप्तमस्थानातून भ्रमण करीत असतां स्त्री, कोर्टातील खटले आणि व्यापारांतील भागीदार यांजकडून द्रव्यप्राप्ति होते. धनेश बलहीन असल्यास सप्तमस्थानावरून विचार होणाऱ्या गोष्टींमुळें धनहानि होते.

(८) धनेश अष्टमांत भ्रमण करीत असतां द्रव्यप्राप्तीसाठीं अत्यंत कष्ट पडतात. सांपत्तिक स्थिति खालावते. मूळकुंडलींत मृत्युपत्रानें धनलाभ होण्यासारखी ग्रहस्थिति बलवान धनेश अष्टमांतून भ्रमण करीत असल्यास तशा प्रकारें धनलाभ होतो.

(९) धनेश नवमांत भ्रमण करीत असतां प्रवासापासून लाभ व शास्त्रीय शोधामुळें धनप्राप्ति होते. लेखकांस ह्या भ्रमणामुळें धनप्राप्ति होते.

(१०) धनेश बलवान असून दशमांतून भ्रमण करीत असतां नोकरी, धंदा किंवा व्यापार यांमध्यें यश येतें, मानमान्यता वाढून धनप्राप्ति होते.

(११) धनेश लाभस्थानांतून भ्रमण करीत असतां मित्रांच्या सहायानें धन मिळतें. सामान्यतः हें भ्रमण धनप्राप्तीस चांगलें जातें.

(१२) धनेश व्ययस्थानामध्यें भ्रमण करीत असतां धननाश होतो. पीडित असतां सांपत्तिक अडचणी येतात. व्यापारामध्यें ठोकर लागते.

तृतीयेश द्वादशस्थानामध्यें.

(१) तृतीयेश लग्नांत भ्रमण करीत असतां प्रवास घडतील. शेजारी व भाऊबहिणी यांपासून सौख्य मिळेल. कर्तव्य वाढेल.

(२) तृतीयेश धनस्थानांत भ्रमण करीत असतां तृतीयस्थानदर्शक गोष्टींमुळें पैशांचा व्यय होतो. लहानसहान लेखापासून पैसे मिळतात.

(३) तृतीयेश तृतीयांत भ्रमण करीत असतां होणारे प्रवास सुखकर होतात.

(अपूर्ण)

स्फुटविचार.

आमच्या एका मित्रानें ज्योतिषशास्त्रावर नवीन जन्म घेतलेल्या **ज्योतिर्भूषण** नामक एका पुण्याच्या द्वैमासिकाचा पहिला अंक पाहण्यास पाठविला आहे. सदरहु मासिक पुणे येथें पंडित रघुनाथ शास्त्री ज्योतिषी हे प्रसिद्ध करीत आहेत. पहिल्याच अंकामध्यें संपादकांनीं ज्योतिर्भूषणाचें हृद्गत, उद्देश व कार्य हें सांगताना व्यक्तिद्वेषाचे मोहास बळी पडून दुगाण्या झाडण्याचा प्रयत्न केला आहे तो बराच हास्यास्पद झालेला आहे व त्यासंबंधानें आम्हांस चालू अंकामध्यें चार शब्द ओघानें लिहिणें प्राप्त झालें आहे. भूषणाचीं कित्येक विधानें फार गमतीचीं आहेत. ज्यांस पहिल्याच अंकामध्यें पक्षाभिमानाचें किंवहुना व्यक्तिद्वेषाचें पिशाच्च झोंबतें त्यांचे हातून प्रसिद्ध केलेले उद्देश किती सिद्धीस जातात हें पाहणें आहे. कुंडलीविज्ञानकार

रा. रा. विष्णु गोपाळ नवाथे व रा. रा. व्यंकटेश बापुजी केतकर यांनीं गेल्या पंधरा वीस वर्षांमध्यें फलज्योतिष व गणितज्योतिष वाङ्मयाची जी सेवा केली आहे ती लक्ष्यांमध्यें घेतां ज्योतिर्भूषणाचे संपादकांनीं आपल्या पहिल्या अंकामध्यें श्रीयुत नवाथे यांचे अकलेचें प्रदर्शन करण्याचें किंवा योग मालाकाराचे समुद्रकांठच्या वास्तव्यानें क्षार विचार झालेले व दररोज **नवा थेर** वगैरे क्षुद्रविचार किंवा श्रीयुत केतकर यांचे सभाप्रसंगीं मूग गिळणें व मागाहून धारवाडी वातावरणामुळें लेखन सकेत करणें वगैरे वगैरे उद्गार प्रसिद्ध करण्याचें कारण नव्हतें. दुसऱ्यास दोष दिल्याखेरीज आपलें भूषण वाढत नाहीं अशी जर भूषणकर्त्यांची समजूत असेल तर ती साफ फोल आहे असें म्हणावें लागतें. श्रीयुत नवाथे यांनीं आपली कीर्ति महाराष्ट्रांत चिरकाल करून ठेविली आहे. रा. केतकर यांनीं तर आपल्या गणितग्रंथानें अखंड भारतवर्षास ऋणी केलें आहे. अलिकडील काळांतील गणितदैवज्ञ रा. केतकर ह्यांचें लेखन संकेत करणें किंवा फलज्योतिषशास्त्राचे कट्टे निस्सीम भक्त आचार्य ज्योतिर्विद नवाथे यांचे **नवा थेर** जर प्रसिद्ध झाले नसते तर पुण्याची किंवा मुंबईची पंचांग शोधन कमीटी अस्तित्वांत येऊन पंडित रघुनाथ शास्त्री यांस आपले अंकामध्यें जुन्या परंपरेच्या शास्त्री लोकांवर तोंडसुख घेतां आलें असतें किंवा नाहीं याबद्दलही शंका वाटते.

पंचांगसुधारणा करण्याकरितां ज्या चळवळी झाल्या त्याबद्दलचें बरेंच श्रेय सायनवादी मंडळी कै. वि. र. लेले, कै. शंकर बाळकृष्ण दीक्षित, कै. जनार्दन बाळाजी मोडक, कै. जिवन त्रिंबक चिटणीस आणि कै. केरू नाना छत्रे रा. रा. विष्णु गोपाळ नवाथे, व श्रीयुत केतकरादि निरयण मंडळीकडे आहे. लेले, दीक्षित, छत्रे, चिटणीस, केतकर या मंडळींचे ज्या वेळीं वादसंग्राम चालले होते त्या वेळीं पंडित रघुनाथ शास्त्री हे ज्योतिषशास्त्राचे धडे गिरवीत असतील किंवा नाहीं याची शंका वाटते. इतकेंच नव्हे तर सन १९०० सालापासून तहत १९०८ सालापर्यंत ज्या काळामध्यें कुंडलीविज्ञानानें बहारीची लोकसेवा केली तेव्हांही त्यांचे नांवाचा डांगोरा कोठेंच ऐकूं येत नव्हता.

विज्ञानाचे संपादकानें आपल्या १३ वर्षाचे कारकीर्दीमध्यें अखिल महाराष्ट्रामधील विद्वान मंडळीमध्यें जी ज्योतिषशास्त्राभिरुची आपल्या चर्चात्मकलेखानें उत्पन्न केली आहे ही गोष्ट ज्यांस पूर्ण पटली असेल त्यांस विज्ञानकाराविरुद्ध बाष्कळ बरळणें पाहून राग आल्यावांचून राहणार नाहीं अशी आमची प्रामाणिक समजूत आहे. नुसता लोकमान्यांचा फोटो देऊन किंवा ते ज्योतिषशास्त्रावर लिहिणार असून कांहीं पदवीधर व रहस्यकार अभिमानी भूषणांत लेख देणार आहेत येवढ्या आश्वासनानें महाराष्ट्रजनांस खात्रीनें मुरळ पडणार नाहीं.

प्रतिपदेस चंद्रदर्शन.

ज्योतिर्भूषणाच्या संपादकानीं आपल्या पहिल्याच अंकामध्यें पंचांग कमीटीच्या शिक्यामोर्तबासह झालेल्या शुद्ध पंचांगाच्या दृक् प्रत्ययासंबंधानें जें लिहिलें आहे व त्यावर विज्ञानकार यांनीं तारीख २३ मे सन १९१८ च्या संदेशाच्या अंकामध्यें जी लांड्या कोल्ह्याची गोष्ट प्रसिद्ध केली आहे ती फार मजेची वाढल्यामुळें त्यापैकीं महत्वाचा भाग आम्हीं मालेच्या वाचकांकरितां पुन्हां प्रसिद्ध करीत आहों.

ज्योतिर्भूषण पृष्ठ १९ वें "शके १८४० च्या पंचांगप्रवर्तक कमेटीनें प्रसिद्ध केलेल्या पंचांगांतील गुरुवारच्या पाडव्यासंबंधानें अतिशय चर्चा व टीका झाली आणि त्यामुळें कित्येक लोक संशयाच्या भोंवऱ्यांत सांपडून पाडवा कधीं करावा अशा विचारांत गुंतले! खेडेगांवांतील लोकांनीं भटजीबुवांच्या सांगण्यावरून कांहीं ठिकाणीं शुक्रवारीं पाडवा केला. परंतु गुरुवारीं रात्रींच त्याबद्दल त्यांना पश्चाताप वाटूं लागला. कारण, कोणी कांहीं सांगितलें तरी आकाशांतील ग्रह कांहीं मनुष्याच्या ताब्यांत नाहींत. गुरुवारीं रात्रीं आकाशाकडे पाहिलें असतां चंद्रमा सर्वांना असें सांगत होता कीं, खरा पाडवा आजच असल्यामुळें मी दृश्यमान झालों आहे. शुक्रवारीं पाडवा करणाऱ्यांनो, तुम्हीं मात्र फसला! पुढें तरी आपलें वर्तन सुधारा."

" हा लेख वाचून झाल्यावर प्रथम " शुद्ध " पंचांग उघडलें आणि त्यांत " चंद्रदर्शन " कधीं आहे तें पाहिलें. तों तें त्यांत मला शुक्रवारीं लिहिलेलें दिसलें. पंडितजी तर "गुरुवारीं चंद्रदर्शन झालें व तें सर्वांना झालें" असें लिहितात. त्या अर्थी टाईप वगैरे चुकला असेल अशा समजुतीनें दुसरी पंचांगें पाहिलीं त्यांतही शुक्रवारींच चंद्रदर्शन लिहिलेलें आहे. काशीच्या बापुदेव शास्त्र्यांच्या पंचांगांतही शुक्रवारींच. मग पंडितजींना जो चंद्र आकाशांतच दिसला तो काय खोटा ? इतक्यांत मला लांड्या-कोल्ह्याच्या गोष्टीची आठवण झाली, आणि पंडितजी गुरुवारीं रात्रीं चंद्रमा दिसल्याचें जें आपल्या जातभाईंना सांगत आहेत तें गणिताच्या सफलतीनें शुद्ध पंचांगाचें शेंपूट तुटून लाडे झाल्यामुळें त्यानें पंडितजींचे पाय धरिले असावे व माझी कसें तरी करून अब्रू रक्षण करा अशी विनवणी केली असावी, अशी कल्पना झाली. पंडितजी पडले महागणिती ! त्यांनीं तावडतोब शक्कल काढली कीं " खरा पाडवा गुरुवारीच आहे, हें सांगण्यासाठीं त्या दिवशीं आकाशांत चंद्रानें प्रत्यक्ष दर्शन दिलें असें लोकांना सांगितलें कीं, सर्व लोक गप्प बसतील, आणि शुद्ध पंचांगाप्रमाणें वागण्यास निरुत्तर झाल्यामुळें तेव्हांच तयार होतील.

अहो पंडितजी, भूषणाची ही नवीन तऱ्हा तुम्हीं आपल्या मेंदूंतून काढलीत याबद्दल तुम्हांला शाबासकी मिळेल यांत संशय नाहीं पण असल्या गोष्टी आपण आम्हांला सांगून काय उपयोग ? कारण प्रतिपदेंत चंद्रदर्शन होणें कालत्रयीं शक्य नाहीं—हें आम्हांला पूर्णपणें अवगत आहे. म्हणून ही भूषणाची नवीन तऱ्हा तुम्ही मूर्खांना सांगा तेथें मात्र तुमचा खात्रीनें वाहवा होईल."

—o—

॥ श्रीसद्गुरवे नमः ॥

ज्योतिर्माला

आप्राचः कामरूपाद्द्रुहिणसुतनदप्लावितादाप्रतीचो
गान्धारात् सिंधुसाद्रांद्रघुवररचितादाचसेतोरवाचः ।
आकेदारादुदीचस्तुहिनगहनतः सन्तिविद्वत्समाजा
ये ये तानेष यत्नः सुखयतु समजान्कश्चमत्कर्तुमीष्टे ॥ १ ॥

अभिनवाऽऽवृत्ति वर्ष ४ थें. } जुलै १९१८. { अंक ४ था.

मातृपितृ-स्थान विचार.

(लेखक-कुकदेव महेश्वर प्रभु देसाई-पापडी, पोष्ट वसई.)

मातृपितृस्थान विचार म्हणजे जन्मलेल्याच्या कुंडलींतील मातृस्थान आणि पितृस्थान हीं कोणतीं समजावीं ह्याबद्दल विचार. ह्यासंबंधानें आर्यमताच्या सर्व जोशांत मतैक्यच आहे. परंतु आँग्ल जोशांत मात्र तीन मतें आहेत—एक आर्यमत, दुसरें त्याच्या विरुद्ध मत, आणि तिसरें मिश्रमत. ह्या परस्पर विरुद्ध आणि मिश्र अशा मतांमुळें अनुभवही तसाच येत असावा असें सिद्ध होतें; परंतु एकाच मताबद्दल परस्पर विरुद्ध मार्गानें व परस्पर मिश्रमार्गानें अनुभव मिळणें अगदींच असंभवनीय आहे. ह्या घोंटाळ्याचा

निकाल लावण्यास खऱ्या विद्वान् व अनुभविक अशाच जोशाची अत्यंत आवश्यकता आहे. ती वास्तविक योग्यता माझी नसतांही, मी ह्याचा सोपपत्तिक निर्णय करून तो अनुभवाकरितां आर्यजोशांपुढें मांडण्याचा विचार धाडस बुद्धीनें करीत आहें. तर ह्यांत यश येण्याकरितां, प्रथम सृष्टिकर्त्या परमेश्वरास वंदन करून, मग इष्ट विषयास आरंभ करतों.

आर्यजोशांत दोन मताचे लोक आहेत, एक सायनमताचे व दुसरे निरयणमताचे; ह्यांपैकीं सायनमत हें सृष्टिनियमास धरून आहे, म्हणून ह्यांत विषुवदिन व अयनदिन ह्यांची सत्यता अनुभवानें पटते. ह्यास्तव आर्यजोशी हें नांव खरोखर ह्यांनाच शोभतें. निरयणमत हें सृष्टिनियमास सोडून असल्यामुळें ह्यांत वरील दिवसांची असत्यता मात्र चांगली पटते. तेव्हां ह्यांस अनार्यजोशी असें म्हणणें भाग पडतें. ह्याबद्दल जगजाहीर असें एकच उदाहरण देतों. मकरसंक्रांतीचा दिवस, हा दिनवृद्धीच्या आरंभाचा दिवस आहे, ह्या खऱ्या दिवसानंतर २२।२३ दिवसांनीं हे निरयण जोशी लोकांस सांगतात कीं, आज मकरसंक्रमणाचा दिवस आहे तेव्हां तन्निमित्त स्नानदान वगैरे धर्मकर्म आज करा. ही कर्मकालाची थट्टा करण्याची ह्यांची शैली फारच प्रशंसनीय आहे. ह्याप्रमाणें राशि व नक्षत्रें ह्यांना अनुसरून जेवढे कर्मकाल धर्मशास्त्रांत सांगितले आहेत तेवढ्या सर्व कर्मकालांची हे गबु नेहमीं थट्टाच करीत असतात ! ह्यांत लोकांचे कर्म करण्याचे श्रम आणि कित्येक कर्मांत झालेला खर्च हीं मात्र फुकट जातात. वास्तविक धर्म हें सुखाचें साधन असतां तेंच दुःखाचें साधन करण्याची कलीची युक्ति ह्या गबूंजवळ असल्यानें, हे कलीराजाकडून कर्मकालाची थट्टा करून कर्मफलास बट्टा लावण्याकरितां नेमलेले अधिकारीच आपल्या देशांत जन्मलेले आहेत, असें दिसतें; आणि म्हणूनच ह्या आपल्या देशांत निरयण जोशांचा पगडा सर्वत्र बसला आहे. त्यामुळें आर्यजोशी ह्या नांवाला योग्य अशा सायन जोशांस धर्मसंबंधांत निमूटपणें गप्प बसण्याचा प्रसंग सांप्रत आला आहे; व ह्यांचें आर्यत्व त्या गबूनीं बळकाविलें आहे. म्हणून त्या अनार्य जोशांनीं ह्या माझ्या

HANSA MEHTA LIBRARY

विषयाकडे मुळींच लक्ष न दिल्यास फार चांगलें. कारण, कर्मकाल चुकवून वाईट कर्मफल पदरांत पाडण्याचें कौशल्य जसें ह्यांना साधलें आहे, तसेंच ते आपल्या खोट्या क्रांतिवृत्तांतील राशींच्या सहाय्यानें आमचीही खरी उपपत्ति कशी खोटी ठरते, हें दाखविण्यास चुकणार नाहींत; म्हणून माझ्या ह्या सोपपत्तिक विषयाचा विचार सायन जोशांनींच करावा. कारण धर्मशास्त्रांतील त्यांचें स्वातंत्र्य जरी आज पूर्ण नष्ट झालें आहे, तरी ज्योतिषाधारें व्यावहारिक फळें सांगण्याचें स्वातंत्र्य त्यांना अद्यापि आहे.

बापाचें संततिबीज पेरण्याची भूमि आई आहे, व शेतजमिनीची कारकता चतुर्थस्थानाकडे आहे, म्हणून आर्यजोशी हे आईचा विचार चतुर्थस्थानावरून करितात, अर्थात बीज पेरणाऱ्या बापाचा विचार चतुर्थासमोरच्या दशमस्थानावरून करितात, असें दिसतें; व अँग्लजोशांतले सॅफरेल जोशी हे आर्यमताची चतुर्थावरील आईची कारकता बरोबर असल्याचें प्रतिपादितांना, वरील तात्पर्याची उपपत्ति सांगून आणखी म्हणतात कीं, आईचा विचार चंद्रावरून करितात व त्याचें घर कर्क ही चवथी रास आहे, म्हणून चवथ्या घरावरून आईचा विचार करावा; परंतु भावक्रमानें येणारी भावाची कारकता ही जर राशिक्रमानें येणाऱ्या राशीची कारकता धरूं लागल्यास काय घोंटाळा होतो तो पहा. बापाचा विचार रवीवरून करितात, तेव्हां त्याचें घर सिंहरास ही बापाची कारकता दाखवील, व राशिक्रमानें सिंहरास पंचमांत पडत असल्यामुळें पंचमस्थानावरून बापाचा विचार करावा असें ठरेल; आणि असेंच खरें धरून चालल्यास आईच्या घरासमोरचें बापाचें घर धरण्याच्या ज्योतिषांतल्या सार्वत्रिक नियमास हरताळ फांसावा लागतो. आणि त्या नियमाप्रमाणें पंचमस्थान बापाचें घरलें म्हणजे, एकादशस्थान आईचें येतें; व ह्याप्रमाणेंच चतुर्थ, एकादश हीं दोन आईचीं घरें आणि दशम, पंचम हीं दोन बापाचीं घरें ठरत असल्यामुळें प्रत्येकाच्या दोन घरांपैकीं खरें कोणतें ? ह्याबद्दल नसता वाद मात्र उपस्थित होतो. स्त्रीपुरुष भेद राशींत आहेत, तसा भावांत नाहीं. तेव्हां चंद्राच्या घराची रास कर्क ही स्त्री रास असल्यामुळें व आई ही स्त्रीच अस-

ल्यामुळें, सॅफरेल जोशांच्या केवळ कल्पनिक विचारसरणीनें चतुर्थावरून आईचा विचार करण्यास दुजोराच मिळतो; परंतु ह्या सरणीनें जरी दहावी रास मकर ही बापाच्या विचारास योग्य ठरते, व तिचा स्वामी शनि हा बापाचा कारक ठरतो, तरी मकर ही स्त्री रास असल्यामुळें, व बाप हा पुरुष असल्यामुळें ती बापाच्या विचारास अयोग्य ठरते, व तिचा स्वामी शनि हाही बापाचा कारक कोणी घेत नसून बापाचा कारक रविच घेतात; म्हणून आर्यमताप्रमाणें चतुर्थावरून आईचा विचार करण्याची जी उपपत्ति सॅफरेल जोशानें दिली आहे, तिची विचारसरणीच चुकीची ठरते. ह्या विचारसरणीप्रमाणें पाहूं गेलें असतां पंचमरास सिंह ही पंचमस्थानावरील गोष्टींची कारकता दाखविते, व पंचमस्थानावरून होणारा संततिविचार सिंह राशीकडे सर्वत्र घेऊं लागल्यास ती वंध्या रास असल्यामुळें ती संततीचा अभाव दर्शविते, व त्याप्रमाणें आज जगाचा उत्तरोत्तर क्षयच होत चाललेला दृष्टीस पडावयास पाहिजे होता; पण तसा अनुभव दिसत नाहीं; म्हणून ह्या जोशांनीं आर्यमताच्या पुष्टिकरणार्थ दाखविलेली, भावांची कारकता, ही भावक्रमानें राशिक्रमावर लावण्याची उपपत्ति अगदीं अग्राह्य ठरते.

सॅफरेल साहेब स्वतांचे पुस्तकांत म्हणतात कीं, पुरुषकुंडलींत चतुर्थावरून आईचा व दशमावरून बापाचा विचार करावा; आणि स्त्रीकुंडलींत चतुर्थावरून बापाचा व दशमावरून आईचा विचार करावा. ह्यांच्या मतांतला पुरुषकुंडलीचा विचार मात्र आर्यमताशीं जुळता आहे. आर्यमत स्त्रीपुरुष भेदानें विभागिले नाहीं; व त्यांत स्त्रीपुरुषांचा मातृपितृस्थानविचार एकच आहे. आर्यमताच्या पुष्टिकरणार्थ ह्या सॅफरेल साहेबांनीं वकिली ठढवितांना जी उपपत्ति दाखविली आहे, तीच उपपत्ति ह्यांच्या मनांतल्या पुरुषकुंडलीला जशी लागू पडते, तशी तीच उपपत्ति ह्यांच्या मनांतल्या स्त्रीकुंडलीसंबंधानें मुळींच लागू पडत नाहीं; येथें त्यांचीच उपपत्ति लागू करावयाची झाल्यास, भावानुक्रम व राश्यनुक्रम हीं फिरवावीं लागतात; म्हणजे लग्न हा पहिला भाव, द्वादश हा दुसरा भाव, एकादश हा तिसरा भाव, दशम हा चवथा

भाव वगैरे. ह्या प्रमाणें भावक्रम फिरविला म्हणजे मग ह्याच क्रमानें चंद्राच्या घराची चौथी रास कर्क ही, स्त्रीकुंडलींत आईच्या विचारास उपयोगीं पडेल. ह्यांच्या मतांतल्या स्त्रीकुंडलीची उपपत्ति, आर्यमतानें पाहूं गेलें असतां अगदींच असंभवनीय ठरते; ती अशी कीं, ह्यांच्या मताप्रमाणें स्त्री जन्माच्या वेळीं बापाच्या ठिकाणीं आई ही बीजारोपण करिते. ह्या सॅफरेल साहेबांच्या स्त्रीपुरुषभेदानें बनलेल्या सांवळ्या-गोंधळाचा निकाल दुसऱ्याच एका उपपत्तीनें लागतो; तो असा कीं, दशमभाव हा सर्व भावांत अधिक बलवान आहे. तेव्हां स्त्री किंवा पुरुष जो कोणी जन्मेल त्याच्या आईबापांचा विचार स्त्रीपुरुष भेदाप्रमाणें दशमास अनुसरून करावा. म्हणजे स्त्री जन्मल्यास स्त्रीजातीची आई, हिचा विचार दशमावरून व बापाचा विचार चतुर्थावरून करावा; आणि पुरुष जन्मल्यास पुरुष जातीचा बाप, ह्याचा विचार दशमावरून व आईचा विचार चतुर्थावरून करावा. ह्या साहेबांचा दशमावर वाजवीपेक्षां जास्त भर असल्यामुळें ह्यांनीं अशा उपपत्तीची क्लृप्ति लढविली असावी असें वाटतें. पण हीही क्लृप्ति अग्राह्यच ठरते. कारण पुरुष किंवा स्त्री कोणीही जन्मावयाचें असो, त्याच्या वेळीं बाप हा बीज देणारा आणि आई ही बीज घेणारी, हा नियम बदलत नाहीं. मग त्यांच्या कुंडल्यांत भेदपरत्वें आईबापांच्या स्थानांत बदल होईल कसा? व तो निरंकुश बुद्धीनें कादंबरीकारासारखा केला, तरी तो ग्राह्य ठरेल कसा?

पाश्चात्य जोशांत जीं तीन मतें वर सांगितलीं आहेत, त्यांपैकीं मिश्रमताचे सॅफरेल साहेब हे आहेत. ह्यांची आर्यमताबद्दलची उपपत्ति व त्यांच्या स्वतःच्या मताची उपपत्ति ह्यांचा जो थोडक्यांत विचार वर दर्शविला आहे, त्यावरून हें मिश्रमत अगदींच अग्राह्य ठरतें. आतां त्याच जोशांतले कांहीं जोशी आर्यमताचे आहेत असें समजतें. तर त्यांच्या मताबद्दल आतां विचार करूं.

पितृबीज हें मातृभूमींत पेरिलें जातें, म्हणून भूमीसंबंधामुळें आईचा विचार चतुर्थावरून करावा; व बीज पेरणारा हा जमिनीवर असतो म्हणून

चतुर्थासमोरच्या दशमावरून बापाचा विचार करावा; ही उपपत्ति सकृद्दर्शनीं बरोबरशी वाटते, परंतु विचाराअंतीं ती कितपत टिकते तें पाहूं. संततिबीज हें आईजवळ उपजतच नसतें, तर तें ती बापापासून (पतीपासून) शरिरांत घेते आणि तेंच प्रसूतीकाळीं संततिरूपानें शरिराबाहेर टाकिते. ह्या आईप्रमाणेंच बापाचीही व्यवस्था आहे; म्हणजे संततिबीज, शुक्र, हें बापाजवळ उपजतच नसतें; तर तें तो अन्नरूपानें शरिरांत घेतो आणि तेंच तो गर्भाधानकाळीं शुक्ररूपानें शरिराबाहेर टाकितो, तेव्हां तें आईला मिळतें. आतां आईच्या ठिकाणीं जसें बाप (तिचा पती) हा बीजारोपण करितो, तसेंच बापाच्या ठिकाणीं अन्न हें बीजारोपण करितें; तेव्हां ह्या अन्नाची कारकता जर दशमाशीं जमत असेल, तर दशमावरून बापाचा विचार करणें योग्य ठरेल; परंतु भूमिविचार जसा चतुर्थावरून करितात, तसाच भूमीत पिकणाऱ्या अन्नाचा (धान्याचा) विचार चतुर्थावरूनच करितात; तो कांहीं दशमावरून करीत नाहींत. येथें सृष्टींतील दृश्य वस्तु जमीन व पीक यांचा संबंध क्रमानें आई व बाप ह्यांच्या अनुक्रमें चतुर्थ व दशम या स्थानांची कारकता बरोबर दाखवीत नाहीं. अन्नापासून "रसा सृङ्मांस मेदोस्थि–मज्जाशुक्राणि धातवः ॥ वाग्भटसूत्र अध्याय एक १" ह्या रसादि सप्तधातूंचें पोषण होत असल्यामुळें, अन्नापासून शुक्र होतें त्याबद्दल वाद नाहीं. तसेंच आईच्या ठिकाणीं बाप बीजारोपण करितो, व बापाच्या ठिकाणीं अन्न बीजारोपण करितें म्हणजे अन्नापासूनच शुक्र होतें, त्याबद्दलही वाद नाहीं; परंतु चतुर्थावरच्या भूमीप्रमाणें दशमावर अन्नाची कारकता जमण्याचा वाद असल्यामुळें, एका आईशींच जमणाऱ्या ह्या एकदेशी उपपत्तीविषयीं आणखी एक मुद्दा संभवतो; तो असा कीं, चतुर्थापासून लग्न हें दहावें स्थान येतें व आई दहाव्या महिन्यांत (ह्या महिन्याच्या पहिल्या आठवड्यांत) प्रसूत होते, म्हणून आईचें स्थान चतुर्थच धरावें; पण त्याही मुद्यांत कांहीं अर्थ नाहीं. कारण, वैद्यशास्त्रांत प्रसूतिकाळ हा सातव्या महिन्यापासून उक्त आहे, म्हणजे ७-८-९ हे महिने व दहाव्याचा आठवडा इतका काल प्रसूतीचा

आहे; ह्या कालांत गर्भिणी केव्हांही प्रसूत झाली तरी त्या त्या वेळच्या स तीच्या कुंडलींत लग्न हें चतुर्थापासून दहावेंच येणार. त्यावरून असें होतें कीं, चतुर्थापासून प्रत्येक भावास एक महिना ह्याप्रमाणें लग्नाप येणारा काळ, हा संततीचा गर्भावस्थाकाल बरोबर दाखवीत नाहीं. म्ह ही उपपत्तिही बरोबर नाहीं, बापासंबंधानें तर हा मेळ पहातांच येत ना कारण, दशमापासून चतुर्थस्थान हें सातवें येतें. परंतु, बाप जें षड्स असें नाना प्रकारचें अन्न खातो, त्याचें शुक्र बनण्याचा व तें बनल्यावर श रांत राहण्याचा व नंतर तें शरिराबाहेर पडण्याचा काळ किती किती अस हें, शरिरोत्पत्तीचा विचार सांगणारें वैद्यक बिलकुल सांगतच नाहीं; प आर्यमत व त्याचें अनुयायी आँग्लमत ह्यांतला मातृ–पितृ–स्थान वि नोपपत्तिक असल्यामुळें विश्वसनीय नाहीं.

आँग्लमतांत जें तिसरें मत आहे, त्या मताचे अनुयायी क्याल्डी ज्योतिषी, टॉलमी, झडकील, रॅफेल, वाईल्ड वगैरे ज्योतिषी आहेत. हें आर्यमताच्या अगदीं विरुद्ध आहे. तें असें कीं, पुरुष किंवा स्त्री कोण जन्म पावो, त्याच्या कुंडलींत चतुर्थावरून बापाचा आणि दशमाव आईचा विचार करावा. हें मत आमच्या उपपत्तीशीं जुळतें आहे, हें पुढ विवेचनावरून सर्व जोशांस सहज समजेल. म्हणून आतां आमच्या उप त्तीच्या विचारास सुरवात करितों.

आईबापांपासून संतति होते हें जगांत सर्वत्र प्रसिद्धच आहे, ह्याब वाद नाहीं; आणि आई बाप ह्या दोघांचा विचार करण्याची स्थानें निरनिरा आहेत, ह्याबद्दलही जोशी मंडळांत बिलकूल वाद नाहीं फक्त वाद काय त्या दोघांपैकीं कोणाचें स्थान कोणतें ? ह्याबद्दलचाच आहे. तर ह्या वादग्र स्थानांचा निकाल लावण्यास आईचें आपल्या शरिराबाहेर संतति टाक आणि बापानें आपल्या शरिराबाहेर संतति बीज टाकणें हा मुद्दा फार म त्वाचा आहे. ह्या बाहेर टाकण्यासच जन्म ही संज्ञा होय. जन्म हा जीवा

नाहीं, तर तो फक्त देहाला आहे; आणि देह हें जिवाचें राहण्याचें घर आहे. आई आणि बाप ह्या दोहोंपैकीं प्रत्येकाच्या शरिरांत जिवाला निरनिराळे देह मिळतात, त्यांपैकीं हस्तपादादिकांनीं युक्त असा जगांत दिसणारा हा देह आईच्या शरिरांत मिळत असतो; आणि त्या देहाचें बीज जें शुक्र, तो शुक्र-रूपी देह बापाच्या शरिरांत मिळत असतो, व शुक्र आणि देह ह्या जिवाच्या दोन घरांना बाप आणि आई मिळून दोन जन्म देत असतात. त्यांतला दुसरा जन्म आईच्या प्रसूतिकाळीं मिळतो व पहिला जन्म आईच्या गर्भाधान-काळीं मिळतो. त्या दोन जन्मांपैकीं दुसरा जन्म हा मात्र जन्म ह्या नांवानें प्रसिद्ध आहे, परंतु गर्भाधानकाळच्या जन्माला मात्र जन्म असें लोकांत म्हणत नाहींत. तथापि वेदांमध्यें परमार्थसाधन निमित्तानें अनेक जन्मकथनप्रसंगीं ह्या गर्भाधानास पहिला जन्म अशी संज्ञा दिली आहे. ती येणेंप्रमाणें:—

॥ पुरुषेहवा अयमादितो गर्भो भवति यदेतद्रेतः ॥
॥ तद्यदा स्त्रियां सिंचत्यथैनज्जनयति तदस्य प्रथमं जन्म ॥ १ ॥

ऐतरेयोपनिषत् अध्याय पांचवा.

अर्थः—शरीर धारण करूं इच्छिणारा जीवात्मा, हा पुरुषाच्या शरिरामध्यें म्हणजे पितृ-शरिरांमध्यें प्रथमतः गर्भ होतो; तो स्त्रीच्या गर्भाप्रमाणें उदर-वृद्धीनें व्यक्त होणार नाहीं. तर पुरुषाच्या शरिरामध्यें जो रेतोरूप सप्तम धातु, ज्याला शुक्र अशी संज्ञा आहे, त्यालाच येथें गर्भ असें म्हटलें आहे. त्या रेताचें पुरुष जेव्हां ऋतुकाळीं स्त्रीगमन करून तिच्या गर्भाशयांत सिंचन करितो, तेव्हां पुरुष हा, स्त्रीगर्भाशय प्रविष्ट रेतोरूप शरीर, हें उत्पन्न करितो. हें जें पुरुषापासून स्त्रीगर्भाशयांत रेतोनिःसरण होतें, तो रेतोगर्भभूत संसारी जिवाचा प्रथम जन्म होय.

ही उपपत्ति चांगली लक्षांत येण्याकरितां, गर्भाधान ह्या अर्थी पहिला जन्म हे शब्द प्रसंगोपात् योजिले आहेत तसेंच प्रसूति ह्या अर्थी दुसरा जन्म असे शब्द योजिले आहेत. कुंडलींत लग्न जसें कुंडलीवाल्याचा संबंध दाखवितें,

तसचें चतुर्थ दशम हीं स्थानें त्याच्या जन्मसंबंधांत मुख्यत्वेंकरून सहाय्य करणारांचा संबंध दाखवितात. त्या दोन स्थानांपैकीं पहिला जन्म देणाऱ्या बापाचें स्थान भावमालिकेंतल्या क्रमानें जें पहिलें येतें, तें ध्यावें; व तसें तें चतुर्थच येतें, म्हणून चवथें घर बापाच्या विचाराकरितां ध्यावें. तसेंच दुसरा जन्म देणाऱ्या आईचें स्थान भावानुक्रमांत दुसरें येतें, तें ध्यावें; व तसें तें चतुर्थानंतर दशमच येतें, म्हणून दहावें घर आईच्या विचाराकरित ध्यावें. खालील कुंडली पहा.

कुंडली नं. १



येथें आर्यमताचे जोशी अशी शंका घेतील कीं, भावबलाच्या प्राधान्यानें भावानुक्रम कां धरूं नये? म्हणजे सर्वभावांत दशम हें अधिक बलवान असल्यामुळें तेथपासून दशम पहिलें, व चतुर्थ दुसरें येतें; त्यावर जन्मानुक्रम बसवून दशम बापाकरितां व चतुर्थ आईकरितां कां घेऊं नये? तर त्या शंकेचें समाधान असें कीं, तसा क्रम धरणें अगदीं चुकीचें आहे. कारण बाप जो जन्म देतो तो अदृश्य असतो, व आईनें दिलेला जन्म दृश्य असतो; म्हणून अदृश्य जन्म देणाऱ्या बापाचें घर अदृश्य गोलार्धांतलें चतुर्थच ध्यावें, आणि दृश्य जन्म देणाऱ्या आईचें घर दृश्य गोलार्धांतलें दशमच ध्यावें. ह्यांत भावबलही आपोआपच सांपडतें. तें असें कीं अदृश्य गोलार्धांतलें ख स्वस्तिक बापाला मिळतें. आणि दृश्य गोलार्धांतलें ख स्वस्तिक आईला मिळतें. पण दशमापासूनचा अनुक्रम हा जन्मक्रमाकडे लाविल्यास जन्मांचा दृश्यादृश्यसंबंध अगदींच चुकतो.

आईबापांचीं स्थानें गर्भावस्थेचा निश्चित काल व निश्चित झालेल्या प्रसूतिकाळाचा आरंभ हीं दाखवितात. म्हणजे प्रथम जन्माचें बापाचें घर हें आईच्या गर्भावस्थेचा पहिला महिना दाखवितें. व चतुर्थापासून दशम हें सातवें येतें. म्हणून तें वैद्यकांत निश्चित झालेल्या प्रसूतिकालारंभाचा सातवा महिना दाखवितें, आणि त्यापूर्वीचे सहा महिने हे वैद्यकांत निश्चित झालेला गर्भावस्थाकाल दाखवितात. सातव्या महिन्यांत झालेल्या मुलांस सातोळीं आणि आठव्या महिन्यांत झालेलीं मुलें आठोळीं ह्या विशेषणानें लोकांमध्यें प्रसंगोपात् व्यक्त होत असतात. प्रसूतीचे बरोबर महिने आईचें घर दाखवीत नाहीं. कारण प्रसूतीकालाची मर्यादा सातव्या महिन्यापासूनच ३। सव्वातीन महिने आहे; तथापि तें प्रसूतीकालाचा आरंभ दाखवितें.

कुंडली नं. २



एकादशस्थान हें गर्भाचा आठवा महिना दाखवितें, व तेंच गर्भाचें अष्टम आहे, आणि आईच्या अष्टमासमोरचें घर आहे. आठव्या महिन्यांत गर्भिणी प्रसूत झाली असतां बाळ व बाळंतीण ह्यांपैकीं कोणीतरी एक मरतें, असें वैद्यक सांगतें, तेंही येथें बरोबर जुळतें; चतुर्थस्थान आईचें घेतल्यास आठव्या महिन्यांतल्या प्रसूतीनें, एकादशस्थान हें गर्भ व आई ह्या दोघांचेंही अष्टमस्थान येत असल्यामुळें त्या दोघांचाही नाश होतो, असें वैद्यकानें सांगितलें असतें. पण तें तसें सांगत नाहीं. म्हणून आईचें घर दशमच घ्यावें. कुंडलीवाल्याच्या लोकप्रसिद्धीचा विचार दशमावरून करीत असतात तर त्याची जगांत प्रथम प्रसिद्धि जन्मद्वारा आईच करिते; म्हणून तशा प्रथम

प्रसिद्धीला मुख्य कारणीभूत जी आई, तिचा विचार दशमावरूनच करणें योग्य ठरतें. मुलांच्या जन्मसंबंधानें आईचाच उल्लेख करण्याचा प्रघात लोकांत आहे. तो असा कीं, अमुक बाई किंवा अमक्याची बायको बाळंतीण झाली काय? असें लोक विचारितात. त्या वेळेस बापाचा निर्देश कोणीच करीत नाहींत. कारण, त्याचें पहिला जन्म देण्याचें काम पूर्वीच झालेलें असतें. ह्या प्रघातावरून असें ठरतें कीं, मुलांना जगांत प्रसिद्ध करणाऱ्या आईचेंच नांव त्यांच्या जन्म निमित्तानें लोक उच्चारित असल्यामुळें मुलांच्या प्रसिद्धीचें कारक जें दशम तेंच आईचें कारक होय.

जन्मणाराच्या कुंडलीमध्यें त्याच्या जोडण्याकरितां पूर्वपश्चिम-केंद्र-स्थानांची योजना आहे, व त्याच्या आईबापांच्या जोडण्याकरितां दक्षिणोत्तर-केंद्र-स्थानांची योजना झालेली आहे. आणि त्यांतही जन्मणाऱ्यांकरितां पूर्वकेंद्र योजिलें आहे. ह्यांत ध्यानांत ठेवण्यासारखी गोष्ट ही कीं, जन्मणाऱ्याच्या स्त्रीपुरुष-भेदास अनुसरून त्याच्या समोरच्या स्थानावर त्याच्या उलट म्हणजे पुरुष-स्त्रीची योजना होत असते; परंतु बापाचें चतुर्थस्थान आणि आईचें दशमस्थान, ह्यांत मात्र संततीच्या स्त्रीपुरुष-भेदास अनुसरून उलटापालट होणें शक्य नाहीं; म्हणून त्यांचीं घरें आहेत तीं कायमचींच आहेत. कारण, जन्मणारा पुरुष असो किंवा स्त्री असो, त्याला पहिला जन्म बाप देतो, व दुसरा जन्म आई देते, हा आईबापांचा संततीला जन्म देण्याचा क्रम सृष्टिनियमास अनुसरून पाहतां कधींही बदलणें शक्य नाहीं. असें असतां, मिश्रमताचे जे सॅफरेल साहेब म्हणतात कीं, पुरुषकुंडलींत चतुर्थावरून आईचा, आणि दशमावरून बापाचा विचार करावा. ह्यांचा हा सर्व विचार आमच्या उपपत्तीनें अगदीं हास्यास्पद ठरतो. तो असा कीं, कोणत्याही जोडण्यास मुलगा व्हावयाचा असतां, आई अदृश्य जन्म देते व बाप दृश्य जन्म देतो, आणि मुलगी व्हावयाची असतां बाप अदृश्य जन्म देतो व आई दृश्य जन्म देते. म्हणजे मुलाच्या वेळेस बाप बाळंत होतो आणि मुलीच्या वेळेस आई बाळंतीण होते. पण हें जर खरें असतें, तर प्रत्येक जोडण्यास मुलगा होणार

किंवा मुलगी होणार, हें गर्भामुळें मोठें झालेल्या बापाच्या किंवा आईच्या पोटावरून अगोदरच कळलें असतें, पण जगांत तसें दिसत नसल्यामुळें, स्त्रीपुरुषभेदाप्रमाणें मातृपितृस्थानें बदलण्याची ह्या साहेब बहादुरांची सृष्टि-विरुद्ध कल्पना फारच विचित्र आहे, असें म्हणणें भाग पडतें.

आमच्या ह्या उपपत्तीनें आर्यमतही विचित्रच ठरतें; तें असें कीं, स्त्रीपुरुष कोणीही जन्मो त्या प्रत्येकाच्या वेळेस दशमावर गणला जाणारा बापच बाळंत होतो, असा ठराविक नियम दिसतो. हा सृष्टिविरुद्ध नियम आर्य-जोशांच्या दृष्टोत्पत्तीस आजपर्यंत कसा आला नाहीं, ह्याबद्दल आश्चर्य मानावें तितकें थोडेंच आहे.

आईच्या स्वतःच्या—कुंडलींत संततिविचार पंचमावरून होतो, पण तिनें दृश्य जन्म दिलेल्या मुलांच्या कुंडलींत तिचें स्थान जें दशम, तें आईचें लग्न धरून जी कुंडली तयार होते, तिच्यामध्यें आईच्या पंचमावरचा संततिविचार तिच्या चतुर्थावर आणि षष्ठावर विभागिला जातो, ह्याचें कारण आईचें दृश्य जन्म देणें म्हणजे तिचें बाळंतपण हें होय. ह्यामुळें ज्या मुलास आईनें जन्म दिला असेल, तो त्याच्याच कुंडलींतल्या आईच्या कुंडलींत चतुर्थस्थान दाखवितें, व तिलाच झालेली दुसरी मुलें तिचें षष्ठस्थान दाखवितें. तींच कुंडलीवाल्याचीं भावंडें होत. आणि हीं दोन्ही स्थानें तिच्या पंचमाच्या दोन बाजूंचीं असल्यामुळें, जें पंचमस्थान कुंडलीवाला व त्याचीं भावंडें ह्यांचा संबंध आपल्या सन्निधच्या दोन स्थानांवर असल्याचें दाखवितें, त्याच पंचमानें दर्शित लग्न म्हणजे कुंडलीवाल्याचें जें दशम तेंच आईचें स्थान धरणें योग्य ठरतें; म्हणून दशमावरच आईचा विचार करावा. म्हणजे सृष्टिनियम आणि ज्योतिषांतली भावरचना ह्यांना बाध येत नाहीं, म्हणूनच कुंडलीवाला पुरुष असो किंवा स्त्री असो, त्याचें दशमच आईचें कायमचें स्थान ध्यावें असें सिद्ध होतें. आईचें स्थान चतुर्थ धरिलें असतां तिचें पंचमस्थान हें कुंडलीवाल्याचें अष्टम येत असल्यामुळें, व तेंच अष्टम कुंडलीवाला व त्याचीं भावंडें ह्यांचा संबंध दर्शवित नसल्यामुळें, चतुर्थावर आईचा विचार करणें अगदींच अयोग्य आहे.

बापानें जन्म दिल्याशिवाय आईला जन्म देतां येत नाहीं, म्हणजे आई गरोदर झाल्याशिवाय तिला बाळंतीण होतां येत नाहीं; हें जरी खरें आहे, तरी आईनें जन्म दिल्याशिवाय बापानें दिलेल्या जन्माचें लोकांत फारसें महत्त्व मानीत नाहींत; आणि बापानें दिलेला गुप्त जन्म-सुद्धां आईच डोहोळे व उदरवृद्धि वगैरेनीं व्यक्त करिते; म्हणून जन्म देण्याच्या कामांत बापापेक्षां आईचेंच प्राबल्य फार दिसत असल्यामुळें चतुर्थ—दशम ह्या दोन्ही स्थानांत अधिक बलवान जें दशम तेंच आईचें स्थान धरणें अधिक इष्ट आहे. कारण त्यामुळें स्थानांचें बलाबल आणि जन्म देण्यांतलें आईबापांचें बलाबल हीं अगदीं बरोबर दर्शविलीं जातात.

आँग्ल जोशांत क्यालडीय ज्योतिषी टालमी, झडकील, राफेल इत्यादि आँग्ल ज्योतिर्विदांचें मत अगदीं बरोबर आहे, असें आम्ही समजतों. पण तें आँग्ल जोशांचें आहे, व आंग्लाचें ते सर्वच बराबर असतें, अशा समजुतीनें मात्र ते बरोबर आहे असें आम्ही समजत नाहीं. तर ते सृष्टिनियम, वैद्यक आणि व्यवहार ह्या तीन्ही दृष्टीनी आमच्या उपपत्तीशीं अगदीं तंतोतंत जुळतें, म्हणूनच ते मत अगदीं बरोबर आहे असें आम्ही म्हणतों, आणि ह्याशिवाय इतर सर्व मतें नोपपत्तिक असल्यामुळें चुकीचीं अतएव अग्राह्य आहेत, असें वरील उपपत्तीनें त्या त्या मताच्या लोकांस सहज समजण्या-सारखें आहे.

वरील आँग्ल ज्योतिर्विद मंडळीच्या मताचा अनुभव आम्ही आजपर्यंत घेत आलों आहों तसाच अनुभव सायन-जोशांनीं घ्यावा, म्हणून हा सोपपत्तिक मातृपितृस्थान विचार प्रसिद्ध केला आहे. गतानुगतिक, वृथाभिमानी व दुराग्रही जोशी खेरीज करून मार्मिक, गुणग्राही व सत्यप्रिय जोशांना ह्या मताची सत्यता, व तिच्यामुळें ह्याविषयीं पूर्ण विश्वास, आणि त्यामुळ ह्या मताचा अनुभव घेण्याची प्रवृत्ति ह्या कामांत वरील उपपत्ति फार उपयोगीं पडेल. तथापि, गणितमालिन्य, ग्रहसंख्येतली न्यूनता, असत्य ग्रह-कल्पना इत्यादि अनेक कारणांनीं आर्यज्योतिषांत स्वभावतःच असलेलें दौर्बल्य साय-

नजोशांत असल्यामुळें, त्या शास्त्रीय दौर्बल्य-नाशार्थ त्यांनीं आँग्ल ज्योतिषांतल्या उपयुक्त माहितीचें औषध घेतलें पाहिजे, त्याशिवाय, आमचें सायनच खरें आहे, असें नुसत म्हणत बसून चालणार नाहीं. कारण, " आर्यागीतिः—सायन सायन ऐसें गायन गाउनि रसायना चुकला ॥ उपयुक्त माहितीच्या तो अनुभववायना खचित मुकला ॥ १ ॥ " ते जर त्या शास्त्रांतली उपयुक्त माहिती न घेतील, तर ह्या मताच्या अनुभवाचें वाण खचित त्यांच्या पदरांत पडणार नाहीं; म्हणजे त्यांना खरोखरच चांगला अनुभव घेतां येणार नाहीं.

आँग्ल ज्योतिषांतली उपयुक्त माहिती सायन आर्य जोशांस मिळाल्यावर, त्यांनीं प्रथम मोठाल्या मनुष्यांच्या कुंडल्या ह्या अनुभवाकरितां घ्याव्या. कारण पुष्कळ वयाच्या मनुष्यांची जन्मवेळ तपासण्यास, चालू वर्षापर्यंतच्या त्यांच्या आयुष्यांत घडलेल्या महत्त्वाच्या अशा पुष्कळशा गोष्टी सांपडतात; त्यांवरून त्यांची जन्मवेळ तपासून ती बरोबर असल्याबद्दल जोशांनीं आधीं आपली खात्री करून घ्यावी. कारण, जन्मवेळेंत चूक राहिल्यास मातृपितृस्थानांच्या राशीच चुकण्याचा संभव असतो. किंवा कदाचित् त्या बरोबर असूनही त्यांच्या स्थानांचे आरंभांश चुकले असल्यास मातापितरांच्या पटलेल्या गोष्टी जमण्यास अडचणी येतात. म्हणून तशा कुंडल्या आमच्या उपपत्तीची सत्यता पाहण्यास बिलकूल उपयोगीं पडणार नाहींत. जन्मवेळ बरोबर असली म्हणजे ज्याप्रमाणें पुढील गोष्टी अनुभवानें बरोबर पटतात, त्याप्रमाणेंच अनुभवास बरोबर पटलेल्या गोष्टींवरून जन्मवेळेंत चूक असल्यास ती बरोबर करितां येते. हें जन्मवेळ तपासण्याचें ज्ञान ज्या जोशांत नसेल तो ह्या उपपत्तीची सत्यता पाहण्यास अयोग्य ठरेल; हें प्रत्येक सायनजोशानें चांगलें लक्षांत ठेविलें पाहिजे.

कुंडलींतल्या जन्मवेळेची तपासणी झाल्यावर मातृपितृस्थानांच्या राशि, त्यांचे स्वामी व त्या स्थानांत ग्रह असल्यास ते ह्यांवरून मातृपितृसंबंधी गोष्टींचा अनुभव पहावा. तसेंच त्यांच्या स्थानांस अनुसरून त्यांच्या नातलगांचीं जीं स्थानें ठरतात, त्यांच्या राशि, त्यांचे स्वामी, व तेथें ग्रह असल्यास ते, ह्यांवरून त्यांच्या नातलगांच्या गोष्टींचाही अनुभव पहावा; म्हणजे मातृपितृस्थानांबद्दल मुळींच शंका राहणार नाहीं.

ह्या उपपत्तीचा अनुभव पाहतांना, सायनजोशीमंडळींस आम्ही विनंतीपूर्वक अत्याग्रहानें अशी सूचना करितों कीं, सुचेष्टेनें प्रतिष्ठा मिळविण्याचें ज्ञान नसून प्रतिष्ठेस आधासल्यामुळें, कुचेष्टेनेंच प्रतिष्ठा मिळविण्याचा मार्ग धरणें हें जोशी म्हणविणाऱ्यासच शोभतें. म्हणून आमच्या ह्या उपपत्तीसंबंधानें विचार करण्याच्या कामांत, जोशी असणाऱ्याच्याच प्रश्नास योग्य उत्तर मिळेल; आणि जोशी म्हणविणारांपैकीं जो कोणी दिसेल त्याच्याकडे पूर्ण दुर्लक्ष करणें भाग पडेल.

———o———

परीभ्रमण पद्धति.

(मागील अंकावरून पुढें चालू)

(४) तृतीयेश चतुर्थांत भ्रमण करीत असतां कौटुंबिक गोष्टींमुळें त्रास होतो.

(५) तृतीयेश पंचमांत भ्रमण करीत असतां मनप्रवृत्ति लॉटरी, सट्टे यांजकडे होते. बौद्धिक विषयाची आवड वाढते.

(६) तृतीयेश षष्ठांत भ्रमण करीत असतां प्रवासांत त्रास होतो.

(७) तृतीयेश सप्तमांत असतां स्त्रीलाभ, लग्नकारणामुळें लहानसहान प्रवास व मित्रवर्गापासून त्रास होतो.

(८) तृतीयेश अष्टमांत भ्रमण करीत असल्यास प्रवासांत कष्ट किंबहुना मृत्यु सुद्धां होतो.

(९) तृतीयेश नवमांत भ्रमण करीत असतां लांबचा प्रवास व तीर्थयात्रा होतात. ग्रंथकारांना या भ्रमणावर ग्रंथप्रकाशनापासून कीर्ति, लाभ व धनलाभ होतो.

(१०) तृतीयेश दशमांत भ्रमण करीत असल्यास उद्योगधंद्यानिमित्य प्रवास होईल.

(११) तृतीयेश लाभस्थानांत भ्रमण करीत असतां प्रवासामुळें नवीन मित्राचा लाभ होईल.

(१२) तृतीयेश व्ययस्थानांत भ्रमण करीत असतां शत्रूपासून फार त्रास होतो.

चतुर्थेश द्वादशस्थानामध्यें.

(१) चतुर्थेश तनुस्थानांतून भ्रमण करीत असतां परिस्थितीप्रमाणें जमीनजुमल्यासंबंधानें फायदे होतील.

(२) चतुर्थेश बलवान असून धनस्थानांतून भ्रमण करीत असतां परिस्थितीप्रमाणें नवीन इस्टेट घेणें, व्यापार आरंभणें, पैसे कर्जाऊ देणें यांपासून फायदे होतील.

(३) चतुर्थेश शुभग्रह असून तृतीयस्थानांत भ्रमण करीत असेल तर प्रवास फायदेशीर होतील.

(४) चतुर्थेश शुभग्रह असून चतुर्थांतून भ्रमण करीत असतां नवीन इस्टेटीचा लाभ होईल. जन्मकालीन चतुर्थेश शनि किंवा मंगळ असन ते वार्षिक चतुर्थांत असल्यास इस्टेटीसंबंधानें भानगडी उपस्थित होतील. शनि किंवा मंगळ बलहीन असतील तर कोर्टात जाण्याचा प्रसंग येऊन अखेर अपयश येईल.

(९) चतुर्थेश पंचमस्थानामध्यें भ्रमण करीत असतां सट्ट्याच्या व्यवहारांत यश मिळण्याचा संभव आहे.

(६) चतुर्थेश षष्ठांत भ्रमण करीत असतां मातृपक्षाकडील मंडळींत मृत्यु होतो; गुरेढोरें, व नोकरचाकर यांमुळें त्रास होईल.

(७) चतुर्थेश सप्तमस्थानांतून भ्रमण करीत असतां बायकोकडून सांपत्तिक लाभ होतील. (अपूर्ण)

॥ श्रीसद्गुरवे नमः ॥

ज्योतिर्माला

आप्राचः कामरूपाद्दुहिणसुतनदप्लावितादाप्रतीचो
गान्धारात् सिंधुसार्द्राद्ध्रुवररचितादाचसेतोरवाचः ।
आकेदारादुदीचस्तुहिनगहनतः सन्तिविद्वत्समाजा
ये ये तानेष यत्नः सुखयतु समजान्कश्चमत्कर्तुमीष्टे ॥ १ ॥

अभिनवाऽऽवृत्ति वर्ष ४ थें. } आगष्ट १९१८. { अंक ५ वा.

द्विर्द्वादश योग.

(ले. जयवंतराव मंत्री जहागिरदार, मु. करंदी.)

त्रिंशत्स्वरूपाः सुनफानफाख्याः षष्ठित्रयं दौरुधरे प्रभेदाः ॥ इच्छा विकल्पैः क्रमशोऽमिनीय नीते निवृत्तिः पुनरस्य नीति ॥ या बृहज्जातकांतील श्लोकाचा अर्थ (पृ. १०७) ३१ प्रकारचे सुनफा, ३१ प्रकारचे अनफा व १८० प्रकारचे दुरुधरा असे याचे प्रतिभेद पडतात, ते ग्रहांचा फेरपालट कल्पिला म्हणजे स्पष्टपणें ध्यानांत येतील, असा देवजी अप्पुराव देशपांडे यांनी केला असून श्रीयुत अंबाप्रसाद यांस शंका येत आहे. त्यांचे मतानें इतके योग होत नाहींत. झालेच तर सुनफा व अनफा १९।१९ आणि दुरुधरा ज्यास्तींत ज्यास्त २९ असे योग होतील. यापेक्षां जास्त होत नाहींत अशी

त्यांची समजूत आहे. वराहमिहिरानें नुसती खानेसुमारी दिल्यामुळें त्यांची जिज्ञासा अतृप्त राहत असून ते विस्तारशः कळण्याची इच्छा करितात. ही त्यांची इच्छा तृप्त व्हावी एतदर्थ (त्यांचा लेख वाचून झाल्यानंतर केलेल्या खटपटींत यश आल्यामुळें) खुलासा करीत आहें.

चंद्राचे द्वितीयस्थानीं ग्रह असून होणारे सुनफायोग.

मं. १	मं. गु. ७	गु. शु. १३	मं. गु. शु. १९	गु. शु. श. २५
बु. २	मं. शु. ८	गु. श. १४	मं. बु.गु.शु. २०	मं.बु.गु.शु. २६
गु. ३	मं. श. ९	शु. श. १५	मं. शु. श. २१	मं. बु.गु.श. २७
शु. ४	बु. गु. १०	मं.बु.गु. १६	मं. गु. शु. २२	मं.गु.शु.श. २८
श. ५	बु. शु. ११	मं.बु.शु. १७	बु. गु. श. २३	मं.बु.शु.श. २९
मं.बु.६	बु. श. १२	मं.बु.श. १८	बु. शु. श. २४	बु.गु.शु.श. ३०
				मं.बु.गु.शु.श. ३१

हेच ग्रह द्वादशस्थानीं कल्पिले म्हणजे ३१ प्रकारचे अनफायोग होतील.

चंद्राचे द्वितीय द्वादशस्थानीं ग्रह असून होणारा दुरुधरायोग.

अ. नं.	द्वितीय.	द्वादश.	अ. नं.	द्वितीय.	द्वादश.	अ. नं.	द्वितीय.	द्वादश.
१	मं.	बु.	१३	श.	मं. बु.	२५	श.	बु. गु.
२	मं.	गु.	१४	बु.	मं गु.	२६	मं.	बु. शु.
३	मं.	शु.	१५	शु.	मं. गु.	२७	गु.	बु. शु.
४	मं.	श.	१६	श.	मं. गु.	२८	श.	बु. शु.
५	बु.	गु.	१७	बु.	मं. शु.	२९	मं.	बु. श.
६	बु.	शु.	१८	गु.	मं. शु.	३०	गु.	बु. श.
७	बु.	श.	१९	श.	मं. शु.	३१	शु.	बु. श.
८	गु.	श.	२०	बु.	मं. श.	३२	मं.	गु. शु.
९	गु.	श.	२१	गु.	मं. श.	३३	बु.	गु. शु.
१०	शु.	श.	२२	शु.	मं. श.	३४	श.	गु. शु.
११	गु.	मं. बु.	२३	मं.	बु. गु.	३५	मं.	गु. श.
१२	शु.	मं. बु.	२४	शु.	बु. गु.	३६	बु.	गु. श.

३७	शु.	गु. श.	५५	गु.	मं. बु. श.	७३	मं. शु.	बु. श.
३८	मं.	शु. श.	५६	शु.	मं. बु. श.	७४	मं. शु.	गु. श.
३९	बु.	शु. श.	५७	बु.	मं. गु. श.	७५	मं. श.	बु. गु.
४०	गु.	शु. श.	५८	शु.	मं. गु. श.	७६	मं. श.	बु. शु.
४१	शु.	मं. बु. ग.	५९	मं.	बु. शु. श.	७७	मं. श.	गु. शु.
४२	श.	मं. बु. गु.	६०	गु.	बु. शु. श.	७८	बु. गु.	श. श.
४३	बु.	मं. गु. शु.	६१	श.	मं.बु.गु.शु.	७९	बु. शु.	गु. श.
४४	श.	मं. गु. शु.	६२	बु.	मं.गु.शु.श.	८०	बु. श.	गु. शु.
४५	बु.	मं. शु. श.	६३	शु.	मं.बु.गु.श.	८१	मं. बु.	गु. शु. श.
४६	गु.	मं. शु. श.	६४	गु.	मं.बु.शु.श.	८२	मं. गु.	बु. शु. श.
४७	मं.	बु. गु. शु.	६५	मं.	बु.गु.शु.श.	८३	मं. शु.	बु. गु. श.
४८	श.	बु. गु. शु.	६६	मं. बु.	गु. शु.	८४	मं. श.	बु. गु. शु.
४९	मं.	बु. गु. श.	६७	मं. बु.	गु. श.	८५	बु. गु.	मं. शु. श.
५०	शु.	बु. गु. श.	६८	मं. बु.	शु. श.	८६	बु. शु.	मं. गु. श.
५१	मं.	गु. शु. श.	६९	मं. गु.	बु. शु.	८७	बु. श.	मं. गु. शु.
५२	बु.	गु. शु. श.	७०	मं. गु.	बु. श.	८८	गु. शु.	मं. बु. श.
५३	गु.	मं. बु. शु.	७१	मं. गु.	शु. श.	८९	गु. श.	मं. बु. शु.
५४	श.	मं. बु. शु.	७२	मं. शु.	बु. गु.	९०	शु. श.	मं. बु. गु.

हेच ग्रह उलट धरून घेतले म्हणजे ९० योग होऊन दुरुधरा योगांची संख्या १८० होईल.

सुनफा, अनफा व दुरुधरा याचेच नियम वेशी, वाशि व उभयचरी यांस लागू होतील. जरी याबद्दल ग्रंथांत स्पष्ट उल्लेख नाहीं तरी जसे चंद्राचे तीन योग, त्याच नियमानुसार रवीचे तीन योग सांगितलेले आहेत. म्हणून, वेशी ३१ वाशि ३१ व उभयचरी १८० असे योग होतील.

वेशी, वाशि व उभयचरी योगांबद्दल शुभफळें व पाप ग्रहांचीं अशुभ फळें ग्रंथांत दिलीं आहेत. तीं एक एक ग्रहांचीं आहेत. हाच नियम एकापेक्षां अधिक ग्रहांस लागू करावयाचा. पाहिजे तर त्याची वर्गवारी करावी. उभयचरी योगांत शुभपाप असेल तेथें मिश्रफल घ्यावें. सुनफा, अनफा व दुरुधरा योगांत जरी पापग्रह असले तरी त्याचें फल शुभच सांगितलेलें आहे. या फलासाठीं (एकापेक्षां अधिक ग्रह असतील तेव्हां) वर्गीकरण करावें.

चंद्राच्या द्वितीय द्वादशस्थानीं ग्रह नसल्यास केमद्रुप नांवाचा योग होतो. याचें फल अति वाईट. ज्याच्या कुंडलींत असा योग असेल, तो राजवंशांत उत्पन्न झाला तरी या योगाचें वाईट फल त्यास मिळाल्यावांचून राहणार नाहीं. असा या योगाचा पराक्रम आहे. याचें कारण इतकेंच दिसतें कीं, चंद्र परप्रकाशित असल्यामुळें त्याला दुसऱ्याचे मदतीची जरूर आहे. त्यास जशी संगत मिळेल त्याप्रमाणें फल उत्पन्न करील. नसल्यास तो निर्बली असतो. चंद्र कालपुरुषाचें मन आहे. ज्याचें मन कमकुवत असेल त्याचे हातून पराक्रम काय होणार? ज्याचे हातून पराक्रम होणार नाहीं, त्याचे कपाळीं दुःख, दारिद्र्य दास्यत्व वगैरे ठेवलेलींच. हाच नियम चंद्रास लागू केलेला दिसतो.

ग्रहविचार.

(मागील अंकावरून पुढें चालू.)

दशमस्थ रविफल.

प्रयातोंशुमान् यस्य मेषाणेऽस्य श्रमः सिद्धिदो राजतुल्यो नरस्य ॥
जनन्यास्तथा यातनामातनोति....संक्रमेद्वल्लुभैर्विप्रयोगः ॥

रवि (मेष)—भाग्यवान्, मोठा अधिकारी, व्यापारांत सहज यश मिळणारा, राजकारणकुशल, राजप्रिय, सर्वत्र कीर्ति मिळविणारा होईल.

रवि (वृषभ)—दीर्घोद्योगी, हुद्देदार, राजप्रिय, संस्था बुडूं न देणारा, जास्त डौलानें राहणारा व स्वतःचा मान न बिघडण्याविषयीं जास्त काळजी घेणारा, पितृसौख्य अल्प.

रवि (मिथुन)—शास्त्रीय व्यासंगानें प्रसिद्धि पावणारा, उद्योगधंद्यांत फार द्रव्य खर्चणारा, सदसद्विवेकबुद्धीस जागून सल्ला देणारा, गूढशास्त्रांचें

मनन करणारा होईल. धंद्यांत बूड फार वेळां येईल व त्यामुळें बिकट परिस्थिति येईल.

रवि (कर्क)—व्यवहारकुशल, हिंडण्याचीं कामेंच बहुशः करणारा, मोठ्या जबाबदारीचीं कामें अंगावर घेणारा, गरीबीला घालविणारा असा होईल.

रवि (सिंह)—सर्व बाजूंनीं उन्नत, राजकार्यकुशल, उत्तम पुढारी, उत्साही, पितृसौख्य चांगलें; मोठमोठीं कामें करून हुद्दा व मान मिळविणारा, व दृढनिश्चयी होतो.

रवि (कन्या)—समाजशास्त्रज्ञ, व्यवहार व राजकारण यांचा मिलाफ करणारा, राजकीयमार्गानें नशीब काढणारा, यांत्रिक कामांत कुशल.

रवि (तुला)—राजमान्य, बक्षिसें व हुद्दे मिळविणारा, प्रत्यक्ष लोककार्य न करणारा व सामदाम वर्तनानें महत्व राखणारा, न्यायनिपुण, व्यापारी पण अडचणींत सांपडणारा, पितृसौख्य अडचणीचें किंवा पितृविरोधी.

रवि (वृश्चिक)—स्वतंत्र धंद्याकडे लक्ष घालणारा, भागीनें धंदा करणारा, वैद्यकींत यश मिळविणारा, उत्तम व्यवहारी, मातेचें किंवा पित्याचें सौख्य कमी.

रवि (धनु)—डॉक्टरी व लष्करी धंद्यांत यश. नोकरींत वरिष्ठांशीं तंटेबखेडे फार, धाडशी, उत्तमधोरणी, कोणत्याही राजकीय चळवळींत पुढाकार घेण्यास योग्य, दूरदृष्टीचा किंवा पुढील भवितव्याचें निश्चित धोरण सांगणारा.

रवि (मकर)—नोकरी करणारा, मुत्सद्दी, पण कष्टानें यश मिळणारा, पितृक्लेश फार.

रवि (कुंभ)—पित्यावर प्रेम करणारा, पण त्याचें सौख्य फार दिवस न भोगणारा, स्थावर इष्टेटीच्या व्यवहारांत मन घालणारा, सर्वदा अडचणींत दिवस घालविणारा.

रवि (मीन)—भाग्यवान्, स्वपराक्रमानें उदय पावणारा, रेल्वे, दळण-वळणाचे उद्योग करणारा, एजंटासारखीं कामें करणारा, प्रवासी.

एकादशस्थ रविफल.

रवौ संलभेत्स्वंचलाभोपयाते नृपद्वारतो राजमुद्राधिकारात ॥
प्रतापानले शत्रवः संपतन्ति श्रियोनेकधा दुःखभंगोद्भवानाम् ॥

रवि (मेष)—स्वपराक्रमानें उदयास येणारा, रेल्वेपोष्टें वगैरे खात्यांतून नौकरी करून मानमरातब मिळविणारा, व्यापारांत पुष्कळ फायदा होईल व मित्रसुख उत्तम मिळेल.

रवि (वृषभ)—मित्रांना मदत करणारा, हरतऱ्हेची संपत्ति मिळविणारा, सुखी, बँकेचे व्यवहार व सावकारी करणारा; मित्रही त्यास सुखी ठेवणारे असतात.

रवि (मिथुन)—मित्र फार, शेअर घेण्यादेण्याचे व्यवहार करणारा, मध्यम संपत्तिमान्, काव्यग्रंथाची जास्त आवड असलेला, कुलीन व विद्वान्.

रवि (कर्क)—मित्रच नुकसान करतील, पुत्रसौख्य कमी, गुह्य विषयांचा शोध करणारा, मोठाले लाभ अगदीं एन वेळीं बुडतील, धोक्याचीं कामें करणारा, हॉस्पिटलमधील कामांत महत्व मिळविणारा.

रवि (सिंह)—राजकारणांत, कौन्सिलांतील चळवळींत मन घालणारा, प्रमुखत्वानें आपल्या मित्रांसाठीं खटपट करणारा, उत्तम प्रकारचे लाभ पावणारा, वक्ता, राजप्रिय.

रवि (कन्या)—धंद्यापेक्षां नोकरींत जास्त महत्व मिळवील. यांत्रिक कामांत लक्ष घालणारा, मित्रांवर अवलंबून न राहणारा, हरतऱ्हेनें मान्यत्व मिळवणारा.

रवि (तुला)—विशेषत: राजकीय मार्गानें नशीब काढणारा, उत्तम

सल्लागार, न्यायानें वागणारा, प्रेमळपणानें मित्रांशीं वागणारा, फायद्यांत व्यवहार करणारा व स्वस्थिति उत्तम करणारा.

रवि (वृश्चिक)—लॉटरी वगैरे मार्गानें द्रव्यलाभ मिळविणारा. सर्वदा मत्सरबुद्धि जागृत ठेवणारा, वैद्यविद्येंत प्रवीण, लोकांकडून बक्षिसें मिळविणारा, गूढविद्येचा व्यासंग करणारा.

रवि (धनु)—भागीचे धंद्यांत यश, मित्रसुख चांगलें, स्त्रीसुख व स्त्रीपक्षाकडील धनाची प्राप्ति, संततीस फार कष्ट व अशक्तता, व्यापारांत द्रव्य मिळविणारा.

रवि (मकर)—मित्रांशीं वैर करणारा, अडचणींत भाग्य चोखाळणारा, कृपण, स्वार्थबुद्धी धरणारा.

रवि (कुंभ)—विद्वान्, ग्रंथकर्ता, धनाढ्य, मित्रविरोधी, वर्तमानपत्रांतून लेखक या नात्यानें लेख लिहिणारा, शास्त्रव्यासंगी.

रवि (मीन)—अकल्पित धनाची इच्छा करणारा, उदासी, शेतकी व बागाइतीकडे लक्ष पुरविणारा, मित्रांवर विश्वसून राहणारा.

व्ययभावस्थ रविफल.

रविर्द्वादशे नेत्रदोषं करोति विपक्षाहवे जायतेऽसौ जयश्रीः ॥
स्थितिर्लेचया लीयते देहदुखं पितृव्यापदोहारिनरस्वप्रदेशे ॥

रवि (मेष)—शेतशाही व इमारती बांधण्याकडे खर्च करणारा व गूढविद्या—आत्मशोधन—व्यासंग करणारा, वारंवार कष्ट भोगणारा, एकांतप्रिय, शत्रुताप सहन करणारा होतो; गुप्त पोलीसखात्यांत महत्वास येणारा.

रवि (वृषभ)—उद्योग करूनही दरिद्र भोगणारा, भ्रातृविरोधी, चैनी व उधळ्या, नेत्रदोष जास्त.

रवि (मिथुन)—चैनींत व कुमार्गात खर्च करणारा, हातांत द्रव्य टिकणार नाहीं. कर्ज फार, शास्त्रीय व्यासंगांत रमणारा, गैरहिशोबी, डोळ्यांत खुपऱ्या असणारा; राजदंड भोगणारा

रवि (कर्क)—उडाणटप्पू, खेळ खेळणारा, व्यवहार फार गुंतागुंतीचे करणारा, सर्वांकडून त्रास भोगणारा, ठकबाजीनें फसवणुकीनें किंवा नाहक संकटांत पडणारा.

रवि (सिंह)—शत्रुयोग फार, निधड्या छातीचा, छातीठोक कामें करणारा, स्त्रीसाठीं खर्च करणारा, मूर्खपणामुळेंच अवनत स्थितीस पोंचणारा.

रवि (कन्या)—कुबेरालाही दारिद्र्य आणणारा, हातचे लाभ गमाविणारा, मित्रांसही दूषण देणारा, नेत्रांत वारंवार फुलें पडतात ज्याच्या असा.

रवि (तुला)—गुप्तपणें शोध घेण्यांत उत्तम, गुप्त पोलीसखात्यांत महत्वाची नोकरी करून नेकीनें राहणारा. सांपत्तिक अडचणी फार येतील, पण असहाय्य मंडळींस मदत करणारा हिंडणारा.

रवि (वृश्चिक)—गरिबी अनुभवणारा, डोळ्यांतील पापणीचे आंतील बाजूस केस येण्याचा दोष असलेला, हॉस्पिटलमध्यें कामें करणारा, कमनशिबाचा, अपयशी पण वैद्यविद्याप्रवीण.

रवि (धनु)—गूढविद्याव्यासंगी, गलिच्छ, व्यसनी, धनाचा कारणाशिवाय व्यय करणारा, पितृविरोधी.

रवि (मकर)—स्त्रीपासून दुःख फार, रतिसौख्यासाठीं द्रव्य खर्च करणारा, शर्यतींत पैसे गमाविणारा, वादांत अपयश मिळविणारा, भागीच्या धंद्यांत स्वतःस नागवणारा होतो. नेत्र वारंवार पाण्यानें भरलेले अथवा अगदीं आळशी माणसासारखे असतात.

रवि (कुंभ)—राजदंड, शिक्षा भोगणारा, सर्वांशीं शत्रुत्वानें वागणारा, भलत्या भरीस पडणारा. द्रव्याचा एकदम नाश होतो ज्याच्या असा.

रवि (मीन) बुद्धीचा दुरुपयोग करणारा, अगम्य स्थलीं जाणारा, एकांतप्रिय, दारिद्र्य भोगणारा, आत्मज्ञानाचे पाठीस लागणारा व जलप्रवास करणारा होतो.

याप्रमाणें रवि हा प्रत्येक स्थानांतून निरनिराळ्या राशींत असतां फलें

उत्पन्न करील. अशा स्थितींत रवि असतां हें फल मिळतें किंवा नाहीं मिळाल्यास तें किती कुंडल्यांत मिळेल याचा अनुभव चाणाक्ष वाचकांनीं कळविल्यास त्याचा उपयोग शास्त्रसंशोधनास फार होईल.

असे फलें ठरविण्याचे प्रयोग चालू ठेविल्यासच प्रगति होईल. पूर्वग्रंथांचे रचनाकालीं जे धंदे नव्हते व जे केवळ आधुनिक शोधामुळेंच अस्तित्वांत आले त्यांचे संबंध ग्रहस्थितीवरून बसविले पाहिजेत. जेव्हां टाईपरायटर नामक यंत्राचा शोधच नव्हता तेव्हां टायपिस्ट किंवा या यंत्रावर काम करणाऱ्या इसमाचा नियम कसा ठरविणार? म्हणून नवीन नवीन शोध करण्याचें फलज्योतिष्यांनीं चालू ठेवून ते एकमेकांस कळविल्यास या शास्त्रास महत्व येईल.

—o—

परिभ्रमण पद्धति.

(८) चतुर्थेश अष्टमांत भ्रमण करीत असतां मातृकष्ट व जमीनजुमला वगैरेंचा नाश होण्याचा संभव आहे. मूळ कुंडलींत योग असल्यास चतुर्थेश अष्टमांतून भ्रमण करीत असतां मृत्युपत्रानें बायकोकडून अर्थप्राप्ति होते.

(९) चतुर्थेश नवमांत भ्रमण करीत असून बलहीन असल्यास मातृकष्ट होतील

(१०) चतुर्थेश दशमांत भ्रमण करीत असतां व्यापारधंदा किंवा नोकरी यांमध्यें यश मिळेल, पित्याकडून किंवा वृद्ध मनुष्याकडून मदत मिळते.

(११) चतुर्थेश शुभग्रह असून लाभस्थानीं भ्रमण करीत असतां मित्रलाभ होतो.

(१२) चतुर्थेश व्ययस्थानांत भ्रमण करीत असतां मालमत्तेमुळें शत्रु उत्पन्न होऊन पूर्वार्जित धनाचा व्यय होतो

पंचमेश द्वादशस्थानामध्यें.

(१) पंचमेश शुभ ग्रह असून तनुस्थानांत भ्रमण करीत असतां सौख्य प्राप्त होतें.

(२) पंचमेश धनस्थानांतून भ्रमण करीत असतां परिस्थितीप्रमाणें पुत्रामुळें लाभ होतात; जुगारी व सट्टेबाज लोकांस ह्या योगावर धनलाभ होतो.

(३) पंचमेश तृतीय स्थानीं भ्रमण करीत असतां चैनीसाठीं प्रवास घडतील.

(४) पंचमेश चतुर्थांत भ्रमण करीत असतां संततीस सौख्य मिळतें.

(५) पंचमेश पंचमांतून भ्रमण करीत असतां संततिसौख्य मिळतें. सट्टे, लॉटरीमध्यें धनप्राप्ति होण्याचा संभव असतो.

(६) पंचमेश षष्ठांतून भ्रमण करीत असतां संततीस दुखण्यापासून त्रास होतो.

(७) पंचमेश सप्तमांत भ्रमण करीत असतां संततीचा लाभ होतो.

(८) पंचमेश पापग्रह असून अष्टमांत भ्रमण करीत असतां संततीपासून त्रास व दुःख होतें. सट्टेबाज लोकांना पैशाच्या बाबतींत मोठाल्या ठोकरा लागतात.

(९) पंचमेश नवमांत भ्रमण करीत असतां धार्मिक प्रवृत्ति वृद्धिंगत होते व तीर्थयात्रा व सत्पुरुषांचा समागम घडतो.

(१०) पंचमेश दशमांतून भ्रमण करीत असतां ग्रहाच्या शुभाशुभत्वाप्रमाणें सुकीर्ति अगर दुष्कीर्ति होते

(११) पंचमेश लाभस्थानीं भ्रमण करीत असतां संततिलाभ होतो.

(१२) पंचमेश व्ययस्थानीं भ्रमण करीत असतां संतती, लॉटरी, सट्टे किंवा चैनीमध्यें द्रव्याचा व्यय होतो.

षष्ठेश द्वादशस्थानामध्यें.

(१) षष्ठेश तनुस्थानीं भ्रमण करीत असतां शरीरस्वास्थ्य रहात नाहीं.

(२) षष्ठेश धनस्थानांत भ्रमण करीत असतां आजारामुळें धनाचा व्यय होतो.

(३) षष्ठेश तृतीयस्थानीं भ्रमण करीत असतां प्रवास सुखकर होत नाहींत, कुटुंबांतील मनुष्यें—विशेषतः भाऊबहिणी—आजारी पडतात.

(४) षष्ठेश चतुर्थांत भ्रमण करीत असतां माता आजारी पडते व इस्टेटीसंबंधानें त्रास होतो.

(५) षष्ठेश पंचमांत भ्रमण करीत असतां अनियमित खाण्यामुळें दुखणीं येतात.

(६) षष्ठेश षष्ठांत भ्रमण करीत असतां नोकरांकडून त्रास होतो.

(७) षष्ठेश सप्तमांत भ्रमण करीत असतां गुप्तरोग होतो, बायको आजारी पडते व नोकरांकडून चोरी होते.

(८) षष्ठेश अष्टमस्थानांतून भ्रमण करीत असतां देहकष्ट होतात.

(९) षष्ठेश नवमांत भ्रमण करीत असतां (मूळयोगाप्रमाणें) खोट्या गोष्टी केल्यामुळें दुष्कीर्ति होते.

(१०) षष्ठेश दशमांतून भ्रमण करीत असतां वरिष्ठाबरोबर भांडणें होऊन नोकरी जाण्याचा संभव असतो. या योगानें कार्यामध्यें अपयश येतें.

(११) षष्ठेश एकादश स्थानामध्यें भ्रमण करीत असतां मित्रांबरोबर भांडणें होतात.

(१२) षष्ठेश व्ययस्थानांत भ्रमण करीत असतां अपघात होतो.

सप्तमेश द्वादशस्थानामध्यें.

(१) सप्तमेश लग्नांत भ्रमण करीत असतां स्त्रीसौख्य मिळतें. सप्तमेश पापपीडित व बलहीन असल्यास उघड शत्रु होतात व भागीदारांमुळें नुकसान होतें.

(२) सप्तमेश धनस्थानांत भ्रमण करीत असतां स्त्रीनाश व स्त्रीमुळें धननाश होतो.

(३) सप्तमेश तृतीयस्थानीं भ्रमण करीत असतां भाऊबंदांत शत्रुत्व होतें व शेजाऱ्यांशीं भांडणें होतात.

(४) सप्तमेश चतुर्थांतून भ्रमण करीत असतां बलवान असेल तर गृहसौख्य मिळतें.

(५) सप्तमेष पंचमांतून भ्रमण करीत असतां कुटुंबवृद्धि होते. सप्तमेश शुभग्रह असल्यास सौख्यप्राप्ति होते.

(६) सप्तमेश षष्ठांत भ्रमण करीत असतां शत्रूकडून त्रास होतो. स्त्री आजारी पडते.

(७) सप्तमेश सप्तमांत भ्रमण करीत असतां सप्तमेश बलवान असेल तर गृहसौख्य प्राप्त होते.

(८) सप्तमेश अष्टमांतूण भ्रमण करीत असतां सासऱ्याकडून धनप्राप्ति होते. सप्तमेश बलहीन असल्यास स्त्रीस कष्ट होतात.

(९) सप्तमेश दशमांतून भ्रमण करीत असतां सौख्यवृद्धि व धार्मिक प्रवृत्ति उत्पन्न होते.

(१०) सप्तमेश दशमांतून भ्रमण करीत असतां नोकरी धंद्यामध्यें भरभराट होते.

(११) सप्तमेश लाभस्थानांतून भ्रमण करीत असतां मित्रलाभ होतो.

(१२) सप्तमेश व्ययस्थानांतून भ्रमण करीत असतां स्त्रीमुळें त्रास होतो. सप्तमेश पापयुक्त व पापदृष्ट असल्यास स्त्रीनाश होतो.

अष्टमेश द्वादशस्थानामध्यें.

(१) अष्टमेश तनुस्थानांतून भ्रमण करीत असतां आजार, दुखणीं व संकटें येतात. हा भ्रमणकाळ शरीरप्रकृतीस कष्टप्रद असतो.

(२) बलवान अष्टमेश धनस्थानांतून भ्रमण करीत असतां मूळ कुंडलींत योग असल्यास बायकोकडून अगर मृत्युपत्रानें धनप्राप्ति होते; अष्टमेश बलहीन असल्यास धननाश होतो.

(३) अष्टमेश तृतीयस्थानांतून भ्रमण करीत असतां नातलगांमध्यें मृत्यु, वादविवाद व प्रवास यांमुळें त्रास होतो.

(४) अष्टमेश चतुर्थांतून भ्रमण करीत असतां उंचावरून पतन व आईबाप आजारी पडतात.

(५) अष्टमेश पंचमांत भ्रमण करीत असतां मुलें आजारी किंवा मृत्यु पावतात. अष्टमेश पापग्रह असून बलहीन असल्यास मृत्यु होतात.

(६) अष्टमेश षष्ठांत भ्रमण करीत असतां शरीरस्वास्थ्य रहात नाहीं.

(७) अष्टमेश सप्तमांत भ्रमण करीत असतां स्त्री आजारी पडते किंवा मृत्यु पावते. प्रवासांत चोरी होते. अष्टमेश बलवान असल्यास अशुभ फलें दृष्टोत्पत्तीस येत नाहींत.

(८) बलवान अष्टमेश अष्टमांत भ्रमण करीत अलतां गुप्त धनप्राप्ति होते.

(९) अष्टमेश नवमांत भ्रमण करीत असतां प्रवास सुखकर होत नाहींत.

(१०) अष्टमेश दशमांत भ्रमण करीत असतां नोकरी धंद्यांत ठोकर बसते, मानमान्यता कमी होते, व पित्यास कष्ट होतात.

(११) बलवान अष्टमेश लाभस्थानांत भ्रमण करीत असतां धनलाभ होतो.

(१२) अष्टमेश पापग्रह असून व्ययस्थानांतून भ्रमण करीत असतां धननाश व शत्रुभय होतें. मूळ कुंडलींत योग असल्यास तुरुंगवास प्राप्त होतो.

नवमेश द्वादशस्थानांमध्यें.

(१) बलवान नवमेश तनुस्थानीं भ्रमण करीत असतां मनःप्रवृत्ति सात्विक व धार्मिक विषयाकडे वळते, भाग्यवृद्धि होते व तीर्थयात्रा व प्रवास घडतात.

(२) नवमेश धनस्थानीं भ्रमण करीत असतां धनवृद्धि होते.

(३) नवमेश तृतीयस्थानीं भ्रमण करीत असतां प्रवासामुळें लाभ होतात. लेखन व्यवसायी लोकांस या भ्रमणावर मानमान्यता मिळते.

(४) नवमेश चतुर्थांत भ्रमण करीत असतां आईबापास कष्ट होतात. नवमेश शनि असल्यास कुटुंबांतील म्हातारा मनुष्य मरतो.

(५) नवमेश पंचमांत भ्रमण करीत असतां संततिसौख्य प्राप्त होतें.

(६) नवमेश षष्ठांत भ्रमण करीत असतां नोकर किंवा हाताखालच्या लोकांमुळें फायदा होईल. हें भ्रमण विशेष महत्वाचें नाहीं.

(७) नवमेश सप्तमांतून भ्रमण करीत असतां स्त्रीसौख्य प्राप्त होतें.

(८) नवमेश अष्टमांत भ्रमण करीत असतां धनप्राप्ति किंवा सौख्य यांचा अभाव होतो.

(९) नवमेश नवमांत भ्रमण करीत असतां धर्मप्रवृत्ति जागृत होते. तीर्थयात्रा घडतात, मनःस्वास्थ्य प्राप्त होतें व भाग्यवृद्धि होते. ग्रंथकार या भ्रमणामुळें प्रसिद्धीस येतात.

(१०) नवमेश दशमांत भ्रमण करीत असतां नोकरीधंद्यांत यश मिळतें व कीर्ति प्राप्त होते.

(११) नवमेश लाभस्थानांतून भ्रमण करीत असतां मित्रलाभ होतो.

(१२) नवमेश व्ययस्थानांतून भ्रमण करीत असतां धर्मकृत्यें, भाऊबंद व प्रवास यांमुळें संपत्तीचा व्यय होतो.

दशमेश द्वादशस्थानामध्यें.

(१) दशमेश तनुस्थानांतून भ्रमण करीत असतां नोकरीधंद्यांत मानमान्यता व धनप्राप्ति होते. अधिकाऱ्यांपासून फायदे होतात.

(२) दशमेश धनस्थानांतून भ्रमण करीत असतां धनलाभ उत्तम प्रकारें होतो. नवीन धंद्यास आरंभ करण्यास हा काळ उत्तम असतो.

(३) दशमेश तृतीयांत भ्रमण करीत असतां नोकरीधंद्यानिमित्तानें प्रवास घडतो.

(४) दशमेश चतुर्थांत भ्रमण करीत असतां नोकरीधंद्यांत त्रास होतो.

(५) बलवान दशमेश पंचमांत भ्रमण करीत असतां सट्ट्यांत किंवा लॉटरींत पैसे मिळतात.

(६) दशमेश षष्ठांत भ्रमण करीत असतां नोकरीधंद्यामुळें श्रम करावे लागतात. ह्या भ्रमणांवर कष्ट होतात.

(७) दशमेश सप्तमांतून भ्रमण करीत असतां व्यापारांत यश येतें.

(८) बलवान दशमेश अष्टमांतून भ्रमण करीत असतां मृत्युपत्रामुळें फायदा होण्याचा संभव असतो.

(९) दशमेश नवमांत भ्रमण करीत असतां हातीं घेतलेल्या कार्यांत यश प्राप्त होतें.

(१०) दशमेश दशमांत भ्रमण करीत असतां नोकरीमध्यें बढती होते, व्यापारांत यश मिळतें व मानमान्यता वाढते. हा काळ भरभराटीचा असतो.

(११) दशमेश लाभस्थानांतून भ्रमण करीत असतां धनप्राप्ति उत्तम होते.

(१२) दशमेश व्ययस्थानांतून भ्रमण करीत असतां नोकरीधंदा चांगला चालत नाहीं. दशमेश शनि असल्यास अधिकाऱ्यांशीं भांडणें होऊन नोकरी जाते.

लाभेश द्वादशस्थानांमध्यें.

(१) लाभेश तनुस्थानांतून भ्रमण करीत असता मित्रप्राप्ति, मित्रामुळें फायदे व मुलांचा उत्कर्ष होतो.

(२) लाभेश धनस्थानीं भ्रमण करीत असतां धनप्राप्ति होते.

(३) लाभेश तृतीयस्थानांतून भ्रमण करीत असतां भाऊ, नातलग यांच्याशीं सख्य राहतें.

(४) लाभेश चतुर्थस्थानीं भ्रमण करीत असतां भाऊबंद व इस्टेट यांच्यामुळें त्रास होतो.

(५) लाभेश पंचमांत भ्रमण करीत असतां संततिलाभ होतो.

(६) बलवान लाभेश षष्ठांत भ्रमण करीत असतां विश्वासू चाकर मिळतात.

(७) लाभेश सप्तमांत भ्रमण करीत असतां स्त्रीसौख्य मिळतें व कुटुंबांत शांतता रहाते.

(८) लाभेश अष्टमांत भ्रमण करीत असतां मित्रहानि होते.

(९) लाभेश नवमांत भ्रमण करीत असतां मित्रामुळें लाभ होतात, प्रवासांमुळें मित्रलाभ होतात.

(१०) लाभेश दशमांत भ्रमण करीत असतां मित्रांच्या सहाय्यानें व्यापारांत धनप्राप्ति होते.

(११) लाभेश लाभस्थानीं भ्रमण करीत असतां धनलाभ व मित्रलाभ होतात.

(१२) लाभेश व्ययस्थानीं भ्रमण करीत असतां मित्रकार्यामुळें धनव्यय होतो, मित्रांमुळें हानि होते.

व्ययेश द्वादशस्थानीं.

(१) व्ययेश तनुस्थानीं भ्रमण करीत असतां शत्रु उत्पन्न होतात, शरीरस्वास्थ्य व मनःस्वास्थ्य नाहींसें होतें.

(२) व्ययेश धनस्थानीं भ्रमण करीत असतां संचित द्रव्याचा नाश होतो.

(३) व्ययेश तृतीयस्थानीं भ्रमण करीत असतां भाऊबंदांत तंटे होतात. भावंडांचें सौख्य मिळत नाहीं.

(४) व्ययेश चतुर्थांत भ्रमण करीत असतां मातृसौख्य मिळत नाहीं. जमीनजुमल्याचा नाश होतो.

(५) व्ययेश पंचमांत भ्रमण करीत असतां संततिसौख्य–हानि व सट्ट्यांच्या व्यवहारांत अपयश येतें.

(६) व्ययेश षष्ठांत भ्रमण करीत असतां नोकरलोकांमुळें त्रास होईल.

(७) व्ययेश सप्तमांत भ्रमण करीत असतां स्त्रीसौख्य–हानि होते; भागीदार व उघड शत्रु यांमुळें त्रास होतो.

(८) व्ययेश अष्टमांत भ्रमण करीत मृत्युपत्रानें मिळणाऱ्या धनाचा नाश होतो.

(९) व्ययेश नवमांत भ्रमण करीत असतां प्रवासांत हाल होतात.

(१०) व्ययेश दशमांत भ्रमण करीत असतां नोकरीधंद्यांत अपयश येतें.

(११) व्ययेश लाभांत भ्रमण करीत असतां मित्रहानि होते.

(१२) व्ययेश व्ययांत भ्रमण करीत असतां द्रव्यहानि व शत्रुभय होतें.

॥ श्रीसद्गुरवे नमः ॥

ज्योतिर्माला

आमाचः कामरूपाद्द्रुहिणसुतनदप्लावितादाप्रतीचो
गान्धारात् सिंधुसार्द्रादुघुवररचितादाचसेतोरवाचः ।
आकेदारादुदीचस्तुहिनगहनतः सन्तिविद्वत्समाजा
ये ये तानेष यत्नः सुखयतु समजान्कश्चमत्कर्तुमीष्टे ॥ १ ॥

अभिनवाऽऽवृत्ति वर्ष ४ थें. | सेप्टेंबर १९१८. | अंक ६ वा.

ग्रह दृष्टि विचार.

ग्रहांचें बलाबल कसें पाहतात या निबंधामध्यें दृष्टिबलासंबंधानें आम्हीं आमचे विचार मालेच्या वाचकांसमोर सन १९१६ सालामध्यें मांडिले आहेत. परंतु या विषयावर आणखी सविस्तर माहिती प्रसिद्ध करण्याविषयीं अनेकांकडून सूचना आल्याकारणानें चालू अंकामध्यें या विषयावर उहापोह करण्याचा आमचा मानस आहे.

आर्य ग्रंथांमध्यें सांगितलेली दृष्टिविषयक माहिती व हल्लीं यूरोपीय ज्योतिषशास्त्रामध्यें किंवा यावनी ज्योतिषशास्त्रामध्यें रूढ असलेली माहिती यामध्यें बराच फरक असल्यामुळें त्यांपैकीं ग्राह्य विचार कोणते व अग्राह्य कोणते हा प्रश्न बराच महत्त्वाचा असून तो तितकाच बिकट आहे. आर्य

ग्रंथामध्यें **पाव, अर्धा, पाऊण** व **संपूर्ण** दृष्टींचे चार प्रकार सांगितलेले असून शुभग्रहांच्या दृष्टीचीं शुभ फलें व अशुभ ग्रहांच्या दृष्टीचीं अशुभ फलें मानण्याचा प्रघात आहे. **गुरु, शुक्र,** शुक्लपक्षामधील पंचमीपासून वद्य पंचमीपर्यंतचा **चंद्र** व शुभसंबंधित असलेला **बुध** हे चार शुभग्रह मानलेले असून त्यांच्या दृष्टींचीं फलें सर्वदा शुभच मानलेलीं आहेत. **रवि, मंगळ** व **शनि** हे अशुभ ग्रह असून त्यांचे दृष्टीपासून अनिष्ट फलें योजावींत असें सर्व साधारणपणें आर्य ग्रंथकारांचें मत आहे. **द्रष्टा** व **दृष्ट** या दोन ग्रहांमध्यें किती अंतर असावें यासंबंधानें आर्यग्रंथांमध्यें मुळींच उल्लेख नाहीं. युरोपीय ज्योतिषशास्त्रामध्यें याचे उलट आहे. दृष्टीचें शुभाशुभत्व ग्रहांच्या शुभाशुभत्वावर नसून द्रष्टा व दृष्ट या दोन ग्रहांच्या मध्यें असलेल्या अंतरावर आहे. त्यांचे मतें दोन किंवा अधिक ग्रहांमध्यें जें विशिष्ट कोणात्मक अंतर आढळतें त्यास दृष्टि असें म्हणतात. दोन ग्रहांचीं आपल्या पृथ्वीवर येणारीं प्रकाशकिरणें किंवा आकर्षण रेषा जर एकमेकांस विसंगत अशा स्थितीमध्यें असेल तर त्यापासून त्या वेळीं पृथ्वीवर कांहीं तरी अनर्थपात, किंवा एकमेकांविरुद्ध धर्म उत्पन्न होऊन त्याचा परिणाम भयकारक किंवा अनर्थसूचक झाला पाहिजे अशी यावनी किंवा सांप्रतच्या यूरोपीय ज्योतिर्विदांची कल्पना आहे. हाच किंवा अशा तऱ्हेचा अनुभव आपणांस संगीत शास्त्रामध्यें चांगला पहावयास मिळतो. विशिष्ट रागाबरोबर विशिष्टच सुरांचें किंवा रागिणींचें उत्तम स्वरमेलन होतें; परंतु जर एकमेकांविरुद्ध असलेल्या सुरांची खिचडी केली असतां कर्णकटु व तीव्र कर्कश असा आवाज ऐकण्याचा प्रसंग येतो. याच नियमाचा दृष्टियोगांमध्यें यावनी ज्योतिर्विदांनीं अनुवाद केलेला आहे एका ग्रहापासून दुसरा ग्रह अमुक एका अंतरावर असला तर तो त्याचे गुणधर्मामध्यें आपल्या विशिष्ट कोणात्मक अंतरानुरोधान त्याचें बल किंवा गुणधर्म क्षीण किंवा पुष्ट करितो असें यावनी किंवा यूरोपीय ज्योतिर्विदांचें मत आहे.

यावनी ज्योतिर्विदांचे मतें ग्रह शुभ असोत किंवा पाप असोत ते जन्मकालीं किंवा प्रश्नकालीं ज्याप्रमाणें स्थान बली किंवा राशिबली असतां चांगलें

फल दर्शवितात त्याचप्रमाणें ग्रह शुभ दृष्टियोग करीत असतां शुभ फलें पाहण्यास मिळतात. शुभग्रह (गुरु किंवा शुक्र) देखील आपल्या अशुभ दृष्टीनें अशुभ फलें देतात. व हाच अनुभव जगामध्यें इतरत्रही पाहण्यास मिळतो. सोमल हा जितका तीव्र प्राणघातक आहे तितकाच तो उत्तम वैद्याच्या हातामध्यें प्राणसंरक्षक होतो. योजकाप्रमाणें वस्तूंचा ज्याप्रमाणें चांगला किंवा वाईट उपयोग होतो त्याचप्रमाणे ग्रहांचे शुभाशुभ धर्म देखील स्थान, राशि व दृष्टियोगांप्रमाणें म्हणजे ग्रह एकमेकांपासून ज्याप्रमाणें विशिष्ट कोणात्मक अंतरावर असतील त्या मानानें पाहण्यास मिळतात. जगामध्यें शुभ व अशुभ असें कांहींच नाहीं. ज्या मानानें जन्मलेल्या प्राण्यानें आपल्या संचिताप्रमाणें ग्रहांचीं तत्त्वें आपल्या शरीरामध्यें जन्मकालीं कमीजास्त प्रमाणानें आणलीं असतील त्या मानानें त्यास त्याच्या चालू आयुष्यामध्यें त्या त्या ग्रहांचे शुभाशुभ परिणाम पाहण्यास मिळाले पाहिजेत, हें सृष्टिनियमास धरून आहे. मानवी प्राण्यानें सृष्टीमधील ऐहिक सुखदुःखाच्या कल्पनेप्रमाणें ग्रहांचें किंबहुना सर्व वस्तूंचें शुभाशुभत्व कल्पिलेलें आहे. प्रत्येक ग्रह विशिष्ट प्रकारची आंदोलनशक्ति (vibratory motion) दर्शवितो असें जर मानिलें तर त्या त्या विशिष्ट ग्रहांच्या आंदोलनाप्रमाणें वागणाऱ्या प्राण्यास त्यापासून कधींच त्रास होणार नाहीं. परंतु याचे उलट ज्यांचें आचरण होईल त्यांस त्यापासून ताप उत्पन्न व्हावा हें सृष्टिधर्मास अनुसरून नाहीं असें कोण म्हणेल ? जन्मकालीन कुंडलींतील ग्रहस्थिति ही जन्मणाऱ्या प्राण्याजवळ विशिष्ट ग्रहांची कसकशा तऱ्हेची आंदोलन शक्ति आहे याचा पूर्ण बोध करून त्यानें आपल्या भावी आयुष्यक्रमामध्यें कसें वागावें याचा उलगडा करिते.

यावनी किंवा युरोपीय ज्योतिषग्रंथामध्यें अमुक अंतरानें होणारी दृष्टि शुभ व अमुक अंतरानें होणारी दृष्टि अशुभ असें सांगितलें आहे. यासंबंधानें निरनिराळ्या ग्रंथकारांनीं आपापल्या बुद्धिमत्तेप्रमाणें कार्यकारणसंबंध जुळवून दाखविण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्या सर्व विचारांची येथें पुनरावृत्ति कर-

ण्याची विशेष आवश्यकता आहे असें आम्हांस वाटत नाहीं. हें दृष्टिभेदाचें शुभाशुभत्व यवनाचार्यांनीं स्वानुभवाअंतीं ठरविलेलें आहे येवढेंच लक्ष्यांत घेतल म्हणजे पुरेसें आहे.

प्रसिद्ध आर्य आचार्य **वराहमिहिर** याचे वेळीं देखील यवनलोक—ग्रीक, खाल्डीयन, ब्याक्ट्रीयन किंवा सिथीयन—हे ज्योतिष शास्त्रामध्यें चांगले ज्ञानी होते व म्हणूनच त्याच्या सारख्या रसिकाच्या लेखणींतून "म्लेंच्छादि यवनास्तेषु सम्यक् शास्त्रमिदं स्थितम्" असे उद्गार निघालेले पाहण्यास मिळतात. व त्यानें ठिकठिकाणीं त्यांच्या मताचा उल्लेख केलेला आहे. परंतु दृष्टिविचारासंबंधीं पाहतां त्यानें इतर कोणत्याच आचार्याच्या नांवाचा उल्लेख केला नसून पाव, अर्धा, पाऊण व पूर्ण याच दृष्टि सांगितल्या आहेत. ही गोष्ट आर्य फलज्योतिषशास्त्र व यावनी फलज्योतिष संमेलनाचे इतिहासामध्यें फारच महत्त्वाची आहे. इतर सर्वत्र प्रचलित व अप्रचलित असलेल्या आचार्यांच्या मताचा उल्लेख करणारा वराहमिहिर यासंबंधानें कांहींच म्हणत नाहीं हें विशेष तर खरच पण फार महत्त्वाचें आहे. हल्लींचे यूरोपीय ज्योतिर्विदांमध्यें रूढ असलेले दृष्टिविचार किंवा इतर पुष्कळच माहिती इसवी सन १५० च्या सुमारास झालेल्या **टॉलमी**च्या ट्रेट्राबेब्लस नांवाच्या ग्रंथामध्यें पाहण्यास मिळते. इसवी सन ५५० च्या सुमारास वराहमिहिर झाला असावा असें कांहीं विद्वानांचें मत आहे. म्हणजे टॉलमीनंतर ४०० वर्षांनीं झालेल्या व साधारण गोष्टींमध्यें यवन आचार्यांच्या मताचा उल्लेख करणाऱ्या वराहमिहिरानें दृष्टिविचारासारख्या महत्वाचे प्रकरणामध्यें इतर यवन ज्योतिर्विदांबद्दल मुग्धत्व स्वीकारणें हें जरा चमत्कारिक दिसतें. त्याचप्रमाणें त्याच्या अगोदर २००।४०० वर्षें झालेला टालमीचा ग्रंथ त्यानें पाहिला नसेल असें म्हणावें तर त्याच मताचा अनुवाद करणारा एकही यवन ज्योतिर्विद भेटू नये हें जरा विचार करण्यासारखें आहे. व याच दृष्टीनें पाहतां वराहमिहिर हा टालमीनंतर खात्रीनें झाला नसावा असें मानण्यास मुळींच हरकत दिसत नाहीं व त्याचबरोबर वराहमिहिराच्या ग्रंथांत वर्णन केलेली आर्य ज्योतिष-

शास्त्राची माहिती ही भारतीय आर्यांस ग्रीकांकडून किंवा यवनांकडून मिळालेली नसून ती भारतांतील आर्यांच्या स्वतःच्या श्रमाची आहे असें म्हणण्यास मुळींच प्रत्यवाय दिसत नाहीं.

आचार्य वराहमिहिर यानें आपल्या बृहत् जातकामध्यें दृष्टीसंबंधानें खालीलप्रमाणें सांगितलें आहे.

" त्रिदश त्रिकोणचतुरस्र सप्तमान्यवलोक यंति चरणाभिवृद्धितः ॥
रविजामरेज्यरुधिरा स्तथाऽपरेक्रमशो भवंति किल वीक्षणेऽधिकाः॥"

तृतीय व दशमस्थानीं शनीची पूर्ण व इतरांची $\frac{1}{4}$ दृष्टि असते. नवम-पंचमस्थानीं गुरूची पूर्ण व इतरांची $\frac{1}{2}$ दृष्टि असते. चतुर्थाष्टमस्थानीं मंगळाची पूर्ण व इतरांची $\frac{3}{4}$ दृष्टि, आणि सप्तमस्थानीं सर्व ग्रहांची संपूर्ण दृष्टि असते.

वराहमिहिरानंतर झालेल्या सर्व ग्रंथकारांनीं याच मताचा अनुवाद केलेला आहे. पाहणारा ग्रह शुभ असतां त्याचें फल शुभ व अशुभ असतां त्याचें फल अशुभ अशी कल्पना किंवा भावना वराहमिहिराच्या काळीं किंवा त्याचसुमारास प्रचलित असणें संभवनीय आहे. त्यानंतर कांहीं ग्रंथकारांनीं दृष्टि करणारा ग्रह अमुक राशीमध्यें असून तो अमुक एका ग्रहास पाहत असतां अमुक एका प्रकारचें फल अनुभवास येईल असें वर्णन केलेलें पाहण्यास मिळतें. परंतु इसवी सन १२०० ते १३०० पर्यंतच्या काळापर्यंत म्हणजे **यवन** ज्योतिषशास्त्राचा जास्त परिचय होऊन **ताजिक** आमचेमध्यें रूढ होईपर्यंत या दृष्टिविचारामध्यें दोन ग्रहांमधील विशिष्ट अंशात्मक अंतरामुळें होणाऱ्या दृष्टीसंबंधी कल्पना व ग्रह अमुक एक अंतरावर आले असतां दृष्टि करण्यास समर्थ असतात किंवा द्रष्टा व दृष्ट यांच्या स्थितीनें उत्पन्न होणारा इत्थशाल योग वगैरेबद्दल कांहीं ज्ञान नव्हतें असें स्पष्ट दिसतें. आर्यज्योतिषशास्त्रकारांनीं दृष्टीच्या गणितगतबलाचा कीस काढण्याचा प्रयत्न केला परंतु त्यांनीं दृष्टिविचार अंशात्मक केला नाहीं हें दुर्भाग्य होय.

नुसत्या दृष्टीच्या बलाच्या खलबत्यांतून सूक्ष्म काढलेल्या दृष्टिबलाच्या चूर्णानें फलादेश सुगम होऊन त्यांत सूक्ष्मता आली असें म्हणता येत नाहीं. केशवीप्रमाणें किंवा श्रीपतीच्या मताप्रमाणें दृष्टीच्या सूक्ष्मगणिताचा फलें वर्तविण्याच्या कामीं किती उपयोग होतो याचा प्रत्येकानें आपल्या मनाशींच विचार करावा किंवा अनुभव घेऊन पहावा. आमचे मतें हा व्यर्थ कालव्यय करणारा खटाटोप आहे. त्याचप्रमाणें ग्रंथांतरीं अमुक राशीमध्यें ग्रह असून अमुक ग्रहावर पहात असतां वर्णन केलेलीं फल हीं तितकींच महत्त्वाचीं आहेत. भारतीय आर्यज्योतिषशास्त्रमंदिरामध्यें जे हल्लीं दृष्टींचें प्राचीन वर्णन आहे त्यावरून एखाद्या कल्पक व हुशार ज्योतिषास हल्लीं आंग्लज्योतिष वाङ्मयामध्यें असलेल्या दृष्टिविचारापर्यंत सहज मजल गांठतां आली असती. कारण एकतर दीप्तांश व अंशपरत्वें किंवा स्थानपरत्वें दृष्टीमध्यें शुभाशुभत्व मानण्याचा स्पष्ट उल्लेख ताजिक ग्रंथामध्यें इसवी सन १२०० ते १३०० पासून झालेला पाहण्यास मिळतो.

विद्वद्वर श्री ढुंढिराज याचा मुलगा गणेश दैवज्ञ यानें शके १४८० सुमारास केलेल्या **ताजिकभूषण** ग्रंथामध्यें खालीलप्रमाणें दृष्टींचे चार प्रकार कल्पिलेले आहेत. हे दृष्टींचे चार प्रकार पूर्वोक्त वराहानें सांगितलेल्या चार प्रकारांसारखेच आहेत. परंतु यावनी मताप्रमाणें असून वराहापेक्षां जरा भिन्न आहेत. व त्यांत विशिष्ट ग्रहाच्या अमुक एका स्थानावरील विशिष्ट दृष्टीसंबंधानें उल्लेख नाहीं. गणेशानें आर्य व यावनी दृष्टींचा मिलाफ करण्याकरितां हा प्रयत्न फारच कुशलतेनें केलेला आहे. परंतु त्यापासून व्हावा तसा उपयोग झालेला दिसत नाहीं. शके १४८० च्या पूर्वीचा ताजिकवरील एखादा ग्रंथ आम्हांस पाहण्यास न मिळाल्याकारणानें येथें गणेशाचा उल्लेख केला आहे.

लाभं तृतीयं चरणेन पश्येद् ग्रहश्चतुर्थद्वशमन्दलेन ।
तथात्रितुल्यैश्चरणै स्त्रिकोणं सम्पूर्ण दृष्ट्या तिजसप्तमेच ॥

प्रत्येक ग्रह ३ व ११ या स्थानांवर एक चतुर्थांश दृष्टीनें पाहतो.

४ व १० या स्थानांवर अर्धदृष्टीन. ५ व ९ स्थानांवर तीन चतुर्थांश दृष्टीन व स्वस्थानापासून ७ व्या स्थानावर पूर्ण दृष्टीन पाहतो.

या पाददृष्टिस्सुखलाभदात्री स्नेहप्रदा बुद्धिविवृद्धिकर्त्री ।
नन्वर्द्ध दृष्टिः स्वजनैर्विरोधं गुप्तारिभेदं कुरुते विवादम् ॥

ग्रहांची **एकपाददृष्टि** म्हणजे आपल्या स्थानापासून असलेल्या ३ व ११ स्थानांवर असणारी दृष्टि सुख लाभ देणारी, **स्नेहदाहक** व बुद्धि वाढविणारी आहे. **अर्धदृष्टि** ४ व १० स्थानांवर असणारी दृष्टि इष्टमित्रांबरोबर विरोध उत्पन्न करणारी म्हणून तिला **गुप्तारिभेद**दृष्टि म्हणतात.

त्रिकोण दृष्टयर्द्धनलाभसौख्यमित्रोन्नतिं चापि करोति नित्यम् ।
सम्पूर्ण दृष्टिस्सुतरामरिष्ट युद्धं विवादंचरिपून्दमंच ॥

त्रिकोणदृष्टि म्हणजे ५ व ९ स्थानावर असणारी दृष्टि मित्रवृद्धि करणारी व **सुखदायक** आहे. आणि **पूर्णदृष्टि** युद्ध, विवाद, अरिष्ट व शत्रुवृद्धि करणारी आहे.

या वरील दृष्टयांचे नांवास प्रसिद्ध निलकंठाचार्य यानें आपल्या ताजिक नीलकंठीनामक ग्रंथामध्यें १ **प्रत्यक्षस्नेहादृष्टि** (पंचम व नवमस्थानांवर असणारी दृष्टि) २ **गुप्तस्नेहादृष्टि** (तृतीय व एकादश स्थानांवर असणारी दृष्टि) ३ **गुप्तवैरादृष्टि** (चतुर्थ व दशमस्थानांवर असणारी दृष्टि) ४ **प्रत्यक्षवैरादृष्टि** (सप्तमस्थानावर असणारी दृष्टि) व **एकस्थानस्थिता** अशीं नांवें दिलेलीं आहेत. एकस्थानस्थिता याच दृष्टीस हल्लीं युतियोग किंवा युतिदृष्टि असें म्हणतात. यासंबंधानें पुढें वर्णन केलें आहे तें पाहावें. व हा युतिदृष्टियोग अत्यंत स्नेहवर्धक किंवा अत्यंत वैरात्मक असूं शकेल असें निलकण्ठाचार्याचें मत होतें व तसाच अनुभव मिळतो. यासंबंधानें योग्य ठिकाणीं खुलासा करण्यांत येईल. निलकंठाचार्यांनीं गुप्तस्नेहादि दिलेलीं नांवें फारच अन्वर्थक अशीं आहेत. करितां तृतीय एकादशयोग किंवा ६० अं. दृष्टियोग किंवा केन्द्रयोग, केन्द्रदृष्टि किंवा ९० अंशाची

दृष्टि असें म्हणण्यापेक्षां वरील प्राचीन संज्ञा उपयोगामध्यें आणाव्या असें आम्हांस वाटतें.

वरील विवेचनावरून पाहतां आर्यग्रंथांत वर्णन केलेल्या पाव, अर्धा, पाऊण व पूर्ण ह्याच दृष्टि यवनज्योतिर्विदांनीं थोड्या फरकानें उपयोगांत आणल्या असून दृष्टींच्या फलादेशाची कल्पना पाहणाऱ्या किंवा दृष्टि करणाऱ्या ग्रहाच्या शुभाशुभ धर्मावर न मानतां ती दृष्टि ज्या ज्या स्थानानुरोधानें किंवा अंशात्मक ठरविली त्या अनुरोधान शुभाशुभ कल्पिली आहे. कसेंही असो ज्योतिष वाङ्मयांतील दृष्टीसंबंधी कल्पना प्रथमतः कोठें तरी एकाच ठिकाणीं उगम पावली असली पाहिजे. विचाराअंतीं ही कल्पना आर्यज्योतिर्विदांस सुचली असून त्यानंतर ती इतर राष्ट्रांमध्यें पसरली असली पाहिजे. कारण दृष्टि पाहणाऱ्या ग्रहांच्या गुणधर्माप्रमाणें दृष्टीच्या शुभाशुभत्वाची कल्पना करणें हें काम अगदीं पहिल्या स्थितीचें—बाल्यावस्थेचें द्योतक आहे व तें तसेंच आज कमींत कमी दोन हजार वर्षें आर्यग्रंथांमध्यें दिसत आहे. याचे उलट यवनांनीं आपल्या दीर्घप्रयत्नानें, अनुभवानें व प्रागतिक विचारानें भारतीय आर्यांकडून मिळालेल्या ज्योतिषशास्त्रांच्या मूलतत्वाच्या पायावर भव्य ज्योतिषशास्त्र मंदिर उभारलेलें आहे. यवनांनीं ज्योतिषशास्त्र उत्तम पक्व स्थितीस वराहकालीं देखील आणलेलें होतें असें त्याच्या पूर्वी उद्धृत केलेल्या वाक्यावरून दिसतें व ही गोष्ट कोणासही नाकबूल करितां येणार नाहीं. हाच प्रकार दृष्टीसंबंधानें झालेला आहे. आर्यग्रंथकार दृष्टींचे पाव, अर्धा, पाऊण व पूर्ण असे चार प्रकार कल्पण्या पलीकडे गेले नाहींत तोंच यवन आचार्योंनीं दृष्टि अंशात्मक अंतरावर नेऊन तिचे फलादेशाच्या शुभाशुभत्वाची कल्पना अंशात्मक अंतरावर ठरविली इतकेंच नव्हे तर जेव्हां ग्रह विशिष्ट अंशात्मक अंतरावर येतात तेव्हां ते आपआपल्या दृष्टींचे परिणाम दृग्गोचर करितात म्हणजे त्यांनीं दृष्टींचे **दीप्तांश** ही ठरविले. या त्यांच्या दीर्घपरिश्रमांबद्दल ते खरोखरच स्तुतीस पात्र व वंदनीय आहेत. यवन आचार्योंची जरी पक्व अशी दृष्टियोगासंबंधी कल्पना किंवा विचार आम्हांपुढें सन १२०० ते १३०० पासून होते तरी आम्हीं

आमच्या ज्ञानांत भर घातली नाहीं. इतकेंच नव्हे तर आज विसाव्या शतकांत देखील आम्हीं आमच्या पाव, अर्धा, पाऊण दृष्टींच्या घोळांत आहों. व ही आमची जुनी अपुरी कल्पना आज मोठ्या प्रेमानें उराशीं बाळगीत आहों. धन्य आहे त्या आमच्या आर्य संस्कृतीची !! [अपूर्ण]

—o—

परिभ्रमण पद्धति

(लेखक:—राम नारायण)

(मागील अंकावरून पुढें चालू)

परिभ्रमण पद्धतींतील ग्रहांच्या भ्रमणाचा जो प्रथम विचार करावा लागतो त्यासंबंधानें मागें सांगितलेल्या भ्रमणफलांचा वाचकांना पुष्कळ उपयोग होईल. असो. आतां योगफलांचा विचार करूं.

मूळ कुंडलींत झालेले सर्व योग ग्रहांच्या भ्रमणकाळीं फलद्रूप होतात. हा एक साधा पण महत्त्वाचा नियम वाचकांनीं प्रथमारंभींच लक्ष्यांत ठेवावा. अर्थातच परिभ्रमणानें ज्या ज्या वेळीं मूळयोगांप्रमाणें किंवा त्यांच्याशीं संबंध करणारे योग घडून येतील त्या त्या वेळीं त्यांची (मूळयोगांचीं) फलें अनुभवास येतील हें अनुमान वरील नियमास अनुसरूनच आहे. उदाहरणार्थ एखाद्या कुंडलींत दशमस्थानीं बलवान रवि-गुरूंची युति आहे. सामान्यतः ह्या महत्त्वाच्या योगावर मनुष्य भाग्यवान असणारच पण ज्या ज्या वेळीं रवि किंवा गुरु ह्या मूळच्या योगाशीं शुभसंबंध (युतीनें अगर दृष्टीनें) करील किंवा परस्परांशीं युति अगर शुभसंबंध करतील त्या त्या वेळीं विशेष फलें अनुभवास येतील. रवि-गुरूंची युति पुन्हां ३३ वे वर्षीं वर्षलग्नाच्या

दशमांत होईल. हा काळ तर विशेष महत्त्वाचा जाईल. * या एकाच उदाहरणावरून वाचकांच्या लक्ष्यांत एक गोष्ट सहज येईल कीं मूळ कुंडलींत ग्रहांचे जे शुभाशुभ योग झालेले असतील त्यांच्याशीं संबंध करणारे किंवा परस्परांत मूलसदृश योग केव्हां केव्हां होतात हें प्रथम ठरविणें आवश्यक आहे आणि हें ठरविण्याचें काम विशेष कठीण आहे असें नाहीं. साधारण संबयीनें नुसत्या कुंडलीवरून भविष्यकालीन ग्रहयोग बसवितां येतात. या कामीं पुढील नियम वाचकांच्या विशेष उपयोगी पडेल. जर दोन ग्रहांमध्यें युति असेल तर त्या ग्रहांच्या भ्रमणकालांचा गुणाकार करून गुणाकारास भ्रमणकालाच्या अंतरानें भागिलें असतां तितक्या वर्षांनीं त्या दोन ग्रहांची पुन्हां युति होते. वरील उदाहरणांतील ग्रहांचे (रवि-गुरूंचे) भ्रमणकाल १९ व १२ असे आहेत. म्हणजे $\frac{१९ \times १२}{७} = \frac{२२८}{७} = ३२\frac{४}{७}$ वर्षांनीं त्यांची पुन्हां युति होईल. त्याचप्रमाण त्या दोन ग्रहांमध्यें ११ व्या व २२ व्या वर्षीं त्रिकोण योग व १७ व्या वर्षीं प्रतियोग होतील हें ग्रहांच्या युति-कालावरून दिसून येईल. याप्रमाणें इतर ग्रहांच्या योगांविषयीं समजावें.

आतांपर्यंत परिभ्रमणपद्धतीची जी सामान्य माहिती ग्रथित केली आहे ती चांगली लक्ष्यांत येण्यासाठीं एक उदाहरण घेऊन दाखवितों.

उदाहरण १ लें

जन्म ता. १९ डिसेंबर १८८९ वेळ सकाळीं ७ वाजून ७ मिनिटांनीं.

तन्वादि स्पष्ट षड् भाव.

तनु	धन	सहज	सुहृद्	सुत	रिपु
मकर २	कुंभ ४	मीन ८	मे. ११-३१	वृषभ १२	मिथुन ८

* प्रसिद्ध ज्योतिषी विज्ञानकार यांच्या कुंडलींतील रवि-गुरूंचा द्विराश्यंतरयोग आहे. परिभ्रमणानें ह्या ग्रहांची युति ५ व्या, ३८ व्या व ७१ वर्षीं होते. त्यांपैकीं ५ व्या वर्षाचा योग बालपणांतील असल्यामुळें विशेष महत्त्वाचा नाहीं. ३८ व्या वर्षीं त्यांच्या "स्वतंत्रतेनें चालविलेल्या उद्योगाला स्थिर व वाढतें स्वरूप प्राप्त झालें" योग-माला पा. १०० पहा. मूळचे शुभयोग परिभ्रमणानें असे फलद्रूप होतात.

सायन स्पष्ट ग्रह.

रवि, धनु २३-२१	चंद्र, कन्या १७-१५	बुध, धनु २७-२०
शुक्र, धनु ७-४२	मंगळ, तूळ २०-१९	गुरु, मकर १३-५७
शनि, कन्या ३-५९	हर्शल, २५-४४ व	नेपच्युन, मिथुन २-३६
	राहु, कर्क ३-२६	

वरील कुंडलीमध्यें ता. १ सप्टंबर १९१८ रोजीं परिभ्रमणानें काय ग्रहस्थिति होते हें पाहूं.

सन १९१७ डिसेंबर १९ ला २८ वीस वर्षें पुरी होऊन १ सप्टेंबर १९१८ पर्यंत ८ महिने व १८ दिवस अधिक होतात. म्हणजे २८ वर्षें ८ महिने व १८ दिवस इतक्या अवधींत आपआपल्या परिभ्रमणाच्या गतीनें प्रत्येक ग्रह कोठें कोठें आला आहे हें गणितानें काढूं.

(१) रवीचा भ्रमणकाळ १९ वर्षांचा आहे. १९ वें वर्ष ज्या वेळीं पुरें झालें त्या वेळीं रवि मूळच्या ठिकाणीं म्हणजे धनु २३-२१ मध्यें आला. इष्ट काळीं म्हणजे एक भ्रमणाच्या पुढें ९ व. ८ म. १८ दिवस इतक्या काळांत तो किती पुढें गेला हें त्रैराशिकानें काढलें पाहिजे.

व १९ : १२ रा :: $९\frac{४३}{६०}$ व : ६ रा—४ अं. ६ कला

मूळचा रवि रा ८—२३ अं—२१ क. + रा ६—४ अं—६ = रा २—२७ अं—२७ कला. ह्या पद्धतीचा उपयोग गणिताचें अवडंबर न माजवितां भविष्य करतां यावें असा आहे. तेव्हां भ्रमणकाळचे ग्रह काढतांना वरीलप्रमाणें त्रैराशिक सर्वांनाच आंकडे मोडल्यावांचून करतां येणार नाहीं. म्हणून तोंडी गणित करतां येईल अशी सोपी रीति सांगतों

इष्ट काळीं ग्रहांची किती पूर्ण भ्रमणें होऊन शेष राहिलेल्या काळांत

पाव, अर्ध किंवा पाऊण भ्रमण झालें आहे किंवा नाहीं हें लक्ष्यांत घेऊन नंतर राहिलेल्या कालाची ग्रहगति मिळवावयाची. प्रस्तुत उदाहरणांतील इष्ट कालामध्यें रवीचें १९ वर्षांचें १ भ्रमण पुरें होऊन व पुढील ९॥ वर्षांत अर्धें भ्रमण पुरें झालें आहे. म्हणजे बरोबर २८॥ वर्षांनीं रवि मिथुनेंत २३ अं. २१ कला आला. इष्ट काल यापुढें २ महिने १८ दिवस राहिला. रवीची वर्षाची गति सुमारें १९ अंश व महिन्याची १॥ अंश आहे. म्हणजे २ महिने १८ दिवसांत रवीची गति ३॥ अंश झाली ती मिथुन २३-२१ मिळवितां इष्ट काळचा रवि सांपडेल.

(२) चंद्रः—पुऱ्या २८ वर्षांमध्यें चंद्र ७ भ्रमणें पुरीं करून ८ महिने १८ दिवसांत २ राशि ४ अंश ३० कला पुढें जाईल. मूळचा चंद्र रा. ९ अंश १७ क. १५ आहे.

९–१७–१५+२–४–३०=७–२१–४५ परिभ्रमणाचा चंद्र.

(३) मंगळ—रवीप्रमाणें मूळ स्थानापासून रा. ६ अंश ४ क. ९ जातो

मूळ मंगळ ६–२०–१९+६–४–९=०–२४–२८ प. भ. मंगळ.

(४) बुधः—इष्टकाळामध्यें बुधाचें ३ रें भ्रमण चालू आहे. २० व्या वर्षीं २ रें भ्रमण पुरें होऊन त्यानंतर ८ वर्षें ८ म. १८ दिवसांची मिळविली असतां इष्टकाळचा परिभ्रमण काळचा स्पष्ट बुध होईल.

व. रा. व. रा.

१० : १२ :: $८\frac{४३}{६०}$: $१०\frac{१४}{३०}$

मूळचा बुध ८ रा. २७ अं. २० कला + १० रा. १४ अंश=७ रा. ११ अंश २० कला परिभ्रमणाचा बुध.

(५) शुक्रः—इष्ट काळांत शुक्राची ३॥ भ्रमणें पुरीं होऊन ८ महिने

१८ दिवसांची गति पुढें झाली आहे. शुक्राची वार्षिक गति ४५ अंश आहे.

म. १२ : ४५ अं. :: $८\frac{३}{६०}$ म : ३२ अंश. मूळच्या शुक्रामध्यें अर्धें भ्रमण व १ रा. २ अंश मिळविले असतां परिभ्रमणाचा शुक्र येईल.

मूळचा शुक्र ८रा. ७अं. ४२कला + ६ राशि + १रा. २अंश=३रा. ९ अं. ४२ कला. परिभ्रमणाचा शुक्र.

(६) गुरूचा भ्रमणकाळ स्थल मानानें १२ वर्षांचा आहे पण सूक्ष्म गणित करणारांनीं हा काळ ११ वर्षें ११ महिन्यांचा घ्यावा. ह्या मानानें इष्ट काळांत गुरूनें २ रें भ्रमण पुरें करून ४ व. १० म. १८ दि. इतक्या काळाचा भ्रमणमार्ग पुढें आक्रमण केला आहे. हा भ्रमणमार्ग ४ रा. २८ अंशांचा आहे. मूळचा गुरु ९ रा. १४+४ रा. २८ अंश=२ रा. १२अंश.

(७) शनीचा परिभ्रमणकाळ स्थूलमानानें ३० वर्षांचा व सूक्ष्म मानानें २९॥ वर्षांचा आहे. इष्ट काळांत शनीचें १ लें भ्रमण चालू आहे. एक संपूर्ण भ्रमण होण्यास ९॥ महिन्यांचा काळ जावयास पाहिजे. शनीची एका वर्षाची गति अं. १२ कला १२ आहे. ह्या मानानें तो मूळच्या स्थानापासून $९\frac{२}{३}$ अंश मागें आहे. मूळचा शनि रा. ५–३–५५ उणे ९ अंश=रा. ४ २४ अं. १५ कला.

(८) हर्शलचा परिभ्रमण काळ स्थूल मानानें ८४ वर्षांचा आहे म्हणजे दर राशीस ७ वर्षें होतात. इष्ट कालांत हर्शलनें चार राशी आक्रमून ९॥ महिन्यांची पुढें गति झाली आहे म्हणजे मूळस्थानापासून १२४ अंशांवर हर्शल इष्ट कालीं आहे. मूळचा हर्शल रा.६ अंश २५ कला४४+रा.४ ४अंश= १० रा.–२९ अं. ४४ कला.

(९) नेपच्युन १४ वर्षांनीं १ राशि म्हणजे इष्ट काळीं २रा. २अंश जातो. मूळ नेपच्युन रा. २ अंश २ क. ३६+रा.२–अं.२=रा.४–अं.४.

(१०) राहु:—राहूची गति एकमार्गीच म्हणजे वक्री असते. ग्रहांप्रमाणें कधीं वक्र तर कधीं मार्गी असा फरक होत नसल्यामुळें राहूच्या गोचर गतींत फेरबदल होत नाहीं म्हणून त्याची दैनिक स्पष्ट स्थिति पंचांगावरून घ्यावी. १ सप्टेंबर रोजीं राहु रा८ अंश१९ आहे.

वर दिलेले परिभ्रमणानें आलेले ग्रह मूळ कुंडलीच्या स्थानांत मांडले असतां कुंडली पुढें दिल्याप्रमाणें होईल.

(१) नंबर

लग्न



आतां परिभ्रमण काळाची कुंडली तयार करूं. इष्ट काळीं २९ वें वर्ष चाललें आहे. हें वर्ष पंचम स्थानाचें आहे. २९ व्या वर्षारंभीं लग्नीं जो अंश उदित असेल त्यापुढें इष्टकाळचें लग्न २१½ अंश पुढें गेलें आहे. (१ वर्षास ३० अंश याप्रमाणें ८ म. १८ दिवसांतील गति) पान ४० वर सांगितल्याप्रमाणें २९ व्या वर्षारंभीं तनुस्थानीं वृषभ राशीचा १२ वा अंश उदित होता त्यामध्यें २१½ अंश मिळवितां मिथुन ३–३० हें इष्ट काळचें तनुस्थान झालें, या तनुस्थानाप्रमाणें परिभ्रमणकाळची कुंडली पुढें दिल्याप्रमाणें आहे. ह्या कुंडलींतील ग्रह वरील नंबर (१) च्या कुंडलीप्रमाणेंच ता. १ सप्टेंबरचे आहेत.

परिभ्रमणाची कुंडली.



वरीलप्रमाणें मूळ व परिभ्रमणाच्या कुंडल्यांचा पान ४१ व ४२ वर सांगितलेल्या धोरणानें विचार करावयाचा असतो. हें धोरण मागेंच सांगि-

तलें आहे तेव्हां त्यासंबंधानें पुनरुक्ति करण्याचें कारण नाहीं. वाचकांनीं त्या धोरणानें वरील कुंडल्यांचा विचार करावा.

मूळ व वार्षिक कुंडल्यांतील ग्रहांचीं भ्रमणें आणि मूळ-ग्रह-योगांशीं किंवा तत्सदृश होणारे परिभ्रमणकाळचे योग यांचा विचार करणें हा प्रस्तुत पद्धतीतील भविष्यनिर्णयाचा पाया आहे व त्यासंबंधानें पुरेशी माहिती वर दिलेली आहे. भविष्यनिर्णयामध्यें नक्की कालानुमान करणें ही गोष्ट विशेष महत्त्वाची आहे. मूळ दशमस्थान दूषित करणारा शनि त्या स्थानांतून भ्रमण करीत असतां अनिष्ट फलें उत्पन्न करील हें सांगण्यास विशेष ज्ञान पाहिजे असें नाहीं. आयुष्यांतील २।२॥ वर्षांचा विभाग अनिष्ट म्हणून ठरविणें हें स्थूल कालानुमान झालें. येवढ्या स्थूल मानाच्या भविष्य निर्णयाचा उपयोगही तितकाच. आम्हांस कालानुमान महिन्यापर्यंत तर करतां यावेंच परंतु कांहीं प्रसंगीं तर तें दिवसापर्यंतही ठरवितां आलें पाहिजे. ही गोष्ट कठीण तर खरीच पण अगदींच अशक्य कोटींतील नाहीं हें प्रस्तुत पद्धतीचा अनुभव घेत असतां वाचकांच्या प्रत्ययास येईल. अशा तऱ्हेचें कालानुमान परिभ्रमणपद्धतीनें कसें करतां येईल ह्या संबंधानें सूचनात्मक माहिती येथें देतों.

॥ श्रीसद्गुरवे नमः ॥

ज्योतिर्माला

आमाचः कामरूपाद्दुहिणसुतनदप्लावितादाप्रतीचो
गान्धारात् सिंधुसार्द्रादधुवररचितादाचसेतोरवाचः ।
आकेदारादुदीचस्तुहिनगहनतः सन्तिविद्वत्समाजा
ये ये तानेष यत्नः सुखयतु समजान्कश्चमत्कर्तुमीष्टे ॥ १ ॥

अभिनवाऽऽवृत्ति वर्ष ४ थें. | ऑक्टोबर १९१८. | अंक ७ वा.

स्फुटविचार.

ह्या चालू असलेल्या साथीसंबंधानें आमचें मत काय आहे, ही साथ कोणत्या ग्रहस्थितीमुळें उत्पन्न झाली, किती काळ राहणार व एवढी मृत्युसंख्या कां व्हावी यासंबंधानें अनेकांकडून आम्हांस वारंवार प्रश्न विचारण्यांत येत आहेत. यासंबंधीं आम्ही आमचे विचार ज्योतिर्मालेच्या **जानेवारी १९१८** च्या अंकांत दहा महिन्यापूर्वीच प्रसिद्ध केले आहेत. सदरहू अंकामधील कर्क व तुला संक्रमण व हर्शल शनि यांचा प्रतियोग वगैरे संबंधी वर्णन वाचलें असतां आमचे विचार कळतील.

आद्य ज्योतिर्मालाकर्ते कै. रा. चिटणीस यांनीं ज्याप्रमाणें सन १८९९-९६ च्या प्लेगसंबंधीं सर्वांच्या पूर्वी स्पष्टतर शब्दामध्यें भविष्य वर्तविलें, त्याच-

प्रमाणें आम्हींही दहा महिन्यांपूर्वी अगदीं स्पष्ट शब्दांत या साथीचा व तीमुळें होणाऱ्या भयंकर मृत्युसंख्येचा उल्लेख केलेला असून हल्लीं असलेल्या मुंबई-शहराच्या व्यापारी स्थितीचें हुबेहुब वर्णन केलेलें आहे. व ही राष्ट्रीय भविष्यें ज्या तत्वावर करितात त्यासंबंधीं साग्र माहितीचें पुस्तकही आम्हीं प्रसिद्ध करून मालेच्या आश्रयदात्यांस शक्य तेवढ्या कमी किंमतीस दिलें आहे. परंतु या विषयाकडे अद्यापि आमच्या ज्योतिर्विदांचें लक्ष गेलेलं दिसत नाहीं.

* * * * *

गेल्या जानेवारीच्या अंकामध्यें हल्लींच्या परिस्थितीसंबंधानें पुढें लिहिल्याप्रमाणें उल्लेख केलेला होता. तूळ संक्रमणकाळीं " शनि हर्शलांचा प्रतियोग धनस्थान व अष्टमस्थान ह्यांतून होत आहे तेव्हां दुष्काळामुळें व भयंकर रोगामुळें मृत्युसंख्या वाढेल. ह्या दोन्हीं खल ग्रहांच्या अनिष्ट योगांस मंगळाच्या केन्द्रयोगानें अत्यंत भयंकरपणा आणला आहे. हा योग **भयंकर लोकसंहार दर्शवीत आहे.** दुष्काळ भयंकर स्वरूप धारण करील, नाना तऱ्हेचे रोग होतील, चोऱ्या, मारामाऱ्या व रक्तपात होऊन मनुष्यहानि होईल." " तारीख १७।१८ सेप्टेंबर पासूनचा काळ भारतवासीयांस व त्यांतले त्यांत मुंबईशहरच्या रहिवाशांस हा काळ अनिष्ट जाईल असें वाटतें. या कालामध्यें भयंकर रोगराई, अत्याचार, खून, मारामाऱ्या होऊन लोकांना हा काळ कष्टतम भासेल. जून नंतरचा काळ ह्या देशांतील उद्योग-धंद्यास, सांपत्तिक स्थितीस व सार्वजनिक आरोग्यास अत्यंत विघातक वाटत आहे."

देशांत जो हल्लीं हाहाकार उडाला आहे त्यासंबंधीं वर दिलेल्या स्पष्ट शब्दांमध्यें भविष्य सुमारें दहा महिन्यांपूर्वी करण्यात आलें होतें. हें भविष्य ज्या तत्वांस धरून केलेलें होतें तीं तत्वें लक्षांत घेतलीं असतां कोणाही विचारी ज्योतिर्विदास हा अनिष्ट काळ खात्रीपूर्वक कळला असता. चालू साली भयंकर दुष्काळ पडणार याचेंही भविष्य त्याच अंकामध्यें केलेलें आहे व हें भविष्य प्रसिद्ध झाल्यानंतर पुष्कळ ठिकाणीं पुष्कळांनीं भविष्यें प्रसिद्ध केलीं

होतीं व त्या भविष्यांत यंदा सुबत्ता होईल असेंही म्हटलेलें आमच्या पहाण्यांत आहे. (२२ जानेवारीचा केसरीचा अंक पहा) अशा प्रकारचीं भविष्यें करणारांनीं निदान प्रथम शास्त्राचा कांहींतरी पायाशुद्ध अभ्यास करावा. वाटेल त्यानें उठावें व भविष्य खरडून प्रसिद्ध करावें यानें शास्त्रावरील जनतेचा विश्वास कमी होतो. राष्ट्रीय भविष्यें करणारांनीं तर अतिशय काळजी घेणें जरूर आहे. पण अलिकडे प्रसिद्ध होणाऱ्या भविष्यवाद्यांकडून अशा प्रकारची काळजी घेतल्याचें दिसून येत नाहीं. ही दुःखाची गोष्ट आहे.

* * * * *

विशिष्ट व्यक्तीचीं भविष्यें जाणण्यापेक्षां राष्ट्राचीं भविष्यें जाणण कितीं महत्वाचें आहे या संबंधांत जितकें लिहावें तितकें थोडेंच होणार आहे. जेथें राष्ट्रेंच्या राष्ट्रें नामशेष होण्याचा काळ येतो किंवा जेथें जनतासंहार होण्याचा वेळ येतो तेथें एखाद्या दुसऱ्या व्यक्तीचा काय पाडाव ? राष्ट्रीय भवितव्यतेवर व्यक्तिभवितव्यता पुष्कळ अंशानें अवलंबून असते. किंवा राष्ट्रीय भवितव्यतेच्या नौकेचें सुकाणूं ज्याप्रमाणें फिरत असतें त्याप्रमाणें त्या त्या राष्ट्रामधील व्यक्तींस आपआपल्या कुंडलींतील ग्रहमानाप्रमाणें कमीजास्त प्रमाणानें फलें अनुभवास मिळतात. म्हणूनच मेदिनीय किंवा राष्ट्रीय ज्योतिषाचा अभ्यास आम्हांस चांगल्या तऱ्हेनें केला पाहिजे. आमचे आद्य आचार्य त्याप्रमाणें करीत होते व म्हणून त्या काळीं प्रत्येक ज्योतिर्विदास ज्योतिषशास्त्राचे संपूर्ण तिन्ही स्कंधाचे ज्ञानाची आवश्यकता भासत होती.

राष्ट्रांत रोगराई केव्हां येईल, लढाया केव्हां होतील, दुष्काळ केव्हां पडतील, कोणतीं पीकें बुडतील, त्या वेळीं कोणत्या प्रकारची सावधता बाळगली पाहिजे वगैरे गोष्टी मेदिनीय ज्योतिषशास्त्राचा अभ्यास केल्याखेरीज कळणार नाहींत. नुसता शनि सिंहेत येण्यापासून किंवा तो येण्याला कांहीं महिने अवकाश होता तेव्हांपासून जिकडे तिकडे हाहाकार उडावा, व्यापारधंदा बुडावा वगैरे वगैरे विधानें तितकींच अज्ञानपणाचीं आहेत असें आमचें ठाम मत आहे.

मेदिनीय किंवा राष्ट्रीय ज्योतिषशास्त्रावर आपल्याकडे मराठी भाषेमध्यें किंवा इतर देशी भाषांमध्यें एकही चांगला स्वतंत्र ग्रंथ नसल्याकारणानें या स्कंधाचा पूर्णपणें अभ्यास करितां येत नाहीं हें पाहून या विभागावर स्वतंत्र व सोप्या भाषेंत ग्रंथ लिहिण्यास कै. रा. चिटणीस यांनीं सन १९०१।०२ सालीं सुरुवात केली होती. परंतु अनेक अडचणींमुळें त्यांचे हातून तो ग्रंथ पुरा झाला नाहीं व त्यांची इच्छा तशीच अपुरी राहिली. ही त्यांची इच्छा पूर्ण होऊन मराठी वाङ्मयामध्यें अशा एखाद्या ग्रंथाची उणीव राहूं नये म्हणून सन १९१७ सालामध्यें आम्हीं ज्या कित्येक गोष्टी आम्हांस परंपरेनें कळल्या होत्या त्यांसह या विभागावर स्वतंत्र रीतीनें विवेचन करणारा **मेदिनीय ज्योतिष** किंवा **राष्ट्रीय ज्योतिष** नांवाचा ग्रंथ महाराष्ट्र वाचकवर्गापुढें ठेविला असून त्याच ग्रंथाधारें ज्योतिर्मालिकेच्या गेल्या जानेवारीच्या अंकांत मागील वर्षन केलेलें भविष्य प्रसिद्ध केलें आहे. व जे कोणी त्या पुस्तकाचा चांगला व्यासंग करतील त्यांसही आमच्यापेक्षां खात्रीनें उत्तम भविष्यें करितां येतील अशी आमची प्रामाणिक समजूत आहे.

* * * * *

डिसेंबरमध्यें जेव्हां आम्हीं जानेवारीच्या अंकाकरितां सन १९१८ सालाचें भावी स्थितीचें भविष्य करण्यास घेतलें त्याच वेळीं चालू सालचे दुष्काळाचें व साथीचें उग्र स्वरूप आमचे लक्षांत आलें होतें व त्याप्रमाणें आम्ही ठिकठिकाणीं त्या अंकामध्यें उल्लेख केलेला आहे. या वर्षाच्या पहिल्या सहा सात महिन्यांमध्यें पूर्वी भविष्य केल्याप्रमाणें व्यापारामध्यें भयंकर तेजी होऊन प्रत्येक वस्तूचे भाव सारखे वाढत गेले व सट्ट्यांच्या व्यवहारांस कल्पनातीत तेजी आली परंतु पूर्वी वर्तविल्याप्रमाणें आगष्ट महिन्याच्या २४ व्या तारखेनंतर एकंदर व्यापारामध्यें निराळेंच स्वरूप प्राप्त झालें आहे. शेअर, कापड, कापूस, या मार्केटमध्यें एकदम भाव उतरले आहेत. निरनिराळे करांसंबंधानें उपक्रम सुरू झाला असून सांपत्तिक स्थिति बरीच डळमळीत होंसूं लागली असून दिवाळीं कितीक निघतात यांची सर्वत्रांस धास्ती वाटूं लागली आहे.

तुमच्या एखाद्या दुसऱ्या ग्रहाच्या राश्यंतरानें असे प्रकार होतात काय? ज्यांच्या स्वप्नांत देखील या गोष्टी येत नाहींत ते जनतेस व्यापारज्योतिष काय शिकविणार? जर एकाच ग्रहाच्या राश्यंतरानें किंवा तो ग्रह विशिष्ट राशीमध्यें आल्यानें जगामध्यें असे मोठमोठे फेरफार होत असतात तर जेव्हां जेव्हां तो ग्रह त्या विशिष्ट राशीमध्यें आला असेल त्या त्या वेळीं तसलेच फेरफार झालेले आहेत काय? शनि हा (निरयण) सिंह राशीमध्यें ज्याप्रमाणें चालू वर्षी सूक्ष्म वेधसिद्ध पंचांगाप्रमाणें २० सेप्टेंबर १९१८ ला आला त्याचप्रमाणें तो सन १८८९,१८३०,१८०० या सालींही त्याच राशीमध्यें आलेला आहे. यंदासारखी प्राणहानी किंवा व्यापारांमध्यें स्थित्यंतरें वरील सालीं झालीं आहेत काय? शनीच्या राश्यंतरामुळें व्यापारामध्यें क्रांति होणार असें सांगणारे पंडितजी याचा खुलासा करतील काय?

* * * * *

चालू असलेल्या इन्फ्लुएंझा तापाच्या साथीच्या रोगाची उत्पत्ति कशापासून आहे याचा अद्यापि निर्णय झालेला नाहीं. हा रोग अशुभग्रहांच्या युति व दृष्टि यांपासून उद्भवतो असें इतालियनांचें मत होतें व त्या कल्पनेवरून इतालियनांनींच त्याला 'Influenza' हें नांव दिलें आहे. व चालू सालीं देखील **शनि, हर्शल** व **मंगळ** या खलग्रहांचा एकाच काळीं प्रतियोग व केन्द्रयोग झाल्यामुळें ही साथ उद्भवली आहे हें पाहण्यासारखें आहे.

चालू सालची ही साथ **वृषभ, सिंह, वृश्चिक** व **कुंभ** या स्थिर राशींमधून झालेल्या दृष्टियोगांमुळें झाली असून मृत्युसंख्येचें प्रमाण कल्पनातीत वाढलें आहे किंबहुना आजपर्यंत ज्या अनेक या रोगाच्या साथी येऊन गेल्या त्या सर्वांमध्यें चालू सालच्या मृत्युसंख्येनें तर पहिला नंबर पटकाविला आहे. ही साथ स्थिर राशीमधून उत्पन्न झाली असल्यामुळें लवकर बरी होईल असें चिन्ह दिसत नाहीं. ईश्वर करो व ही प्लेग सारखी आमच्या बोकांडीं कायमची न बसो म्हणजे बरें. शनिहर्शलांचा पुन्हा प्रतियोग जानेवारी १९१९ मध्यें होणार असून मंगळ हर्शलची युति ता. २२ जाने-

वारी १९१९ रोजीं होणार आहे. वरील गोष्टींवरून पाहतां आतां ही साथ साधारणपणें मंद होऊन डिसेंबर जानेवारीच्या सुमारास भयंकर उग्र स्वरूप धारण करील किंवा दुसरीच एक निराळी साथ उत्पन्न होऊन मृत्युसंख्या भयंकर वाढेल असें वाटतें. तारीख २२ डिसेंबर रोजीं होणारें मकरसंक्रमणही अशुभयोग प्रचुर असल्यामुळें तर त्यांत विशेष भर पडणार आहे. या साथीमध्यें स्थिरराशीन द्योतक असे शरीराचे विभाग लवकर रोगग्रस्त होतात करितां त्यासंबंधानें विशेष सावधता बाळगणें जरूर आहे. वृषभ राशीमुळें कंठ वशांतील दोन गांठी बऱ्याच सुजणें, पडजीभ बरीच सुजणें व त्यामुळ श्वासोश्वासाच्या क्रियेस प्रतिबंध होणें, हृदयाचे क्रियेमध्यें विकृती होणें, हार्ट लवकर बंद पडणें किंवा अशक्त होणें, रक्ताभिसरण बरोबर न होणें, रक्त दूषित होणें वगैरे गोष्टी सिंहेमुळें होतील असें वाटत. या साथीचे मुळाशीं पौष्टिक अन्नाची महर्गता व तीमुळें प्राप्त झालेला शरीरप्रकृतीचा किंवा जीवनशक्तीचा ऱ्हास हें मुख्य कारण आहे. व या रोगांवर हृदयास उत्तेजक औषधें, दालचीनीचा काढा किंवा अर्काचे थेंब, अंगामध्यें भरपूर उबदार कपडे, कोठा साफ होण्याकरितां हलकेसें रेचक याचीच फार आवश्यकता आहे.

चालू साथीसंबंधानें आमचे विचार चालू आहेत व ते सवडी सवडीनें मालेंत प्रसिद्ध करण्यांत येतील. सर्वच गोष्टी एकट्या माणसास कळत नाहींत. करितां मालेचा वाचकवर्गही शक्य तितक्या या साथीनें मृत झालेल्या माणसांच्या कुंडल्या मिळवून आपआपले अनुभव कळवितील तर या गोष्टींसंबंधानें सविस्तर विचार करण्यास सोपें पडेल. आजच्या अंकामध्यें आम्हीं या साथीवरील दोन ज्योतिर्विदांचे लेख प्रसिद्ध करीत आहोंत व असेच सर्व ज्योतिर्विद आपआपले विचार प्रसिद्ध करतील अशी आम्हांस फारफार आशा आहे. प्रत्येकाचे विचार आम्हांस मान्य आहेत किंवा ते सर्वांसच पटतील असें जरी नाहीं तरी प्रत्येकास त्यांपासून थोडाबहुत लाभच होईल. जो तो आपआपल्या मताबद्दल जबाबदार असतो व आपआपल्या बुद्धिमत्तेप्रमाणें प्रत्येक गोष्टीचा विचार करीत असतो.

इन्फ्लुएंझा.

(लेखक:—भास्कर रामचंद्र जोशी.)

सदरहू रोग आपल्या देशांत बऱ्याच जोरानें फैलावत असोन यामुळें बऱ्याच इसमांना धक्का पोंचत आहे. कोणाही डॉक्टर अगर वैद्याचे रामबाण उपाय जमत नाहींत आणि ते केव्हांही जमावयाचे नाहींत कारण अद्यापि वैद्य अगर डॉक्टर हे आपल्या धंद्यांत ज्योतिषशास्त्र विचारांत घेऊन वागूं लागले नाहींत व असें जेव्हां होईल तेव्हांच वैद्यशास्त्र पूर्ण होण्याच्या मार्गाकडे वळेल. असो.

मी आज या ठिकाणीं वरील रोगावर अनुभवाचे विचार लिहिणार आहें. सामान्यतः नियम असा आहे कीं षष्ठस्थान बिघडलें असतां विकार होतो. षष्ठस्थानीं रवि असेल किंवा तेथें अग्निराशि अगर मंगळ असतांना हा रोग होण्याचा फार संभव आहे. म्हणून डॉक्टर अगर वैद्य यांनीं प्रथम रोग्याची कुंडली पहाणें फार अवश्य आहे. सर्व रोग्यांच्या कुंडल्या मिळणें कदाचित् फार दुर्मिळ होणें सहाजिक आहे. यासाठीं आजाऱ्याच्या प्रथम चिन्हांवरून हा विकार कोणत्या ग्रहाच्या दोषामुळें उत्पन्न झाला असेल हें जाणण्याचे अनुभवाचे ताळे आहेत ते असे:—

कुंडलींत **चंद्र** बिघडला असल्यास पोट फुगतें, अग्नी मंद होतो, आणि आणि जीभ पांढरीशी बुळबुळीत होते. त्यांतच **मंगळ** असल्यास ओकाऱ्याही वारंवार येतातसें वाटतें. **मंगळ** नसून **शुक्र** असल्यास चांगलें पडसें येतें. एकटाच **शुक्र** असल्यास अंगांत जोराचा ठणका घालतो. **रवी**मुळें कपाळाच्या पुढच्या भागाची व डोळ्यांची फार आग होते. वय वर्षें ३६ पर्यंतच्या माणसांना **चंद्रसूर्य** बिघडल्यामुळें हा विकार होतो. त्यांतच **शनि** असेल तर खोकला किंवा सूज येईल. **गुरू**मुळें एकप्रकारची किंचित् अंगाला घाण येतेशी वाटेल. निव्वळ **चंद्र** बिघडल्यामुळ झालेला हा विकार २॥ दिवसांनंतर उतरूं लागतो. **मंगळा**चा ४॥ दिवसांनीं बरा होऊं लागतो. **रवी**चा १० दिवसांत उतरूं लागतो. ग्रह, कुंडलींत एक दोन अधिक जसे बिघडले असतील त्या मानानें आजाऱ्याला चिन्हें जास्ती कमी मिश्र होऊन दिवसही तसेंच कमजास्त लागतील. **चंद्रा**मुळें बिघडलेल्या रोग्यास लंघन चिकित्सेचा चांगला उपयोग

होतो. कुंडलींत रवि अनुकूल असेल तर आजाऱ्यास ताज्या पण कोमट पाण्याचा मनसोक्त उपयोग करूं द्यावा. रवि अनुकूल नसल्यास पाणी फार बेतानें द्यावें. पुष्कळदां डॉक्टर अगर वैद्य रोग्यास कोठा साफ होण्यासाठीं रेचक औषधांचा उपयोग करितात. सकृद्दर्शनीं स्वच्छतेसाठीं ही गोष्ट योग्यही दिसते, पण ही फार घातक होते. उदरस्थानीं कोणी अनुकूल ग्रह असतील तरच रेचकांपासून रोग्यास अपाय होत नाहीं. आणि प्रतिकूल वेळीं तर रोगी हटकून दगावतो. यासाठीं या बाबतींत औषधोपचार करणारांनीं फार दक्ष असावें.

सर वुइलीयम मूर के. सी. आय. ई. यांनीं केलेल्या फॅमिली मेडिसीन मॅन्युएल नामक ग्रंथाचा उपयोग बरेच इंग्रजी जाणणारे औषधोपचाराचे योजनेसाठीं करीत असतात म्हणून मीही त्याच ग्रंथांतील या रोगासाठीं कोणतें औषध केव्हां देणें पथ्यकारक होईल हें देतों. तो प्रकार पुढीलप्रमाणें आहे.

सदरहू पुस्तकाच्या शेवटीं औषधीक्रमांक घालून कृतीचें वर्णन दिलें आहे. म्हणून मी यां ठिकाणीं औषधाचा नंबरच तेवढा लिहीत आहें. औषध नं. १ **रवीमुळें** बिकार होईल तर दिलें म्हणजे कोठा साफ होऊन आराम वाटेल. **मंगळानें** बिघडेल तर नं. २ चें रेचक गुणावह आहे. **गुरूनें** दोषी होईल तर सायट्रेट ऑफ मॅग्नेशिया उपयोगांत आणणें अपायकारक आहे. **शनीमुळें** आजार झाल्यानें औषध नं. ९७ चांगलें गुणदायक होतें. आणि या औषधांचा उपयोग करून गुळवेलीचा काढा दालचिनीमिश्रित घेत राहिल्यानें फार जलद गुण येतो. सदरहू बुकांत वाइन किंवा ब्रँडी यांचा उपयोग करणेस शिफारस केली आहे. परंतु ती आर्यावर्तातील लोकांकरितां तरी साफ चुकीची आहे. औषध नं. ९६ हें बिकार कमी झाल्यावर शक्तीसाठीं द्यावयाचें आहे. आणि **रवीनें** अनुकूल पण **चंद्रानें** दूषित अशक्तांस याचा बरा उपयोग आहे. परंतु इतर वेळीं आमच्या आर्यवैद्याजवळचेंच शक्तिवर्धक चांगलें उपयोगीं पडतें. किंवा पुन्या माहितीनें लोह घेतलें असतांही गुण येतो. आतां ज्योतिषपद्धतीनें ग्रहबल पाहून औषधी योजना व निदान वगैरे करितांना डॉक्टर व वैद्यांनीं रोग्याचे कुंडलींत ग्रहबल वाढतें आहे किंवा कमी होतें आहे याजकडे नीट लक्ष दिलें पाहिजे व तदनुसार औषधोपचार केला असतां प्रत्येक केसींत यशच मिळत जाईल.

———o———

इन्फ्ल्युएंझा व ज्योतिषशास्त्र.

(तारीख १३ ऑक्टोबर १९१८ च्या ज्ञानप्रकाशावरून).

या रोगास Influenza हें नांव सतराव्या शतकांत पडलें. इटलींत ज्या वेळीं या रोगाचा प्रादुर्भाव झाला, त्या वेळीं ताऱ्यांच्या बला (Influenza) मुळें हा रोग उत्पन्न झाला अशी सर्वांची समजूत झाल्यावरून हें नांव प्रचारांत आलें व तेंच मेडिकल–वैद्यशास्त्रांनं उचललेलें आहे असें डॉ. एडमंड पार्क्स यांचें म्हणणें आहे.

पाश्चात्य ज्योतिषशास्त्राच्या दृष्टीनें आपण या रोगाचा किंचित विचार करूं. इंग्लंडामध्यें १८३० सालीं जेव्हां हा रोग उद्भवला, त्या वेळीं शनि व युरेनस (प्रजापति) यांची एकमेकांवर ऑपोझिशन–Opposition ची दृष्टि [पूर्ण किंवा सप्तम दृष्टि] होती. हें ऑपोझिशन शनि (सायन) सिंहेंत व हर्शल (सायन) कुंभेंत असतांना झालें. या सुमारास कुंभेंत चंद्रग्रहण झालें. तें ज्या ज्या ठिकाणीं दिसलें, त्या त्या ठिकाणीं ही सांथ झपाट्यानें वाढत गेली. १८३१ मध्यें देखील पुन्हां असाच योग आला व हर्शल शेजारीं सूर्यग्रहण पडलें. तें कुंभेच्या २४ व्या अंशावर पडलें.

हल्लीं उद्भवलेली सांथ ही हर्शल व शनि हे पुन्हां कुंभेंत व सिंहेंत अनुक्रमें परस्परांच्या ऑपोझिशनच्या दृष्टीनें युक्त झाल्यामुळेंच उत्पन्न झाली. हल्लीं हर्शल व शनि यांचें ऑपोझिशन हें हर्शल कुंभेंत (सायन) २४°–१४' अंश व शनि सिंहेंत (सायन) २४°–१४' अंश असतांना होत आहे. यावरून इतकें दिसतें कीं, कुंभेच्या २४° वा अंश हा ज्योतिःशास्त्रदृष्ट्या या इन्फ्ल्युएंझाच्या सांथींत विशेष महत्त्वाचा भाग आहे.

आपल्या शास्त्रांत व युरोपियन शास्त्रांत देखील **कुंभ** ही रास वायुप्रकृति आहे, असें सांगितलेलें आहे. आपल्या शास्त्रांत कुंभ रास ही घटांतील

आकाशाचें द्योतक आहे. युरोपियन शास्त्रांतही असेंच आहे. युरोपियन शास्त्रांत कुंभ रास मांडतांना चिन्हांचा उपयोग करतात. सदरहु चिन्हांत दोन कांपऱ्या (≈) रेघांमध्यें जी पोकळी आहे ती आकाशाची द्योतक आहे, असें आल्फ्रेड बार्लीनें आपल्या The Rationale of Astrology मध्यें म्हटलें आहे.

हर्शल किंवा युरेनस (प्रजापति) हा कुंभेंत शिरल्यामुळें हवा बिघडण्याचा योग असतो व बिघडलेली हवाच या रोगाचा प्रसार होण्यास कारणीभूत होते. श्वासोच्छवासाबरोबर बिघडलेली हवा गेल्यानें मुख्यतः घशास व फुफ्फुसांना विकार उत्पन्न होतो.

डोकें दुखणें, सांधे दुखणें, फुप्फुसांच्या क्रियेच्या बिघाड, खोकला, न्यूमोनिया, त्रॉंकाइटीस वायु उद्भवणें, वरचेवर अंग ठणकणें, आंतड्यांच्या क्रियेचा बिघाड होणें व कॉलरा अगर कालऱ्याप्रमाणें रेच होणें इतक्या गोष्टी हर्शल कुंभेत असतांना उद्भवतात आणि अंगांत विष शिरल्यामुळें हृदयक्रियेचा बिघाड होणें, पाठीस अशक्तता येऊन पाठ दुखणें, लिव्हर बिघडणें, नर्व्हस सिस्टीमला अशक्तता येणें, थंडीपासून ताप भडकणें, डोळे येणें या गोष्टी शनि सिंहेत असतांना होतात.

हर्ली चालू असलेल्या इन्फ्ल्युएंझाच्या सांथींत बहुतेक वरील विकारांचा समावेश होतो. डोळे येण्याची प्रवृत्ति इन्फ्ल्युएंझाच्या सांथींत जरी नाहीं तरी या सांथींत डोळे दुखण्याचा एक प्रकारचा त्रास होतो. शिवाय याच दिवसांत डोळे येणाऱ्या सांथीचाही प्रादुर्भाव झालेला आहे.

ज्यांच्या लग्नकुंडलींत (**सायन दृष्टीनें विचार केल्यास उत्तम**) शनि व हर्शल हे २-३-६-७-८ व क्वचित् १२ या ठिकाणीं असतील व त्यांची युति झालेली असेल अथवा एकमेकांवर अशुभ दृष्टियोग करीत असतील तर सांथींत आजार प्राप्त होऊन फार अपाय होण्याचा संभव आहे. त्याचप्रमाणें वर दिलेल्या घरांचे स्वामी जर शनि व हर्शल यांनों युक्त असतील अथवा त्याच्या अशुभ

दृष्टीनें युक्त असतील तरीही आजार प्राप्त होण्याचा योग आहे. परंतु गुरु अगर शुक्र अथवा शुभ चंद्र अथवा शुभ बुध यांची दृष्टि असेल (शुभदृष्टि असल्यास अति उत्तम) तर आजार फार लवकर बरा होईल. वास्तविक शुभग्रहांची हर्शल व शनि यांना जर शुभदृष्टि असेल तर आजाराचा योग नाहीं व जरी आला, तरी अत्यंत कमजोर असाच राहील.

शनि–हर्शलचें ऑपोझिशन ता. २९ आगस्टच्या सुमारास सुरू झालें. ऑपोझिशनचा दिवस ता. १ आक्टोबर हा आहे. विशेष भराचे दिवस ता.१० सप्टेंबर तें २० ऑक्टोबर पर्यंत आहेत. २० ऑक्टोबर नंतर या सांथीस उतार पडेल.

एम. के. देशपांडे–सातारा.

—o—

पत्रव्यवहार.

श्री.

रा. रा. संपादक ज्योतिर्माला मुक्काम मुंबई नं. १४ यांस सप्रेम वि. वि.

ज्यो. कुकदेव महेश्वर यांचा ज्योतिर्मालेच्या ४ थ्या अंकांत उपपत्तीस अनुसरून मातृपितृस्थानाच्या विचाराविषयीं आलेला लेख वाचण्यांत आला. (१) त्यांत त्यांनीं चतुर्थ स्थानावर पित्याचा व दशमावर मातेचा विचार करण्याविषयीं सुचविलें आहे. (२) त्यांनीं बसविलेली उपपत्ति चतुर्थस्थान पित्याचें व दशमस्थान मातेचें धरल्यास जमते असें त्यांचें मत दिसतें. (३) दशम भाव मातेच्या विचारार्थ घ्यावा असें सावार व प्रमाणयुक्त ग्रंथाधारें सिद्ध केलें नाहीं. (४) [अनेक भावडें असल्यास] सर्वांचें चतुर्थच स्थान बिघडलें म्हणून पितृहानी झाली असें म्हणतां येणार नाहीं. याविषयीं मला शंका उत्पन्न झाली आहे. सदरहूवरुन मीं द्वेषबुद्धीनें लिहितों असें मुळींच मानूं नये. खरें तत्व प्रचारांत आणण्याचा माझा हेतू आहे. माझ्या मतें मातृस्थानाचा विचार चतुर्थ, षष्ठम व द्वादश भावांवरून आणि पितृस्थानाचा विचार

चतुर्थ दशमभावांवरून व सूर्याचे ४।१० स्थानांवरून करावा. यास "षष्टेच द्वादशे राशौ यदा पापग्रहो भवेत् । तदा मातृभयं विद्याच्चतुर्थे दशमे पितुः ॥१॥ अम्बापाताल तूर्य । ताताज्ञा मान कर्मात ॥ इत्यादि प्रमाणें आहेत व तीं उपपत्तीला धरून आहेत. चतुर्थावरून मातापित्याचा, ज्यो. कुकदेव यांच्या भाषेंत म्हणावयाचें म्हणजे शेतीचा व बीजाचा बोध होतो. यावरून चतुर्थस्थान जातकामध्यें जन्म पावणाऱ्या प्राण्याच्या मातापित्याच्या संयोगाचें आहे असें मानण्यास हरकत नाहीं. नंतर षष्टम व द्वादशस्थानावरही मातृसौख्याचा विचार करण्यास सांगितलें आहे. षष्टस्थानांत म्हणजे गर्भाधानापासून तिसऱ्या महिन्यांत तो गर्भ पित्यापासून मातेच्या ठिकाणीं पूर्णांशें प्रवेश करितो. [तृतीये मासि सर्वेन्द्रियाणि सर्वाङ्गावयवाश्च यौगपद्येनाभि निर्वर्तने—चरक.] तिसऱ्या महिन्यांत सर्व इंद्रियें व सर्व अंगाचें अवयव एकदम उत्पन्न होतात. म्हणूनच तें स्थान मातृदर्शक असावें. गर्भस्थानापासून (चतुर्थभावापासून) द्वादशस्थान ९ वें येत असल्याकारणानें या वेळीं प्रसूति झाली तरी अनिष्ट नाहीं. चतुर्थ व षष्टम मातृस्थान मानलें कीं, अदृश्य गोलार्धांत गर्भधारण करणाऱ्या आईचा व गर्भोत्पादक जन्म देणाऱ्या पित्याचाहि बोध होतो. (द्वादश हें षष्टमाचे समोरील असल्याकारणानें मातृसुखाचा विचार करतेसमयीं त्याचें शुभाशुभत्व पाहणें जरूर आहे.) पांच महिने पूर्ण झाल्यावर सहावे महिन्यांत गर्भाचें स्थिरत्व मानण्यांत येतें म्हणजे कुंडलींतील भाग्यस्थान गर्भस्थानापासून सहावें स्थान हेच त्या गर्भाच्या भाग्योदयाचें, गर्भदृढत्वाचें अथवा जगांत मातृउदरीं स्पष्ट व्यक्त होण्याचें दृश्य गोलार्धांतील स्थान माणण्यास हरकत नाहीं. गर्भिणीची दोहद लक्षणें व सिमंतोनयनादि संस्कार याच कालांतच सांगितले आहेत.

कुंडली विज्ञानाचे विद्वान संपादक ज्यो. नवाथे यांनीं कुंडलीविज्ञान मासिकांत पुस्तक १२ अंक ४ ता. १ मे १९१२ चा अंक पृष्ठ २२।२३ वर खालील कुंडली दिली असून त्या कुंडलींतील पितृसुखाचा विचार केला आहे तो असा.—



"दशमस्थानीं शनि व मंगळ यांची अनिष्ट युति आहे व ती मेष राशींत आहे. दशमावर पितृसुखाचा विचार होतो, म्हणून या स्थानांत शनि व मंगळ यांची युति पितृसुखाचा नाश करणारी झाली. हें शास्त्रानुसारच घडलें. जें स्थान शनि व मंगळ यांच्या युतीचे आहे ते निःसंशय बिघडलेलें आहे म्हणून समजावें. शनि व मंगळ यांची युति हें एक जहर आहे. तें कोणता अनर्थ करील याचा नियम नाहीं. रवि हा कर्क राशींत असल्यामुळें हा शनिमंगळाचा योग त्याच्याही दशमांत झालेला आहे, म्हणूनच बाप फार दिवस जगूं शकला नाहीं. ज्योतिःशास्त्र हें शास्त्रच नाहीं असें म्हणणाऱ्यानीं या योगाचा मननपूर्वक विचार करावा. बापाचा मृत्यु ७ वें वर्षीं झालेला आहे, म्हणजे साडेसातीच्या पूर्वभागांत झालेला आहे, तोही यथार्थ आहे. कारण, रवि कर्क राशींत व्ययस्थानीं आहे, तेथें शनि आल्यावर पितृनिधन होणें शक्य आहे."

ज्योतिर्विद नवाथे यांनीं वरील कुंडलीचें वर्णन यथार्थ केलें आहे. त्यांनीं आर्यऋषिप्रणीत वचनांप्रमाणेंच विवेचन केलें आहे. तत्वास सोडून विवेचन केलें आहे असें आम्हास वाटत नसून केवळ चतुर्थ स्थानावरच पितृसौख्य निश्चित ठरवितां येईल हें म्हणणें फार धाडसाचें आहे. अनेक भावंडांच्या पितृसुखाचा विचार एकट्या चतुर्थावर होणें शक्य नाहीं.

वरील कुंडली सायन आहे. यांत पितृसुखाचें द्योतक असें दशमस्थानच दूषित आहे. कित्येक समयीं चतुर्थ बिघडलेलें तर कित्येक ठिकाणीं दशम पीडित असलेलें दृष्टीस पडतें. पितृस्थानाचा विचार ४।१० भावावरून व सूर्याच्या ४।१० स्थानावरूनच करणें शास्त्रसंमत व रा. रा. कुकदेव महेश्वर प्रभुदेसाई यांच्या तत्वास अनुसरून दिसतें. तसेंच मातृसुखाचा विचार चतुर्थ, षष्टम, द्वादश व चंद्राच्या याच भावापासून करणें योग्य दिसतें.

वरील कुंडलींत चतुर्थस्थानापासून सातवे वर्षीं पितृहानिकारक योग कोणकोणते घडले व दशमस्थानावरून रा. रा. प्रभुदेसाई यांच्या मतें मातेचा विचार होत असतां मातेच्या ऐवजीं पितृनाश इतक्या लवकर कां झाला, याबद्दल रा. प्रभुदेसाई सप्रमाण रीतीनें मालेच्या द्वारें माझ्या शंकेचें निरसन करतील काय? सदरहू गृहस्थाची माता मे सन १९१२ पर्यंत हयात असल्याचें कुंडली-विज्ञानामधील लेखावरून कळेल. कळावें, लोभ असावा हे विनंती.

आपला,

मुक्काम–राजंदा,
ता. १८-७-१९१८.

हरिहर सिताराम राजंडेकर.

ग्रह–दृष्टि–विचार.

(मागील अंकावरून पुढें चालू)

ग्रहांचे दृष्टियोग पाहतांना दोन ग्रहांमध्यें अंशात्मक अंतर किती असलें पाहिजे किंवा फक्त ग्रह एकमेकांसमोरच्या राशींमध्यें असल्यानें दृष्टियोग होतो किंवा काय याचा आमच्या ग्रंथांमध्यें चांगल्या रीतीनें खुलासा केलेला नाहीं व हा दृष्टीसंबंधीं अतिमहत्त्वाचा भाग आर्यग्रंथांमध्यें फार अपूर्ण असल्याकारणानें भिन्नभिन्न मतें व विचार रूढ आहेत. कित्येकांचे मतें ग्रंथांतरीं वर्णन केलेल्या पाव, अर्धा, पाऊण वगैरे दृष्टींचा विचार करण्याची जरूर नसून फक्त पूर्ण दृष्टियोगाचा विचार केला म्हणजे पुरे, तर कित्येक ह्याच्या उलट आहेत व कांहीं ज्योतिर्विदांच्या मताप्रमाणें ज्याप्रमाणें गुरु हा पांच व नऊ या स्थानांवर संपूर्ण दृष्टीनें पाहतो त्याच न्यायानें सर्व शुभग्रह पांच व नऊ या स्थानांवर पूर्ण दृष्टीनें पाहतात व रवि हा मंगळाप्रमाणें ४ व ८ या स्थानांवर संपूर्ण दृष्टीनें पाहतो असें म्हणणें आहे. आर्य ग्रंथांमध्यें ज्या पाव, अर्धा, पाऊण दृष्टि सांगितलेल्या आहेत त्याचे उलट **जैमिनीयसूत्रा**मध्यें दृष्टियोग सांगितलेले आहेत. जैमिनीय सूत्रामध्यें दृष्टिविचार स्थानावर नसून तो राशींच्या चर स्थिर धर्मावर सांगितलेला आहे त्याचप्रमाणें कोणती दृष्टि संपूर्ण किंवा अर्धी याचा खुलासा नाहीं. जैमिनीय पद्धतीप्रमाणें चर राशि किंवा चर राशीमधील ग्रह आपल्या धनस्थानीं असलेल्या स्थिर राशींशिवाय सर्व स्थिर राशींस पाहतात म्हणजे **मेष** राशि किंवा मेषराशीमध्यें असलेला ग्रह हा सिंह, वृश्चिक व कुंभ राशींना किंवा त्या राशींमध्यें असलेल्या ग्रहांस पाहतो. **कर्के**मधील ग्रह वृषभ, वृश्चिक व कुंभ राशींना किंवा त्या राशींमधील ग्रहांना पाहतो. **तुळे**मधील ग्रह कुंभ, वृषभ व सिंह राशींमधील असलेल्या ग्रहांस पाहतो. **मकरे**मधील असलेला ग्रह हा वृषभ, सिंह, व वृश्चिक राशीला पाहतो. परंतु **स्थिर राशि**—वृषभ, सिंह, वृश्चिक व कुंभ—ह्या आपल्या व्ययस्थानीं असलेल्या चर राशींशिवाय इतर चर राशींना पाहतात—उदाहर-

णार्थ **वृषभे**मधील ग्रह कर्क, तुला, मकर राशींना पाहतात. **सिंहे**मधील ग्रह तुळा, मकर व मेषेमधील ग्रहांना पाहतात. **वृश्चिके**मधील ग्रह मकर, मेष, कर्क राशींमधील ग्रहांना पाहतात व **कुंभे**मधील ग्रह मेष, कर्क, तुळा या राशींमधील ग्रहांना पाहतात व **द्विस्वभाव राशि**—मिथुन, कन्या, धनु व मीन—आपणांशिवाय इतर सर्व द्विस्वभाव राशींना पाहतात म्हणजे **मिथुने**मधील ग्रह कन्या, धनु व मीनेमधील ग्रहांना पाहतात, **कन्ये**मधील ग्रह धनु, मीन व मिथुनेमधील ग्रहांस पाहतात इत्यादि. हा जैमिनीयसूत्रामध्यें सांगितलेला दृष्टिप्रकार पूर्वोक्त वराहमिहिराच्या बृहज्जातकांतील दृष्टियोगापेक्षां सकृद्दर्शनीं निराळा भासतो. इकडील भागामध्यें जैमिनीय सूत्र विशेष प्रचारांत नसल्यामुळें त्या संबंधानें आज निश्चित असें कांहींच सांगतां येत नाहीं. जैमिनीयसूत्र मद्रासकडील विभागांत बरच प्रचारामध्यें आहे असें म्हणतात. कसेंही असो जरा सूक्ष्म विचारपूर्वक पाहिलें असतां जैमिनीयसूत्रामध्यें सांगितलेला दृष्टिविचार हा आपल्या प्रचलित पाव, अर्धा, व पाऊण दृष्टियोगांबरोबर किंवा यवनांच्या प्रत्यक्ष स्नेहा, गुप्तस्नेहा, गुप्तवैर व प्रत्यक्ष वैरा इत्यादि दृष्टियोगांबरोबर थोडयाबहुत फरकानें जुळत आहे. यावरून पूर्वी आम्हीं दृष्टियोगाची कल्पना कोठें एकाच ठिकाणीं उगम पावली असेल असें जें म्हटलें आहे त्या विधानास पुष्टि येते. जैमिनीय सूत्रामध्यें ३, ९, ११, ४, ७, १०, ६ व ८ या राशींवर राशींच्या चरस्थिर द्विस्वभावधर्माप्रमाणें दृष्टि आलेली पाहण्यास मिळते. प्रचलित आर्य, जैमिनीय व यावनी किंवा युरोपीय दृष्टि या सर्वांची द्विराश्यंतर किंवा तृतीय, एकादशम, त्रिकोण किंवा नवमपंचम केन्द्र किंवा चतुर्थ, दशम, संपूर्ण म्हणजे सप्तम व षडाष्टक या दृष्टीसंबंधानें एकवाक्यता आहे. यावनी किंवा आंग्ल मत फक्त दृष्टिफळासंबंधानें भिन्न असून दृष्टीचा विचार अंशपरत्वें करावा असें आहे व हें मत विचारी मनुष्यास ग्राह्य होण्यासारखें आहे. जैमिनीय सूत्रामध्यें दृष्टीसंबंधी एक मोठा महत्त्वाचा मुद्दा पुढें आलेला आहे तो असा—

(अपूर्ण)

॥ श्रीसद्गुरवे नमः ॥

ज्योतिर्माला

आप्राचः कामरूपाद्द्रुहिणसुतनदप्लावितादामतीचो
गान्धारात् सिंधुसार्द्रादधुवररचितादाचसेतोरवाचः ।
आकेदारादुदीचस्तुहिनगहनतः सन्तिविद्वत्समाजा
ये ये तानेष यत्नः सुखयतु समजान्कश्चमत्कर्तुमीष्टे ॥ १ ॥

अश्विनवाऽऽवृत्ति वर्ष ४ थें. } नोव्हेंबर १९१८. { अंक ८ वा.

परिभ्रमण पद्धति.

(लेखकः—**राम नारायण**)

(पान ९६ वरून समाप्त)

परिभ्रमण पद्धतीनें कालनिर्णय सूक्ष्म रीतीनें कसा करतां येतो यासंबंधानें कांहीं माहिती नमूद केल्याशिवाय प्रस्तुत निबंध पुरा होणार नाहीं. मागें जी माहिती दिली आहे त्यावरून वाचकांना स्थूलमानानें कालनिर्णय करतां येण्याजोगा आहे. यानंतरची पायरी म्हणजे सूक्ष्म कालनिर्देश करणें ही आहे. अर्थातच ही पायरी प्रस्तुत पद्धतींतील शेवटची आहे.

जर घडणाऱ्या गोष्टींचा द्योतक योग लक्ष्यांत घेतला तर तो योग ज्या वेळीं पूर्ण होत असेल त्या वेळीं ती गोष्ट घडेल असें अनुमान कांहीं वाचक तरी केल्यावांचून रहाणार नाहींत. हें अनुमान चुकीचें नाहीं मात्र त्यास एक पुरवणी जोडली पाहिजे. ही पुरवणी अनुमानाची नसून प्रत्यक्ष अनुभवाची आहे. योग तंतोतंत होण्याच्याच वेळीं फलद्रूप होतात असें नसून ते पूर्ण होण्यापूर्वी किंवा नंतरही फलद्रूप होत असल्याचे दिसून येतें. असें घडण्याचें कारण विशिष्ट योग इतर कारणापुळें प्रदीप्त होत असल्यानें त्यांची फलद्रूपता दिसून येते. अर्थात ह्या अनुभवाप्रमाणें प्रस्तुत पद्धतीतील सूक्ष्म कालनिर्देशाचा नियम बसविणें असल्यास तो असा होईल कीं **विशिष्ट योग ज्या वेळीं पूर्ण किंवा प्रदीप्त होतो तेव्हां त्याचीं फलें दृष्टोत्पत्तीस येतात.** योग प्रदीप्त होण्यास विशेषतः रवि, चंद्र व इतर ग्रह यांचीं गोचर भ्रमणें कारणीभूत होतात. आपल्याकडील कांहीं ज्योतिर्विद नुसत्या गोचरीवरून कालनिर्णय करीत असतात व त्यांस कांहीं कांहीं प्रसंगीं फलें जमून येतात म्हणून मोठ्या आनंदानें सांगावयास सांपडतें. त्यांच्या मुळांशीं गोचर ग्रहांचीं भ्रमणें नसून इतर योग असतात याची त्यांना कल्पनाही नसते. एखाद्याच्या लग्नसमयीं सप्तमस्थानीं गोचरीचा शुक्र पाहून हे ज्योतिर्विद् एकदम आश्चर्यानें उद्गारतात "पाहिलेंत, गोचरग्रहांचा असा अनुभव मिळतो"! गोचरीचा खरा उपयोग ह्या ज्योतिर्विदांस मुळींच कळलेला नसतो असें म्हणण्यांत मुळींच बाडस होणार नाहीं. कारण भविष्यनिर्णयाच्या ज्या कांहीं पद्धति आहेत त्या प्रत्येकीमध्यें गोचरीचा थोडाबहुत उपयोग केला जातो. यापेक्षां तिचा स्वतंत्र रीतीनें फलनिर्णयास मुळींच उपयोग होत नाहीं. गोचरी स्वतंत्र पद्धति आहे असें म्हणण्यांत अज्ञानजन्य आग्रहाचेंच प्राबल्य दिसून येतें. असो. सांगावयाचा मुद्दा हा आहे कीं प्रस्तुत पद्धतीतील योग ज्या वेळीं गोचर भ्रमणानें प्रदीप्त होतात त्या वेळीं त्याचीं फलें पहावयास सांपडतात. ह्या गोचर ग्रहांत विशेषतः रवि–चंद्रांचा फार उपयोग होतो व मंगळाचें गोचरभ्रमण अनिष्टयोगांचीं फलें तीव्र करण्यास कारणीभूत होतें.

रविचंद्रांचीं भ्रमणें कालनिर्णयास फार उपयोगी आहेत असें जें वर सांगितलें आहे त्यासंबंधानें थोडासा खुलासा करणें अवश्य आहे. ह्या दोन ग्रहांच्या भ्रमणांपैकीं नुसतें चंद्राचें भ्रमण महत्वाचें नाहीं. चंद्राचें भ्रमण स्वीच्या भ्रमणाशीं अनुषंगिक असावें लागतें. एखाद्या परिभ्रमणाचा योग नुसत्या गोचरीच्या चंद्रानें प्रदीप्त होत नाहीं तर स्वीच्या गोचर भ्रमणाशीं त्याचा संबंध असावा लागतो.

गोचर भ्रमणाविषयीं आणि विशेषतः रवि–चंद्रांच्या गोचर भ्रमणाविषयीं नुसते नियम देण्यापेक्षां एखाद्या कुंडलीवरून परिभ्रमणाचा योग व गोचरभ्रमणें यांचा अन्योन्य संबंध वाचकाच्या सहज लक्ष्यांत येईल असें जाणून उदाहरणाकरतां एक कुंडली पुढें घेऊं. उदाहरणार्थ जी कुंडली घेत आहों ती झालेल्या गोष्टींचा मेळ बिनचूक घालतां यावा म्हणून निवडली नाहीं एवढेंच नव्हे तर हा निबंध पुरा होण्यापूर्वी ती योगमालेमध्यें प्रसिद्ध होऊन गेलेली आहे. प्रस्तुत निबंधाच्या उपयोगी पडतील अशा पुष्कळ कुंडल्या संग्रहीं आहेत परंतु इतर ठिकाणीं प्रसिद्ध झालेली कुंडली घेण्याचें कारण प्रस्तुत पद्धतीच्या अनुभवाचा मेळ कसा तरी व कोणत्या तरी कुंडलीवरून घालण्याचा प्रयत्न केला नाहीं हें स्पष्ट दाखविण्यासाठीं आहे. ह्या कुंडलीबरोबर "योगमालाकारांनीं" घडलेल्या गोष्टींची मालिका ही जोडिली आहे तीमधून आपल्या जरूरीपुरत्या गोष्टी कुंडलीसह येथें देतों.

सा. ल.



वरील कुंडली ज्या व्यक्तीची आहे त्या व्यक्तीच्या आयुष्यांतील कांहीं गोष्टीः—

(१) ९ माहे सप्टेंबर १९०४, घोड्यावरून पडून डाव्या बाजूच्या गळ्याजवळील फासळींचें हाड मोडलें. त्यामुळें एक महिना आजारांत गेला.

(२) ता. २ जानेवारी १९०५ रोजीं गाडींतून पडून डाव्या पायाचें कमेरेपाशीं असलेलें हाड मोडलें. दवाखान्यांत ३ महिने काढले. ह्या अपघातांत मरणप्राय दुःख भोगलें; देहाचा भरंवसा नव्हता.

(३) ता. ११ माहे मे १९०३ रोजीं दोनप्रहरचें उन्ह लागून सर्व शरीर एकदम पित्तळें झालें. तीन महिनेपर्यंत भयंकर दुःख भोगलें.

(४) शके १८३३ मार्गशीर्ष शु॥ ६ (ता. २७-११-१९११) रोजीं रात्रीं ८ वाजतां मातृनिधन झालें.

(५) शके १८३९ अश्विन व॥ १४ (ता. २८-१०-१९१३) रोजीं पितृनिधन झालें.

मूळ कुंडलीमध्यें अपघातदर्शक योग झाले आहेत ते येणेंप्रमाणेंः—

(१) मंगळ–शनि प्रतियोग
(२) रवि–शनि प्रतियोग
(३) चंद्र–मंगळ प्रतियोग
(४) चतुर्थस्थानीं हर्शल

वरील योगांमध्यें रवि-चंद्र हे शनिमंगळांकडून एकाच वेळीं बिघडले आहेत हें लक्ष्यांत ठेवण्यासारखें आहे.

अपघात पहिलाः—मूळ कुंडलीमध्यें अपघातदर्शक योग ज्या ग्रहांमध्यें झाले आहेत ते ग्रह २९ व्या वर्षाच्या आरंभीं पुढें लिहिल्याप्रमाणें आले होतेः—

रवि–मीनेंत २ अंश; कुंभेंत २९ अंश; शनि–कुंभेंत १६ अंश; हर्शल–धनेंत २९ अंश.

परिभ्रमणाचे योग करीत होते ते असेः–(१) परिभ्रमणाचा रवि मूळ शनीबरोबर युतियोग व (२) मूळ मंगळाबरोबर प्रतियोग (३) परिभ्रमणाचा मंगळ मूळच्या हर्शलबरोबर प्रतियोग आणि (४) परिभ्रमणाचा शनि मूळ हर्शलबरोबर प्रतियोग करण्यास जात होता. हे चारही योग पांच अंशांच्या आंत असून पहिला योग पुरा होण्यास फक्त २ अंशच अंतर आहे ! आणि अशा वेळीं रवि व मंगळ यांचीं गोचरीचीं भ्रमणें मूळच्या व परिभ्रमणांच्या योगास प्रदीप्त करीत होतीं. शनि मळ तनुस्थानीं उदित असलेल्या अंशाबरोबर केंद्रयोग करीत असून मूळ कुंडलीच्या षष्ठस्थानीं आहे. गोचरीचा मंगळ चतुर्थांतून परिभ्रमणाच्या शनीबरोबर फक्त दोन अंशांच्या अंतरानें प्रतियोग

करीत असून मूळ उदित अंशाबरोबर केंद्रयोग करीत आहे. गोचरीच्या मंगळानें मूळच्या उदितांशाबरोबर केंद्रयोग करतांच अपघात झाला.

अष्टमेश गुरु वर्षलग्नाच्या अष्टमांतून व मूळच्या व्ययस्थानांतून भ्रमण करीत असून त्याबरोबर मूळ लग्नेश परिभ्रमणानें केंद्रयोग करीत आहे. मूळचे लग्नेश—अष्टमेश वार्षिक लग्नाच्या चतुर्थाष्टमांतून केंद्रयोग करीत असतां अपघाताच्या दिवशीं गोचर रवि ह्या दोन्ही ग्रहांशीं १३५ अंशाचा अशुभ योग व गोचर चंद्र त्याच ग्रहांशीं तंतोतंत केंद्र—प्रतियोग करीत होते.* येथें मंगळ, रवि व

---

* ह्या अपघाताच्या वेळीं ग्रहयोग कसे जुळतात हें **योगमाल कारांनीं** दाखविलें आहे त्याचें किंचितसें दिग्दर्शन ज्योतिर्मालेच्या वाचकांस दाखविल्यास त्यांस नुसत्या गोचरीच्या विफलतेविषयीं कांहीं कल्पना येईल. "ह्या वेळीं गोचर मंगळ हा चतुर्थस्थानीं सिंह राशींत असून तो जन्मकालीन हर्शलवरून जाणार होता व मंगळाशीं जन्मकालीं योग (कीं प्रतियोग ?) करणारा शनि हा त्या चर मंगळाच्या समोर होता. शनि वक्री असून तो १६ व्या अंशांत आहे व मंगळ १४ व्या अंशांत समोर आहे. ह्या दोन ग्रहांचा प्रतियोग ८ व्या तारखेला होणारा होता" ह्या वाक्यांतील सांगितलेली स्थिति बरोबर आहे. मंगळशनींचा प्रतियोग ८ तारखेला होणार होता हें जसें सांगितलें आहे तसेंच मंगळ चतुर्थांतील हर्शलवरून १७ तारखेच्या सुमारास जाणार होता एवढी तारीख नमूद केली असती म्हणजे ठीक झालें असतें. असो. मंगळ ८ तारखेला शनीबरोबर प्रतियोग व १७ व्या तारखेस मूळ-हर्शलबरोबर युति करणार होता तर ५ व्या तारखेस अपघात कां व्हावा ? यो. मालाकार याचें कारण सांगतात तें असें:—"ग्रहांचे योग जेव्हां जोराचे असतात तेव्हां त्यांचा परिणाम ते योग होण्यापूर्वीच होतात असा अनुभव आहे येथें अपघाताचा योग जन्मकालींच हरगोचर होत होता म्हणून तो जोराचा असून अपरिहार्य होता" जोराच्या योगांचे परिणाम ते योग होण्यापूर्वीच होतात हा अनुभव खरा कीं खोटा याचा विचार करतां ज्या वाक्यांत हा अनुभव ग्रथित केला आहे त्यापुढें सरासरी २८-२९ ओळींवरच त्याचा निकाल लागला ! दुसऱ्या अपघाताच्या वेळीं हाच मूळचा जोराचा म्हणून अपरिहार्य योग असून शनिमंगळांची युति २४ डिसेंबरला होते व अपघात घडतो पुढें २०-२५ दिवसांनीं !! नुसत्या गोचरीनें अशी फसगत होते.

चंद्र यांचीं गोचर भ्रमणें आम्हीं दिलेल्या नियमाप्रमाणें तंतोतंत अनुभवास येतात.

२ दुसऱ्या अपघाताच्या वेळीं (१) परिभ्रमणाचा शनि मूळ मंगळाबरोबर आणि (२) रवीबरोबर प्रतियोग करीत होता (३) वर्ष षष्ठस्थानाचें असून वर्षलग्नाच्या षष्ठांत शनि मंगळ भ्रमण करीत होते. जसा मूळ कुंडलींत चतुर्थस्थानीं हर्शल आहे त्याप्रमाणें (४) परिभ्रमणकुंडलीच्या चतुर्थांत हर्शल होता (५) ह्या हर्शलबरोबर मूळ व वर्षलग्नेश केंद्रयोग करण्यास जात होता (६) हर्शल—नेपच्युनाचा प्रतियोग वर्षलग्नाच्या चतुर्थ दशमांतून चालला होता. हे योग वर्षारंभापासूनच चालले होते परंतु मूळ व वर्षलग्नेश शुक्र उच्च राशींतून जात असतां हा अपघात घडला नाहीं. उच्चत्वाचीं फलें देण्यास तो असमर्थ होतांच अपघात घडला. अपघाताच्या दिवशीं रवी मूळ लग्नेशाशीं प्रतियोग व चंद्र हा मूळ तनुस्थानीं व वर्षलग्नाच्या अष्टमस्थानीं भ्रमण करणाऱ्या मूळच्या अष्टमेशाशीं प्रतियोग करीत होता.

अपघात ३ रा:—ह्या अपघाताच्या वेळीं ग्रह पुढें लिहिल्याप्रमाणें आले होते:—

शनि—मिथुनेंत ९ अंश; रवी १६ सिंहेंत, मंगळ ९ सिंहेंत व हर्शल कुंभेच्या ८ व्या अंशांत.

या वेळीं म्हणजे ३६ वर्षें पुरीं होऊन ८ महिन्यांनीं मिथुन राशीचा शनि वर्षलग्नाच्या तनुस्थानीं येत होता. हा शनि वर्षकुंडलीमध्यें अष्टमेश आहे. हर्शल हा ग्रह परिभ्रमणाच्या रविमंगळांशीं प्रतियोग व शनि मूळच्या रविमंगळांच्या केंद्रांत असतां हा प्रसंग झाला. गोचरीचा रवि वृषभ राशींतून केंद्रयोगानें परिभ्रमणांच्या रवि, मंगळ व हर्शल यांच्या योगांस प्रदीप्त करीत असतां गोचर चंद्र वर्षलग्नाच्या अष्टमांतील मूळच्या अष्टमेशाशीं प्रतियोग करीत होता.

(४) मातृनिधन ३६ व्या वर्षी झालें. या वेळीं परिभ्रमणानें पुढें लिहिल्याप्रमाणें योग घडून आले होते:—

(१) चतुर्थेश रवि हर्शलनें युक्त व नेपच्यूनच्या समोर होता (२) चतुर्थीतील हर्शल परिभ्रमणाच्या शनीनें दूषित झाला आहे. ह्यांपैकीं पहिला योग परिभ्रमणाच्या कुंडलींत चतुर्थ-दशमस्थानांतून होत आहे. गोचर रवीचें भ्रमण मूळ शनि-मंगळांच्या केंद्रांतून होत असतां गोचर चंद्र शनि-हर्शलांच्या केंद्रयोगाच्या केंद्रांतून व परिभ्रमणाच्या कुंडलीमध्यें चतुर्थस्थानाच्या अष्टमांतून जात असतां मातृनिधन झालें.

(२) पितृनिधन ३८ व्या वर्षी झालें. परिभ्रमणाचा मंगळ मूळच्या हर्शलशीं दशमस्थानांतून तंतोतंत प्रतियोग करीत होता. हर्शल दशमभुवनीं उदय पावत असून शनीही मूळच्या रवीच्या केंद्रांतून भ्रमण करीत होता. गोचर रवि हर्शलशीं केंद्रयोग व गोचर चंद्र परिभ्रमणकुंडलींतील दशमस्थानाच्या अष्टमांतून जात असतां पितृनिधन झालें !

मातृनिधनाच्या वेळीं चंद्र परिभ्रमणाच्या कुंडलींत मातृस्थानाच्या मृत्युस्थानांत व पितृनिधनाच्या वेळीं पितृस्थानाच्या मृत्युस्थानांत आहे हें विशेष लक्ष्यांत ठेविण्यासारखें आहे. ह्या दोन्हीही प्रसंगीं अपघाताच्या प्रसंगाप्रमाणेंच चंद्र गुरूबरोबर अशुभ योग करीत होता.

———o———

मागें दिलेल्या उदाहरणावरून परिभ्रमणकाळचे ग्रहयोग गोचर ग्रहानें कसे प्रदीप्त होतात याची कांहींशी कल्पना वाचकांस होईल असें वाटतें. गोचर ग्रह परिभ्रमणाच्या ग्रहास प्रदीप्त करितात ही गोष्ट जर चांगली कळली तर भविष्यनिर्णय सूक्ष्म रीतीनें करतां येणें सुलभ जाईल. मूळ कुंडलींतील कांहीं विशिष्ट योग परिभ्रमणानें फलद्रूप होण्याचा संभव असल्यास त्याचा काल नक्की करण्यास गोचर ग्रहांचा उपयोग होतो. वरील उदाहरणांतील कुंडलीचा विचार करतांना ही गोष्ट स्पष्ट झाली आहे. ती अधिक स्पष्ट होण्यास थोडक्यांत एकच उपाय म्हणजे अनेक प्रकारच्या योगांच्या कुंडल्या घेऊन त्या योगांच्या फलद्रूपतेच्या वेळीं परिभ्रमणानें कसे योग आले होते व त्या वेळीं गोचर ग्रहांचीं भ्रमणें कशीं होत होतीं याचा स्पष्ट उल्लेख करावयास पाहिजे. परंतु आतांपर्यंत च निबंधाचा विस्तार फार झाल्यामुळें फक्त एकच योग निरनिराळ्या कुंडलींतून परिभ्रमणाच्या ग्रहांनीं व गोचर ग्रहांनीं कसा घडून येतो हें दाखवितों.

ह्या योगाच्याही कुंडल्या इतर ठिकाणीं म्हणजे योगमालेंत प्रसिद्ध झालेल्या घेणार आहोंत. योगमालेच्या ज्या ४ थ्या पुस्तकांतून मागच्या उदाहरणाची कुंडली घेतली आहे त्याच पुस्तकांतून या विशिष्ट योगाचीं उदाहरणें घेत आहों. योगमालेच्या ह्या ४ थ्या पुस्तकांत वैधव्ययोगाच्या १६ कुंडल्या दिल्या आहेत त्यांपैकीं ६ कुंडल्या खालीं वैधव्ययोग घडून आल्याच्या तारखा किंवा मिती दिल्या आहेत. तारखांच्या अगर मित्यांच्या अभावीं रविचंद्रांचीं गोचर भ्रमणें विचारांत घेणें शक्य नाहीं म्हणून ज्यांच्या तारखा दिल्या आहेत अशाच *कुंडल्या विचारांत घेऊ.

---

* कुंडली नं. १ मध्यें मिति दिली आहे ती सन १९११ मार्गशीर्ष शुद्ध २ शुक्रवार. १९११ च्या मार्गशीर्ष शुद्ध २ स शुक्रवार नाहीं. त्याचप्रमाणें कुंडली नं. ११ खालीं शके १८२९ चैत्रशुद्ध ६ बुधवार अशी मिति दिली आहे. ह्या चैत्र शुद्ध ६ स बुधवार नाहीं. अर्थात् ह्या मित्या संशयास्पद समजून त्यांचा विचार केला नाहीं.

(१)

सायन लग्न.



वैधव्यकाळीं परिभ्रमणाचा शनि मूळच्या रवीवर **मकर** राशींत २० अंश. (मूळ कुंडलींत रवि-शनींचे षडाष्टक) व भर्तृस्थानाचा अष्टमेश मूळच्या मंगळाशीं **मकर** राशींत असतां गोचरीच्या रविचंद्रांच्या **मकर** राशींतील भ्रमणावर वैधव्य प्राप्त झालें.

(२)

जन्मः—८ एप्रिल १८७२ इ. घ. १८।४७.

वैधव्य २९ जुलै १८९९

सायन षड्-भाव.

१	२	३	४	५	६
सिंह १०-२५	कन्या ७	तूळ ७	वृश्चिक ७	धनु १०	मकर ११

सायन स्पष्ट ग्रह.

र.	चं.	बु.	शु.	मं.	गु.	शनि	हर्शल	ने
मे.१८	मे. २३	वृष.७	मी. २२	मे. २८	कर्क २०	मकर २०	कर्क २७	मे.२३

(मूळ **सप्तमेश शनि मंगळा**बरोबर **केंद्रयोग** व हर्शलबरोबर प्रतियोग करीत आहे.)

परिभ्रमणानें शनि-मंगळांचा केंद्र चालला होता. (सिंहेंत मंगळ व वृश्चिकेंत शनि). गोचर रवि **सिंहेमध्यें** परिभ्रमणाच्या मंगळाशीं युति व शनीबरोबर केंद्रयोग व गोचर मंगळ वृषभेंतून परिभ्रमणांच्या शनि-मंगळांबरोबर केंद्र-प्रतियोग करीत होता.

(३)

जन्मः ता. १७ मे १८९३ सूर्योदयात् घटि ५।२७.

वैधव्यः—ता. २३ मे १९१३.

सायन षड्-भाव.

१	२	३	४	५	६
वृषभ २६	मिथुन २३	कर्क १९	सिंह १५	कन्या १६	तूळ २०

रवि, वृषभ २६; चंद्र-मिथुन ११।४३; बुध-वृषभ ७; शुक्र-मिथुन० मंगळ-कर्क २; गुरु-वृषभ १२; शनि तूळ ६ वक्री; हर्शल-वृश्चिक ७ वक्री; नेपच्युन-मिथुन १०; राहु-मेष २७.

[मूळ सप्तमेश मंगळ नीच असून शनीबरोबर केंद्रयोग व रवि-शनींचा षडाष्टक योग आहे.]

परिभ्रमणानें सप्तमेष मंगळ मूळच्या शनीशीं केंद्रयोग आणि रवि-शनींची युति **मिथुन** राशींत मूळ नेपच्युन-चंद्रांच्या युतीवर होत होती. गोचर रवि परिभ्रमणाच्या रविशनींच्या युतीवर **मिथुनेंत** व गोचर चंद्र परिभ्रमणाच्या नीच मंगळावर होता.

(४)

सा. ल.



[मूळ सप्तमेश मंगळ व शनि यांचा केंद्रयोग व रवि हर्शलांचा प्रतियोग.]

परिभ्रमणकाळीं शनिमंगळांची युति कुंभेंत १६ व्या अंशांत आणि हर्शलचें भ्रमण वार्षिक सप्तमस्थानांतून चाललें होतें. गोचरीचा मंगळ परिभ्रमणाच्या

शनि-मंगळांच्या युतीवर व गोचरीचे रवि-चंद्र मूळ शनीवर व परिभ्रमणाच्या हर्शलबरोबर केंद्रयोग करीत होते.

(५)

जन्मः—२३ एप्रिल १८९४ इ० घ० ११-३३.

वैधव्यः—५।१।१९०९.

षड्—भाव.

१	२	३	४	५	६
मीन १	मेष ९	वृषभ १२	मिथुन १९	कर्क ४	सिंह ०

सायन स्पष्ट ग्रह.

रवि-वृषभ ४; चंद्र-तूळ १७; बुध-मेष ८; शुक्र-मीन १७; मंगळ-कुंभ १८; गुरु-मिथुन ४; शनि-तूळ २० वक्री; हर्शल-वृश्चिक १३ वक्री; नेपच्युन-मिथुन ११; राहु-मेष ९.

[मूळ रवि-हर्शल प्रतियोग; रवि-शनि १३९ अंशांचा अशुभयोग व हर्शल-मंगळ केंद्रयोग.]

परिभ्रमणाचा रवि मूळच्या हर्शलबरोबर केंद्रयोग व मूळ सप्तमस्थानाचा अष्टमाधिपति मंगळाबरोबर युति करीत होता.

गोचर मंगळ वृश्चिकेंतील परिभ्रमणाच्या मंगळाबरोबर युति करीत असून, गोचर रवि परिभ्रमणाच्या हर्शलवर व गोचर चंद्र भर्तृस्थानाच्या अष्टमांतून भ्रमण करीत असलेल्या शनीबरोबर केंद्रयोग करीत होता.

(६)

जन्मः—३० जुलई १८९२.

वैधव्यः—शके १८३१ वैशाख कृष्ण १

कुंडलीचे षड्-भाव.

लग्न	२	३	४	५	६
कर्क १९	सिंह १४	कन्या १२	तूळ १४	वृश्चिक १७	धनु २०

सायन स्पष्ट ग्रह.

रवि-सिंह७; चंद्र-तूळ २९-३४; बुध-कन्या ४; शुक्र-कर्क ९; मंगळ-कुं १३ व; गुरु-मेष २४; शनि-कन्या २९; हर्शल-वृश्चिक २; नेपच्युन-मिथुन १०; राहु-वृषभ १२.

[मूळ कुंडलींत रवि-हर्शल केंद्रयोग; रवि-मंगळ प्रतियोग; रवि-शनि अर्धकेंद्र योग]

वैधव्यकाळीं सप्तमेश शनि नीच राशींतून भ्रमण करीत असून सप्तमस्थानीं हर्शलचें भ्रमण चालूं होतें. हर्शलबरोबर शनिनेपच्युनांचे केंद्र प्रतियोग होत होते. परिभ्रमणाचा रवि मूळच्या शनीबरोबर केंद्रयोग करीत असतां वैधव्य प्राप्त झालें. गोचर रवि वृषभेमध्यें वार्षिक सप्तमांतून व गोचर चंद्र वृश्चिकेंतून मूळ मंगळाच्या केंद्रांत भ्रमण करीत होते. त्याचप्रमाणें गोचर मंगळ मूळ ठिकाणीं आला होता.

वरील सहा कुंडल्यांतील मूळ वैधव्ययोगांचा अगदीं थोडक्यांत उल्लेख करून परिभ्रमणानें वैधव्यकाळीं मूळ कुंडलींतील योगांप्रमाणेंच कसे योग चालले होते हें नमूद केलें आहे. व त्याबरोबरच गोचर ग्रहांचीं–विशेषतः रवि-चंद्र मंगळांचीं भ्रमणें दिलीं आहेत. त्यावरून परिभ्रमणकालीन मूळ योग गोचर ग्रहांनीं कसे प्रदीप्त होतात हें स्पष्ट लक्ष्यांत येईल. मूळ व परिभ्रमणकालीन योग व गोचर भ्रमणें यांचा संबंध काय असतो हें वरील सहा कुंडल्यांवरून वाचकांच्या जितकें लक्षांत येईल तितकें नुसते कोरडे नियम देऊन आलें नसतें. उपरिनिर्दिष्ट मूळयोग, परिभ्रमणाचे योग व गोचर भ्रमणें ह्यांवर नजर टाकतांच परिभ्रमण पद्धतीमध्यें गोचरीचे ग्रह कसे पहावे व त्याप्रमाणेंच योगांच्या फलद्रूपतेचा काळ निश्चित करतां येण्याचीं **साधनें** काय आहेत याचा बोध

होईल असें वाटतें. ह्या साधनांचा कुशलतेनें उपयोग केल्यास भविष्यनिर्णय पुष्कळ समाधानकारक रीतीनें करतां येईल असा अनुभविक भरंवसा आहे.

उपसंहार.

परिभ्रमण पद्धतीसंबंधानें ग्रहांचे भ्रमणकाळ, वार्षिक लग्न, भ्रमणांचीं फलें व त्यावरून भविष्यनिर्णयाची दिशा, सूक्ष्मकाल निर्णयाचा मार्ग वगैरेचा विस्तार प्रस्तुत निबंधांत जरूरीपुरता केला आहे. यापुढें ह्या पद्धतीसंबंधानें एक दोन गोष्टींचा उल्लेख करून हा निबंध पुरा करूं.

(१) ग्रहांचे भ्रमणकाळ व प्रतिवर्षास होणारें स्थानचलन यांवरून एका प्रकारचा विशिष्ट कालनिर्देश करतां येतो. दर वर्षास स्थानचलन ३० अंशांनें होत असतें. ह्या स्थानचलनाबरोबर ग्रहांचेही चलन होत असतें. ह्या दोन्हीही चलनांमुळें कांहीं ग्रहांच्या बाबतींत नियमित काल निर्देश करतां येतो. उदाहरणार्थ, बुध ग्रहाची वार्षिक भ्रमणगति ३६ अंश आहे, ह्या गतीनें बुधग्रह वर्षकुंडलीमध्यें दर स्थानांत ९ वर्षें भ्रमण करीत असतो असें होतें. उदित अंशाबरोबर असणारा बुध पहिलीं पांच वर्षें वर्षलग्नाच्या तनुस्थानीं राहील, ६ ते १० वर्षेंपर्यंत तो वर्षलग्नाच्या धनस्थानीं भ्रमण करील, ११ ते १९ पर्यंत वर्षलग्नाच्या तृतीयस्थानीं राहील. येणेप्रमाणें बुध दर स्थानाचीं फलें पांच वर्षेंपर्यंत देऊं शकेल. वर्षकुंडलीच्या स्थानांचीं हीं फलें असल्यामुळें तीं दुय्यम दर्जाचीं आहेत हें खरें पण त्यावरून ज्यांच्या कुंडलीमध्यें बुध ग्रह प्रबल आहे त्यांच्या आयुष्यांत अशा प्रकारच्या कालनिर्देशाचा चांगलाच अनुभव येतो. इतर ग्रहांविषयीं पहातां त्यांची गति व स्थानचलन यांमुळें कांहीं वर्षें खरोखर विचारणीय दिसतात. शुक्र भ्रमणगतीनें प्रत्येक स्थान साधारणपणें ८ महिन्यांनीं आक्रमण करितो परंतु वर्षकुंडलीमध्यें तो साधारणपणें दोन वर्षें असूं शकतो. ह्याप्रमाणें पहातां शुक्र ज्या स्थानांत असेल त्या स्थानांत परिभ्रमणानें आठव्या वर्षीं येईल परंतु वर्षकुंडलीच्या त्याच स्थानांत येण्यास पुरीं २४ वर्षें लागतील. उदाहरणार्थ शुक्र दशमांत असल्यास आठ वर्षांनीं तो तेथें येईल व वर्षलग्नाच्या दशमांत पंचविसाव्या वर्षीं येईल. या वेळीं तो परिभ्रमणानेंही दशमांत

असेल. सारांश शुक्र पंचविसाव्या वर्षी मूळ आणि वर्षलग्नाच्या कुंडल्यांमध्यें जन्मकालीन स्थितीप्रमाणें असेल आणि म्हणून पंचविसावें शुक्राचें वर्ष विशेष महत्वाचें जातें असें वाटतें. रवि-मंगळांची वार्षिक गति १९ अंश आहे म्हणजे त्याच्यापुढें वर्षलग्न दर वर्षास पुढें जाईल. या गतीनें मूळ कुंडल्यांमध्यें ते ज्या स्थानांत असतील त्याच स्थानांमध्यें ३३ व्या वर्षी वर्षकुंडलीमध्यें येतील. अशा रीतीनें प्रत्येक ग्रहाचें येणारें कालमान भविष्यनिर्णयाच्या किती उपयोगी पडतें याचा अनुभव प्रस्तुत पद्धतीचा अभ्यास करणाऱ्या वाचकांनीं घ्यावा अशी सूचना आहे.

(२) परिभ्रमण पद्धतीची जी त्रोटक माहिती जुन्या ज्योतिर्मालेंत आली आहे तीमध्यें कै. चिटणीसांनीं ग्रहांच्या भ्रमणफलांविषयीं एक नियम नमूद केला आहे तो असा:—

ग्रह जर मूळ कुंडलीमध्यें नीच अगर स्वराशिविन्मुख क्षेत्रांत असेल तर तो ज्या वेळीं स्वगृहीं अगर उच्च गृहीं येतो तेव्हां अशुभ फल देतो. राशिबलानें हीन असणारा ग्रह परिभ्रमणानें राशिबली झाल्यास अशुभ फलें देतो हा या नियमांतील मथितार्थ आहे. तो सर्वच ग्रहांविषयीं अनुभवाच्या कसोटीस उतरेल असें नाहीं शुभ ग्रहांविषयीं वरील नियम अनुभवास येणें अशक्य दिसत. नीच किंवा विन्मुख क्षेत्रीं असणारे ग्रह आपल्या स्थानाचीं फलें अशुभच देतात व ह्या अशुभ फलांची प्राप्ति ते जेव्हां बलवान होतात त्या वेळीं होते अशा विचारसरणीनें वरील नियम केलेला दिसतो. ही विचारणी अशीच असेल तर ती बिनतोड आहे असें म्हणतां येत नाहीं, इतकेंच येथें नमूद करून ठेवितों. भ्रमणफलांच्या विचारांत ग्रहांचें बलाबल अवश्य लक्ष्यांत घेतलें पाहिजे हें मागेंच (पहा पान ४१) सांगितलें आहे. तेव्हां कै. चिटणीसांच्या नियमाची ग्राह्याग्राह्यता अनुभवानेंच ठरविली पाहिजे. जिज्ञासु वाचकांची दृष्टि वरील नियमाकडे वळल्यास कांहीं तरी समाधानकारक निकाल लागण्याचा संभव आहे असें समजून त्याचा उल्लेख केला आहे.

M.2133

॥ श्रीसद्गुरवे नमः ॥

ज्योतिर्माला

आप्राचः कामरूपाद्दुहिणसुतनदप्लावितादाप्रतीचो
गान्धारात् सिंधुसार्द्राद्रघुवररचितादाचसेतोरवाचः ।
आकेदारादुदीचस्तुहिनगहनतः सन्तिविद्वत्समाजा
ये ये तानेव यत्नः सुखयतु समजान्कश्चमत्कर्तुमीष्टे ॥ १ ॥

अभिनवाऽऽवृत्ति वर्ष ४ थें. | जानेवारी १९१९. | अंक १० वा.

सन १९१९ साल कसें जाणार ?

ज्योतिर्मालेच्या जानेवारी सन १९१७ च्या अंकामध्यें पूर्वी सांगितल्याप्रमाणें चालू महायुद्ध सन १९१८ सालामध्यें थांबलें आहे. व आतां पुढें येणारा काळ कसा जाईल याकडे सर्व भारतवासीयांचे किंबहुना अखिल जगताचे डोळे लागले आहेत. राष्ट्रांची भवितव्यता जाणण्याचें काम फारच कठीण आहे. कारण मेदिनीय किंवा राष्ट्रीय ज्योतिषशास्त्रावर अद्यापि पुष्कळच शोध व्हावयाचे आहेत. पाश्चिमात्य राष्ट्रांतील ज्योतिर्विद या बाबतीमध्यें बरेच पुढें आहेत. आम्हांस या विषयाची अद्याप ओळख व्हावयाची आहे. हिंदुस्थानांतील अद्याप किती तरी प्रांतांच्या व शहरांच्या राशि ठरावयाच्या आहेत. हा विषय एकट्या दुकट्याचा नसून अनेक ज्योतिर्विद जेव्हां या विभागाकडे लक्ष्य देतील तेव्हां त्यासंबंधानें निश्चित असें कांहीं ठरवितां येईल

राष्ट्रीय ज्योतिषामध्ये उपलब्ध गोष्टींपेक्षां अनुपलब्ध गोष्टीच फार आहेत. इकडील ज्योतिर्विदांचे या संहितास्कंधाकडे लक्ष्य लागण्याकरितां प्रसंगानुसार मेदिनीय ज्योतिषाचा उल्लेख करण्याचें ठरविलें असून दर वर्षाचे जानेवारीच्या अंकामध्यें आमच्या अल्पज्ञानाप्रमाणें त्या त्या सालांतील घडामोडींचें भविष्य वर्तविण्याचा सांप्रदाय ठेविला आहे. हा प्रयत्न कितपत यशस्वी झाला आहे हें पाहण्याचें काम वाचकांचें आहे.

आर्यग्रंथाप्रमाणें चालू सन १९१९ सालामध्यें तारीख ३ मार्च पर्यंत शालिवाहन शकमानाप्रमाणें **कालयुक्त**नामसंवत्सर आहे. या संवत्सराचा आरंभ तारीख १३ मार्च १९१८ रोजीं झाला व आतां तो तारीख २ मार्च १९१९ रोजीं संपणार आहे. त्या नंतर ३ मार्च सन १९१९ रोजीं **सायन अमान्त चैत्र शुद्ध** प्रतिपदेपासून **सिद्धार्थी** नांवाच्या संवत्सराचा आरंभ होणार आहे. विक्रम संवत्सराप्रमाणें सायन अमान्त कार्तिक शुक्ल प्रतिपदेपासून (तारीख ६ आक्टोबर सन १९१८) **प्रमोद** नांवाचा संवत्सर चालू आहे. ही दोन्ही चालू सालांतील संवत्सरांचीं नांवें शुभ द्योतक आहेत. आर्यलोकांचे प्रभव विभवादि कालगणनेचें ६० वर्षांचें ज्याप्रमाणें एक संवत्सर चक्र आहे त्याच प्रमाणें क्यालडी किंवा खालडीयन ज्योतिर्विदांचें २५२ वर्षांचें एक चक्र आहे. आपणाप्रमाणें खालडीयन ज्योतिर्विदांनीं प्रत्येक वर्षास निरनिराळें नांव दिलेलें आढळत नाहीं. परंतु दर ३६ वर्षांचा एक एक भाग रवि, चंद्र मंगळादि सप्तग्रहांपैकीं एका एका ग्रहास वाटून दिलेला आहे व या ३६ वर्षांचे लघुचक्रामध्यें पुन्हा प्रत्येक ग्रहाचें अधिपतित्व किंवा वर्षाधिपतित्व मानिलेलें आहे. चक्राधिपति ग्रह व वर्षाधिपति असलेला ग्रह या दोघांचे संयोगानें उत्पन्न होणाऱ्या भावी फळाची कल्पना करण्याचा त्यांच्यात प्रघात आहे.

क्यालडी संवत्सर चक्राप्रमाणें इसवी सन १९०९ पासून जगतावर **मंगळाच्या** चक्राचा आरंभ झाला. व तें सन १९४४ पर्यंत टिकणार आहे. या काळामध्यें **मंगळ** हा ग्रह ज्या ज्या गोष्टींचा कारक आहे तद्द्योतक गोष्टींमध्यें सर्वत्र घडामोडी घडल्या पाहिजेत असें क्यालडी ज्योतिर्विदांचें मत आहे. मंगळ हा लढाया, जाळपोळ, खून, मारामाऱ्या, रक्तपात, अत्याचार, अपघात, आगी, शस्त्रक्रिया, रेलवे, मेक्यानिकल वर्क्स, सर्व प्रकारचें यंत्रसामर्थ्य,

मोठमोठाले अग्निसाह्यानें चालणारे कारखाने, फौजफाटा, पोलीस यांचा द्योतक असल्याचें फलज्योतिषशास्त्रामध्यें वर्णन असल्यामुळें या वर दर्शविलेल्या कालामध्यें याच गोष्टींस ऊत येणें नैसर्गिकच आहे. सन १९०९ साल मंगळामध्यें मंगळाचें गेलें, नंतर १९१० मंगळामध्यें रवि, १९११ मंगळामध्यें **शुक्र**, १९१२ मंगळामध्यें बुध, १९१३ मंगळामध्यें चंद्र व १९१४ **मंगळामध्यें शनि** येतांच युरोपखंडामध्यें युद्धाची ज्वाळा पेटली व त्यामुळें गेल्या ४ वर्षांमध्यें सर्वत्र एकच कहर कोसळला. मंगळ व शनि हे दोन ग्रह अगदीं विरुद्ध धर्माचे असल्यामुळें असलाच कांहीं तरी भयंकर संहाराचा प्रकार होणें शक्य आहे. या वर्षामधील संक्रमणाच्या कुंडल्या पाहिल्या किंवा जीं जीं राष्ट्रें या युद्धामध्यें होतीं त्यांच्या अधिपतींच्या कुंडल्यामध्यें त्या वर्षाचे वेळीं **मंगळाचेच** अनिष्ट योग चालू असलेले पाहण्यास मिळावेत हा प्रकार खरोखर विचार करण्यासारखा आहे. **मंगळास युद्धाची देवता** Mars the War Lord मानण्याचा सर्वत्र प्रचार आहे. यासंबंधानें सवडीनें मालेंत ऊहापोह करण्याचा विचार आहे. महायुद्ध मंगळामध्यें शुक्राचें साल सन १९१८ सालीं चालू असतां थांबलें आहे. सन १९१९ साल मंगळामध्यें **बुधाचें** येणार आहे. फलज्योतिषशास्त्रामध्यें बुध हा बुद्धीचा, लेखनकलेचा, वक्तृत्वाचा, छापखाने, पुस्तकें, पोष्ट, टेलिग्राफ, टेलिफोन, वर्तमान पत्रें, ट्रामवे, वातम्यांचीं किंवा प्रवासांचीं साधनें (means of easy communication) वगैरे गोष्टींचा कारक मानिलेला आहे. बुधाचा मंगळाबरोबर योग झाला असतां बुधाचे गुणधर्म फारच उदीप्त होतात त्या न्यायानें विचार करितां पोष्ट, टेलिग्राफ, टेलिफोन, वर्तमान पत्रें, मासिकें, भाषणें, प्रवासाचीं साधनें यांसंबंधीं चालू सालामध्यें विशेष महत्त्वाच्या घडामोडी होतात किंवा काय हे पाहणें आहे. मेषसंक्रमणकाळीं हा ग्रह मेष राशीमध्यें षष्ठ स्थानामध्यें मंगळानें युक्त असा आहे त्यामुळें चालू सालामध्यें तुफानी वारे, वादळें यांचा सुकाळ होईल. चांगल्या चांगल्या लेखकांचे, वक्त्यांचे, मासिककारांचे, वर्तमान पत्रकार यांचे मृत्यु न होवोत म्हणजे बरें. या दृष्टीनें विचार करितां सन १९१९ हें साल वर्तमान पत्रें, मासिककार व लेखक वर्ग यांस फार जाचक जाईल अशी भीति वाटते. या वर्षीं नाना प्रकारचे **कर बसून देशाची सांपत्तिक स्थिति फारच निकृष्ट राहील.**

नेपच्यून या ग्रहाचें सन १९१९ सालीं सिंह राशीमधून भ्रमण होणार आहे. हा ग्रह वर्षारंभीं सिंहेच्या ९ व्या अंशामध्यें आहे व तो डिसेंबर ३१ च्या सुमारास सिंहेच्या ११ व्या अंशामध्यें राहील. हा ग्रह वर्षारंभींच वक्री असून २८ एप्रिलच्या सुमारास सिंह राशीच्या ६ अं. व ३४ कलेमध्यें मार्गी होईल. त्यानंतर पुन्हा तो १६ नोव्हेंबर रोजीं सिंह राशीच्या ११ अं. ३३ कलेमध्यें वक्री होणार आहे.

नेपच्युन हा खल ग्रह असल्यामुळें त्याचें भ्रमण ज्या ज्या राशीमधून होत असतें तद्योतक देशामध्यें अनेक भानगडी व घोटाळे उत्पन्न होतात. हा ग्रह खालील प्रमाणें चालू वर्षामध्ये इतर ग्रहांबरोबर शुभाशुभ दृष्टियोग करील. रवीबरोबर त्याचे खालील दिवशीं अशुभ योग घडतील.

रवि ☍ नेप. २७ जानेवारी; रवि □ नेप. २८ एप्रिल; रवि < नेप. १४ जून. रवि ☌ नेप. २ आगष्ट; व रवि □ नेप. ४ नोव्हेंबर.

रवि नेपच्युन यांचे अशुभ योगावर देशामध्यें अस्वस्थता होते. सामाजिक बाबतींसंबंधानें फार गाजावाजा होतो (मे. ज्यो. पान १९).

रवि नेपच्यून यांचे खालील दिवशीं शुभयोग घडतील:—

रवि △ नेप २८ मार्च; रवि * नेप. ५ अक्टोबर, व रवि △ नेप. ४ डिसेंबर.

या योगावर अधिकारारूढ लोक व प्रजापक्ष यांचे मध्यें सलोखा राहतो. सरकारपक्षास हा काळ उत्तम जातो.

खालील दिवशीं नेपच्युन **बुधाचे** अशुभ योग घडतील.—

बुध ☍ नेप. ८ फेब्रुवारी; बुध □ नेप. २० मे.

या अशुभ योगावर बेअब्रूचे खटले, अत्याचार, गुप्त कारस्थानें, आश्चर्यकारक रीतीनें फसवेगिरी केल्याचीं कृत्यें उघडकीस येतात.

बुध नेपच्युन यांचे खालील दिवशीं शुभ योग घडतील.—

बुध △ नेप. १३ मार्च; बुध * नेप. १ आक्टोबर; बुध △ नेप. १२ नोव्हेंबर

वरील शुभ योगांचे दिवशीं लेखनव्यवसाय, वक्तृत्व, ग्रंथप्रकाशन आणि ललित वाङमय यांची प्रगति होते.

शुक्र व नेपच्युन यांचे खालील दिवशीं अशुभ दृष्टियोग झालेले पाहण्यास मिळतील.—

शुक्र ☍ नेप. १६ जानेवारी; शुक्र □ नेप. २८ मार्च; शुक्र △ नेप. ८ आगष्ट; शुक्र □ नेप. १९ डिसेंबर.

वरील योगांवर सांपत्तिक बाबतींमध्यें फसविण्याचे प्रयत्न केले जातात. अनीतीच्या किंवा बळजबरीच्या कृत्यांचा बोभाटा होतो.

शुक्र व नेपच्युन यांचे खालील दिवशीं शुभ दृष्टियोग होतील.—

शुक्र △ नेप. ४ मार्च; शुक्र * नेप. २१ नोव्हेंबर.

वरील योगांवर कनिष्ट दर्जाचे लोक यांची स्थिति सुधारण्यासंबंधानें प्रयत्न केलेले पाहण्यास मिळतात.

मंगळ व नेपच्युन यांचे मध्यें खालील दिवशीं अशुभ योग घडणार आहेत.—

मंगळ □ नेप. २४ एप्रिल; मंगळ △ नेप. २८ जून व २४ नोव्हेंबर. नेपच्युन-मंगळांची युति ८ सप्टेंबरला होईल.

वरील अशुभ योगांचे दिवशीं चळवळे लोकांच्या चळवळींनीं देशांत अस्वस्थता वाढते, गुप्त कृत्यें, अत्याचार घडतात. त्या दिवशीं मृत्युसंख्या ज्यास्त असलेली पाहण्यास मिळते.

या सालामध्यें **गुरू** व नेपच्युन यांची युति तारीख २४ सप्टेंबर १९१९ रोजीं मुं. टा. सकाळीं ६-४९ वाजतां होणार आहे. ही युति फार महत्त्वाची आहे कारण त्यानंतर थोडक्याच वेळानें सायन तुला संक्रमण होत असून त्याचे दशमांत ही युति आहे. त्यामुळें धार्मिक आचारविचार किंवा अध्यात्मिक गोष्टीविषयक कांहीं मोठी महत्त्वाची चळवळ झालेली पाहण्यास मिळेल असें दिसतें.

हर्शल किंवा **प्रजापति** हा वर्षारंभीं कुंभ राशीच्या २९ व्या अंशांत असून एप्रिलच्या १ ल्या तारखेस मीन राशीमध्यें जाणार आहे. परंतु जूनच्या ९ व्या तारखेच्या सुमारास हा ग्रह वक्री होऊन वर्षाच्या अखेर म्हणजे ११ डिसेंबर रोजीं कुंभेच्या २८ अंश व ५७ कलेमध्यें राहील. हर्शल-ग्रहाचें चालूं वर्षांतील राश्यंतर फारच महत्त्वाचें आहे. हर्शल हा ग्रह ज्या

राशीमधून भ्रमण करीत असतो तद्योतक प्रदेशामध्यें राज्यव्यवस्थेसंबंधानें चळवळी सुरू होतात, प्रजापक्ष जोरानें काम करूं लागतो, देशावर आकस्मिक संकटें येतात. हा काल फार मोठ्या घडामोडींचा असतो व या काळांत इतिहासांत नमूद करण्यासारखे फेरफार घडलेले पहाण्यास मिळतात. मेदिनीय ज्योतिष पान ६३ मध्यें **मीन** राशीचा अंमल **पोर्तुगाल, स्पेन**मधील **गॅलिशिया, नार्मंडी; न्यूबिया, सहारा** अरण्यें, **अलेक्झांड्रिया** व हिंदुस्थानामध्यें **पंजाब, पानिपत, बनारस** इत्यादींवर सांगितलेला आहे. सन १९२० ते १९२७ च्या काळामध्यें पुढील ७ वर्षांमध्यें या वर दर्शविलेल्या प्रदेशांत विशेष घडामोडी झाल्या पाहिजेत.

या ग्रहाचे खालीलप्रमाणें चालू वर्षामध्यें इतर ग्रहांबरोबर दृष्टियोग होणार आहेत—

हा ग्रह खालील दर्शविलेल्या तारखांस **रवी**बरोबर अशुभ दृष्टियोग करील—

रवि<हर्शल १ जानेवारी, रवि♂हर्शल १७ फेब्रुवारी, रवि<हर्शल ६ एप्रिल; रवि□हर्शल २४ मे; रवि १३५ अं. हर्शल ९ जुलई; रवि♂हर्शल २४ आगस्ट; रवि☒ हर्शल २१ नोव्हेंबर.

रवि हर्शल यांचे अशुभ योगावर संप व अस्वस्थता माजते; कायदेकौंसिलामध्यें तीव्र मतभेद होतो; देशाचे हितकर्ते यांवर संकटें ओढवतात (मे. ज्यो. पान १९)

खालील दिवशीं रवि व हर्शल यांचे शुभयोग घडतील—

रवि*हर्शल २२ एप्रिल; रवि△हर्शल २४ जून; रवि△ हर्शल २२ आक्टोबर; रवि*हर्शल २१ डिसेंबर.

रवि हर्शल यांचे शुभ योगावर अधिकारी वर्ग व राजसत्ता यांस हा काळ फार उत्तम जातो. हर्शलच्या अमलाखालीं असलेल्या गोष्टींची प्रगति होते. देशामध्यें लोकोपयोगी गोष्टी घडतात.

बुध व हर्शल यांचे अशुभ योगांचे चालू वर्षामधील दिवस—

बुध<हर्शल ४ मे; बुध□हर्शल ३ जून.

बुध हर्शल अशुभ योग होत असतां असंतोष, चळवळी, अपघात, संप व

अत्याचार होतात. वाङ्मयाच्या प्रगतीस अडथळे येतात, लेखक, किंवा वक्ते मरतात.

बुध हर्शल यांचे शुभ दृष्टियोग खालील दिवशीं होतील.

बुध*हर्शल ९ जानेवारी; बुध युति हर्शल २० फेब्रुवारी; बुध*हर्शल १७ मे बुध△हर्शल १७ जून व १२ आक्टोबर.

बुध हर्शल यांचे शुभ योगावर लेखनव्यवसाय, वक्तृत्व, ग्रंथप्रकाशन आणि ललित वाङ्मय यांची प्रगति होते. गूढ शास्त्रांतील शोध लागतात.

शुक्र व हर्शल यांचे अशुभ योग चालू वर्षामध्यें खालील दिवशीं होतील—

शुक्र♂हर्शल ३१ जानेवारी; शुक्र ४५ अं. हर्शल १० मार्च व १० एप्रिल; शुक्र□हर्शल १७ एप्रिल; शुक्र♂हर्शल ९ जुलई; शुक्र १३५ अं. २६ डिसेंबर.

हे दिवस सांपत्तिक दृष्टीनें वाईट जातात. स्त्रियांच्या बेअब्रूसंबंधानें घडलेल्या गोष्टी उघडकीस येतात किंवा कोर्टामध्यें खटले चाललेले पहाण्यास मिळतात. गृहसुखास हे दिवस अनिष्ट असतात. ह्या दिवशीं शुक्र ज्या ज्या गोष्टींचा कारक आहे त्यासंबंधानें व्यवहार करूं नयेत.

शुक्र व हर्शल यांचे खालील दिवशीं चालू वर्षांत शुभयोग होतील—

शुक्र*हर्शल २३ मार्च; शुक्र△हर्शल १४ मे; हे दिवस शुभ जातात. चांगल्या चांगल्या गोष्टी घडतात. उत्सव, रोषणाई वगैरे झालेली पहाण्यास मिळते.

मंगळ व हर्शल यांचे खालील दिवशीं अशुभ योग घडतील—

मंगळ युति हर्शल २२ जानेवारी; मंगळ□हर्शल २८ मे; मंगळ १३५ हर्शल २ आगस्ट.

मंगळ हर्शल यांचे अशुभ योग चालू असतां अकल्पित रीतीनें त्रासदायक व भानगडीचे प्रश्न उपस्थित होतात; असंतोष वाढतो, संप, खून, मारामाऱ्या होतात; धरणीकंपाचे धक्के बसतात.

चालू वर्षामध्यें हर्शल व मंगळ यांमध्यें तारीख १६ एप्रिल रोजीं होणारा हर्शल*मंगळ एवढा एकच शुभ योग होणार आहे.

शनि व हर्शल या दोन ग्रहांमध्यें चालू वर्षामध्यें दोन वेळ प्रतियोग होईल. पहिला प्रतियोग सिंह व कुंभ राशींमधून तारीख २९ जानेवारी रोजीं

होईल व दुसरा मीन व कन्या राशींमधून तारीख १२ आगस्ट रोजी होईल. यासंबंधानें स्वतंत्र विवेचन केलेलें आहे. हर्शलशनि प्रतियोगाचें वर्णन मागील वर्षाचे जानेवारीच्या अंकांत केलें आहे तें अवश्य पहावें.

यंदाचे सालीं गुरु व हर्शल यांच्यामध्यें फक्त १३९ अंशांचा दृष्टियोग २ जूनला होईल.

शनि हा जानेवारीच्या १ ल्या तारखेस सिंह राशीच्या २७ अं. ४७ कलेमध्यें वक्री आहे. व तो एप्रिलच्या २४ व्या तारखेस २१ अं. ३१ कलेमध्यें मार्गी होणार आहे. हा ग्रह चालू वर्षी आगष्ट महिन्याच्या १२ व्या तारखेस कन्या राशीमध्यें संक्रमण करील. हा ग्रह पुन्हा तारीख २३ डिसेंबर रोजी कन्या राशीमध्ये ११ अंश ४१ कलेमध्यें वक्री होणार आहे.

शनि हा ग्रह ज्या राशींमधून भ्रमण करीत असतो तद्यातक प्रदेशामध्यें रोगराई, दुष्काळ, व्यापारामध्यें हानि दर्शवितो. कन्या राशीचा अंमल यूरोपीय **तुर्कस्थान, स्विट्झरलंड, वेस्ट इन्डीज, असीरिया, मेसापोटेमिया,** (टैग्रिसपासून युफ्रेटिसपर्यंत) **क्रीट, क्रोशिआ, सायलेशिया, बाबिलोनिया, मोरिया, थेसली, कर्डीस्थान, ग्रीस** देशांतील कांहीं भाग **व्हर्जीनिया** आणि **ब्राझिल** या देशांवर आहे. शनि कन्याराशीमध्यें १९२१ च्या आक्टोबर महिन्यापर्यंत राहणार आहे. या कालांत **तुर्कस्थान** व **बालकन** राष्ट्रें यांची फार शोचनीय स्थिति होणें संभवनीय आहे.

खालील दिवशीं **रवि** व **शनि** यांचे अशुभ योग घडतील. हे दिवस सर्व महत्त्वाचे कार्यास वर्ज्य करावे.

रवि १३५ अं. शनि ४ जानेवारी; रवि ☌ शनि १४ फेब्रुवारी; रवि □ शनि १३ मे; रवि ☍ शनि २६ आगस्ट; रवि ४५ शनि १७ आक्टोबर; रवि □ शनि ४ डिसेंबर.

या योगावर देशांतील व्यापार, मजूरवर्ग, कामकरीवर्ग यांच्यासंबंधानें फार भानगडी उपस्थित होतात. अधिकारीवर्गासंबंधानें असंतोष उत्पन्न होतो, राजवर्गांत किंवा अधिकारीवर्गांत मृत्यु होतात. हा काळ अत्यंत अनिष्ट असतो.

रवि △ शनि १२ एप्रिल; रवि ✱ शनि १५ जून, व १ नोव्हेंबर या दिवशीं रवि-शनींमध्यें शुभ योग घडतील.

खालील दिवशीं **शनि** व **बुध** यांचेमध्यें अशुभ दृष्टियोग होतील.

बुध ☌ शनि १८ फेब्रुवारी; बुध □ शनि २९ मे, बुध ☍ शनि ३ आगस्ट व ११ सप्तेंबर, बुध ४५ अं. शनि ९ आक्टोबर; बुध □ शनि ११ नोव्हेंबर, व २ डिसेंबर.

ग्रंथप्रकाशन, लेखन, वक्तृत्व यांस हे दिवस फारच अनिष्ट असतात. चोऱ्या, फसवेगिरी वगैरे गोष्टी घडतात.

खालील दिवशीं **बुध** व **शनीचे** शुभ योग होतील. हे दिवस लेखन, ग्रंथप्रकाशन, शिक्षण यांस उत्तम असतात.

बुध △ शनि ११ जानेवारी व २७ मार्च; व १ ली एप्रिल बुध ✱ शनि १३ जून व १८ आक्टोबर.

खालील दिवशीं **शनिशुक्रामध्यें** अशुभ योग घडतील. या दिवशीं उद्योगधंदे व सांपत्तिक स्थिति अनिष्ट होते. देशांत अनीतिकारक गोष्टी घडतात; स्त्रीवर्गावर या योगाचा अनिष्ट परिणाम घडतो. शुक्रानें दर्शविल्या जाणाऱ्या गोष्टींस हें दिवस वर्ज्य करावेत.

शुक्र ☌ शनि तारीख ३० जानेवारी; शुक्र १३५ अं. शनि ५ मार्च; शुक्र □ शनि १० एप्रिल; शुक्र ☍ शनि ३ जुलई.

खालील दिवशीं या दोन ग्रहांमध्यें शुभ योग घडतील.

शुक्र △ शनि १७ मार्च; शुक्र ✱ शनि ५ मे.

खालील दिवशीं **शनि** व **मंगळ** यांचेमध्यें अशुभ योग घडतील. हे योग अत्यंत अनिष्ट असतात. असंतोष वाढतो. चोऱ्यामाऱ्या, खून, दरवडे यांस ऊत येतो. या दिवशीं प्रवास वगैरे करूं नयेत.

मंगळ ☌ शनि २३ जानेवारी; मंगळ १३५ अं. शनि १६ मार्च; मंगळ < शनि २८ जुलई; मंगळ युति शनि २४ आक्टोबर.

वरील योगांत शनिमंगळांचा युतियोग फारच महत्त्वाचा आहे. त्यासंबंधानें पुढें खुलासा केला आहे. युतिमंगळामध्यें चालू वर्षी १ जुलई रोजी एक शुभयोग (मंगळ ✱ शनि) घडेल.

गुरु हा चालू वर्षी जानेवारीच्या १ ल्या तारखेस सायन कर्क राशीच्या १० अं. ५३ कलेमध्यें वक्री आहे. व तो ३ मार्च रोजीं कर्क राशीच्या ९ अंश ४६ कलेमध्यें मार्गी होईल. गुरु २ आगस्ट रोजीं सायन सिंह राशीमध्यें जाईल. हा गुरु पुन्हा सिंह राशीच्या १८ अं. ८ कलेमध्यें ६ डिसेंबर रोजीं वक्री होऊन वर्षअखेर सिंहेच्या १७ अंश ३ कलेमध्यें राहील.

गुरु हा शुभ फल देणारा ग्रह असल्यामुळें ज्या ज्या देशांच्या राशींमधून या ग्रहाचें भ्रमण होतें त्या त्या देशांचे उद्योगधंदे, सांपत्तिक स्थिति व व्यापार यांची भरभराट होते व त्या देशांत सुखशांतता व आरोग्य नांदतें. कर्केंत गुरु असल्यामुळें **स्कॉटलंड, हालंड** व **चीन** या देशांत शांतता नांदेल. **चीन देश खात्रीनें प्रगतीच्या मार्गास लागेल.** फार महत्त्वाच्या सुधारणा घडतील. महाराष्ट्रांतील **निजाम हैदराबादची** कर्क राशि आहे त्यामुळें त्या शहराची चांगली भरभराट होईल, आरोग्याची वृद्धि होईल. महाराष्ट्राची राशि धनु असून त्या राशीचा अधिपति चालू वर्षी उच्च होत असल्यामुळें महाराष्ट्रामध्यें शिक्षणाचा चांगला प्रसार होऊन सुधारणा केल्या जातील. महाराष्ट्रांतील संस्थानाधिपतींस कांहीं मानसन्मान प्राप्त होईल. हिंदुस्थानामध्यें किंबहुना मुंबईंत जहाजें बांधण्यासंबंधानें चालू वर्षामध्यें प्रामुख्यानें कांहीं गोष्टी घडतील. स्टीमशिप बिल्डिंग कंपन्या नवीन निघतील किंवा असतील त्यांची चांगली भरभराट होईल. कोर्स्टींग स्टीमर कंपन्यांचे शेअरचे भाव वाढतील व त्यांना चालू वर्षी चांगला फायदा होईल. पोर्टट्रस्ट बॉन्डसुद्धां चांगले वाढतील असा अंजमास आहे.

गुरु हा सिंह राशीमध्यें २ आगस्ट रोजीं प्रवेश करील व त्यामुळें सिंह राशीच्या अंमलाखालील प्रदेशांस हा काल उत्तम जाईल. सिंह राशीमध्यें गुरु १९२० च्या आगस्ट अखेरपर्यंत राहणार आहे. या कालामध्यें **फ्रान्स, इताली, रुमानियाचा** उत्तर भाग, **सिसिली, रोम, मुंबई** वगैरे ठिकाणच्या व्यापाराची भरभराट होईल.

खालीलप्रमाणें गुरु हा इतर ग्रहांबरोबर दृष्टियोग करील.

रवि व **गुरु** यांचे खालील दिवशीं शुभ योग घडतील—

रवि△गुरु २६ फेब्रुवारी; रवि✱गुरु २ मे; रवि☌गुरु २१ जुलई; रवि✱गुरु ७ आक्टोबर; रवि△गुरु ११ नोव्हेंबर.

हे सर्व दिवस शुभ आहेत; सांपत्तिक स्थिति चांगली रहाते. धंदे व लोकोपयोगी संस्थांची भरभराट होते.

खालील दिवशीं गुरूमध्यें अशुभ योग घडतील.

रवि☍गुरु २ जानेवारी; रवि १३५ अं. गुरु ११ फेब्रुवारी; रवि□गुरु २८ मार्च; रवि ४५ अं. गुरु २१ मे व १८ सप्तेंबर; रवि□गुरु १० नोव्हेंबर; रवि १३५ अं. गुरु २५ डिसेंबर.

हे दिवस सांपत्तिक दृष्ट्या अशुभ आहेत. या दिवशीं नवीन उद्योगधंद्यांस आरंभ करूं नये. धार्मिक भांडणें उपस्थित होतात. देशांतील आरोग्य चांगलें रहात नाहीं.

खालील दिवशीं गुरूचे **बुधा**बरोबर शुभ योग घडतील

बुध△गुरु २४ फेब्रुवारी; बुध✱गुरु २५ मे; बुध☌गुरु २७ जून; बुध✱गुरु २३ आक्टोबर; बुध△गुरु २१ व २३ नोव्हेंबर व ३० डिसेंबर.

देशांतील व्यापार, उद्योग व धंदा यांची भरभराट होते. धार्मिक व सामाजिक बाबतींत श्रेयस्कर चळवळी निघतात. वाङ्मयाची वृद्धि होते. हे दिवस लेखन, वक्तृत्व, पुस्तकें छापणें वगैरे कृत्यांस फारच महत्त्वाचे आहेत.

बुधगुरूंचा खालील दिवशीं अशुभ योग घडणार आहे. हे दिवस लेखन, वक्तृत्व वगैरे गोष्टींस घेऊं नयेत. या योगामध्यें समाजसुधारक व जुने मतवादी यांचे वादविवाद होतात. धार्मिक, सामाजिक किंवा वाङ्मयिक प्रगतीस हा काल प्रतिकूल असतो.

बुध☍गुरु २० जानेवारी; बुध १३५ अं. गुरु १६ फेब्रुवारी; बुध□गुरु १२ मार्च; बुध ४५ गुरु ३ जून; बुध□गुरु २३ आक्टोबर.

गुरुशुक्रांमध्यें खालील दिवशीं शुभ योग घडतील.

शुक्र △ गुरु ८ फेब्रुवारी; शुक्र * गुरु २९ मार्च; शुक्र युति गुरु २६ मे; शुक्र * गुरु २७ नोव्हेंबर.

हे दिवस सर्व गोष्टींस शुभ आहेत. या योगांवर व्यापारधंदा व सांपत्तिक स्थिति चांगली राहिलेली पाहण्यास मिळते.

खालील दिवशीं गुरुशुक्रांमध्यें अशुभ योग झालेले पाहण्यास मिळतील. या योगांवर संपत्तीचा विनियोग चांगला केला जात नाहीं. लोकोपयोगी संस्था पैशाच्या अडचणींत येतात. चैन वाढलेली पहाण्यास मिळते.

शुक्र १३५ अं. गुरु २८ जानेवारी; शुक्र □ गुरु ३ मार्च; शुक्र ४५ अं. गुरु ११ एप्रिल, व २२ जुलई; ७ सेप्टेंबर व १२ नोव्हेंबर.

खालील दिवशीं **गुरुमंगळां**मध्यें शुभ योग घडतील.

मंगळ △ गुरु ५ फेब्रुवारी; मंगळ * गुरु २९ एप्रिल. आणि खालील दिवशीं गुरुमंगळांमध्यें अशुभ योग होतील.

मंगळ □ गुरु १४ मार्च; मंगळ ४५ अं. गुरु २७ मे व ६ डिसेंबर.

गुरुमंगळांची युति २ सप्टेंबर रोजीं होईल याबद्दल पुढें विवेचन करण्यांत येईल.

सूचना—मागें सांगितलेल्या प्रत्येक दृष्टियोगाच्या फलाप्रमाणें त्या त्या दिवशीं वर्णन केलेलीं फलें अनुभवास येतीलच म्हणून दिलेलीं नसून निरनिराळ्या योगांचा काय अनुभव येतो हें वाचकांनीं स्वतः अजमाविण्याकरितां दिलेलीं आहेत. त्याचप्रमाणें वरील शुभाशुभ दृष्टियोगानुरूप कोणते दिवस कोणत्या कार्यास अनकूल किंवा प्रतिकूल आहेत हें सहज कळेल. व विशेषतः हाच महत्त्वाचा मुद्दा पुढें ठेवून ते योग व त्यांचीं फलें वर्णन केलीं आहेत.

मकर संक्रमण तारीख २२ डिसेंबर १९१८ रोजीं रात्रीं ८ वाजून ३४ मिनिटांनीं रवि **सायन मकर** राशींत प्रवेश करीत आहे. ह्या वेळीं पूर्वक्षितिजावर सिंह राशीचा १३ वा अंश उदय पावत असून तनुस्थानामध्यें नेपच्यून व शनि–चंद्र युति आहे. चंद्र–शनींच्या युतीसमोर हर्शल आहे.

आधीं तनुस्थानांतील चंद्रशनि यांचा युतियोग अनिष्ट असून त्यांत हर्शलच्या प्रतियोगानें अनिष्टपणामध्यें फारच भर पडली आहे. वरील योगांमुळें देशांत आरोग्य मुळींच राहणार नाहीं, दारिद्र्य व दुष्काळ यांनीं लोक हैराण होतील. मजूरवर्ग, काबाडकष्ट करणारे लोक व मध्यम स्थितीमधील लोक यांची विपन्नावस्था होईल. वाईट धान्याच्या पुरवठ्यामुळें व उपासमारीनें कॉलऱ्याच्या साथीनें मृत्युसंख्या अतिशय वाढेल. संक्रमण काळचा पीडित चंद्र कन्या राशीच्या आरंभींच आहे त्यामुळें कन्याराशीनें दर्शित होणाऱ्या विभागासंबंधीं रोगांचा अतिरेक झालेला पाहण्यास मिळेल. कन्याराशीचा अमल जठराशय, आंतडीं यांवर असल्यामुळें कॉलरा, आंवेचा उपद्रव किंवा अतिसारानें मृत्युसंख्या विशेष झालेली पाहण्यास मिळेल. त्याचप्रमाणें टयुबरक्युलासीस किंवा कफशय, मलेरीयल इन्फ्लुएंझा, संधिवात यांचाही प्रसार पुष्कळच झालेला पाहण्यास मिळेल.

मकरसंक्रमणकाळच्या कुंडलीमध्यें रविचंद्रांचा नवमपंचम योग झाला आहे. हा योग अधिकारी वर्ग व लोकपक्ष वं पुढारी यांच्या परस्पर सहानुभूतीनें लोकहिताचीं कामें होतील असें दर्शवीत आहे. प्राथमिक शिक्षणाची भरभराट होऊन मुलांचे जन्माची संख्या वाढेल.

मकर संक्रमणाचे वेळीं प्रजापति (हर्शल) सप्तमांत असून तो शनीबरोबर प्रतियोग करीत आहे. मेदिनीय ज्योतिषामध्यें सप्तस्थानावरून परराष्ट्रांशीं संबंध व दळणवळण, युद्धें, आपसांतील यादवी, दंगेधोपे, परराष्ट्रीय व्यापार, देशांत होणारे लग्नसमारंभ व घटस्फोटाचे प्रकार यांचा विचार होतो. व या स्थानामध्यें चालू वर्षीं हर्शल पीडित असल्यामुळें परराष्ट्रांशीं होणारे व्यवहार फारच त्रासदायक आणि भानगडीचे होतील. घटस्फोटांची संख्या वाढेल. देशांतील स्त्रीवर्गास हा काळ फार अनिष्ट आहे. विवाहसंस्थेसंबंधी भानगडी उत्पन्न होतील. समाजांतील निरनिराळ्या वर्गामध्यें तंटे लागतील. दुफळ्या, भांडणें आणि तीव्र मतभेद यांचा सुकाळ होईल.

लंडनमध्यें या संक्रमणाचे वेळीं चतुर्थांमध्यें शनि व दशमामध्यें हर्शल येत आहे. ही ग्रहस्थिति शुभ नाहीं. यामुळें कामकरी पक्षामध्यें फारच खळबळ होईल, संप होतील. जानेवारी महिन्याच्या शेवटच्या १२ दिवसांमध्यें मंगळ हा लंडनशहराच्या माध्यानीं उदित अंशावरून व हर्शलवरून जात असतां नेपच्यून व शनीबरोबर प्रतियोग करील. हा काल फारच कठीण जाईल. हा काळ रशियास तर फारच अनिष्ट भासतो. फ्रान्सकडील दक्षिण भागांत त्याचप्रमाणें कलकत्त्याच्या जवळील प्रदेशांत भूकंपाचे धक्के तारीख २५।२६ चे सुमारास बसतील व त्यामुळें घरेंदारें यांचा नाश होऊन प्राणहानि होण्याचा पुष्कळ संभव वाटतो.

मेष संक्रमण तारीख २१ मार्च १९१९ रोजीं ९ वाजून १० मिनिटांनीं रवि **सायन मेष** राशीमध्यें प्रवेश करील. या प्रवेशकालीं मुंबई रेखांशावर सायन वृश्चिक राशीचा १३ वा अंश उदय पावत असून तनुस्थानीं वृश्चिक राशीमध्येंच चंद्र आहे. हा चंद्र दशमांतील सिंह राशीमध्यें असलेल्या शनीबरोबर व चतुर्थस्थानामध्यें असलेल्या हर्शलबरोबर केन्द्रयोग व पंचमभुवनामध्यें असलेल्या रवीबरोबर त्रिकोण दृष्टियोग करीत आहे. **चंद्रशनींच्या** अशुभ योगांमुळें देशांतील मजूरवर्ग, कामकरीवर्ग व नोकरीवर अवलंबून असणारे लोक यांना हा काल अनिष्ट जाईल. दुष्काळ पडून गरीब लोकांचे हाल होतील. कौंसिलांतील लोकनियुक्त सभासदांपैकीं कोणी तरी मृत्यु पावेल. व्यापारधंदा वगैरेंस हा काल अनिष्ट आहे. देशांत असंतोष व रोगराई वाढेल. **चंद्रहर्शलांच्या** अशुभ योगामुळें कायदेकौंसिलें, मुनिसिपालिट्या यांना हा काल अस्वस्थतेचा जाईल. प्रजेला अप्रिय वाटणाऱ्या गोष्टी पुष्कळच घडतील. जानेवारी, मे व सप्टेंबर हे महिने या दृष्टीनें वाईट जातील. चतुर्थ स्थानामध्यें हर्शल शनीनें पीडित असल्यामुळें चालू वर्षीं जमीनजुमलेवाले लोक, शेतकरी, खाणी, जलसाह्यानें चालणाऱ्या कंपन्या, पीकपाणी, यांस हें वर्ष फारच वाईट जाईल. यंदा खाणीमध्यें अपघात घडतील, बरींच घरें पडतील, भूकंपामुळें बरीच नासाडी होईल. शेतकी,

घरवाले यांचे विरुद्ध कायदे होण्याचा पुष्कळ संभव आहे. यंदांच्या सालीं वादळें, तुफानी वारे यांनीं बरीच नासाडी होईल. संप, असंतोष, रोगराई व दुष्काळ यांमुळें चालू साल जनतेस कष्टकारक जाईल.

चालू वर्षीं लग्नांतील चंद्रामुळें रोगराई चतुर्थस्थानद्योतक **शेतकी**, खाणी, हवामान, व पंचमस्थानद्योतक **शिक्षण** व दशमस्थानद्योतक **राजकारण** इत्यादि गोष्टी प्रामुख्यानें लोकांच्या पुढें रहातील. शिक्षणाशिवाय वरील गोष्टींपैकीं कोणतीही गोष्ट विशेष समाधानकारक ठरणार नाहीं. पंचमाधिपतित्व सुरगुरूकडे आहे व तो भाग्यभुवनांत उच्चस्थित आहे म्हणून शिक्षणाची प्रगति उत्कृष्ट होईल, नवमस्थानांतील कर्केमधील गुरूमुळें परराष्ट्रीय व्यापार व देशामधील धार्मिक वाङ्मय यांची वृद्धि होईल. स्टीम नॅव्हिगेशन कंपन्या नवीन अस्तित्वांत येण्याचा संभव आहे. त्याचप्रमाणें शिपबिल्डिंग वगैरे संबंधानें कांहीं तरी चांगला उपक्रम होईल.

चालू वर्षाच्या कुंडलीमध्यें दशमभुवन अत्यंत पीडित होत आहे. हिंदुस्थानांतील बराचसा भाग दशमारंभीचा अंश नेपच्युन व शनि या दोन खल ग्रहांच्या कैचींत सांपडला आहे त्याचा परिणाम दशमस्थानद्योतक गोष्टींना अनिष्ट आहे. चालू वर्षातील रविचंद्रांचा होणारा त्रिकोण योग जनतेस साम्राज्य सरकाराकडून नवीन हक्क मिळतील असें दर्शवितो व तद्योतक कायदे कायदेकौंसिलांमध्यें केले जातील असें लाभेश बुध व दशमांत असलेला शनि यांचेमध्यें होत असलेल्या त्रिकोणयोगावरून वाटतें.

कर्क संक्रमण रवि **सायन कर्क** राशीमध्यें तारीख २२ जून रोजीं दुपारीं ४।४९ वाजतां प्रवेश करणार आहे. त्या वेळीं पूर्वक्षितिजावर धनु राशीचा ९ वा अंश उदय पावत आहे. लग्नस्वामी अष्टमांत असून त्याच्याबरोबर चंद्र केंद्रयोग करीत आहे. या संक्रमणाचे वेळीं रवि, बुध, शुक्र, व गुरु असे ४ ग्रह अष्टमांत असून चंद्र शेवटच्या ३ ग्रहांबरोबर केन्द्रयोग करीत आहे. त्यामुळें शिक्षणखातें, शाळा, मुलांचें व स्त्रियांचे

आरोग्य, नाटकगृहें, करमणुकीचीं साधनें, सट्टे, शेअर बझार यांना हा काळ अनिष्ट आहे. वर्षकुंडलीमध्यें (मेषसंक्रमणकालीं) मृत्युसंख्या जास्त वाढेल असें दर्शविणारे जे योग झाले आहेत त्यांचा परिणाम प्रस्तुत संक्रमण-कालीन ग्रहयोगांनीं मुळींच कमी होणार नाहीं. चंद्र पंचमस्थानीं असून मंगळ व शनीबरोबर शुभ दृष्टियोग करीत आहे त्यामुळें सार्वजनिक हिताच्या गोष्टींसंबंधानें उत्साह वाढेल. म्युनिसिपालट्यांची वाढ होईल. स्थानिक स्वराज्याच्या हक्काची व्याप्ति करण्यांत येईल असें अनुमान आहे. या कुंडलींतील सप्तम स्थानांतील मंगळामुळें लोकांचें लक्ष्य परराष्ट्रीय व्यापा-राकडे अतिशय वेधेल.

तुला संक्रमण—रवि बुधवार तारीख २४ सेप्टेंबर रोजीं सकाळीं ७।२७ वाजतां **सायन तुला** राशीमध्यें संक्रमण करील. लग्नभावारंभीं कर्क राशीचा २२ वा अंश उदय पावत असून दशमभावारंभीं कर्क राशीचा २२ वा अंश आहे. या कुंडलीमध्यें दशमामध्यें (१) गुरुनेपच्यूनयुति (२) लाभस्थानामध्यें सिंहेचा मंगळ (३) व शनिशुक्रयुति आहे. हे तीन योग विचार करण्यासारखे आहेत. राजभुवनामध्यें—बादशाहा राशी-मध्यें—सिंह राशीमध्यें गुरु नेपच्युनची युति होत असल्यामुळें राजकीय परि-स्थिति कांहीं औदार्याच्या धोरणानें बदलावी असें वाटतें. गुरु-नेपच्युनचा योग महत्त्वाचा आहे. दोन महत्त्वाचे ग्रहांची तंतोतंत युति संक्रमणकालीं दशमांत येत आहे व या युतियोगाचा परिणाम प्रजेच्या बाजूनें हितकारक होईल असें अनुमान होतें. एकादश स्थानांतील शुक्रशनीचा युतियोग व सप्तमेश मंगळ लाभामध्यें यामुळें नवीन वैवाहिक कायदा पास होईल किंवा जुन्या कायद्यामध्यें दुरुस्ती होईल. मुलांची मृत्युसंख्या देवी, गोंवर, कांजण्या यांपासून बरीच होईल. नाटक कंपन्या, थीएटरें, सिनेमा हाऊसीस यांमध्यें आगी लागतील. एखाद्या कॉन्सिलरचा मृत्यु हृदयाची क्रिया बंद पडल्यामुळें झाल्याचें पहाण्यास मिळेल.

सन १९१९ सालामधील ग्रहणें.

सन १९१९ सालीं दोन सूर्यग्रहणें व एक चंद्रग्रहण होणार आहे. त्यांपैकीं आपलेकडे तारीख ८ नोव्हेंबर १९१९ रोजीं होणारें चंद्रग्रहण मात्र दिसेल.

(१) तारीख २९ मे १९१९ रोजीं खग्रास सूर्यग्रहण होईल तें हिंदु-स्थानांत कोठेंच दिसत नाहीं. दक्षिण आफ्रिका व दक्षिण अमेरिका खंडामध्यें मात्र दिसेल. ग्रहणमध्यरेषा ब्राझिल, बोलिव्हीया व पेरु या दक्षिण अमेरि-केंतील प्रांतांमधून जात आहे त्यामुळें जून महिन्यामध्यें तेथें भूकंपाचे धक्के बसतील.

(२) तारीख ८ नोव्हेंबर रोजीं खंडाकृति चंद्रग्रहण येथें दिसेल. हें ग्रहण वृषभ राशीच्या द्वितीय द्रेष्काणामध्यें होत असून ग्रहणकालचा चंद्र अष्टमस्थानामध्यें आहे व तो गुरु व नेपच्युनबरोबर पीडित आहे. हें ग्रहण अनिष्टसूचकच आहे व त्यामुळें पश्चात धान्यें गहूं हरभरा वगैरेंचा नाश होईल, शेतीची नासाडी होईल. देशांत आरोग्य राहणार नाहीं. एखाद्या प्रसिद्ध स्त्रीचा मृत्यु होईल, मृत्युसंख्या वाढेल, सांथीचे रोग उद्भवतील व गुन्ह्यांची संख्या वाढेल.

(३) तारीख २२ नोव्हेंबर रोजीं कंकणाकृति सूर्यग्रहण होईल. व ग्रहणमध्यरेषा उत्तर आफ्रिका, अटलान्टिक महासागर, वेस्टइन्डिज बेटें मेक्सिकोचें आखात व उत्तर अमेरिकेंतील टेक्सस प्रांतावरून जातें. हें ग्रहण लंडन, पॅरिस, आक्सफोर्ड, लिव्हरपूल, ग्लासगो, स्पेन, पोर्तुगाल व उत्तरअमेरिका खंडामधील पूर्वेकडील भागामध्यें खंडाकृति दिसेल. हें ग्रहण वृश्चिक राशीच्या तिसऱ्या द्रष्काणामध्यें होत आहे त्यामुळें बल्हेरिया, स्पेन, हंगेरी, इटलीमध्यें अनिष्ट परिणाम घडतील. अमेरिका खंडाच्या पूर्वेकडील संस्थानें व अटलान्टिक महासागर यांमध्यें तारीख २१ ते २३ नोव्हेंबर व डिसेंबर महिन्याच्या पहिल्या ४ दिवसांमध्यें व जानेवारी १९२० मध्यें भयंकर वादळें, तुफानें व भूकंप होण्याचा पुष्कळ संभव वाटतो.

सन १९१९ सालामधील बृहत् ग्रहांचे योग प्रतियोग.

(१) जानेवारी महिन्याच्या २२ व्या तारखेस **हर्शल मंगळाची** युति रात्रीं ९ वाजून ४० मिनिटांनीं होईल. ही कुंभ राशीच्या २६ अं. १४ कलेमध्यें होणार आहे. ह्या युतीमुळें रशियाची फारच तारांबळ उडण्याचा रंग दिसत आहे. आपणाकडे ही युति षष्ठस्थानामध्यें होत असून मंगळ तृतीयेश व अष्टमेश असा असून तृतीयस्थानाचा भावारंभी उदित अंशाबरोबर केन्द्रयोग करीत असल्यामुळें आपल्याकडे पोस्ट, रेलवे यांमध्यें संप होतील, मोठाले रेलवे अपघात होऊन मृत्युसंख्या जास्त होईल. या दृष्टीनें फेब्रुवारी १६, मे १८ ते २२, आगस्ट १९।२०, आक्टोबर ३।४, नोव्हेंबर १९।२० हे दिवस अशुभ आहेत.

(२) हर्शलशनींचा प्रतियोग पुन्हा चालू वर्षी दुसऱ्यांदा तारीख २९ जानेवारी रोजीं होईल यांचेच अगोदर म्हणजे तारीख २३ रोजीं शनिमंगळांचा प्रतियोग होणार आहे. शनिहर्शलांच्या प्रतियोगासंबंधानें आम्हीं आमचे विचार मागील वर्षाच्या जानेवारी महिन्याच्या अंकामध्यें नमूद केले आहेत ते पहावे.

(३) हर्शलशनींचा पुन्हा प्रतियोग तारीख १३ आगस्ट रोजीं कन्या राशीच्या ० अं. ७ कला व ४२ विकलामध्यें होणार आहे. हा प्रतियोग आपणाकडे लग्न व सप्तमस्थानामधून दुपारीं ५।५० चे सुमारास होईल. केंद्रामधून होत असलेल्या या प्रतियोगानें अनिष्ट फलाची वृद्धि होत आहे.

(४) **मंगळगुरूंची** युति तारीख २ सेप्टेंबर रोजीं रात्रीं ११।४० वाजतां सिंह राशीमध्यें ६ अं. ४३ कलेमध्ये होणार आहे. ही युति आपलेकडे तृतीय स्थानाचे उदित अंशावर होणार आहे. यामुळें एखादा मोठा रेलवे अपघात होण्याचा पुष्कळच संभव वाटतो.

(५) **मंगळनेपच्यूनची** युति तारीख ८ सेप्टेंबर रोजीं होईल यामुळें फ्रान्स व इटलीमध्ये धार्मिक बाबतींसंबंधानें भानगडी उत्पन्न होतील.

(६) **गुरुनेपच्युनची** युति ही २४ सेप्टेंबर रोजीं सकाळीं ६।४९ वाजतां सिंह राशीच्या १० अं. ४९ कलेमधें होईल. ही युति आपणाकडे युतिकौलाच्या कुंडलीमध्यें लाभामध्यें येत असल्यामुळें कायदेकौंसिलामध्यें बराच घोंटाळा किंवा घालमेल करील. ही युति सयामकडील बाजूकडे दशम भावारंभी येत असल्यामुळें तेथें राजकीय भानगडी उद्भवतील.

(७) **शनिमंगळांची** युति तारीख २४ आक्टोबर रोजीं कन्या राशीमध्यें ८ अंश ३७ कलेमध्यें होणार आहे. ही युति फारच महत्त्वाची आहे युतीमुळें समुद्रामध्यें मोठाली वादळें तारीख २२ ते २९ आक्टोबरमध्यें होण्याचा पुष्कळ संभव आहे. ही युति युरोपीय तुर्कस्थान व बालकन राष्ट्रें यांना फारच अनिष्ट भासेल. आपणाकडे ही युति षष्ठस्थानामध्यें पडत असल्यामुळें मलेरिया किंवा अशाच कोणत्या तरी तापाच्या आजाराची सांथ पसरेल.

असो, येथपर्यंत चालू वर्षामधील ग्रहस्थितीचें विवेचन केलें आहे. आतां प्रत्येक महिन्यामधील महत्त्वाच्या बाबींसंबंधानें फलज्योतिषशास्त्रदृष्ट्या खुलासा करण्याचा प्रयत्न करण्याचें योजिलें आहे. हा प्रयत्न अगदीं प्रारंभीचा असल्यामुळें त्यांत चुका होण्याचा पुष्कळच संभव आहे तथापि मेदिनीय ज्योतिषशास्त्राच्या मूलतत्त्वास धरून भावी फलादेश किती सूक्ष्म करितां येतो हें पाहणें आह. या बाबतीमध्यें आमचे विचार चालूच आहेत. अझून आमची विद्यार्थिदशा संपली नाहीं असें आमचें ठाम मत आहे. त्याकरितां सहृदय वाचक आमच्या चुकया आम्हांस स्पष्टपणें दाखवीत जातील अशी आशा आहे. त्याचप्रमाण प्रस्तुत विवेचनामध्यें वातावरण व पाऊस यांसंबंधानें थोडाबहुत खुलासा करण्याचें योजिलें आहे. त्याबद्दल सवडीनें सविस्तर विवेचन मालेंत करण्याचा विचार आहे.

जानेवारीच्या २ व्या तारखेस रविचंद्रसंयोगकाळीं दशम भुवनीं कुंभेचा मंगळ असून नेपच्यूनबरोबर प्रतियोग चतुर्थस्थानाधून करीत आहे. जनतेस हा महिना अनिष्ट आहे. बेंगालमध्यें बरेच दरवडे पडतील, अत्याचार होतील, त्याचप्रमाणें भूकंपाचे धक्के बसतील. या महिन्याचे शेवटील १२ दिवस फारच अनिष्ट आहेत. त्या कालामध्यें मृत्युसंख्या फार वाढेल. २१ ते २३ तारखांच्या सुमारास हवेमध्यें भयंकर फेरफार होईल व उत्पात घडतील. या महिन्यांत रशियामध्यें फारच दंगल उडेल.

फेब्रुवारीच्या १ ल्या तारखेस रविचंद्रसंयोगकाळीं रवि, चंद्र, हर्शल धनस्थानीं असून अष्टमस्थानामध्यें नेपच्युन व शनि हे अनुक्रमें रविचंद्र व हर्शल यांच्याबरोबर प्रतियोग करीत आहेत. या महिन्यांत धनोत्पादक धंदे, व्यापारी वर्ग, सरकारी वसूल यांची स्थिति फारच कनिष्ट राहील. व्यापारी वर्गानें फारच जपून वागलें पाहिजे. फेब्रुवारीमध्यें मृत्युसंख्या फारच वाढेल. तुर्कस्थान

व रशियामध्यें फारच भानगडी उत्पन्न होतील. मुंबई शहराचा व्यापार व सांपत्तिक स्थिति यांस हा महिना अनिष्ट आहे. नवीन करासंबंधानें याच महिन्यांत वाच्यता होईल.

मार्च महिन्यांतील रविचंद्रसंयोगही फेब्रुवारी सारखाच अनिष्ट सूचक आहे. रवि, चंद्र, बुध व मंगळ कुंडलीच्या अष्टमस्थानीं आहेत तेव्हां आरोग्य व मृत्युसंख्या यांमध्यें फेब्रुवारीपेक्षां यत्किंचितही कमीपणा दिसून येत नाहीं. अष्टमांतील बुधमंगळांची युति लेखकवर्गामध्यें मृत्यु दर्शवीत आहे. या महिन्यामध्यें पार्लमेंटमध्यें कडाक्याचे वादविवाद होऊन कांहीं अंशी फाटाफूट होईल.

एप्रिल महिन्याच्या १ ल्या तारखेस होणाऱ्या रवि-चंद्रसंयोगकाळीं बुध. मंगळांची युति तृतीयस्थानीं होत आहे. मंगळ तृतीयेश व बुध अष्टमेश आहे त्यामुळें देशांतील लेखकवर्ग, वर्तमानपत्रकर्ते वगैरेंना हा महिना अनिष्ट दिसतो. या महिन्यामध्यें राजकीय प्रकरणांसंबंधानें तीव्र व कडाक्याचे वादविवाद होतील. या महिन्यांत एखाद्या लेखकासंबंधानें अगर प्रेसॲक्टसंबंधानें प्रिव्हीकौंसिलच्या निकालानें बराच गवगवा होईल असा अंदाज आहे. बुधमंगळांच्या अशुभ योगांवर वृत्तपत्रकार, लेखक वगैरेंवर बेअब्रू केल्याच्या फिर्यादी होतात त्याचप्रमाणें वादग्रस्त प्रश्न उपस्थित होऊन लेख व भाषणें यांचा सुकाळ होतो. पोस्ट, टेलिग्राफ व रेलवे यांसंबंधानें बरीच भानगड किंवा बोलवा होईल. त्याचप्रमाणें वरील खात्यांत संप होण्याची पुष्कळच धास्ती वाटतें. तारीख १,९, ११ व १२ या दृष्टीनें महत्त्वाच्या आहेत.

मे तारीख ३० एप्रिल रोजीं रविचंद्रसंयोग होत आहे त्याचीं फलें चालू महिन्यांत दिसतील. या रविचंद्रसंयोगाचे वेळीं धनस्थानामध्यें असलेला शनि देशांतील सांपत्तिक घडामोडींस अनिष्ट आहे. या वेळीं नाण्यांची अतिशय टंचाई होऊन व्यापाराची स्थिति कठीण होईल. नवीन कर बसेल. दशमांत रवि चंद्र व मंगळ यांचा युतियोग नेपच्यूनच्या केन्द्रामध्यें झाला आहे. हा योग अधिकारी वर्ग व प्रजा या दोघांनाही अनिष्ट आहे. दशमांत बुध असून शुक्राबरोबर द्विराश्यंतर योग होत असल्यामुळें महत्त्वाच्या सार्वजनिक सभा भरतील. अधिकारारूढ लोकांचीं महत्त्वाचीं भाषणें घडतील. विशेषतः कायदेकौंसिलांतील भाषणें फारच महत्त्वाची होतील. एखाद्या लेखकाचा किंवा ग्रन्थकाराचा चांगला गौरव होईल.

याच महिन्यांत २९ व्या तारखेस **सूर्य सायन** आर्द्रा नक्षत्रामध्यें प्रवेश करणार आहे. आर्द्रा प्रवेशावरून पर्जन्याचा विचार करण्यास आर्य ग्रंथांमध्यें सांगितलें आहे. आर्द्राप्रवेशकाळीं कर्क ही जलराशि उदय पावत असून लग्नांत कर्केचेच गुरु शुक्र आहेत. चतुर्थ स्थानावर कन्या राशीचा २३ वा अंश उदय पावत असून चतुर्थेश बुध लाभामध्यें असून तो गुरुशुक्रांबरोबर शुभसंबंधित आहे हा योग पर्जन्यास फारच उत्तम झाला असल्याकारणानें यंदा पाऊस चांगला पडेल अशी आशा वाटते. पावसास आरंभ मेच्या २३।२४ तारखेपासूनच होईल असा रंग दिसतो. आर्द्राप्रवेशकाळीं मिथुन राशीमध्यें रविचंद्रमंगळयुति व्ययस्थानीं होत आहे. व हें व्ययांतील ग्रहत्रय नवमांमधील हर्शलबरोबर केन्द्रयोग करीत असल्यामुळें यंदा पावसाळ्यामध्यें मोठालीं तुफानें, वादळें होतील व त्यानें बरीच प्राणहानि होईल. वारा फार सोसाट्यानें वाहील व त्यामुळें खंड वृष्टिहि होते किंवा काय अशी धास्ती आहे. तारीख २३ मेपासून हवेचा रंग पालटेल.

जून तारीख २९ मे रोजीं रविचंद्रसंयोग होत आहे त्या वेळीं रवि, चंद्र, मंगळ सप्तमस्थानामध्यें असून चतुर्थामधील हर्शलबरोबर केन्द्रयोग करीत आहे. या महिन्यांत स्त्रियांची मृत्युसंख्या जास्त वाढेल. व परराष्ट्राच्या व्यापारासंबंधाचे प्रश्न विशेष पुढें येतील. या महिन्यांत वादळी हवा बरीच झालेली पाहण्यास मिळेल. तारीख ९,६,११ व २४ या सुमारास समुद्रामध्यें वादळें होतील व समुद्र फारच खवळलेला आढळेल. साधारणपणानें या महिन्यांत पाऊस बरा आहे तारीख २,७ ते ९, १० ते १२, १३, १४, १५, १६, २२, २४ व २८ या तारखांस पाऊस पडेल. या महिन्यामध्यें वादळानें, विद्युत्पातानें व पावसानें घरांची बरीच दैना उडण्याचा रंग आहे. पुष्कळच घरें जमीनदोस्त होतील. या महिन्यामध्यें आर्यलंडमध्यें बरीच अस्वस्थता भासेल,

जुलै या महिन्याच्या रविचंद्रसंयोगकाळीं मंगळ धनस्थानामध्यें असून शुभ शनीबरोबर शुभ संबंध करीत आहे त्यामुळें व्यापारी घडामोडींस हा महिना उत्तम आहे. व्यापार तेजीमध्यें येईल. कलाकौशल्याच्या धंद्यामध्यें उर्जित अवस्था येईल. तृतीयस्थानद्योतक लेखकवर्ग, वर्तमानपत्रकर्ते वगैरेंस हा महिना चांगला जाईल. नवीन मासिकें अगर वर्तमानपत्रें अस्तित्वांत येतील.

या महिन्यांत २१ व्या तारखेस रविगुरुयुति कर्क राशीच्या २७ अंश १७ कलेमध्यें होईल. ही युति जहाजें नेआण करणाऱ्या धंद्याची उन्नति दर्शवितें. या महिन्यांत पाऊस बराच पडेल व सर्वत्र पडेल. या महिन्यांत समुद्रामध्यें खालील तारखांस वादळें होतील किंवा वादळी हवा झालेली पाहण्यास मिळेल २,३,९,१७,१८,२७ व २८. पावसासंबंधानें पाहतां तारीख २,७ ते ९,१३,१४,१६,१७,२२,२३,२५,२६ व २७ या तारखांस पाऊस पडेल.

आगस्ट तारीख २७ जुलै रोजीं सकाळीं १०।१२ वाजतां रविचंद्रसंयोग होईल त्या वेळीं दशमांत गुरुमंगळ असून एकादशस्थानामध्यें रवि, चंद्र नेपच्युन, बुध, व शनि असे असून पहिले दोन ग्रह नेपच्युन या खलग्रहानें युक्त आहेत व बुध शनीनें युक्त आहे त्यामुळें आगस्टमध्यें निराशाजनक कायदे पास होतील. या महिन्याच्या १२ व्या तारखेस शनि कन्या राशीमध्यें संक्रमण करील व १३ रोजीं हर्शल व शनि प्रतियोग होणार आहे. या प्रतियोगाचा फारच अनिष्ट परिणाम तुर्की राष्ट्रावर होण्याचें चिन्ह दिसत आहे. या २३ तें २६ तारखांपर्यंत यूरोप खंडाच्या पश्चिमेपासून पूर्वेकडील प्रदेशांत काय काय प्रकार घडतात याकडे जगाचे डोळे लागतील. या महिन्यांत मुलांचे मृत्युसंखेचें प्रमाण वाढेल व धार्मिक बाबती किंवा धर्मगुरु यांसंबंधानें कांहीं अनिष्ट प्रकार उघडकीस येतील. या महिन्यांत पाऊस फारच थोडा पडेल असें वाटतें, तारीख २,३,१३ ते १९ २१ ते २३ या तारखांस पाऊस व वादळी हवा होईल.

सप्तेंबर तारीख २९ आगस्ट रोजीं रात्रीं ८।२८ वाजतां रविचंद्रसंयोग होणार आहे. या काळची कुंडली फारच अनिष्ट बसत असल्यामुळें या महिन्यामध्यें सर्व प्रकारची अनिष्ट फलें संभवतात. सर्वच ग्रहांची गर्दी पंचमस्थानामध्यें झालेली आहे. रविचंद्र संयोगकाळीं पुढीलप्रमाणें योग झाले आहेत. शनि ☌ चंद्र; शनि ☌ रवि; शनि ☌ हर्शल; चंद्र ☌ हर्शल; रवि ☌ हर्शल; मगर ☌ गुरु व गुरु ☌ नेपच्युन. या योगांचा परिणाम आगष्टच्या शेवटच्या आठवड्यापासून संबंध सेप्तेंबरपर्यंत पहावयास सांपडेल. रोगराई, सांथीचे आजार, कॉलरा यांचा प्रादुर्भाव होईल. या महिन्याच्या २ व्या ७ व्या ८ व्या व२४ व्या तारखांस इटलीमध्यें बहुशः भुकंप होईल. या महिन्यामध्यें पाऊस साधारण

बरा आहे. तारीख २,१०,११,१३ ते १९,१८,१९,२४,२५,२६,२७,२८ या दिवशीं हवेमध्यें फेरफार होतील पाऊस व वादळी हवा होईल.

आक्टोबर बुधवार तारीख २४ सप्तेंबर रोजीं सकाळीं ९।२५ वाजता रविचंद्रसंयोग होत आहे. दशमांत शनि, बुध, शुक्र येत आहेत त्यामुळें आरंभींचा बराच काळ शांततेचा जाईल. मध्यम वर्गामधील व नोकर लोकांना हा महिना चांगला जाईल. रविचंद्रसंयोगकाळी हर्शलमंगळांचा प्रतियोग तृतीय व नवम स्थानामधून होत आहे त्यामुळें रेलवेसंबंधी अपघात किंवा पोस्ट व रेलवेमध्यें अस्वस्थता पाहण्यास मिळेल. या महिन्याच्या २४ व्या तारखेस कन्या राशीच्या ८ अं. २७ कलेमध्यें शनिमंगळाची युति होईल. कन्या राशीचा अंमल पुणें व नागपूर शहरांवर असल्यामुळें तेथील चांगल्या पुढाऱ्यांचे मृत्यु दर्शवितो. हा काल सदरहु शहरास अनिष्टसूचक आहे. यानें यंदा लंडनमध्यें वादळें, जलप्रलय, इनफ्ल्युएंझा सांथीचा आजार उद्भवण्याची भीति आहे. या योगानें जपानमध्यें भूकंप होईल व तुर्कस्थान व स्वित्झरलंड यांस हा काल फार अनिष्ट दिसतो. या महिन्यांत थोडासा पाऊस आहे. तारीख ४ ५,११,१२,२५ या दिवशीं पाऊस पडण्याचा संभव आहे. ७।८ मोठा सोसाट्याचा वारा वाहील. २३ ते २५ पर्यंत समुद्रामध्यें भयंकर मोठालीं तुफानें व त्यामुळें प्राणहानि होईल.

नोव्हेंबर—रविचंद्रसंयोग तारीख २४ आक्टोबर रोजीं म्हणजे गुरुवारीं रात्रीं १।३४ वाजतां होत आहे. संयोगकाळीं सिंह राशीचा २६ वा अंश लग्नकेंद्री उदय पावत असून गुरुनेपच्युनयुति व्ययस्थानांत येत असून तृतीय स्थानामध्यें वृश्चिक राशीमध्यें असलेल्या बुधाबरोबर केन्द्रयोग होत आहे त्यामुळें फसवेगिरी, भामटेगिरी यांसंबंधानें बराच त्रास होईल. पोस्ट व रेलवे यांस हा महिना अशुभ आहे. धार्मिक हास्पिटले किंवा धर्मादाय संस्था यांसंबंधानें अनिष्ट प्रकारची टीका होऊन कांहीं गुप्त कृत्यें उघडकीस येतील. हा महिना लेखकवर्ग व वृत्तपत्रकार यांस अनिष्ट आहे. अब्रुनुकसानीसंबंधानें एखादा खटला झालेला पहाण्यास मिळेल. लग्नीं शनिमंगळांची युति येत असल्यामुळें देशांतील आरोग्य खात्रीनें बिघडेल, मलेरिआचा उपद्रव व संग्रहणीचा उपद्रव या महिन्याच्या १९ तारखेपर्यंत खात्रीनें होईल. व नोव्हें-

वर महिन्याच्या शेवटीं एखादा रेलवेवर मोठा अपघात होईल. या महिन्याच्या ४,१०,१९ व २२ ह्या तारखा फारच महत्त्वाच्या आहेत. युरोपामध्यें याच तारखांस भूकंप होईल.

डिसेंबर—तारीख २२ नोव्हेंबर शनिवार रोजीं रात्रीं ८।११ वाजतां रविचंद्रसंयोग होत आहे. संयोगकाळीं कर्क राशीचा ११ अंश लग्न केन्द्रीं उदय पावत आहे. चतुर्थामध्यें तुला राशीचा शुक्र आहे. धनस्थानामध्यें गुरुनेपच्युन येत आहेत व तृतीयस्थानामध्यें शनिमंगळ बसत आहेत. एकंदर विचार करितां हा महिना सांपत्तिक सुखास, उद्योगधंद्यास व देशांतील आरोग्यास चांगला आहे. तृतीयांतील शनिमंगळ हे अशुभ आहेत. एखादा रेलवेंत अपघात नोव्हेंबरच्या शेवटीं त्याचप्रमाणें याही महिन्यांत होईल. तृतीयस्थानाचा अधिपति बुध हा षष्ठस्थानामध्य व आहे वक्री तृतीयांत शनि २४ तारखेच्या सुमारास स्तंभी होणार आहे त्यामुळें त्याच सुमाराचा काळ लेखकवर्ग व वृत्तपत्रकार यांस अनिष्ट जाईल. एखादा चांगला लेखक मृत्यु पावेल किंवा एखादें मासिक किंवा वृत्तपत्र बंद पडेल. या महिन्याच्या ३,४,६,७,१८, २०,२१,२४ या तारखा देशहितदृष्टीनें अनिष्ट जातील.

असो; येथपर्यंत यथामती सन १९१९ सालाच्या भावी सुखदुःखासंबंधानें खुलासेवार विवेचन अनुभव पहाण्याकरितां केलें आहे. अनुभवाप्रमाणें पुढील सालीं जास्त सुधारणा करण्यांत येईल. आतां आपण सन १९१९ साल व्यक्तिशः कसें जाईल या विभागाकडे वळूं.

सन १९१९ साल व्यक्तिशः कसें जाईल.

मागें वर्णन केलेल्या ग्रहस्थितीवरून सन १९१९ हें साल देशास कसें जाईल याची प्रत्येकास साधारण बरीच कल्पना होईल. परंतु चालू वर्ष व्यक्तिशः आपणास कसें जाईल याचा बोध मागील वर्णनावरून होईल असें वाटत नाहीं. ही इच्छा थोड्याबहुत अंशानें पूर्ण करण्याच्या हेतूनें चालू अंकांत व्यक्तिशः वर्ष कसें जाईल याचा स्थूल मानानें प्रयत्न करण्याचें

योजिलें आहे. हा प्रयत्न किती कठीण आहे याची कल्पना अनुभवाखेरीज कळणार नाहीं. जन्मकालीं **सायन रवि** ज्या राशीच्या अंशामध्यें असेल तो जेव्हां चालू वर्षीं त्याच राशीच्या त्याच अंशाध्यें ज्या तारखेस येईल त्या दिवशीं असलेल्या रविचंद्रादि ग्रहांच्या दृष्टियोगानुरूप खालील फलादेशाची कल्पना कली आहे. हा प्रयत्न फारच कनिष्ठ आहे, हें आम्हांसही कबुल आहे. परंतु यापेक्षां सुलभ व शास्त्रीय दुसरा मार्गच उपलब्ध नसल्यामुळें आम्हांस याच मार्गाचा अनुवाद करावा लागत आहे.

जन्मकालचा **सायन स्पष्ट** सूर्य सन १९१९ सालच्या दैनिक स्पष्ट ग्रहाचे पुस्तकामध्यें ज्या महिन्याचे ज्या तारखेस होईल ती वर्षप्रवेशाची तारीख जाणावी व त्यावरून फलादेश पहावा.

जानेवारी—ज्यांचे वर्षप्रवेश (ताजीकप्रमाणें) तारीख ६,१९ व १९ या दिवशीं होतील त्यांस हें वर्ष उत्तम जाईल. तारीख २,९ व १९ या दिवशीं लेखक, शिक्षक, वकील, अकॉउन्टट व व्यापारी यांचे वर्षप्रवेश झाल्यास त्यांस हें वर्ष चांगलें जाईल. तारीख ७,१२ व २८ या दिवशीं कारागीर लोक, गायनवादन यावर उपजीविका करणारे लोक व कापडाचे व्यापारी यांचे वर्षप्रवेश झाल्यास त्यांस ह वर्ष उत्तम जाईल. तारीख ९,१३ व २८ या दिवशीं डाक्तर, सरजन, इंजीनिअर, लोखंडाचे काम करणारे किंवा लोखंडाचा व्यापार करणारे व शिपाई यांचे वर्षप्रवेश झाल्यास त्यांस हें वर्ष चांगलें जाईल. ज्यांचे जन्म सन १८५९ किंवा १८६७ सालामध्यें जुलई महिन्याच्या आरंभीं झाले असतील त्यांस हें वर्ष फारच सुखकारक व बढतीचें जाईल. परंतु त्यांचे जन्म १८६० किंवा १८६७ च्या फेब्रुवारीच्या १९ व्या किंवा आगस्टच्या १९ व्या तारखेस झालेले असतील त्यांस हें वर्ष व्यापार, शरीरसुख या दृष्टीनें फारच अनिष्ट जाईल. त्यातल्यांत चालू वर्षाचा हिवाळा फारच अनिष्ट जाईल.

फेब्रुवारी—५ व्या, ७ व्या, ११ व्या, २० व्या, २१ व्या, २५ व्या, व २७ व्या तारखांस औषधें विकणारे, डाक्तर, सरजन, लोखंडाचे व्यापारी,

शिपाई व लोखंडाचे काम करणारे या लोकांचे वर्षप्रवेश झाल्यास त्यांस चालू वर्ष चांगलें जाईल. तारीख २,५,११,२० व २९ या दिवशीं सार्वजनिक बाबतींत पुढारीपणानें वाद करणारे लोक, विद्यार्थी, लोकरीचे व्यापारी, व न्यायाधीश यांचे वर्षप्रवेश झाल्यास त्यांस हें वर्ष फारच उत्तम जाईल. ज्या ग्रंथकार, लेखक, शिक्षक, आकान्टट्स, शिंपी व यंत्रज्ञ किंवा कारागीर यांचे वर्षप्रवेश चालू महिन्याच्या ४,९,१९,२४ व २५ तारखांस होतील त्यांस हें वर्ष बरें जाईल. तरुण स्त्रीया, कारागीर लोक, गायनवादन करणारे लोक, तागाचे कापडाचे व्यापारी यांचे वर्षप्रवेश चालू महिन्याच्या २ ऱ्या, ६ व्या, ११ व्या, २२ व्या व २७ व्या तारखांस झाल्यास त्यांस हें वर्ष सुखकारक जाईल. खाणीचे काम करणारे, घरें बांधणारे, शेतकरी, बागाईत करणारे, घर व जमीनजुमला यांचे व्यवहार करणारे लोक यांचे वर्षप्रवेश चालू वर्षात ६ व्या, १९ व्या, २४ व्या तारखांस झाल्यास त्यांस हें वर्ष शुभ जाईल. ज्यांचे जन्म १८५८,५९,६०,६७,६८,७०,७६,८०,८५, ८६,८९,९० किंवा ९५ सालामध्यें झाले असून त्यांचे वर्षप्रवेश तारीख १४,१६ व१७ या दिवशीं होत असतील तर त्यांस चालू वर्ष सांपत्तिक व शारीरिक सुखाच्या दृष्टीनें अति वाईट जाईल.

मार्च—या महिन्यांत वर्षप्रवेशास शुभ असे फारच थोडे दिवस आहेत. साधारणपणें ४,१०,१३,२०,२४, व २९ ह्या तारखा वर्षप्रवेशास शुभ आहेत. ज्यांचे जन्म कोणत्याही वर्षाच्या जून महिन्याच्या २८ व्या तारखेस सूर्योदयी किंवा माध्यान्हीं झाले असतील त्यांस किंवा ज्यांचे जन्मकाळीं चंद्र कर्क राशीच्या ५ ते ७ अंशांत असेल त्यांस या महिन्याचे आरंभीचे दिवस लाभकारक जातील. स्वतंत्र धंदे करणाऱ्या लोकांचे वर्षप्रवेश या महिन्याच्या २ ऱ्या, ४ थ्या, ७ व्या, १२ व्या, १५ व्या, २० व्या, २२ व्या किंवा २९ व्या तारखांस झाल्यास त्यांस हें वर्ष साधारण बरें जाईल. ज्यांचे वर्षप्रवेश या महिन्याच्या ११ व्या, १४ व्या, व १७ व्या तारखेस होतील त्यांस चालू वर्षीं व्यापारउद्योगधंद्यांमध्यें तोटा होईल. शिपाई, डाक्तर, इंजीनियर वगैरे लोक ज्यांचे वर्षप्रवेश या महिन्याच्या ६ व्या, ७ व्या, ११ व्या, १२ व्या, २२ व्या, २३ व्या, २७ व्या, २८ व्या, व ३० व्या तारखांस होतील त्यांस चालू वर्षाचे वसंतऋतुमध्यें लाभ होईल, धंदा रोजगार चांगला चालेल.

एप्रिल—तारीख ५,६,९,११,१६,२०,२१,२५ व २६ या तारखांस शिपाई, डाक्तर, सरजन, इंजीनिअर, सार्वजनिक पुढारी यांचे वर्षप्रवेश झाल्यास त्यांना चालू वर्षात अनेक प्रकारचे फायदे होऊन त्यांची प्रगति होईल. प्रत्येक गोष्टींत त्यांना यश मिळेल. ज्या ग्रंथकार, संपादक, आकाउन्टटस, मास्तर, शिक्षक, व कारागीर लोकांचे वर्षप्रवेश चालू महिन्याच्या ५,६,९,१९,२४,२७, व २८ तारखांस होतील त्यांस हें १९१९ साल महत्त्वाचें जाईल. शेतकरी, खाणीचे काम करणारे, घरें बांधणारे, किंवा कोळशाचे व्यापारी यांचे वर्षप्रवेश या महिन्याच्या १,५,१२,२०, व २९ या तारखांस होतील तर त्यांस हें वर्ष चांगलें जाईल. उपाध्ये, व्याजबट्टा करणारे, सावकारीचा धंदा करणारे, वाणी, कापडाचे व्यापारी यांचे वर्षप्रवेश २,६,११,१६,२५,२६ व २९ या तारखांस झाल्यास त्यांस चालू वर्षात फायदा होईल. २,६,१२,२०,२५,२८, या तारखांस गायनवादन यावर उपजीविका करणारे, नट, नटी, तरुण स्त्रिया, कलाकौशल्याचीं कामें करणारे लोकांचे वर्षप्रवेश झाले असतां वर्ष शुभ जाईल. या महिन्याचे २४ तारखेस शनि स्तंभी होणार आहे त्यामुळें ज्यांचे जन्म कोणत्याहीं वर्षाचे आगस्टच्या १५ व्या तारखेस किंवा फेब्रुवारीच्या ११ व्या तारखेस झाले असतील त्यांना हा काळ जरा कठीण आहे म्हणून जपून वागावें, प्रकृतीची नीट काळजी घ्यावी व कोणत्याही धाडसाच्या कृत्यामध्यें उडी घेऊं नये.

मे महिन्याच्या २,४,२०,२४, ते २६ तारखांपर्यंत ज्यांचे वर्षप्रवेश होतील त्यांस हें साल फारच शुभ व फायदेशीर जाईल. त्यांतलेत्यांत धंदेवाले लोक, गायनवादन करणारे लोक, लोकरीच्या कापडाचा व्यापार करणारे लोक, न्यायाधीश, सावकारीचा धंदा किंवा पेढीचा धंदा करणारे लोक यांस

तर विशेषच शुभ जाईल. २,४,९,२०,२४, व २५ या तारखांस शिपाई, सरजन, डाक्तर, इंजीनिअर यांचे वर्षप्रवेश झाल्यास वर्ष ठीक जाईल. परंतु त्यांतल्यात्यांत ९ वी व २९ वी तारीख ही वर्षप्रवेशास चांगली नाहीं. ज्या कारकून, शिक्षक, मासिककार किंवा वृत्तपत्रकार व अकाउंटटस् यांचे वर्षप्रवेश चालू महिन्याच्या २,७,१८, किंवा २४ तारखांस होतील त्यांस हें वर्ष बरें जाईल. या महिन्याच्या ९,१३,२३ व २९ तारखांस होतील त्यांस चालू वर्षी तोटे व अपघात होण्याची भीति आहे.

जून महिन्यांतील १,२,६,७,१९,२७, व २८ या तारखांस ज्यांचे वर्षप्रवेश होतील त्यांस हें वर्ष उत्तम जाईल. खालील दिवशीं डाक्तर, सरजन, स्वतंत्र धंदा करणारे लोक, शिपाई, व्यापारी यांचे वर्षप्रवेश १,२,६, ८,१८,२७, किंवा २९ या तारखांस होईल तर त्यांस मानसन्मान मिळेल व चालू वर्ष सुखकर जाईल. ज्यांचे जन्मकाळीं कर्क राशीच्या दुसऱ्या किंवा तिसऱ्या द्रेष्काणामध्यें **चंद्र** किंवा दशम असेल त्यांस चालू महिन्यांतील त्यांचे वरून होणाऱ्या गुरु व शुक्राचे गोचरभ्रमणानें फायदा होईल. शेतकरी, शेताचे काम करणारें, मळेवाले, बागाईत करणारे, खाणींत काम करणारे, घरें बांधणारे, कॉन्ट्राक्टरस वगैरे लोकांचे चालू वर्षांत वर्षप्रवेश ८,१३, १९,२३,२७, व २८ या तारखांस झाल्यास त्यांस हें वर्ष बरें जाईल चालू महिन्यांत ज्या ग्रंथकारांचे, लेखकांचे, एडिटर लोकांचे, शिक्षकांचे, कलाकौशल्याचीं कामें करणारांचे, शोधकांचे, शास्त्रज्ञांचे वर्षप्रवेश २,७,९,११, १४,१९२४,२७ व २९ या तारखांस होतील त्यांस चालू वर्ष शुभ जाईल.

जुलई महिन्यांतील १८ ते १४ तारखांपर्यंत ज्यांचे वर्षप्रवेश होतील त्यांस हें वर्ष फारच उत्तम जाईल. त्यातलेत्यांत ज्यांचे जन्म १८६०,६२, ६४,७२,७६,८१,८३,८४,८८,९२,९३,९९ किंवा ९६ खालीं सूर्योदयीं किंवा बारा वाजण्याचे सुमारास झालेले असतील त्यांस हें वर्ष फारच श्रेष्ठ तऱ्हेचें जाईल. स्वतंत्र धंदेवाले लोक, नट, कारागीर, गायन-

वादन करणारे गवये लोक, तागाच्या कापडाचा व्यापार करणारे लोक यांचे ६,१०,१८,२१,२६,३० व ३१ या तारखांस वर्षप्रवेश झाल्यास त्यांना वर्ष उत्तम जाईल. सरजन, शिपाई, इंजीनिअर, लोखंडाचे काम करणारे, किंवा लोखंडाचा व्यापार करणारे लोकांचे वर्षप्रवेश २,६,१८,२१,२६ व ३० या तारखांस झाल्यास त्यांस वर्ष चांगलें जाईल. वकील, विद्यार्थी, लोकरीचे व्यापारी, वाणी, खाणींत काम करणारे, घरें बांधणारे वगैरे लोकांचे वर्षप्रवेश ३,८,१८,२४, व ३१ या तारखांस झाल्यास त्यांस चाल वर्ष चांगलें दिसतें.

आगस्ट महिन्यांतील ४,६,७,१६,२०, व ३० तारखांस सोनार, सार्वजनिक कामें करणारी माणसें, स्वतंत्र धंदा रोजगार करणारीं माणसें, कासार काम करणारीं माणसें यांचे वर्षप्रवेश झाल्यास त्यांस चाल वर्ष चांगलें जाईल. ४,१४,१८,२७, व २८ या तारखांस गायनवादन करणारे, नाटकांचा धंदा करणारे, नट, कापडाचा धंदा करणारे यांचे वर्षप्रवेश झाल्यास त्यांस हें वर्ष चांगलें जाईल. ४,६,१४,२०,२३, व २८ या तारखांस ज्या शिपाई, खलासी, सरजन, डाक्तर यांचे वर्षप्रवेश होतील त्यांस चालू वर्षी मान मिळेल, ९,१४,२८, व २९ या तारखांस शाळामास्तर, लोकरीचे व्यापारी, यांचे वर्षप्रवेश झाल्यास त्यांस हें वर्ष सुखकारक जाईल. २,७, १६, व ३० या तारखांस शेतकरी, बागवान, मळेवाले, विटांचा धंदा करणारे, घरें बांधणारे, कॉन्ट्राक्टास, रंगाचें काम करणारे यांचे वर्षप्रवेश झाल्यास त्यांस चालू वर्ष चांगलें जाईल. परंतु ज्यांचे वर्षप्रवेश तारीख ३, २१,२३, किंवा २५ आगस्ट रोजीं होतील त्यांची शरीरप्रकृती चांगली राहणार नाहीं; सांपत्तिक अडचण येईल किंवा तोटा होईल.

सतेंबर डाक्तर, सरजन, पोलीसमधील अधिकारी, शिपाई वगैरे ज्यांचे जन्म १८५९,६०,६४,६९,७६,८१,८८, किंवा ८९ सालामध्यें तारीख २ सतेंबर रोजीं मध्यान्ही किंवा सूर्योदयाचे सुमारास झाले असतील त्यांस या वर्षी याच तारखेस होणाऱ्या गुरुसंगळाचे युतीपासून चांगला

फायदा होईल. त्यांस हें वर्ष चांगलें जाईल. या महिन्याच्या १३,१४,१८, २९ व २६ तारखांस ज्यांचे वर्षप्रवेश होतील त्यांस हें वर्ष यश, मान-सन्मान लाभ या दृष्टीनें फारच उत्तम जाईल; ९,११,१४,२३ व २४ या तारखा वर्षप्रवेशास शुभ आहेत. त्यांतलेत्यांत सार्वजनिक काम करणारे, सोन्याचा धंदा करणारे, सोनार, पेढीचा धंदा करणारे, गहाणवटाचा किंवा सावकारीचा धंदा करणारे, यांस फारच उत्तम आहेत. ज्या ग्रंथकाराचे, संपादकाचे, अकॉउन्टंटस, वकील, ब्यारीस्टर, अटरनी, शिक्षक यांचे वर्षप्रवेश या महिन्याचे ३,१३,१८,२३ व २९ तारखांस होतील त्यांस हें वर्ष सुखकारक जाईल. शेतकरी, मळेवाले, बागवाले, घरें वगैरे बांधणारे-बांधकाम करणारे, रंगकाम करणारे यांचे वर्षप्रवेश ४,१३,१७ व २७ या तारखांस झाल्यास त्यांस हें वर्ष चांगलें जाईल. शोधक, विद्यार्थी, शास्त्रीयविषयाचा व्यासंग करणारे लोक यांचा वर्षप्रवेश या महिन्याच्या ३,४,१३,१७,२३,२७ व २९ तारखांस झाला तर त्यांस हें वर्ष उत्तम जाईल. या महिन्याच्या ८,११ व २० तारखांस ज्यांचे वर्षप्रवेश होतील त्यांस शरीरप्रकृतीच्या दृष्टीनें हें वर्ष बाईट असून अपघात होण्याची भीति आहे.

ऑक्टोबर सप्तेंबर १ ली किंवा फेब्रुवारी २७ व्या तारखेच्या सुमारास ज्यांचे जन्म झाले असतील त्यांस चालू महिन्याच्या २० व्या तारखेस होणाऱ्या शनिमंगळांच्या युतिमुळें फारच त्रास होईल, अनेक संकटें येतील. त्याचप्रमाणें जन्मकाळीं ज्यांचें लग्न, रवि, चंद्र किंवा दशमस्थान कन्या किंवा मीन राशीच्या ९ अंशांत असेल त्यांसही अनिष्ट फळें प्राप्त होतील.

या महिन्याच्या १,४,७,१४,१७,२०,२९ व ३० या तारखांस ज्यांचे वर्षप्रवेश होतील त्यांस वर्ष चांगलें जाईल. लोखंडाचे व्यापारी, सरजन, डाक्तर, शिपाई वगैरे लोकांचे वर्षप्रवेश १,१०,१४,१७, व २९ या तारखांस झाल्यास त्यांस वर्ष लाभकारक जाईल. ज्या लेखक, संपादक, वकील, बॅरिस्टर, अटरनीज, सावकार, शिल्पशास्त्रज्ञ यांचे वर्षप्रवेश या महिन्याच्या ५,१४,१५,२१, २५ किंवा ३१ या तारखांस झाल्यास त्यांस या वर्षांत लाभ होईल. ३,९,१३, १७,२२ व ३१ या तारखांस सावकार, पेढीवाले, विद्यार्थी, लोकरीचे व्यापारी

यांचे वर्षप्रवेश झाल्यास त्यांस येत्या वर्षांत लाभ होतील. २,११,१९, व २९ या तारखांस खाणींत काम करणारे, घरें बांधणारे, शेती करणारे, मळेवाले, भाजीवाले यांचे वर्षप्रवेश झाल्यास त्यांस वर्ष सुखकारक जाईल.

नोव्हेंबर-ऑगस्ट महिन्याच्या ८ ते २१ तारखांपर्यंत ज्यांचे जन्म सूर्योदयीं किंवा बारा वाजल्याचे सुमारास झाले असतील त्यांस या महिन्यांतील गुरूचे गोचरभ्रमणापासून चांगला फायदा होईल. त्यातलेत्यांत ज्यांचे जन्म वरील आगस्टाच्या ८ ते ११ तारखांच्या सुमारास इसवी सन १८९८,९३,९५,९८, ७२,७७,८०,८४,९६ किंवा ९९ या सालांमध्यें झाले असतील त्यांस तर विशेष लाभ होईल. या महिन्याच्या २,७,१४,२१, व २६ या दिवशीं शेतकरी, बागाईत करणारे, घरवाले, इष्टेटवाले, बांधकाम करणारे, रंगाची कामें करणारे, जमिनीसंबंधानें देखरेख, बांधकाम, कंट्राक्ट घेणारे यांचे वर्षप्रवेश झाल्यास त्यांस वर्ष चांगलें जाईल, धंदारोजगारामध्यें फायदा होईल. ६,८,१०, १४,१९,२१,२४ व २७ या दिवशीं वकील, बरीस्टर, विद्यार्थी, कापडाचे व्यापारी, वाणी, उदमी, उपाध्ये यांचे वर्षप्रवेश झाल्यास त्यांस वर्ष शुभ जाईल. ९,८,१३.१४,१८,१९,२१,२४,२६ ते २९ या तारखांस संपादक, लेखक, कारागीर, शिल्पज्ञ, गायनाचा धंदा करणारे, शिक्षक, कापडाचे व्यापारी, शिंपी किंवा कलाकौशल्यतेची कामें करणारे यांचे वर्षप्रवेश झाल्यास यांस वर्ष सुखकारक जाईल. ८,१२,१४,२२,२७ व २८ या दिवशीं शिपाई, खलाशी, कमीस्ट, रसायन शास्त्रज्ञ, औषध विकणारे, डाक्तर, सरजन, आचारी, लोखंडाचे व्यापारी किंवा त्यासंबंधानें धंदा करणारे, शस्त्रें करणारे लोक यांचे वर्षप्रवेश झाल्यास त्यांस हें वर्ष चांगलें जाईल. ९,६,१०,१४,१९,२१,२२,२४, २६ व २७ या दिवशीं शास्त्रज्ञ, शोधक, कल्पक, विद्युतशास्त्रज्ञ किंवा त्यासंबंधानें काम करणारे व ज्योतिषी या लोकांचे वर्षप्रवेश झाल्यास त्यांस वर्ष चांगलें जाईल. ज्या लोकांचे जन्म १७ फेब्रुवारी व ४ सप्तेंबर रोजीं झाले असतील त्यांनीं आपल्या धंद्यारोजगाराकरितां या महिन्यांत फार सावध रहावें.

डिसेंबर महिन्याच्या ९,७,११,२१ व ३० या दिवशीं ज्या वकील, वैद्य, विद्यार्थी, लोकरीचे व्यापारी, वाणी यांचे वर्षप्रवेश होतील त्यांस वर्ष चांगलें जाईल. ११,१६,२२ व २७ ह्या दिवशीं संस्थानामधील कारभारी, मोठमोठ सरकारी नोकर, सरदार, सोन्याचा धंदा करणारे, तांब्याचा व्यापार करणारे

यांचे वर्षप्रवेश झाल्यास त्यांस वर्ष फारच उत्तम जाईल व अनेक लाभ होतील. १०,१६,१८,२०,२५,२९ व ३१ या दिवशीं शिक्षक, कारकूनवर्ग, अकाउन्टट, नट, गायनाचा धंदा करणारे, खोदकाम करणारे कारागीर, तागाचे व्यापारी, तत्त्ववेत्ते यांचे वरील तारखांस वर्षप्रवेश झाल्यास त्यांस वर्ष शुभ जाईल, सर्व प्रकारानें पुढें पाऊस पडेल. ६,१०,११,२०,२२, २६ व २८ या दिवशीं डाक्तर, खलाशी, शिपार्यी, आचारी, लोखंडाचे व्यापारी यांचे वर्षप्रवेश झाल्यास त्यांस धंदारोजगारामध्यें वर्ष चांगलें जाईल. ८,९,१८ व २३ या तारखांस शेतकरी किंवा जमीनजुमल्यासंबंधानें सर्व प्रकारचे व्यवहार करणारे या लोकांचे वर्षप्रवेश झाल्यास त्यांस वर्ष चांगलें जाईल. ८,११,१७,२०, २१,२२ व ३० या दिवशीं लेखकवर्ग, शोध करणारे, ग्रंथकार, विद्युतसंबंधान काम करणारे, शास्त्रज्ञ यांचे वर्षप्रवेश झाले असतां त्यांस वर्ष चांगलें जाईल. इसवीसन १८६१,६९,७७,८३ व ९० या सालामधील ज्यांचे जन्म सप्तेंबरच्या ४ थ्या तारखेस झाले असतील त्यांस चालू महिन्यांतील शनीच्या भ्रमणानें संकटें व आजार प्राप्त होतील. त्याचप्रमाणें या महिन्याच्या १,४,१३ व २८ या तारखांस ज्यांचा वर्षप्रवेश होईल त्यांनीं फार सावध रहावें.

॥ इति शम् ॥

—o—

ज्योतिषशास्त्रावरील खालील पुस्तकें ज्योतिर्माला ऑफिसमध्यें विक्रीस ठेविलीं आहेत.

(१) **बालबोध ज्योतिष**—फलज्योतिषशास्त्राच्या मूलतत्त्वांचा सोप्या व सरळ रीतीनें उहापोह या पुस्तकांत केला आहे. फलज्योतिषशास्त्र शिकूं इच्छिणाऱ्या नवीन होतकरू विद्यार्थ्यांस फारच उपयुक्त किं. ०६ आणे.

(२) **विवाहप्रदीप**—यांत वधूवर पत्रिकांचा शास्त्रीय दृष्टीनें कसा विचार करावा यासंबंधानें फारच विस्तृत माहिती दिली आहे. किं. ०८ आणे.

(३) **मेदनीय** किंवा **राष्ट्रीय ज्योतिष**—राष्ट्राची शुभाशुभ फलें पहाण्यास यासारखा आज मराठी भाषेमध्यें दुसरा ग्रंथच उपलब्ध नाहीं. किं. ०१२ आणे.

म्यानेजर, ज्योतिर्माला ऑफीस, दादर मुंबई नं. १४

॥ श्रीसद्गुरवे नमः ॥

ज्योतिर्माला

आप्राचः कामरूपाद्दुहिणसुतनदप्लावितादाप्रतीचो
गान्धारात् सिंधुसार्द्रादधुवररचितादाचसेतोरवाचः ।
आकेदारादुदीचस्तुहिनगहनतः सन्तिविद्वत्समाजा
ये ये तानेष यत्नः सुखयतु समजान्कश्चमत्कर्तुमीष्टे ॥ १ ॥

अभिनवाऽऽवृत्ति वर्ष ४ थें. | फेब्रुवारी १९१९. | अंक ११ वा.

अभिनंदनीय प्रयत्न.

फलूज येथें 'सायन ज्योतिर्मंदीर' नांवाची संस्था निघाली असल्याचें त्या संस्थेच्या व्यवस्थापकांकडून लिहून आलें आहे. या संस्थेनें ज्योतिषशास्त्रासंबंधानें व्याख्यानें करविण्याचा उपक्रम केला असून पहिलें व्याख्यान सारांशरूपानें ज्योतिर्मालेंत प्रसिद्ध करण्याच्या उद्देशानें पाठविलें आहे. त्यांतील मुद्याचा भाग प्रस्तुत चालू अंकांत प्रसिद्ध केला जात आहे. ज्योतिषशास्त्राच्या प्रगतीस असल्या संस्था व त्यांचे सामुदायिक प्रयत्न यांची अत्यंत जरूरी आहे. याबद्दल मतभेद होणार नाहीं. मुंबई, पुणें इत्यादि ठिकाणीं ज्योतिषांच्या संस्था आहेत त्याप्रमाणेंच इतरत्रही संस्था निघाल्यात व शास्त्रप्रसाराचें काम अप्रतिबंध चालावें असें ज्योतिषशास्त्रावर प्रेम कर-

णाऱ्या प्रत्येक व्यक्तीस वाटल्यावांचून रहाणार नाहीं. व या दृष्टीनें आम्हीं अकलूजकरांचें मनापासून अभिनंदन करितों.

महाराष्ट्रांत सायनमताची प्रगति शनैः शनैः होत आहे हें अकलूज येथील संस्थेच्या नांवावरून सहज व्यक्त होत आहे. सायनमताचा ओघ "हं करेसो पंचांग" अशा अहंमन्यांना व त्यांच्या स्तुतिपाठावर पोसल्या जाणाऱ्या पंडितमन्यांना सारून पुढेंच जाणार याचें प्रत्यंतर ह्या संस्थेनें आणिल्यावरून तिचें अभिनंदन सर्व सायनवादी करतील यांत शंका नाहीं. ह्या संस्थेच्या हातून उत्तम शास्त्रसेवा होईल अशी आम्हांस आशा आहे.

"सायन ज्योतिर्मंदीर" संस्थेचे अध्यक्ष रा. रा. डी. एम. मायदेव बी. ए. एल्एल्. बी. व्यवस्थापक रा. रा. वि. पं. अग्निहोत्री व अध्यापक रा. रा. रा. मु. मोहोळकर हे आहेत.

सायन ज्योतिर्मंदिराच्या अध्यक्षांच्या व्याख्यानाचा गोषवारा पुढें दिल्याप्रमाणें आहे. व्याख्यानाचा विषय लक्ष्यांत येण्यासाठीं नोव्हेंबरच्या व डिसेंबर १९१७ च्या अंकांतील **"ज्योतिर्विद्या"** नामक रा. रा. **राम नारायण** यांचा लेख अवश्य पहावा.

लोकोत्तर ज्योतिषी.

अकलूज तारीख १३-१-१९१९.

"ज्योतिषशास्त्र अवगत होण्यास चंद्र, बुध, व शुक्र यांच्याशी हर्शलचा शुभयोग असल्यास तें अवगत होतें, हें निर्विवाद आहे. व याबद्दल, "ज्योतिर्मालेचे" प्रसिद्ध लेखक, **श्रीयुत राम नारायण** आणि "योगमाला"कार यांनीं, विवेचन केलेंच आहे. "ज्योतिर्मालेंतील" प्रसिद्ध लेखक श्री. **राम नारायण** यानीं ज्ञानदाता 'गुरु' मुळींच विचारांत घेतलेला नाहीं. "योगमाला"कार तो विचारांत घेतात. गुरु-हर्शलचा "त्रिकोणयोग" वे. मू. अण्णा भट्टजी जेरे या लोकोत्तर ज्योतिर्विदांना आहे. तसेंच, श्रीयुत ना. स. मराठे (सायनस्पष्टग्रहांचे कर्ते) यांच्या कुंडलींत, कुंभ राशींत गुरु असून

त्याचा नेपच्युनशीं "त्रिकोणयोग" होत आहे; आणि "ज्योतिर्मालेचे" प्रत्यक्ष "संपादक" यांच्या कुंडलींत गुरु हर्शल युतींत असून त्यांनीं नेपच्युनशीं "त्रिकोणयोग" केला आहे. यांवरून लोकोत्तर ज्योतिषी होण्यास, गुरूचे नेपच्युन व हर्शल यांशीं होणारे योग कारणीभूत होतात, असें, स्पष्ट दिसतें.

"योगमाला"कार, नेपच्युन मुळींच विचारांत घेत नाहींत; पण ज्योतिषविद्येला अंतःस्फूर्तीची अत्यंत जरूरी आहे,' असें आपल्या पहिल्या पुस्तकांत ते प्रतिपादन करतात. तर अंतःस्फूर्तीचा कारक ग्रह जो नेपच्युन त्याचा विचार कां न करावा ? लोकोत्तर ज्योतिर्विदांच्या कुंडल्यांत, चंद्र, बुध, शुक्र आणि गुरु यांच्याशीं हर्शलचे योग झाले असून शिवाय त्यांना अंतःस्फूर्तीची जोड असली पाहिजे म्हणून, नेपच्युनचेही त्या ग्रहांबरोबर शुभयोग झालेले आहेत. उदाहरणार्थ:—"कुंडलीविज्ञानचे संपादक" राजश्री वि. गो. नवाथे यांच्या कुंडलींत शुक्राजवळ तर हर्शल आहेच व गुरूही नेपच्युनशीं युति करण्यास जात आहे, व नेपच्युनशीं बुधाचा "द्विराश्यंतर" शुभ दृष्टियोग आहे. तसेंच श्रीयुत प्रधान व श्रीयुत मराठे यांच्या कुंडलींतही सदर ग्रहांशीं योग असल्याबद्दल मागें विवेचन केलेलेंच आहे.

"ज्योतिर्मालेचे" प्रसिद्ध लेखक श्री. राम नारायण हे नेपच्युनचा थोडाबहुत विचार करतात. नेपच्युनशीं चंद्र, बुध, शुक्र यांनीं केलेले योग स्वतंत्रपणें ज्योतिषशास्त्राकडे प्रवृत्ती करतील असें मानण्यास कांहीं आधार नाहीं" असें म्हणतात. परंतु हर्शलनें ज्योतिषशास्त्राकडे वळविल्यानंतर हे नेपच्युनप्रधानलोक किती कल्पनातीत कामें करतात हें पाहण्यासाठीं आपण "परिभ्रमण" पद्धतीचे संशोधक कै. जीवनराव चिटणीस या लोकोत्तर ज्योतिर्विदांची कुंडली पाहूं. या कुंडलींत नवमस्थानांत मीनेचा अत्यंत बलवान असा नेपच्युन असून त्याशीं गुरु शुभयोग करण्यास जात आहे. नवमांतील नेपच्युनमुळें ज्योतिषशास्त्रांतील त्यांचे सर्व शोध स्वप्नसृष्टींतून निर्माण झाले आहेत. व कालनिर्णयाची "परिभ्रमणपद्धती" ही त्यांनींच शोधन काढून

ज्योतिषशास्त्राची वाढच केली आहे. परिभ्रमणपद्धतीची उपपत्ती फारशी लागत नसून समाधानकारक नाहीं. पण तिच्यामुळें **कालनिर्णय बराच चांगला करतां येतो; असें आपणां सर्वांच्या अनुभवास आलें आहे.** उपपत्तीसिद्ध गोष्टी कल्पनेनें सांगणें, हें हर्शलचें काम आहे. आणि उपपत्ती न सांगतां कल्पनेच्याही पलीकडचें काम निव्वळ स्फूर्तीनें करणें, हें नपच्युनचें लक्षण आहे. यावरून परिभ्रमणपद्धतीचा शोध नेपच्युनप्रधान ज्योतिर्विदांनीं लावला हें बरोबरच आहे. "दिनवर्षपद्धती"चा संशोधक कोण ? हें मला माहीत नाहीं; पण असाच कोणी तरी लोकोत्तर नेपच्युनवाला असावा असें वाटतें. यांवरून, चंद्र, बुध, शुक्र आणि गुरु यांच्याशीं हर्शल नेपच्युनचे योग झाले असतां ते ज्योतिषशास्त्राची वाढ फारच मोठी करतात असें दिसतें."

—o—

दिनवर्षपद्धति व लो. टिळकांची कुंडली.

(लेखक—भाऊराव परशराम खोपकर)

ज्योतिर्मालेच्या गेल्या डिसेंबरच्या अंकामध्यें रा. आपटे यांनीं दिनवर्षपद्धतीचा "सत्यता" एक सुप्रसिद्ध उदाहरण घेऊन प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला आहे. हा प्रयत्न पाहून कांहीं विचार सुचले आहेत ते आपणाकडे प्रसिद्धीकरितां पाठवीत आहें. त्यांना आपल्या मालेच्या अंकामध्यें स्थळ मिळेल अशी आशा आहे.

रा. आपटे यांचा प्रयत्न खरोखरच स्तुत्य आहे. थोडक्यांत दिनवर्षपद्धतीची माहिती देऊन लोकमान्यांच्या कुंडलीवरून मागील झालेल्या व पुढें होणाऱ्या गोष्टींचें दिग्दर्शन करून पद्धति विषयीं सत्यता पटविण्याचें काम समाधानकारक झालें आहे, यांत शंका नाहीं. मात्र लेख कांहींसा घाईनें व वर वर विचार करून लिहिला गेला असावा व त्यामुळें विवेचनामध्यें दोष

राहून गेले आहेत असें वाटतें. प्रस्तुत लेखामध्यें पद्धतीसंबंधानें पाश्चिमात्य ज्योतिर्विदांमध्यें झालेल्या वादविवादामधून निघालेल्या गोष्टींचा समावेश झाला असता तर श्रीयुत आपट्यांचा प्रयत्न फारच अमोल्य ठरला असता. यापुढें मात्र रा. आपट्यांपासून प्रस्तुत पद्धतीसंबंधानें अधिक गोष्टींची अपेक्षा ज्योतिषविद्यार्थी करीत रहातील यांत शंका नाहीं.

रा. आपट्यांच्या लेखांतील गुणदोष विवेचनाची जरूरी नाहीं कारण लेख स्पष्टच आहे. फक्त लेखामध्यें लोकमान्याच्या कुंडलीसंबंधानें त्यांच्याकडून ज्या कांहीं चुका झाल्या आहेत त्याचा विचार होऊन तज्ज्ञ ज्योतिर्विदांचें या दिनवर्षपद्धतीसंबंधानें काय मत आहे याचाही जमल्यास खुलासा व्हावा या हेतूनें चार शब्द लिहिले आहेत. हा खुलासा कोणत्या मुद्यासंबंधानें पाहिजे हें सांगण्यापूर्वी रा. आपट्यांच्या एका विधानाचा उल्लेख करणें जरूर आहे. दिनवर्षपद्धति "सर्वांत कमी निर्दोष, अधिक फल देणारी, पद्धतशीर व सर्वांस समजण्यास सुलभ अशी आहे" हें आपट्यांचें म्हणणें वस्तुस्थितीला फारसें सोडून नसलें तरी या पद्धतीच्या गुणवर्णनांत त्यांचे पुढील शब्दांत अतिशयोक्ति झालेली आहे असें आम्हांस वाटतें. "सर्व युरोपखंडांत या **एकाच** पद्धतीचा अवलंब केला आहे. अमेरिकेंत तर या विद्येची कालेजें असून त्यांतून **हिचेंच** शिक्षण देण्यांत येतें. इंग्लंडांत लिओ, राफेल, सफॅरिअल वगैरे सुप्रसिद्ध ज्योतिषी **हिचाच** पुरस्कार करितात." दिनवर्षपद्धति सोपी व विश्वसनीय खरी पण रा. आपट्यांच्या नजरेंत तिच्यांतील जे दोष आले नाहींत ते दोष यूरोपीय ज्योतिर्विदांच्या दृष्टीस ठळकपणें आले असल्यामुळें तिचें स्वरूप रा. आपट्यांच्या लेखांत रेखाटल्याप्रमाणें आजला खास नाहीं. लिओ ज्या प्रकारानें दिनवर्षपद्धति विचारामध्यें घेत होता तो प्रकार हर्लीच्या व पूर्वीच्या राफेलला मुळींच संमत नाहीं. चलित दशम, चलित लग्न किंवा चलित वर्षकुंडली हे शब्दच रॅफेल उच्चारीत नाहीं (पहा रफेलस् गाईड). खुद्द लिओ व त्याचे अनुयायी जन्मदिवसापासून पुढें एक दिवस एक वर्षाचा द्योतक असतो त्याप्रमाणेंच जन्माच्यापूर्वीचा एक दिवस

हा सुद्धां एक वर्षाचा द्योतक असतो असें मानतात. म्हणजे लोकमान्यांच्या ६३ व्या वर्षाचें भविष्य वर्तविणें असतां जन्मानंतरचा ६३ वा दिवस हा जसा ६३ व्या वर्षाचा द्योतक आहे तसाच जन्मापूर्वीचा ६३ वा दिवसही आहे. दिनवर्षपद्धतीला जोडण्यांत आलेली पुस्ती रा. आपटयांच्या कुंडली-विज्ञान अगर ज्योतिर्मालेंत प्रसिद्ध झालेल्या लेखांमध्यें दिसून येत नाहीं. अशी पुस्ती कां जोडण्यांत आली याचें कारण रा. आपटयांसारख्या बहुश्रुत विद्वानास विदित नसेल हें संभवनीय नाहीं. ही पुस्ती जरी दिनवर्षपद्धतीच्या मूलसिद्धांतास—एक दिवस म्हणजे एक वर्ष—धरून आहे तरी ह्या पुस्तीनेंसुद्धां पाश्चिमात्य ज्योतिर्विदांना दिनवर्षपद्धति आंखूड वाटते. आणि म्हणून Primary Directions प्रायमरी डायरेकशनस्‌ची कुबडी सुप्रसिद्ध ज्योतिर्विद लिओ, ग्रीन, सर्फॅरिअल, बेली वगैरेंना अवश्य लागत असते हें त्यांचे लेख वाचणाऱ्यांस वेळोवेळीं दिसून येणारें आहे. जन्मकुंडलीवरून अनुजन्म (postnatal) व प्राग्जन्म (prenatal) अशा दोन्ही प्रकारच्या मिश्रणानें दिनवर्षपद्धतीचीं फलें विचारांत घेऊन मधून मधून Primary Directions ची मदत घेऊनही आंग्ल ज्योतिष्यांचें काम भागतें अशी कोणाची समजूत असेल तर ती खोटी आहे. अलिकडे आधानकाळची कुंडली व तिच्यावरून दिनवर्ष अगर Primary Directions पद्धतीनें फलें फार अनुभवास येतात असा पुकारा केला जात आहे. सारांश आपटे म्हणतात त्याप्रमाणें दिनवर्षपद्धतीचाच पुरस्कार केला जातो तर (१) जन्मकुंडलीवरून प्राक्‌जन्म (२) व अनुजन्म त्याचप्रमाणें (३) आधानकुंडलीवरून प्रागाधान (pre-Epochal) व (४) अन्वाधान (post-Epochal) असे चार प्रकार कां झाले असते ? तसेंच ज्योतिर्विद **झडकील** दिनवर्षपद्धतीची संभावना पुढील शब्दांनें करतो "Secondary Directions in Nativities are to Primary—Directions as 'moon light unto Sun light as water unto wine.' They are very unreliable if not entirely so." See text book of astrology by Zadkiel.

सारांश दिनवर्षपद्धतीचाच सर्वत्र पुरस्कार केला जातो वगैरे आपट्यांचें म्हणणें वस्तुस्थितीस मुळींच धरून नाहीं. ह्या पद्धतीचाच अनुभव सर्वांत अधिक येतो असें प्रतिपादन करणारे ज्योतिर्विद फारसे सांपडतील असें वाटत नाहीं. रा. आपट्यांनीं लिहिल्याप्रमाणें **जन्मानंतरचाच** १ दिवस १ वर्ष दाखवितो अशी एकेरी दिशा तर पुष्कळांसच नाकबूल होईल. जर सर्वांत हीच एक पद्धति कमी सदोष असती तर तिला वर सांगितल्याप्रमाणें ठिगळें लावण्यांत कां येती ? ह्या पद्धतीचा प्रथम पुरस्कार करण्याचा मान सर्फॅरिअल ज्योतिर्विदास आहे पण तो Primary Directions ना किती महत्व देतो हें त्याच्या सदरहू पद्धतीवर लिहिलेल्या स्वतंत्र ग्रंथावरून दिसून येतें. ह्या पद्धतीचें अवास्तव गुणवर्णन करण्यांत मराठी वाचकांचें लक्ष्य तिच्याकडे लागावें एवढाच रा. आपट्यांचा हेतु असेल तर तो सिद्धीस जाण्याचा खरा मार्ग म्हणजे पद्धतीच्या गुणांचें तसेंच दोषांचेंही आविष्करण केलें पाहिजे.

दिनवर्षपद्धति सोपी असून अनेक बाबतींत भविष्यकाळ समाधानकारक रीतीनें स्पष्ट तर करणारी आहे एवढी गोष्ट अनुभवास येते पण त्याबरोबरच कोणत्याही पद्धतीनें तिच्याइतका समाधानकारक भविष्यनिर्णय होणार नाहीं असें म्हणणें म्हणजे अज्ञानमूलक आग्रहातिरेक होय असें म्हटल्यावांचून रहावत नाहीं. स्पष्टोक्तीबद्दल रा. आपटे क्षमा करतील अशी आशा आहे. असो.

दिनवर्षपद्धति भविष्यकाळ समाधानकारक रीतीनें स्पष्ट तर करणारी आहे हें रा आपटयांच्या लेखामध्यें लोकमान्यांच्या गतआयुष्यांतील गोष्टींचा मेळ घातला आहे त्यावरून सर्व वाचकांची खात्री होणारी आहे. गतआयुष्यांतील गोष्टींसंबंधानें जशी विस्तारपूर्वक चर्चा झाली आहे त्याप्रमाणेंच उर्वरित आयुष्यासंबंधानेंही व्हावी ह्या इच्छेनें चार ओळी लिहीत आहें. रा. आपट्यांनीं लोकमान्यांच्या भविष्यकालीन स्थितीचा कांहींसा विचार केला आहे

पण त्यापेक्षां अधिक विस्तारानें, स्पष्ट व असंदिग्ध असा खुलासा आपट्यांनीं अगर दुसऱ्या कोणी तरी तज्ज्ञानीं करावा व त्यासाठीं थोडीशी भूमिका तयार करण्यासाठीं लोकमान्यांच्या कुंडलीमध्यें दिनवर्षपद्धतीनें कोणते योग घडतात ते येथें देतों.

प्रथम लोकमान्यांच्या ६३ व्या वर्षापासूनच आरंभ करूं व त्यासाठीं त्या वर्षाची चलित कुंडली मांडू. जन्मकाळ रा. आपटे म्हणतात तोच घेऊं. ६३ वें वर्ष पहाणें आहे म्हणून जन्मदिवसापासून ६३ व्या दिवसाची —२३ सप्टेंबर १८९६ तारखेची—सकाळीं ६ वाजून २९ मिनिटांची— कुंडली खालीलप्रमाणें आहे.



ग्रहांच्या क्रांति.

जन्मकाळच्या	ग्रह	चलित
२० उ. ६	रवि	० द. १९
० द. ४६	चंद्र	२६ उ. १८
२२ उ. १८	बुध	१३
२० द. ४६	शुक्र	६ द.
१० द. ३७	मंगळ	२२ द. २२
२ उ. १९	गुरु	० उ. २५
२२ उ. ३९	शनि	२२ उ. ९
१८ उ. ३८	हर्शल	१८ उ. ४३
४ द. ५९	नेपच्युन	९ द. ३२
१४ उ.	दशम	२३ उ. १२

[दशम अगर लग्न यांची क्रांति काढणें असल्यास रवि त्या अंशांत असतांना त्याची जी क्रांति असते तीच क्रांति दशम अगर लग्न यांची असते]

वर दिलेल्या कुंडलींतील ग्रह स्वतःशीं व मूळग्रहांशीं त्याचप्रमाणें लग्न व दशम बिंदूंशीं पुढें लिहिल्याप्रमाणें शुभाशुभ योग करीत असल्याचें दिसून येईल.

शुभ.

(१) च. रवि * मूळ-शुक्र.
(२) च. मंगळ △ च. गुरु.

अशुभ.

(१) चलित दशम ☌ मूळ शनि. (तंतोतंत)
(२) ,, ,, □ मूळ गुरु. (होणारा)
(३) ,, ,, □ मूळ चंद्र. (होणारा)
(४) ,, ,, ∠ हर्शल.
(५) ,, लग्न ☍ मूळ गुरु.
(६) ,, ,, ☍ मूळ चंद्र.
(७) च. मंगळ व शनि समक्रांतियोग.
(८) ,, शनि ☌ मळ बुध.
(९) ,, बुध ☌ मळ मंगळ.

संशयास्पद.

(१) च. रवि–गुरु मळ समक्रांतियोग.

(२) च. रवि–चंद्र मूळ ,,

६३ व्या वर्षी चंद्राचे दृष्टियोग कोणते होतात हें समजण्यासाठीं चंद्राची दर महिन्याची स्थिति देतों.

६३ वर्षाच्या आरंभीं म्हणजे २३ जुलै १९१८ ला चंद्र कर्केचा २२ अंश ५ कला आहे. ह्या दिवशीं त्याची गति १२ अंश ४६ कला आहे. १ दिवस=१ वर्ष याप्रमाणें ६३ व्या वर्षांत चंद्र १२ अंश ४६ कला आक्रमण करील म्हणजे दर महिन्यास १ अंश ४ कला जाईल. २३ जुलैला चंद्र कर्केंत २२-५ आहे त्यामध्यें दर महिन्यास १ अंश ४ कला मिळविले असतां त्या त्या महिन्यांतील चंद्र कळेल.

कर्क २२।५ जुलै २३ १९१८	कर्क २८-२८ जाने. १९१९	सिंह ४-५२ जुलै १९१९
२३-९ आगस्ट ,,	२९-३२ फेब्रुवारी ,,	५-५५ आगष्ट ,,
२४-१३ सपटेंबर ,,	सिंह ०-३६ मार्च ,,	६-५९ सपटेंबर ,,
२५-१७ आक्टोबर ,,	१-४० एप्रिल ,,	८-३ आक्टोबर ,,
२६-२१ नोव्हेंबर ,,	२-४४ मे ,,	९-१३ नोव्हेंबर ,,
२७-२५ डिसेंबर ,,	३-४८ जून ,,	१७-१७ डिसेंबर. ,,

योगांचा विचार.

६३ व्या वर्षी मागें नमुद केलेले १३ योग चालू आहेत त्यांचा कांहींचा म्हणजे फक्त शुभ योगांचा विचार रा. आपटे यांनीं केला आहे. अशुभ योग त्यांनीं विचारांत घेतले नाहींत असें त्यांच्या ६३ व्या वर्षाच्या वर्णनावरून दिसून येईल. त्यांनीं केलेलें वर्णन पुढे दिल्याप्रमाणें पॅरिग्राफ १३ मध्यें आहे—

"सप्टेंबरच्या २३ तारखेस गुरु व मंगळ यांचा त्रिकोणयोग झालेला रॅफेलच्या पंचांगांत दिसेल. हा योग अर्थातच ६३ व्या वर्षी फल देतो. जन्मस्थ

गुरु नवमांत आहे. या स्थानावर फार लांबचे प्रवास होतात. त्याचा मंगळाशीं योग झाल्यानें लांबचे प्रवासांत उत्तम कीर्ति, अंगीकृत कार्यांत निश्चयात्मक यश हीं प्राप्त होतांत. याच वर्षी चलित रवि हा तूळेंत १ अंश आल्यानें जन्मस्थ शुक्राशीं ९० अंशांचा योग करितो. हाहि योग शुभ असल्यानें वरील योगाला तो मदतच करितो. अर्थात या योगावर चिरोल केसमध्यें यश खात्रीनें मिळेल हें निसंशय आहे."

या वर्णनांत जे ९ अशुभ योग चालले आहेत त्यांचा मागमूसही दिसून येत नाहीं. ह्या अशुभ योगांपैकीं ६ योग चलित दशम व चलित लग्न यांजबरोबर होत असून त्यांसंबंधानें एक गोष्ट लक्ष्यांत ठेविली पाहिजे कीं जर रा. आपट्यांनीं दिलेला जन्मकाल खरा असेल तर त्यांचीं फलें प्रस्तुत वर्षी कांहीं तरी दिसून आलीं पाहिजेत, ह्या अशुभ योगांचे परिणाम काय होऊं शकतील यांसंबंधानें "लिओ"च्या "Progressed Horoscope" ग्रंथांतून खालीलप्रमाणें उतारे देतों.

योग १ ला:—चलित दशम ♂ मूळ शनिः—

Liability to suffer dishonour & disgrace, legal troubles difficulties connected with avocation; a liability to suffer at the hands of those of inferior birth or position; difficulties in connection with responsibilities & any occupation requiring trust and integrity.

योग २. चलित दशम □ मूळ गुरु.

"Danger of law suits; loss in business; legal disputes: difficulties in social life; troubles in connection with persons having power & influence, monetary losses & a liability to financial disputes."

योग ३. चलित दशम □ चंद्र मूळ.

"Troubles in connection with the populace & discredit in the circle in which the native moves."

योग ४. चलित दशम ∠ दर्शल.

"Sudden & unexpected troubles & disasters, sudden losses & tax upon the reputation; & a liability to suffer much discredit, a tendency for all things to go wrong suddenly & unexpectedly."

योग ५. चलित लग्न ☍ गुरुमूळ.

Blood disorders; liver complaints; many troubles either through false friends or extravagances. Liability for affairs to go wrong through intemperance, unwise enthusiasm, under hopefulness etc:

योग ६. चलित लग्न ☍ चंद्र मूळ.

"Difficulties in connection with enemies. Liabilities to suffer through cancrous or tumorous diseases if the nativity shows any likelihood of this. Difficulties in connection with voyages or travel a very unpopular period generally in which health suffers through vitality or want of it & also through depletion."

योग ७. चलित मंगळ व मूळ शनि समक्रांति योग.

"This, like all the parallel aspects will last over a very long period, for Saturn is a slow moving planet and Mars is not quick enough in motion to allow the influence to work off in one year. It is not a favourable aspect, for Mars represents heat & Saturn cold, & therefore unless these planets neutralise or balance each other, by "mutual disposition" or favourable aspect in the nativity, one of them will exercise the stronger influence, with all the evil of the other added. In common with all parallels, this must depend upon the operation of the lunar aspects & their nature to awakan from latency its evils. When, therefore the lunar directions are evil it will cause the temper too readily affected, any tendancy to give way to anger resulting

in awakening the passional side of the nature & by the very strong feeling it engenders giving an inclination either to go to deliberate extremes or to act very indiscreetly. The period may be made good by allowing the strength of Mars to be blended with the tact of Saturn, this giving the finest form of diplomacy & persuasiveness."

योग ८. चलित शनि ☌ बुध मूळ.

"He will experience some mental disappointments & is likely to suffer at the hands of persons older than himself or those having some power or authority over him."

योग ९. चलित बुध ☌ मंगळ मूळ.

"The native is likely to become the victim of sharp practice or to suffer from fraud or by the actions of others especially where writing correspondance or literary work is concerned ..... it is not a good time either to travel or to deal with the literary persons."

Progressed Horoscope.

"Do not go to law during this period.

लिओ Key to your own nativity page 262.

संशयास्पद म्हणून जे दोन योग दिले आहेत त्यांची फलें अशुभ मिळावींत असा आमचा समज आहे. कारण हे दोन्ही समक्रांति योग प्रतियोगांतील आहेत. रा. आपटे रविगुरूंचा समक्रांतियोग शुभ मानतात असें दिसतें (पहा १२ पॅरिग्राफ) दोन्ही ग्रह शुभ असल्यामुळे त्यांमधील समक्रांति योग शुभच असला पाहिजे असा रा. आपटे यांचा समज झाल्यासारखा दिसतो. हा समज कितीसा अनुभवास धरून आहे हे प्रस्तुत लेखांत स्पष्ट करता येत नाहीं. पुढें एखादे वेळीं संपादकांनीं मेहेरबानी केल्यास ह्या समक्रांतियोगासंबंधानें लिहूं. तूर्त योग संशयास्पद म्हणून त्यांचा विचार करीत नाहीं.

वर दिलेल्या ९ अशुभ योगांचीं फलें कशा प्रकारचीं आहेत याची कल्पना वाचकांस सहज होईल. ही फलें जर रा. आपटे यांनीं दिलेला जन्मकाल खरा असेल तर अनुभवास येणारच हें दिनवर्षपद्धतीच्या चहात्यास कबूल करावेंच लागेल. मात्र अशुभत्वाची तीव्रता जोंपर्यंत रवि*शुक्र हा योग चालू आहे व चलित दशमबिंदूवरून गोचरीच्या गुरूचें भ्रमण होत आहे तोंपर्यंत दिसून येणार नाहीं. रवि-शुक्रांचा शुभयोग ६३ व्या वर्षाच्या अखेर संपत आहे व गुरु□दशम आणि दशम□चंद्र वगैरे योग ६४ व्या वर्षीं तंतोतंत होणारे आहेत. याशिवाय दशम☌मूळ शनि हा योग जरी सुटत असला तरी दशम–शनि समक्रांतियोग चालूच आहे. व्ययस्थानांतील शनि दशमांशीं अशुभयोग करीत आहे. हा मोठा योग रा. आपटे यांनीं कसा सोडला याच आश्चर्य वाटतें. ह्या व्ययस्थानांतील शनीबरोबर झालेला रवि किंवा दशम यांच्या योगांकडे रा. आपटे यांचें लक्ष गेल्याचें दिसून येत नाहीं. लोकमान्यांच्या कुंडलींतील ग्रहांचा विचार करितां व्ययस्थानीं असलेल्या शनीकडे विशेष लक्ष्य पुरविलें पाहिजे. हा खलग्रह लोकमान्यांच्या कुंडलीमधें महाकष्टकारक आहे. अर्थात ज्या ज्या वेळीं या ग्रहांशीं अशुभयोग होतील त्या त्या वेळीं कष्ट झालेच पाहिजेत. याचा अनुभव पहा:—

चलित दशम ∠ मूळ शनि...वर्ष १६-१७ पित्याचा मृत्यु.

चलित रवि ∠ मूळ शनि वर्ष २४-२५ १०१ दिवसांची शिक्षा.

चलित दशम व मूळ शनि समक्रांतियोग. } वर्ष ५२ पासून ६ वर्षांची शिक्षा.

व्ययस्थानांत असलेला आणि विशेषतः रवि किंवा चंद्रांशीं अशुभ दृष्टि करणारा शनि तुरुंगवास, महाकष्ट, किंवा महादंड घडवितो याविषयीं मतभेद होणार नाहीं. त्याप्रमाणेंच पूर्वोक्त प्रकारच्या शनीबरोबर रवीचे अगर दशमाचे योग झाले असतां शनीनें दर्शित केलेल्या योगांचीं फलें दृष्टोत्पत्तीस येतील हे सांगणें कठीण आहे असें वाटत नाहीं. रा. आपटे यांनीं पूर्वोक्त शनीच्या तीन योगांपैकीं फक्त एकच योग लक्ष्यांत घेतला आहे व शेवटचा चलित

दशम व मूळ शनि यांचा समक्रांतियोग त्यांच्या ध्यानीं आलेला दिसत नाहीं. रवि–नेपच्युनचा प्रतियोग हाच काय तो योग ६ वर्षांची शिक्षा दर्शवितो असें त्यांना वाटतें. ही शिक्षा चलित दशम व मूळ व्ययस्थ शनि यांच्या समक्रांतियोगानेंच घडवून आणिली व रवि–नेपच्युनच्या प्रतियोगानें शनीच्या अशुभयोगांत भर टाकिली असें आम्हांस वाटतें. यासंबंधांत रा. आपटे यांचें काय मत असेल तें असो, शिक्षेचा योग चलित दशम–मूळ शनि समक्रांतियोग हा असून रवि नेपच्युनचा योग दुय्यम दर्ज्याचा आहे. असो. सांगावयाचा मुद्दा इतकाच कीं व्ययस्थ शनीबरोबर रवि अगर दशमाचे योग होत असतां शनीनें दर्शविलेले कष्टकारक प्रसंग त्या योगाच्या वेळीं दिसून येतात. आणि असें आहे तर ६३ व्या वर्षापासून मूळ व्ययस्थ शनि दशमाशीं युति करीत आहे व त्यानंतर पांच वर्षांनीं चलित शनि चलित दशमाशीं युति करीत आहे. आणि या पांच वर्षांच्या अवधींत गुरु–चंद्र हेही अशुभयोग करीत असून दशम शनीच्या समक्रांतींत आहे म्हणून हीं पांच वर्षें कष्टकारक जावींत असें अनुमान दिनवर्षपद्धतीनें करण्यास हरकत दिसत नाहीं. त्या कष्टकारक काळाचा आरंभ जरी ६३ व्या वर्षापासून होत आहे तरी रवि*शुक्र या योगानें त्याचीं फलें दिसणार नाहींत पण ६४ व्या वर्षाच्या आरंभापासून हीं फलें दिसूं लागावींत. ६४ व्या वर्षीं चलितलग्न व अष्टमेश गुरु यांचा प्रतियोग चालू आहे हा योगही देहसौख्याविषयीं चिंता उत्पन्न करणारा आहे. रवि–गुरूचा प्रतियोग ६६ व्या वर्षीं होत आहे पण त्यापूर्वी दोन वर्षें वर दर्शविलेल्या अशुभयोगांचा अंमल बसत आहे व त्याचा उल्लेख रा. आपटे यांनीं आपल्या लेखांत मुळींच केलेला नव्हता व त्यामुळें त्यांनीं केलेल्या भविष्यासंबंधानें कांहीं फेरफार करावा लागेल असें वाटल्यावरून प्रस्तुत लेख लिहिला आहे.

रा. आपट्यांनीं दिलेला जन्मकाल खरा असला तर ६३ व्या वर्षीं लोकमान्यांचें दशमसुद्धां शनि, गुरु व चंद्र यांनीं पीडित होत आहे व त्याचा परिणाम शुभयोगांचें बल कमी होण्यांतच होईल किंवा स्वतंत्रपणें अशुभयोगांचींच फलें दिसून येतील हें ठरविणें रा. आपट्यांसारख्या अनुभवी ज्योतिषांनाच

शक्य आहे तेव्हां त्यांनींच या बाबतींत लिहावें हें उत्तम. तरी पण शुभाशुभ योग पहातां अशुभयोगांचेंच प्राबल्य अधिक दिसून येतें व रा. आपट्यांच्या मताप्रमाणें चिरोलकेसचा निकाल कदाचित रविशुक्राच्या शुभयोगाप्रमाणें जरी लोकमान्यांच्या तर्फेनें लागला तरी ते कोर्टाच्या भानगडींतून सुटतील असें आम्हांस वाटत नाहीं व या शेवटच्या भानगडी शनि, गुरु–चंद्रांच्या अशुभयोगांच्या प्राबल्यामुळें यश मिळणें दुरापास्त होईल. इतकें दिनवर्षपद्धतीवरून म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं ह्या अशुभयोगांचीं फलें Progressed Horoscope ग्रंथांमधून मागेंच दिलीं आहेत व त्यांस अनुसरूनच आम्ही लिहिलें आहे हें सूज्ञ वाचकांच्या लक्ष्यांत येईलच.

रा. आपट्यांनीं पुन्हा एकवार या अशुभयोगांचा विचार करावा आणि लोकमान्यांच्या ६४ व्या वर्षापासून पुढील ५ वर्षांच्या आयुष्यासंबंधानें स्पष्टीकरण करावें अशी त्यांस नम्र विनंति आहे व त्याचप्रमाणें "ज्योतिर्मालेचे" विद्वान संपादक व या मासिकाच्या वाचकांच्या पूर्ण परिचयाचे लेखक श्रीयुत "राम नारायण" यांनींही या बाबतींत आपलीं मतें प्रसिद्ध करावींत अशी त्यांस आग्रहाची विनंति करून हा लेख पुरा करितों.

ता. ५-२-१९१९.

—o—

ज्योतिषशास्त्रावरील खालील पुस्तकें ज्योतिर्माला ऑफिसमध्यें विक्रीस ठेविलीं आहेत.

(१) **बालबोध ज्योतिष**—फलज्योतिषशास्त्राच्या मूलतत्त्वांचा सोप्या व सरळ रीतीनें उहापोह या पुस्तकांत केला आहे. फलज्योतिषशास्त्र शिकूं इच्छिणाऱ्या नवीन होतकरू विद्यार्थ्यांस फारच उपयुक्त किं. ४६ आणे.

(२) **विवाहप्रदीप**—यांत वधूवर पत्रिकांचा शास्त्रीय दृष्टीनें कसा विचार करावा यासंबंधानें फारच विस्तृत माहिती दिली आहे. किं. ४८ आणे.

(३) **मेदनीय किंवा राष्ट्रीय ज्योतिष**—राष्ट्राची शुभाशुभ फलें पहाण्यास यासारखा आज मराठी भाषेमध्यें दुसरा ग्रंथच उपलब्ध नाहीं. किं. ४१२ आणे.

म्यानेजर, ज्योतिर्माला ऑफीस, दादर मुंबई नं. १४

॥ श्रीसद्गुरवे नमः ॥

ज्योतिर्माला

आप्राचः कामरूपाद्द्रुहिणसुतनदप्लावितादाप्रतीचो
गान्धारात् सिंधुसाद्रार्द्रघुवररचितादाचसेतोरवाचः ।
आकेदारादुदीचस्तुहिनगहनतः सन्तिविद्वत्समाजा
ये ये तानेष यत्नः सुखयतु समजान्कश्चमत्कर्तुमीष्टे ॥ १ ॥

अभिनवाऽऽवृत्ति वर्ष ४ थें. } मार्च १९१९. { अंक १२ वा.

वार्षिक समारोप.

ज्योतिर्मालेची पुनरावृत्ती काढण्याची मानसिक स्फूर्ती झाल्यापासून तों आतांपर्यंतचें काम फारच निर्विघ्नपणानें व संथपणानें पार पडलें आहे. चालू अंक हा चवथ्या वर्षाचा १२ वा म्हणजे शेवटला असून हा वाचकांच्या हातीं देऊन आम्हीं आमच्या वाचकांच्या चतुर्थवर्षाचे ऋणामधून मुक्त होणार आहोंत. यूरोप खंडामध्यें रण संग्राम चालू असतां मासिकांचा जीवनकलह किती तीव्र झाला होता व हल्लीं लढाई थांबल्यानंतर किती अडचणी उत्पन्न झाल्या आहेत याची कल्पना अनुभवाखेरीज करतां येईल असें वाटत नाहीं. पुष्कळांस या काळामध्यें विश्रांती घ्यावी लागली आहे. आम्हीं भावी आशेवर नजर ठेऊन कशीबशी चार वर्षें पूर्ण केली आहेत. या गेल्या चार वर्षांचे कालामध्यें माला सुरळीतपणानें आमच्या

हितचिंतकांचे मदतीमुळें व वर्गणीदारांच्या आश्रयामुळेंच चालली आहे हें आम्हीं जाणून आहोंत.

ज्योतिषशास्त्रास राजाश्रय नाहीं. त्याचप्रमाणें लोकाश्रय नाहीं असें मोठ्या कष्टानें म्हणावें लागतें व त्यामुळें अनेक गोष्टी करावयाच्या योजिल्या असून देखील त्या द्रव्याभावामुळें होत नाहींत. हें मोठ्या खेदानें सांगावें लागत आहे. पुष्कळ घनिकांस व पुष्कळ राजेरजवाड्यांस मदत करण्याची इच्छा आहे पण....द्रव्याभावामुळें मदत करतां येत नाहीं असेंही म्हणतां येत नाहीं. लोकरुचीसंबंधानें म्हणावयाचें असतां जन समाजास शास्त्राची सेवा करणारे मासिकाची किंवा एखाद्या संस्थेची आवश्यकता आहे असें मुळींच दिसत नाहीं. लोकरुची म्हटली म्हणजे त्यांस वर्षफलें, मासफलें व कुंडल्या वर्णन करून देणाऱ्या संस्थेचीच आवश्यकता फार भासत आहे. शास्त्रास मदत करणें, शास्त्र ऊर्जितदशेंत आणणें आहे इत्यादि गोष्टी त्यांच्या स्वप्नींही दिसत नाहींत. शास्त्रसेवा करण्यास निघणाऱ्या संस्थेवर वक्रदृष्टि तर मासफलें वर्तवून देणाऱ्या संस्थांकडे लक्ष्मीची प्रसन्नता अशा ह्या कठीण परिस्थितीमध्यें मालेनें कोणतें ध्येय ध्यावें. हें ठरविणें फारच कठीण झालें आहे. ज्योतिर्मालेचा जन्म शास्त्राचें संशोधन व चर्चा करण्याकरितां झालेला असल्यामुळें दुसरें ध्येय हातीं घेतां येत नाहीं याबद्दल आम्हीं फार दिलगीर आहोंत. गेल्या चार वर्षांमध्यें मालेच्या द्वारें अनेक उपयुक्त व अद्याप ज्यांसंबंधानें विशेष उहापोह झाला नाहीं असे अनेक नवीन नवीन निबंध चर्चात्मक रूपानें मांडिले गेले आहेत. चालू वर्षामध्यें कालनिर्णयासंबंधानें परिभ्रमणपद्धति व दिनवर्षपद्धतीसंबधानें फारच उत्तम लेख प्रसिद्ध झाले आहेत. परिभ्रमणपद्धतीसंबंधानें मालेच्या नेहमीच्या परिचयाचे लेखक रा. राम नारायण यांनीं फारच उत्तम खुलासा केला आहे. आतां यासंबंधानें विशेष लिहिण्यासारखें राहिलें आहे असें आम्हांस वाटत नाहीं. रा. राम नारायण यांच्या या लेखानें परिभ्रमणपद्धतीची दिशा पुष्कळांस

आतां सुलभ झाली आहे असें म्हटलें असतां चालेल. यासंबंधांत आमचे मनांतून कांहीं कुंडल्यांचीं कै. चिटणीसांनीं केलेलीं वर्णनें प्रसिद्ध करावयाचीं आहेत तीं सवडीसवडीनें पुढील वर्षीं प्रसिद्ध करण्यांत येतील. रा. कुकदेव महेश्वर प्रभु देसाई यांचा "मातृपितृस्थान विचार" हाही निबंध फारच विचार करण्यासारखा झालेला आहे. सवडीसवडीनें रा. प्रभुदेसाई असेच एकदोन निबंध वर्षामधून प्रसिद्ध करतील अशी आशा आहे. दिनवर्षपद्धतीवरील रा. आपटे व रा. खोपकर यांचे निबंध फारच महत्वाचे आहेत. या पद्धतीसंबंधानें आणखी पुष्कळच खुलासा व्हावयाचा आहे व तो रा. आपटे व रा. खोपकर करतील अशी आशा आहे. ग्रहदृष्टिविचार हा चालू वर्षामधील अपुरा राहिलेला निबंध पुढील सालामध्यें पुरा करण्यांत येईल. थोडक्यांत म्हणावयाचें असतां गेल्या चार वर्षांमध्यें मालेच्या हातून जातक व मेदिनीय ज्योतिष यांसंबंधानें कांहींसा खुलासा झाला आहे अद्यापि प्रश्नज्योतिष, ज्योतिर्वैद्यक व मुहूर्त यांसंबंधानें कांहींच करण्यांत आलें नाहीं परंतु पांचव्या वर्षामध्यें यांसंबंधानें कांहीं विचार करण्याचें योजिलें आहे.

चालू चवथ्या वर्षामध्यें इन्फ्लुअंझा व त्यानंतर कॉलरा वगैरे रोगांच्या साथीमुळें मालेचे अंक आम्हांस नियमित वेळीं प्रसिद्ध करितां आले नाहींत याबद्दल आम्हीं फार दिलगीर आहों. हा दोष सर्वस्वी आमचा आहे असें वाटत नाहीं. जेथें देशांतच अस्वस्थता, महागाई झाली आहे तेथें सर्वच गोष्टी सुरळीत कशा चालाव्या हा प्रश्नच आहे. महायुद्धामुळें कागद वगैरे जिन्नस फारच महाग झाले आहेत. याची कल्पना मालेच्या वाचकांस नसेल असेंही म्हणवत नाहीं. या भयंकर महागाईचे काळामध्यें मालेनें कसाबसा जीव धरून नियमानें सेवा केली आहे इतकेंच नव्हे तर चालू साली डिसेंबर व जानेवारी या दोन महिन्यांचे अंक नेहमीपेक्षां जास्त मोठे काढून तेवढ्याच वर्गणीमध्यें वाचकांस दिले आहेत हें लक्ष्यांत घेण्यासारखें आहे. अद्यापि कागदाचे भाव उतरले नाहींत व ते आणखी १।२ वर्षामध्यें पूर्वीसारखे

स्वस्त होतील असा आज रंग दिसत नाहीं तथापि माला योग्य ती सुधारणा करण्यास केव्हांच पुढेंमागें पहात नाहीं हें आज चार वर्षांचे अनुभवावरून वाचकांस कळलेंच असेल. नुसत्या भपकेबाज जाहिराती व बक्षीसपुस्तकांची लालुच दाखवून फसविणें हें मालेचे ब्रीद नाहीं. असो. शेवटीं ज्या श्रीभगवतीच्या कृपाप्रसादानें हें मालेचें कार्य सुखकर होऊन निर्विघ्नपणें आतांपर्यंत पार पडलें त्या दिव्य शक्तीस पुढील वर्षाचा कार्यक्रम सुरळीत जाण्याबद्दल व ज्योतिर्मालेच्या हातून उपयुक्त शास्त्रसेवा होऊन तिचें आयुष्य मंगलमय होण्याबद्दल नम्र प्रार्थना करून हा चतुर्थ वर्षाचा वार्षिक समारोप आटोपता घेतों.

—संपादक—

सूचना—एप्रिल सन १९१९ पासून मालेच्या पांचव्या वर्षास आरंभ होईल. पुढील वर्षीं ज्यांना वर्गणीदार राहण्याचें नसेल त्यांनीं चालू अंक हातीं पडल्यापासून १५ दिवसांचे आंत आम्हांस तसें कळवावें. पुष्कळ लोक आगाऊ न कळवितां व्ही. पी. परत करितात हें त्यांचे विद्वत्तेस व नीतिमत्तेस शोभत नाहीं. त्यामुळें आम्हांस प्रत्येक अंकापाठीमागें विनाकारण ८।८३ नुकसान सोसावें लागतें. कांहीं तर व्ही. पी. येईपर्यंत येणारे अंक मुकाट्यानें घेऊन नंतर व्ही. पी. नें येणारा अंक तेवढाच परत करितात हें फारच गर्ह्य आहे. याकरितां चालू सालीं आम्हीं सर्वांकडे एकदम एप्रिलच्या अंकाची रु. १।९ व्ही. पी. करणार आहोंत. व्ही पी. सुमारें एप्रिलच्या शेवटच्या व मेच्या पहिल्या आठवड्यामध्यें येतील.

व्ही. पी. चा स्वीकार करून मालेच्या कार्यास मदत करण्याबद्दल सर्वांस नम्र विनंती आहे. ज्यांना अनपेक्षित अडचणीमुळें किंवा इतर कोणत्याही कारणानें पुढील सालाकरितां मासिक चालू ठेवणें नसेल त्यांनीं तसें आम्हांस **आगाऊ कळविलें असतां आम्हीं त्यांचे अत्यंत आभारी होऊं.** व्ही. पी. परत आल्यानें प्रत्येक व्ही. पी. पाठीमागें होत असलेलें सव्वा

आण्याचें नुकसान हल्लीच्या बिकट परिस्थितीमध्यें मालेस फार जड जात आहे. करितां मालेचे आश्रयदाते व मित्रवर्ग या आमच्या विनंतीकडे लक्ष्य देतील काय? ज्यांचेकडून पत्रद्वारें कळणार नाहीं ते पुढील सालीं वर्गणीदार होण्यास तयार आहेत असें समजून पहिला अंक व्ही. पी. नें पाठविण्यांत येईल. ज्यांना ज्यांना आगाऊ वर्गणी मनीआर्डरीनें पाठविणें शक्य असेल त्यांनीं ती आमच्याकडे १० मे पर्यंत पाठविली असतां व्ही. पी. करण्याचे श्रम वाचून विलंब होणार नाहीं व आमच्या कामामध्यें बरीच मदत होईल करितां याही गोष्टीकडे आमच्या आश्रयदात्यांनीं लक्ष्य द्यावें.

मालेचे अंक नियमित वेळीं प्रत्येक महिन्याच्या पहिल्या आठवड्यामध्यें प्रसिद्ध करून वर्गणीदारांकडे वेळच्या वेळीं पाठविण्याबद्दल शक्य तेवढा प्रयत्न करीत आहों. चाल सालीं अनेक अडचणीमुळें आम्हांस तसें वागतां आलें नाहीं याबद्दल आम्हीं दिलगीर आहों. मालेचा प्रत्येक अंक शक्य तेवढी काळजी घेऊन वर्गणीदारांकडे रवाना करण्याचें काम आम्हीं फारच काळजीपूर्वक करीत असतों परंतु दर महिन्यास बरेच अंक पोष्टांत गहाळ होत आहेत. ज्या एखाद्या वर्गणीदारास कांहीं कारणामुळें अंक मिळाला नसेल त्यांनीं त्याप्रमाणें कळविल्यास योग्य ती व्यवस्था करण्यांत येईल. प्रत्येक वर्गणीदारास मालेचा अंक नियमित मिळावा अशी आमची इच्छा आहे. त्याप्रमाणें आमचे प्रयत्न चालू आहेत. पुष्कळ वर्गणीदार आपले बदललेले पत्ते कळवीत नाहींत व त्यामुळें कित्येकांस अंक वेळेवर मिळत नसतील. करितां वर्गणीदारांनीं पत्ता बदलला असतां आम्हांस व पोष्टास ताबडतोब कळवावें. पत्रव्यवहार करतेवेळीं आपलें नांव, व रजिष्टर नंबर सुवाच्य कळविण्याबद्दल आमची त्यांस नम्र सूचना आहे. त्याचप्रमाणें सर्व पत्रव्यवहार प्रीपेड असून उत्तराकरितां अर्धा आण्याचें पोष्टाचें तिकीट असावें. तिकिटाच्या अभावीं उत्तर देण्यांत येणार नाहीं.

म्यानेजर ज्योतिर्माला ऑफिस—दादर मुंबई नं १४

साभार स्वीकार.

चालू वर्षामध्यें खालील वृत्तपत्रकार व मासिककार यांनीं मालेस प्रेमानें परत भेट दिली. त्याबद्दल माला सर्वत्रांची फारच आभारी व ऋणी आहे. एकमेकांनीं एकमेकांच्या परत भेटीस जाणें हा चालू युगांतील एक शिष्टाचार मानला जात आहे. व माला तो मोठ्या प्रेमानें पाळीत आहे. बंधुत्वाचें नातें बाळगून थोरानें लहानाच्या भेटीस जाण्यानें थोरांस कमीपणा येत नसून त्यांत थोरांच्या मनांचा मोठेपणा व्यक्त होत असतो.

भेट देणारीं वृत्तपत्रें:—

"केसरी;" "राजकारण;" "चिकित्सक;" "शुभसुचक;" "ज्ञानप्रकाश;" "दैवज्ञ प्रबोधिनी;" "हिंदु मिशनरी."

भेट देणारी मासिक पुस्तकें:—

"भारत सेवक:" "बालबोध;" "लोकमित्र;" "खेळगडी;" "भिषग्विलास;" "महाराष्ट्र साहित्य पत्रिका;" "मधुकर;" "पत्रिका;" "रामदास व रामदासी;" "वंजारी त्रैमासिक;" "व्यायाम;" "दूत;" "आचार्य;" "केळवणी;" "धर्मजागृति."

आमचे मित्र रा. रा. भास्करराव फडके यांचे निधनानंतर श्रीयुत रा. रा. आर. आर. मंडलीक यांनीं श्रीमत स्वामी विवेकानंद यांचे चरित्राचे पुढील भाग पाठविले आहेत त्याबद्दल आम्हीं त्यांचे अत्यंत आभारी आहोंत.

श्रीयुत रा. केशव सिताराम ठाकरे यांचेकडून "कोदंडाचा टणत्कार" पावला. अखिल भारताच्या इतिहासाचे संशोधन करण्याच्या अवडंबराखाली ज्ञातीज्ञातींमध्यें द्वेष उत्पन्न होईल अशा प्रकारच्या चववळ करणाऱ्या आमच्या इतिहाससंशोधकांची जितकी तारीफ करावी तेवढी थोडीच होणार आहे. देश-हिताच्या लांबलांब गप्पा झोडणाऱ्या व एकीकरितां नक्राश्रु ढाळणाऱ्यांच्या हातून यापेक्षां अधिक चांगलें तें काय होणार आहे! भारत इतिहास संशोधक मंडळाच्या वार्षिक अहवालामध्यें असले घाणरडे, कुत्सित बुद्धीनें लिहिलेले निबंध काय अन्तस्थ हेतूनें मंडळाच्या विद्वान सभासदांस पसंत होऊन प्रसिद्ध होत असतील तें त्यांसच माहीत!

रा. ठाकरे यांचा "रामदास" ही पावला. पुस्तकें पाठविल्याबद्दल आम्हीं रा. ठाकरे यांचे आभारी आहोंत.

—संपादक—

शेतकी, बागायत, जिरायत इत्यादि गोष्टींचा फलज्योतिषशास्त्रदृष्ट्या विचार.

(अंक १ ला वर्ष ४ थें वरून संपूर्ण)

(३२) शुक्लपक्षामध्यें नैसर्गिक रीत्या चंद्र बलवान असून त्याचे अंगीं वनस्पतीस पोषक असें रसाधिक्य जास्त प्रमाणामध्यें असल्यामुळें सर्व तऱ्हेचीं रोपें, झाडें, किंवा भाजी वगैरे शुक्लपक्षामध्यें वर सांगितल्याप्रमाणें दिवसाची निवड करून त्या त्या दिवशीं लावावी.

(३३) कृष्णपक्षामध्यें चंद्र हीनबळी असतो व त्यामुळें तो वनस्पतीस पोषक असा नसल्याकारणानें कृष्णपक्षामध्यें चंद्र ज्या ज्या दिवशीं मेष, सिंह, कन्या, मिथुन किंवा धनु राशींमध्यें असेल त्या त्या दिवशीं शेतांमधील रानटी किंवा निरुपयोगी झाडें उपटून काढावींत. त्याचप्रमाणें जीं कित्येक निरुपयोगी झाडें तोडलीं असतां पुनः पुनः जोरानें माजतात तीं झाडें कृष्णपक्षामध्यें चंद्र सिंह राशीमध्यें असतां तोडावींत म्हणजे पुन्हा फार फुटणार नाहींत.

(३४) झाडावर कीड पडली असतां तिचा नाश करण्याकरितां कृष्णपक्षा-मधील सिंह राशीचा किंवा वर कलम ३३ मध्यें सांगितलेल्या इतर चंद्रावर कीड मारणाऱ्या औषधींचा उपयोग करावा म्हणजे किड्यांचा किंवा झाडांच्या रोगांचा फारच लवकर प्रतिकार होतो.

(३५) आंबे, सफरचंद वगैरे झाडांवरून उतरविण्याचीं फळें नेहमीं कृष्ण-पक्षामध्यें उतरवावींत कारण शुक्लपक्षामध्यें उतरविलेल्या फळांस ठेंचून किंवा खरडून झालेले डागाचे वण फारच स्पष्ट रहातात. शुक्लपक्षाच्या पहिल्या एकदोन दिवसांत झाडावरून उतरलेलीं फळें फारच डागाळलेलीं पाहण्यास मिळतात व त्यामुळें तीं लवकरच खराब होतात.

(३६) मुईमुगासारखीं जीं पिकें जमिनीमध्यें येतात तीं किंवा रताळीं, बटाटे, कांदे वगैरे कंदमय पदार्थ जे जमिनीमध्यें उत्पन्न होतात ते सर्व कृष्णपक्षामध्यें खणून काढावेत कारण त्या वेळीं त्यांचेमध्यें रसाधिक्य कमी प्रमाणांत असल्या-मुळें तीं जास्त काळ चांगल्या स्थितीमध्यें टिकतात. त्यांस लवकर कीड लागत

नाहीं. त्यांत विशेषतः जेव्हां वरील पदार्थांच्या बियाण्याकरितां हीं पिकें खणून काढणें असतील तेव्हां तीं कृष्णपक्षामधील सप्तमीपर्यंत खणून काढावीत.

(३७) बियाण्याकरितां जें धान्य ठेवावयाचें असेल तें नेहमीं कृष्णपक्षांत कापावें व त्यांतलेंत्यांत जमल्यास तें अमावास्येच्या अगोदर तीनचार दिवस कापणें चांगलें.

(३८) कृष्णपक्षामध्यें तोडलेल्या लांकडांस कीड लागत नाहीं व त्याचप्रमाणें त्यांस वाळवीही कमी लागते, व ह्या लाकडांचा जळतांना तडतड असा आवाज कमी होतो करितां नेहमी झाडें कृष्णपक्षामध्यें तोडावीत, त्यातलेंत्यांत इमारतीस लांकडें नेहमी कृष्णपक्षामध्यें मेष, सिंह, धनु, मिथुन, व कन्या राशीमधील चंद्र घेऊन तोडावीत.

(३९) कुंपणाचे वासे डांबर लावून कृष्णपक्षामध्यें पुरले असतां जास्त काळ टिकतात करितां नेहमी कुंपण घालण्यास कृष्णपक्ष योजावा.

(४०) कोंबडीं, बदकें वगैरेंचीं अंडीं फुटून पिलें होण्याकरितां तीं उबत ठेवावीं लागतात तीं अशा बेतानें ठेवावीत कीं, तीं ज्या दिवशीं फुटतील तो दिवस शुक्लपक्षामधील असून चंद्र वृषभ, कर्क, तुला, मकर किंवा मीन राशीमध्यें असावा. शुक्लपक्षामध्यें उत्पन्न होणारीं पिलें फार लवकर वाढतात व गुबगुबीत असतात व त्यातलेंत्यांत या दिवसांवर उत्पन्न होणाऱ्या माद्या तर फारच लवकर अंडीं घालण्यास सुरवात करितात. ह्याच नियम शेतकरी लोकांनीं गाई, म्हैशी, घोडीं, बकऱ्या, कुत्रीं यांसंबंधानें पाहावा. गाई फळल्यापासून ४० आठवड्यानें विते, घोडीला ४८ आठवडे लागतात, बकऱ्यांला २१ आठवडे तर कुत्रीला ९ आठवडे पुरतात. सश्याची वीण ३० दिवसांत होते. कोंबड्यांचीं अंडीं उबत ठेविल्यापासून २१ दिवसांत फुटतात तर बदकांच्या अंड्यांस उबण्यास २८ दिवस लागतात.

(४१) राशिचक्रामधील **कन्या** राशीचा अंमल मोठ्या आंतड्यावर असल्याचें सांगितलेलें आहे, **तूळेचा** मूत्रपिंड व **वृश्चिकेचा** अंमल प्रजोत्पादन करणाऱ्या इंद्रियावर असल्याकारणानें नेहमीं घोडा किंवा बैल खच्ची करणें असतां चंद्र ज्या ज्या दिवशीं या वरील तीन राशींमध्यें असेल ते दिवस अगदीं

वर्ज्य करावेत. म्हणजे जनावरांचे अंड **कन्या, तुळा,** व **वृश्चिक** राशींमध्यें चंद्र ज्या दिवशीं असेल त्या दिवशीं बडवूं नयेत कारण त्या योगानें जनावरें पुष्कळ प्रसंगीं मरतात तर कित्येक जनावरें त्यानंतर मुळींच अंग धरीत नाहींत असा अनुभव पहाण्यास मिळतो.

आतांपर्यंतच्या मागील विवेचनामध्यें ऋतुमानाप्रमाणें शुक्ल अगर कृष्णपक्षामधील कोणकोणत्या राशीवरील चंद्रावर शेतकी किंवा बागायतीसंबंधानें कोणकोणतीं कामें करावीत याचें सविस्तर विवेचन केलें आहे. वरील विवेचनामध्यें फक्त ऋतुमान ज्यावर अवलंबून आहे अशा सूर्याचा, व शुक्लपक्ष किंवा कृष्णपक्ष हे ज्यावर अवलंबून आहेत अशा चंद्राचाच विचार झाला आहे. म्हणजे नवग्रहांपैकीं सूर्य व चंद्र या दोन आकाशस्थ ज्योतींचाच विचार झाला. याखेरीज बुधशुक्रादि इतर तेजांचा विचार केला गेला नाहीं. म्हणजे बुधशुक्रादि ग्रहांचा या विषयाशीं संबंध नाहीं असें म्हणतां येणार नाहीं. विषय सुगम होऊन विशेष पंचांगाचे मानगडीमध्यें न जातां साधारण खेडवळास देखील या उपयुक्त शास्त्राचा सहज फायदा घेतां यावा या हेतूनें प्रस्तुतचा निबंध लिहिला आहे म्हणून त्यांचा वरील नियमामध्यें समावेश केला नाहीं. परंतु ज्या कोणास याहीपेक्षां अधिक खोलामध्यें जाऊन पाहणें असेल त्यांचेकरितां कांहीं थोडीबहुत माहिती सांगून या विषयाचा हा दुसरा विभाग पुरा करण्याचा विचार आहे.

(४२) कोणत्या वारीं शेतकीसंबंधानें काय काय कामें करावी यासंबंधानें विचार करितां पूर्वोक्त सांगितल्याप्रमाणें चंद्र अनुकूल किंवा प्रतिकूल आहे किंवा काय हें पाहून नंतर वारांचा विचार घ्यावा. सर्वसाधारणपणें **शुक्लपक्षामध्यें सोम, शुक्र, गुरु** व **बुध** या वारीं चंद्र वृषभ कर्क, तुला, वृश्चिक, मकर व मीन या राशींचा असतां पेरणी किंवा लावणी करावी, कलमें बांधावीत, किंवा एका ठिकाणचीं झाडें दुसऱ्या ठिकाणीं उपटून लावावीत.

(४३) मंगळ, रवि, व शनि यांचे वारीं कृष्णपक्षामध्यें चंद्र सिंह राशीमध्यें असतां बेणणी, रानटीं झाडें उपटणें, झाडें तोडणें, वगैरे कामें करावीत.

(४४) होऱ्यासंबंधानें विचार करितां पेरणी किंवा नवीन झाडें गुरु किंवा शुक्राच्या होऱ्यावर लावावीत. फळझाडें विशेषतः गुरूच्या होऱ्यावर लावावीत परंतु फुलझाडें लावणें असतां शुक्राचा होरा घ्यावा.

(४५) रानटी झाडें तोडणें असतां किंवा झाडावरील किडीस औषध टाकणें असतां शनीचा किंवा मंगळाचा होरा घ्यावा.

(४६) शुक्लपक्षामध्यें चंद्र वृषभ, कर्क, तुळा, वृश्चिक, मकर, व मीन राशीमध्यें असून तो पापग्रहाबरोबरील अशुभसंबंध सोडीत असून गुरु, शुक्र किंवा रवि यांचेबरोबर शुभसंबंध (६० अं.-द्विराश्यंतर दृष्टियोग किंवा १२० अं.-त्रिकोण दृष्टियोग)करण्यास जात असेल अशा वेळीं शेतकी किंवा बागाईत-संबंधी पेरणी, रोपणी, इकडील झाडें तिकडे उपटून लावणें वगैरे कामें करावींत.

(४७) चंद्र ज्या दिवशीं पापग्रहाबरोबर केन्द्र प्रतियोग किंवा सार्धकेन्द्रयोग किंवा १३५ अंश दृष्टियोग करीत असतां रानटी झाडें किंवा निरुपयोगी झाडें तोडावींत; झाडांवरील रोगनाशनार्थ औषधी योजना करावी. मागें सांगितल्याप्रमाणें कृष्णपक्षामधील त्या त्या राशीमधील चंद्र घेऊन वर सांगितल्याप्रमाणें दृष्टियोग पाहिले असतां विशेष चांगलें.

(४८) कोणतेंही बीं किंवा धान्य साधारणपणें चर (-मेष, कर्क, मकर, व तुला) या लग्नावर पेरावें. लग्नीं व चतुर्थामध्यें पापग्रह नसावा. चंद्र लग्नाधिपतीबरोबर शुभसंबंधित असून वृषभ, कर्क, तुला, वृश्चिक, मकर किंवा मीन राशीमध्यें असावा. स्थिर लग्नावर पेरणी करूं नये—वृषभ, सिंह, वृश्चिक व कुंभ या चार स्थिर राशींपैकीं वृषभ साधारण कांहीं बरी आहे परंतु पेरणी-करितां स्थिर लग्न शक्य तेवढें टाळावें.

(४९) कांहीं ग्रंथकारांच्या मताप्रमाणें चंद्र वृषभ, सिंह, कन्या, कुंभ व मीन राशींमध्यें असतां झाडांचीं कलमें तयार करावींत किंवा बांधावींत. परंतु विचार करतां असें वाटतें कीं सर्व राशींमध्यें फळझाडांच्या कलमासाठीं वृषभे-मधील चंद्र उत्तम होय. चंद्र वरील राशींमध्यें असून शुक्राबरोबर त्रिकोण किंवा तृतीय एकादश दृष्टियोग करीत असतां फळें फारच सुंदर व स्वादिष्ट होतात. गुरूबरोबर शुभ दृष्टियोग करीत असतां पुष्कळ लागतात व आकारानें मोठीं असतात.

(५०) शनि मार्गी असून लग्न, धन, पंचम, किंवा एकादश स्थानामध्यें घ्यावा. वरीलप्रमाणें साधत नसतां म्हणजे शनि मार्गी नसतां शनिगुरूमध्य शुभ दुष्ठियोग असून गुरु लग्न, चतुर्थ, धन, पंचम, दशम, एकादश स्थानांमध्यें

घ्यावा. व हें कांहींच साधत नसतां कलमें बांधणें वगैरे बाग़ेसंबंधीं कामें चंद्र लग्न, धन, पंचमम, दश, व एकादश स्थानांमध्यें घेऊन करावींत.

(५१) पेरणी काय किंवा एका ठिकाणचीं झाडें दुसरीकडे नेऊन लावणें असतां काय नेहमीं चंद्रमंगळांमध्यें कोणताच संबंध—दृष्टीयोग नसावा. चंद्रमंगळांमध्यें सार्धकेन्द्रयोग, केन्द्रयोग, प्रतियोग, किंवा १३५ अंशांचा दृष्ठियोग असतां वरील कृत्यें करूं नयेत.

(५२) चंद्र ज्या राशीमध्यें असेल त्या राशीचा अधिपति जल राशीमध्यें असून चंद्राचा व त्याचा शुभदृष्टियोग असावा. स्थिर राशीचें लग्न असावें, शुक्लपक्ष असून चंद्र लग्नाधिपति उदित गोलार्धामध्यें असावेत. अशा वेळीं झाडांची छाटणी, कलमें, लावणी केली असतां तीं फार जोमानें वाढतात व त्यांस फळें भरपूर लागतात. लग्नीं स्थिर राशी घेण्यास जमत नसल्यास द्विस्व-भावराशि घेतल्यास हरकत नाहीं. व कोणतीच गोष्ट साधत नसतां चंद्र ज्या दिवशीं वृषभ राशीमध्यें किंवा धनु राशीच्या उत्तरार्धामध्यें असून पापग्रहानें पीडित नसून गुरूबरोबर शुभदृष्टियोग तृतीय, एकादश किंवा नवमपंचम करीत असतां गुरु लग्न, दशम, चतुर्थ, पंचम, किंवा एकादशस्थानामध्यें घेऊन वर सांगितलेली बागाईतासंबंधीं कामें करावींत. **परंतु हा वर सांगितलेला नियम दीर्घकाल फळें व पुष्पें देणाऱ्या वृक्षांसंबंधानें फारच महत्वाचा** आहे. जे वृक्ष दीर्घकाल किंवा लावल्यापासून पुष्कळ कालानें फळें देतात त्यासंबंधानेंच योजावा.

साधारण ज्यांस पंचांगाची व ज्योतिषशास्त्राचे मूळ तत्त्वाची साधारण माहिती आहे अशा माणसासदेखील ज्योतिषशास्त्राचा शेतकीस किंवा बागायत वगैरे विषयासंबंधानें कसा उपयोग करावा याचें सविस्तर विवेचन केलें आहे व तें कोणत्या मूलतत्त्वास धरून आहे व याचाही प्रस्तुतच्या निबंधामध्यें साग्र विचार केला असल्यामुळें हा विषय पाहिजे तितका सूक्ष्म कल्पक व हुशार विद्यार्थ्यास करितां येईल अशी आम्हांस खात्री आहे. कोणतेंही शास्त्र असो तें जितकें सोपें होऊन मानवी प्रगतीस मदत करणारें होईल तितकें आज हवें आहे. शास्त्राची परीक्षा उपयुक्ततेच्या कसोटीवर लावून पहाण्याचा काल आला आहे. नुसत्या त्या शास्त्रामध्य अमुक गूढार्थ भरलेला आहे किंवा तें अध्यात्म-

दृष्टीनें पाहिलें पाहिजे अशा तऱ्हेच्या गोड गोड थापानें काम भागणार नाहीं. इतकेंच नव्हे तर शास्त्राची प्रगती होण्याचें एकीकडे राहून तें खात्रीनें अधोगतीला जाईल. हल्लीं आम्हांस ज्योषिशास्त्रामध्यें जे धडे शिकावयाचे आहेत ते मानवी संसारयात्रेस मदत करणारे पाहिजे आहत. व याच धोरणानें मालेमध्यें लेख प्रसिद्ध करण्यांत येत आहेत. प्रस्तुत निबंधामध्यें राशींचा अनुभव **सायन** पद्धतीनें येतो किंवा **निरयन** पद्धतीनें येतो हें ज्याचें त्यानें अनुभवानें ठरवावें. आर्यग्रंथकारांनीं जे जे योग सांगितले आहेत ते ज्या तत्वास धरून वर्णन केले आहेत त्याच गुणधर्मीचा विचार करून प्रस्तुतचा निबंध लिहिला आहे. मालेचे वाचक आपापला अनुभव प्रसिद्ध करतील अशी आशा आहे.

जुन्या ग्रंथांमध्यें या विषयासंबंधानें काय लिहिलें आहे किंवा जुन्या ग्रंथकारांचे या विषयासंबंधानें काय विचार आहेत हें मुहूर्त मार्तंड, मुहूर्त चिंतामणी, मुहूर्त गणपती वगैरे ग्रंथांमध्यें पाहण्यास मिळेल परंतु यासंबंधानें **'कालप्रकाशिका'** ग्रंथामध्यें फारच चांगल्या रीतीनें सांगितलें आहे असें वाटल्यावरून त्या ग्रंथामधील भाषांतरासह श्लोक देऊन हा लांबलेला लेख पुरा करण्याचा विचार आहे. श्लोकांमध्यें वर्णन केलेली माहिती पूर्वी वर्णन केलेल्या मूलभूत तत्वास धरून वाचली असतां किंवा त्यांचा विचार केला असतां त्यासंबंधानें जास्त खुलासा होऊन ग्रंथकाराचें म्हणणें कोणतें ग्राह्य आहे व कोणतें अग्राह्य आहे याचें ज्याचें त्याला सहज शास्त्रीय दृष्टीनें निरिक्षण करीतां येईल असें वाटतें.

॥ कृष्यारंभः ॥

अतःपरं प्रवक्ष्यामि कृष्यारम्भमनुत्तमम् । कृषिरेवं प्रधानं हि तन्मूला जगतः स्थितिः ॥ आरभेत कृषिं तस्मात्सर्वयत्नेन बुद्धिमान् । पूर्वं प्रविश्य मेदिन्यां पश्चादरभते कृषिम् ॥ तस्माद्भूमिप्रवेशाय नक्षत्रादिकमुच्यते । उत्तरेषु मखायां च स्वातौ पुष्यानुराधयोः ॥ चैत्रे रौद्रे च याम्ये च कुर्याद्भूमिप्रवेशनम् । ओजस्तु तिथयः सर्वाः प्रशस्ता नवमीं विना ॥ वर्ज्या युग्मा द्वितीया च दशमीं च तथा विना । केचिद्भद्रां वर्जयन्ति दैवज्ञाः क्षमाप्रवेशने ॥ कुजसौम्येन्दुवागीश वारेषु शुभदं भवेत् । मन्दवारादिकं केचिदिच्छन्ति क्षमाप्रवेशने ॥ वृषवृश्चिककन्यासु शुभं भूमिप्रवेशनम् । एवं प्रविश्य पश्चात्तु कृषिकर्म समाचरेत् ॥ शुभवाराः शुभाः सर्वे पापवारा विवर्जिताः । अर्यमर्केतलग्ने च कर्तयं लाङ्गल

दिकम् ॥ मूलादित्योत्तराश्चैव रोहिणीमैत्रमेव च । रेवती पुष्य हस्ताश्च कृषिकर्मणि पूजिताः ॥ विष्णुवास्वम्बुनाथाश्वि वसुचित्रेन्दुभानि च । मखाविशाखामुख्यानित्येवं केचित्प्रचक्षते ॥ गङ्गागुणा गुणा गौरी ईशार्यर्कविमुक्तभात् । कोणेषु कृषिनाशः स्यान्मध्यादिक्षु महत्फलम् ॥ पक्षच्छिद्राश्च रिक्ताश्च पर्वणी च विवर्जिते । शेषास्तु तिथयः सर्वाः कृष्यारम्भे सुपूजिताः ॥ नवम्यां सस्यनाशः स्याच्चतुर्थ्यां कीटसंभवः । पापग्रहोदये मृत्युः कर्तृहन्त्री चतुर्दशी ॥ गोकर्किमृगमीनाश्च मिथुनं चैव पूजिताः । मेषकुम्भालिसिंहाः स्युः वर्ज्याः शेषास्तु मध्यमाः ॥ मेषलग्ने पशोर्हानिः कर्कटे सफलं भवेत् । कण्ठीरवे विनाशः स्यात्तुलायां राज्यसंपदः ॥ बुवक्षेत्रे तु सफलं वृषभे तु फलं भवेत् । वृश्चिके वन्हिदाहः स्याद्धान्यवृद्धिस्तु कार्मुके ॥ मृगे बहुफलं विद्यात्कुम्भे चोरभयं भवेत् । मीने सुभिक्षमायाति कृष्यारम्भे फलं विदुः ॥ पूर्वपक्षे तु कुर्वीत कृष्णपक्षे तु वर्जयेत् । प्राङ्मुखो वा प्रकुर्वीत कृषिकर्मोत्तरामुखः ॥ एवं तिस्रोऽथवा पञ्च कृषिरेखाः प्रकीर्तिताः । अत ऊर्ध्वं न कुर्वीत कृष्यारम्भदिने कृषिम् ॥ भग्नशृङ्गखुरं चैव च्छिन्न लाङ्गूलमेव च । कपिलां वर्जयेतत्र रक्तं कृष्णं च योजयेत् ॥ हलप्रवाहे तत्क्षेत्रे यदिसर्पस्तु दृश्यते । तत्क्षेत्रमन्यदीयं स्यादिति ज्योतिर्विदो विदुः ॥ हलप्रवाहे तत्क्षेत्रे यदि कूर्मस्तु दृश्यते । बहुलाभं हि तत्क्षेत्रं कुर्यात्तस्य न संशयः ॥ कृष्यमाणे हले यत्र भस्माङ्गारस्तुषोस्थि वा । लोष्टके शरदो वापि दृश्यन्ते तद्विवर्जयेत् ॥ यदाचोत्पद्यते दोषो घृतन पयसापि वा । सके दोषा विनश्यन्ति शुभं चास्य प्रयच्छति ॥ लाङ्गूल दण्डिकायूकौ योक्त्रद्वय समन्वितम् । स्थापयेद्दण्ड क्षाणां चण्डाशुस्थितभादिकम् ॥ दण्डलाङ्गूलयुगानां द्विद्विस्थाने त्रिकं त्रिकम् । योत्क्रयोः पञ्चकान्विद्याद्गणानां चक्रलाङ्गले ॥ दण्डस्थे तु गवां हानिः युकस्थे स्वामिनो मृतिः लक्ष्मी लांङ्गूलयोक्त्रस्थे कृष्यारभणवासरे ॥ लाङ्गूले भज्यमाने तु कुलभङ्ग विनिर्दिशेत् । ईषाभङ्गे भवेत्स्त्रीणां यागे कुलपतेः स्वयम् ॥ शमी भङ्गे तु नारीणां योक्रे पुत्रवधो भवेत् । जङ्घाभङ्गे भवेत्सिद्धिः सर्वसस्यानि संपदः ॥ कण्ठे चोरभयं विद्याच्छिद्रके स्याद्धनक्षयः । पादभङ्गे भवेद्वृद्धी रज्जुच्छेदे तु शोभनम् ॥३०

स्पष्टीकरणः—

ज्या शेतीवर सर्व जगत् अवलंबून आहे त्या कृषकर्मास आरंभ करण्याकरितां उत्तम-शुभकालाची कशी निवड करावी यासंबंधानें खालीलप्रमाणें जाणावें.

बुद्धिमान पुरुषानें कृषिकर्मास आरंभ करण्यापूर्वी शुभ दिवस पाहून प्रथमतः शुभ वेळीं भूमीवर प्रवेश करावा नंतर कृषिकर्माचीं कृत्यें नांगरणें वगैरे करावींत.

भरणी, आर्द्रा, पुष्य, मघा, उत्तराफाल्गुनी, चित्रा, स्वाति, अनुराधा, उत्तराषाढा, व उत्तराभाद्रपदा या नक्षत्रांवर कृषिकर्म करण्याकरितां प्रथम भूमिप्रवेश करावा. नक्षत्रें भूमिप्रवेशास उक्त होत.

नवमीखेरीज सर्व विषय (१,३,५,७,९,११,१३,१५) तिथि उक्त होत. सम (२,४,६,८,१०,१४) तिथींपैकीं द्वितीया व दशमीखेरीज बाकीच्या समतिथि भूमिप्रवेशास वर्ज्य आहेत. कांहीं ज्योतिर्विद भद्रातिथि (द्वितीया, सप्तमी व द्वादशी ह्या भद्रा तिथि होत) भूमिप्रवेशास वर्ज्य सांगतात.

प्रथमभूमिप्रवेशास सोम, मंगळ, बुध व गुरु वार उक्त होत. कित्येक शनिवार भूमिप्रवेशास उक्त असें सांगतात.

वृषभ, वृश्चिक व कन्या हीं लग्नें भूमिप्रवेशास चांगलीं आहेत. सर्व कार्यास शुभग्रहांचे वार चांगले परंतु पापग्रहांचे वार वर्ज्य करावेत. सिंह किंवा सूर्य ज्या राशीवर असतो ती राशि किंवा तें नक्षत्र किंवा तो ज्याचा स्वामी आहे तें नक्षत्र शुभ जाणावें. याप्रमाणें पाहून भूमिप्रवेश केल्यानंतर कृषिकर्मास आरंभ करावा.

रोहिणी, पुनर्वसु, पुष्य, उत्तराफाल्गुनी, हस्त, अनुराधा, मूल, उत्तराषाढा, उत्तराभाद्रपदा, रेवती हीं नक्षत्रें कृषिकर्मास श्रेष्ठ म्हणजे उत्तम मानिलीं आहेत. कित्येक ज्योतिर्विद् अश्विनी, मृगशीर्ष, मघा, चित्रा, स्वाती, विशाखा, धनिष्ठा, शततारका, हीं नक्षत्रें कृषिकर्मास उक्त मानतात. सूर्य ज्या नक्षत्रावर असेल त्यापासून ३,४,५,६,७,११,१२,१३,१४,१५,१९,२०,२४,२५ व २६ वें हीं नक्षत्रें कृषिकर्मास आरंभ करण्यास उक्त मानतात. यांखेरीज बाकीच्या नक्षत्रांवर कृष्यारंभ करूं नये.

कृषिकर्मास आरंभ करण्यास चतुर्थी, षष्ठी, अष्टमी, नवमी, द्वादशी, चतुर्दशी, पौर्णिमा व अमावास्या यांखेरीज बाकीच्या तिथि शुभ जाणाव्यात.

नवमीवर कृषिकर्मास आरंभ केला असतां पिकाचा नाश होतो. चतुर्थीवर केला असतां पिकाचा कीड लागून किंवा पिकांवर होणाऱ्या रोगानें पिकाचा नाश होतो. पापग्रह लग्नांत उदय पावत असतां कृष्यारंभ केला असतां पीक मरतें. व चतुर्दशीवर कृषीचा आरंभ केला असतां कृषि करणारा मरतो.

ज्योतिर्माला

मासिक-पुस्तक.

अप्रत्यक्षाणि शास्त्राणि विवादस्तेषु केवलम् ।
प्रत्यक्षं ज्योतिषं शास्त्रं चंद्रार्कौ यत्र साक्षिणौ ॥ १ ॥
यथा शिखा मयूराणां नागानां मणयो यथा ।
तद्वेदांग-शास्त्राणां ज्योतिषं मूर्द्धनि स्थितम् ॥ २ ॥

अभिनवाऽऽवृत्ति वर्ष ५ वें

(पृष्ठें १ ते १८८)

संपादक—यशवंत केशव प्रधान.

मेसर्स वैद्य ब्रदर्स यांचे छापखान्यांत गजानन भास्कर वैद्य यांनीं ठाकुरद्वार, मुंबई, येथें छापून यशवंत केशव प्रधान यांनीं दादर, राउताची वाडी, येथें प्रसिद्ध केलें.

इ. स. १९२०.

(वार्षिक वर्गणी टपाल खर्च सह रु. १॥)

ज्योतिर्माला

(वर्ष ९ वें एप्रिल सन १९१९ ते मार्च १९२०.)

विषयांची अनुक्रमणिका.

विषय		पृष्ठ.
१ आक्षेपकांचीं तोंडें बंद झालीं नाहींत	अंक ११।१२	१६९
२ ईशप्रार्थना	अंक १ ला	१
३ ग्रहदृष्टिविचार	अंक २ रा	२९
४ डोळे कोणी उघडायचे	अंक ९ वा	६९
५ गुरुनेपच्युन युतियोगासंबंधानें कांहींज्योतिर्विदांचे विचार	अंक६ वा	८७
६ चरित्रात्मक कुंडली संग्रह (कै. केरुनाना छत्रे)	अंक ७।८	१०७
७ ज्योतिषशास्त्रसंबंधी कांहीं प्रसिद्ध पुरुषांचीं मतें	अंक ७।८	१२६
८ तिथिविचार	अंक ३ रा	४१
९ पश्चिभ्रमणपद्धति	अंक ४ था, ९ वा	५९,७३
१० पत्रव्यवहार	अंक ६ वा	८९
११ पराज्योतिर्विद्या किंवा आंतर्ज्योतिषज्ञान	अंक ११।१२	१७३
१२ फलज्योतिषशास्त्रदृष्ट्या वातावरणाचा विचार	अंक १ ला	३
१३ लोकमान्यांचे लाकूम	अंक ६ वा	८४
१४ वसिष्ठकालीन दुहेरा संक्रांति	अंक ४ था	५४
१५ वार्षिक समालोप	अंक ११।१२	१९७
१६ राशीवरुन नक्षत्रज्ञान	अंक ७ व ८	१२१
१७ रासनांव	अंक ११।१२	१६६
१८ सन १९२० साल कसें जाणार ?	अंक ९।१०	१२९
१९ सांपातिक वर्षगती पटवर्धन	अंक ९।१०	१४९
२० सांगली ज्योतिषसंमेलन आणि सायन पंचांग	अंक ११।१२	१६०
२१ सिंहस्थ नेपच्यून	अंक ९।१०	१५४
२२ सूर्यावरील डाग	अंक ७।८	९७
२३ स्फुटविचार	अंक २ रा, ३ रा, ४ था, ५ वा, ६ वा, ७।८।११।१२	१७, ३३, ४९, ६३, ८१, ११७ १८१

॥ श्रीसद्गुरवे नमः ॥

ज्योतिर्माला

आप्राचः कामरूपाद्द्रुहिणसुतनदप्लावितादाप्रतीचो
गान्धारात् सिंधुसार्द्राद्रघुवररचितादाचसेतोरवाचः ।
आक्रेदारादुदीचस्तुहिनगहनतः सन्तिविद्वत्समाजा
ये ये तानेष यत्नः सुखयतु समजान्कश्चमत्कर्तुमीष्टे ॥ १ ॥

अभिनवाऽऽवृत्ति वर्ष ५ वें. } एप्रिल १९१९. { अंक १ ला.

" ईशप्रार्थना "

(रा. रामचंद्र राजाराम मोकाशी. ठाणें)

पद-चाल—मी नववाला जोगीण.

अयि ! जगदंबे ! नमि पदकमलां ॥ नमि पदकमलां आरंभ झाला ॥
आरंभ झाला नव अयनाला ॥ धृ० ॥
अनन्य भावें करि विनतीला ॥ शांतिसुखा दे चराचराला ॥
सनातना ही " ज्योतिर्माला " ॥ समजुनि अपुली प्रेमळ बाला ॥
निशिदिनिं प्रतिमासीं वर्षाला ॥ अंकाश्रय दे शुभ कर इजला ॥१॥
(अयि ! जग०)

नील नभाचें वसन इयेला ॥ कृपाप्रसादा दे शालूला ॥
रवि शशि पदकें शोभति जीला ॥ तारकततिची मोहनमाळा ॥
सुदिव्य तेजोमय ही बाला ॥ यंत्रशोधही नमी तियेला ॥ २ ॥
(अयि०)

पार न मंगलमय सूत्राला ॥ सुर शर बिंदी परिधानाला ॥
नभो जान्हवी गळेसरीला ॥ चमक हिऱ्यांची विद्युन्माला ॥
कृष्णमेघ निर्शिदिनिं अशिवाला ॥ सारुनि नांदो ही सुरबाला ॥३॥
(अयि०)

आळस मत्सर राहु केतुला ॥ दुष्टग्रह युति ने विलयाला ॥
तम अवनतिचा नाशायाला ॥ प्रशांत अरुणोदय हा झाला ॥
राष्ट्रोन्नतिच्या प्रभातकाला ॥ स्वतेज रवि दे मिरवायाला ॥ ४ ॥
(अयि०)

पद २.

(चाल–शंभो शिवहर)

अंबे ! शुभकर कर हे वत्सर, सकलांनां ॥ जोडी हे कर ॥ धृ० ॥
विलया ने रणकलहाला ॥ शांतिसुखा दे, दे धनधान्यहि,
सुखविं चराचर विनवी किंकर ॥ १ ॥ अं.
नानाविध हे रोग किती । छळिती आम्हां,
करितो जर्जर, ये ये सत्वर, वेगें ते हर ॥ २ ॥ अंबे.
" ज्योतिर्माला " तव बाला । देवि ! कृपा तव
ठेवी पाखर, नांदो भूवर, रविशशि तोंवर ॥ ३ ॥ अंबे.

पद ३.

[चाल–आनंदी आनंद गडे]

धन्य ! जगीं "ज्योतिर्माला" । रमवी जे निशि विश्वाला ॥धृ॥
चमकत सारी कृष्ण घना । चंद्र विलोल दिसे नयनां ॥
आड मेघपट ॥ मार्गीं संकट ॥ नाशी झटपट ॥
थोर उद्यमें धरि द्युतिला ॥ विजय श्री घाली माळा ॥ १ ॥
मौज दिसे ती बाळांना ॥ ओषधिचा उगवे राणा ॥
मति अंकुर स्फुरवी त्यांनां । वाढवि ज्ञानाच्या पाना ॥
पूर्ण भरानें ॥ विकसित सुमनें ॥ फलभारानें ॥
दाविति कीं सत्कीर्तीला । सृष्टीला–निज मातेला ॥ २ ॥

फलज्योतिषशास्त्रदृष्ट्या वातावरणाचा विचार.

उपोद्घात.

आपल्या पृथ्वीसभोंवतीं जें हवेचें आवरण आहे त्यास वातावरण असें म्हणतात. हें वातावरण कसें बनलेलें आहे, त्याचे घटकावयव काय काय आहेत, वगैरे गोष्टींसंबंधानें चालू लेखामध्यें विचार करण्याचें कारण दिसत नाहीं. त्याच प्रमाणें वातावरणामध्यें उष्णता, गारठा, हवेचे प्रवाह, पाऊस वगैरे गोष्टी ऋतुमानांप्रमाणें नित्य होणाऱ्या घडामोडी कशा होतात यासंबंधानेंही प्रस्तुतच्या निबंधांमध्यें साग्र माहिती देतां येईल असें दिसत नाहीं. कारण एक तर तो विषय फारच मोठा आहे व त्यासंबंधीं अनेक लहानमोठे ग्रंथ प्रकाशित झालेले आहेत.

दररोजच्या हवेमध्यें नित्य होणारे फेरफारांची सविस्तर माहिती मेट्रालाजिकल खात्याकडून प्रसिद्ध होत असते. वातावरणाच्या किंवा हवेच्या प्रवाहाचे व हवेच्या भारादि गोष्टींचें व्यवस्थित रीतीनें निरीक्षण करून त्यावरून पुढील अंदाज करण्यासाठीं आपल्या सरकारानें हजारों रुपये खर्च करून ठिकठिकाणीं

वेधस्थळें ठेविलीं आहेत. तेथून दररोजच्या हवामानाचे रिपोर्ट व अंदाजपत्रकें, वादळासंबंधी व वृष्टीसंबंधानें सूचना देण्यांत येत असतात. लक्षावधी रुपये खर्च करून हें सरकारचें लाडकें खातें विशेष महत्वाचें काम करीत आहे असें दिसत नाहीं, भूकंपादि उत्पात, मोठालीं वादळें वगैरे संबंधानें या खात्यास दोनतीन दिवसांपेक्षां जास्त अगोदर सूचना किंवा भविष्य करितां येत नाहीं. एखाद्या वर्षामध्यें होणारी भयंकर वृष्टी तर अनावृष्टी, भयंकर हिंवाळा तर भयंकर उष्णता यांसंबंधानें तर बिलकुलच कळत नाहीं. लक्षावधी रुपायांची मदत, उत्तम सूक्ष्म वेधयंत्रें व आजपर्यंतच्या लक्षावधी वेधसामुग्रीचा संग्रह करून हें शास्त्र इतक्या शोचनीय स्थितीमध्यें आहे ही खरोखर विचार करण्यासारखी गोष्ट आहे.

सृष्टी चमत्कारांकडे प्रत्येकाचें लक्ष लागणें नैसर्गिक आहे व त्याप्रमाणें भारतीय आर्यांचें फार प्राचीनकाळापासून या विषयाकडे लक्ष लागल्याचें दिसत आहे. अमुक अमुक सृष्ट चमत्कार कां व केव्हां होतात व त्यांसंबंधानें पुढें काय काय आढळण्यांत येतें याबद्दलचे विचार त्यांनीं ठिकठिकाणीं नमूद केलेले आहेत. या दृष्टीनें भारतीय आर्यांनीं या शास्त्रासंबंधीं केलेलें निरीक्षण महत्वाचें आहे. व या दृष्टीनें शास्त्रीय व चिकित्सक बुद्धीनें त्याचें परिशीलन होऊन भारतीय आर्यांच्या वातावरण शास्त्राचा समग्र इतिहास प्रसिद्ध होणें अत्यंत जरूरीचें आहे. हल्लीं लक्षावधी रुपयांचीं यंत्रें जें सद्योवृष्टीचें ज्ञान किंवा हवेमध्यें थोडक्याच अवधीमध्यें होणारे फेरफारांचे जें ज्ञान करून देत आहे तेंच ज्ञान आमच्या पूर्वजांनीं यंत्रसामुग्रीचा विशेष बडेजाव न माजवितां सृष्टिनिर्मित झाडें प्राणी, वगैरे यांचेमध्यें होणाऱ्या फेरफारांवरून जाणण्याचा मार्ग आंखून ठेविला आहे. कांहीं जणांस हा प्रकार गांवढळ व कांहीं तरी वाटेल. परंतु विचाराअंतीं व त्याबद्दल सत्यासत्यतेचा शोध केल्यानंतर भारतीय आर्यांची सृष्ट चमत्कारांचें सूक्ष्म निरीक्षण करण्याची पद्धति पाहून आश्चर्य वाटल्याखेरीज राहणार नाहीं. अमुक एक गोष्ट कां घडते व त्याचें शास्त्रीय कारण काय आहे हें ठरविण्याचा विशेष प्रयत्न त्या काळीं झाला नाहीं. किंबहुना जुन्या ठेवीमध्यें मुळींच भर न पडतां असलेला साठाही कांहीं अध्यापारेषु व्यापारामुळें पुष्कळच विस्कळीत व बराच दुर्बोध झाला असला तरी कुशल व बुद्धिमान माणसांनीं या गोष्टीचा विचार केला असतां त्यांतन पुष्कळच उपयुक्त गोष्टी उपलब्ध होतील.

सरकाराचा भरपूर आश्रय असलेले चालू युगामधील वायुशास्त्रवेत्ते वातावरणाचा विचार करते वेळीं सूर्याची उष्णता, पृथ्वीची वार्षिक गती व भूरचना यांचाच विचार करितात. व त्या अनुरोधानें प्रत्येक वर्षाचा पावसाळा, वादळी हवा वगैरेसंबंधीं अनुमानें प्रसिद्ध करीत असतात. ही अनुमानें त्यांस महिनेच्या महिने अगोदर करितां येत नसल्याचा उल्लेख मागेंच केला आहे. त्याचप्रमाणें त्यांस अनावृष्टी, भयंकर उष्णता किंवा थंडी यांसंबंधानें देखील निश्चित अशी माहिती जनतेस देतां येत नाहीं. फलज्योतिषशास्त्रदृष्ट्या अनेक उपाधींची जरूर न घेतां वातावरणासंबंधीं होणारे भयंकर फेरफार पुष्कळ वर्षें अगोदर नसले तरी एक वर्षापूर्वी सांगतां येतील किंवा नाहीं याचा विचार प्रस्तुत निबंधामध्यें करण्याचें योजिलें आहे. त्याचप्रमाणें आपल्या कडील बऱ्याच ज्योतिर्विदांस या विभागासंबंधी चांगली कल्पना नसल्यामुळें त्यांचेमध्यें बऱ्याच चुकीच्या व भ्रामक समजुती आहेत. त्या नष्ट होऊन वाचकांस या विषयासंबंधी शास्त्रीय माहिती व्हावी व कित्येक व्यक्तींच्या हवेच्या भविष्याच्या संबंधीच्या दर्पोक्तीस थोडा तरी आळा पडावा या हेतूनें या विषयासंबंधानें खुलासेवार व आम्हांस जी माहिती आहे ती प्रांजळपणें वाचकांपुढें मांडण्याचें ठरविलें आहे. वस्तुतः प्रस्तुतच्या लहानशा निबंधांत या विषयासंबंधानें सर्व कांहीं एकदम सांगता येईल असें जरी नाहीं तरी या नवीन विषयाचीं जीं मूलतत्वें पुष्कळांस माहीत नाहींत व ज्या योगानें हा विभाग दुर्बोध झाला आहे तीं सर्व चालू निबंधामध्यें सांगण्याचें योजिलें आहे. व जो कोणी या मूळतत्वांचा चांगला विचार करील त्यास या विषयावर स्वतंत्र बुद्धीनें विचार करण्याची दिशा सुलभ व सरळ होऊन पुष्कळच अचूक भविष्यें करितां येतील अशी खात्री आहे.

प्रस्तुत विषयामध्यें ऋतुमानाप्रमाणें हवेमध्यें कसकसे फरक होतील, वृष्टी कशी होईल केव्हां होईल, अवर्षणें केव्हां पडतील, अति उन्हाळा, भयंकर थंडी, वादळें, विद्युत्पात् वगैरे गोष्टी केव्हां होतील यांचा समावेश होतो. व या गोष्टींसंबंधीं ज्योतिषशास्त्राधारें पुष्कळ अगोदर भविष्यें करितां येतात असा आमचा समज आहे. व तीं भविष्यें कशीं करावीं याबद्दलची चर्चा चालू निबंधांत करणें

आहे. आर्य ग्रंथांमध्यें यासंबंधानें बरीच विस्कळीत अशी माहिती असून प्रत्येक राष्ट्रामध्यें या विषयासंबंधानें फार प्राचीन काळापासून विचार होऊन कांहीं कांहीं आडाखे बसलेले आहेत. त्यांचाच प्रस्तुत निबंधामध्यें विचार करण्याचा मानस आहे. विषयरचना सुलभ व्हावी म्हणून नुसत्या श्लोकांचा अर्थ देऊन भागणार नाहीं असें जाणून तो सर्वांस सुगम व्हावा व अगदीं नवशिक्या विद्यार्थ्यांस देखील कळावा अशा तऱ्हेनें लिहिण्याचें योजिलें आहे. हा प्रयत्न किती यशस्वी झालेला आहे या गोष्टीचा विचार वाचक वर्ग करील.

विषय प्रवेश—ऋतुविचार.

आधुनिक शास्त्राप्रमाणें विचार करितां आपल्या पृथ्वीवरील हवामान, उष्णता, वारा, पाऊस इत्यादि वातावरणविषयक एकंदर घडामोडी सूर्यावर अवलंबून आहेत. हवामान साधारणपणें कांहीं महिने एकसारखें चाललें म्हणजे आपण त्यास ऋतु असें म्हणतों. व ज्या अर्थी हवामान सूर्यावरच अवलंबून आहे त्या अर्थी ऋतुही सूर्यावरच अवलंबून असले पाहिजेत. ऋतु होण्यास मुख्य कारण विषुववृत्त व क्रांतिवृत्त यांमधील २३½ साडेतेवीस अंशांचा कोन होय. पृथ्वी आपल्या दीर्घवर्तुळ कक्षेमधून सूर्याभोंवती एक वर्षांत प्रदक्षिणा करिते. त्याचाच अर्थ असा कीं सूर्य आकाशाचा थोडाथोडा भाग आक्रमीत वर्षामध्यें एक फेरा पुरा करून निघालेल्या ठिकाणीं परत येतो. रोजच्या हवामानामध्यें थोडा थोडा फरक होत होत निरनिराळ्या ऋतूंतील निरनिराळें हवामान उत्पन्न होऊन सूर्याच्या एका भ्रमणाबरोबर ऋतूंचा एक फेरा पुरा होतो. हवामानामध्यें रोजचा फरक फारच कमी असल्यामुळें एक ऋतु संपून दुसरा लागण्याची वेळ आली किंवा काय हें कळत नाहीं. किंवा अमुक ऋतूचाच आरंभ अमुक एका दिवशीं होईल हें हवामानावरून सांगतां येत नाहीं. पण ही अडचण सूर्याच्या गतीमुळें नाहींशी करितां येते. सूर्याच्या एका फेऱ्याबरोबर ऋतूंच्या चक्राची समाप्ती होत असल्यामुळें. सूर्याच्या भ्रमण मार्गांतील ठळक बिंदूवरून अमुक एका ऋतूचा आरंभ झाला किंवा काय हें सांगता येतें.

आपली पृथ्वी किंवा सूर्य क्रांतिवृत्तामधून न फिरतां विषुव वृत्तांतूनच फिरता किंवा क्रांतिवृत्त व विषुववृत्त यांमध्यें कोन मुळींच नसता तर

आपल्या पृथ्वीवर ऋतुही मुळींच पाहण्यास मिळाले नसते. परंतु विषुववृत्त व क्रांतिवृत्त यांमध्यें साडेतेवीस अंशांचा कोन असल्याकारणानें सूर्य क्रांतिवृत्तांतून फिरतांना वर्षांतून, विषुववृत्ताच्या दक्षिणेस साडेतेवीस अंश व उत्तरेस साडेतेवीस अंश जातो. साधारणपणें २२ मार्चला सूर्य विषुववृत्तावर **मेष संपातीं** आढळतो. तेथून हळुहळु उत्तरेकडे जात जात तो २२ जूनला **कर्कवृत्तीं** येतो व दक्षिणायनास सुरुवात होते. नंतर हळुहळु दक्षिणेकडे येत येत बावीस सप्टेंबरच्या सुमारास विषुववृत्तावर **शारद संपातीं** किंवा **तुला संपातीं** येतो. नंतर निषुववृत्ताच्या दक्षिणेस जाऊन २२ डिसेंबरला **मकरवृत्तीं** येतो व उत्तरायणास किंवा उदगयनारंभ होतो. नंतर २२ मार्चला पुन्हा वसंत संपातीं येतो. याप्रमाणें सूर्य उत्तर गोलार्धांत सहा महिने असतो व दक्षिण गोलार्धामध्यें सहा महिने असतो. या सूर्याच्या गतीबरोबर रोजचें हवामान थोडें थोडें बदलून वर्षांतून सर्व ऋतूंचा एक फेरा होत असतो. सूर्यावर ऋतु अवलंबून असल्याकारणानें वस्तुतः ऋतु दोनच व्हावयास पाहिजेत. एक उन्हाळा व दुसरा हिंवाळा. सूर्य उत्तर गोलार्धामध्यें सहा महिने असतो व त्यामुळें उत्तर गोलार्धामध्यें सहा महिने उन्हाळा व दक्षिण गोलार्धामध्यें सहा महिने हिंवाळा होतो व ज्या काळीं सूर्य दक्षिण गोलार्धामध्यें सहा महिने असतो त्या वेळीं दक्षिण गोलार्धामध्यें सहा महिने उन्हाळा व उत्तर गोलार्धामध्यें सहा महिने हिंवाळा होतो. परंतु एवढयाच दोन ऋतूंनीं भागत नाहीं. उन्हाळ्यांत व हिंवाळ्यांत निरनिराळें हवामान पाहण्यास मिळतें म्हणून निरनिराळे ऋतु मानावे लागतात. कांहीं देशांमध्यें दोन अयनें व दोन विषुनें यांमधील प्रत्येक तीन महिन्यास एक याप्रमाणें चार ऋतु मानतात. आपल्याकडे मुख्य ऋतु तीन होतात–उन्हाळा, पावसाळा व हिंवाळा. पण या प्रत्येकाचे दोनदोन भाग करून सहा ऋतु मानण्याची चाल आहे. बावीस मार्चला सूर्य विषुववृत्तीं संपातीं आला म्हणजे वसंत ऋतूस आरंभ होतो व उन्हाळ्यामध्यें **वसंत, ग्रीष्म,** व **वर्षा** असे तीन ऋतु होतात. बावीस सप्टंबरला सूर्य दक्षिण संपातीं आला म्हणजे शरद् ऋतूस आरंभ होतो व हिंवाळ्यांत **शरद् हेमंत** व **शिशिर** असे तीन ऋतु होतात. सुगमतेकरितां खालील कोष्टक पहा.

सांपतिक सौरवर्ष.



यावरून कोणत्या महिन्यांत कोणता ऋतु असावयास पाहिजे हें सहज कळेल. चैत्रापासून अश्विनापर्यंत उन्हाळा असतो यांत तीन निरनिराळ्या प्रकारचें हवामान असतें. वसंतांत सौम्य सुखकर हवामान, ग्रीष्मांत प्रखर उन्हाळा. वर्षामध्यें पाऊस. अश्विनापासून चैत्रापर्यंत हिंवाळा असतो यांतही तीन निरनिराळ्या प्रकारचें हवामान पाहण्यास मिळतें. शरद् ऋतूंतील हवामान, हेमंताची कडक थंडी व शिशिरांतील हवामान.

अयनचलन व अयनांशविचार.

सूर्य ज्या मार्गानें पृथ्वीभोंवतीं फिरतोसा दिसतो, त्याला **क्रांतिवृत्त** म्हणतात. ज्या वर्तुळाच्या योगानें पृथ्वीचे उत्तर गोलार्ध व दक्षिण गोलार्ध असे सारखे दोन विभाग होतात त्याला **विषुववृत्त** म्हणतात. भूविषुववृत्ताला समांतर असें दुसरें वृत्त कल्पिलें किंवा विषुववृत्ताची मर्यादा आकाशामध्यें कल्पिली म्हणजे जें वृत्त होतें तें **खविषुववृत्त** होय. हें **खविषुववृत्त** व **क्रांतिवृत्त**–पृथ्वीचा भ्रमणमार्ग आकाशामध्यें एकमेकांस छेदितात त्यास **संपातबिंदु** म्हणतात. पृथ्वीचा भ्रमणमार्ग खविषुववृत्तामधून नसल्याचा मागेंच उल्लेख केला आहे. त्याचप्रमाणें पृथ्वीच्या भ्रमणमार्गामध्यें व खविषुववृत्तामध्यें आज मितीला सरासरी २३ अं. २७ कलेचा कोन असल्याचेंही सांगितलें आहे. पृथ्वी क्रांतिवृतांतून फिरतांना आपला आंस नेहमीं समांतर धरून फिरते. त्यामुळें विषुव वृत्तही समांतरच राहतें. क्रांतिवृत्त व विषुववृत्त हीं दोन महावर्तुळें ज्या ठिकाणीं एकमेकांस

छेदितात त्या बिंदूंस संपातबिंदु किंवा विषुवें म्हणतात. या दोन बिंदु सांधणाऱ्या रेषेला संपात रेषा किंवा विषुव रेषा म्हणतात. दोन्ही संपातांपासून ९० अंशांवर अयनबिंदु आहेत. त्यांस साधणाऱ्या रेषेला अयन रेषा म्हणतात. विषुव रेषा व अयन रेषा ह्या एकमेकींस लंब असतात. म्हणजे दोन अयनें व दोन विषुवें मिळून क्रांतिवृत्ताचे ९०,९० अंशांचे किंवा तीनतीन राशींचे चार विभाग होतात. परंतु येवढ्यानेंही ही भानगड मिटत नाहीं. वर सांगितलेला संपातबिंदु हा स्थिर नाहीं. या दोन वृत्तांच्या छेदन बिंदूंस गति आहे. म्हणजे एका वर्षीं ज्या ठिकाणीं छेद झाला तेथेंच दुसऱ्या सालीं हीं दोन्हीं महावृत्तें एकमेकांस छेदीत नाहींत. एका सालीं ज्या ठिकाणीं हा छेदन बिंदु येतो, त्याच्या पुढल्या सालीं त्या ठिकाणाच्या मागें कांहीं अंतरावर हा छेद होत असतो. याच छेदन बिंदूंना संपात असें म्हणतात. पैकीं एकाला वसंतसंपात व दुसऱ्याला शरत्संपात असें म्हणतात. कारण, या दोन संपात बिंदूंवर सूर्य येतो तेव्हां अनुक्रमें वसंत व शरत् या ऋतूंचा आरंभ होत असतो. यांनाच अनुक्रमें मेष संपात व तुला संपात अशीं नांवें आहेत. संपात बिंदूंना विलोम गती असल्याचें पूर्वीच सांगितलें आहे व त्यामुळें अयनें व विषुवें हीं दर वर्षीं थोडीं थोडीं मागें सरकत असतात व त्यामुळें ऋतूंच्या आरंभ कालामध्यें फरक झालेला पाहण्यास मिळतो.

कै. केरूनाना छत्रे यांच्या सूक्ष्म निरयन पद्धतीप्रमाणें शा. श. ४९६ या वर्षीं वसंत संपात रेवती योगतारा जी झिटापिशिय त्या तारेमध्यें होता; म्हणजे क्रांतिवृत्त व खविषुववृत यांचा एक छेदनबिंदु त्या वर्षीं त्या तारेमध्यें पडला होता, अर्थात सूर्य त्या वर्षीं क्रांतिवृत्तापैकी रेवती योगतारेवर आला तेव्हां त्याचा खविषुवालाही स्पर्श झाला. परंतु शके ४९७ मध्यें रेवती योगतारेच्या मागें ५० विकलांवरचा क्रांतिवृत्तावरचा बिंदु त्या बिंदूवर येतांच सूर्याचा खविषुवाला स्पर्श झाला. हाच क्रम अद्याप चालू असून पुढेंही निरंतर असाच चालणारा आहे. यांसच संपातचलन असें म्हणतात.

शा. शके ४९६ मध्यें रेवती योगतारेशीं मेष संपात होता म्हणून निरयन व सायन राशिचक्राचा किंवा नक्षत्रचक्राचा आरंभ एकत्र होता. परंतु शा. श. ४९७ मध्यें हाच मेष संपात रेवती योगतारेच्या मागें ५० विकलांवर

आला व सायन नक्षत्रचक्राचा आरंभ या संपातापासूनच मानिलेला असल्याकारणानें त्या वर्षी (शा. श. ४९७) सायन अश्विनीचा आरंभ व निरयन अश्विनीचा आरंभ यामध्यें ५० विकलांचें अंतर पडलें. व हाच क्रम अद्यापि चालू असून आजला १८ अं. ४१ क. अंतर पडल आहे. (शके १८४१-४९६ १३४५=५० वि. संपातगती=६७२५० विकला=१८ अं. ४० कला ५० वि.) म्हणजे एकनक्षत्र ५ अंश व ४१ कला इतकें वाटलें आहे. म्हणजे सध्या कै. केरोपंतांच्या सूक्ष्म निरयन अश्विनीचा अथवा मेषराशीचा आरंभ होतो तेथें सायन भरणी नक्षत्राचे ५ अं. ४१ कला झालेल्या आहेत.

संपात चलनाची कारणें वगैरे प्रकार सामान्य वाचकांस जरा दुर्बोध वाटण्यासारखी असून त्याची प्रस्तुतच्या विषयाला जरी आवश्यकता आहे तरी त्याचा विस्तारानें येथें उहापोह करण्याचें कारण दिसत नाही. ही सर्व उपपत्ति आपल्या उपलब्ध ज्योतिष ग्रंथांत जरी निटशी मिळत नाहीं तरी संपातचलन हें कसेंही होवो, तें होतें खचित, इतकी गोष्ट आपल्या ज्योतिष्यांना सर्वथा मान्य आहे. ही गति उत्पन्न होण्याचें कारण असें आहे कीं पृथ्वी जरी साधारण मानानें गोल आहे तरी ती पूर्णपणें गोल नाहीं. ध्रुवापेक्षां विषुववृत्तावरील भाग सुमारें तेरा मैलांनीं फुगलेला आहे म्हणजे ध्रुवांतून जाणाऱ्या व्यासापेक्षां विषुषवृत्तांतून जाणारा व्यास २६ मैलांनीं मोठा आहे. पृथ्वी जर बरोबर गोल असती तर चंद्र सूर्य यांचें आकर्षण बरोबर मध्य बिंदूंतून गेलें असतें. परंतु या विषुव वृत्तावरील फुगलेल्या भागावर चंद्रसूर्यांचें जास्त आकर्षण होऊन पृथ्वीचें आंसास थोडी गति प्राप्त झाली आहे. पृथ्वी सूर्याभोंवतीं फिरतांना आपला आंस नेहमीं समांतर ठेवून फिरते हें खरें; परंतु या वर सांगितलेल्या असमान आकर्षणामुळें तो बरोबर समांतर नसतो त्यास थोडी गति प्राप्त होते. ही गति पूर्वेकडून पश्चिमेकडे आहे. क्रांतिवृत्ताचे ध्रुवास कदंब म्हणतात. क्रांतिवृत्त व विषुववृत्त यामध्यें साडेतेवीस अंशांचा कोन आहे. अर्थात् क्रांतिवृत्ताचे ध्रुवाभोवतीं, विषुववृत्ताचा ध्रुव, या अल्प गतीमुळें साडेतेवीस अंश त्रिज्येच्या वर्तुळांतून प्रदक्षिणा करितो. हा प्रदक्षिणाकाळ सुमारें २६००० वर्षांचा आहे. ही पृथ्वीचे आंसाची गति विषुववृत्तास लंब असल्याकारणानें विषुववृत्तासही भासते व विषुवें व अयनें क्रांतिवृत्तावर विषुववृत्ताबरोबर २६००० वर्षांत एक फेरा करितात. वेदांग ज्योतिष-

काळीं म्हणजे सुमारें ३३०० वर्षांपूर्वी सूर्याचें उदगयन धनिष्ठा नक्षत्राच्या आरंभीं होत असे, वराहमिहिराचे वेळीं उत्तराषाढाच्या दुसऱ्या चरणीं होत असे व हल्लीं मूळनक्षत्राच्या तिसऱ्या चरणांत होतें. खालील प्रमाणें वराहमिहिर आपल्या बृहत् संहितेमध्यें म्हणतो—

आश्लेषार्धाद्दक्षिणं उत्तरमयनं रवेर्धनिष्ठाद्यम् ।
नूनं कदाचिदासीद्येनोक्तं पर्वशास्त्रेषु ॥
सांप्रतमयनं सवितुः कर्कटकाद्यं मृगादितश्चान्यत् ।
उक्तभावो विकृतिः प्रत्यक्ष परीक्षणैर्व्यक्तिः ॥

वर्षारंभ अमुकच ठिकाणीं केला पाहिजे असा नियम नाहीं. परंतु सर्वत्र मेषराशीपासून वर्षारंभ करण्याची चाल आहे. त्याप्रमाणें विषुवें मेष व तुला राशींच्या आरंभीं झालीं पाहिजेत व अयनें कर्क व मकरराशीच्या आरंभीं होतात. ज्या चांद्रमहिन्यांत सूर्याचें मेषसंक्रमण होतें त्यास चैत्र म्हणतात. ज्यांत वृषभ होतें त्यास वैशाख म्हणतात. या प्रमाणें बारा महिने होतात. आपण चांद्रमास धरितों, परंतु सुमारें तेहतीस महिन्यांनीं एक अधिक मास धरून वर्ष सौरमानाबरोबर करून घेतों. वसंत संपातीं सूर्य आल्यापासून पुन्हां तो वसंतसंपातीं येईपर्यंत जो काळ जातो त्यास सांपातिक सौरवर्ष म्हणतात. ऋतु सूर्यावर अवलंबून आहेत अर्थात सांपातिक सौर वर्षांत सर्व ऋतूंचा एक फेरा होतो. संवत्सर शब्दाची खालील प्रमाणें व्याख्या सांगितलेली आहे. "संवसन्ति ऋतवः यस्मिन् सः संवत्सरः" म्हणजे ज्यांत ऋतु वास करितात, अर्थात जो ऋतूंचाच बनला आहे, तो संवत्सर होय. संवत्सर म्हणजेच वर्ष. वरील विवेचनावरून दिसून येईल कीं, या व्याख्येप्रमाणें मेष संपातापासून निघून दुसऱ्या वर्षीच्या मेषसंपातापर्यंत फिरण्याला सूर्याला जो काळ लागतो, तें वर्ष होय. कारण मेष संपातीं सूर्य आला म्हणजे फिरून वसंतास प्रारंभ होतो. व या दृष्टीनें पाहिलें असतां ऋतु सूर्याच्या निरयन राशिप्रवेशावर बिलकुल अवलंबून नसून ते रवीच्या सायन राशिप्रवेशावरच सर्वथा अवलंबून आहेत. या विषयीं कोणाचा वाद नाहीं. निरयन पंचांगांत जें वर्ष मानितात तें याहून भिन्न आहे. एकदां सूर्य रेवती योगतारेशीं आलेला दिसला, म्हणजे तो फिरून त्या तारेशीं आलेला

दिसेपर्यंत जो काळ जातो त्यांस निरयन पंचांगांत वर्ष समजतात. वरील विवेचनावरून दिसून आलेंच असेल कीं, एकदां रेवती योगतारेशीं मेषसंपात झाला कीं, दुसऱ्या वर्षी तो त्या तारेच्या मागें सुमारें ५० विकलांवर होतो. करितां त्या वर्षी खऱ्या ऋतुपर्यात्मक वर्षाला सूर्य रेवतीशीं येण्याचे अगोदर प्रारंभ होणार. असें असतां निरयन पंचांगपद्धतींत तसें करीत नाहींत. वसंत संपात कोठेंही असो रेवतीशीं सूर्य येईल, तेव्हांच दुसऱ्या सौर वर्षाला प्रारंभ होईल असें निरयनपंचांगकार समजतात. अर्थात ५० विकला अंतर चालण्याला सूर्याला जितका वेळ लागतो, तितकें सायन व निरयन वर्षमानामधील अंतर होय. हा काल सुमारें ५० पळें आहे. व आतांपर्यंत ही चूक २२।२३ दिवसांवर गेली आहे.

व्यवहारामधील वर्ष हें केवळ सौर नाहीं. त्याला चांद्रसौर म्हटलेलें अधिक शोभेल. त्याचा आरंभ चैत्रशुद्ध प्रतिपदेपासून ठरलेला आहे; मग सूर्य वसंत संपातीं त्याच दिवशीं येवो अगर त्या महिन्याचे अमावास्येस येवो. आपल्या ग्रहलाघवी पंचांगाप्रमाणें सूर्य संपातीं केव्हां जरी आला तरी रेवती योगतारेशीं आल्याखेरीज निरयण मेषसंक्रमण होत नाहीं. व हें मेषसंक्रमण झाल्याशिवाय चैत्र महिना धरीत नाहींत. यामुळें सायन व निरयण चैत्रामध्यें हल्लीं बराच फरक पडला असून पुढें हें अंतर वाढत जाणार आहे. आपण निरयण पद्धतीप्रमाणें वर्षारंभ केव्हां केला तरी ऋतु आपल्या आरंभाप्रमाणें चालावयाचे नाहींत. ते सूर्याच्या गतीप्रमाणेंच चालावयाचे. सूर्य विषुववृत्तीं आला म्हणजेच वसंत ऋतु सुरु व्हावयाचा. मग आपला आरंभ कोणत्याही राशीपासून होवो. म्हणूनच हल्लीं अशी स्थिती आली आहे कीं चैत्र वैशाख वसंत ऋतु ही स्थिति नाहींशी होऊन फाल्गुन चैत्र वसंत ऋतु अशी स्थिती झाली आहे. सर्व ऋतु याप्रमाणें २२।२३ दिवस मागें सरकले आहेत व उत्तरोत्तर जास्त मागें सरकतील. इतक्यानेंच हा घोंटाळा थांबला नाहीं तर आजच्या २२।२३ दिवसांच्या चुकीनें हनुमज्जयंतीचे दिवशीं होलिकोत्सव साजरा होतो ! खऱ्या दिवाळींत सर्वपित्री अमावास्या येते ! त्रिपुरी पौर्णिमेस कोजागरी होते. पौषांत, आषाढांत व चैत्रांत लग्नें होतात ! ! पौषांत महाशिवरात्र होते ! ऋग्वेद्यांचें उपाकर्म शततारकांवर होतें ! यजुर्वेद्यांचें भाद्रपद शु १५ स होतें ! गरु सिंह राशीमधून गेला म्हणजे

गोदास्नानास गर्दी जमते ! आणि कन्येंतून गेला म्हणजे कृष्णास्नानास धांवतात ! सिंहस्थांत साधतील तितके विवाह अखेरच्या कशाबश्या मूहूर्तावर साधून घेण्यांत येतात आणि कन्यागतामध्यें जिकडे तिकडे सामसूम माजते ! !

प्रस्तुतच्या निबंधामध्यें सायन निरयन संबंधानें वादविवाद करण्याचें कारण नाहीं. हल्लींचा होत असलेला ऋतुविपर्यास कां होत आहे व तो होण्याचीं कारणें काय आहेत व तो नाहींसा करण्याकरितां कोणती पद्धति ग्राह्य आहे याचा विचार ज्याचा त्यास करितां यावा या हेतूनें चार शब्द लिहिणें भाग पडलें आहे. चैत्रांत नेहमीं वसंतऋतु यावयास पाहिजे असेल किंवा चैत्रवैशाख वसंतऋतु किंवा मधुमाधव वसंतऋतु ही परिभाषा कायम ठेवावयाची असेल तर सायनच ग्राह्य केलें पाहिजे. नाहींतर निरयन पद्धतीनें चैत्रात क्रमाक्रमानें सहाही ऋतु येऊं शकतील. एवंच वसंत सदैव येणार नाहीं. मेष व तुला या संक्रांतीमध्यें विषुवदिवस असावे किंवा विषुवें मेष व तुला राशीमध्येंच व्हावीं अशी इच्छा असल्यास सायनच ग्राह्य केलें पाहिजे. त्याचप्रमाणें कर्कराशीच्या आरंभीं दक्षिणायन व मकर राशीच्या आरंभीं उदगयन व्हावें व त्याप्रमाणें प्रत्यक्ष अनुभव घेण्याची इच्छा असल्यास सायनच घेतलें पाहिजे. नाहींतर कांहीं काळानें निरयन कर्क किंवा मकरारंभीं वसंत व शरत् ऋतूचा आरंभ झालेला खात्रीनें पाहण्यास मिळेल. आपण आपल्या विषयाच्याच म्हणजे ऋतुमानाच्याच दृष्टीनें सायन निरयन संबंधीं विचार केला तरी देखील आपणांस सायनमानच ग्राह्य करावें लागेल. कारण वातावरणांतील सर्व घडामोडी जर सूर्यावर अवलंबून आहेत एवढेंच नव्हे, तर मानवी किंवा पशुपक्षादि प्राण्यांचें जीवित सुद्धां जर सूर्यावरच अवलंबून आहे तर त्याचे गतीप्रमाणेंच चालणें रास्त होय. सर्य एकदां वसंतसंपातापासून निघून पुन्हां वसंतसंपातीं येईपर्यंत जर सर्व ऋतूंचा एक फेरा होतो व तेथपासूनच पुन्हां नवीन फेऱ्यास जर आरंभ होतो तर सूर्य जेव्हां वसंत संपातीं येतो तेव्हांच वर्षारंभ करणें श्रेयस्कर होय.

असो, येथपर्यंत आपण आपणांस आपल्या वातावरण विचारासंबंधी विषयास अवश्य लागणाऱ्या गोष्टींचा विचार केला आतां आपण फलज्योतिष शास्त्राधारानें वातावरणसंबंधीं भविष्य कसें करितात या विषयाकडे वळूं.

वर वर्णन केलेल्या एकंदर विवेचनावरून वाचकांच्या लक्षांत आलेंच असेल कीं आपल्या पृथ्वीवरील उष्णता, पाऊस, हवामान इत्यादि वातावरणविषयक

एकंदर घडामोडी सूर्यावरच अवलंबून आहेत. त्याचप्रमाणें ऋतूही सूर्यावरच अवलंबून असल्याचा मागें उल्लेख केला आहे. प्रत्येक वर्षी साधारणपणें विशिष्ट महिन्याच्या विशिष्ट तारखेस सूर्य विवक्षित स्थळींच असतो किंबहुना अधिक शास्त्रीय पद्धतीनें म्हणावयाचें असतां आपली पृथ्वी विवक्षित महिन्याचे एखाद्या तारखेस ज्या विशिष्ट स्थितीमध्यें असते तेथेंच ती प्रत्येक वर्षी त्या महिन्याच्या त्या तारखेस आलेली पाहण्यास मिळते व त्यामुळें कोणत्याही वर्षाच्या विवक्षित महिन्यामध्यें सारखेंच ऋतुमान असावयास पाहिजे होतें. परंतु असें असल्याचें आपणांस कधींच पहावयास मिळत नाहीं. एखाद्या वर्षी पाऊस सडकून पडतो तर दुसऱ्या वर्षी पावसाची जिकडे तिकडे हाकाहाक होते. तर एखाद्या वर्षी उन्हाळा अति तीव्रतम भासतो. जर ऋतु नुसत्या एकट्या सूर्यावर किंवा आमच्या पृथ्वीच्या सूर्याभोंवताली फिरण्याच्या विवक्षित स्थितीवर अवलंबून आहेत किंवा तीस सूर्यापासूनच मिळणाऱ्या उष्णतेवरच अवलंबून आहेत तर असे प्रकार कां घडावेत ? याचें उत्तर आमचे आधुनिक शास्त्रकार देऊं शकतील असें वाटत नाहीं. इतर ग्रहांच्या आकर्षणाचा परिणाम पृथ्वीच्या भ्रमणमार्गावर होत असतो असें प्रतिपादन करणाऱ्या व्यक्तींना पृथ्वीच्या वातावरणावर इतर ग्रहांच्या आकर्षणाचे परिणाम होत नाहींत असें प्रतिपादन करतांना पाहून आश्चर्य वाटतें. आधुनिक वातावरण शास्त्रज्ञ आपल्या हवेच्या वेधादिक कृत्यामध्यें इतर ग्रहांचा मुळींच विचार करीत नाहींत व म्हणूनच त्यांना वातावरणासंबंधानें अचूक भविष्यें करितां येत नाहींत व येणारही नाहींत असें आमचें ठाम मत आहे. कारण ऋतु जर एकाच सूर्यावरच अवलंबून असते तर हल्लीं आपल्या पाहण्यांत येणारे मोठमोठाले फेरफार कधींच पाहण्यास मिळाले नसते व मिळणारही नाहींत. विशिष्ट महिन्याच्या लागेल त्या वर्षी सूर्य एकाच विवक्षित ठराविक ठिकाणीं असतो हें जितकें खरें आहे तितकेंच भिन्न भिन्न वर्षी इतर अष्टग्रह सारखे असे कधींच पाहवयास मिळणार नाहींत व म्हणूनच प्रत्येक वर्षाचा पावसाळा, हिंवाळा व उन्हाळा हे भिन्न पाहण्यास मिळतात. जर विशिष्ट ऋतूमध्यें पूर्वी सारखेंच ग्रह आले तर खात्रीनें तसेंच हवामान पाहण्यास मिळेल हें कोणीही अजमावून पाहण्यासारखें आहे.

वातावरणावर इतर ग्रहांचा परिणाम होतो हें आपणांस निरनिराळ्या वर्षामधील अति पावसाळा, अति थंडी, अति उन्हाळा इत्यादि विचित्र अनुभवामुळ

कबूल करावें लागत आहे. व त्या प्रमाणें आपले कडील एक लेखक रा. रा. दामोदर भास्कर बापट हेडमास्तर, खारेपाटण, जि. रत्नागिरी हे आपल्या पावसाच्या भविष्यामध्यें इतर ग्रहांच्या उष्णतेचा विचार करितात व त्यांच्या अनुमानाचे पुस्तकामध्यें ग्रहांची उष्णता ही विशेष गोष्ट असल्या कारणानें त्यांनीं आपल्या पुस्तकाचें नांव "ग्रहांच्या पावसाचें अनुमान" असें ठेविलें आहे. राजश्री बापट यांनीं या विषयाकडे लक्ष देऊन ग्रहांच्या उष्णतेचा पावसाशीं संबंध असल्याचा प्रतिपादन करण्याचा प्रयत्न चालविला आहे याबद्दल त्यांनीं अखिल महाराष्ट्रीय ज्योतिर्विदांस ऋणी केलें आहे. ज्या विद्वानांची ग्रहांचे वातावरणावर परिणाम होत नाहींत अशी समजूत झालेली आहे त्यास प्रयोगसिद्ध सप्रमाण रीतीनें आपलें म्हणणें पटवून देण्याचें काम सोपें आहे असें वाटत नाहीं व तें रा. बापट यांनीं हातीं घेतलें आहे ही विचार करण्यासारखी गोष्ट आहे. रा. रा. बापट यांचे खालील उद्गार फार महत्वाचे आहेत.

" सूर्याशीं तुलना केली असतां ग्रह लहान आणि परप्रकाश आहेत असें दृष्टीस पडतें. ह्यामुळें ग्रहांच्या उष्णतेचा उपयोग होईल ही कल्पना विद्वानांस शिवतही नाहीं. परंतु आम्हीं दीर्घकाळाची माहिती घेऊन व अनुभव पाहून असें ठरविलें आहे कीं, पावसाच्या कामीं **ग्रहांपासून मिळणाऱ्या उष्णतेचा उपयोग** होतो.

ग्रहांच्या उष्णतेचा उपयोग होतो, हा आमचा **नवा शोध** आहे. ह्या शोधावरून व्यवहारांत उपयोग काय होतो तो दाखविला आहे. ह्या शोधावरून पावसाची अनुमानपद्धति बसवून तीवरून पावसाचें अनुमान केलें आहे, ही विद्येची परमोच्च स्थिति आहे. विद्यालयांतून पुष्कळ लोक विद्वान होऊन जातात, पण शोध लावणारा क्वचित् मिळतो व त्यांतही नवीन शोध लावून तो व्यवहारोपयोगी करून दाखविणारा क्वचित् मिळतो. म्हणूनच वरील स्थितीला 'परमोच्च स्थिति' म्हटलें आहे. पाऊसही सृष्टियुक्त गोष्ट आहे; त्याचें अनुमान आजपर्यंत शास्त्रीय पद्धतीनें करितां येत नव्हतें. पण तें आतां आमच्या नवीन बसविलेल्या शास्त्रीय पद्धतीनें करितां येऊं लागलें आहे ही महत्वाची गोष्ट आहे."

रा. बापट आपल्या विद्येला **ग्रहांची उष्णता** असें निराळें नवें नांव देतात परंतु याच विद्येला आमच्या आर्य पूर्वजांनीं **ज्योतिर्विद्या** असें नांव दिलेलें आहे. त्यांचे मतें त्यांचे शोध नवे आहेत परंतु आम्हांस तसें वाटत नाहीं. इतकें मात्र खात्रीनें असूं शकेल कीं त्यांचा जाण्याचा मार्ग पूर्वी आखला गेलेल्या

मार्गापेक्षां नवीन सुगम व सोपा असूं शकेल. भारतीय आर्यांनीं या विषयामध्यें फारच चांगले परिश्रम केलेले आहेत. परंतु दीर्घ कालामुळें हल्लीं त्यांतील बराच भाग लुप्त झाला आहे. व तो पूर्ववत स्थापण्यास रा. बापटांसारख्याच व्यक्तींची आवश्यकता आहे. रा. बापट यांनीं या विषयावर एक ग्रंथ लिहिला आहे व तो ते लवकरच प्रसिद्ध करणार आहेत. आमचे मतें त्यांनीं आपले शोध इंग्रजी व मराठी अशा दोन्ही भाषांमध्यें छापून प्रसिद्ध करावे. इंग्रजीमध्यें ग्रंथरचना झाली असतां तिचा स्वाद महाराष्ट्राबाहेरच्या व परद्वीपस्थ लोकांस घेतां येऊन आम्हां महाराष्ट्रीयांचे बुद्धिमत्तेची साक्ष पटवील. रा. बापट यांचा ग्रंथ अद्यापि प्रकाशित झाला नसल्यामुळें त्यांचे ग्रहाच्या उष्णतेच्या तत्त्वासंबंधानें कांहींच बोलतां येत नाहीं. ग्रहांचे प्राणिमात्रावर व हवेवर किंवा सृष्टिनिर्मित पदार्थांवर जें कार्य घडतें तें कसें व कोणत्या रीतीनें घडतें यासंबंधानें निरनिराळ्या विद्वानांमध्यें निरनिराळीं मतें आहेत. कोणी त्यास उष्णता म्हणतो तर कोणी त्यांचें कार्य विद्युत् प्रवाहानें, आकर्षणामुळें किंवा अशाच कांहीं सूक्ष्म शक्तीनें कार्य घडत आहे. असें म्हणतात. दोन खस्थ ज्योतींमध्यें असलेलें अंतर नुसतें पोकळीमय आहे असें वाटत नाहीं. आधुनिक विद्वानांचे मतें ग्रह एकमेकांस ईथर सारख्या प्रवाही द्रव्यानें संबंधित आहेत व याच ईथरच्या द्वारें एकमेकांचा संबंध जोडला गेलेला आहे. आर्य संस्कृतीप्रमाणें म्हणावयाचें असतां सर्व आकाश प्राणवायूनें भरलेलें आहे व त्या योगानेंच एका ग्रहावरील संवेदना दुसऱ्यास कळतात किंवा जाणतां येतात. ग्रहांच्या निरनिराळ्या स्थितींमध्यें येण्यानें या प्राणवायूच्या प्रवाहामध्यें अनेक प्रकारचे फेरफार घडतात व त्याप्रमाणें आपल्या सृष्टीवर नाना प्रकारच्या उत्पातादिक गोष्टी घडतात. प्राणवायूचा प्रवाह नेहमीं समतोल सारखा असतो त्या वेळीं जिकडे तिकडे शांतता व सौख्य नांदतें. उलट असतां उलट प्रकार घडतात. रा. बापट हे ज्यास उष्णता असें म्हणतात त्यासच आम्हीं प्राणशक्ति असें नांव देतों. आजचा वातावरणासंबंधी निबंध पूर्ण आहे असें जरी नाहीं, तरी या गोष्टींसंबंधानें ज्योतिर्विद्येमध्यें कसा विचार केला आहे याचें दिग्दर्शन करण्याच्याच हेतूनें लिहिलेला आहे. या विषयावर महाराष्ट्र भाषेमधील हा पहिलाच निबंध असल्या कारणानें यामध्यें शक्य तेवढा खुलासा केला आहे. परंतु अल्प साधनामुळें किंवा अनुभवामुळें यांत पुष्कळच उणीवा भासतील त्या सुधारून या विषयासंबंधी रा. बापट व इतर ज्योतिर्विद आपआपले अनुभव प्रसिद्ध करून भर घालतील अशी आम्हांस फार फार आशा आहे.

(अपूर्ण)

॥ श्रीसद्गुरवे नमः ॥

ज्योतिर्माला

आप्राचः कामरूपाद्दुहिणसुतनदप्लावितादाप्रतीचो
गान्धारात् सिंधुसाद्रद्रुवररचितादाचसेतोरवाचः ।
आकेदारादुदीचस्तुहिनगहनतः सन्तिविद्वत्समाजा
ये ये तानेप यत्नः सुखयतु समजान्कश्चमत्कर्तुमीष्टे ॥ १ ॥

अभिनवाऽऽवृत्ति वर्ष ५ वें. } मे १९१९. { अंक २ रा.

स्फुट विचार.

हल्लीं ज्योतिर्मालेच्या अंकास उशीर कां होत आहे असा प्रश्न बऱ्याच जणांकडून विचारला जात आहे. याचें स्वतंत्र रीतीनें प्रत्येकास उत्तर देणें शक्य नाहीं असें जाणून थोडी बहुत उशीरा अंक प्रसिद्ध होण्याचीं कारणें व चालू महिन्यामध्यें मालेच्या व्हीपी करण्यासंबंधानें पोष्टाकडून जो त्रास झाला तो सर्वत्रांस कळावा या हेतूनें एक दोघां पत्रांकडे एक पत्र छापण्यास पाठविलें होतें परंतु पत्रकारांना तें पत्र छापण्याचीच इच्छा झाली नाहीं. जशी सरकारामधून सेन्सरशिप पत्रव्यवहार आहे तशीच ह्यांच्या ऑफीसांमध्येंही आहेच. किंवा कदाचित असलीं पत्रें छापण्याबद्दल पैसे जाहिराती बजा घेण्याचा ह्यांचा सांप्रदाय असल्यास आमचेकडून सदरहु बद्दल पैसे न गेल्यामुळेंही पत्र छापलें नसेल.

* * *

गेल्या सप्टेंबर आक्टोबर मधील इन्फ्लुअंझा व त्यानंतर संपांचें वादळ यामुळें आम्हीं ज्या ठिकाणीं आमचें मासिक छापवीत आहों तेथें कंपाझिटर लोक वगैरे बरेच दिवस कामावर नव्हते व त्यामुळें छापखान्याच्या प्रत्येक कामास दिरंगाई व ढिलाई प्राप्त झाली. मुंबईमध्यें जसे सर्वत्र कारखाने वरील कारणामुळें जरा विस्कळीत झाले त्याचाच परिणाम आमचेवर देखील झाला; त्यांत आणखी नोकरी संभाळून माळेचें काम करावयाचें तेथेंही आमची ग्रहदशा थोडी फिरली. ऑफीसामध्यें काम जास्त, इकडे छापखान्याची ओरड, प्रकृतीचें अस्वास्थ्य, घरीं फलज्योतिषाचे कामाचा चेप अशा चोहोंकडून अडचणींमध्यें सांपडल्यामुळें आज अंक लिहूं उद्या लिहूं असें करण्यांत बराच काळ गेला परंतु आतां सर्व व्यवस्था जरा सुरळीत चालली आहे त्यामुळें पुढील अंक लवकर प्रसिद्ध होतील अशी आशा आहे. आम्ही आमच्या अडचणी आमच्या वाचकांस नाहीं सांगावयाच्या तर त्या आम्हीं कोणास सांगावयाच्या ? वाचकवर्ग मालेवर उशीरां अंक निघण्याबद्दल न रागावतां पूर्वीप्रमाणेंच लोभ ठेवतील अशी खात्री वाटते.

* * *

एप्रिल महिन्याच्या म्हणजे पांचवे वर्षाचा १ ला अंक जूनच्या ९।६ तारखेच्या आंत व्ही. पी. नें वाचकांच्या हातीं पडावा म्हणून तारीख ३१ मे पासून अंकाच्या व्ही. पी. करण्यास सुरवात केली परंतु तारीख ४ रोजीं दादर पोस्टानें व्ही. पी. घेण्याचें साफ नाकारून पाहिजे असल्यास पोस्ट मास्तर जनरलकडे तक्रार करा म्हणून कळविलें. तेव्हांपासून तक्रारीचा पत्रव्यवहार चालूच आहे. अद्यापि पोष्टाकडून व्यवस्था होतच आहे. धन्य आहे त्या खात्याची व तेथील उपरी अधिकाऱ्यांची !! पोष्ट, रेलवे व टेलिग्राफ हीं सार्वजनिक लोकांच्या सोईचीं व हिताचीं साधनें आहेत परंतु तेथील नोकरशाहीच्या दडेलीच्या वर्तणूकीसंबंधानें लिहिण्याचें मनांत आणल्यास दुसरें एक महाभारत निर्माण होईल. पोस्ट खात्यांत नोकर कमी म्हणून व्ही. पी. घेतां येत नाहींत हा रूळ पोस्टाच्या कोणत्या

गाईडमध्यें आहे हा कोणी आम्हांस दाखवील काय ? पोस्टांत माणसें कमी असतां ज्यास्त ठेवून कामाचा बोभाटा न होऊं देण्याचें काम पोस्टाचे उपरी अधिकाऱ्यांचें नाहीं काय ? वर्तमान पत्रें व मासिककार यांची ही दैना पोस्टाकडून होते मग बिचाऱ्या अशिक्षित लोकांची काय त्रेवा व हाल होत असतील.

* * *

सुशिक्षित लोकांस देखील पोष्टांतील नोकर लोकांकडून कित्येकदां कशा अपमानकारकरीतीनें वागविण्यांत येतें याची कल्पना अनुभवाखेरीज कळणार नाहीं. पोस्टांत दर महिना अंक गहाळ होणें, कांहीं तरी सबबीवर व्ही. पी. न घेणें, फार झालें म्हणजे तक्रार करा म्हणून सांगून बाटेला लावणें, तक्रार केली असतां फार झालें म्हणजे सीलच बरोबर नव्हतें व्ही. पीच बरोबर नव्हती, अशा एकना दोन हजार सबबी पुढें करून तक्रारींचा निकाल लावणें, अति झालें म्हणजे यापुढें असें होणार नाहीं असें कळविणें असे अनेक प्रकार चालू आहेत. याचा कांहीं नीट बंदोबस्त होणें शक्य आहे काय ?

* * *

आमच्या एका मित्रानें पुणें येथें फलज्योतिषशास्त्रावर प्रसिद्ध होत असलेलें ज्योतिर्भूषण आणि व्यापार ज्योतिष या मासिकाचा **वर्षारंभाचा खास अंक** आम्हांस पाहण्यास पाठविला असून त्याबद्दल आमचें मत विचारलें आहे. फलज्योतिषशास्त्राची प्रगती व या शास्त्रावर प्रसिद्ध होत असलेल्या मासिकांचा चर्चात्मक इतिहास प्रसिद्ध करण्याचा आमचा विचार आहे व त्याप्रमाणें मालेच्या अंकामध्यें एक लेख लवकरच प्रसिद्ध करण्यांत येईल त्या वेळीं आम्हांस काय लिहावयाचें आहे तें लिहूंच परंतु सध्यां इतर सुशिक्षित वर्गामध्यें सदरहु मासिकासंबंधानें काय मत आहे हें कळण्याकरितां हिंदु मिशनरी पत्राचे विद्वान संपादक रा. रा. गजानन भास्कर वैद्य बी. ए. यांनीं आपल्या तारीख ९ जूनच्या हिंदु मिशनरी पत्रामध्यें जो अभिप्राय

व्यक्त केला आहे तो विशेष मनन करण्यासारखा असल्यामुळें त्यांतील महत्त्वाचे मुद्दे मुद्दाम मालेच्या वाचकांकरितां पुन्हा उद्धृत करीत आहोंत.

" प्रस्तुत अंकामध्यें ४८ पानें असून १५।१६ लेख आहेत. लेख प्रसिद्ध करतांना कांहीं लेखांचा फक्त आशय दिला तर शास्त्रीय विषयांना जास्त जागा मिळेल अशी आमची समजूत आहे.

(२) ' ज्योतिषविषयक हालचाल ' देतांना मराठी प्रांताबाहेरील कार्याचा नामनिर्देश केलेला नाहीं. नावें दिलीं आहेत यांतही नब्राह्मण ज्योतिषांचा उल्लेख नाहीं. ज्योतिषी म्हणजे ब्राह्मण, कीर्तनकार म्हणजे ब्राह्मण, असा क्वचित आत्मघातकी भाव असलेला दिसतो.

(३) ' भवितव्यता ' हा रा. रा. शिवरामपंत परांजपे यांचा लेख फलज्योतिषाच्या विरुद्ध आहे. असले लेख प्रसिद्ध झाले तर ' सल्लामसलतीची फी २५ रुपये ' घेऊन तेजी मंदी सांगणाराचा धंदा बुडेल खचीत. रा. परांजपे म्हणतात ' असें जें अनुमानप्रमाण त्याच्या जोरावर सगळें ज्योतिषशास्त्र उभारण्यांत आलेलें आहे ' (पृ. १३).

(४ ते ७) **टीकात्मक पत्रव्यवहार अपशब्दानीं भरलेला आहे.** दुसऱ्याच्या मनाला लागेल अशी शब्दयोजना शास्त्रीय विषयाचे मासिकांत नसावी. वादविवाद निर्विकार होऊन करावा. ज्योतिर्भूषणकर्त्यांनीं लेखकांना अशी भाषापद्धति सोडून देण्यास सांगावें. रा. आगाशे यांनीं फक्त ' आचार्यकर्ते ' रा. विष्णुपंत बापट यांना लागेल असें लिहिण्याशिवाय कांहीं केलें नाहीं. त्यांच्या लेखांत शास्त्रविचार नाहीं.

(८) 'ईश्वराचें अधिष्ठान'हा लेख छापून जागा व्यर्थ अडविली आहे. दोन कोटी जप केला तेव्हां कर्जमुक्तता झाली असा नाममंत्राचा यांत महिमा वर्णिला आहे

' ज्योतिर्भूषणांत ' निबंधलेखक म्हणतात कीं रा. बळवंतरावजी टिळक हे अद्वितीय व महात्मा पुरुष आहेत; त्यांच्याशीं मतभेद व्यक्त करणारांना दोष लावतात. ही मनोवृत्ति शास्त्रीय नव्हे. लोकमान्य टिळकांशीं शास्त्रीय मतभेद झाला व तो व्यक्त करण्यांत आला तर त्यांत दोष कोठें आहे ? लोकमान्य टिळक हे गणितज्योतिषाचे पुरस्कर्ते आहेत, फलज्योतिषाचे नाहींत, व परमशास्त्रीय वृत्तीचे आहेत.

' ज्योतिर्भूषण ' कर्त्यांनीं लेखांतील वृत्ति शास्त्रीय ठेवावी अशी आमची नम्र सूचना आहे. कांहीं पत्रव्यवहार तर फक्त चार ओळींत सारांश देण्याच्याच योग्यतेचा असतो. '

* * *

महाराष्ट्राच्या इतिहासामध्यें **पुण्यानें** मोठी आघाडी मारली असून तेथील सर्वच कांहीं विचित्र असल्याचा आजपर्यंतचा इतिहास सांगत आहे. पुणेरी म्हणून ज्याला विशेषण लागतें त्याच्याबरोबर त्याच्या पाठीमागील वैभवाचें, तैल बुद्धीचें, अक्कल हुशारीचें, सोदेगिरीचें, धन्याला धतुरा व चोराला मलिदा अशा तऱ्हेच्या सद्गुणांचें भांडवल मिळतें. व पुणें म्हटलें म्हणजे महाराष्ट्राच्या इतिहासांतील अजरामर कीर्तीची आठवण होते. पुणें शहरावर **कन्या** राशीचा अंमल असल्याचें पूर्व ज्योतिर्मालाकार कै चिटगीस यांचें मत होतें व तें अनुभवान खरेंही आहे. या राशीवर जन्म पावणारे लोक किंवा या राशीमध्यें चंद्र असणारे लोक स्वभावानें आपमतलबी, क्षणोंक्षणीं विचार बदलणारे, चिकित्सक, शोधक, चौकस, इतिहास व चरित्रें वाचणारे, उत्तम भाषा जाणणारे, लेखनवाचनाची गोडी असणारे असतात. या राशीचे मुख्य दुर्गुण म्हटले म्हणजे अतिशय आपमतलबीपणा, स्वार्थपरायणता, लाजाळूपणा, भित्रेपणा, आडून काम करण्याची संवय व आळस हे होत. या दृष्टीनें विचार केला असतां आमचें पुणें वाङ्मयक्षेत्रामध्यें चालू युगामध्यें कोश, टीका, चर्चा, वर्तमानपत्रें, किंबहुना सर्व प्रकारच्या वाङ्मययुद्धामध्यें पहिलें आहे. आपमतलबीपणा हा गुण तर हार्डीमार्सीच खिळलेला पुण्याच्या इतिहासाबरोबर दिसून येत आहे. शहरांतील कोणतीही संस्था घ्या मग ती राष्ट्रहिताची, जनहिताची किंवा महाराष्ट्राच्या अखिल कल्याणाची असो बहुशा त्यामध्यें शेंकडा ८०।९० टक्के कांहीं विशिष्ट स्वार्थमूलक हेतु नाहीं असें आढळणारच नाहीं. पुणेरी भित्री फडणीसी व आपसांत यादवी माजवून व आडून काम करण्याचें आत्मघातकी राजकारण इतिहासप्रसिद्धच आहे. असला हा पुण्याचा ऐतिहासिक अनुभव ! ! मग पंचांगशोधनासारख्या निरुपद्रवी कार्यांत तरी कां मिळूं नये. वस्तुतः कारण नव्हतें, परंतु दुर्दैव

महाराष्ट्राचें. पुण्याचा महत्त्वाचा स्वार्थपरायणता हा गुण जेथें तेथें पुढें येतोच यास कोण काय करणार ! पुण्याच्या पंचांगशोधन कमिटीचे २३ अयनांश, हम करे सो कायदा करणारे व गेल्या दोनवर्षांपासून लो. टिळकांच्या नांवाखालीं निघणारें पंचांग कमिटीचें ईश्वराच्या शुद्ध कालात्मक स्वरूपाचें ज्ञान करून देणारें, शुक्रवारचा पाडवा गुरुवारीं करण्यास सांगणारें, नऱ्हे दृग्प्रत्ययाची सत्यता प्रतिपदेच्या चंद्रदर्शनानें करून देणारें पंचांग ह्या या चालू विसाव्या शतकांतील नवीन तऱ्हा आहेत. पुण्याच्या पंचांगशोधन कमिटी-मधील बहुमत, श्रीयुत केतकर यांचें पंचांग व ग्रंथ यांचा प्रसार करण्याचें पूर्वी ठरलें असतां कसा काय घोटाळा झाला व तो कोणत्या मोहनीमंत्रानें झाला, सभेचे चिटणीस २३ अयनांश कां जोरानें प्रतिपादन करू लागले इत्यादि अगदीं खासगी गोष्टी पुढें न येतील तर बरें असें आम्हांस वाटतें. परंतु हें व्हावें कसें ? पुण्याचा इतिहासच मोठा चमत्कारिक आहे ! !

* * *

राष्ट्रीय सभेच्या जन्मकालीं षष्ठस्थानामध्यें कन्या राशीमध्यें मंगळ असल्या-मुळें पुण्यांतील विद्वान लोकांकडून राष्ट्रीय सभेस शत्रुत्व होऊन भांडण तंटे माजतील असें माजी ज्योतिर्मालाकार कै. चिटणीस यांनीं सन १८९९ सालीं आपल्या ज्योतिर्मालेच्या अंकामध्यें प्रसिद्ध केलें होतें. हिंदुस्थानाच्या राजकारणाचा विचार करणाऱ्या संस्थेच्या षष्ठम स्थानीं राष्ट्रसभेचा प्राण पडला असल्याकारणानें पुण्याच्या बोकांडीस सुरत काँग्रेसमध्यें बसलेलें अपयश, मोर्ले मिन्टो सुधारण्याच्या कालीं पुण्याहून झालेला घरभेदीपणा या सर्व गोष्टी महाराष्ट्राच्या आतां पूर्ण परिचयाच्या झाल्या आहेत. परंतु चालू सन १९१९ सालीं याच षष्ठस्थानामध्यें शनि मंगळाची युति तारीख २४ आक्टोबर रोजीं होणार आहे. व सन १९२० च्या आक्टोबरमध्यें राष्ट्रीय सभेच्या मूळच्या मंगळाच्या अंशावरून शनीचें भ्रमण होणार आहे. हा काळ जरा चमत्कारिक दिसत आहे. ईश्वर करो व आमच्या पुण्याच्या बोकांडीस आणखी कांहीं आपत्ती न येवो म्हणजे मिळविली. पण बहुशा असें होईल असें दिसत नाहीं. पुणेरी वातावरणामुळें आपसांत यादवी, फूट, ज्ञातीज्ञातींमध्यें भांडणें,

कलह, तट, अनेक पक्ष निर्माण होऊन कलह तीव्र होतील. सन १९२१ सालामध्यें गुरु कन्याराशीच्या १९।२० अंशांत वक्री होऊन आगस्ट १९२१ मध्यें राष्ट्रीयसभेच्या मूळच्या मंगळावरून जाईल. या कालामध्यें पुणेंकरांच्या हातून विशेष महत्त्वाच्या गोष्टी घडतील व पुण्याची विशेषतः व्यापारधंदा वगैरे गोष्टींमध्यें चांगली प्रगती होईल, पुण्यास नवीन मित्र मिळतील, उद्योग वाढेल व ट्रामचे वगैरे शीघ्र प्रवासाचीं साधनें उपयोगांत येतील व असल्या कंपन्यांचे शेअरांच्या किमती या काळामध्यें बऱ्याच वाढण्याचा संभव आहे.

* * *

गेल्या मे १९१९ च्या चित्रमय जगताचे अंकामध्यें प. वा. रे. नारायण वामन टिळक यांचे मृत्युलेखामध्यें संपादक म्हणतात " ज्योतिर्गणितावरून वर्तविलेल्या भविष्यावर या सुधारणेच्या अतएव विचिकित्सेच्या काळांत कोणाचा विश्वास असो वा नसो परंतु एवढी गोष्ट सप्रमाण सिद्ध आहे कीं, अनुभव आला म्हणजे एकदां अशक्यतेच्या सदराखालीं कायमच्या जमा करून टाकलेल्या गोष्टींबद्दल मन सश्रद्ध होतें व त्या चालू खात्यावर घेऊं लागतें. इ. स. १९१८।१९ हीं वर्षे महाराष्ट्र वाङ्मयाला फार हानिकारक आहेत असें एक भविष्य गेल्या वर्षी कोणी एकानें वर्तविलें होतें परंतु त्या वेळीं त्याबद्दल कोणासच कांहीं वाटलें नाहीं. पुढें श्रीमहाराष्ट्रशारदेच्या मुकुटांतील, नाना ओक, धर्ममार्तंड लेले, रा. सा. कानिटकर, बालकवि, गोविंदाग्रज, हरिभाऊ लिमये व आपटे यांसारखीं परम दैदीप्यमान रत्नें एका मागून एक निखळून पाडून टाकण्याचा काळानें मांडलेला धूम धडाका पाहून मन अत्यंत गांगरून गेलें, व यांतच रे. टिळकांच्या ता. ९ मे १९१९ रोजीं झालेल्या शोचनीय मृत्यूची भर पडून आतां तर प्रत्येक सारस्वताचे हृदयांत धडकीच भरल्या सारखें होईल ! ! ! "

* * *

जानेवारी महिन्याच्या प्रत्येक अंकामध्यें पुढें येणारे सालची ग्रहस्थिति काय सांगते हें सांगण्याचा गेल्या चार वर्षांमध्यें मालेनें सांप्रदाय ठेविला

आहे. गेल्या सालचीं भविष्यें किती तंतोतंत उतरलीं याचा येथें आज पुन्हा उल्लेख करण्याचें कारण नाहीं. जुलै नंतरचा काळ कसा कठीण येत आहे व त्यानंतर एखाद्या चमत्कारिक रोगानें मृत्युसंख्या भयंकर वाढून कसा लोकसंहार होईल याबद्दलचें वर्णन जानेवारी १९१८ च्या अंकांत आलेंच आहे परंतु गेल्या जानेवारी १९१९ च्या अंकामध्यें केलेलीं भविष्यें वाचलीं असतां फलज्योतिषशास्त्राधारें तीं किती सूक्ष्मतेनें करितां येतात याची कल्पना येऊन फलज्योतिषशास्त्रास शास्त्र नव्हे असें प्रतिपादन करणाऱ्या व्यक्तींस थोडी बहुत शास्त्राची सत्यता पटवील. लेखक, वक्ते, मासिककार, वर्तमानपत्रकार, यांसबंधानें पृष्ठ १९३ मध्यें खालील प्रमाणें म्हटलें आहे "सन १९१९ साल वर्तमान पत्रें, मासिककार व लेखकवर्ग यांस फार जाचक जाईल अशी भीति वाटते" "चांगल्या चांगल्या लेखकांचे, वक्त्यांचे, मासिककारांचे, वर्तमानपत्रकार यांचे मृत्यु न होवोत म्हणजे बरें."

राजकारण व तद्योतक भानगडी यांसंबंधानें पृष्ठ १६९ पासून १७० पानावरील एप्रिल महिन्याचें मासफल वाचावें. तारीख ९, ११, व १२ ह्या किती महत्त्वाच्या झाल्या हें आतां नव्यानें सांगण्याची जरूरी दिसत नाहीं.

* * *

तारीख २४ सप्टेंबर सन १९१९ रोजीं सकाळीं ६।४२ वाजतां गुरु व नेपच्युन (वरुण) या दोन ग्रहांची सिंह राशीच्या १० अं. ४९ कलेमध्यें युति होणार आहे. यासंबंधानें थोडासा उल्लेख ज्योतिर्मालेा मासिकाच्या ज्यानेवारी १९१९ च्या अंकामध्यें पृष्ठ १६० मध्यें केला आहे. मेदिनीय ज्योतिषशास्त्रामध्यें किंवा राष्ट्रीय ज्योतिषशास्त्रामध्यें हा युतियोग अनेक दृष्टींनीं महत्वाचा आहे. एकतर ह्या दोन ग्रहांमध्यें होणारा युतियोग लवकर होणारा नसून तो दीर्घकालिक आहे. या दोन ग्रहांची युति दर १३ वर्षांनीं होते व म्हणून या योगाचीं फळें १३ वर्षेपर्यंत अनुभवास येतील असें साधारणपणें मानण्यास हरकत नाहीं. व या युतियोगाच्या काळीं जीं फळें दर्शविलीं जातात तीं पुढें ज्या ज्या वर्षीं इतर ग्रहांच्या गोचर भ्रमणानें उत्तेजित होतात त्या त्या वर्षीं अनुभवास येतात असें अनुमान आहे. चालू

योगास आणखी एकप्रकारानें महत्त्व प्राप्त झालें आहे. हा योग झाल्यानंतर लवकरच म्हणजे तारीख २४ सप्टेंबर रोजीं सकाळीं मुं. टा. ७।२७ वाजतां सायन तुला संक्रमण होणार आहे व त्यानंतर ९ वाजून २५ मिनिटांनीं सकाळीं अमावास्या होत आहे. रविचंद्रसंयोग तुलाराशीच्या० अं. ७ कलेमध्यें होत आहे. या दृष्टीनें पाहिलें असतां हा यंदाचा होणारा नेपच्युन गुरूंचा युतियोग फारच महत्त्वाचा आहे. नेपच्युन ह्या ग्रहाच्या फलादेशासंबंधानें अद्यून एकवाक्यता झालेली नाहीं. कांहीं हा ग्रह शुभ असें मानतात तर कांहीं तो पापग्रह असें मानतात. असें असल्याकारणानें निरनिराळ्या ज्योतिर्विदांचें या युतीसंबंधानें काय मत आहे व ती राष्ट्रीय भवितव्येवर कसा काय परिणाम करील यासंबंधानें सर्वत्रांनीं आपापले विचार कळविल्यास त्यांचा थोडक्यांत संग्रह करून तो मालेंत छापण्याचा विचार आहे. विद्वान वाचकवर्ग याकडे लक्ष देऊन आपलीं मतें किंवा विचार आम्हांस कळवितील काय ?

ही युति स्पेन व पोर्च्युगालकडील प्रदेशांमध्यें युतिकालाचे कुंडलीमध्यें **उदय** पावत आहे. मुंबईच्या रेखांशावर **एकादशभावारंभीं**च येत आहे. कलकत्त्याकडील प्रदेशांमध्यें सयाम वगैरेकडे **माध्यान्हीं** येत आहे. न्युझीलंडमध्यें **सप्तमकेन्द्रीं** येत असून उत्तरअमेरिकाखंडामधील युनायटेडस्टेटस् व कानडा येथें **चतुर्थ**भावारंभीं येत आहे. हें स्पष्ट कळण्याकरितां खालील प्रमाणें ठिकठिकाणीं लग्नादि षड्भाव आहेत. ग्रह तसेच राहतात. जागेच्या अभावामुळें फक्त मुंबईचीच कुंडली दिली असून बाकीच्या ठिकाणांचे भाव दिले आहेत. हा युतियोग तुला संक्रमणकालचे कुंडलीमध्यें दशमांत येत असून रविचंद्र संयोग कालचे कुंडलीचे नवमांत बसत आहे.



इतर देशांमध्यें ह्या युतियोगाचे वेळीं खालील प्रमाणें सहा भाव उदित आहेत.

	लग्न.	द्वितीय.	तृतीय.	चतुर्थ.	पंचम.	षष्ठ.
(१)	सिंह १७-२७	कन्या ५	कन्या २९	वृश्चि. १-२८	धनु १०	मकर ११
(२)	सिंह ४	सिंह २५	कन्या २०	तुला २२	वृश्चिक २८	मकर ३
(३)	तुला २५	वृश्चिक २५	धनु २५	मकर २६	कुंभ २८	मीन २८
(४)	कुंभ ८	कुंभ २९	मीन २४	मेष २६	मिथुन ३	कर्क ८
(५)	मिथुन २	मिथुन २६	कर्क १७	सिंह १०	कन्या ५	मेष १७

(१) लंडन (२) लिसबन (३) कलकत्ता (४) वेलिंगटन न्यु. झी. (५) वाशिंगटन.

युतिकालचे ग्रह.

रवि कन्या २९-५८, चंद्र कन्या २८-३८, मंगळ सिंह २०-७ बुध कन्या २७-१४, गुरु व नेपच्युन सिंह १०-४९, शुक्र कन्या १३-१७ वक्री, शनि कन्या ५-१९, हर्शल कुंभ २८-३३ वक्री. * * *

तारीख २१ मार्च स. १९१९ रोजीं रात्रीं ९ वाजून १० मिनिटांनीं सूर्यानें सायन मेषसंक्रमण केलें. या संक्रमणकाळची कुंडली अनेक दृष्टींनीं महत्त्वाची आहे. व त्यासंबंधानें आम्हीं आमचे विचार **मालेच्या** ज्यानेवारीच्या अंकामध्यें दिले आहेत. याच कुंडलीवरून राजकीय वातावरण कसें बिघडेल याचा थोडासा उल्लेख त्याच अंकामध्यें केला आहे. संक्रमणकाळची कुंडली पुन्हा वाचकांच्या सोईकरितां प्रसिद्ध करीत आहों. तिचा प्रत्येकानें अवश्य विचार करावा. **सायन मेषसंक्रमण.**

शुक्रवार तारीख २१ मार्च १९१९ रोजीं रात्रीं ९ वाजून १० मिनिटांनीं.



संक्रमण कालचे कुंडलीमध्यें लग्नांत जनतेचा कारक ग्रह जो चंद्र तो आपल्या नीच अशा राशीमध्यें शनि व हर्शल या दोन ग्रहांनीं पीडित असून चंद्र ज्याच्या क्षेत्रीं बसला आहे त्या मंगळाबरोबर १३५ अंश दृष्टियोग करीत आहे. जनतेची मार्शल लॉनें कशी दैना झाली आहे याची कल्पना प्रत्येकास आहेच. तारीख ३० मार्च १९१९ रोजीं रवि हा संक्रमण काळचे कुंडलींतील मंगळावर येत असतां संक्रमणकाळचे दशमांतील शनि व लग्नांतील चंद्राबरोबर अशुभयोग करणार होता; याच दिवशीं दिल्लीस गोळ्या झाडल्या जाऊन अनेक प्रजाजन मृत झाले असें म्हणतात. व येथूनच अस्वस्थतेस सुरवात झाली असें म्हणण्यास हरकत नाहीं. तारीख ९ एप्रिल १९१९ रोजीं रवि बुधावरून जात होता व चंद्र सिंहराशीमधून दशमांतून जात असतां मुंबई, अमदाबाद, पंजाब वगैरे ठिकाणीं गडबड झालेली आहे. तारीख १० हा तर दिवस फारच धांदलीचा गेला आहे. या दिवशीं चंद्र दशमांत शनीनें युक्त मूळच्या चंद्राच्या केंद्रांत व हर्शलसमोर असा होता. या मागील अनुभवावरून पहातां आगस्ट ११ नंतर काय होतें हें पाहणें आहे व सप्टेंबर मध्यें या दशमांतील उदित अंशावरून व शनीवरून तारीख १३ नंतर मंगळाचे भ्रमणास सुरवात होणार आहे व ही अनिष्ट स्थिति ९ आक्टोबर १९१९ पर्यंत राहणार आहे. हा काल बराच कष्टकारक दिसत आहे.(अपूर्ण)

ग्रहदृष्टिविचार.

(ज्योतिर्माला अंक ६ व ७ वर्ष ४ थें वरून पुढें चालू.)

चर राशीमधील ग्रह म्हणजे मेष, कर्क, तुला व मकरराशीमधील ग्रह तृतीय, एकादश, नवम, पंचम व षडाष्टक या दृष्टींपैकीं एकादश, पंचमस्थान व अष्टमस्थान किंवा राशींमधीलच ग्रहांबरोबर दृष्टियोग करितात. म्हणजे इतर होणारे दृष्टियोग उदाहरणार्थ चरराशीमधून होणारे ग्रहांचे केन्द्रयोग वगैरे तितके महत्त्वाचे नाहींत असें मानावें लागतें तर द्विस्वभाव राशीमध्यें—मिथुन, कन्या, धनु व मीन राशीमध्यें—केन्द्रयोगास अतिप्राधान्य येतें. स्थिर राशि—वृषभ, सिंह, वृश्चिक व कुंभ—या तृतीय, षष्ठ व नवमस्थानांतील राशींबरोबर किंवा ग्रहांबरोबर दृष्टियोग करितात. म्हणजे चर व स्थिर राशींना केन्द्रयोगाचें महत्त्व नसून तें फक्त द्विस्वभाव राशींनाच आहे असें मानावें लागतें; यासंबंधानें निश्चित असें कांहींच म्हणतां येणार नाहीं.

वरील एकंदर विवेचनावरून पाहतां वाचकांच्या निदर्शनास आलेंच असेल कीं यावनी किंवा यूरोपीय दृष्टिविचार हा संपूर्ण असून त्याचाच अनुवाद आम्हांस फलादेशाचे सूक्ष्मतेकरितां करणें अत्यंत जरूरीचें आहे. कारण ग्रहांच्या दृष्टीसंबंधानें पाहतांना पूर्ण दृष्टि करणाऱ्या दोन किंवा अधिक ग्रहांमध्यें अंशात्मक अंतर किती असलें पाहिजे किंवा नुसते ग्रह एकमेकांच्या समोरच्या राशींमध्यें असल्यानें दृष्टियोग होतो किंवा काय व त्याचीं फळें अनुभवास येतात किंवा काय याचा पूर्वी सांगितल्याप्रमाणें आमच्या ग्रंथांमध्यें कोठेंच सविस्तर रीतीनें उहापोह झालेला नाहीं. **द्रष्टा** व **दृष्ट** ग्रहांच्या अंशांमध्यें फरक थोडा असतां दृष्टिफलें संपूर्ण रीतीनें पाहण्यास मिळतात असें अलिकडील कांहीं शोधक ज्योतिर्विदांचें मत आहे. तरी देखील अजून एक ग्रह राशीच्या आरंभीं असून त्याच्या समोरील ग्रह राशीच्या अंतीं असतां

दृष्टियोग होतो असें म्हणणारे किंवा एक ग्रह राशीच्या ८ व्या अंशांत असून दुसरा ग्रह त्याच राशीच्या २८ व्या अंशांत असतां युतियोग होतो व त्याचें फळ अनुभवास मिळतें असें म्हणणारे ज्योतिर्विद् आहेत. आर्य ग्रंथामधील दृष्टिविचार अशा तऱ्हेनें अपुरा व मुग्ध असल्याकारणानें अशी नाना मतें व खिचडी झालेली आहे. त्याच प्रमाणें दृष्टिफलांचा उल्लेख स्पष्ट नसल्याकारणानें दृष्टि करणारा ग्रह शुभ किंवा पाप असेल, त्याप्रमाणें दृष्टीच्या शुभाशुभत्वाची कल्पना करावी लागते. तसेंच ग्रह ज्या मानानें बलवान अगर निर्बली असेल त्या मानानें दृष्टिबलाचा विचार प्रत्येक ज्योतिर्विदास आपापल्या बुद्धिमत्तेप्रमाणें करून फलादेशाची कल्पना करावयाची असते. हा सर्वच प्रकार गौण आहे असें कोणाही विचारी माणसास वाटल्यावाचून राहणार नाहीं. शुभ ग्रहापासून नेहमी शुभच व पापग्रहापासून नेहमी पापच फलें अनुभवास आलीं पाहिजेत असें मानून भागणार नाहीं. व त्याप्रमाणें आर्य ग्रंथकार कोठेंच सांगत नाहींत. अशुभ ग्रहही योगकारक असतां चांगलीं फलें दर्शवितो असें प्रतिपादन करणारे ग्रंथकार याचे उलट मत दृष्टीसंबंधानें प्रतिपादन करितात असें म्हणणें अति धाडसाचें आहे. म्हणूनच हल्लीं प्रचारामध्यें शुभ ग्रहांचे दृष्टींचीं फलें शुभ व पापग्रहांचे दृष्टींचीं फलें सर्वत्र अशुभच आहेत असें ढोबळ मानानें मानून भागणार नाहीं. ही विचारसरणी अगदीं शास्त्राचे बाल्यावस्थेमधील असली पाहिजे. यूरोपीय ज्योतिषशास्त्रामध्यें वर दर्शविल्याप्रमाणें दृष्टियोगांच्या फलादेशाची कल्पना नाहीं. व त्यांचेमध्यें हा भाग व्यवस्थित व पूर्णत्वास गेलेला आहे.

दृष्टिविचार अंशपरत्वें करून फलादेशाची कल्पना दृष्टीप्रमाणें करावी

या मताचा प्रसार महाराष्ट्रामध्यें आद्य ज्योतिर्मालाकर्ते कै. रा. रा. जीवनराव त्रिंबक चिटणीस यांनीं केला व त्या मताचे आज हजारों अनुयायी झाले आहेत. यावनी किंवा आंग्ल ज्योतिर्विदांची दृष्टीसंबंधी व्याख्या फारच निराळी असल्याचा उल्लेख पूर्वीच केला आहे. दोन अथवा अधिक ग्रहांमध्यें जें विशिष्ट कोणात्मक अंतर त्यास दृष्टि असें म्हणतात अशी आंग्ल ज्योतिर्विदांची दृष्टीसंबंधानें व्याख्या आहे. व हें कोणात्मक अंतर क्रांतिवृत्तावर अंशांनीं मोजतात. या न्यायानें पाहिलें असतां दोन अथवा अधिक ग्रहांमधील प्रत्येक अंशाची दृष्टि होऊन दृष्टियोगाचे ३६० निरनिराळे प्रकार होतील परंतु इतक्या सूक्ष्मतेची कल्पना मानवी बुद्धिमत्तेला करितां येईल किंवा नाहीं याबद्दल शंका वाटते. म्हणूनच यवन आचार्यांनीं अंशपरत्वें प्रत्येक अंशाची दृष्टि न मानतां कांहीं विशिष्ट अंतराच्या दृष्टि कल्पिलेल्या आहेत. व ही सर्व दृष्टींचीं अंतरें एखाद्या नियमित सरळ रेषाकृतीच्या (Regular Polygon) कोणांची किंवा पूरक कोणांच्या अंतरा एवढीच असलेलीं आढळतात. दुसरा एक महत्त्वाचा चमत्कार या दृष्टियोगासंबंधानें पाहण्यास मिळतो तो खालील प्रमाणें विचार करण्यासारखा आहे. पदार्थ द्रवरूपावस्थेमधून घनावस्थेमध्यें येतात तेव्हां प्रत्येक पदार्थाचें घनीभवन किंवा स्फटिकीभवन (crystalisation) विशिष्ट कोणात्मक आकृतीनें होत असल्याचें आढळतें व ही गोष्ट सर्व स्फटिकशास्त्रवेत्त्यांस माहित आहे व ज्या विशिष्टकोणात्मक अंतरावर पदार्थाचें स्फटिकीभवन होत असतें त्याच कोणात्मक अंतरावर जेव्हां एक किंवा अनेक ग्रह असतात त्या वेळीं त्यांचेमध्यें दृष्टियोग होत असतो. उदाहरणार्थ पाणी हें जेव्हां द्रवावस्थेमधून घनावस्थेमध्यें म्हणजे बर्फीमध्यें रूपांतर होत असतें त्या वेळीं

पाण्याचे घटकावयव स्फटिकीभवन होत असतां तें ६० अंश कोणाच्या आकृतीनें स्फटिकीभवन पावत असल्याचें आढळतें. व हेंच ६० किंवा १२० अंतर जेव्हां दोन अथवा अधिक ग्रहांमध्यें असतें त्या वेळीं फलज्योतिषीलोक या दोन अथवा अधिक ग्रहांमध्यें ६० अंश किंवा १२० अंशांचा दृष्टियोग झाला आहे असें मानतात. या वरील गोष्टीवरून येवढी कल्पना करितां येईल कीं दोन अथवा अधिक ग्रहांमध्यें लागेल तेवढें अंतर असल्यानें दृष्टियोग होतो असें आंग्लज्योतिर्विद मानित नाहींत व ग्रह विशिष्ट अंतरावर आल्याखेरीज एकमेकांवर कार्यही करीत असतील असें दिसत नाहीं. ज्या विशिष्ट कोणात्मक अंतरावर सृष्टीमध्यें इतरत्र घडामोडी होतात तीच कोणात्मक अंतरें फलज्योतिषशास्त्रामध्यें दृष्टियोगाखालीं आलेलीं आहेत. सृष्टिनिर्मित कायदे सदासर्वकाळ सारखेच असतात. ते स्वेच्छाचारी पुरुषाप्रमाणें वारंवार लागेल तसे बदलत नाहींत.

खालीलप्रमाणें यूरोपीय जातक ग्रंथामध्यें दृष्टियोग सांगितले आहेत.—

जेव्हां दोन ग्रहांमध्यें ०अंश अंतर असतें म्हणजे जेव्हां दोन ग्रह क्रांतिवृत्तामध्यें एकाच अंशामध्यें येतात—मग त्यांचें दक्षिणोत्तर अंतर कितीही असलें तरी हरकत नाहीं तेव्हां युतिदृष्टि होते. वस्तुतः हा दृष्टियोग नसून क्रांतिवृत्तामधील दोन अथवा अधिक ग्रहांचा एके ठिकाणीं येण्याचा स्थितियोग आहे. योगाचीं फलें ग्रहांच्या गुणधर्मावर अवलंबून आहेत.

॥ श्रीसद्गुरवे नमः ॥

ज्योतिर्माला

आप्राचः कामरूपाद्दुहिणसुतनदप्लावितादामतीचो
गान्धारात् सिंधुसार्द्रद्रघुवररचितादाचसेतोरवाचः ।
आकेदारादुदीचस्तुहिनगहनतः सन्तिविद्वत्समाजा
ये ये तानेष यत्नः सुखयतु समजान्कश्चमत्कर्तुमीष्टे ॥ १ ॥

अभिनवाऽऽवृत्ति वर्ष ५ वें. } जुलै १९१९. { अंक ४ था.

स्फुट विचार

दोन किंवा अधिक ग्रहांमध्यें जेव्हां शून्य अंश अंतर असतें म्हणजे दोन ग्रह किंवा अधिक ग्रह जेव्हां क्रांतिवृत्तामध्यें एकाच अंशामध्यें येतात. मग त्यांचें दक्षिणोत्तर अंतर कितीही असलें तरी हरकत नाहीं-तेव्हां युतियोग होतो. हा क्रांत्तिवृत्तामधील दोन अथवा अधिक ग्रहांचा एके ठिकाणीं येण्याचा स्थितियोग फारच महत्त्वाचा फल ज्योतिषशास्त्रामध्यें मानिलेला आहे. जेव्हां पूर्वपश्चिम अंतर शून्य असून दक्षिणोत्तर अंतर ही शून्य असेल त्या वेळीं झालेला युतियोग तर फारच महत्त्वाचा असतो. परंतु असले योग क्वचितच होत असतात. खालीलप्रमाणें मागील कांहीं वर्षांमधील युतियोगांचे राष्ट्रावर परिणाम पाहण्यास मिळालें आहेत. हे युतियोग ज्या राशींमध्यें होतात तद्योतक देशांमध्यें घडामोडी होतात. त्याचप्रमाणें युतियोगकालीं ज्या ठिकाणीं हे योग लग्न, दशम, सप्तम, किंवा चतुर्थ या भावारंभीं उदय पावतात तेथें

यांचे परिणाम त्वरित पाहण्यास मिळतात. यासंबंधानें सविस्तर विवेचन आमच्या राष्ट्रीय ज्योतिष पुस्तकामध्यें केलें आहे तें पहावें.

* * *

शनि–मंगळ युतियोग.

तारीख २७ नोव्हेंबर १८९७ सालीं धनुराशीमध्यें शनि–मंगळांची युति झाली आहे. धनुराशीचा अंमल स्पेन देशावर आहे असें ज्योतिर्विद मानतात. याच युतिकालचे अंशावरून सन १८९८ मार्च १० ला हर्शलचे भ्रमणास सुरवात झाली. सन १८९८ च्या एप्रिल २१ रोजीं स्पेन व युनायटेड स्टेटस् ऑफ अमेरिका यांचेमध्यें युद्ध सुरू झालें. मिथुन राशीचा अंमल अमेरिकाखंडावर आहे असें म्हणतात. म्हणजे या युतियोगानें धनु व मिथुन या राशीमध्यें कलह सुरू केला.

* * *

कुंभराशीमध्यें सन १९०३ च्या डिसेंबरच्या २१ व्या तारखेस शनिमंगळांची युति झाली होती व ६ फेब्रुवारी १९०४ ला रसोजपानी युद्धास सुरवात झाली. कुंभेचा अंमल रशियावर आहे. याच वेळीं कुंभेमध्यें एक धूमकेतु दिसत असल्याचें रॅफेलनें प्रसिद्ध केलें आहे.

* * *

शनिमंगळांची युति **मीन** राशीमध्यें सन १९०७ च्या डिसेंबरच्या ३० तारखेस झाली आहे व तारीख १ फेब्रुवारी १९०८ रोजीं पोर्तुगालचा राजा व त्याचा जेष्ठ पुत्र यांचा खून झाला. मीनराशीचा अंमल पोर्तुगालवर आहे असें म्हणतात.

* * *

तारीख २९ डिसेंबर १९०९ रोजीं शनिमंगळांची युति **मेष**राशीमध्यें झाली आहे. याच युतीवर ता. ९ एप्रिल सन १९१० रोजीं अमावास्या

झाली होती व लवकरच बादशाहा सप्तम एडवर्ड हे परलोकवासी झाले. मेषराशीचा अंमल इंग्लडवर असल्याचें सर्व ज्योतिर्विदांचें मत आहे.

* * *

शनि–हर्शल युतियोग.

शनिहर्शलांचा युतियोग दर ४५ वे वर्षी होत असतो. सन १८९२ सालीं तारीख १६ मार्च रोजीं ही युति वृषभेमध्यें झाली होती. लवकरच क्रिमियन युद्ध व रशियामध्यें भयंकर धरणीकंप झालेला आहे.

* * *

सन १८९७ सालीं तारीख ६ रोजीं या दोन ग्रहांची युति वृश्चिकेमध्यें झाली होती. लवकरच मोरोक्कोमध्यें बंड, स्वीडनच्या राजाचा नार्वेवरील हक्क जाणें, व ट्रान्सवालमध्यें युद्ध झालेलें पाहण्यास मिळालें. हे तिन्ही देश वृश्चिकेच्या अंमलाखालीं आहेत असें म्हणतात.

* * *

शनि–हर्शल किंवा प्रजापतीचा प्रतियोग.

शनिहर्शलांचा तिसऱ्यानदां प्रतियोग तारीख १३ आगस्ट सन १९१९ रोजीं दुपारीं मुंबई टाईम ९-५० वाजतां होत आहे. हा युतियोग शनि कन्या ० अं. ६ कला व ४२ विकला व हर्शल किंवा प्रजापति मीनेमध्यें तेवढेच अंश व कला आहे म्हणजे कन्या व मीनराशींमधून हा योग होत आहे.

शनिहर्शलांचा पहिल्यानें प्रतियोग तारीख १ आक्टोबर १९१८ रोजीं सिंह व कुंभराशीच्या २४ अंश १४ कलेमध्यें झाला आहे. याचा विचार

ज्योतिर्माला मासिक पुस्तकाचे जानेवारी सन १९१८ च्या अंकामध्यें केला आहे. त्यानंतर पुन्हा दुसऱ्यांदा याच ग्रहामध्यें प्रतियोग तारीख २९ जानेवारी सन १९१९ कुंभ व सिंह राशीच्या २६ अं. २४ कलेमधून झाला आहे. याचेच अगोदर हर्शलमंगळांचा प्रतियोग तारीख २३ जानेवारी रोजी झालेला आहे, या दोन योगांमुळें सर्वत्र ठिकाणीं अनेक प्रकारचे संप मोठ्या जोरानें होण्यास सुरवात झाली असून मजूर व कारखानदार, मालक व नोकर यांचेमध्यें बराच तीव्रपणा आलेला आहे. संप जोरानें होत असून उद्योगधंद्यांची पूर्ण वाताहात लागण्याचा प्रसंग सर्वत्र आलेला आहे.

चालू आगष्टच्या तेरा तारखेस होणारा शनिहर्शलांचा प्रतियोग बराच विचार करण्यासारखा आहे. एकतर हा प्रतियोग आतां निराळ्या राशीमध्यें म्हणजे मीन व कन्या राशींमध्यें होत आहे. व याच राशीमध्यें पुन्हां तारीख २६ एप्रिल १९२० मध्यें व तारीख ७ जून १९२० च्या सुमारास आणखी दोन वेळां होणार आहे. या हर्शलशनीच्या प्रतियोगाचा धडाका महाराष्ट्र, पंजाब, तुर्कराष्ट्र या सर्वांस कसा काय भोंवतो हें पाहणें आहे. महाराष्ट्र किंवा हिंदुपतबादशाहीचें स्थान धनेच्या अंमलाखालीं आहे असें कै. चिटणिसांचे मत होतें व हा प्रतियोग आतां चतुर्थ व दशम स्थानांमधून होणार असल्यामुळें महाराष्ट्रामधील संस्थानिकांपैकीं बऱ्याच जणांची कशी काय अवस्था होते हें पाहणें आहे. या कालामध्यें संस्थानाधिपती जाऊन दुसरे अधिष्ठित होणें पुष्कळच संभवनीय आहे.

* * *

तारीख १३ आगस्ट सन १९१९ रोजी दुपारीं ९-९० वाजतां (मुं. टा.) होणाऱ्या प्रतियोगाची कुंडली खालील प्रमाणें आहे.

॥ सायन भावचलित कुंडली ॥



हा योग आमचेकडे लग्न सप्तमामधून होत असून लंडनमध्यें दशमांत शनि व चतुर्थामध्यें हर्शल येत आहे. अमेरिकेमधील युनायटेड स्टेट्स व मेक्सिकोमध्यें शनि लग्नामध्यें येत असून हर्शल सप्तमामध्यें येत आहे यामुळें आगष्ट २४ । २५ व ६ सप्टेंबर २२ ते २५ सप्टेंबर १९१९ व २१ आक्टोबर ते ३० आक्टोबर १९१९ च्या काळामध्यें कलकत्ता, लंडन, युनायटेड स्टेटस, मेक्सिको, मुंबई, तुर्कस्थान, स्पेन, पोर्चुगाल व स्वित्झरलंड या देशांमध्यें काय काय प्रकार घडतात हें पाहणें आहे.

* * *

वसिष्ठकालीन दुहेरी संक्राति.

(लेखक—प्रेषित)

१ ज्ञान प्राप्त झाल्यानें अज्ञानामुळें झालेली भ्रांति आपोआप नाहींशी होते. हें कोणासही नव्यानें सांगणें नको. सायन व निरयण वाद कै. केरोपंतांच्या केरोपंती पंचांगाच्या अवतारामुळें आधुनिक कालांत विशेषत्वानें पुढें आला. हा वाद बराच रंगांत येत जाऊन कांहीं पंचांगासंबंधीं अधिक माहिती ज्योतिर्वाचकांस झाली. निरयणपक्षाभिमानी लोकांनीं सायनाचें सशास्त्रत्व सिद्ध करण्याचा बोजा सायनानुसारी लोकांवर टाकला व हा बोजा श्रुतिस्मृतिपुराणें यांतील स्पष्ट वचनें दाखवून त्यांनीं आपलें कार्यही बजाविलें. निरयणांतील आपल्या मतें शुद्ध असें पंचांग चालू करणाऱ्या रा. ब. कै. छत्र्यांनीं सायनमानानें केलेलें भारतकालचें कै. विसाजी रघुनाथ लेलेकृत गणित तपासून तें बरोबर आहे असा शेराही दिला. तेव्हां सायन गणित भारतकालीं तरी होतें याविषयी सायनमतानुयायी यांची पूर्णपणें खात्री झाली.

२ वरील सर्व प्रकारांत एक गोष्ट कशी काय विचार न होतां राहिली गेली हें कांहीं सांगतां येत नाहीं, पण ती राहिली खरी. सायन व निरयण अशी दुहेरी पद्धति प्राचीन कालीं चालत होती अशी पुष्कळ सायन ज्योतिष्यांची अजून समजूत असलेली आढळून येते. तारका व नक्षत्रें हीं भिन्न आहेत. तारकांचे क्रांतिवृत्ताच्या पट्ट्यांतील पुंज समांतरानें स्थित नाहींत हें नुसत्या डोळ्यांसही दिसून येईल. पंचांगांतील-नक्षत्रें हीं समविभाग आहेत हें कोणत्याही ज्योतिष्यास माहित आहे. तारकांचा उल्लेख जो भारतांत आला आहे तो खुणांच्या दृष्टीनें आहे. मघानक्षत्रीं असलेला मंगळ आकाशांत सहज डोळ्यांनीं ज्येष्ठा या ताऱ्याजवळ दिसत होता याप्रकारचें आहे. " त्या वेळीं निरयण बाजूही माहीत होती " असें वास्तविक विचार करितां अज्ञानामुळें जागृत असलेल्या भ्रांतीमुळें पुष्कळ तज्ज्ञ म्हणविणारांकडूनही म्हटलें जातें.

३ ऋषिवचनांचा पूर्णपणें विचार करण्याचें सामर्थ्य आर्यावर्तात फारच थोड्या माणसांस असतें. श्रुतिस्मृतिपुराणविहित कालदर्शक शके १८४१ चे

पंचांगांत संक्रमणांचा उल्लेख करितांना वसिष्ठांचें वचन पुढीलप्रमाणें दिलें आहे.

चलसंस्कृततिग्मांशोः संक्रमो यः संक्रमः ॥
अजागलस्तन इव राशिसंक्रांतिरुच्यते ॥ १ ॥
पुण्यदां राशिसंक्रांतिं केचिदाहुर्मनीषिणः ॥
नैतन्मम मतं यस्मान्न स्पृशेत्क्रांतिकक्षया ॥ २ ॥

या वचनांत दोन प्रकारच्या संक्रांतींचा उल्लेख आलेला आहे. त्या दोन संक्रांति म्हणजे १—क्रांतिकक्षेचा संबंध असलेल्या वृत्तावरील सूर्याचें संक्रमण, २ क्रांतिकक्षेचा संबंध नसलेल्या वृत्तावरील सूर्याचें संक्रमण. या दोन प्रकारच्या संक्रमणांतील पहिल्या प्रकाराचें महत्त्व वसिष्ठांच्या दृष्टीनें होतें.

निरयण राशि क्रांतिवृत्ताचेच समभाग आहेत. तेव्हां सांप्रतच्या सर्व रूढ पंचांगांत दिलेल्या संक्रांति क्रांतिवृत्तावरील होत. सायन व निरयण संक्रांति निराळ्या आपणास आज दिसत आहेत. पण क्रांतिकक्षेस स्पर्श करीत नसलेल्या अशा राशिसंक्रांति कोणत्या ? वसिष्ठांनीं त्यांचा उल्लेख केला पण आज मितीस त्या संक्रांति कोणीही आपल्या पंचांगांत देत नाहींत !

ज्या वृत्तास क्रांति नाहीं असें एकच वृत्त आहे. त्या वृत्ताचा सर्व ज्योतिषी थोडाबहुत उपयोग करून घेतात. सुलभजातक भाग ३ मध्यें या वृत्ताचा उपयोग द्वादशभाव साधन करण्याचे प्रसंगीं सांगितला आहे. त्या वृत्ताचे १२ समविभाग करून त्या १२ विभागांवरून क्रांतिवृत्तावरील १२ भाव काढावयाचे ही रीति कायम अस्तित्वांत आहे. पण याच विषुववृत्ताचे १२ समविभाग करून त्यांतील रविसंक्रमणें देण्याची पद्धति वसिष्ठकालीं रूढ असलेली या वेळीं कायमची नष्ट झालेली आहे.

विषुववृत्त व क्रांतिवृत्त या दोन वृत्तांस अनुसरून ग्रहांची स्थिति सांगण्याची पद्धति सर्वत्र रूढ आहे. क्रांति व विषुवांश, शर व क्रांतिवृत्तांश (राश्यंशभोग) हे ते चार प्रकार होत. ते—

(१) विषुवांश—मेषसंपातबिंदूपासून विषुववृत्ताचे पूर्वपश्चिम मोजलेले अंश.

(२) क्रांतिवृत्तांश—मेषसंपातबिंदूपासून क्रांतिवृत्ताचे पूर्वपश्चिम मोजलेले अंश.

(३) क्रांति—विषुवाचे दक्षिणेस किंवा उत्तरेस असलेले अंश.

(४) शर—क्रांतिवृत्ताचे दक्षिणेस किंवा उत्तरेस असलेले अंश. भावसाधनांत नाक्षत्रकालावरून दशमाचे विषुवांश निघतात. या विषुवांशावरून प्रथम ३०।३० अंशांचे समविभाग करून त्या समविभागांस अनुसरून क्रांतिवृत्तावरील अंश कायम करावे व ते अंश द्वादशभावारंभी घ्यावे ही पद्धति कोणासही मान्य आहे. याच प्रमाणें विषुवांशांवरून ३०।३० अंशांवर येणारी जी सूर्याची स्थिति त्या स्थितीवरून त्याची क्रांतिवृत्तावरील स्थिति काढणें सर्वत्रांस मान्य असली पाहिजे. किंबहुना हीच रीति गणितांत कायम आहे. विषुवांशांत ३०।३० अंशांप्रमाणें येणाऱ्या १२ संक्रांति विषुववृत्तानुरोधें होतें. व या अंशांप्रमाणें क्रांतिवृत्ताचे ३०।३० अंशांप्रमाणें येणाऱ्या दुसऱ्या १२ संक्रांति होत. असे दोन प्रकार पूर्वकालीं निदान वसिष्ठकालीं रूढ होते, व या रूढ प्रकारांत विषुवसंक्रांतीपेक्षां क्रांतिवृत्तांतील संक्रांति जास्त पुण्यद आहेत हें वसिष्ठांचें स्पष्ट मत होतें असें 'न स्पृशेत्क्रांतिकक्षया' या वचनावरून स्पष्टपणें सिद्ध होतें. सांप्रत नॉटिकल आल्मनाक मात्र विषुवांशावर सर्व ग्रहांची स्थिति देत असतें.

(५) आपलेकडे अलीकडच्या काळांत ज्योतिषी केवळ आपले कुंडलीवरूनच फल अनुभवीत असतात. त्यांत सायन ज्योतिषीवर्गानें आंकडे कुंडलीवरून स्पष्ट अंश विचारांत घेण्यापर्यंत मजल मारली आहे व अशांच्या उपयोगार्थ मराठींत स्पष्ट सायनग्रहांचे भोगांश दरवर्षी प्रसिद्ध केले जातात. क्रांतिवृत्तांतील भोगांशांप्रमाणें क्रांति, शर व विषुवांश यांची जरूरी फलज्योतिषास असते ही जाणीव आज पूर्णपणें पाश्चात्य ज्योतिषी वर्गातील कांहीं थोड्यांस आहे. राफेल हा भोगांश व क्रांति यांचा विशेषत्वानें उपयोग करण्यास आपल्या पुस्तकांतून पुष्टि देतो. शरांचा उपयोग फारसा कोणी करीत नाहीं. पण हा शरही राफेलच्या दरसालच्या स्पष्टग्रहांच्या पुस्तकांत दिलेला

असतो. भोगांश, क्रांति व शर यांच्या साधनानें विषुवांश काढितां येतो. या सर्वांचा उपयोग झडकीस—सेफारिअल हे करितात असें त्यांचे ग्रंथांवरून सहज समजेल. आपलेकडे मात्र अंशांपर्यंत मजल जाणेंच मुष्किलीचें होतें. दिनवर्षपद्धतींत भोगांश, क्रांति यांचा उपयोग फार आहे. यांचें फक्त सामान्य विवेचन आपलेकडे सध्यां होत आहे. विवेचनानंतर त्याचें मनन होऊन अनुभवानें ती पद्धति रूढ होण्यास बराच कालावधि जावा लागेल. दिनवर्षपद्धति ही चंद्रप्रकाशवत् आहे. सूर्याप्रमाणें स्वयंप्रकाशी पद्धतीचा विचार, मनन, अनुभव घेण्यास त्या पद्धतीचें विवेचन होणें जरूर आहे. या स्वयंप्रकाश पद्धतींत भोगांश, विषुवांश, क्रांति व शर या चारही मानांचा विचार करावा लागतो. हा विचार करण्यास कठीण जात असल्यामुळें कालनिर्णयाचे कामीं निश्चित विचार सर्वत्रांस साधत नाहीं. या पद्धतीस Primary Directions असें नांव आहे. आपण फार तर या पद्धतीस 'दशमांशवर्षपद्धति' असें म्हणूं. या पद्धतींतील प्रत्येक ग्रहाचे विषुवांश काढणें अत्यंत जरूरीचें असतें.

जन्मकालीन कुंडली मांडणें म्हणजे केवळ नुसते स्पष्टभोगांश लिहिणें नव्हे. तर क्रांति, शर व विषुवांशही जन्मकालचे स्पष्ट लिहिले पाहिजेत. अशा पद्धतीनें स्पष्टपणें ग्रहांचे, व द्वादशभावांचे चारी मानानें स्पष्ट गणित करून ठेवणें म्हणजेच जन्मकुंडली मांडणें होय. अशी कुंडली मांडणें गोलीय त्रिकोणमितीनेंच साधते. तें एक दीड आण्याच्या पंचांगावरून कधींही साधत नाहीं. अशा तऱ्हेनें चारही प्रमाणें दिलेलें स्पष्ट ग्रहांचें पुस्तक अजून प्रसिद्ध झालेलें आढळांत नाहीं. नॉटिकलमध्यें विषुवांश व क्रांति हीं दोन मानें दिलेलीं असतात. राफेलच्या स्पष्टग्रहांच्या पुस्तकांत क्रांति, शर व भोगांश अशीं तीन मानें दिलेलीं असतात. यामुळें नॉटिकलपेक्षां फलज्योतिष्यांस

राफेलचें स्पष्ट ग्रहांचें पुस्तकच जास्त उपयोगी पडेल. या तीन मानांवरून पुढील सूत्रानें विषुवांश काढतां येतात.—

(१०—लाग्रतम क्रांतिकोटिज्या + लाग्रतम शरकोटिज्या + लाग्रतम भोगकोटिज्या) = लाग्रतम विषुवांशकोटिज्या.

दशम व रवि यांचे विषुवांश काढण्यास—

(लाग्रतम रविपरमक्रांति ($२३^{\circ}-२७'$) कोटिज्या + लाग्रतम भोग स्पर्शरेखा मेष किंवा तुलेपासून) = लाग्रतम विषुवांश कोटिज्या.

याप्रमाणें स्पष्टतेनें कुंडली मांडण्याची पद्धति असल्यास वरील स्वयंप्रकाशी 'दशमांशवर्षपद्धती' चा विचार करणें सुलभ होईल.

द्वादशभाव मांडतांना जसें विषुवांचें महत्त्व असतें तसेंच गहत्व फलें ठरवितांना व कालनिर्णय करतांना असतें. हें महत्त्व ज्योतिषीवर्गाकडून मध्यंतरींच्या कालांत कायमचें विसरून गेल्यामुळें वसिष्ठकालीं रूढ असलेल्या विषुव संक्रांतीचा लोप झाला !

विषुव संक्रांतीचा जसा लोप झाला तसाच क्रांतिवृत्तावरील संक्रांतीचा विपर्यास होऊन अज्ञानामुळें भ्रांतिकृत चमत्कार घडून निरयण संक्रांति रूढ झाल्या. या संक्रांति वर्षमानांतील सूक्ष्म चालन वारंवार देत न गेल्याकारणानें रूढ झाल्या.

याप्रमाणें वसिष्ठांस पूर्ण मान्य असलेल्या संक्रांतींचा विपर्यास व अमान्य असलेल्या संक्रांतींचा उदय या गोष्टी मध्यंतरींच्या ज्ञानलोपकालांत घडून आल्या ! !

———o———

परिभ्रमणपद्धति.

ज्योतिर्माला वर्ष ४ थें अंक ६, ७ व ८ यांमध्यें परिभ्रमणपद्धतीसंबंधानें सविस्तर विवेचन केलेलें आहे. त्यानंतर मार्च सन १९१९ च्या वार्षिक समालोचनामध्यें या पद्धतीसंबंधानें कै० चिटणीस यांचे प्रसिद्ध व अप्रकाशित लेख व चरित्रात्मक कुंडल्या वाचकांच्या सोई करितां देण्याचें अश्वासन दिलें होतें त्याप्रमाणें आज रोजीं एका प्रसिद्ध व्यक्तीची चरित्रात्मक कुंडली प्रसिद्ध करीत आहों. सदरहु लेख तारीख ३१ आक्टोबर सन १८९७ सालीं प्रसिद्ध होत असलेल्या **गुराखी** पत्रामध्यें कै. रा. रा. जिवनराव यांनीं प्रसिद्ध केलेला आहे.

पत्रव्यवहार.

" रा. रा. गुराखीकर्ते यांस वि. वि. खालील मजकुरास कृपा करून स्थळ मिळावें.

ॉ. बाळ गंगाधर टिळक यांजवर नुकत्याच झालेल्या खटल्याची हकीकत बाहेर पडते आहे नाहीं तोंच त्यांचे संबंधानें मी कांहीं वर्षांपूर्वी केलेलें भविष्य उतरलें असें पाहून कांहीं मराठी व इंग्रजी पत्रांत माझे नांवाचा उल्लेख* झाला आहे. पुण्यांतील कांहीं पत्रकारांस माहिती आहेच.

*Advocate of India 30th September 1897-Extract *Thana Hindu Punch.*—' About six years ago one Jeevanrao, an asrtrologer of Bombay had prophesied to Mr. Tilak that in 1897 he would be a parrot in a cage. He had even cautioned Mr. Tilak to be careful. But lot is inevitable and the prophecy was realized. ' Bully for the prophet अशाच प्रकारचा उतारा Coming Events नांवाच्या लंडन येथें फलज्योतिष शास्त्रावर प्रसिद्ध होत असलेल्या मासिकामध्यें पाहण्यास मिळाला आहे. कै. चिटणीस यांचें भविष्य कोठें प्रसिद्ध झालें तें आम्हांस माहित नाहीं. वाचकांपैकीं कोणाजवळ तें असल्यास किंवा अशींच चिटणिसांचीं भविष्यें असल्यास तीं त्यांनीं कृपा करून आमचेकडे पाठवावींत म्हणजे सवडीनें ती मालेंत प्रसिद्ध करण्यांत येतील.—संपादक.

हा लेख प्रसिद्ध झाल्यानंतर कांहीं ज्योतिषी लोकांचीं पत्रें मजकडे ह्यासंबंधानें भविष्य कसें व कोणते आधारांनीं केलें ह्याबद्दल, व ता. १४ सप्तंबर रोजीं निकाल होईल तोंपावेतों रा. टिळक तुरुंगांत जात नाहींत, आणि पुढें त्यांस देहकष्ट १९ महिने भोगावे लागणार आहेत हें कसें व कोणते आधारें सांगितलें, व त्याचप्रमाणें मुंबई मुक्कामीं रा. टिळक हे सुटतील असें सांगितलेलें कसें चुकलें ह्या गोष्टीची शहानिशा कांहीं मंडळीनें चालू केली आहे. कांहीं वर्तमानपत्रकारांनीं रा. टिळकांचे संबंधानें पुढील भविष्यें कळवावींत म्हणून फार आस्थापूर्वक सूचना केल्या आहेत, म्हणून ह्या पत्रव्यवहारास स्थल दिल्यास सर्वांची मनीषा तृप्त होईल. वास्तविक पहातां हा विषय ज्योतिर्मालेंत प्रसिद्ध करणें जास्त महत्वाचें होतें परंतु त्या पुस्तकाचे १२ अंक एकदम छापण्याचे असल्यामुळें व त्यांतून खडतर वर्गणीदारांकडून वर्गणी वसूल करून माला टवटवीत होण्यास बराच वेळ जाणारा आहे म्हणून हा लेख आपणांकडे पाठविला आहे.

ऑ. बाळ गंगाधर टिळक यांचा जन्म शके १७७८ आषाढ कृष्ण ६ रोज बुधवार या दिवशीं सूर्योदयानंतर २ घटका आणि ६ पळांनीं झाला. इंग्रजी ता. २३ जुलई सन १८५६ रोज बुधवारीं मुंबई वेळ सकाळीं ६ वाजून २९ मिनिटांनीं जन्म झाला. ह्या वेळीं केरोपंती मताचे अयनांश १७ अंश ४९ कला आहेत. या वेळीं सायन स्पष्ट ग्रह येणेंप्रमाणें आहेत.

रवि	चंद्र*	मंगळ	बुध	गुरु	शुक्र
४	११	६	३	०	४
०	२८	१९	१२	९	०
१६	४४	३०	९३	४	१६

शनि	राहु*	केतु*	हर्शल
३	११	९	१
७	१३	१३	२४
०	१०	१०	२४

ऑ. बाळ गंगाधर टिळक यांचा जन्मकाल जो पत्रिकेंत लिहिला



* चंद्र चुकलेला आहे. वरील कुंडलीमध्यें बरोबर मांडला आहे तो पहावा, त्याचप्रमाणें राहु, केतुही चुकले आहेत.—संपादक,ज्यो०

आहे तो वर नमुद केला आहे. परंतु माझे मतें हा काल जन्मकालापेक्षां २० मिनिटांनीं जास्त आहे. म्हणजे त्यांचा जन्मवेळ सकाळीं ६ वाजून २९ मिनिटांचा न धरतां तो ६। वाजून ९ मिनिटांचा धरला आहे कारण दोन्ही वेळ धरून जन्म लग्न सिंहच रहातें परंतु उदित अंशांचें वर्णन नामदारांचे स्थितीस जुळत नाहीं म्हणून हा फेरफार करावा लागला आहे. ह्याच वेळेची सायन मानाची कुंडली चालू निरयण पद्धतीस अनुसरून लिहिली आहे.

ऑ० बाळ गंगाधर टिळक यांचे जन्मवेळीं सिंह राशीचा ७ वा अंश उदित आहे. ह्या अंशावर जन्म पावणारा मनुष्य अधिकारत्व, प्रसिद्धत्व आणि श्रेष्ठत्व पावतो. हा आपले अनेक गुणांनीं, आणि मानसिक धैर्यानें सर्वांत श्रेष्ठ अशा महत्पदापर्यंत जाऊन पोहंचतो. हा विलक्षण धैर्याचा, औदार्याचा, जोमाचा व सहनशीलतेचा एक पुतळाच होतो. व आपल्या भाग्योदयकालीं आपल्या गुणांनीं सर्व जगतामधील अचाट व विलक्षण होणाऱ्या गोष्टींचा एक केंद्रच होतो.*

---

* हें अंश फलवर्णन चारुबेल या ग्रंथकारानें "डिग्रीज आफ दि झोडीयाक सिम्बोलाईज्ड" क्रांतिवृत्ताच्या प्रत्येक अंशाचें स्वरूप व फलवर्णन नामक पुस्तकामधून साररूपानें दिलेलें आहे. कै. चिटणिसांनीं कुंडलीमध्यें लग्न सिंहराशीचे ६ अं. ४ कला मांडलें असून खालीं सातवा अंश उदित असल्याचें म्हटलें असून फलवर्णन सिंहराशीच्या सहाव्या अंशाचें दिलेलें आहे. कसेंही असो इतकी गोष्ट मात्र निर्विवादपणें म्हटली पाहिजे कीं सातव्या अंशाचें वर्णन फारच मार्मिक तऱ्हेनें लोकमान्यांचा स्वभाव, गुण व आयुष्यक्रम यांबरोबर मिळतें आहे. यूरोपीय ज्योतिषग्रंथामध्यें आजपावेतों चार ग्रंथकारांनीं अंशवर्णनें प्रसिद्ध केलीं आहेत व तीं किती तंतोतंत जुळतात हें पाहण्यासाठीं आम्हीं येथें मुद्दाम तीं देत आहोंत.

Charubel's "Degrees of Zodiac Symbolized"

♌ 7° *A pyramidal figure with a Maltese cross at the top or rather on the apex.* This IS POSSIBLY AS GLORIOUS

A DEGREE AS ANY IN THE ZODIAC. This degee is impinged by a ray from a transcedental Sun one of those Suns which with our Sun revolves round the grand central Sun Denotes the greater good; the sublime; gives prophetic inspirations; rules the wonderful; and fills the Soul with a flood of celestial glory. This degree throbs sympathetically with the seventh degree of Libro.

भावार्थः—एक मनोऱ्यासारखी उंच व भव्य आकृती असून त्याचे डोक्यावर एक क्रूस आहे अशा तऱ्हेचें सिंहराशीच्या ७ अंशाचें स्वरूपवर्णन आहे. व त्यामुळें राशीचक्रामधील सर्वोत्तम अंशापैकीं हा एक भाग्यवान, तेजस्वी, प्रतापवंत, वैभवशाली, विख्यात, उज्ज्वल किंवा श्रेठ असा हा अंश आहे. कारण आपला सूर्य ज्या दुसऱ्या एका अतिश्रेठ किंवा अनुभवतां न येणाऱ्या किंवा गुणातीत अशा दुसऱ्या सूर्यासह एका मध्यवर्ती महामहा सूर्याभोंवतीं प्रदक्षणा करीत आहे त्या दुसऱ्या सूर्यामधून एक किरण ह्या अंशामध्यें येत आहे. व त्यामुळें या अंशावर जन्म पावणारे किंवा ज्यांचे रवि किंवा चंद्र या अंशामध्यें आहेत. तीं मागसें विख्यात, भाग्यवंत व तेजस्वी आढळतील. त्यांची वाणी भविष्यसूचक किंवा भावी कालदर्शक आढळेल. व तीं मागसें आत्मसाक्षी, ईश्वराच्या अगम्य शक्तीची पूर्ण जाणीव असणारीं, ज्यांचे आत्मे ईश्वरार्शी एकतान झालेले आहेत अशीं आढळतील ह्या अंशाचा व तुळाराशीच्या सातव्या अंशाचा अति निकट संबंध किंवा सहानुभूति आहे.

(२) याच अंशाचें मॉन्स्युअर ला व्होलस्फेग नामक फ्रेंच ग्रंथकाराचें खालीलप्रमाणें वर्णन आहे.

♌ 7 *A Sceptre on the crest of which shines a diamond like a magnificent star.* The native is born to power, eminence, fame. He will by the use of his many talents supplemented by a powerful will rise to a foremost position in his sphere of life. There is in the character a large amount of courage, nobility, energy and endurance and the free use of such qualities will, under a benign fate,

bring the native into a field of life where he will be a central figure. It is a degree of *superiority*.

भावार्थ—या ग्रंथकाराच्या मताप्रमाणें या अंशाचे स्वरूप एक राजदंड असून त्याच्या तुऱ्यावर दैदिप्यमान ताऱ्यासारखा चमकणारा एक भला मोठा उंची व उत्तम हिरा बसविलेला आहे. या अंशावर जन्म पावणारीं माणसें अधिकार, भाग्य, कीर्ति, यांनीं युक्त असतात. व हीं माणसें आपल्या अक्कलहुशारीनें व करारी स्वभावानें कुलदीपक होतात. व ज्या स्थितीमध्यें जन्म झाला असेल त्या अनुरोधानें उच्चतम पदास जातात. हीं स्वभावानें अति हिम्मतबाज, धाडसी, उदार, उत्साही, खंबीर, स्वत्व न सोडणारीं अशीं असतात. व याच गुणामुळें चांगल्या परिस्थितीमध्यें किंवा कुंडलीमध्यें इतर ग्रहस्थिती अनुकूल असतां हीं माणसें कर्तृत्ववान असून जनतेचें नेते असतात. हा अंश श्रेष्ठपणा, श्रेष्ठ पदवी किंवा अधिकारद्योतक आहे.

(३) रॅफेल हा आपल्या Description of the faces and Degrees of the Zodiac अंशवर्णन व हद्दा किंवा द्रेष्काणवर्णन नामक पुस्तकामध्यें खालीलप्रमाणें वर्णन देतो.
The seventh degree of Leo, ascends a man riding upon a lion. A valiant man, strong and wise is by this denoted.

भावार्थ—सिंहावर बसलेला मनुष्य असें या अंशाचें स्वरूप आहे त्यामुळें या अंशावर जन्म पावणारा मनुष्य शूर, हिम्मतबाज असून आपल्या हुशारीनें किंवा धाडसानें प्रमुखत्व पावेल.

(४) ॲलन लिओ हा आपल्या ॲस्ट्रालॉजी फॉर आल नामक ग्रंथामध्यें खालीलप्रमाणें फल वर्णन करीत आहे.
Generous, courteous and obliging, ever hospitable:devotion to brethren.

उदार, सभ्य, परोपकारी, दयाळूपणानें वागणारा व आपल्या बांधवांवर प्रेम करणारा असतो.—**संपादक.** (अपूर्ण)

॥ श्रीसद्गुरवे नमः ॥

ज्योतिर्माला

आप्राचः कामरूपाद्द्रुहिणसुतनदप्लावितादाप्रतीचो
गान्धारात् सिंधुसार्द्रद्रुघुवररचितादाचसेतोरवाचः ।
आकेदारादुदीचस्तुहिनगहनतः सन्तिविद्वत्समाजा
ये ये तानेष यत्नः सुखयतु समजान्कश्चमत्कर्तुमीष्टे ॥ १ ॥

अभिनवाऽऽवृत्ति वर्ष ५ वें. } ऑगस्ट १९१९. { अंक ५ वा.

स्फुटविचार.

सूर्य हा जन्मकुंडलीमध्यें आयुष्य किंवा जीवन शक्ति दर्शवितो व तो आत्मकारक असल्याचें ज्योतिर्विद मानतात. परंतु **चंद्र** हा सूर्याप्रमाणें स्वयंप्रकाशी नसून परप्रकाशित आहे. तो सूर्यकिरणांमुळें प्रकाशित दिसतो म्हणजे थोडक्यांत म्हणावयाचें असतां **चंद्र** हा सूर्याचे गुणधर्म परावर्तन करणारा आहे. त्यामुळें जन्मकाळीं रविचंद्र हे ज्या राशीमध्यें असतील व जसे दृष्टियोग करीत असतील त्याप्रमाणें प्राणिमात्राचें भाग्य, स्वभाग, गुणधर्म असल्याचे पाहण्यास मिळतात. जर **रवि** अग्निराशीमध्यें मेष, सिंह व धनु—यांमध्यें असेल तर जन्मणारामध्यें महत्त्वाकांक्षा, सामर्थ्य, हिंमत, प्रभाव, वीर्य किंवा पाणी जास्त असल्याचें दिसण्यांत येतें व ह्या माणसास नेहमीं पुढारीपणानें, अधिकारानें किंवा प्रत्येक गोष्टीमध्यें पुढाकार घेणें जास्त आवडतें. कोणाची ताबेदारी करणें मुळींच आवडत नाहीं. व अशा वेळी **चंद्रही** अग्निराशीमध्यें असेल तर वरील गुणधर्म जास्त प्रमाणानें उद्दीपन झालेले पाहण्यास

मिळतील. परंतु रवि अग्निराशीमध्यें असून चंद्र पृथ्वीराशीमध्यें–वृषभ, कन्या व मकर राशींमध्यें असेल तर चंद्रामुळें सूर्याचे गुणाचे परावर्तनामध्यें थोडा फरक झालेला पाहण्यास मिळेल. हीं माणसें वरील माणसांइतकीं महत्त्वाकांक्षी व हिमतबाज नसतात. **रवि** व **चंद्र** हे दोन्हीही वायुराशीमध्यें—मिथुन, तुला व कुंभ–असतां, हीं माणसें मोठीं कल्पक, हुशार, मानसिक श्रम करणारीं आढळतात व स्वभावानें शांत व सुस्वभावाचीं असतात. महत्त्वाकांक्षा, हिम्मत वगैरे गोष्टीनें राशींचें वर्गीकरण करणें असतां अग्नि, वायु, पृथ्वी व नंतर जलराशी या क्रमानें करावें लागतें व त्यांत पुन्हा चर, स्थिर व द्विस्वभाव हा क्रम घेतला पाहिजे. म्हणजे अग्निराशीमध्यें मेष श्रेष्ठ तर वायु राशीमध्यें तुला व पृथ्वी राशीमध्यें मकर होत. इत्यादि प्रमाणानें क्रमवर्णन ध्यावें लागतें.

* * *

कुंडल्यांचें निरीक्षण करते वेळीं ग्रहांच्या स्थान व राशिबलावर नुसतें अवलंबून राहून भागत नाहीं तर या दोहोंपेक्षां **दृष्टिबल** हें विशेष महत्त्वाचें आहे. एखाद्या कुंडलीमध्यें धनस्थानामध्यें शनि असून तो दुसऱ्या ग्रहाबरोबर शुभदृष्टियोग करीत असतो अशा वेळीं धनस्थानामध्यें नुसता शनि असल्यामुळें जी स्थिति असावयास पाहिजे त्याचे उलट प्रकार म्हणजे हीं माणसें उत्तम वडिलार्जित इस्टेट असलेलीं, काटकसरी व चांगला पैसा बाळगून असणारीं पाहण्यास मिळतात. परंतु याचे उलट लग्नामध्यें गुरु असून पापदृष्टियोग करीत असतां अल्पायुषी, उघळ्या स्वभावाचीं, अस्थिर वृत्तीचीं, निष्काळजी वगैरे ज्याप्रमाणें गुरु ज्या ग्रहाबरोबर पापदृष्ट असेल तदनुरोधानें अशुभ फलें पाहण्यास मिळतात.

* * *

प्रत्यक्षस्नेहादृष्टि—त्रिकोणदृष्टि किंवा १२० अं. दृष्टि (नवम पंचम योग) व **गुप्त स्नेहादृष्टि**—द्विराश्यंतर किंवा ६० अं. दृष्टि (तृतीय व एकादशयोग) ह्या दृष्टि नांवा प्रमाणें सुख समाधान देतात व साधारणपणें कुरकुरण्यास जागा देत नाहींत. परंतु **गुप्तवैरादृष्टि** केन्द्रयोग व **प्रत्यक्ष** वैरादृष्टि–प्रतियोग यांमुळें अनेक भानगडी व अडथळे मानवी आयुष्यांत आलेले पाहण्यास मिळतात.

परंतु **शनी**मुळें होणाऱ्या केन्द्र किंवा प्रतियोगामुळें दर्शविले जाणाऱ्या संकटांचा परिहार करण्याची अंगांत धमक नसलेली पाहण्यास मिळते, परंतु इतर ग्रहाचे केन्द्र किंवा प्रतियोग हे अडथळ्यास किंवा संकटास तोंड देऊन त्यावर विजय संपादन करण्याची धमक दर्शवितात. समजा एखाद्या कुंडलीमध्यें रवि व चंद्र हे शनीबरोबर केन्द्रयोग करीत आहेत अशा वेळीं उन्नतीकरितां त्याच वेळीं मंगळाचा रविचंद्रांस केन्द्र, प्रतियोग किंवा युतियोग असणें चांगलें कारण त्यामुळें शनीमुळें येणाऱ्या संकटपरंपरेची निरसन करण्याची मंगळामुळें धमक किंवा जोम दर्शविला जातो. अशा स्थितीमध्यें मनुष्यास मंगळाचे दृष्टीसंबंधानें निवडानिवड करून घेण्याची परवानगी ब्रह्मदेव देईल तर खात्रीनें प्रत्येकजण रविचंद्रास मंगळाचा त्रिकोणयोग किंवा द्विराश्यंतरयोग मिळण्याकरितां धांवपळ करील. परंतु म्हणतातना अशा आवडीनावडीच्या वेळा फारच थोडक्यांच्या वांटणीस येत असतात.

* * *

प्रजापति (हर्शल) सप्तमस्थानामध्यें असतां विचित्र व नाना प्रकारचे अनुभव पाहण्यास मिळतात. हा ग्रह या स्थानामध्यें असला म्हणजे भागिदारापासून तोटे, कलह, कोर्टातील कज्जे, भांडणें यांपासून त्रास दर्शवितो. ज्यांचे सप्तमांत हर्शल असेल त्या मंडळींनीं वकील, बॅरिस्टर, सार्वजनिक संस्था, कंपन्या यांपासून सावध रहावें. या मंडळीनें सहसा तिऱ्हाईत इसमावर भरंवसा ठेऊं नये त्याचप्रमाणें ज्या धंद्यामध्यें जनतेचा विशेष संबंध येतो असे धंदे किंवा जेथें स्वतःच जाऊन कामकाज करावें लागतें असें सेल्समन, ट्रॅव्हलिंग एजन्ट यांसारखे धंद्यांत हात घालूं नये. यापेक्षां जे धंदे पत्रव्यवहारानें करितां येतील त्यांत पडावें.

* * *

विशेषतः पुरुषाचे कुंडलीमध्यें जन्मकाळीं रवि हर्शलमध्यें अशुभ दृष्टियोग असतां कांहीं कांहीं विचित्र अनुभव पाहण्यास मिळतात. त्यांत जेव्हां हर्शल सप्तमांत असून रवीबरोबर अशुभसंबंधित असतो त्या वेळीं अशुभ परिणाम फारच तीव्रतेनें अनुभवास येतात व जेव्हां दिनवर्षपद्धतीनें

रवि चलित होऊन ह्या मूळच्या किंवा चलित हर्शलबरोबर अशुभ योग करण्यास येतो त्या वेळीं हीं माणसें बहुशा कोणत्याना कोणत्या तरी उलाढालीमध्यें किंवा खटपटीमध्यें असतात. या वेळीं त्यांस असें वाटत असतें कीं आपण एखादा नवीन उद्योगधंदा सुरूं केला असतां त्यांत आपणाला अनेक प्रकारानें लाभ होऊन मान, सन्मान, कीर्ति मिळेल परंतु हा सर्व भ्रम होय. कारण आजपर्यंत जेवढया या योगाच्या कुंडल्या पाहण्यास मिळाल्या आहेत त्यांमध्यें या मंडळीच्या भ्रमाचा भोंपळा लवकर फुटून जवळ असलेलें सर्व गेलेलें पाहण्यास मिळालें आहे. हा काळ मोठा सावधगिरीनें वागण्याचा असतो.

जन्मकालीं रविहर्शलयुति किंवा समक्रांतिदृष्टियोग असतां देखील वरीलप्रमाणेंच अनुभव जेव्हां पहिल्यानेंच रवि व हर्शलमध्यें दिनवर्षपद्धतीनें पुढें अशुभयोग होतो, त्या वर्षी येतो.

रविहर्शलमध्यें दिनवर्षपद्धतीनें अशुभ दृष्टियोग घडत असतां त्या वर्षी कोणत्याही प्रकारचे नवीन उद्योगधंदे व कारखाने काढूं नयेत. त्याचप्रमाणें हा काळ सट्टेबाजीस—स्पेक्युलेशनकरितां फारच अनिष्ट आहे. या काळांत कोणाबरोबर तंटा, भांडणें, कोर्टातील कज्जे, सार्वजनिक कंपन्यांबरोबर व्यवहार, रेलवे कंपन्यांबरोबर व्यवहार करूं नयेत कारण खात्रीपूर्वक या काळांत सदरहु गोष्टींमध्यें अपयश प्राप्त होण्याचा पुष्कळ म्हणजे शेंकडा ८० टक्के संभव असतो. करितां या गोष्टींपासून त्या त्या वर्षी दूर राहणें विशेष चांगलें. तानीकच्या वर्षप्रवेशकुंडलीमध्यें देखील केन्द्रामध्यें विशेषतः लग्न, दशम, व सप्तम स्थानांमध्यें हर्शल असून रवीबरोबर अशुभ दृष्टियोग घडत असतां त्या वर्षी असाच कांहीं अनुभव मिळणें शक्य वाटतें. वाचक यासंबंधी आपला अनुभव कळवितील काय ?

डोळे कोणी उघडायचे ?

(ले. अंबाप्रसाद)

ज्योतिर्भूषणकारांनीं वार्षिक सभेवर जो लेख लिहिला आहे, त्यांत एक चमत्कारिक सिद्धांत जाहीर केला आहे. हा सिद्धांत त्यांच्या दृष्टीनें खरा आहे. ज्या कार्यास यश मिळतें तें कार्य मात्र महत्त्वाचें व ज्यांत अपयश तें अयोग्य. हा सिद्धांत त्यांनीं कसा काय काढला हेंच कळत नाहीं.

पूर्वगणित चुकीचें आहे व तें सुधारलें पाहिजे असें सर्वत्रांस वाटतें व संशोधनकमिटी तें बहुमतानें सुधारीत आहे असें त्यांचें म्हणणें आहे. पण बहुमतानें गणितांत सुधारणा ही नवीच चीज आहे ! पूर्वकालीं सर्व ग्रह, तारे हे आपल्या पृथ्वीभोंवतीं फिरतात व पृथ्वी स्थिर आहे हें तत्त्व सर्वत्र रूढ होतें. अशा वेळीं गॅलिलिओ सारख्यांनीं पृथ्वी सूर्याभोंवतीं फिरते हें तत्त्व सर्वत्रांस सांगण्यास सुरवात केली. या वेळीं बहुमताकडे त्या महापुरुषानें लक्ष दिलें नाहीं. त्यासाठीं त्यास फार त्रास झाला इतकेंच नव्हे तर न्यायकचेरीत हा त्याचा मोठा अपराध समजला गेला. इतकें अपयश आलें, शिक्षा व जनतेचा कोप झाला म्हणून आपला निश्चय त्यानें सोडला नाहीं. ज्या सत्याचें तत्त्व पटेल त्यानें त्याचें मत ग्राह्य धरावें इतरांनीं त्याची खरपूस षष्ठी काढावी हा क्रम जगाच्या उत्पतीपासून आतांपर्यंत चालला च आहे. रूढ मत व नूतन मत यांचा झगडा अशा विषम परिस्थितींत असतांही, पृथ्वी फिरते हेंच मत अखेर सर्वत्र रूढ झालें. आपलेकडे या तत्त्वासाठींच आर्यभटाची त्याच्या शिष्यानेंच प्रथम टवाळी केली होती ! कारण आर्यभटाचें तत्त्व त्या वेळीं रुचणें बहुमताच्या रुचीला मान्य नव्हतें. तथापि या बहुमताकडे मात्र कोणत्याही गणित्यानें लक्ष्य दिलेलें आढळत नाहीं. गणिती आपणास काय वाटतें तें आपल्या ग्रंथांत लिहून ठेवीत असतो. राजे जयसिंग यांनीं तयार केलेल्या ग्रंथावरून ग्रह साधन येतात, पण ते सर्वत्र रूढ नसल्यामुळेंच मान्य झाले नाहींत. नित्यानंद साधनप्रवर्तक होते हें त्यांचा करणग्रंथ पाहिल्यास समजून येईल. बहुमताची अभिरुची जरी अद्यून त्याकडे वळली नाहीं, तरीहि तें

सत्य तत्त्व केव्हांहि नष्ट होणें शक्य नाहीं. याप्रमाणें सायनवाले आपलें मत इतरांस सांगत असतात. गणिताचीही सुधारणा अमुकच कालांत व्हावी असा त्यांचा आग्रहच नाहीं. त्यांस हे विचार सर्वत्रांपुढें मांडावयाचे असतात म्हणून ते मांडतात; हें त्यांचें कर्तव्यच आहे. ते विचार पूर्ण उपपत्तिसिद्ध आहेत हें दाखविण्यासाठीं वेदशास्त्रादिकांचा ते आधार दाखवितात. हा त्यांचा क्रम असाच चालू राहील. ज्योतिर्भूषणकारांसारख्यांनीं वाटेल ते शाब्दिक छल केले तरी सायनवादी आपल्या उद्दिष्ट कर्तव्यापासून तिळमात्र पराङ्मुख होणार नाहींत व त्यांना कर्तव्यच्युत करण्याची एकाहि निरयणवाद्याची प्रयत्नपरंपरा सिद्धीस जाणार नाहीं.

सायनवाले क्षुल्लक शाब्दिक चुकीसाठीं किंवा हस्तदोषासाठीं पानें खरडणारे नव्हत; किंवा **षष्ठ** कीं **षष्ठम** हा छापखान्यांतील भुतांचा प्रकार ते पाहत नाहींत. जें कारण दाखविलें गेलें आहे तें शास्त्रीय आहे कीं नाहीं एवढेंच ते पाहतात. जर एखादें तत्त्व शास्त्रीय पायावर असेल तर वाक्यांच्या ठेवणीकडे लक्ष देण्याचें त्यांना कारण नाहीं. निरयणवाल्यांची गोष्ट मात्र कांहीं और आहे खरी. सायनवाल्यांचें मुद्दे खोडवत नाहींत तेव्हां मुद्यावर वाद न करितां शब्दरचना, व्याकरण, घरगुती बाबी यांवर कांहींतरी बहकत सुटण्याशिवाय त्यांस गत्यंतर नसतें. अशा बहकण्यानें ज्योतिर्माला कार! आपण मात्र बिथरून जाऊन आपल्या अंकांचीं पानें खरडून वाचकांस ज्योतिषमाहितीस पारखे करूं नका. नाहींतर दर अंकीं 'जशास तसें' करण्याच्या मोहास बळी पडाल बरें!!

रा. नगरकरांनीं 'राजकारणांतून' नवाथेकृत पंचांगाच्या चुक्या दाखविल्या आहेत. खरें म्हटल्यास त्या चुक्यांपैकीं कोणत्याही वाचकास एकच चूक आढळेल. बाकी सर्व हस्तदोष आहेत, पण हे हस्तदोष सहजासहजीं उलगडतात. त्यास इतरांचें मतही घेण्याची जरूरी नाहीं. हें मी स्वानुभवावरून सांगतों. क्रांतीची चुकी मात्र वाचकास प्रथम बुचकळ्यांत पाडील व ही चुकी कशी झाली हें पाहण्यासाठीं मी सूर्योदयसूर्यास्त काढण्याच्या प्रयत्नास लागलों.

सूर्योदय, सूर्यास्त तर बरोबर आहेत. मराठेकृत सायन स्पष्ट ग्रहांच्या पुस्तकांतून रविक्रांति घेऊन चरादि तयार केले व सूर्योदयादि तपासले. हे सारखे अनुक्रमानें १० । १५ दिवसांचे तपासल्यावर केलेल्या गणिताकडे अवलोकन करीत बसलों व ज्यो. नवाथ्यांच्या पंचांगांत चुकी कशी झाली हें सहजीं ध्यानांत येऊन आनंदानें टाळीच वाजविण्याची लहर आली! ही चुकी कच्च्या कामावरून पंचांगाची पक्की कॉपी करतांना झालेली आहे. क्रांतींतील आंकडे उतरण्याच्याऐवजीं **चराचे** आंकडे जसेच्या तसे उतरले गेले होते! अर्थात ही चूक या प्रकारानें घडलेली आहे. हें पाहिल्यावर 'अभिनवगणितज्ञान' म्हणून चेष्टा करणाऱ्या नगरकरांचें जरा कौतुकच वाटलें. बहुमत निरयणाकडे कायमचें करण्यास सायनवाल्यांच्या या चुकीनें आयतें फावलें पण ही एकच चुकी त्यांनीं दाखविली असती तर त्यांचे सायनवाल्यांनीं आभार मानले असते. पण तसें न करितां ३० च्या ऐवजीं अनुक्रमानें लिहितांना १४ चे पुढें १५ लिहिले गेले व शास्त्रार्थात अमावास्येचा शास्त्रार्थ लिहिला गेला इत्यादि सहज दिसणाऱ्या छापण्यांतील चुकांवरून पौर्णिमेस काळाकुट्ट आंधार दाखविला हें म्हणणें जाहीर करण्याचा मोह केवळ सायनवाल्यांची टवाळी करण्यासाठीं नगरकरांस पडला! इतकेंच नव्हे तर या चुका होण्याइतकी घांदल पंचांग छापतांना झालेली आहे हें नगरकरांनींच लिहिलें होतें. म्हणून शंका काढून शंकेचें कारण शोधून त्यावर घांदल हें उत्तर देण्यामुळें नगरकरांनींच आपल्या लेखांत नवाथ्यांचें कार्य केलेलें होतें. यामुळें सायनवाल्यांस त्यावर लिहिण्याची जरूरी पडली नाहीं. असें स्पष्टपणें कोणासही नगरकरांचें पत्र वाचल्यास कळून येईल. पण बहुमत आपलेकडे आहे असें समजून नगरकरांस उत्तर कां देत नाहींत असा सवाल ज्योतिर्भूषणकार करीत आहेत. त्यांनीं नगरकरांचे पत्र डोळे उघडून वाचून पहावें, म्हणजे हा सवाल करणें किती गैर आहे हें त्यांस आढळून येईल. ज्योतिर्भूषणकारांनीं मात्र टिळकपंचांगाच्या स्तुतीच्या भरांत व तें पंचांग बहुजनसमाजानें मान्य करावें यासाठीं लिहितांना पंचांगांत नसतांही प्रतिपदेस चंद्रास नभोमंडळांत आणून त्याजकडून " आज पाडवा असल्याचें " सर्वत्रांस विदित केलें. असली खोटी

साक्ष देण्यास टिळकपंचांगांतील चंद्र तयार होईना म्हणून त्यांस आपल्या कल्पनासृष्टींतील चंद्र आणावा लागला. व हाच कल्पनासृष्टींतला चंद्र नवाध्यांनीं सर्वत्रांस संदेशांतून दाखविला होता व मालाकार, आपणही त्याचा उतारा घेऊन आमच्यासारख्या आपल्या वाचकांस दाखविला होता. असो. ही शके १८४० च्या पंचांगाची हकीगत झाली.

नवाध्यांचें १८४१चें पंचांग आल्याबरोबर राजकारणांत त्या पंचांगांतील वैगुण्य दाखविण्याचा प्रयत्न 'राजंदेकरांनीं' केला आहे. त्यांनीं एक विधान तर **खरोखरीच डोळे न उघडतां** केलेलें आहे. पंचांगांत ग्रहांचे अस्तोदय दिलेले नाहींत व संकष्टीचे उदय दिलेले नाहींत हें तें विधान होय. या विधानास उत्तर देणें म्हणजे व्यापार–ज्योतिषकार, आपणच **'डोळे उघडा'** हेंच होय.

ज्यो. नवाध्यांनीं स्पष्टग्रही पंचांगास चतुरंग म्हणावें अशी त्यांनीं एक सुधारणेची सूचना स्पष्टग्रही पंचांगाबद्दल केलेली आहे. स्पष्टग्रही पंचांगाचा उद्देश केवळ रोजचे निरयण ग्रह ग्रहलाघवाप्रमाणें देणें हा आहे. त्या ग्रहांचें गणित तपासून अमुक ग्रह तयार करतांना अमुक चुकी झाली आहे असें दाखविण्याऐवजीं शास्त्रार्थच अपुरा, करणच दिलेलें नाहीं अशीं व्यंगें दाखविण्यांत आलीं आहेत. नवाथे यांचे जे निरयण स्पष्टग्रह म्हणून पुस्तक निघणार होतें तेंच त्यांनीं दामोदर सांवळाराम मंडळींस दिलेलें आहे हें त्या पंचांगांतील प्रस्तावनेंत उघड आहे. नवाथे यांनीं अधिक मासाबद्दलचें स्पष्टीकरण आपल्या सायन पंचांगाच्या प्रस्तावनेंतच केलेलें असूनही त्याविषयीं नाहक टीका करीत बसणें गैर आहे. तसा अधिक मास धरणें उपपत्तीनें अयोग्य आहे असें राजंदेकरांनीं दाखविलें असतें तर त्यांच्या लेखांस सायनवाद्यांनीं महत्त्व दिलें असतें. कोणत्याही रीतीनें उपपत्तीनें व मुद्यानें सायनवाल्यांचें मत न खोडतां त्यांजवर अवास्तव टीका करण्याशिवाय आतां निरयणवाल्यांस मार्ग उरला नाहीं हें ज्योतिर्भूषणकारांनीं आपल्या लेखांनीं जाहीर केलें याबद्दल त्यांचे आभार मानतों. संपादक महाशय व मालेचे वाचकहो आपल्या अंकांतील बराचसा भाग या कामासाठीं घेतला याबद्दल क्षमा करावी अशी आशा आहे.

परिभ्रमणपद्धति.

(अंक ४ वरून पुढें.)

ह्या उदित अंशाबरोबर **आसेलस्** नांवाचा एक तारा उदयास आला आहे. ह्या ताऱ्याचा स्वभाव रविमंगळांप्रमाणें आहे. म्हणजे तो अशुभ असून अग्निस्वरूपी आहे व त्याच्या परिणामामुळें जन्मणारा आकस्मिक मृत्यूनें अथवा अपघातानें अथवा अग्नीपासून मृत्यु पावेल. लग्नाधिपति हा दशमस्थानाच्या अधिपतीसह लग्नारंभाजवळ आहे. ग्रहमालेचा चालक भगवान् सहस्ररश्मि हा आपले स्वगृहीं आहे. ह्यामुळें जन्मणाराचे अंगीं वरील वर्णनांत स्वगुणांनीं जास्त महत्व येत आहे. स्वगृहींचा रवि तनुस्थानांत असला म्हणजे जन्मणारा शरीरानें दृढ बांधेसूत असतो. मुद्रा भव्य व डोळे मोठे असतात. प्रामाणिकपणा हें त्याचें ब्रीदच असतें व महत्त्वाकांक्षी असतो व दुसऱ्यांनीं केलेला अपमान त्यास सहन होत नाहीं. व स्वभाव मानी असतो. शुक्र सिंह राशिस्थ जन्मलग्नीं असला म्हणजे त्याचा चेहरा वाटोळा असून डोळे विशाळ असतात, मानी असून लोकांनीं केलेला अपमान त्यास सहन होत नाहीं. धर्मस्थानांत म्हणजे नवमस्थानांत गुरु ग्रह आहे व त्याची चंद्राबरोबर युति आहे. ह्या दोन्ही ग्रहांची तनुस्थानावर त्रिकोण दृष्टि आहे नवमस्थानांत गुरु असला म्हणजे त्या मनुष्याची धर्मावर श्रद्धा रहाते. व नेहमीं सत्यप्रिय नीतिवान् असतो. गुरुचंद्रयुति नवमस्थानांत आहे म्हणून धर्मसंबंधाच्या उच्च विचारांचें बीजारोपण जन्मणारांत असतें व त्या गुणाचा परिणाम सामान्य जनांवर होणारा आहे.

कारण, चंद्र हा सामान्य लोकांचा दर्शक आहे. नवमस्थान हें एक दीक्षास्थान आहे, म्हणून जन्मणाराचे हातून धार्मिक व नैतिक शिक्षण लोकसमुदायास मिळेल. ह्या युतीचा परिणाम जन्मणारास आरोग्य, संपत्ति, बहुमान देतो. व त्यास विश्वविद्यालयांतील पदव्या मिळतात. व अशा मनुष्यांमध्यें कायदेनैपुण्य असतें. चंद्राची लग्नावर त्रिकोणदृष्टि आहे म्हणून जन्मणारा आपल्या स्थितींतच संतोष मानणारा असतो. युरेनस् ज्यास कित्येक हर्शल असें म्हणतात व ज्या ग्रहास आपल्या भाषेमध्यें प्रजापति असें म्हणतात हा दशमस्थानांत म्हणजे राजकीय स्थानांत आहे. हा ग्रह राजापासून मान व अपमान देतो. शनि आणि बुध हे व्ययस्थानांत आहेत. शनि ग्रह व्ययस्थानांत असला म्हणजे त्या मनुष्यास गुप्त शत्रु फार होतात. व त्यास लोक फसवितात. त्याजवर मिथ्या आरोप येतात किंवा त्यास कारागृहवासही भोगावा लागतो. बुध* द्वादशस्थानीं असला म्हणजे त्या मनुष्यामध्यें वक्तृत्वशक्ति असते व जगामध्यें त्याला नेहमीं प्रत्येक कामामध्यें यश येतें. बुध हा मुद्रणकलेचा कारक आहे. मंगळ तृतीयस्थानांत असल्याकारणानें जन्मणारा हट्टी व एककल्ली असतो. राहु व केतु ह्यांचें वर्णन दिलें नाहीं. वरील वर्णन यूरोपीय फलग्रंथाच्या आधारें दिलें आहे. उदय अंशांचें वर्णन एका यूरोपीय फल ज्योतिषावरील मासिक पुस्तकांतील घेतलें आहे. हें वर्णन नामदार टिळकांचे चरित्रार्शी कितपत जुळतें ह्याचा विचार लोकांनीं करावा.

---

* खालीलप्रमाणें रॅफेल आपल्या गाईडमध्य म्हणतोः—In ४, ♏ or ♑ many crafty enemies seeking to injure the native secretly; in the other signs it tends to success in life, & fluency in speech.

नामदार टिळकावरती १८९७ सालीं दुर्धर प्रसंग येणार असें भविष्य कांहीं वर्षांपूर्वी मी जें प्रसिद्ध केलें होतें त्याचीं कारणें खालीं देतों.

टिळकांच्या संबंधानें दिलेल्या वर्णनावरून वाचकांचे लक्षांत आलेंच असेल कीं प्रजापति ग्रह दशमस्थानांत राजयश व अपयश देतो. हा ग्रह ४२ वे वर्षारंभीं आपले स्थानापासून बरोबर स्वसन्मुखक्षेत्रीं जातो. प्रजापतीचा प्रदक्षिणाकाल ८४ वर्षांचा आहे. म्हणजे बेचाळिसावे वर्षीं तो मूळचे ठिकाणापासून सप्तमस्थानांत जातो व तेथून दशमस्थानास म्हणजे राजकीय स्थानास पीडा करतो. ना. टिळकांस कारागृहवासास नेणारा ग्रह जो शनि हा चौदा वर्षांपूर्वी दशमस्थानांतून जात असतांना म्हणजे हर्शलचे ऊर्फ प्रजापतीचे मूळ ठिकाणावरून जात असतांना १०१ दिवस कारागृहवास देता झाला. हा शनि ग्रह ९७ सालीं २३ जुलईचे सुमारास म्हणजे ना. टिळकांचें ४२ वे वर्षारंभीं प्रजापतीबरोबर युति करीत आहे. ह्या दुष्ट युतीचा परिणाम कारागृहवास करवील असें सांगण्यास कारणभूत झाला. प्रजापति ग्रहाचा स्वभाव आकस्मिक व अचाट फळें उत्पन्न करण्याचा आहे म्हणून ९७ सालीं टिळकांवर भयंकर प्रसंग गुदरेल म्हणून सावध रहाण्याविषयीं सूचना करण्यांत आली होती व त्याचप्रमाणें बॉंस्टावर पकडण्याचा काल वर्ष बसतांच चारपांच दिवसांत होईल असेंही कळविण्यांत आलें होतें. परंतु ही सूचना त्यांस वेळेवर पोहोचली नाहीं. व रा. टिळक वर्ष बसतांच चारपांच दिवसांनीं पकडण्यांत आले.

४२ व्या वर्षारंभीं प्रदक्षिणाकाल कोष्टकांचे आधारें (ज्यो. मा.

अं. ५ सन १८९६. नवीन ज्योतिर्माला अंक ३ वर्ष ४ थें) ग्रह येणें-प्रमाणें येतात.

रवि	कन्या	२७	अं.
चंद्र	कर्क	९	अं.
मंगळ	धनु	२२	अं.
बुध	सिंह	१६	अं.
गुरु	कन्या	९	अं.
शुक्र	कन्या	१६	अं.
शनि	वृश्चिक	२४	अं.
प्रजापति	वृश्चिक	२९	अं.
नेपच्युन	मिथुन	२१	अं.
राहु	धनु	२२	अं.

सहावें स्थानाचा (म्हणजे शत्रुस्थानाचा) स्वामी शनि हा बारावे स्थानीं म्हणजे कारागृहस्थानीं आहे. हा शनि बुधाबरोबर युति करीत आहे. फलज्योतिषांत बुध हा मुद्रणकलेचा कारक आहे. शनि प्रजापति यांची युति ह्या वर्षी झाली आहे म्हणून गुप्तशत्रु—**जस्टिस** आणि आंग्लो इंडियन पत्रें यांजकडून नामदारांस त्रास झाला. २७ व्या ऑक्टोबर रोजीं शनि हा धन-राशींत जातो व प्रजापति हा ता. २ दिसेंबर रोजीं धन राशींत जातो. त्याच-प्रमाणें २३ दिसेंबर रोजीं मुद्रणकलेचा कारक बुध परिभ्रमणकालाचा उच्च होतो. म्हणून टिळकांचे गुप्त शत्रु जस्टिस वगैरे ह्यांचे अब्रचें कायमचें नुकसान होईल.

बेचाळिसावे वर्षाचा आरंभ सहावे स्थानांत होतो. ह्या वर्षारंभीं पत्रिकें-तील दशमस्थानाचा व वार्षिक दशमाचा अधिपति शुक्र हा आपले नीचांत आहे म्हणून राजकीय अपयश मिळणें संभवाचें आहे, तथापि गुरु, शुक्र, रवि ह्यांचा कन्याराशींतील फेरा राजकीय अपेशाचा ऱ्हास करण्यास मूळचे धनस्थानांत असल्यामुळें, मूळच्या दशमस्थानास दुर्बळ असूनही त्रिकोण-दृष्टीनें संरक्षण करीत आहे. मूळचे कुंडलींत रवि आणि गुरु यांचा त्रिकोण-दृष्टियोग आहे आणि या वर्षारंभीं हाच युतियोग झाला आहे. तारीख १३ सपटंबर रोजीं रवि आणि गुरु (पंचांगस्थ) यांची युति झाली. या युतीचा परिणाम तारीख १४ रोजीं ४ वाजेपर्यंत शुभ होता. ४ वाजल्यानंतर रविगुरु युतीचा परिणाम नाहींसा झाला आणि रवि आपले नीचारंभाजवळ येऊं लागला. रवि, गुरु युतीचा दिवस हाच या खटल्याचा शेवटचा दिवस आणि टिळकांस मुक्त करण्यास कारणभूत होईल असें मला इतर ग्रहांच्या अनिष्ट स्थितीकडे लक्ष देतांही वाटलें होतें; तथापि या तारखेपासून पुढें रवि हा तूळ राशींत म्हणजे आपले नीच राशींत १९ महिने राहणारा अस-ल्यामुळें नामदार टिळकांवर इतर मिथ्या आरोप, देहत्रास, कुटुंबांत त्रास, हानि व भयंकर देहारिष्ट करण्यास तो कारणीभूत होईल असेंही वाटलें होतें व वाटत आहे.

मूळचे दशमस्थानाचा अधिपति शुक्र हा जरी नीच आहे तरी त्याचा संस्कार वाईट होऊं नये म्हणून एक उत्तम हिऱ्याची आंगठी त्यांचे हातांत अखेरपर्यंत ठेविली होती. तिचा परिणाम शुभच झालेला दिसतो. कारण (१२४ अ) कलमाखालीं ३ वर्षांची शिक्षा ठरविली असतां नामदार

स्ट्राची साहेबांकडून अर्धीच शिक्षा देण्यांत आली. नामदार टिळकांस जामिनावर खुलें केलें त्या दिवशीं व ज्या दिवशीं शिक्षा झाली त्या दिवशीं ही सर्व अनिष्ट स्थिति सांगण्यांत आली होती. नामदारांचे स्नेहीवर्गांत या दुःखद स्थितीचा परिणाम आरंभापासून खेदकारक दिसूं लागला म्हणून रा. टिळक हे तारीख १३–१४ रोजीं मुक्त होतील असें सांगणें भाग पडलें व तसें सांगण्यांत रविगुरूची युति ही कारणभूत झाली. कन्या राशींतील तीन ग्रह हेच ज्यूरीचे नामदाराकडचे होते हें लक्षांत ठेवावें. हे ग्रह रवि, शुक्र आणि गुरु होत. बाकीचे पापग्रह जोरदार होते.

तारीख १० ऑक्टोबर रोजीं पंचांगस्थ मंगळ वार्षिक दशमामधून जात आहे, त्याचप्रमाणें मूळचा दशमाधिपति शुक्र तारीख २१ ऑक्टोबर पासून वार्षिक दशमामधून जात आहे म्हणून तारीख २१ नोवेंबरपर्यंत नामदार टिळकांचे संबंधानें म्हणजे राजकीय कामांत त्यांस बरेंच यश येण्याचा संभव आहे. तारीख २३ नोवेंबरपासून प्रदक्षणाकालाचा शुक्र तूळ राशीमध्यें येतो आहे म्हणून २३ नोवेंबरच्या पुढें राजकीय कामांत यश मिळेल, त्याच प्रमाणें वार्षिक दशमाचा अधिपति मंगळ हा मकर राशीमध्यें जात आहे म्हणून हाही राजकीय कामांत अपयश देईल असें वाटत नाहीं.

तारीख २७ ऑक्टोबर रोजीं शनि धनु राशींत व मंगळ तारीख २२ नोव्हंबर रोजीं धन राशींत जात आहे. दिसेंबरच्या मध्यभागीं हे दोन्ही ग्रह लंडन शहराचे तनुस्थानास पीडा करीत आहेत म्हणून महाराष्ट्राचें तनुस्थान जें धन लग्न त्यांत झालेल्या विविध त्रासांचा योग्य निकाल या सुमारास लंडन शहरांत मोठे कडाक्याचे वादविवाद होऊन होईल.

मूळचा लग्नाधिपति रवि हा तूळ राशींत आला आहे. पंचांगस्थ रवि धनराशींत तारीख २३ नोवेंबर पासून २३ दिसेंबर पर्यंत–टिळकांची शरीर प्रकृति चांगली राहील. ता. २१ मार्चपासून त्यांच्या देहकष्टांची समाप्ति होते म्हणून शिक्षा झाल्या दिवसापासून तीं तारीख २३ मार्चपर्यंत टिळकांचे ग्रहांत राजकीय बाबींत यश आणि देहकष्ट हे समसमान दिसत आहेत, म्हणून प्रिव्ही कौन्सिलमध्यें टिळकांचा निकाल योग्य रीतीनें लागला तरी अन्य गोष्टींचा त्रास हाही शंकेस कारणीभूत होत आहे. म्हणून या कुंडलीचा विचार ज्योतिषी लोकांनीं विशेष विचारपूर्वक करून त्यांनीं आपलें मत प्रसिद्ध केल्यास ठीक पडेल. नामदार टिळकांची सुटका होण्यास जीं सबळ कारणें मजला आढळलीं तीं सर्व दिलीं आहेत. तथापि नामदारांची प्रकृति अतिशय बिघडून जाईल असें मजला वाटतें परंतु त्यांत त्यांचा अंत होईल असें वाटत नाहीं. कारण, नामदारांचे हातून सन १९०१ पासून विशेष देशसेवा होणार आहे. तोंपर्यंत त्यांस ईश्वर आयुष्य देवो आणि ग्रहांचे वाईट संस्कार टळोत हीच प्रार्थना परमेशाजवळ आहे. कळावें.

मुंबई ता ३०।१०।९७.

आपला,

जीवनराव विवेक चिटणीस.

पोंच व अभिप्राय.

भारतीय पंचांग—शके १८४१ सालचें स्मार्त, भागवत, वैष्णव, वल्लभ सांप्रदायविहित **भारतीय पंचांग** कि. ८४ आणे. हें निजाम हैद्राबाद येथील ज्योतिर्विद् रा. रा. दत्तात्रय निळकंठ पांडव मावसाळकर यांनीं छापून प्रसिद्ध केलें आहे. पंचांगांत इतर पुष्कळच माहिती देऊन तें अनेक प्रकारानें उपयुक्त करण्याचा रा. पांडव यांनीं प्रयत्न केला आहे. त्यांनीं आपल्या निरयण पंचांगामध्यें चालू सालची हर्शल (प्रजापति) व नेपच्यून (वरुण) या दोन ग्रहांची दर पंधरवड्याची स्पष्ट स्थिति दिलेली आहे. यायोगानें या दोन नूतन ग्रहांसंबंधानें आमच्या निरयणवादी मंडळीस फलज्योतिषशास्त्राचे कामांत बरीच मदत होईल.

पंचांगकार आपल्या आरंभींच्या शब्दांमध्यें खालीलप्रमाणें रा. रा. केतकर व पंचांगकमिटीच्या पंचांगासंबंधानें लिहितात—" वस्तुतः केतकर हे अद्वितीय करणमार्तंड असून आम्हां भारतवासीयांस त्यांनीं ऋणी केलें आहे, याकडे कोणी लक्ष पुरवीत नाहीं, तसेंच पंचांगशोधन कमिटी शके १८३९ तर्फे २३ अयनांश, वेधशाळा स्थापन होईपर्यंत, घेऊन पंचांग प्रसिद्ध करतें, यांतहि लोकोपयुक्त माहिती व दृक्प्रत्ययात्मक गणित असून २३ अयनांशाच्या दिग्विजयाचें " **नवें पिल्लू** " पुढें केलें आहे. यामुळें समाजांत नवा प्रश्न उभा राहिला,.....अयनांश २३ ची ग्राह्यता म्हणजे दुथडी भरलेल्या नदीचे दोन्ही कडेची खोली मोजून मध्यभागाची खोली ठरविण्याप्रमाणें आहे. यापेक्षां ज्योतिर्माला वर्ष ३ अंक ६ तील प्रोफेसर गो. स. आपटे यांचे विचार सरणीचे अयनांश ठरविणें किंवा केतकरांचे ग्राह्य करणें शास्त्रीय व वेधतुल्यदृष्ट्या अप्रशस्ततेबद्दल कोणाहीं तज्ज्ञांत वाद नसता."

—संपादक—

——:o:——

॥ श्रीसद्गुरवे नमः ॥

ज्योतिर्माला

आप्राचः कामरूपाद्दुहिणसुतनदप्लाविताद्प्रतीचो
गान्धारात् सिंधुसार्द्राद्रघुवररचिताद्याचसेतोरवाचः ।
आकेदारादुदीचस्तुहिनगहनतः सन्तिविद्वत्समाजा
ये ये तानेष यत्नः सुखयतु समजान्कश्चमत्कर्तुमीष्टे ॥ १ ॥

अभिनवाऽऽवृत्ति वर्ष ५ वें. } सप्टेंबर १९१९. { अंक ६ वा.

स्फुटविचार.

जन्मकालीं कुंडलीमध्यें हर्शल स्त्रीचा अशुभ दृष्टियोग असणें चांगलें नाहीं. त्यामुळें नाना प्रकारचीं संकटें व अडचणी उत्पन्न होतात. प्रत्येक कामांत कांहीं तरी भानगड झाल्याखेरीज राहत नाहीं.

नोकरपेशामध्यें राहणाऱ्या माणसांचे कुंडलीमध्यें जेव्हां रवि चलित होऊन हर्शल (प्रजापती) बरोबर केन्द्र, प्रतियोग, ४५ अंश किंवा १३५ अंश दृष्टियोग करितो त्या वेळीं नोकरीमध्यें भानगड, उपरी अधिकाऱ्याबरोबर तक्रारी व बेअब्रु झालेली पाहण्यास मिळते अशा काळीं जन्मकालीं रवि-हर्शल अशुभसंबंधित असतां फारच अनिष्ट फळें पाहण्यास मिळतात.

* * *

स्त्रीकुंडलीमध्यें जन्मकालीं रविहर्शलमध्यें अशुभ संबंध असणें चांगलें नाहीं. कारण हा योग विवाहसुखास चांगला नाहीं. अशा स्त्रियांचीं लग्नें

फार उशीरानें होतात. व ज्या वेळीं रवि चलित होऊन प्रजापतीबरोबर अशुभ संबंध होतो तो काळ फारच वाईट जातो. कित्येक स्त्रिया या काळांत अनीतिपथ सेवितात तर कित्येक गोडगोड भुलथापांस फसून भलत्याच मार्गास जातात. तर कित्येकांचे विवाहसुखांत अडचणी येतात. या योगावर कांहीं स्त्रिया नवऱ्यापासून विभक्त पडलेल्या पाहण्यास मिळाल्या आहेत तर कित्येकांचें चटकन लग्न होऊन नंतर एकाचें तोंड पूर्वेस तर एकाचें तोंड दक्षिणेस असें पाहण्यास मिळतें. स्त्रियांस याकाळामध्यें नवऱ्याच्यामुळें किंवा नवऱ्यावर संकटें आल्यामुळें दुःख किंवा कष्ट भोगावे लागतात.

* * *

सांपत्तिक दृष्टीच्या बाजूनें विचार करणें असतां साधारणपणें धनस्थानामध्यें शनि असणें चांगलें नाहीं. परंतु धनस्थानामध्यें शनि पापदृष्ट नसतां उलट शुभसंबंधित असतां मात्र चांगलाच अनुभव पाहण्यास मिळतो. धनस्थानांत निर्बली किंवा पापदृष्ट शनि असतां पैसे मिळविण्यासाठीं फारच मेहनत व यातायात करावी लागते व इतकेंही करून हातीं चार पैसे कचित्‌च लाभतात. व धनस्थानामध्यें शनि असून तो जर जन्मकालीं कुंडलीमध्यें चंद्राबरोबर केन्द्र, प्रतियोग, ४५ अंश किंवा १३५ अंश दृष्टियोग करीत असेल तर अनेक प्रकारांच्या संकटांबरोबर झगडावें लागतें. अनेक भानगडी किंवा प्रयत्न केला तरी प्राप्तीचें मान साधारणच राहतें. पैशासंबंधी अनेक भानगडी उभ्या रहातात. ही मंडळी जन्मतांच जरी गर्भश्रीमंत असली तरी त्यांस सांपत्तिक अडचणी नेहमी येतात व पैसा शिल्लक राहणें कठीण जातें.

* * *

कुंडलीमध्यें कोणत्याही स्थानामधून शनिगुरूंचा केन्द्र किंवा प्रतियोग होणें चांगलें नाहीं. कारण या मंडळीचा पैसा बहुतेक कायदा, कोर्ट यांमध्येंच निकालांत येतो तर कित्येकांचे पैसे ट्रस्टीजमुळें नाहींसे होतात.

व या योगांत आणखी मंगळाच्या अशुभ दृष्टियोगाची भर असल्यास तर मग काय विचारायाचें या मंडळीचा बहुतेक पैसा सट्टेबाजी स्पेक्युलेशन मध्येंच निकालांत आलेला पाहण्यास मिळतो.

* * *

वरील गोष्टींचा विचार करते वेळीं शनि हा दुसऱ्या कोणत्या ग्रहानें शुभदृष्ट आहे किंवा काय इत्यादि गोष्टींचा अवश्य विचार केला पाहिजे. ग्रहांच्या दृष्टियोगाकडे विशेष लक्ष दिलें पाहिजे. धनस्थानामध्यें शनि गुरूनें शुभसंबंधित असतां चांगलीं फलें दर्शवितो. ही मंडळी खाऊन पिऊन सुखी असतात व जमीनजुमला इत्यादि स्थावर मिळकत करतात. व शनि तुला किंवा मकर राशीमध्यें असून गुरु धनु किंवा मीन राशीमध्य असून जेव्हां याचेमध्यें शुभ संबंध आढळण्यांत येतो. त्या वेळीं तर फारच चांगलीं फलें दृष्टोत्पत्तीस येतात.

ज्यांना म्हणून व्यापार करावयाचा आहे त्यांचे सप्तमामध्यें शनि असणें चांगलें नाहीं. कारण या मंडळीस यामुळें व्यापारामध्यें नेहमीच अपयश प्राप्त होण्याची भीति असते. व जर कां शनि सप्तमांत असून चंद्राबरोबर केन्द्र, प्रतियोग, ४५ अंश किंवा १३५ अंश दृष्टियोग करीत असेल तर बहुतेक व्यापारांत दिवाळें फुंकण्याचाच प्रसंग येतो. ह्या मंडळीनें कोणत्याही प्रकारच्या भागीच्या व्यापारामध्यें किंवा व्यवहारामध्यें पडूं नये हें चांगलें. या मंडळीनें व्यापार सार्वजनिक कामें, कायद्याचे व्यवहार, भांडण, कोर्टांतील खटले इत्यादि गोष्टींपासून शक्य तितकें दूर रहावें या मंडळीनें क्रयविक्रय याचा धंदा करूं नये. व उधारीवर केलेले या मंडळीचे सर्व व्यवहार अंगावर येतात. सप्तमांत शनि असून तो गुरूबरोबर केन्द्र योगादि अशुभ दृष्टियोग करीत असतां कायद्याचे कामांत अपयश प्राप्त होतें व ही मंडळी बहुतेक कायद्यामुळें फिर्यादी आर्यादीमुळें बरीच डबघाईस येतात. तर कित्येक प्रसंगीं दिवाळें काढण्याचा प्रसंग आलेला पाहण्यास मिळतो.

———o———

लोकमान्यांचें लोकमान्य मत.

[लेखक—संपादक "कुंडलीविज्ञान,"]

(१) "वराहमिहिराच्या वेळीं वसंतसंपात रेवतीच्या चतुर्थचरणीं होता हें सुप्रसिद्धच आहे. परंतु त्यानें आपल्या ग्रंथामध्यें दोन ठिकाणीं अयनांताच्या त्याच्या पूर्वीच्या ग्रंथांत वर्णिलेल्या स्थितीविषयीं स्पष्टपणें सांगितलें आहे. तो म्हणतो 'सांप्रत अयन पुनर्वसूपासून होतें; परंतु पूर्वी आश्लेषांपासून होत असे.' या वराहमिहिराच्या म्हणण्याला गर्गपराशराच्याही वचनांचा आधार आहे." (वेदकालनिर्णय पृ० १९)

शंका

आश्लेषार्द्धादासीद्यदा निवृत्तिः किलोष्णकिरणस्य ॥
युक्तमयनं तदासीत् सांप्रतमयनं पुनर्वसुतः ॥

पंचसिद्धांतिका.

लोकमान्य म्हणतात त्याप्रमाणें पुनर्वसूपासून दक्षिणायन होतें असें पंचसिद्धांतिकेंत आहे खरें. हें नक्षत्र विभागात्मक घेतल्यास वराहाच्या वेळीं वसंतसंपात रेवतीच्या चतुर्थ चरणीं येतो असें लोकमान्य म्हणतात तें कसें ?

शंका २ री.

आश्लेषार्द्धादक्षिणमुत्तरमयनं रवेर्धनिष्ठाद्यं ॥
नूनं कदाचिदासीद्येनोक्तं पूर्वशास्त्रेषु ॥ १ ॥
साप्रतमयनं सवितुः कर्कटकाद्यं मृगादितश्चान्यत् ॥
उक्ताभावो विकृतिः प्रत्यक्षपरीक्षणे व्यक्तिः ॥ २ ॥

बृ० सं० अ० २

यांत वराहमिहिर म्हणतो, आश्लेषांच्या अर्धावर दक्षिणायन व धनिष्ठांच्या आरंभीं उदगयन पूर्वशास्त्रांत सांगितलें आहे. पण, सांप्रत सूर्याचें दक्षिणायन कर्कराशीच्या आरंभीं व उदगयन मकरराशीच्या आरंभीं होत

आहे हें प्रत्यक्ष पाहून खात्री करून घ्या, येथें शंका अशी आहे कीं, पुनर्वसूच्या आरंभीं कर्कसंक्रमण कसें झालें ? हें संक्रमण सायन असेल असें म्हटल्यास कर्कराशीच्या आरंभीं दक्षिणायन होतें यांत त्यानें नवीन काय सांगितलें ? निरयन म्हणावें तर तें पुनर्वसूच्या आरंभीं कसें होतें ?

शंका ३ री.

पुनर्वसु हें तारात्मक नक्षत्र असेल अशी कल्पना केली तर सूर्यसिद्धांतांत त्याचें भोग ३ रा. ३ अं. दिले आहेत. त्यांत ९० अं. मिळवल्यास १ रा. ३ अं. हा तुला संपात झाला. व त्यांत ६ रा. मिळवल्यानें०रा. ३ अं. हा वसंतसंपात आला. यांतच रेवतीचे भोग ११ रा. २९ अं ९० क. दिले आहेत. म्हणून रेवतीच्या ताऱ्याच्या पुढें०रा. ३ अं. १० येथें संपात येतो. यालाच रेवतीचा चतुर्थचरण म्हणावयाचें काय ?

शंका ४ थी.

वेदांग ज्योतिषांत आश्लेषांच्या अर्धावर दक्षिणायन होत होतें व वराहाच्या वेळीं पुनर्वसूच्या आरंभापासून होत होतें. म्हणजे उभयारंभांत ३३ अं. २० क. चें अंतर आलें. इतकें अंतर पडण्यास (३३—२०×३७२=) २४०० वर्षें पाहिजेत. वेदांगज्योतिषाचा काल इ. स. पू. १३०० असें लोकमान्य (पृ. २०) मानतात. यावरून वराहाचा काल इ० स. ११०० हा येतो हे खरें काय ?

या शंकांचें निरसन पं. रघुनाथशास्त्री, राजंदेकर, नगरकर अगर अन्य विद्वान् करितील, अशी आशा आहे.

पत्रव्यवहार

मिरज ता १०—३ १९१९.

ज्योतिर्माला कर्ते मु. दादर यांस, सां. न. वि. वि.

आपणाकडे, आपल्या वाचकवर्गास उपयोगी पडेल अशी एका मुलाची कुंडली पाठवीत आहें. तीस पुढील अंकीं आपल्या मासिक पुस्तकांत

स्थळ मिळेल अशी आशा आहे जन्म शके १८१८ वैशाख कृष्ण १ ता. २८ एप्रिल १८९६ संध्याकाळीं ५ वाजतां. जन्मस्थळ—सातारा जिल्हा मु. मायणी. या कुंडलींत शनि, शुक्र, रवि, गुरु हे चार ग्रह उच्चीचे आहेत. यावरून ही बऱ्याच थोर घराण्यांतील कुंडली असावीसें वाटतें. पण वस्तुस्थिति उलट आहे. सप्तमस्थानीं मीनेचा शुक्र आहे तथापि त्यास कुरूप स्त्री मिळाली आहे. शिवाय पतिपत्नींत प्रेमाचा अभाव आहे याचें कारण काय असावें बरें ?

निरयण जन्म कुंडली



लाभस्थानीं कर्केचा गुरु आहे परंतु घरची सांपत्तिक स्थिति साधारण गरिबीचीच आहे. द्विभार्यायोग आहे परंतु अद्याप तो फलद्रुप झाला नाहीं. कदाचित् पुढें दुसरें लग्न झालें तर होईल. अशी परिस्थिति आहे विद्या कोणतीही पूर्ण झाली नाहीं. सरासरी इंग्रजी ७ व्या इयत्तेपर्यंत शिकला आहे. संगीताचा फार नादी आहे. ता. १ जानेवारी १९१७ रोजीं सकाळीं ७ वाजतां अंगांतील शर्ट व नेसलेलें धोतर चुलीपुढें शेकत असतां पेटलें. पाठीवरचा सर्व कपडा जळला परंतु अंगास बिलकुल इजा झाली नाहीं. एक फोडही आला नाहीं. असें का व्हावें याचा उलगडा आपण अगर आपल्या कोणी वाचक करतील अशी आशा आहे.

कळावें हे विज्ञापना.

आपला वर्गणीदार,

हरी नारायण पत्की.

गुरु नेपच्युन युतियोगासंबंधी कांहीं ज्योतिर्विदांचे विचार.

तारीख २४ सप्टेंबर सन १९१९ रोजीं सकाळीं ६।४२ वाजतां गुरु व नेपच्युन या दोन ग्रहांची सिंह राशीच्या १० अं. ४९ कलेमध्यें युति होणार असून त्यासंबंधानें आम्हीं आमचे तांत्रिक विचार मालेच्या अंकामध्यें वाचकापुढें मेच्या अंकामध्यें मांडले आहेत व वाचकवर्गास आपापलीं मतें व विचार कळविण्याबद्दल विनंती केली होती. परंतु त्याकडे मालेच्या वाचकांनीं लक्ष दिलेलें दिसत नाहीं. वाचकवर्गाची अशी शिथिलता पाहून वाईट वाटतें. असो पुढें कोणीं याकडे लक्ष पोहंचवीत काय ? चालू अंकामध्यें आम्हांस काय वाटत आहे याचा व ज्या एक दोन मित्रांनीं यासंबंधानें आमच्याजवळ आपले विचार प्रदर्शित केले आहेत ते देऊन पाश्चिमात्य ज्योतिर्विदांचीं यासंबंधानें काय काय मतें आहेत याचा खुलासा करण्याचें योजिलें आहे. युतिकालाच्या ग्रहांची स्थिति वगैरे ज्योतिर्माला अंक २ मध्यें पृष्ठ २६ वर दिली आहे ती पाहावी.

(१) ही युति मुंबई अक्षावर एकादश भावारंभीं उदय पावत असल्याकारणानें कापदेकी सलासंबंधीं कांहीं महत्त्वाचे फेरफार घडून येण्याचा पुष्कळच संभव आहे. युतिकालीं पंचमांत हर्शल व एकादशस्थानामध्यें मंगळ असे दोन ग्रह वसत असल्याकारणानें एकादशस्थानसंबंधी गोष्टीमध्यें बरेंच स्थित्यंतर खात्रीपूर्वक होईल असें वाटतें. या युतीस अनेक दृष्टीनें फार महत्त्व येत आहे. एक तर ही दीर्घकालानें होणारी युति असून याच वेळीं सूर्याचें तुलासंक्रमण होत आहे व थोड्या वेळानें रविचंद्रसंयोग होणार आहे. या युतीमुळें हवेमध्यें भयंकर मोठाले फेरफार होऊन मोठाले तुफानी वारे सुटतील. पावसाचा जोर या वेळीं आपणाकडे जास्त होईल. ही युति मेषसंक्रमणकाळीं उदित असलेल्या दशमाच्या अंशावर होत असल्यामुळें हिंदुस्थानचे राजकारणासंबंधानें काय काय भानगडी उत्पन्न होतात याकडे सर्वांचे डोळे लागतील. मूळ वर्षप्रवेशकाळचे म्हणजे मेषसंक्रमण कुंडलीमध्येंच फारच अनिष्ट योग राजकारणद्योतक गोष्टींसंबंधानें झालेले आहेत. प्रजापक्ष व अधिकारी वर्ग यांमध्यें बराच तीव्रपणा येण्याचा संभव होता व अखेरीस

जनताविजय संपादन करील असें त्याच वेळीं (जानेवारीच्या अंकांत) ध्वनित केलें आहे. त्याच योगास भर पडत असल्याकारणानें साम्राज्य सरकाराचे दरबारांत हिंदी नोकरशाहीच्या धोरणाची चव्हाटयावर शहानिशा होते किंवा काय हें पाहणें आहे. या युतीमुळें सर्व प्रकारचे हलके कामधंदा करणारे लोक, दर्यावर्दी लोक, मासळी मारणारे लोक किंवा त्यासंबंधी धंदे, सर्व प्रकारचा दर्यावरून होणारा व्यापार, जहाजाच्या ने आण करणाऱ्या धंदेवाल्या कंपन्यांची भरभराट होईल.

आमच्या दुसऱ्या एका मित्राच्या मतानें या युतीमुळें नवीन सिनेमाच्या कंपन्या निघतील व त्यांचे शेअरचे भाव वाढतील असें आहे. सिंह राशि किंवा पंचमस्थानावरून नाटक कंपन्या, करमणुकीचीं साधनें यांचा विचार होतो म्हणून त्या दृष्टीनें विचार करितां हें त्यांचें म्हणणें पुष्कळ अंशानें बरोबर आहे असें आम्हांस वाटतें. नाटककला किंवा संगीत शास्त्राच्या पुनर्घटनेचा प्रश्न जनता हातीं घेईल व त्यांत सुधारणा होईल असें म्हणण्यास हरकत नाहीं. नेपच्युनचा संबंध तंतुवाद्यावरोबर विशेष असल्याचें आढळतें. त्यामुळें जलतरंग, सतार, तंबोरा, व्हीआलीन वगैरेमध्यें प्रावीण्य संपादन केलेल्या माणसांचा गौरव होऊन नाट्यकला व संगीतशास्त्राचा दर्जा वर येण्याकरितां प्रयत्न होईल. नाट्य व नाटक कंपन्यांच्या अंतरंगाचा परिस्फोट होऊन अनेक नीचवृत्तीचीं कारस्थानें बाहेर आल्याकारणानें त्यासंबंधानें सुधारणा करणें भाग पडेल. नाटककंपन्या, सिनेमा वगैरे वगैरे करमणुकीच्या साधनांमध्यें सुधारणा होईल. त्यासंबंधानें नवीन कायदेकानु पास केले जातील.

सिंह राशि ही राशिचक्रामधील पांचवी राशि असल्याकारणानें पंचमस्थानद्योतक जी दुसरी बाब सट्टा, जुगार, स्पेक्युलेशन यांसही सर्वत्र अनुमोदनात ऊत येणार आहे. घोड्याच्या शर्यती फारच भरभराट होऊन बहुशा हलकेच लोक यामध्यें विशेष तल्लीन होतील. निरनिराळ्या ठिकाणीं घोड्याच्या शर्यती सुरू होतील. व त्यांची वाढ भयंकर झाल्यामुळें सुधारणा करण्याकरितां कांहीं उपाय हातीं घ्यावे लागतील. कांहीं कालपर्यंत जुगार, स्पेक्युलेशना व सट्टेबाजीचे जगास वेड लागणार आहे ही गोष्ट मात्र निर्विवाद दिसते.

नेपच्युन हा जलतत्त्वाचा कारकग्रह असल्यामुळें त्यासंबंधानें कांहीं नवीन नवीन साधनें जनतेच्या उपयुक्ततेचीं निर्माण होतील. जलतत्त्वाचा किंवा नद्याच्या पाण्याच्या शक्तीचा उपयोग विद्युत निर्माण करण्याकडे होऊन त्या योगानें अनेक लहान मोठे कारखाने पुढें येणाऱ्या १२ वर्षांमध्यें भरभराटीस येतील. नदीस धरणें बांधून किंवा कालवे काढून त्यापासून शेतकीस उपयोग करणाऱ्या कंपन्या निघतील किंवा त्यासंबंधानें नवीन कायदे ठरविण्यांत येतील. नवीन फिशरीज (मासळी मारण्याचे कारखाने) उत्पन्न होतील. त्याचप्रमाणें पर्ल फिशरीजसंबंधानें कांहीं नवीन शोध लागतील. मोत्याची आयातनिर्यातीसंबंधानें कांहीं तरी सुधारीत व्यवस्था होईल किंवा एखादी दुसरी मोठी कंपनी या उद्योगधंद्याकडे लक्ष पुरविणारी निघावी असा तर्क आहे.

नेपच्युन हा ग्रह सर्व प्रकारचे गुंगी आणणाऱ्या द्रव्यांचा द्योतक मानतात त्यामुळें जगांत यापुढें लवकरच आणखी अफूपासून उत्पन्न होणारें किंवा कोकेनसारखें दुसरें द्रव्य उपलब्ध होईल व त्याचा उपयोग वीर्यस्तंभन करण्याकडे किंवा नीच मनोविकार तृप्त करण्याकडे केला जाण्याचा पुष्कळच संभव वाटतो. या युतीमुळें शास्त्रीय विद्वान लोकांचें लक्ष "लिक्विडफ्युएल" कोळशाऐवजीं तेल जाळून कारखाने व त्यासंबंधानें कांहीं चांगले शोध लागतील. एकंदर विचार कसे चालवितां येतील त्यांत काय काय सुधारणा केल्या पाहिजेत याकडे शास्त्रज्ञ लोकांचें विशेष लक्ष लागेल करितां तेलांचा उपयोग निरनिराळ्या रीतीनें कसा करावा याकडे पुष्कळांचें लक्ष वेधेल व आईल केमिस्ट्रीमध्यें निराळे शोध लागून सन १९२४,१९२६,१९२७ यांमध्यें विशेष असें दृष्टोत्पत्तीस येईल. राकेल तेल व पेट्रोलियम यांपासून निरनिराळे पदार्थ निर्माण होतील व लवकरच आपलेकडे राकेल व पेट्रोलिअमच्या खाणी सांपडतील किंवा यासंबंधानें काम करणारे कारखाने लवकरच निर्माण होतील. सन १९२० च्या सप्टेंबर आक्टोबरच्या सुमारास यांपैकीं पुष्कळ गोष्टी पाहण्यास मिळतील.

सिंह राशि किंवा पंचमस्थान यावरून संततीचा म्हणजे राष्ट्रांतील जननाचा विचार होतो व त्याचप्रमाणें या स्थानावरून विषयभोगादि सुखांचा विचार करण्याची पाश्चिमात्य ज्योतिर्विदाची प्रवृत्ति आहे त्या दृष्टीनें विचार

करितां सर्वत्र नैतिक विवाहबंधनानें विषयसुख भोगण्याचा प्रकार सुटून जिकडे तिकडे स्वैराचारास प्राधान्य मिळेल. व त्यामुळें नीतीचीं बंधनें खीळखीळीं होतील. विचित्र प्रकारचें मिश्रण झालेलें पाहण्यास मिळून संकर सुकर होईल. मुलांची जननसंख्या वाढेल, व तींत अनीतीच्या संबंधानें उत्पन्न झालेली फारच मिळेल. आपलेकडे पंचमांत हर्शल व एकादशांत मंगळ आहेत. हा योग चांगला दिसत नाहीं. गर्भपात, व उपजतांच मुलांचा नाश करण्याची प्रवृत्ति दिसत आहे व या गोष्टी फार प्रामुख्यानें पुढें येऊन हिंदी जनतेस निराळ्या तऱ्हेचा मार्ग पतकरावा लागेल. व अखेरीस नामदार पटेल यांचेच बिलाचा स्वावलंबनीय मार्ग पतकरून द्यावा लागेल व सन १९२२ च्या डिसेंबरच्या सुमारास या बाबतींत केवढें तरी स्थित्यंतर झालेलें पाहण्यास मिळेल.

यूरोपीय ज्योतिर्विदांचे विचार.

गुरु आणि नेपच्यून यांच्या युतीबद्दल पाश्चात्य ज्योतिर्विदांनीं आपापले अनेक अभिप्राय प्रसिद्ध केले आहेत. त्या सर्वांची वाक्यरचना जरी भिन्न असली तरी त्यांच्या अभिप्रायामधून जवळ जवळ एकाच प्रकारचा ध्वनि दिसत आहे. कोणी तरी एक जबरदस्त संघटनाशक्तीचा महात्मा पुढें येत आहे, तो आपल्या मनगटाच्या जोरावर सर्व राष्ट्रांचें ऐक्य करील, लोकसत्ता हीच यापुढें जगांतल्या मानवांची सत्ता बनेल, आणि धर्माच्या शुद्ध आध्यात्मिक तेजापुढें इतर मानवी स्वार्थी कल्पना जळून खाक होतील, अशा प्रकारचा मोठा आशावादाचा संदेश हे पाश्चात्य द्रष्टे आज जगाला सांगत आहेत. Coming Christ—तारक येणार, किंवा Order of The Star in The East हा मिसेस ॲनी बेझंटनें स्थापन केलेल्या संस्थेचें ध्येय फलद्रूप होईल, असेहि कित्येकांचे अभिप्राय पडले आहेत. लोकसत्तेची जी लाट आज सगळ्या जगावर उसळली आहे, ती नुसती कल्पित कादंबरीतली नसून तें एक दृश्य सत्य आहे आणि ही लाट लवकरच महासमर्थ होऊन तिच्या प्रभावापुढें अमिरी सत्ता अनियंत्रित सोटेशाही यांना बिनतक्रार हार खावी लागेल: नव्या मन्वंतराचा पराक्रमच असा आहे कीं लोकसत्तेंत

या सत्ता मोठ्या आदरानें समरस होऊन जातील. एका नव्या सुधारणेचा आणि संस्कृतीचा मनु लवकरच निर्माण होऊन तो प्रत्येक राष्ट्राला त्याच्या त्याच्या भावनेप्रमाणें रुचतील आणि पचतील अशा सत्तांचा प्रसाद देईल. लोकांच्या हातांत स्वयंनिर्णयाची सत्ता येऊन तिचा विकास जनतेच्या धार्मिक, सामाजिक व राजकीय उन्नतीकडे बिनचूक होईल. राज्यकर्ते आणि सरकारें यांना असा प्रत्यय येईल कीं राज्यसत्तेची शक्ती जरी वरून परमेश्वरदत्त—येत असली, तरी जगाच्या इतिहासांत असे शेंकडों प्रसंग आलेले आहेत व आतां लवकरच येतील कीं याचवरून उतरणाऱ्या शक्तीच्या पायां तूनहि—जनतेमधूनच—त्याचा फुटेल आणि शेक्सपियरनें एका ठिकाणीं जें म्हटलें आहे कीं राजा म्हणजे कोण ? तर एक माणूस आणि माणूस म्हणजे एक कीटक, या उद्गाराची जाणीव सत्ताधाऱ्यांना आणि सत्तामान्यांना दोघांनाहि सारखीच पटेल बिनाशक प्रवृत्ति तर या नव्या मनूंत याच्यापुढें सूसाप्रमाणें नष्ट होईल. पुढाऱ्यांची अनुमति जनता मान्य करील आणि त्यांच्या सल्ल्यानें आपली सामाजिक व राजकीय परिस्थिति परिणत करण्याचा यत्न करतील. एका सर्वव्यापी धर्ममताचा मोठ्या जोरानें सर्वत्र प्रसार होईल. अध्यात्म भावनेची, गूढ कल्पनाशक्तीची आणि निसर्ग सौंदर्याची भोकी अशी प्रजा पुष्कळ जन्माम येईल. धर्माधर्मातले वाद मिटून एकबधुत्वाच्या कल्पनेचा प्रसार होईल. सामाजिक आणि राजकीय जीवनांतसुद्धां धर्मतत्त्वांचा परिपोष उत्कृष्ट रीतीनें केला जाईल. हिंदुस्थानांतील राज्यकारभाराचीं यंत्रें चांगलीं घासून पुसून स्वच्छ केलीं जातील. त्यांची रचनाहि लोकमताच्या सांच्याला अनुसरून होईल. लोकांच्या हातच्या सत्तेंत बरीच भर पडेल आणि अस्वस्थतेचें प्रमाणहि बरेंच कमी होईल. हिंदी राष्ट्रांत दिवसेंदिवस फोफावत चाललेल्या आध्यात्मिक सामर्थ्यापुढें कोणताहि विरोध टिकाव धरूं शकणार नाहीं. हिंदी लोक आणि हिंदी राष्ट्र यांना स्वातंत्र्याची आणि अध्यात्मसामर्थ्याची जोड मिळेल. ही नेपच्युनची युति प्रेमाच्या सुकाळाची द्योतक आहे. सध्यांच्या निरनिराळ्या धर्ममतांची कस्सून छाननी होऊन त्यांच्यावर वाढलेल्या कुकल्पनांची, व्रतवैकल्याची व गैरसमजांची बांडगुळें छाटलीं जाऊन, मानवी अंतःकरणाला पटणारें असें धर्माचें शुद्ध स्वरूप प्रगट होईल. गूढ विद्येचा शोध करण्याची प्रवृत्ति फार वाढेल. खरें

म्हटलें तर आर्थिक व्यवहारापेक्षां आध्यात्मिक तत्त्वशोधनाकडेच मनुष्यांचें विशेष लक्ष जाईल आणि या तत्त्वशोधनामुळें मानवी हिताच्या ऐहिक प्रश्नांना मोठें सोज्वळ रूप प्राप्त होईल. विलायतेंतील इस्पितळांत कांहीं विशेष सुधारणा होतील आणि नर्सबायांच्या मागण्यांचा विशेष सहानुभूतिपूर्वक विचार होईल. जपानच्या धर्मविषयक धोरणांत बराच फरक होण्याचा संभव आहे. वॉशिंग्टन (अमेरिका) येथें असंतोष, संप, यांचा धूमधडाका उडेल. त्यांच्या कॉंग्रेसमध्यें मोठी घडामोड होईल व त्वेषाच्या चळवळींनां ऊत येईल. अनपेक्षित गोष्टी घडतील. धरणीकंप वगैरे उत्पातांचें बरेंच भय आहे. वॉशिंग्टन, वेलींग्टन स्पेन आणि पोर्च्युगाल या देशांबद्दलचें भविष्य बाद केलें तर बाकीच्या जगावर जवळ जवळ सत्ययुगच येणार अशा प्रकारची ही ज्योतिर्विदांचीं भविष्यवाणी ऐकून कोणीहि हेंच म्हणेल कीं तुमच्या तोंडांत साखर पडो !

सायन भावचलित कुंडली

पान ८९ वर छापलेल्या पत्रव्यवहारांतील दिलेल्या जन्मकालावरून पुढील प्रमाणें सायन भावचलित कुंडली येते.

सायन कुंडलीमध्यें कोणतेच ग्रह उच्चीचे नाहींत. उलट चंद्र आपल्या नीच राशीमध्यें दोन पापग्रहांचे मध्यें धनस्थानांत आहे. लाभाधिपति रवि सप्तमांत असून शनीबरोबर समक्रांतिदृष्टियोग व प्रतियोग करीत आहे. धनाधिपति मंगळ हा मीन या जलतत्त्वाच्या राशीमध्यें असून तो नेपच्यूत बरोबर केन्द्रयोग करीत आहे. अशी ग्रहस्थिति असतां हा मनुष्य थोर घराण्यांतील असेल असें संभवतें काय ?

स्त्रीसुखाचा विचार सप्तमस्थान, सप्तमेश, सप्तमांतील ग्रह यांवरून करण्याचा सांप्रदाय आहे. पाश्चिमात्य ज्योतिर्विद यासंबंधी विचार करते वेळीं चंद्रास फार महत्त्व देतात व स्त्रीचा स्वभाव वगैरे सर्व गोष्टी चंद्र ज्याप्रमाणें दृष्टियोग करण्यास जातो त्यावरून घेतात. येथें सप्तम भावारंभी मेषराशि उदय पावत असून सप्तमांत रवि बुध व शुक्र असें तीन ग्रह आहेत. सप्तमेश निर्बली असून नेपच्यूनबरोबर केन्द्रयोग करीत आहे. चंद्र वृश्चिक राशीमध्यें असून त्यानें शनीबरोबरील युतियोग सोडला असून हर्शल

बरोबर युति सप्तमेश मंगळाबरोबर केन्द्रयोग व नेपच्युनबरोबर प्रतियोग करण्यांस जात आहे. यामुळें स्त्रीसुख कसें असेल याची कल्पना करितां येईल. धनस्थानावरूनही कुटुंबसुखाचा विचार करितात. येथें असलेले शनि, चंद्र, हर्शल ग्रहत्रय कसें सुख दर्शवितात यासंबंधानें जास्त लिहिण्याची जरूरी नाहीं.



क्रांति

रवि १४ उ. २४	बुध. १९ उ. २	शनि १४ द. १९
चंद्र २२ द. ५९	गुरु. २० उ. २९	हर्शल १८ द. १८
मंगळ ८ द. १६	शुक्र ९ उ. १०	नेपच्युत २१ उ. २१

बुधशुक्रयुति केन्द्रामध्यें झाली असून हे दोन ग्रह नेपच्यूनबरोबर द्विराश्यंतर योग करीत आहेत त्यामुळें यास संगीत शास्त्राची गोडी लागली व ही विद्या यांस चांगली येईल असें वाटतें. नेपच्युन (वरुण) हा तंतुवाद्याची विशेष आवड दर्शवितो करितां त्यामध्यें याची चांगली प्रगति होईल.

संपादक—

विविध कुंडली संग्रह.

खालीं दिलेली कुंडली आमचे सहाध्यायी व मित्र डॉक्टर निलकंठ आत्माराम पुसाळकर यांची आहे. सन १९०८ मध्यें त्यांनीं कलकत्ता येथें नॅशनल मेडिकल कॉलेज मध्यें जाऊन तेथें डॉक्टरकीची परीक्षा दिली व नंतर बडोदें येथें प्रॅक्टीस सन १९१४ पासून करीत होते. बडोद्यास हे दांतांचे डाक्टर या नांवानें प्रसिद्ध होते कारण डेन्टीस्ट्रीमध्यें त्यांनीं विशेष अभ्यास करून चांगलें यश संपादन केलें होतें. यांना या वर्षी जुलई महिन्याच्या २६।२८ तारखेच्या सुमारास कालऱ्याचा उपद्रव झाला होता व त्यामुळें ते आजारी होते व त्यांची प्रकृती सुधारत चालली होती परंतु तारीख १ आगस्ट रोजीं जुलाब थांबण्याकरितां त्यांनीं स्वतः अफूचा डोस घेतला व तो चुकून प्रमाणापेक्षां जास्त झाल्यामुळें शनिवार सकाळीं तारीख २ आगस्ट रोजीं देहावसन झालें. ईश्वर त्यांच्या आत्म्यास शांति देवो. असो ईश्वरी सत्तेपुढें कोणाचेंच कांहीं चालत नाहीं असें म्हणून स्वस्थ बसणें भाग आहे.

आमच्या सहाध्यायी मित्राच्या मृत्यूची वार्ता वाचून अति दुःख झालें. याच वेळीं आमची प्रकृति बरीच अस्वस्थ होती.

लग्नाधिपति शनि अष्टमांत, अष्टमांत चंद्र शनि राहु असे ग्रह असल्यामुळें यांचे आयुर्मर्यादेसंबंधानें ३० वे वर्षाचे सुमारास विषप्रयोगानें म्हणजे ज्या वेळीं शनीचें सिंह राशीमधून भ्रमण सन १९१७ च्या जुलईनंतर पुन्हा होईल त्या वेळीं धोका यावा असें आम्ही आमचें मत यांना सन १९०७ सालीं दिलेलें होतें. परंतु कै. जीवनराव यांचे जवळ या कुंडलीसंबंधानें सन १९०८ सालीं विचारतां त्यांनीं वर्षाचे ३२ वे वर्षी या माणसास चुकून विषारी पदार्थ पोटांत जाऊन त्यामुळें अनिष्ट प्रसंग ओढवेल करितां औषधें वगैरे घेण्याचे वेळीं सावध राहण्यास सुचविण्यास सांगितलें होतें.

सायन भावचलित कुंडली



क्रांति

रवि २२ द. २३	बुध १६ द. ११	शनि १९ उ. ६
चंद्र १८ उ. २७	गुरु १७ द. २८	हर्शल ५ द. ४७
मंगळ १ उ. ५३	शुक्र ७ द. ५८	नेप १८ उ. ५

व विशेषतः स्ट्रीकनिआ किंवा अफूसंबंधानें विशेष सावधता बाळगावी असें सुचविलें होतें. कै. चिटणिसांचा व आमचा काल व विषार कसें होईल या संबंधानें मतभेद झाला होता. आम्हांस दुसऱ्याकडून विषप्रयोगाची धास्ती वाटत होती. व कै. चिटणिसांचे मतें चुकून विषारी औषधाचें सेवन होऊन विषामुळें देहनाश व्हावा असें होतें. शेवटीं कै. चिटणिसांचें म्हणणें तंतोतंत अनुभवास पटलेलें पाहून ज्योतिशशास्त्राचे सत्यतेबद्दल आनंद वाटतो.

कै० चिटणिसांनीं ३२ वें वर्ष कसें सांगितलें असेल याचा विचार करितां हें त्यांनीं परिभ्रमण पद्धतीनें सांगितलें असलें पाहिजे असें दिसतें. कारण ३२ व्या वर्षाचा आरंभ अष्टमांत होतो व अष्टमांत असलेले मूळचे चंद्र, शनि व राहु हे लग्नांत येतात. मूळचा लग्नेश जो शनि तो लग्नाच्या अष्टमांतून भ्रमण करीत असलेला आढळतो व परिभ्रमणपद्धतीचा रवि सिंहेमध्यें येत आहे. याच वर्षांत लग्नेश अष्टमेशाची युति अष्टमांत होत आहे. हें ध्यानांत ठेवण्यासारखें आहे.

जन्मकाळीं शनि, नेपच्यून व चंद्र असे समक्रांतियोग करीत आहेत व मृत्युकाळीं नेपच्युनचें भ्रमण शनिचंद्र व परिभ्रमणपद्धतीच्या रवीवरून होत आहे.

तारीख २७ जुलई सन १९१९ रोजीं झालेली अमावास्या अष्टमांतील चंद्र व शनीवर होत आहे व मृत्युकालीं अष्टमांतील सिंहराशि उदय पावत आहे हें विचार करण्यासारखें आहे. मृत्युकाळीं अष्टमांतील राशि व अष्टमांत असलेली विघातक शनिचंद्रयुति उदय पावत होती. हें विशेष पाहण्यासारखें आहे. दिनवर्षपद्धतीनें विचार करतां मृत्युकालीं खालीलप्रमाणें योग पाहण्यास मिळतात.

चलित लग्न ३२ वे वर्षी कुंभेमध्यें ८ कला आलें आहे म्हणजे तें जन्मकालचे अष्टमांतील शनि व चंद्राबरोबर प्रतियोग करीत आहे. हा फारच आयुष्यविघातक योग झालेला आहे. (२) चलित रवि मकरेमध्यें १४ अंश ३८ कला आला असून मंगळ तुलेमध्यें १४ अं. ४१ क. म्हणजे रविचलित हा चलित मंगळाबरोबर केन्द्रयोग करीत आहे. (३) चलित रवि जन्मकालचे नेपच्यूनबरोबर १३५ अंशांचा दृष्टियोग करीत आहे. (४) चलित रवि व चलित गुरूमध्यें ४५ अंशाचा दृष्टियोग होत आहे. (५) चलित रवि हर्शल बरोबर केन्द्रयोग करण्यास जात आहे. (६) जन्मकालीं शनि वक्री आहे तो वक्र होऊन मूळचंद्रावर आला आहे. (७) चंद्राचें भ्रमण चलित कुंडलीचे अष्टमांतून होत असून चंद्र मृत्युकालीं जन्मलग्नाबरोबर केन्द्रयोग व मंगळाबरोबर समक्रांतियोग करीत आहे. मृत्युकालचें मंगळाचें दैनिक किंवा गोचर भ्रमण विचार करण्यासारखें आहे. या वेळीं मंगळ कर्क १६ अं. ३१ मध्यें असून तो रवि मंगल केन्द्रयोग होत असलेला वार्षिक दृष्टियोग उत्तेजित करीत आहे. वरील सात आठ वार्षिक दृष्टियोगांपैकीं एकही योग शुभफलदायी नाहीं. उलट परिस्थिति सर्वप्रकारें अनिष्टच होती.

———:०:———

॥ श्रीसद्गुरवे नमः ॥

ज्योतिर्माला

आप्राचः कामरूपाद्दुहिणसुतनदप्लावितादाप्रतीचो
गान्धारात् सिंधुसार्द्राद्रघुवररचितादाचसेतोरवाचः ।
आकेदारादुदीचस्तुहिनगहनतः सन्तिविद्वत्समाजा
ये ये तानेष यत्नः सुखयतु समजान्कश्चमत्कर्तुमीष्टे ॥ १ ॥

अभिनवाऽऽवृत्ति वर्ष ५ वें. } ऑक्टोबर १९१९. { अंक ७ वा.

सूर्यावरील डाग.

शिरपुर ता. १०-११-१९.

तारीख १७ डिसेंबर १९१९ रोजीं सूर्यावर मोठाले डाग दिसणार असून त्यामुळें लवकरच जगाचा संहार होणार आहे अशा अर्थाचें एक अल्बर्टसाहेबाचें भविष्य प्रसिद्ध झालें असून त्यासंबंधानें आमचें काय मत आहे अशा प्रकारची पृच्छा मालेच्या कांहीं वाचकांकडून झाली असल्याकारणानें चालू अंकामध्यें त्यासंबंधानें चार शब्द लिहिण्याचा विचार आहे.

मिस्टर अल्बर्ट यांचें काय म्हणणें आहे हें सविस्तर आम्हांस मिळालें नाहीं कारण नोकरीमुळें आम्हांस या गांवाहून त्या गांवास प्रवास करीत फिरावें लागत आहे. अद्यापि आम्हांस यासंबंधीं तपास करण्यास वेळ मिळाला नाहीं, किंवा त्यांचा लेखही आमच्या पहाण्यांत अजून आला नाहीं. मुंबईस परत आल्यावर पुन्हा या गोष्टीचा विचार करूं असें म्हणतों. सध्यां

खरोखर जगाचा संहार सूर्यावरील डागामुळें होतो किंवा काय या गोष्टीचा विचार करूं.

नुसत्या डोळ्यांनीं पाहिलें तर सूर्यबिंब सर्व भागीं एकसारखें तेजस्वी दिसतें. नुसत्या डोळ्यांनीं सूर्याकडे पाहूं नये नाहीं तर डोळे बिघडतील. भिंगास काजळ लावून त्या भिंगामधून सूर्यबिंब पहावें. सूर्यबिंब दुर्बीणींतून पाहिलें असतां त्याजवर एक किंवा अनेक काळे ठिपके दिसतात. आणि बाकीचें बिंब एखाद्या स्वच्छ प्रवाही पदार्थांत तांदुळांचे दाणे किंवा बारीक कण तरंगत असल्याप्रमाणें दिसतें. हे कण अस्पष्ट दिसतात. कोठें कोठें मुळींच दिसत नाहींत. हे कण म्हटले तरी त्यांचा वास्तविक विस्तार कांहीं शेंकडो मैल असतो. सर्व डागांची आकृती सारखी नसते. सूर्य आपल्या आंसाभोंवतीं फिरत असल्यामुळें एकच डाग बिंबाच्या निरनिराळ्या भागीं निरनिराळा दिसतो. मातीच्या गोळ्यावर चवली चिकटविली तर कशी दिसेल आणि तो गोळा फिरविल्यामुळें ती कडेकडे गेली असतां कशी दिसेल हें मनांत आणिलें असतां, डागाचें स्थान बदलल्यामुळें त्याची आकृती कशी बदलते याची कल्पना सहज होईल. स्थानांतरामुळें होणाऱ्या फेरफारशिवाय स्वतः डागाच्या आकारांतही फरक होत असतो. कांहीं डाग कांहीं दिवस दिसून नाहींसे होतात. आणि कांहीं तर कांहीं महिने दिसत असतात. एखादा डाग इतका मोठा असतो कीं तो नुसत्या डोळ्यांनींही दिसतो. भारतवासीय लोकांना सूर्यावर डाग असल्याचें माहीत होतें व प्रसिद्ध वराहमिहिरानें यासंबंधानें चांगलें वर्णन दिलें आहे. डागाच्या आकारावरून फलादेश कसा करावा यासंबंधीचे श्लोक खालीलप्रमाणें बृहत्संहिता अध्याय ३ आदित्याचारामध्यें आढळतात.

सतमस्कं पर्वविना त्वष्टा नामार्कमण्डलं कुरुते ।
स निहन्ति सप्तभूपात् जनांश्च शस्त्राग्निदुर्भिक्षैः ॥

अर्थः—त्वष्टा नामक ग्रह पर्वदिवसावाचून अन्य दिवशीं जेव्हां सूर्यमंडल अंधकारयुक्त करितो, तेव्हां नक्षत्र कूर्माध्यायांत सांगितलेले सात राजे मरण पावतात. त्याचप्रमाणें शास्त्र, अग्नि व दुष्काळ यांच्या योगानें लोकांचाही नाश होतो.

हा त्वष्टा नामक ग्रह कोण असावा, हें समजण्यास मार्ग नाहीं. हा ग्रह सूर्यबिंब आच्छादन करितो असें यांत वर्णन आहे. हा चमत्कार कोणी पाहिल्याचेंही कोठें वर्णन वाचण्यांत नाहीं. पर्वकाळीं म्हणजे पौर्णिमा व अमावास्या या दिवशीं ग्रहणसमयीं जशा प्रकारची चंद्रसूर्यांचीं बिंबें काळीं होतात तशींच हा ग्रह [कदाचित अति मोठा डाग किंवा अशनींचा ओघ] सूर्याच्या व चंद्राच्या आड आला असतां काळीं होतात, असें पराशराचें वचन आहे. "अपर्वणि शशाकीं त्वष्टा नाम महाग्रहः । आवृणोति तमः श्यामः सर्व लोकविपत्तये ॥"

तामसकीलकसंज्ञा राहुसुताः केतवस्त्रयस्त्रिंशत् ।
वर्णस्थानाकारैस्तान् दृष्ट्वाऽर्कें फलं ब्रूयात् ॥

अर्थः—तामसकीलक या नांवाचे राहुपुत्र धूमकेतु यांत ३३ आहेत, ते सूर्याच्या आड येतात, त्या वेळीं त्याच्या बिंबावर उमटलेला रंग, त्या बिंबावरील जागा आणि त्यांचा दिसणारा आकार हे अवलोकन करून फलें सांगावीं.

त्वष्टा आणि तामसकीलक नांवाचे धूमकेतु यांत व इतर धूमकेतूंत इतकाच फरक आहे कीं, इतर धूमकेतु आकाशांत प्रत्यक्ष दृष्टिगोचर होतात, तसे हे प्रत्यक्ष दिसत नाहींत. ते जेव्हां सूर्याच्या अगर चंद्राच्या आड येतात तेव्हां सूर्यावर त्यांचे डाग दिसतात. त्वष्टा नामक केतु फार मोठा असल्यामुळें तो सर्व सूर्यबिंब आच्छादन करितो. त्वष्टा नामक ग्रह—किंवा केतु नुसत्या डोळ्यांनीं दिसणारा सूर्यावरील प्रचंड डाग असावा, व तामसकीलक नांवाचे केतु (राहुपुत्र) हे त्यापेक्षां लहान असणारे डाग आहेत.

ते चार्कमंडलगताः पापफलाश्चन्द्रमंडले सौम्याः ।
ध्यांक्षकबन्धप्रहरणरूपाः पापाः शशांकेऽपि ॥

अर्थः—त्या तामसकीलक केतूंनीं सूर्यबिंब आच्छादिलें तर अनिष्ट फल प्राप्त होतें; व चंद्रबिंब आच्छादिलें तर शुभफल प्राप्त होतें; त्यांचे कावळा, मुंडकें, खड्ग, शस्त्र, इत्यादिकांसारखे आकार चंद्रमंडळावर दिसले तर

अनिष्ट फल मिळतें. अन्यरूपाचे मात्र चंद्रमंडलावरील आकार शुभ असतात. सूर्यमंडलावर कोणतेही आकार कसेही दिसले तरी अशुभच होत.

सूर्यावर जसे डाग दिसतात, तसे चंद्रावरही दिसतात, पण त्यांत फरक आहे. सूर्यावरील डागांना गति आहे. तशी चंद्रावरील डागांना नाहीं. चंद्रावर जे लहानमोठे पर्वत आहेत त्यांच्या शिखरांवर सुर्यकिरण जसे पोहोंचतात तसे जी सपाट किंवा खोलकट जमीन आहे तेथें पोहोंचत नाहींत, त्यामुळें तेथील भाग काळ्या रंगाचे दिसतात. यांना अनुसरून कदाचित् वरील चंद्रावरील डागाचें वर्णन असावें.

तेषामुदये रूपाण्यम्भः कलुषं रजोवृतं व्योम ।
नगतरूशिखरामर्दी सशर्करो मारुतश्चण्डः ॥
ऋतुविपरीतास्तरवो दीप्ता मृगपक्षिणो दिशां दाहाः ।
निर्घातमहीकम्पादयो भवन्त्यत्र चोत्पाताः ॥

अर्थः—त्या तामसकीलकांच्या उदयकाळीं लक्षणें होतात, तीं अशीं-उदकें एकदम गढूळ होतात, आकाश धुळीनें धुंद होतें. धुळीचे बारीक कण ज्यामध्यें आहेत असा प्रचंड वारा सुटून पर्वत व वृक्ष यांचीं शिखरें मोडून पडतात, वृक्षांना ऋतुप्रमाणें फळें व फुलें येत नाहींत. पशुपक्षी संतप्त व दिशा पेटल्यासारख्या दिसतात, तुफानी वारा सुटून भूकंपादि उत्पात होतात.

यस्मिन् यस्मिन् देशे दर्शनमायान्ति सूर्यबिंबस्थाः ।
तस्मिंस्तस्मिन् व्यसनं महिपतीनां परिज्ञेयम् ॥
क्षुत्प्रम्लान शरीरा मुनयोऽव्युत्सृष्टधर्मसच्चरिताः ।
निर्मांसबालहस्ताः कृच्छ्रेणायान्ति परदेशम् ॥
तस्करविलुप्तवित्ताः प्रदीर्घनिःश्वासमुकुलिताक्षिपुटाः ।
सन्तः सन्नशरीराः शोकोद्भव बाष्प रुद्ध दृशः ॥
क्षामा जुगुप्समानाः स्वनृपतिपरचक्रपीडिता मनुजाः ।
स्वनृपतिचरितं कर्म न पुरा कृत्यं प्रभुवन्त्यन्ये ॥

गर्भेष्वपि निष्पन्ना वारिमुचो न प्रभूतवारिमुचः
सरितो यान्ति तनुत्वं कचित्कचिज्जायते सस्यम् ॥

अर्थः—ज्या ज्या देशामध्यें ते तामसकीलक ग्रह सूर्यबिंबावर दृष्टोत्पत्तीस येतात त्या त्या देशचे राजे संकटांत पडतात; ऋषि भूकेमुळें म्लान शरीर होतात, ते आपला सद्धर्माचार सोडतात व रोड झालेलीं आपलीं मुलें हातांत घेऊन मोठ्या कष्टानें परदेशांत जातात. साधूंना चोर लुटतात, त्यांची इतकी कठीण स्थिति होते कीं, दीर्घश्वास सोडल्यामुळें त्यांच्या पापण्या मिटलेल्या दिसतात, शरीर गळाटलेलें होते व त्यांचे दुःखातिरेकानें डोळे भरून येतात; सामान्य लोकांची स्थितिही तशीच भयंकर होते. ते खावयास न मिळाल्यामुळें कृश होतात, त्यांच्यावर स्वचक्र व परचक्र येऊन ते मोठ्या पेंचांत सांपडतात, व आम्ही आज जी स्थिति भोगीत आहों ती पूर्वकर्मानुसार असून तिचा राजाशीं कांहीं संबंध नाहीं, असें दीन शब्द उच्चारीत असतात; मेघ गर्भलक्षणयुक्त असतांही वृष्टि करीत नाहींत, नद्यांचें पाणी आटतें व क्वचित् ठिकाणीं धान्य पिकतें.

दण्डे नरेन्द्रमृत्युर्व्याधिभयं स्यात्कबन्धसंस्थाने ।
ध्वांक्षे च तस्करभयं दुर्भिक्षं कीलकेऽर्कस्थे ॥

अर्थः—ते तामसकीलक ग्रह सूर्यबिंबावर काठीच्या आकारासारखे दिसले तर राजाचा मृत्यु होतो, मुंडक्यासारखे दिसल्यास रोगाची साथ येते, कावळ्यासारखे दिसल्यास चोऱ्या होतात, व खांबासारखे दिसल्यास दुष्काळ पडतो.

राजोपकरण रूपैश्छत्रध्वज चामरादिभिर्विद्धः ।
राजान्यत्वकृदर्कः स्फुलिंगधूमाभिर्जनहा ॥

अर्थः—सूर्यावर हत्ती, अश्व, इत्यादि राजचिन्हें दिसतील किंवा छत्र, पताका व चवरी या आकारांचीं चिन्हें दिसतील तर दुसरा राजा होईल. व अग्निकण आणि धूर इत्यादि चिन्हें दिसतील तर लोक फार मरतील.

एको दुर्भिक्षकरो द्व्याणः स्युर्नरपतेर्विनाशस्त्व ।
सितरक्तपीतकृष्णैस्तैर्विद्योऽर्कोऽनुवर्णघ्नः ॥

अर्थः—सूर्यबिंबावर एकच आकृति दिसेल तर दुष्काळ पडेल. दोन किंवा दोहोंपेक्षां अधिक दिसतील तर राजाचा नाश होईल. त्या आकृतीचा रंग पांढरा असेल तर ब्राह्मणांना, तांबडा असेल तर क्षत्रियांना, पिंवळा असेल तर वैश्यांना व काळा असेल तर शूद्रांना मारक समजावा.

दृश्यन्ते च यतस्ते रविबिंबस्योत्थिता महोत्पातः ।
आगच्छति लोकानां तेनैव भयं प्रदेशेन ॥

अर्थः—रविबिंबावर उत्पन्न झालेले ध्वांक्षादि आकृतीचे मोठे उत्पात ज्या दिशेकडे दिसतील त्या दिशेकडील प्रदेशांत लोकांना मोठें भय उत्पन्न होईल.

असो वरील श्लोकावरून वाचकाच्या सहज लक्षांत येईल कीं वराहमिहिराच्या काळीं इसवी सन ५०० च्या सुमारास भारतीय लोकांस सूर्यावरील डागांची चांगली कल्पना होती इतकेंच नव्हे तर डागाच्या निरनिराळ्या आकारमानावरून काय काय फलें अनुभवास येतात व डागाचे आकार किती प्रकारचे व कोणत्या रंगाचे असतात यासंबंधानें त्यांनीं बरेच सूक्ष्म शोध केले असावे असें म्हणण्यास हरकत नाहीं. डाग कसे होतात कां होतात व त्यांचीं फलें काय मिळावीं याची कल्पना एक दोन वर्षांचें निरीक्षण करून सहसा येईल असें दिसत नाहीं. यास बराच कालावधी लागला पाहिजे. हा अभ्यासाचा, निरीक्षणाचा आणि प्रत्यक्ष परिचयाचा प्रश्न आहे. डागांस केतुपुत्र या नांवानें संबोधिलें आहे व त्यावरून सूर्यावर होत असलेल्या ग्रहांच्या आकर्षणानें डाग पडत असतात असें मानावें लागतें. सूर्यबिंबाच्या विशिष्ट भागावर निरनिराळ्या ग्रहांचा अंमल होत असून त्यामुळें सूर्याच्या अंतररचनेंत भयंकर फेरफार होऊन हे डाग दिसत असले पाहिजेत व त्या त्या ग्रहाच्या स्थित्यनुरोधानें त्या त्या विभागांत कमी अधिक प्रमाणांत डाग दिसले पाहिजेत. या संबंधांत निरनिराळ्या विद्वान लोकांचीं

निरनिराळीं मतें आहेत. कित्येक पाश्चिमात्य पंडितांच्या मतानें या डागांचा व गुरूच्या भ्रमणाचा निकट संबंध आहे. गुरु आपल्या सूर्याभोंवतील कक्षेमधील नीच बिंदूजवळ आल्यानंतर पुन्हा त्याच ठिकाणीं येण्यास त्यास ११ वर्षें व सरासरी ११ महिने लागतात व हाच काल डागाच्या पुन्हा पुन्हा दिसण्याच्या काळांत आढळण्यांत येत असल्यामुळें वरीलप्रमाणें त्यांचें मत होणें साहजिकच आहे. परंतु नुसत्या गुरूचाच सूर्यावरील डागांबरोबर संबंध असेल असें वाटत नाहीं. सूर्यबिंबावर बुध, शुक्र, पृथ्वी, मंगळ, या ग्रहांचा तरी खास परिणाम होत असला पाहिजे व या सर्वांच्या सूर्याजवळील नीच बिंदूजवळ येण्याच्या कालाचा लघुत्तम काढला असतां जी संख्या येते त्याच त्या वर्षांनीं पुन्हा पुन्हा तसेच डाग दिसतात.

सूर्यबिंबाचा आकार लक्षांत आणतां हे डाग लहान दिसले तरी त्यांचें क्षेत्र किती मोठें असतें याची कांहींशी कल्पना सहज करितां येईल. कांहीं डागांचें क्षेत्रफळ कोटयवधी मैल असतें व आपल्या पृथ्वीसारख्या कांहीं पृथ्व्या तर त्यामध्यें सहज गडप होतील. साधारणपणें सूर्यावर जे डाग दिसतात त्यांचा मध्यभाग फार कालाचा दिसतो त्यास **छाया** म्हणतात; आणि डागाभोंवतीं जी काळसर जागा दिसते तीस **छायाकल्प** असें म्हणतात.

यूरोपीय राष्ट्रामध्यें सूर्यावरील डागांचा शोध प्रथमतः सन १६११ मध्यें म्हणजे दुर्बीणीची कल्पना निघाल्यानंतर लागला आहे. सूर्य आपल्या आंसाभोंवतीं फिरतो हें डागांमुळेंच समजलें. सूर्यावर हे डाग एकाद्या वर्षी फार दिसतात, एकाद्या वर्षी थोडेच दिसतात. सबंध वर्षांत सूर्यावर मुळींच डाग दिसला नाहीं असें कधींच होत नाहीं. हे डाग कमजास्त दिसण्याच्या काळांत कांहीं नियम दिसून येतो. एकदां डाग फार दिसले तर पुन्हा ११ वर्षें ३ महिने इतक्या काळानें फार दिसतात. इसवी सन १८२०, १८२३, १८३३, १८४३, १८५६, १८६७, १८७८ ह्या वर्षी डाग फार थोडे दिसले. आणि इ. स. १८०४, १८१६, १८३०, १८३७, १८४८, १८६०, १८७०, १८८३, १८९२, ह्या वर्षी फार दिसले. सूर्यावर इतर ग्रहांच्या आकर्षणामुळें त्याच्या अंतःस्थितीमध्यें कांहीं धडामोड होऊन नियमित कालानें हे डाग दिसत असावेत असें आम्हांस वाटतें.

सूर्याच्या डागांच्या कालचक्रास धरून धान्यादिकांचे भाव कमजास्त होतात; डाग कमी असतात तेव्हां सूर्यकिरण पिकास अनुकूल असतात, असें **हर्शल** नामक ज्योतिर्विदाचें मत होतें. कै. वा. **केरोपंतनाना** यांनीं याबद्दल पुष्कळ विचार केलेला आहे. पावसाशीं व दुष्काळाशीं डागांचा संबंध आहे असें त्यांचें अनुमान होतें. मद्रास येथील वेधशाळेचे मुख्य अधिकारी **पागसन** ह्यांचे मत होतें कीं, डागाप्रमाणें कर्नाटकाच्या पावसांत फरक पडतो. परंतु एखादे वर्षी पाऊस कमी पडला तरी तो हंगामशीर पडला असतां पिकांस फार उपयोगी पडतो, असें होतें. यामुळें डागांवरून दुष्काळाबद्दलचे नियम फारसे बांधितां यावयाचे नाहींत. हर्शलचें मत पुढील अनेक वर्षांच्या अनुभवावरून खरें ठरलें नाहीं. आणि डागांशीं पृथ्वीच्या उष्णतेचा व वातावरणाच्या स्थितीचा कांहीं संबंध आहे काय, असल्यास कसा आहे याबद्दल कांहीं निश्चित सिद्धांत अद्यापि ठरले नाहींत.

सूर्यावरील डागामुळें वातावरणावर कांहीं फरक होतो कीं काय? म्हणजे या डागांचे एक चक्राबरोबर हवेचा एक पर्याय होतो कीं काय? या प्रश्नाचें निश्चितपणें असें कांहींच उत्तर देतां येत नाहीं. पण अनुभव असा येतो कीं ज्या वेळीं एखादा मोठा डाग दिसूं लागतो त्या वेळीं सगळ्या पृथ्वीवर लोहचुंबकाचे सुईचे दिशेमध्यें एकदम फरक पडतो व फार तेजस्वी अरोरा बारीलस नांवाचा प्रकाश दिसूं लागतो. म्हणजे सूर्यावरील डाग व पृथ्वीवरील निदान कांहीं गोष्टी यांमध्यें संबंध असावा. शिवाय डाग जास्त झाले म्हणजे उष्मता जास्त होते व डाग कमी झाले म्हणजे उष्णता कमी होते. यावरून असें दिसतें कीं हवेवरसुद्धां डागांचा परिणाम होत असला पाहिजे. सूर्यावरील डागांचा परिणाम जर हवेवर होत असेल तर पावसावरही झालाच पाहिजे. कै. केरूनाना छत्रे यांनीं सूर्याच्या डागांवर अतिवृष्टि किंवा अनावृष्टि अवलंबून आहे या गोष्टीकडे विद्वानांचें प्रथम लक्ष वेधलें. एकोणिसाव्या शतकांतील सूर्यावरील डागांचे वेध उपलब्ध आहेत. त्यावरून असें दिसून येतें कीं, सूर्यावरील डागांची संख्या एकदां वाढत जाते नंतर उतरत

जाते. प्रो. केरुनाना यांचें म्हणणें असें आहे कीं सूर्यावर ज्या सालीं डाग दिसतात त्यानंतर चार वर्षांनीं अतिवृष्टि होते व ज्या वर्षी डाग अगदीं कमी दिसतात त्यानंतर चार वर्षांनीं अवर्षण पडतें. तसेंच मुंबईचे पावसाचे आंकडे घेऊन त्यांनीं असें दाखविलें आहे कीं, कोंकणांत ज्या सालीं अतिशय पाऊस पडतो त्या सालानंतर एक किंवा दोन वर्षांनीं अगदीं कमी पाऊस पडतो.

ज्या सालीं सूर्यावर डाग अगदीं कमी दिसतात त्यानंतर सुमारें चार किंवा पांच वर्षांनीं एकदां अवर्षण पडतें व नंतर त्याच सालानंतर सुमारें दहा वर्षांनीं दुसरें अवर्षण पडतें. हीं अवर्षणें नेहमीं एकाच भागांत पडतात असें नाहीं. हिंदुस्थानांत कोणत्या भागांत पडतात त्याचा नियम सांगतां येत नाहीं. प्रोफेसर छत्रे यांचें कोष्टक पुढें त्याच नियमानें वाढविलें तर असें येतें.

कमी डागांचें वर्ष.	अवर्षणाचें वर्ष.	दोहोंमध्यें अंतर.
१८७८	१८८२	४
	१८८८	१०
१८८९	१८९३	४
	१८९९	१०
१९०१	१९०५	४
	१९११	१०
१९१४ (!)	१९१८	४
	१९२४	१०
१८२९ (!)	१९२९	४
	१९३९	१०
१९३६ (!)	१९४०	४
	१९४६	

यांत सन १८८२ व १८९३ या वर्षांचा विचार सोडून दिला तरी १८९६।९७ चा दुष्काळ यांत येत नाहीं. हें तेव्हांच लक्षांत येईल. अगदीं कमी डागाचे वर्षापासून अनुक्रमें सुमारें चार व दहा वर्षांनीं अवर्षणें पडतात; एकदां अगदीं कमी डागांचे वर्ष येतें. पण दहा वर्षें हें अंतर सुद्धा बरोबर नाहीं. त्यात कमी जास्ती फरक होतो हें खालील कोष्टकावरून समजेल.

गेल्या शंभर वर्षांत कमी जास्ती डागांचीं वर्षें.

सर्वांत जास्त डागांचीं वर्षें.	दोहोंमध्यें अंतर.	सर्वांत कमी डागांचीं वर्षें.	दोहोंमध्यें अंतर.
१८०४		१७९८	
१८१६	१२	१८१०	१२
१८३०	१४	१८२३	१३
१८३७	७	१८३३	१०
१८४८	११	१८४३	१०
१८६०	१२	१८५६	१३
१८७०	१०	१८६७	११
१८८४	१४	१८७८	११
१८९३	९	१८८९	११
		१९०१	१२

म्हणजे यावरून नक्की अंदाज करितां येत नाहीं. तरी हा संबंध लक्षांत ठेवण्यासारखा आहे. प्रोफेसर छत्रे यांचे मतें हा सूर्याचे डागांचा परिणाम सह्याद्रीचे माथ्यावर व तेथून पूर्वेकडे देशावर विशेष आढळून येतो. पण हिंदुस्थानचा पश्चिम किनारा व कलकत्याजवळील प्रांत या भागांत तो फारसा आढळत नाहीं. वास्तविक पाहतां सूर्यावरील डागांचा परिणाम पावसाबर होत असेल तर ज्या ठिकाणीं पाऊस अगदीं नियमानें पडतो अशा ठिकाणीं डागांबरोबर होणारा फरक चांगला आढळून आला पाहिजे. पश्चिम

किनारा व बंगाल येथें पाऊस नियमानें पडतो तर डागांबरोबर होणारा फरक येथेंच चांगला समजला पाहिजे. छत्रे यांचे मतें येथें तो आढळत नाहीं. पण असें कां होतें याबद्दल त्यांनीं कारण दिलें नाहीं.

असो येथपर्यंत केलेल्या विवेचनावरून वाचकांच्या सहज लक्षांत येईल कीं नुसत्या सूर्याच्या डागानें पृथ्वीचा नाश कधीं होणें शक्य नाहीं, मागें झाला नाहीं व आतांही होईल असें वाटत नाहीं. सन १९२० सालामध्यें कायकाय घडामोडी होणार आहेत यांचें सविस्तर विवेचन मालेच्या जानेवारी सन १९२० च्या अंकांत येईलच.

चरित्रात्मक कुंडली संग्रह.

कै. केरुनाना छत्रे.

ज्योतिर्माला मासिकाच्या ५ व्या वर्षाच्या ४ थ्या अंकामध्यें लोकमान्यांच्या कुंडलीचें कै. चिटणीसांनीं प्रसिद्ध केलेलें वर्णन दिलें आहे. त्याचप्रमाणें आज दुसऱ्या एका प्रसिद्ध व्यक्तीच्या कुंडलीचें सन १८९२-९३ सालीं इंदुप्रकाशामध्यें कै. जिवनराव चिटणीस यांनीं प्रसिद्ध केलेलें वर्णन मालेच्या वाचकांकरितां पुन्हा देण्याचें योजिलें आहें. हें वर्णन अनेक दृष्टीनीं महत्वाचें आहे. कारण जाताजातां त्यामध्यें सायन व निरयण पद्धतीचा तुलनात्मक विचार केला आहे. व त्यावरून मालेच्या वाचकांस पुष्कळच नवीन माहिती मिळेल अशी आमची खात्री आहे.

" मागें कळविल्याप्रमाणें आज सायन ग्रह जन्मलग्नकुंडलीवरून फलादेश मिळतो किंवा नाहीं हें पाहणें आहे. वरील कुंडलींत सायन निरयण ग्रहांत बरेंच अंतर आहे. जन्मकाल विविधज्ञानविस्तार पुस्तक १४, अंक ४ सन १८९२ चे एप्रिल महिन्यांत रा. ब. केरूनाना छत्रे यांचें चरित्र त्यांचे हयातींत प्रसिद्ध झालेलें आहे त्यांतून घेतला आहे. जन्मकाळाची शंका घेण्याचें कांहीं प्रयोजन नाहीं, हें त्यांचे त्रोटक चरित्रावरून कळून येईल.

रा. ब. चा जन्म ता. १६ मे सन १८२४ रोजीं रात्रौ ९ वाजतां नागावीं झाला आहे. नागांवचे उत्तर अंक्षाश १८ अंश व ३७ कला आहेत. आणि ग्रीन्विच शहरांतील रेखेपासून तो गांव पूर्वेस ७२ अंश ५६ कला इतक्या अंतरावर आहे. रा. ब. चे वडील त्यांचे वयाचे ९ वे वर्षीं ता. १० डिसेंबर सन १८२९ रोजीं वारले. ता. ५ एप्रिल सन १८३२ मध्यें त्यांचें उपनयन झालें. सन १८३९-४० पर्यंत अभ्यास झाला. विद्याभ्यासाचे नादांत भाताची चवटी करून तिजवर सिद्धांताची आकृति काढून नाना सिद्धांत सोडवीत. म्हणून जेवणाचें विस्मरण त्यांस होत होतें, असें चरित्रकार लिहितात. ता. १८ एप्रिल सन १८४० रोजीं त्यांस मुंबई येथील वेदशाळेंत ९० रुपयांची नोकरी मिळाली. ता. २३ फेब्रुवारी सन १८४१ रोजीं लग्न झालें. ६ कन्या व ५ पुत्र झाले. पुत्रांपैकीं दोन गत झाले. ता. २० एप्रिल १८९१ रोजीं अ. प्रोफेसर पुणें कॉलेजची जागा मिळाली. सन १८६० जुलई ता. ११ रोजीं त्यांस १९० रुपयांवर नगरास हेडमास्तर नेमिलें. ता. जानेवारी सन १८६९ रोजीं त्यांस मुंबई येथील एलफिस्टन कॉलेजांत ४२९ रुपयांवर गणिताचे प्रोफेसर नेमिलें. ता. ११ एप्रिल १८६९ पुणें कॉलेजावर बदली झाली. सन १८७१ ता. १ जानेवारी रोजीं रा. ब. किताब मिळाला. पेनशनचे वेळेस पगार १०९० होता. रा. ब. नानाचे चिरंजीव रा. सा. कोंडोपंत छत्रे हे बी. ए. एल. सी. इ. आहेत तसेच त्यांचे बंधु एल. एम. झेड. एस्. आहेत. नानांचे मृत्यूनंतर त्यांचे स्त्रीस पेनशन मिळालें नानांची स्त्री पतिव्रता असून, नानांचे घराण्याचा लौकिक राखण्यांत अत्यंत दक्ष, उदार व खर्चीक होती. नानांचे घरीं विद्यार्थ्यांची पंगत असे. रा. ब. नानांचा शरीरबांधा बुटका होता. बाकीचे शरीरवर्णनाची अटकळ तसबीरीवरून बरीच होईल. नानांचे मस्तक स्थूल असून चेहरा लांबट नव्हता. किरवंत जातीचे ब्राह्मणात आणि छत्रे ह्या घराण्यांत इतका प्रसिद्ध पुरुष झाला नाहीं. इत्यादि गोष्टी सायन कुंडलीचे द्वारें दाखविणें आहेत.

रा. ब. चे जन्मसमयीं सायन ग्रह येणेंप्रमाणें होते—

रवि.	चंद्र.	मंगळ.	बुध.	गुरु.	शुक्र.	शनि.	राहु.	हर्शल.	नेप.
१	९	५	२	३	१	१	९	९	
२५	७	२५	१५	९	५	२७	११	१५	
३९	४२	१३	४४	२८	५८	८	५२	३०	
२१	०	०	०	०	०	०	०	०	

रा. ब. चे जन्मकालीं पृथ्वीची व आकाशांतील ग्रहांची स्थिति कशी होती हें खालील नकाशावरून अगर जन्मकुंडलीवरून कळेल.

कुं. नं. १

॥ सायन भावचलित लग्न कुंडली ॥



कुंडलीवाचन—पूर्वक्षितिजावर क्रांतिवृत्तावरील मकर राशी ० अं. ३९ कला उदित होती. तनुस्थानाची हद्द कुंभ दोन अंशपर्यंत असून लग्नी चंद्र, नेपच्युन, राहु व हर्शल हे ग्रह अनुक्रमें होते. पंचमस्थानाचा आरंभ वृषभ १० अंशांत झाला आणि त्याचा अधिपति चतुर्थ-स्थानांत वृषभ राशीच्या ९ अंशांत ९८ कलेमध्यें आहे. पंचमस्थानाची हद्द मिथुन ६ अंशपर्यंत आहे. पंचमस्थानांत शुक्र, रवि व शनि आहेत. शुक्रानें पंचमस्थानाची हद्द चतुर्थस्थान अखेरीचे पूर्वी म्हणजे वृषभ १० अंशांचें आंतच व्याप्त केली आहे. षष्ठस्थानारंभ मिथुन ६ अंशांत होऊन शेवट कर्क ०-३९ अंशांत झाला आहे. षष्ठस्थानांत बुध १९-४४ आहे. पंचमस्थान अगर बुद्धिस्थान शुक्राकडून आणि बुधाकडून मध्यस्थ झालें आहे. भावारंभ प्रवृत्तीप्रमाणें शुक्र पंचमांत धरण्यास ४ अंशांची तक्रार कोणताही सुज्ञ गणित जाणणारा गणक करील असें वाटत नाहीं. सप्तमस्था-नारंभ कर्क ०-३९ मध्यें होऊन शेवट सिंह दोन अंशांत होतो. तेथें गुरु, केतु आहेत. नवमस्थानारंभ कन्या ६ अंशांत होऊन शेवट तुळेच्या १० अंशांत होतो. तेथें मंगळ आहे. येणेंप्रमाणें आकाशांतील ग्रहांचें चित्र आणि पृथ्वीची स्थिति केरुनाना जन्मले त्या वेळीं होती.

*निरयण कुंडली ग्रहलाघवाचे अयनांश २१-४१ वजा करून वरील पद्धतीप्रमाणें ग्रहही निरयण करून भावात्मक दाखविले आहेत. हर्षल व नेपच्यून ग्रहांबद्दल हिंदु ज्योतिषांना माहिती कमी आहे म्हणून त्यांस कुंडलींतून गाळून टाकलें आहे.

कुंडली नं. २.

॥ निरयण भावचलित कुंडली ॥



*हल्लीं निरयण मंडळीमध्यें भावचलित कुंडली मांडतांना आकडे कुंडली मांडण्याची पद्धती सदोष आहे असें कै. चिटणीसांचें मत होतें व जर निरयणच कां होईना परंतु शास्त्रीय पद्धतीनें कुंडली मांडणें असतां कशी मांडावी यासंबंधानें येथें तर प्रत्यक्षच उदाहरण घालून दिलें आहे. परंतु याकडे अद्यापि आमच्या निरयणवादी मंडळीचें लक्ष गेलेलें दिसत नाहीं. निरयणवादी समाज आपल्या आकडे कुंडल्यांचीं स्तुतिस्तोत्रें गाण्यां-

तच गर्क झालेला असुन अझून गाढ घोरत आहे हें पाहून त्यांच्या अज्ञानाची कींव येते. चिटणीसांनीं निरयण कुंडली शास्त्रीय रीतीनें कशी मांडावी याचा जो पाया घालून ठेविला आहे त्यावर कुंडलीविज्ञानाचे विद्वान संपादक यांनीं चांगली इमारत आपल्या कुंडलीविज्ञानाचे अंकांत निरयण ज्योतिर्विदांपुढें मांडली आहे. तिकडे या मंडळीचें लक्ष जाईल काय ? नाहीं म्हणावयास फळ ज्योतिषादर्श मासिकाचे संपादक ज्योतिर्विद यज्ञेश्वर गोविंद घोलप यांनीं या निरयण आकडे कुंडलीचें फोल घाणेरडें स्वरूप स्पष्टपणानें चव्हाटयावर आणून नक्षत्रकुंडली म्हणजेच अंशात्मक भावसाधन कुंडली मांडण्याचा प्रघात सुरू केला होता परंतु तोही प्रघात कै. घोलपांच्या मृत्यू-बरोबर लयास गेला आहे. निरयणवाद्यांच्या शास्त्रीय संशोधनाचे प्रतिगामी धोरणाची कींव येते. हल्लींची अशास्त्रीय निरयण भावसाधन कुंडली मांडण्याचा प्रघात जाऊन शास्त्रीय पद्धति रूढ होईल काय ?

संपादक—

वरील चित्र दर्शनावरून निरयण ग्रह आणि सायन ग्रह आकाशांत बारा भागांत जीं जीं स्थळें व्याप्त करीत आहेत तीं तीं बदलत नाहींत हें चांगलें कळेल. व्यावहारिक अपूर्णांकांत अंशांतून आणि छेदांतून सम संख्या काढली असतां अपूर्णांकाची किंमत जशी बदलत नाहीं, त्याचप्रमाणें ग्रह नियमित अंतर ठेवतात. चालू निरयण कुंडलींत जन्मलग्न धनु प्रदर्शित करण्यास ९ चा आंकडा मांडतात आणि मकर प्रवृत्ति दिसण्यास भावचलित कुंडली निराळी मांडतात. परंतु राशीचे मिश्रणांनीं उत्पन्न होणारीं फळें वर्णन कचितच करतात. म्हणून कुंडलीचे अनुभव चुकतात म्हणून सायन निरयण कुंडलींतील अंतर असल्यास किंवा सायन पक्षावर कोणास आक्षेप घेणें असल्यास त्यांनीं वर दर्शित केलेले कुंडलीप्रमाणें कुंडली करून नंतर साधार आक्षेप घ्यावेत. तसें न केल्यास उत्तर मिळणार नाहीं.

रा. ब. नानांचा जन्म सायन मकर लग्नावर झाला आहे आणि तेथें चंद्र आहे म्हणून मकर राशीवर जन्म झाला त्याचें फल—जातक पारिजातक पान ३० श्लोक ९३....**गीतज्ञः पृथु मस्तको मृगगते शास्त्री परस्त्रीरतः**" असें आहे. केरोपंत नानांचे मस्तक मोठें आहे हें प्रत्यक्ष त्यांची तसवीर पाहिली असतां कळेल. सिद्ध पदार्थविज्ञानशास्त्राचे ते पुस्तककर्ते आहेत. बाकीचा योग गुरूचे शुभदृष्टीनें होत नाहीं. कदाचित् मानसिक विकारापेक्षां त्याची मजल दूर नसेल असें वाटतें. निदान जगास त्या अनुभवाची सत्यता नको आहे. निरयण धनु लग्न २० अंश तनुस्थानांत आहे तेव्हां त्याचा अनुभव वरील श्लोकांमीं दिला आहे तो **"सौम्यांगोरुचिरेक्षणः कुलवरः शिल्पी धनुस्थे विधौ"** असें आहे. वाचकांनीं त्याचा अनुभव पहावा, सप्तमस्थानीं गुरु कर्क राशीचा बली आहे (कुंडली नंबर १ सायन पहा) म्हणून नानांचे मृत्यूनंतर त्यांचे स्त्रीस सरकारांतून पेन्शन मिळाले. त्याच प्रमाणें साध्वी स्त्रीचीं लोकप्रसिद्ध लक्षणें तीमध्यें होतीं. सप्तमस्थानाचा अधिपती चंद्र तनुस्थानांत आणि गुरु सप्तमांत चंद्राकडून सप्तम दृष्टीनें विलोकित आहे, म्हणून त्याचें फळ जा. पा. ४३ श्लोक २२ मध्यें असें सांगितलें आहे **"कलत्राधिपतौ केन्द्रे शुभग्रह निरीक्षिते शुभांशे शुभ राशौ वा पत्नी व्रतपरायणा"** निरयणप्रमाणें तन्वाधिपती सप्तमस्थानीं येतो म्हणून पत्नी धर्मपरायणी होती असें निरयणवादी म्हणतील. परंतु नव याच्या मागें पेनशन मिळण्यास सप्तमस्थानाचा अधिपति बुध बलिष्ठ नसून सप्तमस्थानीं गुरु दुर्बली पापयुक्त आहे; आणि बुध षष्ठस्थानांत आहे; तेव्हां वरील योग मिळत नाहीं तथापि जन्मलग्न धनु धरल्यास, लग्नीं पापग्रह राहु आहे आणि तनूचा मालक सप्तमस्थानीं आहे म्हणून रा. ब. निरयण ग्रहावरून व्यभिचारी ठरतील. परंतु वास्तविक स्थिति तशी नाहीं; हें लोकविदित आहे. सर्वार्थचिंतामणी पान २९ श्लोक १०....**लग्ने सपापे यदिदारनाथे जातः परस्त्रीषु रतः कुमार्गी** असा योग होतो, सायनप्रमाणें स. चिं. पान ३० श्लोक ४३ **" गुरुणा सहिते दृष्टे दार-**

नाथे बलान्विते । कारकेवा तथा भावे पत्नीव्रतपरायणा ॥
म्हणून चंद्र बलिष्ठ होऊन अखेरीस पेनशन देतो आणि सायन मकर लग्नवरास कायम करतो आणि नानांवरील व्यभिचाराचा काल्पनिक आरोप दूर करतो.

केरोपंत नानांस बाल्यावस्थेंत सुख लागल्याचें दिसत नाहीं, त्यांचे वडील पांचवे वर्षी वारले आहेत. स. चिं. पा. १० श्लोक २३ **"लग्ने शुभे शोभन दृष्टियुक्ते बाल्यात्सुखं तन्नहि पापयोगात्"** केरोपंत नानांस मातेचे चपटीवर सिद्धांत सोडविण्यास कारण त्यांचें विषयदृढत्वच होय. आणि त्याच गुणामुळें त्यांची गणित विषयांत पारंगतता झाली. एखादें उदाहरण अवघड असलें म्हणजे विद्यार्थी तें सोडून देतात तसें नानांनीं केलें नाहीं. ह्याचें कारण स. चिं. पा. ३८ श्लोक २६ **शुभग्रहाणां संबंधे माने, तन्नायकेपिवा । स्वोच्चेवा स्वग्रहवापि जातोमानि दृढव्रतः ॥** केरोपंत नानांस सन १८४० सालीं म्हणजे त्यांचे वयाचे १६ वे वर्षी त्यांस आब्झरव्हेटरींत ९० रुपयांची नोकरी लागली. त्याचें कारण स. चिं. पा. ११ श्लोक १५ **लग्नेशे शुभ राशिस्थे शुभग्रह निरीक्षिते । गोपुरांश गते वापि षोडशाब्दात्परं सुखम् ॥** असें आहे. केरोपंत नानांस सन १८५१ सालीं म्हणजे वयाचे २७ वें वर्षी १५० रुपयांची जागा मिळाली म्हणजे पहिले पगारांत १०० रुपये जास्त झाले. ह्याचें कारण जा. पा. पान ३६ श्लोक ५८ मध्यें असें लिहिलें आहे–**'अर्थाधीशो यत्र संस्थो नराणाम् तस्मिन् काले तत्र वृद्धिर्विशेषात्'** हीं वर्षें म्हणजे शुक्राची २५, २६, २७ हीं आहेत. सत्ताविसावे वर्षी हा योग झाला आणि नानांस १५० रुपये पगार झाला. केरोपंत नानांस दुर्बिणीची समता ठेवून टाईम बॉलकरतां आब्झरव्हेटरींतून त्यांचे नशिबानें सूर्य माध्यान्हीं दिसण्याचे सोडवून कालेजावर आणल्यामुळें ते पुष्कळ विद्यार्थ्यांचे गुरु झाले ह्याचें कारण स. चि. पान २६ श्लोक **"शुभ ग्रहाणांमध्यस्थे बुद्धिशशौ शुभान्विते गुरौ केन्द्र त्रिकोणेवा बुद्धिमार्ग विशारदः ॥** ह्या ठिकाणी

पंचमस्थान शुक्र आणि बुधाचे मध्यें आहे. आणि शुक्र पंचमस्थानीय आहे असें समजावें. केरोपंत नानांचे येथें विद्यार्थ्यांची पंगत पडत असे ह्याचें कारण स. चि. पान २६ श्लोक ६१ **"पंचमे गुरु शुक्राभ्यां सवित्रासहितेथवा । एतेषां भवने वापि सोयं भोजयिता भवेत् ॥"** असें आहे म्हणून रवि पंचम स्थानांतच धरला पाहिजे. निरयण आकडे कुंडलीवरून रवि षष्ठ स्थानांत येतो आणि वरील लोकश्रुत फळ मिळत नाहीं.

केरोपंत नानांचे विद्यार्थी आणि त्यांचीं मुलें आज्ञाधारक असत. याचें कारण स. चि. पान २६ श्लोक ५९ "लग्नेश्वरे सुतर्क्षेवा पुत्रोवाक्य वशानुगः ।" असें आहे. म्हणून शनि आणि शुक्र एक राशींत आहेत असें स्पष्ट धरावें लागलें. पंचम स्थानांत शुक्र, रवीपासून आणि शनीपासून दूर आहे. अस्तास नसून बलिष्ठ आहे म्हणून कन्यासंततीचा पुत्रसंततीपेक्षां जास्त नंबर झाला. नानांस ६ कन्या आणि पांच पुत्र झाले. अष्टमेश रवि पंचम स्थानीं शनीनें युक्त आहे, म्हणून पुत्रसंततींत दोन अपत्यें मारलीं. सन १८६० मध्यें नानांस पगार १५० रुपये झाला. सन १८६५ मध्यें ४२५ झाला आणि पेनशनचे वेळेस पगार १०५० रुपये म्हणजे मुळचे पगारांत हजार रुपयांनें वृद्धि झाली. याचें कारण स. चिं. पान ३९ श्लोक २ मध्यें असें आहे **"लाभेश्वरे केन्द्रगते त्रिकोणेवा, समन्विते । लाभेवा पाप संयुक्ते धन लाभमुदीरयेत् ॥** आतां केरोपंत नाना फक्त गणितीच होते हें खालील श्लोकावरून कळेल. स. चिं. पान १३ श्लोक ३७ **"केन्द्र त्रिकोणगे जीवे शुक्रे स्वोच्चगते सति । वाग्भावेंदु पुत्रे वा गणितज्ञो भवेन्नरः ॥"** त्या ठिकाणीं शुक्र उच्च राशीचा म्हणजे मीन राशीचा नाहीं म्हणून केरोपंत नाना गणिती नव्हते असें शाब्दीक स्वोच्च शब्दाचे अर्थावरून वरील योगावर आक्षेप घेतील परंतु ग्रहांचे योग स्वग्रहांशीं आणि उच्चांशीं निळकंठाचार्यानें मणऊयोगलक्षणांत बांधले आहेत. त्याजवरून वरील योग वृषभस्थ शुक्रास धरून लाविला आहे. केरोपंत कदाचित् वेधवेत्ते अगर ज्योतिर्विद् न बनोत परंतु ते गणिती नव्हते, हें निदान

लोकांपुढें तरी म्हणतां येत नाहीं. म्हणून स्वोच्च शब्दाचा अर्थ स्वगृह असा धरून वरील योग दिला आहे. आणि तो केरोपंत गणिती होते ह्या प्रत्यक्ष प्रमाणावरून ग्रंथकाराचे लक्षणाशीं बरील केलेला अर्थ युक्त दिसतो, म्हणून तो तसा केला आहे. निरयणप्रमाणें केरोपंत नानांची कुंडली " आम्हा निरयणवाल्यांस वेधाकरितां निरयण ध्यावेसें इष्ट वाटतें" असें अरुणोदयांत प्रसिद्ध करणारे रा. नानांचे पंचांगावरून अथवा ग्रहसाधनावरून अथवा नॉटिकलवरून जेव्हां कोणी सप्रमाण पुढें दाखवील तेव्हां वरील योग जमतो किंवा नाहीं ह्याचा विचार समग्र वाचकांवरोवर केला जाईल.

केरोपंत नानांची गणितशास्त्रांत बुद्धि फार चलाख होती. युरोपांतून कांहीं अवघड उदाहरणें आलीं होतीं. तीं रा. ब. नाना आणि **दळवी** यांनीं केलीं. दळवी हे गृहस्थ उदाहरण सुटल्याचे आनंदांत वस्त्रभान ही विसरले. युरोपांत नानांची कीर्ति दुमदुमण्यास येणेंप्रमाणें योग होतो, जातक पारिजातक पान ३९ श्लोक १६ **"त्रिकोणकेन्द्रे यदि लग्ननाथे शुभान्विते शोभनवीक्षितेवा शुभ ग्रहागार गते बलाढ्ये चतुःसमुद्रांतयशः समेति"** त्याच प्रमाणें जा. पा. पान २१ श्लोक १६ **"गजकेसरी योगः केन्द्रस्थिते देवगुरौ मृगांकाद्योगस्तद्वाहुर्गजकेसरीती दृष्टे सितार्यैदुसुतैः शशांके नीचास्तहीनैर्गजकेसरी स्यात् ॥ १६ ॥ गजकेसरी संजातः तेजस्वी धन धान्यवान मेधावी गुणसंपन्नो राज प्रियकरो भवेत् ॥** सन १८७१ सालीं नानांस दिल्ली दरबारांतून राव बहादूर हा किताब मिळाला आहे. त्यास योग जा. पा. पान ४१ श्लोक ४ **"राजस्थाने गुरु बुधसितैरीक्षित संयुतेवा तद्राशीशे बलवति नृप प्रीति संपत्तिमेति ॥**

केरोपंत नानांचे पांचवे वर्षाचा आरंभ वृषभावर होतो आणि त्या वर्षाचा दशमाधिपति शनि गोचरीचा मुळचे कुंडलींत अष्टमस्थानीं येतो. म्हणून पांचवे वर्षी त्यांचे वडील वारले. त्याचप्रमाणें १७ वे वर्षाचा आरंभ वृषभावर होऊन तेथें जन्मकाळचा शुक्र बलिष्ठ आहे आणि गोचरीचा गुरु त्या

वर्षी सप्तम स्थानांत येतो. म्हणून त्यांचें लग्न १७ वे वर्षी झालें. षष्ठस्थानांत बुध स्वराशीचा आहे म्हणून ते आपले ज्ञातींत श्रेष्ठत्वास आले. येणेंप्रमाणें त्यांचें त्रोटक चरित्र सायन कलादेशावरून वाचकांचे नजरेखालीं आणलें.

* * *

असो, कै. चिटणीसांनीं केलेल्या कुंडल्यांचे वर्णनापैकीं ही दुसरी कुंडली वाचकांस सादर केली आहे. यानंतर सन १८२४ चे पंचांग आमच्या हातीं आल्यानंतर रा. बहादुरांच्या कुंडलीचा दिनवर्षपद्धतीनें घडलेल्या गोष्टींचा कसा काय मेळ घालतां येतो इत्यादि गोष्टींचा सवडीप्रमाणें विचार पुढें करितां येईल.

संपादक—

स्फुट विचार.

ज्योतिषग्रंथामध्यें पुरुषाच्या जातकासंबंधानें जितका सविस्तर उहापोह झालेला आहे तितका स्त्रियांच्या कुंडलीसंबंधानें झालेला आढळत नाहीं. **पुरुषजातका**प्रमाणें **स्त्रीजातक** निराळेंच निर्माण झालें पाहिजे. यासंबंधी आद्य ग्रंथकारांस कल्पना झाली नव्हती असें मुळींच म्हणतां येत नाहीं. याचे उलट प्रत्येक ग्रंथकारानें स्त्रीजातकासंबंधानें थोडेंबहुत विवेचन केलेलें आहे. व पुरुषजातकाचेच नियम थोड्याबहुत फरकानें स्त्रीजातकास लावण्यास सांगितले आहेत. सर्वसाधारणपणानें आयुर्मर्यादा, संतति, संपत्ति अधिकार, भाग्य, प्रवास, स्नेही, बुद्धिमत्ता इत्यादि गोष्टींसंबंधानें विचार करते वेळीं पुरुषजातकांतलेच नियम जसेचे तसे विचारांत घेतले असतां स्त्रीकुंडलीचा चांगला बोध होतो. फक्त देश, काळ, परिस्थिति व लिंग इत्यादि गोष्टी विचारामध्यें घेऊन कुंडलीचें वर्णन केलें पाहिजे. स्त्रीकुंडलीमध्यें आपल्याकडील पूर्वकालीन परिस्थित्यनुरूप भर्तृसुखासंबंधीच विचार

प्रामुख्यानें मानून त्या अनुरोधानें पुढील भविष्यें करण्यास सांगितलीं आहेत. परंतु कालमहात्म्य हें मोठें विलक्षण आहे व त्याप्रमाणें आपणासही प्रस्तुतच्या परिस्थितीप्रमाणें ह्याही विभागांत सुधारणा करणें जरूर आहे.

* * *

स्त्रियांचे कुंडलीमध्यें भर्तृसुखाचा विचार करतेवेळीं **रवी**चा विचार प्रामुख्यानें केला पाहिजे. ही गोष्ट अंमिचेकडील बरेच ज्योतिर्विदांस माहिती आहे असें दिसत नाहीं. मुलीला मिळणारा नवरा व नंतर मिळणारें पतिसुख यांचा बोध रवीवरून जितका चांगला करितां येतो तितका तो सप्तमाधिपति किंवा शुक्रावरून स्त्रीनें करितां येत नाहीं. पुष्कळशा बालविधवांच्या कुंडल्या पाहिल्या असतां सप्तमांत किंवा सप्तमेश पीडित नसलेला अढळतो व त्यांस भर्तृसुख कां मिळालें नाहीं याबद्दल शंका सहज उत्पन्न होते परंतु जर रवीकडे पाहिलें तर तो अशा कुंडल्यांत शेकडा ९० पर्यंत बिघडलेला आढळेल. पुरुषाचे कुंडलींत ज्याप्रमाणें **चंद्र** व **शुक्रा**वरून जायासुखाचा विचार होतो त्याच प्रमाणें स्त्रियांचे कुंडलींत **रवि** व **मंगळा**वरून भर्तृसुखाचा विचार होतो. स्त्रीकुंडलीमध्यें मंगळ निर्बळी किंवा पीडित असतां लग्न लवकर जुळत नाहीं व लग्न जुळविण्याच्या कामांत अनेक अडचणी उत्पन्न झालेल्या पाहण्यास मिळतात.

वधुवरकुंडल्यांचें घटित पहातांना **मंगळ** पाहण्यास सांगितला आहे, तो यावरून तर आला नसेल ना ? व म्हणूनच मंगळाचा विचार वधूच्या कुंडलींत विशेषेंकरून केला पाहिजे. वराच्या कुंडलींतल्या मंगळास इतकें महत्व नाहीं. वाचक वर्ग याचा विचार करतील काय ?

* * *

पाश्चिमात्य ग्रंथकार स्त्रीकुंडलीमध्यें **रवि** ज्या ग्रहाबरोबर प्रथम कोणताही दृष्टियोग करण्यास जातो याकडे फार बारकाईनें लक्ष देतात, कारण त्यावरूनच पतीचा स्वभाव, व विवाहसुख इत्यादि गोष्टींचा विचार होतो.

जर स्त्रीकुंडलींत रवि प्रथमतः शनीबरोबर दृष्टियोग करण्यास जात असेल व तो दृष्टियोग अशुभ म्हणजे युति, प्रतियोग किंवा केन्द्रयोग असेल तर लग्न दीर्घकालानें होतें, लग्न जुळवितांना अनेक अडचणी येतात, विवाहसुख चांगलें मिळत नाहीं. रवि किंवा शनि जर राशीमध्यें कर्क, वृश्चिक व मीन असून अशुभ दृष्टियोग घडत असतां आळशी, निरुद्योगी, दारुबाज किंवा व्यसनी नवरा मिळण्याचा पुष्कळ संभव असतो.

ज्या मुलींच्या कुंडलींत सप्तमांत शनि असून रवि शनीबरोबर त्रिकोण दृष्टियोग किंवा तृतीय एकादशयोग करण्यास जातो तिला बहुशा बिजवर नवरा मिळतो. सप्तमांत शनि मकर, कुंभ, तुला राशीचा गुरूनें शुभसंबंधित असून रवि जर शुभयोग करण्यास जात असेल तर बिजवर परंतु बरदार जमीनजुमला व चांगली इष्टेट असलेला नवरा मिळतो.

* * *

शनिबुधांचा युतियोग किंवा अशुभ दृष्टियोग मन संशयी बनवितो. हीं माणसें फारच संशयी आढळतात. परंतु शनिबुधांमध्यें शुभ दृष्टियोग होत असतां अंगांत विचार करण्याची चांगली धमक असते. ही मंडळी शोधक, मुत्सद्दी असतात व बुधाबरोबर आणखी गुरु किंवा हर्शलचा शुभ दृष्टियोग असेल तर बुद्धिमत्ता फार उच्च प्रकारची आढळते. व ही मंडळी आपल्या बौद्धिक सामर्थ्यावर जगांत पुढें येतात.

* * *

शुक्र जलराशीमध्यें व विशेषतः **कर्क** व **वृश्चिक**मध्यें असून शनीबरोबर अशुभसंबंधित असलेली मंडळी दारुबाज व व्यभिचारी पाहण्यास मिळतात.

* * *

ज्यांचे जन्मकाळीं शनि उदित गोलार्धांत असून अनुदित गोलार्धांत असलेल्या चंद्रावरोबर केंद्र, प्रतियोग किंवा इतर अशुभ दृष्टियोग करीत असेल त्यांना साधारणपणें प्रत्येक गोष्टीमध्यें यश कमी मिळतें व ही मंडळी उद्योगधंद्यामध्यें अपयशी आढळतात. या मंडळीनें सटयाचे व्यवहार किंवा स्पेक्युलेशनमध्यें मुळींच जाऊं नये किंवा स्वतःच्या नांवावर कोणताच स्वतंत्र धंदा करूं नये. या मंडळीनें दुसऱ्याची नोकरी करणें विशेष फायदेशीर असतें. कारण दशमाकडील असलेला शनि किंवा दशमांत असलेला शनि उद्योगधंद्यांत अपयश देतो व जेव्हां तो चंद्रावरोबर आणखी अशुभ संबंधित असतो त्या वेळीं त्याची नाशाकडे विशेष प्रवृत्ती आढळते व म्हणूनच वरील योग असलेली मंडळी जेव्हां जेव्हां आपल्या नांवावर स्वतंत्र धंदा करितात त्या त्या वेळीं त्यांना जबर मार बसतो.

* * *

पुरुषाचे कुंडलीमध्यें चंद्र शनीनें पीडित असतां विवाहसुख चांगलें दर्शविलें जात नाहीं. परंतु जर चंद्र प्रथम गुरूवरोबर शुभ संबंध करीत असून नंतर शनीबरोबर अशुभ संबंध करण्यास जात असेल तर स्त्री चांगली मिळते परंतु शरीरप्रकृतीच्या दृष्टीनें पाहतां सदा रोगी असण्याचा पुष्कळ संभव असतो. व या मंडळीस स्त्रीच्या प्रकृतीमुळें बराच पैसा खर्च करावा लागतो. परंतु जर कां चंद्र द्विस्वभाव मिथुन, कन्या, धनु व मीन—राशींमध्यें शनीनें पीडित असेल तर प्रथम भार्येचा नाश होऊन दुसरें लग्न झालेलें पुष्कळ वेळां पाहण्यास मिळतें.

* * *

राशीवरून नक्षत्रज्ञान.

[लेखकः—विनायक आप्पाजी जोशी वसईकर मु. मुळगांव]

॥ यो यो यां यां तनुं भक्तः श्रद्धयाऽर्चितुमिच्छति ॥
॥ तस्य तस्याचलां श्रद्धां तामेव विदधाम्यहम् ॥ २१ ॥
"भ. गी. अ. ७"

॥ आपणास जें जें अनुकूळ । तें तें करावें तात्काळ ॥
॥ होईना त्यास निवळ । विवेक उमजावा ॥ २७ ॥
"रामदास"

प्रपंचांत प्रत्येक मनुष्याला सुख हवें असतें. सुख नको, दुःख पाहिजे असें म्हणणारा मनुष्य सांपडणें कठीण. म्हणूनच सकाळीं उठल्यापासून रात्रीं झोंप लागेपर्यंत प्रत्येक मनुष्य सुखप्राप्तीसाठीं व दुःखनिवृत्तीसाठीं एकसारखी धडपड करीत असतो. ही धडपड कांहीं वावगी नाहीं. उलट, सुख संपादणें व दुःख निवारण करणें हें मनुष्यासारख्या बुद्धिमान प्राण्याचें कर्तव्यकर्मच आहे.

परंतु सुख संपादणें अगर दुःख निवारण करणें, हें समजण्याला साधन म्हणजे एक ज्योतिषशास्त्रच होय. जर कुंडलींत बुद्धिस्थानांत शुभ ग्रहांचे योग असले, तर तो आपल्या बुद्धिसामर्थ्यानें मोठमोठाल्या उलाढाली करून नांवालौकिकास येतो, आणि अशुभ ग्रहांचे योग असले तर तो त्याप्रमाणें वागून रसातळाला जातो. एकंदरींत कुंडलीवरून बुद्धियोग समजतो व त्याप्रमाणें प्रत्येकजण वागत असतो. परंतु ज्यांस ज्योतिषाचें ज्ञान आहे त्यांस हें समजेल. इतरांस समजणें शक्य नाहीं. म्हणून प्रत्येकानें ह्या शास्त्राचें ज्ञान करून घ्यावें, म्हणजे त्या शास्त्राचा खरेपणा दिसून येईल.

ज्या अर्थी जगन्नियंत्यानें मनुष्यास बुद्धि दिली आहे, त्या अर्थी तिचा दुरुपयोग करतां कामा नये. तर तिची वाढ करणें, हें प्रत्येक मनुष्याचें कर्तव्य आहे, व तो कर्तव्य करीत गेला, म्हणजे मग त्यास यश मिळत असतें; हें प्रत्येकास स्वानुभवावरून माहीतच आहे. अशा त्या कृपाळू जग-

नियंत्याच्या कृपेनें, मला अल्पशा बुद्धीनें, जे विचार सुचले आहेत ते आपल्या लोकमान्य मासिकांत येत्या अंकीं प्रसिद्ध कराल अशी आशा आहे.

क्रांतिवृत्ताचे किंवा राशिचक्राचे समान २७ विभाग करतात त्या प्रत्येकास नक्षत्र असें म्हणतात. ही नक्षत्रें सत्तावीस आहेत. सत्तावीस नक्षत्रें बारा राशींना सारखीं विभागून दिलीं म्हणजे प्रत्येक राशींत सव्वादोन नक्षत्रें येतात. नक्षत्रासंबंधानें विशेष माहिती ज्योतिर्माला अंक ८ व १० वर्ष पहिलें सन १९१९ यांत—"नक्षत्रविचार" म्हणून लेख दिला आहे तो पहावा.

नक्षत्रावरून राशि पाहाण्याच्या रीति पुष्कळ ग्रंथांत आहेत. पण राशिवरून नक्षत्र काढण्याची रीत अद्यापपर्यंत माझ्या अवलोकनांत नाहीं. यदा कदाचित जर दुसरे ग्रंथांत असेल तर निदान माझ्या तरी पहाण्यांत नाहीं. एवढ्याकरितां प्रस्तुत लेखांत—

राशीवरून नक्षत्र कसें ओळखावें.

ह्याबद्दल माहिती दिली आहे. सदर माहिती स्थूल आहे. सर्व ठिकाणीं लागूं पडेल असें मात्र सांगतां येत नाहीं. मला जो स्वानुभव आला आहे, तो आपल्या मासिक वर्गणीदारांस अगर ज्योतिष विद्यार्थ्यांस अंशतः तरी उपयोगी होईल असें वाटतें. विशेषेंकरून सदर माहिती वरून प्रश्नकर्त्या मनुष्याची रास कोणत्या नक्षत्रांत आहे हें समजतें.

राशीवरून नक्षत्र काढण्याची रीत.

अगोदर मनुष्याचें नांव विचारावें व नांववरून रास ठरवावी. किंवा त्याची रास माहित असल्यास त्यास विचारावी. एकदां रास माहीत झाली म्हणजे त्या राशीच्या अगोदर ज्या राशी भुक्त होऊन गेल्या असतील तितक्या राशींना सव्वादोन नक्षत्रानें गुणावें (खालीं नक्षत्र चरणांश राशिज्ञानकोष्टक दिलें आहे तें पहावें.) जो गुणाकाराचा आंकडा येईल तितका आंकडा म्हणजे तितकीं नक्षत्रें आश्विनीपासून मोजावीं व त्यापुढील नक्षत्र विचारलेल्या राशीचें समजावें. अगर आश्विनीपासून मोजून आलेलें (गुणाकाराच्या आंकड्यासमोर) नक्षत्र विचारलेल्या राशीचें समजावें.

नक्षत्र चरणांश राशिज्ञान कोष्टक.

अनुक्रम.	नक्षत्रें.	चरण	अंश.	एकूण नक्षत्र.	एकूण चरण.	दरएक चरणाचे अंश	सव्वादोन नक्षत्राचे अंश	राशि-
१	अश्विनी	पूर्ण ४	१३-२०					
२	भरणी	पूर्ण ४	१३-२०	२।	९	३-२०	३०	मेष.
३	कृतिका	१/४ १	३-२०					
	कृत्तिका	३/४ ३	१३-२०					
४	रोहिणी	पूर्ण ४	१३-२०	२।	९	३-२०	३०	वृषभ
५	मृग	१/२ २	६-४०					
	मृग	१/२ २	६-४०					
६	आर्द्रा	पूर्ण ४	१३-२०	२।	९	३-२०	३०	मिथुन
७	पुनर्वसु	३/४ ३	१०-०					
	पुनर्वसु	१/४ १	३-२०					
८	पुष्य	पूर्ण ४	१३-२०	२।	९	३-२०	३०	कर्क
९	आश्लेशा	पूर्ण ४	१३-२०					
१०	मघा	पूर्ण ४	१३-२०					
११	पूर्वा	पूर्ण ४	१३-२०	२।	९	३-२०	३०	सिंह
१२	उत्तरा	१/४ १	३-२०					
	उत्तरा	३/४ ३	१०-०					
१३	हस्त	पूर्ण ४	१३-२०	२।	९	३-२०	३०	कन्या
१४	चित्रा	१/२ २	६-४०					

१५	चित्रा	१/२	२	६-४०					
१६	स्वाती	पूर्ण	४	१३-२०	२।	९	३–२०	३०	तूळ
	विशाखा	३/४	३	१०-०					
	विशाखा	१/४	१	३-२०					
१७	अनुराधा	पूर्ण	४	१३-२०	२।	९	३–२०	३०	वृश्चिक
१८	ज्येष्ठा	पूर्ण	४	१३-२०					
१९	मूळ	पूर्ण	४	१३-२०					
२०	पूर्वाषाढा	पूर्ण	४	१३-२०	२।	९	३–२०	३०	धन
२१	उ०षाढा	१/४	१	३-२०					
	उ०षाढा	३/४	३	१०-०					
२२	श्रवण	पूर्ण	४	१३-२०	२।	९	३–२०	३०	मकर
२३	धनिष्ठा	१/२	२	६-४०					
	धनिष्ठा	१/२	२	६-४०					
२४	श०ता०	पूर्ण	४	१३-२०	२।	९	३–२०	३०	कुंभ
२५	पूर्वाभा०	३/४	३	१०-०					
	पूर्वाभा०	१/४	१	३-२०					
२६	उ०भा०	पूर्ण	४	१३-२०	२।	९	३–२०	३०	मीन
२७	रेवती	पूर्ण	४	१३-२०					

टीप:—प्रत्येक नक्षत्र तेरा अंश वीस कलेचें. व दर एक नक्षत्रांत चार चरण. प्रत्येक चरण तीन अंश वीस कलेचा. आणि सव्वादोन नक्षत्रांची एक रास व प्रत्येक रास तीस अंशांची समजावी.

वर जी राशीवरून नक्षत्र काढण्याची रीत दिली आहे ती समजण्याकरितां एक उदाहरण घेऊन सिद्ध करतों.

उदाहरण:—कुंभ राशीच्या मनुष्याची रास कोणत्या नक्षत्रांत आहे ?

समजूत (उत्तर):—कुंभ राशीच्या अगोदर दहा राशी भुक्त झाल्या आहेत व अकरावी कुंभ रास आहे. (वर कोष्टकांत दाखविल्याप्रमाणें सव्वा दोन नक्षत्रांची एक रास) तेव्हां भुक्त राशीस म्हणजे दहा राशींस सव्वा दोन नक्षत्रानें गुणिलें. तेव्हां गुणाकार साडेबावीस आला (१०+२।= २२॥) रीतींत सांगितल्याप्रमाणें, जो गुणाकार तींच नक्षत्रें समजावयाचीं. म्हणून ह्या ठिकाणीं साडेबावीस हीं नक्षत्रें आलीं. आरंभापासून म्हणजे आश्विनीपासून साडेबावीसावें 'म्हणजे तेविसावें' नक्षत्र धनिष्ठा आहे. (इकडे अर्धें नक्षत्र अधिक घरलें त्याप्रमाणें राशीला सव्वादोन नक्षत्रानें गुणून, गुणाकार; पूर्णांकाला पाव, अर्धा किंवा पाऊण कमी आला, तर तो संपूर्ण धरावा.) हें धनिष्ठा नक्षत्र भुक्त होऊन गेलें आहे. ह्याच्या पुढील २४ वें नक्षत्र शततारका आहे. हें विचारलेल्या कुंभ राशीचें नक्षत्र होय.

आतां कोणी अशी शंका काढील कीं, २२॥ नक्षत्रें भुक्त आहेत व अर्धें नक्षत्र भोगणें आहे म्हणजे धनिष्ठाचें १ नक्षत्र भोगावयाचें आहे. तर कुंभ राशीच्या मनुष्याचें नक्षत्र धनिष्ठा, अगर मधलें नक्षत्र सोडून, पूर्वा भाद्रपदा कां धरूं नये ?

ही शंका योग्य होईल. पण आपणांस कोणी विचारावयास येतो तो सकाळींच येत नाहीं. आलाच तर ८ वाजल्यानंतर येत असतो. किंवा दोन प्रहरीं अगर दिवस अस्तमान होण्याच्या आंत येत असतो. म्हणजे चंद्र, उजाडल्यापासून जितके टाईमांत विचारलें, तितक्या टाईमांत भुक्त होऊन जातो. शिवाय कुंभ राशीला आरंभीं धनिष्ठाचे दोन चरण उदय पावतात व पुढें शततारका संपूर्ण असून पूर्वाभाद्रपदा पाऊण आहे. म्हणून राशीचे आरंभाचें अगर मधलें नक्षत्र धरणें योग्य होय. यदा कदाचित शेवटलें ही (तिसरें) येऊं शकेल परंतु हें ज्योतिषानें आपल्या बुद्धिसामर्थ्यानें दिवसाच्या कालमानाकडे पाहून नक्षत्र कायम करावें.

राशीच्या नक्षत्राचा फायदा.

राशीवरून नक्षत्र समजलें म्हणजे तें चर, स्थिर, उग्र, मिश्रलघु, मैत्र किंवा दारुण आहे हें पहावें. आणि तें ह्यांपैकीं एकाद्यांत असलें तर त्यांच्या गुणावगुणाप्रमाणें फलादेश सांगावा ह्याबद्दल विशेष माहिती ह्याच मासिकांत (१९१९) 'नक्षत्रविचार' म्हणून सविस्तर माहितीचा लेख दिला आहे तो पहावा.

येणेंप्रमाणें राशीवरून नक्षत्र समजण्याची रीत उदाहरणासह सिद्ध करून दाखविली आहे. तरी त्याचा सर्वांस फायदा होईल अशी आशा आहे.

श्री.

रा. रा. ज्योतिर्मालाकर्ते यांस सा. न. वि. वि.

हिंदु लोकांची ज्योतिषशास्त्रावर विशेष श्रद्धा असल्यामुळें या शास्त्रासंबंधी त्यांचेमध्यें आदर असणें नैसर्गिकच आहे व त्यामुळें ज्योतिषशास्त्राची प्रसंशा करणारीं अनेक आर्य आचार्यांचीं वचनें पाहण्यास मिळतात. परंतु जेथें या शास्त्रास अनेक प्रकारानें दूषणें ठेविण्यांत येतात त्या देशांतील विद्वान म्हणून मानले गेलेल्या लोकांचे या शास्त्रासंबंधानें काय विचार आहेत हें कळण्याकरितां एकत्र करून पाठविण्यांत येत आहेत त्यांस आपण आपल्या अंकांत स्थळ द्याल अशी आशा आहे.

आपला—

अंबाप्रसाद.

ज्योतिष शास्त्रासंबंधी कांहीं प्रसिद्ध पुरुषांचीं मतें.

"सृष्टीला एखाद्या विशेष प्रसंगानें आपल्यांतील गुह्य तत्वें हीं उजेडांत आणावीं लागतात. कोणत्याही एखाद्याविषयीं ही सृष्टि (nature) एकदां सर्व कांहीं सांगून ठेविते. मात्र हा सांगण्याचा काळ ज्या वेळीं ती गोष्ट घडते तोच नसतो. तो आपणांला मागें पुढें असलेल्या सृष्टिबोलांतून

पहावयाचा असतो. म्हणूनच सृष्टिक्रमाच्या नियमांचा आद्यंत कोणासही ठरवितां येत नाहीं. मानवी शक्ति त्या सृष्टिक्रमाचीं गूढ प्रमेयें, अतर्क्य नियम व कल्पनातीत कार्यांचा उलगडा पूर्णपणें करण्यास समर्थ नाहीं. ही सृष्टि म्हणजे एक अमोलिक ग्रंथ असून यांतील कांहीं पृष्ठें आपणाला ग्रहांच्या स्थितीवरून वाचतां येतात"—**गटे**

"ज्योतिष हें अत्यंत मननीय शास्त्र आहे. यांतील रमणीयता जाणण्यास व याचा उपयोग प्रत्यक्ष व्यवहारांत करण्यास लागलें पाहिजे. केवळ आकाशांतील तेजोमय गोलांचें अवलकोन करून किंवा ग्रहांच्या परस्पर गति इत्यादि गोष्टींचें ज्ञान होऊन भागत नाहीं. दिवस हा जणूं काय सृष्टिरूपी मागावर तयार केलेलें वस्त्र असून त्यामधील सुताचा उभा धागा हा भूतकाल व आडवा धागा हा भविष्य काळ होय."—**इमर्सन**

"खज्योतिष शास्त्राची (Astronomy) परम उत्क्रांति म्हणजे फलज्योतिषशास्त्र हेंच होय. मग तें भविष्य एखाद्या व्यक्तीचें असो वा अन्य कशाचें असो"—**कालेरिज.**

सुव्यवस्थित पायावर असलेलें फलज्योतिष याची गणना बेकननें अभ्यासास निबंधक म्हणून ठरविलेल्या विषयांचे यादींत केली आहे.—**बेकन.**

गणित ज्योतिषी म्हणून नांवाजलेले जे ज्योतिषी—पायथागोरस, टालमी, केप्लर, टायको ब्राहे, न्यूटन, फ्लॅमस्टेड (अगदीं पहिला रॉयल ॲस्ट्रॉनमर) या सर्वांस फलज्योतिष शास्त्राची चांगली माहिती होती. ही एकच गोष्ट या शास्त्रासंबंधीचें महत्व दाखविणारी आहे.

जगांत जे अनेक बुद्धिमान पुरुष होऊन गेले त्यांत बराच वरचा मान असलेला केप्लर हा होता. यानें प्रसिद्ध केलेल्या पुस्तकांपैकीं तिसरा भाग केवळ फलज्योतिष या विषयानेंच अडविलेला आहे. हा ग्रंथकार फलज्योतिषासंबंधानें म्हणतो कीं "ग्रहांच्या परस्पर आपसांत होणाऱ्या योग प्रतियोगांचा व पृथ्वीवरील घडामोडींचा विचार करितां ग्रहांचा परिणाम ऊचूक पाहण्यास मिळतो व म्हणून मोठ्या नाखुषीनें मला या शास्त्रावर विश्वास ठेवावा लागत आहे.

ग्रहांच्या परिणामाबद्दल आम्हीं नापंसतीही दर्शवित नाहीं किंवा ग्रहांचे परिणाम होणें अशक्य आहे असेंही आम्हीं म्हणत नाहीं. त्याचप्रमाणें ग्रहांबद्दलच्या शास्त्रास—फलज्योतिषशास्त्रासही आम्हीं दोष देत नाहीं. आमचा जो विश्वास नाहीं तो शास्त्रासंबंधी नसून ज्योतिषी लोकांसंबंधी आहे. कारण अनेक ज्योतिषी आपणास शास्त्र कळतें असें भासवितात. खरें ज्ञान फार थोड्यांसच आहे. ग्रहांचे परिणाम होतात. परंतु त्यांचें योग्य अनुमान करण्याच्या पद्धतीविषयीं मात्र आम्हांस जास्तसंशय येतो (जर योग्य अनुमान करतां आलें तर निश्चित फळ मिळेलच.)—ब्रौने.

"स्वर्गांतील सुवर्णाक्षरें" किंवा स्वर्गीय भाषा असें नांव डॅन्टे यानें फलज्योतिष शास्त्रास दिलें आहे. या शास्त्रामुळेंच ग्रहांच्या स्थितीचें व गतीचें महत्व कळतें. कामकऱ्याच्या हातांतील हत्यार जसें उपयोगाचें असतें, याच प्रमाणें ग्रहांचा परिणाम ज्यांस जाणून घ्यावयाचा आहे त्यांस हे शास्त्र साधनीभूत आहे.—डॅन्टे.

मिल्टनचें बायबल सध्यां ब्रिटिश म्यूझियममध्यें आहे. त्यांत त्यानें आपला स्वतःचा व आपल्या मुलांचे जन्मकाळ तास मिनिटासुद्धां फार काळजीपूर्वक लिहून ठेविले आहेत व त्या खालीं त्यानें खालील उद्गार लिहून ठेविले आहेत.

"The Stars over man's poor trivial body ride,
And praise or lower it easier than a tide;
In these eternal volume of the sky
The stars displayed are characters on high,
Where man may read his future and his state;
If dim the tale seem,'tis his sunken state,
Unfit by sin that bright page to descry,
Writ by the finger of the Deity."

* * *

॥ श्रीसद्गुरवे नमः ॥

ज्योतिर्माला

आप्राचः कामरूपाद्द्रुहिणसुतनदप्लावितादाप्रतीचो
गान्धारात् सिंधुसार्द्राद्रघुवररचितादाचसेतोरवाचः ।
आकेदारादुदीचस्तुहिनगहनतः सन्तिविद्वत्समाजा
ये ये तानेष यत्नः सुखयतु समजान्कश्चमत्कर्तुमीष्टे ॥ १ ॥

अभिनवाऽऽवृत्ति वर्ष ५ वें. } डिसेंबर १९१९ व जानेवारी १९२० { अंक ९-१०

सन १९२० साल कसें जाणार ?

युद्ध थांबलें ! युद्ध थांबलें ? होय, युद्ध थांबले असें म्हणतात; सर्वत्र शांतता प्रस्थापित झाली असें सांगतात; दोस्त सरकारांना युरोपिअन महायुद्धांत मोठ्ठा न भूतो न भविष्यति असा विजय मिळाला असेंहि सर्व लोक बोलतात परंतु म्हणतात, सांगतात किंवा बोलतात असल्या सुसाव-रच्या चिठीप्रमाणें ही गोष्ट सांगोसांगीची नसून, नुकताच जो ११ नवंबर १९१८ रोजीं बरोबर स्टॅंडर्ड ११ च्या टोल्याला आमच्या परमपूज्य बद-शहांच्या अनुज्ञेप्रमाणें सर्व पृथिवीतलावर

पांच मिनिटांचा प्राणायाम

करण्यांत आला आणि दिसेंबरच्या भर माध्यान्हीं टोलेजंग शांत्योत्सव साजरा करण्यांत आला, त्यावरून युद्ध थांबलें, शांतता झाली ही गोष्ट केवळ ज्ञानी व डोळस जनांनाच पटली नसून,

मुके, आंधळे, पांगळे आणि थोटे

अशा अनाथांनाहि प्रत्यक्ष अनुभवानें कळून चुकली आहे. अमृतसिद्धी योगावर अमृतसरला राष्ट्रीय सभेच्या एकराष्ट्रीयत्वाच्या अननुभूत उर्मींच्या सरीवरसरी कोंसळत असतांना, दुधांत साखर या न्यायानें बादशहांचा राजकीय सुधारणांचा खलिता पितृवात्सल्यपूर्ण संदेशासह येऊन दाखल झाला आणि त्यानें

लोकशाहीच्या प्रभातीचें प्रथम किरण

अखिल हिंदुस्थानावर पाडून जनतेच्या हृदयाला मगरमिठी मारून बसलेल्या उद्वेग, निराशा आणि शोकपूर्ण रात्रीचा निःपात केला !

२. पूर्वी एक काळ असा होता कीं ज्योतिष्यांना नेहमीं व्यक्तींच्या भवितव्यतेचाच पडताळा पाहून त्यांच्या हातीं भविष्यज्ञानाचा नकाशा द्यावयाचें काम असे. भरतखंडांतील निरनिराळ्या अनेक नृपतींच्या

कचट्यांवर सटवीनें काय लिहिलें

असावें यांचींच एकदेशी संकुचित प्रमेयें सोडविण्याचीं कामें करून आपल्या राजज्योतिष्यत्वाची प्रौढी मिरवावयाची होती; किंवा हिंदुस्थानांतील लोकांच्या व्यक्तिशः कुंडल्या पाहून पुत्रयोग, धनयोग इत्यादि योगाभोगांचीं रहस्यें उलगडण्याचा धंदा त्यांना करावयाचा होता. पण आतां मन्वंतर इतकें बदललें आहे आणि ज्योतिषशास्त्राचें कार्यक्षेत्र हि इतकें व्यापक बनलें आहे कीं इतर शास्त्रांप्रमाणें ज्योतिषशास्त्रालाहि अतःपर आपली एकदेशी व एकमार्गी जीर्णमतप्रवृत्ति साफ झुगारून देऊन जगांतील सर्व

राष्ट्रांच्या दैवगतीचा झोला

कसा कसा आणि कुठकुठें झोंकें खात आहे यांचीं प्रमेयें सोडविण्यासाठीं आपल्या आंगच्या तेजाचा उपयोग करणें प्राप्त झालें आहे. या दिशेनें आगाऊच

धोरण बांधून **ज्योतिर्मालेनें** वाचकांना वेळोवेळीं भविष्य सूचनांचा पुरवठा केलेला आहे, ही गोष्ट मागील दोन तीन वर्षांचे वर्षारंभाचे अंक पाहिल्यानें समजून येईल, हें सांगणें नकोच ! तसेंच या बाबतींत आम्हीं प्रसिद्ध केलेलें **मेदिनीय ज्योतिष** किंवा **राष्ट्रीय ज्योतिष** या ग्रंथानेंहि काय कामगिरी बजाविलेली आहे, ती आमच्या वाचकांस पूर्ण माहीत आहेच.

३. जीर्णमतवाद आणि नवमतवाद हा जगाच्या अंतापर्यंत आहे तसाच चालणार. हें सांगायाला निरयण किंवा सायन यांपैकीं कोठल्याहि ज्योतिषपद्धतीची आवश्यकता नाहीं. तथापि जुनें म्हणूनच सोनें म्हणण्याचा अट्टहास करणारांनीं नवमतवाद्यांचा प्रतिकार करतांना

नथींतून तीर मारायचेच

तर त्यासाठीं आपल्या अपशब्दांच्या भात्यांकडेच हात नेला पाहिजे असें नाहीं. सायनवादी लोक अकलेचे खंदक असून, ते आपल्या पाश्चात्य आलन लीयोदि गुरूंच्या आशीर्वादावर परप्रत्ययनेयत्वानें धिंगाणा घालीत आहेत, अशा प्रकारच्या बाष्कळ व निराधार निंदेनें आपलीं तोंडें व लेखण्या माखविण्यापेक्षां आमच्या प्रतिकारी सज्जनांनीं

मुद्यास मुद्दा व गुद्यास गुद्दा

देण्याचा सरळ मार्ग पत्करला तरी त्यांत आम्ही त्यांचें कौतुकच करूं. परंतु सरळ आक्षेपांना सरळ शास्त्रीय प्रत्युत्तराचें तोंड देण्याच्या धमकेचें भांडवल संपल्यामुळें ते जेव्हां—स्वतः ज्योतिषशास्त्रज्ञ पंडित असूनहि—

भलत्याच महिन्यांत शिमगा

खेळतात तेव्हां मात्र त्यांची करुणा करण्यापलीकडे कांहीं हि गत्यंतर उरत नाहीं.

४. तारीख २१ मार्च रोजीं म्हणजे सायन अमान्त चैत्र प्रतिपदेपासून शालिवाहन शकमानाप्रमाणे रौद्र नांवाच्या संवत्सराचा आरंभ होणार आहे.

व विक्रम संवत्सराप्रमाणें **प्रजापति** नांवाचा संवत्सर सायन अमान्त कार्तिक शुक्ल प्रतिपदेपासून म्हणजे तारीख २४ आक्टोबर १९१९ पासून सुरू आहे. **क्यालडी** संवत्सर चक्राप्रमाणें पाहतां चालू सन १९१० साल मंगळामधील चंद्राचे अमलाखालीं येत आहे. मेदिनीय ज्योतिषशास्त्रामध्यें किंवा राष्ट्रीय ज्योतिषशास्त्रामध्यें चंद्र हा ग्रह प्रजा, जनसमाज, सामान्य दर्जाचे लोक आणि देशांतील स्त्रिया यांचा कारक आहे. वर्षप्रवेश कालचे कुंडलींत चंद्र मेष या धाडशी, महत्वाकांक्षी अग्नि व चर राशीमध्यें असून तो गुरु व नेपच्यून या दोन ग्रहांनीं शुभसंबंधित असल्यामुळें चालू वर्षामध्यें म्हणजे ११ मार्च सन १९२० ते २२ मार्च १९२१ पर्यंतच्या सालांत प्रजा, जनसमाज, सामान्य दर्जाचे लोक आणि देशांतील स्त्रीवर्ग यांच्या प्रगतीपर अनेक सुखावह गोष्टी घडतील, प्रवासाची साधनें रेलवे, पोस्ट ऑफीसें यांना अनुकूल काल वाटत आहे. या खात्यांतील लोकांच्या संबंधानें विशेष महत्वाच्या सुधारणा होतील. देशांतील शिक्षणविषयक चळवळी यशस्वी होतील. नोकरपेशावर उदरनिर्वाह करणाऱ्या लोकांची स्थिति कांहीं अंशीं सुधारेल असें वाटतें. सॉल्ट, अबकारी, रेलवे, पोस्ट, आरमारादि खात्यांमध्यें पुष्कळच सुधारणा होण्याचा संभव आहे. वर्ष प्रवेश कालचे कुंडलीमध्यें माध्यान्हीं मंगळ असून तो गुरु व नेपच्युन यांबरोबर केन्द्रयोग स्थिर राशीमधून करीत असल्यामुळें सन १९२० सालामध्यें धार्मिक गोष्टींचा संबंध येऊन त्यामुळें देशांत भयंकर खळबळ उडेल असा आमचा समज आहे व ह्या गोष्टीस सुरवात लवकरच पाहण्यास मिळेल. या दृष्टीनें जुलईचा शेवटला आठवडा व आक्टोबर हे महिने विशेष महत्वाचे दिसतात. सांपत्तिक स्थिति युद्धखर्चामुळें बरीच खालावली असून तींत आणखी असल्याच गोष्टींची भर पडणार असल्यामुळें नवीन कर लवकरच येतील.

सांपत्तिक दृष्टीनें विचार करितां चालू साल विशेष चांगलें वाटत नाहीं. जगांत जिकडे तिकडे कागदी नाण्यास ऊत आला असून त्याचे बुडाशीं सोनें

कीं रौप्यनिधीची टंचाई दिवसेंदिवस जास्त वाढत जाणारी असल्याकारणानें लवकरच पुढें जी दिवाळ्यांची व सांपत्तिक तुटवडयाची साथ सन १९२१ व १९२२ सालांत येणार आहे त्यामुळें अनेकांचें वाटोळें होऊन सर्वत्र हाःहाकार होणार असल्याकारणानें प्रत्येकानें या संबंधांत आतां पासूनच विशेष सावध रहावें. आम्हीं म्हटल्याप्रमाणें जगास हल्लीं सट्टेबाजीचें वेड लागून भरामर नवीन कंपन्या निघून त्यांचे भावही भरामर वाढत आहेत परंतु या स्थितींत भयंकर बदल लवकरच होण्याचा काळ जवळ येत चालला आहे. हल्लींचा सांपत्तिक सुस्थितीचा बुडबुडा लवकरच फुटावयाचा आहे, व त्यामुळें देशांत जिकडे तिकडे दुःख, दारिद्र्य वाढेल, व्यापारधंदे नीट चालणार नाहींत व त्यांस हटता पाया लागेल व त्यामुळें सर्वत्र असंतोष माजावयाचा आहे. हल्लींचे शेअरचे भाव बसून नाण्याची बरीच टंचाई भासेल व त्यामुळें धान्यांचे भाव वाढतील.

चालू साल मंगळामध्यें चंद्राचें असल्याकारणानें रेलवे अपघात, संप, अग्निप्रलय, रोगराई व असंतोष पुष्कळच प्रमाणांत पाहण्यास मिळतील. आरमार, सैन्य यांसंबंधानें कांहीं भानगडीचे प्रश्न उपस्थित होतील. चालू सालांत रोगराईसंबंधानें विशेष भीति वाटत आहे. एखाद्या रोगाची सांथ प्रथमतः पूर्वेकडील प्रदेशांत उद्भवून नंतर ती पश्चिमेकडे पसरत जाईल व मृत्युसंख्या भयंकर होईल. म्हणून लोकांनीं शक्य तेवढी सावधगिरी ठेवावी. आहार सात्विक व चांगला पौष्टिक घ्यावा. स्वच्छता उत्तम ठेवावी व प्रत्येक माणसानें आपला कोठा साफ ठेवण्याचा प्रयत्न करावा त्यापासून पुष्कळच फायदा होईल. रोग, महागाई, दुष्काळ व मजुरांचे जंगी संप व त्यामुळें कारखान्यांची सर्वत्र दैना या अरिष्टांमधून हिंदी जनता अद्यापि सुटली नाहीं असें दिसतें.

५ **नेपच्युन** किंवा **वरुण** या ग्रहाचें सन १९२० सालीं सिंह राशीमधून भ्रमण होणार आहे. हा ग्रह वर्षारंभीं सिंहेच्या ११ व्या अंशामध्यें

वक्री आहे. व तो ता. ३१ डिसेंबर रोजीं सिंहेच्या १३ व्या अंशामध्यें वक्रीच आहे.

नेपच्युन हा खल ग्रह असल्यामुळें त्याचें भ्रमण ज्या राशीमधून होत असतें तद्योतक देशामध्यें अनेक भानगडी व घोंटाळे उत्पन्न होतात. ह्या ग्रहाची व गुरूची चालूं वर्षामध्यें पुन्हा दोन वेळां युति होणार आहे. १ ली युति तारीख ८ मार्च १९२० रोजीं सिंह राशीच्या ९ अंश १२ कलेमध्यें होणार आहे व नंतर पुन्हा या दोन ग्रहांची युति तारीख २४ एप्रिल १९२० रोजीं सिंह राशीच्या ८ अं. ४९ कलेमध्यें होणार आहे. नेपच्युन-गुरूच्या युतीसंबंधानें आमचे विचार आम्हीं पूर्वीच प्रसिद्ध केले आहेत ते पहावेत. या युतीमुळेंच फ्रान्समध्यें आपसांतील घरभेदेपणामुळें व गुप्त कटामुळें पुष्कळच त्रास व भानगडी उत्पन्न होतील. ज्यांचे रविचंद्रावर किंवा रविचंद्रांच्या त्रिकोणांत किंवा तृतीय एकादश दृष्टियोगामध्यें ही गुरुनेपच्युनची युति होईल त्यांस धार्मिक व सांपत्तिक लाभ होतील. जलप्रवासाची आवड उत्पन्न होईल. ज्यांचे रविचंद्राच्या सप्तमांत ही युति होईल म्हणजे रविचंद्रांबरोबर ही युति प्रतियोग करील त्यांस हा काल सांपत्तिक दृष्टीनें अनिष्ट जाईल. अनेक भानगडी उत्पन्न होतील. या मंडळीनें कायदा, कोर्टांचे खटले यांपासून सावध राहावें. सर्व प्रकारचे देवघेवीचे व्यवहार व दलाल यांपासून सावध राहावें.

ज्यांच्या लग्नाच्या किंवा दशमाच्या उदित अंशावर ही युति होईल त्यांस जलप्रवासाची आवड उत्पन्न होईल. तिर्थयात्रा कराव्याशा वाटतील, हातुन पुण्यकर्में घडतील. पवित्र विभूतींची दर्शनें घडतील किंवा पवित्र स्थलदर्शनें किंवा पवित्र नद्यांचीं स्नानें घडतील किंवा करावीशी वाटतील. कित्येकांस या कालांत स्वप्नसृष्टीचा विचित्र अनुभव पाहण्यास मिळेल तर कित्येकांस अध्यात्म विद्येची आवड उत्पन्न होईल. ज्यांस गायनवादनाची गोडी असेल त्यांची गोडी वाढेल.

६ हर्शल ऊर्फ प्रजापति हा ग्रह वर्षारंभीं कुंभ राशीच्या २९ व्या अंशांत आहे व तो तारीख २२ जानेवारी १९२० रोजीं मीनेमध्यें जाणार आहे. शनिहर्शलांचा प्रतियोग पुन्हा दोन वेळ तारीख २७ एप्रिल रोजीं व तारीख ९ जून रोजीं होणार आहे व हा प्रतियोग मीन व कन्या राशींच्या ४ अं. ५९ कलेमध्यें व ५ अं. ४० कलेमध्यें होणार आहे. हे बुवाजी तारीख १० जून १९२० रोजीं मीन राशीच्या ५ अं. ४० कलेमध्यें वक्री होणार आहेत व पुन्हा तारीख ११ नव्हेंबर १९२० रोजीं मीन राशीच्या १ अं. ४९ कलेमध्यें मार्गी होणार असून वर्ष अखेर तो मीन राशीच्या २ अं. ४८ कलेमध्यें राहणार आहे.

या शनिहर्शलांच्या प्रतियोगामुळें कारखानदार व मजूर वर्ग यांचे मध्यें तेढ उत्पन्न होईल, संप मोठ्या प्रमाणांत झालेले पाहण्यास मिळतील. हा शनिहर्शलांचा प्रतियोग मेषसंक्रमणाचे कुंडलीमध्यें धन व अष्टमस्थानामधून होत आहे व कर्कसंक्रमणकाळचे कुंडलीमध्यें लग्न व सप्तमस्थानामधून होत आहे. त्यामुळें देशांतील सांपत्तिक स्थिति व मृत्युसंख्या व आरोग्य यांसंबंधानें विशेष अनिष्ट फळें अनुभवास येतील. हा प्रतियोग ज्या दोन राशींमधून होत आहे तद्योतक प्रदेशांत बऱ्याच भानगडी उत्पन्न होतील. कन्याराशीचा अंमल युरोपीय तुर्कस्थान, स्वित्झरलन्ड, असिरीआ, मेसापोटेमिया, व ब्राझिल या देशांवर असल्याचें सांगितलें आहे व मीन राशी अंमलाखालीं पोर्तुगाल, गॅलिशिआ, नार्मंडी, न्युब्रिया, वगैरे देश आहेत.

ज्यांच्या लग्नाच्या उदित अंशांवर किंवा रविचंद्रांवर किंवा दशमाच्या उदित बिंदूवर हा प्रतियोग घडेल त्याचेवर नानाप्रकारचीं संकटें येण्याची भीति आहे. रवि किंवा दशम चतुर्थावरील बिंदूवर हा प्रतियोग घडल्यास उद्योग धंदा, मान सन्मान या संबंधांत भानगडी उत्पन्न होतील, कुटुंबांत मृत्यु घडतील. लग्नावर किंवा चंद्रावर हा प्रतियोग घडल्यास आजार प्राप्त होईल, शरीरसुख चांगलें मिळणार नाहीं, स्त्रीसुख मिळणार नाहीं किंवा स्त्रीचा वियोग होईल.

७ शनि हा ग्रह वर्षारंभी कन्याराशीच्या ११ अंश ३७ व्या कलेमध्यें वक्री आहे व तो तारीख ८ मे १९२० रोजीं कन्या राशीच्या ४ अंश ४९ कलेमध्यें मार्गी होईल व वर्षअखेर तो कन्याराशीच्या २४ अंश ४७ कलेमध्यें राहणार आहे. शनीचें भ्रमण ज्या राशीमधून होतें तद्योतक देशामध्यें रोगराई, दुष्काळ पडतात असें म्हणतात. चालू वर्षी शनि व हर्शल यांचा प्रतियोग दोन वेळां होणार असल्याचें पूर्वीच सांगितलें आहे. तारीख २७ एप्रिल ते ७ जून १९२० पर्यंत हे दोन ग्रह एकमेकाचे प्रतियोगामध्यें राहत आहेत. त्यावरून या कालामध्यें जगांत काय काय घडामोडी होतात याकडे सर्वांचें लक्ष लागेल, हवेमध्यें एकदम पुष्कळ फेरफार होऊन २९ मे ते २ जूनपर्यंत पुष्कळ पाऊस पडेल व समुद्रामध्यें मोठालीं तुफानें होऊन भयंकर प्राणहानी होईल असें वाटतें.

महाराष्ट्राचा व धनु राशीचा निकट संबंध असून कन्याराशी मध्यान्ही आहे या राशीमधून चालू वर्षी शनिहर्शलचा प्रतियोग होणार आहे यामुळें चालू-वर्षी महाराष्ट्रामधील कर्त्या पुरुषावर काय काय आपत्ती येतात त्या पाहणें आहे. कन्याराशीचा अंमल नागपुर व पुण्यावर असल्याचें आद्य ज्योतिमालाकर्त्यांचें मत होतें व त्यामुळें असें वाटतें कीं या प्रतियोगामुळें पुण्यामधील चांगल्या लोकनायकांचे मृत्यु घडतील व पुण्यास यंदा एखाद्या साथीच्या रोगापासून फारच त्रास होईल असें म्हणण्यास हरकत नाहीं. कालरा, इन्फ्लुअंझा, टाय-फाईड किंवा सन्निपात ज्वर यांपासून बरीच भीति वाटते. कन्या राशीचा अंमल तुर्कस्थान व बालकन राष्ट्रें यांवर आहे त्यामुळें या देशांसंबंधी भानगडी लव-कर मिटतील असें वाटत नाहीं. पंजाब व मीन या राशींचा निकट संबंध आहे करितां वरील प्रतियोगामुळें पंजाबवर आणखी काय अरिष्ट कोसळतें यासंबंधानें कल्पनाच केली पाहिजे, इतकें मात्र खरें कीं हा प्रतियोग संपून जाईपर्यंत पंजाबला स्वस्थता मिळेल असें दिसत नाहीं. व या दृष्टीनें सप्टेंबर १९२० हा महिना बराच अनिष्ट भासत आहे. इतकें मात्र खास वाटतें कीं यामुळें तीव्र मत-भेद व दुहीचें साम्राज्य फार माजेल.

शनि जात्याच खल ग्रह मानिला असल्या कारणानें याचें भ्रमण कुंडलीच्या किंवा चंद्राच्या (राशीकुंडलीच्या) ज्या ज्या स्थानामधून होतें त्या त्या स्थाना-संबंधी वाईट अनुभव पाहण्यास मिळतो. ज्याच्या लग्नाच्या उदित अंशावरून किंवा चंद्रावरून चालू सालीं शनीचें भ्रमण होईल त्यास हें वर्ष सुखकर जाणार नाहीं, शरीरप्रकृति अस्वस्थ राईल. ज्याच्या रवि किंवा दशमाचे उदित बिंदू-वरून भ्रमण होईल त्यांस सांपत्तिक अडचणी प्राप्त होतील. व्यापारामध्यें बूड येईल. ज्याचे रवि किंवा चंद्र धनस्थान दशमस्थानामध्यें असून त्यांचे वरून चालू वर्षी शनीचें भ्रमण झालें तर त्या लोकांस सांपत्तिक दृष्ट्या फारच अडचणी येऊन भयंकर नुकसान होईल.

(८) गुरु वर्षारंभीं हा ग्रह सिंह राशीच्या १६ अं. ५८ कले मध्यें वक्री आहे व तो तारीख ४ एप्रिल १९२० रोजीं सिंह राशीच्या ८ अंश ६ कले-मध्यें कन्या राशीमध्यें प्रवेश करील. व वर्ष अखेर कन्या राशीच्या १८ अंश ५४ कलेमध्यें राहणार आहे.

गुरु हा सर्व ग्रहांत अति शुभ फलें देणारा ग्रः असल्यामुळें कन्या व सिंह राशीच्या अमलाखालील देश व शहरें भरभराटीस येतील. विशेषतः जुलई व आगस्ट सन १९२० हे महिने मुंबई शहरास अनेक दृष्टींनीं महत्वाचे जातील. व्यापार वाढेल व उद्योग धंदे चांगले जोरानें चालतील. याच काळामध्यें हिंदु-स्थानामध्यें शिक्षणासंबंधानें कांहीं तरी जोराची चळवळ होईल असें दिसतें.

या वर्षी गुरूचें भ्रमण ज्यांच्या रवि, चंद्र, लग्न व दशमाचे बिंदूवरून होईल त्यांस अनेक परीनें लाभ होतील, त्यांची उन्नती होईल. गुरु व नेपच्युन या दोन ग्रहांची युति या वर्षी पुन्हा दोन वेळां होणार आहे. पहिला युतियोग तारीख ८ मार्च १९२० रोजीं होणार आहे व दुसरा युतियोग २४ एप्रिल रोजीं होणार आहे. ही युति ज्याचें लग्न, चंद्रावर होईल त्यांस अध्यात्म विष-याची गोडी लागेल, समुद्र प्रवास करावेसे वाटतील तर कित्येकांस या काळांत नवीन सूचक स्वप्नें पडतील, तंतुवाद्याची गोडी लागेल. हा गुरु नेपच्युन

युतियोगामधील काळ फारच महत्वाचा आहे. धार्मिक गोष्टींस जास्त महत्व येईल.

९ मंगळ हा ग्रह वर्षारंभी तूळाराशीच्या १६ अंश ४१ कलेमध्यें आहे व तारीख १ फेब्रुवारीला वृश्चिक राशीमध्यें प्रवेश करील व तारीख १९ मार्च रोजीं वृश्चिक राशीमध्यें ९ अंश ६ कलेमध्यें वक्री होणार आहे व ही मंगळाची वक्र स्थिति १ जून पर्यंत राहणार आहे व तो तारीख १० चे सुमारास पुन्हां वृश्चिक राशीमध्यें प्रवेश करील. साधारणपणें सर्वच वेळ मंगळाच्या भ्रमणाचा विशेष तीव्रपणानें अनुभव येतो असें म्हणतां येत नाहीं. परंतु ज्या वेळीं तो वक्री होतो त्या वेळीं त्याचें भ्रमण अत्यंत महत्वाचं असतें. व तो ज्या राशीमध्यें वक्री होतो व ज्या राशीमध्यें विशेष काळपर्यंत राहतो त्या देशामध्यें लढाया, खून, मारामाऱ्या वगैरे अत्याचार दर्शवितो.

वृश्चिक राशीचा अंमल मोरोको, नार्वे, ट्रान्सवाल, बव्हेरीआ, आपलेकडे आसाम या प्रांतांवर आहे व तुलाराशीचा अंमल जपान, तिब्रेट, इन्डोचायना, ब्रह्मदेश व चीनला लागून असलेला हिंदुस्थानचा भाग यांवर आहे.

चालू वर्षी मंगल हा ज्यांच्या रवि चंद्रांवर किंवा लग्नाच्या उदित अंशावर वक्री होईल त्यांस लाभ, अपघात, अग्निभय, चोरभय, आजार प्राप्त होतील. धनस्थानामध्यें रवि किंवा चंद्र असून त्यांचे अंशावर मंगळ वक्री झाल्यास द्रव्यहानि, कुटुंबांत मृत्यु घडतील, घरामध्यें चोरी होऊन द्रव्यनाश होईल. चतुर्थ किंवा दशमांत रवि चंद्र असून त्यांचेवर मंगळ वक्री झाल्यास मातृ पितृ कष्ट होतील. पंचमांतील रविचंद्रांच्या अंशावर मंगळ वक्री झाल्यास संततीस आजार होईल. स्त्री गर्भवती असल्यास गर्भपात होण्याची भीति; सप्तमांत रविचंद्र असतां त्यांवर मंगळ वक्री झाल्यास स्त्रीला देहकष्ट, तिला प्रदरविकार असल्यास रक्त प्रदरापासून या कालामध्यें फारच त्रास होईल. अशा वेळीं कांडलीव्हर आईलचा उपयोग केला असतां फारच फायदा होईल. या काळामध्यें शत्रुत्व वाढेल, प्रमेहविकार असल्यास बळावेल, भांडणें, कज्जे यांसंबंधी सावध राहावें. नेत्रविकार होण्याचा पुष्कळ संभव असतो. अष्टमांतील रविचंद्राच्या

अंशावर या वर्षी मंगळ वक्री झाला असतां भयंकर दोषी ज्वरापासून पीडा होईल. मूत्रकृच्छादि व्याधी असल्यास त्यांचा जोर वाढेल. सांपत्तिक अडचणी येतील, नेत्रदोष उत्पन्न होईल.

१० सन १९२० सालीं सूर्य सायन मेष राशीमध्यें तारीख २१ मार्च* रोजीं माध्यान्हापूर्वी मुंबई टाईमप्रमाणें २ वाजून ५० मिनिटांनीं म्हणजे मंगळवारीं व तारीख २० च्या पहाटेस संक्रमण करणार आहे. चालू वर्षप्रवेशकाळची कुंडली बरीच महत्वाची वाटत असल्याकारणानें तो चालू अंकांतच देणें बरें असें वाटल्यावरून देत आहोंत.

---

* बऱ्याच ज्योतिर्विदांस माध्यान्ह रात्रीनंतर म्हणजे रात्रीचे बारा वाजल्यानंतर तारीख बदलत असते याची कल्पनाही असल्याचें दिसत नाहीं. तर याच उलट पाश्चात्य अनुकरणामुळें रात्रीं बारानंतर वार बदलत असतो अशी भ्रामक कल्पना रूढ होंऊं लागली आहे !!

दिवसाचे २४ तास होतात, परंतु ते क्रमानें एक वाजला दोन वाजले असें २४ पर्यंत म्हणत नाहींत. परंतु हे तास बारा बारा तासांनीं पुन्हा बारापर्यंत गणण्याचा प्रघात आहे. फक्त रेलवेमध्यें २४ पर्यंत तास मोजण्याची वहिवाट आहे. मध्यरात्रीनंतर नव्या तारखेला आरंभ होतो त्याचप्रमाणें त्या तारखेच्या पहिल्या तासालाही तेथूनच प्रारंभ होतो व दुसऱ्या दिवसाच्या माध्यान्ह रात्रीं त्या तारखेचा २४ वा तास पुरा होतो. यूरोपीय राष्ट्रांत हे बारा बारा तासांचें गणणें सोईस्कर पडावें म्हणून तासापुढें ए. एम. व पी. एम. अशीं अक्षरें लावितात. आपण ही वार व तारीख लिहून नंतर सकाळचे, दुपारचे, रात्रीचे व पहांटचे असें तासापुढें किंवा पूर्वी लिहिण्याचा संप्रदाय सुरू करणें अत्यंत महत्वाचें आहे. या गोष्टीकडे वाचक लक्ष देतील काय ?

सन ९१२० सालाची वर्ष प्रवेशकाळाची सायन भावचलित कुंडली.



या कुंडलीतील ग्रहस्थितीचें विवेचन अगोदरच करण्यांत आलें असल्या कारणानें पुन्हा विवेचन करण्याचें कारण दिसत नाहीं. चंद्र मेष या राशीमध्यें असून गुरूबरोबर त्रिकोण दृष्टियोग करण्यास जात आहे हा या कुंडलीमध्यें फारच महत्त्वाचा व शुभ दृष्टियोग झालेला आहे. या योगानें प्रजापक्ष फारच जोरावेल व प्रजापक्षाची वृत्ती मंगळाच्या धर्माप्रमाणेंच राहील. चालू वर्षांत चंद्र मेष या राशीमध्यें असल्यामुळें अनेक प्रकारच्या प्रगतीपर खटपटी होतील जहालमवाळांची लढत फारच जोराची होऊन अखेरीस जहाल पक्षाकडेच सामान्य जनता धांव घेईल असें चिन्ह दिसत आहे. वर्षकुंडलीच्या एकादश स्थानावरून देशांतील कायदे कौन्सिलांचा विचार होतो व या दृष्टीनें पाहतां

वर्ष कुंडलीच्या एकादश भावारंभीं धनुराशीचा ९ वा अंश उदय पावत असून एकादश भावाधिपती गुरु हा सप्तमांत नेपच्यून या खल ग्रहानें युक्त असून दशमांत असलेल्या मंगळाबरोबर केन्द्रयोग करीत आहे ही स्थिति समाधान करण्यासारखी दिसत नाहीं. यंदा कौन्सिलचे निवडणूकीसंबंधानें तीव्र मतभेद होऊन बरेच घोंटाळे उत्पन्न होतील असें वाटतें. आगस्ट, नोव्हेंबर, डिसेंबर व फेब्रुवारी सन १९२१ हे महिने अशुभ आहेत व याच महिन्यांत बऱ्याच अनिष्ट गोष्टी पहाण्यास मिळतील. सप्तेंबरमध्यें नाण्याच्या संबंधानें बरीच अडचण भासेल व या महिन्यामध्यें एखाद दोन कौन्सिलरांचा मृत्यु होण्याचा संभव दिसतो. याच महिन्यांत कित्येक मुनिसिपालटयांसंबंधानें कलह व कारस्थानें उघडकीस येतील व त्यांच्या सांपत्तिक स्थितीचा भोपळा फुटून बऱ्याच खटपटी चव्हाटयावर येतील. धार्मिक बाबतींत कलह होतील. बरेच पक्षभेद देशांत उत्पन्न होतील. देशांतील कायदेकौन्सिलासंबंधानें बरीच वाच्यता व खल होईल.

मेषसंक्रमण काळची कुंडली जपानच्या राजधानीचे अक्षांश व रेखांश घेऊन मांडली असतां फारच पाहण्यासारखी बसत आहे. लग्नीं मेषराशीचा २७ वा अंश उदय पावत असून दशमांत मकर राशीचा १६ वा अंश उदय पावत आहे. सप्तमांत वक्री मंगळ येत असल्यामुळें लवकरच जपानचा खटका कोणाबरोबर तरी उडणार असें चिन्ह दिसतें. सप्तमांत वक्री मंगळ असतां युद्धाचे प्रसंग आलेले पाहण्यास मिळतात.

११ सायन कर्कसंक्रमण तारीख २१ जून रोजीं रात्रीं मुंबई टाईमप्रमाणें १० वाजून ३२ मिनिटांनीं होईल. त्या वेळीं सायन कुंभराशीचा २६ वा अंश लग्नारंभीं उदय पावत आहे. हर्शल लग्नामध्यें असून सप्तमांत शनिचंद्रयुति, अष्टमांत मंगळ आहे, हर्शल शनीचा प्रतियोग लग्न व सप्तम स्थानामधून होत आहे, व बुध मंगळाचा केन्द्रयोग षष्ठ व अष्टम स्थानामधून होत आहे. ही कुंडलीही पहिल्या कुंडली इतकीच अशुभ आहे. देशांत संप वाढतील, मृत्युसंख्या फारच वाढेल. कालऱ्याची साथ येण्याचा पुष्कळच संभव

आहे. प्रत्येकानें याकरितां विशेष सावध रहावें. वर्तमानपत्रकार, लेखक व वक्ते यांचे मृत्यु घडतील. जुलई १९ नंतरचा काल व आक्टोबर ११ नंतरचा काळ या गोष्टींस अनुकूल असा येत आहे. शनिचंद्रयुति सप्तमांत बसत असल्याकारणानें स्त्रिया व लहान मुलें यांची मृत्युसंख्या ज्यास्त प्रमाणांत दिसेल. बुधमंगळांच्या केन्द्रयोगानें नोकरपेशांतील लोक रेल्वेमधील नोकर, पोस्टामधील नोकर यांचेमध्यें असंतोष सर्वत्र पसरलेला पाहण्यास मिळेल. बुध पीडित असल्यामुळें न्युमोनिया किंवा इनफ्लुअंझा जास्तच बोकाळेल. या संक्रमणानंतर पुष्कळच पाऊस पडून पिकें बुडतील असा संभव दिसतो.

जून व जुलईमध्यें बरीच धांदल होईल असें दिसतें. चीन व जपान देशांत रोगराई जास्त प्रमाणांत होईल. पुष्कळ ने आण करणारीं जहाजें बुडतील व मोठालीं तुफानें होतील. सांपत्तिक व राजकीय दृष्ट्या तुर्कस्थानसंबंधीं विचार करितां आगस्ट सन १९२० हा महिना बराच काळजी करण्यासारखा वाटत आहे.

* * *

१२ सूर्य सायन तुलाराशीमध्यें तारीख २३ सप्तेंबर रोजीं दुपारीं १ वाजून २० मिनिटांनीं (मु. टा.) प्रवेश करील. या संक्रमणकाळची कुंडली मागील दोन कुंडल्यांपेक्षां पुष्कळ बरी दिसत आहे. मकरलग्नाचा १३ वा अंश लग्नीं उदय पावत असून लग्न व नवमामधून रविचंद्रांचा त्रिकोण दृष्टियोग होत आहे व शुक्र माध्यान्हीं आहे. ही ग्रहस्थिति प्रजापक्ष व राजपक्ष सलोख्यानें काम करील असें दर्शवीत आहे. दशमांत शुक्र स्वगृहीचा माध्यान्हीं असल्यामुळें राजपुरुष व अधिकारी वर्ग यांना तारीख २३ सप्तबर ते २२ डिसेंबर १९२० पर्यंतचा काळ सुखावह जाईल. या काळांत देशांत आनंदोत्सव होतील. बुधही या वेळीं नवमांत असून नेपच्युनबरोबर व मंगळाबरोबर द्विराश्यंतर योग करीत असल्यामुळें या वेळीं चांगले चांगले शास्त्रीय विषयांवर ग्रंथ प्रसिद्ध होतील, नवीन मासिकें व वृत्तपत्रें उदयास येतील, हा काळ ग्रंथकार, लेखक

व वक्ते यांस फारच अनुकूल असल्याकारणानें त्यांचा गौरव होईल. पुष्कळ महत्त्वाचे ग्रंथ प्रकाशित होतील व या वेळीं कायदे कौन्सिलमधील भाषणें व व इतर भाषणें हीं फारच उपयुक्त अशीं होतील. या कालांत प्रवासाचीं साधनें व दूर देशाच्या प्रवासांत जलमार्गानें जाणारांची संख्या फारच वाढेल व शीघ्र प्रवासाचीं साधनें उपयोगांत येतील.

या कुंडलीचे एकादश स्थानामध्यें मंगळ असून तो शनीबरोबर केन्द्रयोग करीत आहे त्यामुळें कायदे कौन्सिलांत या काळामध्यें तीव्र मतभेद व विरोधाचे प्रश्न उपस्थित होतील. अनेक पक्ष उत्पन्न होतील. सैन्याचे खर्चासंबंधानें वादविवाद होईल. आक्टोबर ६ ते १२ व डिसेंबर ४ ते १० पर्यंत कायदे कौंसिलांतील एखाद दोन सभासदांचे मृत्यु घडतील असें वाटतें.

रवि हा नवमांत चंद्राबरोबर शुभ संबंधित असून त्याच प्रमाणें बुधही नवमांत शुभ संबंधित असल्यामुळें विश्वविद्यालयें, परराष्ट्रीय व्यापार यांस हा काळ फारच उत्तम जाईल. व याच काळांत युनिव्हरसिटीसंबंधी कांहीं उपयुक्त सुधारणा होतील.

* * *

१३ सन १९२० सालामध्यें एकंदर ग्रहणें चार होणार आहेत. त्यांपैकीं तारीख ३ मे रोजीं होणारें (ग्रस्तास्त) खग्रास चंद्र ग्रहण व तारीख २७ आक्टोबर रोजीं होणारें खग्रास (ग्रस्तोदय) चंद्रग्रहण हीं फक्त आपलेकडे दिसणार आहेत. बाकी राहिलेलीं दोन सूर्यग्रहणें भरतखंडांत दिसणार नाहींत. त्यांपैकीं पहिलें ता. १८ मे १९२० रोजीं होईल. तें आस्ट्रेलिआ खंडांत व हिंदी महासागरात दिसेल. दुसरें बुधवार तारीख १० नोव्हेंबर सन १९२० रोजीं होईल तें यूरोप, आफ्रिका व अमेरिका खंडाच्या कांहीं भागांत दिसेल.

तारीख ३ मे रोजीं होणारें चंद्रग्रहण वृश्चिक राशीच्या द्वितीय द्रेष्काण मध्यें होत असून तें आपल्याकडे षष्ठस्थानामधें बसत असल्याकारणानें देशांत रोगराई वाढेल, मजूर वर्गामध्यें असंतोष व बेरोजगारी वाढते. नोकरीवर

अवलंबून राहणाऱ्या वर्गास हा काळ त्रासदायक जाईल. कामकरी लोकांमध्यें संप होण्याचा पुष्कळ संभव वाटतो. मंगळ षष्ठस्थानामध्यें बसत असून तो लग्नाधिपति शुक्र व बुधाबरोबर प्रतियोग करीत असल्यामुळें या ग्रहणानंतर लवकरच देशांत साथीचे ताप, रोगराई वगैरे वाढेल. या दृष्टीनें पाहतां जुलई १९ ते आगष्ट ८ पर्यंतचा काळ बराच त्रासदायक आहे. या ग्रहणामुळें महापूर व समुद्रांत तुफानें, वादळें होतील व त्यामुळें शेतीची नासाडी व गुराढोरांची हानी होईल असें दिसतें. आशियामायनार व परशिआमध्यें भूकंप होतील. २६ ते २८ मे व आगष्टचा पहिला आठवडा यांमध्यें वरील बऱ्याच अनिष्ट गोष्टी झालेल्या पाहण्यास मिळतील.

तारीख १८ मे सन १९२० रोजीं सूर्यग्रहण होणार आहे. हें आपलेकडे दिसणार नसून हिंदीमहासागराच्या अगदीं दक्षिणेकडील भाग व ऑस्ट्रेलिया खंडामध्यें दिसेल. हें सूर्यग्रहण वृषभ या पृथ्वी राशीच्या तृतीय द्रेष्काणामध्यें होणार आहे. त्यामुळें देशात धान्य कमी पिकेल, शेतकीच्या जनावरांमध्यें रोग होतील व गोधनाचा नाश होईल. या ग्रहणामुळें वृषभ राशीच्या अमलाखालीं असलेले देश परशिआ, आर्यलंड, आशिआमायनार या देशांत अनिष्ट परिणाम घडलेले पाहण्यास मिळतील. तारीख ६।७ जून व आगस्ट महिन्याच्या शेवटीं पूर्वरेखांश ९० ते १४९ पर्यंतच्या प्रदेशांत भूकंप झालेले पाहण्यास मिळतील.

यानंतरचें चालू वर्षांतील ३ रें ग्रहण हें चंद्रग्रहण तारीख २७ आक्टोबर १९२० रोजीं संध्याकाळीं मुंबई टाईम सात वाजतां होतें व वृषभराशीच्या पहिल्या द्रेष्काणामध्यें होत असून चंद्रग्रहण मध्यकाळचे म्हणजे पौर्णिमेच्या कुंडलीमध्यें व्ययस्थानामध्यें बसत असून तो पंचमांतील शनीबरोबर १३९ अंशांचा अशुभ दृष्टियोग करीत आहे. यामुळें देशांतील धर्मादाय संस्थांमध्यें घोंटाळे होतील, देशांत दारिद्र्य वाढेल, गुन्ह्यांची संख्या बरीच वाढेल. देशांत आजार विशेष फैलावेल, स्त्रिया व मुलें यांचेसंबंधी अत्याचार झालेले उघड-

कीस येतील, व लहान मुलांची मृत्युसंख्या वाढलेली दिसेल. शेतकीचीं गुरें व ढोरें यांचे मध्यें आजार उत्पन्न होईल. शेतकी व बागाईतांचीं पिकें खराब होण्याचा संभव वाटतो. सयामकडील प्रदेशांत भूकंप, दंगेधोपे होतील व पिकांची नासाडी होईल.

तारीख १० नोव्हेंबर १९२० रोजीं सूर्यग्रहण होणार आहे व तें युरोप, आफ्रिका व अमेरिका खंडाच्या कांहीं भागांत दिसेल. हें ग्रहण वृश्चिक राशीच्या द्वितीय द्रेष्काणामध्यें होईल. या ग्रहणकाळची कुंडली फारच विचार करण्यासारखी बसत आहे. आपलेकडे कर्क लग्नाचा १२ अंश उदय पावत असून सप्तमांत मकरेचा मंगळ अस्त पावत आहे. ग्रिनविच येथें वृषभ लग्नाचा १९वा अंश उदय पावत असून दशम भावारंभी मकर राशीचा १९वा अंश उदित होत असून मंगळ दशमांत बसत आहे त्यामुळें लवकरच युद्धाची गडबड होते किंवा काय अशी फार धास्ती वाटत आहे. मंगळ अमेरिका येथें लग्नांत उदित होत आहे म्हणून वरील म्हणण्यास जास्तच बळकटी येत आहे. आपलेकडील सरहद्दीवरील प्रदेशांत धामधूम पुन्हां सुरू होऊन परराष्ट्रीय व्यापारासंबंधानें कांहीं भानगडी उत्पन्न होतील.

* * *

१४ या वर्षांतील विशेष महत्वाचे युतियोगांचा विचार करितां गुरु व नेपच्युन या दोन ग्रहांचा दोन वेळ होणारा युतियोग हा होय व त्यासंबंधानें थोडा उल्लेख पूर्वीच केला आहे. तारीख ८ मार्च सन १९२० रोजीं होणारी युति ही युतिकाळचे कुंडलींत व्ययस्थानामध्यें बसत असून गुरु व नेपच्युन हे दोन्ही ग्रह तृतीय स्थानामध्यें असलेल्या मंगळाबरोबर केन्द्रयोग करीत आहेत. व दुसरी युति तारीख २४ एप्रिल १९२० रोजीं होणार असून ती युतिकालच्या कुंडलीदशमांत होणार आहे.

* * *

१५ चालू वर्षांतील महत्वाच्या प्रतियोगांचा विचार करितां हर्शल व शनि या दोन ग्रहांचा प्रतियोग कन्या व मीन राशींमधून दोन वेळां होणार आहे. पहिला प्रतियोग तारीख २० एप्रिल रोजीं होणार असून दुसरा प्रतियोग तारीख ७ जून रोजीं होईल. हा प्रतियोग ज्या दोन राशींमधून होत आहे तद्योतक देशांचीं हाडें बरींच खिळखिळीं होतील. पहिला व दुसरा प्रतियोग हा आपलेकडे मेषसंक्रमण काळच्या कुंडलीच्या घनस्थानाच्या उदित अंशावर होत असल्यानें याचा परिणाम देशांतील उद्योगधंदे व्यापार व नाणें, यांवर भयंकर होईल. या प्रतियोगामुळें हवेमध्यें मोठाले फेरफार झालेले पाहण्यास मिळतील, पाऊस फार पडेल व त्यामुळें पिकांची नासाडी होईल. मृत्युसंख्या विशेष वाढेल व देशांत संपामुळें उद्योगधंद्यांची पूर्ण वाताहत लागेल. धनी व नोकर, यांचा तंटा लवकरच मिटेल असें चिन्ह दिसत नाहीं. मजुरांचे जंगी संप होतील; व मजुरी वाढल्यामुळें शेतीकडे दुर्लक्ष खात्रीनें होऊन शेतकीची दुर्दशा झालेली पाहण्यास मिळेल. तारीख २५ व २७ मे, आगष्ट २७ ते सप्टेंबर च्या पहिल्या पंधरवड्यापर्यंतचा काळ या अनिष्ट गोष्टींस बराच अनुकूल आहे.

* * *

१६ भरतखंडांत सूर्याचा आर्द्रानक्षत्रामध्यें प्रवेश झाला म्हणजे पर्जन्यास सुरुवात होत असते व म्हणून सूर्याच्या आर्द्राप्रवेशावरून पावसाळ्यासंबंधीं भविष्य करण्यास सांगितलें आहे. सूर्याच्या आर्द्रानक्षत्रप्रवेशाची कुंडली हीच पावसाची कुंडली मानतात. ऋतुमान सायन मानावर अवलंबून असल्याकारणानें निरयण आर्द्रावर हल्लीं पावसाचा मध्यकाळ येऊं लागला आहे. पूर्वी आर्द्रावरील मृगावर व मृगावरील होणारे पेरे हल्लीं रोहिणीवर आले असून आमच्या निरयण ज्योतिर्विदांस रोहिणीनक्षत्राचें प्रवेशफळ लिहावें लागत आहे. आर्द्रा नक्षत्रापासून दहा नक्षत्रें पर्जन्यनक्षत्रें सांगितलीं आहेत. परंतु हल्लीं पर्जन्याचा आरंभ निरयण मानानें दोन नक्षत्रें अगोदर होत असल्यानें दहाच्या बदल बारा पर्जन्य नक्षत्रें झालीं आहेत ! ! व हाच क्रम चालू राहिला तर

पर्जन्यकाळ खात्रीनें अश्विनी नक्षत्रावर येईल व दहाच्या ऐवजीं पंधरा नक्षत्रें पर्जन्याचीं होतील ! ! अश्विनीनक्षत्रांत सूर्य आल्यावर पाऊस पडूं लागला म्हणजे मोठी बहार होणार आहे ! ! कारण ग्रंथांत अश्विनीमध्यें सूर्य असतां किंवा चैत्रवैशाख वसंतऋतु सांगितला आहे त्याचेबदल वसंत व वर्षाऋतु या दोहोंचा एकदम अनुभव घेण्यास मिळेल ! !

सूर्याचा सायन आर्द्रा नक्षत्रांत प्रवेश होतांच पर्जन्यकालास आरंभ होईल व सायन आर्द्रापासूनच असलेल्या दहा नक्षत्रांचा व पावसाचा अबाधित संबंध राहणार आहे. मग निरयणवादी अश्विनीवर किंवा रोहिणीवर किंवा लागेल त्या नक्षत्रावर पावसाचा आरंभ करून पावसाचें भविष्य करोत. आर्द्रा व पर्जन्यकाळाचा आरंभ अबाधित ठेवणें असल्यास सायन गणना विचारांत घेतल्याशिवाय सुटका नाही. चालू वर्षी तारीख २८ मे १९२० रोजीं दुपारीं १२ वाजून ५० मि. मुं. टा. सूर्य सायन आर्द्रा नक्षत्रामध्यें प्रवेश करणार आहे. आर्द्रा नक्षत्र प्रवेशकालीं कन्या राशीचा १९ वा अंश उदय पावत आहे. लग्नाधिपति बुध हा रवीनें युक्त असून हर्शल व शनीबरोबर केन्द्रयोग करीत आहे. चंद्र तुलाराशीमध्यें मंगळानें युक्त आहे. वृषभ राशीचा शुक्र नवमांत बलवान आहे. केन्द्रांत कोणीच शुभ ग्रह नाहीं. यावरून विचार करितां चालू वर्षी वृष्टियोग मोठा बलवत्तर दिसत नाहीं. शेतकीच्या जनावरांचा पुष्कळच नाश होईल. त्याच प्रमाणें मजूर वर्गाच्या चढत्या तुटवड्याचा परिणाम शेतकीवर खात्रीनें होईल. शेतांत काम करण्यास मजूर मिळणार नाहींत व त्यामुळें पिकाची बरीच नासाडी होईल. यंदा तुफानें, वारे फारच सुटून मोठालीं वादळें होतील व त्या सुमारास अतिवृष्टि होऊन पिकें बिघडतील. पर्जन्य प्रवेशकालीं कन्या हें द्विस्वभाव राशीचें लग्न उदित असून रवि बुध हेही द्विस्वभाव राशीमध्यें पीडित असल्याकारणानें वृष्टि सारखी होणार नाहीं. चतुर्थांत पापग्रह नाहीं हा एक व लग्नेश बुध व चतुर्थेश गुरु व त्याबरोबर युक्त असलेला नेपच्युन यांच्या मध्ये शुभयोग असे तीन चांगले योग पर्ज्यन्य प्रवेशाचे कुंडलीमध्यें झालेले आहेत.

या वर्षी साधारणपणें १५ तारखेच्या सुमारास पावसास सुरुवात होईल व ३१ पर्यंत पाऊस बरा पडेल. जून महिन्यांत विशेष पाऊस पडेल असें वाटत नाहीं. पहिल्या पंधरवड्यापेक्षां दुसऱ्यांत पाऊस जास्त पडेल. ७ ते ११ कांहीं कांहीं ठिकाणीं बरा. ता. १५, १६, १९, २०, २५, २६, २७. २८, २९, ३० हे दिवस पाऊस पडेल असें दर्शवितात. मेच्या तारीख १०, ११, २२, २३, २६ व २७ या दिवशीं वादळी हवा होईल किंवा तुफानी वारे सुटतील. जुलई महिन्यांत सर्वत्र ठिकाणीं चांगला पाऊस पडेल. ता. ३ ४।७।८। १२ । १६ । १८ । २१ । २२ २५। २६ । २७ । २८ । ३१ या दिवशीं पाऊस पडेल. या महिन्यांत ता. ७ । ८, १९ । २० व २७ या दिवशीं समुद्रामध्यें तुफानें झालेलीं पाहण्यास मिळतील.

आगस्ट महिन्यामध्यें पाऊस बेताचाच आहे. या महिन्याच्या १३ तारखेपर्यंत विशेष पाऊस दिसत नाहीं. ता. १४, १५, १६, १७, २१, २३, २४, २५, २६, २७ या दिवशीं पाऊस पडेल.

सप्टेंबर महिन्यामध्यें पाऊस बरा आहे परंतु या महिन्यामध्यें वादळें विशेष होतील असें वाटतें व कदाचित त्यामुळें एखादे वेळीं या महिन्यांत सपाटून पाऊस पडल्यामुळें पिकें बिघडण्याचा पुष्कळ संभव वाटतो. हा महिना शेतीच्या पिकाच्या दृष्टीनें अशुभ आहे. ता. २।३।५।७।८।११।१३।१५ १८।१९।२१।२५।२६। व २७ या तारखांस पाऊस पडेल. यांपैकीं ता. ७।९।११।१२ व २७ या तारखांस वादळें होण्याचा पुष्कळ संभव आहे.

आक्टोबर महिन्यामध्यें पाऊस साधारणच वाटत आहे. तारीख ६ । ७, ९ । १० । १४ । २० । २३ । २५ । २६ व २९ या दिवशीं कांहीं ठिकाणीं थोडया कमी अधिक प्रमाणावर पाऊस पडेल.

यापुढें नोव्हेंबर महिन्यांत पाऊस पडेल असें दिसत नाहीं. असो याप्रमाणें चालू सन १९२० सालाचें थोडक्यांत यथामति दिग्दर्शन केलें आहे. अनुभव काय येतो तो मालेचे वाचकवर्ग कळवितील अशी आशा आहे.

———o———

सांपातिक वर्षवादी पटवर्धन !

अथवा

कालिदासाच्या कालीं पंचांग सायन होतें कीं निरयण ?

[लेखक—भिकाजी महादेव पेंडसे बी. ए.]

वस्तुतः प्राचीन सूर्यसिद्धांतादि सिद्धांत ग्रंथांवरून पाहतां शा. श. ४४४ च्या पूर्वी कोणालाही सध्याच्या निरयण पद्धतीची कल्पनाच नव्हती हें उघड दिसण्यासारखें आहे. यामुळें कालिदासाचे कालीं कोणत्या प्रकारचें पंचांग प्रचारांत होतें ह्याचा निराळा ऊहापोह करण्याची आवश्यकताच राहत नाहीं. कारण, कालिदासाचा वास्तविक काल अद्याप एकमतानें निश्चित झालेला नसला तरी तो शा. श. ४४४ च्या अलीकडील आहे असें आतां फारसें कोणाला वाटत नाहीं, हें अगदीं स्पष्ट आहे. परंतु पुण्याचे ग. रा. रामचंद्र विनायक पटवर्धन बी. ए. एल् एल् बी. ह्यांनीं चित्रमयजगताच्या सन १९१८ च्या जुलईच्या अंकांत "कालनिर्णयप्रयत्न" असा मथळा घालून एक लेख प्रसिद्ध केला आहे, त्यामध्यें त्यांनीं "कालिदासाचे वेळीं आषाढ, श्रावण इत्यादि निरयण चांद्र—सौर मास व नभ—नभस्य इत्यादि आर्तव (म्हणजे सायन) मास चालू होते असें सिद्ध होतें" असें कालिदासाच्या मेघदूतावरून दाखविण्याचा प्रयत्न केला असल्याकारणानें त्यांच्या त्या म्हणण्याचें सारासार विचाराच्या दृष्टीनें परीक्षण करणें भाग झालें आहे.

पटवर्धन आपल्या लेखात म्हणतात कीं, "कालिदासाचा काल इ. स. पू. १३० वर्षांपासून इ. स. नंतर २३० वर्षें इतक्याचे दरम्यान असला पाहिजे असें निश्चित अनुमान करण्यास यत्किंचित् हरकत नाहीं." आतां

त्यांचेच म्हणण्याप्रमाणें इ. स. पूर्वी १३० पासून इ. स. २३० ह्या कालांत सौरमास व संक्रांती ह्या सायनमानाच्याच होत्या असें धरावें लागतें. कारण, त्यांनींच आपले लेखांत म्हटलें आहे कीं, "कालिदासांनीं मेघदूताच्या द्वारें आपणांस असें स्पष्ट सांगितलें आहे कीं त्यांच्या वेळेस नभोमास आषाढ शु. एकादशीस सुरू होत होता. *नभोमास म्हणजे हल्लीं ज्याला आपण सायन कर्कमास म्हणतों तो होय." परंतु ह्या त्यांचे म्हणण्यावरून कालिदासाचे वेळीं—आषाढ, श्रावण इत्यादि निरयण चांद्रसौर मास चालू होते. हें कसें सिद्ध होणार ? तेच सांगतात कीं आषाढ शु. एकादशीला कर्कसंक्रमण झालें. म्हणजे त्या महिन्याचे अमावास्येस सूर्य सायन कर्क राशींत असणार व अमावास्येला सूर्य सायन कर्क राशींत असला म्हणजे तो महिना मेषादिस्थे सवितरि यो यो मासः प्रपूर्यते चांद्रः ॥ चैत्राद्यः स ज्ञेयो मासद्वित्वेऽधि मासोऽन्यः ॥ ह्या नियमाप्रमाणें सायन आषाढ झालाच ! पटवर्धनांनीं घेतलेल्या काळीं अयनांश झिटापिशियम् आरंभस्थान धरून व अगदीं सूक्ष्म अयनगति हिशोबांत धरून सुमारें दहांहून अधिक येत नाहींत. ह्यामुळें निरयण कर्क संक्रमण जेमतेम शुद्ध प्रतिपदेला येऊं शकेल. ह्यामुळें तो आषाढ निरयण आषाढ होणें ह्या रीतीनें केवळ अशक्य नाहीं इतकें फार तर मानतां येईल. परंतु एवढ्यावरून कालिदासांचे कालीं निरयण चांद्रमासच प्रचारांत होतें हें अनुमान पटवर्धनांनीं कसें काढलें ? एकच महिना सायन आषाढ व निरयण आषाढ होऊं शकतो इतकें दिसून आल्यानें फार तर त्या काळीं निरयण चैत्रादि चांद्रसौरमास प्रचारांत असणें अशक्य नाहीं इतकें मात्र म्हणतां येईल. परंतु दोन पद्धतींपैकीं अमुकच एक पद्धति त्या कालीं

* नभस् ह्याचा पटवर्धनांचा अर्थ बरोबर आहे असेंच आमच्या ह्या लेखांत आम्ही गृहीत धरलें आहे.

प्रचारांत होती असें म्हणण्यास एवढ्यावरून कोणालाही कोठ्हांही हक्क पोहोचणार नाहीं. परंतु पटवर्धनांनीं तर तसें स्पष्ट विधान केलें आहे ! ह्यावरून काय समजावयाचें ? ह्यावरून इतकेंच समजावयाचें कीं, पटवर्धनांचें विधान युक्तीला धरून नाहीं. दुसरें काय म्हणणार ?

पटवर्धनांचे विवेचनावरून इतकें मात्र सिद्ध झालें आहे कीं, कालिदासाचे कालीं सायनसौरमास व सायन संक्रांती प्रचारांत होत्या इतकी गोष्ट त्यांना आतां बिनतक्रार मान्य होऊं लागली आहे. फक्त एका वर्षांत इतकी प्रगति म्हणजे कांहीं कमी नव्हे ! पटवर्धनांचा प्रस्तुत लेख इ. स. १९१९ च्या जुलई महिन्यांत प्रसिद्ध झाला असून त्यांचा "सायन आणि निरयण" हा लेख सन १९१८ च्या जुलईत प्रसिद्ध झाला होता. म्हणजे ह्या दोन लेखांत बरोबर एक वर्षाचेंच अंतर आहे. स. १९१८ च्या जुलईंतील लेखांत पटवर्धनांनीं सायन वर्षमानाचा स्वीकार करणें म्हणजे अजागळपणा व आचरटपणा होय असें आपलें मत प्रदर्शित केलें होतें व सांप्रतचे यूरोपियन ज्योतिषी हेच सायनवाद्यांचे गुरु अशीही त्यांची त्या वेळीं समजूत होती. परंतु एक वर्षाच्या शोधानें व मननानें निदान कालिदासाच्या वेळीं तरी सायनवर्षमानच प्रचारांत होतें ही गोष्ट पटण्यापर्यंत त्यांची मजल आली, ह्यावरून आणखी एक दोन वर्षांत ते सर्वस्वी सायनवादी बनतील अशी आशा करण्यास जागा झाली आहे. सायनसौरमास कालिदासाच्या वेळीं प्रचारांत होते इतकी गोष्ट तर पटवर्धनांचे लेखांत सर्वस्वी असंदिग्ध स्वरूपांत येऊन चुकली आहे. परंतु इतकें केलें म्हणजे सायन वर्षमानाचा स्वीकार झालाच. कारण, सूर्यसिद्धांतांत म्हटलेंच आहे कीं "मेषादयो द्वादशैते मासास्तैरेव वत्सरः" मेषादि बारा सौरमास म्हणजेच वत्सर ऊर्फ वर्ष होय. अर्थात् **सौरमास सायन ठरले कीं वर्षमान ओघानेंच सायन झालें.**

इसवी सनाच्या पांचव्या सहाव्या शतकांत होऊन गेलेला जो ब्रह्मगुप्त त्याच्या ग्रंथांत सुद्धां अयनगति व अयनांश ह्या कल्पना आढळत नाहींत. ह्यावरून इ. स. च्या सहाव्या शतकापर्यंत सायन व निरयण अशा दोन

प्रकारच्या संक्रांती किंवा अशीं दोन प्रकारचीं नक्षत्रें ज्योतिषग्रंथकारांना माहीतच नव्हतीं. त्यांना सायन संक्रांती व सायन नक्षत्रें ह्यांशिवाय नक्षत्रपुंज व त्यांतील योगतारादि तारांचीं स्थानें मात्र माहीत असत व तीं सांगतांना ते सायन भोगांचाच उपयोग करीत असत. अशा स्थितींत पटवर्धनांचे म्हणण्याप्रमाणें इ. स. पू. १३० पासून इ. स. २३० ह्या काळीं निरयण चांद्रमास व सायन सौरमास प्रचारांत असणें संभवतच नाहीं. म्हणजे त्या काळीं चांद्रमासही सायनमानाचेच होते. आमचें हें म्हणणें पटवर्धनांना बरोबर वाटत नसेल तर त्यांनीं ब्रह्मगुप्ताच्या अगर त्याचे पूर्वीच्या एखाद्या शालिवाहनशकारंभाच्या आसपासच्या ज्योतिषग्रंथकाराच्या ग्रंथामध्यें निरयण चांद्रमास तयार करण्याची रीत दाखवून द्यावी म्हणजे झालें. अशी रीत जोंपर्यंत पटवर्धन किंवा इतर कोणी दाखवून देत नाहींत तोंपर्यंत पटवर्धनांनीं मानिलेल्या कालीं चांद्र व सौर हे दोन्ही महिने एका सायनपद्धतीचेच असत असें म्हणण्यास कोणालाही प्रत्यवाय नाहीं.

ह्या लेखांत आम्ही पटवर्धनांनीं मानिलेला कालिदासाचा काल आमच्या मतें बरोबर आहे किंवा नाहीं ह्याबद्दल कांहींच उल्लेख केलेला नाहीं. परंतु ह्यावरून पटवर्धनांनीं मानिलेला कालिदासाचा काल आम्हांला मान्य आहे असें मात्र कोणी समजूं नये. आमचे मतें कालिदासाचा काल पटवर्धनांनीं मानिलेले कालापेक्षां फारच प्राचीन आहे. ह्यासंबंधानें आमचें म्हणणें आम्ही एका स्वतंत्र लेखांत सवडीप्रमाणें प्रसिद्ध करणार आहों. कालिदासाचे कालीं चांद्रमास सायन होते किंवा निरयण होते ह्या प्रश्नाचे निर्णयाला कालिदासाचा वास्तवीक काल कोणता ह्या प्रश्नाचे निर्णयाची विशेष आवश्यकता नाहीं. कारण, कालिदासाचा काल सध्यां शा. श. ४४४ च्या अलीकडील कोणीच मानीत नसून शा. श. ४४४ च्या पूर्वी कितीही जवळचा अगर दूरचा तो काळ असला तरी त्यामुळें त्या कालीं चांद्रमास सायन होतें किंवा निरयण होते ह्या मुद्याचा निर्णय बदलण्याचा कांहींच संभव नाहीं.

श्री. पटवर्धन हे सांपातिक वर्षच सशास्त्र मानणारे आहेत ही गोष्ट त्यांच्या एका अगदीं अलीकडल्या लेखांतही आलेली आहे. ता. ३ एप्रिल १९२० च्या संदेशपत्रांत त्यांचा एक लेख छापला आहे. त्यांत यासंबंधानें ते लिहितात: "नाक्षत्रवर्षमानापासून ऋतुचक्राचें मान भिन्न आहे असें प्रथम मानीत नव्हते. दोन्ही वर्षमानें एकच समजलीं जात. सूर्याच्या नक्षत्रस्थितीच्या मानानें ऋतु मागें हटत जातात असा अनुभव पुढें येत गेला. परंतु **परंपरा मात्र बदलली नाहीं.**" पटवर्धनांचे ह्या लिहिण्यामध्यें आलेली परंपरा ही संदर्भावरून वर्षमानाचीच परंपरा होय हें सहज दिसणारें आहे. आतां, ही वर्षमानाची पूर्वपरंपरा सांपातिक वर्षाचीच होती हें लो. बा. ग. टिळक यांनीं आपल्या ग्रंथांत स्पष्ट करून दाखविलें आहे. त्यांनीं असें दाखवून दिलें आहे कीं "पुरातन वैदिक काळीं सूर्य वसंतसंपातीं आला कीं सौरवर्षास प्रारंभ होत असे." यांत नक्षत्रांचा कांहीं संबंध नाहीं. फक्त संपाताचा संबंध आहे. सूर्य संपातीं येतो तेव्हां तो आपल्या पृथ्वीच्या विषुववृत्तासमोर असतो. ह्यामुळें तो तेथें केव्हां आला हें नुसत्या छायेवरून समजतें. संपातापासून सुरू झालेलें वर्ष तेंच सांपातिक होय व पटवर्धनांचे लिहिण्यावरून त्याचीच परंपरा चालू ठेवणें हेंच शास्त्रसंमत ठरतें.

'सिंहस्थ नेपच्यून'

(व्याख्याते—सायनज्योतिर्मंदिराध्यापक)

अध्यक्ष, दत्तात्रय मोरेश्वर मायदेव B. A. LL. B.

सिंह ही ग्रहमालेचीं राजा रवि याची रास. अनियंत्रित राजसत्तेस प्रतिकूल असा ग्रह, म्हणून सिंह या राजराशींतून नेपच्यूनचें भ्रमण होत असल्यामुळें अनियंत्रित राजसत्तेस बराच आळा जगभर बसेल हें निर्विवाद आहे.

सन १९१५ सालीं या बादशाही राशींत नेपच्यून आला त्या वेळेपासून राजकीय भानगडी जगांत सुरू आहेतच. मोठी ठळक भानगड युरोपांतील प्रचंड युद्ध होय. ह्या भानगडींतून इंग्लंड, इताली, फ्रान्स, युनायटेड स्टेट्स हीं राष्ट्रें विजयी झालीं आहेत व हीं राष्ट्रें जगांतील सोटेशाहीचें नियमन करण्यासाठीं राष्ट्रसंघ स्थापून राहिलीं आहेत.

इंग्लंडची रास मेष; तेव्हां सिंहराशी इंग्लंडच्या त्रिकोणांत येते. इताली, व फ्रान्स यांची राशीच सिंह व युनायटेड स्टेट्सची राशी मिथून, तिच्या पराक्रमांत सिंह राशी येते. ह्या सिंह राशींत नेपच्यून सध्या भ्रमूं लागल्यामुळें हीं राष्ट्रें राजकीय भानगडींत विजयी होऊन विश्वबंधुत्वाच्या ह्या प्रयत्नास योग्य स्वरूप मिळूं लागलें आहे, व जसा गुरु नेपच्यूनशीं त्रिकोण, लाभयोग करील तसें आणखी यश मिळेल.

आतां आपण हिंदुस्तानाकडे वळूं. हिंदुस्तानाची राशी मकर आहे म्हणून सिंहराशी अष्टमांत पडते. यामुळें नेपच्यूनचें ह्या राशींतील भ्रमण हिंदुस्तानास अगर मकर राशीच्या भागांस सुखकर होणें अशक्य वाटतें. इन्फ्लुएंझा सारखी विलक्षण साथ उत्पन्न होऊन लाखो लोक मृत्युमुखीं पडले, वॉरमुळें सांपत्तिक अडचणी विलक्षण उत्पन्न झाल्या आणखी भानगडी उत्पन्न होत आहेत. हिंदुस्तानाची व बंगालची राशी एकच यामुळें बंगालची स्थितिही सुखकर

राहाणें शक्य दिसत नाहीं. पंजाब बनारस हीं मीन राशीखालील आहेत. यांचे षष्ठांत सिंह राशी आहे. तसेंच पुणें नागपूर कन्या राशीखालील शहरें मानतात. यांचे व्यवस्थानीं सिंह राशी येते. यामुळें तींतील नेपच्यूनचें भ्रमण त्या प्रांतांस अगर शहरांस सुखप्रद होईलसें वाटत नाहीं. तसेंच दिल्ली वृषभ राशीखालील असल्यामुळें तिच्या केंद्रांत सिंह राशी येते. तींतून होणारें नेपच्यूनचें भ्रमण दिल्लीस सौख्यकारक होईलसें दिसत नाहीं.

धन राशीचा महाराष्ट्र आहे तेव्हां त्याचे नवमांत सिंह राशी येते. तींत नेपच्यून यामुळें महाराष्ट्रांतील पुढारी लांबचा जल प्रवास करीत आहेत. व त्यांचा राजकीय प्रयत्न जोरदार होईलसा वाटतो.

आतां आपण १६९ वर्षें मागें जाऊं. १९१५ सालीं सिंह राशींत नेपच्यून प्रवेश करितो. त्यांतून नेपच्यूनच्या एका भ्रमणाचीं वर्षें वजा केलीं म्हणजे १७९० सालीं नेपच्यून सिंह राशींत होता, व तो १७९४ पर्यंत याच राशींत भ्रमण करीत होता.

आतां त्या वेळची हिंदुस्तानाची स्थिति पहा. मेष राशीचे मद्रासमध्यें इंग्रज उदयास आले. मेष राशीच्या म्हैसूरमध्यें हैदर उदयास आला. इंग्रजसरकारची सत्ता मद्रास इलाख्यांतच वाढून राहिली नाहीं तर त्यांचे दशमस्थ राशीखालील बंगाल प्रांत त्यांनीं नेपच्यून ग्रहाच्या राजकीय भानगडी करून जिंकला. महाराष्ट्र त्या वेळीं जोरांतच होता. श्रीमंत नानासाहेब पेशवे गादीवर होते, हिंदुस्तानांत चोहोंकडे मराठ्यांचा दरारा विलक्षण होता.

कर्क राशीचें निजाम हैद्राबाद आहे. १७६० सालीं निजामाशीं मराठ्यांनीं लढून पुष्कळ मुलूख व पैसा मिळविला. पुढें १७६१ साल आलें. अफगाणची राशी मकर व हिंदुस्तानाचीही राशी मकर यामुळें दोघांचाही नाश झाला. कारण त्यांच्या अष्टमांतून नेपच्यूनचें भ्रमण. पानिपतची राशी मीन ह्यामुळें नेपच्यूनचें भ्रमण पानिपतला अनुकूल नव्हतें. पेशवे या वेळीं हिंदुस्तानचे पूर्ण

मालक दिल्ली येथें ब्राह्मणपादशाही स्थापून होणार होते. पण पुण्यास व हिंदुस्तानास नेपच्यूनचें भ्रमण अनुकूल नव्हतें यामुळें पेशवे पराजित झाले असें वाटतें. पण त्या वेळच्या महाराष्ट्रांतील वीरांचें तेज विलक्षण असून पराक्रम अवर्णनीय होता. हें इतिहास सांगतो. पुढें १७६१ मध्यें पेशवे थोरले माधवराव गादीवर बसून त्यांनीं पानिपतचें नुकसान भरून काढिलें.

आतां आपण सध्याचे हिंदुस्तानाकडे पाहूं. मीन राशीच्या पंजाबामध्यें अनेक राजकीय भानगडी झाल्या आहेत त्याकडे हिंदुस्तानाच्या प्रांतांतील सर्व लोकांचें लक्ष लागून राहिलें आहे. महाराष्ट्रांतील पुढारी लोक या प्रांतांतील राजकीय भानगडींबद्दल जोरदार प्रयत्न करतील असें वाटतें.

प्रयत्नांतीं यश येईल किंवा नाहीं याबद्दल खात्री वाटत नाहीं. पण थोरले माधवराव यांचें लग्न सिंह असून त्यांचा गुरु धनेचा होता हें ज्योतिर्भूषणावरून दिसतें. तर अशा प्रकारची ग्रहस्थिति असणारी व्यक्ति प्रचलित राजकीय भानगडींत विजयश्री संपादन करील असें वाटतें. मेष राशीचें मद्रास, म्हैसूर व बडोदें हीं यशस्वी मदत करतील असा तर्क आहे.

॥ श्रीसद्गुरवे नमः ॥

ज्योतिर्माला

आप्राचः कामरूपाद्द्रुहिणसुतनदंप्लावितादाप्रतीचो
गान्धारात् सिंधुसार्द्रादघुवररचितादाचसेतोरवाचः ।
आकेदारादुदीचस्तुहिनगहनतः सन्तिविद्वत्समाजा
ये ये तानेष यत्नः सुखयतु समजान्कश्चमस्कर्तुमीष्टे ॥ १ ॥

अभिनवाऽऽवृत्ति वर्ष ५ वें. } फेब्रुवारी व मार्च १९२०. { अंक ११-१२

वार्षिक समारोप

चालू जोडअंक हा पांचव्या वर्षाचा ११वा व १२वा अंक असून हा वाचकांच्या हातीं देऊन आम्हीं आमच्या वाचकांच्या पांचव्या वर्षाचे ऋणांतन मुक्त होत आहोंत. चालू साल हें सांपत्तिक दृष्टीनें व मानसिक दृष्टीनें आम्हांस बरेंच जाचक गेल्यामुळें त्याचा परिणाम ज्योतिर्मालेवर झालेला आहे. कोणतीही संस्था एकट्याच्या सुखदुःखावर व सुस्थितीवर अवलंबून असली म्हणजे असेंच होणार. यासंबंधानें आम्हीं आमचे विचार वारंवार मालेंत प्रसिद्ध केले आहेत. कोणतेंही कार्य संघशक्तीनें करण्याची प्रवृत्ती अजून हिंदी जनतेमध्यें उत्पन्न झाली नाहीं व त्यांत या बाबतीमध्यें महाराष्ट्र तर फारच मागें आहे. भांडखोरपणांत आमचा पहिला नंबर लागत असून एकमेकांच्या उखाळ्यापाखाळ्या उकरून काढन मत्सराचें बीजारोपण करण्यांत फारच कुशल आहोंत.

यूरोपखंडामध्यें रणसंग्राम चालू असतां ज्या अडचणी उत्पन्न झाल्या नाहींत अशा नाना प्रकारच्या नवीन अडचणी चालू वर्षांत उत्पन्न झाल्या आहेत. मासिकें, वृत्तपत्रें व दैनिकें यांच्या जीवनाचा प्रश्न अतिकष्टतम अवस्थेस गेला आहे. याची कल्पना अनुभवाखेरीज होणार नाहीं. सध्या कागदाचा व मजुरांचा वाढता तुटवडा इतका कठीण झाला आहे कीं त्यापेक्षां मासिकें बंद करून स्वस्थ बसावें हाच शहाणपणाचा मार्ग आहे असें वाटूं लागलें आहे. ही संकटावस्था लवकरच नष्ट होईल असें आज मुळींच चिन्ह दिसत नाहीं. अशा परिस्थिती-मध्यें आम्हीं कोणता मार्ग पतकरावा यासंबंधानें आमच्या हितचिंतक मित्रमंडळा-मध्यें विचार करितां ज्योतिर्माला चालू ठेवण्याचें ठरलें असून त्याप्रमाणें लवकरच सहाव्या वर्षाचा पहिला अंक आम्हीं प्रसिद्ध करणार आहोंत. आजपर्यंत ज्याप्रमाणें आमच्या हितचिंतकांनीं व आश्रयदात्यांनीं उदार मनानें आश्रय दिला तसाच आश्रय या पुढेंही ते देतील अशी आमची आशा आहे. व चालू संकटाच्याच परिस्थितीमध्यें विशेष मदतीची आवश्यकता वाटत आहे. कित्येकांकडून थोडी वर्गणी वाढविण्याबद्दल सूचना आल्या आहेत परंतु हल्लीं सर्वत्र जीवनकलह इतका तीव्रतम झाला आहे कीं त्याचें चित्र रेखाटण्याचें सामर्थ्य आमच्या लेखणीमध्यें नाहीं. अशा समयीं आम्ही थोडीबहुत वर्गणी वाढवून आमच्या आश्रयदात्यांस त्रास देऊं इच्छित नाहीं. शास्त्रसेवा हेंच आद्यज्योतिर्मालाकर्तें यांचें ध्येय होतें; व तेंच ध्येय आमचें व आमच्या सहाय्यक मंडळीचें असल्याकारणानें आम्हीं स्वतः झीज सोसून कार्य करण्यास तयार आहों. जावत्काल नेटानें प्रयत्न करून माला सुरळीत ठेवितां येईल तोंपर्यंत ती ठेवण्याचा आमचा कृतसंकल्प आहे. शेवटीं ज्या दिव्यशक्तीच्या प्रसादावर आम्हांस आज पांच वर्षें लोकसेवा करितां आली तिला अनन्यभावें शरण जाऊन व अशीच ज्योतिषशास्त्ररूपी तिच्या दिव्यस्वरूपाची सेवा करण्याचा चिर मंगल योग ती देवो अशी प्रार्थना करून हा पांचव्या वर्षाचा समारोप पुरा करितों.

—संपादक—

वाचकांस विनंती

एप्रिल सन १९२० पासून मालेच्या सहाव्या वर्षाचा आरंभ होईल. पुढील वर्षीं ज्यांना वर्गणीदार रहाण्याचें नसेल त्यांनीं चालू अंक हातीं पडल्यापासून १५ दिवसांचे आंत आम्हांस तसें कळवावें. पुष्कळ लोक आगाऊ न कळवितां व्ही. पी. परत करितात. हें त्यांचें करणें बरें कीं वाईट याचा त्यांनींच किंचित सहृदयतेनें विचार करावा. त्यामुळें मालेस विनाकारण दरवर्षी पंधरा-वीस रुपयांचा भुर्दंड भरावा लागत आहे. याकरितां ज्यांना वर्गणीदार रहावयाचें नसेल ते आम्हांस एक पैशाचें कार्ड खर्चून कळवितील तर बरें होईल.

व्ही. पी. चा स्वीकार करून मालेच्या कार्यास मदत करण्याबद्दल सर्वांस नम्र विनंती आहे. ज्यांना अनपेक्षित अडचणींमुळें किंवा इतर कोणत्याही कार-णानें पुढील सालाकरितां मासिक चालू ठेवणें नसेल त्यांनीं तसें आम्हांस आगाऊ कळविलें असतां आम्हीं त्यांचे अत्यंत आभारी होऊं. व्ही. पी. परत आल्यानें प्रत्येक व्ही. पी. मागें सवा आण्याचें नुकसान हल्लींच्या बिकट परि-स्थितीमध्यें मालेस फार जड वाटत आहे. करितां मालेचे आश्रयदाते व मित्रवर्ग या आमच्या विनंतीकडे लक्ष्य देतील अशी आम्हांस फारफार आशा आहे. ज्यांचे कडून पत्रद्वारें कळणार नाहीं ते पुढील सालीं वर्गणीदार होण्यास तयार आहेत असें समजून त्यांचेकडे पहिला अंक रु. १-९ आण्याच्या व्ही. पी. नें पाठविण्यांत येईल. ज्यांना ज्यांना आगाऊ वर्गणी मनीआरडरनें पाठविणें शक्य असेल त्यांनीं ती आमच्याकडे १० आगस्ट १९२० पर्यंत पाठविली असतां व्ही. पी. मुळें होणारा विलंब वांचून आमच्या कार्यामध्यें बरीच मदत होणार आहे, करितां याही गोष्टीकडे आमच्या प्रिय आश्रयदात्यांनीं लक्ष द्यावें.

मॅनेजर ज्योतिर्माला ऑफीस–दादर, मुंबई नं. १४.

सांगली—ज्योतिष संमेलन आणि सायन पंचांग.

[लेखक—भिकाजी महादेव पेंडसे बी. ए.]

सांगली येथें ता. १५, १६, व १७ फेब्रुवारी १९२० या तीन दिवशीं मुख्यतः महाराष्ट्रीय ज्योतिषी व धर्मशास्त्री यांचें संमेलन भरलें होतें. त्यासंबंधी बरीच हकीगत वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध झालीच आहे. परंतु सायनपक्षाचा त्या संमेलनांतील वास्तविक अनुभव अद्याप नीटपणें प्रसिद्ध झाला नसल्यानें तो येथें देतों.

तारीख १४ फेब्रुवारी रोजीं अध्यक्षांनीं ते उतरले होते त्या ठिकाणीं तिसरे प्रहरीं चार वाजतां तोंपर्यंत जमलेल्या संमेलनांतील प्रतिनिधींना बोलावून आणून दुसरे दिवशीं सुरू करावयाचे संमेलनाचे मुख्य कामगिरीची रूपरेखा आंखण्याचा प्रयत्न केला. वस्तुतः संमेलनाचे कामाचा हाच खरा आरंभ होय.

(१) ह्या प्रसंगीं सायनपक्षाचे प्रतिनिधींनीं प्रथम 'शुद्ध पंचांग म्हणजे काय ?' हा प्रश्न संमेलनांत विचाराकरितां घ्यावा म्हणून सूचना केली व वस्तुतः पंचांगाची शुद्धि करण्याच्याच हेतूनें एकत्र जमलेल्या प्रतिनिधींना ही सूचना ग्राह्य होण्यास कांहींच हरकत नव्हती. परंतु चमत्कार हा कीं सायन पक्षाबाहेरील कोणाही इसमाला ही सूचना आवडली नाहीं.

(२) पुढें कांहीं वेळानें सायनपक्षानें 'पंचांग सायन असावें किंवा निरयण असावें ?' हा प्रश्न विचाराकरितां घ्यावा म्हणून सुचविलें. परंतु हा प्रश्न ऐकतांच लो. टिळकांनींच विशेष विरोध करण्यास सुरुवात केली. अखेरीस असें ठरलें कीं ह्याबद्दलचा अखेर निर्णय निषयनियामक कमिटीनें करावा.

(३) दुसरे दिवशीं अध्यक्षांचें प्रास्ताविक भाषण होऊन विषय—नियामक कमिटीचे कामास सुरुवात झाल्यावर सायन पंचांगाचा प्रश्न पुढें आला.

परंतु सायनपक्षातर्फे विषय—नियामक कमिटींत निवडून दिलेल्या दोघां इसमांखेरीज कोणीही सायन पंचांगाचा प्रश्न सभेपुढें मांडण्यास संमति देईना. ह्या संमेलनांत सर्व मतांच्या ज्योतिष्यांबरोबर सायन पक्षालाही जर बोलावणें करण्यांत आलें आहे तर सायन पंचांगासंबंधानें त्या पक्षाला आपलें म्हणणें संमेलनाचे मुख्य सभेपुढें मांडूं न देणें म्हणजे ही एक प्रकारची मुसकटदाबीच होय वगैरे सायन पक्षानें पुष्कळ सांगून पाहिलें परंतु तें सर्व अरण्यरुदनवत् झालें.

(४) तथापि सायन पक्षानें धीर सोडला नाहीं. आणखी एखादी अनुकूल संधि मिळेल म्हणून तो पक्ष त्या संधीची वाट पाहत बसला होता. ही संधि ता. १६ फेब्रुवारी रोजीं आली. त्या दिवशीं वर्षमान वेधोपलब्ध नाक्षत्र सौर घ्यावें अशा अर्थाचा एक ठराव श्री. रामचंद्र विनायक पटवर्धन बी. ए. एल् एल् बी. यांनीं सभेपुढें मांडला. त्याबरोबर सायन पक्षातर्फे रा. भिकाजी महादेव पेंडसे बी. ए. ह्यांनीं 'पंचांगांत वर्ष घेणें तें नाक्षत्रसौर न घेतां सांपातिक वर्ष घ्यावें' अशी उपसूचना आणली. त्या वेळीं

रा. पेंडसे म्हणाले

आपण ज्या पंचांगाचें संशोधन करण्यास येथें आलों आहों तें पंचांग धर्मकर्माकरितां आहे. करितां त्यांत वर्ष घेणें तें धर्मसंबंधानें प्रमाणभूत मानलेल्या ग्रंथांत जें वर्ष आढळेल तेंच घेतलें पाहिजे. तरच तें पंचांग शास्त्रसंमत म्हणतां येईल. नाहीं तर त्यास शास्त्रबाह्य म्हणावें लागेल. हे प्रमाणभूत ग्रंथ म्हणजे श्रुति, स्मृति, पुराणें व अपौरुष मानलेले ज्योतिषसिद्धान्त—ग्रन्थ हे होत. अर्थात् ह्या प्रमाणभूत ग्रंथांची तपासणी करून त्यांत जें वर्ष आढळेल तेंच स्वीकारणें आपल्याला भाग आहे. करितां ह्या ग्रंथांतून नाक्षत्र सौरवर्ष आलें आहे तें आतां पाहूं.

लो. बा. गं. टिळक यांनीं आपल्या ओरायन नांवाच्या सुप्रसिद्ध ग्रंथांत येणेंप्रमाणें लिहिलें आहे:—

" In the early Vedic days the year began when the sun was in the Vernal Equinox.....Vasant. The year and the Satras, all commenced together at the Vernal Equinox.....the Autumnal Equinox was the central day of the year."

" पुरातन वैदिक काळीं सूर्य वसंतसंपातीं आला कीं, (सौर) वर्ष सुरू होत असे.....वसंत, (सौर) वर्ष व सत्रें या सर्वांचा आरंभ एकदम वसंतसंपातीं सूर्य आला कीं होत असे.....शरत्संपातीं सूर्य येई तो दिवस (सौर) वर्षाचा मध्य दिवस असे."

संपातापासून सुरू होणारें वर्ष तेंच सांपातिक वर्ष होय म्हणजे वेदांमध्यें सांपातिक वर्षच आलेलें आहे.

पुढें स्मृति, महाभारत, पुराणें ह्यांतून सर्वत्र अयनें, विषुवें, षडशीति ह्या सांपातिक संक्रांतींचाच उल्लेख आढळतो. यावरून ह्या ग्रंथांनाही सांपातिक वर्षच मान्य आहे हें उघड झालें.

आतां सूर्य सिद्धान्तामध्यें कोणतें वर्ष आहे तें पाहूं. सूर्य सिद्धान्तांत ३६५ दि. १५ घ. ३१$\frac{3}{5}$ पळें हें वर्षाचें मान दिलेलें आहें. अलीकडील शोधांवरून नाक्षत्र सौर ऊर्फ निरयण वर्षाचें मान ३६५ दिवस १४ घ. ३१ प. ५३. ४३ वि. इतकें ठरलें आहे. म्हणजे सूर्य सिद्धांतांत दिलेले वर्षमान हें शुद्ध निरयण वर्षमानापेक्षां सुमारें ८$\frac{3}{5}$ पळांनीं अधिक असून सांपातिक वर्षमानापेक्षां सुमारें ९९$\frac{3}{5}$ पळांनीं अधिक आहे. मग सूर्यसिद्धांतांत जें वर्षमान आलें आहे तें देणारानें निरयण उर्फ नाक्षत्र सौर म्हणून दिलेलें आहे किंवा सायन ऊर्फ सांपातिक म्हणून दिलेलें आहे ? ह्यावर कोणी म्हणतात कीं तें निरयण वर्षाचें मान म्हणूनच दिलेलें असावें; कारण तें सध्यां उपलब्ध झालेल्या शुद्ध निरयण वर्षमानापेक्षां फक्त सुमारें ८$\frac{3}{5}$ पळांनींच अधिक असून सायन वर्षमानापेक्षां सुमारें ९९$\frac{3}{5}$ पळांनीं अधिक आहे. परंतु ही विचारसरणी बरोबर आहे असें दिसत नाहीं. ' क ' हें झाड

कोणत्या जातीचें आहे हें ठरविणें झाल्यास ' क ' ह्या झाडाची उंची ' ख ' ह्या झाडाच्या उंचीच्या अगदीं जवळ आहे यावरून ' क ' हें झाड ' ख ' ह्या झाडाचे जातीचें आहे असा निर्णय करणें रास्त होणार नाहीं. ' क ' ची पानें, साल, फुलें, फळें असल्या गोष्टींवरूनच त्याचे जातीचा निर्णय करणें योग्य होय. त्याच प्रमाणें सूर्यसिद्धान्तोक्त वर्षमान नाक्षत्र सौर आहे किंवा सांपातिक आहे हे ठरविणें तें सूर्यसिद्धान्तवचनांत आलेल्या वर्ष–लक्षणावरूनच ठरविलें पाहिजे.

प्रस्तुत प्रश्नाचा निर्णय ज्यांवरून होईल अशीं अनेक वचनें सूर्यसिद्धान्तांत आहेत. त्यापैकीं येथें एकच सांगतों.

" मासेनस्यादहोरात्रः पैत्रोवर्षेण दैवतः "

ह्यांत देवांचें म्हणजे उत्तर ध्रुवस्थांचे जें अहोरात्र तें मानवांचें वर्ष असें स्पष्टपणें आलें आहे. आतां उत्तरध्रुवस्थांचें अहोरात्राचें मान काय तें पाहिलें पाहिजे. उत्तरध्रुवस्थांचें अहोरात्र हें सूर्याच्या सांपातिक प्रदक्षिणांच्या कालांमध्यें सुमारें ९० पळांचें अंतर आहे इत्यादि गोष्टी निदान ज्योतिर्विदांना समजावून देण्याची आवश्यकता नाहीं. हे ज्योतिःशास्त्राचे सर्वमान्य सिद्धांत आहेत. यावरून सूर्यसिद्धान्तकारानें दिलेलें वर्षमान हें त्यानें सांपातिक वर्षाचें म्हणून दिलेलें असून नाक्षत्र सौरवर्षाचें म्हणून दिलेलें नाहीं हें सिद्ध झालें.

ह्यानंतर ह्या उपसूचनेस रा. विष्णु गोपाळ नवाथे, संपादक कुंडलीविज्ञान, ह्यांनीं अनुमोदन दिलें. त्या वेळीं

रा. नवाथे म्हणालेः

" या ठिकाणीं जमलेले ज्योतिषी सिद्धांतग्रंथ पाहिलेले असलेच पाहिजेत. त्यांना मी असा प्रश्न करितों कीं सिद्धांतग्रंथांत ' वर्ष ' शब्दाचें लक्षण काय सांगितलें आहे ? श्रीमद्भास्कराचार्य आपल्या सिद्धांत–शिरोमणींत लिहितातः—

रवेश्चक्रभोगोऽर्कवर्ष प्रदिष्टं द्युरात्रंच देवासुराणांतदेव ॥
रर्दीद्वोर्युतेः संयुतिर्यावदन्या विधोर्मास एतच्च पित्र्यंद्युरात्रम् ॥

यांत देवांचें जें अहोरात्र तेंच मनुष्यांचें सौरवर्ष होय, असें स्पष्ट सांगितलें आहे. देव हे मेरूच्या उत्तर टोंकावर राहतात. (देवाः मेरोरुत्तराग्रवर्तिनः) अर्थात् त्यांना सूर्य जेव्हां विषुवांत म्हणजेच संपातांत येईल त्या वेळीं सूर्योदय होणार. देवांचा सूर्योदय तोच मनुष्यांचा सौरवर्षारंभ आहे. तेव्हां सौरवर्ष हें सांपातिक (सायन) च आहे, नाक्षत्रसौर नाहीं हें निर्विवाद आहे.

सूर्यसिद्धांतांत नऊ प्रकारचीं मानें सांगितलीं आहेत. तीं अशीं:—

ब्राह्मं दिव्यं तथा पित्र्यं प्राजापत्यं गुरोस्तथा ॥
सौरंच सावनं चान्द्रमार्क्षं मानानिवै नव ॥

यांत नाक्षत्रसौर वर्ष नाहीं. तुसतें सौर मात्र आहे व तें सांपातिक सौर होय हें रा. पेंडसे यांनीं सविस्तर दाखविलें आहेच. नाक्षत्रसौरवर्ष ही केवळ सूर्यसिद्धान्तानंतरची नवीनच कल्पना आहे. तात्पर्य, सूर्यसिद्धांताचें वर्षमान (सांपातिक) सौर आहे. हें वर्षमान मुंबईच्या सभेनें कायम ठेवावें असें ठरविलें होतें. आमचें म्हणणें त्यांत बदल करणें तर सांपातिक धरून फेरफार केला पाहिजे. नाक्षत्रिक धरून करणें शास्त्रबाह्य आहे.

यावर मूळ सूचना आणणारे श्री. पटवर्धन यांचें भाषण झालें. तें संपल्याबरोबर रा. नवाथे यांनीं उभे राहून सांगितलें कीं श्री. पटवर्धन यांनीं केलेल्या भाषणांत सायनमताविरुद्ध कांहीं भाग आलेला माझ्या तरी लक्षांत आलेला नाहीं. यावर अध्यक्षांनीं पटवर्धनांचे म्हणण्याची फोड करण्याचे निमित्तानें स्वतःच भाषण करण्यास सुरवात केली. लवकरच त्यांचे भाषणांत असें विधान आलें की " सिद्धांत ग्रंथांत अयनगतीचा उल्लेख आहे. " त्यावर रा. पेंडसे यांनीं लागलीच सांगितलें कीं " **प्राचीन** ज्योतिषसिद्धान्तग्रंथांत अयनगतीचा उल्लेख नाहीं. " यावर अध्यक्ष म्हणाले " **प्राचीन** सिद्धांताविषयीं तुम्ही म्हणतां तें बरोबर आहे. पण निदान अलीकडील एक हजार वर्षांत तरी सांपातिक वर्षमान प्रचारांत नव्हतें इतकें तर खरें ? " यावर रा. पेंडसे व रा. नवाथे यांनीं उत्तर दिलें " हें आपलें म्हणणें अगदीं बरोबर आहे व

इतक्याच करितां सांपातिक वर्षमान व्यावयाचें नसेल तर या गोष्टीला हरकत करण्याचें आम्हाला कारणच नाहीं. आमचें म्हणणें शा. श. ४४४ पर्यंत सांपातिक ऊर्फ सायन वर्ष चालू होतें इतकेंच आहे. इतकें झाल्यावर अध्यक्षांनीं मतें घेण्यापलीकडे या बाबतींत कांहींही केलें नाहीं. ह्या एकंदर प्रकारावरून एवढें सिद्ध झालें कीं शा. श. ४४४ च्या पूर्वी केव्हांही सध्यांच्या पंचांगांतील निरयण वर्ष प्रचारांत नव्हतें ह्याविषयीं आतां सर्वांची खात्री होऊन चुकली आहे.

ह्यानंतर सायनपक्षाकडून आपण होऊन सायनपंचांगासंबंधानें कांहींच हालचाल करण्यांत आली नाहीं. मात्र निरयणपक्षांतल्या निरनिराळ्या अयनांशांचें भांडण तोडींत असतां कोणत्याच पक्षाचें बहुमत होत नाहीं असें दिसूं लागे त्या त्या वेळीं अध्यक्षांच्या तोंडून " नाहींतर सायनच घ्या म्हणजे कांहींच मानगड नको " अशा अर्थाचे उद्गार निघालेले क्वचित् प्रसंगीं ऐकावयास सांपडत होते.

संमेलनांत निकराचे युद्ध चाललें होतें तें अयनांशांसंबंधाचें होय. परंतु चमत्कार हा कीं ' माझ्या मताच्या अयनांशांना अमुक वेदाचा किंवा अमुक स्मृतीचा किंवा महाभारताचा अगर एखाद्या पुराणाचा आधार आहे " असें मात्र कोणी म्हणेना. म्हणणार कसे ? आडांत असेल तर पोहऱ्यांत येईल. असल्या धर्मसंबंधानें प्रमाणभूत मानलेल्या ह्या ग्रंथांचे कालीं वसंतसंपात हाच राशिचक्राचा किंवा नक्षत्रचक्राचा आरंभ मानींत असल्याकारणानें त्या ग्रंथांतून स्थिर आरंभस्थान व अयनांश ह्या कल्पनांना आधार मिळणार कसा ? अशा रीतीनें त्या बाबतींत प्रमाणभूत ग्रंथांतला योग्य आधार मिळणें अशक्य असल्याकारणानेंच निरयण पंचांगाचे प्रकारांची संख्या सध्यां तरी वाढत मात्र आहे. ही संख्या वाढण्याचें कारण आरंभस्थानाचा अनिश्चितपणा. वसंतसंपात हेंच श्रुति—स्मृति—पुराण—संमत आरंभस्थान होय. परंतु तें तर निरयण पक्षाला दोन डोळ्यांसमोर नको. मग खरा वारस बाजूला राहिल्यावर त्याचे जागीं अनेक तोतयांना गर्दी करण्यास संधि मिळावी हें अगदीं स्वाभाविक आहे.

रासनांव.

(ले. जयवंतराव मंत्री जहागीरदार मु. करंदी)

समंजसवर्गाचे लोकसमूहाकडे लक्ष दिलें तर असें दिसून येत कीं; हे लोक ज्योतिषाकडून मूल जन्मल्यानंतर लागलीच किंवा पुढें केव्हां तरी जन्मपत्रिका करून घेतात. या पत्रिकेंत (अवकहडा चक्रामध्यें नक्षत्राचे चरणास " चुचेचोला " इत्यादि नांवें दिलीं आहेत त्यांपैकीं ज्या चरणावर मुलाचा जन्म असेल त्यास जें नांव असेल तें) नांव नमूद करण्यांत येतें. हें नांव मूळ पाया असून ज्योतिषाची सर्व इमारत यावर बांधली जाते. यास रासनांव असें म्हणतात. या नांवाचें ज्योतिषशास्त्रांत फार महत्त्व आहे. एखाद्यास साडेसाती आहे अगर नाहीं हें या नांवावरून समजतें. गोचरीचे ग्रहांचीं फलें यावरून पाहतात. हें नांव निरंतर ध्यानांत रहावें म्हणून ब्राह्मण वर्गांत दररोज त्रिकाळ संध्येच्या समयीं याचा उच्चार होत असतो. आमच्या ऋषींनीं तशी योजना करून ठेविली आहे. साधारण अशिक्षित असे कुणबी, माळी, सुतार, लोहार, वगैरे लोक सुद्धां ग्रामजोशाकडे जाऊन रासनांव विचारतात.

व्यावहारिक नांव वेगळें व रासनांव वेगळें. व्यावहारिक नांवाचा ज्योतिषशास्त्रांत फारसा उपयोग होत नाहीं म्हटलें तरी चालेल. ज्यास रासनांव ठाऊक नाहीं त्याचें चालतें नांव (व्यावहारिक) फुलाचें किंवा फळाचें नांव घेण्यास सांगून फलें पहाण्याचा मार्ग दिसून येतो. कित्येक ज्योतिषी धान्याचे २७ ढीग (राशी) करितात हे २७ ढीग २७ नक्षत्रांचे असल्यामुळें त्यांपैकीं कोणतेही एकास हात लावावयास सांगतात. ज्यास हात लावला तें जन्मनक्षत्र समजून चरणासाठीं त्या ढिगाचे पुन्हा चार भाग करितात. ही पद्धत अशिक्षित वर्गामध्यें लग्न जुळवितांना दृष्टोत्पत्तीस येते. फल कितपत जुळतें ईश्वरास ठाऊक ? या रासनांवाचे मूळाक्षरांचा (अवकहडा चक्रां-) तील) कर्ता कोण ? सर्व ज्योतिषास मान्य होऊन फलेंही बरोबर पटतील.

अशी रचना करणाऱ्याचा जन्म कोणते मातेचे उदरीं झाला ? ज्यांनीं जातकावर ग्रंथ लिहून ठेविले त्या गर्ग, पाराशर, भृगु इत्यादिकांपेक्षां याची योग्यता जास्त ठरत नाहीं काय ?

" पीछेस भाई आगे चली " असें म्हणण्याचे दिवस निघून गेले. ज्याजवळ विद्या होती त्यांनीं प्राप्ति कमी होईल या भावनेनें दुसऱ्यास सांगितली नाहीं. (अझून ही तऱ्हा आहेच) ती त्याचेबरोबर लयास जाऊन या देशास अवकळा प्राप्त झाली. याबद्दल प्रत्येकास खेद वाटत असून " बैल गेला आणि झापा केला " या म्हणीप्रमाणें जो तो प्रत्येक विषयांत गर्क झाला आहे. ज्यास ज्योतिष शिकावयाचें असेल त्यास " चुचेचोलाश्विनी प्रोक्ता लीलूलेलो भरण्यथ " अशी घोकंपट्टी करावयास त्याचा गुरु सांगेल; पण ही रचना कशी केली असा शिष्यानें प्रश्न केला तर समाधानकारक उत्तर कचितच मिळेल. २७ नक्षत्रांच्या बारा राशी होऊन एक एक राशीचे वाट्यास सव्वादोन नक्षत्रें येतात. नक्षत्राची अपूर्णांकांत हिस्सेवारी झाली, म्हणून चरणाची कल्पना निघाली. ही गोष्ट संभवनीय दिसत आहे. नांवाचें अनुमान कसें करावयाचें ?

असो. जितकें कांहीं आपणांस ठावें । तितकें हळु हळु शिकवावें । शहाणें करूनि सोडावें । सकल जनां ॥

या—समर्थ रामदास स्वामीचे उपदेशाप्रमाणें विद्वान ज्योतिषी याचा उलगडा करतील काय ?

* * *

या गोष्टीसंबंधानें विचार करीत असतां आम्हांस भेटण्यास परगांवाहून आमचे एक मित्र आले होते. त्या वेळीं त्यांचे बरोबर ज्योतिषशास्त्रासंबंधी कांहीं गोष्टींची चर्चा चालू असतां सहज ह्या **अवकहडा** चक्राचा व घातमासादिकांचा उल्लेख झाला. त्यांचा घातमासादिकासंबंधीं अनुभव विचार करण्यासारखा आहे. ते म्हणतात " या घातमासादिक गोष्टी मी शेकडो

वेळां पाहिल्या असून त्याचा अनुभव चांगला येतो. ज्या ज्या वेळीं मजला प्रश्न विचारण्यास किंवा इतर शुभाशुभ विचारण्यास मंडळी येतात त्या त्या वेळीं मी त्यांना त्यांच्या चालू नांवावरून राशि ठरवून नंतर वातमासादिक गोष्टींचा विचार करितों व शुभाशुभ फळें सांगतों." ज्यांचे जवळ जन्मकाल नाहीं अशा लोकांना त्यांच्या आयुष्यामध्यें कशा घडामोडी होतील, काय काय अनुभव येईल व चालू काळ कसा आहे इत्यादि गोष्टींचा विचार करते वेळीं ज्योतिषी लोकांची किती त्रेधा उडते याचा अनुभव थोड्याबहुत प्रमाणानें प्रत्येकास आहेच. अशा वेळीं अशाच कांहीं मार्गाचा उपयोग करणेंच भाग पडतें. अमुक नक्षत्रास अमुक अक्षरें कां दिलीं आहेत याचा आज कांहींच खुलासा मिळत नाहीं, परंतु याचा उल्लेख कोठें तरी मंत्रशास्त्राच्या किंवा तंत्रावरील ग्रंथामध्यें लागणें शक्य आहे. व तेथूनच या गोष्टीचा उगम झाला असला पाहिजे.

हिब्रु व अरेबिक लिपींमध्यें जीं अठ्ठावीस अक्षरें आहेत तीं अठ्ठावीस नक्षत्रपुंजांवरून सुचलीं आहेत असें म्हणतात. व यासंबंधांत अरबांनीं उत्तम ज्ञान करून घेऊन ग्रंथरचना केली आहे. त्यांनीं **जफर** नांवाचें शास्त्र विशिष्ट अक्षरांची किंमत अमुक एक असें ठरवून त्यावरून सर्वप्रकारचा फलादेश पाहण्याचें शास्त्र फारच पूर्णतेस नेलें आहे. हिब्रु लोकांनींही अरबांप्रमाणेंच **कबाला** नांवाचें शास्त्र निर्माण केलें आहे. व याच दोन देशांमधील शास्त्राचे साह्यानें हल्लीं इंग्रजीमध्यें **कबालिस्टीक अस्ट्रालाजी** नांवाचा एक भाग पाहण्यास मिळत आहे. या शास्त्राच्या साह्यानें जन्मलेल्या प्राण्यास जें नांव दिलेलें असतें किंवा तो ज्या नांवानें जगांत ओळखला जातो त्यावरून त्याचा स्वभाव, शील, आयुष्यामधील चढ्याउतरत्या गोष्टी यांचा विचार करितां येतो. अशाच प्रकारचा कांहीं विचार आमचेकडे केरळ ग्रंथामध्यें सांगितला असल्याचें कळतें. परंतु त्यासंबंधानें अद्यापि विशेष असा खुलासा कोठेंच झालेला आढळत नाहीं. या संबंधीं जितके अप्रकाशित ग्रंथ उजेडामध्यें येतील तेवढे येणें आज इष्ट आहे. या गोष्टीकडे कोणी लक्ष देईल काय ?

—संपादक—

" आक्षेपकांचीं तोंडें बंद झालीं नाहींत. "

(लेखक—पांडुरंग रामचंद्र महाजन)

फलज्योतिषाची सुधारणा करणेकरतां कै. जीवनराव चिटणीस, रा. रा. विष्णुपंत नवाथे, कै. घोलप, पुण्याचे रा. रघुनाथ शास्त्री, मुंबईचे रा. श्रीधरपंत भिडे वगैरे ज्योतिष्यांनीं मासिकपुस्तकद्वारा व इतर रीतीनें बरेच प्रयत्न केले व अद्यापही करीत आहेत. तरीपण फलज्योतिषावरील आक्षेपकांचीं तोंडें बंद पडलीं नाहींत. हे लोक ज्योतिषीवर्गाची व फलज्योतिषाची थट्टा घरीं बसूनच करतात असें नाहीं तर जाहीर व्याख्यानांत व मासिक पुस्तकांतही थट्टा करतात.

कै. विष्णुशास्त्री चिपळूणकरांनीं आपल्या निबंधमालेंत आकाशांतील ग्रहांचा व मनुष्यांचा संबंध नाहीं, त्यांचा परिणाम मनुष्यांवर होणे शक्य नाहीं असें लिहिलें आहे. कांहीं वर्षांपूर्वी पुण्याचे वसंतव्याख्यानमालेंत रा. केसकर यांचें फलज्योतिषावर व्याख्यान झालें त्या वेळीं रा. म. गो. अभ्यंकर यांनीं कांहीं उदाहरणें देऊन फलज्योतिषाची थट्टा केली व ज्योतिषी लोकांना कुडबुडे व पोटभरू अशी पदवी दिली. त्याच वेळीं आमची एका सभ्यगृहस्थानें त्याला अनुमोदन दिलें व कै. विनायक कोंडदेव ओक यांनीं त्याचा अनुवाद आपले बालबोध मासिकांत केला. वा फलज्योतिषावरील आक्षेपकांचे तीन वर्ग आहेत. १ पहिल्या वर्गांतील लोकांचें असें म्हणणें आहे कीं मनुष्यवस्तीपासून आकाशांतील ग्रह फार दूर असल्यामुळें त्यांचा मनुष्यांवर परिणाम होणें शक्य नाहीं. मग त्यांपासून शुभाशुभ फळें कसलीं पाहतां व तीं अनुभवाला येणार तरी कशीं ? दुसऱ्या वर्गांतील लोक असें म्हणतात कीं फलज्योतिषावरून कांहीं किरकोळ गोष्टी सांगतां येत असल्या तरी त्या बिनचूक सांगतां येत नाहींत. त्यांच्या बेळा जमत नाहींत इत्यादि कारणांमुळें

फलज्योतिष हें शास्त्र या सदरांत पूर्वी कधीं आलें नव्हतें व पुढेंही येणें शक्य नाहीं. तिसरे वर्गांतील लोक असें बोलतात कीं फलज्योतिषावरून कित्येक गोष्टी बरोबर सांगतां येत असल्या तरी सर्व माहिती बरोबर सांगतां येत नाहीं. शिवाय जन्मवेळा बरोबर नसतात. शेंकडा७५ लोकांच्या जन्मवेळा बरोबर नसतात. शेंकडा ७५ लोकांच्या जन्मवेळा टिपलेल्या नसतात यामुळें फलज्योषिष हें सर्व साधारण समाजाचे उपयोगी नाहीं अर्थात तें व्यवहारोपयोगी नाहीं. हे आक्षेप अगदींच खोटे आहेत काय ? अशा प्रकारच्या आक्षेपक लोकांचीं तोंडें बंद करणें हें ज्योतिषी लोकांचें कर्तव्य नाहीं काय ? या लोकांचीं तोंडें बंद करणेस माझे मतें दोन उपाय आहेत. पहिला फलज्योतिषावरून व हवामानावरून पावसाचें भविष्य बिनचूक सांगतां येण्याचा प्रयत्न करणें. उपाय दुसरा कुंडलींतील ग्रहांवरून उत्पन्न झालेला रोग नक्की अमुक दिवशीं बरा होईल असें सांगतां आलें पाहिजे. रोग बरा होणें शक्य नसून त्या रोगानें मृत्यु येणार असेल तर तो कधीं हेंही सांगतां आलें पाहिजे. या दोन गोष्टींची सुशिक्षित अशिक्षित, सुधारक उद्धारक, ब्राह्मण ब्राह्मणेतर या सर्वांना जरूर आहे. शेतीवर अवलंबून असलेले हिंदुस्थान देशाला पावसाचे बिनचूक भविष्याची तर फार जरुरी आहे. या दोन बाबतींत कित्येक ज्योतिष्यांनीं व इतर लोकांनीं प्रयत्न केले आहेत. परंतु ते व्यक्तिशः प्रयत्न त्यांच्या मृत्यूनंतर नामशेष झाले. कित्येक ज्योतिष्यांस आपले अनुभव प्रसिद्ध केले तर आपलें सांपत्तिक नुकसान होईल, आपली मान्यता कमी होईल असें वाटतें यामुळें ते आपले अनुभव गुप्त ठेवण्याची खबरदारी घेतात. परंतु अनुभव प्रसिद्ध केल्यानें सांपत्तिक नुकसान होईल, मान्यता कमी होईल, असें मनांत येणें म्हणजे फलज्योतिषांचे बाबतींत अज्ञान व्यक्त करणें होय. कारण आपल्या नशीबांत जें लिहिलें तें हिरावून कोण नेणार ? व प्रारब्धकर्म बलवान् ही साधूक्ती खोटी कशी होणार. तरी या गोष्टीचा विद्वान ज्योतिष्यांनीं विचार करून पावसाचे व रोगाचे बाबतींतील आपले अनुभव प्रसिद्ध करावे व

फलज्योतिषाचे इतर अनुभवही प्रसिद्ध करावे म्हणजे फलज्योतिषाची खरी सुधारणा होईल. व आक्षेपक लोकांचीं तोंडें आपोआप बंद होतील. व पुढील पिढीला त्याचा चांगला उपयोग होईल. अशा रीतीनें नुसती सूचनाच न करतां माझे अनुभव प्रसिद्ध करणेस मी आरंभ करतों. व पुढें प्रत्येक अंकांत एकेक अनुभव प्रसिद्ध करण्याचें आश्वासन देऊन हा लेख पुरा करतों.

अनुभव नं. १ विषमज्वर, न्युमोनिया, टायफाईड, भीतिप्रद मलेरिया, अमांष, अतिसार (डायरिया) हे रोग जेव्हां होतात तेव्हां जन्मलग्नाचा स्वामी अस्तंगत, वक्री किंवा कोणत्याही राशीच्या शेवटचे नवांशांत असतो. मरणसमयीं पण याच स्थितींत जन्मलग्नाचा स्वामी असतो. हें निरयण पद्धतीनेंच जुळतें. सायन पद्धतीनें जुळत नाहीं.

२ जन्मलग्नेश मार्गी होतो, उदित होतो किंवा दुसरे राशींत जातो त्याच दिवसापासून रोगनिवृत्तीस आरंभ होतो.

३ जन्मसमयीं लग्नेश वक्री असून पापदूषित असतां आयुष्यांत अपघाताचे प्रसंग बरेच येतात.

४ २ । ६ । ८ । १२ यांपैकीं एका स्थानांत हर्शल असून समोर रविशनि असतां त्या मनुष्यास मोतिबिंदु होतो. वरील नियम निरयण पद्धतीनेंच बरोबर जुळतात.

५ हर्शलशनींची युती अगर प्रतियुती ज्या वर्षी होते त्या वर्षी दुष्काळ पडतो. प्रतियुतीचे वर्षीचा दुष्काळ फारच भयंकर असतो. व त्या वर्षी कॉलरा इन्फ्लुएंझा वगैरे साथी उत्पन्न होऊन भयंकर मनुष्यनाश होतो. १८७६-७७ व १९१८-१९ या वर्षांत हर्शलशनींची प्रतियुती होती.

६ निरयण पद्धतीनें हर्शल ज्या दिशेस असतो त्याच दिशेस दुष्काळाचा प्रभाव जास्त जाणवतो. मेष, सिंह धनेंत असतां पूर्व; वृषभ, कन्या मकरेंत असतां दक्षिण; मिथुन, तूळ कुंभेंत असतां पश्चिम; कर्क, वृश्चिक मीनेंत असतां

उत्तर; दिशा जाणाव्या हें ज्योतिष वाचकांस माहीत आहेच. १८७१ मध्यें हर्शल सिंहेंत होता, १९१८ मध्यें कुंभेंत होता, यामुळें १८७६ चा दुष्काळ बंगालमध्यें विशेष जाणवला व त्या साली कालेऱ्यानें बेसुमार मनुष्यहानी झाली. १९१८ चा दुष्काळ पश्चिमेस जास्त जाणवला व इन्फ्लुएंझा, कॉलरा यांनी मनुष्यनाश झाला.

* * *

ज्योतिर्विद् पांडुरंग रामचंद्र महाजन हल्लीं मुकाम हर्णै यांनीं उदार मनानें आपले स्वताचे अनुभव ज्योतिर्मालेंत प्रसिद्ध करण्याचें अभिवचन दिलें असुन त्याप्रमाणें पहिला हप्ता आम्हीं आज रोजीं मोठ्या आनंदानें वाचकांस सादर करीत आहोंत. ज्योतिर्विद् पांडुरंग शास्त्री यांचें अनुकरण सर्व ज्योतिर्विदानीं करण्यासारखें आहे. विद्या प्रगट केल्यानें तिची किंमत कमी न होतां अधिकच होत असते. सर्वच गोष्टी गुप्त ठेवण्याच्या आत्मघातकी घातुक सवयीनें आम्हीं स्वतःचें व भावी पिढीचे अनेक प्रकारें नुकसान करीत आहोंत. व त्यामुळें शास्त्राच्या प्रगतीच्या कामास विरोध करणारीं अनेक प्रकारचीं कुंपणें निर्माण केलीं आहेत व करूं इच्छित आहोंत. या गोष्टीकडे ज्योतिर्विद लक्ष देऊन आपली गुप्त राखण्याची परंपरा सोडतील काय ?

सायन खरें किंवा निरयण खरें या वादांत आम्हीं च न पडतां आम्हीं राजेश्री पांडुरंग रामचंद्र महाजन यांचेकडून जशी माहिती आली आहे तशीच प्रसिद्ध करीत आहोंत. रा. महाजन यांचा लेख संपूर्ण झाला म्हणजे आम्हांस काय विचार प्रसिद्ध करावयाचे आहेत ते मुद्देसूद रीतीनें वाचकांपुढें मांडूंच. आमचे प्रमाणेंच ज्या कोणा ज्योतिर्मालेच्या वाचकांस या नियमासंबंधानें कांहीं लिहावयाचें असेल तें त्यांनीं आमचेकडे पाठविलें असतां आम्हीं तें मोठ्या आनंदानें मालेंत प्रसिद्ध करूं. ज्योतिशशास्त्राचा चर्चात्मक विचार करण्याकरितांच माला अवतीर्ण झाली आहे.

संपादक—

परा ज्योतिर्विद्या किंवा आंतर्ज्योतिषज्ञान.

(लेखक—द्वारकानाथ नारायण राजे)

लेख १ ला

ज्योतिषशास्त्र मनुष्यास दैववादी बनवितें असा पुष्कळ लोकांचा समज आहे. व त्या शास्त्रापासुन मनुष्याच्या उत्कर्षास मदत न होतां, दैवाधीन सर्व गोष्टी आहेत असा समज करून पुष्कळ मनुष्यें प्रयत्न न करितां, निवळ नशीबावर हवाला ठेऊन स्वस्थ बसतात. खरेर विचार केला तर, हा ज्योतिषशास्त्रावरील आरोप खरा दिसेल. भावी संकटास अथवा विपत्तीस आपणांस टाळतां आलें नाहीं तर तीं संकटें आगाऊ समजण्यांत कांहीं अर्थ नाहीं. परंतु ज्योतिषशास्त्राचा खोल दृष्टीनें विचार केला असतां, ज्योतिषशास्त्र हें मनुष्यास दैववादी कधींही बनविणार नाहीं. प्रत्येक मनुष्य आपलें नशीब स्वतांच बनवीत असतो, आपलीं संकटें अथवा विपत्ति हीं आपल्या अज्ञानाची अथवा कर्मांचीं फलें आहेत. ज्योतिषशास्त्राची आपणांस जितकी जास्त माहिती असेल, त्या मानानें भावी संकटांस तोंड देण्यास आपण अधिक समर्थ होऊं. कारण पुष्कळ अशीं संकटें हीं आपल्या प्रयत्नानें व निश्चयानें टाळतां येतात. संकटसमयीं कोणत्या रीतीनें वागलें असतां तीं आपल्या प्रगतीच्या आड न येतां उन्नतावस्था प्राप्त करून घेण्याकरितां मदत करणारीं कशीं होऊं शकतील यांचेंच विवेचन खालील निबंधांत करण्याचें योजिलें आहे.

कोणतेंही शास्त्र घ्या, किंवा कोणतीही विद्या घ्या, तिचे व्याप्रमाणें अपराविद्या किंवा पराविद्या, बहिर्विद्या किंवा आंतर्विद्या, बहिर्ज्ञान किंवा आंतर्ज्ञान, या प्रमाणें दोन मोठाले विभाग होतात त्याचप्रमाणें ज्योतिषशास्त्राचे किंवा ज्योतिर्विद्येचे किंवा ज्योतिषज्ञानाचे दोन मुख्य विभाग होतात. **अपराज्योतिर्विद्या** किंवा बाह्यज्योतिषज्ञान (xoteric Astrology) कदाचित् मनुष्यास दैववादी बनवील परंतु **पराज्योतिर्विद्या** (Esoteric Astrology) किंवा आंतर्ज्योतिषज्ञान हें त्या शास्त्राची गूढ प्रमेयें आपणांस दाखवील व तें मनुष्यास प्रयत्नवादीच बनवील.

आर्य लोकांस या दोन विभागांची चांगलीच ओळख होती व त्यांनीं दोन्ही शाखांवर निरनिराळी ग्रंथरचना केलेली आढळते. काळाच्या तडाख्यापुढें जरी आज स्वतंत्र ग्रंथ असे उपलब्ध नाहींत तरी चाणाक्ष वाचकांस या दोन विभागांवर ग्रंथ असल्याचा सहज सुगावा लागतो. आर्य ऋषिवर्यांनीं प्राग्कर्मावर बराच जोर दिलेला आहे. जन्मलेल्या प्राण्यास त्याच्या प्राग्कर्मा-प्रमाणें सुखदुःखें प्राप्त होतात. गहूं पेरले असतां गहूंच मिळतात, हरभरे किंवा उडीद मिळत नाहींत. या तत्त्वावर त्यांनीं फारच जोर दिलेला आहे. व हें तत्त्व सर्व जगांतील शहाण्या माणसांस मान्य होण्यासारखें आहे. अमुक एक ग्रहस्थिति असतां अमुक एक प्रकारचें अनिष्ट फळ मिळेल असें सांगितल्यानंतर हें फल त्याच्या कोणत्या प्रागूकर्माप्रमाणें प्राप्त झालें आहे या-संबंधीं विचार सुरूं होऊन पुढें काय केलें असतां दोषांचा परिहार होईल याकडे त्यांचें लक्ष वेधलें जाणें शक्य आहे व त्याप्रमाणें तें जाऊन त्यासंबंधीं ऊहापोह होऊन शेवटीं ज्योतिषशास्त्रामधील कर्मकांड—जप, दानें, औषधीसेवन, निरनिराळ्या वस्त्रांचें किंवा रत्नांचें धारण या गोष्टी उत्पन्न झाल्या आहेत. कांहीं कालानें हें कर्मकांडाचें बंड इतर कांहीं धार्मिक बंडाप्रमाणें फारच फुगलें गेलें. व त्यामुळें तें सर्वत्र निंदेस व टीकेस पात्र झालें. आज जरी वरील सर्व प्रकार कांहींतरी थोतांड आहे अशा तऱ्हेची प्रवृत्ति सर्वत्र दिसत आहे तरी तें अगदीं टाकाऊ आहे, त्यांत कांहींच शास्त्रीय तत्त्व नाहीं असें म्हणतां येत नाहीं. आपण कसें वागावें, कोणतीं कृत्यें करावीं, आहारविहार कसा करावा, कोणत्या वस्तूचें धारण करावें, कोणत्या मंत्राचा जप केला असतां आपली आत्मिक उन्नती लवकर होऊन संकटपरंपरा नष्ट होईल ह्या गोष्टींचें ज्ञान ज्याप्रमाणें बाह्य ज्ञानानें कधींच प्राप्त होत नाहीं त्याच प्रमाणें वरील गोष्टींची कल्पना ज्योतिषशास्त्राच्या स्थूल बाह्य ज्ञानानें होईल असें वाटत नाहीं; यांस ज्योतिर्विद्येच्या आंतर्ज्ञानाची आवश्यकता आहे. व याच विषयासंबंधीं थोडीबहुत चर्चा ज्योतिर्मालेच्या अंकांत करण्याचें ठरविलें आहे. हा विषय अगदींच नवा असून यावर अद्याप कोठेंच चांगली सविस्तर चर्चा झालेली नसल्याकारणानें

आम्हीं आमच्या अल्पमतीप्रमाणें सुचलेले व इतर ठिकाणीं वाचलेले विचार मालेच्या वाचकवर्गापुढें ठेवीत आहोंत. इतर वाचकवर्गही आपापले विचार मालेच्या द्वारें प्रसिद्ध करतील अशी आशा आहे.

आपण विचार करण्यास घेतलेल्या विषयाची सुरवात प्रथमतः जन्मकालीं पूर्व क्षितिजावर उदित असलेल्या राशीचा व त्या राशीच्या स्वामीचा मनुष्यावर व राष्ट्रावर कसकसा परिणाम होतो यापासून करूं.

राशिचक्र हें जणू काय आपल्या पृथ्वीचा कमरपट्टा आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. पृथ्वी आपल्या आसाभोंवतीं २४ तासांमध्यें एक प्रदक्षिणा पुरी करते व म्हणूनच तितक्याच कालांत सर्व राशिचक्र आपल्या पृथ्वीसमोरील कोणत्याही एका विवक्षित बिंदूपुढून गेलें पाहिजे व त्याप्रमाणें तें जातें.

आपल्या शरीराभोंवतीं वातावरण आहे व त्याच प्रमाणें एक प्रकारचें तेजोवलय (Aura) आहे. ग्रहांचा परिणाम अथवा चांगले वाईट किरण राशिचक्रांतून मनुष्याभोंवतीं असलेल्या तेजोवलयामधून त्याच्या दृश्य शरीरावर होत असतो. ग्रह याच तेजोवलयांतून मनुष्याच्या शरीरावर परिणाम करितात व म्हणूनच अमुक राशींतून अमुक एका ग्रहाचे आलेले किरण कोणकोणते परिणाम करील हेंच समजणें जास्त महत्त्वाचें आहे. पृथ्वीसभोंवतीं सूर्याच्या फिरण्याच्या गमनपंथाचे १२ भाग करितात व त्यांस राशी असें म्हणतात. व म्हणूनच या प्रत्येक भागाच्या किंवा राशीच्या गुणधर्माचें संपूर्ण ज्ञान होणें अत्यंत जरूरीचें आहे. आपला स्थूल देह हीच पृथ्वी आहे अशी कल्पना करण्यास मुळींच हरकत नसून आपल्या इच्छा, मनोविकार व स्वभाव हेंच आपल्या भोंवतीं असलेलें तेजोवलय किंवा राशिचक्र होय.

सूर्य व इतर ग्रह आपल्या शरीराचा आध्यात्मिक भाग आहे असें मानलें असतां आपल्या इच्छा, मनोविकार किंवा स्वभाव हा जन्मकालीं पूर्वक्षितिजावर जी राशि उदय पावत असेल तीवर अवलंबून आहे. आपल्या इच्छेचा अथवा मनोविकाराचा उद्भव होणें, विकास होणें अथवा नाहींसा होणें इत्यादि गोष्टी जन्मकालीन उदित असलेल्या राशीच्या स्थितीवर अवलंबून आहेत.

राशिचक्रांतील प्रत्येक राशीचा शरीराच्या वेगवेगळ्या भागावर अंमल असल्याचें आढळतें. **मेष** मेंदु व डोकें; **वृषभ** मान व कंठ; **मिथुन** फुप्फुसें; **कर्क**–पोट; **सिंह**–हृदय; **कन्या**–पोटाखालील भाग, आंतडीं; **तुला**–मूत्रपिंड; **वृश्चिक**–जननेंद्रिय; **धनु**–मांडया. **मकर**–गुदघे; **कुंभ**–पोटऱ्या, घोटे; **मीन**–तळपाय, पावलें. शरीराच्या प्रत्येक निरनिराळ्या भागावर निरनिराळ्या राशीचा अंमल असल्याचें येथें सांगण्याचें कारण इतकेंच कीं ज्या वेळीं अपघात किंवा रोग होतो त्या वेळीं बहुशा जन्मकाळीं ज्या राशीमध्यें पापग्रह असतात किंवा रवि, चंद्र पीडित असतात त्याच राशीनें दर्शित शरीराचे भागाचें चैतन्य मूळचेंच विकृत असल्याकारणानें त्याच भागास अपघात-कालीं किंवा रोगोत्पत्तीच्या कालीं पीडा होते. शरीराच्या प्रत्येक अवयवामध्यें चैतन्य कशा तऱ्हेनें जागृत आहे याची कल्पना जन्मकुंडलीवरून करितां येते. व त्याचमुळें शरीरांतील विवक्षित अवयव दुर्बल आहे असें दिसून आल्यावर त्या अवयवासंबंधी विशेष काळजी घेऊन तो तो शरीराचा अवयव मजबूत व निरोगी करण्याकडे लक्ष देणें हें आपलें कर्तव्य नाहीं काय ?

समुच्चयवाचक रीतीनें म्हटलें असतां सर्व राशिचक्रावर चंद्राचीच सत्ता आहे असें म्हटलें असतां चालेल. व म्हणूनच जर आपणास सर्व राशींचे एकवटलेले गुणधर्म पाहणें असेल तर जन्मकुंडलींतील चंद्राकडे अवश्य लक्ष्य दिलें पाहिजे.

राशिचक्रांतील प्रत्येक राशि ही एकप्रकारचा धर्म उत्पन्न करिते. एकादें मूल द्वादश राशींपैकीं ज्या एखाद्या विवक्षित राशीवर जन्मास आलें तर जगामध्यें ज्या प्रकारचें यश, लौकिक व संपत्ति मिळवील, त्याच प्रकारचें फल द्वादश राशींपैकीं दुसऱ्या एकाद्या राशीवर जन्मास आलेल्या मुलास मिळणार नाहीं व मिळतही नाहीं. जन्मलग्नीं उदित असलेल्या राशीचीं चांगलीं वाईट फलें जेव्हां जेव्हां त्या राशींतून शुभाशुभ ग्रह जातात त्या त्या वेळीं मिळतात.

मेषराशीचा अंमल डोक्यावर असल्याचें पूर्वी सांगितलें आहे. त्याखेरीज बुद्धि व मेंदूवरही मेषेचीच सत्ता आहे. कोणतीही राशि शुभ नाहीं व

अशुभही नाहीं. प्रत्येक राशीमध्यें चांगले व वाईट दोन्ही धर्म उत्पन्न करण्याचें सामर्थ्य असतें. मेषराशीचे वाईट गुण लबाडी, प्रतारणा, व्यर्थ वंचना करणें इत्यादि आहेत व चांगले गुणधर्म कुशाग्रबुद्धिदर्शीपणा किंवा धोरण, विवेक, तात्कालिक ज्ञान, प्रसंगावधान इत्यादि आहेत.

मेष लग्नावर किंवा राशीवर जन्मास आलेला परंतु ज्याचे अंगीं मेष राशीचे पूर्ण सद्गुण नाहींत असा मनुष्य व्यर्थ बडबड करणारा व उतावळा, प्रत्येक कामांत पुढाकार घेण्याची आवड, स्वातंत्र्यप्रिय असा असेल. विशेषतः मेषलग्नावर जन्मणारीं माणसें पुढारी होऊं इच्छितात व त्यांची सर्व मदार बुद्धीवर असते. राशिचक्राचे मुख्य दोन भाग करितां येतात, एक पाझीटिव्ह म्हणजे धन विद्युत्दर्शक राशि व दुसरा निगेटिव्ह म्हणजे ऋण विद्युत्दर्शक राशि. धन-विद्युत्दर्शक राशि चैतन्य व ऋण विद्युत्दर्शक राशि आकार देतात; शक्ति व चैतन्य पाझिटिव्ह राशीपासून मिळते व तें कायम ठेवण्याचें काम निगेटिव्ह राशी करितात. मेष ही पाझिटिव्ह राशि आहे, वृषभ ही निगेटिव्ह राशि आहे. मेषराशीचे सर्व गुणधर्म या राशींत गुप्तपणें वास करितात. मेषलग्नाचे मनुष्याला त्याचे उतावळेपणानें जी गोष्ट साध्य होणार नाहीं ती वृषभ राशीचा मनुष्य विस्मेपणानें मिळवील. वृषभ राशीचा मनुष्य निश्चयी, गंभीर व सोशीक असतो. याचे उलट मेषलग्नाचा मनुष्य गडबडया व उतावळा आढळतो. तर दोन्ही राशी परस्पर विरुद्ध आहेत. मेषराशी जनक आहे, तर वृषभ राशी जननी आहे. मिथुन राशी ही दोन्ही राशींचे संयोगानें झालेलें अपत्य होय, दोन्ही राशींमध्यें असलेले गुण तिसरीमध्यें एकवटून उतरलेले आहेत. जे गुणधर्म पहिल्या दोन राशींत गुप्तपणें वास करितात तेच मिथुनमध्यें प्रगट होतात. वृषभ राशि धिम्मे परंतु पद्धतशीर परंतु रेंगाळत काम करणारे लोक दर्शविते. मिथुन राशीचे मनुष्यांचे प्रत्येक कृत्यांत हेतु व बुद्धिमत्ता स्पष्ट दिसते. मेष राशीचीं माणसें कल्पना व विचार करितील परंतु कल्पनेचा उपयोग करणें अथवा विचारास मूर्त स्वरूप देणें हें मेष राशीचे माणसाकडून होणार नाहीं. तें वृषभ राशि करील.

वृषभ राशींत सद्गुण आज्ञाधारकपणा, दुर्गुण हट्टवादीपणा. जगामध्यें अतिशय दुराग्रही, हट्टवादी व स्वमताभिमानी लोक वृषभ लग्नावर अथवा वृषभ राशीचे चंद्रावर जन्मतात व या लोकांचीं मनें कशानेंही वळत नाहींत. वृषभराशीचा मुख्य सद्गुण आज्ञाधारकपणा आहे. व ज्या मानानें वृषभराशीचीं माणसें सुशिक्षित होतील त्या प्रमाणानें त्यांचीं मतें प्रगल्भ झालेलीं व दुसऱ्यांच्या मताविषयीं त्यांच्यांत जास्त आदर आलेला पाहण्यास मिळेल.

मिथुन राशीच्या माणसांना प्रत्येक कामांत खोल जाण्याची इच्छा असते, प्रत्येक कामाच्या परिणामाचा विचार केल्याखेरीज त्या कामांत हात घालावयाचा नाहीं अशी त्यांची इच्छा असते; त्यांच्यांत मुख्य गुण म्हटला म्हणजे प्रेम होय. मिथुन राशीचे लोक प्रेमानें अथवा मायेनें लवकर वळतात व या राशीचा अम्मल फुफ्फुसावर आहे.

त्यानंतर चवथी राशि **कर्क** होय, तिचा धर्म पहिल्या तीन राशींहून अगदीं भिन्न आहे. कारण त्या राशीपासून दुसरें राशित्रय (Triplicity) सुरूं होतें. पहिल्या तीन राशि मेष, वृषभ व मिथुन ह्या (Tntellectual Trinity) बौद्धिक त्रयींपैकीं आहेत तर दुसऱ्या तीन कर्क, सिंह, कन्या अपत्य स्नेहत्रयींपैकीं (Maternal Trinity) आहेत व त्या जगांतील ऐहिक सुख दर्शवितात. कर्क राशि ही राशिचक्रांतील जलराशींपैकीं पहिली आहे. या राशीचे कांहीं धर्म मेष राशीसारखे आहेत; परंतु मेष राशीपेक्षां या राशींत आग्रहीपणा व चिकाटी जास्त आहे. या राशीचे सद्गुण म्हणजे नीतिमत्ता व सामर्थ्य होय. व या राशीचे दुर्गुण चैन व ऐषआराम होय. कर्कराशीचा दुसरा दुर्गुण म्हटला म्हणजे मनाचा अतिशय कोमलपणा होय. कर्कराशीचे मनुष्यास थोडा सुद्धां अपमान अथवा व्याजोक्तीचें भाषण सहन होत नाहीं व त्यामुळें थोडासा देखील अपमान त्यांच्या मनाला हुरहुर लावण्यास व मनोविकार तावडतोब क्षुब्ध करण्यास पुरेसा होतो. कर्कराशीचीं माणसें दुसऱ्यावर प्रेम अगर ममता लवकर करूं लागतात, त्यांना अधिकाराची लालसा असते व एकादें काम तडीस नेईपर्यंत ते त्याची चिकाटी सोडीत नाहींत.

राशिचक्रांतील राशी अनुक्रमें पाश्चीटिव्ह व निगेटिव्ह धन किंवा पुरुष व ऋण किंवा स्त्री अशा आहेत. सिंह राशि ही पाश्चीटिव्ह धन किंवा पुरुष राशि आहे व कर्क ही निगेटिव्ह किंवा ऋण व स्त्री राशि आहे. पहिलीचा अंमल हृदयावर आहे तर दुसरीचा पोटावर आहे. सर्व राशींत ह्या दोन राशी श्रेष्ठ आहेत. कारण एकीचा संबंध सूर्याशीं व दुसरीचा चंद्राशीं आहे. हृदयासंबंधीं सर्व स्थिति सिंह राशि दर्शविते व त्या राशीच्या माणसास निसर्गसौंदर्याची आवड असते. या राशीचे दुर्गुण मनाचा क्षोभ होणें किंवा अतिशय संताप येणें अथवा उद्वेग वाटणें होय. सिंहराशीचे मुख्य सद्गुण म्हणजे ऐक्य व प्रेम आहे.

कन्या ही निगेटिव्ह, ऋण किंवा स्त्री राशि आहे, तिचा मुख्य दुर्गुण म्हटला म्हणजे अतिशय आपमतलबीपणा हा आढळतो. जगांत अतिशय स्वार्थी व आपमतलबी माणसें ह्या राशींवर जन्मतात. आपमतलबाबरोबर या लोकांचे अंगीं चिकित्सा, बारकाई व उत्तम निरीक्षण शक्ति असे सद्गुण असतात. या गुणांमुळेंच त्यांचे अंगीं दोषान्वेषण करण्याची शक्ति चांगली असते. प्रत्येक गोष्टीचें पृथःकरण करून त्याचे तळाशीं जाण्याची त्यांची इच्छा असलेली पाहण्यास मिळते. त्यामुळें चांगला वाईट, सद्गुण दुर्गुण, सत्य असत्य, न्याय अन्याय वगैरे द्वंद्वांची निवड करणें कन्याराशीसच चांगलें साधतें.

त्यानंतरची आठवी राशि **वृश्चिक** ही निगेटिव्ह, ऋण व स्त्री आहे. जगांतील गाढ अज्ञान व अतिशय विद्वत्ता हे दोन्ही गुण ह्या राशींत दिसून येतात. या राशींत परस्परविरोधी असे पुष्कळ गुण आहेत. वृश्चिक राशीच्या माणसाच्या स्वभावाची पारख होणें फारच कठीण आहे. या राशींत गर्व, मत्सर, सूड, हेवा वगैरे पुष्कळ दुगुण वास करितात तथापि कधीं कधीं त्या राशींत लोक विलक्षण बुद्धिमान निघतात.

धनुराशींत मुख्य दोन गुण आहेत तिचा दुर्गुण म्हणजे सत्तेशीं विरोध, व सद्गुण कायदेशीरपणा व ऐक्य होय. धार्मिक लोक याच राशीचे लग्नावर अथवा चंद्रावर जन्मतात. या राशीचे सर्व गुण क्वचितच एके ठिकाणीं दिसतात. विचारपरिप्लुतता, निःपक्षपातीपणा, सरलता, न्यायप्रियता हे गुण या राशींत जास्त दिसून येतात. धनुराशींत तिसरें राशित्रय पुरें होतें. तुला, वृश्चिक व धनु या राशी पहिल्या सहा राशींच्या गुणांचा विकास करणाऱ्या आहेत. शेवटच्या राशी म्हणजे मकर, कुंभ व मीन या सेव्य वृत्तीच्या आहेत.

सर्व राशींमध्यें **मकर** ही विलक्षण आहे. या राशीचे लोक नादी असतात. एकाद्या गोष्टीचा त्यांना नाद लागल्यास ते अगदीं शिखरास जाऊन पोंचल्याबांचून त्याचा पिच्छा सोडीत नाहींत. इमानी व राजनिष्ठ नोकरी करणें हे या राशीचे सद्गुण आहेत. परंतु हांजी हांजी करणें, गुलामगिरी व दास्य हे या राशींत दुर्गुण असतात. या राशीची स्वतांचें शील बनविण्याकडे विशेष प्रवृत्ति दिसून येते व साधारणपणें मकर राशि नीतिमत्तेंत पुढें असते.

अकरावी राशि **कुंभ** होय, ही मनुष्यांच्या गुणांचा पूर्ण विकास करते. या राशींत विचार करण्याची शक्ति व न्यायीपणा पुष्कळ असतो. या राशीचे अंगीं असलेले गुण निर्दोष असून पूर्ण विकास पावलेले असतात. जणू काय मनुष्य प्राणी सर्व राशींचा अनुभव घेऊन त्यांतील दोष काढून फक्त राहिलेले गुण घेऊन कुंभराशींत जन्म घेतो व पूर्णत्वास पावलेल्या मनुष्याचे अंगीं किती योग्यता असते याचा अनुभव जगास दाखवितो.

या नंतरची शेवटची राशि **मीन** होय. या राशीचे लग्नावर जन्मास येणाऱ्या लोकांचे अंगीं कोणताही गुण प्रमुखत्वानें दिसून येत नाहीं. मीन ही राशिचक्रांतील शेवटची राशि असल्यानें सर्व गुणांचा ह्या राशींत लोप होतो. ह्या राशींत जीवनशक्ति कमी असते. मीनलग्नीं जन्मास येणाऱ्या लोकांकडून कोणतेंही महत्त्वाचें कार्य होत नाहीं, हे लोक स्वभावतः दीदिल, सुखासक्त व स्वतःपुरते पाहणारे असतात.

(अपूर्ण)

स्फुट विचार ।

सन १९१२ च्या नोव्हेंबर महिन्याच्या १२ व्या तारखेस **हर्शल** किंवा **प्रजापति** हा ग्रह कुंभ राशीमध्यें शिरला व तो त्या राशीमध्यें १ ली एप्रिल सन १९१९ पर्यंत होता. बहुशः हर्शल हा ग्रह ज्या राशीमधून जात असतो तद्योतक तत्त्वासंबंधानें जगांत निरनिसळे महत्वाचे शोध लागतात. तसेंच ज्या राशीमधून तो जात असतो ती राशि ज्या ज्या देशांची द्योतक असते त्या त्या देशांमध्यें भयंकर क्रांतिकारक चळवळी होऊन राज्यव्यवस्थेचीं हाडें खिळखिळी झालेलीं पाहण्यास मिळतात, कुंभ राशीचा अंमल रशिया व पोलंड या प्रदेशांवर असल्याचें ग्रंथांत वर्णन केलें आहे व या दोन प्रदेशांमध्यें सन १९१३ नंतर कशी धुमःचक्री झाली याचें निराळें वर्णन करण्याचें कारण दिसत नाहीं.

सन १९१९ च्या एप्रिल महिन्यामध्यें हर्शल हा ग्रह मीन राशीमध्यें शिरला असून तो या राशीमध्यें १९२७ च्या मार्च अखेरपर्यंत राहणार आहे. मीन राशीचा अंमल पोर्तुगाल स्पेनमधील ग्यालीशीआ व आपलेकडील पंजाब, पानिपत, बनारस यांवर असल्याचें आम्हीं आमच्या मेदिनीय किंवा राष्ट्रीय ज्योतिष पुस्तकांत सांगितलें आहे. या प्रदेशांत काय काय घडामोडी घडतात हें पाहणें आहे.

राशिचक्रांतील कुंभ राशि वायुतत्त्वाची असल्याचें मानतात. व हर्शल या राशीमध्यें होता त्या दरम्यानच्या काळामध्यें धूम्रास्त्र (गेल्या महायुद्धामध्य वापरलेले विषारी ग्यास) वायरलेस टेलीग्राफी व वायरलेस टेलीफोन यांमध्यें पुष्कळच सुधारणा झाली असून आकाशनौकागमनाची किंवा विमानाची कल्पना पूर्णत्वास गेली असून मुंबापुरस्थ पुष्कळ लोकांनीं तर आकाशयानाचा अनुभव देखील घेतला आहे.

वरील गोष्टींवरून विचार करितां **मीन** ही जलतत्त्वाची राशी असल्याकारणानें या राशीमधील हर्शलचीं पुढील सात वर्षें जलतत्त्वासंबंधानें मोठमोठाले शोध दर्शवीत आहेत. मोठमोठाल्या नद्यांचे प्रवाह विद्युत् उत्पन्न

करण्याकडे लावण्यांत येतील व मोठाले कारखाने विद्युत् प्रवाहावर चाललेले दिसूं लागतील. नद्यांचे प्रवाह माणसें आपल्या इच्छेनुरूप फिरवून त्यांपासून कार्यें करून घेतील. मीन राशि ही महासागराची द्योतक असल्याकारणानें महासागरांतर्गत प्रवाहाचा चांगला सूक्ष्म शोध होऊन त्यांचा उपयोग मानवी प्राण्यांस करितां येईल किंवा काय, त्याच प्रमाणें पाण्याचा लिकविड फ्युअल सारखा उपयोग करतां येणें शक्य आहे किंवा काय या गोष्टींकडे बरेंच लक्ष वेधेल. महासागरांत मोठाले उत्पात होतील व जलप्रलय विशेष झालेले पाहण्यास मिळतील. बरींच द्रव्यें रासायनिक रीत्या पाण्यापासून बनविण्याचे शोध लागतील. जलास्त्राचा पूर्ण परिचय होईल. हल्लीं आपणास साधारणपणें तासीं ३०।३५ मैल जहाजांच्या साह्यानें जातां येतें त्यापेक्षां जास्त गतीनें म्हणजे १००। १५० मैल तासीं जाण्याचे शोध उपलब्ध होतील. त्याचप्रमाणें माशासारखें पाण्यांतून स्वेच्छेनुरूप संचार करितां येणारी कला साध्य होऊन नौकागमनाचे कलेचे शास्त्रांत क्रांतिकारक सुधारणा होतील.

* * *

मोठमोठ्याला ग्रहांचे युतियोग किंवा प्रतियोग हे देशामधील होणाऱ्या भावी घडामोडींचे द्योतक असतात, असा प्राचीन ज्योतिर्विदांचा समज आहे. देशांत सुधारणा करूं इच्छिणाऱ्या नवीन मनूचा उदय याच योगप्रतियोगांवर होत असतो. तारीख ७ जून १९२० रोजीं **हर्शल** व **शनि** या दोन मोठ्या ग्रहांमध्यें प्रतियोग होणारा आहे, आणि म्हणूनच त्या दिवसापासून दुसऱ्या एका नव्या मन्वंतराचा उदय होणार आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं.

कोणत्याही दोन ग्रहांमध्यें होणारा प्रतियोग हा एक महत्वाचा दृष्टियोग असून त्याचे परिणाम फार तीव्र व अशुभ आढळतात. मोठमोठाल्या ग्रहांमध्यें होणारे योग प्रतियोग लवकर सुटून जात नाहींत, कारण बहुशा योग किंवा प्रतियोगाचे काळीं ग्रह समक्रांतीमध्यें असलेले आढळतात. व शनिहर्शल सारख्या बृहत् ग्रहांची गति फारच अल्प असल्यामुळें ते एकमेकांच्या समोरून सुटून जाण्यास तर पुष्कळच काळ घेतात. व त्याच मुळें

त्यांचे परिणाम नक्की त्याच तारखेस न होतां पुढें मागें ज्या ज्या वेळीं उत्तेजित होतात त्या त्या वेळीं झालेले पाहण्यास मिळतात.

हर्शल हा ग्रह साधारणपणें रेलवे मंडळें, संस्था, संघ, क्षोभ व उत्पात यांचा द्योतक असून सुधारणा व क्रांतिकारक चळवळींला मदत करणारा आहे व आम्हांस तो विद्युत् सहाय्यानें, वाफेच्या साह्यानें किंवा यांत्रिक शक्तीच्या सहाय्यानें चालणाऱ्या कारखान्यांतील मजूरवर्गाचा कारक असावा असें वाटतें. कोणत्याही दोन ग्रहांमधील प्रतियोग हा साधारणपणें त्या दोन ग्रहांनीं दर्शविल्या जाणाऱ्या गोष्टींमध्यें किंवा ते ग्रह ज्या ज्या गोष्टींचे कारक आहेत त्यांमध्यें विरोध किंवा मारामारी दर्शवितो.

हर्शल हा ग्रह मीन या सुधारणाप्रिय राशीमध्यें शिरला आहे. मीन ही राशिचक्रामधील सुधारणाप्रिय व गुह्यविद्याप्रिय राशि आहे. या राशीचा ओढा क्रांतिकारक चळवळींपेक्षां सुधारणेकडे जास्त असल्याकारणानें लवकरच सर्वत्र मोठमोठाले फेरफार घडलेले पाहण्यास मिळतील. नवमतवादाचा ध्वज सहजासहजीं फडकत नसतो. त्याला जीर्ण मतवादाच्या ठिकऱ्या उडवाव्या लागतात व आचार, विचार यांमध्यें क्रांति करावी लागते तेव्हांच कोठें त्याचें प्रगतीपर पाऊल पडतें. अशाच तऱ्हेची खळबळ मीनराशीमधील हर्शल उडवून खास देईल असें वाटतें.

मीन ही राशिचक्रामधील बारावी जलतत्त्वाची, स्त्री, व द्विस्वभाव राशि आहे. या राशीवरून साधारणपणें आणखी द्वादशस्थानद्योतक तुरुंग, दवाखाने, लोकोपयोगी संस्था, हेर, अन्नछत्रें, भिक्षागृहें, दानसंस्था यांचाही बोध होतो.

तारीख २४ एप्रिल १९२० ला गुरुनेपच्युनची शेवटची चालूवर्षातील युति झाल्यानंतर तारीख १० सप्टेंबर १९२० रोजीं गुरु व हर्शल या दोन ग्रहांचा प्रतियोग होणार आहे. व त्यानंतर सप्टेंबर १९२१ मध्यें शनिगुरूंची युति होणार आहे. गुरुहर्शलचा योग किंवा प्रतियोग साधारणपणें दर १४ वर्षांनीं होत असतो. परंतु त्या वेळीं योग किंवा प्रतियोग त्याच त्या राशीमध्यें होत नाहीं. गुरुहर्शलची युति सन १९१४ च्या मार्च महिन्याच्या ४ थ्या

तारखेस कुंभ राशीच्या ९ अं. ३२ कलेमध्यें झाली. आतां पुढें ही युति सन १९२१ सालीं फेब्रुवारी महिन्यामध्यें मेष राशीच्या १ ल्या अंशांत होणार आहे. गुरुहर्शलचा मकर व कर्क राशींमधून प्रतियोग २८ मे १९०७ सालीं झाला व त्यानंतर तो आतां तारीख १० सप्टेंबर १९२० रोजीं कन्या व मीन राशींच्या ४ थ्या अंशांमधून होणार आहे. हर्शलगुरूंचा त्याच त्या राशीमध्यें योग किंवा प्रतियोग सरासरी ८३ वर्षांनीं होत असल्याचें आढळतें. कन्या राशीच्या ६ व्या अंशामध्यें गुरुहर्शलचा प्रतियोग सन १८३७ च्या सप्टेंबर महिन्यांत झाला होता.

गुरु हा ग्रह न्याय, वकील, पतपेढ्या, धार्मिक गोष्टी, सांपत्तिक सुस्थिति, पेढीवाले, न्यायाधीश, आणि धार्मिक बाबतींसंबंधानें काम करणारे यांचा कारक ग्रह आहे म्हणून या कालामध्यें या गोष्टींमध्यें काय काय घडामोडी होतात हें पाहणें आहे.

यंदांच्या वर्षामध्यें होत असलेला हा हर्शलगुरूंचा प्रतियोग चालू वर्षाच्या वर्षप्रवेशकालच्या कुंडलींतील अष्टमांत असलेल्या शनीवर होत आहे. चालू वर्षप्रवेशकालच्या कुंडलीमध्यें धनस्थानाचें स्वामित्व गुरूकडे आलें असून तो त्या कालींही जसा मंगळानें पीडित होता तसाच तो प्रस्तुतच्या प्रतियोग-कालींही मंगळानें पीडित असल्याकारणानें लवकरच एखादा मोठा कर बस-ण्याचा पुष्कळच संभव वाटत असून व्यापारधंद्यामध्यें भयंकर घडामोडी होतील. नाण्याची टंचाई अति भासेल. व त्यामुळें व्यांका आला व्याजाचा दर वाढ-वितील. सप्टेंबर महिन्याची १० वी, १२ वी, १८ वी, २५ वी, २६ वी, २७ वी, व आक्टोबर महिन्याची २ री तारीख हे दिवस चालू वर्षांतील विचार करण्यासारखे दिसत आहेत या युतीनंतर लवकरच मृत्युसंख्या जास्त वाढेल. व मजुरवर्गामध्यें संप होण्याची भीति वाटत आहे. त्याच-प्रमाणें या युतीनंतर एखादा रेलवे अपघात किंवा रेलवेच्या कारखान्यामध्यें संप होणें संभवनीय आहे.

* * *

महाराष्ट्राचा व धनुराशीचा निकट संबंध असून कन्या राशि महाराष्ट्राच्या दशम भुवनीं असल्याचें आम्हीं मागें एकदा प्रसिद्ध केलेंच आहे. व त्याच-प्रमाणें महाराष्ट्राची राजधानी जें पुणें शहर त्याची कन्या राशि असल्याबद्दल अनेकवार ज्योतिर्माला मध्यें उल्लेख केला आहे. कन्या राशीचा कोणता नक्की अंश पुण्याच्या लग्नीं उदित आहे याबद्दल अद्यापपर्यंत कोठेंच कोणी उल्लेख केलेला आढळत नाहीं. परंतु विचार करितां असें वाटतें कीं महाराष्ट्रांतील शिवाजी महाराजांनीं स्थापित केलेली हिंदुपत बादशाहीचें लग्न धनु राशीच्या पहिल्या अंशांत असावें असें वाटतें. धनु राशीचा पहिला अंश लग्नीं घेतला असतां हिंदुपत बादशाहीच्या राज्यभुवनांत किंवा दशमस्थानांत कन्या राशीचा ४ था अंश उदय पावत आहे.

शनिगुरूंची पहिली पृथ्वीतत्त्वामधील युति कन्या राशीच्या ९ अं. ६६ कलेमध्यें सन १८०२ च्या जुलईच्या १६ तारखेस झाली आहे. म्हणजे ही युति मराठेशाहीच्या राज्यभुवनाचे उदित अंशावर झाली व लागलीच ३१ डिसेंबर १८०२ या दिवशीं वसईचा तह होऊन बाजीराव हा इंग्रजाचा सर्वस्वीं गुलाम बनला व मराठी राज्याच्या काळजाचीं इंग्रजांच्या मध्यस्थीच्या पाचरीनें अनेक शकलें झालीं.

कन्या राशीच्या समोरून म्हणजे मीन राशीमधून सन १८१७ व १८१८ सालीं शनि भ्रमण करीत असतां तारीख १७ नोव्हेंबर १८१७ या दिवशीं पुण्यांत शनिवारच्या वाड्यावर इंग्रजांचें निशाण लागलें. या वर्षी गुरुहर्शलची युति नोव्हेंबर महिन्यांत धनु राशीच्या १४ व्या अंशांत झाली होती. नेपच्युनही धनु राशीच्या २३ व्या अंशांत होता व शनि नोव्हेंबरमध्यें मीन राशीच्या २ व्या अंशांत होता. यापुढें लगेच तारीख ३ जून १८१८ रोजीं बाजीरावानें अशीर गडाजवळ ढोलकोट येथें जनरल माल्कम याच्या स्वाधीन होऊन त्यानें राज्यावर उदक सोडलें.

तारीख १६ म १८४९ या दिवशीं मराठेशाहीची जी मुळची सातारची गादी ती खालसा झाली. या वेळीं नेपच्युनचें भ्रमण मीन राशीच्या ९ व्या

अंशांमधून चाललें होतें. व मराठेशाहीच्या अस्तकेंद्रावर म्हणजे मीन राशीच्या ४ थ्या अंशावर तारीख २३ फेब्रुवारी रोजीं सूर्यग्रहण झालें आहें व दशमभुवनाचे केन्द्रावर तारीख ९ मार्च रोजीं चंद्रग्रहण झालेलें आहे व या ग्रहणाचे अंशांवरून गोचरीच्या मंगळाचें भ्रमण होत असतां राज्य खालसा होण्याची पूर्व तयारी होऊन जेव्हां तारीख २३ रोजींच्या सूर्यग्रहणाचे अंशांवर नेपच्युन आला त्याच बरोबर सर्व कारभार आटोपलेला आहे.

या दृष्टीनें पाहतां कन्या व मीन राशींचा ४ था अंश हा फारच महत्वाचा आहे. यंदाच्या वर्षामध्यें याच चवथ्या अंशांमध्यें हर्शलगुरूंचा प्रतियोग तारीख ७ जूनला झाला असून आतां हर्शलगुरूंचा तारीख १० सप्टेंबर रोजीं होणारा प्रतियोग याच अंशामधून होणार आहे. त्यामुळें महाराष्ट्रांतील मराठेशाहीपैकीं अस्तित्वांत असलेल्या जबाबदार संस्थानासंबंधी बऱ्याच भानगडी, क्रांतिकारक चळवळी किंवा उलाढालींना लवकरच ऊत यावयाचा आहे. बहुशा सर्व चळवळीचे मुळाशीं ज्याप्रमाणें सुधारणेचेंच बोडें ढकलेलें पाहण्यास मिळेंतें त्याप्रमाणें सदर्हु संस्थानामधील राज्यांतर्गत घोरण सुधारण्याची खटपट होईल. व आजपर्यंतच्या गेल्या १००।१९० वर्षांच्या ऐतिहासिक काळामधील सर्व महत्त्वाचे गोष्टींमध्यें ज्याप्रमाणें पुण्यास अग्रत्वाचा मान मिळाला आहे त्याच प्रमाणें पुढें येणाऱ्या भावी काळांत वरील संस्थानामधील अस्तित्वांत असलेली संस्थानी राज्यपद्धतीची घडी बदलून नवीन राज्यव्यवस्था स्थापण्याच्या चळवळीच्या अग्रपूजेचा मान पुण्यास खात्रीनें मिळावयाचा आहे

हर्शल हा ग्रह मीन राशींत ४ थ्या अंशामधून सन १९२१ मधून पुन्हा जाणार आहे. व त्यामुळें तारीख ७ जून १९२० नंतर उत्पन्न होणाऱ्या चळवळीची लाट फेब्रुवारी, सप्टेंबर व आक्टोबर १९२१ मध्यें जास्त प्रबळ झालेली पाहण्यास मिळेल.

हर्शलगुरूंचा १० सप्टेंबरला होणाऱ्या प्रतियोगास अष्टमांत असलेल्या मंगळाचा केन्द्रयोग होत असल्यामुळें महाराष्ट्रामधील संस्थानिकासंबंधानें

व प्रमुख व्यक्तीच्या शरीरस्वास्थासंबंधानें घास्तीच वाटते. या कालामध्यें एखादे दोन चांगले पुढारी, संस्थानिक, वकील, न्यायाधीश, धार्मिक आचार-विचाराचे लोक कालवश होतील अशी घोतक ग्रहस्थिति आहे.

* * *

ता० ३-८-१९२०.

प्रस्तुतचा अंक बहुतेक छापून तयार झाला असतां लोकमान्य बाळ गंगाधर टिळक हे कैलासवासी झाल्याची अत्यंत दुःखकारक वार्ता सर्वतोमुखी झाली ! हिंदुस्थानच्या दुर्दैवानें हल्लींच्या संक्रमणावस्थेंत लोकमान्यांसारखा धीरोदात्त लोकनायक नाहींसा व्हावा यापेक्षां दुःखतर प्रसंग तो कोणता ? आधींच या अभागी भरतभूमीमध्यें स्वार्थत्यागी देशभक्तांची उणीव व त्यांतून लोकमान्यासारखा सहस्र संकटांच्या कसोटीस उतरलेला उज्वल देशभक्त, निस्सीम कर्मयोगी व कर्तृत्ववान पुढारी अस्तंगत झाल्यामुळें सर्व राष्ट्रास हळहळ लागली आहे. या दुःखद प्रसंगासंबंधानें आम्हीं गेल्या डिसेंबरच्यानुआरीच्या अंकामध्यें पृष्ठ १३६ व पृष्ठ १४२ वर असें म्हटलें होतें " महाराष्ट्राचा..... यामुळें चालू वर्षीं महाराष्ट्रामधील कर्त्या पुरुषांवर काय काय आपत्ती येतात त्या पाहणें आहे. कन्याराशीचा.....त्यामुळें असें वाटतें कीं या प्रतियोगामुळें (हा प्रतियोग शेवटला ता० ७ जून १९२० रोजीं झाला.) पुण्यामधील चांगल्या लोकनायकांचे मृत्यु घडतील" पृष्ठ १४१।४२ "बुध मंगळांचा केन्द्रयोग.....वर्तमानपत्रकार, लेखक व वक्ते यांचे मृत्यु घडतील. जुलई १५ नंतरचा काल व आक्टोबर ११ नंतरचा काल या गोष्टीस अनुकूल असा येत आहे."

मालेच्या डिसेंबर १९१९ च्या अंकामध्यें लोकमान्यांच्या कुंडलीसंबंधानें रा. रा. दाजी नागेश आपटे यांचा एक चर्चात्मक लेख प्रसिद्ध केल्यानंतर त्या कुंडलीमधील चालू असलेल्या ग्रहस्थितीसंबंधानें आमचा थोडा मतभेद झाला होता व त्याबद्दलचा पूर्ण खुलासा मालेच्या कामकरी वर्गांपैकीं रा. खोपकर यांनीं लोकमान्यांच्या कुंडलीमध्यें ६४ व्या वर्षानंतर किती अशुभ योगांचें प्राबल्य होत आहे याचें स्पष्टतर शब्दांमध्यें फेब्रुवारी १९१९ च्या अंकांत केलेलें विवेचन आमच्या वाचकांच्या लक्षांत असेलच. आम्हांस त्याच वेळीं लोकमान्यांचा इहलोकींचा सहवास फार थोड काळ होणार असल्याचें वाटत

होतें व सन १९२० साल कसें उलटतें याबद्दल पूर्ण धास्ती वाटत होती. पृष्ठ १९७ ज्यो. माला अंक ११ फेब्रुवारी १९१९ मध्यें खालील प्रमाणें विधान केलेलें आहे. " ६४ व्या वर्षी चलित लग्न व अष्टमेश गुरु यांचा प्रतियोग चालू आहे. हा योगही देहसौख्याविषयीं चिंता उत्पन्न करणारा आहे. रविगुरूंचा प्रतियोग ६६ व्या वर्षी होत आहे पण त्यापूर्वी दोन वर्षे अशुभ योगांचा अंमल बसत आहे. " त्याचप्रमाणें या गोष्टीकडे लोकांचें थोडें तरी लक्ष वेधावें म्हणून पुन्हा मे १९१९ च्या अंकामध्यें पृष्ठ २२ वर स्फुटविचारामध्यें पुण्याबद्दल उल्लेख केला आहे.

त्याच वेळीं पुण्याच्या उदित अंशासंबंधानें आम्हांस सुचलेली कल्पना व तीवरून त्या वेळीं पुढें येणाऱ्या भावी स्थितीचा विचार आजच्या अंकामध्यें प्रसिद्ध होत आहे. हे विचार आम्हीं गेल्या जानेवारीमध्येंच लिहून ठेविलेले होते. व त्यांचा आज लोकमान्यांच्या निधनानें कसा प्रत्यय आला आहे याचा पुन्हा खुलासा करण्याचें कारण दिसत नाहीं. असो लोकमान्यांनीं आपलें जीवित कार्य यशस्वी करून दाखविलें अमून मोज्वळ चारित्र्याचा उत्तम आदर्श आपल्या देशबांधवांपुढें ठेविला आहे. ईश्वर त्यांच्या आत्म्यास शांति देवो.

—संपादक—

सूचना—लोकमान्यांच्या कुंडलीचा जरी अनेकांनीं पुष्कळ ठिकाणीं विचार केलेला आहे तरी त्यामध्यें पुष्कळच अपूरेपणा राहिलेला आहे म्हणून पुढील अंकीं निरनिराळ्या विद्वान ज्योतिर्विदांचे लोकमान्यांच्या कुंडलीवर प्रकाश पाडणारे लेख प्रसिद्ध करण्याचें ठरविलें आहे. व याच अंकांत हिंदी राष्ट्राच्या पुढील आयुष्यामधील होणाऱ्या घडामोडींचा (थोडाबहुत) विचार करण्याचें योजिलें आहे. ज्या कोणा ज्योतिर्विदांस लोकमान्यांच्या कुंडलीसंबंधानें आपले विचार कळविण्याची इच्छा असेल त्यांनीं ते ३० आगस्टच्या आंत आमचेकडे पाठविले असतां त्यांचा समावेश आम्हीं या आमच्या प्रसिद्ध होणाऱ्या अंकांत करूं. आमचे ज्योतिर्विद मित्र या गोष्टीकडे लक्ष्य देऊन लोकमान्यांबद्दल असलेलें आपापलें प्रेम व्यक्त करतील काय? सध्या कागदाची किंमत बरीच वाढली असल्याकारणानें वर्गणीदारांइतक्याच अंकाच्या प्रति काढण्याचें ठरविलें असल्यामुळें फुकट अंक कोणास मिळणार नाहीं. याबद्दल वाचक वर्ग आमचेवर रागावणार नाहींत अशी आशा आहे.

मॅनेजर—ज्योतिर्माला आफीस दादर, मुंबई नं. १४

॥ श्रीसद्गुरवे नमः ॥

ज्योतिर्माला

आप्राचः कामरूपाद्द्रुहिणसुतनदप्लाविताद्प्रतीचो
गान्धारात् सिंधुसौद्रद्रघुवररचिताद्याचसेतोरवाचः ।
आकेदारादुदीचस्तुहिनगहनतः सन्तिविद्वत्समाजा
ये ये तानेष यत्नः सुखयतु समजान्कश्चमत्कर्तुमीष्टे ॥ १ ॥

अभिनवाऽऽवृत्ति वर्ष ६ वें अंक १ ते ३

" ईशप्रार्थना "

रा. रामचंद्र राजाराम मोकाशी, ठाणें.

पद (१) चाल—भपती खरे ते

नव वर्ष लागलें ! आशीर्वच शुभ देई ॥
जगदंबभक्त हा नम्र तुझे गे ! पायीं ॥ ध्रु० प. ॥
जाहली जनांची सेवा आजवरी जी ॥
ती कृपा तुझी गे ! शक्ति कायशी माझी ॥
तुजविना बोलती पानहि हालत नाहीं ॥
ते बोल फोल नच पटते गोष्ट मना ही ॥
(चाल) म्हणुनि तूं साह्य मज देई गे पुढें ॥
"मालिका" बालिका पाहीं । तिजकडे ॥
सत्कीर्ति वाढवी तीची । चहुकडे ॥
तूं दीनदयाघन त्रिलोक महिमा गाई ॥
मी चातक पामर कसा होउं उतराई ॥ (नववर्ष०)

पद (२) चाल—निज बाळा रे

श्री जगदंबे ! विनवीं तुला मी भावें ॥
नववर्ष सुखानें जावें ॥ ध्रु० ॥

ही नील नभीं सुंदर "ज्योतिर्माला" ॥
गे ! चिरंजीविनी बाळा ॥
ती खेळूं दे घेउनि तारक-माळा ॥
धायास चंद्रसूर्याला ॥

(चाल)-पाहतां विहरतां तिजला ।
सुखशांति तत्र हृदयाला ।
निपजणेंचि विज्ञानाला ।
चिच्छक्तीचें स्मरण स्वयं मग व्हावें
मनिं मुखीं नाम तव यावें ॥

वृत्त—दिंडी (३)

सूर्य जातां अस्तास चंद्र येतो ।
कधीं तारे चमकती मोद होतो ।
कधीं दिसती काजवे सान थोर ।
प्रभा देते कधिं बीजही अपार ॥ १ ॥
निशादुरिताची म्हणुनि पूर्ण नाहीं ।
देव देई घडिघडीं साद्य पाहीं ।
किरण आशेचा निराशेंत राही ।
प्रभू ऐशी काळजी नित्य वाही ॥ २ ॥
रवी ऐसा लागतां महादीप ।
कां न पळुनी जावेंच सर्व पाप ? ।
संत ऐसा रोजचा सोबतीला ।
परी त्याचें हो काय मनुज त्याला ॥ ३ ॥
माय ! अंबे ! बुद्धिचा दे प्रकाश ।
रवीऐशा देदिप्य जीवनास ।
धन्य ! "माला" होईल तमादुरिता
ठाव नुरुनी वाहील सौख्यसरिता ॥ ४ ॥
एकमेकां देती न कधीं नांवें ।
बंधुभगिनी भजतील तुला भावें ॥
लीन होतिल मग तींच त्वत्पदाशीं ।
नव्या वर्षा दे साद्य मंगलाशी ॥ ५ ॥

सन १९२१ साल कसें जाणार ?

हिंदी जनता गेल्या दोन तीन वर्षांपर्यंत अनेक संकटपरंपरेनें त्रस्त झाली आहे व आतां सुखाचे दिवस कधीं येणार याकडे सर्वांचे डोळे लागलेले आहेत. दुष्काळ, महर्घता व त्यामुळेंच उद्भवणारे संपादि प्रकार यांच्या कचाट्यामधून हिंदीजनता चालली आहे तोंच महात्माजींच्या आत्मिक बळास प्रबळ करणाऱ्या असहकारित्वाच्या निशाणाचा कीर्तिध्वज फडकाविला गेला असून असहकारित्वाच्या कार्यक्रमाची नौबत झडूं लागली आहे. व त्यामुळें जिकडे तिकडे राजकीय जागृतीची लाट उत्पन्न झाल्याचें भासत आहे. कांहीं मुत्सद्दी या असहकारित्वाच्या निशाणाखालीं जमा झाले आहेत तर कांहींना ही चळवळ मुळीच अशक्य कोटीमधील वाटत असून तीमुळें महत् संकटें उद्भवणार आहेत. याप्रमाणें तीव्र मतभेद व वादविवाद चालू आहेत. अशा या महत्वाच्या वेळीं पुढें येणारें साल कसें जाईल यांच्यासंबंधानें तर्क वितर्क चालू असणें साहजिकच आहे.

जिकडे तिकडे पूर्वी मालेमध्यें प्रसिद्ध केल्याप्रमाणें अस्वस्थता प्राप्त झाली असून गेलीं तीं वर्षें फार चांगलीं गेलीं, पुढें कसें होणार हा मंत्र ज्याचे त्याचे तोंडीं होऊन राहिला आहे. राष्ट्रीयसभा काय करते, महात्माजी आपली मोहिम कशी वळविणार, आयर्लंडमध्यें स्वस्थता कधीं मिळणार, नाण्याची झालेली टंचाई कधीं मिटणार, व्यापारधंदे नीट चालून स्वस्थपणा कधीं प्राप्त होणार किंवा अशीच अस्वस्थता राहणार किंवा काय इत्यादि अनेक चिंताजनक विचार प्रत्येकाच्या पुढें उभे राहणें साहजिक आहे. अशा या हल्लींच्या संक्रमणावस्थेमध्यें पुढील वर्षासंबंधानें चार शब्द आमच्या पूर्व सांप्रदायाप्रमाणें लिहिण्याचा विचार आहे, व त्यापासून अनेक जणांस आपल्या भावी कार्यक्रमाची रूपरेषा आंखून ठेवितां येईल असें वाटतें.

ज्योतिर्मालेचा पुनर्जन्म होण्यापूर्वीच्या गेल्या २९ । ३० वर्षांमध्यें राष्ट्रीय ज्योतिष किंवा मेदिनीय ज्योतिषशास्त्रासंबंधानें विशेष प्रयत्न किंवा जागृती झाल्याचें दिसत नाहीं. फक्त तुरळ कतुरळक रीतीनें आद्य ज्योतिर्मालाकर्ते यांची राष्ट्रासंबंधानें भविष्यें प्रसिद्ध होऊं लागलीं होतीं व त्याच वेळीं यूरोपखंडामध्यें रॅफेल व झडकील यांचीं भविष्यें कशीं होतात, काय होतात यासंबंधानें कोठें तुकतेंच समजण्यास सुरवात झाली होती. याविषयाची व्यवस्थित मांडणी करून तो महाराष्ट्र वाचकांच्या स्वाधीन करण्याचा कै. चिटणिसांचा विचार होता. परंतु त्यांच्या निधनानें ती गोष्ट शक्य झाली नाहीं. पुढें त्यांच्याच पद्धतीचा व उपकरणांचा उपयोग करून आम्हीं महाराष्ट्रवाचकांस **राष्ट्रीय ज्योतिषाचें** उत्तम ज्ञान करून देणारें पुस्तक प्रसिद्ध करून ज्योतिर्मालेच्या अभिनवावृत्तीमध्यें दर वर्षाचें पुढील भविष्य प्रसिद्ध करण्याचा उपक्रम केला. तेव्हांपासून या विषयाकडे जनतेचें व ज्योतिर्विदांचें चांगलें लक्ष वेधलें गेलेलें दिसत आहे व आतां तर दर वर्षाची 'वर्षभविष्यें' प्रसिद्ध होणारीं पुस्तकें प्रसिद्ध होऊं लागलीं आहेत. व त्यावरून या शाखेच्या प्रगतीची चांगली कल्पना करितां येते. अशींच अनेक उत्तमोत्तम वर्षभविष्यें शास्त्रीय रीत्या प्रसिद्ध होऊन या शास्त्रांत ज्या अनेक अज्ञात गोष्टी आहेत त्यांचा ऊहापोह करतील व दर वर्षीं आपल्या वाचकांस नवीन कांहीं माहिती देतील अशी आम्हांस आशा आहे. राष्ट्रावर येणाऱ्या आपत्तींची सशास्त्र कल्पना झाली तर त्यापासून शास्त्राचा दर्जा वाढून देशाचें कल्याण होतें. लोकमान्यांसारखे धीरोदात्त नायक पुढें केव्हां जन्मास येतील, असलेल्या पुढाऱ्यांवर कशीं कोणत्या तऱ्हेचीं संकटें उत्पन्न होतील, देशाची सांपत्तिक स्थिति कशी राहील, संप केव्हां होतील, रोगराई केव्हां होईल पाऊस कसा पडेल, पिकें कशीं येतील, इत्यादि गोष्टी कळणें अत्यंत अवश्य व जरूरीचें आहे. उगीच ३६ जिनसांची हिंग, जिरें, मिरें, लसूण, मिरच्या इत्यादिकांची तेजी मंदीची कडबोळीं लोकांस प्रसिद्ध करून दिल्यानें शास्त्रसेवा न होतां शास्त्राची

विटंबना मात्र होत आहे. ज्योतिषशास्त्रानें तेजीमंदी कळते हें आम्हांस कबूल आहे. परंतु हा विषय इतका सोपा आहे असें आम्हांस वाटत नाहीं. मेदिनीय ज्योतिष किंवा राष्ट्रीय ज्योतिषशास्त्राची पूर्णता ह्या विषयामध्यें आहे. शास्त्राची अत्युच्चम स्थिति आहे. व त्या वेळीं ३६ काय परंतु जगामधील सर्व वस्तू व बाजारासंबंधानें छातीला हात लावून सांगतां येईल. परंतु आज या उच्च स्थितीला किती ज्योतिर्विद पोहंचलेले आहेत ? हा प्रश्न सदोदित सुज्ञ लोकांपुढें उभा रहाणारच. या विषयाकडे आमचे ज्योतिर्विद बंधु लक्ष देतील काय ? प्रथमतः तेजीमंदीकरितां एकच विषय घेऊन त्याचा चांगला विचार झाला पाहिजे. उपलब्ध ग्रंथांमधील वचनें मागील वस्तुस्थितीबरोबर किती मिळतात त्यांत आणखी काय काय सुधारणा केली पाहिजे इत्यादि गोष्टींचा विचार होणें अत्यंत जरूर आहे. प्रत्येक ज्योतिर्विदाजवळ यासंबंधानें कांहींना कांहीं तरी माहिती असतेच ती सर्व उपलब्ध होऊन एकत्र विचार झाल्यानें एकंदर विषयाचा पुढील पिढीस उत्तम विचार करितां येईल असें आम्हांस वाटतें. ज्योतिषशास्त्राचा आद्य आचार्य वराहमिहिर यानें आपल्या बृहत्संहितेमध्यें याविषयासंबंधानें थोडाबहुत विचार केलेला आहे व त्याच धोरणानें आजपर्यंत सर्व आपलेकडील ज्योतिर्विद विचार करीत असल्याचें पाहण्यास मिळतें. या विषयावर जैन ज्योतिर्विदांनीं फारच उत्तम प्रयत्न केल्याचे पाहण्यास मिळतात व याची साक्ष **भद्रबाहुसंहिता** व दुसरे अनेक लहान मोठे ग्रंथ पूर्णपणें देत आहेत. या विषयावर अनुपलब्ध अशी कांहीं माहिती व ग्रंथ आमचेजवळ आले आहेत, त्यांतून विषयाची निवड करून व्यवस्थित रीतीनें मालेच्या वाचकांपुढें मांडण्याचा आमचा विचार आहे व त्या दृष्टीनें आमचे प्रयत्न चालू आहेत. मिळालेले ग्रंथ बरेच अशुद्ध व दुर्बोध असल्यानें हें काम सोपें आहे असें आम्हांस म्हणतां येत नाहीं, परंतु आमच्या सहृदय वाचक वर्गाच्या मदतीवर आम्हीं ही कामगिरी पुढें हातीं घेणार आहोंत.

(२) सन १९२१ सालामध्यें गुरुवार तारीख १० मार्च पासुन सायन अमान्त चैत्र प्रतिपदेपासुन शालिवाहन शकमानाप्रमाणें **दुर्मति** नांवाच्या संवत्सराचा आरंभ होणार आहे. व विक्रम संवत्सराप्रमाणें **अंगिरा** नांवाचा संवत्सर चालू आहे. **दुर्मति** संवत्सरामध्यें " दुर्मत्यब्देखिलालोकाभूपादुर्मत-यस्सदा । तथापि सुखिनः सर्वे संग्रामाः सन्ति चेदपि ॥ " दुर्मति संवत्सरामध्यें नांवाप्रमाणें सर्व लोक व राजे दुर्मतियुक्त होतील तथापि सर्व लोक सुखी असतील व लढाया चढूंकडे चालतील. या संवत्सराचा अधिपति मंगळ आहे. अंगिरासंवत्सरामध्यें " अंगिरान्देखिललोका भूपाश्च कलहोत्सुकाः । " सर्व लोक व राजे लोक कलहोत्सुक राहतील व या संवत्सराचा स्वामी मंगळ आहे.

क्याळडी संवत्सरचक्राप्रमाणें पाहतां इसवी सन १९०९ पासून जगतावर **मंगळाच्या** महत् चक्राचा आरंभ झाला असुन तें मंगळाचें चक्र सन १९४४ पर्यंत चालणार आहे. म्हणजे या ३६ वर्षांच्या कालामध्यें मंगळाच्या धर्मा-प्रमाणें घडामोडी व्हावयाच्या आहेत. मंगळ हा लढाया, जाळपोळ, खून, मारामाऱ्या, रक्तपात, अत्याचार, अपघात, आगी, शस्त्रक्रिया, रेलवे, मेक्या-निकल वर्क्स, सर्व प्रकारचें यंत्रसामर्थ्य, मोठमोठाले अग्निसाह्यानें चालणारे कारखाने, फौजफांटा, पोलीस यांचा कारक ग्रह आहे. सन १९१४ सालामध्यें **मंगळामध्यें शनीचें** साल येतांच युद्ध सुरूं झालेलें होतें. त्याचप्रमाणें सन १९२१ साल हे **मंगळामधील शनीचें** येत आहे. चक्राधिपति व अब्दाधिपति हे दोन्ही ग्रह अशुभ धर्माचे आहेत. व यांचा योग प्रतियोग झाला असतां फारच अनिष्ट फलें मिळतात. शनिमंगळांची युति फारच अनिष्ट व तीव्र फळें दर्शविते. यामुळें सन १९२१ साल भयंकर खटक्याचें जाणार हें खास. वर्षारंभींच म्हणजे जानेवारी महिन्यांतच हा ग्रह (मंगळ) हर्शलबरोबर युक्त असून शनीबरोबर प्रतियोग करीत आहे. हा प्रतियोग मीन व कन्या राशींमधून होणार आहे. त्यामुळें या दोन राशींच्या अमलाखालील प्रदेशामध्यें खात्रीनें अस्वस्थता माजेल. शनिमंगळांचीयुति या वर्षी तुलाराशीमध्यें होणार आहे

त्यामुळें यंदांच्या वर्षामध्यें जपान, चायना, अमेरिका व ऑस्ट्रिया यांचेकडे सर्वत्रांचें खात्रीनें लक्ष लागणार असें दिसतें. शनिमंगळांची युति म्हणजे भयं-कर तोफखानाच होय व या भडक्यांतन सन १९२१ साल रक्तपाताखेरीज सुनें जाईल असें वाटत नाहीं. शनि हा ग्रह साधारणपणें हिंदुस्थानाचा अधि-पति आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं त्यामुळें हिंदुस्थानास तर हे वर्ष फारच कष्टतर जाईल. व्यापारधंद्याची फारच वाईट स्थिती होईल व भयंकर सांपत्तिक अडचणी भासतील. इजिप्त, अमेरिका, मेक्सिको, तुर्कस्थान, पोर्च्युगाल व स्पेन या देशांमध्यें अत्याचार, खून मारामाऱ्या विशेष प्रमाणा-मध्यें झालेल्या पाहण्यास मिळतील.

चालू वर्षामध्यें होहेनझालेरन घराण्याची म्हणजे जर्मन राजघराण्याची राजसत्ता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न होईल व त्यामुळें युरोपखंडामधील वातावरण क्षुब्ध राहील. अमेरिकन राजकारणामध्यें बऱ्याच भानगडी होतील व अमेरिकेमधील संयुक्त संस्थानांमध्यें खून व अत्याचार झालेले पाहण्यास मिळतील. मेक्सिकोमध्यें पुन्हा बंडाळी उत्पन्न होईल. हिंदुस्थानाचे राजकर्त्यांचे पाठीस लागलेला दुष्काळ, दारिद्र्य, लोकांतील अस्वस्थता यांचा शह सुटला आहे असें दिसत नाहीं. तुर्कस्थानामधील सुलतानाविरुद्ध त्याची प्रजा दुष्काळ व रोगराईनें त्रस्त झाल्यामुळें बंड उभारील. सर्व ठिकाणीं अन्नवस्त्राच्या महा-गाईमुळें लोक त्रस्त झालेले पाहण्यास मिळतील. जमिनीच्या किंमती एकदम उतरतील. दक्षिण आफ्रिकेमधील ट्रान्सवाल व जोहन्सबर्ग याचेवर संकट-परंपरा कोसळेल. हल्लींचें इंग्लंडमध्यें असलेलें प्रधानमंडळ लोकांस आवडणार नाहीं, व त्याविरुद्ध बरीच चळवळ होईल व तें मोडेल. चळवळ व बोलशेव्हि-झमचें भूत बरेच राष्ट्रांच्या पाठीमागचें सुटलें आहे असें दिसत नाहीं. हिंदुस्थान व सरहद्दीवरील प्रदेश यांना या भूताचा उपसर्ग चांगलाच भोवेल असें दिसतें. जानेवारी, एप्रिल, जुलई, ऑगस्ट, नोव्हेंबर व डिसेंबर हे महिने हिंदुस्थानास फारच अनिष्ट दिसतात. राजकीय चळवळ करणाऱ्या पुढाऱ्यांनीं

सावध रहावें. एप्रिलमध्यें राजघराण्यामध्यें मृत्यु होण्याचा संभव दिसतो. सांपत्तिक दृष्ट्या हें साल हिंदुस्थानास चांगलें नाहीं. यांत जर कां फेब्रुवारी किंवा जुलई महिन्यामध्यें एखाद्या ब्यांकेनें दिवाळें काढलें तर मात्र फारच शोचनीय स्थिति होणार आहे.

चालू सालांतील संक्रमण कुंडल्या व इतर दर महिन्याच्या अमावास्या ग्रहणादिकांच्या कुंडल्या फारच विचित्र बसत आहेत. अशा प्रकारचे योग बरेच दिवसांत पाहण्यास मिळालेले नाहींत. सर्व कुंडल्यांमध्यें मंगळाची स्थिति मोठी लक्षांत घेण्यासारखी आहे.

(३) **नेपच्यून** किंवा **वरुण** या ग्रहाचें सन १९२१ सालीं सिंह राशीमधून भ्रमण होणार आहे. हा ग्रह या राशीमध्यें इसवी सन १९२८ च्या ऑगस्ट महिनाअखेर राहणार आहे. सन १९२५ सालामध्यें ऑगस्ट महिन्यापासुन नेपच्युनची जास्त तीव्र फलें आपलेकडे पाहण्यास मिळतील व सन १९२६ मध्यें शनि नेपच्यूनचा केन्द्रयोग सिंह आणि वृश्चिक राशीमधून जानेवारी महिन्यांत होणार आहे हा काळ मोठा कठीण आहे. सन १९१९ । २० सालामध्यें उत्पन्न झालेल्या कंपन्या या सालामध्यें बहुशा आपल्या कांखाबगला वर करतील असें दिसतें.

हा ग्रह वर्षारंभी १३ अं. १२ कलेमध्यें वक्री आहे व तो तारीख २२ एप्रिल रोजीं सिंह राशीच्या १० अंश ५८ कलेमध्यें मार्गी होणार आहे. हा ग्रह पुन्हा सिंह राशीच्या १९ अंश ५८ कलेमध्यें नोव्हेंबर मध्यें वक्री होणार आहे. व डिसेंबर अखेर तो वक्रीच राहत आहे. नेपच्युनमंगळांची युति तारीख २९ ऑगस्ट रोजीं सिंह राशीच्या १४ अंश १० कलेमध्यें होणार आहे. सिंह राशीचा अंमल फ्रान्सवर असल्यामुळें या युतीमुळें रशिया व फ्रान्समध्यें बरेच अत्याचार झालेले पाहण्यास मिळतील. चांगल्या नटांचे मृत्यु घडतील व तेलाच्या कारखान्यामध्यें अपघात होण्याचा पुष्कळ संभव वाटतो किंवा मोठाल्या आगी लागतील. नाटक, सिनेमा, (हाटेलस) इत्यादि

संस्थांमध्यें भानगडी व घोंटाळे उत्पन्न झालेले पाहण्यास मिळतील. या कालामध्यें लहान मुलांचे मृत्यु फार होतील. जुगार व सट्टेबाजीमुळें आत्महत्या केल्याची बरींच उदाहरणें पाहण्यास मिळतील. सट्ट्याच्या धंद्यामध्यें एकदम ऊत येईल व कांहीं काळ प्रत्येकाच्या तोंडीं सट्टासंबंधानेंच चर्चा झालेली दिसेल.

(४) **हर्शल ऊर्फ प्रजापति** हा ग्रह वर्षारंभीं मीन राशीच्या २ अं. ५० कलेमध्यें आहे. हा ग्रह तारीख १४ जून रोजीं ९ अं. ३८ कलेमध्यें वक्री होईल व तो १५ नोव्हेंबर रोजीं ५ अं. ४६ कलेमध्यें मार्गी होणार आहे. आम्हीं पूर्वी भाकित केल्याप्रमाणें महाराष्ट्रामधील एका मोठ्या संस्थानासंबंधानें कोल्हापूरप्रकरण-खटपटीस सुरवात झाली आहे. ९ जानेवारी रोजीं हर्शल-मंगळांची युति होत आहे. यानंतर पुन्हा हें प्रकरण चांगलेंच रंगास चढणार असें दिसतें हर्शलगुरूंचा पुन्हा प्रतियोग तारीख २४ मे रोजीं होत आहे व प्रतियोगाबरोबर मंगळ हा मिथून राशीमधून केन्द्रयोग करीत आहे. एकंदरींत या प्रतियोगापूर्वीचा काळ बराच ताणाचा दिसत आहे. हर्शलमंगळांचा प्रतियोग तारीख २९ सप्टेंबर रोजीं ६ अंश ३४ कलेमधून होणार आहे. कोल्हापूर संस्थानासंबंधानें या महिन्यांत पुन्हा काय प्रकरण रंगास येतें तें पाहणें आहे. या युतीनंतर लवकरच पुण्यास व नागपुरास आगी लागतील. पुण्यास टायफॉईडची साथ जोरानें पसरलेली पाहण्यास मिळेल. प्रथमतः नुसती तापाची साथ येऊन नंतर ती जास्त उग्र रूप धारण करील. एखादे वेळीं कालऱ्याचा उपद्रव होणें संभवनीय वाटतें.

तुर्कस्थान, एशिया मायनर वगैरे प्रदेशामध्यें भयंकर कत्तल झालेली पाहण्यास मिळेल. तुर्कस्थान ऊर्फ मुसलमानी राष्ट्र यावर कन्या राशीचा अंमल आहे. शनीनें कन्या राशीमध्यें प्रवेश केल्यापासुन तुर्की राष्ट्राची शकलें करण्यास सुरुवात केली आहे व आतां अति अनिष्ट काल येत असल्यामुळें वेळेस हें राष्ट्र नामशेष होण्याचा संभव दिसत आहे.

(५) या वर्षी अझून शनीचें भ्रमण सायन **कन्या** राशीमधून होणार आहे. हा ग्रह **कन्या** राशीमध्यें तारीख १२ ऑगष्ट सन १९१९ रोजीं शिरला व तो आतां तारीख ८ ऑक्टोबर रोजीं तुला राशीमध्यें जाणार आहे. कन्या राशीमध्यें शनि असतां खालीलप्रमाणें फलवर्णन केलेलें ग्रंथांत पाहण्यास मिळतें.

"यदा भास्करतनयः कन्याराशिं प्रविश्यति । जलशोषं भवेद्वायुर्मध्यदेशे नृपक्षयम्॥" "कन्या मीने यदा सौरी राशिवक्रं प्रजायते । नृपयुद्धं भयं लोके दुर्भिक्षं तत्र जायते ॥" "कन्यायां मिथुने मीने वृषे धनुषि वा स्थितः । शनि करोति दुर्भिक्षं राजयुद्धं परस्परम्" ॥

वर्षारंभीं शनि कन्या राशीच्या ५४ अंश ४८ कलेमध्यें आहे व तो त्याच अंशामध्यें ता. ४ रोजीं वक्री होणार आहे. मे तारीख २१ रोजीं तो १७ अंश १८ कलेमध्यें मार्गी होणार आहे. वर्षअखेर तो तुलाराशीच्या ७ अंश २१ कलेमध्यें पाहण्यास मिळणार आहे. तुळाराशीमध्यें शनि सन १९२३ पर्यंत राहणार आहे. व डिसेंबर १९२३ मध्यें तो वृश्चिक राशीमध्यें जाईल.

"तुलाराशिपें शनि रहै उच्च शनिश्चर जान ।
सर्व देश मूंगो रहे बंगालामें हान ।
बंगालामें हान वृष्टि जलकी होय भारी ।
बागडमें उत्पात सुखी रेवे नरनारी ॥
राजाको दुख है सही, तुलाको शनी पैंचान ।
यह निश्चय तुम जानियो, ज्योतिषको हे प्रमान ॥

वरील दोह-यांत वर्णन केल्याप्रमाणें फल प्राप्त होईल असें आमच्या एका मित्राचें म्हणणें आहे.

शनिगुरूंची युति या वर्षीच होणार आहे. ही युति तारीख १० सप्टेंबर रोजीं कन्या राशीच्या २६ अं. ३८ कलेमध्यें होणार आहे. ही या वर्षांमधील अत्यंत महत्त्वाची युति असल्यामुळें तिचें सविस्तर वर्णन पुढें केलेलें पाहण्यास मिळेल.

(६) राहूचें भ्रमण तुला राशीमधून या वर्षी होणार आहे व त्यामुळें आतां पुढील दीड वर्षांचे कालामध्यें सर्व ग्रहणें मेष व तुला राशींमध्यें होतील. ग्रहणासंबंधानें सविस्तर खुलासा ह्यापुढें करण्यांत येईल. "यदा राहुस्तुले याति क्रूरः क्रूरसमन्वितः । मेदिन्यां सस्यनाशः स्याद् दुर्भिक्षं तत्र दारुणम् ।" याप्रमाणें ग्रहस्थिति चालू १९२१ च्या नोव्हेंबर डिसेंबर महिन्यांमध्यें येत आहे. तुला राशीमध्यें शनिमंगळांची युति तारीख १३ नोव्हेंबर रोजीं होत आहे. तुला राशीमध्यें गुरुमंगळांची युति तारीख २७ नोव्हेंबर रोजीं होईल व तारीख १ डिसेंबर रोजीं राहुमंगळांची युति होत आहे. ऑक्टोबर १ ली रोजीं सूर्यग्रहण

तुलाराशीच्या ८ व्या अंशामध्यें होत आहे व याच अंशाजवळ शनिमंगळांची युति होत आहे. व ऑगस्ट १६ रोजीं चंद्रग्रहण मेष राशीमध्यें होणार आहे. या व एप्रिल महिन्यामध्यें होणाऱ्या सूर्यग्रहणाचे समोरून मंगळाचें भ्रमण डिसेंबर महिन्यामध्यें होणार आहे त्यामुळें नोव्हेंबर व डिसेंबर या महिन्यांमध्यें अन्नवस्त्रादिकांचा बराच तुडवडा भासेल व सर्वत्र तीव्र महर्गता खात्रीनें झालेली पाहण्यास मिळेल व जपान या देशांत भयंकर अस्वस्थता माजेल.

(७) गुरु या वर्षी कन्या व तुला राशीमधून भ्रमण करणार आहे. "कन्याभोगे गुरोर्जाते मेघनामतमस्तमः । भाद्रसंवत्सरस्तत्र सप्त मासाश्चघोरवम् ॥ ततः परं सुभिक्ष स्यात्कार्तिकान्माधवावधि । अघसंग्रहण लाभो द्विगुणो भाद्र-मासजः ॥ चतुष्पादानां पीडापि गोधूमाशालि शर्कराः तैलं माषा महर्घाणि गुडादोक्षुरसस्तथा ॥ शूद्राणामंत्यजानां च कष्ट सौराष्ट्रमण्डले खण्ड वृष्टिर्दक्षिण-स्यामुत्पातो म्लेच्छमण्डले ॥ भेदपाटे शुगाले च परचक्रभयंरणः । सर्वदेशो वन्हिभयं मेघोल्पश्च रसेल्पता ॥ मरुदेशे छत्रभंगश्चैत्रे वा माधवे भवेत् । गोधूमा घृततैलानि महर्घाणि समादिशेत् ॥ वस्त्रकंबलधातूनामक्षादेश्च समर्घता । धान्यसंग्रह आषाढे भाद्रे लाभश्चतुर्गुणः ॥" कन्या राशीमध्यें गुरु सन १९२० सालच्या ऑगस्टच्या २७ तारखेस गेला व त्यानंतरची तारीख २६ सप्टेंबर १९२१ रोजीं तुला राशीमध्यें प्रवेश करील. व वर्षअखेर तुला राशीच्या १८ व्या अंशामध्यें राहील. गुरूची वर कन्या राशीमधील वर्णन केलेलीं फळें ह्या वर दर्शविलेल्या कन्या राशीमधील गुरूच्या राहण्याच्या कालांत मिळालीं पाहिजेत. हा ग्रह जानेवारीच्या ४ तारखेस च कन्या राशीमध्यें वक्री होणार आहे व तो कन्या राशीच्या ८ अंश ५६ कलेमध्यें तारीख ६ मे रोजीं मार्गी होईल.

गुरु चालू वर्षी प्रथमतः मंगळानें पीडित, नंतर मे महिन्यांत हर्शलनें व मंगळानें पीडित, सप्टेंबरमध्यें शनीबरोबर युतियोग व लगेच नोव्हेंबर महिन्यामध्यें मंगळाबरोबर युक्त होणार आहे त्यामुळें हा ग्रह चालू वर्षांमध्यें ज्या ज्या गोष्टींचा व स्थानांचा अधिपति झालेला पाहण्यास मिळेल त्या त्या संबंधानें अनिष्ट फळें खात्रीनें पाहण्यास मिळून देशांतील सांपत्तिक स्थिति व पीकपाणी यांची हानी दर्शवित आहे.

(८) सन १९२० च्या डिसेंबर ता. २२ रोजीं सकाळीं मुं. टा. ८ वाजून आठ मिनिटांनीं सूर्य सायन मकर राशीमध्यें प्रवेश करील, या वेळीं पूर्व केन्द्रावर मकर राशीचा २३ वा अंश उदय पावत असून जनतेचा दर्शक चंद्र हा चतुर्थामध्यें वृषभ राशीच्या २३ अं. २७ कलेमध्यें असून लग्नांतील शुभ मंगळ व सप्तमामधील नेपच्यून बरोबर केन्द्रयोग करीत आहे. या योगामुळें राजकीय विचारांचें वातावरण तारीख ९ फेब्रुवारीचे सुमारास बरेंच क्षुब्ध होईल. अपघात, अग्निप्रलय, रक्तपात, तीव्र मतभेद, अत्याचार व कलह यांचा सुकाळ होईल. षष्ठेश चंद्र हा तृतीयेश मंगळानें पीडित आहे म्हणून पोष्ट रेलवे यांमधील संपाचें बी मोडलें गेलें आहे असें वाटत नाहीं. या कालांत जनसमूह प्रक्षुब्ध राहील. स्त्रिया व मुलें यांसंबंधानें अत्याचार जास्त झालेले पाहण्यास मिळतील. धनस्थानामध्यें हर्शल, धनस्थानाचा अधिपति व कारक अष्टमामध्यें असून अष्टमेशाबरोबर केन्द्रयोग व शनीनें युक्त असा अष्टमांत आहे ही ग्रहस्थिति देशांतील सांपत्तिक स्थितीची फार शोचनीय स्थिति दर्शवीत आहे. नाण्याची फारच टंचाई भासेल व त्यामुळें बऱ्याच ब्याँका व व्यापारी पेंचांत येतील. ब्यांका व्याजाचा दर वाढवितील व बाजारभाव त्यामुळें एकदम खालीं येतील असा रंग दिसतो. विशेषतः कागदी नाणें—शेअरसंबंधानें सावध राहावें. लवकरच मोठ्या मंदीचा काळ नजिक येत आहे.

लाभस्थानाचा अधिपति अष्टमांत असून अष्टमेश लाभांत आहे व त्यांच्यामध्यें केन्द्रयोग होत असल्यानुळें कायदेकौन्सिलाची फारच शोचनीय स्थिति दिसत आहे. जनतेचा कारक ग्रह चंद्र बलवान असून गुरूबरोबर शुभसंबंधित आहे त्यामुळें सामान्य दरजाचे लोकांकरितां भासत असलेल्या अनेक उणीवा कशा रीतीनें दूर कराव्या याकडे लक्ष लागेल व त्यासंबंधानें कांहीं खटपट होईल. या संक्रमणाचे कालांत एखाद दोन चांगल्या खनिज पदार्थ तयार करणाऱ्या नवीन कंपन्या व धान्याची खरेदी विक्री करणाऱ्या कंपन्या निघतील असें वाटतें, आयर्लन्ड, रशिया, पोलड, तुर्कस्थान यांसंबंधानें फेब्रुवारी महिन्याच्या पहिल्या आठवड्यामध्यें किंवा मार्च महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यानंतर बऱ्याच विचित्र भानगडी झालेल्या पाहण्यास मिळतील. रशियामध्यें या काळांत रक्तपात होऊन युद्धविषयक धडामोडी जास्त घडतील. फ्रान्स याच्या हितसंबंधामध्यें तारीख ३ फेब्रुवारीच्या सुमारास कांहीं भानगड उत्पन्न होईल. व याच सुमारास आयरलंडसंबंधानें जिकडे तिकडे चळवळ दृष्टीस पडेल. मार्च महिन्याच्या १०।१२ तारखेनंतर तुर्की राजकारणाकडे सर्वांचें लक्ष लागेल.

पोर्तुगालमध्यें तारीख २१ फेब्रुवारीच्या सुमारास कांहीं भानगड उत्पन्न होईल. आपल्या राजकर्त्यांच्या पुढें अनेक भानगडीचे प्रश्न अद्यापि उभे राहावयाचे आहेत व त्यामुळें हिंदी राष्ट्रांतर्गत सुधारणा लवकर करून घेण्याची जलदी करण्यांत येईल व त्यामुळें हिंदुजनतेच्या वांट्यास कांहीं चांगला भाग येईल असें दिसतें. हिंदी सरकारी नोकरांची स्थिति सुधारण्याचा प्रयत्न तारीख २० फेब्रुवारीपासून १० मार्चच्या आंत व्हावा असें वाटतें.

(९) ज्योतिषशास्त्रदृष्ट्या म्हणावयाचें असतां सूर्य जेव्हां मेष राशीमध्यें प्रवेश करितो त्या वेळेपासून नूतन वर्षाचा आरंभ होतो. या वर्षामधील **मेष संक्रमण** तारीख २१ मार्च १९२१ रोजीं सकाळीं मुंबई टाईम आठ वाजून ४२ मिनिटांनीं होणार आहे. **मेष संक्रमण** म्हणजेच वर्षाचा आरंभ होय म्हणून चालू नूतन दुर्मति संवत्सराची किंवा सन १९२१ सालच्या वर्षप्रवेशकालाची सायन भावचलित कुंडली खालीलप्रमाणें बसते.



मेष संक्रमण काळीं वृषभ राशीचा २०वा अंश उदय पावत असून लग्नाधिपति शुक्र व्ययस्थानामध्यें असून नेपच्यून बरोबर केन्द्र योग करीत आहे. चंद्र चतुर्थामध्यें सिंह या बलाढ्य राशीमध्यें असून मंगळाबरोबर त्रिकोण योग करीत आहे. यामुळें लोकपक्ष विशेष बलवान होईल. लोकहिताच्या अनेक चांगल्या गोष्टी चालूवर्षामध्यें घडतील. खाणी, शेतकी व पाट बांधण्याचीं कामें यांची या वर्षामध्यें चांगलीच प्रगती होईल. व्ययस्थानामधील मंगळामुळें गुन्हेगारांची संख्या वाढेल. बुधहर्शलयुति लाभ भावारंभींच असून गुरूच्या प्रतियोगामध्यें आहे त्यामुळें नव्या मन्वंतरांतील नवीन कौन्सिलाची स्थिति फारच विक्षिप्तपणाची दिसत आहे. हर्शल ग्रहाच्या धर्माप्रमाणें नवीन कायदेकौन्सिलाची स्थिति जन्मापासून पाहण्यास मिळेल. पंचमांत गुरु शुक्राच्या त्रिकोणामध्यें आहे. शनिही त्याच स्थानामध्यें आहे. गुरु-शनीसारखे मोठे ग्रह पंचमस्थानीं असल्यामुळें शिक्षणसंस्थामध्यें क्रांति होण्याची वेळ खास आली आहे. गुरूबरोबर बुध हर्शल प्रतियोग करीत असल्यामुळें शिक्षणक्रमांत जे फरक घडून येतील ते गतानुगतिक पद्धतीच्या दृष्टीनें विक्षिप्त व चमत्कारिक भासतील. परंतु गुरु-शुक्राच्या त्रिकोण योगामुळें शिक्षण संस्थांमधील चळवळ राष्ट्राच्या दृष्टीनें हितावह होईल. चालू वर्षांमध्यें बुध मीन या जलराशीमध्यें निर्बली असून हर्शलनें युक्त असून गुरूबरोबर प्रतियोग व शुक्राबरोबर शुभसंबंधित आहे त्यामुळें कादंबऱ्या, नाटकें, संगीतशास्त्र, ज्योतिषशास्त्र यावर बरेच ग्रंथ प्रकाशित होऊन यंदाच्या सालामध्यें वाङ्मयाची प्रगति बरी होईल. उत्तम कादंबऱ्या, ज्योतिष व विद्युत्शास्त्र यांवर एकदोन चांगले ग्रंथ प्रसिद्ध होतील. यंदा उन्हाळा बराच तीव्र भासेल, व पीकपाण्याच्या दृष्टीनें चालू साल साधारणच जाईल परंतु गुदस्त सालापेक्षां बरें जाईल व पाऊसही बरा पडेल.

डेनमार्क, फ्रान्स, पोर्च्युगाल व तुर्कस्थान यांमध्यें भानगडी उत्पन्न होतील. मे महिन्याच्या शेवटल्या आठवड्यामध्यें पोर्च्युगालमध्यें गडबड होईल.

प्रस्तुत वर्षाच्या वर्षकुंडलीचा अंमल वर्षभर टिकेल असें वाटत नाहीं. मेषसंक्रमणानंतर होणारे रविचंद्रसंयोग अधिक बलवान असल्यामुळें या वर्षामधील घडामोडी संयोगकालच्या व इतर संक्रमणाच्या कुंडल्यांवरून दर्शित होतील असें आम्हांस वाटतें.

(१०) तारीख २२ जून १९२१ रोजीं पहाटे ४ वाजून २७ मिनिटांनीं **कर्क संक्रमण** होणार आहे. संक्रमण काळीं मिथुन राशीचा १६ वा अंश उदय पावत आहे. राज्यभुवनीं हर्शल वक्री असून त्याचा गुरूबरोबर प्रतियोग होत आहे. देशांतील अधिकारी वर्गाचा द्योतक ग्रह जो रवि तो लग्नांतच कर्क या नीच राशीमध्यें असलेल्या मंगळानें युक्त आहे. हा योग अधिकारी वर्गास फारच अनिष्ट आहे. लोकपक्षाचा कारक ग्रह चंद्र हाही अष्टमांत मकर राशीचा निर्बली असून बुधाबरोबर प्रतियोग करीत आहे ही स्थिति लोकपक्षाचीही समाधानकारक नाहीं. परंतु चंद्राबरोबर गुरु शुक्र व शनि हे नवपंचम योग करीत असल्यामुळें संकटांतून बचाव होईल. लोकपक्ष चांगला बलवान होईल. ६ जून रोजीं होणाऱ्या रविचंद्र संयोग काळीं जो दशमांत अनिष्ट योग झालेला आहे त्याची तीव्रता या संक्रमण काळचे रवि मंगळाचे युतीमुळें यत्किंचितही कमी होत नाहीं. त्यामुळें देशांत अत्याचार जास्त होतील. मृत्युसंख्या वाढेल, अपघात विशेष होतील व आगी लागतील असें दिसतें. या संक्रमणानंतर पाऊस फार पडून पिकें नासण्याचा संभव वाटतो. शेतीस दगा बसण्याचा संभव चांगलाच आहे असें म्हटलें असतां हरकत नाहीं. सप्टेंबर महिन्यामध्यें पाऊस फार पडून नंतर धान्याची व पिकाची नासाडी खात्रीनें होईल.

कर्कसंक्रमणाची कुंडली फारच भयकर आहे असें म्हणावें लागतें व त्याचप्रमाणें ती लंडन अमेरिका येथेंही बसत आहे. या संक्रमणानंतर युद्धविषयक गोष्टींना ऊत आलेला पाहण्यास मिळेल. तारीख २४ जून १९२१ च्या सुमारास युद्ध पुकारलें जातें किंवा काय याकडे सर्वांचें लक्ष लागेल व त्यामुळे व्यापारामध्यें भयंकर खळबळ उडेल. **हालंड व चीन** या प्रदेशावर कर्क राशीचा अंमल असल्यामुळें या प्रदेशांत या युतीमुळें बरीच खळबळ होईल. ही युति कलकत्त्याकडील प्रदेश, ब्रह्मदेश व चीनला लागून असलेला हिंदुस्थानाच्या पूर्वेकडील प्रदेश येथें लग्नीं उदय पावेल त्यामुळें तिकडील प्रदेशामध्यें भयंकर अस्वस्थता माजून अत्याचार घडतील. तारीख ५ जुलई ते ता ११ जुलईपर्यंतचा काळ व त्यानंतरचा देखील काळ हिंदुस्थानची सांपत्तिक स्थिति व लोकांची स्थिति फार वाईट दर्शवित आहे. या कुंडलीच्या तृतीयस्थानामध्यें नेपच्यून असून तृतीय स्थानाचा अधिपति रवि मंगळाबरोबर युक्त असल्यामुळें रेलवेचा एखादा मोठा अपघात होईल. रेलवेमध्यें भयंकर

अत्याचार झालेले पाहण्यास मिळतील. या काळामध्यें स्त्रियांसंबंधीं बरेच अत्याचार आगस्ट महिन्यामध्यें उघडकीस येतील. वेळेस रेलवेमध्यें संप होण्याची भीति वाटते. या संक्रमणाची कुंडली विशेष महत्त्वाची वाटत असल्यामुळें ती आम्हीं आमच्या वाचकांकरितां देत आहों.



(११) तारीख २३ सप्टेंबर १९२१ रोजीं संध्याकाळीं ७ वाजून ११ मि. मुं. टा. तुला संक्रमण होणार आहे. संक्रमणकालीं मेष राशीचा २५ वा अंश उदय पावत असून लग्नाधिपति मंगळ हा पंचम स्थानांत आहे व तो एकादश स्थानामध्यें असलेल्या हर्शलबरोबर प्रतियोग करीत आहे. चंद्र धनस्थानामध्यें असून तो बुधाबरोबर त्रिकोण दृष्टियोग करण्यास जात आहे. षष्ठ स्थानामध्यें रवि हा शनि व गुरूनें युक्त आहे. धनस्थानाचा अधिपति शुक्र हा पंचमामध्यें असलेल्या दोन खलग्रहांमध्यें नेपच्यन मंगळामध्यें आहे. एकंदर विचार करितां

ही संक्रमण कुंडली मोठी चांगली आहे असें म्हणतां येत नाहीं. कायदे-कौन्सिलमध्यें विचित्र भानगडी झालेल्या पाहण्यास मिळतील. देशांतील सांपत्तिक स्थिति विशेष समाधानकारक राहील असें वाटत नाहीं. फक्त चंद्र बुधाचा त्रिकोणयोग या काळीं होत असल्यामुळें मासिकें, वर्तमानपत्रें, व वाङ्मय विषयक गोष्टींस हा काळ चांगला अनुकूळ आहे व त्यांची चांगली भरभराट होईल. उत्तमोत्तम ग्रंथ, लेख व भाषणें होतील. सार्वजनिक भाषणांचा सुकाळ लवकरच झालेला पाहण्यास मिळेल. या संक्रमणानंतर लहान मुलांच्या मध्यें मृत्युसंख्या जास्त वाढेल व शिक्षण संस्थामध्यें नवीन भानगडी उत्पन्न होतील. पंचमाधिपति रवि हा नेपच्यून बरोबर ४९ अंशाचा दृष्टियोग करीत आहे तसाच गुरुही षष्ठस्थानामध्यें पीडित आहे; ही स्थिति देशांत सांपत्तिक अडचणी उत्पन्न करील. शेअरबझार, कापसाचे सट्टे वगैरे गोष्टींना अनिष्ट काळ येत आहे, करितां स्पेक्युलेटरांनीं सावध रहावें, एक्सचेंज संबंधीं चांगली महत्त्वाची सुधारणा घडेल व परराष्ट्राबरोबर करण्यांत येणाऱ्या व्यापारासंबंधी नवीन व अनुकूळ गोष्टी घडतील. या संक्रमणाचे कालांत नाटक, सिनेमा वगैरे ठिकाणीं अग्निप्रलय होऊन हानी होईल असें वाटतें. त्याचप्रमाणें शेअरबझार वगैरे जेथें सट्टे होतात त्या ठिकाणींही अग्निप्रलय होण्याची धास्ती आहे. लवकरच शेतकीच्या उपयोगास येणाऱ्या जनावरांमध्यें एखाद्या रोगाची साथ पसरून त्यामुळें गोराढोरांचा नाश होईल. त्याचप्रमाणें शेतीचाही भरंवसा देववत नाहीं. पिकें चांगलीं येणार नाहींत हें मात्र खास.

(१२) चालूं सालामध्यें एकंदर चार **ग्रहणें** व्हावयाचीं आहेत. त्यांपैकीं **दोन सूर्यग्रहणें** व **दोन चंद्रग्रहणें** आहेत. या चार ग्रहणांपैकीं फक्त एकच चंद्रग्रहण आपल्याकडे दिसेल. यंदा एप्रिल महिन्यामध्यें दोन व

ऑक्टोबर महिन्यांत दोन या प्रमाणें ग्रहणें होतील. या ग्रहणांपैकीं तीन चर—मेष व तुला—राशींमध्यें व्हावयाचीं आहेत व त्यामुळें सर्व देशामधील राजकारणामध्यें खळबळाट उडेल. पूर्वी झालेले करारनामे, तह वगैरे धाब्यावर बसविण्यांत येतील.

तारीख ८ एप्रिल रोजीं मेषराशीच्या १८ व्या अंशामध्यें कंकणाकृती सूर्यग्रहण होईल. हें ग्रहण यूरोपखंडामध्यें सर्वत्र, आशियाखंडाच्या पश्चिमेकडील प्रदेशांत, आफ्रिकाखंडामधील वायव्येकडील प्रदेशामध्यें, अटलान्टिक महासागराच्या उत्तरेकडील प्रदेशांत व पश्चिमेकडील न्यूफौंउंडलंडकडील प्रदेशांत दिसेल. हें सूर्यग्रहण फार महत्त्वाचें असून त्याचा सर्व युरोपखंडामध्यें व विशेषतः ब्रिटिश साम्राज्यावर महत्त्वाचा परिणाम घडेल. हें ग्रहण ग्रेटब्रिटन व प्यालेस्टाईन यांना फारच अशुभ फल दर्शवीत आहे. या ग्रहणामुळें राजेलोकांचे मृत्यु किंवा आजार घडले पाहिजेत. हें ग्रहण इंग्लंड येथें लाभस्थानामध्यें होत असल्यामुळें प्रधानमंडळ लवकरच मोडेल, संप होतील व या ग्रहणामुळें रशिया, आशिया मैनार व सिरीया वगैरे ठिकाणीं आणखी जास्त अत्याचार झालेले पाहण्यास मिळतील.

तारीख २२ एप्रिल रोजीं वृश्चिक राशीच्या २ ऱ्या अंशामध्यें खग्रास **चंद्रग्रहण** होईल. हें ग्रहण दक्षिण व उत्तर अमेरिका, प्यासिफिक महासागर व अटलान्टिक महासागर येथें दिसेल. या ग्रहणकाळीं ५ ग्रह स्थिर राशीमध्यें असल्याकारणानें भूकंप व ज्वालामुखीचे उद्रेग होतील. ब्राझील, आयर्लंडमध्यें अत्याचार घडतील. अमेरिकेच्या प्रेसिडेन्टला या ग्रहणामुळें उपसर्ग पोहंचेल व त्याला अनिष्ट काल दर्शविला जात आहे.

तारीख १ ली ऑक्टोबर रोजीं तुला राशीच्या ८ व्या अंशामध्यें खग्रास सूर्यग्रहण होईल व हें ग्रहण दक्षिण अमेरिकेमधील दक्षिणेकडील प्रदेशांत

खग्रास दिसेल. हें ग्रहण तुलाराशीच्या प्रथम द्रेष्काणामध्यें व्हावयाचें आहे. पूर्वेकडील प्रदेशामध्यें टॉयफाईडची साथ पसरेल व मृत्युसंख्या वाढेल. ऑस्ट्रियाचें राजकीय वातावरण बरेंच क्षुब्ध होईल. लिसबनच्या प्रेसिडेन्टना या ग्रहणापासून धास्ती आहे. या ग्रहणामुळें भयंकर सांपत्तिक तारांबळ दर्शविली जात आहे व त्यामुळें सर्व ठिकाणच्या बँकिंग संस्थांना अनिष्ट काल दर्शविला जात आहे.

तारीख १६ ऑक्टोबर रोजीं तुलाराशीच्या २३ व्या अंशामध्यें खंडा ृती **चंद्रग्रहण** होईल. हें ग्रहण आशियाखंडाच्या पश्चिमेकडील प्रदेशांत, युरोपखंडामध्यें, आफ्रिकाखंडामध्यें, दक्षिण अमेरिकेच्या पूर्वेकडील प्रदेशामध्यें, हिंदीमहासागर व अटलान्टिकमहासागर यांमध्यें दिसेल. तुलाराशीच्या तृतीय द्रेष्काणांमध्यें ग्रहण झालें असतां स्त्रीवर्गाला कष्ट दर्शवितें व विशेषतः प्रसूत होणाऱ्या स्त्रियांना जास्त कष्ट दर्शवितें. हें ग्रहण ग्रेटब्रिटनला बरेंच अशुभ बसत असून ऑस्ट्रिया व ग्रेटब्रिटन यांचेमध्यें कांहीं भानगड उत्पन्न होईल. आपलेकडे या ग्रहणकालची कुंडली विशेष चांगली बसत नाहीं व हें चंद्रग्रहण आपलेकडे अष्टमस्थानामध्यें बसत आहे यामुळें जरा मृत्युसंख्या वाढेल व शेअरचे भाव बसतील असें वाटतें.

(१३) सन १९२१ सालामध्यें खालील प्रमाणें ग्रहांचे पांच महत्त्वाचे युतियोग व्हावयाचे आहेत. त्यांमध्यें शनिगुरूंचा युतियोग हा फारच महत्त्वाचा आहे. कारण शनिगुरूंच्या या युतीनंतर पुन्हा युति सन १९४१ मध्यें वृषभ राशीच्या ८ व्या अंशामध्यें होईल.

तारीख ९ जानेवारीला **हर्शेलमंगळांची युति** मीनराशीच्या ३ अंश १० कलेमध्यें होईल. या युतिपूर्वीच रवि चंद्र संयोग होत असून त्या कुंडलीचे व्ययस्थानामध्यें ही युति घडत आहे. या युतीमुळें देशांत अत्या-

चार वाढून गुन्हे जास्त घडतील. मीन राशीच्या अमलाखालील प्रदेशामध्यें असंतोष उत्पन्न होईल.

तारीख २६ आगस्ट रोजीं **नेपच्युनमंगळांची** युति सिंह राशीच्या १४ अंश ११ कलेमध्यें होणार आहे. या युतीनंतर बराच असंतोष पसरेल व मजूरवर्गाची दैना होईल. जनावरांचा नाश होईल व देशांत रोगराई विशेष पसरेल व लहान मुलांची मृत्युसंख्या वाढेल.

तारीख १० सप्तेंबर रोजीं **शनिगुरूंची युति** कन्या राशीच्या २६ अंश २७ कलेमध्यें होणार आहे. ही ह्या वर्षामधील अत्यंत महत्त्वाची युति असून हिचीं फलें पुढें येणाऱ्या भावी १९४१ सालापर्यंत दृष्टोत्पत्तीस येतील. करितां या युतीचें वर्णन स्वतंत्रपणानें करण्याचें योजिलें आहे. शनिगुरूंची युति दर २० वर्षांनीं होत असते. मागें या दोन ग्रहांची सन १९०१ सालामध्यें मकर राशीमध्यें झाली होती.

तारीख १३ नोव्हेंबर रोजीं **शनिमंगळांची युति** तुला राशीच्या ४ अंश ८ कलेमध्यें होणार आहे. ही युति कर्कसंक्रमणकालीं होत असलेल्या रविमंगळांचे युतीच्या केन्द्रामध्यें होत असल्याकारणानें विशेष लक्षांत घेण्यासारखी आहे.

तारीख २७ नोव्हेंबर रोजीं तुला राशीच्या १२ अं. २९ कलेमध्यें गुरुमंगळांची युति होईल. ही युति आपलेकडे माध्यान्हीं वसत आहे व मेषसंक्रमण कालचे कुंडलीमध्यें षष्ठ स्थानामध्यें पडत आहे. व तारीख ८ एप्रिल रोजीं जें सूर्यग्रहण होत आहे त्याचे बरोबर प्रतियोग करीत असल्यामुळें या युतीनंतर आपल्याकडे एखादा रेलवे अपघात होईल. किंवा धार्मिक आचारविचार यांसंबंधानें खळबळ उडवून देणारी भानगड उत्पन्न होईल. किंवा एखादा धर्मगुरु मृत्यु पावेल. या युतीमुळें देशांत अस्वस्थता भासेल

व तिच्या मुळाशीं धार्मिक वेड असलेलें पाहण्यास मिळेल. इंग्लंड, चीन व जपान या देशांमध्यें या युतीमुळें अनिष्ट फलें पाहण्यास मिळतील.

जानेवारी १९२१ या महिन्यामध्यें गुरू व शनि हे ग्रह कन्या राशीमध्यें स्तंभी होतील. मंगळ हर्शलची युति मीन राशीमध्यें याच महिन्यामध्यें होणार असल्यामुळें मीनराशीच्या अमलाखालील प्रदेशाकडे जगाचे डोळे लागतील. पोर्च्युगालमध्यें धामधुम होईल. ही युति आपलेकडे रविचंद्रसंयोगकालचे कुंडलीचे व्ययस्थानामध्यें बसत आहे त्यामुळें चोऱ्या, मारामाऱ्या, दरवडे, वगैरे गुन्ह्यांची संख्या वाढेल, संप होतील. पंजाबमध्यें विशेष भानगड उत्पन्न होईल. कामकरी लोक यांच्यामध्यें असंतोष पसरेल. इलेक्ट्रिक लाईट किंवा इलेक्ट्रिक संबंधानें काम करणाऱ्यांमध्यें संपाची भीति वाटते. रेलवेवर भयंकर अपघात घडेल किंवा रेलवेमध्यें फार अत्याचार घडतील. लवकरच सरहद्दीकडील प्रदेशामध्यें कांहींतरी बरीच भानगड होईल. स्त्रियांची मृत्युसंख्या वाढेल. सांपत्तिक अडचणी भयंकर भासण्यास सुरवात होईल. नवीन करासंबंधानें कांहीं वाटाघाट होईल. किंवा नवीन कर्ज काढण्यासंबंधानें कांहीं बोलवा होईल. ब्याँका आपला व्याजाचा दर वाढवितील.

फेब्रुवारी सन १९२१—या महिन्यामध्यें सट्ट्याच्या व्यवहारामध्यें फसवाफसवीचे व्यवहार झालेले उघडकीस येतील. नवीन दिवाळखोर लबाड कंपन्या निघण्याचा पुष्कळ संभव आहे. नाण्याची व बँकांची त्रेधा उडेल. जानेवारी महिन्याच्या शेवटल्या आठवड्यापासून शेअरमार्केट फसवून तेजीकडे नेण्याचा प्रयत्न होईल. परंतु पुढें याचा परिणाम फारच अनिष्ट घडणार आहे. या महिन्यामध्यें टेलिग्राफीसंबंधानें महत्त्वाची सुधारणा झालेली पाहण्यास मिळेल. पोर्च्युगालमध्यें राजकीय वातावरण क्षुब्ध राहील. या महिन्यामध्यें जमीन, घरेंदारें यांच्यासंबंधानें भानगड झालली पाहण्यास मिळेल. वेळेस

त्यांच्या किंमती उतरतील. बऱ्याच ठिकाणीं अग्निप्रलय होईल. लंडनमध्यें खाणींत काम करणारे लोक पुन्हां सरकाराविरुद्ध चळवळ करूं लागतील व तेथील राजकीय पक्षास हा महिना अनिष्ट आहे. गोंवर, देवी व प्लेगचा आजार यांची या महिन्यांत सुरुवात होण्याची धास्ती वाटते. रशियामध्यें खून, मारामाऱ्या होऊन फार वाईट स्थिति होईल. आयर्लंडमध्येंही याच महिन्यांत कांहीं भानगड होईल.

मार्च सन १९२१—या महिन्याचे तारीख ९ रोजीं होत असलेल्या रविचंद्र संयोगकाळचे कुंडलीमध्यें दशमांत शनिगुरू बसत असून रविचंद्र चतुर्थांमध्यें बसत आहे. ही स्थिति विचार करण्यासारखी आहे. प्रजापक्ष व राजपक्ष यांचे मध्यें तीव्र मतभेद दिसत आहे. अधिकारी व राजवर्ग यांची स्थिति फारच अनिष्ट दर्शविली जात असून चांगल्या अधिकारी पुरुषांचे मृत्यु घडतील. देशांतील चांगल्या श्रीमंत किंवा पेढीवाल्या माणसांचे मृत्यु घडतील. एकंदर देशांत असंतोष पसरेल. जमिनीच्या किंमती एकदम उतरतील. घरवाले व भाडेकरी यांचा झगडा तीव्रपणानें वाढेल व रेन्ट ॲक्टमध्यें सुधारणा होतील. घर व जमीन यांवर एखादा नवीन कर लादला जाण्याबद्दल बरीच गडबड होईल व त्यामुळें देशांतील वर्तमानपत्रांना हा एक नवीन विषय होईल. या महिन्यामध्यें घरें कोसळल्यामुळें किंवा इलेक्ट्रिसिटीमुळें किंवा खाणीमध्यें पुष्कळ अपघात पाहण्यास मिळतील. लहान पोरांमध्यें गोंवर व देवी यांची सांथ चालू राहील व त्यांची मृत्यु संख्या वाढेल. या महिन्याच्या १२ ते १९ तारखेच्या सुमारास तुर्की राष्ट्रासंबंधानें कांहींतरी किटाळ आणखी उत्पन्न होईल. लंडनमध्यें कोळशाच्या खाणीमध्यें काम करणारे लोक व सरकार यांचेमध्यें खटका उडण्याचा पुष्कळ संभव दिसतो. त्याचप्रमाणें राजकारणासंबंधानें बरीच टीका होऊन अस्वस्थता माजेल व त्यामुळें कॅबिनेट

मधील एखादा राजमंत्री राजीनामा देईल. या महिन्यामध्यें देशांतील सांपत्तिक स्थिति बरोबर नाहीं. करावद्दल कांहीं सुधारणा होऊन नवीन करासंबंधानें बाच्यता होईल, व धान्य व वस्त्र यांवर कर बसण्याचा पुष्कळ संभव आहे. आमचेकडील व्यांकांना हा महिना अनिष्ट दिसत आहे.

एप्रिल सन १९२१—या महिन्यामध्यें तारीख ८ रोजीं सूर्यग्रहण असून तारीख २२ रोजीं चंद्रग्रहण होणार आहे. यामुळें इंग्लडवर बऱ्याच आपत्ति कोसळतील. तेथील राजकीय वातावरण बरेंच क्षुब्ध झालेलें पाहण्यास मिळेल. मंत्रिमंडळ बदलण्याचा पुष्कळ संभव वाटतो. फ्रान्स, मुंबई, मोरोक्को येथें बऱ्याच भानगडी उत्पन्न होतील. हिंदुस्थानामध्यें या महिन्यांत धरपकड होण्याची पूर्ण चिन्हें दिसत आहेत, बरेंच लोक तुरुंगांत टाकण्यांत येतील. सर्व हिंदुस्थानभर नाण्याची अति टंचाई भासेल. सांपत्तिक दृष्ट्या हा महिना फारच वाईट दिसत आहे. पोर्च्युगाल व तुर्कस्थान यांचे राजकारणामध्यें खळबळ उडेल. इजिप्तमध्यें अत्याचार झालेले पाहण्यास मिळतील. इंग्लडमध्यें देखील हा महिना सुखाचा जाईल असें दिसत नाहीं. अमेरिकेबरोबर झालेल्या तहासंबंधानें कांहीं तरी वादविवाद माजेल. व्यापार धंदा चांगला चालणार नाहीं. कामगार लोकांमध्यें असंतोष पसरेल. अमेरिका व जपान यांचा खटका लवकरच जुंपुन युद्धास तोंड लागतें किंवा काय हें पाहणें आहे. या महिन्यामध्यें एखादा चांगला वर्तमानपत्रकार, लेखक किंवा वक्त्याचा मृत्यु घडेल. दिवाळ्यांची सांथ न पसरो म्हणजे मिळविलें. असें वाटण्याचा काळ आला आहे. वर्तमानपत्रकारांस हा महिना जाचक जाईल. शेअरमार्केटची स्थिति फारच शोचनिय होणार आहे. व त्यामुळें कांहीं दलाल आत्महत्या करतील किंवा श्रीमंत लोकांचे मृत्यु घडतील.

मे सन १९२१—तारीख ८ रोजीं रविचंद्र संयोग होईल. त्या काळीं हर्शल लग्नांत उदय पावत असून सप्तमामध्यें शनिगुरु बसत आहेत. तृतियस्थानामध्यें असलेला मंगळ या दोनग्रहांबरोबर केंन्द्र योग करण्यास जात आहे. परराष्ट्राबरोबर होणाऱ्या व्यापारा संबंधानें कांहीं भानगड उत्पन्न होईल असें दिसतें. रेलवेवर एखादा मोठा अपघात घडेल. चालू रविचंद्र संयोग तृतीयस्थानाच्या भावारंभीं होत असून शनीबरोबर शुभसंबंधित असल्यामुळें पोष्टांतील नोकरां संबंधानें कांहीं समाधान कारक सुधारणा होईल, व तार व ट्रामवे मधील लोक संप करण्याची पुष्कळ धास्ती वाटते. या दृष्टीने तारीख २० ते २३ पर्यंचा काळ विचार करण्या सारखा आहे. धन स्थानामध्यें शुक्र बसत असल्यामुळें या महिन्यामध्यें देशांतील सांपत्तिक स्थिति बरी राहील. या महिन्याच्या शेवटल्या आठवड्यामध्यें शेअरमार्केट तेजीमध्यें आलेलें पाहण्यास मिळेल.

तारीख २५ रोजीं रवि आर्द्रानक्षत्रामध्यें प्रवेश करील. **आर्द्राप्रवेश-कालीं** धनुराशीचा ११ वा अंश उदय पावत आहे. दशमांत शनि व सप्तमांत बुध मंगळ येत आहेत. चतुर्थभावारंभीं मीन राशीचा १७ वा अंश उदय पावत आहे. चंद्रबुधामध्यें शुभसंबंध होत असून चतुर्थेश गुरु हा हर्शल बरोबर प्रतियोग करीत आहे. सन १९२१ मध्यें प्रथमतः साधारण पाऊस चांगला पडेल. परंतु नंतर सप्तेंबर महिन्यामध्यें फार पाऊस पडेल. पाऊसाची सुरवात मेच्या २४ । २५ तारखेस होईल. एकंदर विचार करितां पाऊस बरा पडेल परंतु पिकें चांगली हातीं येतील असें वाटत नाहीं. यंदा तुफानी वारे विशेष वाहतील. व वादळें सडकून होतील.

जून सन १९२१—तारीख ६ जून रोजीं रविचंद्र संयोग होणार आहे. या कुंडली इतकी भयंकर ग्रहस्थिति असलेल्या कुंडल्या फारच क्वचित

पाहण्यास मिळतात. या कुंडलींतील ग्रहस्थिति फारच अनिष्ट आहे. रविचंद्र, मंगळ, हर्शल, गुरु व शनि असे सहा ग्रह थोडक्याच अंशांच्या फरकानें परस्परांशीं अनिष्ट योग करीत असून हे सर्व योग लग्न, सप्तम व दशम या तीन केन्द्रांमधून होणार आहेत. देशांत भयंकर अस्वस्थता भासेल, मृत्युसंख्या जास्त वाढेल, ताप व न्यूमोनिआ यांचा भयंकर फैलाव होऊन टायफॉईड फीव्हरची सांथ पुष्कळ जोरांत चालण्याचा संभव आहे. कदाचित् कॉलरा व संग्रहणीच्या विकाराची सांथ पसरेल. सर्व अनिष्ट योग द्विस्वभाव राशींमधून होत आहेत त्यामुळें हवेमध्यें भयंकर वारंवार फेरफार होतील. वादळें फार होतील, तुफानी वारे जोरानें चालतील, पाऊसही जास्तच पडेल, मृत्युसंख्या वाढेल. या महिन्यामधील ग्रहस्थितीचा विचार करितां हिंदुस्थानामध्यें रक्तपात, मनुष्यहानी होऊन सर्व देश संकटामध्यें बुडून जाईल. सरकार, पुढारी व जनता यांनीं अत्यंत सावधगिरीनें वागलें पाहिजे. माथेफिरूपणा टाकला तरच रयतेची धडगत लागणार आहे. गुप्त शत्रूच्या स्थानामध्यें नेपच्युन असल्यामुळें हिंदुस्थानामध्यें या महिन्यांत बोलसेव्हीझमची छाया दिसूं लागेल. धर्मवेडाच्या लहरींत बरेच लोक वहात जातील. हा महिना अत्यंत धामधुमीचा, असंतोषाचा व प्रक्षोभाचा जाईल.

जुलई सन १९२१ तारीख ८ रोजीं होणाऱ्या रविचंद्र संयोगकालचे कुंडलीमध्यें सप्तमस्थानीं मंगळ, रवि, चंद्र व बुध असे चार ग्रह बसत आहेत. सप्तमस्थानाचा संबंध परराष्ट्राबरोबरील दळणवळण, युद्धें, आपसांतील यादवी, परराष्ट्रीय व्यापार, विवाहसंस्था यांबरोबर असल्यामुळें या महिन्यामध्यें वरील गोष्टींमध्यें भानगडी उत्पन्न होतील. हिंदुस्थान सरकार या योगामुळें लढाईच्या धामधुमीमध्यें गुतेल. राजकारणामध्यें महत्त्वाचा भाग घेणाऱ्या स्त्रीचा मृत्यु या महिन्यामध्यें होईल. साऊथ आफ्रिकेसंबंधानें कांहीं भानगड उत्पन्न होईल.

त्याचप्रमाणें फिजी बेटाकडील स्त्रियांवरील अत्याचारासंबंधानें व करारबंद मजुरांसंबंधानें काहीं चळवळ होण्याचा रंग दिसत आहे. या महिन्यामध्यें सांपत्तिक अडचण भयंकर भासेल व त्यामुळें ब्यांका व व्यापारी वर्ग यांची फार त्रेधा उडेल. एकंदरींत हा महिना अत्याचार, अस्वस्थता व क्षोभकारक जाणार खास. देशांत रोगराई पसरेल, डॉयफॉईड फीव्हरची सांथ येण्याची भीति आहे. देवी व गोंवर यांची साथही राहील. या महिन्यामध्यें आगी लागण्याची पुष्कळच भीति आहे. पाऊस चांगला पडल.

ऑगस्ट सन १९२१ तारीख ३ च्या रात्रीं सिंह राशीमध्यें रविचंद्रसंयोग होईल त्यावेळीं कर्कसंक्रमणाप्रमाणेंच राज्यसुखनामध्यें हर्शल बसत आहे. तृतीय स्थानामध्यें रवि, चंद्र, मंगळ, नेपच्युन असे चार ग्रह सिंहराशीमध्यें आहेत. यामुळें रेलवे अपघात व अत्याचार फार झालेले पाहण्यास मिळतील. प्रवासाच्या दृष्टीनें हा महिना अत्यंत अनिष्ट आहे. पोष्ट, टेलिग्राफ, टेलिफोन यांचाही विचार याच स्थानावरून होतो म्हणुन या खात्यामध्यें कांहीं गडबड होईल. विशेषतः टेलिग्राफ व टेलिफोन कंपन्यांमधील स्त्रियांसंबंधानें कांहीं विचित्र प्रकार उघडकीस येतील. ही ग्रहस्थिति वर्तमानपत्रकाराचा मृत्यु दर्शविते. एखाद्या स्त्रीसंपादिकेचा मृत्यु या महिन्याच्या २० ते २९ तारखेपर्यंत व्हावा असें वाटतें. लवकरच या महिन्यामध्यें विमानांचा सुकाळ झालेला पाहण्यास मिळेल. किंवा एखादी मोठी विमानाची शर्यत झालेली पाहण्यास मिळेल. या महिन्यामध्यें अनाचार फार होतील व अनीतीच्या संबंधापासून जन्म पावणाऱ्या मुलांची संख्या विशेष पाहण्यास मिळेल व त्यासंबंधानें वर्तमानपत्रांमधून उघडपणें चर्चा होईल. शिक्षणविषयक चांगल्या गोष्टी घडतील. दशमांतील हर्शल राज्यकारभारासंबंधानें विलक्षण चळवळ उपस्थित करील व अधिकारी वर्गास स्वस्थता लाभूं देणार नाहीं. त्यांचे विरुद्ध कडक लेख प्रसिद्ध झालेले पाहण्यास मिळतील.

फ्रान्स, मेक्सिको, अमेरिका, इटली व रुमानिया या प्रदेशांमध्यें कांहींतरी भानगड उत्पन्न होईल. कालिफोर्निआ व ग्रीसिअन आरचिपेलागोमध्यें बराच मोठा भूकंप झालेला पाहण्यास मिळेल. तारीख ११ च्या सुमारास भयंकर मोठें वादळ होईल व त्यानंतर भयंकर तुफानी वारे सुटतील. या महिन्यामध्यें पाऊस पुष्कळ पडेल व त्यामुळें पिकांची नासाडी होण्याचा संभव आहे.

सप्टेंबर सन १९२१ हा महिना अनेक दृष्टीनीं फार महत्त्वाचा आहे. तारीख २ रोजीं सकाळीं रविचंद्रसंयोग होणार आहे. या संयोग कालचे कुंडलीमध्यें व्यवस्थानामध्यें रवि, चंद्र, बुध शनि, व गुरु असे पांच ग्रह बसत आहेत. रविचंद्रसंयोग षष्ठस्थानामध्यें असलेल्या हर्शलबरोबर प्रतियोग करीत आहे. मंगळ नेपच्यूनची युति लाभस्थानामध्यें होत आहे. तारीख दहा रोजीं शनिगुरूंचा अनेक वर्षांनीं होणारा संयोग युतिकाळच्या कुंडलीमध्यें लाभस्थानामध्यें होत आहे. एकंदरींत ही स्थिति फारच विचित्र आहे खास. हिंदी प्रजेवर युद्ध खर्च, नवीन कर्ज, आरमाराचा नवीन वाढता खर्च इत्यादि खर्चाचे बोजे व करांचें ओझें एकसारखें लादण्यांत येईल. कायदेकौन्सिलाची स्थिति अजागळ स्तनासारखी ठरेल. देशांत रोगराई पसरेल. पाऊस फार पडून खात्रीनें पिकांची नासाडी होईल. देशांत टॉयफॉईड, कॉलरा किंवा संग्रहणीचा उपद्रव होईल. तुरुंगाची स्थिति सुधारण्यासंबंधानें कांहीं कायदे पास होतील. त्याप्रमाणें या महिन्यामध्यें तुरुंगामध्यें भयंकर अत्याचार घडतील. तुर्की साम्राज्याची कठीण अवस्था होण्याचा प्रसंग येत आहे. मेसापोटामिया-संबंधानें व हिंदुस्थानासंबंधानें लवकरच कांहीं आणखी सुधारणा मोठ्या प्रमाणावर करण्यास घेणें भाग पडेल. या महिन्यामध्यें पोर्च्युगाल व जपानमध्यें कांहींतरी मोठी भानगड उत्पन्न होईल.

आक्टोबर सन १९२१—या महिन्यामध्यें तारीख १ ली रोजीं जो रविचंद्रसंयोग होत आहे तें सूर्यग्रहण असून दक्षिण गोलार्धामध्यें दिसेल.

या वेळीं रवि, चंद्र, गुरु सप्तमस्थानामध्यें येत आहेत. षष्ठस्थानामध्यें असलेली शुक्रमंगळांची कन्या राशीमधील युति व्ययस्थानामध्यें असलेल्या हर्शलबरोबर प्रतियोग करीत आहे. त्यामुळें मजूरवर्गामध्यें मोठ्या प्रमाणावर संप होऊन मिल इन्डस्ट्री बंद पडण्याचा संभव दिसतो. याच महिन्यामध्यें एखाद्या प्रसिद्ध लेखकाचा मृत्यु होईल. याचमहिन्यांत तारीख १७ रोजीं म्हणजे १६ व्या पांहटेस चंद्रग्रहण होणार आहे. त्या वेळीं आपलेकडे हें ग्रहण अष्टमस्थानामध्यें येत आहे. त्यामुळें मृत्युसंख्या वाढेल. तारीख १९ डिसेंबरच्या सुमारास लोकपक्षामधील एखादी प्रसिद्ध व्यक्ति अस्तंगत होईल. देशामधील सांपत्तिक स्थिति फारच निराशाजनक भासेल. नाण्याची टंचाई, हिंदी व्यापाऱ्यांना नडणारे हुकूम व निर्बंध, भयंकर सरकारी अस्ताव्यस्त खर्च वगैरे गोष्टी या महिन्यामध्यें प्रमुखपणानें घडतील.

नोव्हेंबर १९२१:—तारीख ३० ऑक्टोबर रोजीं होणाऱ्या रविचंद्रसंयोगकालीं मंगळ, गुरु व शनि असे तीन ग्रह व्ययस्थानीं आहेत. हा महिना हिंदुस्थानामधील व्यापारी वर्गास अत्यंत कठीण जाईल. पूर्ण केंद्रींच शुक्रगुरूंची युति उदित असल्यामुळें या महिन्यामध्यें शुक्रविषयक गोष्टी पुष्कळ होतील. राजघराण्यामध्यें लग्न होईल. रवि, चंद्र बुध, हे तीन ग्रह हर्शलबरोबर त्रिकोण दृष्टियोग करीत आहेत त्यामुळें वाङ्मय, राजकारण, शास्त्रीय शोध यांस हा महिना चांगला जाईल. परंतु व्ययस्थानामधील शनिमंगळ देशांत अस्वस्थता दर्शवीत आहेत. या महिन्यामध्यें पहिल्या पंधरा दिवसांमध्यें धान्य वगैरेंचे भाव चांगलेच वाढलेले पाहण्यास मिळतील. या महिन्यामध्यें तीन मोठाले ग्रह तुला राशीमध्यें एकत्र होत आहेत त्यामुळें **जपान** व **आस्ट्रिया**कडे जगाचे डोळे लागतील. आपल्याकडील सांपत्तिक स्थितीला हा महिना चांगला नाहीं. ब्याँकांना हा महिना अनिष्ट दिसत आहे. चालू महिन्यामध्यें वक्री असलेला वृश्चिक राशीमधील बुध हा फार

कडक व जहाल लेख प्रसिद्ध होतील असें दर्शवीत आहे, व कायदेकौन्सिलासंबंधानें कांहीं तरी नवीन भानगड उत्पन्न करील खास.

डिसेंबर १९२१:—तारीख २९ ऑक्टोबर रोजीं होणाऱ्या रविचंद्रसंयोगकाळीं षष्ठस्थानामध्यें असलेले रविचंद्र, गुरु, शनि व मंगळ यांबरोबर शुभसंबंधित आहेत यामुळें देशामध्यें मजूरवर्गामध्यें विशेष चळवळ व संप निर्माण होतील व त्यांचें कार्यक्षेत्र विशेष चांगल्या प्रमाणावर रेखाटण्यांत येईल. मजूरवर्गाची स्थिति चांगली राहील व त्यांचें सामर्थ्य वाढेल. या महिन्यामध्यें शिक्षणासंबंधानें विशेष सरकारी कायदे किंवा कानू निर्माण होतील. व त्यामुळें समाजामध्यें बरीच खळबळ उडेल. नवीन धर्तीवर चालणाऱ्या व धंदेशिक्षण व विशेषत: यंत्रकला शिकविणाऱ्या शाळा उघडतील. देशांतील अन्नवस्त्रांसंबंधानें कांहीं निर्बंध उत्पन्न व्हावेत असें वाटतें. धान्य व नित्य संसारास लागणाऱ्या सर्व वस्तूंचे भाव वाढतील. या महिन्यामध्यें रेलवे व पोष्ट या संबंधानें कांहीं तरी गडबड होईल. पेट्रोल, रॉक ऑईल यांचा तुटवडा या महिन्यामध्यें विशेष भासेल व त्यामुळें त्यांच्या किमती वाढतील. या महिन्यामध्यें इंग्लंडमधील राजकीय वातावरणामध्यें बरीच खळबळ उडेल असें वाटतें. युद्धासंबंधानें बोलणें सुरू होईल. गुरुमंगळांची युति या महिन्यामध्यें तुलाराशीमध्यें होत असल्यामुळें **जपान** किंवा चीन संबंधानें भानगड चालेल.

सन १९२१ सालांतील मंगळाचा अनिष्टपणा.

सन १९२१ सालांत विशेष लक्षांत येणारी गोष्ट म्हणजे मेदिनीय कुंडल्यांतील मंगळाची स्थिति ही होय. चारही संक्रमणकाळीं त्याचप्रमाणे बहुतेक रविचंद्रसंयोगकाळीं मंगळ प्रमुखपणानें पीडित असलेला आढळतो. ह्या पीडित मंगळाची फलें काय आहेत याचें आम्हीं मागेंच दिग्दर्शन केलें आहे. अशा प्रकारची मंगळाचीस्थिति क्वचितच दिसून येते. सन १९२१ सालच्या कुंडल्यांमध्यें मंगळग्रह पुढें दिल्याप्रमाणें दिसत आहे:—

		स्थान	योग
मकरसंक्रमण		तनुस्थान	चंद्रमंगळ केंद्रयोग; नेपच्यून प्रतियोग.
मेष	"	व्ययस्थान	
कर्क	"	तनुस्थान	रवि–मंगळ युति.
तुला	"	पंचमस्थान	हर्शल–मंगळ प्रतियोग.
रविचंद्रसं.	जानेवारी	व्ययस्थान	हर्शल–मंगळ युति.
"	फेब्रुवारी	धनस्थान	शनि-मंगळ व गुरु-मंगळ प्रतियोग.
"	एप्रिल	नवमस्थान	नेपच्यून–मंगळ केंद्रयोग.
"	मे	तृतीयस्थान	गुरु–मंगळ केंद्रयोग.
"	जून	दशम	रवि–चंद्रांबरोबर युति व गुरुशनीबरोबर युतियोग.
"	जुलै	सप्तमस्थान	(कित्ता)
"	सप्टेंबर	लाभस्थान	नेपच्युन-मंगळ युति.
"	ऑक्टोबर	षष्ठस्थान	हर्शल–मंगळ प्रतियोग.
"	नोव्हेंबर	व्ययस्थान	
"	डिसेंबर	पंचमस्थान	शनि–मंगळ युति.
चंद्र ग्रहण काळीं		दशमस्थान.	

वर दिलेल्या यादीवरून मंगळ फक्त मार्च व आगष्ट या महिन्यांखेरीज पीडित आहे, निदान व्ययस्थान किंवा राजभुवन पीडित करीत आहे असें दिसून येईल. मंगळ इतर ग्रहांबरोबर जे योग करीत आहे ते सर्व प्रक्षोभकारक आहेत. इतके प्रक्षोभकारक योग एकापाठीमागून एक असे होत असल्यामुळें युद्धें अत्याचार, अपघात, अग्निप्रळय, दरवडे व दंगेधोपे यांची १९२१ त रेलचेल उडेल.

ड्यूक ऑफ कनॉट.

सायन लग्न.



सन १९१९ च्या रिफार्म ॲक्टाप्रमाणे लेजिस्लेटिव्ह असेंब्ली व कौंसिल आफ स्टेट यांची स्थापना करण्याकरितां **ड्यूक ऑफ कनॉट** हे हिंदुस्थानांत येण्यास निघाले आहेत. व ते तारीख १० जानेवारी सन १९२१ रोजीं **मद्रासेस** येऊन पोंचतील असें प्रसिद्ध करण्यांत आलें आहे. ड्यूक ऑफ कनॉट यांची कुंडली वर दिली आहे. ड्यूक साहेबांचा तनुस्थानाचा

अधिपति चंद्र हिंदुस्थानाच्या तनुस्थानीं म्हणजे मकर राशींत असून तो रवि-गुरूबरोबर शुभदृष्टियोग करीत आहे. या योगामुळें ड्यूक ऑफ कनॉट यांना, ब्रिटिश मंत्रिमंडळानें आपल्या स्वार्थी मनाचा मोटा हिय्या करून हिंदुस्थानास जी 'जबाबदार' (?) राज्यपद्धति देऊं केली आहे तिची मुहूर्तमेढ रोंवण्याचें काम करावें लागत आहे. ड्यूक ऑफ कनॉट यांच्या कुंडलींत हिंदुस्थानाच्या तनुस्वामी शनि नीच राशींत असून नीच मंगळाकडून दूषित झाला आहे. अर्थातच हिंदुस्थानाची स्वराज्याची आकांक्षा या वेळच्या होणाऱ्या प्रयत्नानें अल्पांशानेंही पुरी होणार नाहीं हें उघड आहे. बादशहांच्या कुंडलींत हिंदी राष्ट्राचा कारक शनि उच्च आहे तेव्हां त्यांच्याच कारकीर्दीत हिंदुस्थान आपला उच्च दर्जा मिळवील हें खास पण ती वेळ आज आली नाहीं.

ड्यूक ऑफ कनॉट मद्रासेस प्रथम पोंचतील. मद्रास मेषराशीखालीं आहे तेथेंच ड्यूक साहेबांचा शनि आहे. परिभ्रमणाचा मंगळ मेष राशींत मूळच्या शनीजवळ येत आहे त्यामुळें मद्रासेहून दौऱ्याचा आरंभ होण्यांत ज्योतिषशास्त्रदृष्ट्या बरा दिसत नाहीं. ड्यूक साहेबांचें प्रकृतिस्वास्थ्य बरोबर रहाणार नाहीं असें वाटतें. त्यांच्या कुंडलींत चलित रविगुरूंचा तृतीय एकादश योग चालू आहे ही समाधानकारक गोष्ट आहे. या योगावर त्यांचा प्रवास सुखकारक होवो .

राम नारायण.

॥ श्रीसद्गुरवे नमः ॥

ज्योतिर्माला

आप्राचः कामरूपाद्द्रुहिणसुतनदप्लाविताद्दामतीचो
गान्धारात् सिंधुसाद्रांद्रघुवररचिताद्दाक्षसेतोरवाचः ।
आकेदारादुदीचस्तुहिनगहनतः सन्तिविद्वत्समाजा
ये ये तानेष यत्नः सुखयतु समजान्कश्चमत्कर्तुमीष्टे ॥ १ ॥

अभिनवाऽऽवृत्ति वर्ष ६ वें अंक ३, ४.

राष्ट्रीय ज्योतिषाचा अभ्यास.

लेखक.—राम नारायण

(लेखांक १ ला.—राशींचा अधिकार.)

ज्योतिषशास्त्रदृष्ट्या राष्ट्रीय भवितव्यतेचा विचार कसा करावा यांचें दिग्दर्शन आम्हीं "मेदिनीय किंवा राष्ट्रीय ज्योतिष" या पुस्तकांत करून मराठी वाचकांच्या समोर ठेविल्यास बरेच दिवस झाले. ज्योतिर्मालेच्या पहिल्या वर्षापासून तों आतांपर्यंत वरील पुस्तकांत स्वीकारलेल्या पद्धत्यनुसार राष्ट्रीय भविष्यें करण्यांत आलीं आहेत व त्यांची सत्यताही वाचकांस दिसून आलीच असेल. ज्योतिर्मालेंत येणारीं भविष्यें खरीं झाल्याबद्दल अनेक वाचकांनीं आनंद प्रदर्शित केलेला आहे. अनेकांस राष्ट्रीय भविष्यें वाचतांना

कुतूहल वाटतें, तीं खरी ठरल्याबद्दल समाधानही होतें. परंतु भविष्यपद्धति पूर्णावस्थेस येण्यास जी चर्चा होण्याची आवश्यकता आहे त्यासंबधानें मात्र म्हणण्यासारखी आस्था दिसून येत नाहीं. नाहीं म्हणावयास वाचकवर्गापैकीं चारपांच जणांशीं कांहीं प्रश्नांसंबंधानें चर्चा झाली. त्याच प्रमाणें ज्योतिर्मालेच्या गेल्या डिसेंबर जान्युआरीच्या अंकांत अकलूज येथील सायनज्योतिर्मंदिराध्यापक रा. रा. मोहोळकर यांच्या व्याखानाचा सारांश 'नेपच्युनचें भ्रमण' ह्या मथळ्याखालीं प्रसिद्ध केला आहे त्यामध्यें 'मेदिनीय ज्योतिष' पुस्तकांत दिलेल्या हिंदुस्थानांतील प्रांतांच्या व शहरांच्या राशींवरून भविष्यें केलेलीं आहेत. यावरून थोड्या लोकांस कां होईना राष्ट्रीय ज्योतिषाच्या पद्धतीकडे लक्ष्य घालावेसें वाटतें ही समाधानाची गोष्ट आहे. रा. मोहोळकरानीं ज्या थोड्याशा शहरादिकांच्या राशींचा भविष्य विचारांत जसा उपयोग केला आहे तसाच त्यांनीं व इतरांनीं उपयोग करून सत्यनिर्णय करावा म्हणून आज कांहीं प्रांतांच्या व शहरांच्या राशींचा विचार करण्याचें योजिलें आहे.

१ आसाम—वृश्चिक.

गेल्या सालीं बरेच महिने आसाम देशांत घालविले त्या वेळीं पुढील गोष्टी अवलोकनांत आल्या:—

(१) प्रदेश डोंगराळ व दलदलीचा, पाणी विपुल, हिंदुस्थानांत अतिशय पाऊस पडत असेल तर तो आसामांत, अफाट ब्रह्मपुत्रा नद व त्याला मिळणाऱ्या अनेक नद्या यांमुळें जलसंचय विपुल.

(२) लोक हिंदी आर्य व मंगोलियन यांच्या मिश्रणाचे, हाडापेरानें मजबूत, अतिशय मांसाहारी, अफिणबाज व कैफी, रुधिरप्रिय, डोंगर व पहाड यांमध्यें रहाणाऱ्या कांहीं जाती गुरख्यांच्या वळणावर ठेंगु परंतु लठ्ठ, असुरप्राय भयंकर स्वरूपाच्या आहेत. लोक लढवय्ये व क्रूर आहेत.

(३) भूकंपाचे धक्के नेहमीं बसतात व त्यामुळें मजल्याचीं घरें करीत नाहींत.

(४) विषारी जनावरें व कृमिकीटक यांचा सुळसुळाट.

(५) आसाम देश मंत्रतंत्र, जादुटोणा व शाक्तधर्म यांचें माहेरघर समजतात,

वर दिलेल्या कारणांवरून आसामदेश वृश्चिक राशीच्या अंमलाखालीं असला पाहिजे असें आम्हांस वाटतें.

२ काश्मीर—सिंह.

काश्मीर देश पहाडी व डोंगराळ असून सृष्टिसौंदर्याबद्दल फार प्रसिद्ध आहे. त्याच प्रमाणें केशर, लोंकर व लोंकरी वस्त्रें यांबद्दलही प्रसिद्ध आहे. या कारणांमुळें सिंह राशीचा अंमल या देशावर असावा. ब्रिटिशांनीं हा प्रांत पहिल्या शीख युद्धानंतर एक कोटि रुपयांस विकला व त्यासंबंधाचे करार मदार अमृतसर येथें ता. १६ मार्च १८४६ रोजीं करण्यांत आले. त्या वेळीं गुरु वृषभ राशींत म्हणजे दशम भुवनांत होत असल्यामुळें काश्मीरचें संस्थान एक कोटि रुपये घेऊन ब्रिटिशांनीं अस्तित्वांत आणिलें.

अमृतसर—मेष.

जालियनवाला बागेंतील अमानुष कत्तलीमुळें सर्व जगांत महशूर पावलेलें अमृतसर शहर मेष राशीच्या अंमलाखालीं असलें पाहिजे असें अंगावर शहारा येण्यासारख्या गोष्टी घडल्या त्या वेळची ग्रहस्थिति लक्ष्यांत घेतली असतां दिसून येईल. ही ग्रहस्थिति पुढें लिहिल्याप्रमाणें होती.

ता. १०—४—१९ रोजीं डॉ. सत्यपाळ व किश्चिलु यांच्या हद्दपारीची बातमी शहरांत पसरली व त्यामुळें बरीच चळवळ उडाली. कांहीं लोक हद्दपारीबद्दल अधिकाऱ्यांपाशीं दाद मागण्याकरितां गेले असतां त्यांच्यावर गोळीबार करण्यांत आला. त्याच दिवशीं नॅशनल बँक, पोस्ट ऑफीस व

टाउनहॉल वगैरे इमारती लोकांकडून जाळण्यांत आल्या. दुसऱ्या दिवशीं लष्करी कायदा पुकारण्यांत आला. ता. १३ रोजीं जालियनवाला बागेंत सभेसाठीं जमलेल्या लोकांवर गोळीबार करून बायकामुलांचीही कत्तल झाली. ता. १० ते १३ चीं ग्रहस्थिति येणें प्रमाणें:—

	रवि	चंद्र	मंगळ	गुरु	शनि	हर्शल	नेपच्युन
ता १०	मेष	सिंह	मेष	कर्क	सिंह	मीन	सिंह
	२०.	२०.	२७.	९.	२२. व.	१.	७.
ता.१३.	२३.	तूळ३.	२९.	९.	२२. व.	१.	७.

ता. १० पासून १३ पर्यंतचे गोचर ग्रह. वर्षकुंडली व १ एप्रिल रोजीं झालेल्या रवि—चंद्र संयोग काळचे ग्रह यांशीं ताडून पहातां घडलेल्या गोष्टींचा चांगलाच मेळ पडतो. वर्षकुंडलींत वृश्चिक राशींतील तनु स्थानीं असलेला चंद्र, राजभुवनांतील बादशाही राशींतील शनीबरोबर केंद्रयोग करीत आहे व दोन्ही ग्रहांबरोबर चतुर्थस्थानांतील हर्शल अशुभयोग (केंद्र व प्रतियोग) करीत आहे. ह्या योगावर राजकीय वातावरण प्रक्षुब्ध झालें व सत्याग्रहाची चळवळ सुरू झाली. राजकीय वातावरण प्रक्षुब्ध करणाऱ्या योगाच्या पाठोपाठ १ एप्रिल रोजीं झालेल्या रवि—चंद्र—संयोग कालीं विशेष लक्ष्यांत ठेवण्यासारखा एक योग झाला होता तो योग म्हणजे वर्ष कुंडलींतील मंगळावर म्हणजे मेषेच्या १२ व्या अंशाजवळ रवि—चंद्र—संयोग झाला व या संयोगकाळीं मंगल ग्रह रविचंद्रांच्या युतींतच होता. हा योग रक्तपाताचा खास कारक असल्याबद्दल शंकाही घेण्याचें कारण नाहीं. वर्ष कुंडलींतील राजकीय वातावरण प्रक्षुब्ध करणारा योग व त्यानंतर एप्रिल महिन्यांत होणारा रक्तपात दर्शक योग हे लक्ष्यांत घेऊन ता. १० ते १३ पर्यंतची गोचर ग्रहांची स्थिति पाहूं. हर्शलनें पंजाबच्या तनुस्थानांत प्रवेश

केल्यावर ता. १० रोजीं चंद्र वर्ष कुंडलीच्या राजभुवनांतील शनीशीं युक्त असतां पंजाबच्या अधिकारी वर्गानें डा. सत्यपाल व किश्चिलु यांना हद्दपार केलें त्याच दिवशीं रवि—चंद्र संयोग काळच्या **मंगळावर** म्हणजे मेषेच्या २० व्या अंशांत गोचर रवि आला व गोळीबारास सुरुवात झाली व दुसऱ्या दिवशीं लष्करी कायदा अंमलांत आला. यानंतर रवि—चंद्र—संयोग काळच्या तनुस्थानाच्या तंतोतंत केंद्रांत मंगळ दाखल झाला. अशा ग्रहस्थितीवर अमृतसर येथें ता. १३ रोजीं सायंकाळीं पांच वाजून १९ मिनिटांनंतर म्हणजे रक्तपातदर्शक रवि—मंगळ सप्तमांत असतां जालियनवाला बागेंतील सभेवर बंदुकीच्या गोळ्या सुटूं लागल्या. वर दिलेल्या योगांचा विचार करतां **मेष** राशींतच रवि—चंद्र संयोग काळच्या मंगळाशीं युक्त होणारा गोचर रवि व उदित अंशाशीं तंतोतंत अंशात्मक केंद्रयोग करणारा मेष राशींतील गोचर मंगळ हे अमृतसरच्या तनुस्थानींच होत असले पाहिजे असें आम्हांस वाटतें.

४ कराची— कर्क

कराची शहराची राशि नक्की ठरविण्यास म्हणण्यासारखीं साधनें आमच्यापाशीं नाहींत परंतु ज्यांना कांहीं कारणामुळें कराचीस स्थानांतर करावें लागलें अशांच्या कुंडल्या पाहून त्या शहराची राशि कर्क असावी असें आमचें अनुमान आहे. कराची बंदराचा संबंध जलराशीशीं असणें शक्य आहे.

५ पंढरपुर—कर्क

वारकरी लोकांवर चर राशीचा अंमल दिसून येतो; सामान्यतः भक्तिमार्ग हा राशिचक्रांतील आर्द्र राशींनीं आणि विशेषेंकरून कर्क राशीनें

दर्शविला जातो. कर्क राशीच्या अंमलाखालचीं मनुष्यें प्रेमळ अंतःकरणाचीं असतात. अंतःकरणांतील ईश्वरभक्तिभावही या राशींत प्रबळ असतो आणि म्हणून वारकरी पंथ कर्क राशीच्या अंमलाखालीं गणण्यास हरकत नाहीं. महाराष्ट्रांतील भक्तिपंथाचें माहेरघर जें **पंढरपुर** तें चंद्रभागा आणि भीमा या नद्यांच्या वेढ्यांतच आहे हें कर्क राशीच्या जलस्वरूपास योग्य आहे. आचार्य वराहमिहिरानें चंद्रभागा नदी चंद्राच्या अंमलाखालींच दिलेली आढळते.

(६) द्वारका—वृषभ

द्वारका बेटाच्या जवळ मोत्यांचे शिंपले व शंख यांची पैदास होते. जुने ज्योतिर्विद मोत्यांचा विचार वृषभ राशीखालीं करतात. इराणांत ही मोत्यांची पैदास होते व तो देश वृषभेखालीं मानला जातो. मोत्यांच्या संबंधावरून द्वारकाबेट हें वृषभ राशीच्या अंमलाखालीं मानण्यास हरकत नाहीं. चंद्र-वंश-दीपक श्रीकृष्णाची द्वारका चंद्राच्या उच्च ग्रहींच असावी हें योग्य श्रीकृष्णाचा जन्म रोहिणी नक्षत्रावर म्हणजे वृषभ राशींत चंद्र असतां झाल्याचें भविष्यिक ज्योतिषी समजतात व त्यांच्या मतें चंद्र तनुस्थानीं होता. वस्तुस्थिति तशीच असेल तर द्वारका बेटाच्या राशीबद्दल जें आम्हीं अनुमान केलें आहे त्यास दुजोरा मिळतो.

(७) जगन्नाथपुरी—वृश्चिक.

(८) बदरी केदार—मीन.

हिंदुस्थानच्या चार दिशेस जीं चार वैष्णव स्थानें आहेत त्यांपैकीं जगन्नाथपुरी व बदरीकेदार हीं अनुक्रमें वृश्चिक व मीन या राशींखालीं असावींत असें आमचें अनुमान आहे.

(९) ब्रह्मदेश—वृषभ

ब्रह्मदेशांत उत्पन्न होणारे जिन्नस व तेथें झालेल्या घडामोडीच्या वेळची ग्रहस्थिति हीं लक्ष्यांत घेऊन त्या देशाची राशी वृषभ असली पाहिजे असें आम्हास वाटतें. वाचकांच्या माहितीकरिता कांहीं थोड्याशा घडामोडींच्या वेळेची ग्रहस्थिति तारखेसह नमूद करतों त्यावरून आमचें अनुमान बरोबर आहे किंवा नाहीं हें फारसे श्रम न करतां कोणालाही ठरवितां येईल.

पहिलें म्ही युद्ध—इंग्रजांनीं युद्ध पुकारल ता२४-२-१८२४

रवि	मंगळ	गुरु	शनि	हर्शल
मीन ६	तूळ ६ व	कर्क १	वृषभ १९	मकर १२

दुसरें ब्रह्मी युद्धः—ता. २-४-१८५२

रवि	चंद्र	मंगळ	गुरु	शनि	हर्शल	नेपच्युन
मे	कन्या	कर्क	वृश्चिक	**वृषभ**	**वृषभ**	मीन
१३	१३	२९	२२	५	४	११

दुसऱ्या युद्धानंतर दक्षिण ब्रह्मदेश खालसा झाल्याचा जाहीरनामा ता.३०-६-१८५३ (स्वातंत्र्यनाश)

रवि	चंद्र	मंगळ	गुरु	शनि	हर्शल	नेपच्युन
कर्क	**वृषभ**	मिथुन	**धनु**	**वृषभ**	**वृषभ**	मीन
९	३-२३	९	१७ व	२७	११	१३

वर दिलेल्या ग्रहस्थितीवरून वृषभ राशींतील शनीचें भ्रमण आणि विशेषतः शनिहर्शलांची वृषभ राशींतील युति लक्ष्यांत ठेविण्यासारखी आहे. यानंतर सन १८८५ सालांत उत्तर ब्रह्मदेशांत गडबड झाली व त्यामुळें तेथल्या थीबा राजास पदच्युत व्हावें लागलें. या वेळीं वृषभ राशींत नेपच्युनचे भ्रमण चाललें होतें.

मेदिनीय ज्योतिष पुस्तकाच्या ६१ व्या पानावर यूरोपीय ज्योतिषांच्या मतें ब्रह्मदेश तूळ राशीखालीं दिला होता. ब्रह्मदेश तूळ राशीखालीं मानण्याचें कारण नाहीं हें वर दिलेल्या ग्रहविचारावरून सहज दिसून येईल.

'मेदिनीय किंवा राष्ट्रीय ज्योतिष' प्रसिद्ध झाल्यावर भरतखंडाबाहेरचे देश वगैरेंच्या राशि आंग्ल ज्योतिर्विदांनीं ठरविल्या त्या आमच्या वाचकांस कळाव्या म्हणून पुढें दिल्या आहेत.

(१) **बेलफास्ट**—कर्क (पहा पान २९ ब्रिटिश जर्नल आफ ॲस्ट्रालॉजी, पुस्तक ९, नोव्हेंबर १९२०)

(२) आस्ट्रेलिया—सिंह (पहा पान १९०-१९१ " Your Destiny & Stars " by Agnes Croysdale & G. Wilde)

(३) न्यू झीलंड—मकर.

(४) मेक्झिको—वृश्चिक.

(६) पेरु—मेष

(७) चिलि—वृषभ

(८) युरागवे—कन्या

जे. एल्. जॉन्डो नांवाचा अमेरिकन ज्योतिर्विद महासागरांची वांटणी पुढें लिहिल्याप्रमाणें करतोः—

(१) हिंदी महासागर—वृश्चिक

(२) अटलांटिक महासागर—कर्क

(३) पासिफिक—मीन.

———o———

राशिचक्राचें आरंभस्थान.

(लेखक–भिकाजी महादेव पेंडसे बी. ए.)

केसरीच्या २०-७-२० च्या अंकांत श्री. विनायक त्र्यंबक आगाशे यांचे सहीचा 'राशिचक्राचें आरंभस्थान' ह्या मथळ्याखालीं एक लेख प्रसिद्ध झाला आहे. त्यांत श्री. आगाशे यांनीं रेवतीयोगतारा हेंच सूर्यसिद्धान्तसंमत राशिचक्रारंभस्थान होय असें म्हणणें सत्याला सोडून नाहीं असें दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु वस्तुस्थिति तशी नाहीं. करितां सूर्यसिद्धान्तसंमत राशिचक्रारंभस्थान कोणतें हें त्याच सिद्धांतांतील वचनावरून दाखवितों.

सूर्यसिद्धान्तांत पुढील वचन आहे;

" देवासुरा विषुवति क्षितिजस्थं दिवाकरं । पश्यन्ति "

यावरून देवांना (उत्तरध्रुवस्थांना) व दैत्यांनाही (दक्षिणध्रुवस्थांना) सूर्य विषुववृत्तावर आला असतां क्षितिजावर दिसतो. सूर्य विषुववृत्तावर वर्षांतून दोनदां येतो, एकदां उत्तरेकडे जात असतां व एकदां दक्षिणेकडे जात असतां अर्थात् उत्तरेकडे जात असतां तो विषुववृत्तावर आला कीं देवांना क्षितिजावर दिसूं लागतो. तोच देवांचा (उत्तरध्रुवस्थांचा) सूर्योदय व तोच देवांच्या दिवसाचा किंवा मानवी सौरवर्षाचा आरंभ होय (**मासेनस्यादहोरात्रः पैत्रो वर्षेण दैवतः**) तसेंच,

" मेषादौ देवभागस्थो देवानां याति दर्शनम् ।
असुराणां तुलादौ तु सूर्यस्तद्भागसंचरः ॥ "

ह्या सूर्यसिद्धान्तवचनावरून त्या सिद्धान्ताचे मतानें सूर्य उत्तरेकडे जातांना विषुववृत्तावर आला असतां तो मेषारंभीं येतो हें उघड होतें. आतां सूर्य फिरतो तो विषुववृत्तावरून फिरत नसून क्रान्तिवृत्तावरून फिरतो. यावरून हेंही ठरतें कीं सूर्य विषुववृत्तावर आला असतां तो क्रान्तिवृत्ताच्या ज्या बिंदूवर असतो तो बिंदु हाच सूर्यसिद्धान्तमताचा मेषारंभ होय. ह्या बिंदूलाच आपण वसंतसंपात म्हणतों. म्हणजे वसंतसंपात हाच सूर्यसिद्धान्तसंमत मेषारंभ होय. मेषारंभ तोच राशिचक्रारंभ अर्थात् वसंतसंपात हाच सूर्यसिद्धान्तोक्त राशिचक्रारंभ होय हें निर्विवाद ठरलें.

———

कर्तृत्ववान गणिती.

'सायन ज्योतिर्मंदिर' ही संस्था, परमेश्वर इच्छेनें निर्माण झाली. पण तिचें प्रगटीकरण होतांच, सर्व सायनवादी लोकांतर्फे, ह्या ज्योतिर्मंदिरावर असलेला, श्रुति-स्मृति-पुराणसंमत झेंडा पाहून, सायनमताचा पुरस्कार करणारे व त्यासाठीं ज्योतिषशास्त्राची सेवा अत्यंत एकनिष्ठेनें व अविश्रांत करणारे "ज्योतिर्मालिचे" विद्वान संपादक यांनीं, तिचें अभिनंदन करून, 'ह्या संस्थेच्या हातून उत्तम शास्त्रसेवा होईल' असा परम मंगल व पुण्यप्रद आशीर्वाद दिला. ह्याबद्दल, ही संस्था सर्व सायनवादी लोकांच्याच आजपर्यंतच्या परिश्रमाचें फळ असल्यामुळें त्यांची अत्यंत ऋणी आहे.

निरयणवाद गणिती ग्रंथकारांचा आहे. यासाठीं कर्तृत्ववान गणिती लोकांच्या कुंडल्या पाहून, त्यांवरून कोणकोणतीं अनुमानें निघतात, तें पाहूं. गणिताचा मुख्य कारक ग्रह मंगळ आहे; तसाच कर्तृत्वाचा अथवा सामर्थ्याचाही कारक ग्रह मंगळच आहे. मंगळ बुद्धिस्थानांत, बौद्धिक राशीस अगर बुधगुरू यांच्या राशीस असतां किंवा उच्च अथवा मेषेस स्वगृहीं असतां, गणितांत बुद्धि उत्तम चालते. हें 'योगमालाकारांनीं' प्रसिद्ध केलेल्या ज्योतिषांच्या कुंडल्यांवरून दिसतें. पण **त्या ४८ कुंडल्यांतही वृश्चिकेचा मंगळ नाहीं.** यावरून तो ज्योतिर्विदांच्या गणितास उपयोगीं पडत नसावा असें अनुमान निघतें.

बुधगुरूंच्या राशीस असलेला मंगळ जर फलप्रद होतो, तर त्यांच्याशीं मंगळानें केलेले योगही गणितज्ञानें वाढविण्यास कारणीभूत झाले पाहिजेत, हें उघड आहे. यासाठीं सायनचा प्रथम झेंडा रोवणारे 'स्फुटवक्ता अभियोगी' लेले, यांची कुंडली पाहा. यांच्या लग्नीं हर्शल असून, वादस्थानीं सिंहराशींत बुध शुक्रासहवर्तमान मंगल आहे; व तो गुरूशीं 'द्विराश्यंतर' शुभ दृष्टियोग करीत आहे. यामुळें त्यांना गणितविद्येंत अपूर्व असें यश मिळालें. सायनवाद आरंभीला व तत्कालीन शंकराचार्यांना सायनमानच

शास्त्रशुद्ध आहे असें कबूल करावयास लाविलें. त्याप्रमाणेंच असामान्य गणिती, निरयणवादी कै. केरूनाना छत्रे यांनाही सायनमान कबूल करावयास लावलें खरें; पण छत्र्यांनीं 'यद्यपि शुद्धं लोकविरुद्धं नाकरणीयम्' असें म्हणून सायनमान नाकारिलें. पुढें या सायनमानाचें पंचांग सुरू करणारे, राजेश्री शंकर बाळकृष्ण दिक्षीत, यांची कुंडली पाहा. त्यांचे एकादश स्थानांत हर्शल असून, मंगळ लग्नीं मिथुन राशींत आहे. व त्यांचा बुध शुक्राशीं 'द्विराश्यंतर' शुभ दृष्टियोग आहे. यामुळें, हे लोकोत्तर ज्योतिर्गणिती व ग्रंथकार झाले.

या दोन लोकोत्तर ज्योतिर्विदांच्या कुंडल्यांत, हर्शल बुद्धिस्थानांत असल्यामुळें त्यांची बुद्धिमत्ता विलक्षण अशी दिसून येते. तसेंच मंगळहर्शलचे योगही गणितज्ञान वाढविण्यास कारणीभूत होतात. हें तुम्हांस पुढील कुंडल्यांवरून दिसेल. कै. जीवनराव चिटणीस यांचा मंगळ द्वितीय स्थानीं शुक्राचे युतींत असून एकादश स्थानांतील मिथुनेच्या हर्शलशीं 'द्विराश्यंतर' शुभ दृष्टियोगांत आहे. यामुळें त्यांची बुद्धिमत्ता ज्योतिर्गणितांत कमी असेलसें वाटत नाहीं, यांनीं फलशास्त्रानें सायनवादास सुरवात करून सायनमानाचे ग्रह फलें बरोबर सुचवितात हें शिकविण्यास सुरवात केली. गणिताच्या खटाटोपास भिऊन पुष्कळ विद्यार्थी ज्योतिषशास्त्राचें अध्ययन सोडून देतात. हें त्यांचे व 'कुंडलीविज्ञान'कार नवाथे यांचे लक्षांत आल्यामुळें विद्यार्थ्यांना सायन कुंडली व सायन स्पष्टग्रह तयार करण्याची सामुग्री लवकर तयार व्हावी, यासाठीं त्यांनीं पुस्तकें तयार केलीं. 'कुंडलीविज्ञान'कारांनीं तर सायन पंचांग सुरू केलें. 'कुंडलीविज्ञान'कारांचा मंगळ पराक्रम स्थानांत असून, शुक्रसंनिध असलेल्या हर्शलशीं 'द्विराश्यंतर' शुभ दृष्टियोग करून आहे; यामुळें त्यांचा कामगिरी यशस्वी झाली. श्रीयुत मराठे यांचा मंगळ दशमाशीं युतींत असून पंचमस्थ हर्शलशीं 'त्रिकोणयोग' करून आहे. यामुळें ते दररोजचे सायन स्पष्टग्रह तयार करून आपणांस देत आहेत.

या वरील सर्व कुंडल्यांवरून असें ठरतें कीं, बुध, गुरु व हर्शल यांच्यांशीं मंगळानें शुभयोग केले असतां, ज्योतिर्गणितांत उपयुक्त व यशस्वी असें कर्तृत्व दिसून येतें. 'योगमालाकार' गुरुमंगळ प्रतियोग, बुध-मंगळ केंद्रयोग हे गणितज्ञान देतात असें म्हणतात पण हे योग अशुभ असल्यामुळें उपयुक्त कामगिरी घडवून आणून ज्योतिर्गणितांत यशस्वी करितील, असें वाटत नाहीं. फक्त गणितज्ञ होईल.

या दृष्टीनें निरयन ज्योतिर्गणितीही पाहा. कै. केरूनाना छत्रे यांच्या कुंडलींत लग्नीं चंद्राजवळ हर्शल नेपच्यून असून, हर्शलशीं नवमांतील कन्येचा मंगळ 'त्रिकोणयोग' करून चालला आहे. यामुळें यांना ग्रहलाघवी निरयन चुकीचें आहे असें वाटून तें सुधारण्यासाठीं स्वतःचें पंचांग चालू केलें. दुसरे गणिती राजश्री केतकर, यांची कुंडली पाहा. तींत कन्येचा मंगळ लग्नीं असून, त्यानें पंचमस्थ गुरूशीं व नवमस्थ हर्शलशीं 'त्रिकोणयोग' केला आहे. यामुळें यांची कामगिरी विशेष यशस्वी झाली आहे. त्यांनीं ज्योतिर्गणितविषयक ग्रंथ केले आहेत व स्वतःचें निरयन पंचांगही चालू आहे. आतां पंचांगप्रवर्तन कमेटीचे पुढारी लो. टिळक यांची कुंडली पाहा. तींतील मंगळ तूला या बौद्धिक राशींत व तृतीय या बौद्धिक स्थानांत आहे; व हर्शलही दशमांत आहे. पण मंगळ कोणत्याच ग्रहाशीं शुभयोग करीत नाहीं. यामुळें त्यांचे हातून यशस्वी अशी ज्योतिर्गणित-विषयक फार मोठी कामगिरी होईलसें वाटत नाहीं.

'योगमाला'कारांनीं ज्योतिर्विदांच्या कुंडल्या प्रसिद्ध केल्यामुळें, ही चर्चा आज करतां आली. याबद्दल त्यांचे आभार मानून आतां मी तुमची रजा घेतों.

[वरील लेख अकलुज येथील सायन ज्योतिर्मंदिर व्यवस्थापक यांचेकडून तारीख १ एप्रिल सन १९१९ रोजीं प्रसिद्धीकरितां आला होता परंतु तो जागेच्या अभावामुळें प्रसिद्ध करितां आला नाहीं.—संपादक.]

प्रसिद्ध व्यक्तींच्या कुंडल्यांचा संग्रह.

नं. १० प्रेसिडेंट विलसन.

प्रेसिडेंट विल्सन साहेबांनीं 'स्वयं निर्णयाचें तत्त्व' जगांत अंमलांत आणण्याचा आपला निश्चय जाहीर केल्यापासून त्यांच्याकडे सर्व जगाचें आणि विशेषतः दास्यांत रुतलेल्या लोकांचे डोळे लागले होते. राजकारणाच्या तत्त्वज्ञानाचें मंथन करून हे स्वयंनिर्णयतत्त्वरूपी अमृत गुलामराष्ट्रांना प्रे. विल्सन पाजणार अशी भोळसर लोकांस आशा वाटली व साम्राज्यवाद्यांस चिंता पडली. परंतु भोळसर लोकांच्या दुर्दैवानें त्यांची आशा व साम्राज्यवाद्यांच्या सुदैवानें त्यांची चिंता नाहींशी झाली आहे ! साम्राज्यवाद्यांनीं 'स्वयंनिर्णयाच्या तत्त्वास' पुन्हां एकदां अर्धचंद्र दिला आहे. सन १८१४ त फ्रान्सची पायमल्ली करणारांनीं प्रथम तोंडानें स्वयंनिर्णयाचें तत्त्व जाहीर रीतीनें *मान्य केलें होतें. " They (conquerors) declared that every people has the right of choosing its government " जेत्यांनीं तत्त्व मान्य केलें पण बळी तो कान पिळी हीच स्थिति वज्रलेप झाली. बळी ते बळीच राहिले व गुलामांच्या गुलामगिरीवर कायमपणाचा शिक्का जेत्यांनीं कृतीनें मारला ! इतिहासाची पुनरावृत्ति होते ती अशी ! सन १८१४ नंतर शंभर वर्षांनें हेंच स्वयंनिर्णयाचें तत्त्व फिरून जगाच्या समोर आणलें गेलें. प्रे. विल्सन साहेब हे या वेळीं त्याचे मुख्य पुरस्कर्ते होते. त्यांनीं या तत्त्वाची प्राणप्रतिष्ठा करण्याकरतां जीवापाड मेहनत घेतली, पुष्कळ चिकाटी दाखविली वगैरे सर्व कांहीं खरें असलें तरी त्यांना या तत्त्वाचा त्यांच्या डोळ्या देखत झालेला खून निमूटपणें पहावा लागला ! त्यांचें बोलणें फोल झालें, त्यांच्या Notes हास्यास्पद ठरल्या ! गुलामगिरी रसातळास नेण्याकरतां प्रत्यक्ष स्वातंत्र्य देवीचें वारें त्यांच्या अंगीं अवतरल्याचें भासूं लागलें होतें परंतु काय झालें

* जे. मिचलेट कृत 'फ्रेंच रेव्होलूशन' पान २०६ वर दिलेले आधार पहा.

असेल तें असो. थोडक्यांतच यूरोपच्या मांत्रिकानीं हें वारें जागच्या जागींच जिरविलें. हा नुकताच घडलेला **लोकोत्तर चमत्कार** सर्व जगानें पाहिला. प्रे. विल्सन साहेबांचा संकल्प अपुराच नव्हे तर साफ पुसून निघाला व त्यांच्या पदरीं पूर्ण अपयश आलें. हें असें कां झालें? ह्या प्रश्नाचें उत्तर ज्योतिष-विद्यार्थी प्रेसिडेंट साहेबांच्या पुढें दिलेल्या कुंडलीवरून सहज देतील असें वाटतें.

प्रेसिडेंट वुडरो विलसन.

सायन लग्न.

प्रेसिडेंट विलसन यांच्या जन्मकाळीं तूला राशीचा १० वा अंश पूर्व क्षितिजावर उदय पावत असून तनुस्थानाधिपति शुक्र पंचमस्थानांत कुंभ राशींत आहे. तुळराशी कांटेतोलपणा व सत्वशील वर्तन, सरळपणा व न्यायप्रियता दर्शविते आणि कुंभराशि परोपकार, औदार्य व प्राणिमात्रांविषयीं नैसर्गिक स्नेहभाव यांची द्योतक आहे. राशिचक्रांतील वायुतत्त्वाच्या राशि या बुद्धि-कोशदर्शक असतात व त्यांपैकीं कुंभराशीनें दर्शविणारी बुद्धि आपल्या विशालत्वानें विश्वबंधुत्वाची मर्यादा गांठते. शास्त्रीय शोध, कुशाग्रता व श्रमसातत्य हे कुंभ राशीचे मुख्य गुण आहेत. एवढेंच नव्हे तर या राशींत जी दिसून येते ती सर्व प्राणिजातांविषयीं बंधुभाव किंवा सुहृदत्व

विशिष्ट भावना

ही होय. प्रे. विलसन साहेबांचा आत्मकारक ग्रह शुक्र वर दिलेल्या भावना-गुणदर्शक अशा कुंभ राशीमध्यें पंचमस्थानांत—बौद्धिक स्थानांत विराजमान झाला आहे. मनाचा कारक ग्रह चंद्र हाहि कुंभराशींतच आहे. चंद्र गुरूबरोबर द्विराश्यंतर दृष्टियोग करीत असल्यामुळें मानसिक पवित्रता व विकास दर्शविला जातो ही गोष्ट ज्योतिष विद्यार्थ्यांस पटणारी आहे. प्रेसिडेंटसाहेबांनीं मानव जातीच्या उद्धाराकरितां जो खटाटोप केला त्यांतील हेतु कारस्थानी पुरुषांच्या प्रयत्नाप्रमाणें लोकांच्या डोळ्यांत धूळ फेंकण्याचा नव्हता असें वरील योग पाहून वाटतें. चंद्र व आत्मकारक ग्रह यांच्या स्थितीबरोबरच रवि व बुध हे मकर राशींत चतुर्थस्थानीं आहेत हेंही लक्ष्यांत घेतलें पाहिजे. राजकारणाच्या उलाढाली करणाऱ्यांच्या कुंडल्यांमध्यें चरराशि व विशेषतः राजभुवनदर्शक राशि जी मकर यांमध्यें विशेष ग्रहयोग झालेले आढळतात. प्रस्तुत कुंडलींत मकर राशींत बुद्धिकारक ग्रह बुध व रवि असून गुरु व शनि हे दोन्ही ग्रह चर राशींत आहेत. बुध हा शनीबरोबर प्रतियोग करून जवळजवळ ९ अंश पुढें गेलेला आहे व शनि वक्री

आहे त्यामुळें बुध-शनींच्या प्रतियोगाचें बुद्धि-विकृतीरूप अनिष्ट फळ मूळांतच कमी झालेलें आहे. बुध नेपच्युन बरोबर शुभयोग करून हर्शल बरोबर त्रिकोणयोग करण्यास जात आहे. हा या कुंडलींत प्रधान-बुद्धियोग आहे. मकरेंतील रवि-बुधांमुळें राजकारणाकडील स्वाभाविक प्रवृत्ति दृग्गोचर होते ती बुध-हर्शल त्रिकोणयोगानें व कुंभराशींतील आत्मकारक ग्रहामुळें व्यवहारी न बनतां शास्त्रीय म्हणजे तात्विक बनली व यामुळेंच प्रेसिडेंट विल्सननीं राजकारणशास्त्राचें अध्ययन, अध्यापन व ग्रंथलेखन यांमध्यें जितकें नांव मिळविलें तितकें व्यवहारी राजकारणांत मिळविलें नाहीं. ते राजकारणशास्त्रांत केवळ पढिक विद्वान् होते. कै. लो. टिळकांनीं लॉर्ड मोर्ले यासंबंधानें म्हटलें होतें कीं 'He is more a philosopher than a statesman' हें वाक्य प्रे. विल्सन साहेबांसही लागू पडेल. बुध-हर्शल-त्रिकोण योगानें बुद्धि स्वातंत्र्यप्रिय व परंपरागत मळलेल्या मार्गांतून नवा मार्ग काढणारी होते हें अनुभवसिद्ध आहे. हर्शल ग्रह परंपरेचा विध्वंसक आहे ही गोष्ट केवळ अनुमानाची नसून अनुभवजन्य आहे. कुंभराशींतून या ग्रहाचें भ्रमण चाललें असतां परंपरेच्या व पुराण गोष्टींच्या कारक ग्रहार्शी—शनीर्शी—प्रतियोग-घर्षण होतांच कुंभराशीच्या अंमलाखालच्या परंपरागत झारशाहीचा व केसरशाहीचा चूर होऊन गेला ! सारांश हर्शल हा भावना शक्तीची एकवटलेली शक्ति आहे व या शक्तीबरोबर ज्यांच्या कुंडल्यांतील आत्मकारक, बुद्धिकारक किंवा मनकारक ग्रह दृष्टियोगानें निगडित असतात त्यांच्या हातून परिस्थितीप्रमाणें आश्चर्यकारक शक्ति—प्रधान कार्यें घडून आल्याचें दिसून येतें. प्रे. विल्सन यांच्या कुंडलींतील बुधहर्शल त्रिकोणयोग, बौद्धिक स्थानांतील आत्मकारक ग्रह व चंद्राबरोबर होणारा मेषेंतील गुरूचा शुभयोग यांमुळें Balance of Power, गुप्त तहनामे वगैरे जुन्यापुराण्या परंपरागत चाललेल्या कारस्थान्यांच्या वैभवाची इतिश्री करून 'राष्ट्र-संघ' व 'स्वयंनिर्णय' या अद्भुत भावना-प्रधान गोष्टींचा पुरस्कार करण्याच्या कामीं

त्यांनीं पुढाकार घेतला पण यशापयशाच्या बाबतींत त्यांच्या कुंडलींतील चतुर्थ दशम भुवनांतून होणारा रवि-शनींचा प्रतियोग त्यांच्याच नव्हे तर सर्व मानव-जातीच्या विरुद्ध गेला असें वाटतें. दशमस्थानांतील स्वक्षेत्रविन्मुख राशींतील रवि किंवा चंद्र यांना पीडित करणारा शनि शेवटचें अपयश किती बिनचूक देतो हें दर्शविणारी प्रस्तुतची कुंडली नेपोलियनच्याच कुंडलीप्रमाणें आहे. फरक एवढाच कीं नेपोलियनचा दशमस्थ कर्क राशींतील शनि **चंद्रार्शी** प्रतियोग करीत होता व येथें तो **रवीबरोबर** प्रतियोग करीत आहे.

मानव जातीचे उद्धारक—

अशा अपूर्व कीर्तीचा लाभ कारस्थान्यांचा कारक ग्रह दूषित शनि दशमभुवनांत **वक्र** असतां मिळणें अशक्य आहे असेंच कोणीही ज्योतिषी सांगेल. शनि जितका अधिक दूषित तितका अधिक अनिष्ट असा नियमच आहे.

राम नारायण.

प्रसिद्ध व्यक्तींच्या कुंडल्यांचा संग्रह.

नं. ११ प्रेसिडेंट हार्डिंज.

प्रे. विलसन यांच्या अधिकाराची मुदत सरल्यावर **हार्डिंज** हे त्यांच्या जागीं येणार आहेत. अध्यक्षाची निवडणूक चालली असतां हार्डिंज व त्यांचे प्रतिस्पर्धी यांच्या कुंडल्या प्रसिद्ध करून निदान ज्योतिषांनीं तरी एकमतानें हार्डिंज हेच संयुक्त संस्थानांच्या अध्यक्षपदावर येणार असें शेवटच्या निवडणूकीच्या पूर्वी बरेच दिवस प्रसिद्ध केलें होतें. अमेरिके सारख्या प्रमुख राष्ट्राचा अध्यक्ष ह्या दर्जाच्या व्यक्तीच्या हातून होणाऱ्या कृत्यांचा सर्व जगावर परिणाम होण्यासारखा असल्यामुळें प्रे. हार्डिंज यांची कुंडली ज्योतिर्मालेच्या वाचकांच्या विचारासाठीं प्रसिद्ध करीत आहों.

राष्ट्राची अधिकारसूत्रें ज्यांच्या हातीं असतात त्यांच्या ग्रहमानावरून राष्ट्राच्या स्थितीचा पुष्कळसा बोध होतो या दृष्टीनेंही या कुंडलीचा विचार होणें जरूर आहे.

प्रे. हार्डिज यांची कुंडली पुढें दिल्याप्रमाणें आहे.

सायन लग्न

प्रे. हार्डिज यांच्या कुंडलींत तनुभावारंभी मीन राशीचा १२ वा अंश उदित असून तनुस्वामी गुरू दशम भुवनांत स्वक्षेत्रीं आहे. तनुस्थानांतच नेपच्युन मेषराशीचा आहे. बलवान लग्नाधिपति गुरु दशमस्थानांत असणें हा यशदायक योग आहे; त्यांतून गुरु व उच्च चंद्र यांचा ६ अंशांच्या अंतरानें झालेला त्रिकोण योग व केंद्रांत स्वगृहीं असलेला शुक्र यांमुळें

संपत्ति, सन्मान, सत्कीर्ति, यश व सौख्य यांचा लाभ दर्शविला जातो. या योगांत चंद्र उच्च आहे, गुरूच्या शुभ दृष्टींत आहे तरी त्याबरोबर शनि प्रतियोग करीत असल्यामुळें त्यामध्यें मोठेंच वैगुण्य प्राप्त झालें आहे. संपत्ति-नाश हा त्याचा साहजिक होणारा परिणाम आहे ही गोष्ट विसरतां येत नाहीं. स्वक्षेत्रीं गुरु, शुक्र व उच्च चंद्र यांचा अपूर्व योग या कुंडलींत आलेला स्पष्टच आहे. ह्या योगाचा परिणाम ज्या अर्थी हार्डिज साहेब अध्यक्ष आहेत त्या अर्थी त्यांच्या राष्ट्राबर झालाच पाहिजे. म्हणजे कुबेरतुल्य संपत्ति ज्या देशांत आधींच आहे त्या ठिकाणीं ती अधिक वाढणार. वरील शुभ योगामुळें प्रे. हार्डिज यांच्या कारकीर्दीत अमेरिका व्यापारांत आपला दर्जा आहे त्यापेक्षां द्विगुणित करील व इतर राष्ट्रांशीं नवीन स्नेहसंबंध व नवीन व्यापारी तहनामे होतील हा या शुभयोगाचा थोडक्यांत सारांश आहे. या शुभयोगाशिवाय दुसरा एक बलवत्तर योग दिसून येतो. वृश्चिकराशींत शनि, रवि, मंगळ व बुध हे चार ग्रह मृत्युस्थानांत एकत्र झालेले आहेत तो हा दुसरा योग होय. हा योग राशिचक्रांतील अष्टमराशि व द्वादश भुवनांतील अष्टमस्थान यांमध्यें होत असल्यामुळें अत्यंत कष्टदायक असा आहे. रवि वृश्चिक राशींत शनिमंगळांच्या युतींत चंद्राच्या सप्तमांत आहे. हा योग केव्हांही शरीरसौख्यास व आयुष्यास कमालीचा अनिष्ट आहे. तो इतका कीं जर स्थान व राशि यांनें बलवान असलेला लग्नाधिपति गुरु व उच्च चंद्र यांचा त्रिकोण योग कुंडलींत झाला नसता तर ही कुंडली बालमृतीचीच ठरली असती. इतका अनिष्ट योग अष्टमांत झाला आहे व तोही वृश्चिक राशींत. ही राशि रुधिरप्रिय व घातपातदर्शक आहे. यामुळें प्रे. हार्डिज यांचा शेवट अपघातांत किंवा शस्त्रघातांत होईल. हा व्यक्तिविषयक विचार झाला. राष्ट्रीय दृष्टीनें हा योग युद्धाच्या रूपानेंच फलद्रूप झालेला दिसून येईल. तनुस्थानांतील नेपच्युन लढाऊ राशींत आहे म्हणून प्रे. हार्डिज यांच्या कारकीर्दीत आरमाराच्या वाढीची कमान सारखीच चढत राहील. वृश्चिक राशींतील रवि, शनि व मंगळ यांमुळें प्रेसिडेंट हे स्वतः निग्रही,

हट्टी, कारस्थानी, वेळेवर दोन हात मागें न सरणारे असेच असावेत. या बाबतींत सारावलीकारांचे शब्द लक्ष्यांत ठेविण्यासारखे आहेत ते असेः—

" योद्धा प्राज्ञस्तीक्ष्णो नीचाचारो कविप्रधानश्च ।
मंत्रीच भूपतिर्वा बुधार्ककुजसौरि संयोगे ॥

प्रे. हार्डिंज यांच्या कुंडलींतील वर दिलेल्या योगाचा विचार करतां त्यांच्या कारकीर्दीत अमेरिका युद्धांत पडेल असेंच वाटतें. सन १९२१ च्या आक्टोबर महिन्यापासून अमेरिकेच्या परराष्ट्रीय संबंधामध्यें खटके उडतील. युद्धोत्साह वाढेल, आरमार व सैन्य यांच्या हालचाली होतील, कदाचित अमेरिकन सैन्य पॅसिफिक महासागर ओलांडूही लागेल असा इतर ग्रहस्थिति लक्ष्यांत घेतां वाटतें. प्रे. हार्डिंज यांच्या सप्तम भुवनांत बरींच वर्षें शनि भ्रमण करीत रहाणार आहे. सप्तमस्थानावरून उघड शत्रूंचा विचार होतो व येत्या नोव्हेंबरच्या १३ व्या तारखेस शनि मंगळांची युति तुळाराशीच्या ९ व्या अंशांत मूळ नेपच्यूनच्या समोर होत आहे. त्या वेळीं अमेरिकेंत कांहीं तरी अनर्थपात घडलेला दिसून येईल.

३१–१–१९२१ **राम नारायण.**

रा. रा. संपादक, ज्योतिर्माला, यांसी. सा.न. वि. वि.

आपणाकडे मी माझ्या अल्पायु पुतणीची कुंडली पाठवीत आहें तरी तिचा आपण स्वीकार कराल अशी आशा आहे.

जन्म सोमवार ता. २४ मे १९२० श्रीसूर्योदयात् गतघटी २० व.

॥ जन्मलग्न कुंडली ॥



बृहज्जातक अध्याय ६ येथें असें सांगितलें आहे कीं, जर लग्नाच्या द्वितीय द्वादश स्थानीं पापग्रह आहेत व चद्रमा ६,८,१२ यापैकीं कोणत्या तरी स्थानांत आहे तर, किंवा १२ स्थानीं शनी असुन जर ९ स्थानीं सूर्य असेल तर, ते अरिष्टयोग समजावेत. वरील कुंडलींत दोन्ही अरिष्टयोग आहेत. ही मुलगी शुक्रवार ता. ११ फेब्रुवारी १९२१ रोजीं आजारी पडली. अगोदर थोडासा खोकला येत होता. ती जेव्हां आजारी पडली तेव्हां मी एकंदर भविष्य वर्तविलें व तें अगदीं बरोबर उतरलें याबद्दलचें आयुर्वेदाचार्य नानल वैद्य यांचें पत्र आहे.

शुक्रवार ता. ११-२-२१ रोजींचे सकाळचे ग्रह.

मूळ कुंडली लक्ष्यांत घेतां या वेळेस तिला गोचरीं सर्व ग्रह अनिष्ट होते. ३रा राहू चांगला जरी असला तरी तो जन्मकुंडलीच्या द्वितीय स्थानीं असल्यामुळें स्थानबली नाहीं व कितीहि झालें तरी तो पापग्रह आहे व त्याला अस्तित्व नसल्यामुळें छायाग्रह आहे. ७वा बुध चांगला परंतु तो कुंभेचा म्हणजे मूळ कुंडलीच्या ६ व्या स्थानांतून भ्रमण करीत आहे हें चांगलें नाहीं कारण तो लग्नेश आहे. एकूण सर्व ग्रह अनिष्ट आहेत. आईबाप यांच्या पत्रिका लक्ष्यांत घेता त्यांचे ग्रहही चांगलें नव्हते. शनी मंगळ, चंद्र, शुक्र समोरासमोर असल्यामुळें व शनीचा वातरोग, मंगळाचा पित्तरोग व चंद्र शुक्र यांचा कफरोग; यावरून त्रिदोषयुक्त ताप यावा म्हणजे नवज्वर अथवा

विषम व्हावा असें मी वर्तविलें होतें व त्याप्रमाणें तिला नवज्वरच झाला. नवज्वर व विषम यांत काय काय फरक आहे हें वैद्यकीय ज्ञानाच्या अभावामुळें मला माहीत नसल्यामुळें विषम होईल का नवज्वर होईल हें मात्र मला नक्की सांगतां आलें नाहीं. शनिवारच्या रात्रीं म्हणजे रविवारच्या पहांटें ५ ते सकाळीं ७ पर्यंतचा काल तिला फारच जड जावा असें मी अगोदर सांगितलें होतें व त्याप्रमाणेंच झालें. चंद्र कोणत्याही राशींत शेवटच्या ३-४ घटका बरें किंवा वाईट फल देतो व ५ ते ७ हा काल मीनेंतील शेवटच्या घटका होत. कफाधिक्य व्हावें असें मी सांगितलें व तसेंच झालें. पुढें चंद्रमा मेषेंत गेला म्हणजे मूळ कुंडलीच्या ८ स्थानीं गेला; ही स्थिती फारच वाईट होती. लग्नेश बुध मूळ कुंडलीच्या षष्ठांत, चंद्र अष्टमांत व अष्टमेश मंगळ शनी या पापग्रहदृष्ट सप्तमांत. म्हणजे स्वस्थानापासुन, अष्टमापासुन १२ स्थानीं. रवि कोणत्याही राशींत गेल्यापासुन पहिल्या ५ दिवसांत फल देतो. या ठिकाणीं रवि कुंभेचा होऊन तो गोचरीं अनिष्ट होता व त्याचें अनिष्ट फल मिळण्याचा काल निघून गेला नव्हता. शुक्र व चंद्र या दोन जलग्रहांपैकीं एक जलग्रह, चंद्र अष्टमांत मेष या ऊष्णराशींत आला व शनि चंद्रामध्यें वातवर्धक असें षडाष्टक पडलें व त्यामुळें मी अगोदर वर्तविल्याप्रमाणें कफविकार जरासा कमी झाला व वाताधिक्य झालें. वाताचा झटका ९॥ वाजतां सकाळीं येईल तोंपर्यंत तिची प्रकृती बरी राहील असें मी सांगितलें होतें व त्याप्रमाणें तिला बरोबर ९॥ वाजतां वाताचा झटका आला. तोंपर्यंत तिला वाताचे झटके मुळींच येत नव्हते. चंद्रमा मेष राशींत जरी सकाळीं ७॥ वाजतां शिरला तरी ९॥ पर्यंत त्याचा कांहींच अम्मल चालणें शक्य नव्हतें. मूळ कुंडलींत चंद्र सिंहराशीच्या ० अंश ५४ कला इतका आहे व तो मेषेच्या तितक्याच अंशावर येईपर्यंत चंद्राचें फल बरें किंवा वाईट मिळणें शक्य नव्हतें. चंद्रमा पुढें केतुशीं युति करीत होता.

हा एक प्रकारचा ग्रहणयोगच होय. ही युती संपूर्ण अंशात्मक अशी रात्रीं ९॥ ते ११॥ पर्यंत होणार होती त्यामुळें हा काल उलटणें म्हणजे त्याला नशीबच पाहिजे असें मी सांगितलें होतें. या युतीचा अम्मल दुपारीं ४ वाजल्यापासून होईल असें मी वर्तविलें होतें व त्याप्रमाणें तिची प्रकृती संध्याकाळीं ४ चे सुमारास बिघडली. रात्रीं ९॥ ते ११॥ पर्यंतचा काल अत्यंत कठीण जाईल असें जरी मी सांगितलें होतें तरी त्यांतल्यात्यांत ९ ते ११ पर्यंतचा काल उलटणें बहुतेक अशक्य आहे असें मी भाकित केलें होतें. कारण या वेळीं कन्यालग्न येत असून तें तिचें जन्मलग्न होतें त्यामुळें चंद्रमा व लग्नेश बुध हे मूळ कुंडलीच्या व त्या वेळच्या कुंडलीच्याही ८म व षष्ठ स्थानीं येत होते. त्याच वेळीं चंद्र ८म स्थानीं, मृत्युस्थानीं राहूशीं संपूर्ण प्रतियोग करीत असुन केतूशीं संपूर्ण अंशात्मक युति करीत होता.

अगदीं कोणत्या मिनिटाला केतुचंद्रांची अंश, कला विकलात्मक युती होत होती हें जरी पाहिलें नाहीं तरी पण ९ ते ११ पर्यंतचा काल फारच वाईट जाईल इतकें मी सांगितलेलें होतें. माझें भाकित दुर्दैवानें खरें ठरलें कारण तिचें प्राणोत्क्रमण रात्रीं १०॥ वाजतां झालें.

प्रयाणकालची कुंडली ॥

ता. १३-२-२१ रात्रीं १०॥ वाजतां मृत्यु.

रवी	केतू
१०	०
२	७
१	५९



	लग्न	चंद्र
रा.	४	०
अं.	२८	८
क.	५४	१८

सिंहरास असल्यामुळें गोचरीं सर्वच ग्रह अनिष्ट आहेत. शनी लग्नीं आहे. लग्नेश ६ स्थानीं व चंद्र ८ स्थानीं मेष या क्रूर राशींत केतू या पापग्रहाशीं

संपूर्ण युति करीत आहे. राहू चंद्राशीं प्रतियोग करीत आहे. विंशोत्तरीमानें अष्टमस्थानीं असलेल्या पापग्रहाची, केतूची, महादशा असुन शुक्राची अंतर दशा असुन तो गोचरीं अनिष्ट आहे. योगिनी दशाच्या मानें भद्रिकेची महादशा असुन उल्केची अंतर्दशा फारच अनिष्ट आहे. इतका खटाटोप करण्याचें कारण काय असा प्रश्न कदाचित् येईल परंतु त्याचें कारण इतकेंच कीं फलज्योतिष शास्त्र म्हणजे निवळ थोतांड आहे असें म्हणणाऱ्यांची थोड्या अंशीं कां होईना खात्री व्हावी कीं जर नीट सूक्ष्म तऱ्हेनें पाहिलें तर रोगोत्पत्ती, साध्यासाध्यता व कोणते वेळीं काय होईल हें १५ मिनिटांच्या, जास्त सूक्ष्म गेल्यास ८-१० मिनिटांच्या अंतरानें, स्पष्ट सांगतां येतें. दुसरें कारण असें कीं जे अगदींच नवीन लोक या शास्त्राचा अभ्यास करीत असतील त्यांनां कदाचित् फायदा होईल असें वाटल्यावरून मी हा खटाटोप केला आहे.

सोबत आयुर्वेदाचार्य नानलवैद्य यांच्या पत्राची नक्कल पाठवीत आहें तरी तीं आपण कृपा करून छापाल अशी आशा आहे. कळावें लो. अ. हे. वि.

आपला,

पुणें शहर. परशराम कृष्ण भोपटकर.

———o———

केस नं. १३०९ १७२-२१.

माझे मित्र रा. रा. ग. कृ. भोपटकर यांची कन्या नलिनी हिच्या संबंधानें पहिल्यापासुन शेवटपर्यंत तयार केलेली कुंडली (रा. भोपटकर यांचे धाकटे बंधू) मी समक्ष पाहिली असुन रा. माऊराव भोपटकर यांनीं वर्तवि. ल्याप्रमाणेंच मुलीच्या प्रकृतींत बिघाड होऊन तिला न्यूमोनिया ऊर्फ कफप्रधान संन्निपात झाला. व ठरल्या वेळेला तिला वायूचे झटके येऊन व शेवटीं सर्व तऱ्हेचीं उत्तमोत्तम कफनाशक व हृदयोद्दीपक औषधें योजूनही अखेर दोनच मिनिटें कफ वाढून प्राणोत्क्रमण झालें. ही गोष्ट जरी अत्यंत वाईट

झाली तथापि अशा बिकट व धैर्य खचणाऱ्या प्रसंगींही रा. माऊराव यानीं सूक्ष्म गणित करून आपलें पुरातन फल ज्योतिषशास्त्र प्रत्यक्ष सिद्ध ठरविलें याबद्दल कोणीही सच्छास्त्राभिमानी पुरुष त्यांचें कौतुकच करील. कळावें लो. अ. हे. वि.

(सही) पु. ग. नानल वैद्य.

सायन भाव चलित कुंडली.



जन्म-ता. २४ मे १९२०
रोजीं दुपारीं स्टं. टाईम
२ वाजून ४ मि.

ग्रहांच्या क्रांति

रवि चंद्र मंगळ बुध गुरु शुक्र शनि हर्शल नेपच्यून
२०उ४४.७उ३८.७द१८.२०उ३५.१८उ२.१७उ२३.११उ२३.१०उ११.१७उ५९.

रा. भोपटकर यांचेकडून आलेला पत्रव्यवहार आम्हीं जसाच्या तसा छापला आहे. **बालमृती**संबंधानें आम्हीं आमचे विचार ज्योतिर्माला वर्ष ३ रें अंक १,२ व ४ यांमध्यें प्रसिद्ध केले आहेत ते पाहिले असतां प्रस्तुतच्या कुंडलीवरून आयुर्मर्यादेसंबंधाची कल्पना जन्मकालींच सूज्ञ ज्योतिर्विदास करतां आली असती असें आम्हांस वाटतें. अल्पायु बालकें कोणत्या योगावर जन्म पावतात, त्यासंबंधानें आर्य व पाश्चिमात्य ज्योतिर्विद यांच्या मतांचें तुलनात्मक विवेचन पूर्वी दर्शविलेल्या निबंधामध्यें केलें असून त्यांचे विचार व मतें कोणत्या तत्वाला धरून आहेत व अल्पायु बालकें कालवश केव्हां होतात इत्यादि गोष्टींचा साग्र विचार त्याच निबंधामध्यें वाचकांस पाहण्यास मिळेल.

एखादा मनुष्य आजारी पडल्यानंतर त्या संबंधानें भविष्य करणें व तें तंतोतंत मिळणें व आजारी पडण्या पूर्वी करून ठेवलेलें भविष्य तंतोतंत उतरणें यांत अंतर आहे. पहिला प्रकार केव्हांही श्रेष्ठच आहे. दुसऱ्यांत गौण पक्ष उत्पन्न होतो. त्यामुळें शास्त्राची सत्यता जाते असें मुळींच म्हणता येत नाहीं. परंतु पहिल्या प्रकारानें शास्त्राची साक्ष जितकी जोरदार रीतीनें पटवून देतां येते तेवढी दुसऱ्यानें पटत नाहीं. **लोकमान्य** आजारी पडल्यानंतर आम्हीं ते या दुखण्यामधून उठणार नाहींत असें सांगितलें होतें किंवा अमुक दिवस उलटून गेला तर त्यांना आराम पडेल असें आम्हीं त्यांच्या मित्रमंडळीजवळ सांगितलें होतें वगैरे सांगणारे बरेच ज्योतिषी आम्हांस भेटले परंतु आमचे मतें हा प्रकार मर्द ज्योतिषांचा नाहीं. आश्चर्याची गोष्ट कीं दशा उपदशा प्राणदशा किंवा दुसऱ्या कित्येक गोष्टींचे तुंतुणें बाजविणारांनीं एक दोन वर्षांपूर्वी लोकमान्याच्या मृत्यूसंबंधानें भविष्य वर्तवून ठेविलें नाहीं हें पाहण्यासारखें आहे. ज्योतिष शास्त्रानें अशा गोष्टी सांगतां येतील किंवा नाहीं या संबंधानें पाहणें असल्यास वाचकांनी अवश्य रा. रा. दाजी नागेश आपटे व रा. रा. खोपकर यांचे कै. लोकमान्यांच्या कुंडलीवर

ज्योतिर्मालेमध्यें सन १९१९।१९२० मध्यें प्रसिद्ध झालेले विचार अवश्य वाचावे. सन १९२० सालामध्यें महाराष्ट्रामधील पुण्यांतील एका मोठ्या लोकनायकावर मृत्यूचा घाला येऊन भयंकर हानी होणार असल्याचें भविष्य आम्हीं त्या वर्षाचे ज्यानेवारीच्याच अंकांत प्रसिद्ध केल्याचें अद्यापि मालेच्या वाचकांच्या स्मरणांतून गेलें असेल असें वाटत नाहीं.

रा. भोपटकर यांनीं पाठविलेली कुंडली फारच परिश्रम घेऊन तयार केलेली असून त्यांचा व्यासंग चांगला दिसतो. इतका विचार करून तयार केलेलें भविष्य सहसा चुकणार नाहीं असें वाटतें. चंद्र हा राशीच्या शेवटल्या घटकेंत फल देतो किंवा रवि राशीमध्यें शिरल्यापासूनच्या पहिल्या पांच दिवसांत फल देतो या संबंधानें आम्ही सध्या कांहींच विचार प्रदर्शित करूं इच्छीत नाहीं. कारण गोचरीचे ग्रह कित्येक वेळा कसे साफ फसवितात व त्याआधारें अगोदर वर्तवलेलीं भविष्यें कशी फोल ठरतात हें अनुभवा खेरीज कळणार नाहीं. दशा ताजिक व गोचर या पद्धती कशा व केव्हां चुकतात या संबंधानें संशोधनाचें कार्य होणें अत्यंत आवश्यक आहे.

रा. भोपटकर यांनीं निरयण कुंडलीवरून भविष्य केलेलें आहे व तें सायन कुंडलीवरून जुळतें किंवा नाहीं त्याच प्रमाणें रोगनिदान सायन कुंडलीपेक्षां निरयण कुंडलीवरून चांगलें करितां येते किंवा काय याचा तुलनात्मक विचार करण्या करितां व वाचकांच्या सोईकरितां आम्हीं मुद्दाम सायन कुंडली देत आहो. आमचे मतें अयुर्मर्यादा व रोग याचा सायन कुंडली फारच उत्तम रीतीनें बोध करीत आहे. रा. भोपटकर रोगासंबंधानें म्हणतात "शनि व मंगळ, चंद्र व शुक्र समोरा समोर असल्यामुळें व शनीचा वात रोग, मंगळाचा पित्त रोग व चंद्र शुक्रांचा कफ रोग यावरून त्रिदोषयुक्त ताप यावा म्हणजे नवज्वर अथवा विषम व्हावा असें मी वर्तविले होते व त्याप्रमाणे तिला नवज्वर झाला. नवज्वर व विषम यांत काय काय फरक आहे हे वैद्यकीय

ज्ञानाच्या अभावामुळें मला माहित नसल्यामुळें विषम होईल का नवज्वर होइल हें मात्र मला नक्की सांगतां आलें नाहीं. " हें भोपटकर यांचें म्हणणें जरा विचित्र वाटतें. आर्य वैद्यकाची सर्व इमारत वातपित्त कफ या त्रयोवर उभारलेली आहे. परंतु नुसते वात कफ होईल एवढेंच सांगून भागत नाहीं, रोगाचे तिदान या त्रयीमध्येंच न थांबता या पेक्षां सूक्ष्म रोगनिदान करितां आले. पाहिजे. प्रकृतीमध्यें वाताधिक्य आहे किंवा कफाधिक्य आहे हे सांगणें निराळें व रोगनिदान करणें निराळें. सर्वच प्राणि त्रिदोष बलवान झाले म्हणजे मरतात !! परंतु ह भविष्य नव्हे. न्युयोनिया झाला म्हणजे तो न्युमोनियाच आहे असें सांगतां आलें पाहिजे. सर्वच गोष्टी त्रयीवर, त्यामुळे लांब लांब गोलाट्याही सहज मारतां येतात. रा. भोपटकर यांच्या वरील विधानावरून अमुक एक रोग होण्यास अमुक एक प्रकारची जन्मकालीन ग्रह स्थिति असण्याची जरुरी नाहीं असा दुसरा मुद्दा ध्वनित होतो. जन्म कुंडलीमध्यें क्षय होणार असें नसतांना अनिष्ट अमुक एक प्रकारानें वात पित्त कफ उत्पन्न करणारे ग्रह आले म्हणजे क्षय झालाच पाहिजे व उत्पन्न होतो हें म्हणणें बरेंच अविचाराचे आहे असें वाटतें कारण ज्या गोष्टी बीज रुपानें कुंडलीमध्यें नसतात त्या देखील अनुकुल प्रतिकुल गोचर ग्रहांच्या भ्रमाणानें मिळतात असें म्हणावे लागते. रा. भोपटकर यांचा अनुभव काय असेल तो खरा. आमचा मात्र तसा अनुभव नाहीं. कुंडलीमध्यें जन्मकाली क्षय किंवा दुसरे जे विकार होणारे असतात तेच गोचर किंवा इतर ग्रहांच्या परिभ्रमणानें, दशेने किंवा कोणत्याही भविष्य काल निदर्शन करणाऱ्या पद्धतीनें इष्टानिष्टकाळीं अनुभवास येतात. फोनोग्राफ किंवा ग्राफोफोन यंत्रामधील प्लेटीमध्यें जे स्वर नोंदले गेलेले असतात तेच जेव्हां जेव्हां त्यावरून ध्वनि उमटविणारी पीन फिरते त्या वेळीं तेंच तेंच पुन्हा उमटले जातात. तशीच

स्थिति ग्रहांची आहे. जन्म कुंडलीची ग्राफोफोन यंत्रामधील प्लेटी बरोबर पूर्ण साम्यतां मानता येईल व गोचर ग्रह किंवा दशा किंवा इतर कोणत्याही काल दर्शविणाऱ्या पद्धती ही पिन रुपानें आहेत. जें मुळांतच नाहीं तें कसें अस्तित्वांत यावें हें एक कोडेंचे आहे !!

जन्मकाळीं सायन कन्या लग्न उदिय पावत असून लग्नेश बुध हा मिथुन राशीमध्यें आहे. या कुंडलीमध्यें खालील प्रमाणें अनिष्ट योग झालेले आहेत. (१) कन्यारशीमध्यें शनिचंद्रांची युति; (२) हे दोन ग्रह हर्शल बरोबर मीन राशी मधून प्रतियोग करीत आहेत (३) चंद्र हा शनीनें युक्त असून रवि बरोबर केन्द्रयोग व हर्शल बरोबर प्रतियोग करीत आहे. (४) रवि बुधांची युति मिथुनेमध्यें असून (९) लग्नाधिपति बुध हा शनीबरोबर, चंद्राबरोबर व हर्शल बरोबर केन्द्रयोग करीत आहे. या कुंडलीमध्यें लग्नीं कन्या राशी सारखी कमी जीवन शक्ति देणारी राशि असून ती मध्येंच चंद्र आहे. शुभयोग फक्त एकच म्हणण्यासारखा आहे. शुक्र स्वगृहींचा नवमांत असून लग्नाच्या उदित अंशाबरोबर त्रिकोण दृष्टियोग करित आहे. पापयोगाचें प्राबल्य प्रमाणाधिक्यानें असल्यामुळें बाल्यावस्थेंतच मृत्यु दर्शविला जात आहे. [पहा बाल मृति वरील निबंध ज्यो. माला वर्ष ३ रें अंक १, २ व ४] सदर कुंडलीमध्यें सर्व अशुभ योग द्विस्वभाव राशीमधून (कन्या मिथुन व मीन) झाल्ले असल्यामुळें तद्योक राशींचे अवयव रोगी किंवा अशक्त असून त्यामुळेंच उद्भवणाऱ्या रोगानें मृत्यु आला पाहिजे. साधारणपणें द्विस्वभाव राशींचा व विशेषतः मिथुन राशीचा फुप्फुसांबरोबर Lungs बरोबर संबंध आहे. येथें मृत्यु न्युमोनियानें झालेला आहे. या विकाराला फुप्फुसदाह विकार म्हणतात. व हा विकार एका अथवा दोन्ही फुप्फुसांमध्यें होतो व त्यामुळें ताप भरतो. ज्वराची दुसरीं लक्षणें होऊं लागतात. श्वासोश्वास वेगानें चालतो. छातीमध्यें दुखत असल्यामुळें व खोकला

येत असल्यामुळें श्वास बरोबर घेववत नाहीं. कफ सुटत नाहीं त्यामुळें त्रास होतो. कित्येक वेळेला रक्त लागलेले कफाचे बडके पडतात. या विकारामध्यें कफाचें फार प्राधान्य असतें व दोनी लंग्ज बिघडतात. त्यामुळें स्वसन क्रिया मंदावत जाऊन अखेरीस मृत्यु येतो. मृत्युकाळीं शनी लग्नाच्या उदित अंशावरून वक्रगतीनें भ्रमण करीत आहे. मंगळ शनीचा प्रतियोग सुटला असुन नुकताच मंगळ मेष राशीमध्यें जात आहे. चिटणीसांच्या परिभ्रामण पद्धतीनें विचार करण्या सारखी ग्रह स्थिति येत आहे. मृत्युकालीं तुला राशीचा २० वा अंश उदय पावत आहे. म्हणजे जन्मकालीं अष्टमेष मंगळ ज्या अंशामध्यें आहे तोच अंश उदय पावत आहे. व हा अंश (तुला २०) जन्मकालीन चंद्र व शनिबरोबर ४९ अंश, हर्शल बरोबर व रवि बुधाबरोबर १३९ अंश अंतराचा अशुभ दृष्टियोग करीत आहे.

—संपादक—

———o———

पत्र व्यवहार.

ज्योतिर्माला कर्ते मु. दादर यांस:—

सा. न. वि. वि. आपणांकडे आपल्या वाचक वर्गास उपयोगी पडेल अशी एका मुलाची कुंडली पाठवित आहें. तीस पुढील अंकीं आपल्या मासिक पुस्तकांत स्थळ मिळेल अशी आशा आहे.

जन्म शके १८२४ पौष शु॥ ३ रात्रौ मुं. टा. ११। इं. ता. १ जानेवारी १९०३.



सदर्हू कुंडलींत पंचमांत ४ ग्रह असोन् बाकीचे केंद्रांत आहेत. तेव्हां या कुंडलींत कांहीं तरी अपूर्व योग असावा असें वाटल्यावरून ती पाठवीत आहें. आपल्या २ ऱ्या वर्षाच्या अंक नं. ४ मध्यें कै. न्या. रानडे यांचें कुंडलीचें विवेचन पहातां त्यांत पंचमांत गुरू-शनींच्या अत्यंत दुर्मिळ युतीचें वर्णन आहे तीच युती या मुलाचे कुंडलींत पंचमांत मकर राशीमध्येंच झालेली आहे. तेव्हां तिचा परिणाम या कुंडलींत काय व्हावा. जे लोक उदयास आलेले आहेत किंवा येऊन गेले त्यांच्या कुंडल्यांतले योग घेऊन निदान ठरविण्यापेक्षां अमुक मनुष्य त्याच योगावर पुढें येईल किंवा नाहीं हें ठरविण्यांत विशेष आहे. सहर्हू मुलगा आज इंग्रजी ७ वें इयत्तेंत शिकत असून बुद्धीमत्तेनें साधारणच आहे. तेव्हां या युतीचा परिणाम या कुंडलींत काय व्हावा हें आपण अगर आलेले वाचक ठरवितील अशी आशा आहे. कळावें हें विज्ञापना.

आपला,

परमानंद राणे.

व्यक्ति तितक्या प्रकृती म्हणतात तें कांहीं खोटें नाहीं. कांहीं जणांना आम्हीं कुंडली वर्णन देत होतों तें हवें तर कांहींना तें नको आहे. सर्वत्रांना खुष करण्याचें काम फारच कठीण आहे. रा. परमानंद राणे म्हणतात कीं, प्रसिद्ध असलेल्या लोकांच्या कुंडल्यांवरून योगाची सत्यता ठरविण्यापेक्षां अमुक मनुष्य त्याच योगावर पुढें येईल किंवा नाहीं हें ठरविणे विशेष आहे. होय विशेष आहे ही तर गोष्ट खरीच, परंतु अमुक योगावर अमुक होतें हें कसें ठरवावयाचें याचा कांहीं ते खुलसा करतील तर बरें. ग्रंथांत वर्णन केलेलें योग अनुभवास पटले म्हणजे मग त्यांची महती कळते व नंतर त्यांवरून पुढील भविष्य अचुक करितां येतें. अनुभवाच्या अभावीं सर्व गोष्टी फोल असतात.

सायन भावचलित कुंडली.



रा. राणे मकर राशीमध्यें गुरुशनींची युति म्हणत आहेत वर सायन कुंडली दिली आहे. गुरुशनीमध्यें २१ अंशांचे अंतर आहे. याला जर युति म्हणावयाची असेल तर मात्र सगळेच रानडे उत्पन्न झाले पाहिजेत हें खास !! रा. राणे यांनीं आतां वर दिलेल्या सायन कुंडलीचा रानडयांच्या कुंडलीबरोबर तुलनात्मक विचार करून किती साम्य आहे तें दाखवावें. या कुंडलीमध्यें गुरु चंद्र युति पंचमामध्यें जितकी चांगली झाली आहे तितकीच शनि बुधाची युति बाईट झालेली आहे. लग्नांत अष्टमेश मंगळ असून तो रवि बरोबर केंद्रयोग करीत असून दशमांत असलेल्या नेपच्यून बरोबर प्रतियोग करीत आहे. यामुळें या कुंडलीमध्यें वैगुण्यत्व उत्पन्न झालें आहे.

—संपादक—

॥ श्रीसद्गुरवे नमः ॥

ज्योतिर्माला

आशाचः कामरूपाद्द्रुहिणसुतनदप्लावितादाम्रतीचो
गान्धारात् सिंधुसार्द्राद्रघुवररचितादाश्वसेतोरवाचः ।
आकेदारादुदीचस्तुहिनगहनतः सन्तिविद्वत्समाजा
ये ये तानेष यत्नः सुखयतु समजान्कश्चमत्कर्तुमीष्टे ॥ १ ॥

अभिनवाऽऽवृत्ति वर्ष ६ वें अंक ५, ६.

कालविधानशास्त्र.

(ना. स. मराठे–मुंबई ४.)

(नाशिक येथें भरलेल्या 'हिंदुधर्मपरिषदे'पुढें वाचण्यासाठीं
हा निबंध नेलेला होता. पण हा फार मोठा आहे असें
सांगण्यांत आल्यावरून याचाच सारांशरूप
उतारा सादर केला आहे.)

हिंदुधर्मीयांस या शास्त्राची पदोपदीं जरूरी आहे. स्नानापासून तों यज्ञयागापर्यंत कोणत्याही धर्मकृत्यास कालविधान शास्त्राची अत्यंत जरूरी आहे. हें कालविधान कोणीतरी ठरविलेलें नसावें. तें श्रुति स्मृति पुराणांस अविरुद्ध असावें, कारण कोणतेंही कार्य करितांना जो संकल्प करण्यांत येतो तो कोणाच्या तरी मताचें फळ मिळविण्याचा नसून श्रुति स्मृतिपुराणोक्त फल मिळविण्याचा असतो. योग्य कालीं धर्माचार न करितां केव्हां तरी तो करणें म्हणजे

कालविधान शास्त्राची जरूरी.

अकालकर्मजन्य दोष पदरीं घेणें होय. तरी धर्माचारांस योग्य असें कालमापन प्रचारांत आणण्याचें मुख्य कार्य जगद्गुरुपीठाकडून होणें अगत्याचें आहे.

वेदाहि यज्ञार्थमभिप्रवृत्ताः कालानुपूर्वा विहिताश्च यज्ञाः ॥

तस्मादिदं कालविधानशास्त्रं यो ज्योतिषं वेद स वेद यज्ञान् ॥ श्रुत्यंगम् या श्रुत्यंगावरून लक्षांत येईल कीं जें कालमापन हिंदुधर्मानुयायी माणसांस जरूरीचें आहे तें मुख्यतः योग्य काल जाणण्यासाठीं आहे. अशा प्रकारचें कालमापन केलेलें पंचांग सांप्रत एकही नाहीं.

सांप्रतच्या पंचांगांत ऋतुमासविपर्ययामुळें कालविहित आचार घडत नाहींत. 'संवसन्ति ऋतवः यस्मिन् स संवत्सरः' हें संवत्सराचें लक्षण सांप्रत नष्टप्राय झालेलें आहे. वसंतादि सहा ऋतूंचा पूर्णपणें समावेश होणारा जो काल तो संवत्सरसंज्ञक होय. सांप्रतच्या पंचांगकारांनीं हा ऋतुपर्याय दर्शविणारा संवत्सर सोडलेला आहे. ऋतु हे मेषसंपातापासून सुरू होतात. संपात बिंदु चल असल्यामुळें जेथें संपात असेल तेथूनच ऋतुचक्राचा आरंभ होतो. सांप्रतच्या पंचांगांत संपातापासून गणना होत नसल्यामुळें ऋतुविपर्यास सारखा वाढत आहे. या ऋतुविपर्यासाप्रमाणेंच अयनविपर्यासही

वर्षऋतुमासविपर्यास वाढत्या प्रमाणावर आहे.

होत आहे. उदगयन सुरू होऊन २०।२२ दिवस झाल्यानंतर सांप्रतच्या पंचांगांत उदगयन लिहितात. यामुळें उदगयन असूनही २०।२२ दिवस धर्माचार प्रसंगीं दक्षिणायनाचा उच्चार केला जातो ! हा विपर्यास बरील वर्षऋतुविपर्यासाइतकाच अनिष्ट आहे. महिन्यांचीं नांवें बदललीं कीं महिन्यांतील धर्माच्या पालनाचे सणही तदनुरोधें बदलतात. मासनामकरण "मेषादिस्थे सवितरि यो यो मासः प्रपूर्यते चांद्रः चैत्राद्यसंज्ञेयः पूर्तिद्वित्वेऽधिमोत्यः ॥" या सूत्राप्रमाणें करावयाचें

असतें. संपातबिंदूच्या गतीमुळें अयनांशांचें प्रमाण वाढतें आहे. या वाढत्या अयनांशामुळें मासनामें ही बदलत चाललीं आहेत. रवि मेषांत १९।२० अंश असतां अयनांशरहित केल्यास तो मीनेचा होतो व या मीनेंत रवि असून चांद्रमास पुरा झाल्यास त्यास फाल्गुनमास हें अभिधान प्राप्त होतें. पण प्रत्यक्ष मेषांत हा मास पुसहोत्त असल्यामुळें तो चैत्रसंज्ञक आहे.

अयनांशसंस्कृतो भानुर्गोले चरति सर्वदा हें वचन स्पष्टपणें दर्शवितें कीं रवि हा गोलांत अयनांशविरहित नाहीं. पंचांगपरिगणनेंत सांप्रत अयनांशविरहित रवि घेतात तो प्रत्यक्ष गोलाशीं विरोधी घेतला जातो. व या विरोधी घेण्यामुळें "प्रत्यक्ष ज्यौतिषं शास्त्रं चंद्रार्कौ यत्र साक्षिणौ" अथवा "यस्मिन्पक्षे यत्र काले येनदृग्गणितैक्यकम् । दृश्यते तेन पक्षेण कुर्यात्तिथ्यादि निर्णयम् "इत्यादि सूत्रांस पूर्णपणें वर्ज केल्याचा दोष पंचांगकारांच्या पदरीं येतो. व अशा प्रकारें मास ऋतुअयनवर्ष यांचा विपर्यास ज्या कालगणनेंत होतो अशी कालगणना हिंदुधर्मीयानें आपले धर्माचारास योग्य काल मिळण्यास घेणें अत्यंत अविहित आहे. तरी या बाबीचा आचार्यपीठाकडून निर्णय होऊन विहित कालीं कर्माचार घडतील अशा श्रुतिस्मृतिपुराणोक्त कालदर्शक पंचांगांची सर्वत्र परिव्याप्ति करण्याबाबद प्रयत्न होणें जरूर आहे.

ऋतुपर्यायात्मक वर्ष सांप्रत जें सुटलें तें वास्तविक वर्षमानापेक्षां फाजील वर्षमान घरल्यामुळें सुटलें. सौरवर्षाचें वास्तविक वर्षमान व सूर्यसिद्धांतोक्त वर्षमान यांत ९९॥ पलें अंतर आहे. सूर्यसिद्धांतोक्त वर्ष एवढें जास्त धरि-

सूर्यसिद्धांतोक्त वर्ष व त्याचें लक्षण

ल्यामुळें आज इतक्या वर्षांनीं ऋतुविपर्यास २२।२३ दिवसाइतका होत आहे. असेंच वर्षमान कायम ठेवल्यास दर वर्षी होणाऱ्या ९९॥ पलांच्या वाढीनें हा विपर्यास वाढता राहील. हें वर्षमान सांप्रतचे पंचांगसुधारक बदलूं इच्छितात. पण तें बदलतांना

सूर्यसिद्धांतोक्त वर्षलक्षणांकडे दुर्लक्ष करून केवळ निरयणसौर वर्षमान व सूर्यसिद्धांतोक्त वर्षमान यांत असलेलें ८॥ पलांचे अंतर काढून टाकण्याइतकी ते सुधारणा करीत आहेत. सूर्यसिद्धांतांत (उत्तरध्रुवस्थांचें) देवांचें जें अहोरात्र तें मानवांचें वर्ष असें लक्षण सांगितलें आहे. संपात हा क्रांतिवृत्तांतील विषुवांतील बिंदु असल्यामुळें संपातीं सूर्य आल्याशिवाय देवांस सूर्यदर्शन घडणार नाहीं. म्हणून एकदा मेष संपातीं सूर्य आल्यापासून फिरून तो मेषसंपातीं येण्यापर्यंतचा जो काल तें मनवांचें वर्ष होय. हें वर्ष सांपातिक असल्याचें सूर्यसिद्धांतोक्त वर्षलक्षणावरून उघड होतें. ज्या ग्रंथांत वर्षमान व वर्षलक्षण दिलेलें आहे तें लक्षण व तें वर्षमान हें एकाच सांपातिक सूर्यभ्रमणाचें आहे. सूर्यभ्रमणाचे १२ भाग ते राशि व २७ भाग तीं नक्षत्रें असा स्पष्ट उल्लेख ज्योतिषग्रंथांत आहे. तेव्हां पंचांगगणनेंतील सांप्रत ज्या राशि व जीं नक्षत्रें घेण्यांत येतात तीं प्रत्यक्ष सांपातिक सूर्यभ्रमणाशीं जुळतीं नाहींत तरी हीं सांपातिक सूर्यभ्रमणाशीं जुळतीं येतील अशी आज्ञा आचार्यपीठाकडून होणें अवश्य आहे.

मेषसंपात हें वर्षारंभस्थान अजी सोडून दुसरें एखादें स्थिर आरंभस्थान धरण्याच्या मोहांत पंचांगसुधारक पडल्यामुळें अयनांशभिन्नता दृष्टीस पडत आहे. यामुळें अधिकमासांत भिन्नता येऊन

निरयणांतील अनेकविध मतें.

सर्वत्र गोंधळ उडतो. ग्रहलाघवीय अधिक श्रावण तर पटवर्धनी (केरोपंती) पंचांगोक्त अधिक आश्विन ! आणि पंचांगप्रवर्तन कमिटीचा अधिक आषाढ !! आणि खरोखरी प्रत्यक्ष गोलांत यंदा अधिकमास नाहीं. अधिमास नसतां अधिकमास धरणें हेंच अगोदर अविहित. यामुळें विहित धर्माचारांचा लोप होतो व अविहित व अधिकमासोक्त कर्म आचरल्याचा दोष मात्र जनतेच्या पदरीं येतो. या पंचांगभेदामुळें यंदा ग्रहलाघवीय श्रावण चालू असतां पटवर्धनी पंचांगाप्रमाणें गणेश चतुर्थी साजरी झाली व पितृपक्षही साजरा होत आहे. तरी अशा अनेकविध मतानें पंचांग व हिंदु धर्माचार यांची थट्टा होत आहे व धर्माचारांवरील जनतेची श्रद्धाही ढळूं लागण्याचा जास्त संभव आहे. ही धर्मावरील आपत्ति टाळण्याचा उपायधर्मपीठाकडून होणें जरूर आहे.

ग्रहलाघवाप्रमाणें पंचांग केल्यास त्यांतील ग्रहणें, ग्रहयुत्या, अस्तोदय इत्यादि चुकीचे येतात तरी हिंदु लोकांस मौंजीविवाहादि धर्मसंबंधी कृत्यास ज्याची जरूरी असें पंचांग करण्याच्या इराद्यानें कै. केरोपंत छत्रे यांनीं पंचांग चालू केलें. तेंच सांप्रतचें पटवर्धनी पंचांग होय. या पंचांगाविषयीं

शुद्धिकरणाविषयीं अलीकडील प्रयत्न.

गुणदोष जे ज्यांचे दृष्टीस पडतील ते त्यांनीं निःशंकपणें बर्तमानपत्रद्वारें कळविल्यास त्यांचें आम्ही समाधान करूं अशी प्रस्तावना या पंचांगांत १२ वर्षें पर्यंत होती. पण या प्रस्तावनेप्रमाणें जेव्हां कै. बिसाजी रघुनाथ लेले यांनीं प्रश्नांची मालिका पंचांगकारांपुढें ठेविली व त्यावर बर्तमानपत्रांत उहापोह चालू केला त्या वेळीं त्यांनीं पंचांगाचें केरोपंती हें नांव बदलून पटवर्धनी हें नामाभिधान ठेविलें, प्रस्तावना काढून टाकली व वादविवादास १२।१५ वर्षें गेल्यानंतर लेलेमजकुरांस "सायन बाबची खरी पण ती येथें रूढ नसल्यामुळें अंमलांत आणणें योग्य नव्हे" अशा अर्थाची कबुली दिली. या वादविवादप्रसंगीं कै. शंकर बाळकृष्ण दीक्षित व जनार्दन बाळाजी यांनीं सायनप्रवर्तनच योग्य अशी बर्तमानपत्रद्वारा ग्वाही फिरविली. काशीचे पं. बापूदेव यांनीं सायनमानच खरें अशी कबुली दिली व तत्प्रीत्यर्थ आधारवचनांचें पुस्तक प्रसिद्ध केलें. मात्र काशीस पंचांग चालू करतांना प्रस्तावनेंत सायन खरें पण रूढीप्रमाणें निरयण पंचांग सुरू केलें. या शुद्धिकरण्याच्या प्रयत्नापासून ग्रहलाघवाशिवाय हीं दोन पंचांगें निराळीं अशीं जनतेच्या नेत्रांसमोर आलीं. छत्र्यांचे अयनांश व पं. बापूदेव यांचे अयनांश भिन्न होते. पं. बापूदेवजींचे पंचांगांतील अयनांशपद्धति सूर्यसिद्धांतोक्त मेषसंक्रमणकालीं सायन रवि जो असेल तितके अय-

नांश ही आहे. कै. केरोपंतांची अयनांश रीति रेवतीपुंजांतील झीटा पीशिअम हा तारा व संपातबिंदु यांचें अंतर ते अयनांश ही आहे. कै. विसाजी रघुनाथ लेले, शंकर बाळकृष्ण दीक्षित, जनार्दन बाळाजी मोडक यांचा इंदूर सरकारच्या राजज्योतिष्यांशी वादविवाद होऊन अखेरीस सायनपंचांग प्रवर्तनास इंदूरसरकारचें प्रोत्साहन मिळालें व लेलेदीक्षित यांनीं सायनपंचांग प्रवर्तन सुरू केलें. याप्रमाणें सायनपंचांग प्रवृत्तीकडे इंदूरसरकार श्रीमंत महाराज तुकोजीराव होळकर यांची दृष्टी पोहंचून त्यांनीं आश्रय दिल्यामुळें सायन पंचांग तयार होऊन छापून प्रसिद्ध होऊं लागलें. पुढें सदोदित सायनपंचांग चालू राहील अशी व्यवस्था होण्याची जी आशा होती ती ते महाराज स्वर्गवासी झाल्यामुळें खुंटली. इतकेंच नव्हे तर पटवर्धनी (केरोपंती) पंचांग प्रचारांत आणण्याविषयीं जगद्गुरूंकडे खटपटी होऊं लागल्या, त्याचप्रमाणें १ मे १८८२ च्या इंदुप्रकाशांत श्रीमच्छंकराचार्य जगद्गुरु यांस व सर्व विद्वानांस सूचना या हेडिंगाखालीं जो मजकूर प्रसिद्ध झाला त्यांत "धर्मसंबंधी ज्या अडचणी आहेत त्या सुधारण्याचा बोजा प्रत्येक देशसुधारणेच्छूनें स्वत: शिरावर न घेतां मुख्य मुख्य ठिकाणच्या वजनदार लोकसमूहाच्या सहीनें अर्जद्वारा सर्व अडचणी जगद्गुरूंकडे पाठवाव्या" असा मजकूर होता. पटवर्धनी पंचांग प्रचारांत आणण्याविषयीं जगद्गुरूंकडे खटपटी होणें हें धर्मसंबंधी विपरीत जाणून श्रीमच्छंकराचार्य जगद्गुरु मठ नंकेश्वर व शृंगेरी या उभयमठांकडे अनेक विज्ञप्ति पत्रें डाकमार्गें रवाना करण्यांत आलीं. १७ अक्टोंबर १८९० रोजीं ९२ ठळक ठळक सह्यांनिशीं अर्जी करण्यांत आली. सायनपंचांगप्रवर्तकांनीं पुढें १६ डिसेंबर १८९० रोजीं एक संस्कृत पत्र जगद्गुरुपीठाकडे रवाना केलें. पुढें भारतीय युद्धारंभ कालाचो स्पष्टग्रहस्थिति जगद्गुरूकडे पाठविली. ही ग्रहस्थिति अयन असून तीवर केरोपंत छत्रे यांनीं तपासून 'बरोबर' असल्याचा शेरा होता. या ग्रहस्थितीचा विचार होण्याविषयीं आज्ञापत्र पाठविलें. याप्रमाणें २२ स गृहस्थांच्या सह्यांनिशीं व आधारवचनांसह

विज्ञप्ति पत्रें रजिस्टर पोष्टानें रवाना झाल्यावरही अनेक दिवस होऊन कांहीं एक निर्णय उभय आचार्यपीठांकडून केला गेला नाहीं. म्हणुन कै. लेले यांनीं

शास्त्रबाह्यं निरयणं पंचांगं ऋतुदोषकृत् ॥
सशास्त्रं सायनं शुद्धं विषुवायनसाक्षिकम् ॥

असा शिलालेख तयार केला व त्याविषयीं श्रीकडून विचार होण्यासाठीं प्रति सोमवारीं ज्ञानसागरांत करवीरक्षेत्रांत जाहिरात रूपानें श्रीचे नांवें प्रार्थना प्रसिद्ध ठेविली होती. श्रीमच्छंकराचार्य मठसंकेश्वर व शृंगेरी या उभय संस्थांनीं पंचांगाच्या नमुन्यासह प्रमाणवचनांनीं अनेक प्रकारच्या विनंत्या होऊन दीड वर्ष होऊन गेलें सबब उपदेशपरंपरा संकेश्वरमठीं असल्याकारणानें प्रति गुरुवारीं व स्थानपरंपरा शृंगेरीमठ असल्याकारणानें त्यांजकडे दर १५ दिवसांनीं एकेक कार्ड सूचनार्थ रवाना होत होतें. त्या कार्डातील मजकूर

"वेदाहि यज्ञार्थमभिप्रवृत्ताः कालानुपूर्वा विहिताश्च यज्ञाः ॥
तस्मादिदं कालविधानशास्त्रं यो ज्योतिषं वेद स वेद यज्ञान् ॥ वेदांगे ॥
एतदर्थम् ।

श्रुतिस्मृतिपुराणोक्तं विहितं कालदर्शकम् ॥
सवत्रदकृप्रत्ययदं विषुवायनसाक्षिकम् ॥ १ ॥
उक्तकालप्रसिद्ध्यर्थं कृतकर्मफलप्रदम् ॥
मत्कृतं सूक्ष्मतायुक्तं पंचांगं सायनाभिधम् ॥ २ ॥
विचारयुक्तसंपूर्णं विज्ञप्तिसहितं पुरा ॥
श्रीमच्चरणसान्निध्ये संस्थाने प्रेषितं मया ॥ ३ ॥
तद्ग्राह्यं वा नैवमेतद्वेदमार्गप्रवर्तक ॥
श्रीमज्जगद्गुरो धर्मादाज्ञापयितुमर्हसि ॥ ४ ॥

अन्यथा—येन केनप्रकारेण कालज्ञानं प्रवर्तते ॥

शास्त्रबाह्यं निरयणं पचांगमृतुदोषकृत् ॥ ५ ॥
श्रुतिस्मृतिपुराणानां संग्रहो व्यर्थतां व्रजेत् ॥
तथैकपूज्यपादानामाश्रयोपि निरर्थकः ॥ ६ ॥"

इतका ऊहापोह होऊनही जगद्गुरूंकडून निर्णय कांहींच झाला नाहीं. म्हणून २२ आगष्ट १८९२ च्या ज्ञानसागरांत शेवटचें श्रींस पाठविलेलें पत्र प्रसिद्ध झालें. संवत १९४९ फल्गुन शु. २ रोजीं द्वारकापीठाधीशांकडे ग्वाल्हेर मुक्कामीं विज्ञप्ति केली होती त्या विज्ञप्ती प्रमाणें त्यांनीं सायनमान प्रवर्तनाविषयीं आज्ञापत्र दिलें आहे. तें आज्ञापत्रही या निबंधास जोडलें आहे.

यानंतर शंकर बाळकृष्ण दीक्षित यांनीं भारतीय ज्योतिःशास्त्राचा इतिहास म्हणून एक अत्युत्तम ग्रंथ प्रसिद्ध केला. त्यांत सर्व सायननिरयणबाबींचा ऊहापोह करून अखेरीस सायनमानच प्रवर्तन झालें पाहिजे असा निर्णय दिला आहे. तो त्यांचे ग्रंथांत पृ. ४३० मध्यें पहावयास सांपडेल.

यानंतर व्यक्तिदृष्ट्या पंचांग शुद्धीसाठीं प्रयत्न ज्यो. केतकरांनीं केला.

पंचांग सुधारणेचे अपुरे प्रयत्न.

हा प्रयत्न पंचागशुद्धीसाठीं म्हणण्यापेक्षां ग्रहलाघवार्थी मिळते असे अयनांश घेऊन स्वतंत्र केतकी पंचांग चालविण्याचा होता. कारण याही पंचांगांत ऋतुमासविपर्यास झालेला आढळतो. यांनीं आपले अयनांशांस आधार म्हणून चित्रातार्‍याचे सायन भोगांपासुन १८० अंशांवर येणारा जो बिंदु तो बिंदु व मेषसंपात यांतील जें अंतर ते अयनांश अशी अयनांशोपपत्ति सांगली आहे. पुढें त्यांतही अधिमासभिन्नत्व आढळून मध्यंतरी वर्तमानपत्रीं बराच वाद माजला होता. पण त्या वेळीं प्रत्यक्षगोलांत अधिमास होता कीं नाहीं इकडे लक्ष दिलें गेलें नाहीं. सन १९०६ सालीं अखिल भारतीय पंचांग परिषद होऊन त्यांत अयनगति शुद्ध घ्यावी, सूर्यसिद्धांताचें वर्षमान घ्यावें. सांप्रत अयनांश २२।२३ यांचे दरम्यान घ्यावे, सायन संक्रांति पंचांगांत घ्याव्या वगैरे ठराव पास केले व त्याप्रमाणें पंचांग प्रवर्तन करण्याचा प्रयत्न एक वर्ष झाला. पुढें हा प्रयत्न चालू राहिला नाहीं. यानंतर शके १८३९ सालीं पुणे येथें महाराष्ट्रीय ज्योतिषसंमेलन झालें. त्या वेळीं अयनांश १८४० च्या प्रारंभीं २३ घरावे असा ठराव पास झाला व त्याप्रमाणें पंचांगप्रवर्तन

सुरूं झालें पण त्याप्रमाणें पंचांग चालू असतां ग्रहलाघवाचा व पंचांगप्रवर्तन कमिटीच्या पंचांगाचा श. १८४२ सालीं अधिकमासांत भेद पडला. व त्यामुळेंच सांगलीस संमेलन करण्याचा प्रसंग पडला. त्या संमेलनसमयीं पुण्याचें अयनांश रद्द ठरून पटवर्धनी पंचांग रूढ होण्याचें कांहीं अटीवर निश्चित ठरलेलें आहे. पण हे ठराव एका समेनें करावे व दुसऱ्या सभाप्रसंगीं रद्द करावे. यामुळें पंचांगावरील सामान्य जनतेची फारच विचित्र स्थिति झालेली आहे. या नानामतांचा घोटाळा मोडून ज्याप्रमाणें आद्यशंकराचार्यांनीं अनेकधर्ममतांचा उच्छेद करून सनातनधर्माचें प्रवर्तन केलें तद्वत् पंचांगोद्धार करून श्रुतिस्मृतिपुराणोक्त कालदर्शक पंचांगाचें प्रवर्तन सुरू करावें व सर्व जनता जी अकालकर्मजन्यदोषांत सांपडली आहे तिचा उद्धार करावा हीच जगद्गुरुपीठाकडे माझी अभ्यर्थना आहे.

यस्मिन्देशे य आचारः पारंपर्यक्रमागतः ॥
आम्नायैरविरुद्धश्चेत् सधर्मः परिकीर्तितः ॥

संवर्तस्मृति.

यावरून एखादा आचार केवळ हजारो वर्षांपासून चालत आला आहे एवढ्यावरच तो धर्म या सदरांत येऊं शकत नाहीं. तो आचार वेदांच्या अविरुद्ध असेल तर ग्राह्य समजावा.

जी पंचांगपरंपरा आज जवळ जवळ १४०० वर्षें चालू आहे ती विषुवायनमासविपर्यास बाढविणारी आहे. कांहींचें म्हणणें ही परंपरा अशीच चालू ठेवावी फक्त त्यांत प्रत्यक्ष ग्रहणादिकांची सूक्ष्मता साधावी इतकेंच. पुण्यास अध्यक्षस्थानीं असलेले लो. टिळक यांनीं असें सुचविलें कीं वर्षारंभ ३० अयनांश झाल्यानंतर मागें १ महिना घ्यावा. चैत्रांतील धर्मकृत्यें त्या वेळीं फाल्गुनांत करण्याचा परिपाठ पाडावा म्हणजे झालें. अशा रीतीनें प्रत्येकमासास

दर२००० वर्षांनीं वर्षारंभाचा मान मिळेल व सर्व ऋतुद्वादशमासांत फिरून २९००० वर्षांनीं फिरून चैत्रास वर्षारंभत्व येईल. पण अशा प्रकारें सुधारणा करण्यानें सर्व श्रुतिस्मृतिपुराणांस अजी रद्द ठरवावें लागेल. पांडवकालीं कार्तिकांत शरदंत व हिमागम होत असे. हा ऋतुक्रम जर असाच प्रत्येकमहिन्यास वर्षारंभाचा मिळत असून येणें अशक्य आहे. वसंतांतील मास वसंतांत अशाच सर्व ऋतु व मास यांची सांगड वेदकालापासून चालू आहे. हे ऋतु व मास अजी तोडून टांकणे व सर्वच कालविधानशास्त्र बिघडवून टाकणें हें कोणासही मान्य होणार नाहीं. म्हणून सांगलीसंमेलन प्रसं. श्री. भिकाजी महादेव पेंडसे व ज्यो. विष्णु गोपाळ नवाथे संपादक कुंडली विज्ञान यांनीं पंचांगातील सौरवर्षमान बदलावयाचें तर तें सिद्धांतोक्त वर्षलक्षणा प्रमाणें बदला असें सांगितलें. त्या वेळीं संमेलनाचे अध्यक्ष महाराजांनीं "प्राचीन सिद्धांताविषयीं तुम्ही (सायनपक्षी) म्हणतां तें बरोबर आहे. पण निदान अलीकडील एक हजार वर्षात तरी सांपातिक वर्षमान प्रचारांत नव्हतें इतकें तर खरें ?" असा उद्गार काढूनच हजारवर्षांपासुन चालत आलेली परंपराच कायम करून पंचांगसुधारणा करावयाची आहे, असें सांगितलें. म्हणून पंचांगांची व्यवस्थित घडी घालतांना जें स्पष्ट,शुद्ध व श्रुतिस्मृति पुराणांशीं अविरुद्ध असेल असें कालदर्शकपंचांग प्रवर्तनात आणावें. केवळ पीठाकडील आज्ञा म्हणून वाटेल त्या पंचांगाचें प्रवर्तन करण्यांत येऊं नये. अशा रीतीनें १४०० वर्षेपर्यंत जी वेदविरुद्ध रूढि चालू आहे ती बदलल्यास कोणत्याही प्रकारचें नुकसान न होतां सर्वांस शुद्ध काळीं आपलें धर्माचरण करितां येईल.

———o———

नवीन व्हाईसराय साहेबांची कारकीर्द कशी काय जाणार ?

आपली पांच वर्षांची संस्मरणीय कारकीर्द संपवून **लार्ड चेम्सफर्ड** हे तारीख २ रोजीं दुपारीं १ वाजण्याच्यां सुमारास स्वदेशीं प्रयाण करण्याकरितां " एस. एस. कल्याण " बोटीवर चढले. **लार्ड चेम्सफर्ड** यांची कारकीर्द हिंदुस्थान देशाच्या दृष्टीनें अत्यंत संस्मरणीय झाली असुन या पांच वर्षांच्या अल्पावधीच्या काळांतच **जागृति, दडपशाही आणि सुधारणा** या तिन्ही अंगांचा हिंदुस्थानांत चांगलाच विकास झालेला पाहण्यास मिळाला आहे. लॉर्ड चेम्सफर्ड यांनीं मुंबई येथें अधिकाराचीं सूत्रें ज्या वेळीं आपल्या हातामध्यें घेतलीं त्यावेळेच्या ग्रहस्थितिवरून ही कारकीर्द मोठी महत्वाची जाणार असून सुधारणेबरोबरच अनेक प्रकारचे अनिष्ट प्रकार यापुढें देशांत झालेले पाहण्यास मिळून अपयशाचें खापर लॉर्ड चेम्सफर्ड यांचेवर फुटेल असें आम्हांस वाटलें होतें. लॉर्ड चेम्सफर्ड यांनीं अधिकारसूत्रें हातीं घेतलीं त्या वेळीं मालवें नुकतेंच कोठें पहिलें वर्ष संपलेलें होतें व इतक्यांतच आपण असल्या मोठ्या महत्वाच्या विषयावर विचार प्रसिद्ध करण्याचें धाडस न करितां देशाला ही कारकीर्द कशी जाते याचें बारीक निरीक्षण करून जमल्यास पुढें येणाऱ्या व्हॉइसराय साहेबांच्या कारकिर्दीसंबंधानें भवितव्य प्रसिद्ध करावें असें ठरविलें व त्याच प्रमाणें आमच्या मित्र मंडळाचा सल्ला पडल्यामुळें त्या वेळीं कांहींच विचार प्रसिद्ध केले नाहींत. परंतु पूर्व संकल्पाप्रमाणें आतां तो योग आला असल्यामुळें व्हॉईसराय **लार्ड रेडिंग** यांची कारकीर्द हिंदुस्थान देशाच्या भावी आकांक्षेस व हितसंबंधास कशी काय जाणार याबद्दल चार शब्द प्रस्तुतच्या अंकामध्यें लिहिण्याचें योजिलें आहे.

अमुक एक राजाची किंवा त्याच्या प्रतिनिधीची कारकीर्द कशी काय जाईल ह्याबद्दल भविष्य जाणण्याची जिज्ञासा प्रत्येकासच असते परंतु भविष्य वाचणें जितकें सोपें आहे किंवा त्यावर खरमरीत टिकारूपी राखेचे तोबरे चढविणें जितकें सोपें आहे तितकेंच सशास्त्र भविष्य करणें अत्यंत कठीण आहे. या विषयावर स्वतंत्रपणानें विवेचन केलेला एकही ग्रंथ दिसत नाहीं. त्यामुळें प्रत्येक ज्योतिर्विदास आपआपल्या बुद्धिमत्तेप्रमाणें भविष्य करावयाचें असतें. भविष्य करण्याचा सर्व साधारण पहिला प्रकार म्हणजे ज्या देशावर जो राजा किंवा प्रतिनिधी राज्य करीत असतो त्याच्या कुंडलीवरून पुढील कारकीर्दीची अटकळ बांधणें हा होय. किंवा एखाद्या राजानें किंवा प्रतिनिधीनें अधिकारसूत्रें ज्या वेळीं हातामध्यें घेतलीं त्या वेळच्या ग्रहस्थित्यनुरोधानें पुढील काळाचा विचार करणें हा दुसरा प्रकार होय परंतु या सर्वांचा मेळ उत्तम रीतीनें बसविण्यास राष्ट्रीय ज्योतिषाची किंवा मेदिनीय ज्योतिष शास्त्राची चांगली माहिती असावी लागते. बहुशः राजांचा किंवा त्यांच्या प्रतिनिधींचा जन्मकाळ व त्यांच्या अधिकारसूत्रें ग्रहण करण्याच्या वेळेचा काल नक्की मिळत नाहीं. व म्हणूनच हा विषय किती बिकट आहे याची थोडीबहुत कल्पना सहज करतां येण्यासारखी आहे.

या विषयावर सशास्त्र विवेचन कसें करावें याचा उत्तम घडा महाराष्ट्र भाषेमध्यें कै. रा. रा. चिटणीस यांनीं " लॉर्ड सॅन्डहर्स्ट " यांचे कारकीर्दीसंबंधीं भविष्य ज्योतिर्माला वर्ष १ लें सन १८९९ सालच्या अंकामध्यें करून घालून दिलेला आहे. व त्यानंतर सप्तम बादशहा एडवर्ड यांची कारकीर्द हिंदुस्थानास कशी जाईल याबद्दल विवेचन सन १९०१ १९०२ सालच्या केसरीमध्यें केलेलें पाहावयास मिळेल. केसरीकारांनी तो लेख संपूर्ण छापला नाहीं हें महाराष्ट्राचें दुर्दैव होय. ज्योतिषशास्त्रावरील लेख त्या शास्त्राव्यतिरिक्त इतर मासिककार व वृत्तपत्रकार यांच्याकडे गेले असतां त्यांची बोळवण हे वर्तमानपत्राचे सर्वज्ञ संपादक कशी करतात या संबंधानें येथें आणखी उदाहरणें देण्याचें कारण नाहीं.

लॉर्ड चेम्सफर्ड यांची कारकीर्द कोणकोणत्या योगांमुळें इतकी चिरस्मरणीय झाली व कोणकोणते योग आले असतां काय काय गोष्टी घडल्या याचें सिंहावलोकन करून नंतर आपण **व्हॉइसराय लॉर्ड रेडिंग** यांच्या कारकीर्दीचा तुलनात्मक विचार करूं.

लॉर्ड चेम्सफर्ड यांनीं तारीख ४ एप्रिल सन १९१६ रोजीं संध्याकाळीं स्टँडर्ड टाईम पांच वाजून पंचेचाळीस मिनिटें झालीं असतां व्हॉइसरायशिपच्या जागेचा चार्ज मुंबई येथें घेतला. (See Extraordinary Government Gezette) त्या वेळीं खालील प्रमाणें ग्रहांची स्थिती होती.

॥ सायन भावचलित कुंडली ॥



लॉर्डचेम्सफर्ड यांनीं अधिकार सूत्रें ज्या वेळीं धारण केलीं त्या वेळीं पूर्व केन्द्रावर कन्या लग्नाचा २८ वा अंश उदित असून केन्द्रामध्यें चार ग्रह आहेत. शनीसारखा खल ग्रह कर्क या दुर्बल राशीमध्यें माध्यान्हीं आहे. व ह्याच ग्रहाच्या मुळें फार अप्रिय अशा गोष्टी घडून लॉर्ड चेम्सफर्ड यांच्या हातुन झालेल्या चांगल्या गोष्टींचा उल्लेख होण्या ऐवजीं त्यांच्या अप्रियतेची नौबत झडूं लागेल व त्यांची कारकीर्द अखेरीस अपयशी ठरेल असें वाटलें होतें. लॉर्ड चेम्सफर्ड यांचा कारक ग्रह म्हणजे लग्नाधिपति बुध हा मेष या राशीमध्यें असुन तो हर्शल, चंद्र व शनि बरोबर अशुभ योग करीत आहे. लॉर्ड चेम्सफर्ड यांचें स्नेही मंडळ किंवा अधिकारारूढ असलेले कौन्सिलर्स हे रवीनें दर्शविले जात असून लग्नाधिपति बुध हा गुरु व रवीबरोबर युत होण्यास जात असून हे सर्व ग्रह दशमांतील शनीबरोबर केन्द्रयोग करीत असल्यामुळें या स्नेही मंडळाच्या सल्ल्यामुळें अखेरीस शनीच्या धर्माप्रमाणें शेवट होऊन कीर्तीच्या शुभ्रतेवर डांबर फांसण्यासारखीं कृत्यें घडतील असें अनुमान करण्यास सबळ जागा दिसत होती. या कुंडलींतील महत्वाचा योग म्हणजे मेष या राशीमध्यें केन्द्रामध्यें रवि गुरु व बुधाची युति होय. व याच युतीमुळें एकादशस्थान द्योतक महत्वाच्या गोष्टी घडल्या आहेत. एकादशस्थानावरून कौन्सिलांचा विचार होतो. राजपक्ष व प्रजापक्ष दर्शविणारे ग्रह रवि व चंद्र हे दोघेही या कारकीर्दीचे आरंभ काळचे कुंडलींत बलवान आहेत. दोघेही उच्च राशीमध्यें आहेत. जसा रवि शनीनें दूषित झालेला आहे तसाच चंद्रही हर्शल व मंगळानें दूषित झालेला आहे. रविमंगळांचा त्रिकोण दृष्टि. योग, गुरुमंगळांचा त्रिकोण दृष्टियोग व बुधमंगळाचा त्रिकोण हे सर्व मिलिटरी सत्ता सबळ व जोरदार दर्शविणारे योग झाले आहेंत. लॉर्ड चेम्सफर्ड

यांनीं व्हॉइसराय पदाचा स्वीकार केला त्या वेळीं यूरोप खंडामधील युद्धाच। अत्यंत आणिबाणीचा काळ प्राप्त झालेला होता. व याच वेळीं पूर्वीचे व्हॉइसराय यांच्या लष्करी धोरणाचा पूर्ण विचका विलायतेंत झालेला होता. व त्या मुळेंच लॉर्ड हार्डिंज व मि. चेंबरलेन यांसारख्या मुत्सद्यांना मान वांकविण्याचा प्रसंग आला होता परंतु वरील शुभ योगामुळें पुढें यशाचा वांटा लॉर्ड चेम्सफर्ड यांच्या पदरांत पडून त्यांचें मिलटरी धोरण यशस्वी ठरलें.

कन्या लग्नासारखें द्विस्वभाव राशीचें लग्न अधिकार सूत्रें धारण केलीं त्या वेळीं उदय पावत होतें व लग्नाधिपति बुध हा मेष या चर राशीमध्यें पीडित असल्या कारणानें या कारकीर्दीमध्यें स्थिरबुद्धीचा व शांतपणानें विचार करण्याचा पूर्ण अभाव दिसत असून क्षुल्लक गोष्टीचाही विपर्यास करण्याची प्रवृत्ती फारच ज्वाज्वल्यपणानें दृग्गोचर होत आहे व तीचमुळें अखेरीस अनर्थ झालेला आहे.

प्रजापक्षाचा कारक ग्रह चंद्र बलवान असल्यामुळें त्या काळामध्यें स्वराज्यविषयक चळवळ जोरांत चाललेली होती अखेरीस

तारीख २० ऑगष्ट १९१७ रोजीं

जेव्हां चलित चंद्र मिथुन राशीच्या ७।८ अंशांमध्यें येऊन लग्नेश व दशमेश बुधाबरोबर केलेला तृतीय एकादश योग सोडून रवि व गुरू बरोबर शुभ दृष्टियोग करण्यास जात असतां व याच चलित चंद्रावरून गोचर गुरूचें भ्रमण होत असतां लोकमत शांत करण्याकरितां मंत्र्यांनीं बादशाहाचा सुप्रसिद्ध जाहिरनामा प्रसिद्ध केला आहे. हिंदुस्थानात जबाबदारीचें स्वराज्य संस्थापन करणें हें ब्रिटिश राज्यव्यवस्थेचें अंतिम ध्येय असून तें सा य करण्यासाठीं पहिली पायरी म्हणून स्वराज्यदानाचा भरपूर हप्ता देण्याचें अभिवचन या जाहिरनाम्याच्या द्वारें हिंदी जनतेस देण्यांत आलें होतें.

या दिवशीं खालील प्रमाणें गोचरीची ग्रहस्थिति होती. ही ग्रह स्थिति मुंबई टाईम दुपारीं ४ वाजन ९२ मिनिटे झालीं असतांची आहे.

रवि २६।९२ चंद्र २६।४८ मंग ४०; मंगळ कर्क १९।२९;
८।५ शुक्र २ ... शुक्र-कन्या २७।१; शनि-सिंह
।-सिंह ९।२८ राहु-मकर ८।७.

ही जाहीरनामारूपी हिन्दुस्थानच्या स्वातंत्र्याची मुहूर्त मेढ लॉर्ड चेम्सफर्ड यांचे कारकीर्दीच्या कुंडलीमध्यें शुभ वेळीं रोंवली गेली होती व म्हणूनच जाहीरनाम्यांतील वचनांची पूर्तता करण्यासाठीं १९१७ च्या अखेरीस म्हणजे गोचर गुरु ज्या ठिकाणामध्यें असतां जाहिरनामा प्रसिद्ध झाला तेथेंच तो वक्री होऊन येत असतां भारत मंत्री मि. मॉन्टेग्यु हे स्वतः हिंदुस्थानांत आले व लोकपक्षीय पुढाऱ्यांच्या मुलाखती घेण्यास सुरवात झाली. व स. १९१८ च्या जुलाई महिन्याच्या १८ तारखेस म्हणजे या कारकीर्दीच्या कुंडलीच्या दशमस्थानाच्या उदित अंशावरून सुरगुरूचें भ्रमण होत असतां लॉर्ड चेम्सफर्ड व माटेग्यु साहेब यांनीं सुधारणेच्या योजनेचा खर्डा ब्रिटिश पार्लमेंटला सादर केला. परंतु येथेंच जर लॉर्ड चेम्सफर्ड यांची कारकीर्द संपली असती तर ती फारच महत्वाची उत्तम सुयशस्वी ठरली असती. परन्तु दशमांतील स्वक्षेत्रविन्मुख शनीच्या धर्माप्रमाणेंच अखेर शेवट व्हावयाचा होता म्हणून कीं काय जेव्हां शनि हा मूळच्या मंगळावर येऊन हर्शल बरोबर प्रतियोग व चंद्राबरोबर केन्द्र योग करण्यास जाऊं लागला व सुरगुरूनें दशमस्थान सोडलें त्या वेळेपासूनच या कारकीर्दीच्या रूपरंगास सुरवात झाली. ज्या गृहस्थांनीं माटेग्यु चेम्सफर्ड योजनेस पाठिंबा दिला व जबाबदारीच्या स्वराज्याचें तत्त्व मान्य करून हिन्दुस्थान देशाची मोठी सेवा केली व आपल्या वरील रिपोर्टावर उदार मनाचें

प्रदर्शन केलें किंवा ज्या गृहस्थांनीं हिंदुस्थान देशाचें हित करण्याची मुहूर्तमेढ रोंवली त्याच गृहस्थांनीं सहा महिन्यांनंतर सुधारणाविरुद्ध प्रतिगामी स्वरूपाचा खलिता गोऱ्या सिव्हिल सर्व्हंटांच्या कोल्हेकुईस भिऊन लिहिण्यास तयार व्हावें किंवा इतकें मनोदौर्बल्य एवढ्या मोठ्या गृहस्थानें दर्शवावें हें विचित्र तर खरेंच परन्तु शनीच्या खळ कर्मा प्रमाणें झालें नाहीं असें कोण म्हणेल? हिंदुस्थानाच्या नशिबीं दडपशाहीचा तीव्र अंमल पहावयाचा होता म्हणा किंवा शनीच्या धर्माप्रमाणें कीर्तीचे काळेकुट्ट निशाणाचा ध्वज लवकरच फडकावयाचा होता म्हणून म्हणा हिन्दुस्थानांत लवकरच राज्यक्रांति होणार अशी सुस्वप्नें अधिकारी वर्गास पडूं लागावीं व त्याचा प्रतिकार करण्याकरितां जलमी कायदे पसार करण्याचा मोह अधिकारी वर्गास सुटल्यामुळें व तारीख २१ मार्च सन १९१९ रोजीं रौलट ॲक्ट हिन्दुस्थानच्या कायदे कौन्सिल मध्यें पास झाला. या कायद्याच्या निषेधाची हिंदुस्थानांत न भूतो न भविष्यति अशी तीव्र चळवळ झाली. वरिष्ठ कायदे मंडळांतील सर्व बीन सरकारी सभासदांनीं या कायद्याला एकमतानें विरोध केला. परन्तु हिन्दुस्थान सरकारानें दुराग्रहानें तो कायदा पास करून हिन्दी जनतेच्या तोंडास काळें फांसून आपल्या राजकारणपटुत्वाच्या भांडवलाचें दिवाळें वाजविलें. सन १९१९ सालामध्यें मकर संक्रमणाचे कुंडलीमध्यें (२२ डिसेंबर १९१८) लग्नामध्यें शनिचंद्रांची युति उदय पावत असून लग्नांत नेपच्यून होता व सप्तम स्थानामध्यें हर्शल होता व मेष संक्रमणाचे काळीं (२१ मार्च १९१९) वृश्चिक लग्नामध्यें चंद्र उदय पावत असून हर्शल शनीचा प्रतियोग दशम व चतुर्थ स्थानामधून होत होता व; दशमावरील बिंदु नेपच्युत शनि या खलग्रहाच्या कैचीमध्यें सांपडलेला होता व त्यामुळें

देशांत राज्यकारभारासंबंधी अनेक भानगडी होतील व राजकारण दृष्ट्या फार अनिष्ट काळ येत असल्याचें आम्हीं त्या वेळीं ध्वनित केलें (जानेवारी १९१९ चा अंक) असून वाचकांच्यां स्मरणामधून गेलें नसेल. या कुंडलींतील रवि मंगळ युति व चंद्र मंगळांमध्यें अशुभ दृष्टियोग हेही लक्षांत घेण्यासारखे आहेत. तारीख १ ली एप्रिल महिन्याची अमावास्या ही त्या काळच्या वर्ष कुंडलीचे मंगळावर पडणार असल्यामुळें लवकरच फार भयंकर प्रकार पहाण्यास मिळतील असें आम्हांस वाटत होतें व म्हणून मुग्धपणानें राजकीय प्रकरणासंबंधानें तीव्र व कडाक्याचे वादविवाद होतील असें म्हटलें होतें. व या एप्रिल महिन्यामधील तारीख १।९।११ व १२ हे दिवस फारच महत्वाचे म्हणून दर्शविले होते. याच सुमारास सत्याग्रहाचे चळवळीस जोर येऊं लागला व ९ ते तारीख १३ च्या दरम्यान अमृतसर गुजराणवाला व अहमदाबाद येथें भयंकर प्रकार घडले गेले व पंजाबमधील अमानुष कत्तलीनें तर लॉर्ड चेम्सफर्ड यांची कारकीर्द फारच काळीकुट्ट झाली आहे.

लॉर्ड चेम्सफर्ड यांच्या कारकीर्दीत मधील प्रथम वर्षापासूनच्या वर्ष प्रवेश काळच्या (मेष संक्रमणाच्या कुंडल्या) पाहिल्या असतां प्रजापक्षाचा कारक ग्रह चंद्र हा बलवान असून तो शुभसंबंधित असलेला पाहण्यास मिळतो व अधिकारासूत्रें ग्रहण केलीं त्या वेळींही चंद्र आपल्या उच्च राशी मध्यें होता व त्यामुळेंच

लोक पक्षांच्या खालील चळवळी,

स्वराज्याची चळवळ, सत्याग्रहाची चळवळ व असहकरितेची चळवळ अशा तीन एकच ध्येय साधणाऱ्या चळवळी त्यांच्या कारकीर्दीमध्यें उत्पन्न झाल्या असून त्या परिणामकारी झाल्याचें दृष्टोत्पत्तीस आलें आहे. स. १९१९ वर्षामधील मकर व मेष संक्रमणाच्या कुंडलीवरून राजकारण दृष्ट्या आपत्तीचे प्रसंग दिसत होते तसेच प्रजापक्ष फार जोरदार होऊन जोरानें प्रतिकार करील व शेवटीं यशाचा वांटा मिळवील असे मकर संक्रमणाचे व मेष संक्रमणाचे कुंडली मधील रवि चंद्रांच्या त्रिकोण दृष्टियोगानें ध्वनित होत होतें. सत्याग्रहाच्या चळवळीला तारीख ६ एप्रिल १९१९ ला ८ वाजतां म्हणजे लॉर्ड चेम्सफर्ड यांनीं अधिकार सूत्रें ज्या वेळीं घेतलीं त्या वेळेच्या चंद्राच्या अंशा जवळील वृषभ राशीचा १२ वा अंश उदित असतां मुंबई येथें चौपाटीवर **नॅशल मोर्निंग डे** नांवाचें स्वरूप देण्यांत आलें. हा अंश लॉर्ड चेम्सफर्ड यांचे अधिकार सूत्रें ग्रहण केलेल्या वेळेच्या मंगळाच्या बरोबर तंतोतंत केन्द्रयोग करीत होता व मंगळाच्याच धर्माप्रमाणें अखेरीत तारीख ९ ते १३ पर्यंत च्या काळामध्यें रक्तपात व अनर्थ गुजरून ही चळवळ बंद पडली. हें विचार करण्या सारखें झालें आहे. रौलट कायदा पास होऊन सत्याग्रहाची चळवळ चालू झाली व अखेरीस पंजाबामध्यें अनर्थ कोसळले. त्या वेळीं या वरील अधिकार सूत्रें ग्रहण करण्याच्या काळच्या कुंडलीमध्यें परिभ्रमण पद्धतीप्रमाणें फारच अशुभ योग चाललेले होते. असो येथपर्यंत गत व्हॉइसराय यांची कारकीर्द इतकी अपयशी कां ठरली याचें फळ ज्योतिष दृष्ट्या विवेचन केलें. आतां आपण नवीन व्हॉइसराय साहेब लार्ड रेडिंग यांची कारकीर्द कशी काय जाईल या विषयाकडे वळूं.

तारीख २ एप्रिल १९२१ रोजीं स्टँ. टाईम दुपारीं पांच वाजून ९ मिनिटें झालीं असतां व्हॉइसराय साहेब यांनीं मुंबई येथें युनिव्हरसिटीच्या कानव्होकेशन हॉलमध्यें अधिकार सूत्रें ग्रहण केलीं आहेत. या वेळेची खालील प्रमाणें साधन भावचलित कुंडली आहे.

॥ सायन भावचलित कुंडली ॥



व्हॉइसराय लॉर्ड रेडिंग यांनीं अधिकारसूत्रें ग्रहण केलीं त्या वेळीं कन्या लग्नाचा १९ वा अंश उदय पावत असून या उदित अंशाबरोबरच वक्री असलेला शनि उदय पावत आहे. दशमाधिपति व लग्नाधिपति बुध हा मीन या दुर्बल राशीमध्यें असून शनीबरोबर प्रतियोग करीत आहे. मागील कारकीर्दीच्या वेळीं शनि माध्यान्हीं होता तर या कारकीर्दीचे वेळीं तो लग्नीं उदय पावत आहे. कन्या लग्नासारखी द्विस्वभाव राशि लग्नांत उदय पावत असून लग्नाधिपतिही द्विस्वभाव राशीमध्येंच आहे त्यामुळें या कारकीर्दीमध्यें अनिश्चितपणा फारच पाहण्यास मिळेल. लग्नांतील

शनीच्या उदयामुळें ही कारकीर्द कष्टकारक जाईल असें ओघानें म्हणावें लागतें. परंतु हा शनि पंचमेश असल्या कारणानें व लॉर्ड रेडिंग यांची कुंडली इतकी अशुभ नसल्यामुळें या शनीचे फार अशुभ धर्म पाहाण्यास न मिळतां प्रत्येक गोष्ट न्यायाच्या धारवाडी कांटयानें तोलली जाऊन सहसा पक्षपात होणार नाहीं. अधिकारी वर्ग व जनता या दोघांनाही सारखाच न्याय मिळेल. परंतु या कारकीर्दीमध्यें देशांत रोगराई विशेष वाढेल, परराष्ट्रीय व्यापार व परराष्ट्रीय धोरणें यांमध्यें फारच अनिश्चितपणा पाहावयास मिळेल. परराष्ट्रांबरोबर होणारे तहनामे व हितसंबंध यांसंबंधानें अनेक अडचणी उत्पन्न होऊन त्यामुळें हिंदुस्थानच्या खजिन्यास चांगलीच चटी बसेल. राजपक्षाचा कारकग्रह रवि हा बलवान असून प्रजापक्षाचा कारक ग्रह चंद्र हा त्याचे बरोबर शुभसंबंध करीत असल्यामुळें राजवर्ग किंवा अधिकारी वर्गास प्रजेबरोबर स्नेह दृष्टीनें वागावें लागेल. चंद्र हा एकादशस्थानाचा मालक असून तो शनि, मंगळ, शुक्र व नेपच्युन या सर्वांबरोबर अशुभ दृष्टियोग करीत आहे व एकादश भावारंभीं चर राशि उदय पावत असल्यामुळें या स्थानानें दर्शविल्या जाणाऱ्या गोष्टींमध्यें फारच घडामोडी होतील. एकादश स्थानाचा व देशाधीपाचा कायदे कौन्सिलांचा फारच निकट संबंध आहे त्यामुळें या कारकीर्दीमध्यें कायदे कौन्सिलांची फारच त्रेधा दिसत आहे. लोकनियुक्त सभासदांची प्रथमतः फारच ठेचाई दिसत आहे. चंद्र कुंभ या स्थिर राशीमध्यें असून बरोबर शुभ दृष्टियोग करण्यास जात असल्यामुळें जनता स्थिरबुद्धीनें व चातुर्यानें आपला पगडा बसवील व जनता कार्यक्रमाची जी रूपरेषा आंखील ती फार चिकाटीनें शेवटास नेईल. प्रथमतः जरी कौन्सिलांची फारच त्रेधा दिसत आहे तरी या कारकीर्दीच्या पहिल्या वर्षाच्या अखेर अखेर कायदे कौन्सिलमध्यें पुष्कळच सभासद येऊन चांगल्या घडामोडी होतील. या कारकीर्दीच्या आरंभींच चंद्र हा फार पीडित झाला असून लवकरच वक्री शनि लग्नाच्या अंशावरून भ्रमण करण्यास सुरवात करील त्यावरून विचार करतां जून महि-

न्याच्या १० तारखेपर्यंतचा काळ अनिष्ट दिसत आहे. लवकरच देशांत रोगराई वाढेल व प्रजा दुष्काळानें त्रस्त झालेली पाहाण्यास मिळेल व अनिष्ट वाटणाऱ्या कायद्यांची अंमलबजावणी फार कठोरपणानें करण्यास सुरवात होईल. या कारकीर्दीमध्यें व्ययस्थान व षष्ठस्थानामधून गुरुहर्शलचा प्रतियोग होत आहे. हा योग देशांत धार्मिक बाबतींसंबंधानें बरीच खळबळ उडवून देईल. गुरु हा चतुर्थस्थानाचा अधिपति असुन तो हर्शलनें पीडित झाला असुन शुक्र मंगळाबरोबर शुभ संबंधित आहे त्यामुळें ल्यँड ॲक्विझिशन ॲक्ट संबंधानें भयंकर चळवळ होऊन त्यामध्यें चांगली महत्वाची सुधारणा होईल. या कुंडलीमध्यें शुभयोग हा एवढाच आहे. दुसरा शुभयोग म्हणजे बुध शुक्रांचा व मंगळाचा शुभ योग होय. परंतु बुध शनीनें निर्बली असून त्यानें या वरील दोन ग्रहांबरोबर केलेला शुभयोग सोडला असुन शनीबरोबर प्रतियोग करण्यास जात आहे त्यामुळें या योगापासून विशेष निष्पन्न होईल असें वाटत नाहीं. व याच योगामुळें बहुशः लॉर्ड रेडिंग यांची प्रकृति चांगली राहणार नाहीं. त्यांस व लेडी रेडिंग यांस हिंदुस्थानची हवा चांगली मानवेल असें दिसत नाहीं.

दुसरा महत्वाचा योग म्हणजे हर्शल मंगळ व शुक्र हर्शल याचा शुभ योग होय त्यामुळें या कारकीर्दीमध्यें यांत्रिक उद्योग धंदे, रेलवे यांचा देशांत चांगला प्रसार होईल. धनाधिपति शुक्र व चतुर्थाधिपती गुरु हे दोन्ही ग्रह कारकीर्दीच्या आरंभी वक्री असून शुभ संबंधित आहेत त्यामुळें विशेष नवीन कर बसतील असें वाटत नाहीं. कुंडलीच्या चंद्रावरून अबकारी व एक्साईज या खात्यांसंबंधानें पुढें बरेंच अनिष्ट धोरण स्वीकारण्यात येईल. पोलीस व मिलिटरी खात्याकरितां कोटयवधी रुपये जास्त खर्च करण्यांत येऊन या खात्यांसंबंधानें फाजील खर्च झालेला पाहण्यास मिळेल. सरकारच्या एक्साईज व अबकारी धोरणामुळें जनतेमध्यें फारच खळबळ उडेल. ऑगस्ट १९२१ मध्यें गुरूचें भ्रमण लग्नाच्या उदित अंशावरून होईल व त्यामुळें या महिन्यांत शिक्षणविषयक किंवा जमीन, लॅन्ड रेव्हीन्यु

संबंधानें व इतर कांहीं चांगल्या महत्वाच्या गोष्टी घडतील. सन १९२२ सालामध्यें गुरूचें भ्रमण तुलाराशीमधून होईल व याच वर्षामध्यें हर्शल हा मूळ शुक्राबरोबर तृतीय एकादश व मूळगुरूबरोबर प्रतियोग करील. हा काळ जानेवारी ते मार्च व सप्टेंबर ते ऑक्टोबरचा काळ फारच घडामोडीचा जाईल. या काळामध्यें तीव्र मतभेद उत्पन्न होणारे प्रश्न उभे राहतील परंतु त्याचा शेवट चांगला होईल. सन १९२२ मध्यें धनुराशीमध्यें मंगळ मार्च महिन्यापासून सप्टेंबर पर्यंत वक्री राहाणार असल्या कारणानें चतुर्थस्थान द्योतक गोष्टी संबंधानें म्हणजे लॅन्ड ॲक्ट, रेव्हीन्यु खातें व रिझर्व्ह फॉरेस्ट या संबंधानें बराच गवगवा होण्याचा काळ जवळ आला आहे. या काळामध्यें युद्ध विषयक आरमार व सैन्य विषयक जास्तच खर्च होईल. लार्ड रेडिंग यांची कारकीर्द ३ वर्षें व ९ महिने पर्यंत जास्तींत जास्ती चालेल. या पुढें ती चालेल असें प्रस्तुतच्या कुंडली वरून वाटत नाहीं. कारण लग्नामध्यें उदय पावत असलेला शनि त्यांच्या प्रकृतीचें मान चांगलें दर्शवित नाहीं. त्यांना येथील हवा मानवणार नाहीं. सन १९२३ मध्यें हर्शलचें भ्रमण मूळ कुंडलीच्या बुधावरून होईल व शनि हा तुलाराशीमधून रवीच्या समोरून भ्रमण करणार आहे. हा काळ सरकारी धोरणास व अधिकारी वर्गास सुखावह जाईल असें वाटत नाहीं. व हाच काळ लॉर्ड रेडिंग यांच्या प्रकृतीला चांगला नाहीं. बुध हा मुद्रण कलेचा व वाङ्मयाचा कारक ग्रह असल्यामुळें या वेळीं लोकमत प्रदीप्त व खळबळून सोडणारे क्रांतिकारक लेख प्रसिद्ध होतील व त्यामुळें प्रेस ॲक्ट संबंधी बरीच भानगड उत्पन्न होईल. सन १९२४ मध्यें हर्शलचें भ्रमण मीन राशीच्या १४ ते २० अंशांपर्यंत होणार आहे व याच वेळीं शनि वृश्चिक राशीमध्यें ९ अंशांपर्यंत येणार आहे. हें वर्ष या कारकीर्दीमधील फारच अनिष्ट आहे. सन १९२४ चा फेब्रुवारी मार्च व ऑक्टोबर ते डिसेंबर १९२४ पर्यंतचा काळ फारच कष्टकारक येत आहे.

लॉर्ड रेडिंग यांनीं अधिकारसूत्रें घेतलीं त्या वेळेच्या कुंडलीस जास्त महत्व द्यावें किंवा त्यांच्या जन्मकाळच्या ग्रहस्थितीला जास्त महत्व द्यावें याचा आजच निश्चित खुलासा करणें फारच कठिण आहे. पुढील काल याचा निर्णय करील. लॉर्ड रेडिंग यांची याच अंकांत प्रसिद्ध होत असलेली कुंडली बरीच बलवान असून तीमध्यें शुभ योगांचें फारच प्राबल्य आहे हें कोणाच्याही लक्ष्यांत आल्यावांचून राहणार नाहीं. तुसत्या कुंडलीवरून स्वतंत्र विचार केला तर ही कारकीर्द फारच महत्वाची व सुखावह जावी असें वाटतें. लग्नकुंडलीमध्यें जो गौणपक्ष उत्पन्न होतो तो फक्त जन्मकाळाचाच आहे. आमचे मतें अधिकार ग्रहण केलेल्या वेळेची कुंडली हिंदुस्थानाच्या राजकीय घडामोडीच्या दृष्ट्या फारच महत्वाची आहे. निदान प्रस्तुतच्या कुंडलीमध्यें शनिसारखा बाकी असलेला खळ ग्रह उदय पावत असून लग्नाधिपति बुध निर्बली व पीडित असतां कारकीर्द हिंदुस्थानास फारच सुखावह जाईल असें म्हणण्याचें आमच्यानें धाडस करवत नाहीं. कारण या कुंडलीमध्यें सरासरी चार ग्रह केन्द्रांमध्यें असून एकंदर चवदा ग्रहांचे आपापसांत दृष्टियोग होत आहेत. चंद्राचे ४; बुधाचे ३ रवीचा १; शुक्राचे ३, मंगळाचे २ व गुरूचा एक असे एकंदर १४ दृष्टियोग होत आहेत. त्यापैकीं दहा दृष्टियोग अशुभ धर्माचे आहेत. चद्राच्या चार दृष्टियोगांपैकीं ३ योग अशुभ आहेत. या सर्व गोष्टींचा विचार करितां लार्ड रेडिंग यांची कारकीर्द बरीच कडक व खाष्ट जाईल हें मात्र खास. परंतु लार्ड चेम्सफर्ड पेक्षां यांची कारकीर्द जास्त बरी जाईल. लार्ड चेम्सफर्ड यांच्या दशमामधील शनीच्या धर्माप्रमाणें ही कारकीर्द काळीकुट्ट खात्रीनें होणार नाहीं. लग्नातील शनीच्या धर्माप्रमाणें फारच कडक, न्यायी व करडा अंमल गाजणारी ही कारकीर्द होईल. हें मात्र खास या कारकीर्दीमध्यें जनतेमध्यें शारीरिक आरोग्य विशेष नादणार नाहीं. व पुष्कळ वेळां नेपच्युनच्या स्वभाव धर्माप्रमाणें जनतेला पोकळ आश्वासनावरच ठेवण्याचा मंत्रिमंडळे प्रयत्न करील. या कारकीर्दीमध्यें पंजाबसारखे अत्याचार होऊं नयेत असें वाटतें.

तारीख ४-४-१९२१ दुपारीं ९-४० स्टँ टा.

प्रसिद्ध व्यक्तींच्या कुंडल्यांचा संग्रह.

नं. १२ व्हॉइसराय लार्ड रेडिंग.

लॉर्ड चेम्सफर्ड यांची कारकीर्द संपल्यानंतर व्हॉईसराय पदावर लॉर्ड रेडिंग येणार अशाबद्दल अगोदर वाच्यता होऊन नंतर त्यांची नेमणूक हिंदुस्थानच्या व्हॉइसरायच्या पदावर ब्रिटिश पार्लमेन्टनें केल्यानंतर त्यांच्या चरित्राचा व भावणांचा सर्वत्र ठिकाणीं उल्लेख करण्यांत येऊं लागला होता. अशा वेळीं लॉर्ड रेडिंग यांची कुंडली कशी आहे तीवरून हिंदुस्थानामधील त्यांची कारकीर्द कशी जागार या संबंधानें फलज्योतिषशास्त्राचें अध्ययन करणारांमध्यें तर्क वितर्क चालणें साहजिकच आहे. लॉर्ड रेडिंग यांची कुंडली कशी असेल या संबंधानें फारच थोडया लोकांनीं चिकित्सक बुद्धीनें विचार केलेला पाहण्यास मिळतो.

लॉर्ड रेडिंग यांची नेमणूक व्हॉइसरायचे पदावर झाल्याचें जानेवारीच्या पहिल्या आठवडयामध्येंच जाहिर करण्यांत आलें व त्याच सुमारास टाइम्स् ऑफ इंडिआच्या दैनिक अंकामध्यें त्यांचा फोटो, जन्म दिवस व चरित्र वर्णन केलेलें पाहण्यास मिळालें व तें वाचल्यानंतर या व्हॉइसरायचा जन्म तुला लग्नावर झाला असावा असें आम्हांस वाटलें व यासंबंधानें विवेचन ज्योतिर्माला मासिकाच्या एका अंकामध्यें करण्याच ठरविलें व पुढें तारीख १८ जानेवारी रोजीं आम्हीं याच गोष्टीवर वादविवाद करीत असतां आमचे बोरसद येथील मित्र व ज्योतिर्मालेचे हितचिंतक रा. रा. हरगोविंद लल्लुभाई तलाठी यांचेकडून लॉर्ड रेडिंग यांची कुंडली मालेमध्यें प्रसिद्ध करण्याकरितां पत्रद्वारें आलेली मिळाली. सदरहु कुंडली रा. तलाठी यांनीं कल्पनेच्या जोरावर बसविलेली आहे. लार्ड रेडिंग यांचा जन्मकाल अद्याप पावेतों कोठेंच प्रसिद्ध केलेला पाहण्यास मिळाला नाहीं. पुष्कळ वेळा

अशा काल्पनिक (speculative) कुंडल्या फारच उत्तम अनुभव देतात व त्या बरोबर असतात त्या मुळेंच सध्यांची कुंडली प्रसिद्ध करण्याचें आम्हीं धाडस करीत आहोंत. रा. रा. तळाठी यांनीं काल्पनिक कां होईना परंतु मेंहनत घेऊन तयार केलेली कुंडली पाठविली म्हणूनच ती आम्हांस आज प्रसिद्ध करितां येत आहे व या त्यांच्या अमोल्य मदतीबद्दल आम्हीं त्यांचे फार फार आभारी आहोंत. व ते असेंच वारंवार मालेस मदत करतील अशी आशा आहे.

व्हॉइसराय लॉर्ड रेडिंग यांची कुंडली खालील प्रमाणें आहे.

सायन लग्न.



जन्मः ता० १० आक्टोंबर
१८६० सकाळीं ९ वाजतां
स्थळः-लंडनजवळ.

व्हॉइसराय लार्ड रेडिंग यांचा जन्म तुला लग्नाचा तिसरा अंश उदय पावत असतां झाला असला पाहिजे असें वाटतें. तुला लग्नावर जन्म पावणारीं माणसें स्वभावानें गर्विष्ठ, अभिमानी, मित्रांची आवड बाळगणारीं, बुद्धिमत्तेनें श्रेष्ठ, विद्याव्यासंगी, महत्वाकांक्षी, लोकांशीं मिळून मिसळून वागणारीं न्यायप्रिय, उत्तम गोष्टींची आवड बाळगणारीं, स्तुतिप्रिय आणि कला कौशल्याची आवड बाळगणारीं असतात. समतोल आचरण, न्यायी वर्तन, आजूबाजूच्या परिस्थितीचें योग्य ज्ञान, आनंदी व प्रेमळ स्वभाव हे तुला राशीचे मुख्य गुणधर्म आहेत व येथें तर याच राशीमध्यें रविही असल्यामुळें हे गुण फारच प्रमुखत्वानें व्हाइसराय साहेब यांच्या अंगांत असलेले पाहावयास मिळाले पाहिजेत.

लार्ड रेडिंग साहेब यांचे जन्मकाळीं रविचंद्र तृतीय एकादश योग, गुरुचंद्र युति, रविगुरूमध्यें शुभ दृष्टियोग, रविहर्शलमध्यें शुभयोग, चंद्रहर्शलमध्यें शुभयोग, बुधशुक्रामध्यें शुभयोग व बुधशनीमध्यें शुभयोग असे अनेक शुभयोगांचें जन्मकाळीं प्राबल्य झाल्यामुळें ही कुंडली फारच यशस्वी झाली असून यांचेमध्यें समतोलपणा व न्यायी बुद्धि फारच उत्तम तऱ्हेनें वास करीत असून यांचे कारकीर्दीमध्यें सहसा अविचारांचें किंवा अन्यायाचें वर्तन घडेल असें वाटत नाहीं.

मनाचा कारक चंद्र सिंह या बादशाही राशीमध्यें गुरूनें युक्त असून रवि हर्शल बरोबर शुभसंबंधित असल्यामुळें हे मनाचें मोठे दिलदार, आत्मविश्वासी, स्थिर बुद्धीचे, स्वातंत्र्यप्रिय, निष्कपटी, असून आपल्या आचरणानें व उदार मनानें लोकांवर छाप कशी बसवावी हें यांस उत्तम अवगत आहे. यांचा स्वभाव कोणत्याही परिस्थितीला न डगमगणारा, नीतिदृष्ट्या शुद्ध आचरण व सरल मार्गाचा अवलंबन करणारा पाहण्यास मिळेल. यांना दुसऱ्यानें सांगितलेल्या गोष्टी किंवा सल्ला मुळींच पटणार

नाहीं, सिंह राशीच्या स्वभाव धर्माप्रमाणें यांना लोकांचें पुढारीपण आपणाकडे असावें असें वाटेल. यांचा स्वभाव फारच आशावादी असून कितीही प्रतिकूळ स्थिति आली तरी हताश होणें हें यांना स्वप्नामध्यें देखील ठाऊक नसेल. सिंहस्थ राशीच्या नैसर्गिक स्वभाव धर्माप्रमाणें हे सरळ व शुद्ध मार्गाचें अवलंबन करून गंभीर पणानें आपली कारकीर्द उत्तम करतील अशी आशा वाटते.

जनसमाजाचा कारक ग्रह चंद्र गुरूनें युक्त असून चांगला बलवान आहे व तो रवीबरोबर शुभसंबंध करीत असल्यामुळें या कारकीर्दीमध्यें प्रजापक्ष उत्तम धोरण स्वीकारील व हा पक्ष फारच बलवान होईल. व या कारकीर्दीमध्यें प्रजेच्या हिताचीं अनेक कामें होऊन इरिगेशन व जमीन महसूल व सॉल्ट यांसंबंधानें फारच महत्वाच्या सुधारणा होतील. एकंदर विचार करितां शेतकीकडे या कारकीर्दीमध्यें चांगलेंच लक्ष जाईल. गुरुचंद्र युतीचा जन्म लार्ड रेडिंग यांना स्वतःला सांपत्तिक दृष्टीनें चांगला अनुभव मिळाला पाहिजे तसाच अनुभव त्यांचे कारकीर्दीमध्यें हिंदुस्थानास आला पाहिजे व त्यामुळें या कारकीर्दीमध्यें हिन्दी प्रजेची सांपत्तिक स्थिती चांगली सुधारेल व कौन्सिलमध्यें लोकनियुक्त सभासदांचा चांगला बोज राहील असें म्हणण्यास मुळींच हरकत नाहीं.

लार्ड रेडिंग साहेब यांच्या कुंडलीमध्यें गेल्या २।३ वर्षांपासून फारच उत्तम योग दिन वर्ष पद्धतीप्रमाणें चालू आहे. रवि हा चंद्राबरोबर शुभयोग करीत असून तो हल्ली गुरूबरोबर शुभयोग करण्यास चाललेला आहे. जन्मकाळीं मूळ कुंडलीमध्यें गुरुचंद्रांची युति रवीबरोबर शुभसंबंधिति आहे व जेव्हां चलित रवि हा चंद्राबरोबर त्रिकोण दृष्टियोग व गुरूबरोबर त्रिकोण दृष्टियोग करण्यास आला त्या वेळीं त्यास अत्यंत मानाची, जबाबदारीची व राजपदतुल्य ऐश्वर्याची स्थिति दिली आहे हें पाहण्यासारखें आहे.

नोव्हेंबर १९२१ मध्यें शनीचें भ्रमण मूळ लग्नाच्या उदित अंशावरून होणार आहे व नेपच्युनचें भ्रमण मूळ जन्मकाळच्या चंद्रावरून होणार असल्यामुळें हा काळ व्हॉइसराय साहेब यांस प्रकृतीच्या दृष्टीनें चांगला नाहीं. परंतु लवकरच गुरूचें भ्रमण रवीवरून होणार असल्यामुळें डिसेंबर ते मार्च १९२२ पर्यंतचा काळ चांगला येत आहे या काळामध्यें प्रजेच्या कल्याणाच्या चांगल्या चांगल्या गोष्टी घडतील. सन १९२२ मध्यें धनुराशीमध्यें मे महिन्या पासून मंगळ वक्री होणार आहे. याच वेळीं शनि ही वक्री होऊन लग्नाच्या उदित अंशावर येणार आहे त्यामुळें हा काळ तीव्र विरोध व प्रकृतीची अस्वस्थता दर्शविणारा आहे. या काळामध्यें प्रवास करते वेळीं अत्यंत सावधगिरी बाळगणें जरूरीचे आहे. नोव्हेंबर १९२२ पासून शनीचें भ्रमण मूळ जन्मकाळचे रवीवरून होणार आहे व मार्च १९२३ मध्यें शनि वक्री होऊन पुन्हा रवीच्या अंशावरून जाणार आहे व हें त्यांचें अनिष्ट भ्रमण आगस्ट १९२३ पर्यंत राहणार आहे. हा काळ शरीर सौख्यास प्रतिकूळ आहे व यावेळीं कारकिर्दीमध्यें अनेक अडचणी उत्पन्न होतील. अधिकारी वर्ग व व्हॉइसराय साहेब यांचा बेबनाव पाहण्यास मिळेल. एकंदर कुंडलीचा विचार करितां व्हॉइसराय लार्ड रेडिंग यांची कारकीर्द हिन्दीजनतेस लाभ कारकच जाईल व प्रजाहित साधणारी अनेक चागलीं कृत्यें घडतील व ते आपल्या अत्यंत न्यायी वर्तनानें कायद्यांचा अमंळ समतोळ बुद्धीनें व निःपक्षपातानेंच करतील. अन्यायाच्या जुलमी कायद्यांच्या नांग्या मोडण्याचा शक्य तेवढा प्रयत्न करण्यात येऊन परराष्ट्रामध्यें हिन्दीजनतेचा लौकिक वाढेल. अफ्रिका खंडासारख्या परमुल खांतील रहिवाशी हिन्दी प्रजाजनांच्या अन्यायाच्या गाऱ्हाण्यांचा कांहीं चांगला शेवट होईल अशी व्हॉइसराय साहेब याच्या अधिकार ग्रहण केलेल्या वेळेच्या ग्रहस्थितीवरून व कुंडलीवरून आशा वाटते.

—o—

गेल्या ग्रहणा विषयीं संक्षिप्त विचार.

(लेखक नारायण अनंत नाईक पाटणकर, सांगे-गोवा)

यंत्रे वेधादिना ज्ञातं यत्पूर्वं गणकैस्ततः । ग्रहणादि परिक्षेत् ॥१॥

निसर्गाच्या अंगांत असा एक गुण आहे कीं, कालपरत्वें व्हावयाच्या प्रवृत्तीस प्रत्येक गोष्टीस उन्नतीच्या बाजूस प्रेरणा होते; उदाहरण, ज्योतिः-शास्त्रच घ्याना, हल्लीच्या सुधारणेच्या काळीं ज्याप्रमाणें प्रत्येक शास्त्राचे बाबतींत सूक्ष्म शोध होऊन नवीन नवीन शोधांचीही भर पडत आहे, त्याच प्रमाणें या दृक् प्रत्यय सिद्ध अशा ज्योतिःशास्त्रांतही अनेक महत्वाचे शोध होऊन, तूर्त ही उत्क्रांत्यावस्थेतच आहे असें म्हटल्यास चालेल.

कोणत्याही गोष्टींत दोन पक्ष असावे लागतात. म्हणजे तें कार्य शुद्धाशुद्धतेच्या कसास लागून शेवटीं चांगलें तेंच शिल्लक राहतें; राजकीय बाबतींत ज्याप्रमाणें जहाल मवाळ पक्ष, त्याच प्रमाणें ज्योतिःशास्त्रांत आज कैक वर्षें निरयनसायण असे जबरदस्त पक्ष अस्तित्वांत आहेत. परंतु हे मुख्य पक्ष झाले. शिवाय ज्योतिःशास्त्राचा जो "सिद्धांत," स्कंध त्याच्या गणित विभागांतील पंचांगविषयक बाबतींत अनेक तट पडून हरेक पोट भेद अस्थित्वांत आहेत.

पंचांगें बहुतेक करण ग्रंथावरून करितात. व हे करण-ग्रंथ बहुतेक प्राचीन असल्यामुळें त्यावरून होणाऱ्या पंचांगांत कालपरत्वें फरक येणें साहजिक आहे. म्हणूनच पूर्वाचार्यांनीं अशा करण ग्रंथात बीज संस्कारादि करून चालन द्यावें म्हणून पुनःपुन्हा बजावल आहे. व हेंच आमच्याकडे न झाल्यानें, पंचांगांत एक व आकाशांत एक अशी स्थिति होत आहे, वसिष्ठ संहितेत सांगितलेंच आहे कीं,—

* हा लेख प्रस्तुतचें ग्रहण झालेल्या दिवसांतच छापण्यास एका वर्तमान पत्राकडे पाठविला होता. पण त्या संपादकांच्या अनिश्चित धोरणामुळें कांहीं दिवसांनीं परत आल्यावरून प्रसिद्धीस विलंब झाला.—ना. अ. ना. पाटणकर—

१ पण हाहीपक्ष शके ४४४ अगोदर असल्याचा निश्चित उल्लेख न सांपडतां ब्रह्मसिद्धांतादि सायन पद्धतीचाच स्वीकार करीत असल्याचा स्पष्ट उल्लेख सांपडतो. पाटणकर.

यस्मिंदेशे यत्रकाले येन दृक् गणितैक्यकं ॥
दृश्यते तेन पक्षेण कुर्यात् तिथ्यादि निर्णयं ॥ १ ॥

यावरून पंचांग किंवा कोणतेंही ग्रहगणित दृक् प्रत्यय सिद्ध असलें पाहिजे हें उघड आहे. आज आम्हांस ज्योतिष संबंधी सर्वच बाबतींची चर्चा करावयाची नसून गेल्या ग्रहाणचा अल्पसा विचार करावयाचा आहे. असो; शके १८२६ सालापासून पंचांग विषयक चळवळीस विशेष स्वरूप प्राप्त होऊन तिचें दृश्य फल म्हणजे पंचांग प्रवर्तक कमिटीचें सुरू झालेलें पंचांग होय. जुन्या म्हणजे ग्रहलाघवादि पचांगावरूनें ग्रहणादिकांचा दृक् प्रत्यय बरोबर येत नाहीं, हें हल्लीं बहुतेकांस विदित आहेच, या लेखाच्या मथळ्यांत दिलेल्या श्लोकांचें तात्पर्य म्हणजे पंचांगाच्या दृक् प्रत्ययास ग्रहणासारखें अन्य साधन दुर्मिळ होय. या वरून गणितांत ग्रहणाची थोरवी केवढी आहे हें लक्षांत येईलच. गेल्या वर्षी कार्तिक पौर्णिमेस (ता. ८-११-१९१९.) चंद्रग्रहणानें हें म्हणणें सार्थ करून दाखविलेंच आहे. ग्रहणाचा स्पर्शकाल वगैर "टिळक" पंचागाप्रमाणेंच किंवा "नॉटिकल आल्मेनाक" प्रमाणेंच बरोबर प्रत्ययास आले, व जुन्या पंचांगांत दिलेल्या स्पर्शकालानंतर सुमारें अर्ध्या तासानें ग्रहणस्पर्श झाला ! याविषयीं कांहींनीं अनुभव घेऊन खात्री केलीच आहे, तसेंच गेल्या वैशाख शु ॥ १५ मेष (तारीख ३-५-१९२०) खग्रास चंद्रग्रहण असल्यामुळें स्पर्शकालादि कोणत्या पंचागाप्रमाणें उतरतात तें पाहण्यास लेकांचें मन उत्सुक झाल्यास आश्चर्य कोणतें ? आम्हीं घेतलेल्या अनुभवावरून तर ग्रहणाचे स्पर्शादि काल कोणत्याहि पंचागांप्रमाणें उतरले नसून ग्रहणच स्पष्टपणें दिसलें नाहीं हें कळून येईल.

जुन्या चालीच्या सर्व पंचागांत प्रमुख अशा पुरंदरे शास्त्री यांच्या पंचागाप्रमाणें ग्रहणाचा स्पर्शकाल पहांटेस स्टॅ. टा. ४ वाजून ५६ मिनिटांनीं येतो त्यांतून गोमांतकीय अक्षांशानुसार ४ मिनिटांचा ऋण संस्कार केला म्हणजे ४ वाजून ५२ मिनिटांनींच स्पर्श व्हावयास पाहिजे होता. पण तसा मुळींच झाला नाहीं !! आतां सूक्ष्म गणितानुसार म्हणजे नॉटिकल वरून निघणारा सदरहू ग्रहणाचा स्पर्शकाल देशांतर संस्कारादि करून स्टॅ. टा. ५ वाजून २१ मिनटांनीं येतो, म्हणजे सूक्ष्म मानानें सूर्योदया अगोदर ५४ मिनिटें ग्रहणारंभ व्हावयाचा शिवाय ग्रहलाघवांतील-" तिथि विहतिरयं ग्रहस्य मध्यः " "तिथ्यंती ग्रहणमध्य होतो." या नियमानुसार याच वेळीं स्पर्श व्हावयाचा, कारण, दुसऱ्या दिवशीं पौर्णिमा फक्त १ घ. ३२ पळेंच आहे. पण अशा स्पर्शादिकांचा अनुभव आम्हांसच नव्हे तर इतर पुष्कळांना आला नाहीं !!

"मनिवसे तें स्वन्निंपदिसे" या न्यायानें जरि स्पर्श झालासा वाटला तथापि संशयच आहे त्यातून "भिक्षायांम् वायसः" या म्हणीप्रमाणें मेघराजानेही याचवेळीं अभ्रपटलानें चंद्रास आच्छादन करण्याची कृपाकेल्यानें संशयास जास्तच जागा राहिली पण कांहीं झालें तरी निदान जुन्यापंचागाप्रमाणें ग्रहणाचा काल सपसेल चुकला, एकढें मात्र आम्हांस छातिठोकपणें म्हणतां येईल परंतु अश्चर्य हें कीं अद्याप कोणींच विद्वानानें या विषयींचचा केलेली आढळली नाहीं, वरील गोष्टीवरून शुद्ध पंचागाची जरूर आवश्यकता सिद्ध होत नाहीं काय?

या विषयीं विचार केल्यास कोणासहीं हेंच दिसून येईल कीं, "जुनें तें सोनेंच" म्हणून उगी न बसतां पंचांगांत जरूर सुधारणा होणें इष्ट आहे. व ह्याच साठीं गेल्या माघ मासांत सांगलीस सर्व मतांच्या ज्योतिर्विदांचें तिसरें ज्योतिषसंमेलन" भरून, या विषयीं बराच उपयोगही झाला. व नवीन करण ग्रंथ तयार करण्या करितां तद्वत विद्वानांचा एक कमिटी नुकतीच नमल्याचें प्रसिद्ध झालें आहे व त्यांत श्री. वि. ब. नाईक एम्. ऐ. सारखे विद्वान व व. मोघे शास्त्र्यां सारखे प्रसिद्ध पंचांग कर्ते वगैरे असल्यानें पंचागात ऐक्यमत घडून येईल या विषयीं संतोष वाटतो. शिवाय असें होतां होतां कदितरी सायन पद्धतीच स्वीकारली जाईल या विषयीं खात्री वाटतें. कारण, तूर्त जें पंचांगप्रचारांत येणार तेंहीं "दगडापेक्षां विठ मऊ" याच न्यायानें तर मग याहूनही सूक्ष्मतेचा विचार व विष्णपुराणादी ग्रंथांतीलः—

मेषादौच तुलादौच मैत्रेय विषुवस्थितः ।
तदा तुल्य महोरात्रं करोति तिमिरापहः ॥ १ ॥

इत्यादि वाक्यांचा निःपक्षपातानें विचार केला तर सायनपद्धतीच श्रेष्ठ ठरून सांपतीक वर्षारंभ स्वीकारला जाईल याविषयीं शंका वाटत नाहीं यावरून कोणीही दुरभिमानांस बळी न पडतां ऐक्य मतानें एकमुखी पंचांग प्रचारांत आणण्या विषयीं प्रयत्न केला पाहिजे हाच निष्कर्ष निघतो. नाहींतर "हम करेसो कायदा" करून निरनिराळी पंचांगें प्रसिद्धिस आणून सामान्य लोकांस घोटाळ्यांत पाडणें कसें इष्ट नाहीं, याचा अनुभव या दोनतीन वर्षांत आलाच आहे, आमच्या इकडे इतर विषयां प्रमाणें ज्योतिष विषयक बाबतींतही अत्युदासीनता पसरली आहे, हें हल्लीच्या काळींतर बिलकूल शोभण्यासारखें नाहीं; म्हणून प्रत्येक भारतियानें शुद्ध पंचागप्रर्वतनाचे कामी एकमेकांस सहाय्य करणें व दृक्प्रत्ययतुल्य पंचागच प्रचारांत आणणें हें त्यांचें एक कर्तव्यच आहे.

"योज्योतिषंवेत्तिःनरः ससम्यग्धर्मार्थकामान् लभते यशश्च" ॥

—सि. शिरोमणि —

॥ श्रीसद्गुरवे नमः ॥

ज्योतिर्माला

आप्राचः कामरूपाद्द्रुहिणसुतनदप्लावितादाप्रतीचो
गान्धारात् सिंधुसाद्रार्द्रद्रुवररचितादाचसेतोरवाचः ।
आकेदारादुदीचस्तुहिनगहनतः सन्तिविद्वत्समाजा
ये ये तानेष यत्नः सुखयतु समजान्कश्चमत्कर्तुमीष्टे ॥ १ ॥

अभिनवाऽऽवृत्ति वर्ष ६ वें अंक ७, ८.

अश्विनी नक्षत्र.

(लेखक—भवानीशंकर तुकाराम ठाकूर.)

ज्ञानसम्पन्न पुढारी व प्रसिध्द व्यक्तीच्या कुण्डल्यांचें निरीक्षण कांहीं विशिष्ट पध्दतीनें करीत असतांना आपल्या चालू वर्षाच्या ३-४ अंकांतील प्रेसिडेंट विलसन ह्यांची कुण्डली आमच्या पहाण्यांत आली. त्यांतील बलवत्तर योग कोणते कीं ज्यायोगानें ते प्रेसिडेंट् झाले ह्याचा आम्ही विचार करूं लागलों----कारण ज्यो० रामनारायण ह्यांनीं ह्या दृष्टीनें ह्यांच्या कुण्डलीचा विचार केलेला नसून फक्त त्यांच्या हातून त्यांनीं हातीं घेतलेलें **मानव जातीच्या कल्याणाचें कार्य** कां तडीस गेलें नाहीं इतक्या पुरताच विचार केलेला आहे----तेव्हां आमच्या दृष्टीनें ह्या विषयावर जे कांहीं विचार सुचले आहेत ते आज आपणांपुढें मांडीत आहों.

कुण्डलीचें निरीक्षण करतांना पुढील गोष्टी आढळतात.

१ लें:---- वरुणाशिवाय कोणताही ग्रह **उत्तम राशीबली** नाहीं. पण वरुण प्रजापति ह्या ग्रहांनां राशीपेक्षां स्थान माहात्म्यच ज्यास्त आहे. त्याप्रमाणें पाहिलें तर वरुण षष्ठांत आहे. व षष्ठांतील वरुणाचें ज्योतिर्मालें-तील वर्णन येथें इतकें अनुकूल दिसत नाहीं.

२ रें:--दृष्टियोग ह्या कुण्डलींत कांहीं बरे आहेत पण अत्यन्त अनिष्ट असेही कांहीं झाले आहेत. व गुरूशिवाय प्रत्येक ग्रह **पाप ग्रहानें दूषित** असून गुरू शुक्राचा अर्ध केंद्र योग झाला आहे (तरी ह्यांत क्रांतियोग विचारांत घेतले नाहींत.)

३ रें:-- दशवर्गांत उत्तमांशापलीकडे लग्न किंवा कोणताही ग्रह बलवान नसून फक्त रवि उत्तमांशांत व बुध, शुक्र पारिजातांशांत आहेत.

४ थें:--स्थान बलाबद्दल विचार केला तर कुण्डलींतील महत्वाचे ग्रह स्थान-बली आहेत पण ते सर्व अनुदित गोलार्धांत असून उदित गोलार्धांत शनि सारखा पापग्रह दशमावर आहे. अशा तऱ्हेचे स्थान बली ग्रह ज्यांच्या कुण्डल्यांत आहेत अशीं कांहींतरी माणसें **जगाच्या दृष्टीनें** कोना कोप-ऱ्यांत पडलेलीं दिसतात तर येथें प्रे० विलसन् हे सर्व जगांत प्रख्यातीस आलेले पुरुष आहेत. ह्यावरून आम्हांस अशी शंका येते कीं ही कुण्डली कोठेंतरी चुकत असावी. बारकाईनें शोध करून खरी कुण्डली मिळविण्याचा प्रयत्न करावा अशी आमची नम्र सूचना आहे.

आमच्या मतें ह्या कुण्डलींत गुरू हा सत्व प्रधान ग्रह अत्यन्त बलिष्ठ आहे व लग्न मेष असलें तर ह्या गुरूला फारच महत्व येत आहे. कारण तो भाग्येश होऊन लग्नांत उदित होईल.

पण आम्ही आहे हीच कुण्डली विचारांत घेऊन काय फळ मिळतें ह्याचा विचार करणार आहों. व ह्या दृष्टीनें पहातां आमच्या मतें ह्या कुण्ड-लींत महत्वाचे असे दोन बलिष्ठ योग झाले आहेत.

योग १ ला:-- लग्न पंचम व नवम ह्या तीनही बौध्दिक स्थानाचे अधिपति कुण्डलीच्या केंद्र कोणांत असून ते नवमांश बली आहेत व प्रे० विलसन इतक्या योग्यतेस चढण्यास त्यांची बुध्दिमत्ताच कारणीभूत होत असून बुध्दिमत्तेबद्दल योग " अधिकस्य अधिकं फलं " ह्या न्यायानें घडून आलेले असून सर्वांत नवमांश बलानें त्याच्यावर कळस चढविला आहे.

योग २ रा:---- हा योग म्हणजे गुरू ज्या अंशांत आहे तो अंश **अश्विनीचा** प्रथम चरण असून **मेषेचा पहिला नवांश** आहे व म्हणूनच तो अत्यन्त महत्वाचा आहे असें आमचें मत आहे.

ह्या बाबतींत ज्योतिर्माला वर्ष १ लें अंक ८ वा नक्षत्रविचार ह्या सदराखालीं ८ व्या पानाच्या पहिल्या ५ ओळींत अश्विनी नक्षत्राबद्दल जी माहिती दिली आहे ती सर्व ज्योतिष विद्यार्थ्यांनीं लक्षांत ठेवण्या-सारखी आहे.

"हें नक्षत्र ज्याप्रमाणें पहिलें आहे त्याचप्रमाणें मनु-ष्यास महत्वपद देतें, या नक्षत्रांत रवि, चन्द्र अगर गुरु असणें शुभदायक आहे. जगांतील महत्वाकांक्षी, उला-ढाली करणारे किंवा प्रमुखत्व पावलेल्या मनुष्यांचे कुंड-ल्यांत या नक्षत्रीं रवि, चन्द्र, गुरु किंवा मंगळ आढळतो"

वरील वर्णन तन्तोतन्त आहे असें अनेक कुण्डल्यांच्या निरीक्ष-णांनीं आमच्या अनुभवास आलें आहे. ह्या नक्षत्राचा **प्रथम चरण** तर

अत्यन्त महत्वाचा आहे. ह्या प्रथम चरणांत वर दर्शित केलेले कोणतेही ग्रह असून जर त्यांचे शुभस्थानाधिपतींबरोबर चांगले योग झाले असतील तर खात्रीनें तो मनुष्य पुढें आलाच पाहिजे.

या नक्षत्रांतील बुध, वरुण व प्रजापति ह्यांचे इतर ग्रहांशीं चांगले योग झाले असल्यास उत्तमच फळें दृष्टोत्पत्तीस येतात.

कुण्डल्यांचें निरीक्षण करीत असतां हें नक्षत्र पुढें दिल्याप्रमाणें खालील प्रसिध्द पुरुषांच्या कुण्डल्यांत बलवान आढळतें.

१ पंचम जॉर्ज लग्न २-३० मेष हा अंश दशवर्गात देवलोकाशीं आहे
२ प्रेसिडेंट् विलसन सप्तमांत गुरु १-१९ „ दशमेश चंद्राबरोबर त्रिरेकादश
३ स्वामी विवेकानंद तृतीयांत वरुण १-२० „ शुक्र, बुधाबरोबर ”
४ ” रामकृष्ण परमहंस लग्नेश गुरु २-० „ वरुण, मंगळाबरोबर ”
५ न्या. म. गो. रानडे सप्तमांत मंगळ ३-० „ स्वनवमांशीं व चंद्राबरोबर ”
६ प्रिन्स ऑफ् वेल्स् ” ०-२३ „
७ क्वीन् आलेक्झांड्रा प्रजापति २-३० „ शनीबरोबर ”
८ ऑ. जस्टिस् सर् बानर्जी नाईंट मंगळ२-० „ रवि, शनि ”
९ मिसेस ॲनि बेझंट् लग्नारंभीं ५-३ „
१० नामदार गोखले षष्ठांत मंगळ ४-१२ „ शुक्र, गुरूबरोबर ”
११ लो.मा.बा.गं.टिळक नवमांत गुरु, चंद्र७व९ „ रवि, शुक्रा ” न. पंचम
१२ प्रे. हार्डिंज लग्नांत वरुण ८-३३ „ इतर ग्रहाबरोबर योग नाहीं
१३ सर फेरोजशहा मेथा चतुर्थांत प्रजापति१०-६„ शनि त्रिरेकादश, रवि नव पंचम
१४ प्रिन्स बिस्मार्क रवि ११-० „ शनि ” प्रजा ”
१५ कोपर्निकस बुध ७-० „ शुक्र ” चंद्र ”
१६ ऑलिव्हर क्रॉमवेल मंगळ १० ० „
१७ मिस्टर लेडबीटर प्रजापति १२-० „ गुरुबरोबर ”
१८ थॉमस् एडिसन् ” १२-० „ गुरु, बुध ”
१९ जीझस् ख्राईस्ट् मंगळ ७ „ पंचमेश शनि ”

२० चीरो (हस्तसामुद्रिक) गुरु ६ मेष शनि नव पंचम
२१ गणपतराव पडवळ रवि ८ „
२२ स्टान्ले प्रख्यात शोधक चंद्र ११ „ रवि, वरुण, बुध त्रिरेकादश
२३ डॉ. स्वेन हेडेन वरुण ६-४० „ गुरु नव पंचम
२४ प्रिन्स लिओपोल्ड चंद्र ७ मंगळ ८ „
२५ लेडी मॉड् बुध, ९ शुक्र ६-० „ मंगळ, वरुण त्रिरेकादश
२६ बोन्हेर रोसा (प्रख्यात पेन्टर) रवि १-३० „
२७ पोप आलेक्झांडर ६ वा गुरु २ चंद्र० „ बुध त्रिरेकादश
२८ ” क्लीमेंट् ८ वा वरुण ३-३० „ शुक्र ”
२९ ” पॉल २ रा नवमांत गुरु २ „ चंद्रयुती बुध ”
३० थीअर्स लुईस अडॉल्फे गुरु ३-३० „ मंगळ ”
३१ न्या. का. त्रिं. तेलंग तृतीय भावारंभीं पहिला अंश दशवर्ग बली आहे

वरील माहिती वरून चाणाक्ष वाचकांच्या लक्षांत येईल कीं ह्या नक्षत्रांतील ग्रहांचे इतर ग्रहांबरोबर त्रिरेकादश किंवा नवपंचम योग होणें महत्वाचें आहे. इतर ज्योतिषविद्यार्थी या नक्षत्रा संबंधीं आपला अनुभव ज्योतिर्मालेच्या द्वारें प्रसिध्द करतील तर आणखी खल होऊन ह्या बाबतींत योग्य तो सिध्दांत काढतां येईल.

शेवटीं आम्हांस येथें इतकेंच नमूद करावयाचें आहे कीं, थोर, विद्वान व पुढारी माणसांच्या हजार कुण्डल्यांचें निरीक्षण केल्यावर सुमारें **शेंकडा ७७ कुण्डल्यामध्यें सायन मेषराशीचा किंवा संपातापासून पहिल्या ३० अंशाचाच फार प्रमुखत्वानें संबंध आला आहे** असें आढळून आलें इतकेंच सांगून हा लेख पुरा करतों.

गुरुवार ता० ५ मे १९२१ दादर.

प्रसिद्ध व्यक्तींच्या कुंडल्यांचा संग्रह.

नंबर (१३) कै० लोकमान्य बाळ गंगाधर टिळक.

लोकमान्य टिळकांच्या कुण्डली सम्बन्धानें आजपर्यंत अनेक ज्योतिर्विदांनीं अनेक ठिकाणीं ऊहापोह केलेला आहे. **ज्यं तिर्मोलेंतच** त्यांच्या कुण्डलीचें विवेचन एकदां होऊन गेलेलें आहे असें असतां पुन्हा त्याच कुण्डली सम्बन्धानें आमचे विचार वाचकांपुढें मांडीत आहोंत. याचें कारण **लो० टिळकांच्या** चरित्राचा जितका ज्यास्त विचार करावा तितकें अधिक बोधप्रद ठरेल व कोणत्याही व्यक्तीच्या चरित्र्याचा बोध त्या व्यक्तीच्या कुण्डलीवरून जसा होईल तसा इतर बाह्य साधनावरून होणार नाहीं हें ज्योतिष विद्यार्थ्यास नव्यानें सांगावयास नको आणि म्हणूनच पुनरुक्तीचा दोष स्वीकारून त्यांच्या कुण्डलीचें विवेचन करण्यास प्रवृत्त होत आहोंत. पुनरुक्तीचा दोष स्वीकारला तर आहेच पण त्याबद्दल आमच्यावर नेहेमींच प्रेम करणारे वाचक क्षमा करतील अशी आशा आहे.

लोकमान्यांच्या जन्मकाळासम्बन्धानें बऱ्याच ज्योतिर्विदांमध्यें मतभेद दिसून येतो. हा मतभेद नक्की काळासंबंधानें आहे. आतांपर्यन्त प्रसिध्द झालेला कोणताही काळ घेतला तरी लग्न केन्द्रीं **सायन सिंह** राशीच उदय पावते. कै० **चि**टणीस लग्न सिंहेच्या ७ व्या अंशांत धरतात, **कुण्डली विज्ञान कारांच्या** मतें तें सिंहेच्या १ ल्या अंशांत असावें रा० **आ**पटे ८ व्या अंशाची कुण्डली प्रसिध्द करतात, परंतु जो काळ देतात त्या काळीं ८ वा अंश येऊं शकत नाहीं. ता० २३ जुलै १८५६ रोजीं सकाळीं ६ वाजून २५ मिनिटांनीं सिंह राशीचा ११ वा अंश उदय पावेल. रा० **आ**पटयांनीं स्वीकारलेल्या दिन वर्ष पध्दती प्रमाणें जो

फलागम वर्णन केला आहे त्यावरून सिंह राशीचा आठवाच अंश त्यांना मान्य असला पाहिजे व केवळ नजरचुकीनें जन्मकाल ६ वाजून २५ मिनिटांचा लिहिला गेला असावा. दिलेला वेळ कायम ठेविला तर दिन वर्ष पध्दतीनें दशम भुवनांशीं होणारे योग सुमारें ३ वर्षें अलिकडे येतील. रा० **चि**टणीसांचा भर ७ व्या अंशाचें जें भव्य वर्णन एका फ्रेंच ग्रंथकारानें केलेलें आहे व जें वर्णन **लो**कमान्यांच्या आयुष्य क्रमाच्या स्थतींत तंतोतंत जुळतें त्यावर आहे. मग ह्या तीन अंशांतून कोणता अंश उदित असला पाहिजे ? आमच्या मतें ७ अंशच बरोबर आहे. मात्र **चि**टणीसांपेक्षां आम्हीं अर्धा अंश लग्न पुढें घेतों. व रा० **आ**पटयांनीं दिलेल्या अंश कलापेक्षां पाऊण अंश मागें घेतों. लग्न केंद्रीं ७ वाच अंश कायम ठेविण्यांस **चि**टणीसांपेक्षां आम्हीं अधिक कारणें देतों तीं अशीं:----

पहिलें कारण दिन वर्ष पध्दतीनें **लो**कमान्यांच्या सतराव्या वर्षी चलित मंगळ, लग्न ७ व्या अंशांत धरून येणारा जो दशम बिंदु (वृषभ-५ अंश) त्याबरोबर तंतोतंत प्रतियोग करीत होता या योगावर **लो**कमान्यांचे वडील वारले. दुसरें कारण मरणसमयीं मूळ मृत्यु स्थानाधिपति गुरु (चलित) व चलित लग्न यांचा प्रतियोग चालला होता. **लो**कमान्यांच्या निधनसमयीं सिंह राशीचा तंतोतंत सातवाच अंश चतुर्थ स्थानारंभीं म्हणजे लय स्थानांत लय पावत होता हें लक्ष्यांत ठेविण्या सारखें आहे. रा० **न**वाथे यांच्या मताप्रमाणे सिंह राशीचा १ ला अंश धरला तर दिन वर्ष पध्दतीनें होणारे योग व घडलेल्या गोष्टी यांचा मुळींच मेळ बसत नाहीं. व तो अंश कायम करण्यास दिलेलीं कारणें म्हणण्या सारखीं बलवत्तर आहेत असें आम्हांस वाटत नाहीं. सारांश आमच्या मताप्रमाणें

लोकमान्यांची जन्म वेळ ता० २३ जुलै १८५६ रोजीं सकळीं सहा वाजून पांच मिनिटें ही आहे व या कालाची कुण्डली पुढें दिल्याप्रमाणें आहे.

॥ सायन भावचलित जन्म कुंडली ॥



ग्रहांच्या क्रांति.

रवि.	चंद्र.	मंगळ.	बुध.	गुरु.
२०उ७,	३उ३८,	१०द३७,	१०उ१३,	२द१९
शुक्र.	शनि.	हर्शल.	नेप.	लग्न.	दशम.
२०उ५६,	२२उ३५,	१८उ३८,	४द५५,	१८उ३३,	१३उ१२

लोकमान्यांच्या जन्मकाळीं पूर्व केंद्रीं सायन सिंह राशि उदय पावत होती. लग्नस्वामी अंशुमान रवि वैशेषिकांशांत नुकताच उदय पावला होता. सिंह या बादशाही राशींत रवि असतां जन्म पावणारे लोक, महत्वाकांक्षी, अचल बुद्धीचे स्वातंत्र्यप्रिय, निष्कपटी, आत्मविश्वासी, कोणत्याही परिस्थितींत न डगमगणारे, शुद्ध आचरणाचे, सरळमार्गी, अत्यंत विश्वासु व दुसऱ्यावरही अतिशय विश्वास ठेवणारे, अत्यंत आशावादी असतात असें वर्णन ग्रंथांतरीं केलेलें आहे व यासबबानें पौर्वात्य व पाश्चिमात्य ज्योतिर्विदांमध्यें मतभेद नाहीं. सिंह लग्न व सिंह राशींतील रवि यांचें वर्णन कोणीही ज्योतिषी वर दिल्याप्रमाणें फार तर भाषेचा फरक करून सांगेल. हें ग्रंथोक्त वर्णन व **लो**कमान्यांचें चरित्र यांचें इतकें साम्य पाहून ज्योतिषशास्त्र व सायन राशी यांचा खरेपणा न मानणारा शास्त्रांधच समजला पाहिजे. निरयण मानानें लग्न व रवि कर्क राशीच रहातोल त्याचप्रमाणे चंद्र मीन राशीचा होईल. कर्क व मीन ह्या जलतत्वाच्या व स्त्रीसज्ञक राशी आहेत असें नवे, जुने ग्रंथकार म्हणतात व त्याप्रमाणें जर लग्न, रवि व चंद्र यांचीं फलें ग्रंथावरून जरी द्यावयाचीं म्हटलें तरी टिळक हे मिळमिळीत स्वभावाचे टाळकुटेच झाले असते. मेष व सिंह ह्या रजोगुणदर्शक----क्षात्रतेजदर्शक राशींवरून दिसणारा वीर वृत्तीचा आवेश कोणाकडे व निरयण राशींनीं दर्शविलेला मुळमुळीतपणा कोणाकडे ? ह्या दोहोंतील ढळढळीत फरक अत्यंत स्पष्ट आहे पण तो सुद्धां दृष्टिआड करणारे हरीचे लाल जेव्हां दृष्टीस पडतात तेव्हां त्यांची चिकित्सक बुध्दि शून्य अंशाच्याही खाली उतरली आहे असें म्हणण्याची प्रवृत्ति होते.

---

* सारावलीकार म्हणतो " कर्किणि लग्ने **भीरु**र्नैक निवासश्चलप्रज्ञः " तसेंच सिंह लग्नाविषयीं म्हणतो " सिंहस्यसमानमुखः स्थितिमान्नांभीर्य सयुक्तः " हा जो दोन लग्नांचा फरक आहे तो लक्ष्यांत घेतला तर लोकमान्यांचें कर्क लग्न असूं शकणारच नाहीं.

लोकमान्यांच्या कुंडलींत रवि तनुस्थानाधिपति असून तनुस्थानाशीं युक्त आहे व अत्यंत बलवान असा ग्रह तोच आहे म्हणून तो **लो**कमान्यांचा आत्मकारक ग्रह समजला पाहिजे. हा आत्मकारक रवि राशिचक्राच्या ज्या अंशांत आहे त्या अंशाचें वर्णन **चा**रुबेलनें केलें आहे तें असें:----

"Leo 1st degree:–Symbol, An olbelisk. Denotes one who will suffer many great trials, reverses of fortune etc. but will leave behind him a name on the pages of history. Such a life may for a time be so much involved in the life of people among whom he may live & labour as to be lost sight of but finally he mounts to the surface".

लोकमान्यांच्या आत्मकारक ग्रहाचें हें अंशवर्णन कितीं तंतोतंत खरें आहे हें वाचकांनींच स्वत: ठरवावें ' ला व्हालफेरा ' नांवाचा फ्रेंच ग्रंथकार याच अंशाचें वर्णन पुढें लिहिल्याप्रमाणें देतो:----

"Symbol—There stands a lion upon an elevation looking towards a rising sun. It denotes a person of extreme dignity of character, with much self reliance, fearlessness, nobility & freedom of nature; an ambitious person & somewhat jealous of honours being much subject to praise & flattery. The native will be apt in the government of others & equally so in self control; unless the heart be kind, the native will be a mere pompous tyrant. It is a degree of dignity."

सिंह लग्न व अत्यंत बलवत्तर रवि यांचीं फलें लक्ष्यांत घेऊन मेष राशींतील मनाचा कारक ग्रह चंद्र हाहि विचारांत घेतला पाहिजे, मेष ही राशिचक्रांतील अग्नितत्वाची व चर राशि आहे. ह्या राशींत चंद्र असतां जन्म

पावणारा मनुष्य धाडसी, उद्योगी, खटपटी, महत्वाकांक्षी, प्रत्येक कामांत पुढाकार घेणारा, कल्पक, धैर्यवान् व निर्भिड असतो. रवि सिंह राशींत, लग्न सिंह राशीचें, व चंद्र मेषराशींत अशा योगावर जन्म पावणारा पुरुष, अचल धैर्याचा, आत्मविश्वासी, सिंहतुल्य पराक्रमाचा सर्वांवर छाप ठेवणारा, संकटास न जुमानणारा असाच असला पाहिजे असें सायन कुंडलींतील ग्रह साक्ष देतात. रवीच्या अंशफलाप्रमाणेंच **चंद्राचेंही अंशफल** विचार करण्यासारखें आहे हें पुढील उतार्‍यांवरून दिसून येईल.

"Aries 10 th degree:- Symbol—a large glass ball or globe. It is capable of receiving the images of the Stars in space as well as reflecting the 'anorama of the earth.' The person here denoted will possess a mind open to receive & will reflect the truth in his daily life. Such will be scrupulous by just & honourable. He may prove to be a great seer or naturalist. Should this person be of humble origin he will rise far above his birth" "चारुबेल."

"Aries 10th degree:- A man on the horse back standing alone in the middle of a battlefield, where around him lie the dead and dying. It denotes a person who will occupy some singular position in life; one whose career will be remarkable, if not unique, & noted for its daring & hazardous exploits. It fires success in undertakings & much prestige. It is a degee of Victory." "ला व्हाल फेरा"

वर दिलेली रविचन्द्रांचीं अंशवर्णनें इतकीं स्पष्ट आहेत कीं त्यासंबंधानें अधिक स्पष्टीकरण करण्याचें कारण नाहीं. उदित अंशाचें-

हा वर्णन ज्योतिर्मालेंत मागेंच प्रसिध्द झालेलें आहे म्हणून तें पुन्हां येथें देत नाहीं. उदित अंशासंबंधानें कदाचित कोणास शंका वाटेल परन्तु रवि-चन्द्रांच्या सायन राशीच्या अंशाविषयीं कोणासहीं शंका घेतां येणार नाहीं आणि ही अंशवर्णनें वस्तुस्थिति इतकी बरोबर दाखवितात कीं ती खोटीं म्हणणाऱ्यांची कींव करणेंच योग्य होईल.

लोकमान्यांचा आत्मकारक ग्रह रवि राशीनें अत्यन्त बली आहे असें दशवर्गावरून आणि पाश्चिमात्य अंशवर्णनावरून स्पष्ट आहे. बलवत्तर आत्मकारक ग्रहामुळेंच दुस्तर संकटपरम्परा ओलांडून **लो**कमान्यांचें आयुष्य यशस्वी झालें. आत्मकारक ग्रहाच्या धर्माप्रमाणें स्वभावतःच ते स्वातंत्र्यप्रिय होते. पैं राक्रम भुवनांतील भंगळ व मेषेंतील चन्द्र यांमुळें मुळची स्वातंत्र्यप्रीति रोमरंध्रांतून भरून राहिली होती. आत्मकारक ग्रह रवि दशम भुवनाच्या अधिपतीबरोबर तनुस्थानीं युक्त आहे त्यामुळें **लो**कमान्यांस राजकारणाचा प्रश्न अत्यन्त जिव्हाळ्याचा वाटे. बलवान् लग्नेश-- दशमेश यांचा ततुस्थानारंभीं होणारा योग महत्पददर्शक आहे. हिन्दी राजकारणांत त्यांनीं पहिल्या रांगेंतील पहिली जागा मिळविली होती या गोष्टीचा दर्शक योग आहे. **टि**ळकांचें राजकारण पूर्ण व्यवहारीं होतें. केवळ विद्वद्वरांच्या बौध्दिक भूमिकेवर दृश्यमान होणारें तत्वज्ञान नव्हतें कारण आत्मकारक व कर्मस्थानाधिपति याचा युति-योग तनुस्थानांतच झालेला आहे. चर राशींतील ग्रहपंचक व त्यांचा

* बौद्धिक स्थानांतील मंगळाचीं फलें सफॅरिअल देतो तीं अशीं;- "Mars produces a military spirit, contentious, free & courageous; gives a desire for conquest .... The sense of freedom dominates the nature." New manual पान ९८ पहा

बौध्दिक स्थानांशीं (१-३-९) आलेला संबंध साम्राज्य दर्शक सिंह राशींत असलेला बलिष्ठ रवि आणि दशम भुवनांतील हर्शल हे तीन योग लोकमान्यांच्या राजकारणांतील कामगिरीचे द्योतक आहेत. आत्मकारक व दशमाधिपति शुक्र यांच्या त्रिकोणांत भाग्य भुवनांतील गुरु-चन्द्रांचा पूर्ण युति योग झालेला आहे. भाग्यभुवन हें यश व कीर्ति यांचें द्योतक आहे. दशम स्थान म्हणजे हातून घडणाऱ्या कार्याचें क्षेत्र, त्याचा अधिपति व आत्मकारक ग्रह यांवर भाग्य भुवनांतील जीवयोगाचें अमृत सिंचन झालेलें आहे आणि ह्मणूनच **लो**कमान्य **टि**ळकांनीं राजकारण क्षेत्रांत यशस्वी होऊन अजरामर कीर्ति मिळविली. हिंदी राजकारणाच्या इतिहासांत त्यांचें नांव कायमच्या ठशांनीं मुद्रित झालेलें आहे. हें कार्य रवि शुक्र व चन्द्र गुरु या दोन युतियोगांमुळें घडून आलेलें आहे. या योगद्वयापैकीं दुसरा योग ग्रन्थ कर्तृत्वाग्रही कारणीभूत झाला आहे. भाग्यभुवन हे जसें कीर्तीचें भाग्याचें यशाचें कारक आहे तसेंच तें धर्म व तत्वज्ञान, प्रवास व तीर्थाटण, कोर्टातील कज्जे व न्याय ग्रन्थ प्रकाशन व ग्रन्थ कतृत्व वगैरे गोष्टींचें कारक आहे अर्थातच या स्थानांत गुरु-चन्द्रांचा अंशात्मक युतियोग झाला आहे म्हणून ग्रन्थ कतृत्वामुळें कीर्तिलाभ घडला. राष्ट्रीय पुढारी व ग्रंथकार अशा दुहेरी नात्यानें **लो**कमान्यांस त्यांच्या हयातींतच अग्रपूजेचा मान मिळाला हें उपरिनिर्दिष्ट योगद्वयांस अनुसरूनच झाले. या दोन्हीं योगांचें आणखी सूक्ष्म अवलोकन केलें तर दिसून येईल कीं आत्मकारक रविचा योग अभेद्य व चिरकालिक स्वरूपाचा दिसतो. आत्मकारक रवि फक्त मंगळा बरोबर केंद्र योग करीत आहे पण हा योग होऊन गेलेला आहे. रवीनें मंगळा-बरोबर केलेला केन्द्र योग सोडला असू तो पुढें दशमेशाशीं युक्त होत आहे व त्यापुढें गुरु-चन्द्रां बरोबर नव पंचम योग करण्यास जात आहे. त्याच प्रमाणें या

अशुभ योगांत क्रूर मंगळ ग्रह अनुदित गोलार्धात असून रवि मात्र आपल्या सर्व बलांनीं प्रकाशित झाला आहे आणि ह्मणुनच राष्ट्रोध्दारक पुढारी या नात्यानें त्यांची कीर्ति चिरकालर रहाणार यांत बिलकूल शंका नाहीं. दुसऱ्या योगाचा विचार करतां (१) भाग्याधिपति मंगळ स्थान बली आहे परंतु आपल्या स्वक्षेत्र विन्मुख क्षेत्रांत असल्यामुळें राशीनें हीन बली आहे (२) गुरु--चन्द्रांचा योग अत्यंत शुभ तर खराच परन्तु या शुभ योगास गुरूच्या अष्ट मेषत्वानें व चन्द्राच्या व्ययेशत्वानें कमीपणां आला आहे (३) व शेवटीं गुरु--चन्द्रांबरोंबर अपकीर्तीच्या स्थांनांतून म्हणजे व्ययस्थानांतून खल ग्रह शनि व बुध अत्यन्त अशुभ योग करीत आहेत. हे योग लक्ष्यांत घेतां लोकमान्यांच्या राजकारण क्षेत्रावर त्यांचा कीर्तिसूर्य कधींच मावळत नाहीं परन्तु इतर क्षेत्रा सम्बंधानें तसें म्हणतां येत नाहीं.

आत्मकारक----दशमेश आणि गुरु-चंद्र या दोन ठळक योगांप्रमाणेंच तिसरा एक योग लोकमान्यांच्या कुंडलींत झालेला आहे व तो व्यय-स्थानांतील बुध-शनीचा कर्क राशींत झालेला योग होय. जसा आत्मकारक ग्रहाचा अत्यंत महत्वाचा योग प्रस्तुत कुंडलींत दिसून येतो तसाच हा बुध-शनीचा योग ही महत्वाचा आहे. बुध, धन व लाभ स्थानांचा व शनि, षष्ठ-सप्तस्थानांचा अधिपति आहे. धनस्थानावरून द्रव्यार्जन, द्रव्यसंचय व वाणी, लाभस्थानावरून मित्र व सहाय कर्त्ते, षष्ठस्थानावरून आरोग्य व शारीरिक त्रास व सप्तम स्थानावरून पत्नी व भागीदार त्याच प्रमाणें उघड शत्रु यांचा विचार होतो. लोकमान्यांच्या कुंडलींत बुध-शनि हे वरील गोष्टींचे अधिपति आहेत व ते व्ययस्थानांत आहेत. व्ययस्थान म्हणजे निराशा, संकटें, विरोध, अडचणी,

अपयश, कारागृहवास, हद्दपारी व गुप्तशत्रु यांचें निवासस्थान होय. एवंगुणविशिष्ट स्थानांतून शनि व बुध हे गुरु चंद्राशीं अशुभ योग करीत आहेत. लोकमान्यांना अनंत संकटांच्या भोंवऱ्यांत खेंचणारा अनिष्टयोग तो हाच, भाग्य भुवनांतील गुरुचंद्रयोगावर निढळाच्या घामानें मिळविलेल्या संपत्तीस ओहटी लावणारा योग तो हाच व कोर्टातील खटल्यांचा कायमचा ससेमिरा लागला तो यामुळेंच. लेखनक्रियेचा ग्रह बुध अपयशी स्थानांत खलांतील खल ग्रह जो शनि त्याशीं युक्त आहे आणि दोन्ही ग्रहचंद्राबरोबर अनिष्ट योग करीत आहेत म्हणून राजद्रोही लेख लिहिल्याच्या आरोपावरून कारागृहवासांत जावें लागलें. " बुध-शनि व्ययस्थानांत म्हणून लेख लिहिल्यामुळें कारागृहवास व कारागृहाच्या स्थानाचा अधिपति चन्द्र कीर्तिभुवनांत म्हणून कारागृहांत ग्रन्थ लिहून कीर्तिलाभ " असा ह्या योगाचा अर्थ आमच्या एका मित्रानें सुचविला आहे. बुध मित्रस्थानाचा अधिपति आहे व तो पूर्वोक्त प्रकारच्या-दुष्ट स्थानांत आहे व चन्द्र-शनींचाही *अशुभ योग झालेला आहे म्हणून लोकमान्यांच्या मित्रमण्डळांत हितशत्रूंचा भरणा जास्त असला पाहिजे. या प्रच्छन्न शत्रूनीं त्यांचें किती नुकसान केलें असेल, त्यांना किती मानसिक यातना भोगावयास लावल्या असतील याचा आपण कल्पनाच केली पाहिजे. असो. बुध-शनींच्या योगाची ही एक बाजू झाली. निराळ्या भाषेंत सांगावयाचें म्हणजे व्यवहाराची बाजू झाली. आतां बौध्दिक भूमिकेवर या योगाचा परिणाम काय झाला हें पाहूं

---

*"The moon anywhere in the horoscope, afflicted by saturn, shows false friends" सफॅरेअलचें 'New manual of astrology' पान १२१ पहा.

कुण्डलीवरून बौद्धिक योग कसे पहावे यासंबंधानें आजपर्यन्त आपल्या भाषेंत तरी विशेष म्हणण्यासारखें कोणी लिहिलेलें दिसत नाहीं. व जुने ग्रन्थकार केवळ सामान्य वर्णनें देऊन मोकळे झालेले आहेत. कुण्डल्यांचीं चरित्रात्मक वर्णनें देतांना आम्हीं कांहीं प्रसंग बुद्धियोगा विषयीं जें लिहिलें आहे त्यावरून या योगांचा कांहीं कल्पना होण्यासारखी आहे परन्तु त्यांचें निश्चित स्वरूप समजण्यास त्यांचा स्वतंत्र रीतीनेंच विचार केला पाहिजे. प्रस्तुत प्रसंगीं बुद्धियोगांचे केवळ मूलभूत सिध्दांत येथें नमूद करतों.

(१) तनुस्थान, चन्द्र व बुध यांच्या **राशी** बुद्धिमत्तेवर परिणाम करितात.

(२) कुण्डलींतील ग्रहाधिक्याच्या **राशींच्या स्वभावानुरूप** व **तत्वानुरूप** बुद्धिमत्तेची दिशा दर्शविली जाते.

(३) बुध, चन्द्र व उदित अंश या बरोबर होणारे दृष्टियोग बुध्दिमत्तेचा दर्जा दर्शवितात.

(४) लग्न, तृतीय, नवम व पंचम या स्थानांतील ग्रह राशींवरून (नियम १ व २ मध्यें सांगितल्याप्रमाणें) दृग्गोचर होणाऱ्या बुध्दिमत्तेस निश्चित स्वरूप देतात.

प्रस्तुत कुण्डलीत लग्न सिंह राशीचें व चंद्रमेषेचा आहे. या दोन्हो राशींमध्यें महत्वाकांक्षा, धैर्य, धडाडीनें काम करण्याची हतोटा, वगैरे येतात. सिंह राशि ही opposed to cliques व oblivious to enmity अशी आहे व मेष राशीमध्यें धाडस, कौशल्य व पुढें येण्याची अनिवार इच्छा हे गुण प्रबळ असतात. बुध राशि म्हणजे कर्क राशि महत्वाकांक्षी व सार्वजनिक कामांविषयीं आवड दर्शविणारीं असून prudent, sympathetic & imaginative अशी आहे. प्रस्तुत कुण्डलींत ग्रहाधिक्य चर राशींत आहे. या योगाचें वर्णन सुप्रसिध्द ज्योतिर्विद सफरिअल पुढील शब्दांत करतो:----

"Cardinal signs indicate useful, energetic, ambitious & persevering persons; busy people, the workers of the world, the best business men, pioneers such as are capable of cutting out a line in life for themselves & of making headway against obstacles. They are very independent, capricious & averse to humble service."

लोकमान्यांच्या कुंडलींतील लग्न, चंद्र व बुध यांच्या राशींवरून बुद्धिप्रवाह कोणत्या दिशेस वहात होता हें वर सांगितलें आहे. त्यांचा बुद्धि मूळांतच रजोगुणात्मक किंवा प्रवृत्तिपर होता हें वरील वर्णनावरून स्पष्ट होईल. प्रवृत्तिपर असणाऱ्या बुद्धिमत्तेवर चंद्र--गुरु व बुध--शनि हे युतियोग व त्याचप्रमाणें बुधचंद्र--केंद्रयोग, बुध--गुरु केंद्रयोग व चंद्र-शनि--केंद्रयोग अशा शुभाशुभ पांच योगांनीं परिणाम केला आहे. बुध--चंद्र केंद्रयोगानें बुध्दि तीव्र होते परंतु तो परदोष हुडकून काढण्यांत तत्पर असते. परहृदयाला मर्मी लागणारे शब्द वापरणें हा या योगाचा दुसरा दुर्गुण होय. त्याच प्रमाणें लोकांकडून मतविपर्यास व अर्थविपर्यास हटकून होतात. बुध--गुरु--केंद्रयोग हा **लो**कमान्यांच्या कुंडलींतील ज्योतिषविद्यार्थ्यांना बुचकळ्यांत पाडणारा एक योग आहे. याचें ग्रंथोक्त फल असें आहे.----

'Imitative, susceptible, declarative, wavering & lacking in true Judgment' "Errors of judgment" हा एक ठळक दोष बुध गुरूंच्या अशुभ योगावर उत्पन्न होतो. शनि-

गुरूंचा केंद्रयोग हा धार्मिकप्रवृत्तीचा विकास होण्यास अत्यन्त प्रतिकूल आहे पण या तिन्ही अशुभ योगांचीं फलें बौध्दिक स्थानांतील चन्द्र-गुरूंच्या युतीनें कांहीं अंशीं झालीं आहेत कारण या शुभ ग्रहांचा योग मानसिक पावित्र्य, शुध्दाचरण, आतिक्यभाव, परोपकारबुध्दि वगैरे गुण देतो. लोकमान्यांच्या कुण्डलींतील आणखी बुध्दियोग म्हणजे बुध-शनींचा होय. या योगाचें वर्णन How to judge a Nativity' या ग्रन्थांत पुढील शब्दांत केलें आहे.

"If mercury be connected in any manner with the planet Saturn, it makes all things corporeal, substantial & practical, including those born under this influence to science & all work requiring concentrated thought & carefnl analysis. It is the most tangible & permanent vibration that mercury can express ... The conjunction is the most potent; for in this case thought & action become one whether for good or ill, there being concentration & much power of continuity displayed."

बुध नेपचून बरोबर त्रिकोण योग करण्यास जात आहे. हा योगreceptivity & adaptibility in matters of feelings हे गुण दर्शवतो.

लोकमान्यांच्या कुंडलींतील बुध्दियोगांचें जें पृथक् वर्णन वर दिलें आहे तें मुद्दाम केवळ ग्रंथाधारेंच केलें आहे त्यावरून वाचकांस कळून येईल कीं बौध्दिक प्रवृत्ति सिंह व मेष या राशीस अनुरूप पूर्ण प्रवृत्तिपर असून धर्मभुवनांतील गुरु-चन्द्र युतीनें तिच्यावर सत्व गुणाची छाप बसविली होती त्यामुळें शुध्दाचरण, सदैव कर्तव्यतत्परता (चन्द्र-गुरु-

युतिमुळें) उच्च मनोभावना, (बुध-शनि योगामुळें) सखोल तात्विक विचार व व्यवहारनैपुण्य इत्यादि गुणांचा समुच्चय येथें झालेला दृष्टीस पडतो. बुध-गुरु, बुध-चंद्र व गुरु-शनि यांच्या अशुभ योगांमुळें राजकारणांकरतां म्हणा, सामाजिक कारणांकरतां म्हणा धर्म व तत्वज्ञानाकरतां म्हणा वाणी व लेखणी हीं दोन आयुधें अव्याहत परजत होतीं. बुध पीडित असल्यामुळें----बुध-हर्शलांचा अर्ध केंद्र योगही लक्ष्यांत घेतला पाहिजे----लोकमान्यांच्या लिहिण्यास विरोध झाला नाहीं असें कधींच घडलें नाहीं. राजकारण व सामाजिक बाबींसम्बंधानें तर राहोच परन्तु Artic Home in the Vedas व गीता-रहस्य या ग्रंथांतील तत्वांनां विरोध करणारे जाडे पण्डित निर्माण झाले. गीता रहस्यावर जी टीका झाली तशी टीका मराठी भाषेंतील दुसऱ्या कोणत्याही ग्रंथासंबंधानें झाली नाहीं. ज्योतिषशास्त्रदृष्ट्या या सर्वांचें कारण बुध पीडित आहे हें होय. बुध पीडित, नवमेष स्वराशिविन्मुख क्षेत्री व नवमांतील ग्रहही पीडित म्हणून लोकमान्यांचा त्यांच्या हयातींत ग्रंथकार म्हणून जो कीर्ति झाली ती तशीच अणुरेणु कमी न होतां चिरकाळ राहील असें वाटत नाहीं.

'The memory of other authors is kept alive by their works. But the memory of Johnson keeps many of his works alive.'

असें मेकॉलेनें म्हटलें आहे. असाच कांहीसा प्रकार लोकमान्यांच्या ग्रन्थांसंबंधानें होईल.

१० एप्रिल १९२१.

राम नारायण.

राष्ट्रसूर्य भगवान् टिळक.

(ले. नारायण सदाशिव मराठे.)

"लोकमान्य टिळक!" या नामोच्चारानें ज्याचें हृदय देशभक्तीनें उचंबळून येणार नाहीं असा मनुष्य निदान या भरतखंडांत तरी आढळणार नाहीं. त्यांची देशभक्ती प्रत्यक्ष ताऊन सुलाखून निघालेली असून ती अस्सल शंभर नंबरी ठरली. विष्णुशास्त्री चिपळूणकरांच्या पासून उद्भवलेली देशभक्तीचीं तत्त्वें लोकमान्यांनीं पूर्णपणें आचरून दाखविलीं. सर्व लोकांस आपल्या देशभक्तीनें आपलेसें करून "अनभिषिक्त भूपति" बनण्याचें अलौकिक सामर्थ्य त्यांनीं प्रत्यक्ष जगास दाखविलें. नर करणी करे तो नरका नारायण हो जाय हो साधूक्ति सार्थ आहे कीं नाहीं यासंबंधी शंका असलेल्या इसमानें पुराणकालाकडे जाण्यास नको, ऐतिहासिक कालचीं उदाहरणें शोधण्याचीं तसदी घेण्यापेक्षां त्यानें वर्तमानकालीन नुकत्याच संपलेल्या लोकमान्यांचें इहलोकचें चरित्रच अवलोकन करावें. त्यांचें चरित्र आपणास तर मार्गबोधक झालेंच आहे, पण तें भविष्यकालीन अनेक पिढ्यांपर्यंत मार्गदर्शकच होऊन राहील यांत बिलकूल शंका नाहीं.

असलें अलौकिक सामर्थ्य अंगीं असणें हो एक ईश्वरी देणगी आहे. ही देणगी सामान्य इसमांस अनेक जन्म घेऊनहो मिळणें दुर्लभ. अशी देणगी कोणत्या प्रकारच्या ग्रहयोगांनीं मिळते हें अनेक उदाहरणें घेऊन सिध्द करण्यास अशा लोकमान्य विभूतीच थोड्या झाल्या असल्यामुळें त्यांच्या कुंडल्यांचा संग्रह आमचे जवळ नाहीं. टाईपरायटरवर काम करणाऱ्या शेंकडो इसमांच्या कुंडल्या मिळू शकतील पण कालावर विजय मिळवून सर्वांस मार्गदर्शक अशा इसमांच्या शेंकडों कुंडल्या उपलब्ध होणें अत्यंत अशक्य! कारण

अशा विभूति दर वर्षीं आपणांस लाभत नाहींत. अनेक शतकांत एखादी अशी विभूति आपणास पहावयास सांपडते. म्हणून असें असामान्य सामर्थ्य अमुकच एका विशिष्ट ग्रहयोगानें मिळतें असें प्रतिपादन करणें अशक्य आहे. सामान्यतः क्रियाशक्ति, द्रव्यशक्ती, इच्छाशक्ती व दैवी शक्ती या चोहोंचा संगम असल्याशिवाय कोणतेंही असामान्य कार्य होणें शक्य नाहीं. आपण पुष्कळांजवळ या चार शक्तींपैकीं काहीं शक्ति पाहूं शकतो, पण लोकमान्यांजवळ या चारही शक्ती एकवटून राहिल्या होत्या व त्यांचा योग्य कालीं उपयोग करण्याचें त्यांस सहज साधलें होतें.

असलें सामर्थ्य ही एका इहजन्मांतील कर्माचें फळ नव्हे तर त्यांचे पूर्वजन्मांतील फलांचेंच द्योतक होय. आमचे फलज्योतिषांत यासच "भाग्य" असें म्हटलें आहे. कुंडलींतील नवमस्थान हें दैवबल दाखविणारें असतें. हें स्थान ज्यांचें बलवान् असतें त्यांस प्रयत्नांत दैवाची मदत होत असते. कोणतेंही कार्य घडून येण्यास मुख्यतः पांच कारणें लागतात. तीं---

अधिष्ठानं तथा कर्ता करणंच पृथग्विधम् ।
विविधाश्च पृथक् चेष्टा दैवं चैवात्र पंचमम् ॥ १४ ॥ गी. १८

कार्य करण्यास भूमिका, करणारा, करण्यास लागणारीं साधनें, उद्योग व दैव या पांच कारणांची जोड मिळावी लागते. ही दैवाची जोड ज्यांचें नवमस्थान बलवान् असतें त्यांसच मिळतें. इतरांस मिळत नाहीं. लोकमान्यांसही दैवाची जोडी मिळाली म्हणूनच त्यांस आपलें कार्य चिरस्मरणीय करतां आलें. त्यांचे कुंडलींतील भाग्यस्थानांतील गुरुचंद्रयोग हा सर्वश्रेष्ठ योग आहे. या योगावर जन्मलेलीं माणसें क्वचितच आढळतात. हा एकच योग मनुष्यास महत्व देणारा आहे.

या नवमांतील गुरूचें फल कुंडलीविज्ञानकारांच्या शब्दांत देणें जास्त उत्तम वाटल्यावरून त्यांचें गुरूविषयींचें वर्णन देत आहों. कुंडलीविज्ञान पुस्तक ११ अंक ७ सन १९११ मध्यें ते लिहितात.----

" राजकीय, धार्मिक व शास्त्रीय (विशेषतः तत्त्व, वेदांत व वाङ्मय) विषयांचीं वर्तमानपत्रें, मासिकपुस्तकें अथवा ग्रंथ यांच्या ठिकाणीं गुरूचा वास आहे, म्हणून समजावें. त्यांच्या संपादकांच्या कुंडल्या आपण पहाल तर त्यांत गुरु अंमल करीत आहे हें स्पष्ट दिसून येईल. वस्तुतः सदरचे ग्रंथ हे त्या संपादकांचें दृश्य स्वरूप आहे. सदरच्या ग्रंथांच्या लेखनशैलीवरून संपादकांच्या गुरूचें सामर्थ्य कळण्यासारखें आहे. ग्रन्थाची भाषा जर कठोर किंवा चुरचुरीत असेल तर गुरु अग्निराशींत बसलेला आहे म्हणून समजावें. " लोकमान्यांचीं व्याख्यानें, त्यांचे लेख व त्यांचे ग्रन्थ हे त्यांच्या गुरुचंद्रयोगाचो स्पष्ट साक्ष देतात. मार्मिक टीका, तत्त्वप्रतिपादन या बाबतींत त्यांच्याइतकें यश इतर कोणासहो मिळालेलें नाहीं. स्वदेशभक्ति, स्वराज्य, कर्मयोग हीं मुख्य तत्त्वें कायम धरून त्यांनीं आपलें लेखन आणि वक्तृत्व केलें. "

गुरुचंद्र योग.

लोकमान्यांचे कुंडलींत अत्यंत महत्वाचा असा दुसरा योग म्हणजे रवि व शुक्र यांचा योग होय. रवि हा लग्नेश व शुक्र हा दशमेश असून त्यांचा हा होणारा योग राजकीय विषयांतील अग्रेसरत्व पूर्णपणें सिध्द करणारा आहे. या योगाविषयीं कुंडलीविज्ञानकार लिहितात.----

लग्नेश व दशमेश यांची युति.

" राजकीय विचार जन्मणारा स्वतंत्रतेनें करो अगर राजाश्रयानें (नोकरीच्या द्वारें) करो. पार्लमेंटचे मेंबर, गव्हर्नरचे कौन्सिलर अथवा राजकीय विषयांवर लेख लिहिणारे वर्तमानपत्रकार यांचा हा (मुख्य) योग

आहे. उदाहरणार्थ, केसरी हें राजकीय चळचळ उत्पन्न करणारें वर्तमानपत्र आहे. म्हणून त्यांच्या मुख्य संपादकांस हा योग असलाच पाहिजे. याचे मुख्य संपादक टिळक यांचो सायन कुंडली पहा. तींत लग्नेश रवि असून दशमेश शुक्र आहे व या दोन ग्रहांचो पूर्ण युति आहे. ही युति सिंह राशीच्या आरंभींच असल्यामुळें फार प्रबळ आहे. "

कुंडलीविज्ञान पु--१ २ अं--३.

हा लग्नेशदशमेशांचा योग ज्या ग्रहांचा झाला ते ग्रह एकमेकांचे शत्रु असल्यामुळें यांस सांप्रतच्या ब्यूराक्रसीबरोबर झगडा करावा लागला. राजकीय बाजूकडे त्यांनीं लक्ष पुरविल्यापासून त्यांस झगडाच खेळावा लागला.

या वर वर्णन केलेल्या दोन महत्वाच्या योगांचा त्रिकोणयोग हा अत्यंत महत्वाचा असा आहे. असा हा ग्रहयोग एकमेकांस पोषक झाल्यामुळेंच त्यांचे अंगी हें विश्वमोहक सामर्थ्य प्राप्त झालें. " रवि व चंद्र यांचा त्रिकोणयोग राजकीय व सांपत्तिक उच्च भोग देतो. या योगांत ज्ञानसंपन्नता सामान्य असते. हा राजयोग आहे. यास गुरूची जोड मिळाली आहे. ज्ञानसंपन्नता गुरूवांचून नाहीं हें तत्त्व ध्यानांत ठेवून फल वर्तविणें जरूर असतें. गुरूमध्यें ज्ञान व राजभोग हे दोन्ही गुण प्रधान आहेत. रवीमध्यें स्वाभिमान व आत्महित हे दोन गुण मुख्य असून चंद्रामध्यें औदार्य व परकार्यतत्परता हे गुण प्रधान आहेत. चंद्रप्रधान मनुष्यांना दुसऱ्याचो जितको कींव येईल, तितकी रविप्रधान मनुष्यांस येत नाहीं. रविप्रधान माणसें आपणास मोठेपणा कसा मिळेल अशी चिंता करितात व चंद्रप्रधान माणसें लोकांचें कल्याण कसें होईल अशी चिंता करितात. गुरुप्रधान माणसें या दोन्ही गुणांनी संपन्न असतात " (कुंडलीविज्ञान पु--१ २ अं ९ ।

रविशुक्रांशीं त्रिकोणयोग.

१०) लोकमान्यांच्या कुंडलींत प्रभुत्व व लोककल्याणेच्छा या दोहोंचा संयोग झाल्यामुळें त्यांतल्यात्यांत लोककल्याणेच्छा नवमांतील चंद्रगुरु योगामुळें विशेषच बलवत्तर असल्यामुळें त्यांस लोकमान्य ही सर्व लोकांकडून एकमतानें पदवी प्राप्त झाली. लोकमान्यत्व मिळविण्यास त्यांस गुरुचंद्रांचा रविशुक्राशीं त्रिकोण योग हाच जास्त कारणीभूत झाला. हा त्रिकोणयोग जर अंशपूर्ण असता तर त्यांस राज्याधिकार मिळून " पुण्यश्लोक भूपति " होतां आलें असतें. हा योग येवढा दूर अंशावरून असतांही स्थानबलानें त्यांस अनभिषिक्त भूपति होऊन हिंदुस्थानावर आपला अंमल चालवितां आला !

लोकमान्यांच्या कुंडलींत मंगळाचा स्थिति विचार करण्यासारखा आहे. नवमांतील गुरुचंद्र जशी त्यांस दैवाची जोड मिळवून देणारे आहेत तद्वत्

तृतीयस्थ मंगळ.

तृतीयस्थानांतील मंगळ त्यांस उद्योगाची परमावधि करण्यास लावणारा आहे. पराक्रमस्थानांतील या मंगळामुळेंच त्यांस आपले पराक्रम विरोधीपक्ष कितीहि जोरदार असला तरी निश्चयानें पार पाडतां आले. तुला राशीचा धर्म समतोलपणा हा आहे. हा समतोलपणाच त्यांस आपली दृष्टि आपल्या तत्त्वाशीं निगडित अशी कायमची ठेवण्यास उपयोगी पडला. त्यांची दृष्टि व्यक्तीचें महत्व वाढविण्याची नव्हती. विशिष्ट मतास पुष्टि आणणारी नव्हती तर केवळ स्वदेश, स्वबांधव यांच्या कल्याणाकडे वळलेली होती. त्यांचें प्लेगचे वेळचें कार्य स्वबांधवांस उपयोगी पडण्यासाठींच होतें. कांग्रेसमधील कार्य स्वदेशाचें ब्रीद राखणारें व स्वदेशोन्नति करणारें होतें व स्वराज्याच्या मोहिमेंतील त्यांचें प्रत्येक व्याख्यानही या राष्ट्रीय दृष्टीस धरूनच झालेलें होतें. मंगळ हा पराक्रमस्थानीं असतां पूर्ण निर्भीडपणें कार्य करण्याची धमक अंगीं येते. विरोध, संकटें व विपरीत परिस्थिति यांस असला

मंगळ दाद देत नाहीं. उद्योगाची परमावधि करून आपलेंच मत प्रत्यक्ष प्रयोगानें ते सिद्ध करीतच. या त्यांच्या कृत्यामुळेंच त्यांस उद्योगांत यश व महत्व मिळत गेलें.

ज्योतिषी मंडळीस त्यांचा प्रत्यक्ष परिचय ज्योतिषसंमेलन प्रसंगीं पूर्णपणें आला. त्यांची राष्ट्रीय दृष्टि या पंचांगवावतीतही कायम होती. त्यांस कोणतें पंचांग सशास्त्र व योग्य, याचा विचार करावयाचा नव्हता; सायन " किंवा निरयण, ही बाब त्यांचे दृष्टिसमोर नव्हती हें त्यांच्या भाषणावरून स्पष्टपणें कळत होतें. त्यांचें म्हणणें कोणत्याही प्रसंगी असे असें कीं ज्योतिर्विद हो, आपण कांहींही करा, कोणतेही अयनांश धरा, शून्य धरा कीं ५० धरा पण सर्वत्र एक पंचांगच चालू करा. पंचांग सांगेल त्याप्रमाणें सामान्य लोक आपले आचार करतील. एकाच गांवांत तीन वेळां गणपति गौरी होणें हे अत्यंत अनिष्ट आहे. पंचांगाच्या अनवस्थेमुळें आपल्या सणांचा थट्टा होत आहे. हो अपति टाळा. " याप्रमाणें आपली राष्ट्रीय दृष्टीची मोहिनी पुणे संमेलन प्रसंगीं त्यांनीं टाकल्यामुळें कोणत्याही पक्षास स्वस्थपणें राहवें लागलें. " कांहीही करा पण महाराष्ट्रांत तरी एकच पंचांग चालेल असें करा " हें म्हणणें सांगली संमेलनप्रसंगीं त्यांनीं निराळ्या पद्धतीनें ज्योतिष्यांच्या गळीं उतरविलें. लोकनायक कितीही विरोध असला तरी आपलेंच म्हणणें निरनिराळ्या प्रसंगीं कशा चातुर्यानें सर्वांस मान्य करावयास लावतात हें फार मनन करण्याजोगें आहे.

सांगली संमेलन प्रसंगीं प्रथम ज्या वेळीं ज्योतिषी मंडळी लोकमान्यांवर घसरली त्या वेळीं त्यांनीं स्पष्ट सांगितलें कीं " पुण्यास जे २३ अयनांश मानले ते तात्पुरते सर्वांनीं ठरविलें म्हणून मानले. मी आपलें मत म्हणून पास करून घेतले नाहींत. रूढ असलेल्या पंचांगांतील गाळ बेदजेंतून मथलेच असे ठरविले व तेच बहुमतानें पास केले ! आतां जर आपणास ते नको

असतील तर पूर्ण विचार करून कोणते तरी अयनांश ठरवा व एक पंचांग सर्वत्र रूढ करा. अमुकच अयनांश धरा असा कांहीं कोणाचा आग्रह नाहीं. पंचांगांच्या भिन्नत्वामुळें कालाचा गोंधळ होतो व ज्यांची श्रध्दा धर्माचारावर थोडीबहुत असते तीही यामुळें नाहींशी होऊं लागते. तेव्हां पूर्ण विचारानें व एकमतानें निश्चित अयनांश ठरवून दृक् प्रत्ययाशीं जुळतें असें करा. "

या त्यांच्या सूत्र वाक्याप्रमाणेंच सांगलीसमेलनांतील चर्चा २।३ दिवस चालली. एकदा असा प्रसंग आला की सध्यांचे केतकीपंचांगाचे अयनांश एकमतानें निश्चित ठरतील असें सर्वांस वाटलें पण त्या वेळीं ठराव लिहितांच ज्यो. केतकरांनी हे अयनांश आतां बदलण्याचें कारण नाहीं ते कायमचेच धरावे अशा अर्थाची शब्दयोजना असावी असें सुचविलें. पण या त्यांच्या सुचविण्यानें ठरावच फुटला--त्या वेळीं लोकमान्यांनी स्पष्ट सांगितलें कीं " छे, छे, तसे नव्हे. आम्हांस हळू हळू पण सत्य व शुध्द पंचांगाकडे जावयाचें आहे, पुण्यास जे २३ धरले त्यांवरून आम्हीं आज इतके मागें येत आहोंत. लोकांस यापेक्षां शुध्द अशी पंचांगाची जरूरी वाटली की अशाच समेलनप्रसंगीं सर्व ज्योतिषीवर्गाच्या मतानें फिरूनही अयनांश बदलावे लागतील. असेच मागें मागें हटत शून्य अयनांशापर्यंत जाण्यासही जरूर पडल्यास आमची तयारी आहे. पण हळू हळू जनतेस मान्य होईल अशा बेतानें आपण पंचांगांत सुधारणा घडवून आणा. " या त्यांच्या म्हणण्यानें असा कांहीं हर्शली परिणाम एका ५ सेकंदांत घडला की अखेर निर्णय असा कसा झाला याचेंच सर्वांस आश्चर्य वाटलें ! रेवतीयोगतारा हाच आरंभस्थान आहे असें बहुमतानें ठरलेले असल्यामुळें मग तदनुरोधेंच अयनांश कां ठरवीत नाहीं ? असा प्रश्न बहुतेकांनी विचारिला व अध्यक्षांनी " आपण सर्व जर ठरवीत असाल तर तेही अयनांश मानण्यास आमची कांहीं हरकत नाहीं. आम्ही

आमचें मत सभेवर लादीत नाहीं. आपलें जें बहुमतानें ठरेल तेंच जाहीर करण्याचें कर्तव्यकर्म अध्यक्ष पदीं असलेल्या व्यक्तीचें आहे. असें अध्यक्षांचे म्हणणें पडलें व एका क्षणांत रैवतक पंचांगाचा ठराव पास झाला ! त्यांस कांहीं अटीही मागाहून घालण्यांत आल्या पण तो ठराव पास झाल्याबरोबर चित्रमय जगतनें या वर्षांतील रैवतक पक्षाचे महिने आपल्या पुस्तकांतून प्रतिमास देण्याचें ठरविलें व त्यामुळें सर्वांचे आतां नजरेस येऊन चुकले की अयनांश भेदानेंही सणांचा विपर्यास होत आहे. जरा अयनांश बदलल्यामुळें यंदा रैवतक पध्दतीचे गणपति सर्वांनी आचरत असलेल्या श्रावणांत आलेले आहेत. पितृपक्ष श्रावण कृष्णांत आला. सर्वजण ज्या वेळीं पितृपक्ष करतील त्या वेळीं हे रैवतकवादी अधिकमास आचरत राहतील ! असो. " अयनांश कोणतेही माना पण एक पंचांग ठरवा " हें म्हणणें या लोकमान्यांच्या व्यापक राष्ट्रीय दृष्टीचेंच आहे.

कर्कांतील शनि व बुध.

लोकमान्यांचे कुण्डलींतील शनिबुधांचे व्ययस्थानांतील वास्तव्य त्यांस फार अडचणी व संकटें आणण्यास कारण झालें. चंद्राच्या चतुर्थांत हे ग्रह असल्यामुळें जनतेचा कैवार घेणें त्यांच्या प्रतिपक्षास रुचलें नाहीं. त्यांनीं यांचे मार्गांत अनेक गुप्त व उघड अडथळे करण्यास कमी केलें नाहीं. " जनपदहितकर्ता त्यज्यते पार्थिवेन " ही कल्युक्ति कशी सिध्दांतमय आहे हें लोकमान्यांच्या चरित्रावरून स्पष्टपणें कळून येतें. मनुष्य कितीही विद्वान् असो जनतेच्या हितासाठीं तो एक मतानें झटतो हे पाहिल्याबरोबर त्याचे मार्गांत वाटेल ते योग्य अयोग्य अडथळे आणण्यास अधिकारी वर्ग कमी करीत नाहीं. बुधशनींचीही स्थिति त्यांस लेखन व वक्तृत्व यांमुळेंच कारागाराचे प्रसंग सोसावे लागले असें दर्शवीत आहे. चंद्रगुरूच्या

चतुर्थात हे ग्रह असल्यामुळें बाह्य कर्माचरणाचें त्यांस महत्व वाटत नसे. यामुळें त्यांचें धार्मिक बाह्य आचरण मात्र स्पष्टपणें इतरांस आढळलें नाहीं. ज्ञानमार्गानें त्यांस सामर्थ्य चढलें.

नेपच्यून हा ग्रह दूरदर्शित्व देणारा आहे. हें सामर्थ्य या नेपच्यूनच्या

अष्टमस्थ नेपच्यून.

मीन राशींतील वास्तव्यामुळें मिळालेलें आहे. अष्टमस्थान हें गुह्यस्थान आहे. जें ज्ञान निगूढावस्थेंत आहे त्याचें उद्घाटन करणें हें अष्टमांतील नेपच्यूनचें फल आहे. लोकमान्यांनीं जरी केवळ ज्योतिषशास्त्राचा किंवा अशाच एखाद्या गूढशास्त्राचा व्यासग केला असता तरीही ते लोकप्रसिध्द झाले असते. मुत्सद्दी माणसांस या दूरदर्शित्वाची अत्यंत जरूरी असते. हा नेपच्यून बुधाच्या त्रिकोणयोगांत असल्यामुळें जास्तच महत्वाचा असा झाला आहे. हा बुधनेपच्यूनचा त्रिकोणयोग अष्टम व व्यय या स्थानांतून झाल्यामुळें यांचे रहस्यमय व लोकोत्तर ग्रंथ त्यांस कारागृहांत लिहावे लागले. ओरायनचाही इतिहास जवळ जवळ असाच आहे. त्यांच्यावर संकटें आल्यामुळेंच लोकांस राष्ट्रीय शिक्षणाच्या अभ्यासास साधनीभूत असें स्वराज्य वाङ्मय मिळालें.

गीतारहस्य व ओरायन या जोडीचा उपयोग आधुनिक विद्वानांच्या शोधकबुध्दीस गति देण्यास चांगला होईल. अडचणींच्या स्थानांतून होणारे त्रिकोणयोग मनुष्यास अडचणींतूनच जाण्यास लावतात खरे पण त्यांचे शुभ परिणामही तशा अडचणींच्या प्रसंगींही अनुभवास येतात हें तत्व या बुधनेपच्युनच्या त्रिकोणयोगानें सोदाहरण स्पष्ट केलें आहे. सन १९०८ सालीं त्यांस राजद्रोहाचे आरोपावरून ज्या वेळीं ६ वर्षांची शिक्षा झाली त्या वेळीं त्यांचे मुखांतून जी दूरदर्शित्वाची उक्ति निघाली ती या नेपच्यूनमुळेंच होय.

त्यावेळीं नेपच्युन व्ययस्थानींच होता. ती उक्ति त्यांची स्वार्थत्याग बुध्दी व राष्ट्रीय उन्नतीची कळकळ दाखविणारी अशी सर्वांनीं ब्रीदवाक्य म्हणून अंतःकरणांत सांठवून ठेवावी.

कुण्डलीविज्ञान मध्यें (पु. १० अं. ३) थोरपणास कोणते ग्रहयोग

दशमस्थ हर्शल.

विशेष कारण होतात याचें वर्णन करीत असतां दशमस्थ हर्शलचें वर्णन कुण्डलीविज्ञानकरांनीं पुढील प्रमाणें केलेलें आहे. " हर्शल हा ग्रह सर्व ग्रहांपेक्षां आकार मानानें कमी आहे तरी योग्यतेनें विलक्षण आहे. हा ग्रह घनभागांत जरूर पाहिजे. निरनिराळ्या स्थानांत तो निरनिराळें पण आश्चर्ययुक्त धर्म उत्पन्न करितो. दशम हें राज्यभुवन आहे म्हणून या स्थानांत तो असेल तर मनुष्य कोणत्याही स्थितींत जन्मास येवो तो मोठा कारस्थानी पुरुष झाल्याशिवाय राहणार नाहीं.

दशमांतील हर्शलानें त्यांस प्रथम जितकें राजमान्यत्व दिलें तितकेंच तो स्वगृहसमुख झाल्यावर लोकमान्यत्व दिलें. सामान्यतः हर्शलचे अर्धभ्रमणानंतर परिस्थिति पार बदलून जाते. हा नियम यांचे चरित्रांत स्पष्टपणें पहावयास सांपडतो. त्यांनीं प्रथम शिक्षणसंस्था होतीं घेतली. लॉ क्लास चालू केला शिक्षणासारखें कार्य त्यांनीं पुढें सोडलें पण सर्वांस राजकीय शिक्षणाचे धडे देण्याचें कार्य त्यांनीं चालू केलें कौन्सिलची खुर्ची त्यांची अजो सुटली, पण त्यांस लोकांचे मान्यत्वाची खुर्ची कायमची मिळाली ! या हर्शलनें जरी क्रांति घडविली तरी नवमांतील गुरुचंद्रांचा भाग्यस्थानांतील बलिष्ठ स्थिति त्यांचें भाग्य वृध्दिगत करण्यास उपयोगी पडली.

याप्रमाणें लोकमान्यांच्या कुण्डलींतील जन्मकालीन ग्रह त्यांचें चरित्र यथार्थतेनें दर्शवीत आहेत.

कुण्डलीविज्ञान पु. १० अं. ३ मध्यें थोरपणाचें वर्णन करीत असतां विज्ञानकार लिहितात "मेषादिषट्कांत सर्व मोठाले गोल असून ते धनभागाकडे असतील अशा वेळीं जन्मणारे पुरुष हिंदुस्थानांत मोठ्या योग्यतेला चढतील" हें त्यांचें म्हणणें लोकमान्यांच्या कुण्डलींतील धनभागाकडे पाहिल्यास पूर्णपणें पटेल. नवमापासून द्वितीयापर्यंत जो कुण्डलीचा भाग त्यास अशी संज्ञा आहे. या भागांत गुरु, शनि हर्शल हे तीन मोठे गोल, बुध शुक्र व ग्रहाधिप सूर्यही आहे. अशा अलौकिक ग्रहबलानें युक्त असलेले पुरुष परमेश्वरानें हिंदभूमीचे बांटण्यास देऊन या हिंदभूस पूर्वीचें वैभवसंपन्न दिवस आणावे अशी त्या जगन्नायकाजवळ आमची प्रार्थना आहे.

ही शोचनीयस्थिती बरी नव्हे.

(लेखक.—पांडुरंग रामचंद्र महाजन, मुक्काम हर्णै.)

लोकमान्य टिळक यांच्या कुंडलींतील हांचीं फळें वर्तविणेचें काम आजपर्यंत पुष्कळ प्रसिद्ध अप्रसिद्ध अशा ज्योतिष्यांनीं मासिक पुस्तकांत वर्तमानपत्रांत व खासगी रीतीने केलें आहे. परंतु लोकमान्य चौसष्टावें वर्ष पुरें होतांच दोषिक तापाने एकाएकीं मरतील असें एकानेही वर्तविलें नव्हतें किंबहुना लोकमान्य अत्यवस्थ आजारी असतां त्यांचें आयुष्य संपलें असें त्या वेळीं कोणीं सुचविलें नाहीं किंवा प्रसिद्ध केलें नाहीं. लोकमान्य टिळकांना आपण या वर्षी मरणार असें खात्रीलायक माहीत असतें तर त्यांनीं 'केसरी' 'मराठा' प्रमाणें इतर सर्व संस्थांचीही व्यवस्था लाविली असती. पूर्वीचे ज्योतिषी मरणकाल बरोबर वर्तवीत असत त्यावेळीं सूक्ष्मगणिताची मदतही त्यांना नव्हती. हल्लीं तो मदत आम्हाला मिळत असूनही आयुष्य बरोबर वर्तवितां येत नाहीं. ज्योतिषी वर्गाची ही शोचनीय स्थिती पाहून

लोकमान्य टिळकांच्या आत्म्याला फार वाईट वाटत असेल. ज्योतिष्यासंगीं लोकांचे मनांत लोकमान्यांचें जिवंत स्मारक करावयाचें असेल तर एक संमेलन भरवून रोगोत्पत्ती रोगविनाश व आयुष्य या एकाच बाबतींत शोध लावण्याकरतां संघटित प्रयत्न करावा याकरतां एक मुख्य कमिटी मुंबईस किंवा इतर कोणत्याही ठिकाणीं नेमून इतर ज्योतिष व्यासंगी लोकांनीं तिला मदत करावी. अशा निरपेक्ष संघटित प्रयत्नाला लोकमान्यांच्या आत्म्याच्या आशीर्वादानें व परमेश्वरकृपेनें खात्रीनें यश येईल. तरी विचार करण्यांत वेळ न घालवितां प्रयत्न करण्यास सुरवात करा. आतां लोकमान्यांच्या कुंडलींतील ग्रहांवरून सुचलेली थोडीशी माहिती देतों. लोकमान्यांचे कुंडलींत भाग्येश गुरु स्वगृही होता व लग्नेश चंद्र व गुरु यांची युति असलेमुळेंच त्यांना असामान्य असें लोकमान्यत्व मिळालें. या नवम स्थानांतील स्वगृहींच्या गुरूमुळेंच ते विद्याव्यासंगी झाले. लग्न पंचम नवम स्थानांत गुरू असलेला मनुष्य नीतिमान शुद्ध वर्तनाचा व विद्याव्यासंगी होतो असा नियम आहे. या नवम स्थानच्या बलवान गुरूमुळेंच लोकमान्यांचें अंतर्बाह्य शुद्ध वर्तन होतें व या गुणांची त्यांच्या शत्रूंनीही तारीफ केली आहे १।५।९ या स्थानांत गुरु असतां कोणत्याही अपघातांत किंवा मरण समयीं पूर्ण बेशुद्धी येत नाहीं. या नियमा प्रमाणे वायूचा जोर असतांही लोकमान्यांची शुद्धी नष्ट झाली नव्हती. लोकमान्यांची कुंडली गुरुप्रधान होती. गुरूवरच त्यांचे आयुष्याचा मदार होती. गुरूच्या बलाप्रमाणें १६।३२।४८।६४।८० अशा आयुष्याची मर्यादा ठरते या नियमाप्रमाणेंच लोकमान्यांचें ६४ वर्षे आयुष्य हें बरोबर ठरलें. आतां मरण समयीं लग्नेश अस्तंगत वक्री असतो किंवा अष्टमेशाशी युति करीत असतो असा नियम आहे. चंद्र जेव्हां लग्नेश असतो (कर्क लग्न असतें) तेव्हां चंद्र ज्या राशींत असतो त्या राशीचा

स्वामी हाच लग्नेश ठरतो. लोकमान्यांचें कर्क लग्न असले मुळें व चंद्रमनींत असलेमुळें गुरूच लग्नेश ठरतो व तो मरण समयीं प्रत्यक्ष अस्तंगत नसला तरी वार्धक्यावस्थेंत होता. 'चित्रमय जगत्' मध्यें प्रसिध्द झालेले पटवर्धनी पंचांगांत शनिवार ता. ७ आगष्ट रोजीं गुरूचा अस्त होतो. लोकमान्य, ता. आगष्ट शनिवार या दिवशीं वारले. अस्तापूर्वी ७ दिवस गुरु वार्धक्यावस्थेंत असतो हा नियम ज्योतिषव्यासंगी लोकांना माहीत आहेच. आतां लोकमान्यांना मरण समयीं साडेसातो नव्हतो. चंद्र व त्याचे राशीचा स्वामी एकत्र असतां मरण समयीं साडेसातो निश्चित असतेच असें ठरत नाहीं. तरीपण अष्टमेश शनि हा सिंहराशींत असून त्याच राशींत मरणकाली गुरु प्रवेश करीत होता. मगळ जन्मसमयीं लग्नेश चंद्रापासून आठवा होता. व मरणकालींही आठवा होता. मरणकाली कशी ग्रहस्थिती असते या बद्दलचा माहितो मी पूर्वीच पाठविला आहे ती ज्योतिर्माला संपादकांचे सवडीप्रमाणे प्रसिध्द होईलच. आतां लोकमान्यांना आकस्मिक मरण कां आलें त्याचें कारण लग्नाचा मालक गुरु ता. २७ जुलै रोजीं सकाळी वक्री होतो. लोकमान्यांचा जन्म ता. २३ जुलै रोजीं झाला यामुळें गुरु वक्री सारखेंच फळ देतो. लग्नेश वक्री असतां मरण आकस्मिकच येतें असा अनुभव आहे. त्याप्रमाणेंच मरण फार जलदी. आलें. मरण समयीं गुरूचे जवळ शनी व समोर हर्शल असलेमुळें वात विकाराचें प्राबल्य होतें. लग्नांत रवी व आठवा मंगळ यामुळें ज्वर पीडा झाली. ही सर्व माहिती निरयण पध्दतीप्रमाणें दिलेली आहे गुरु वक्रीची तारीख ही जुन्या पंचांगाप्रमाणेंच दिली आहे. छातींत कळ येण्याचें कारण जन्मलग्नांत व्ययस्थानीं शनि बुध होते व ते मिथुन या छातीचे भागावर होते हेंच असावें.

———o———

॥ श्रीसद्गुरवे नमः ॥

ज्योतिर्माला

आप्राचः कामरूपाददुहिणसुतनदप्लावितादाप्रतीचो
गान्धारात् सिंधुसार्द्राद्रिघुवररचितादाचसेतोरवाचः ।
आकेदारादुदीचस्तुहिनगहनतः सन्तिविद्वत्समाजा
ये ये तानेष यत्नः सुखयतु समजान्कश्चमत्कर्तुमीष्टे ॥ १ ॥

अभिनवाऽऽवृत्ति वर्ष ७ वें अंक १ ले ३.

ईशप्रार्थना,

ले०-रामचंद्र राजाराम मोकाशी, ठाणे

पद-(चाल-आनंदी आनंद गडे)

फेर धरुनियां विश्वाला ।
बागडते "ज्योतिर्माला" ।
खेळ असा चालो चालो ।
अखंड फेरे ही चालो ।
आनंदाची करि वृष्टि ।
तुष्टे तें माता-सृष्टि ।
मीही पाहुनि हें धालों । हर्षाच्या पूरीं न्हालों ॥
रविशशि भूषण ही ल्याली । टिकल्या सुंदर उडु-आली ।
नेसुनि काळी चंद्रकळा । स्वरूप दावी सर्वांला ॥
चराचराला सुखरूप । ठेवाया तूझें रूप ।
मूर्तचि अंबे हें प्रगटे । दिव्य गमे स्वर्गावाटे ॥
विनवितसें मी तुज भावें । नववत्सर सुखकर व्हावें ।

(वृत्त–कामदा)

परमपावने ! माय अंबिके । तारिसी कृपें विश्व हें निकें ।
करुनि साह्य तूं गे चराचरां । स्वर्ग हो तईं ही वसुंधरा ॥
विसरतां तुला असुख वाटतें । स्मरुनियां तुला सौख्य वाटतें ।
निपजलें मनीं जोडिलें करा । अभय दे मला दीन लेंकरा ।
फिरुनि फिरुनि हें मागणें तुला । तूंच एकली भक्तवत्सला ।
वर्ष लागतें जें अतां नवें ॥ पूर्ण होउं तें सौख्य वैभवें ॥

(पद चाल–झाली ज्याची)

वंदन भावें श्री जगदंबे माय भवानी तूं विश्वाला ॥ धृ० ॥
अगाधमहिमा देवि तुझा गे मंगलमय करि नव अयनांला ॥
रात्र सरूं दे हे अवनतिची मेघ दुरित ने ने विलयाला ॥
उघम रवि, शशि दे आशेचा । कुलदीपक दे दे ताऱ्यांला ॥
शांति सुखाची निर्मलगंगा चमकत राहो " ज्योतिर्माला " ॥

(पद–चाल–मजग मतग गनि)

शशि निशेस शोभवी निशाच शोभती शशी ॥
शशि निशाद्वयामुळेंच गगन–भा दिसे कशी !
जल विराजवीच कमल, कमल राजवी जला
जल तयास कमल मिळुनि सरहि केंवि शोभला ।
कार्यभाग साधण्यास साह्य यापरी हवें
विनवि वर्ष मालिकेस लागलें अतां नवें ॥

———:o:———

॥ श्री गुरुगणेश ॥

सन १९२३ साल राष्ट्रीय दृष्ट्या

व

व्यापारी दृष्टीनें कसें जाणार ?

ज्योतिर्मालेच्या सहाव्या वर्षाचा शेवटला अंक प्रसिध्द केल्यानंतर सातव्या वर्षाच्या नवीन अंकाला सुरवात करण्याच्या विचारामध्यें असतां पुढें येणाऱ्या भावी अनिष्ट काळाची जाणीव असल्यामुळें अंक काढावा किंवा काढूं नये असल्या तऱ्हेचे अनेक विचार पुढें येऊ लागले, व त्यामुळें तूर्त कोणत्याच प्रकारची विशेष जबाबदारी न घेतां सन १९२३ च्या जानेवारीपर्यंत वाट पाहण्याचें ठरविलें. व म्हणूनच नूतन अंक प्रसिध्द करून वाचकांच्या पुढील जबाबदारीचा बोजा हा कालपर्यंत आम्हीं आमचे अंगावर घेतला नाहीं.

गेल्या दोनतीन वर्षांमध्यें शरीरप्रकृतीच्या व दुसऱ्या अनेक अडचणींमुळें मालेचें काम आम्हांस नियमितपणानें चालवितां येईनासें झालें व शेवटी तारीख २९ जुलाई १९२२ रोजी सर्वच ग्रंथ आटोपण्याचा समय आला होता, परंतु आमच्या अनेक हितचिंतकांच्या शुभेच्छेनें व त्यांच्याच प्रयत्नानें प्रस्तुत वर्षाचा नवीन अंक लिहिण्याची सुसंधी मिळाली आहे. अनेक परिस्थितींना तोंड देऊन व अनेक प्रकारचे कष्ट सोसून कशी तरी अल्पस्वल्प ज्योतिषशास्त्ररूपी देवतेची सेवा एकनिष्ठपणानें गेल्या सहा वर्षांमध्यें केली आहे. व ती आमची शास्त्रसेवा कोणत्या तऱ्हेची झालेली आहे यासंबंधानें आम्ही स्वमुखानें कांहींच लिहूं इच्छीत नाहीं. एकंदर परिस्थितीचा विचार करितां पूर्वीप्रमाणें आतां स्वतःच्या उदरनिर्वाहाकरितां नोकरी करून नंतर फावल्या वेळामध्यें काम करून मालेच्या

वाढत्या जबाबदारीचा बोजा संभाळणें शक्य दिसत नाहीं. हल्लींच्या काळामध्यें आमच्यापैकीं कोणीतरी स्वतंत्रपणानें मालेच्या कार्यास वाहून घेतल्याखेरीज शास्त्रसंशोधनाचें व फलज्योतिष विनिमयाचें काम सुरळीत चालेल असें दिसत नाहीं. व ही परिस्थिति लक्षांत घेऊनच आम्हीं ज्योतिषशास्त्रसेवा करण्याचेंच काम तूर्ततरी एकवर्षपर्यंत अनुभवादाखल करून पाहणार आहोंत. ज्योतिषशास्त्रविषयक धंदा व शास्त्रविचार व विनिमय ह्या दोन्ही गोष्टी फारच भिन्न आहेत. हल्लीं ज्याला श्रीगणेशायनमःचा धडा कळत नाहीं असले अनेक लोक धंद्यामध्यें लागेल त्या हिंग, जिरें, मिरच्या, कागद, लसूण इत्यादि जिनसांची तेजीमंदी, रेसीसचे घोडे वगैर नाना प्रकारचें ढोंग करून चैनीमध्यें लोकांच्या निढळाच्या घामाच्या पैशाचा व्यय करीत आहेत. त्यांच्या हातून शास्त्रसेवा जन्मांत देखील होणार नाहीं. व ती करण्याचीही त्यांची इच्छाही नाहीं. उलट टवाळी करण्याकडेच असल्या लोकांचा जास्त प्रवृत्ती दिसून येत आहे. याचे उलट अनेक ग्रंथ पोपटा सारखे पाठ येत असून तुम्ही सायनच कां घेतां किंवा अष्टोत्तरी विंशोत्तरी दशा कां मानीत नाहीं. यावनी दिनवर्ष पध्दती व्यापरणें इष्ट नाहीं वगैरे म्हणणाऱ्या दाढीदाक्षितांच्या हातून ज्योतिषशास्त्राला चांगलें चालन मिळेल असें दिसत नाहीं. जेथें स्वार्थ आहे तेथें कांहीं तरी भानगड दृष्टीस पडणारच मग अनुभवजन्य माहितीचें ग्रंथप्रकाशन किंवा इतर शास्त्रीय वादविवाद इत्यादि गोष्टी कशा पहावयास मिळणार? साधारणपणें अलिकडे ज्योतिषशास्त्र विषयक धंदा व प्रामाणिकपणा यांचा छत्तीसाचा आंकडा पहावयास मिळत आहे. व त्या संबंधानें जितकें बारीक खोल पाहावें तितकी फारच निराशाजनक परिस्थिति दिसत आहे. हल्लींच्या कामामध्यें नुसत्या मासिकावरच एखाद्यास अवलंबून राहतां येईल अशी परिस्थिति नाहीं व त्याचमुळें

कोणालाही याच कार्याला स्वतंत्रपणें वाहून घेतां येत नाहीं. असल्या गोष्टींना व शास्त्रसंशोधनाच्या कामाला राजाश्रय किंवा भरपूर लोकाश्रय असावयास पाहिजे व येथें तर याची मुळांतच फारकत दिसत आहे. खऱ्या विद्वानाला किंवा विद्वत्तेला मान्यता नसून जातिमत्सराचा सवता सुभा नांदत असून लोंचट व पोटभरू ढोंगी यांचीच आजकालच्या जगांत टिमकी वाजत आहे. ज्याप्रमाणें जगदंबा बुध्दि देईल त्या मानानें याहो पुढें निस्वार्थ बुध्दीनें शास्त्रसेवा करण्याचा आमचा मानस आहे. जशी आतांपर्यंत ६ वर्षें सुखानें निघून गेलीं त्याचप्रमाणें आणखी कांहीं वर्षें खास निघतील व अखेरीला उत्तम प्रभातीचा काळ येऊन चांगले शास्त्रसेवक निर्माण होऊन ज्योतिष शास्त्ररूपी वृक्ष चांगला जोमानें वाढेल अशी खात्री आहे.

हल्लीं महाराष्ट्र भाषेमध्यें ज्योतिष विषयक विनिमय करणारीं सहा मासिकें निघत असून गुजराथीमध्येंही एक मासिक निघूं लागलें आहे ही फार आनंदाची गोष्ट आहे. प्रत्येक मासिक आपापल्या ध्येयाप्रमाणें ज्योतिष शास्त्राच्या निरनिराळ्या स्कंधाचा विचार करीत आहे. ज्योतिर्मालेमध्यें आतांपर्यंत **जातक** व **भैदिनीय** अथवा **राष्ट्रीय ज्योतिष** याच दोन स्कंधांचा थोडयाबहुत प्रमाणानें प्रामुख्यानें ऊहापोह करण्यांत आला असून अद्यापि इतर स्कंधांकडे वळण्यास देखील सांपडलें नाहीं. परंतु आतां यापुढें आम्हांस इतर स्कंधांकडे वळण्यास सवड मिळेल असें सुचिन्ह दिसूं लागलें आहे. **राष्ट्रीय ज्योतिष** विभागाचा तर आतां स्वतंत्रपणानें ऊहापोह करणारें मासिकच निघूं--लागलें आहे. व **व्यापार ज्योतिष** किंवा तेजीमंदीप्रकार यांचा साग्र व सविस्तर विचार पुण्याचें ज्योतिर्भूषण अथवा व्यापार ज्योतिष करीत आहे. इतर मासिकें जरी तेजीमंदी प्रसिध्द करीत असलें तरी त्यांचा बाणा व्यापार ज्योतिष विषयकच

ज्ञान प्रसिध्द करण्याचें आहे असें म्हणतां येत नाहीं. आजपर्यंत जसें आम्हांस आमच्या वर्गणीदारांनीं उत्तेजन देऊन साह्य केलें त्याचप्रमाणें ते पुढेंही साह्य करतील अशी आशा आहे. असो पूर्व सांप्रदायाप्रमाणें मालेच्या चालू वर्षामध्यें सन १९२३ साला संबंधी विचार करण्याकडे वळून हा प्रास्ताविक भाग येथेंच आटोपता घेणें बरें.

क्यालडी संवत्सर चक्राप्रमाणें पाहतां चालू सन १९२३ साल **मंगळा**मध्यें **मंगळाचें** आहे. म्हणजे या वर्षी **चक्राधिपति** व **अब्दाधिपति** मंगळच आहे. व याचप्रमाणें **मंगळाचें** साल सन १९०९ व सन १९१६ मध्यें आलेलें होतें. आमच्या व्यापार ज्योतिपकार बंधूंनी आपल्या वर्ष ५ वें अंक ८-९ मध्यें संवत्सर चक्रा संबंधी दिलेली माहिती कोठून प्रसिध्द केलेली आहे तें कांहीं कळत नाहीं. **क्यालडी संवत्सर** गणना कशी आहे या संबंधाचा याच अंकांत प्रसिध्द होत असलेला लेख पाहावा. सन १९०९ मध्यें प्रथम मंगळाचे चक्रास सुरवात झाली व त्याच वर्षीं कोणकोणते अनिष्ट प्रकार झाले याचा आठवण अद्यापि सर्वत्रांचे आठवणी मधून गेली असेल असें दिसत नाहीं. सन १९१६ सालामध्यें महायुध्द फारच रंगांत होतें.

चालू वर्षामधील मेष संक्रमणकाळचें कुंडलीमध्यें मंगळाची स्थिति फारच विचार करण्यासारखी आहे. **मंगळ** ग्रह लढाया, रक्तपात, खून, मारामाऱ्या, अत्याचार, अग्निप्रलय इत्यदि गोष्टींचा कारक मानलेला आहे. वर्षप्रवेशकाळीं वृश्चिक राशीसारखी खुनशी व द्वाड राशि लग्नीं उदय पावत असून सप्तमस्थानामध्यें चंद्रमंगळांची युति वसत असून ती माध्यान्हीं असलेल्या नेपुचन बरोबर केन्द्रयोग करीत आहे. भारतवासीय जनांच्या कपाळीं आणखी अनिष्ट काय आहे तें कळत नाहीं !! एकंदरींत यंदांची

परिस्थिति जनसमाजास खात्रीनें काळजी कारण्या सारखी दिसत आहे. मिलिटरी सत्तेचा जोर, मार्शल लॉचें प्राबल्य व अधिकारी वर्गाकडून अनेक प्रकारची अनिष्ट परिस्थिति खात्रीनें उत्पन्न होईल असें दिसतें. हिंदीजनतेस दिलेली आश्वासनें, तसेंच आर्यलंडला दिलेलें स्वातंत्र्य या दोन्ही गोष्टींकडे यंदां सर्व जगाचें चांगलेच लक्ष वेधण्याचा रंग दिसत आहे. सांपत्तिक स्थितीचा बुडबुडा लवकरच फुटतो किंवा काय अशी चिंताजनक परिस्थिति खात्रीनें उत्पन्न झाली पाहिजे. नाण्याची तीव्र टंचाई, परदेशीय हुंडावळीचें भयंकर फेरफारामुळें हिंदुस्थानच्या व्यापारी वर्गाची फारच केविलवाणी स्थिति होईल असा रंग दिसत आहे. सांपत्तिक सुस्थितीसंबंधानें मुळींच शाश्वती देववत नाहीं. त्यामध्यें सन १९२३ सालामध्यें स्पेक्युलेशनला--सटयांना ऊत येऊन राजकीय वातावरणामध्यें चांगलाच सांवळा गोंधळ माजणार असल्या कारणानें आमच्या व्यापारी बंधुवर्गांनीं किती सावधपणें वागलें पाहिजे या संबंधानें जेवढें लिहावें तेवढें थोडेंच होणार आहे. चैनबाजी, स्वैरवर्तन, व व्यसनाधीनता याकडेच जनता झुकेल. स्वेच्छाचार, व्यभिचारीपणा या संबंधानें अनेक किळस आणणारे प्रकार उघडकीस येतील असें वाटतें. देशांतील मजूरवर्गाची चांगली सुधारणा होऊन लेबर युनियन सारख्या संस्था चांगल्या भरभराटीला येतील. व त्यामुळें देशांतील उद्योग धंदे मिल इन्डस्ट्रीज वगैर चांगल्या रीतीनें चालतील. देशांतील कोस्टींग स्टीमरचा व्यवहार किंवा इतर देशाला ने आण करणारा जहाजानें चालणारा व्यवहार बरा चालेल व त्यामुळें असल्या कंपन्या जरा भरभराटीमध्यें येतील. चालू वर्षामध्यें लॅन्ड अक्विझिशन ॲक्ट व लँड रेव्हयुनो संबंधानें कांहीं सुधारणा व्हावी असें वाटतें. परंतु नाण्याच्या टंचाईमुळें जमिनी व इमारती यांना कोणी देखील विचारणार नाहीं. चालू वर्षामध्यें भाड्याची

चणचण बरीच कमी होईल असें दिसतें. निदान बाँबे डेव्हलपमेन्ट डिपार्टमेन्ट चालू १९२३ सालामध्यें चांगलीच प्रगति करील आसा रंग दिसत आहे. व याच कामाकरितां आणखी कर्ज उभारण्याचा प्रयत्न होईल. मार्च मध्यें येणाऱ्या ईम्पीरीअल बजेट मध्यें मिलिटरी व नेव्हल सैन्यांचे भरती वगैरेकडे भयंकर खर्च करण्याची तरतूंद होईल. एकंदर सरकार महसूल फारच कमी भासेल व बरीच मोठी तूट खात्रीनें येईल व त्यामुळें सार्वत्रिक उपयोगांत येणाऱ्या अशा बहुतेक सर्व वस्तूवर कराचा बोजा वाढेल. काटकसर व खर्चाची सुधारणा यांसंबंधानें पोकळ आश्वासना पलीकडे कांहीं होईल असें दिसत नाहीं. व त्याचमुळें सरकारी नोटांचे भाव पडतील. सरकार, सरकारी ऑफीसर यांसंबंधानें लोकांमध्यें बऱ्याच नाठाळ कंड्या पिकतील व त्यांतल्या त्यांत आणीबाणीच्या प्रसंगीं कसें वागावें यासंबंधानें सरकारपक्षाकडून फारच विचित्र व फसवणूकीचें वर्तन घडेल व त्यामुळें लोकांत सरकारपक्षाबद्दल अनादर होऊन अत्याचार जास्त प्रमाणामध्यें वाढतील व सुधारणावादीपक्ष फारच प्रबल होईल. चालू वर्षामध्यें धार्मिक संस्था, इस्पीतळें वगैरे मध्यें फारच क्रांतिकारक सुधारण घडून येतील. यंदाच्या सालामध्यें आजपर्यंत ऐकण्यांत आलेलें नाहींत असल्या तऱ्हेचे फसवेगीरीचे गुन्हे, अंगावर शहारे आणण्यासारखे अत्याचार होऊन गुन्हयांची संख्या विशेष वाढलेली पाहण्यास मिळेळ. यंदा स्त्रियांच्या अब्रू इज्जती प्रवासांत घेतल्याचे, त्यांना लुटल्याचे पुष्कळच निरनिराळे प्रकार पाहण्यास मिळतील. सन १९२३ सालामध्यें जणूं काय नूतन मनूचाच उदय होत आहे, कोणत्याही प्रकारचे तहनामे, कॉन्ट्राक्टस धाब्यावर बसविण्याचा प्रयत्न होऊन जो तो स्वतंत्रतेचा पुकार करूं लागेल. सर्व प्रकारच्या बंधनास झुगारून देऊन स्वेच्छाचारी वर्तन करण्याकडे सर्वत्रांची प्रवृत्ती होईल.

यंदाच्या वर्षामध्यें शिक्षण संस्था विश्वविद्यालयें, मासएज्युकेशन या संबंधानें कडाक्याच वादविवाद होऊन त्यांत फारच महत्वाच्या सुधारणा घडतील. गुन्हेगारांना नुसत्या शिक्षाच देण्यापेक्षां त्यांना कसें सुधारतां येईल या संबंधानें कांहीं तरी उपाय योजण्यांत येतील. रोगांचा उपद्रव म्हणजे तो बरा करण्यापेक्षां रोगच न येईल अशा तऱ्हेच्या उपायाकडे सॅनिटरी बोर्डाचेंलक्ष वेधलें जाईल व ड्रेनेज सिस्टीम संबंधानें कांहीं तरी नवीनच पध्दतीवर सुधारणा करण्याकडे सरकारचें किंवा म्युनिसिपालटयांचें लक्ष वेधेल. पूर्वी ज्या ठिकाणीं गरिबांस जातां येणें शक्य नव्हतें तेथें जाण्याचा त्यांना नवीन मार्ग खुला होऊं पाहत आहे. समानता व समान हक्क पूर्णपणे अस्तित्वांत येणें जरी कठीण दिसतें तरी पूर्वापेक्षां आतां निराळेंच वळण जगाच्या निदर्शनांत यावयाचें आहे. यंदाच्या सालासारखें स्थिर राशीमधून ग्रहांचे केन्द्र प्रतियोग वर्ष प्रवेशकाळच्या कुंडलींत होत असलेले वर्ष प्रवेशकाळच्या कुंडलींत फारच क्वचित पाहण्यास मिळतात म्हणून सन १९२३ साल भारत भूमीच्या इतिहासांत फारच महत्वाचें जाणार आहे असें वाटतें. व त्याच मुळें भूकंप, उत्पात, खून, मारामाऱ्या, दंगल, अग्निप्रलय यांची चालू वर्षामध्यें रेलचल होण्याचाच संभव शेंकडा ९० टक्के दिसत आहे.

सन १९२३ सालामध्यें **नेपच्यून** किंवा **वरुण** हा ग्रह सिंह राशीमध्येंच आहे म्हणजे तो पूर्वा फाल्गुनी नक्षत्रामध्येंच वर्ष अखेर पर्यंत राहणार आहे. आचार्य वराहमिहिर यानें पूर्वा नक्षत्राखालीं खालील गोष्टी दर्शविल्या आहेत.

प्राक्फाल्गुनीषु नटयुवति सुभग गांधर्व शिल्पि पण्यानि ।
कर्पास लवण माक्षिक तैलानि कुमारकाश्चापि ॥

नर, तरुणस्त्रिया, चांगले लोक, किंवा सर्वांना प्रिय असलेले लोक, कारागीर, चित्र काढणारे, खोदकाम करणारे, इन्जीनीअर्स, कापूस, लवण, मधु, किंवा

खनिज पदार्थामध्ये सुवर्ण माक्षिक किंवा सोनें, तेल, लहान बालकें हीं पूर्वा-नक्षत्राने दर्शविलीं जातात. साधारणपणें **नेपच्यून** किंवा **वरुण** हा ग्रह ज्या राशीमधून भ्रमण करीत असतो तद्योतक धंदे, देश, रोजगार यांमध्यें घोटाळा उडवून देतो. यंदांचें वर्ष कुंडलीमध्यें पूर्वानक्षत्री नेपच्यून असून तो गुरु मंगळाबरोबर केन्द्रयोग करीत असल्या कारणानें वर दर्शविलेल्या गोष्टीमध्यें बऱ्याच घडामोडी होण्याचा संभव दिसत आहे. कापूस, लवण, मधु, सोनें यांचे व्यापारामध्यें यंदांच्या सालामध्यें फारच क्रांतिकर घडामोडी झाल्या पाहिजेत. क्रांतिवृत्तामधील या नक्षत्रानें दर्शित होणाऱ्या गोष्टी यंदांच्या वर्षामध्ये प्रामुख्यानें पुढें आल्या पाहिजेत. सन १९२२ साली वर्षप्रवेशकाळी **नेपच्यून** असाच पूर्वाफाल्गुनी नक्षत्रामध्यें होता परंतु तो मंगळाबरोबर शुभसंबंधित होता परंतु यंदां याचे उलट होत असल्यामुळें मोठ, कापसाचे सट्टे, रेसिस, नाटक कंपन्या, सिनेमा, यांचे संबंधान कांही तरी कराचा बोजा बसण्याचा संभव वाटतो. कुमारिका, नट, नायकिणी, मोठाले इन्जीनिअर्स किंवा आर्किटेक्टस् यांचेवर काळाचा झडप पडेल असें म्हणण्यास मुळींच हरकत नाहीं. सिनेमा, नाटककंपन्यांमधील स्त्रिया तरुण कुमारिका यांचेसंबंधानें भयंकर प्रकार घडलेले उघडकास येतील. नाटक सिनेमानें ज्ञानदान होण्यापेक्षां यंदाच्या वर्षामध्यें आतेतोंला चांगलीच मदत होणार आहे. यंदांच्या वर्षामधील नेपच्यून मंगळांची स्थिति फारच विचार करण्यासारखी आहे. कापूस, सोनें यांचे भावामध्यें फारच भयंकर खळबळ होणार आहे. भयंकर तेजी तर भयंकर मंदी असे अनेक चमत्कार पाहण्यास मिळतील. कापूस, तेल, सुवर्ण यांचा पैदास कमी होते किंवा काय याकडे जगाचे डोळे सारखे लागून राहतील व आगष्टच्या ५ व्या तारखेपासून तारीख बाराच्या दरम्यान या वस्तूंसंबंधानें एकदम

कॉर्नरिंग होतें किंवा काय असें भासण्यास लागून फारच त्रेधा उडण्याचा प्रसंग येणार आहे. किंवा याच सुमारास भयंकर अग्निप्रलयानें कापूस व तेल विशेषतः पेट्रोल किंवा राकेल यांचा नाश होण्याचा पुष्कळ संभव आहे. याच वेळीं एक्स्चेंज संबंधानें परदेशीय हुंडावळी संबंधानें किंवा सुवर्णासंबंधानें भयंकर खळबळाट उडणार आहे. या संबंधी येथें विशेष उहाड चर्चा करणें बरें दिसत नाहीं करितां ज्या कोणास या विषयीं माहिती पाहिजे असेल त्यांनीं संपादकास समक्ष भेटावें किंवा पत्र व्यवहारानें विचारावें म्हणजे त्यास योग्य तो सल्ला देण्यांत येईल.

३ **हर्शल** अथवा **प्रजापति** हा उत्तरा भाद्रपदा नक्षत्रामध्यें ता० १ जानुवारी ते ता० ६ मे पर्यंत राहणार आहे. पुढें ९ ऑगष्ट पर्यंत तो रेवती नक्षत्रामध्यें भ्रमण करणार असून नंतर वक्री होऊन पुन्हा उत्तरा भाद्रपदामध्येंच वर्ष अखेर पर्यंत राहणार आहे

आहिर्बुन्ध्येविप्राः क्रतुदान तपोयुतामहाभिभवाः
आश्रमिणः पाखंडा नरेश्वराः सारधान्यंच ॥

ब्राह्मण, यज्ञ करणारे, दाते, तपस्वी, श्रीमंत व ऐश्वर्य युक्त लोक, चतुर्थाश्रमी, पाखंडी, राजे, उत्तम धान्यें हीं उत्तरा भाद्रपदाचा आश्रय करणारे आहेत.

यंदांच्या वर्ष प्रवेश कालचे कुंडलीध्ये **प्रजापति (हर्शल)** पंचमामध्यें बसला असून तो लग्नांतील गुरूबरोबर शुभसंबंधित असून लग्नेश जो मंगल त्याबरोबर शुभसंबंधित आहे. त्यामुळें यंदांच्या वर्षामध्यें शिक्षण संस्था, धर्मा संबंधानें चर्चा करणाऱ्या संस्था चांगल्याच भरभराटीमध्यें येतील. इलेक्ट्रिक वर्कस, इलेक्ट्रीक रेल्वेज, पाण्यापासून वीज उत्पन्न करण्याचे कारखाने इत्यादि नवीन गोष्टींची फारच झपाटयानें प्रगती होणार असून **मुळशीचें**

धरण खात्रीनें पूर्ण होण्याची सुचिन्हें दिसत आहेत. मुळशीच्या सत्याग्रहाचे अपयशाचा वांटा लवकरच जवान मर्द ब्राह्मणभाई सेनापती बापट यांस मिळणार आहे. इलेक्ट्रिक कंपन्यांचे शेअरचे भाव खात्रीनें वरती जाण्याचा योग आला आहे. टाटा पॉवर कंपनीचे शेअर ज्यांस आतां स्वस्त मिळत असतां विकत घेऊन ठेवण्याची सवड असेल त्यानें ते शेअर विकत घ्यावे अशी आमची त्यांस प्रामाणिक सल्ला आहे. पुढें एकदोन वर्षांनें त्या पासून फायदाच झालेला पाहण्यास मिळेल.

धार्मिक शिक्षण किंवा त्यासारखी कांहीं धार्मिक उन्नती करण्याचा मोठ्या जोराचा प्रयत्न यंदा **बनारस** येथें व्हावा असें वाटतें. त्याचप्रमाणें धर्मविषयक लेक्चरें, प्रवचनें यांचा यंदां खूपच सुळसुळाट होईल.

४ **शनि** वर्षारंभीं स्वातीमध्यें आहे व तो १० जानेवारी ते ९ फेब्रुवारीपर्यंत विशाखामध्यें भ्रमण करील नंतर पुन्हा स्वातीमध्यें वक्रगतीनें येऊन तारीख २२ सप्टेंबर पर्यंत स्वातीमध्येंच राहणार आहे व वर्ष अखेर विशाखामध्येंच असलेला पाहण्यास मिळेल.

शनीचें भ्रमण सायनतुला राशीमधून होत असतां काय काय प्रकार पाहवयास मिळतील यासंबंधानें विचार करीत असतां आम्हांला खालीलप्रमाणें एक दोहरा पाहण्यास मिळाला.

तुला राशिपे शनि रहै उच्च शनिश्चर जान ॥
सर्व देश मूंगो रहे बंगालमें हान ॥
बंगालामें हान वृष्टि जलकी होयभारी ॥
बागडमें उत्पात दुखी रेवे नरनारी ॥
राजाको दुख है सही, तुलाको शनी पैंचान ॥
यह निश्चय तुम जानियो, ज्योतिषको प्रमान ॥

सायन तुला राशीमध्यें शनीचें संक्रमण तारीख ८ ऑक्टोबर सन १९२१ सालीं झालें व त्यानंतर सन १९२२ सालामध्यें राहु, गुरु व शनि तुला राशीमध्यें असतांच बंगालमध्येंच भयंकर मोठा जलप्रलय झालेला आहे. हें पहण्यासारखें आहे.

शनि स्वाति व विशाखा या सायन नक्षत्रांमधून भ्रमण करीत असतां खालील वस्तूंवर त्याचा परिणाम झाला पाहिजे असें बृहत्संहितेवरून वाटतें.

'स्वातौ मागधचरदूत सूतपोतप्लवनटाद्याः'

स्वातीमध्यें शनि असतां दक्षिण वऱ्हाड प्रांतस्थ लोक, गुप्त बातमीदार, जासूद, सूत-सारथी, पौराणिक, नौकेमधून प्रवास करणारे लोक व नृत्य जाणणारे किंवा नाटककार यांना पीडा होते.

" ऐंद्राग्न्याख्येत्रैगर्त चीन कौलूत कुंकुमलाक्षा !
सस्यान्यथ मांजिष्टं कौसुंभंच क्षयं याति ॥ "

शनि विशाखा नक्षत्रीं असतां त्रैगर्त-लाहोर प्रांतांतील प्रदेश, चीन, कौलूत या देशांमधील लोक, कुंकुम, लाख, धान्यें, मंजिष्ट, व कुसुंबा रंग या सर्वांचा नाश होतो.

त्याचप्रमाणें खालील वस्तु स्वाती व विशाखा नक्षत्रांचा आश्रय करणाऱ्या असल्यामुळें त्यांना पीडा झाली पाहिजे.

" स्वातौ खग मृग तुरग वणिजो धान्या निवात बहुलानि ।
' अस्थिरसौहृदलघु सत्ववत्रपसोः पुण्य कुशलाश्च ॥
' इंद्राग्नि दैवतेरक्त पुष्पफल शाखिनः सतिलमुद्गाः ।
' कर्पासमाषचणकाः पुरंदर हुताशभक्ताश्च ॥ "

पक्षि, अरण्यपशु, अश्व, व्यापारी, धान्यें, हरभरे इत्यादि वातबहुल धान्यें, क्षणिक मित्र, लहान प्राणी, तपस्वी, क्रयविक्रय करणारे कुशल लोक हे स्वातीचा आश्रय करणारे आहेत.

तांबडीं पुष्पें व फलें आहेत ज्यांस असे वृक्ष तीळ, मूग, कापूस, उडीद, चणे, इंद्र व अग्नीचे उपासक (पारसी लोक ?) हे विशाखा नक्षत्राचा आश्रय करणारे आहेत.

एकंदरीनें सन १९२३ सालामधील शनीचे भ्रमणासंबंधानें विचार करितां तें मोठें चांगलें आहे असें दिसत नाहीं. या वर्षामधील शनीच्या भ्रमणाचा अनिष्ट परिणाम इंग्लिश राष्ट्राला चांगलाच भोंवेल असें दिसतें. चालू वर्षामध्यें राजघराण्यामध्यें कोणाचा तरी मृत्यु होणें विशेष संभवनोय आहे. वर्षप्रवेशकालचे कुंडलीमध्यें आपलेकडे शनि व्ययस्थानामध्यें पडलेला असून तो शुक्राबरोबर शुभसंबंधित आहे.

५ चालू वर्षामध्यें **गुरूचें** भ्रमण सायन वृश्चिक राशीमधून होणार आहे व नव्हेंबर २५ च्या सुमारास धनुराशीमध्यें तो प्रवेश करील. तारीख २५ जानेवारापर्यंत गुरु अनुराधा नक्षत्रामध्यें आहे. पुढें तो १३ एप्रिलपर्यंत जेष्ठामध्यें भ्रमण करणार आहे. परंतु पुन्हा वक्रगतीनें मागें येऊन तारीख १३ एप्रिल व २२ सप्तेंबरपर्यंत अनुराधानक्षत्रामध्यें राहील. तारीख २२ सप्तेंबर ते २४ नव्हेंबरपर्यंत पुन्हा जेष्ठामध्यें भ्रमण करून नंतर २४ नव्हेंबरला मूळनक्षत्रामध्यें जाईल व त्याच नक्षत्रामध्यें वर्ष अखेरपर्यंत राहणार आहे.

एकंदर चालू वर्षामधील गुरूबरोबर होणाऱ्या मोठमोठ्या ग्रहांचे दृष्टेयोगांसंबंधानें विचार करितां गुरूची स्थिति चांगली आहे असें म्हणतां येत नाहीं. वर्ष प्रवेश काळीं लग्नामध्यें गुरु उदय पावत आहे. परंतु तो त्याच वेळीं शुक्र नेपच्यूनबरोबर केन्द्रयोग तर मंगळ चंद्राबरोबर प्रतियोग करीत असलेला पाहण्यास मिळत आहे. त्यामुळें सन १९१९ मध्यें उत्पन्न झालेल्या अनेक नवीन कंपन्या नामशेष होऊन त्या वेळेला माज-

लेला सांपत्तिक लाटेचा बुडबुडा आतां लवकरच फुटणार असून नाण्याचीं भयंकर उधळपटी झालेली जनसमाजाच्या नजरेस यावयाची आहे. एकंदरीनें चालू वर्षाच्या गुरूच्या वृश्चिक राशीमधील भ्रमणानें थोडाबहुत हिंदुस्थानास आर्थिक फायदा होईल असें वाटतें. त्याचप्रमाणें नाण्याच्या भावाची स्थिरता येण्याकरितां कांहीं प्रयत्न होईल असें मानण्यास बिलकुल हरकत नाहीं.

६ तारीख १२ डिसेंबर १९२२ रोजीं सूर्य सायन मकर **राशीमध्यें** संक्रमण रात्रीं मुं. टाईम सात वाजून ४८ मिनिटांनीं करील. आर्यज्योतिर्विज्ञानमयामध्यें मकर संक्रमणाला फारच महत्त्व दिलेलें आहे. व हें संक्रमण व त्यासंबंधीं फलें प्रत्येक पंचागकार आपल्या पंचागामध्यें देत असतो. संक्रातीचा देह इतका योजनें आहे, तिनें अमुक वस्त्र धारण केलें आहे, तिच हातामध्यें अमुक आयुध आहे, अमुक प्रकारचा तिलक केलला आहे वगैरे वगैरे अनेक भानगडी देण्याचा परिपाठ असून त्यासंबंधानें बराच कीस काढण्यांत येत आहे. परंतु हीं फलें अनुभवास किती येतात ? मकरच संक्रमणावर एवढा आपल्या आर्य पूर्वजांनीं भर कां दिलेला आहे ? आयुधादि वर्णनें कोणत्या शास्त्रीय तत्त्वावर धरून दिलेलीं आहेत वगैरे गोष्टींचा ऊहापोह आमचे दाढी दीक्षित करतील तर त्या पासून आमच्यासारख्या अज्ञ संस्कृत, किंवा यावनी, ऊर्दु ग्रंथ मुखोद्गत न येणाऱ्या माणसावर फारच उपकार होतील. नुसती पंडितजींची पदवी लावल्यानें किंवा संस्कृत ग्रंथ मुखोद्गत पाठ म्हणण्यानें किंवा देवीचा देव्हारा व कुंड पुढें ठेऊन जपजाप्याचें ढोंग माजविल्यानें फार तर उदर भरण्याचो विशेष सोय होऊन मोटरमधून फिरतां येईल. पाहिजे असल्यास गिऱ्हाईकांचे डोळ्यांत धूळ टाकतां येईल. परंतु तरुण पिढीच्या किंवा नवमतवाद प्रतिपादन

करणाऱ्या क्रांतिकारक पक्षावर कांहीं परिणाम होईल असें दिसत नाहीं. सायनवाद्यांनीं आपला क्रांतीचा झेंडा केव्हांच रोंविलेला आहे. आतांचा काळ पोकळ पौराणिक वचनांचा मारा करून वादविवाद करावयाचा किंवा वयाचा अथवा दाढीचा नसून ज्ञानाचा आहे. ज्योतिष शास्त्र हें प्रत्यक्ष शास्त्र आहे. तें प्रत्यक्ष प्रमाण मागणारें आहे. हल्लींचा काळ 'हिमत मर्दा तर मदत खुदा' असें मानणाऱ्या प्रागतिकांचा आहे. जुन्या दाढी दीक्षितादि दिवांधांचा नाहीं. सायनपक्षांतील माणसांना ज्ञान जरी त्यांस त्यांच्या बापजाद्यांकडून अनुवंशिक संस्कारानें किंवा हक्कानें मिळालेलें नाहीं तरी जेवढें स्वकष्टार्जित ज्ञान त्यांचे जवळ आहे तेवढें तें उदारपणानें सर्वत्रांस पुकारून देत आहेत. उगीच आपल्या आजोबांचें किंवा बापाचें म्हणून निरुपयोगी गबाळगठ्ठा उराशीं ते बाळगीत नाहींत. ज्यांचो भूक तेवढीच असेल त्यांनीं तो खुशाल आपले बरोबर बाळगावा व त्याच्याच आनंदांत चैनीनें जिभल्या चाटीत बसावें. प्रागतिकांच्या वाटेस जाणें म्हणजे जाणून बुजून वाघाच्या दरीमध्यें उडी घेण्यासारखें आहे.

सूर्य सायन मकर संक्रमण करीत असतां पूर्वक्षितिजावर सायन सिंह राशीचा ३ रा अंश उदय पावत आहे. लग्नांत नेपच्यून उदय पावत असून चंद्रकुंभ राशीच्या विसाव्या अंशामध्यें आहे. चंद्रानें नेपच्यून बरोबर केलेला प्रतियोग सोडला असून तो चतुर्थामध्यें वृश्चिक राशीमध्यें असलेल्या शुक्राबरोबर केन्द्रयोग करण्यास जात आहे. हर्शल मंगळाची जोडी अष्टमामध्यें मीन राशीमध्ये आहे तर ग्रहमालेच्या चालकाची व मकर संक्रमण कालच्या लग्नाधिपतीची स्वारी षष्ठ स्थानामध्यें बसलेली आहे. ही स्थिति मोठी चांगली आहे असें म्हणतां येत नाहीं. ही संक्रांत झाल्यानंतर लवकरच प्लेगचो साथ वाढण्याचा पुष्कळ संभव वाटतो.

मृत्युसंख्या पण पुष्कळच वाढेल. अध्यात्मवाद, किंवा मृत प्राण्यांच्या बरोबरोल संवादासंबंधानें विशेष प्रगतिपर गोष्टी घडाव्यात असें वाटतें. चतुर्थ स्थानामध्यें गुरु असून तो अष्टमामधील हर्शल मंगळाबरोबर शुभसंबंधित होत आहे म्हणून अध्यात्म विद्या, गूढ शास्त्रें, ज्योतिषविषयक चर्चा या सर्वांना उत्तम अनुकूल स्थिति असल्याकारणानें त्या संबंधानें कांहीं व्यवस्थित प्रमाणावर प्रयत्न होईल. संक्रमण काळीं चंद्र शनीबरोबर शुभसंबंधित असून गुरुहर्शलचा त्रिकोणयोग होत असल्यामुळें उद्योगधंद्यास अनुकूल काळ आहे असें म्हणण्यास मुळींच हरकत नाहीं. शिक्षणविषयक संस्था, वाङ्मय, वर्तमानपत्रें यांचा निदान पुढील तीन महिन्यांत चांगली प्रगति होईल. वृश्चिक राशीमध्यें शुक्र असून त्याबरोबर चंद्र केन्द्रयोग करण्यास जात असल्यामुळें लहान मुलांमध्यें देवीच्या सांथीनें मृत्यु संख्या वाढण्याची भीति वाटते. त्याचप्रमाणें पोष्ट व टेलिग्राफ खात्यामधील हलक्या दर्जाच्या पगाराच्या लोकांमध्यें असंतोष पसरण्याची भीति दिसते. टेलीफोन गलेस संबंधानें कांहीं तरी विचित्र प्रकार झालेले उघडकीस येतील.

लंडन येथें या संक्रमणाचे वेळीं मिथुन लग्नाचा १८ अंश उदय पावत आहे. तेथें रेलवे व पोष्ट ऑफीसमध्यें कांहीं भानगड उद्भवेल. अमेरिकेमध्यें कुंभलग्न उदय पावत असून लग्नांत पीडितचंद्र व हर्शल-मंगळांची जोडी बसत असल्यामुळें अमेरिकेमध्यें संप, मारामाऱ्या वगैरे भानगडी बऱ्याच उद्भवल्या पाहिजेत. अमेरिकन रेलवे स्टॉकशेअर वगैरेंच्या किंमती पडण्याचा पुष्कळच संभव वाटत आहे. अमेरिकेच्या नाणेबाजाराची जरा अस्थिरता बरीच भासत असल्यामुळें त्यामुळें लवकरच सर्वत्र बरीच मंदी होण्याचा संभव वाटत आहे. मीन राशीमध्यें होत असलेली हर्शल मंगळांची युति पोर्तुगाल देशाला चांगली भोंवेल. तेथें खून, मारामाऱ्या,

बंड वगैरे होण्याची भीति फारच आहे. व अमेरिकेलाही बराच त्रास सोसावा लागेल. संक्रमण काळीं चंद्र नेपच्यूननें पीडित असल्यामुळें बोलसेव्हिक पंथाला जोर येऊन फसवाफसवीचे बरेच प्रकार घडतील. जानेवारी १७ च्या सुमारास जिकडे तिकडे बरीच अस्वस्थता माजेल व आपल्याकडे नाण्यासंबंधानें कांहीं तरी भानगड होऊन शेअर बाजार व कॉटन मार्केट मंदीकडे जाऊं लागेल. फेब्रुवारीमध्यें तर कॉटन मार्केटमध्यें बरीच मंदी आलेली पाहण्यास मिळेल. व जानेवारीच्या १७ तारखे नंतर मंदीमध्येंच राहणारास विशेष फायदा होईल. फेब्रुवारीचा शेवट शेवट व मार्च महिन्याच्या आरंभींच्या सुमारास सर्वत्र बरीच अस्वस्थता पाहण्यास मिळेल. याच सुमाराला इंग्लंडच्या राजकीय वातावरणामध्यें बरीच खळबळ उडेल. व तारीख ९ फेब्रुवारीच्या सुमारास हल्लींची मिनिस्टरीच नको असें म्हणणाऱ्या **सोश्यालिस्ट** पक्षाकडून गडबड होईल. अमेरिकेमध्येंही पण याच सुमारास परराष्ट्रीय गोष्टींसंबंधानें भानगड उत्पन्न होईल. फ्रान्सचे वातावरण यांच वेळेला अतिखळबळलेलें पाहाण्यास मिळेल.

७ सौरवर्षाचा आरंभ किंवा सायन मेष संक्रमण बुधवार तारीख २१ मार्च सन १९२३ रोजीं मुं. टा. रात्रीं आठ वाजून वीस मिनिटांनीं होईल व ह्या संक्रमणाचा अंमल पुढल्या वर्षाच्या मेष संक्रमणापर्यंत राहील. येथून खरें म्हटलें असतां वर्षारंभ धरला पाहिजे. संक्रमण काळीं पूर्व क्षितिजावर वृश्चिक राशीचा २ रा अंश उदय पावत असून माध्यान्हीं सिंह राशीचा १ ला अंश येत आहे. लग्नांत गुरु वक्री असून माध्यान्हीं असलेल्या नेपच्यूनबरोबर तो केन्द्रयोग करीत आहे तर सप्तमांत असलेल्या मंगळचंद्र युतीबरोबर प्रतियोग करीत असून त्याच्या चतुर्थामध्यें असलेल्या शुक्राबरोबर केन्द्रयोग होत आहे. वर्ष प्रवेशकाळीं केंद्रावर

स्थिर राशि उदय पावत असून चारी केंद्रांमध्यें ग्रह असून ते एकमेकांबरोबर केन्द्र प्रतियोग करीत आहेत. वर्ष लग्नाचा अधिपति मंगळ सप्तमामध्यें चंद्रानें युक्त असून इतर तीन ग्रहांबरोबर केन्द्र प्रतियोगानें बध्द झालेला आहे. या कुंडली इतकी विचित्र कुंडली फारच क्वचित पाहण्यास मिळते. येथें वर्षाधिपतित्व कोणाकडे द्यावें या संबंधानें शंका उत्पन्न होते. परंतु तें कोणाकडेही दिलें तरी त्या पासून विशेष चांगलें फळ निष्पन्न होईल असें मुळींच दिसत नाहीं. वर्षाधिपति किंवा अब्दाधिपती मंगळ मानला तर पुढें दिलेल्या श्लोकांत वर्णन केलेली स्थिति पाहण्यास मिळाली पाहिजे.

वातोद्धूतश्चरति वन्हिरतिप्रचंडोग्रायान्वनानिगनगराणिचसंदिधक्षुः।
हाहेति दस्युगणपात हतास्टंति निःस्वीकृताविपशवो भुवि मर्त्यसंघाः॥
अभ्युन्नता वियतिसंहतमूर्तयोपि मुंचंतिनक्वचिदपः प्रचुरं पयोदाः।
सोम्नि प्रजातमपिशोषमुपैति सस्यं निष्पन्नमप्य विनयादपरे हरंति॥
भूपानस्यस्यगभिपालनसक्तचित्ताः पितोत्थरुक् प्रचुरता भुजगप्रकोपः।
एवं विधैरुपहता भवतिप्रजेयं संवत्सरेव तिसुतस्य विपन्नसस्या॥"

मंगळ वर्षाधिपती असतां वाऱ्यानें पेटविलेला भयंकर अग्नि गांव, वनें, नगरें, यांना जाळीत फिरतो. चोराच्या समुदायानें पीडित, निर्धन झालेले, गाई इत्यादि पशुरहित झालेले असे मनुष्यसमुदाय पृथ्वीवर हाहाःकार करतील. आकाशांत दाट दिसत असलेले मेघ कोठेंही बहुत उदक देणार नाहींत. जलाशयाजवळ असलेलें किंवा नदीच्या तीरीं झालेलेंही धान्य शुष्क होईल. अथवा पिकलेलें धान्य अन्य पुरुष अन्यायानें हरण करतील. राजे धर्माचें पालन करणार नाहींत. पित्तापासून रोग उत्पन्न होतील. सर्पापासून लोकांना पीडा होईल. याप्रमाणें प्रजा नष्ट होईल व धान्यरहित पृथ्वी होईल.

लग्नांत गुरूसारखा ग्रह उदित असल्यामुळें इतकें वाईट फळ मिळूं नये असें वाटतें. एकंदरींत वर्षप्रवेश काळची कुंडली चांगली आहे असें मुळींच म्हणतां येत नाहीं. शिक्षणविषयक गोष्टी, वाङ्मय, ग्रंथ प्रकाश, यांखेरीज दुसऱ्या कोणत्याही कार्यास अनुकूल कुंडली बसलेली आहे असें म्हणवत नाहीं. चतुर्थामध्यें शुक्र बसला असून माध्यान्हीं नेपच्यून असल्यामुळें यंदा पावसाळा जास्त होईल असें म्हणण्याचा प्रसंग येत आहे. पचमांत हर्शल गुरूनें शुभसंबंधित असल्या कारणानें सट्टयाच्या व्यवहारांत ऊत येणार आहे. एकादशस्थानाचा अधिपती पंचमांत असून हर्शलनें युक्त असून गुरूनें शुभदृष्ट आहे. त्याचप्रमाणें तो लग्नेश मंगळाबरोबर व चंद्राबरोबर शुभसंबंधित असल्याकारणानें यंदाच्या कौंसिलमध्यें चांगल्या तऱ्हेची सुधारणा होऊन तीमध्यें जनसमाज चांगलें लक्ष घालील असें म्हणण्यास मुळींच हरकत नाहीं. रवि षष्ठामध्यें असून तो चंद्र, मंगळ व नेपच्यून बरोबर अशुभसंबंधित असल्यामुळें देशांत रोगराई वाढत्या प्रमाणावरच पाहण्यास मिळेल. गिरणींत काम करणारे मजूर लोक यांची दैना होण्याचा संभव विशेष दिसत असून सन १९२३ सालामध्यें मिल इंडस्ट्रीज चांगल्या चालतील असें दिसत नाहीं. राजपक्ष प्रजेला अनुकूल असें धोरण ठेवील असें म्हणवत नाहीं. देशामध्यें रोगराई, खून, संप, मारामाऱ्या, अत्याचार, गुप्तकट हेच सुकाळाचे पाहण्यास मिळतील, अग्निप्रलयानें जनता त्रस्त होईल.

याचप्रमाणें लढायांसंबधानें अनेक विचित्र बातम्या पसरतील. आपलेकडे फ्रांटीअरवरील विभागाकडे पुष्कळच धामधूम माजेल. स्थिर राशीच्या अंमलाखालीं असलेले प्रदेश **आयर्लंड, फ्रांस, रशिआ, पोलंड** या देशांमध्यें खळबळाट उडेल. इंग्लंड व अमेरिका येथेंही हें संक्रमण चांगलें बसत

नाहीं. आशिआ मैनार संबंधानें पुष्कळच भानगड पाहण्यास मिळेल. मार्च २२, एप्रिल ७, एप्रिल २०, मे ६ या तारखा फारच भयंकर वाटतात. मंगळ चंद्रांची युति **लिसबन** येथें माध्यान्हीं येत असून अक्षांश १७१ पूर्व येथें ती चतुर्थ भवनीं येत असल्यामुळें या प्रदेशामध्यें भूकंपाचे उत्पात होतील.

८ **कर्क संक्रमण**--तारीख २२ जून १९२३ शुक्रवारीं दुपारीं मुं. टा. ३ वाजून ५४ मि. सूर्य कर्क संक्रमण करील. संक्रमण काळीं वृश्चिक राशीचा २३ वा अंश पूर्व क्षितिजावर उदय पावत आहे. रवि अष्टमांत असून चंद्र शनीनें युक्त असा एकादशस्थानामध्यें बसलेला आहे. लग्नाधिपति मंगळ अष्टमांत असून शनीबरोबर केन्द्रयोग करीत आहे. ही कुंडलीही फारच अनिष्ट आहे. लवकरच मृत्युसंख्या भयंकर उग्र रूप धरील असें भासत आहे. लवकरच कौंसिलमधील एका चांगल्या व्यक्तीवर व हिंदुस्थानामधील मोठमोठे अधिकारी वर्ग, राजे रजवाडे यांचेवर कालाची वक्र दृष्टी फिरत आहे.

एकंदरीनें विचार करितां हें संक्रमण फारच भयंकर वाटतें. राशिआ पूर्वेकडील प्रदेश आशियामायनार टर्की वगैरे २७० अंश पूर्व रेखांश कडील प्रदेशांमध्यें मंगळ माध्यान्हीं येत आहे. तेथें फारच धांदल होऊन युध्दासंबंधानें कांहीं भानगड उत्पन्न होते किंवा काय याकडे जनांचे डोळे लागतील. अमेरिकेमध्यें लग्नांत मंगळ उदय पावत आहे, नेपच्यून याकडे धन स्थानामध्यें बसत असून चतुर्थामध्यें शनिचंद्र युति होत आहे. एकंदरीनें तेथेंही मोठी समाधानकारक स्थिति आहे असें म्हणतां येत नाहीं. नाण्या संबधानें फारच तारांबळ उडेल. लंडन येथें दशमांत रवि मंगळ येत आहेत तर धनस्थानाजवळच शनिचंद्रांची युति पडत आहे. म्हणून या संक्रमणानंतर

लवकरच इंग्लंडास युद्धांत पडावें लागेल किंवा काय अशी नाजूक परिस्थिति उत्पन्न झाली पाहिजे. कर, खोलावलेला व्यापार, बंडाळी यांमुळें बरीच धांदल उडेल. जुलाई ६ ते १९ पर्यंतचा काळ फारच धांदलीचा आहे. या काळामध्यें मंत्रिमंडळानें फारच जपून वागलें पाहिजे कारण जर एखादा वेडावाकडा प्रकार झाला तर त्याचा परिणाम फारच भयंकर होईल. जुलाई २३ पासून नाण्यासंबंधानें बरीच टंचाई भासूं लागेल. याच कालानंतर इग्लंडमध्यें जिकडे तिकडे व्यापारामध्यें मंदी आलेली भासेल व तारीख ६ आगष्ट ते १३ आगष्ट पर्यंतचा काल नाण्यासंबंधानें फारच धांदलीचा आहे. सप्तेंबरच्या ९ तारखेनंतर लोकांचें लक्ष ईजिप्तकडे वेधेल.

९ **तुलासंक्रमण**--तारीख २४ सप्तेंबर १९२३ रोजीं सकाळीं मुं. टाईम ६ वाजून ५५ मिनिटांनीं ग्रहमालेचा चालक सायन तुला संक्रमण करणार आहे. संक्रमणकाळीं लग्नीं तुला राशीचा १४ वा अंश उदय पावत असून लग्नांत शनि त्याच राशीचा आहे. लग्नाधिपती शुक्र रवीनें युक्त असा व्ययस्थानामध्यें आहे वर षष्ठस्थानामध्यें हर्शलचंद्रांचा जोडी असून व्ययस्थानामध्यें असलेल्या मंगळाबरोबर त्याचा प्रतियोग होत आहे. व्ययस्थानामध्यें गुरु बसला असून तो नेपच्यून बरोबर केन्द्रयोग करीत आहे. एकंदरीनें विचार करितां हें संक्रमण फार चांगलें आहे असें म्हणवत नाहीं. शेतीच्या उपयोगास लागणारीं जनावरें यांचेमध्यें रोगाची साथ पसरण्याचा विशेष संभव आहे. मायनिंग इंडस्ट्रीज व तेलें यांसंबंधानें पुष्कळच सुधारणा होईल. नवीन कारखाने काढण्याचा प्रयत्न होईल. संक्रमणानंतर लवकरच साधारण तेजीकडे शेअर बझार जाण्याचा रंग दिसत आहे. परंतु पुढें त्यानंतर लवकरच भयंकर मंदीचा समय येईल. मिल शेअर्स, पेट्रोल, इलेक्ट्रिक वर्कसचे शेअर्स, रेलवे शेअर्स, यांचे भाव

वाढतील. या संक्रमणानंतरचा कांहीं काल बरा जाईल असें म्हणण्यास मुळींच हरकत दिसत नाहीं.

या संक्रमणानंतर एकदा नाणेबाजारामध्यें खोटा चलतीचा काल वाटत आहे. त्याचप्रमाणें नवीन कंपन्या काढण्याचा प्रयत्न होईल परंतु त्यासंबंधानें जनतेनें सावध राहावें. हवे संबंधानें अमेरिकेहून वाईट बातम्या यऊं लागण्यास आगस्टच्या शेवटल्या आठवडयामध्यें सुरवात होऊन आस्ते आस्ते कॉटन मार्केट तेजीकडे झुकण्यास लागेल व या संक्रमणाच्यानंतर किंवा त्याच सुमारास कॉटन मार्केट फारच तेजीमध्यें आलेलें पाहवयास मिळेल. येथेंही पावसासंबंधानें ओरड आगस्ट महिन्याच्या शेवटल्या शेवटल्या आठवड्यापासून होईल असें दिसतें.

लंडन येथें सिंह लग्न उदय पावत असून लग्नांत नेपच्यून बसत आहे. प्रस्थानामध्यें मंगल येत असून अष्टमांत हर्शल नपच्यूनचो जोडी पडत आहे. एकंदरीनें हें संक्रमण तेथें चांगलें बसत नाहीं. लंडनमध्यें अराजकतेचा सुकाळ होईल. लढाईचे साहित्याकडे भयंकर खर्च करण्यांत येऊन जनता करानें त्रस्त झालेली पाहण्यास मिळेल. तारीख ३ नव्हेंबर ते १३ नव्हेंबरपर्यंतचा काल फारच धांदलीचा आहे. तसाच डिसेंबर ५ ते १३ पर्यंतचा काल वाटतो.

अमेरिकेमध्येंही हें संक्रमण चांगलें बसत नाहीं. तेथें हर्शलचंद्रांची जोडी एकादशस्थानामध्यें बसत असून मंगल पंचमांत येत आहे. यावरून तेथें नाण्याची तारांबळ उडेल व सिनेटमधील मोठमोठया लोकांचे संबंधानें अत्याचार झालेले पाहण्यास मिळतील. साधारणपणें अमेरिकेचें परदेशाबरोबर असलेलें राजकारण बिनसेल असें वाटतें.

१० **ग्रहणें.**--सन १९२३ सालामध्यें एकंदर चार ग्रहणें व्हावयाचीं आहेत त्यांपैकीं दोन सूर्यग्रहणें असून दोन चंद्रग्रहणें आहेत. यांपैकीं एकही आपल्याकडे दिसणार नाहीं. पहिलें चंद्रग्रहण तारीख ३ मार्च १९२३ रोजीं होईल. हें ग्रहण युरोपखंड, आफ्रिका, अटलँटिक ओशन व उत्तर अमेरिका येथें दिसेल. हें खंड ग्रहण असून ग्रास फारच लहान आहे. कन्याराशीच्या द्वितीय द्रेष्काणामध्यें ग्रहण होत असल्यामुळें कन्याराशीनें दर्शविलेल्या देशामध्यें सप्तेंबरमध्यें भानगड व अस्वस्थता झालेली पाहण्यास मिळेल. हें ग्रहण लंडन येथें अष्टम स्थानामध्यें पडत असून धनस्थानामध्यें रवि हर्शलची जोडी बसणार आहे त्यामुळें या ग्रहणानंतर दुःष्काळ, साथीरोग, नाण्याची टंचाई, प्रिन्सी कौंसिलमधील सभासदांचे मृत्यु इत्यादि गोष्टी, इंग्लंडमध्यें घडतील.

तारीख १७ मार्च १९२३ रोजीं कंकणाकृति सूर्यग्रहण होईल व हें ग्रहण दक्षिण आफ्रिका, दक्षिण अमेरिकेच्या दक्षिणेकडच्या भागीं व अटलांटिक महासागराचे दक्षिण प्रदेशामध्यें दिसेल. हें ग्रहण मीन राशीच्या २६ व्या अंशांत होणार आहे व त्यामुळें पोर्च्युगाल, दक्षिण आफ्रिका व विशेषतः आफ्रिका खंडामधील पश्चिमेस असलेल्या पोर्च्युगीज प्रदेशामध्यें बरोच धांदल आक्टोबरमध्यें पाहण्यास मिळेल. रेखांश पूर्व ३० येथें माध्यान्ही ग्रहण कालचा मंगल बसत असल्यामुळें त्या प्रदेशामध्ये खून मारामाऱ्या संप वगैरे भानगडी वाटतात. पूर्व रेखांश ११ येथें भूकंपादि उत्पात होतील.

तारीख २६ आगस्ट १९२३ रोजीं खडाकृती चंद्रग्रहण होईल; हें ग्रहण पॅसिफिक महासागर, ऑस्ट्रेलिआ, व अमेरिका येथें दिसेल. या ग्रहणाचा ग्रास फारच थोडा आहे. या ग्रहणानंतर आंवेचा, अति-

साराचा किंवा कालऱ्याचा उपद्रव सप्तेंबरच्या सुमारास उद्भवावा असें वाटतें.

तारीख १० सप्तेंबर १९२३ रोजीं खग्रास सूर्य ग्रहण होईल. हें ग्रहण उत्तर अमेरिका, दक्षिण अमेरिकेच्या उत्तरेकडील प्रदेशांत, आशिया खंडाच्या अगदीं पूर्वेकडील प्रदेशामध्यें दिसेल. अमेरिका खंडामध्यें मजूर वर्गामध्यें असंतोष, दुष्काळ किंवा पिकाची नासाडी होण्याचा फारच संभव आहे. मृत्युसंख्या जास्त वाढेल. विशेषतः अतिसार, कालरा, व टायफाईड फिव्हरची साथ वाढण्याचा पुष्कळच संभव आहे व या दृष्टीनें सप्तेंबर महिना कठीण जाईल. आपलेकडे रविचंद्र संयोग तृतीयस्थानामध्यें बसत असल्यामुळें सप्तेंबर महिन्यामध्यें एखादा रेलवेचा मोठा अपघात किंवा ट्रामवे, रेलवे व पोष्टखात्यामधील लोकांच्या संपाची भिती दिसते. सॅन फ्रान्सिस्को, मेक्सीको वगैरे मध्य अमेरिकेकडील प्रदेशामध्यें या ग्रहणाचें तीव्र फल अनुभवास येईल. पूर्व रेखांश ४६ येथें ग्रहण चतुर्थ भुवनीं येत असून हर्शल माध्यान्हीं बसत आहे त्यामुळें त्या प्रदेशामध्यें भयंकर भूकंपादि उत्पात होतील.

११ सन १९२३ सालामधील मोठमोठाल्या ग्रहांच्या युत्यांसंबंधानें पाहातां तारीख १३ आगस्ट १९२३ रोजीं नेपच्यून मंगळांची युति सिंह राशीच्या १८ व्या अंशामध्यें होणार आहे. व त्यामुळें सिंह राशीच्या अमलाखालील प्रदेशांत--फ्रान्स, इटली, रशिआमध्यें बऱ्याच भानगडी होतील.

तारीख १ ली डिसेंबर १९२३ रोजीं तुला राशीच्या २९ व्या अंशामध्यें शनि मंगळांची युति होईल. ही युति वृश्चिक राशीच्या जवळच्याच अंशामध्यें होत असल्यानें वृश्चिक राशीच्या अमलाखालील प्रदेशांना त्रास होईल. या युतीनंतर एखाद्या राजाचा मृत्यु घडेल. ही युति रेखांश

पूर्व १६ यथें माध्यान्ही बसते म्हणून त्या प्रदेशामध्यें खून मारामाऱ्या अत्याचार संभवतात. या युतीमुळें **एटना** नांवाच्या ज्वालामुखी पर्वतामधून अग्नीचा वर्षाव होण्याचा संभव आहे. पश्चिम रेखांश १६४ व पॅसफिक महासागरामध्यें भूकंपाच उत्पात संभवतात.

असो याप्रमाणें सन १९२३ साला मधील भविष्याचें सार आहे. आतां आपण सन १९२३ साल व्यक्तिशःकसें जाईल याविषयाकडे वळू.

सन १९२३ साल व्यक्तिशः कसें जाईल ?

जन्मकाळीं **रवि** ज्या **सायन** राशि अंश कलेमध्यें असेल तसा जेव्हां चालू वर्षामध्यें ज्या तारखेच्या सुमारास येईल त्या दिवशीं असलेल्या रविचंद्रादि ग्रहांच्या होणाऱ्या दृष्टियोगानुरूप खालील वर्षफळाची कल्पना केलेली आहे. साधारणपणें जन्म ज्या तारखेला झालेला असेल त्या तारखेच्या सुमारास दैनिक स्पष्ट ग्रहांचें पुस्तक सन १९२३ यामध्यें पाहावें म्हणजे त्याच सुमारास जन्मकाळीं रवि ज्या राशि अंश कलेमध्यें असेल तसा असलेला पाहण्यास मिळेल. व हीच वर्षप्रवेशाची तारीख जाणावी. व ह्या तारखेच्या पुढें जो फलादेश लिहिलेला आहे त्याप्रमाणें चालू वर्षामध्यें अनुभव पाहण्यास मिळेल. हा फलादेश फारच स्थूल आहे. कारण यामध्यें जन्मकालीन इतर ग्रहस्थितीचा मुळींच विचार झालेला नाहीं.

जानेवारी.--ज्यांचा वर्षप्रवेश तारीख ५ ला होईल त्यांस हें वर्ष निराशाजनक, त्रासदायक व बरेंच भानगडीचें जाईल. व तारीख १० ला व ११ ला ज्यांचा वर्षप्रवेश होईल त्यांना प्रथम त्रास परंतु नंतर सुख मिळेल. तारीख १३ ला ज्यांचा वर्षप्रवेश असेल त्यांस हें वर्ष कौटुंबिक सुखासाठीं चांगलें आहे. वयोमानाप्रमाणें कांहींचे विवाह होतील तर कांहींना संतति होईल तर कित्येकांच्या मुलामुलींचीं लग्नें वगैरे शुभ कार्यें होतील. १८ व २९ तारखेला ज्यांचा वर्षप्रवेश होईल त्यांस उद्योगधंद्याच्या दृष्टीनें वर्ष फारच फायदेशीर व लाभकारक जाईल. ज्यांचा वर्षप्रवेश विसाव्या तारखेला होईल त्यांना या वर्षामध्यें वियोगामुळें दःख होईल. २२ व्या तारखेला ज्यांचा वर्ष प्रवेश होईल त्यांस चालूं वर्ष वाईट जाईल. **ज्यांचे वर्ष प्रवेश ९ एप्रिल किंवा १२ आक्टोबर रोजीं झाले असतील त्यांस ह्या महिन्यांत सांपत्तिक बाबतीमध्यें त्रास फार होण्याचा संभव आहे.**

फेब्रुवारी.--ज्याचा वर्ष प्रवेश २ ऱ्या तारखला होईल त्यांच्या एकंदर व्यवहारामध्यें बरेच घोटाळे माजतील. ६ व्या किंवा ७ व्या तारखेला ज्यांचा प्रवेश असेल त्यांना या वर्षामध्यें लुच्चेगिरीमुळें किंवा कोणी फसविल्यामुळें नुकसान लागेल. ज्यांचा वर्षप्रवेश ८ व्या तारखेला होईल त्यांना हें वर्ष चांगलें जाईल परंतु सांपत्तिक दृष्ट्या इतकें चांगलें नाहीं. ११ व्या तारखेला ज्यांचा वर्षप्रवेश होईल त्यांना हें वर्ष कौटुंबिक व सामाजिक सुखास चांगलें आहे. १३ व्या तारखेस ज्यांचा वर्षप्रवेश होईल त्यांचा उद्योगधंदा चांगला वाढेल व नोकरी असल्यास नोकरीमध्यें बढती मिळेल. १७ व्या किंवा २० व्या तारखेला ज्यांचा वर्षप्रवेश होईल त्यांना आजार व किरकोळ भानगडींमुळें त्रास होईल. साधारणपणें ज्याचा जन्म **कोणत्यही वर्षाच्या ६ व्या फेब्रुवारीला किंवा १० व्या आगष्टला झालेला असेल त्यांनीं चालू महिन्यामध्यें सावधगिरीनें व्यवहार करावे. परंतु ज्यांचा जन्म ८ व्या मेला झालेला असेल त्यांना सांपत्तिक दृष्ट्या या महिन्यामध्यें त्रास होईल.**

मार्च.--तारीख ३ ला ग्रहण आहे म्हणून ज्यांचा वर्षप्रवेश या तारखेला होईल त्यांच्या कुटुंबामध्यें या वर्षामध्यें त्यांच्या स्त्री नातेवाईकांमध्यें मृत्यु किंवा आजार येईल. ५ व्या तारखेला ज्यांचा वर्षप्रवेश होईल त्यांच्या व्यवहारामध्यें भयंकर खळबळाट होऊन फारच त्रेधा उडण्याचा संभव आहे. ७ व्या किंवा १३ व्या तारखेला ज्यांचा वर्षप्रवेश होईल त्यांना चालू वर्ष चांगलें जाईल. १५.१६.१७.२१ व २८ ह्या तारखा वर्षप्रवेशाला चांगल्या नाहींत. त्यांना त्रास, दगदग, वियोगजन्य दुःख वगैरेपासून त्रास होण्याचा संभव आहे. एकंदरींत या महिन्यामध्यें वर्षप्रवेशास शुभ असे फारच थोडे दिवस आहेत. **ज्यांचा वर्षप्रवेश ११ व्या नव्हेंबरला असेल किंवा ज्यांचा जन्मकाळीं वृश्चिक राशीचा १९ वा अंश लग्नी किंवा माध्यान्हीं उदय पावत असेल त्यांना या महिन्यामध्यें चांगला लाभ होईल. त्यांच्या उद्योग धंद्याची भरभराट होईल.**

एप्रिल.--ज्यांचा वर्षप्रवेश १ ल्या तारखेला होईल त्यांना वर्ष चांगलें जाणार नाहीं; आजार येईल नुकसानी व सांपत्तिक अडचणी भासतील; ४ थ्या तारखेला ज्यांचे वर्षप्रवेश असतील त्यांना वर्ष लाभकारक जाईल, धंदा रोजगार चांगला चालेल. ७ वी तारीख वर्षप्रवेशाला फारच अशुभ आहे. व विशेषतः ज्या पुरुषांच वर्षप्रवेश या तारखेला होतील त्यांना बरेच कष्ट होतील परंतु स्त्रियांचा वर्षप्रवेश या तारखेला होईल तर त्यांच्या नवऱ्यांना किंवा पुरुष नातेवाईकांना कष्ट व त्रास होईल. बाराव्या तारखेला ज्यांचा वर्षप्रवेश होईल त्यांना संसारसुख, मानमरातब या दृष्टीनें वर्ष चांगलें जाईल परंतु या वर्षामध्यें भांडणें, तंटे, वैर वगैरे होण्याचा संभव दिसतो. १४ व्या तारखेला होणारा वर्षप्रवेश संसारसुख किंवा स्त्रीसुखाच्या दृष्टीनें अनिष्ट आहे.

१६ व्या तारखेला वर्षप्रवेश झाला तर त्रास व काळजीनें जीव त्रस्त होईल. १९ व्या तारखेला होणारा वर्षप्रवेश अपघात व तापापासून पीडा दर्शवितो, तर २५ वीला होणारा वर्षप्रवेश फारच वाईट आहे. २९ व्या तारखेला ज्यांचा वर्षप्रवेश होईल त्यांच्या वांटणीला आजार व अपयश, त्रास, तोटेयतील. **या महिन्याच्या सातव्या तारखेला ज्यांचा जन्म झालेला असेल त्यांनीं फार सावधपणानें वागावें; त्यांचीं सांपत्तिक अडचणी, तोटे यांनीं फारच त्रेधा उडेल असें वाटतें. ज्यांचे जन्म ऑक्टोबरच्या ९ व्या व १० व्या तारखेला झालेले आहेत त्यांना या महिन्यामध्यें बराच प्रसाद मिळावयाचा आहे करितां त्यांनीं जपून असावें. ज्यांचे जन्म फेब्रुवारीच्या ९ व्या तारखेला व ९ व्या ऑगस्टला झालेले आहे त्यांना या महिन्यामध्यें फारच त्रास होईल. फसवेगिरी व डांबीस लोकांचा सहवास यापासून त्रास होईल. या तारखेला जन्म पावणाऱ्या तरुण मंडळीनीं तर विशेष सावधपणानें वागावें. नाहींतर एखाद्या भलत्याच कचाट्यामध्यें सांपडण्याचा विशेष संभव आहे.**

मे सन १९२३.—१ ल्या तारखेला वर्षप्रवेश असणारांना चालू साल चांगलें जाईल. अनेक प्रकारानें उन्नती होणाऱ्या गोष्टी घडून पुढें पाऊल पडेल. ५ व्या तारखेला ज्यांचा वर्षप्रवेश येईल त्यांना सांपत्तिक दृष्टीनें त्रास होईल तर ज्यांचा वर्ष प्रवेश ७ व्या तारखेला होईल त्यांस सांपत्तिक अडचणी दुसऱ्यानें फसविल्यामुळें प्राप्त होतील. १० व्या तारखेला ज्यांचा वर्षप्रवेश असेल त्यांना स्त्रियांच्यामुळें भांडणें, तंटे किंवा सांपत्तिक तोटे प्राप्त होतील. १३ वीला ज्यांचा वर्षप्रवेश असेल त्यांना वर्ष बरें जाईल. कांहीना विवाहसुख मिळेल तर कांहींना संतति होईल. १७ वी तारीख वर्षप्रवेशाला अनिष्ट आहे. १८ वीला ज्यांचें वर्ष बसत असेल त्यांना भांडण तंटे यांपासून त्रास होईल. २२ वी तारीख वर्षप्रवेशाला चांगली नाहीं त्यापासून विवाहित स्त्रियांचा या तारखेला वर्षप्रवेश होत

असल्यास त्यांना हें वर्ष फारच कष्टकारक जाईल. २६ वीला वर्षप्रवेश होईल तर आजार प्राप्त होईल व सर्वप्रकारानें वर्ष अनिष्टच जाईल परंतु ज्यांचा वर्षप्रवेश २८ किंवा २९ व्या तारखेला होईल त्यांना हें वर्ष फारच प्रगतीपरजाईल, धंदा रोजगार चांगला चालेल; ज्यांचा जन्म ५ व्या मेला किंवा ६ व्या नव्हेंबरला झालेला असेल त्यांना खर्चाचे बाबतीमध्यें चालू महिन्यामध्यें विशेष सावधता बाळगिली पाहिजे कारण या लोकांना या महिन्यामध्यें बऱ्याच सांपत्तिक अडचणी प्राप्त होतील. सांपत्तिक दृष्ट्या कोणताही व्यवहार करते वेळीं त्याचा परिणाम आपल्या नांवालौकिकावर कसा काय होईल हें सर्व लक्षांत घेऊन सांपत्तिक उलाढाली कराव्या.

जून.—या महिन्याची ६ वी तारीख वर्षप्रवेशाला कांहीं विशेष चांगली दिसत नाहीं. व ९ वी तारीख तर याहीपेक्षां अनिष्ट फळ दर्शविणारी आहे. या तारखेला ज्यांचे वर्षप्रवेश होतील त्यांना प्रत्येक गोष्टीमध्यें त्रास व अपयश प्राप्त होईल. ज्या तरुण मुलींचा किंवा तरुणींचा वर्षप्रवेश १२ व्या तारखेला होईल त्यांचीं लग्नें होतील, लग्नासंबंधानें गोष्टी निघून स्थळयोजना होईल. परंतु पुरुषांना मात्र या दिवशीं वर्षप्रवेश झाला तर साधारणच वर्ष जाईल. १६ वी तारीख वर्षप्रवेशाला शुभ नाहीं भांडणतंटे दर्शविते. १८ व्या तारखेला ज्यांचे वर्षप्रवेश होतील त्यांना ऑगस्ट महिन्यामध्यें कोणीतरी फसवील व वर्ष साधारणच जाईल. २१ वीला वर्षप्रवेश होईल त्यांना वर्ष चांगलें जाईल. व ज्यांना कलाकौशल्याची गोडी असेल त्यांना या वर्षामध्यें चांगला अनुभव व नांवलौकिक मिळेल. २२ वीला वर्षप्रवेश झाल्यास शरीर प्रकृती चांगली राहणार नाहीं व सांपत्तिक सुख चांगलें मिळणार नाहीं. २४ व्या तारखेला ज्यांचा वर्षप्रवेश होईल त्यांची सर्व प्रकारानें उन्नती झालेली पाहण्यास मिळेल.

ज्यांचे जन्म ३ ऱ्या एप्रिलला किंवा ६ व्या ऑक्टोबरला झालेले असतील त्यांना या महिन्यामध्यें त्रास होईल, त्यांचो शरीर प्रकृती चांगली राहणार नाहीं, सांपत्तिक अडचणी भासतील. त्याचप्रमाणें ८ व्या मार्चला किंवा १० व्या सप्तेंबरला ज्यांचे जन्म झालेले असतोल त्यांना या महिन्यामध्यें अपघात, भांडणतंटे यांपासून त्रास होईल. त्यांच्या गोष्टींमध्यें एकदम अडथळे उत्पन्न होतील.

जुलई.—४ थ्या तारखेला ज्यांचे वर्षप्रवेश येतील त्यांना थोडाबहुत त्रास होईल परंतु ज्यांना कलाकौशल्य, वाङ्मय यांची जोडी असेल त्यांना हें वर्ष प्रगतीपर जाईल. ६ व्या तारखेला ज्यांचा वर्षप्रवेश असेल त्यांना चालू वर्षामध्यें बऱ्याच संकटांना तोंड द्यावयाचें आहे असें म्हटलें असतां हरकत नाहीं. १२ व्या तारखेला तरुण तरुणीचे वर्षप्रवेश झाले असतां विवाह होतील. संसारसुख चांगलें मिळेल, संपत्ति मिळेल. १३ वी तारीख वर्षप्रवेशाला चांगली असून उद्योगधंदा रोजगार यांमध्यें बढती दर्शवीत आहे. परंतु १४ वी तारीख इतकी चांगली नाहीं. ज्यांचे वर्षप्रवेश या तारखेला होतील त्यांना या वर्षीं त्रास, भांडणें, शत्रुत्व प्राप्त होईल. २० व्या तारखेला वर्षप्रवेश झाला तर शरीर प्रकृती चांगली राहणार नाहीं. व अनेक भानगडी उत्पन्न झालेल्या पाहण्यास मिळतील. परंतु ज्यांचें वर्षप्रवेश २१ व्या तारखेला होतील त्यांना चालू वर्ष फारच सुखकर जाईल सांपत्तिक सुख चांगलें मिळेल. २२ वी तारीख उद्योगधंदा या दृष्टीनें वर्षप्रवेशाला चांगली आहे. २६ व्या तारखेला ज्यांचा वर्षप्रवेश असेल त्यांना चालू वर्षामध्यें अपघातापासून फारच भय आहे. ३१ वी तारीख वर्षप्रवेशाला फारच अनिष्ट आहे. ज्यांचे जन्म नव्हेंबरच्या १ ल्या तारखेला झालेले आहेत त्यांना या महिन्यामध्यें सांपत्तिक लाभ घडतील तर ज्यांचे जन्म १३ जुलई किंवा ११ जानेवारीला झालेले असतील त्यांन या महिन्यामध्यें अपघाताचें भय आहे.

अगास्ट.—१ ली तारीख वर्षप्रवेशाला चांगली नाहीं. प्रत्येक कृत्य विचारानें व जपून केलें पाहिजे. ३ ऱ्या तारखेला ज्यांचे वर्षप्रवेश होतील त्यांना सांपत्तिक अडचणी फार भासतील. आद्यापेक्षां खर्चच जास्त झालेला पाहण्यास मिळेल. उद्योगधंदा देखील चांगला चालणार नाहीं. ८ वीला ज्यांचा वर्षप्रवेश होईल त्यांना शारीरिक दृष्ट्या चांगलें वर्ष जाईल असें दिसत नाहीं. व ह्या दिवशीं ज्यांना सर्दीचे विकार होतील किंवा ताप येईल त्यांचें दुःखणें विकोपास जाईल. ११ व्या तारखेला स्त्रियांचा वर्षप्रवेश चांगला नाहीं. तरुण स्त्रियांचा वर्षप्रवेश या दिवशीं होत असतां त्यांना फारच वाईट आहे. त्यांनीं सहसा कोणावर विश्वास टाकून एकटें दुकटें फिरण्याचें किंवा स्वैरवर्तन करण्याचें धाडस करूं नये. कारण त्यामुळें त्यांचेवर बिकट प्रसंग येईल व बेअब्रू होण्याचा प्रसंग येईल. याकरितां आपण कोणाबरोबर स्नेहसंबंध ठेवीत आहों याचा पूर्वी पूर्ण विचार करावा. १२ व्या तारखेला ज्यांचा वर्षप्रवेश होईल त्यांना अपघात व चोरापासून उपद्रव होईल. सांपत्तिक दृष्ट्या वर्ष चांगलें जाणार नाहीं. प्रत्येक व्यवहार जपून करावा. या दिवशीं बहुधा भूकंप झालेला पाहण्यास मिळेल. १४ वी तारीख वर्षप्रवेशाला साधारण ठीक आहे. थोडाबहुत त्रास होईल. परंतु १६ वी तारीख फारच अशुभ आहे, शरीर प्रकृती चांगली राहणार नाहीं. सांपत्तिक अडचणी भासतील. १८ वी तारीख तरुण स्त्रियांच्या वर्षप्रवेशाला फारच अनिष्ट आहे. २३ वी तारीख वर्षप्रवेशाला अनिष्ट आहे. स्वैरवर्तनाला आळा घातला पाहिजे नाहींतर अनिष्ट गोष्टी घडतील. २६ वी तारीख स्त्रियांच्या वर्षप्रवेशाला चांगली नाहीं त्यांची शरीर प्रकृती चांगली राहणार नाहीं. २७ व्या तारखेला ज्यांचे वर्षप्रवेश येतील त्यांना चालू वर्षामध्यें कुटुंबामध्यें कलह झाल्यामुळें त्रास होईल.

ज्यांचे जन्म तारीख ८ आगस्ट किंवा ४ फेब्रुवारीला झालेले असतील त्यांनीं या महिन्यामध्यें फार सावधगिरीनें वागलें पाहिजे. या माणसांस अग्नि व इतर अपघाताचें या महिन्यामध्यें भय आहे. ज्यांचे जन्म ११ ऑगस्ट व ७ फेब्रुवारीला झालेले असतील त्यांना विश्वासघात, लफंगेपणा यामुळें फारच भानगड व त्रास उत्पन्न होईल करितां या मंडळीनें सहसा या काळामध्यें कोणावर विश्वास टाकूं नये. याचप्रमाणें थोडयाबहुत प्रमाणानें ज्यांचे जन्म ३ फेब्रुवारी व ६ आगस्टमध्यें झाले असतील त्यांना या महिन्यामध्यें अनुभव पाहण्यास मिळेल. साधारणपणें ज्यांचे जन्म फेब्रुवारीच्या पहिल्या ३।४ तारखेपर्यंत व आगस्टच्या पहिल्या आठवडयामध्यें झालेले आहेत त्यांना व्यापार, धंदारोजगार व कौटुंबिक सुखासंबंधानें हा महिना फारच विघातक दिसत आहे.

सप्तेंबर.—८ वी तारीख वर्षप्रवेशाला चांगली नाहीं. उद्योगधंद्यासंबंधानें भानगडी उत्पन्न होतील व त्रास होईल. ९ वी तारीख फारच अशुभ आहे. व विशेषतः वयातीत माणसांचा या तारखेला वर्षप्रवेश झाला तर त्यांना फारच त्रास होईल. १० वी तारीख जरी थोडी खटपट दर्शवीत आहे तरी वर्षप्रवेशाला चांगली आहे. उद्योगधंदा चांगला चालेल परंतु कुटुंबातील पुरुष नातेवाईकांचा मृत्यु होईल. १२ वी तारीख वर्षप्रवेशाला चांगली आहे. उद्योगधंदा चांगला चालेल. २३ व्या तारखेला वर्षप्रवेश झाला तर धंदारोजगार यामध्यें घडामोडी होतील; मन उदास होईल व प्रत्येक कामामध्यें माघार येईल. परंतु ज्यांचा वर्षप्रवेश २९व्या तारखेला होईल त्यांना सर्व प्रकारानें वर्ष चांगलें जाईल. **ज्यांचे जन्म ८ मार्च किंवा १० सप्तेंबरला झाले असतील त्यांना या महिन्यामध्यें त्रास उत्पन्न होईल, कुटुंबामध्यें मृत्यु घडतील, प्रकृती चांगली राहणार नाहीं.**

आक्टो र.—६ वी तारीख वर्षप्रवेशाला अशुभ आहे; गुप्तशत्रूकडून त्रास होईल. ९ व्या तारखेला ज्यांचा वर्षप्रवेश होईल त्यांच्या वाटयाला चालू वर्षामध्यें अपयश व दुःख येणार आहे. १० वी तारीख शरीरप्रकृतीच्या दृष्टीनें व सांपत्तिक दृष्टीनें चांगली दिसत नाहीं, परंतु १२ वीला ज्यांचे वर्षप्रवेश होतील त्यांना सांपत्तिक लाभ होऊन वर्ष सुखकर जाईल. १७ व्या तारखेला ज्यांचे वर्षप्रवेश होतील त्यांचे कपाळीं फारच कष्ट लिहिलेले दिसत आहेत. २१ वी तारीख इतकी चांगली वर्षप्रवेशाला आहे असें वाटत नाहीं. उगीच कांहींतरी भानगडी उत्पन्न होऊन उद्योग धंदा चांगला चालणार नाहीं. त्याचे प्रमाणें २९ व्या तारखेला ज्यांचे वर्षप्रवेश होतील त्यांचें वर्ष वाईट जाईल. मन संशयानें ग्रस्त झालेलें पाहण्यास मिळेल. काय करूं कसें करूं असा विचार करण्यांतच वेळ निघून जाईल.**ज्यांचे जन्म तारीख १९ ऑक्टोबर किंवा १२ एप्रिल किंवा १३ एप्रिलला झालेला असेल त्यांना आतां त्रास होईल. कुटुंबामध्यें पुरुष नातेवाईकांचे मृत्यु होतील.**

नव्हेंबर.—साधारणपणें ज्यांचा जन्म ८ व्या तारखेच्या सकाळीं झालेला असेल त्यांना वर्ष चांगलें जाणार नाहीं परंतु संध्याकाळ नंतर वर्षप्रवेश किंवा जन्म होत असतां वर्ष साधारण बरें जाईल. ६ वी तारीख वर्षप्रवेशाला इतकी चांगली आहे असें म्हणतां येत नाहीं. ज्यांचा वर्षप्रवेश ७ व्या तारखेला होईल त्यांना या वर्षामध्यें नुकसान आजार प्राप्त होईल. ९ व्या तारखेला ज्यांचा वर्षप्रवेश होईल त्यांना या वर्षामध्यें अनेक प्रकारचे सांपत्तिक लाभ होतील. वर्ष सुखकर जाईल. १३ व्या तारखेला ज्यांचा वर्षप्रवेश होईल त्यांना हें वर्ष सुखकर जाणार नाहीं. बऱ्याच भानगडी होतील. १६ व्या तारखेला ज्यांचा वर्षप्रवेश होईल त्यांचा उद्योग धंदारोजगार चांगला चालेल. १७ वी तारीख वर्षप्रवेशाला इतकी चांगली नाहीं.

ज्या गोष्टी वर्षफळामध्यें दर्शविलेल्या आहेत तशाच गोष्टी जगामध्यें त्या त्या तारखेला झालेल्या पाहण्यास मिळतील. ज्या दिवशीं अपघातप्रचुर वर्षप्रवेश आहे असें लिहिलें आहे त्या दिवशीं अग्निप्रलय, अपघात, लढाईच्या बातम्या, दंग्याच्या बातम्या आलेल्या वांचण्यास मिळतील. प्रत्येक महिना कोणास विशेष चांगला किंवा वाईट जाईल हें कळण्याकरितां प्रत्येक महिन्यामध्यें महत्वाचा भाग मोठया टाईपामध्यें दिलेला आहे.

नुसत्या अवकहडा चक्राप्रमाणें राशिनाम ठरवून किंवा प्रत्येक ग्रह ज्या वस्तूंचा किंवा धंदयाचा कारक आहे त्यांस होणाऱ्या शुभाशुभ दृष्टीप्रमाणें त्या त्या धंदयामध्यें व्यवहार करणाराला चांगला अगर वाईट काल जाईल हें म्हणणें विशेष धारिष्टाचें आहे. फार झालें तर त्या त्या वस्तूच्या व्यवहारामध्यें भावामध्यें फेरफार होतील. परंतु जो काल एकाला वाईट जाईल तो दुसऱ्याला लाभकारक खात्रीनें जाणार हें निर्विवाद आहे. जेव्हां कोणी एखादा कोणताही जिन्नस विकण्यास निघेल त्या वेळीं समोरच तोच जिन्नस विकत घेणारा दुसरा तेथें असलाच पाहिजे. विकणाराला तोटा होईल तर घेणाराला लाभ हा खात्रीनें झालाच पाहिजे. अमुक एक दिवस धंदयामधील लोकांना वाईट जाईल म्हणून कोणी उद्योगधंदे सोडून व्यवहार बंद करून बसत नाहीं!! तसेंच मेषवृषभादि बारा राशींना अमुक काळीं अमुक ग्रह अनिष्ट येतात हें थोडक्याच प्रयत्नानें किंवा आमच्या **ग्रहसाधन** पुस्तकाचे साह्यानें आज २०० किंवा ४०० वर्षांचें आगाऊ प्रसिध्द करतां येईल परंतु यानें अचुक कालज्ञान होतें काय? जगांत सर्व बाराच प्रकारानें सुखदुःख भोगणारे देश किंवा प्राणी आहेत काय? याहीपेक्षां पुढें जाऊन नक्षत्रावर सूक्ष्मपणा नेऊन २७ चे १०८ विभाग केले तरी उत्तम कालज्ञान होतें किंवा काय याचा प्रत्येकानें

आपल्या मनाशींच विचार करावा. याप्रमाणें भविष्यज्ञान बाजारांतल्या किंवा परसांतल्या पालेभाजी इतकें सवंग असतें तर जन्मकाल, सूक्ष्मजन्मकाळ, जन्मकुंडली त्यावरून दशा अंतर्दशा वगैरेकरितां कंठशोष करणारे आर्य ऋषिवर्य, आचार्य महामूर्ख ठरत नाहींत काय? मग जन्मकुंडली किंवा जन्मकाळच्या ग्रहांचें महत्व कोठें राहतें? किंवा त्यांचा मुळींच जातकांत उपयोगच होत नाहीं? फक्त १२ राशिपैकीं जन्मराशि कळली म्हणजे जन्मकाळीं मिळणाऱ्या स्थितीप्रमाणेंच पुढें येणाऱ्या राशीला जसें गोचर ग्रह शुभाशुभ येतात त्याचप्रमाणें बिनचूक फळें मिळतात काय? ज्यांना जन्मकाळ माहित नाहींत किंवा फक्त जन्म झाल्यावर जोशाला विचारून फक्त नांव राशि करणाऱ्या कांहीं विशिष्ट संस्काररहित जातींचें मासिक भविष्य फार झालें तर याप्रमाणें बरोबर येईल. मंगळवारीं जन्म झाला म्हणून मंगळ्या नांव ठेवणाऱ्या जातींचें भविष्य व उक्रांति तत्त्वाप्रमाणें आत्मपरिणत झालेल्या उच्च वर्णांचें भविष्य एकाच पध्दतीनें होतें काय? आर्य ज्योतिषवाङ्मयांत असा भेद नाहीं काय? सर्वत्र गोष्टी सर्वांना सारख्या पाहण्यास सांगितल्या आहेत काय? उत्तम बुध्दिविकास पावत आहे अशा ज्ञातीमधील मुलाचे कुंडलीमध्यें बुध्दीचा विकास दर्शविणारा योग व एखाद्या केंकाडणीच्या मुलाच्या कुंडलीमधील तोच योग सारखें फळ दर्शवितो काय? नुसत्या बारा राशींवरून वर्षफलाचें चोपडें प्रसिध्द करून फेंकणारांनीं या गोष्टीचा विचार केला असतां बरें होईल यानें शास्त्रसंशोधनाचे कामांत मदत न होतां शास्त्राचे पाय तोडण्याचा प्रयत्न होत आहे. वर्षभविष्य करण्याचा इतका सवंग सवता मार्ग असता तर आमच्या या आधुनिक शास्त्रीपंडितांनीं आमच्या हिंदुस्थान देशाचे हजारों वर्षांचे अगदीं खडान खडा आणि अक्षराक्षर भविष्य चोपून करून एक नवीनच भविष्य

थोडयाबहुत अडचणी प्राप्त होतील. २० व्या तारखेला वर्षप्रवेश झाला तर उद्योगधंदा रोजगार वाढेल, सांपत्तिक दृष्ट्या वर्ष सुखकर जाईल. या महिन्यांतील २२ वी तारीख वर्षप्रवेशाला फारच उत्तम आहे, उद्योगधंदा, रोजगार, सांपत्तिक सुख चांगलें मिळेल. परंतु ३० व्या तारखेला ज्यांचे वर्षप्रवेश होतील त्यांनीं संकटांना तोंड देण्यास कंबर बांधली पाहिजे. ज्यांचा जन्म १८ व्या नव्हेंबरला झालेला असेल त्यांना या महिन्यांत अनेक प्रकारचे लाभ होतील, उद्योगधंदा जोराने चालेल. व्यवस्थित रीतीनें पुढें येण्याचा प्रयत्न केला असतां चांगला जम बसून पुढें पाऊल पडेल, सांपत्तिक भरभराट होईल, कित्येकाचे विवाह होतील. ज्यांचा जन्म १३ व्या ऑगस्टला किंवा ९ व्या फेब्रुवारीला झालेला असेल त्यांना या महिन्यामध्यें फारच धास्ती आहे त्यांनीं आपले उद्योगधंदे व इतर व्यवहार जपून करावे व कित्येकांच्या अब्रूला धक्का बसेल तर कित्येकांना या महिन्यामध्यें दिवाळें फुंकण्याची पाळी येईल. त्याचप्रमाणें ज्यांचे जन्म ९ व्या मार्चला किंवा ७ व्या सप्तेंबरला झालेले असतील त्यांना या महिन्यामध्यें त्रास होईल, संकटें येतील, सांपत्तिक अडचणी उत्पन्न झालेल्या पाहण्यास मिळतील.

डिसेंबर २ व्या तारखेला ज्यांचा वर्षप्रवेश होईल त्यांना अपघात वगैरेची भिती आहे. याहीपेक्षां ४ थ्या किंवा ५ व्या तारखेला ज्यांचे वर्षप्रवेश होतील त्यांना काल फारच वाईट जाईल. ६ व्या तारखेला ज्यांचे वर्षप्रवेश होतील त्यांनीं आपल्या धन्याबरोबर किंवा अधिकारीवर्गाबरोबर जरा जपून वागावें नोकरींत त्रास दगदग खटके उडतील. वर्ष साधारण ठीक जाईल. परंतु ७ वीला ज्यांचा वर्षप्रवेश होईल त्यांना एकंदर वर्ष बरें जाईल सांपत्तिक लाभ होतील. पैशाची अडचण भासणार नाहीं. त्याचप्रमाणें ९ वीला ज्यांचें वर्ष बसेल त्यांचा उद्योग धंदारोजगार चांगला चालेल बढती मिळेल. कित्येकांचे विवाहसंबंध घडतील. १४ वी तारीख वर्षप्र-

वेशाला इतकी चांगली नाहीं. व २७ वी तारीख वर्षप्रवेशाला फारच प्रतिकूल आहे. इतर कोणाबरोबर व्यवहार करते वेळीं जपून वागावें. सहसा विश्वास लागेल त्यावर टाकून बसूं नये. ज्यांचे वर्षप्रवेश १९ एप्रिल किंवा २२ ऑक्टोबरला झालेले असतील त्यांच्या कार्यक्रमांमध्यें या महिन्यामध्यें एकदम घोंटाळे माजतील. नोकरी सुटेल तर अधिकारी वर्गाबरोबर खटके उडतील. या लोकांनीं या महिन्यामध्यें जपून वागावें, प्रवास करते वेळीं सावधपणें रहावें, अपघात पडणें, लागणें, इत्यादि गोष्टी घडतील. जोखमीचे व्यवहार करूं नयेत, सट्टे वगैरेमध्यें जाऊं नये. एकंदर विचार करितां फार सावधपणानें वागलें पाहिजे.

असो, येथपर्यंत प्रत्येक व्यक्तीला सन १९२३ साल साधारणपणें कसें जाईल याचा खुलासा केलेला आहे. हें वर्षफलाचें धोरण कोणत्या तत्त्वाला धरून केलेलें आहे याचा उल्लेख प्रथमच केलेला आहे. व जे कोणीं स्पष्ट ग्रहांचें पुस्तक घेऊन त्या त्या दिवशीं होणारे दृष्टियोग पाहतील त्यांच्या लक्षामध्यें भविष्य कसें केलें आहे हें सहज येईल. प्रत्येक व्यक्तीचो कुंडली भिन्न असते व त्याप्रमाणें फलेंही भिन्न अशींच पाहण्यास मिळालीं पाहिजेत म्हणून सर्वसाधारण गोष्टी सारख्याच प्रत्येकाच्या अनुभवास येतील असें म्हणतां येणार नाहीं. ज्यांचे जन्मकाळचे रविचंद्र बिघडलेले असतील त्यांचें वर्षप्रवेश वाईट दिवशीं झाले असतां त्यांना तीव्र कटु अनुभव पाहण्यास मिळेल. जे जे योग कुंडलीमध्यें नसतील ते योग वर्षफलानें कधींच प्राप्त होत नाहींत ही गोष्ट फारच महत्वाची आहे. कुंडलीमध्यें सांपत्तिक सुख सर्व प्रकारचें चांगलें मिळण्याचा जन्मकाळचा योग असतां वर्षकाळीं भयंकर अडचणी दिसणारा किंवा दिवाळें काढणारा योग उत्पन्न झाला तर त्रास होईल परंतु दिवाळें निघणार नाहीं. अपघात होण्याचा योग नसतां अपघात होऊन मृत्यु घडणार नाहीं. साधारणपणें

पुराण निर्माण केलें असतें. परंतु एकाला देखील **सत्याग्रह चळवळ कां झाली ? टिळक** अमुक वेळेला कां मेले ? व त्यानंतर माहात्मा **गांधी** पुढें येऊन कर्णधार कां झाले ? मुळशीचें रणकंदन अमुक वेळीं अशा तऱ्हेनें उत्पन्न होईल तर तारीख १९ एप्रिलच्या सुमारास **जालियनवाला** बागेमध्यें धुमश्चक्री उडेल तर शिखांच्या दाढी मिशांची व किरपाणाची अमुक वेळेला ओढाताण होऊन शंकराचार्यांना खडतर तुरुंगवास करावा लागेल याचो कल्पना या पंडितांना काळाच्या उदरामध्यें शिरून करितां आलेली नाहीं. हें मात्र निर्विवाद दिसत आहे. वर्षभविष्याच्या गप्पा झोंकणें व शास्त्रोक्त भविष्य करणें यामध्यें कानाडोळ्या इतकेंच अंतर आहे. वर्षभविष्याची कल्पना शास्त्रोक्त रीतीनें करितां येतें किंवा नाहीं याचो थोडो तरी अंधुक कल्पना आमचे ज्योतिर्मालेमधील भविष्यें खात्री करून देतील. व जे आमचें **मेदिनीय ज्योतिष** किंवा **राष्ट्रीय ज्योतिष** नांवाचें पुस्तक वाचतील त्यांनाही आमच्या इतकेंच चांगलें किंवा याहूनही सरस भविष्य करितां येईल अशो खात्री आहे. चालू वर्षामधील व्यक्तिविषयक भविष्य कसें अनुभवास उतरलें याविषयीं आम्हांस पत्रद्वारें आमच्या वाचकांनीं कळविल्यास आम्हीं त्यांचे अत्यंत आभारी होऊं व पुढील सालीं यामध्यें कोणत्या धोरणावर सुधारणा करणें इष्ट आहे याची कल्पना करण्यास आम्हांस जागा मिळेल. यासंबंधानें वाचक वर्ग सूचना करतील त्याप्रमाणें पुढील सालीं अवश्य लक्ष्य देण्यांत येईल. आमचे वाचक या आमच्या विनंतीकडे लक्ष देतील काय ?

सर्वे वै सुखिनः सन्तु सर्वे सन्तु निरामयाः ।
सर्वे भद्राणि पश्यन्तु मा कश्चित् दुःखमाप्नुयात् ॥

———:०:———

पर्जन्यनूतन विचाराची संक्षिप्त माहिती.

(लेखक. दा. भा. बापट, खेड, रत्नागिरी.)

सूचना.-रा. रा. दा. भा. बापट यांचे पर्जन्यासंबंधी चालू असलेले नवीन शोध आमच्या वाचकांस कळावेत या हेतूनें हा लेख मुद्दाम मालेमध्यें प्रसिद्ध केला आहे. हा लेख आमच्या मताप्रमाणें आहे किंवा या लेखामध्यें प्रतिपादन केलेले विचार आम्हांस पूर्ण मान्य आहेत असें कोणीही समजूं नये. यासंबंधानें लवकरच एक स्वतंत्र लेखांची माला प्रसिद्ध करण्याचा आमचा विचार आहे. किंवा जमल्यास एक स्वतंत्र पुस्तक प्रसिद्ध करण्यांत येईल. संपादक.

ऋतूंचीं कारणें.

पृथ्वीची वार्षिक गति, पृथ्वीच्या कक्षेशीं तिच्या आंसाचा ६६॥ अंशाचा कोन, पृथ्वीच्या आंसाचा रोख कधींही बदलत नाहीं, सूर्यापासून पृथ्वीस उष्णता मिळते, हीं कारणें ज्योतिषांत सांगितलीं आहेत.

ऋतूंचें नवें कारण.

वरील कारणांमुळें दिवस रात्र यांचें मान मात्र प्रत्ययास येतें पण हवामान मात्र प्रत्ययास येत नाहीं. सूर्याच्या उष्णतेशिवाय बुध, शुक्र, मंगळ, गुरु यांजपासूनही रवीशीं युति होते त्या वेळीं उष्णता, पृथ्वीस मिळते व वरील कारणांशिवाय रविग्रहयुति हें एक नवीन कारण ऋतु होण्यास आहे, ही गोष्ट आम्ही पर्जन्यनूतन विचार या पुस्तकांत सिध्द केली आहे. युति व पावसाळा यांच्या मधील संबंध सृष्टिशास्त्रदृष्ट्या कसे जुळते आहेत तें दाखून सिध्दता केलेली आहे. या नवीन पध्दतीचें महत्त्व लक्षांत येण्याकरितां पावसाचें अनुमान करण्याच्या ज्या इतर पध्दति आज चालू आहेत त्या पुढें दिल्या आहेत.

पावसाचें अनुमान करण्याच्या चालू असलेल्या इतर पध्दति.

१ फल ज्योतिषाप्रमाणें अनुमान करणें:---फल ज्योतिष शास्त्रांत रविग्रह, ग्रहग्रह, यांची युति, प्रतियुति, व त्यांमधील नियमित स्थिति म्हणजे केंद्रयोग, ६०।९०, अंशांचा कोन इत्यादि प्रकारावरून पावसाचें अनुमान करितात पण तींत सृष्टिशास्त्रदृष्ट्या काय संबंध आहे हें दाखविलेलें नाहीं. आमच्या पध्दतींत रविग्रहयुति आहे व तिचा सृष्टिशास्त्रदृष्ट्या पावसाशीं संबंध काय पोंचतो हें दाखविलें आहे. युतीशिवाय इतर संबंध आम्ही पाहतही नाहीं. अशा रीतीनें आमच्या पध्दतींत आणि फलज्योतिष पध्दतींत फरक आहे.

२ ढगांची स्थिति:---मेघांचा स्थिति म्हणजे त्यांचा आकार, त्यांची गति, त्यांची दिशा यांवरूनही पावसाचें अनुमान करितां येतें पण तें चालू काळापुरतें असतें. भविष्य काळाचें पावसाचें अनुमान त्यावरून होत नाहीं.

३ स्थानिक गोष्टी:--काजवे, बेडूक, सरडे, कांहीं पक्षी, कांहीं प्राणी, चिंच, पिंपळ, इत्यादि झाडें, कांहीं ठिकाणचें पाणी व समुद्र यांवरूनही पावसाचें अनुमान करितां येतें पण तें चालू काळापुरतें असतें व सर्वकाळ करितांही येत नाहीं. यांवरून भविष्य काळचें अनुमान होत नाहीं.

४ हवेची स्थिति:--हवेचें वजन, तिची उष्णता, तिचा ओलसरपणा, तिचा वाहण्याचा वेग, व दिशा ह्यांवरूनही पावसाचें अनुमान करितां येतें पण तें चालू काळापुरतेंच असतें त्यांवरून भविष्य काळचें अनुमान होत नाहीं.

आज चालू काळीं आमच्या नवीन पध्दतींशिवाय, पावसाचें अनुमान करण्याच्या वर सांगितलेल्या चार पध्दति आहेत. त्या पध्दतींची शक्ति

काय आहे हें वर सांगितलेंच आहे. या पध्दतीशिवाय इतर पध्दति नाहींत. आज काल चालू असलेल्या सर्व पध्दतींत आमचीच नवी पध्दति श्रेष्ठ आहे, व ती पुढील काळाचें पावसाचें अनुमान करण्यास समर्थ आहे. तिचें बिस्तृत विवेचन पर्जन्यनूतनविचार यांत केलेलें आहे. ता० १४ जून १९२१च्या केसरीच्या अंकांत विद्वान संपादकांनीं अभिप्राय दिला आहे. त्यांतहो "अनेकांचे अनेक दिशांनीं प्रयत्न चालले आहेत पण अद्यापि पावसाचें भविष्य तंतोतंत बरोबर जुळेल अशी रीति कोणीच बसविली नाहीं. त्यांतल्या त्यांत रत्नागिरी जिल्ह्यांतील केळशी गांवच्या लोकल बोर्ड शाळेचे हेडमास्तर दामोदर भास्कर बापट यांचें पर्जन्यनूतन विचार हें पुस्तक पावसाच्या भविष्याची दिशा दाखविण्यास उपयुक्त होईल" असें श्रेष्ठत्व दिलें आहे. यावरूनहो वरील आमच्या लिहिण्यास बळकटी येते. शेवटचा निर्णय प्रत्यक्ष अनुभवावरून करावयाचा आहे. ही गोष्ट खरी आहे तथापि आमची पध्दति निर्दोष होण्यासही अनुभवच पाहिजे आहेत. म्हणजे ही चुकत चुकत दुरुस्त होणारी गोष्ट आहे.

नवीन शोधाची स्पष्टता.

रवि व ग्रह हे अगदीं जवळ जवळ येतात तेव्हां रवि व ग्रह यांची युति झाली म्हणतात. ग्रह सूर्याभोंवती फिरत असतां तो सूर्याच्या दुसरे बाजूस (पृथ्वीच्या अंगास असेल त्याच्या विरुध्द बाजूस) येतो त्या वेळीं तो सूर्यानें पूर्ण प्रकाशित केलेली बाजू पृथ्वीकडे करितो म्हणून त्याच वेळेस ग्रहाकडून नेहमीपेक्षां अधिक उष्णता पृथ्वीकडे येते, अशा स्थितींत माध्यान्हाच्या वेळीं (दुपारीं) रवि व ग्रह हे दोघेही आपापली अत्यंत उष्णताच देतात. यामुळें इतर वेळापेक्षां युतीच्या वेळीं वातावरणास अधिक जोराची उष्णता मिळते व ही उष्णता वातावरणावर परिणामकारक होते, असें

पुष्कळ वर्षांच्या माहितीवरून दिसून येतें. पाऊस आणि युति यांचा संबंध सहज दृष्टीस पडतो. हीच पावसाचें अनुमान करण्याची मूळ कल्पना आहे व याच पायावर सर्व इमारत रचलेली आहे.

शोधाचे स्वरूप.

१ रविग्रह यांच्या युतीच्या वेळीं नेहमीपेक्षां अधिक उष्णता पृथ्वीस मिळते. या नियमाप्रमाणें बुध, शुक्र, मंगळ, गुरु या चार ग्रहांपासून मात्र उष्णता मिळून पावसाचें कार्य होतें. इतर शनि, नेपच्यून, युरेनस या ग्रहांपासून कांहीं उपयोग होत नाहीं. हे फार दूर आहेत हें त्याचें कारण होय.

२ रविबुध यांच्या युतीमुळें पावसाळा उत्पन्न होतो.

३ रविशुक्र यांची मोठी युति व रविमंगळ व रविगुरु या युति रविबुध युतीस मदत करितात. रविचंद्र युति ही मदत करिते.

४ रवीशीं कोणत्याही ग्रहाची (बुधाशिवाय) गतियुति झाली तरी ती पावसाच्या कामीं उपयोगी पडत नाहीं.

५ ग्रह स्वयंप्रकाश नसल्यामुळें ग्रहांग्रहाची युते, प्रतियुति उपयोगी पडत नाहीं. केंद्रयोग इतर असतें याचा विचारच नाहीं.

६ पावसास प्रतिबंध करणारी स्वतंत्र कारणें नाहींत. किंवा कोणताही ग्रह नाहीं. किंवा त्यांची स्थिति नाहीं. युतींची होणारी रचना हीच पाऊस वाढविणारी किंवा कमी करणारी आहे. म्हणून युतींच्या रचनेकडे लक्ष दिलें पाहिजे.

७ रविबुधाची युति हेच पावसाचे योग आहेत. शुक्र मंगळ गुरु यांच्या रवीशीं झालेल्या युति ह्या मदती आहेत. रविबुधाच्या मोठया युतीस (म) म्हणावें व लहान युतीस (ल) म्हणावें.

८ मोठा योग युतीपूर्वी व नंतर १३।१३ दिवस असतो. योग युतीपूर्वी व नंतर ७।७ दिवस असतो. शुक्र व मंगळाची मदत युतीपूर्वी व नंतर ३७।३७ दिवस असते. गुरूची मदत युतीपूर्वी व नंतर १३।१३ दिवस असते.

९ युतीपूर्वीचें पूर्वार्ध युतीनंतर उत्तरार्ध असे युतीच्या काळांत दोन भाग आहेत. पावसाच्या योगापासून २७ वा व ४५वा हे दिवस असे योगाच्या कार्याचे दोन भाग आहेत. पावसाच्या योगाच्या वरील चार भागांपैकीं कोणत्या भागांत पाऊस पडावयाचा व तो कोठें पडावयाचा व किती इंच पडावयाचा हें ठरविणें मुख्य काम असतें.

पावसाचें अनुमान करण्याची पद्धति.

चालू वर्षांत असलेल्या रविबुधाच्या युति व त्यांस मदत करणाऱ्या शुक्र, मंगळ, गुरु ह्यांच्या युति यांच्याशीं समानता दाखविणारें पूर्वीचें एखादें वर्ष शोधून काढावें (या वर्षाचा तारीखवार, प्रदेशवार, व इंचवार, पाऊस माहीत असला पाहिजे) हें शोधून काढिलेलें वर्ष स्पष्ट वर्ष होय. चालू वर्ष हें इष्ट वर्ष होय. इष्ट वर्षाची स्पष्ट वर्षाशीं तुलना करून इष्ट वर्षाचें तारीखवार, इंचवार व प्रदेशवार अनुमान तयार करावें. ही पावसाचें अनुमान करण्याची तुलनात्मक पध्दति होय.

याप्रमाणें पर्जन्यनूतन विचार या पुस्तकांत मुद्देसूद उहापोह केला आहे. पृष्ठें ८० किं० १ रु.

जाहीरात. जोवेश कर्म सिध्दांत पृष्ठें १२८ किं० १ रु.

पावसाचें अनुमान किं० ४ आ.

——— ० ———

सन १९२३ चें पावसाचें अनुमान.

पावसाचे योग

अंक	योग व तारीख	मदत व तारीख	विशेष गोष्ट.
१	२८।१।२३ ल.		१९।१०।२२ ल मदत गुरु २४।१०।२२ हो पूर्वीची मदत आहे.
२	८।४।२३ म	चंद्र.	योगाच्या जवळच मदत आहे.
३	२९।५।२३ ल	... ...	पावसाळ्याचा पहिला योग.
४	२१।७।२३ म	मंगळ ८।८।२३ शुक्र १०।९।२३	
५	२८।९।२३ ल	चंद्र.	योगाच्या जवळ मदत आहे.
६	१६।११।२३ म	गुरु २३।११।२३	

पूर्व वर्षाचा जोर गुरु २४।१०।२२ याचा आहे. शिल्लक पाऊस नाहीं. व चालू वर्षीं उन्हाळ्यांत मदत नाहीं. गुरूचा विचार करण्याचें विशेष कारण नाहीं. गुरूमुळें उन्हाळ्यांत ढग वगैरे अधिक वेळां येतील यापेक्षां त्याचा उपयोग नाहीं. मागील मदतीमुळें पाऊस लवकर पडत नाहीं. अशी मागील रचना आहे.

पावसाचा पहिला योग लहान आहे व तो पावसाच्या मुदतीतच आहे ही लवकर पाऊस पडण्याची मुदत आहे. पण मागील जोर लवकर पाऊस पडण्याचा नाहीं.

आतां बेतानें पाऊस पडण्याचा टिपणास चंद्राची मदत आहे यामुळें तो बेतावरही पडत नाहीं म्हणून उशीरानें पाऊस पडेल म्हणजे पावसाची सुरवात उशीरानें म्हणजे ११--१३ जूनपर्यंत होईल. पण पावसाची सुरवात होईपर्यंत मधला काळ योगाचा असल्यामुळें संधियुक्त

असेल. रत्नागिरी किनारा ९।१० ता. मुंबई ११ सुरत वगैरे १२-१५ या तारखांपासून सुरवात होईल. या सुरवातीच्या पूर्वी ८।४।२३ म चा ३५ दिवसांपुढील पाऊस व २९।५।२३ चा मिळून मे १३ पासून पाऊस कोठें कोठें शिंतोडूं लागेल. जून १ पासून पाऊस पडेल पण उपयोग नाहीं. पाऊस नाहीं म्हटल्यास आहे. आहे म्हटल्यास नाहीं हें त्याचें वर्णन आहे. हा पाऊस म्हणजे १३ मेपासून तों जूनपर्यंत. विशेषत: सह्याद्रीस धरून पूर्व बाजूस पडेल; १३ जूनपासून पश्चिम किनाऱ्यानें येऊं लागेल. व देशावरांत पाऊस कमी होईल. ता० २० जूनपासून बराच व सर्वत्र पडूं लागेल. पण नगर सोलापूर, विजापूर इकडीलकमी होईल.

२१।७।२३ म योग हा ८।७।२३ पासून सूरू होतो व त्यापूर्वी मंगळ मदत येत आहे म्हणून १।७।२३ पासून पाऊस चांगला पडेल. पण २१।७।२३ पर्यंत कमी अधिक मानानें पाऊस आहे. हा कोंकण गुजराथ नागपूर वऱ्हाड या बाजूसच आहे. देशावर नाहीं. २० जुलई पासून २० आगस्टपर्यंत देशावर कांहीं पाऊस पडेल. पुढें कमी होईल. तथापि सपटंबर अखेरीस देशावर चांगला पाऊस पडेल. व नवंबरांतही देशावर पाऊस थोडा पडेल.

सृष्टरचना व तिचा परिणाम.

२१।७।२३म योग यास मंगळ व शुक्र यांची मदत येत आहे, यांस धरून २८।९।२३ ल हा मदत योग आहे ही सृष्टरचना आहे व तिचा परिणाम कसा होत आहे हें ता. १ जुलईपासून अकटंबर १० पर्यंत पहावयाचें आहे. योगास मदत असली म्हणजे पाऊस चांगला पडतो पण अधिक मदत झाली म्हणजे पाऊस कमीच पडतो. हा गोष्ट आगस्ट २० पासून २० सपटंबर पर्यंत पाहण्यास मिळेल.

पावसाचीं अनुमानें व कारणें.

१ मे ता० ५।६ व १८ ते २२ जून १ ते ३ यांत देश, (सह्याद्रीस लागून) वऱ्हाड, नागपूर, इंदूर, यांत वळोवाचे पाऊस पडतील. कोंकण, गुजराथ येथें बेतमात्र. ८।४।२३ मचा २७वा दिवस. आणि २९।५।२३लचा परिणाम. कृत्तिका व रोहिणी हीं नक्षत्रें आहेत.

२ जून ३ ते १५ पावसाची सुरवात. कारवार ७ गोवा ८ रत्नागिरी ९ मुंबई २१ सुरत १२ सह्याद्रीस लागून देश १८ इंदूर, नागपूर, वऱ्हाड १८ पर्यंत चांगली सुरवात होईल.हें मृग नक्षत्र आहे.२९।५।२३लचेंपहिलें कार्य आहे.

३ जून ३--३० पाऊस फार जोराचा नाहीं. काय जोर तो १३ ते २५ जून पर्यंत असेल. २९।५।२३ लचें २७ दिवसाचें कार्य आहे. ह्यांत मृग आणि आर्द्रा हीं दोन नक्षत्रें आहेत.

४ जुलै १ ते २८ पर्यंत कोंकण, गुजराथ येथें चांगला व इतर ठिकाणीं बेताचा पाऊस आहे. २१।७।२३ मचा पूर्वार्ध आणि मंगळाची मदत आरंभीची याचा परिणाम आहे. ह्यांत पुनर्वसु व पुष्य हीं दोन नक्षत्रें आहेत.

५ जुलई २९ पासून आगस्ट २९ पर्यंत पाऊस सर्वत्र आहे. आतां देशावर थोडा थोडा पडूं लागेल. २१।७।२३मचें उत्तरार्ध आणि मंगळ आणि शुक्र यांचा परिणाम आहे. ह्यांत आश्लेषा व मघा हीं दोन नक्षत्रें आहे.

६ आगस्ट २५ पासून अकटंबर ७ पर्यंत थांबून थांबून पाऊस पडेल. त्यांत देशावर सपटंबर अखेरीपासून अधिक पडेल तसा इतरही थोडा अधिक पडेल. २१।७।२३ म योग मंगळ ४।८।२३ मदत शुक्र १०।९।२३ मदत व २८।९।२३ लयोग व त्यांत येणारा चंद्र इतक्यांचें कार्य आहे, पण थोडें आहे. ह्यांत पूर्वा उत्तरा यांचा पाऊस कमी, हस्ताचा पाऊस बरा आहे.

७ नवंबर १६--३० पर्यंत कांहीं थोडा देशावर पाऊस आहे.

तारीखवार, इंचवार, ठिकाणवार अनुमान १९२३

रविबुधयुति (पावसाचे योग) पुढीलप्रमाणें आहेत. ८।४।२३ म, २९।६।२३ ल, २१।७।२३ म, (मदतमंगळ ८।८।२३, शुक्र १०।९।२३) २८।९।२३ ल (गु. २३।२।२३) १६।११।२३ म.

अंक	ठिकाण	जून ३ ते ३०	जुलई १ ते २८	२९ जु. ते २५ ऑ.	२५ आ. ते ९ अक.	एकूण.	इंचाचा आंकडा नक्की आंकडा नव्हे. अदमास समजण्याकरितां आंकडा आहे.
१	रत्नागिरी	२०	३५	३०	१५	१००	समुद्रकिनारा सम सह्या. पट्टा २० च.
२	मुंबई	१०	३०	३०	१०	८०	अलिबाग ठाणें सम सह्याद्रिपट्टा
३	सुरत	६	१०	१०	७	३३	अहमदाबा. ५ कमी भ. ५ कमी,,१५
४	इंदूर	५	५	१०	५	२५	देवास धार सम मार.राजपुता कमी ५
५	नागपूर	५	७	१०	७	२९	जबलपूर चढ १० चांदाचढ ५
६	अकोला	५	१०	१०	५	३०	उमरा. जळगांवसम पर्व खान. ५कमी
७	धुळें	१	२	१२	७	२२	नाशीक ५ चढ आरभीं दोहोंत
८	पुणें	५	७	१०	१०	३२	सा. १० चढ को. ५ चढ बे. २०चढ
९	नगर	१	२	७	१०	२०	सोलापूर ५ चढ विजापूर ५ कमी
१०	वावडा	५०	५००	५००	७०	३२०	आंबोली ते महाबळेश्वर सम इतर घाटमाथा फार कमी.
११	इच्छित						

१३ जून ते २५ जून पर्यंत जोर आहे. ८ जूलई पासून २८ जुलईपर्यंत जोर आहे.

मृग आर्द्रा पुनर्वसु पुष्य आश्लेषा मघा पू. उत्तरा-उ. ह.

२९ जुलई पासून आगस्ट १५ पर्यन्त कांही वेताचा आहे. या मुदतींत देशावर पाऊस पडेल. २२ सप्टंबरपासून अक्टंबरपर्यन्त देशावर पाऊस बरा आहे.

॥ श्रीसद्गुरवे नमः ॥

ज्योतिर्माला

आप्राचः कामरूपादद्रुहिणसुतनदप्लाविताद्रामठीचो
गान्धारात् सिंधुसार्द्राद्रघुवररचिताद्याचसेतोरवाचः ।
आकेदारादुदीचस्तुहिनगहनतः सन्तिविद्वत्समाजा
ये ये तानेष यत्नः सुखयतु समजान्कश्चमत्कर्तुमीष्टे ॥ १ ॥

अभिनवाऽऽवृत्ति वर्ष ७ वें अंक ४ ते ६.

भविष्याचे दोन मासले.

(लेखकः- राम नारायण.)

अलीकडे नुकतेंच मुंबईमध्यें " The Voice Celestial " या नांवाचें मासिक पुस्तक सुरू झालें आहे. फलज्योतिष व तत्सदृश विषयांसंबंधानें " लोकभाषेंत " चर्चा करण्याकरितांच या मासिकाचा उदय झाला असल्याचें त्याच्या मुखपृष्ठावरच नमूद केलेलें आहे. हें मासिक इंग्रजी भाषेंत निघतें व त्याचे संपादक N. M. Mayancot B. A. L L. B. हे आहेत. मासिकावर दृष्टि टाकतांच मोठमोठ्या विषयांची 'अनुक्रमणिका' व मोठ्या पदवीधरानें फलज्योतिषशास्त्राच्या चर्चेला " Popular language " मध्यें केलेला उपक्रम पाहिला म्हणजे कोणीही फलज्योतिष-प्रेमी आशेनें मासिकाचीं पानें उलटूं लागेल. मासिकांतील " Mahatma Gandhi's Horosocope and the Future of India " हा लेखाचा मथाळा पाहूनच ज्योतिषव्यासंगी तर काय पण

फलज्योतिषाचो कुचेष्टा करणारे **भा**रताचार्यांना सुध्दां प्राचीन इतिहास क्षणभर बाजूस ठेऊन हा भावी इतिहास आहे तरी काय हें पहाण्याची जिज्ञासा होईल. विषय अत्यंत महत्त्वाचा आणि तोही एका डबल ग्रॅजुएटानें हातीं घेतलेला मग लोकांची जिज्ञासा अधिक कां वाढणार नाहीं ! याच कारणाकरतां मुंबईच्या **क्रॉनिकल** पत्रानें एक कालमभर उतारा घेऊन फलज्योतिषशास्त्रदृष्ट्या (?) आधुनिक विद्वानाचें अपूर्व भविष्य अधिक प्रसिध्दीस आणलें आहे. **ज्यो**तिर्मालेच्या पुष्कळशा वाचकांना हें इतकें प्रसिध्दीस आलेलें भविष्य सुध्दां कदाचित मिळालें नसेल व कांहीं वाचकांना भविष्याची "लोकभाषा" येत नसेल हें संभवनीय असल्यामुळें त्याची ओळख येथें मुद्दाम करून देत आहों. असल्या भविष्यांनी फलज्योतिषशास्त्राचें नांव किती "वाढेल" याचा अंदाज त्यांनी जरूर करावा.

वर उल्लेखिलेलें भविष्य "दैवोवाणोच्या" संपादकांनींच केलेलें आहे. त्यांतील पाल्हाळ----पाल्हाळानेंच लेखाचा तीन चतुर्थांश भाग व्यापलेला आहे----बाजूस ठेवून संपादकाचें म्हणणें वाचकांपुढें ठेवितों. **श्री. मे**यन कोट लिहितात--"देशाचा इतिहास म्हणजे देशांतील मोठ्या व्यक्तींचाच इतिहास होय. या विधानाची सत्यता **म. गां**धींनीं ज्या वेळी हिंदी राजकारणांत प्रवेश केला त्या वेळेपासून चांगलीच दिसून येते.....जणू काय दैवी संकेताप्रमाणें **म**हात्माजींच्या हिंदु राजकारणप्रवेशापासून त्यांचा वैयक्तिक इतिहास हा हिंदुस्थानाचा इतिहास झाला आहे.....हिंदुस्थानविषयक भविष्यें वर्तविण्यास अधिक विश्वसनीय सामुग्रीच्या अभावीं **म**हात्मा **गां**धींचो कुंडलीच अत्यंत उपयोगी आहे" अंक २ रा, पान १५.

महात्मा **गां**धी हिंदी राजकारणांत शिरण्यापूर्वी हिंदुस्थानविषयक भविष्यें करण्याचीं साधनें म्हणून कोणाच्या कुंडल्या उपयोगी पडल्या किंवा पडण्यासारख्या होत्या याचा उल्लेख **सं**पादकांनीं केला असता तर फार बरें झालें असतें. **म. गां**धींच्यापूर्वी त्यांच्या सारखी राष्ट्रव्यापक कुंडली कोणाचीहो नसेल असेंही संपादकाचें मत असेल. अशी कुंडली नसतांना राष्ट्रीय भविष्यें करण्याला "विश्वसनीय आधारच" नव्हता. महात्माजींचा हिंदी राजकारणांत प्रवेश झाल्या वेळेपासून हा "विश्वसनीय आधार" ज्योतिषाच्या हस्तगत झाला आहे हो एक दैवाची खैरच समजली पाहिजे!

महात्माजींच्या कुंडलीवरून स. १९१९च्या पूर्वीची स्थिति तंतोतंत जुळते असें संपादक लिहितात. "सन १९१९च्या सुमारापर्यंत महात्माजींच्या कुंडलींत **मंगळाची महादशा** चालू होती. या महादशेंत ते साम्राज्याकरतां युध्दविषयक कार्यांत गढले होते, रिक्रूट भरती व लढाईंत जखमी झालेल्यांस मदत वगैरे कामें त्यांनीं केली. मंगळ-राहूंच्या संमेलनानें १९१९च्या आपत्ती (disasters) ओढवल्या" (आपत्ती कोणत्या त्या नमूद केलेल्या नाहींत). मंगळाची महादशा १९१२च्या सुमारास सुरू झाली व महात्मा व साम्राज्याचें युध्द यांचा संबंध केव्हां आला, त्याच प्रमाणें निम्मे अधिक महादशा संपेपर्यंत मंगळानें दर्शविलेल्या व्यवसायांत **म**हात्माजी होते किंवा काय याचा विचार करण्याचें **सं**पादक **म**हाशयांस जरूर वाटलें नाहीं. मंगळाच्या महादशेंत केव्हांतरी **म**हात्माजो साम्राज्याच्या युध्दांत पडले यावरून ज्योतिषशास्त्राचा अडाखा तंतोतंत जुळला याचा आनंद मानून संपादक अधिक विचारांत शिरले नाहींत हें त्यांच्या दशापध्दतीच्या ज्ञानास योग्यच झालें.

"सन १९१९ सालापासून राहूचा २ वर्षे व ८ महिन्यांचा "काळ" सुरू झाल्यावर महात्माजींच्या जगड्व्याळ चळवळींना प्रारंभ झाला. हा राहू चलग्रह जो चंद्र त्याच्या राशींत आहे व त्याजवर खल-ग्रह शनि व शुभग्रह गुरु यांच्या "दृष्ट्या" आहेत, म्हणून ह्या राहूच्या अंमलाखालीं 'न भूतो न भविष्यति' अशा चळवळी झाल्या" पान १६।१७.

महात्माजींच्या कुंडलींत राहूमध्यें राहूची अंतर्दशा चालू असतांना ज्या गोष्टी घडल्या त्या ज्योतिषशास्त्रदृष्ट्या बरोबर घडल्या असें संपादक मजकुरांनीं निश्चित ठरविलें आहे. राहूमध्यें राहूची हीं फळें अवश्य लक्ष्यांत ठेवावींत. पुढें "राहूमध्यें गुरूची अंतर्दशा आली व त्याबरोबर महात्माजींना कारागृहवास प्राप्त झाला. ही गुरूची अंतर्दशा १९२४ च्या सपटेंबरपर्यंत रहाणार आहे.....१९२३ च्या शेवटीं शेवटीं गुरूमध्यें शुक्राची उपदशा सुरू होणार आहे. त्या वेळीं महात्माजींची कदाचित् सुटका होईल, निदान सरकाराकडून तुरुंगातून मुक्त करण्याच्या अटी तरी त्यांना कळविण्यांत याव्यात.....परंतु **येवढें खास कीं गुरूची अंतर्दशा संपतांच त्यांची मुक्तता होणार.** हा काळ म्हणजे १९२४ चीं अखेर होय. **१९२४ च्या नंतर ते तुरुंगांत रहाणार नाहींत.**"

गुरूच्या अंतर्दशेंत कारागृहवास कसा झाला व अशुभ ग्रहांच्या अंतर्दशेंत उत्कृष्ट चळवळी जोमांत येऊन महात्माजींना यश कसें आलें हा प्रश्न संपादकांनीं कसा सोडविला असेल असा वाचकांना विचार पडल्यावांचून रहाणार नाहीं. विद्वान् संपादक हें कोडें कसें सोडवितात हें त्यांच्याच शब्दांत सांगतों. "Strange it is, that a person should be incarcerated and deprived of his freedom which

undoubtedly the greatest privilege of a human being, when a benefic power from above controls his destinies and yet it has been so. It was reserved for Jupiter the best benefic of the heavens to watch over this misfortune while the malefic influences left him free to carry on his many sided activities free and unhampered!' खरोखर किती बहुमोल ज्ञानाचा आपणास लाभ झाला आहे !! अशुभ-ग्रहांच्या फेऱ्यांत मनुष्य सांपडला असतां त्याला आपलीं कामें बिनधोक व अडथळ्याशिवाय करतां येतात व शुभ ग्रहांच्या अनुग्रहानें बंदिवास प्राप्त होतो ! ज्योतिषशास्त्राच्या तत्त्वाविरुद्ध ग्रहदशेचीं फलें "जुळवून" दाखविण्याकरतां संपादकांनीं जें तर्कट रचिलें आहे तें मूळांतच वाचण्याची आम्ही शिफारस करतों. महात्माजींना जिवापाड मेहनतीनें जे कष्ट होत होते ते गुरूच्या अंतर्दशेमुळें बंद झाले यावरून ज्योतिषशास्त्र खरें ठरल्याचा संपा-दकांना अत्यानंद झाला आहे. ते म्हणतात "Jail life for the Mahatma has been a source of immense good. It has removed him from a field of overwhelming and even disagreeable activities" या कारागृहामुळें सबंध मानव जातीचें कल्याण झालें आहे कारण "शांत वातावरणानें" महात्माजींची शरीर प्रकृति कायम राहून ते पुढें अधिक कार्यक्षम होणार आहेत. गुरूच्या अंतर्दशेचीं अशीं फलें संपादकांनीं आपल्या अपूर्व ज्ञानानें जाहीर केलीं आहेत!

सन १९२४ सपटेंबरच्या सुमारास शनीची अतर्दशा सुरू होते. या अंतर्दशेंत महात्माजींची सुटका अवश्य होईल असें श्री. मेअनकोट यांचें भविष्य आहे (पान २१ व २२). गुरूसारख्या शुभग्रहाच्या अंमलांत तर्‍हेतर्‍हेतील अनुपम शांतता तर शनीच्या* अतर्दशेंत जोराची चळवळ झाली

* It is impossible that during the control of Saturn, the Mahatma should spend, under any circumstances, life of seclusion and inactivity."

पाहिज असा संपादकांचा तर्क आहे. १९२५त गुरु पांचवा येतो तेव्हां महात्माजी यशस्वी होतील (पान २३). " शनीची अंतर्दशा १९२७च्या मध्यापर्यंत टिकणारी आहे. महात्माजींच्या कुंडलींतील ह्या अंतर्दशेचा योग हिंदुस्थानांत तीव्र असंतोष दर्शवीत आहे. १९२६ साल महात्माजींच्या शरीर प्रकृतीस अनिष्ट आहे. स.१९२७च्या मध्यापासून शनि-अंतर्दशा संपून बुध-अंतर्दशा लागणार आहे. या काळांत हिंदुस्थानांत 'वसाहतीचें स्वराज्य' मिळणार आहे. बुध-अंतर्दशेंतील १९२९ सालीं स्वराज्य प्राप्ति होईल. Self government complete and untramelled as the Dominions enjoy today will be an accomplished fact of India of 1929) असें हें गोड भविष्य " दिव्यवाणीनें " केलेलें असून त्याची प्रसिध्दी **क्रॉनिकल** सारख्यांनीं केली आहे.

ज्योतिष्याच्या भविष्याची किंमत त्याच्या गोडपणावर किंवा पुष्कळ प्रसिध्दीवर नसून त्याच्या खरेपणावरच असते. ग्रहस्थितीचा मागें अनुभव काय आला व त्या अनुभवानुरूप तर्कशुध्द विचारसरणीनें भविष्यत् काळाचें अनुमान बांधतां आलें तरच तें खरें ठरेल. " दिव्य वाणी "च्या संपादकाचें भविष्य तर्कशुध्द विचारसरणींत येत नाहीं याबद्दल द्विमत होईल असें वाटत नाहीं. " शुभ ग्रहांच्या अंतर्दशेंत जर कारागृहवास तर पापग्रहाच्या अंतर्दशेंत कारागृहांतून सुटका होऊन चळवळ अधिक होईल " हा तर्क कीं कुतर्क याचा विचार वाचकांनींच करावा. संपादकांचें भविष्य केवळ स्फूर्तीनेंच झालें असल्यास त्यांना दशांची कारणें निमित्तमात्र पुढें करण्याची जरूरी नव्हती. ज्या अर्थी कांहीं तरी कारणें नमूद केलीं आहेत व तीं अनुभवास व उपपत्तीस सोडून आहेत त्याअर्थी असल्या

कारणांच्या आधारावर केलेलें भविष्य खरें ठरण्याचा बिलकूल संभव नाहीं असें नमूद करण्यांत आम्हांस बिलकूल शंका वाटत नाहीं. तसेंच स्फूर्तिजन्य भविष्याची किंमत विचिकित्सकांना बिलकूल नाहीं, तीं काकतालीय न्यायानें जुळोत वा न जुळोत, जगालाहो असल्या भविष्याचा तादृश उपयोग होणार नाहीं. " दिव्य वाणीचें " भविष्य स्फूर्तिजन्य नाहीं किंवा तर्कशुध्द व साधारही नाहीं. ज्योतिषशास्त्राच्या अर्धवट माहितीवर कांहीं तरी अनुमानें काढून लोकांमध्यें गाजावाजाच करण्याचा संपादकांचा उद्देश असल्यास तो चांगलाच सिध्दीस गेला आहे. मात्र असल्या प्रयत्नानें फल ज्योतिषशास्त्राचें नांव बद्दू होईल यांत शंका नाहीं असें दुःखानें म्हणावें लागतें.

" दिव्यवाणीच्या " भविष्याचो किंमत ठरविण्याचें काम वाचकांवरच सोंपवून दुसऱ्या एका भविष्यवाद्याच्या भविष्याकडे वळतों. श्रीयुत **मे**अनकोटच्या भविष्याप्रमाणें हेंही भविष्य मुंबई येथील दैनिकांमध्यें प्रसिध्द होऊन चर्चेचा विषय होऊन बसलें होतें. " **भा**रतीय **ज्यो**तिष **चं**द्रोदय " नांवाच्या गुजराती मासिकाच्या १ ल्या वर्षाच्या १० व्या अंकांत **सं**पादक पंडित मणिशंकर हरिशंकर जोशी यांनीं राष्ट्रीय सभेच्या कुंडलीचा विचार (ज्योतिर्मालेच्या वर्ष १ लें अंक ९ वाल माहितीच्या आधारानेंच) करतांना " १९२३ च्या ऑक्टोबर महिन्यांत हर्शल १० अंश गेल्यावर **महात्मा गांधी** सुटतील " असें भविष्य केलें आहे. म. गांधी सुटण्याचा ग्रहयोग पंडितजींनीं जो दिला आहे तो एवढाच ! राष्ट्रीय सभेच्या कुंडलींत व्ययस्थानांत (कारागृहस्थानांत) हर्शल असतांना सर्व हिंदुस्थानांत तुरुंगवासाला ऊत आला असें नमूद करून त्याच स्थानांत हर्शल १० व्या अंशांत येतांच **म. गां**धी सुटणार ही कारणपरंपरा आमच्या कांहींच लक्ष्यांत येत नाहीं ! हें असो, पण हर्शल ऑक्टोबर महिन्यांत

कोणत्या राशीच्या १० व्या अंशांत येणार !! सायन मीन राशीच्या १० व्या अंशांत त्याला येत्या ऑक्टोबर महिन्यांत मागें खेंचण्याचें कार्य कोण करील तें पंडितजीच जाणोत ! म. गांधी ऑक्टोबर महिन्यांत सुटावयाचेच असले तर ते पंडितजींनीं दिलेल्या योगाच्या जोरावर सुटतील अशी आशा बाळगावयास नको. कांहींही असो, पंडितजींनीं एक मौज उडवून दिली एवढें खरें. भविष्य बरोबर येवो किंवा न येवो पंडितजींची माहिती बऱ्याच लोकांना झाली यांत शंका नाहीं.

ज्योतिषशास्त्राच्या नांवावर वरील प्रकारचीं भविष्यें (?) प्रसिद्ध करणारांचा उद्देश काय असावा बरें? शास्त्रसामर्थ्य लोकांस पटवून द्यावें असाच उद्देश असल्यास तो कितपत सिध्दीस जाईल याचा विचार वाचकांनींच करावा.

"Where angels fear to tread, the fools rush in !! "

पिशाचादि पीडा कुंडलीवरून कशा दर्शविल्या जातात.

[लेखकः भास्कर केशव आंजगांवकर.]

आपण लिहिल्याप्रमाणें सन १९२२ साल मला, आमचे कुटुंबाला, अत्यंत दुःखदायक होऊन बसलें आहे. सर्व बाजूंनीं आपत्ति कोसळत आहेत. व त्यांतहीं खेदाचा गोष्ट ही कीं माझी अत्यंत तीव्र असलेली स्मृतिशक्ति कमी कमी होत असल्याचें दिसत असून शिवाय चक्षुरिंद्रिय ही बिघडलें आहे. यामुळें चुकत माकत पण आपल्या विनंतीप्रमाणें कै. गु. जिवनराव चिटणीसांकडून समजलेले विषय पत्रद्वारें क्रमाक्रमानें पुढें ठेवीत आहें.

कै० गु० चिटणीसांच्या शास्त्रशुध्द विचारांच्या साखळीमध्यें कधींच तुटकपणा अगर कमकुवतपणा येत नसे. त्यांजकडून मिळालेली माहिती लिहितांना कोठें अलगपणा दिसत असल्यास अगर विचारांत कमकुवतपणा आढळल्यास तो मेंदूच्या अशक्तपणामुळें मजकडून झाला आहे. फलज्योतिष, वैद्यक व मंत्रविद्या या तिहींचें मूळ एकच आहे. या तिहींपैकीं कोणाही एका विषयाला इतर दोघांचें साह्य पाहिजे असतें. या तीन विषयांपैकीं एकच विषय उत्तम अवगत असला तरी तितक्यानेंच काम भागत नाहीं. फलज्योतिषानें काळाची अनकूळ प्रतिकूळता स्पष्टपणें समजून प्रयत्नाची दिशा दर्शविली जाते. व इतर दोन्ही विद्या हीं इच्छित हेतु फलद्रुप होण्याचीं साधनें आहेत. अनुकूल काळीं परिस्थिति कशी आहे व प्रतिकूळ काळीं इष्ट हेतु साधण्यास काय काय अडचणी येतील हेंच फलज्योतिष सांगेल. खरा प्रयत्नवादी आपल्या हेतुसिध्दयर्थ अनुकूल नसणाऱ्या गोष्टी प्राप्त करून घेण्यासाठीं झटत असतो. त्या साठीं मंत्रविद्या वैद्यविद्या यांचा अवतार आहे.

वेदांताचा मुख्य सिध्दांत प्रारब्धवाद हा फलज्योतिष सिध्द करून दाखवितें व भौक्तिक शास्त्रज्ञाचा पाया जो प्रयत्नवाद तो वैद्यक व मंत्रशास्त्र हीं सिध्द करून दाखवितात. तथापि ज्योतिर्मालेच्या प्रिय वाचकांचा असा समज होऊं नये कीं वेदांत्यांनीं सिध्द केलेला प्रारब्धवाद प्रयत्नवादानें लटका पडेल. व्यावहारिक लोकांनीं प्रयत्नवादालाच महत्व देणें हें रास्त आहे. तसें नसतें तर व्यवहारकुशल मन्वादि महामुनींनीं विधिनिषेधार्थीं अनेक शास्त्रें निर्माण केलीं आहेत तीं कां झालीं असतीं? तात्पर्य 'अवश्यं भाविभावानां प्रतिकारो भवेद्यदि । तर्हि दुःखं न लभ्येरन् नल राम-युधिष्ठिराः॥१॥'

मणी, मंत्र व औषधी हो मनुष्यांचे हेतु सिध्द करण्याचीं मुख्य साधनें होत. त्यांकडून इच्छित कार्य घडविण्यास प्रतिकूल असलेल्या गोष्टींचा विचार प्रथम करणें जरूर आहे. त्यांत मंत्रशास्त्राची एक शाखा-देव या संज्ञेंत येणारे स्वर्लोकवासीजन प्रपंचावर कांहीं इच्छा ठेवून भुवर्लोकामध्यें वास्तव्य करणारे वरच्या पेक्षां कमी दर्जाचे आत्मे या दोन्हीं प्रकारच्या जिवांचा भूलोकवासी प्राण्यांवर अतिशय अधिकार चालतो. भूलोकवासी--ज्यांचे शरिरांत पार्थिव द्रव्याचा जास्त अंश आहे म्हणून त्यांस पृथ्वीचे आधारावांचून राहतांच येत नाहीं, या सदरांत मनुष्य, पशुपक्षादिक सर्व येतात. भुवर्लोकवासी--ज्यांचे शरिरांत जल व वायु या दोन महाभूतांचें आधिक्य असतें यामुळें त्यांस जोंपर्यंत वायुमडळ आहे तेथपर्यंत संचार करितां येतो. या लोकांत भुतं, यक्षदेवता कनिष्ठ दर्जाच्या उपदेवसंज्ञक देवदेवता, ग्रामदेवता इत्यादि येतात. स्वर्गलोकवासी----ज्यांचे शरीरांत पंच महाभूतांपैकीं तेजोरूपद्रव्यांचें आधिक्य असतें व त्यामुळें त्यांना सूर्यमडळाचा प्रकाश पोंहचत असेल तेथपर्यंत संचार करितां येतो. या सदरांत सर्व ग्रहमाला (म्हणजे तत्तद्गोलाभिमानी देवता शिव विष्णु इत्यादिकांच्या गणदेवता होत) आणि त्यांची स्थिति गति आणि आम्हांविषयीं त्यांच्या अनुकूळ प्रतिकूळ भावना या फलज्योतिषाधारें समजून येतात.

देवदेवतांचा संबंधः—कित्येकांस कदाचित् येथें शंका येण्याचा संभव आहे कीं आम्हांस अनुकूळ प्रतिकूळ गोष्टी केवळ ग्रहांच्याच स्थितिगतीनें होतात. तेथें कांहीं गोष्टींचा---देवदेवतांचा संबंध नसेल पण हें म्हणणें कै० गु० चिटणीस यांनीं परिपूर्ण खात्री केल्यामुळें सकृद्दर्शनीं ज्यांनीं फक्त फलज्योतिष सोडून अन्य दोन्हीं शास्त्रांकडे लक्ष दिलें नसेल त्यांनां विचित्र वाटणारा हा विषय स्वानुभवसिध्द म्हणून पुढें ठेवीत आहें.

ग्रह हें आपलें इष्टानिष्ट फल आपआपल्या किरणद्वारा प्रगट करीत असतात. त्यांचा अंमल स्थूल सूक्ष्म पंचीकृत अपंचीकृत स्थावर जंगम सृष्टीवर अव्याहतपणें चालत आहे. अपंचीकृत आणि स्थूल दृष्टीला भासमान होणारे असें पंचीकृत जे सूक्ष्म सृष्टींतील देह यांवरही त्यांचा अंमल असून तद्वारा ते ग्रह इष्टानिष्ट फलनिष्पति करितात. याच सदरांत वरील तिन्ही लोक येतात. स्थूल सृष्टींत जसें चद्राच्या कलांप्रमाणें समुद्रास भरती येणें, हाताचीं बोटें कापलीं असतां रक्तप्रवाह जास्त निघणें, ओलें झाड तोडलें असतां बरड कोड वगैरे लागून त्या लाकडाची खराबी होणें, हे परिणाम स्पष्ट दिसतात, तसेंच पंचीकृत सूक्ष्म देहांवरही ग्रहांच्या किरणांचा परिणाम होऊं शकतो. सदरहू प्रमाणेंच मणी म्हणजे नील, हिरा आदिकरून रत्नें व वनौषधी हीं बरेवाईट परिणाम करितात. मणी अंगावर धारण करून व औषधी पोटांत घेऊन व शरीरावर ठेवून घेतल्या असतां परिणामकारक होतात.

प्रपंचामध्यें शरीरस्वास्थ्य असेल तरच सर्व गोष्टी साधतात. एकाएकीं शरीर--स्वास्थ्य बिघडलें तर फलज्योतिषाधारें मंत्रशास्त्र काय म्हणतें तें पाहूं.

लग्नावरून

१. प्रश्नकालीं मेष लग्न उदित असेल तर पितृदेवतांचा क्रोध झाला असून लिव्हर वाढणें अग्निमांद्य हे विकार मुख्यतः असतात. बारीक ताप येतो. डोकें फार करून दुखत असतें. झोपेंत भय वाटत असून दचकून उठून बसतो.

२.वृषभ लग्न उदित असेल तर गगनचारी यक्षिणी वगैरे अथवा वड पिंपळ इत्यादि चैत्य वृक्षांवर राहणारी स्त्री देवता असून तिच्या पासून पीडा आहे. मुख्यतः ज्वर, लांबच लांब दुःस्वप्नें, घसा दुखणें, नेत्रपीडा होतात.

३. मिथुन लग्न उदित असेल तर महामाया कुल दैवत देवी हिच्या रोषापासून नियमित काळानें येणारे ज्वर, भ्रम, वायु हीं उत्पन्न होतात.

४.कर्क लग्नीं स्मशानवासी स्त्रीलिंगी पिशाच्च पीडा करीत असून अतिशय हांसणें, रडणें अगर स्तब्धता हीं लक्षणें होत असून घाणेरडेपणा करणें अगर प्रकृतीला अपायकारक वस्तु खाण्याकडे लक्ष जातें.

५. सिंह लग्न उदित असेल तर रोग्याच्याच कुळांतील कोणी पूर्वज त्याचें उत्तर कार्य झालें नसलेला असा त्रास देत आहे. दिवसा शीत ज्वर व अरुचि हीं मुख्यतः उत्पन्न होतात.

६. कन्या लग्न असेल तर केवळ ग्रहांपासूनच पीडा होत असून क्रोध, आळस आणि अशुचिपणा उत्पन्न होतो.

७. तुला लग्न उदयाचलावर आलें असेल तर ज्या ठिकाणीं रोग्याचें घर आहे तेथील स्थलाधिकारी देवता (क्षेत्रपाल) यांजपासून पीडा होत आहे. विशेषतः ही लहान मुलांना होते.

८. पूर्व बिंदु वृश्चिक राशींत असेल तर सर्पदोष असून अंगाचा भडका होणें, क्रोध येणें, बुध्दिभ्रष्टता हीं लक्षणें होतात.

९. धनुलग्नीं प्रश्न केल्यास ग्रहांच्या परिभ्रमणापासून शरीरस्थ सप्तधांतूंतून बिघाड होऊन त्रास झाला आहे असें समजावें.

१०. मकर राशि उदित असल्यास चंडिका देवी पीडा करीत असून त्यामुळें सांधे दुखतात. ताप व वात उत्पन्न होतात. बहुतकरून रोग्याच्या एखाद्या शत्रूनें अभिचार क्रिया अगर एखाद्या तीव्र तामसी देवतेस तिचा प्रिय भक्ष देण्याचें कबूल केलें असतें.

११. उदयीं कुंभ राशि असेल तर अत्यंत मलीन अशा पुरुष-पिशाच्चापासून पीडा होत आहे असें समजावें.

१२. मीन लग्नीं स्त्रीदेवता योगिनी हिजपासून ज्वरादि पीडा होत असून आरंभीं मनास भयंकर वाटणारा देखावा दृष्टीस पडलेला असतो. आतां स्थानानुरोधानें ग्रह खालील प्रमाणें फळें दाखवितात.--

१. द्वादश, धर्म, तृतीय व षष्ठ या चार स्थानांपैकीं कोणत्याही स्थानीं पापग्रह शनि, मंगळ, नेपच्यून, हर्शल आले असतील तर रोग्याच्या कुळांतील कोणी पुरुष पिशाच्च रूपांत असून तो त्रास देत आहे. त्या पुरुषाचे मरणाचें कारण विष, मारक शस्त्र, अगर पाणी यांपैकीं असून वासना शिल्लक राहिली आहे असें जाणावें. त्यांपैकीं जो ग्रह विशेष दूषित झाला असेल त्याचे अनुरोधानें पुढीलप्रमाणें कल्पना करावी.--**शनि** असल्यास पाण्यांत पडून, **नेपच्यून** असेल तर विषापासून, **हर्शल** असेल तर आकस्मिक रीतीनें मयत झाला असावा. त्याचें अनुमानिक वय त्या त्या ग्रहाच्या वर्षाइतकें जाणावें, त्या ग्रहाबरोबर रवीचा दृष्टिसबंध येत असेल तर रोग्याच्या कुळांतील हा पुरुष आहे असें खात्रीनें समजावें. रवेशिवाय-करून इतर ग्रहांचा दृष्टिसबंध येत असेल तर परगोत्री असें समजावें.

राहू वरील चार स्थानांपैकीं कोणत्याही एका स्थानीं असून सदरहू चार ग्रहांपैकीं कोणताही एखाद्या पापग्रहानें युक्त असेल तर ज्या

ग्रहानें तो युक्त असेल त्या ग्रहाच्या जातीचा तो पिशाच्च असून त्यास इतर कोणी भयंकर नीच जातीच्या पिशाच्चाचेंहीं साह्य आहे असें समजावें.

(२). तीन अगर चार पापग्रह चारहीं केंद्रांत असतील तर रोग्यास फारच उपाय करावे लागतील. बहुशः असाध्य असे असतें.

(३). पापग्रहांनीं दूषित असलेले शुभग्रह अगर स्वभावतःच पापग्रह पुढील प्रमाणें व्याधींचीं कारणें दर्शवितात.---

रवि--पितृदेवता अगर उत्तर कार्य न झालेला पूर्वज यापासून पीडा होत आहे.

चंद्र----देवी, दुर्गाआदिकरून अगर रोग्याची कुलदेवता जल-देवता इत्यादि.

मंगल---स्कंदादि उपदेवता अगर भैरवादि देवता ज्या गांवीं रोगी रहात असेल तेथील ग्रामदेवता.

बुध--यक्ष गंधर्वादि उपदेवता, ज्यां मनुष्य वस्तीपासून दूर एखाद्या टेंकडीवर अगर वृक्षाच्या गर्द राईत वास्तव्य करीत असतात त्यां-पासून अथवा स्मशानरक्षक देवता यांपासून पीडा आहे असें जाणावें.

गुरु--ब्राह्मण जाति देव असून तो स्वगृहींच्या इतर देवताकोपामुळें त्रास देत आहे. हा बहुतकरून कुलपतिजवळील कोणी पुरुष असतो.

शुक्र--यक्ष, ब्रह्मराक्षस इत्यादि अथवा स्त्रीची कुलदेवता.

शनि--जमिनीच्या संबंधानें मालको हक्क असलेला अगर शिव गणांपैकीं स्मशानवासी कोणी गण पीडा करीत आहे.

राहू--सर्प, पिशाच्च.

हर्शल--ऊर्फ **प्रजापति** आकस्मिक रीतीनें जडलेला, ज्याविषयीं कांहीं भावना करतां येत नाहीं असा पिशाच्च अगर देवगण; पीर किंवा मुसलमानाचे कबरस्थानांतील एखादें पिशाच्च.

नेपच्यून ऊर्फ **वरुण**.--जलांत पडलेला कोणी तरी परकी पतित प्राणी अगर दोषी विष.

अभिचार

रोगी मनुष्यास त्याच्या शत्रूंनीं मांत्रिकापासून जारणमारणादिक क्रिया करविली असतां पुढील प्रमाणें स्थिति असते:----

१. **शुक्र** ज्या राशीला असेल तिचा अधिपति लग्न, दशम अथवा अस्तभुवनीं असेल, (२) मंगळाची लग्नावर पूर्ण दृष्टी असेल, (३) मंगळ व लग्नेश केंद्रांत अगर लग्नीं असतील, (४) षष्ठेश सप्तमांत असेल, (५) मंगळ स्थिर राशींमध्यें--वृषभ, सिंह, वृश्चिक व कुंभ--असून लाभ अगर नवमस्थानी असेल, (६) चंद्र सप्तमांत असून त्याबरोबर षष्ठेशाचा जोरदार अशुभ दृष्टी असेल, (७) **राहु** मिथुन व धनु राशीचा असेल, (८) **केतु** लग्नीं चतुर्थ भुवनीं अगर कर्म भुवनीं असेल व **मांदि** म्हणजे **गुलक** केंद्रांत असेल तर रोग्यास त्याचे शत्रूंनीं मांत्रिका-कडून अभिचार क्रिया करविली आहे असें जाणावें व अभिचार क्रिया-प्रतिबंधक उपचार केले असतां तत्काळ गुण येतो.

वाचकांच्या सोईसाठीं येथें एवढेंच सांगितलें असतां पुरें आहे कीं मंत्रशास्त्राचे तीन भाग असून त्यांपैकीं एक-कर्मकांडांत वेदोक्त मंत्रांनीं दुसऱ्यास पीडाकारक होणारा एक भाग आहे. दुसरा--वेदमंत्र घेऊन त्यास तंत्रशास्त्राचा जोड दिला आहे. यांत विशेषेंकरून मंत्र बीजाक्षरें फार असतात. कै. गु. चिटणीस हे या भागाचा विचित्र प्रकारें अर्थ लावून

वादविवाद करीत असत. उदाहरणार्थ--ह्रीं हे बीजाक्षर रहोम पासून क्रौं, क्लीं हें करीम पासून वगैरे बाबीलोनीयन लोकांनीं निर्माण केलें आहे वगैरे हें म्हणणें लेखकास पसंत नसे व त्यांत प्राविण्यही नसे. तंत्रापैकीं त्रिकोण चतुष्कोणादिकांची स्थितिही अशाच प्रकारची आहे, तिसरा भाग--शाबरी मंत्र व तंत्र शास्त्र. हें शास्त्र मच्छींद्रनाथापासून जे पुढें नवनाथ व त्यांचे शिष्योपशिष्य झाले त्यांनीं निर्माण केलें आहे. हें बहुतेक देशभाषेतच लिहिलेलें शास्त्र आहे. याच शास्त्राचा उपयोग अभिचार कर्माकडे फार करून हल्लीं लोक करीत असतात. जरी इतर दोन्ही मार्गांनीं इच्छित कार्यें होत असतात तरी ते मार्ग विध्युक्त जाणणारे ब्राह्मण दुर्मिळ होत चालले आहेत.

२. लग्नीं चर राशिउदय पावत असून मंगल सप्तमांत पापग्रह युक्त अगर विशेष दूषित झालेला असेल तर दर्शन होतांच भिति उत्पन्न होणाऱ्या देवतेचें दर्शन होऊन त्यापासून रोग्यास इजा होते.

३. लग्नीं कोणताहा शुभ ग्रह उदय पावत नसून शनैश्वर जर सप्तमांत असेल आणि चंद्रावर बहुतेक पापग्रहाची दृष्टि असून दूषित झाला असेल तर रोग्यास प्रथम भयंकर पिशाच्च दर्शन झालें असून नंतर ईजा उत्पन्न झाली आहे असें समजावें.

४. अभिचार कर्म कोणी केलें आहे हे जाणण्याची इच्छा उत्पन्न होणें साहजिक आहे. त्या विषयीं खालील प्रमाणें अनुमान करावें.

अभिचार कर्मदर्शक ग्रहस्थिति ज्या ज्या स्थानामधून दाखविली गेली आहे त्या त्या स्थानारूढन जे सबंधी (नातें असणारे) लोक दाखविले जातात त्या अनुरोधाने तो नातेवाईक व त्याचा चेहरा ज्योतिषानें विचारपूर्वक वर्णन करावा.

५. जर ग्रह स्वक्षेत्रीं असतील तर रोग्याच्याच कुळांतील पुरुष पीडा करविण्यास कारण आहे. उदासीन क्षेत्रांतील असतील तर भिन्न

कुळांतील व शत्रु क्षेत्रांतील असतील तर शत्रु गोत्रांतील आणि मित्र क्षेत्रीं असतील तर वर व प्रेम दाखविणारा पण अंतरांतून शत्रुभाव असलेला मनुष्य आहे.

याचविषयीं ताजिक नीलकंठींत एक श्लोक आहे तो असा.

प्रेताश्च राहौ पितरः सुरेज्ये चंद्रंबुदेव्यास्तपनेपि देव्यः ।.
स्वगोत्रदेव्यश्च शनौबुधेच भवंति भूता व्ययरंध्रसंस्थे ॥
शाकिन्यार भृगुजेंबु दैव्यो गृहणंति मर्त्यं विमुखं मुकुंदात् ।

साध्यासाध्य विचार

अनिष्ट स्थानीं आलेले ग्रह पीडाकारक कसे होतात याची दिशा वरतीं दाखविली आहे. आतां ज्या देवतेपासून पीडा होत आहे तिला शांत होण्याजोगे उपचार केले असतां सफल होतील अगर कसें हें पुढीलप्रमाणें विचार करून कळवावें:----

(१) पीडा करणारा ग्रह परिभ्रमणानें लवकरच उच्च होत असेल, (२) शुभ ग्रह केंद्रस्थानीं असतील तर, (३) लग्नावर शुभ ग्रहांची शुभ दृष्टि असेल तर अनिष्टदर्शक ग्रह स्थितीचे परिणाम दूर होण्याजोगे योग्य उपाय झाले असतां टळतील परंतु चंद्र हा **उपचय** स्थानीं-----३,६,१० व ११----अगर त्रिकोणांत असला पाहिजे. पण याचे उलट (१) चंद्र नीच अगर बलहीन असेल, (२) केंद्रांत पापग्रह असतील तर ग्रह स्थित्यनुरूप होणारें अनिष्ट परिणाम टाळण्यासाठीं फार बळकट उपाय योजावे लागतील.

असो, या वेळीं इतकाच मजकूर पाठविला आहे. आपणास व वाचकांस प्रिय झाल्यास दुसऱ्या वेळीं पुढील विषय लिहितां येईल. माझ्या आजपर्यंतच्या पाहण्यांत हा विषय कै. गुरुवर्य चिटणीस यांचे इतका अवगत असलेला कोणी गृहस्थ आढळला नाहीं. हा विषय वाचकांस प्रिय झाल्यास कै. गु. चिटणिसां कडून निरानिराळ्या विषयांवर घेतलेली टाचणें अगर तद्विषयक स्वतःचे विचार सादर करण्याचा विचार आहे.

फलज्योतिषशास्त्राचें महत्व.

(लेखकः—माधवी वसंत, कान्ही जहागिरदार.)

It is sweet to live in the sphere of the mind; it is sweet to despise the rough noises of a vulgar world; it is sweet to soar in the Ethereal heights and to devote the best moments of life to the study of the true, the infinite and the eternal. —Camille Flammarion.

" मनाच्या कल्पनामय वातावरणांतील विहार गोड वाटतो, जड-जगाच्या घडामोडीचा तिरस्कार करणें प्रिय वाटतें, इथरच्या उंच वातावरणांत उड्डाण करणें सुखावह वाटतें आणि सत्य-अज्ञेय आणि शाश्वत शक्तीचें निरीक्षण करण्यांत आयुष्यांतील चांगला भाग खर्च करणें पण फार सुखावह वाटतें--" कॅमील फ्लॅमरीन.

* * * *

"For I dipt into the future, far as human eye could see, saw the vision of the world and all the wonders that would be"—Tennyson.

"मनुष्यमात्राच्या नजरेला जितका पल्ला गांठवेल तितक्यापर्यंत भविष्याच्या उदरांत माझ्या दृष्टीनें जेव्हां डुबकी मारली तेव्हां मी जगाचें दिव्यदर्शन व चमत्कार पाहिले "----टेनीसन.

१

मनुष्यप्राण्याच्या आयुष्यांत सुखदुःख--उत्कर्षापकर्ष--उन्नतिपतन वगैरे पुढें घडणाऱ्या अनेक गोष्टींच्या चित्रपटाची कांहीशी कल्पना

आगाऊ करून देणारें शास्त्र म्हणजे जातकविद्या होय. मनुष्यप्राण्याची दृष्टि आशावादानें मोहित असल्यानें ती नेहमीं मोठ्या उत्साहानें भविष्यकालाकडे वळलेली असते. राजा--महाराजा व सर्व सुखवैभवयुक्त सार्वभौम सम्राटापासून तो अगदीं दारिद्र्यावस्थेनें पीडलेल्या निष्कांचन भणंगभिकाऱ्याच्या हृदयांत भविष्यज्ञानाची ज्योत सारखीच प्रज्वलित असलेली दिसून येईल. काल जरी इंद्रियातीत व अगोचर आहे तरी त्याचें अस्तित्व केव्हांहो ग्राह्य करावें लागतें, तसें न केल्यास " काल--उद्यां--परवां--वार महिना " वगैरे कालगणनात्मक शब्द प्रचारांत आले नसते. सर्व ज्ञानाचें आद्यस्थान काल आहे. खगोल व ज्योतिषशास्त्राचा प्रत्यक्ष आत्मा काल होय. सृष्टींतील प्रत्येक घटकावयव कालानें मर्यादित झाला आहे परंतु त्या कालाला मर्यादित करणें आमच्या शक्तीच्या बाहेर अतएव आम्हीं त्याला अनंत म्हणतों. उत्पत्ति--स्थिति आणि लय ह्या त्रिगुणात्मक कालाचा आदि व अत यांचें ज्ञान होण्याकरितां आम्हीं कालमापन सुरू करण्यास सूर्यमालिका घेतली परंतु तो पण या कालाला तशी मर्यादा जेव्हां घालूं शकेना तेव्हां आम्हीं सर्व ज्योतिर्मालां व विश्वतारे हीं साधनें घेतलीं तरी मर्यादा घालतां येईना. तेव्हां त्याला गणितशास्त्रांतील संख्यांचा जोड देऊन खालीलप्रमाणें त्याला बध्द करण्याचा प्रयत्न केला.

चतुर्युग सहस्राणि ब्रह्मणो दिनमुच्यते । तेषु चतुर्दश मनवो भवंति । तत्रैकस्य मनोरकं सप्ततिर्महायुगानि भवंति । महायुगं प्रमाणं । विंशति सहस्राधिक त्रिचत्वारिंशल्लक्षमिताब्दाः । एवं षण्मनवो गताः ॥

अशा रीतीनें खर्व निखर्वापर्यंत संख्या घेतल्या त्यांसही पुन्हां युग--मन्वंतर--ब्रह्मदिन वगैरे आवृत्तिवाचक शब्दांचा रचना करूनही कालाची

पुसट कल्पना करण्याचा आमचा प्रयत्न झाला आहे; तरी त्याचा आदि व अंत यांचा मागमूस कांहीं आम्हांस निश्चित करितां येत नाहीं तेव्हां त्याच्या या अकाळ व अतिव्याप्त क्षेत्रावर भूत--वर्तमान व भविष्य अशा तीन रेषा ओढून कार्यभाग उरकून घेण्याची सवड करून घेतली.

२

वर्तमानकालाचा प्रत्येक क्षण याप्रमाणें भूतकालाच्या अजस्र उदरांत जाऊं लागला. भूतकाल याप्रमाणें दर क्षणीं हातून निसटून जात असल्यामुळें " झालें तें होऊन गेलें आतां काय त्याचें ? " अशा प्रकारचें समाधान मनुष्यप्राणी करून घेतो. वर्तमान काल तर फारच चंचल व क्षण-भंगुर पडला; तो भूत व भविष्य या दोन महाकालाच्या मोठ्या पहाडांमधील खोल दरीवरचा अगदीं लहान व चिंचोळा सांधा असल्यामुळें मनुष्यप्राणी या कालाला फारसें महत्व देत नाहीं व त्यानें महत्व देण्याचा प्रयत्न केला तरी तो सिध्दीला जाणार नाहीं; कारण भविष्य कालांतील प्रत्येक क्षण वर्तमानकालाच्या या अत्यंत संकोचित दरडीवर विश्रांति घेत आहे तोंच त्याला मागाहून येणाऱ्या दुसऱ्या क्षणांकरितां ती दरडी रिकामी करून भूतकालाच्या उदरांत प्रवेश करावा लागतो. दोन्ही कालांचा असा शेवट लागल्यावर भविष्यकालच मनुष्याच्या हातांत काय तो राहतो, व यामुळें या कालाकडेच तो मोठ्या आशेनें व जिज्ञासेनें पहातो. स्मृतीपेक्षां अज्ञान अथवा अज्ञेयता हेंच फार सुखकारक वाटतें असा सर्वसाधारण अनुभव आढळतो. भूतकालांतील सुखदुःखांचा स्मृति असल्यामुळें व तीं भुक्त असल्यामुळें मनुष्याच्या जिज्ञासेला तो कांहीं रुचत नाहीं. भोग्य सृष्टींच्या सुखदुःखाच्या विषयींच्या पूर्वकल्पना हाच मनुष्याच्या भविष्यकालविषयीं असलेल्या जिज्ञासेचा अंतिम गोल होय. सुख प्रत्यक्ष अनुभवांत असतांना

होणाऱ्या आनंदापेक्षां त्या सुखाच्या पूर्वकल्पनातरंगामध्यें असतांना होणारा आनंद सहस्रपटींनें ज्यास्त असतो. असें जें प्रतिपादन करण्यांत येतें त्याचा अनुभव येथें पटण्यासारखा आहे. जगाच्या आरंभापासून अंतापर्यंत मनुष्यप्राणी जडवादाशीं संलग्न असतां भवितव्यतेच्या कल्पनेची जिज्ञासा त्याच्या हृदयांत सारखी जागृत राहणारच व यालाच आपण आशावाद म्हणतों. या जिज्ञासेपासून कोणीहो अलिप्त नाहीं. अठरा ऐश्वर्यांनीं युक्त सार्वभौम अलिप्त नाहीं तसा अठराविश्वें दारिद्र्यानें पीडलेला भिकारी पण अलिप्त नाहीं. भवितव्यतेविषयींचा कल्पना शक्य तितकी बिनचूकपणें व कालसूचक अशी शास्त्रीयमार्गानें काढण्याकडे प्रवृत्ति यामुळें होणें अगदीं सहाजिक आहे. आवश्यकता हीच शोधकतेची जननी आहे. ही जिज्ञासा वाढून जेव्हां आवश्यकतेच्या पटांत येऊं लागली तसे प्रत्यक्ष मार्ग हुडकण्याचा व साधनें मिळविण्याचा प्रयत्न सुरू झाला. समाजाच्या उच्च नीच दर्जाच्या संस्कृतीप्रमाणें निरीक्षण व शोधकपणा सुरू झाला. याच प्रयत्नांचें एक फल म्हणजे फलज्योतिषशास्त्र होय.

फलज्योतिषशास्त्र व्यवहारोपयोगी आहे किंवा नाहीं हा प्रश्न जरी सध्यां एका बाजूस ठेवला तरी जोंपर्यंत भवितव्यतेच्या पूर्वकल्पनेची जिज्ञासा मनुष्याच्या हृदयांत जागृत आहे तोंपर्यंत ती तृप्त करून घेण्याचा प्रयत्न कोणत्या तरी मार्गानें मनुष्य करीत राहणार व तोंपर्यंत तरी फलज्योतिषशास्त्राला असल्या आरोपांचा भीति बाळगण्याचें मुळींच कारण नाहीं. प्रत्यक्ष आरोप करणार सुध्दां या जिज्ञासेपासून अलिप्त नाहींत व अलिप्त राहण्याचा जरी त्यांनी प्रयत्न केला तरी जोंपर्यंत जड जगाच्या जीवन-चक्राच्या रोजच्या उलाढालींत ते वास करितात तोंपर्यंत तो सिध्दीला जाणें अशक्य आहे. नैरीश्यवाद व निवृत्तिपंथ आणि शाश्वत औदासिन्य

यांच्या बुडाशीं गेल्याशिवाय या जिज्ञासच्या जाळ्यांतून सुटका होणें कठीण आहे. घडत असलेल्या किंवा घडणाऱ्या गोष्टी कोणी इच्छेनें घडल्या म्हणतो, कोणी नसर्गिकच आहे असें म्हणेल, कोणी अज्ञातशक्तीकडे बोट करितो तर फलज्योतिषज्ञ ग्रहांचा परिणाम म्हणेल व नुसत्या दैवाच्या कांसेला धरून बसणारा नशिबाची लीला म्हणेल परंतु यामुळें जिज्ञासा कांहीं माघार घेणार नाहीं. फलज्योतिषशास्त्राला ही जिज्ञासाच पाहिजे आहे.

३

भविष्यज्ञानाकडे जिज्ञासा उत्पन्न झाल्यावर साधनांची दिशा मनुष्यप्राणी पाहूं लागला तेव्हां प्रत्यक्ष रोजच्या दृष्टींत येणाऱ्या रवि चंद्र व नक्षत्रपट यांकडें त्या जिज्ञासेची दिशा वळणें सहजासहजीच प्राप्त होतें. या नक्षत्रपटाचा व आकाशस्थ ज्योतींचा तो विचार करूं लागला, अनुभवांच्या सहाय्यानें भविष्यज्ञानाकडे त्यांचा तो उपयोग होतो किंवा काय हें पाहूं लागला; कांहीं गोष्टी त्याला जशा जशा पटत तशा तशा तो स्मरणांत ठेवून विचार करूं लागला. या मार्गानें बऱ्याच कालपर्यंत अनुभवजन्य निरीक्षण व खगोल शास्त्रांतील माहिती यांचा ताळमेळ बसविण्याकडे प्रवृत्ति सुरू झाली. या शास्त्राचा उगम याप्रमाणें फार पुरातन कालापासून झालेला आहे. निसर्गनिर्मित या प्रचंड शक्तीच्या स्वरूप--धर्मनिरीक्षणाशीं एकतल्लीन होऊन नवीन नवीन गूढें उकलण्यांत मनुष्यप्राणी फार आवड धरीत असतो व तदनुसार प्रत्यक्ष नेत्राला दिसणाऱ्या ग्रहनक्षत्रांच्या निरीक्षणापासून मनुष्यप्राण्याची बुध्दि कित्येक अनुभवांच्या कसोटीवरून अनुमानें काढूं लागली. कोणतेंही अनुमान अनुभवांच्या कसोटीला उतरलें कीं तें नियमाच्या स्वरूपांत येऊन बसतें व असा अनेक सर्वसाधारण नियमांचा पध्दतशीर संग्रह मिळूनच शास्त्र बनत जातें, ही परंपरा या पण शास्त्रानें

मोडली नाहीं. वरील मार्गानें परंपरागत चालत आलेल्या अनुभवजन्य शास्त्राची विटंबना करण्याचा उद्देश जेव्हां विद्वान् व सुसंस्कृत मेंदू दाखवितो तेव्हां मात्र मनाला खेद उत्पन्न झाल्याशिवाय रहात नाहीं, याव्यतिरिक्त शास्त्राविषयींचो जिज्ञासा या मार्गानें कमी कधींहीं होणार नाहीं. इतर कित्येक जुन्या व पुरातन ज्ञानावर असे आरोप करण्यांत आले आहेत त्यांपैकीं एक हा प्रकार आहे. या शास्त्राचा देह जीर्ण होऊन त्याच्या अंगीं मांद्य येतांच त्याच्या मानगुटोवर हें संशयी पिशाच्च बस् पहात आहे तें नवें नाहीं. असा प्रकार अनेक वेळां अनेक ठिकाणीं झाला आहे तरी ह्या शास्त्रानें आजपावेतों दाद दिली नाहींच.

४

भविष्यज्ञानाच्या बाबतींत दुसऱ्या अनेक बाजूंनीं पण विचार करण्यांत आला. त्यांपैकीं सामुद्रिक, रमल, पिशाच्चसंवाद, अंक--चिन्ह प्रश्न, वगैरे मुख्य आहेत, परंतु प्रत्यक्ष शास्त्रांत असे त्यांपैकीं बरेच येऊन बसत नाहींत. त्याचप्रमाणें प्रत्येकांत थोडाबहुत कमीपणा पण दिसून येतो. सामुद्रिक अथवा रेखाज्ञान या आधारें भविष्यकथन बरेंच मर्यादित व आकुंचित असतें. हातावर रेषा ज्यांच्या असतील अशांस त्याचा कांहीं तरी उपयोग होईल परंतु लोहार--सुतार वगैरे हातांनीं घसरटींचीं कामें करणाऱ्यांच्या हातावरील बहुतेक रेषा पुसटल्या जातात त्यास या शास्त्राचा उपयोग होणें कठीण. त्याचप्रमाणें हातावरील रेषा कालानुसार बदलत असतात हा एक दुसरा अडचण आहेच. १०।१२ वर्षांपर्यंत रेषा पूर्ण हातावर उमटलेल्या नसतात हा एक अडचण आहेच. इतकें असून पुन्हां हस्तरेषांच्या आधारें भविष्यज्ञान अगदीं व्यक्तिविषयक असें मर्यादितच असतें. रमलशास्त्र म्हणजे नशिबाचे फांसे होत. या शास्त्रावर फलजातकशास्त्रापेक्षां लोकांचा विश्वास

कमीच असलेला दिसून येतो व याही शास्त्रांत मर्यादित फलें व्यक्तिविषयक सुखदुःखाचीं कल्पना देणारीं आहेत. मेदनीय--राष्ट्रीय--वैद्यक अशा अंगांवर त्या शास्त्राधारें विचार करितां येत नाहीं. पिशाच्चसंवाद हें अगदींच दुरुयम साधन आहे, प्रत्येकाला तेंसाध्य होणें कठीण आहे. भूतकालीन गोष्टींचा उलगडा पिशाच्चसंवादाच्या सहाय्यानें जितका होतो तितका भविष्यासंबंधानें होत नाहीं असें पण म्हणतात. याशिवाय दुसरे भविष्यकथनाचें मार्ग फारच आकुंचित व कनिष्ठ दर्जाचे आहेत. फलज्योतिष हें एकच असें शास्त्र आहे कीं त्याच्या सहाय्यानें व्यक्तिविषयक, आप्तस्वकीयांचें, व्यापार-राष्ट्रीय वैद्यक वगैरे सर्व प्रकारचें भविष्यकथन करतां येणें शक्य आहे. या शास्त्राला मर्यादा नाहीं. या शास्त्राचा जितका उपयोग करून घ्यावयाचा असेल तितका करून घेतां येईल, मात्र हें शास्त्र अतिव्यासंगाचें--अनुभवाचें व तर्कशक्तीचें असल्यामुळें बुध्दिसामर्थ्यानुसार या शास्त्राचें ज्ञान कमी अधिक होईल, एवढेंच नव्हे तर पध्दतशीरपणें व्यासंग करून पूर्ण यश एकाद्या शाखेंतही एका आयुष्यांत मिळणें थोड्यांसच शक्य आहे मग या शास्त्राच्या सर्व शाखांचा गोष्ट तर राहोच.

५

फलज्योतिषशास्त्रांत विविक्षित ग्रहांच्या परिस्थतींत जन्म पावलेल्या मनुष्याचें जीवित विवक्षित पध्दतीचें आहे हेंच दर्शवितें. जन्माच्या वेळीं ग्रहांचा ज्या दर्जाचा स्थिति असेल त्याच दर्जाचें त्याचें आयुष्य असतें. पुढें कोणतीही परिस्थिति अथवा ग्रह त्याच्या जीवनांत फेरबदल करूं शकत नाहींत; या मुख्य तत्त्वाकडे बऱ्याच जणांचें लक्ष नसतें. थोडक्यांत म्हणावयाचें म्हणजे मनुष्याच्या जीविताचा निकाल तो जन्म घेतांनांच निसर्गदेवता नक्षत्रपटाच्या आधारें लिहून ठेवते असें म्हणण्यास हरकत नाहीं;

किंवा विवक्षित दर्जाचीं माणसें विवक्षित ग्रहांच्या परिस्थतीतच जन्म घेतात, असें पण म्हणावयास हरकत नाहीं. ग्रहांची ही विवक्षित परिस्थिति व त्यापासून आगाऊ होणारं ज्ञान यालाच फलज्योतिषशास्त्र म्हणतात. ग्रह मागाहून येऊन त्याच्या जन्मस्थ ग्रहपरिस्थितीमध्यें बदल करीत नाहींत किंवा तशी दुसरी कोणतीही परिस्थिति पण बदल करूं शकत नाहीं. ग्रहांचा परिणाम घडमोडीवर होतो किंवा काय ही गोष्ट जरी सध्यां एका बाजूस ठेवली तरी विवक्षित ग्रहांच्या परिस्थितींत विवक्षित गोष्टी घडतात अथवा विवक्षित गोष्टी घडतांना ग्रहांची परिस्थिति पण विवक्षित प्रकारची असते एवढें तत्त्व जरी सध्यां ग्राह्य झालें तरी पुष्कळच कार्यभाग झाला असें म्हणावयास हरकत नाहीं. यापुढें प्रत्येक अशा गोष्टीचाच विचार करितांनां कोणकोणतीं प्रमाणें आढळतात हेंच आपल्यास पहावयाचें आहे.

६

मनुष्याच्या बौध्दिक व्यासंगाला योग्य, भौतिक व ऐहिक उन्नति करण्यास पोषक आणि व्यवहार्य असें हें शास्त्र आहे किंवा नाहीं हाच मुख्य वादाचा प्रश्न असून त्याच्या अंतर्भागांत दुसऱ्या अनेक शंका उत्पन्न होतात त्या मुख्यत्वें अशा आहेत.

(१) फलज्योतिषशास्त्र हा एक फक्त कांहीं आडाख्यांचा व ठोकळ्यांचा संग्रह आहे. ग्रहांच्या परिणामांचा सोपपत्तिक व इंद्रियगम्य मीमांसा करणारें हें शास्त्र नाहीं.

(२) जर शास्त्रीय पध्दत व सोपपत्तिक मीमांसा असती तर ही विद्या प्रत्येक व्यासंगी मनुष्याला चांगलीच अवगत झाली असती.

(३) लाखों मैलांवर असलेले व नेत्राला चांदणोसारखे दिसणारे ग्रह पृथ्वीवरील वस्तूवर अव्याहत परिणाम करून घडमोड करीत असतात हें प्रत्ययास येत नाहीं.

(४) ग्रहांचा परिणाम प्रत्येक घटकावयावर होतो तर तो प्रत्येकावर सारखा कां होऊं नये ?

(५) ग्रहांचे परिणाम कसे, कां व केव्हां घडतात यासंबंधीं फलज्योतिषाला खरें ज्ञान कोठें झालें आहे ?

(६) पृथ्वीवर होणारे फेरफार नैसर्गिक व उत्क्रांतिवादाला धरून होतात, त्यांत ग्रहांस फलज्योतिष उगीच प्राधान्य देतें.

(७) जर हें सोपपत्तिक पध्दतीचें शास्त्र आहे तर कांहीं फळें चुकतात, अनुभवांत कां येत नाहींत ?

(८) हें शास्त्र खरें असलें तरी त्याच्या ज्ञानानें व्यवहारांत मदत न होतां उलट संशयाच्या वातावरणांत मनुष्य गुरफटतो.

(९) या शास्त्रामुळें देववाद फार पुढें येतो व उद्योगाला शिथिलता येते. अमक्या गोष्टी व्हावयाच्याच हें ठरल्यावर त्याच्या ज्ञानानें फलांत जर बदल होत नाहीं तर तें कळून तरी उपयोग काय ?

(१०) इतर भौतिक शास्त्रांच्या व्यासंगानें जगाच्या उत्क्रांतीला फार उपयोग होतो तसा या शास्त्राच्या व्यासंगानें मानवी सुखसाधनांत भर पडणार नाहीं.

(११) फलज्योतिषी दुसऱ्याच्या नशिबाचा व लाभहानीचा उलगडा करतो तर स्वतः सट्टे लॉटरींत संपत्ति या शास्त्राधारें कां नाहीं मिळवीत ?

मुख्यतः वरील प्रकारच्या अनेक शंका या शास्त्रासंबंधानें काढण्यांत येतात व त्या सर्व जर योग्य आणि खऱ्या असत्या तर या शास्त्राला आपला गाशा केव्हांच गुंडाळावा लागला असता. ज्याला शंकाच काढावयाच्या त्याला त्या वाटेल तेथें वाटेल तेव्हां काढतां येतील. दोष काढणें हा सद्गुण जेव्हां मर्यादेबाहेर जातो तेव्हांच तो दुर्गुण बनतो. दोष काढणारास या सवयीमुळें तो स्वर्गीयसुखांत असला तरी दोष काढणारच व अगदीं नर्कासमीप असला तरी दोष तो काढणारच. हा परिस्थितीचा दोष नसून जेव्हां तो दृष्टीचाच दोष होतो तेव्हां अशी परिस्थिती होते. परमेश्वरानें पूर्णत्वाचा देणगी या पृथ्वीवर फारच थोडया प्रमाणांत दिली आहे. दोषैकदृष्टीनें एकाद्या शास्त्रांत व्यंगें काढणाराच्या मेंदूंतही वैगुण्य त्याच परमेश्वरानें ठेवलें आहे. तेथें जर पूर्णत्व असतें तर जगांत बऱ्याच गोष्टींचा मेळ पडतांना या शास्त्राचीं व्यंगें बाहेर उभें राहून काढण्यांत खऱ्या सत्यशोधनाची इच्छा पूर्ण कधीं होणार नाहीं. ज्योतिर्विद्येच्या सत्यतेच्या बुडास ज्यांस हात घालण्याची इच्छा असेल त्यांनीं स्वतः परिश्रम व व्यासंग करून या शास्त्राच्या खोलींत उतरलें पाहिजे. तार्किक विद्वत्तेच्या मार्मिक कल्पनावादानें थोडा वेळ लोकसमुहाला गारुडाप्रमाणें चकवितां येईल परंतु शास्त्रावर लादलेले आरोप कायमचे टिकून राहत नाहींत. ज्यांस हो विद्या भोंदुपणाची अथवा संशयी किंवा अव्यवहार्य वाटत असेल त्यांनीं प्रथम या विद्येचा स्वतः अभ्यास करून स्वतःच्या चिकित्सक अधिकार वाणीनें तिचा फोलपणा साधारणपणें ठरविणें जरूर आहे. त्याव्यतिरिक्त केवळ विहंगावलोकनानें सत्यनिर्णयात्मक विधानें होऊं शकणार नाहींत; व्यासंग केल्यावरच या विद्येंत गैर व अयोग्य किती आहे अथवा अयोग्य कोणतें तें ओळखतां येईल. संशोधनाचा व ज्ञानाचा मार्ग इतका सरळ व बाद-

शाही कल्पनांचा झाला नाहीं. दुसऱ्याला संशयांत टाकणारीं व दुसऱ्यासच विचार करण्यास लावणारीं विधानें एकाद्या शास्त्रावर करितांनां स्वतां विचार करणें--व्यासंग करून निष्कर्ष काढणें अथवा अंतर्गत सत्यसंशोधन करण्यापासून अलिप्त राहण्यांत कांहीं एक साध्य होत नाहीं उलट फुकट वेळ मात्र खर्चला जातो. या विद्येशीं पूर्ण परिचय करून घेऊन आपल्याशींच तिच्या सत्यासत्यतेचा सूक्ष्म विचार केला पाहिजे म्हणजे ही विद्या अनुभवसिध्द आहे अशी खात्री झाल्याशिवाय रहाणार नाहीं. त्याचप्रमाणें या शास्त्रांतील चमत्कार व निसर्गाचें खरें साम्राज्य दृष्टोत्पत्तीसही आल्याशिवाय रहाणार नाहीं. स्वदृष्टीचा पल्ला या भूगोलापुरता ठेवण्यापेक्षां तो अंतरिक्षाकडे वळविल्यास विश्वाच्या गूढपणाची जाणीव होते व या शास्त्रांत प्राविण्य मिळविणें किती कठीण आहे, या शास्त्रांत मनुष्याची बुध्दि कोठपर्यंत जाऊं शकेल, कुठें ती अडखळते, कोठें तिला ठेंचा लागतात, कोठें तिच्यापुढें अंधःकार पसरतो वगैरे अनेक गोष्टींची कल्पना करितां आल्यावर मग मनाचे मनसुभे जनसमाजापुढें मांडण्यांत कोणतेंच गैर नाहीं.

To those who really think, there is nothing in the least unreasonable in astrology, but they must think for themselves, and not allow others to think for them if they would find out where the reason lies—Alan Leo

I will know the stars, which yet alone to gain—
Is knowledge mean, unequal to the pain;
For doubts resolved, if no delight affords,
But fills soft empty heads with rattling words:*
I will search the depths, the most remote recess,
And flying Nature to confession press;
—Manilius. (अपूर्ण)

* These words will apply to some of the nineteenth (20 th in India) century 'really scientifie' men, who mistake mere learning for know ledge.

बॉंबे ॲस्ट्रालॉजिकल सोसायटीच्या सभांचा सारांश.

(ले. श्रीयुत **ना. स. मराठे**–मुंबई नं. ४)

दर रविवारीं भरणाऱ्या सोसायटीच्या बैठकींत काय काय विचार चालतो याचें विवेचन ज्योतिर्मालेंतून येत जावें अशी सूचना बरेच दिवस सोसायटीचे मेंबर करीत होते पण गुदस्त सालांत ज्योतिर्मालेस गुप्तवास करावा लागल्यामुळें हा उपक्रम या वर्षापासून करण्याचा विचार केला आहे.

संस्थेचे रिपोर्ट प्रसिध्द करून ते निरनिराळ्या वर्तमानपत्रांकडे पाठवेण्याचें सामर्थ्य आज संस्थेंत नाहीं. संस्था अतिमंदगते असून तिचें लक्ष आज ७।८ वर्षें ज्योतिष पुस्तकांचा संग्रह करण्याकडे आहे. अशा संग्रहाचा फायदा सर्व मेंबर लोकांस होत आहे. येणारे मेंबर आपल्या सवडीनुसार या पुस्तकांचा उपयोग करितातच, पण प्रत्यक्ष संस्थेंत अशा पुस्तकांचें निरीक्षण करीत गेल्यास बरें या दृष्टीनें संस्थेनें कार्य करावें असा मानस मुख्य सभासदांनीं दर्शविल्यावरून या वर्षापासून तें कार्य करण्याचा उपक्रम केला आहे. या कार्याची फायदा इतर ज्योतिर्मालेच्या वाचकांसही सहजगत्या होईल व इतर शोधकांचें लक्ष या गोष्टीकडे वेधेल व सोसायटीस नवीन ज्ञानलाभही होऊं शकेल.

कांहीं मेंबर लोकांचे सूचनेवरून नवीनच आणलेलें पुस्तक ' बृहत्पाराशरी ' वाचनास घ्यावें असें ठरलें. पुस्तकाचें अक्षरशः केवळ वाचन करण्यापेक्षां त्यांतील महत्त्वाचे मुद्दे कोणते तेवढेच स्पष्ट व्यक्त करावे अशी सूचना आली व ती सर्वांस पसंतही पडली.

" बृहत्पाराशरी " हा एक मोठा ग्रंथ आहे. यांत सामान्यफलापासून तो सर्व दशांपर्यंतचा भाग आलेला आहे. सर्व मतांचा समावेश यांत केलेला आहे. सर्व मतांच्या खिचडीचा हा ग्रंथ आहे. आपल्या आर्य-ज्योतिषांत ग्रहविचाराचे वेळीं ग्रहांच्या शत्रुमित्रत्वाचा विचार प्रामुख्यानें करितात. पाश्चात्य ज्योतिषांत अलीकडे हा विचार जवळ जवळ वगळलाच आहे. पण हा विचार फलभेद फार करितो. तेव्हां या बाजूचा विचार आपण अवश्य केला पाहिजे. निदान दशाफलांचा विचार करितांना तरी हा विचार केल्याशिवाय सुटका नाहीं. अशा प्रकारचं विचार प्रथमतः सर्वांच्या पुढें मांडले गेले. यावर श्री. डॉक्टर नामक पारशी मेंबर म्हणाले कीं हें शत्रु-मित्रत्व कसें ठरवावें या विषयीं नियम आहे. या नियमाचें मुख्य तत्त्व ग्रहांचें स्वामित्व असलेल्या राशि व त्यांचें मूल त्रिकोणस्थान यांच्यांत असलेला संबंध होय. प्रथम मूल त्रिकोणाविषयीं विचार प्रामुख्यानें पुढें मांडण्यांत आला. डॉक्टर मजकुरांनीं सांगितलें कीं चंद्र व बुध यांचे शिवाय इतर ग्रहांचें मूल त्रिकोण त्यांच्या विषम राशींत आहे. सूर्याचें मूळ त्रिकोण सिंह राशींत आहे. येवढें लक्षांत ठेविलें म्हणजे पुढें त्यांचा संबंध कळून येईल. यावर सहजीं प्रश्न आला कीं विषम राशींतच मूल त्रिकोण ठरविण्याचें कारण काय तें शोधतां येईल काय ?

ग्रहांचे मूलत्रिकोण राशी.

रवि	चंद्र	मंगळ	बुध	गुरु	शुक्र	शनि
सिंह	वृषभ	मेष	कन्या	धनु	तुला	कुंभ.

याविषयीं एक उपपत्ति ठरविण्याचा प्रयत्न झाला त्यांत ग्रहांचें शुभपापत्व ध्यानीं घेण्यांत आलें. व सारावलींतील श्लोकाधारें गुरु व शुक्र या शुभ ग्रहांचें मूल त्रिकोण जें धनु व तुला या विषम राशींत आलें त्यास

कारण हे राशि सूर्याचें स्वामित्वाचें आहेत.* हे सत्वगुणी ग्रह प्रभावशाली सूर्यराशींत जितके मानवी प्रगतीस उपयुक्त होतील तितके ते मीन व वृषभ या चंद्रराशींत असतां होणारे नाहींत. चंद्रराशींत ते असतां त्यांचा सत्वगुण आत्यंतिक मर्यादेस पोंचतो व त्यामुळें गुरु मीनेंत असतां तो विश्वाचें कल्याण करण्याची प्रवृत्ति देतो व शुक्र वृषभेंत असतां प्रेममय दृष्टि उत्पन्न करितो. रविराशींतील धनुराशींत गुरु असतां सर्व विश्वाच्या कल्याणापेक्षां प्रवृत्तींत व्यक्तीनें जें कार्य करणें वाजवी असतें तेंच कार्य गुरु घडवितो. तुला राशींतील शुक्रही याप्रमाणें जन्मणाऱ्या व्यक्तीस योग्य सहानुभूति दर्शविण्याचें सामर्थ्य देतो, केवळ आंधळें प्रेम देत नाहीं. या प्रमाणें सत्वगुणी जे गुरुशुक्र यांचा या प्रवृत्तीरूप जगांत उपयोग करून घेतां येतो. म्हणून गुरुशुक्रांचे मूल त्रिकोण राशि सूर्यराशींपैकीं धनु व तुला हे ठरविले गेले.

---

* प्रथमतः द्वादश राशि खालील प्रमाणें रवि व चंद्र या दोन ग्रहांस वाटल्या गेल्या आहेत असें मानलें असतां, वरील विवेचन वाचकांच्या चटकन लक्षांत येईल,

सिंह, कन्या, तुला, वृश्चिक, धनु व मकर—रवि.

कर्क, मिथुन, वृषभ, मेष, मीन व कुंभ—चंद्र.

या वरून दुसरी एक कल्पना स्वगृह राशिसंबंधानें सुचते ती खालील प्रमाणें. रवि व चंद्रांजवळ बुध, शुक्र, मंगळ, गुरु व शनि हे एक एक गृह—राशि सांगण्यास आले त्या वेळीं त्यांनीं प्रत्येक ग्रहाला आपल्या जवळील एकेक राशि दिली. त्यामुळें बुधाला मिथुन व कन्या, शुक्राला वृषभ व तुला, मंगळाला मेष व वृश्चिक, गुरूला धनु व मीन व शनीला मकर व कुंभ राशि देण्यांत येऊन रवीच्या वांटणीला सिंह व चंद्राच्या वाटणीला कर्क अशी एकेकच स्वगृह राशि राहिली.

शनि व मंगळ हे अत्यंत पापग्रह असल्यामुळें त्यांस क्रूरग्रह असेंहो म्हणतात. हें क्रूरत्व जर सौम्य झालें नाहीं तर मानवी जीवनास--- प्रवृत्तिपर जनास काय उपयोगाचें ? यामुळें या शनि व मंगळांचे मूल त्रिकोण कुंभ व मेष या त्यांच्या विषम राशींत ठरविलें गेलें. हे राशि चंद्राचे असल्यामुळें यांत सौम्यत्व आहे. वृश्चिक व मकर हें मंगळशनींचे समराशि सूर्यमार्गीतील असल्यामुळें त्यांत क्रूरत्व जास्त आहे. म्हणून शनि-मंगळांचें क्रूरत्व सौम्य करून तें मानवी जगास उपयोगी पडावें हाच हेतु या ग्रहांचें मूल त्रिकोण चंद्रराशींपैकीं शनीस कुंभ व मंगळास मेष हें ठरविलें.

रवि हा स्वयंप्रकाशी तारा असून त्यास स्वगृह एकच आहे. त्याच राशींत रवीचें मूलत्रिकोण कायम केलें. बुध हा ग्रह स्वयंस्वतंत्र शुभ किंवा अशुभ फल देणारा नाहीं. तो शुभग्रहानें युक्त असेल तर शुभ व पापग्रहानें युक्त असतां अशुभ फल देतो. या त्याच्या घरसोडीसही कांहीं नोट नेटकें करणें असेल तर त्याचा मूलत्रिकोण रविराशींपैकीं जो बुधाचा कन्या-राशि तोच ठरविणें योग्य होय. रविराशींत शूरत्व आहे. या शूरत्वामुळें वरील घरसोडी वृत्तीस आळा बसेल. या प्रमाणें मंगळ, गुरु, शनि, शुक्र, रवि यांचें मूलत्रिकोण त्यांच्या विषम राशींत व बुधाचें समराशींत ठरविलें. चंद्राचें मूलत्रिकोण मात्र त्याच्या स्वगृहीं ठेवलेलें नाहीं. चंद्र हा भ्रमणप्रिय ग्रह कर्क राशींत मूलत्रिकोणी न ठरविण्याचें कारण त्याचें भ्रमणप्रियत्वच होय. सर्वदा प्रवास करणाऱ्या इसमांचा संसार थाटणेंच कठीण असतें. प्रवासासाठीं अगदीं आवश्यक अशा जिनसा त्यांस बाळगाव्या लागतात. संग्राहक बुद्धि ही तर प्रवृत्तिमय जगाचा मुख्य खुण. म्हणून चंद्रास शुक्राचा चंद्रराशींपैकीं जो वृषभ राशि तो स्थिर असल्यामुळें मूळत्रिकोण ठरविण्यास

सोईचा झाला. अशा प्रकारच्या विचारसरणीनें बुध, चंद्र, रवि यांचे मूलत्रिकोण राशि कन्या वृषभ, व सिंह हे ठरतात व इतरांचे त्यांचे विषम स्वराशि ठरतात. सहज लक्षांत ठेवण्यास बुध व चंद्र यांचें मूलत्रिकोण त्यांचे उच्चांत व इतरांचें मूलत्रिकोण त्यांच्या स्वराशींपैकीं विषम राशींत असें म्हणणें सोईचें आहे. याप्रमाणें मूलत्रिकोणाच्या उपपत्तीविषयीं विचार होऊन पुढें मूलत्रिकोण राशि व ग्रहांचीं स्वगृहें यांच्या संबंधाचे साह्यानें मित्रशत्रुत्व ठरवितां येतें. त्याविषयींचा नियम सांगण्यांत आला तो:-

एखाद्या ग्रहाच्या मूलत्रिकोण राशीपासून इतर ग्रहांच्या स्वराशीपर्यंत मोजलें असतां जी अंतराची संख्या येईल ती २।१२।५।९।८।४ असतां अगर मूलत्रिकोण राशि हेंच उच्च असेल तर त्या त्या ग्रहांचें या ग्रहाशीं मित्रत्व आहे अर्से समजावें, तसें नसल्यास शत्रुत्व समजावें. रवि-चंद्रांशिवाय इतरांस दोन स्वगृहें असल्यामुळें एका स्वराशीपासून मित्रत्व व दुसऱ्या स्वराशीपासून शत्रुत्व असल्यास तो ग्रह या ग्रहाशीं सम अगर उदासीन आहे असें ठरवावें.

दुसऱ्या बैठकीचे वेळीं श्रीयुत भट यांनी हीच विचारसरणी ग्रहांचें उच्चत्व ठरवितांना घेतल्यास तो उपयोगी येईल काय असा प्रश्न केला, त्याविषयीं झालेलें विवेचन:----

गुरु व शुक्र या शुभ ग्रहांचीं उच्च स्थानें ही चंद्राच्या राशींपैकीं अनुक्रमें कर्क राशि व मीन राशींत आहेत. चंद्राचे उच्चही चंद्र राशींपैकीं वृषभ राशींत आहे. या तिघांचें उच्चत्व चंद्रराशींत येण्यास कारण उच्चत्वाचे अर्थावरून असें दिसतें. ग्रहाचें फल अत्यंत उत्कटत्वानें मिळण्यास त्यांच्या गुणांस लायक अशा राशि मिळणें हें आहे. चंद्रराशि या समावानें

व सौभाग्यकारक असल्यामुळें या राशींत शुभ ग्रह जे गुरु व शुक्र यांचे सत्वगुण उत्कटत्वानें अनुभवास येण्यास प्रेमवर्धक शुक्रास चंद्रराशींपैकीं मीन या विश्वप्रेमी राशींत उच्चत्व दिलें. गुरु हा ज्ञानवान् ग्रह असल्यामुळें त्यास उत्कटत्वानें चमकण्यास चंद्रराशींतील कर्क या चर राशींचें उच्चत्व ठरविलें. कारण ज्ञान सर्वत्रांस दिलें गेल्यासच ज्ञानी माणसास उच्चत्व प्राप्त होतें. रवीसही उच्चत्व त्याचे समान फल देणारा जो मंगळ त्याचे धर्माशीं संलग्न होणारा चंद्र राशींतील जो मेष राशि त्यांत निश्चित केलें आहे. बुधाचें उच्चत्व कन्या राशींतच ठरविण्याचें मुख्य कारण मागें मूलत्रिकोण प्रसंगीं ठरविलेलेंच दिसतें. मंगळ व शनि या क्रूर ग्रहांचें उत्कटत्व अनुभवास येण्यास त्यांचे उच्च राशि रविराशींतच ठरविणें योग्य आहे. त्यांचें उत्कट क्रूरत्व जगाचे प्रवृत्तीस मारक न व्हावें या हेतूनें तें अनुक्रमें मकर व तुला या राशींत ठरविलें. तुला राशींतील धर्म शुक्र या शुभ ग्रहाशीं मिळते असल्यामुळें शनीचें उच्चत्व या राशींत ठरविल्यास शनीचें उत्कट फल मिळतांना तें प्रवृत्तीस विघातक होणार नाहीं. मंगळ या अति चलाख व झटपट काम करणाऱ्या ग्रहाचें उत्कटत्व प्रवृत्तीस उपयोगी होण्यास त्याचें उच्चत्व मकर या सर्वांस आळा घालणाऱ्या शनीच धर्माशीं समफल होणाऱ्या राशींत ठरविणेंच योग्य. याप्रमाणें विचार करितां मूलत्रिकोण प्रसंगीं जी विचारसरणी धरली तीच थोडया फरकानें या उच्चत्व ठरविण्याचे प्रसंगींही अंगिकारलेली आढळेल.

या विचारसणीप्रमाणें दुसरी एक विचारसरणीही पुढें आली ती-- रवि हा अत्यंत स्वयंप्रकाशी व ग्रहमालेचा आधार म्हणून, मंगळ, गुरु व शनि हे पृथ्वीपलीकडील बाह्य कक्षेचे ग्रह म्हणून, त्यांस सर्व राशींत प्रमुख ज्या चर राशी त्यांतच उच्चत्व ठरविलें. राशिचक्रारंभीं असलेला

मेषराशि. त्यांत रवि आल्यास सर्व ऋतूंत जो श्रेष्ठ त्या वसंतास सुरवात होते व जीवनशक्ति सर्व जगांत अनुभवास येते. रवीचें आत्मतेज याप्रमाणें मेषेंत पूर्ण उत्कटत्वानें मिळतें. मेषेंत सूर्यप्रवेश ज्या दिवशीं होतो त्या दिवशीं अहोरात्र सम होतें. प्राण्यांच्या जीवनशक्तीचा वाढ खुंटविण्याचें कार्य रवि तुला राशींत आल्यास होतें. वर्षा ऋतूंत पाऊस पडलेला असला तरीही वसंतारंभीं वनश्रीस येणारी टवटवी व झाडांस येणारी पालवी जरी अहोरात्र सम होत असलें तरी तुला सक्रांति कालीं अनुभवास येत नाहीं. रवीचे धर्माशीं पूर्ण विसंगत धर्म फक्त शनीचे आहेत. शनीचें कार्यही चैतन्यशक्तीस आळा घालणारें आहे. यामुळें शनीस तुला या चर राशींत उच्चत्व ठरविलें.

कर्क हा चर राशि असून या राशींत सूर्याचा प्रवेश ज्या दिवशी होतो त्या दिवशी दिवसाचे वाढीची पूर्णता होतें. या राशींत गुरूस उच्चत्व ठरविलें. मकर राशींत रवि जाईल त्या दिवशीं रात्रीची वाढ पुरी होते. या राशींत मंगळास उच्चत्व दिलें. मंगळ हा शक्तीची वाढ करणारा असून गुरु ज्ञानवृध्दि करेतो. चैतन्यास शक्ति अगर ज्ञान यांची जोड देणारे हे ग्रह याप्रमाणें कर्क व मकर राशींत उच्च ठरविले गेले.

बुध व शुक्र हे पृथ्वीच्या कक्षेच्या आंतील कक्षा असलेले ग्रह आहेत. यांचें उच्चत्व द्विस्वभाव राशींत ठरविलें. त्यांतही शुक्रास मीन ही चंद्रराशि व बुधास कन्या ही रविराशि ठरविला. चंद्रास मात्र वृषभ ही स्थिर राशि उच्च राशि म्हणून ठरविला. चंद्र हा पृथ्वीचा उपग्रह आहे तसेंच पृथ्वी राशींतील आदिराशि वृषभ आहे. चरराशींतील आदि राशि मेष जसा ग्रहमालेस आधार असा रवीस उच्च राशी ठरविला तसाच पृथ्वीराशींतील आदिराशि जो वृषभ तो उच्च राशि चंद्रास ठरविला.

तिसऱ्या बैठकीस पाराशरींतील शत्रुमित्रत्वाप्रमाणें द्वादशराशि लग्नीं असतां निरनिराळे ग्रह शुभ व पाप फलदायी आहेत हा विचार पराशरास अनुसरणाऱ्या इसमांनीं सोडतां कामा नये. हा मुद्दा पुढें घेण्यांत आला. या मुद्याचें विवेचन पुढील एक दोन बैठकींतही चालू राहिलें. त्याचा सारांशः---

ज्योतिषांत सामान्य नियम असा आहे कीं शुभ ग्रह शुभ फलें उत्पन्न करितात व पापग्रह अशुभ फलें देतात. किंबहुना त्यांच्या अशुभ किंवा शुभ फलें उत्पन्न करण्याच्या धर्मामुळें त्यांस पापग्रह किंवा शुभ ग्रह ठरविलें. यावर एक उपपत्ति पुढें आली कीं आकाशांत गुरु व शुक्र हे शुभ्र तेजानें चमकतात. शुभ्रत्व हें शुभत्वाचें लक्षण मानतात. पण सर्व ग्रहांत क्रूर ग्रह ठरलेले मंगळ व शनि यांचें तेज शुभ्र नाहीं. मंगळ रक्तवर्ण व शनि नीलवर्ण आहेत. हे वर्ण शुभत्वाचे दर्शक नाहींत. रवि चंद्र बुध यांस शुभ पापत्व जरी दिलेलें आहे तरी सामान्यतः ते पापग्रहांनीं दूषित असतां पापग्रहांच्या फलांचें आधिक्यच आढळतें.

या सामान्य नियमास अनुसरून सर्व कुंडल्या पाहण्याचें तत्व पाराशरीमध्यें नाहीं. सामान्य नियम अजीबाद झुगारून दिलेला आहे असेंहि नाहीं. पण मेषादि द्वादश लग्नास निरनिराळे ग्रह शुभ व पापफल देणारे ठरविले आहेत. याच विषयीं विचार करतां ३।६।८।११ या स्थानांचे, तसेंच २।७ या मारकस्थानांचे जे स्वामी असतील ते ग्रह अशुभ ठरविले आहेत. उदाहरणार्थ, तुला लग्न असतां गुरु, मंगळ व रवि हे अनिष्ट फल देणारे आहेत. हा विचार सोडता कामा नये. या विषयींचें महत्व दशाफलाचा विचार करितांना आहे. या मुद्यास अनुसरून एक कुंडली विचारार्थ पुढें घेतली तिचा विचार पुढील अंकीं वाचकांस सादर करीन.

सन १९२३ सालचें पावसाचें भविष्य.

(ले. **पांडुरंग रामचंद्र महाजन, ज्योतिषी,** पो. हर्णे. जि. रत्नागिरी.)

सूचना.—ज्योतिर्मालेच्या वर्ष ७ वें अंक १ ते ३ मध्यें रा. रा. बापट यांचो पर्जन्य विचाराची माहिती प्रसिध्द केली असून त्या आधारें केलेलें भविष्यही प्रसिध्द केलें आहे. रा. बापट यांचें भविष्य ज्योतिषशास्त्राधारें केलेलें नसून तें त्यांनीं बसविलेल्या नवीन शोधाप्रमाणें आहे. आज रोजीं या अंकामध्यें रा. महाजन यांचें पावसाचें भविष्य प्रसिध्द करीत आहों. हें भविष्य फलज्योतिष शास्त्राधारें केलेलें आहे असें रा. महाजन यांचें म्हणणें आहे. हें भविष्य कसें करावें किंवा कोणत्या नियमाला धरून कलेलें आहे यासंबंधानें पुढें मागें महाजन हे आपले विचार रा. बापटाप्रमाणें उवडपणें चर्चेकरितां निबंधरूपानें किंवा स्वतंत्र पुस्तकरूपानें मांडतील अशी आशा आहे. हें भविष्य आमच्या मताप्रमाणें आहे किंवा लेखामध्यें प्रतिपादन केलेले विचार आम्हांस मान्य आहेत असें कोणीहो समजू नयें.

संपादक—

फल ज्योतिषाची सत्यता व उपयुक्तता पटणेकरितां सर्व भविष्य गणिताचें आधारांसह दिलें आहे. नवांश निरयण पध्दतीनें पाहाणें.

जूनः—ता. ५ रोजीं शुक्र हर्शल त्रिरेकादश योग असल्यामुळें या दिवसापासून बंगालचे उपसागरांतून मध्यम जोराचें वादळ येऊन या दिवसापासून बंगालचे उपसागरांतून पावसाला सुरुवात होऊन तो इंदोर, नागपूर, वऱ्हाड प्रांतांत अगदीं बेताचा पाऊस पडल. महाराष्ट्रांत पडणार नाहींच. ता. ८ रोजीं रात्रीं बुध शुक्र एका राशींत येत असल्यामुळें ता. ९ पासून कोलंबोकडून वादळ येऊन, रत्नागिरी कुलाबा जिल्ह्यांत पावसाला सुरवात होईल. हें वादळ आरंभीं कमी जोराचें असेल, ता. ११ रोजीं

बुध मार्गी होतांच वादळाला जोर चढेल. व या दिवसापासून महाराष्ट्रांत आणि वऱ्हाडांत सर्वत्र मुबलक पाऊस सुरू होईल. आठ दहा दिवस पावसाला फार जोर राहील मग थोडा कमी पडेल. ता. १३ रोजीं गुरू मंगळ एका नवांशांत येत असल्यामुळें या तारखेपासून झांझिबारकडून वादळ येईल. व गुजराथेंतही ता. १३ पासून पांच सहा दिवस चांगला पाऊस पडेल. शुक्र नेपच्यून बुध नेपच्यून त्रिरेकादश योग शुक्र शनि एका नवांशांत. या योगांमुळें ता. २५ ते ३० पर्यंत जास्त पाऊस पडेल. एकंदरींत ता. ११।१२ जून पासून ३० जून पर्यंत सर्वत्र पुष्कळच पाऊस पडेल. जास्त पावसामुळें पेरणीचें व बांधबंदिस्तीचें थोडें फार नुकसान होण्याचा संभव आहे. करतां शेतकऱ्यांनीं सावध राहावें.

जुलैः—ता. ३ रोजीं मंगळ शनि एका नवांशांत येतात. ता. ४ रोजीं बुध शुक्र युती मिथुनेंत आहे. ता. २ रोजीं रवि गुरु एका नवांशांत येतात यामुळें ता. ३।४ पासून बंगालचे उपसागरांतून व आरबी समुद्रांत नैऋत्येकडून, व झांझिबारकडून, अशीं तीन दिशांनीं वादळें येऊन सर्वत्र ५।६ दिवस चांगला पाऊस पडेल. झांझिबार कडील वादळ मात्र कमी जोराचें असेल, यामुळें गुजराथेंत पाऊस कमी पडेल. आवणीचे कामाला या पावसाचा चांगला उपयोग होईल. रवि बुध. मंगळ बुध बुध नेपच्यून युती. गुरूचे समोरचे नवांशांत मंगळ. शुक्र शनि एका नवांशांत बुध शनि त्रिरेकादश योग या योगामुळें ता. १३ ते १८ २२।२६।२८।२९। ३०।३१ या दिवशीं सर्वत्र चांगला पाऊस पडेल. जूनपेक्षां जुलैमध्यें पाऊस कमी पडेल. जुलैचे दुसरे पंधरवड्यांत कित्येक ठिकाणीं पावसाची टंचाईच भासेल. पण तादृश नुकसान मात्र कोठेंही होणार नाहीं.

आगष्टः—ता. ९ रोजीं रवि मंगळ युती, व मंगळ शनी, त्रिरेकादश योग असल्यामुळें या तारखेपासून झांझिबारकडून व बंगालच उपसागरांतून जोराचीं वादळें येतील व ७।८ दिवस सर्वत्र उत्तम पाऊस पडेल. ता. २३ रोजीं शुक्र, मंगळ, युती आहे. ते दोनी अस्तंगत असल्यामुळें बंगालचे उपसागरांतून मध्यम जोराचें वादळ येईल. व ता. २३ पासून ४।५ दिवस नागपूर, वऱ्हाड, या प्रांतांत चांगला पाऊस पडेल. महाराष्ट्रांत या दिवसांत पाऊस कमी पडेल. रवि गुरू, मंगळ गुरू, एका नवांशांत रवि नेपच्यून, मंगळ नेपच्यून, शुक्र नेपच्यून युती, बुध गुरू शुक्र शनि त्रिरेकादश योग बुध हर्शल प्रतियोग या योगांमुळें ता. १२ ते २० पर्यंत सर्वत्र चांगला पाऊस पडेल. एकंदरींत आगष्टमध्यें पावसाची कोठेंही ओरड न होतां सर्वत्र चांगला पाऊस पडेल. जुलैपेक्षां आगष्टमध्यें पाऊस कमी न पडतां कांहींसा जास्तच पडेल. व शेतीला चांगला उपयोग होईल.

सप्टेंबरः—ता. ८ रोजीं रवि गुरू, शुक्र गुरू, त्रिरेकादश योग ता. ९ रोजीं रवि हर्शल शुक्र हर्शल प्रतियोग ता. १० रोजीं रवि शुक्र युती, या योगांमुळें ता. ८।९ पासून झांझिबारकडून व बंगालचे उपसागरांतून जोराचीं वादळें येऊन ७।८ दिवस सर्वत्र उत्तम पाऊस पडेल. ता. २४ रोजीं मंगळ हर्शल प्रतियोग ता. २७ रोजीं बुध शुक्र युती ता. २९ रोजीं मंगळ गुरू, त्रिरेकादश योग असल्यामुळें ता. २८।२९ पासून बंगालचे उपसागरांतून व झांझिबार कडून वादळें येतील. व ४।५ दिवस सर्वत्र चांगला पाऊस पडेल. रवि, गुरू, शुक्र, शनि, मंगळ, शनी, एका नवांशांत गुरूचे समोरचे नवांशांत मंगळ. शनी, नेपच्यून त्रिरेकादश योग रवि बुध युती या योगांमुळें ता. १।२।३ १४ ते १८ २५ ते ३० या दिवशीं सर्वत्र चांगला पाऊस पडेल. एकंदरींत सप्टेंबरांत पावसाची कोठेंही ओरड न होतां सर्वत्र चांगला पाऊस पडेल. यामुळें पिकें उत्तम येतील.

अक्टोबर:—ता. ९ रोजीं शुक्र शनी, युतो आहे या वेळीं शनो अस्तंगत आहे. शुक्रोदय नुकताच झाला आहे यामुळें या तारखेपासून आरबो समुद्रांत नैऋत्येकडून मध्यम जोराचें वादळ येऊन एक दोन दिवस कोंकणांत व पुणें, सातारा, ठाणें या जिल्ह्यांत पाऊस पडून भाद्रपद अखेर पावसाळा खलास होईल.

क्यालडी संवत्सर चक्र.

[ले:—परशराम यशवंत हळदणकर.]

आपलेकडे ज्याप्रमाणें प्रभवविभवादि ६० वर्षांचें बार्हस्पत्य संवत्सर चक्र आहे त्याचप्रमाणें खालडोयन लोकांमध्यें एक २५२ वर्षांचें संवत्सर चक्र असल्याचें पाहण्यास मिळतें. आपण प्रत्येक वर्षाला जें विशिष्ट नांव येईल त्याप्रमाणें फळादेश पाहतों. खालडी संवत्सर चक्र प्रत्येक निरनिराळ्या ग्रहाचे अंमलाखाली असून तदनुरोधानें फळादेश पाहण्याचा प्रघात आहे. आपलेकडील संवत्सरचक्राचा आरंभ शालिवाहन शकाच्या आरंभापासून किंवा विक्रम शकाच्या आरंभापासून करितात. खालडी संवत्सरचक्राचा आरंभ इसवी सनापासून करितात. खालडी संवत्सर चक्राबद्दल विशेष अशी माहिती युरोपीय ग्रथांमध्यें मिळत नाही. फक्त कबालीस्टीक अस्ट्रॉलॉजी व दुसऱ्या तशाच तऱ्हेच्या विषयावर असलेल्या पुस्तकांमध्यें या चक्राबद्दल माहिती मिळते. हें चक्र कोणी शोधून काढलें किंवा तें किती जुनें आहे वगैरे संबंधानें आज माहितीच्या अभावी निश्चित असें कांहींच सांगतां येत नाहीं. जन्मकाळच्या ग्रहांच्या स्थितीवरून ज्याप्रमाणें फलादेश सांगतां येतो किंवा भविष्य सांगतां येतें, त्याचप्रमाणें नुसत्या जन्मनांव, त्यांतील अक्षरें, जन्मदिवस यांवरून भविष्य करण्याचा एक प्रकार

पाश्चिमात्य ज्योतिर्विदांमध्यें असल्याचें पाहण्यास मिळतें. याच विषयाला **कबाला** अक्षरशास्त्र किंवा स्वरशास्त्र असें म्हणतात. या शास्त्राचा व मंत्रशास्त्राचा अति निकट संबंध आहे. यासंबंधानें बरीच माहिती हिब्रूमध्यें आहे, व ती युरोपीय संघामध्यें आलेली आहे. फ्रान्समध्यें या पद्धतीनें भविष्य करणारे अनेक उत्तमोत्तम ज्योतिर्विद होऊन गेले असून त्यांचे या विद्येवर अनेक ग्रंथ प्रस्तुत उपलब्ध आहेत. याच ग्रंथावरून प्रसिध्द आंग्ल ज्योतिर्विद ' सेफेरीअल ' यानें कबालिस्टीक अस्ट्रॉलॉजी नांवाचें पुस्तक तयार केलें आहे व त्यामध्यें त्यानें हें काळचक्र दिलेलें आहे. व त्यावरूनच प्रस्तुतची माहिती घेतली आहे. या संवत्सरचक्राचा उपयोग मेदिनीय ज्योतिष किंवा राष्ट्रीय ज्योतिषामध्यें पुष्कळ आंग्ल ज्योतिर्विद करितात. येथें याला क्यालडी संवत्सर चक्र म्हटलें आहे तें मूळचें हिब्रूलोकांचें असणें संभवनीय आहे. हें चक्र २५२ वर्षांचें असून त्यामध्यें छत्तीस छत्तीस वर्षांचा एक असे सात विभाग केले असून ते विभाग वारांच्या अधिपतींच्या उलट क्रमानें प्रत्येक ग्रहाला वांटून दिले आहेत. किंवा त्या त्या ३६ वर्षांचा विभाग त्या वाराचा अधिपति जो ग्रह त्याचे अमलाखालीं आहे असें मानलें आहे; म्हणजे प्रथमचा विभाग शनीचे अमलाखालीं येतो तर दुसरा शुक्र तिसरा बुध चवथा गुरु पांचवा मंगळ सहावा चंद्र तर सातवा रवि याप्रमाणें ३६ वर्षांच्या विभागाचे निरनिराळे ग्रह चक्राधिपति होतात. यानंतर प्रत्येक वर्षावर कोणत्या ग्रहाचा अंमल आहे हें ग्रहांच्या गतीप्रमाणें असलेल्या क्रमानें अधिपति घेतात. म्हणजे शनि, गुरु, मंगळ, रवि, शुक्र, बुध व चंद्र या क्रमानें नंतर शब्दाधिप ठरवितात. या चक्राचा आरंभ ख्रिस्तशकापासून मानलेला असल्याचें पूर्वीच सांगितलें आहे त्याप्रमाणें खालील प्रमाणें प्रत्येक ३६ वर्षांचा विभाग त्या त्या अमलाखालीं आहे.

शनीच्या महत् चक्राचीं वर्षें:---इ. स. १ ते ३६, २५३ ते २८८, ५०६ ते ५४०, ७५७ ते ७९२, १००९ ते १०४४, १२६१ ते १२९६, १५१३ ते १५४८, १७६५ ते १८०० इत्यादि.

शुक्राच्या महत्चक्राचीं वर्षें:---इ. स. ३७ ते ७२, २८९ ते ३२४, ५४१ ते ५७६, ७९३ ते ८२८, १०४५ ते १०८०, १२९७ ते १३३२, १५४९ ते १५८४, १८०१ ते १८३६ इत्यादि.

गुरूच्या महत् चक्राचीं वर्षें:---इ. स. ७३ ते १०८, ३२५ ते ३५०, ५७७ ते ६१२, ८२९ ते ८६४, १०८१ ते १११६, १३३३ ते १३६८, १५८५ ते १६२०, १८३७ ते १८७२, इत्यादि.

बुधाच्या महत् चक्राचीं वर्षें:---इ. स. १०९ ते १४४, ३६१ ते ३९६, ६१३ ते ६४८, ८६५ त ९००, १११७ ते ११५२, १३६९ ते १४०४, १६२१ ते १६५६, १८७३ ते १९०८ इत्यादि.

मंगळाच्या महत् चक्राचीं वर्षें:---इ. स. १४५ ते १८०, ३९७ ते ४३२, ६४९ ते ६८४, ९०१ ते ९३६, ११५३ ते ११८८, १४०५ ते १४४०, १६५७ ते १६९२, १९०९ ते १९४४ इत्यादि.

चंद्राच्या महत्चक्राचीं वर्षें:---इ. स. १८१ ते २१६, ४३३ ते ४६८, ६८५ ते ७२०, ९३७ ते ९७२, ११८९ ते १२२४

१४४१ ते १४७६, १६९३ ते १७२८, १९४५ ते १९८० इत्यादि.

रवीच्या महत्चक्राचीं वर्षें:---इ. स. २१७ ते २५२, ४६९ ते ५०४, ७२१ ते ७५६, ९७३ ते १००८, १२२५ ते १२६०, १४७७ ते १५१२, १७२९ ते १७६४, १९८१ ते २०१६, इत्यादि.

वर दिलेलीं महत् चक्रांचीं वर्षें इसवी सनापूर्वी व इ. स. २०१६ नंतर वर दिलेल्या अनुक्रमानें मोजावीत.

खालीं दिलेल्या ६ महत्चक्रांवरून इ. स. १७६५ पासून इ. स. १९८० पर्यंत कोणत्याही वर्षाचा महत्चक्राधिपति व वार्षिक अधिपति किंवा अब्दाधिपति कोण आहे हें स्पष्ट समजेल. व त्यावरून त्या वर्षांत होणाऱ्या गोष्टींची सहज कल्पना करितां येईल.

शनीचें महत् चक्र.

शनि.	१७६५	१७७२	१७७९	१७८६	१७९३	१८००
गुरु.	१७६६	१७७३	१७८०	१७८७	१७९४	
मंगळ.	१७६७	१७७४	१७८१	१७८८	१७९५	
रवि.	१७६८	१७७५	१७८२	१७८९	१७९६	
शुक्र.	१७६९	१७७६	१७८३	१७९०	१७९७	
बुध.	१७७०	१७७७	१७८४	१७९१	१७९८	
चंद्र.	१७७१	१७७८	१७८५	१७९२	१७९९	

शुक्राचें महत् चक्र.

शुक्र.	१८०१	१८०८	१८१५	१८२२	१८२९	१८३६
बुध.	१८०२	१८०९	१८१६	१८२३	१८३०	
चंद्र.	१८०३	१८१०	१८१७	१८२४	१८३१	
शनि.	१८०४	१८११	१८१८	१८२५	१८३२	
गुरु.	१८०५	१८१२	१८१९	१८२६	१८३३	
मंगळ.	१८०६	१८१३	१८२०	१८२७	१८३४	
रवि.	१८०७	१८१४	१८२१	१८२८	१८३५	

गुरूचें महत् चक्र.

गुरु.	१८३७	१८४४	१८५१	१८५८	१८६५	१८७२
मंगळ.	१८३८	१८४५	१८५२	१८५९	१८६६	
रवि.	१८३९	१८४६	१८५३	१८६०	१८६७	
शुक्र.	१८४०	१८४७	१८५४	१८६१	१८६८	
बुध.	१८४१	१८४८	१८५५	१८६२	१८६९	
चंद्र.	१८४२	१८४९	१८५६	१८६३	१८७०	
शनि.	१८४३	१८५०	१८५७	१८६४	१८७१	

बुधाचें महत् चक्र.

बुध.	१८७३	१८८०	१८८७	१८९४	१९०१	१९०८
चंद्र.	१८७४	१८८१	१८८८	१८९५	१९०२	
शनि.	१८७५	१८८२	१८८९	१८९६	१९०३	
गुरु.	१८७६	१८८३	१८९०	१८९७	१९०४	
मंगळ.	१८७७	१८८४	१८९१	१८९८	१९०५	
रवि.	१८७८	१८८५	१८९२	१८९९	१९०६	
शुक्र.	१८७९	१८८६	१८९३	१९००	१९०७	

मंगळाचें महत्चक्र.

मंगल.	१९०९	१९१६	१९२३	१९३०	१९३७	१९४४
रवि.	१९१०	१९१७	१९२४	१९३१	१९३८	
शुक्र.	१९११	१९१८	१९२५	१९३२	१९३९	
बुध.	१९१२	१९१९	१९२६	१९३३	१९४०	
चंद्र.	१९१३	१९२०	१९२७	१९३४	१९४१	
शनि.	१९१४	१९२१	१९२८	१९३५	१९४२	
गुरु.	१९१५	१९२२	१९२९	१९३६	१९४३	

चंद्राचें महत् चक्र.

चंद्र	१९४५	१९५२	१९५९	१९६६	१९७३	१९८०
शनि.	१९४६	१९५३	१९६०	१९६७	१९७४	
गुरु.	१९४७	१९५४	१९६१	१९६८	१९७५	
मंगळ.	१९४८	१९५५	१९६२	१९६९	१९७६	
रवि.	१९४९	१९५६	१९६३	१९७०	१९७७	
शुक्र.	१९५०	१९५७	१९६४	१९७१	१९७८	
बुध.	१९५१	१९५८	१९६५	१९७२	१९७९	

वरील चक्रांवरून असें दिसून येईल कीं, गुरूचें महत् चक्र इ. स. १८३७ पासून इ. स. १८७२ पर्यंत होतें. व या काळांत सर्वसाधारणपणें गुरूच्या धर्माप्रमाणें सुखसमाधान व एकंदरींत बऱ्याच गोष्टींत प्रगती झाली. त्यानंतर बुधाचें महत् चक्र इ. स. १८७३ पासून इ. स. १९०८ पर्यंत होतें या काळांत बुधाच्या धर्माप्रमाणें पुष्कळ निरनिराळे ग्रंथ, दळणवळणाचीं साधनें याची वाढ, व्यापाराला तेजी इत्यादि गोष्टी झाल्या. सध्यां मंगळाचें महत् चक्र चालू आहे व या काळामध्यें मंगळ हा ग्रह ज्या गोष्टींचा कारक आहे तद्योतक गोष्टींमध्यें बऱ्याच घडामोडी झाल्या पाहिजेत. मंगळ हा लढाया, जाळपोळ, खून, मारामाऱ्या, अत्याचार, अपघात, फौजफाटा, पोलीस, अग्निसाह्यानें चालणारे कारखाने यांचा द्योतक असल्यामुळें वरील गोष्टींचा अनुभव बऱ्याच प्रमाणानें जगास आलेला आहे. व पुढील काळांत थोडा बहुत तरी येईल असा अजमास आहे.

वर्षाच्या अधिपतीचा अंमल ज्यानेवारीपासून होतो तसा न घेतां जेव्हां वर्षप्रवेश होईल त्या वेळेपासून म्हणजे सायन मेष संक्रमण ज्या दिवशीं होतें तेथून वर्षगणना करावी व अब्दाधिपति वर्ष कुंडलीमध्यें कसा काय बसला आहे याची जोड घेऊन फळादेशाचा विचार करावा असें कांहीं ज्योतिर्विदांचें मत आहे, प्रथम जेव्हां एखाद्या ग्रहाचें महत् चक्र सुरू होतें त्या वेळीं होणाऱ्या मेष संक्रमण कालची कुंडली ही फार महत्वाची असून तीमधून होणाऱ्या दृष्टियोगानुरूप व चक्राधिपतीच्या स्थित्यनुरूप पुढील येणाऱ्या ३६ वर्षांच्या काळामध्यें घडामोडी घडतात असें कांहींचें मत आहे. या दोन वरील कल्पना विचार करण्यासारख्या आहेत. व या दृष्टीनें पाहतां इसवी सन १९०९ मध्यें झालेलें सायनमेष संक्रमण हें सन १९४४ पर्यंत फार महत्वाचें आहे.

आर्यांचें संवत्सर चक्र.

(लेखांक १ ला.)

मागील लेखामध्यें खालडी लोकांचें किंवा हिब्रू संवत्सर चक्रासंबंधानें माहिती दिली आहे, त्याच बरोबर आपलेकडे संवत्सरगणना कशी करितात वगैरे संबंधानें थोडक्यांत माहिती दिली असतां या दोन संवत्सर चक्रांसंबंधानें वाचकांना तुलनात्मक विचार करण्यास मदत होईल असें वाटल्यावरून खालील माहिती कै. रा. रा. शंकर बाळकृष्ण दीक्षित यांचे भारतीय ज्योतिषशास्त्राच्या इतिहासाच्या आधारानें दिली आहे.

संवत्सर हा शब्द मूळचा वर्ष या अर्थीच आहे. परंतु प्रभव इत्यादि ६० नांवें अनुक्रमानें वर्षांना देण्याची एक पध्दति आहे, त्या नांवांसही संवत्सर ही संज्ञा लाविताते. ह्या संवत्सरांची उत्पत्ति बृहस्पतीच्या गतीवरून झाली, म्हणून याला बार्हस्पत्य संवत्सर म्हणतात. बृहस्पतीची नक्षत्रमंडळांतून एक प्रदक्षिणा सुमारें १२ वर्षांनीं होते, असें कळून आल्यावर या संवत्सरांची उत्पत्ति झाली असली पाहिजे. सूर्याच्या एका प्रदक्षिणेस जो काळ लागतो त्यास वर्ष हें नांव असून त्याच्या १२ भागांस मास म्हणतात. त्याचप्रमाणें गुरूचा प्रदक्षिणा काळ हें एक गुरुवर्ष आणि त्याचा जो १२ वा भाग तो गुरुमास अशी पद्धति सुरूं झाली असावी. चंद्रमासांचीं चैत्रादि नांवें नक्षत्रांवरून पडलीं आहेत; त्याप्रमाणें, गुरु सूर्यसान्निध्यामुळें वर्षांत कांहीं दिवस अस्तंगत असतो, तो ज्या नक्षत्रीं उदय पावेल त्या नक्षत्रावरून गुरूच्या मासांस नांवें देऊं लागले. हे गुरूचे मास म्हणजे वस्तुतः सौरवर्षांचीं नांवें होत. म्हणून चैत्र संवत्सर, वैशाखसंवत्सर असें म्हणूं लागले. वर्षसंख्या मोजण्यास द्वादशसंवत्सरचक्र हें एक चांगलें साधन होय. या द्वादशसंवत्सरचक्राचे दोन प्रकार आहेत. एक गुरूच्या उदयावरून संवत्सर नाम देणें हा; यास **उदयपद्धति** असें नांव देऊं. गुरूच्या एका उदयापासून दुसऱ्या उदयापर्यंत सुमारें ४०० दिवस जातात. आणि एका गुरुभगणांत म्हणजे १२ वर्षांमध्यें गुरूदय ११ होऊन एका संवत्सराचा लोप होतो. ही पद्धति थोडी गैरसोईची आहे. म्हणून गुरूचा मध्यमगती

जेव्हां बरोबर माहिती झाली तेव्हां नक्षत्रमंडळाचा १२ वा भाग म्हणजे एक राशि क्रमण्यास जो काळ लागतो त्यास गुरूचा मास म्हणजे संवत्सर म्हणावयाचें असें ज्योतिष्यांनीं ठरविलें. या रीतीनें १२ वर्षांत संवत्सराचा लोप होत नाहीं. या पद्धतीला **मध्यम राशि पद्धति** म्हणूं. गुरूचा उदय पहाणें व समजणें हें जसें स्वाभाविक व सोपें आहे तसें मध्यम मानानें एक राशि क्रमण्यास गुरूला किती काळ लागतो हें समजणें साहजिक व सोपें नाहीं. यावरून उदयपद्धति मूळची असली पाहिजे. ही शकापूर्वी ५०० वर्षांच्या पूर्वी प्रचारांत होती असें भारतावरून दिसतें. चैत्रादिक संवत्सर आपल्या प्रांतांत माहीत नाहींत, परंतु मारवाडी लोकांच्या चंडू पंचांगांत मध्यमराशि पद्धतीनें "चैत्रसंवत्सर" अशा प्रकारचें संवत्सराचें नांव असतें. तसेंच **मद्रास** इलाख्यांतील चांद्रमानाच्या तैलंगी पंचांगांत उदयपद्धतीनें संवत्सर नाम असतें. आजपर्यंत अनेक प्राचीन ताम्रपट व शिलालेख सांपडले आहेत, त्यांत गुप्त म्हणून राजे होऊन गेले त्यांच्या वेळचे शक वर्ष ३९७ पासून ४५० पर्यंतचे पांच लेख सांपडले आहेत. त्यांत चैत्रादिसंवत्सरांचा उपयोग केला आहे. तसेंच दक्षिणेतील **मृगवर्मा** नांवाच्या कदंब राजाचे दोन लेख सांपडले आहेत. त्यांतही असे संवत्सर आहेत.

वेदांगज्योतिषांतील युग पांच वर्षांचें आहे, त्याप्रमाणें गुरूच्या ५ वर्षांचें एक युग कल्पिलें आहे. अर्थात् त्यांत सुमारें ६० सौर वर्षें आलीं. आणि त्यांच्या संवत्सरांस प्रभव इत्यादि नांवें ठेविलीं. याप्रमाणें षष्टिसंवत्सरचक्र उत्पन्न झालें. हें अर्थातच द्वादशसंवत्सरचक्राच्या मागाहून उत्पन्न झालें असावें. वर्षसंख्या मोजण्यास हें त्याहून जास्त सोईचें आहे. प्रथम याचेही संवत्सर गुरूच्या मध्यम राशि भोग काळावरून ते मोजूं लागले. गुरूला मध्यम गतीनें एक राशि क्रमण्यास सूर्यसिद्धांताप्रमाणें ३६१ दि. १ घ. ३६ प. लागतात. हें एका बार्हस्पत्य संवत्सराचें मान सौरवर्षाहून थोडेसें कमी आहे म्हणून सुमारें ८५ सौरवर्षांत ८६ बार्हस्पत्य संवत्सर होतात. म्हणजे एका बार्हस्पत्य संवत्सराचा लोप होतो. तसेंच वर्षांत कोणत्याही दिवशीं यात्राआरंभ होऊं

शकेल हें उघड आहे. या संवत्सराची दुसरी एक पद्धत आहे. तीन संवत्सरांचा लोप मुळींच करीत नाहींत. म्हणजे सौरवर्षा इतकेंच त्या संवत्सराचें मान मानल्यासारखें होतें आणि त्यामुळें त्या संवत्सरास सौरसंवत्सर, किंवा चांद्रवर्षाबरोबर त्याचा आरंभ होतो म्हणून चांद्रसंवत्सर म्हणतात. सांप्रत नर्मदेच्या उत्तरेस बार्हस्पत्य संवत्सर चालतात आणि नर्मदेच्या दक्षिणेस चांद्रसंवत्सर चालतात. नर्मदेच्या दक्षिणेस चालणाऱ्या संवत्सरांसही कोणी बार्हस्पत्य संवत्सर म्हणतात, परंतु ती चूक आहे. आतां त्यांमध्यें बार्हस्पत्य राहिलें नाहीं. दक्षिणेचा ही पद्धति मूळची नव्हे. सांप्रतचा रोमशसिद्धांत आणि शाकल्योक्त ब्रह्मसिद्धांत यांत मात्र चांद्रसौर संवत्सर पद्धतीचा उल्लेख आहे. परंतु ते ग्रंथ इतर ज्योतिष सिद्धांतांइतके प्राचीन नाहींत. इतर सर्व सिद्धांतांत संवत्सर बार्हस्पत्य मानाचे मात्र सांगितले आहेत. ज्योतिषग्रंथांत स्तवनादि निरनिराळीं मानें सांगितलेलीं असतात त्यांतही बार्हस्पत्यमान संवत्सरांकरितां असें म्हटलें असतें. दक्षिणेंतही पूर्वी बार्हस्पत्य संवत्सर चालत असत असें ताम्रपटादि प्राचीन लेखांवरून सिद्ध होतें.

वास्तविक बार्हस्पत्य मानानें संवत्सरारंभ चैत्र शुक्ल प्रतिपदेला होत नाहीं; आणि ८९ वर्षांत एक संवत्सराचा लोप होतो; ही भानगडीची पद्धति सोडून नेहमीं चांद्र किंवा सौर वर्षाबरोबर संवत्सरारंभ करणें ही साधी पद्धति स्वीकारावयाचा कल होणें हें स्वाभाविक आहे. त्याप्रमाणें, किंवा ८९ वर्षांनीं एका संवत्सराचा लोप करण्याकडे दुर्लक्ष झाल्यामुळें दक्षिणेंतील पद्धति सुरू झाली असावी. आणि वास्तव बार्हस्पत्य मानानें जो संवत्सर येतो तोच सांप्रतच्या दक्षिण पद्धतीनें ज्या काळीं येत होता त्या काळीं चांद्रसौर पद्धति दक्षिणेंत प्रचारांत आली असावी हें उघड आहे. शक ७४३ पासून ८२७ पर्यंत दोन्ही पद्धतींनीं एकच संवत्सर येत असे. पुढें उत्तरेकडे नियमाप्रमाणें एक संवत्सराचा लोप व्हावयाचा त्याप्रमाणें केला, आणि दक्षिणेंत करण्याचें बंद झालें, यामुळें दक्षिणेंतील संवत्सर मागें पडूं लागले. शक १८१८ च्या आरंभीं दक्षिणेंत दुर्मुख म्हणजे ३० वा संवत्सर आहे, आणि उत्तरेकडे ४२ वा कीलक संवत्सर आहे. असो; सारांश शक १८२७ पासून दक्षिणेंत चांद्रसौर संवत्सर सुरू झाले.

॥ श्रीसद्गुरवे नमः ॥

ज्योतिर्माला

आप्राचः कामरूपाद्दुहिणसुतनदप्लावितादाप्रतीचो
गान्धारात् सिंधुसाद्रद्रघुवररचितादाचसेतोरवाचः ।
आकेदारादुदीचस्तुहिनगहनतः सन्तिविद्वत्समाजा
ये ये तानेव यत्नः सुखयतु समजान्कश्चमत्कर्तुमीष्टे ॥ १ ॥

अभिनवाऽऽवृत्ति वर्ष ७ वें अंक ७ ते ९.

प्रसिद्ध व्यक्तींच्या कुंडल्यांचा संग्रह.

महात्मा गांधी

(लेखक.–राम नारायण.)

सत्याग्रह व असहकार यांचे प्रणेते महात्मा गांधी यांच्या कुंडलीनें ज्योतिर्मालेचा चालू अंक अलंकृत करीत आहोंत. चालू मन्वंतरांतील केवळ भारतवर्षाच्याच नव्हे तर अखिल मानवजातीच्या राजकारणांत क्रांति घडवून आणणाऱ्या विभूतीच्या कुंडलीचा विचार करण्याकरितां वाचकांच्या पुढें ठेवीत आहों. महात्मा गांधींचा जन्मकाळ शके १७८१ भाद्रपद वद्य १२ सूर्योदयापासून ३ घटि व १२ पळें असा प्रसिद्ध झाला

आहे. या काळीं **तूला** राशीच्या २७ व्या अंशांत लग्न येतें. परंतु महात्माजींच्या आयुष्यांतील गोष्टी व आधान कालची कुंडली लक्ष्यांत घेतां प्रसिध्द झालेला जन्मकाळ २२ मिनिटांनीं मागें आहे असें वाटतें. आधान काळावरून येणारा जन्मकाळ आमच्या मतें ग्राह्य वाटतो म्हणून त्याच काळची कुंडली आधान काळच्या कुंडलीसह येथें देतों.

सायन लग्न कुंडली.



ग्रहांच्या क्रांति.

रवि ३ द ३३ ; चंद्र १६ उ १६ ; बुध १५ द ४४ ;
शुक्र १५ द ४४ ; मंगळ १७ द ४३ ; गुरु १६ उ ३३;
शनि २० द ५५ ; हर्शल २२ उ ८ ; नेपच्युन ५ उ ४०
रवि २३ द २५ ; चंद्र ७ उ २० ; बुध २४ द ३० ;
शुक्र १८ द ३६ ; मंगळ १२ उ ५९ ; गुरु ० उ ५५ ;
शनि २० द ३३ ; हर्शल २२ उ ५६ ; नेपच्युन ५ उ १३.

सायन आधान कुंडली.



आर्यज्योतिष वाङ्मयांत " **क्षितिसुतो नेता** " " **सत्वं-कुजः** " असें ज्या ग्रहासंबंधानें म्हटलें आहे त्या **मंगल** ग्रहाच्या **वृश्चिक** राशीचा २ रा अंश **म**हात्मा **गां**धींच्या जन्मकाळीं पूर्व क्षितिजावर उदय पावत होता. वृश्चिक राशि हो सर्व राशिचक्रांत अत्यंत द्वाड राशि आहे, द्वेष, खुनशीपणा व रुधिरप्रियता हे दुर्गुण तर खास या राशीखालीं मोडतात असें ज्योतिष वाङ्मय वरवर पहाणाऱ्यांच्याहो लक्ष्यांत येईल आणि म्हणून कित्येक ज्योतिष्यांस **म**हात्माजींचा जन्म या राशीखालीं नसावा असें वाटेल. पण हो त्यांची चूक आह. राशींच्या गुणधर्मांचें ज्यांनीं मननपूर्वक अवलोकन कलेलें आहे त्यांच्या एवढें सहज लक्षांत आलें असल कीं राशि-चक्रांतील कोणतीहो एक राशि अशी नाहीं कीं जी केवळ दैवी संपत्तीचीच अगर केवळ आसुरी संपत्तीचीच द्योतक आहे. **प्रत्येक राशीच्या गुणधर्मांत दैवी व आसुरी गुणांचा अंतर्भाव निःसंशय झालेला आहे. वृश्चिक** राशीच्या आसुरी स्वभावाचीं मनुष्यें पुष्कळ भेटतात म्हणून सरसहा ती राशि आसुरी समजतां येत नाहीं. **श्रीगौराग चैतन्य** व जगविश्रुत जर्मन कवि **गेटि** हे ह्याच वृश्चिक राशीवर जन्मास आले होते. अर्थातच वृश्चिक राशि हो सर्वस्वीं आसुरी गुणांचा द्योतक आहे असें मानणें हे केव्हांहो चुकीचेंच ठरेल. उलट अनुभव असा आहे कीं वृश्चिक ही अत्यंत गूढ व शक्तिप्रधान राशि आहे. ह्या राशीवर जन्मास येणारे उन्नत जीवात्मे मानवी जीविताच्या गूढांत निमग्न असतात; त्यांची दृष्टि अंतर्मुख व आत्मशक्ति प्रज्वलित झालेली असते. **अंतर्मुखता, आत्मशुद्धि व वासनाक्षय ही वृश्चिक राशीची दैवी**

संपत्ति होय असें आम्हांस वाटतें.* आणि सामान्यतः वृश्चिक राशी-मध्यें निर्भयता, आत्मविश्वास, संकटांविषयीं बेपर्वाई मनोवृत्ति, प्रसंगीं धाडस वगैरे गुण असल्याचें सर्वविश्रुत आहेच. अशा वृश्चिक राशीचा २ रा अंश उदय पावत असतां **म**हात्मा **गां**धींचा जन्म झाला. या काळीं सर्व ग्रह परस्परांशीं दृष्टियोगानें निगडित झालेले आहेत. त्यामुळें कोण-त्याही एका योगाचें पृथक् फल स्वतंत्र रीतीनें पहावयास मिळणार नाहीं. केंद्रस्थानामध्यें **मं**गळ, **शु**क्र, **गु**रु व **चं**द्र हे चार ग्रह केंद्रप्रतियोगानें संबंधित झाले आहेत. ह्या ग्रहचतुष्टयांपैकीं **मं**गळ--**शु**क्रांशीं नवमस्थानांतील **हर्शल त्रिकोणयोग** करीत असून **बु**ध **गु**रु--**चं**द्रांबरोबर **समक्रांति योग** करीत आहत. **हर्शल** एका बाजूनें केंद्रांतील ग्रहांशीं संबंधित आहे तर दुसऱ्या बाजूनें **ने**पच्युनच्या केंद्रांत आहे व **ने**पच्युन **श**नीच्या त्रिको-णांत व **श**नि **र**वीच्या व्दिराश्यंतर दृष्टींत आहे. याप्रमाणें सर्व ग्रह दृष्टि-योगानें संबंधित झालेले आहेत. हा योग व केंद्रांतील स्थिर राशींतून झालेले केंद्र--प्रतियोग यांचा विचार मोठ्या विस्तारानें करतां येण्यासारखा आहे. परंतु ज्योतिर्माला वर्ष ७ वें अंक ३ ते ६ मध्यें ज्या एका प्रश्ना-संबंधानें इतर ज्योतिर्विदांच्या मताचें दिग्दर्शन केलें आहे त्यासंबंधानें स्वमत प्रतिपादनार्थ चार शब्द लिहिणें आवश्यक असल्यामुळें ग्रहयोगांच्या विचारांत अधिक जागा अडवीत नाहीं.

---

* ॲलन लिओचें या राशीसंबंधाचें म्हणणें विचारणीय आहे तें असें:—

" It is the sign of reserved force & power.....in the developed, we find the powers of the magician concealed; Scorpio being the sign of regeneration & purification. "

संपादक.

केंद्र--प्रतियोगानें अडथळे, विरोध, संकटें वगैरे गोष्टींनीं प्रतिकूल परिस्थिति उत्पन्न होऊन जीवयात्रा कष्टप्रद होते या ज्योतिषशास्त्राच्या नियमाचें यथार्थत्व प्रस्तुत कुंडलींत चांगलेंच दिसून येतें. प्रतिकूळ परिस्थितीशीं झगडणाऱ्या प्रत्येकाच्या कुंडलींत हे केंद्र--प्रतियोग अवश्य दिसून येतात. प्रतिकूल परिस्थिति दर्शविणाऱ्या योगांनाच "अशुभ" ही संज्ञा आहे. केंद्र--प्रतियोगानें हातीं घेतलेलीं कामें लौकिक दृष्ट्या तरी यशस्वी होण्यास परमावधीचीं संकटें भोगावीं लागतात. सुप्रसिध्द आंग्ल ज्योतिर्विद् **लिओ** एके ठिकाणीं लिहितात "अशुभ दृष्टियोग हे व्यक्ति व त्याच्या भोंवतालचें जग यांमध्यें विषमता व परस्परांची वागणूक सौख्यकारक नसते असें दर्शवितात. परंतु यावरून ती व्यक्ति दुबळी किंवा वाईट आहे असें होत नाहीं. कदाचित असेंही असणें शक्य आहे कीं अशुभ योग घेऊन आलेली व्यक्ति अत्यत प्रतिकूल परिस्थितीतील एखादें महत्वाचें कार्य किंवा सुधारणा करण्याकरतां जन्मास आली असेल. हें कार्य किंवा सुधारणा अंमलांत आणण्यांत जगाकडून विरोध होणें अपरिहार्य असेल" +**म**हात्माजींच्या कुंडलींतील अशुभ योगांचा या दृष्टीनें विचार करतांना त्यांचें तत्त्वज्ञान, विचार व मार्ग यांना जो विरोध झाला व होत आहे तो अपरिहार्य

+ "Bad aspects show that the attitudes of the man & the world to each other are inharmonicus & unpleasant. It does not follow of necessity that the man is weak or bad. It may be the case of a strong soul placed amidst uncongenial surroundings for the purpose of doing some kind of work, some reform or pioneering work, in which opposition would be inevitable."
Esoteric Astrology **पान ८२—संपादक.**

आहे असेंच म्हणावें लागतें. विरोधकांना पुरून उरेल अशीही शक्ति त्यांच्या जवळ आहे असें दर्शविणारा योगही त्यांच्या कुंडलींत दिसून येतो. त्यांचा आत्मकारक **मंगळ** ग्रह स्वग्रहींचा व शुभयुक्त असून **हर्शल** या भावनाप्रधान ग्रहावरोबर त्रिकोणयोग करीत आहे. हा योग प्रचंड सामर्थ्याचा दर्शक आहे. "**हर्शल** भावनाशक्तीचा एकवटलेली शक्ति आहे व या शक्तीबरोबर ज्याच्या कुंडल्यांतील आत्मकारक, बुध्दिकारक किंवा मनकारक ग्रह निगडित असतात त्यांच्या हातून परिस्थितीप्रनाणें आश्चर्यकारक शक्तिप्रधान कार्यें झाल्याचं दिसून येईल" असें आम्हीं **प्रे बिल्सन**च्या कुंडलीचें वर्णन करतांना लिहिलें होतें त्याची सत्यता येथेंही दिसून येते. प्रस्तुत कुंडलींतील हर्शल नवमस्थानांत असून **शुक्र**, **मंगळ** व **गुरु** या तीन ग्रहांबरोबर त्रिकोण व द्विराश्यंतर दृष्टियोगांत असल्यामुळें अत्यंत प्रबल आहे हें लक्ष्यांत ठेवण्यासारखें आहे.

ह्या **हर्शल**चा प्रभाव कुंडलींतील केंद्र--प्रतियोगांच्या ठिकाणावरून त्याचें भ्रमण होत असतां दिसून आला. सन १९१७ पासून **हर्शल कुंभ** राशींतून जात असतां मूळचे **चंद्र शुक्र मंगळ** व **गुरु** यांच्याशीं अनुक्रमें प्रतियोग व केंद्रयोग करीत असतां चंपारण्य येथें सत्याग्रहानें सरकारी अधिकाऱ्यांना आपला हुकूम मागें घ्यावयास लाविलें. या वेळीं चालेतदशम मूळच्या **गुरू**बरोबर त्रिकोणयोग करात होतें. **हर्शल**चें भ्रमण चतुर्थांतून चाललें असतां १९१८ च्या आक्टोबरांत त्या ग्रहाबरोबर **शनी**नें प्रतियोग केला. अर्थात हा प्रतियोग मूळच्या केंद्र--प्रतियोगांच्या कक्षा प्रदेशांतून झाला. **कुंभ-सिंह**तून झालेल्या या प्रतियोगावर हिंदुस्थानांत सत्याग्रह सुरू झाला व **मीन** कन्या राशींतील

याच ग्रहांच्या १९२० च्या प्रतियोगावर असहकारितेची चळवळ निघाली. सिंह-कुंभेच्या तृतीय द्रेष्काणापासून कन्या-मीनेच्या पहिल्या द्रेष्काणापर्यंतच्या कक्षेत म. गांधींच्या जन्मकुंडलीतील व आधान कुंडलीतील ग्रहांशी या प्रतियोगांचें जे योग होतात ते विशेष लक्ष्यांत ठेवण्यासारखे आहेत. हर्शल-शनींच्या भ्रमणांच्या परिणामासंबंधानें थोडें स्पष्टीकरण करणें येथें जरूरीचें आहे. कोणत्याही सुधारलेल्या देशांत कायदे करण्याची शक्ति ही सर्वांत मोठी शक्ति असते. इंग्लंड सारख्या देशांत ही शक्ति ज्या पार्लमेंटच्या हातीं आहे तें पार्लमेंट म्हणजे सर्व अधिकारांचें केंद्र होय. हा कायदे करण्याची शक्ति हर्शल ग्रहाच्या अंमलांतील आहे.* ज्या ज्या वेळीं हर्शल विशेषतः शनि-नेपच्युनांकडून--पीडित होतो त्या त्या वेळीं ही अधिकार शक्ति ज्यांच्या हातीं असते त्यांना विरोध होतो, त्यांच्या अधिकारावर गदा येते, वेळेस पदच्युतही व्हावें लागतें. नुकत्याच होऊन गेलेल्या हर्शल-शनींच्या प्रतियोगांवर जगांतील कित्येक शाह्या नष्ट झाल्या व अधिकारसंपन्न व्यक्तींना अर्थात् कायद्याचें नियंत्रण करणाऱ्या व्यक्तींना आपले अधिकार सोडावे लागले हें सर्वास माहितीं आहेच. ही जगाची गोष्ट झाली. खुद्द आपल्या हिंदुस्थानांत कायदे करण्याच्या बाबतींत कर्तुमकर्तुम् शक्ति असलेल्या सरकाराला सुध्दां क्षुल्लक कां होईनात पण कांहीं अधिकार प्रजेला द्यावे लागले. कायदे कौंसिलाची नवीन आवृत्ति काढावी लागली.

हर्शल---शनींच्या प्रतियोगानें जगांत--विशेषतः सिंह--कुंभेच्या अमलाखालच्या प्रदेशांत--अधिकाराच्या बाबतींत जी उलाढाल झाली त्यांत

---

* एच्. एस्. ग्रीनचा मॉडर्न अस्ट्रालॉजी व्हॉ. ८ मधील " Uranus in mundane astrology " हा लेख पहा. —संपादक—

कांहीं विशेष आश्चर्य नाहीं पण हिंदुस्थानांत " कायद्यानें प्रस्थापित झालेल्या " सरकाराच्या विरुध्द चालविलेली असहकारितेची मोहिम अनेक दृष्टींनीं अधिक आश्चर्यकारक होती. अधिकाऱ्यांची सत्ता संपुष्टांत आणण्याचा निश्चय स्पष्ट व असंदिग्ध भाषेंत प्रथम जाहीर झाला तो या वेळेसच. हा निश्चय मुत्सद्देगिरीचा असो वा गैरमुत्सद्देगिरीचा असो पण एवढें खास कीं हर्शल--शनींच्या प्रतियोगावर कायद्यानें प्रस्थापित झालेल्या सरकारास विरोध करणाऱ्या एका नवीन पंथाची प्राणप्रतिष्ठा महात्मा गांधींनीं केली. ह्या पंथाच्या अगदीं आरंभापासूनच सरकारासंबंधानें " म. गांधींनीं जी भाषा योजिली होती व जो कार्यक्रम हातीं घेतला होता त्यावरून त्यांना केव्हांच सजा व्हावयास पाहिजे होती. परंतु जोंपर्यंत त्यांच्या कुंडलींतील ग्रह बलवत्तर होते तोंपर्यंत त्यांना शिक्षा झाली नाहीं. चलित दशम मूळ हर्शलच्या द्विराश्यंतर दृष्टीत असून गुरूचें भ्रमण सिंहकन्या राशींतून म्हणजे मूळच्या व चलित दशमांतून चाललेलें होतें. सन १९२१ च्या आरंभीं हर्शलचा द्विराश्यंतर योग संपला व वर्षाच्या अखेरीस गुरूचें भ्रमण व्ययस्थानांतून होऊं लागलें. व त्याबरोबरच शनि व्ययस्थानांत उतरला, व मूळच्या रवीच्या सन्निध भ्रमण करूं लागला. व्ययस्थान हें कारागृहवासाचें स्थान आहे व याच स्थानांत रवि कारागृहवासाचा कारक ग्रह शनीकडून विघडला असतां चलित रवि मूळच्या शनीच्या समक्रांतींत येऊं लागला होता. त्याचप्रमाणें चलित लग्न व चलित शनि यांचा युति होत असतां कारागृहवास प्राप्त झाला. हे सर्व अशुभ योग चालले असतां तारक असा शुभ योग कोणताच नव्हता. यापुढें चालू वर्षा अखेर शनीचें भ्रमण व्ययस्थानांतून चालणार आहे व तें पुढें अडीच वर्षे तनुस्थानांतून होईल. या वेळीं मूळचे

मंगळ-चंद्रादि ग्रह बिघडत असून रवीशनींचा समक्रांतियोग चालूच आहे व १९२४ पासून चलित मंगळ व चलित दशम यांचा केंद्रयोग होणार असून तो ३।४ वर्षे पुढें चालणार आहे. हे सर्व योग कारागृहांतून सुटका होण्यास प्रतिकूळ आहेत हें सांगावयास नकोच. तरी मध्यंतरी सन १९२४ च्या **एप्रिल** व **नोव्हेंबर** या महिन्यांत गोचर गुरू मूळ दशमस्थ चंद्राशीं शुभयोग करीत असून चलित लग्न व मूळ चंद्र यांचा त्रिकोण योग त्याच वर्षी होत असल्यामुळें सुटण्याची आशा वाटते. सन १९२७ च्या जुलै महिन्यापर्यंत कारागृहांतून सुटण्याला शुभयोग दिसतो तो एवढाच असें आम्हांस वाटतें. चलित लग्न व चलित चंद्र यांचा जो शुभयोग होत आहे तो आम्हीं धरलेला जन्म काळ खरा असला तरच १९२४ त फलप्रद होईल हें सांगावयास नकोच.

ता. २-५-२३ **राम नारायण.**

———:-o:-———

ग्रह अनिष्ट असले असतां कसें वागावें ?

[लेखकः—**भास्कर केशव आजगांवकर.**]

आपलें पत्र मिळालें. श्री गीता ग्रंथाचें वचन देऊन मला पुढें लिहिण्याविषयीं प्रोत्साहन देत आहां; तदनुरूप पुढें लिहावयाचें परंतु लिहिलेल्या विषयाची आवडनावड अगर जिज्ञासा वाचक वर्गांत असल्याचें दिसून आलें नाहीं. अर्थात पुढें लिहावें अगर यथेंच पुरें करावें हें समजण्यास मार्ग नाहीं. आपले पहाण्यांत मी लिहिलेल्या विषयावर कोणी कांहीं साधकबाधक लिहिलेलें आढळून आल्यास मला कळविण्याची मेहरबानी करावी.

जन्मकालीन कुंडलीवरून ग्रहांची परिभ्रमण पध्दतीनें स्थिति अनिष्ट आलेली पाहतां अगर प्रश्नकालीन ग्रहांची स्थिति अनिष्ट सूचक आहे असें ठरलें असतां अनिष्ट परिणाम टळावे, म्हणून कोणत्या रीतीनें वागावें, काय उपाय करावे; हें आतां क्रमशः लिहिणें प्राप्त झालें आहे. याविषयीं मागील लेखांत पान ६५वर सूचना दिली आहे; तीं पुरी लक्षांत घेऊन पुढें सुचवीत आहें, त्या उपायांपैकीं जें उपाय देशकाल व आचार याला योग्य असतील, तितकेच प्रयत्नपूर्वक साध्य करावे. पुढें " यत्ने कृते यदि न सिध्यति कोऽत्र दोषः "

मागील लेखांत मणी म्हणजे वस्त्र, माणिक्य, नीळ, मोती इत्यादिक आणि ग्रहस्थित्युनुरूप साध्य असें दैवत व तिचा मंत्र, तसेंच औषधीधारण, भक्षण, वगैरे कृत्यें ग्रहांच्या अनिष्ट फलांचा प्रतिकार करितात; असें पान ५८--५९ यावर म्हटलें आहे; परंतु येथें अशी शंका येणें योग्य दिसतें कीं---(१) ग्रहांचे इष्टानिष्ट परिणाम फलज्योतिषशास्त्राधारें घडतील म्हणून ठरविलें, ते तसेच घडतील; (२) अगर प्रतिकाराचे उपाय केले, तर मॉजिस्ट्रेट प्रमाणें अंमल करणारे ग्रह अपाय करूं शकणार नाहींत. म्हणजे लांचखाऊ अंमलदार आहेत; व दान द्यावयाच्या वस्तु हा त्यांच्या लांचेचा विषय आहे कीं काय ? या शंकेचें निराकरण प्रथम करणें जरूर आहे.

फलज्योतिषशास्त्राचा अभ्यास ज्यांनीं केला आहे, त्यांना खात्रीनें असें सांगतां येतें कीं उपजलेला मनुष्यप्राणी अमुक अमुक फलप्राप्तीच्या बीजभूत संस्कारांचें गांठोडें घेऊन आला आहे; आणि या जगद्रूपी रंगभूमीवरील दशांकी नाटकांत असा एक पार्ट करून अमूक कालानें अव्यक्त रूपी पडद्याआड जाणार आहे. तदनुरूपच त्याचा चेहरा व शरीर प्रकृति

आहे. ह्या संस्काररूपाची पेटी ग्रहाच्या पुढील भ्रमण काळीं स्पष्ट स्थूल रूपानें उघडलेली पाहावयाची आहे; याचेंच नांव दैव ऊर्फ पूर्वार्जित प्रारब्ध कर्म. हें दैव कोणत्या काळीं अनुभव देईल, हें ठरविणें; याचें नांव दशापरिपाक काल. मग तो फलपरिपाक काल कोणत्याही पध्दतीनें काढलेला असो, अनुभवाशीं मिळता असला म्हणजे पुरे.

सध्या आर्य फलजोतिषांत संकटादि योगिनीदशा, ग्रहांच्या अष्टोत्तरी, विंशोत्तरी वगैरे ४२ प्रकारच्या दशा, तसेंच नाक्षत्र गोचरी, ग्रह गोचरी, उदय पध्दति, कै. गुरुवर्य चिटणीस यांची सायक्लिक ऊर्फ परिभ्रमण पध्दति या प्रमाणें लेखकाच्या पाहाण्यांत असलेल्या आर्य पध्दति प्रचलित असून, शिवाय यूरोपियन डिरेक्शन सिस्टम प्रचारांत आहेत. यवनीय ताजक पध्दतीही कांहीं कोठें प्रचारांत आहे. प्रत्येक जोतिषी आपण उपयोगांत आणिलेली पध्दति उत्तम अनुभवदायक आहे, असें समजून फलपरिपाक काल लिहीत असतो; परंतु या सद्गृहस्थांनी आपणच लिहिलेल्या दहा कुंडल्या घेऊन वर्णन केलेल्या फलपाक कालाचा मेळ आहे काय पहावा; अशी आग्रहाची विनंति आहे. ते तसं पहातील तर त्यांचें त्यांनाच खरें खोटें शेंकडा किती टक्के तें समजून येईल. असो.

राहूसह दहाही ग्रह अवश्यमेव फलद्रुप होतात, इतकें खरें. परंतु अनिष्ट परिस्थिति येऊं नये, व अभीष्ट फलप्राप्ति व्हावी म्हणून मनुष्यप्राण्याचे रात्रंदिन प्रयत्न चालू आहेत. यासच प्रपंच व त्यांतील वर्तणूक असें म्हणतात; तरी अशी प्रवृत्ति कां ?

जगन्नियंत्यानें सृष्टि उत्पन्न काळींच सृष्टीवरील प्राण्यांचे व्यवहार त्यांचे त्यांस सुखदायक व्हावे, म्हणून कांहीं नियम करून ठेविले आहेत;

त्यांचें नांव नियतिशक्ति. ही नियति इतकी व्यापक व अपवादरहित आहे कीं, तिचें वर्णन करूं गेल्यास एक स्वतंत्र ग्रंथच होईल. प्रवृत्तिपर सर्व शास्त्रें या तिच्या शाखा आहेत; भूर्भुवादि सप्त ऊर्ध्व लोक व अतलादिक सप्त अधोलोकांवर तिचा एकसारखा अम्मल आहे. आर्य महर्षींनीं तिच्या नियमाचा अनुभव घेऊन तत्त्वज्ञानाचे ग्रंथ व धर्मशास्त्र रचिलें आहे. या नियमाचें ज्ञान आणि तदनुरूप क्रिया करावयाची भ्रमानें किंवा मोहानें अगर अज्ञानानें चुकली अथवा उलट झाली असतां (हें चुकणें याच जन्मीचें नसतें) अनिष्ट फळ प्राप्त होतें, यासच दुःख, क्लेश म्हणतात. यासाठीं ज्यानें त्यानें आपल्या जन्मकाळीं ग्रहयोग इष्टानिष्ट कसे आहेत, हें पहावें, आणि अनिष्ट फल परिहारासाठीं शास्त्रज्ञानपूर्वक प्रयत्न करावा. परमात्म्यानें प्रत्येक मनुष्य प्राण्याची भवितव्यता त्याच्याच हातीं दिली आहे; त्यानें प्रयत्न करावयाचे ते मात्र स्वतः उत्तम समजून घेऊन नंतर करावे अथवा ज्ञात्याकडून करवावे. लेखक असें म्हणतो, कीं ग्रह हे माजिस्ट्रेट नव्हत आणि फलज्योतिषशास्त्राधारें घडेल म्हणून जें सांगितलें,त यामध्यें श्रध्दावान प्रयत्नवाद्याच्या इच्छेनुरूप इष्ट तो फरक पाडून घेतां येईल, व घेतां येतो, असा अनुभव आह. अर्थात बीज--भूत संस्कारांस आपणास इष्ट असें वळण देतां येतें. या म्हणण्यास स्थूल सृष्टीतील उदाहरण:--- वेळूच्या फोंफावलेल्या बेटांतून पर्जन्य कालारंभीं पुढील उत्पत्तिसाठीं बीजभूत असलेले कोंभ दृश्य होऊं पहातात. येथें पूर्वानुभव पहातां ते आपल्या जनकानुरूपच सरळ व गगनचुंबी होतील. या अनुमानानुरूपच कार्यही घडतें; परंतु एकाद्या दीर्घप्रयत्नवाद्यानें आपणास इष्ट असें वळण जबरदस्तीनें लावल्यास इष्ट तो आकार देतां येतो. लेखकानें पालखीकरितां एक अखंड दांडी तयार करून घेतली आहे. हा दृष्टांत द्राष्टांतीं मिळवून द्यावा.

अधिक शहाण्यानीं, लघुशंका दीर्घशंका, काढल्यास लेखक आपल्या अल्प अनुभवानुरूप समजावून देण्यास तयार आहे.

या विषयावर कोणास आधारच पहावयाचा असेल तर अत्यंत पूज्य श्रीमद्भगवद्गीता अध्याय श्लोक क्रमवार.

अध्याय	४	श्लोक	४०	विज्ञान योग
„	३	„	१० ते १२	कर्मयोग
उदाहरण „	३	„	२० वा अर्धा	„
सिध्दांत „	४	„	१५ ते १७	विज्ञान योग
कार्यकर्तृत्व „	१६	„	२४	दैवासुर संपद्विभाग योग.

हे श्लोक येथवर क्रमानें जसे दिले आहेत, त्याच क्रमानें पहावे. जिज्ञासूंस बरोबर न समजल्यामुळें (ते अति संक्षिप्त आहेत) कांहीं शंका राहिली असल्यास श्री ज्ञानेश्वर महाराजांची भावार्थदीपिका यांत वरील श्लोकांवर व्याख्यानांत आहे तें पहावें. या उपरही कांहीं शंका राहत असल्यास याच मासिकांत पत्र येईल अशी व्यवस्था करावी.

प्रथमतः जन्मकालीन अथवा प्रश्नकालीन कुंडलींतील ग्रहस्थितीस मागें सांगितल्याप्रमाणें नियम लावून पहावे त्यांत अनिष्ट परिस्थिति अमुक ग्रहयोगापासून अमुक काली उत्पन्न होत आहे असें समजून घ्यावें. मग पान ६५ वर लिहिलेल्या नियमाचा चांगला विचार करून, पडताळी पाहून, पुढें लिहीत असलेल्या माहितीप्रमाणें योग्य तेथें योग्य तितकाच उपयोग करावा.

दिनचर्या नियम १०

१ प्रातःस्मरण २ स्नान ३ तिलकधारण ४ स्वाध्याय आणि विशेष देवतापूजन ५ मंत्रजप ६ दान (त्याज्य वस्तु) ७ वस्तुधारण

८ औषधीसेवन ९ अन्नग्रहण--त्याज्य व ग्राह्य यांचें विवरण १० वस्त्रप्रावरण त्याज्य व ग्राह्य इतक्या नियमांचें ग्रह गतिस्थत्यनुरूप वर्णन करावयाचें. परंतु कै. गु. चिटर्णीस यांचें वाक्य येथें आठवल्यावांचून राहत नाहीं तें हें " स्वच्छ आहार आणि विहार करूं पहाणाऱ्यासाठीं हें शास्त्रच नव्हे, त्यांना पशूंसारखें यथेच्छ आचरण पाहिजे असतें. नियम म्हणतांच डोकें खवळतें--पशुहो आहारविहारात नियम पाळीत असतात--असो. नियम पाळू इच्छिणाऱ्या सूज्ञांसही देशकालानुरूप योग्य तेंच निवडून घेतलें पाहिजे.

सर्व साधारण उपयोगी नियम.

(१) कोणत्याही मनुष्याचें जें जन्म नक्षत्र असेल त्या नक्षत्राचें आधिपत्य पुढें सांगितल्याप्रमाणें वृक्षावर आहे. जन्म नक्षत्र याचा अर्थ वनस्पतींचा राजा जो चंद्रमा तो जन्मकाळीं ज्या नक्षत्रावर (नजीक) भ्रमण करीत असतो, तें जन्मसंज्ञक नक्षत्र जाणावें. वनस्पतींचा व चंद्राचा जन्यजनक संबंध असून मनाचा आणि चंद्रकलांचा अत्यंत निकट संबंध आहे. सुखदुःखानुभव फक्त मनासच आहे. अन्यत्र कोठेही नाहीं. हा निकट संबंध किती आहे हें मनुष्य प्राण्याच्या दर एक श्वासोच्छ्वासरूप प्राण कर्माचा उल्लेख स्पष्ट केला जातो; यावरून प्रत्येक श्वासकालिक क्रिया फलज्योतिष शास्त्राधारें समजली जाते; या आधारें संबंध किती सूक्ष्म, क्रिया व तिच्याकरतां लागणारा काल, हें समजून येतें. प्राणकर्म हेच क्रियाशक्ति ऊर्फ जिवंतपणाचे लक्षण आहे अन्यथा मृतावस्था असें म्हणतात हें लोकप्रसिद्ध आहे. प्रत्येक जिवंत मनुष्य प्राण्याचे श्वास २१६०० एकवीस हजार सहाशें रात्रंदिन मिळून होतात. हे श्वासोच्छ्-

वास शांत स्थितींत मोजिले असतां अनुभवास येतील. चंद्राचें भ्रमण रात्रंदिन मिळून ६० साठ घटिकांत बारा १२ राशी अगर ३६० अंश होऊन चक्र पुरें होतें. जिवंत प्राण्यास भासमान होणारे हें विश्व दीर्घ वर्तुळाकार आहे; गणित परिभाषेंत पूर्वाचार्यांनीं वर्तुळाचे ३६० भाग मानिले आहेत, प्रत्येक भागास अंश म्हणतात. त्या अंशाचेही ६० भाग केले तर प्रत्येक भागास कला म्हणतात. म्हणून १ अंश म्हणजे ६० कला. काळ व वर्तुळ स्थळ याच्या गणितास म्हणजे मोजमापास हा एकच पारिभाषिक शब्द आहे. ३६०×६०=२१६०० इतकोच श्वास व काल संख्या सामान्य रीत्या मानवास प्राप्त झाली असून प्रयत्नानें कमी जास्ती केलें जाते. मनुष्याची सर्व हालचाल व जीवितमान या दैनंदिन श्वास संख्येवर अवलंबून आहे. व त्याशीं वरील गणित रीती अन्वयें चंद्रकलांचा संबंध आहे.

जर आयुष्यासारखी अमोलिक वस्तु इच्छेनुरूप वाढवून घेतां (अशीं शेंकडों उदाहरणें आहेत) येईल तर विपुल संपत्ति, संतती, आरोग्य, प्रयत्नकर्त्यास कां प्राप्त होणार नाहीं. असो.

लिहितां लिहितां विषयांतर होऊं पहात आहे. ज्योतिर्माला ही जागा विशेष सूक्ष्म विचाराकरितां नसल्यामुळें लेखणी येथें आटोपती घेणें बरें.

नक्षत्र वृक्ष.

१ अश्विनी---	काजरा उर्फ कुचला
२ भरणी---	आवळी.
३ कृत्तिका---	उंबरा, पिवळ्या फुलांचा काटे धोत्रा.
४ रोहिणी---	जांभूळ.
५ मृगशीर्ष---	खैर.
६ आर्द्रा---	कृष्णागरु.
७ पुनर्वसू---	वेळु.
८ पुष्य---	पिंपळ.
९ आश्लेषा---	नागचांफा.
१० मघा---	वड.
११ पुर्वाफल्गुनी---	पळस.
१२ उ. फा.---	पायरी वृक्ष.
१३ हस्त---	पिवळी जाई.
१४ चित्रा---	बेलाचें झाड.
१५ स्वाती---	अर्जुन सादडा, धवा.
१६ विशाखा---	देव बाभूळ बेहकळ.
१७ अनुराधा---	नाग केशर.
१८ जेष्ठा---	सांवर पांढऱ्या फुलांची विशेषेंकरून
१९ मूळ---	गाळेचें झाड.

२० पूर्वाषाढा--- वेत.

२१ उ. षा.--- फणस.

२२ श्रवण--- रुई.

२३ धनिष्ठा--- शमी, सबदड.

२४ शततारका--- कळंब.

२५ पूर्वा भाद्रपदा--- आंबा.

२६ उ. भा.--- कडुनिंब (बाळंत निंब अथवा बकाणा निंब अ. कवड्या, निंबारा नव्हे)

२७ रेवति--- मोहाचा वृक्ष--ज्याच्या फुलांची दारू करतात.

येणें प्रमाणें चंद्रनक्षत्रांचा वृक्षांवर अमल आहे व निशापति चंद्राच प्रिय वृक्ष दुखवल्यास स्वत:चेंच मनोदु:खासच कारण उपस्थित केल्यासारखें होतें. ऋग्वेद पुरुष सूक्त--चंद्रमा मनसो जात: ॥ मनस्तुहिमगु: ॥ वराहमिहिराचार्य--बृहज्जातक.

ज्याचें जे जन्म नक्षत्र असेल त्या नक्षत्रानें दर्शित वृक्ष त्या मानवास अत्यत पूज्य आहे. सबब त्याचा अतिक्रम सहसा करूं नये. त्यास तोडणें, दुखवणें, स्पर्श करणें, औषधांत अगर देवकार्यात, धर्मकृत्यांतही उपयोगासाठी न घेतां त्या वृक्षाचें संवर्धन करावें. त्यांचीं बीजें नजरे समोर रुजत घालून त्यांचो वृध्दी होईल, असें करावें. अतिक्रमण केल्यास आयुष्य संपतें. स्त्री पुत्रादिकांकडून दु:ख प्राप्त होणें संभवनीय अहे.

(अपूर्ण.)

जगाच्या भविष्याचे दोन मासले.

पुढील भावी कालासंबंधानें प्रत्येकास भविष्य पाहिजे असतें व त्याप्रमाणें निरनिराळ्या लोकांनीं भावी येणाऱ्या कालासंबंधानें अनेक भविष्यें केलेलीं आहेत. भविष्यज्ञानाचो आवड एकट्या हिंदु लोकांसच आहे व त्याचे तडाख्यामधून हल्लीचें सुसंस्कृत पाश्चिमात्य लोक सुटले आहेत असें मुळींच नाहीं पाश्चिमात्यांचा आद्यग्रंथ जो बायबल त्यांत देखील भविष्यवाद केलला आहे. अशाच तऱ्हेचीं खालील दोन भविष्यें अलाकड आपल्या इकडील वर्तमानपत्रांमध्यें प्रसिध्द झालेलीं आमच्या पाहण्यांत आलीं आहेत तीं आम्हीं आमच्या वाचकांकरितां येथें देत आहोंत. कोणतेंही भविष्य ज्योतिष शास्त्राला धरून केलेलें असलें तर त्यांतील पुष्कळ भाग खरा होण्याचा संभव असतो. भविष्यें करण्याचे अनेक प्रकार व मार्ग आहेत. त्यांतील ज्योतिषशास्त्राला धरून असणाऱ्या भविष्यांनांच कांहीं शास्त्रीय आधार असतो. स्फूर्तीनें उत्पन्न झालेलीं भविष्यें नेहमींच तंतोतंत खरीं ठरतील असें नाहीं. तो त्या व्यक्तीला होत असलेल्या स्फूर्तीच्या व नेहमी होत असलेल्या संवेदना शक्तीवर पुष्कळ अंशीं अवलंबून असतात. सन १८६४ सालीं केललें भविष्य बहुश: ज्योतिषशास्त्राला धरून असेल असें वाटतें. अशाच तऱ्हेचें एक भविष्य सन १८४२ सालामध्यें झालेल्या **गुरु शनीच्या** युतीवरून पाहिला झाडकोलकामोडर मारासन यानें " झडकोल्स लीगसी " या नावानें प्रसिध्द करून ठेविलें आहे. हें पुस्तक हल्लीं दुर्मिळ झालेलें आह. यांतील बराच भाग फार उपयुक्त अशा माहितीनें भरलेला आहे.

सन १८५७ सालामध्यें झालेल्या हिंदुस्थानामधील बंडासंबंधानें त्यानें फारच पूर्वी आपल्या वरील पुस्तकामध्यें भविष्य करून ठेविलेलें

आहे. सन १८४२ सालामध्यें प्रथमतःच पृथ्वी राशीमध्यें--मकरे--मध्यें तारीख २६ जानेवारी रोजीं शनि गुरूंची युति झालेली आहे. ही युति फारच महत्वाची असून पृथ्वी राशीच्या अंमलाखालील प्रदेशामध्यें हिंदुस्थान, मेसॉपोटानीया, अफगाण, टर्की किंवा मुसलमान राष्ट्रें, बालकन स्टेट्स, मेक्सिको, ग्रीस, परशिआ वगैर देशामध्यें यानंतर पुढें येणाऱ्या २४० वर्षांच्या काळामध्यें फारच मोठाल्या घडामोडी व फेरफार व्हावयाचे आहेत. व याच कालामध्यें वरील देश उन्नत अवस्थेप्रत गेले पाहिजेत. शनि गुरूंची युति ही ज्या तत्त्वाचे राशीमध्यें होत असते तद्योतक राशीचे देशांमध्यें जागृती किंवा चेतना उत्पन्न होत असते असें मानलें असतां पृथ्वीवरील निरनिराळीं राष्ट्रें किंवा प्रदेश हळुहळु कसे उदयोन्मुख होत असतात व अस्ताप्रत कसे जातात यासंबंधानें कांहीं अटकळ सहज करितां येईल. शनिगुरूची युति एकेक तत्त्वाच्या राशीमध्यें २४० वर्षे राहते व नंतर पुन्हा ९६० वर्षांनीं त्या तत्वाच्या राशीमध्यें येते. पृथ्वी राशीमध्यें शनिगुरूची पृथ्वीतत्त्वांचे राशिमध्यें युति इ. स. ८८२ ते ११२२ पर्यंत होती व आतां ती पुन्हां सन १८४२ सालापासून याच तत्त्वाच्या राशीमध्यें होऊं लागली आहे.

सन १९२४ सालामध्यें राजकाय वातावरण एकदम क्षुब्ध होऊन गडबड उडेल असें त्या वर्षाच्या प्रवेशकालाच्या ग्रहस्थितीवरून दिसत नाहीं, परंतु चालू सन १९२३ च्या डिसेंबर महिन्याच्या १ ल्या तारखेस मंगळशनिनो युति होत आहे व ही युति सन १८४२ सालचे शनिगुरूचे युतकालच चंद्राचे केंद्रामध्यें होत असल्यानें विचार करण्यासारखा आहे. एकंदरीनें पाहतां सन १९२४ वर्ष हिंदुस्थानाचे बाबतींमध्यें कांहीं आकस्मिक गडबड उत्पन्न करील असें वाटतें. सन १९२४ च्या

मे महिन्यामध्यें शनि पुन्हां वक्र गतीनें तुलाराशीच्या २८ व्या अंशांत येणार असून तसाच पुढें मागें करीत १९२४ च्या सप्टेंबर पर्यंत त्याच अंशाजवळ राहणार असल्यामुळें हा काळ चांगला दिसत नाहीं. सन १९२४ नोव्हेंबर महिन्याच्या नंतर सत्याग्रहाची चळवळ बरीच उग्रता धारण करील व त्या योगानें सन १९२५ मध्यें हिंदुस्थानाला कांहीं हितप्रत गोष्टी सुरुगुरूचें सायनमकर राशीमधून भ्रमण होत असल्यामुळें घडून येतील. सन १९२६ सालामध्यें शनि नेपच्युनचा केन्द्रयोग होणार असून हर्शलचें भ्रमण सन १९२१ च्या सप्टेंबर महिन्यामध्यें झालेल्या शनीगुरूचे युतीवरोबर प्रतियोग व त्या वेळचे चंद्राचे केंद्रामधून होणार असल्यामुळें हें साल हिंदुस्थानचे राजकीय वातावरणास फारच कष्टाचें आहे व जगामध्येंही याच वेळीं मोठी गडबड व अस्वस्थता उत्पन्न होईल व हिंदुस्थानास सांपत्तिक दृष्ट्या हें साल फार कष्टाचें जाईल. मात्र याच योगावर आपलेकडील कायदे कौन्सिलें फारच जोराचें पुढें पाऊल टाकतील. सन १९२८ ते ३० चा काळ फारच घोटाळ्याचा व भानगडीचा आहे. हर्शलचें मेषराशी मधून सन १९३० मध्यें होत असलेलें भ्रमण खात्रीनें हिंदुस्थानामध्यें नवमन्वंतर सुरू करून हर्शलच्या स्वभाव धर्मा-प्रमाणें क्रान्तिकारक गोष्टी घडताल. सन १९४१ च्या सुमारास म्हणज पुन्हा शनिगुरूची वृषभराशीमध्यें युति होते त्या वेळीं साम्राज्य सरकारापासून हिंदुस्थानास **हिंदी राष्ट्राची** सनद मिळेल किंवा त्याला कलोनीयल गव्हर्मेन्टची सत्ता प्राप्त होईल. सन १९४१ च्या सुमारास मकर राशीच्या पंचमांत म्हणजे वृषभ राशीमध्यें हर्शल, शनि व गुरु या तीन मोठ्या ग्रहांची गर्दी होत असून याच वर्षी हर्शल नेपच्युनचा त्रिकोण योग होणार आहे. या नंतरचे दिवस हिंदुस्थानास राष्ट्र या पदवीस आणणारे असून हल्लींची

नोकरशाही ऊर्फ आर्यनफ्रेम हो सन १९४७च्या नंतर किती टिकेल याबद्दल शंका वाटतें. सन १९४७ व १९४८ हीं वर्षें या दृष्टीनें फारच विचार करण्यासारखीं अनिष्ट दिसत आहेत. स्वराज्य द्या म्हणून मागितलें असतां तें कोणी देत नाहीं तें आपल्या अंगच्या गुणांनें मिळविलें पाहिजे. व तें एकदोन वर्षांत मिळेल असेंही दिसत नाहीं. आज मिळेल उद्या मिळेल अशा-प्रकारच्या आशावाद्यांनीं खालील भविष्यावर कितो विश्वास ठेवावा याची अंधुक कल्पना आमच्या वरील विचारावरून करितां येईल.

१९२४ सालचें भयंकर भविष्य.

अलाहाबादच्या ता. ६ जानवारीच्या अभ्युदय पत्रामध्यें एका अमेरिकन भविष्यवाद्यानें सन १८४६ सालांत करून ठेवलेलें एक भविष्य प्रसिद्ध केलें आहे. त्यांतील सारांश असा आहे कीं:----सन १८६१ सालापासून ६३ वर्षांनी म्हणजे सन १९२४ चे सुमारास युरोप, एशिया, हिंदुस्थान, वगैरे ठिकाणीं फार क्रांतिकारक गोष्टी घडून येतील. फ्रान्समध्यें गेल्या शतकाच्या पूर्वी जी राज्यक्रांति झाली होती, तिच्यापेक्षांही १९२४ सालांत जास्त मोठी राज्यक्रांति त्या देशांत होणार आह. प्रशियाचें सरकार आपल्या प्रजेचें रक्षण कराल. जर्मनी आणि बेलजम ही एक होतील. स्पेन कमजोर होऊन अखेर इटलीच्या ताब्यांत जाईल. आष्ट्रिया देशाचे तुकडे तुकडे होतील. टर्कीवर मुसलमानांचेच राज्य कायम होईल. आयर्लंडमध्यें स्वतंत्रता प्रस्थापित होईल. कानडा अमेरिकेमध्यें सामील होईल. चीन देशाला पुष्कळ त्रास सोसावा लागेल. पण पुढें तो एक मोठा शक्तिमान् देश बनेल व जपान आणि दुसरीं लहान लहान निर्बळ राज्यें त्यांत सामील होतील. हिंदुस्थान पूर्ण स्वतंत्र होईल. आस्ट्रेलियावर आस्ट्रेलियाचीच सत्ता

चालेल. पूर्वेकडे असा एक महापुरुष उत्पन्न होईल कीं, त्याची सर्व जगांत कीर्ति होईल. गौतमबुद्ध, ख्राइस्ट, महंमद, यांच्याहीपेक्षां तो अधिक शक्तिमान् होईल. तो प्रेमाचा प्रसार करील. तो एकटा आपल्या कार्याचा प्रारंभ करील. पण मागाहून हजारों लोक त्याचे अनुयायी बनतील. हा मनुष्य शांतीचा अवतार होईल. अशा प्रकारचें हें भविष्य आहे. १८४६ सालांत हें केलेलें आहे. १८६१ पासून ६३ व्या वर्षामध्यें या गोष्टी घडून यावयाच्या आहेत. या ज्या दोन कालघटनांचा संबंध या भविष्यामध्यें ग्रंथित झालेला आहे, त्याच्या योगानें संशयाला जागा सांपडते. तरी पण ह्या भविष्याची शहानिशा लवकरच होण्यासारखी असल्यामुळें तें येथें दिलें आहे.

स्वराज्य ता. १८ जानेवारी.

जर्मनींत ॲटन जॉन्सन नांवाचा एक वृद्ध भविष्य जाणणारा शेत-करी आहे. त्यानें महायुद्ध सुरू होण्यापूर्वी जर्मनीस इशारा म्हणून भविष्य दिलें होतें. तें खरें ठरलें. बेलजम हा देश जर्मनीच्या पायांत कांट्यासारखा रुतून बसेल. यासाठीं जर्मनीनें युद्धाच्या भानगडींत पडूं नये. त्यानें जगा-संबंधानें केलेलें नवीन भाकीत फारच भयप्रद आहे. तो म्हणतो:----आणखी बरींच युद्धें जुंपावयाचीं असून त्यांत अमेरिकेचा संबंध येईल. पुढील तीस वर्षांत अमेरिकेस पांच मोठीं युद्धें करावीं लागतील, त्यांतील कांहीं यादवी युद्धाच्या स्वरूपाचीं असतील, व एक युद्ध कानडाशीं घडून येईल. इंग्लंड व हिंदुस्थान यांचे दरम्यान १९२५ सालीं युद्ध उपस्थित होईल. त्यांत आरंभीं उत्तर--हिंदुस्थान उचल खाईल. इंग्रज लोकांस समुद्रांत हांकून लावण्यांत येईल; व या युद्धांत अडींच कोटी माणसें मृत्युमुखीं पडतील. सदर युद्धांतील निकराच्या लढाया कलकत्ता व दिल्ली या शहरीं होतील.

हिंदुस्थानचें उदाहरण पाहून ईजिप्ट व आफ्रिकेंतील वसाहतीही बंडें करतील. १९३० सालीं फ्रान्स व स्पेन यांचे दरम्यान युध्द जुंपेल. जर्मनीच्या अंतःकलहानें व राज्यक्रांतीच्या उलटसुलट लाटानीं चिंधड्या उडतील. व हा क्रम १९५३ पर्यंत चालून जर्मनींत फिरून स्थिरस्थावर होईल.

स्वराज्य १२ जुलै १९२३.

स्फुट विचार.

(१) ज्योतिर्माला अंक १ ते ३ वर्ष ७ व्या मध्यें सन १९२३ सालामध्यें होणाऱ्या गोष्टींसंबंधानें भविष्य केलें होते त्याचा चांगलाचा अनुभव येत आहे. दिल्ली येथें प्लेगचाभयंकर हाःहाकार उडाला व जिकडे तिकडे अस्वस्थता प्राप्त झाली होती. यंदा मेष संक्रमणकाळीं मंगळ वृषभडे राशीमध्यें होता व तो गुरु नेपच्युन शुक्र यांचे बरोबर केन्द्रयोग करीत होता. चंद्र मंगळांची युति सप्तमामध्यें वृषभ राशिमध्यें झालेली होती याचा फारच तीव्र अनुभव वृषभ राशिखालीं असलेल्या भागांत आला आहे. दिल्लीचा राशि वृषभ असावा असें आम्हीं आमचे मेदिनीय ज्योतिषामध्यें प्रसिध्द केलें आहे त्याचा अनुभव यंदां चांगलाच पाहावयास मिळाला आहे. तर परशिया--वृषभ--येथें भूकंप व जलप्रलयानें भयंकर प्राणहानी झाली आहे. अफगाणाकडील सरहद्दीवर होत असलेले अत्याचार मेजर एलीसचा खून व मिस एलीसला पळवून नेणें इत्यादि गोष्टी सप्तमामधील चद्र मंगळ युतीनें दर्शित होत आहेत. ऑगस्टमध्यें अफगाण कडील फ्रांटीअर संबंधानें प्रकरण बरेंच रंगास येईल असें दिसतं.

(२) चंद्र मंगळ युति सप्तमांत पीडित असल्याकारणानें तूर्त पूर्वी प्रसिध्द केल्याप्रमाणें सॉल्ट टॅक्स येऊन देशांत बरीच क्षुब्धता उत्पन्न झालेली

आहे. नागपुर येथें हिरव्या तांबड्या फडक्या--निशाणा बद्दल बरोच धामधूम चालू आहे. सप्तस्थानावरून परराष्ट्रांशीं संबंध व दळवळण, युध्दें, आपसांतील यादवी, दंगेधोपे, परराष्ट्रीय व्यापार, देशांत होणारें लग्नसमारंभ व घटस्फोटाचे प्रकार यांचा विचार करितात या गोष्टींसंबंधानें काय काय प्रकार होतात हें पाहणें आहे. आपसांतील यादवी पूर्ण चालू आहे तर हिंदुमुसलमानांच्या एकीच्या प्रश्नाचा बोजवारा होऊं पाहत असून जातीमत्सराचा अग्नि विझण्यापेक्षां वाढविण्याचच प्रयत्न जास्त चालेले दिसत आहे. चंद्र हा लोकपक्षाचा कारक ग्रह असून बलवान असल्याकारणानें जन समाज चिकाटीनें चळवळ करील असें दिसतें. याच योगामुळें चळवळीमध्यें भाग घेणाऱ्या स्त्रीवर्गावर अत्याचर झालेले लवकरच उघडकीस येतील. चंद्र हा साधारण स्त्रीवर्गाचा कारक असल्याकारणानें वरील विधानास जास्त बळकटी येते.

(३) हिंदुस्थान हें स्वतंत्र राष्ट्र नसल्यामुळें सप्तमस्थानावरून त्याचा परराष्ट्राबरोबर होणारा खटका किंवा तंटा युध्दें याचा कसा काय विचार करावा हे जरा कठीण दिसतें. हल्लींच्या दास्यत्वाच्या काळांत इंग्लिश राष्ट्राचे जे शत्रु तेंच हिंदुस्थानचे शत्रु व मित्र होत आहेत. म्हणून स्वतंत्र शत्रुत्व वगैरे गोष्टी सप्तमामधून दृष्टीस पडतील किंवा नाहीं याची शंका आहे. हिंदुस्थान व ब्रिटिश कॉलनीज--आफ्रिका, केनीआ वगैरे प्रदेशामध्यें हिंदु लोकांना काळ्यालोकांना जो आजकाल हकलून देण्याचा प्रयत्न होत आहे त्याचा बेळेस सप्तस्थानावरून बोध होईल. व त्या दृष्टीनें पाहतां हल्लींची चालू असलेली हकालपटी व त्या कारणानें होऊं पाहत असलेली चळवळ यांचा पूर्ण बोध होतो.

(४) कुंडलीच्या चतुर्थस्थानावरून विहिरी, तलाव, शेती स्थावर इस्टेट खाणी, भुम्यंतरंगत पदार्थ यांचा विचार मेदिनीय ज्योतिषशास्त्रामध्यें करण्यास सांगितलें आहे. चालू वर्षाच्या वर्ष प्रवेश काळचे कुंडलीमध्यें चतुर्थस्थानामध्यें वृश्चिक या जल राशीमध्यें शुक्र असून तो पापदृष्ट असा पीडित आहे. यंदा मुंबईमध्यें टान्सा वाटरचे भुमीमध्यें असलेले नळ तीनचार वेळ एकाएकी फुटून परळकडील बाजू जलमय झाली होती हें पाहण्यासारखें आहे. इकडील प्रदेश जर भूकंप प्रचुर असत तर याच योगानें येथें भूकंपाचे थोडेबहुत धक्के बसले असतें. असल्या योगावर जमीनीमध्यें अत्यंत दाब उत्पन्न होतो व त्यामुळें भूकंप वगैरे गोष्टी घडतात. येथें दाबामुळें भुम्यंतरगत असलेल नळ फुटले आहेत. तर कलकत्त्याकडील बाजूकडे खाणीमध्यें अपघात झालेले आहेत. व तेथें एक अनाथगृह जमीनदोस्त होऊन बरीच प्राणहानी झाली आहे.

(५) यंदाच्या मेषसंक्रमण काळच कुंडलीमध्यें शुक्र चतुर्थस्थानामध्यें व नेपच्युन माध्यान्हीं असे समोरासमोर बसले असून ते चंद्र मंगळ गुरुबरोबर केन्द्रयोग करीत आहे. पिडत असलेला चतुर्थीमधील शुक्र हा जलप्रलयाची बरोच धास्ती दर्शवितो व त्यामुळें यंदा नद्यांना महापुर येऊन जल प्रलय होण्याचा पुष्कळच संभव वाटतो व त्यामुळें अनेक शहरें व प्रदेश जलप्रलयानें बुडतील. यंदाचा ग्रहांचा योग स्थिर राशीमधून होत असल्यामुळें नद्यास किंवा समुद्रास बांधलेली धरणें हीं फुटून त्यामुळें जलप्रलय झालेले पाहण्यास मिळावेत. मंगळनेपच्युनची युति तारीख १२ रोजीं होणार आहे; याच सुमारास ५ ग्रह सिंह राशीमध्यें तारीख ११ ते १२ पर्यंत येणार असल्यामुळें आपलेकडे काय उतपात होतात हें पाहणें आहे. हा काळ फारच कठीण आहे. पूर्वरेखांश ६० इटलो, सिसली येथें भूकंप

ज्वालामुखीचें स्फोट तर खाणीमधील अपघात घडतोल तर फ्रांसचा फारच बोजबारा उडण्याचा समय याच सुमारास येत आहे. तारीख २६ ऑगस्टमध्यें मीनराशीच्या २ व्या अंशामध्यें चंद्र ग्रहण होणार असून सप्टेंबर १० ला सूर्यग्रहण होईल हीं दोन्हीं ग्रहणें आपलेकडे दिसणार नाहींत परंतु हीं फार महत्वाचीं आहेत. सूर्य ग्रहण हर्शलचे समोर व मंगळानें युक्त असें होणार असल्यामुळें तर या नंतरचा येणार काळ विशेष महत्वाचा व धामधुमीचा दिसत आहे. हें ग्रहण कन्याराशीमध्यें होत असल्यामुळें एसियाटिक टर्की, ईजिप्त मेसापोटानोया, बालकन राष्ट्रे यांमध्यें कांहीं तरी भानगड खास उत्पन्न होईल. सप्टेंबर महिना या दृष्टीनें बराच भानगडीचा दिसत आहे. आपलेकडे या महिन्यांत एखादा मोठा रेलवेचा अपघात होऊन पोकें बुडाल्याच्या बातम्या येऊं लागतील. आपलेंकडे कन्याराशीचा अंमल वऱ्हाड नागपुर व पुणें या प्रदेशांवर आहे त्यामुळें तिकडे कांहीं भानगड माजेल व कर्त्या पुढाऱ्यांचें मृत्यु घडतील.

(६) सप्तमामधील चंद्र मंगळ युति चालू वर्षीं जनतेला चोर, दरवडेखोर, खून अत्याचार यांनीं भारी बेजार करणार आहे. चंद्र व शुक्र हे दोन्हीं ग्रह देशांतील स्त्रीवर्गाचे द्योतक असल्याकारणानें यंदाच्या वर्षामध्यें स्त्रियांसंबंधानें भयंकर अत्याचार झालेलें पाहण्यास मिळतील. चैनीचीं स्थळें नाटकगृहें, सिनेमा हाऊसिस, रेस कोर्स या वरील ठिकाणीं स्त्रियांचे एकटें जाणें व फिरणें फारच धोक्याचें दिसतें. त्याचप्रमाणें चैनीकरतां फिरण्याची स्थळें, बागबगीचे, म्युझीअमस येथें स्त्रियांवर चालू वर्षामध्यें भयंकर अत्याचार घडतील. एकट्यादुकट्या स्त्रिया सांपडल्या असतां त्यांना लुटणें वगैरे अनेक अत्याचारप्रचुर हें वर्ष खास जाईल व ऑगस्टमध्यें या गोष्टीना बराच ऊत येईल. एकंदर विचार करितां पुढील महिने ऑगस्ट, नव्हेंबर

डिसेंबर हे चांगले जाणार नाहींत. या महिन्यांमध्यें अनेक प्रकारचे अत्याचार झालेले पाहण्यास मिळतील.

(७) जेव्हां जेव्हां स्थिर राशींमधून ग्रहांचे योग किंवा प्रतियोग होतात त्या वेळीं भूकंप ज्वालामुखीचे स्फोट वगैरे गोष्टी घडतात. त्याचधोरणानें यंदाच सालामध्यें भूकंप ज्वालामुखीचे स्फोट वगैरे होतील असें भविष्य केलें होतें. यंदा एटना या ज्वालामुखीनें आपलें उग्रस्वरूप धारण करण्यास सुरवात केली आहे परशीआ वगैरे ठिकाणीं भूकंपाचे उतपात होऊन बरीच प्राणहानी झाली असल्याच्या बातम्या येऊं लागल्या आहेत. यंदाच्या सालासारखे मेष संक्रमणाचे वेळीं स्थिर राशींमधून होणारे योग फारच क्वचित पाहण्यास मिळतात. यंदा सिंह राशीमध्यें पुन्हा अशोच ग्रहांचा गर्दी होत आहे. काय होते तें पाहणें आहे. सिंह राशीचे २० अंश मुंबईच्या माझ्याही उदय पावत आहेत त्याच जवळ जवळ ग्रहांचा गर्दी होत आहे. यामुळें हिंदुस्थानचे राजकीय वातावरणामध्यें बरींच जोराची खळबळ उडेल असें दिसतें.

(८) मेदिनीय ज्योतिष शास्त्रामध्यें गुरु हा सांपत्तिक बाबतीचा कारक मानतात त्याचप्रमाणें तो धार्मिक आचार विचार पंथ यांचा कारक आहे. यंदाच्या वर्ष कुंडलीमध्यें धनुराशि द्वितीय भावारंभीं उदय पावत असल्यामुळें तर गुरूकडे सांपत्तिक बाबतीसंबंधानें बराच अधिकार आलेला होता; व हा ग्रह वर्ष कुंडलीमध्यें लग्नीं उदय पावत असून पीडित असल्यामुळें यंदा बँका, पेढया यांचे संबंधानें बरीच धांदल उडेल असें भविष्य केलें होतें. अलायन्स बँक ऑफ सिमला बुडाल्यामुळें फारच धांदल व खळबळाट झाला आहे. तर टाटा बँकेला सेंट्रलबरोबर इस्तमिलन करण्याचा प्रसंग

आलेला आहे. गुरु पीडित असून त्याला हर्शलचा शुभ योग असल्यामुळें हल्ली जिकडे तिकडे ब्यांकांचे केंद्रीकरण--किंवा एकीकरण करून मोठा द्रव्य संघ किंवा शक्ति उत्पन्न करण्याचे प्रयत्न चालू आहेत. ही लाट आपल्याकडेच आली आहे असें नव्हे तर इग्लंड अमेरिका वगैरे देशातही आहे. गुरु हर्शलचा जेव्हां जेव्हां शुभयोग घडतो त्या त्या वेळीं Reconstruction in financial mattersआर्थिक बाबतीसंबंधानें, हुंडावळीसंबधानें सुधारणा कायदेकानु घडतात म्हणून यंदाचें साल हिंदुस्थानास आर्थिक बाबतींमध्यें स्वातंत्र्य देणारें असून नाण्यासंबंधानें चांगल्या महत्वाच्या सुधारणा घडतील असें वाटतें.

(९) यंदा पंचम भावारंभीं मीनराशि येत असून हर्शल पंचमांत आहे. व पंचमेश गुरूच असून तो हर्शलबरोबर शुभसंबंध करीत असल्याकारणानें लवकर सट्टेबाजसंबंधानें कांहीं तरी इष्ट अशी सुधारणा किंवा कायदा घडावा. मुंबईमध्यें चालत असलेल्या जुन्या स्टॉक एक्सचेंज संस्थेमध्यें लवकरच कांहीं तरी मोठया प्रमाणावर सुधारणा घडून येईल. हल्लीं असलेली शेअर बजारचीं संस्था ही फक्त ब्रोकरलोकांच्याच फायद्याकरितां उभारलेली असल्याचे जुनें ब्युरोक्राटीक तत्त्व जाऊन त्यामध्यें जनसमाजाच्या हिताचा प्रश्न प्रामुख्यानें पुढें येऊन त्या धोरणानें सुधारणा होतील. लोकांच्या गरजा व सार्वजनिक हित यांकडे लक्ष देण्याचा नवीन मनूचा उदय होत आहे. शेअर मार्केट नुसता जुगारखाना होऊन तो कांहीं विशिष्ट व्यक्तीच्या हातांमध्यें राहणें देशाच्या उद्योग धंद्याच्या दृष्टीनें केव्हांही होतावह नाहीं. लवकरच शेअरबजारमध्यें सुधारणा झाली पाहिजे. चालू असलेल्या संस्थेमध्यें यंदा नव्हेंबर डिसेंबरमध्यें भानगड उत्पन होईल किंवा तिला सन १९२४ मध्यें चांगलाच शह बसेल असें दिसतें.

(१०) यंदाच्या वर्ष प्रवेश कुंडलीमध्यें गुरु, शुक्र, जनसमाज दर्शक चंद्र व पोलीस व मिलटरी यांचा कारकग्रह मंगळ हे एकमेकांच्या केन्द्रामध्यें व कुंडलीच्या केन्द्रस्थानामध्यें बसले असल्या कारणानें वरील ग्रह ज्या ज्या गोष्टींचा कारक व द्योतक आहे त्याच गोष्टी कायदे कौन्सिलामध्यें फारच प्रामुख्यानें पुढें येत आहेत. दशमांतील नेपच्युनच्या स्थितीवरून यंदा सरकारी धोरण भानगडीचें व फसवणुकीचें दिसेल असें विधान आम्ही केलेलें वाचकांच्या स्मरणांत असेल. त्याप्रमाणें अलायन्स बँकेच्या प्रकरणानें तर सरकार विरुध्द व्होट ऑफ सेंशर पास होण्यापर्यंत वेळ येऊन सर्वप्रकार चव्हाटयावर आला आहे. धनाधिपति सुरगुरूच्या व नेपच्युनच्या केंद्रामुळें सांपत्तिक मदतीचे प्रकरण फारच तीव्रतेनें बाहेर पडलें आहे. इंग्लडमध्यें असलेल्या हिंदुस्थानचे द्रव्य निधी पैकीं, १२ कोटी रुपये येथील उद्योग धंद्याचे मदतीं करितां आणण्याचें फायनान्स बिल गेल्या असेंब्लीचे मीटींगमध्यें पास झालें आहे. तुरुंगामध्यें स्त्री कैद्यांना वागविण्याचें प्रकार, पोलीस व मिलिटरी यां संबंधानें पुढें काय काय होतें हें पाहणें आहे. सध्या पोलीस व मिलिटरी कमी करण्याचें ठरत आहे पण याचमुळें जनता जास्त त्रस्त न होवो म्हणजे मिळविलो. एकंदरानें राजकारणामधील अनेक भानगडी चालू वर्षां पुढें येऊं पाहत आहेत.

(११) प्रत्येक राशीचा व कांहीं विशिष्ट उद्योग धंद्याचा फारच निकट संबंध असला पाहिजे असें विचाराअंतीं वाटतें. व त्या त्या विशिष्ट राशीमधून शुभ अगर पापग्रहाचे भ्रमण होत असतां व त्यांना ज्याप्रमाणें इतर ग्रहांचे शुभ अगर पापदृष्टि योग होत असतील तदनुरोधानें त्या त्या धंद्यामध्यें फेरफार--चढउतार घडत असलो पाहिजे असें म्हणण्यास हरकत नाहीं.

कोणत्या उद्योग धंद्यावर किंवा व्यापारावर कोणत्या राशीचा अंमल आहे हेंच ठरविणें प्रथमतः फार जरूरीचें आहे. या संबंधानें आमच्या कडील ज्योतिर्विदांनीं कांहीं प्रयत्न केलें असल्याचें आढळत नाहीं. पाश्चिमात्य ज्योतिर्विदांपैकीं कांहीं विद्वानांनीं या विषयांत चांगलो प्रविणता मिळविला असल्याचें त्यांच्या कांहीं कांहीं लेखांवरून दिसतें. परंतु अद्यापि ही महत्वाची माहितो कोणाहो प्रसिध्द केली नाहीं. या संबंधानें जितको प्रगता होईल तेवढी पाहिजे आहे. त्यापासून अनेकांस पुढील अटकळ बांधून द्रव्य मिळवितां येईल. व ज्योतिष हें उपयुक्त शास्त्र आहे असें लोकांच नजरेस आणून देतां येईल. हा विषय मेदिनोय किंवा राष्ट्रीय ज्योतिशास्त्राच्या शाखे पैकीं आहे. या संबंधानें आम्हांस कांहीं विचार सुचलेले आज वाचकांपुढें ठेवीत आहों व या दृष्टीनें कांहीं जणांनीं प्रयत्न केला तर आणखी कांहीं उपयुक्त माहिती पुढें येईल.

(१२) **हर्शल** ऊर्फ **प्रजापति** हा ग्रह ज्या राशीमधून जातो, तद्योतक राशीनें दर्शित होणाऱ्या देशामध्यें, उद्योग धंद्यामध्यें क्रांतिकारक चळवळी उत्पन्न करितो, सुधारणा घडून येतात. सन १९२० साला पासून हर्शलचें भ्रमण मीन या राशीमधून चालू आहे व तो या राशीमध्यें सन १९२७ च्या मार्च महेन्यापर्यंत राहणार आहे. मीन या राशीनें मोठया जलाशयाबरोबर संबंध येणारे उद्योग धंदे, समुद्रा पासून उत्पन्न होणारे पदार्थ व त्यासंबंधानें चालणारें धंदे यांचा विचार होईल. पाण्या पासून वीज उत्पन्न करणें Hydro Electric Schemes, मच्छी मारण्याचे कारखानें Fisheries, समुद्राच्या पाण्यापासून मीठ उत्पन्न करण्याच कारखानें यांचा बोध मीन या राशीनें होईल. त्याचप्रमाणें मीन हो काल पुरुषाचे तळवे असल्यामुळें पादत्राणें--बुट जोडे

इत्यादि करण्याचे कारखाने यांचाही विचार होईल. मीन ही द्वादशस्थान-द्योतक राशी असल्यामुळें तुरुंग--कैदखाने, रुग्णालये--हासपीटलस, दान-संस्था, वेडयांची इसपीतळें यांचा विचार करितां येईल. मीन ही राशीचक्रा-मधील शेवटली राशि असल्यामुळें मोक्ष, मृत झाल्यानंतर कोणत्या लोकांत जाणें, अध्यात्म वाद इत्यादि गूढ विद्या यांचाही विचार याच राशीवरून होईल.

असो, हर्शलचें भ्रमण मीन राशीमधून होत असतां बुट किंवा पादत्राणामध्यें निरनिराळ्या प्रकारची सुधारणा होऊन त्यांचे नवीन नवीन कारखाने निघाले पाहिजेत तर त्यास लागणाऱ्या पदार्थांचा पुरवठा कर-णाऱ्या कंपन्या भरभराटीस आल्या पाहिजेत. कातडें कमावण्याच्या कामांत सुधारणा झाली पाहिजे. पूर्वी कातडयाचीं पादत्राणें करींत होते तर हल्ली मोटरच्या रबराच्या टायरचीं पादत्राणें करण्याची टुम निघाली आहे. याप्रमाणें पहातां हर्शल सन १९२७ ते १९३७ मध्यें मेष राशीपासून असतां डोक्या संबंधानें म्हणजे शिरस्त्राणा संबंधानें नवीन टुम निघेल असें दिसतें.

पुर्वी नदी किनारीं किंवा समुद्र किनाऱ्याजवळ मासे मारण्याचा धंदा चालत असे तो जाऊन भर दर्यामध्यें ट्रालरनें मच्छी मारण्याचा प्रयत्न सरकारनें चालविला असून तो फायदेशीर असल्याचे प्रसिद्ध केलं आहे व त्यामुळें लवकरच या तऱ्हेनें मच्छी मारून मुंबईला पुरविण्यांत येण्याचा नवीन उद्योग धंदा सुरू होऊं पाहत आहे.

मृत आत्म्याबरोबरील संवादासंबंधानें हल्ली मिस्टर ऋषि व पत्नी यांनीं बरीच खळबळाट उडवून दिलेली आहे. व प्लँचेटचे साह्यानें मृतआत्म्या-बरोबर बोलतां येतें आतां जिकडे तिकडे प्रसिद्ध झालें असून या विषया-

संबंधानें पुढील शोध करण्या करितां येथें एक संस्थाही निर्माण झाली आहे.

भिक्षेकऱ्या संबंधानें होऊं घातलेला कायदा, तुरंगासंबंधानें होत असलेल्या सुधारणा; फटक्याची शिक्षा सहसा न देणें, कैद्यास त्यांच्या गुन्ह्याच्या मानानें निरनिराळे वागण्या बद्दल होऊं पाहत असलेले नियम वगैरे सर्व गोष्टी चालू वर्षी हर्शल मीन या राशीमध्यें गुरूनें शुभ दृष्ट असल्यामुळें होत आहेत असें कोण म्हणणार नाहीं?

(१३) आमच्या ग्रंथकारांनीं मीन राशी ही गुरूची स्वगृह राशि मानली आहे. या राशीमध्यें विश्वबंधुत्वाची जाणीव वगैरे प्रकारची आहे. हर्श-लचें भ्रमण या राशीमधून होत असतां धार्मिक आचार विचारांच्या बंधन्न-मध्यें फेरफार किंवा सुधारणा होऊं पाहात आहेत. पतितपरावर्तनासंबंधानें रणें माजणारें जुनें प्रकरण हळूहळू फारच सौम्य होत आहे. पूर्वी म्हणजे सन १९१७-१८ मध्यें लागेल त्याला जो हिंदु म्हणवील त्याला हिंदु करून घेण्यांत येणाऱ्या आद्य हिंदु मिशनरीचें आचार्य कै. रा. रा. गजा-ननराव वैद्य यांच्या कार्याला नाकें मुरडविणारे लोक हल्ली तेंच काम कर-ण्यास तातडीनें धांवत असून खुद्द शंकराचार्यही मदत करण्यास पुढें येत आहेत हा हर्शलच्या मीन राशीमधून होत असलेल्या भ्रमणाचा महिमा पाहण्या सारखा आहे. क्षत्रियकुलोत्पन्न रा. गजाननराव यांचीं मतें त्यांच्या

क्षात्रधर्माप्रमाणें फारच उदारमताचीं आहेत तर हल्लीं फक्त बाटलेल्यांनाच परत हिंदु धर्मांत घ्यावें असा कांहींचा कट आहे हें निराळें. इतकें मात्र खास कीं कांहीं काळानें हिंदु धर्माला व्यापक स्वरूप खात्रीनें येऊन हल्लींचीं बंधनें कालाच्या तडाख्यापुढें टिकणार नाहींत.

(१४) वृश्चिकराशी व अष्टमस्थान यांचा निकट संबंध असल्यामुळें वृश्चिक राशीवरून मृत्यु, मृत्यु पत्रामुळें मिळणारे पैसे, गुप्तधन, ठेवा, निधि याचा विचार करण्यास कांहीं हरकत दिसत नाहीं. सायन वृश्चिक राशीमध्यें गुरु येऊन त्यानें हर्शल ऊर्फ प्रजापतीबरोबर शुभ संबंध करण्याचें सुमारास इजिप्त देशामधील तुतानखामेन् राजाचें थडगें सापडलें आहे व तें उघडून त्यांतील अमोल्य द्रव्य व जुन्या वस्तु सांप्रत हस्तगत झाल्या आहेत. हर्शल हा ग्रह प्राचीन वस्तु शोधाची गोडी किंवा शोध उत्पन्न करितो किंवा प्राक्कालिक द्रव्य संग्रही किंवा वस्तुसंग्रहो बनवितो Antiquarian Department प्राचीन द्रव्य किंवा वस्तुसंग्रहखाने या ग्रहाचें अमल खालीं आहेत. चालू वर्षीं वृश्चिक या गूढराशीमधून सुरगुरूचें भ्रमण होत असतां तो या हर्शल बरोबर शुभसंबंधित असल्याकारणानेंच हा द्रव्यसंग्रह उघडकीस आला आहे. असें म्हणण्यास मुळींच हरकत नाहीं. यंदाच्या सालीं याप्रमाणें अनेक प्राचीन शहरांचीं खिंडारें उकरण्यांत आलीं असून त्यामधून महत्वाच्या गोष्टी बाहेर पडल्या आहेत.

——o——

ज्योतिषशास्त्रदृष्ट्या भूकंपाचा व ज्वालामुखींचा विचार.

" And the old
And crazy earth has had her shaking fits
More frequent, and foregone her usual rest–
The rocks falling headlong and the valleys rise–"
Cowper.

एटना या ज्वालामुखीनें तारीख १८ जून १९२३ पासून चार पांच दिवसांत भयंकर हाहाकार उडवून देऊन अनेक शहरांची व तेथील रहिवाश्यांची दुर्दशा उघडून दिल्याचें वाचकांच्या स्मरणामधून गेलें नसेल. आम्हीं जानेवारीच्या अंकामध्यें चालू वर्षामध्यें भूकंप व ज्वालामुखी यांचे उत्पातापासून प्रलय घडतील असें लिहिलें होतें त्याप्रमाणें परशिया-मध्यें मोठा भूकंप झाला असून व्हेसुविअस व एटना यांनीं रुद्ररूप धारण करून तप्तरसाच्या प्रवाहानें-लाव्हानें अनेक शहरें व खेडीं यांचा पूर्ण विध्वंस केला आहे. या गोष्टी केव्हां व कोणत्या ग्रहस्थितीवर घडतात या संबंधानें चालू अंकामध्यें विचार करण्याचें योजिलें आहे. यासंबंधानें माहिती आम्हीं आमच्या मेदिनीय ज्योतिष किंवा राष्ट्रीय ज्योतिष या पुस्तकामध्य दिलेली आहे.

वराहमिहिरादि प्राचीन आचार्यांनीं भूकंप व ज्वालामुखी यांची गणना उत्पातामध्यें केली आहे व तदनुरोधानें उत्पात झाल्यानंतर काय होईल इत्यादि फलादेश सांगितलेला आहे. परंतु हे उत्पात ज्योतिषशास्त्राधारानें पूर्वी सांगतां येतील किंवा नाहीं या संबंधानें त्यानें आपल्या बृहत संहितेमध्यें सांगेतल्याचें आढळत नाहीं. या विषयावर अद्यापपर्यंत साग्र माहिती मराठी किंवा गुजराथीमध्यें प्रसिध्द झालेली नाहीं. सन १९११-१२ मध्यें आम्हीं कुंडलीविज्ञानमध्यें एक निबंध प्रसिध्द केला आहे. तो

व मेदिनीय ज्योतिष या पुस्तकामध्यें असलेल्या माहितीखेरीज इतर कोठेंच आढळत नाहीं. भूकंप किंवा ज्यालामुखीचा स्फोट झाल्यानंतर अमुक ग्रह असे होते एवढें सांगून भागणार नाहीं. तर हे उत्पात नियमानें बध्द आहेत किंवा नाहीं तसेंच ठरलेल्या नियमाप्रमाणें ग्रहस्थिति आली असतां नक्की कोणत्या स्थलीं उत्पात घडतील यासंबंधानेंही सांगतां आलें पाहिजे. थोडक्यांत म्हणावयाचें असतां मेदिनीय ज्योतिषशास्त्रदृष्ट्या घडणाऱ्या घडामोडींसंबंधानें काल, निदान व स्थल निर्देश करितां आला पाहिजे. ही गोष्ट सोपी नाहीं. हल्लीचें मेदिनीय ज्योतिषशास्त्र एवढें परिणत नाहीं हो गोष्ट खरी आहे; परंतु पूर्वी प्रसिध्द झालेल्या गोष्टी पुन्हा निराळ्या शब्दानें आपल्या नांवाखालीं प्रसिध्द करण्याचा मोह सोडून ज्योतिषशास्त्रामधील नवीन तत्त्वें शोधून काढण्याकडे आपल्या बुध्दिमत्तेचा, अकलेचा व ज्ञानाचा व्यय आमच्यांतील ज्योतिर्विद्यार्थी करतील तर फार उपयुक्त कामगिरी त्यांचे हातून होऊन ज्योतिषशास्त्रामध्यें चांगलो भर पडेल.

मोठाले भूकंप हें नियमित अमुकएक इतक्या वर्षांनींच होतात व ते पृथ्वीवरल्या अमुक एका भागामध्येंच होतात असें आढळत नाहीं. जणुंकाय ते लागेल तेव्हां व लागेल तेथें घडतात. **अमेरिका** व **जपान** येथील समुद्र किनाऱ्यावरील प्रदेशाचें निरीक्षण करितां असें आढळण्यांत आलें आहे कीं मोठमोठाले भूकंप हें नेहमी समुद्रामध्यें प्रथम उत्पन्न होऊन नंतर त्यांचा परिणाम पृथ्वीवरील इतर प्रदेशांवर झालेला पाहण्यास मिळतो. भूकंप शास्त्रवेत्त्यांच्या मतानें पाण्याचो वाफ हें भूकंप होण्याचें एक कारण आहे. पृथ्वीच्या पोटांत एकदम पाण्याचो वाफ उत्पन्न झाल्यानें तो विद्युत

उत्पन्न करितें व भूकंपाचे जे निरनिराळे ठिकाणीं धक्के बसतात ते याच उत्पन्न झालेल्या विद्युत्शक्तीमुळें बसतात. विद्युत्चा व भूकंपाचा निकट-संबंध असलेला पुष्कळ वेळां पाहण्यास मिळतो. कांहीं कांहीं भूकंपाचे वेळीं हवेमध्यें चमत्कारिक फेरफार झालेले पाहण्यास मिळतात. कित्येक भूकंपाचे वेळीं सोसाट्याचा वारा वाहतो, वादळें उत्पन्न होतात, विद्युत्पात व मेघ-गर्जना होते, गारा पडतात, जोराचा पाऊस पडतो; तर याचे उलट कांहीं वेळां हवा अगदीं शांत असून आकाश पूर्ण निरभ्र असल्याचें पाहण्यास मिळतें. कांहीं कांहीं वेळां चुंबकाचा दक्षिणोत्तराभिमुखता दाखविणाऱ्या यंत्रामधील सुई (magnetic Needle) ही बरीच चंचल झालेली दिसते तर कांहीं वेळां तो अगदीं स्थिर असते. पुष्कळ वेळां भूकंपाबरोबर आरोरा बॉरीलस नांवाचा निद्युत प्रकाश दिसू लागतो; व कांहीं भूकंपाचे वेळीं हवेमधील असलेल्या विद्युत् प्रवाहावर बराच ताण बसलेला पाहण्यास मिळतो.

भूकंपाच्या धक्क्याचो सरळता जाऊन तो जेव्हां तिरकस होऊं लागतो व ज्या वेळीं त्याच्या धक्क्याचो शक्ति पुष्कळ मोठ्या प्रदेशावर प्रसरण पावलेली नसते अशा स्थितीमध्यें जे धक्के येतात ते इमारती घरें दारें यांना फारच प्रतिकूल असतात. त्याचप्रमाणें जे धक्के क्षितिजाशीं समांतर दिशेनें किंवा क्षितिजाशीं समान किंवा आडवे येतात त्यांचे योगानें इमारती घरें दारें यांचा फार नाश होतो.

हिम्बॉलट व दुसरे कांहीं भूकंपशास्त्रावेत्ते हे सरळ, आडवे व पिंगा घालणारे किंवा गिरक्या घेणारे अशा तीन प्रकारच्या भूकंपाच्या धक्क्यांची मिमांसा करितात. व त्यांच्या मतानें याच पिंगा घालणाऱ्या भूकंपाच्या धक्क्यांनीं इमारतींचा व घरादारांचा चक्काचूर उडतो व पृथ्वीच्या प्रदेशावर चमत्कारिक घडामोडी घडतात. परंतु कांहींचें मत याचे विरुध्द आहे.

अनुभवजन्य ज्ञानानें बोलावयाचें असतां असें निश्चयानें म्हणतां येईल कीं भूकंपाचा संबंध पृथ्वीपासून लक्षावधी मैल दूर असलेल्या ग्रहांचे स्थितीवर खास आहे. कारण समुद्राला भरती ओहटी हीं पृथ्वीपासून दूर असलेल्या रविचंद्रांच्या आकर्षणामुळें ज्या अर्थीं येतें त्या अर्थीं भूकंपाचा-ही संबंध आकाशस्थ ज्योतींबरोबर असणें विशेष संभवनोय आहे. व ह्या कल्पनेमध्यें अतिशयोक्ति भरलेली आहे असें मुळींच नाहीं. कारण जेव्हां रवि, चंद्र व पृथ्वी ही एका रेषेमध्यें येतात व जेव्हां चंद्र पृथ्वीला विशेष जवळ असतो अशा वेळीं रविचंद्रांच्या आकर्षणशक्तीनं पृथ्वीला एखादा मोठा झटका मिळणें हें खास संभवनीय आहे. परंतु नेहमीच जेव्हां रविचंद्र असे येतात त्या वेळीं भूकंप होत नाहींत त्यामुळें याखेरीज आणखी इतर ग्रहांचें आकर्षण होतें किंवा काय किंवा त्यांचा कसा काय संबंध येऊं शकतो याही गोष्टीचा विचार करणें अत्यंत अगत्याचें आहे व तो केला असतां हे भूकंपाचें कोडें सहज सुटेल. ॲरीस्टाटल सारख्या प्रख्यात तत्त्ववेत्त्यानें ग्रहणाचे वेळीं भूकंप होतात असें नोंदून ठेविलें आहे. क्लॉडी अस टालमीनें आपल्या टेट्रासबेबलास पुस्तक पहिलें प्रकरण २ रें मध्यें खालीलप्रमाणें आपलें मत नमूद केलें आहे. " सर्व ग्रहांमध्यें चंद्र हा पृथ्वीला अत्यंत निकट असल्यामुळें त्याचें सर्व ग्रहांपेक्षां पृथ्वीवर जास्त आकर्षण घडतें. आणि पृथ्वीवरील सजीव व निर्जीव पदार्थांचें त्यांच्या प्रकाशाच्या स्थितीप्रमाणें चलनवलन होतें. त्याच्या कलांच्या क्षय वृध्दी-प्रमाणें नद्यांना पाणी चढतें किंवा उतरतें. समुद्राला त्याच्या उदयास्तानुरूप भरतीओहटी येते. तर वनस्पती व प्राणी हे त्यांच्या कला वाढण्या-

प्रमाणें सर्वस्वीं नाहीं तरी थोड्या प्रमाणानें वाढतात व त्याच्या क्षीण होण्याप्रमाणें क्षीण होतात. "

जेव्हां रविचंद्र एका रेषेमध्यें असून चंद्र जेव्हां पृथ्वीजवळ असतो (भूमिनीच Peregee) म्हणजे ग्रहणाचे वेळीं तेव्हां मोठमोठाले भूकंप होतात असें अलोकडील कांहीं शास्त्रीय मंडळीच्या लक्षांत आलें आहे. परंतु कांहीं ग्रहणांचे वेळीं भूकंप कां होत नाहीं याचें कोडें त्यांनां अद्यापि सुटलेलें नाहीं. व जावत्काल पर्यंत ग्रहणाच्या वेळीं भूकंपाला अनुकूल इतर ग्रहांची स्थिति कशी असावी लागते हें त्यांच्या लक्षांत येणार नाहीं तेथपर्यंत त्यांना हें कोडें सुटेल किंवा नाहीं याची शंका वाटते.

जगामधील अत्यंत विद्वान, तत्त्वज्ञानी व शाहाण्या अशा ज्या माठाल्या प्रसिध्द व्यक्ति होऊन गेल्या आहेत त्या सर्वांना आकाशामधील गोलांचा प्राणिमात्रावर व चराचर वस्तूंवर परिणाम होतो हें तत्त्व मान्य आहे. परंतु ज्यांनीं ग्रहांच्या परिणामासंबंधानें कधीं विचार केलेला नाहीं, किंवा त्यासंग केला नाहीं व अनुभव मुळींच घेतला नाहीं असल्या कांहीं आधुनिक विद्वानांना मात्र भूकंपाचा व ग्रहांचा मुळींच संबंध नाहीं असें वाटतें व तें त्याप्रमाणें मोठ्या धारिष्टयानें लिहून व बोलून दाखवितात इसवी सना. पूर्वी ६१० वर्षीं झालेला अनॅक्झीमॅन्डर जो थेलस याचा शिष्य किंवा विद्यार्थी होता त्यानें स्थिर तारे हे आपल्या ग्रहमालेपेक्षां अनंत पट मोठ्या ग्रहमालांचे मध्यवर्ती बिंदु आहेत व पृथ्वी आपल्या मध्यबिंदुभोवतीं फिरत आहे इत्यादि आपलीं मतें त्या वेळच्या लोकांना शिकविलीं होतीं. व याच माणसानें लॅसिडोनीआ येथें आकाशाच्या स्थितीचे वेध घेण्याकरितां शंकु उभारला होता. हा मोठा ज्योतिषी होता व यानें आपल्या ज्योतिषशास्त्राचे

ज्ञानानें भूकंपानें लॅसिडोनियाचा नाश होईल असें वर्तविलें होतें. अॅनक्झोमॅन्डरसंबंधानें वरीलप्रमाणें माहिती प्लिनी या ग्रंथकारानें दिलेली आहे.

डॉ. गोड नांवाच्या दुसऱ्या एका माणसानें **वृषभ** राशीमधून ज्या ज्या वेळीं **गुरु** गेला आहे त्या वेळीं पृथ्वीवर झालेल्या २० भूकंपांची यादी दिली असून तो म्हणतो.

" वरीलप्रमाणें लिहीत असतां माझी अशी खात्री झालेली आहे की भूकंपासारखा विस्मयता व भीति उत्पन्न करणारा उत्पात हा आकाशस्थ गोलामुळें होतो व तो गुरु संनिध शुक्रबुधांच्या दिसण्यावर खास आहे "

प्लिनी म्हणतो बाबिलोअन लोकांमध्यें भूकंप हे ग्रहांच्या आकर्षणामुळेंच होतात असें मानींत असत. व विशेषत: बहिर्वर्ति ग्रहांपैकीं शनि, गुरु व मंगळ या तीन ग्रहांचे सूर्याबरोबर एकत्र येण्यानें किंवा त्यांचे मध्यें आपसांत योग प्रतियोग होण्यानें व मुख्यत: हे योग प्रतियोग **अयन अथवा संपात** राशीमध्यें जेव्हां होतात तेव्हां भूकंप होतात असें त्यानें आपलें मत स्पष्ट नमुद केलें आहे. हिराडोटस हा याच प्रकारें सांथीच्या रोगासंबंधानें आपलें मत देतो. या खेरीज प्लिनि म्हणतो बहुशः ग्रहणाचे समयास भूकंपाचे उत्पात फार घडतात. इसवी सन १५१६ ते १६८१ या सालचे दरम्यान ज्या ज्या वेळीं **गुरुशनींची** युति झालेली आहे त्या त्या वेळीं भूकंप झाले असल्याचा त्यानें एक लांबलचक यादी दिलेली आहे. एकंदर जुन्या सर्व ग्रंथकारांचा विचार करून पहिला झडकील रिचर्ड जे. मॉरिसन यानें सन १८३४ साली भूकंपासंबंधानें व्यवस्थित असे कांहीं नियम प्रसिध्द केलेले आहेत व त्याच नियमानें त्यानें व त्याच्या नंतर झालेल्या झडकोलनें आतां पर्यंत झालेलें सर्व भूकंपाचें स्थल कालासह फार

पूर्वी भविष्यें करून ठेविलेलीं अहित. जें कार्य आज भूकंपाची नोंध ठेवणारीं यंत्रें व भूकंपशास्त्रज्ञ करूं शकत नाहींत तेंच कार्य ज्योतिषशास्त्राधारें फार पूर्वी स्थलकालासह कोणासही ग्रहांच्या मदतीनें अचूक कांहीं वर्षांपूर्वी करतां येतें यावरूनच कोणतें ज्ञान जास्त उपयुक्त आहे याची कल्पना ज्याचा त्याला सहज करितां येईल. भूकंपासंबंधानें किंवा ज्वालामुखीचे स्फोटासंबंधानें शास्त्रज्ञान्यांचें कांहीं म्हणणें असलें तरी त्यांच्या हल्लींच्या शोधावरून पुढें होणारें भूकंप व ज्वालामुखींचें स्फोट खात्रीनें सांगतां येत नाहींत. भूकंपाची नोंध करणारीं फारच सूक्ष्म यंत्रें निघालीं असल्यानें केव्हां व कोठें भूकंप झाला याचें ज्ञान पूर्वीपेक्षां हल्लीं फार चांगलें होत असल्याने ग्रहस्थितीप्रमाणें कार्य घडलें आहे किंवा नाहीं हें अजमावण्यास फार चांगली सोय झाली आहे.

भूकंप किंवा ज्वालामुखीचें स्फोट केव्हां व कुठें होतील हें ज्योतिषशास्त्राधारानें कसें सांगतां येतात व ते केव्हां होतात यासंबंधानें जे नियम आमचे पाहण्यांत व अनुभवास आले आहेत ते खालील प्रमाणें आहेत. व याच नियमाप्रमाणें पाठीमागील काळामध्यें भूकंपादि किंवा ज्वालामुखींचे स्फोट झालेले पाहण्यास मिळतात.

(१) भूकंप किंवा ज्वालामुखीचे स्फोट हे सूर्य अथवा चंद्रग्रहणाचे लगतचे काळामध्यें होतात. सूर्यग्रहण म्हणजे अमावास्या होय व चंद्रग्रहण म्हणजे पौर्णिमा होय म्हणून दर अमावास्या व पौर्णिमेच्या काळची किंवा रविचंद्र संयोग व प्रतियोगकाळाच्या कुंडल्या मांडून घ्याव्यात. व जेव्हां एखादें ग्रहण केन्द्रस्थानाच्या आरंभीं म्हणजे लग्न, अस्त माध्यान्ह व चतुर्थ केन्द्राच्या उदित असणाऱ्या अंशाच्या अगदी निकट ज्या देशांत होत असतें त्या देशांत भूकंप होण्याचा विशेष

संभव असतो; चारही केंद्रांपैकीं **दशम** व **चतुर्थ** या दोन स्थानांतील ग्रहणांमुळें भूकंप होण्याचा संभव अधिक असतो; आणि त्यांतले त्यांत **चतुर्थ** स्थान हें तर भूकंपाचें द्योतक आहे.

त्याचप्रमाणें ग्रहणकालीं **स्थिर** राशीमध्यें ग्रह असतील तर ते ग्रह ज्या देशामध्यें किंवा पृथ्वीच्या ज्या देशांमध्यें लग्नाबरोबर, दशमकेंद्राबरोबर अस्त केंद्राबरोबर किंवा चतुर्थ केंद्राबरोबर येत असतील तेथें भूकंपादि उत्पात होण्याचा फार संभव असतो. उदाहणार्थ ग्रहणकालीं शनि हा स्थिर राशीमध्यें असून तो दशमापासून ४५ किंवा ५० अंशांवर आहे तर तो ज्याप्रमाणें दशमाच्या पूर्वेकडे किंवा पश्चिमेकडे असेल त्या मानानें पूर्व किंवा पश्चिम ४५ किंवा ५० रेखांशावरील प्रदेशावर भूकंप दर्शक होतो.

केंद्रांतील ग्रहणें हीं जशीं थोड्याबहुत प्रमाणानें भूकंपाचीं द्योतक असतात त्याचप्रमाणें मुख्य ग्रहांचे युतियोग व प्रतियोग हे सुध्दां भूकंपांचे द्योतक असतात. सामान्यतः ग्रहणकालीं जर मुख्य ग्रहांचे युतियोग किंव प्रतियोग होत असतील तर भूकंप होण्याचा संभव असतो. आणि ग्रहण काळच्या रवीच्या अगर चंद्राच्याबरोबर हे योग केंद्रामधून घडत असतील तर त्या त्या प्रदेशामध्यें भूकंप खात्रीनें घडतात.

(२) भूकंपाचे वेळीं दैनिक ग्रहामध्यें बरेच दृष्टियोग झालेले आढळतात; त्यांत विशेषतः भूकंपकाळचे गोचर ग्रह पूर्वी झालेल्या ग्रहणकाळचे रविचंद्रादि ग्रहांबरोबर दृष्टि योग करीत असतात. त्यांतले त्यांत विशेषतः ग्रहणकाळचे रविचंद्रांवर ग्रह असलेले पाहण्यास मिळतात किंवा त्याचेबरोबर गोचर ग्रह दृष्टियोग करीत असलेले पाहण्यास मिळतात.

ग्रहण काळचे ग्रह स्थिर मानून नंतर त्यावरून आपण जशी जन्म कुंडळीवरून गोचर ग्रहांची भ्रमणें पाहतों तद्वतच गोचर ग्रहांची स्थिति पाहावयाची आहे. समजा एखादें ग्रहण भूकंप दर्शवित आहे. परंतु ग्रहणाबरोबर भूकंपादि उत्पात होत नाहीं तो जेव्हां गोचर ग्रह शनि, हर्शल, नेपच्युन मंगळ इत्यादि त्या ग्रहणकाळचे रविचंद्रांवर येतात किंवा त्यांचेबरोबर दृष्टियोग करितात त्या वेळी त्या प्रदेशामध्यें भूकंपादि उत्पात होतात.

(३) भूकंप हे पुष्कळ वेळां गुरु, हर्शल, नेपच्यून, शनि व मंगळ हे वृषभ किंवा वृश्चिक राशींमध्यें मध्यें असतां घडतात.

(४) रवि, चंद्र व इतर ग्रह यांचे होणारे योग यांच्याबरोबर द्वादश राशींचा विचार केल्यास भूकंपांसंबंधानें पुष्कळच निश्चित कल्पना आपणांस करितां येते. राशिचक्रांतील स्थिर (**वृषभ, सिंह, वृश्चिक** व **कुंभ**) राशींचा संबंध भूकंपांशीं दिसून येतो. विशेषतः वृषभ व वृश्चिक या दोन राशींचा अति निकट संबंध आहे. स्थिर राशीनंतर चर राशी या केंद्रस्थानाच्या द्योतक असल्यामुळें त्यांचाहीं संबंध कांहीं ठिकाणीं पाहण्यास मिळतो. द्विस्वभाव राशींचा मात्र **मीन** राशीखेरीज संबंध दिसून येत नाहीं.

(५) विषुवराशि—मेष, तुला, व अयन राशि कर्क व मकर चार राशींच्या पहिल्या कांहीं अंशांमध्यें जेव्हां पुष्कळ ग्रह येतात त्या वेळीं भूकंप घडतात.

(६) गुरु हा वृषभ किंवा वृश्चिक राशीमध्यें असून तो बुधाबरोबर युतिकेंद्र, प्रतियोग व समक्रांति दृष्टीयोग करीत असतां भूकंप झालेले पाहण्यास मिळतात.

(७)मोठमोठाल्या ग्रहांच्या युत्या--शनि मंगळ, शनि गुरु, हर्शल शनि, मंगळ हर्शल इत्यादि मोठ्या ग्रहांच्या युत्या जेव्हां जेव्हां घडतात व त्या ज्या प्रदेशामध्यें चतुर्थस्थानाचे उदित अंशांवर येतात त्या प्रदेशामध्यें भूकंप झालेले पाहण्यास मिळतात.

दोन अथवा अधिक मोठ्या ग्रहांची जेव्हां युति किंवा प्रतियोग होतो त्या वेळीं त्यांच्या युतिकाळची किंवा प्रतियोग काळच्या वेळेची कुंडली मांडावी व ज्या ज्या प्रदेशामध्यें हे युतियोग किंवा प्रतियोग चतुर्थ दशम केन्द्राच्या उदित अंशामधून होतात त्या त्या प्रदेशामध्यें भूम्यंतरगत उत्पात झालेले पाहण्यास मिळतात. स्थिर राशीमधून जर योग किंवा प्रतियोग घडत असेल तर त्याचा फार तीव्र अनुभव येतो. चतुर्थस्थान हें भूमि खाणी भूम्यंतरगत पदार्थ यांचें द्योतक असल्यामुळें चतुर्थाच्या उदित अंशावर होणारा योग फारच महत्वाचा आहे.

(८) पूर्वक्षितिजावर वृश्चिक राशि उदय पावत असतांच भूकंपादि उत्पात झालेले अनेक वेळां पाहण्यास मिळाले आहेत.

(९) कोणत्याहि वर्षामधील भूकंपादि उत्पातासंबंधानें भविष्य करणें असतां प्रथमत: मेष, कर्क, तुला व मकर या प्रत्येक संक्रमणाच्या वेळच्या कुंडल्या व संक्रमणानजीक झालेल्या रविचंद्र संयोग--अमावास्या-- व रविचंद्रप्रतियोग--पौर्णिमा व ग्रहण काळच्या कुंडल्या प्रथम मांडून घ्याव्यात. व त्या कुंडल्यांवरून पृथ्वीच्या कोणत्या प्रदेशामध्यें पापग्रह--मंगळ, हर्शल, नेपच्युन व शनि हे चतुर्थ केन्द्राच्या भावारंभीं बसत आहेत तें पाहावें व त्या वरून त्या प्रदेशामध्यें भूम्यंतरगत भूकंपादि उत्पात होतील म्हणून सांगावें.

(१०) पृथ्वीवरील कोणत्या प्रदेशामध्यें भूकंपादि उत्पात होतील हें खालीलप्रमाणें सांगतात. प्रथमत: ज्या राशींमध्यें ग्रहणें, मोठाल्या ग्रहांच्या युत्या व पापग्रह असतात त्या राशि ज्या देशांच्या किंवा शहरांच्या कारक मानिल्या आहेत किंवा ज्या देशांवर व ज्या शहरांवर त्या त्या राशींचा अंमल सांगितला आहे, त्या त्या प्रदेशांत व शहरांत भूम्यंतरगत उत्पात घडतात. दुसरें ज्या ज्या ठिकाणीं हीं ग्रहणें, मोठाल्या ग्रहांचे प्रतियोग व पापग्रह द्रशमांत व विशेषत: चतुर्थ भुवनाचें उदित अंशावर येतात त्या त्या प्रदेशांमध्यें भूकंपादि भूम्यंतरगत उत्पात घडतात.

आतां आपण भूकंप केव्हां होतील याचा विचार करूं.---

भूकंप हे रविचंद्राच्या ग्रहणांच्या नंतर १।२ दिवस पुढें किंवा अगदीं ग्रहण दिवशींच होतात व त्या वेळेला मुख्य ग्रहांचे युतियोग किंवा प्रतियोग विशेषें करून स्थिर राशींतून झालेले असतात किंवा ग्रहणें स्थिर राशीमधून झालेलीं असतात. कांहीं भूकंप ग्रहणानंतर बऱ्याच दिवसांनीं होतात परंतु त्या वेळेला ग्रहणकालीन रविचंद्रांबरोबर गोचरीचे ग्रह अशुभयोग करीत असतात.

जातकांत ज्याप्रमाणें कालनिदान करणें विशेष महत्वाचें आहे त्याचप्रमाणें मेदिनीय ज्योतिषामध्यें कोणती गोष्ट कोणत्या ठिकाणीं होईल व ती केव्हां होईल हें सांगणें फार महत्वाचे आहे. मेदिनीय ज्योतिषामधील **स्थल** व **कालज्ञान** हा विभाग तूर्त बराच अपुरा आहे. यामध्यें अझून शोध झाले पाहिजे. काल निदानासंबंधानें तूर्त येथें एवढें सांगितलें म्हणजे पुरें आहे कीं **संक्रमण काळचे व ग्रहणाच्या रविचंद्रावरून ज्या ज्या वेळीं इतर ग्रहांचें भ्रमण किंवा दृष्टियोग होतात—युति, प्रतियोग व केन्द्रयोग—त्या त्या**

वेळीं खात्रीनें गोष्टी घडतात. ग्रहणाचे परिणाम फार दीर्घ काळ टिकतात, म्हणून ग्रहणांचेवरून किंवा त्यांच्याबरोबर ज्या ज्या वेळीं मंगळ, हर्शल, नेपच्युन, गुरु शनि यांचे दृष्टियोग घडतात त्या त्या वेळीं भूकंपादि उत्पात व इतर गोष्टी घडतात.

संक्रमणकाळचे कुंडलीला एक प्रकारची गती मानून तीवरून पुढील भविष्यें दिनवर्षपध्दतीचे तत्त्वानें करतां येतात. परंतु यासंबंधानें अद्यापि पुष्कळ शोध व्हावयाचे आहेत. तूर्त आमच्या वाचक वर्गानों संक्रमण काळचे कुंडलीच्या केन्द्रावरून व रविचंद्रांवरून ग्रहांची गोचर भ्रमणें पाहिलीं तरी त्यांचा पुष्कळच कार्यभाग होईल. रविचंद्रांची ग्रहणें हीं मेदिनीय ज्योतिषामध्यें फार महत्वाचीं असून त्यांचा परिणाम पुष्कळ वर्षें टिकतो करितां ग्रहण काळचे रविचंद्रांवरून हर्शल शनि मंगळादि ग्रहांची गोचर भ्रमणें विशेष लक्षांत घ्यावींत व तीं ज्या वेळीं अनिष्ट असतात त्या त्या वेळीं अनिष्ट गोष्टी खात्रीनें घडतात.

असो, आतां पर्यंत भूकंप होण्यास कशी ग्रहस्थिति असावी लागते व ते कोठें होतात याबद्दल सविस्तार विवेचन केलें आहे. आतां मागें झालेलें भूकंप वरील नियमाप्रमाणें घडले आहेत किंवा नाहींत हें पाहून हा लेख पुरा करण्याचा विचार आहे.

(१) तारीख २३ फेब्रुवारी १८८७ रोजीं एक मोठा भूकंप होऊन **रिव्हिरा**चा नाश झाला. तारीख २२ रोजीं कंकणाकृति सूर्यग्रहण झालेलें होतें व ह्या वेळीं चंद्र पृथ्वीपासून अत्यंत जवळच्या अशा अंतरावर Perigee भूमिनीचस्थितीमध्यें नव्हता परंतु तो पृथ्वीपासून अत्यंत दूर असलेल्या बिंदूमध्यें Apogee आपल्या कक्षेमधील भूम्युच्चामध्यें तारीख २४ रोजीं होता.

(२) तारीख ३१ आगस्ट १८८६ मध्यें जो मोठा भूकंप होऊन **चार्लिसस्टोन** शहराचा नाश झाला, तो भूकंप तारीख २९ रोजीं जें खग्रास सूर्यग्रहण झालें त्यानंतर झालेला आहे. त्याच दिवशीं चंद्र हा आपले कक्षेमधील पृथ्वीपासून अत्यंत जवळ असलेल्या ठिकाणीं म्हणजे भूमिनीचस्थतीमध्यें होता.

(३) तारीख १ ली जून १८६३ रोजीं एक चंद्रग्रहण झालें. व त्याच वेळीं चद्रहो पृथ्वीपासून अत्यंत जवळच्या ठिकाणीं म्हणजे Peregee भूमिनीचामध्यें होता व लागलाच तारीख ३ जून रोजीं एक मोठा भूकंप होऊन **मनिला** नांवाच्या शहराचा नाश होऊन सरासरी १००० माणसें मृत्युमुखीं पडली आहेत.

वरील तीन्ही भूकंप हे रविचंद्रांचे ग्रहणकाळीं जवळ चंद्र आपल्या कक्षेमधील पृथ्वीपासून अत्यत जवळचे किंवा लांबचे बिंदूमध्यें असतां म्हणजे पृथ्वी रविचंद्र एका सरळ रेषेच्या पातळींमध्यें असतां झालेले आहेत.

(४) इसवी सन १८८१ मध्यें शनिगुरु **वृषभ** राशीमध्यें असतां खालील तीन ठिकाणीं भूकंप झालेले आहेत.

(१) अरचिपेलागोमधील स्काय शहराचा तारीख ३ एप्रिल १८८१ रोजीं भूकंपानें नाश झाला. अरचिपेलागोची **वृषभ** राशि मानतात.

(२) तारीख १२ जून १८८१ रोजीं अरमेनिआमधील ३४ शहरांचा भूकंपानें नाश झाला. या दिवशीं **वृषभ** राशीमध्यें शुक्र, गुरु, शनि व नेपच्यून असें चार ग्रह एकत्र आले होते. अरमेनिआची ही वृषभ राशि मेदिनीय ज्योतिषामध्यें सांगितलेली आहे. व तारीख २२

जुलाई १८८१ रोजीं जेव्हां या वरील शनि, गुरु, नेपच्यून यांना वृषभ राशीमध्यें मंगळ येऊन मिळाला त्या दिवशीं स्विट्झरलंड व लेयान्स, ग्रेनोबल वगैरे ठिकाणीं भूकंपाचे जोराचे धक्के बसले. या पूर्वी स्विट्झरलंडामध्यें एवढा मोठा भूकंपाचा धक्का १८५४ च्या नंतर कधींच बसलेला नव्हता.

(५) तारीख १ ली नव्हेंबर १७५५ रोजीं मोठा भूकंप होऊन **लिसबन** शहराची राखरांगोळी झाली. त्यावेळीं खालीलप्रमाणें ग्रहस्थिति होती.

गुरु तुला ७-३१ मध्यें होता म्हणजे तो तारीख २७ मार्च १७५५ मध्यें जें चंद्र ग्रहण झालें होतें त्या काळचे चंद्राबरोबर प्रतियोग करीत होता. शनि मकरराशीमध्यें होता व या शनीबरोबर मंगळ कर्क राशीमधून प्रतियोग करीत होता म्हणजे शनि मंगळांचा प्रतियोग अयन राशीमधून होत होता तर शुक्र रवीचा युति वृश्चिक राशीमध्यें होत होती.

(६) तारीख १७ मार्च १८१८ मध्यें एक भयंकर भूकंप रोमानिआ मधील **फिलीपोली** शहरीं होऊन ७००० माणसें मृत्युमुखीं पडलीं. या भूकंपाचे धक्के आपले इकडे वसून समुद्र बराच पाठीमागें **बेनकुलेन** जवळ हटला व बरीच घरेंदारें पडलो असें म्हणतात त्या वेळीं पुढीलप्रमाणें ग्रहस्थिति होती.

॥ श्रीसद्गुरवे नमः ॥

ज्योतिर्मालिका

आप्राचः कामरूपाद्द्रुहिणसुतनदप्लावितादातीचो
गान्धारात् सिंधुसार्द्राद्रघुवररचितादाचसेतोरवाचः ।
आकेदारादुदीचस्तुहिनगहनतः सन्तिविद्वत्समाजा
ये ये तानेष यत्नः सुखयतु समजान्कश्चमत्कर्तुमीष्टे ॥ १ ॥

अभिनवाऽऽवृत्ति वर्ष ७ वें अंक १० ते ११.

घोड्यांच्या शर्यती व बीन ह्लेसचे नंबर कसे काढावें

याचा जेतिषशास्त्रदृष्ट्याविचार

(लेखक घनःश्याम रामचंद्र शहा)

[नोट. भाषांतर, कॉपी करणें वगैरे संबंधानें सर्व हक्क लेखकानें आपले स्वाधीन ठेविले आहेत.]

आजकाल श्रमावांचून व कोणाची खुशामत न करतां, स्वतंत्र रीतीनें पैसे मिळवण्याचा किमया म्हणजे रेसेसचा धंदा झाला आहे. परंतु रेसला जाणाऱ्यांपैकीं कोणी असा विचार केला नाहीं कीं, हे पैसे येतात कोठून ? एकाच्या खिशांतून दुसऱ्याच्या खिशांत, दुसऱ्याकडून तिसऱ्याच्या खिशांत. एवढेंच नव्हे तर, पैसे खिशांतून बाहेर निघाल्याबरोबर, त्यांस क्लबच्या माणसाचा विटाळ झाल्याबरोबर, त्यांस दहा टक्क्याची गळती लागते व प्रत्येकाचे खिशांतून नोटा पांच सात वेळा आंत बाहेर होत असता, चौथाई इतकी तरी त्या पैशाला झीज लागते. दर रेसच्या दिवशीं सुमारें

पन्नास साठ लाखांची तरी उलाढाली होते. म्हणजे दर दिवशीं पांच साहा लाख रुपयांचा चुराडा होतो. एकंदर एक ठिकाणचा सीझन मिळून कोटी दीड कोटी रुपये रेसर्सच्या खिशांतून गव्हर्न्मेंट व क्लबला भुर्शी किंवा दीक्षणा म्हणून मिळतात. ते हक्काचे म्हणून देणाराला त्याचें पुण्य म्हणजे नुकसानीमुळें रक्तशोषति क्षयाची भावना किंवा अतीरेक झाला तर अपघात प्राप्त होतो. अशा तऱ्हेनें राष्ट्राचें जीवन किंवा तेज नाहींसें करणारा, आळसु व दैवावर हवाला टाकून. ऐदी बनविणारा धंदा जर कोणी टाळला असेल तर तो थोड्या कालांत झपाट्यानें आर्थिक व औद्योगिक उन्नत्ती करून घेणाऱ्या स्वतंत्र जपान राष्ट्रानें होय. प्रजा हितैषी जापान सरकारनें कायद्यानें रेसींसला प्रतिबंध केला आहे.

तथापि एकदा जडलेलें व्यसन तावडतोब सुटत नाहीं. त्याप्रमाणें बरेच दिवसांपासून लोकांस लागलेला नाद तावडतोब नाहींसा होत नाहीं. म्हणून हल्लीं पुष्कळसे लोक घोडे शोधून काढण्याकरितां निरनिराळ्या रीतींचा अवलंब करीत आहेत; माझ्या थोडक्याच दिवसांचे अनुभवाचा विचार करितां ज्योतिषदृष्ट्या जिंकणाऱ्या घोड्याचा नंबर शोधून काढण्यास "**होरा पद्धती**" ही विशेष सुलभ व जास्त अनुभव देणारी आहे. **वजनपद्धतीनें** (Weight system) एका वजनाची चार चार घोडे येऊ शकतात. व त्यांत पूर्ण करणारे दुसरें पूरक वजन Comlimentary Weight ही घ्यावें लागतें. व पांच सात घोड्यांतून, एकदोन घोडे आपल्या अकलेने शोधून काढावयाचें असतात व त्यामुळें बराच अनिश्चितपणा उत्पन्न होतो व म्हणूनच माझें मतें ही पध्दत अतोशय गुंतागुंतीची आहे.

रंगपद्धतीः— (Colour System) यांत घोड्यावर बसणाऱ्या जॉकीचे कपडे, टोप्यांचा व बाह्यांचा रंग बुकांत दिलेला असतो. रेस घोड्याची असते, जॉकीची नसते. जिंकणाऱ्या घोड्यांचे नंबर बोर्डवर यावयाचे असतात. जरी घोड्यांचे रंग बुकांत दिलेले असतात. तरी ते सात ग्रहांचे वांटणीस अपुरे आहेत. घोड्यांचे रंग तीन चार आहेत. अमुक जॉकी जिंकला म्हणून पैसे मिळावयाचे नसतात, परंतु अमुक घोडा जिंकला म्हणून पैसे मिळावयाचे असतात. म्हणून मुख्यतः घोड्याचें रंगावरून तो कोणच्या ग्रहाचे अंमलाखाली आहे हें ठरवितां आलें पाहिजे. एका रंगाचे पुष्कळ घोडे असणें विशेष संभवनीय आहे. घोड्यांवर असलेले निरनिराळें रंग पाहून त्या निरनिराळ्या रंगाचें ग्रहाप्रमाणें पृथक्करण करून प्रत्येक घोड्यावर कोणत्या ग्रहाचा मुख्य परिणाम होतो, हें ठरविणें म्हणजे चेहरा पाहून कुंडली मांडण्याइतकेंच अवघड आहे. व म्हणूनच ही पध्दतही अतोशय गुंतागुंतीची व अवघड आहे. कुंडलीवरून घोडा विनर शोधण्याची पध्दति-हीमध्यें जी रेस ज्या वेळेला धांवते त्या काळची कुंडली मांडून, त्यावरून घोडा ठरवावयाचा असतो. या पध्दतीमध्यें, ग्रहांच्या एकमेकांवरील दृष्टीवरून जो ग्रह बलवान ठरेल, त्या ग्रहाचा घोडा येईल, अशी कल्पना करावयाची असते. इष्टकालच्या कुंडलीचे लग्न, दशम, सप्तम, पंचमवगैरे स्थानावर, ज्या ग्रहांचा ठरविलेल्या दृष्टीप्रमाणें जास्त जोर मिळत असेल, त्याचा घोडा, किंवा जॉकी जिंकेल, अशी कल्पना करावयाची असते. एकाच वेळेला दोन तीन ग्रहांचे सारखे योग होत असतात, व दोन चार रंगांचें मिश्रण असतां जिंकणारा घोडा अगोदर कळणें दुरापास्त असतें. पुष्कळशा पध्दतीप्रमाणेंही ही पध्दत रिझल्ट लागल्यानंतर

मात्र **चांगल्या तंतोतंत**रीतीनें जुळवून दाखवतां येते. या पध्दतीनें घोड्याचें निदान करणें व तीकरितां करावयास लागणाऱ्या गणिताचा खटाटोप व फायद्याचें प्रमाण याचा विचार केला असतां परिणाम डोंगर पोखरून उंदीर काढण्यासारखाच दिसतो.

"होरा पध्दती"

पाश्चात्य ज्योतिष्यांची रेसेसवर कांहीं पुस्तकें आहेत. त्यांत होरापध्दतीनेंही घोडे काढण्याचा प्रयत्न केला आहे. तो ही फार जुळतो असें नाहीं. प्रसिध्द ज्योतिषी सेफरियल यानें सिल्वर की (Silver key) मध्यें होरा पध्दती दाखविली आहे. तींत दिनमानाचे मुख्य बारा होरे व रात्रीमानाचे बारा होरे घेतले आहेत. व प्रत्येक होऱ्याचे पंधरा पोटविभाग केले आहेत. म्हणजे चार मिनिटांस एक होरा बसतो. त्यांत घोड्याच्या नांवाच्या किंमतीवरून ग्रहांच्या आंकडयाशीं अनुसंधान केलें आहे. परंतु त्यांत एका आकडयाचे बरेच घोडे येत असल्यामुळें ही पध्दति फायद्याच्या दृष्टीनें अत्यंत हिणकस ठरते. कॉस्मिक सिम्बॉलीझम (Cosmic Symbolism) व कबाला ऑफ नंबर्स (Kabala of Numbers) मध्येंही होरा पध्दतीनें घोडें कसें काढतां येतात, तें दाखविलें आहे. त्यांत दिवसाचे बारा होरे घेऊन, प्रत्येक मुख्य होऱ्याचे सात पोटविभाग केले आहेत. व घोड्याच्या नांवाचीं मुळाक्षरें घेऊन, त्यांच्या किंमतो ठरवून, प्रत्येक घोड्याचा नऊ अंकाचे मधील नंबर ठरवावयाचा आहे. त्यांतही एक नंबरचे चार सहा घोडे वर सांगितल्याप्रमाणें असू शकतात. म्हणून त्या रीतीनें काढलेले घोडे हो फायद्याच्या दृष्टीनें कांहीं उपयोगाचे होत नाहींत.

कार्डमधील जे घोड्यांचे नंबर असतात, त्यांपैकीं कोणच्या नंबरास इष्ट वेळीं होराबल विशेष आहे, तें पाहण्याचा प्रयत्न, अनेक होरापध्दती हल्लीं प्रचलित आहेत, त्यांत मुळांत, मुख्य बाबींमध्यें, कांहीं फेरफार करून, ज्या पध्दतीनें बराच अनुभव येईल, अशी पध्दत बसवण्याचा प्रयत्न मी बरेच दिवसांपासून करीत आहें. त्यांत आतांपर्यंत जी रीत विशेष अनुभवास आली ती पध्दति व त्याची मूळ कल्पना येणेप्रमाणें:----

ज्याप्रमाणें कुंडलीमध्यें केंद्रस्थानें महत्वाचीं समजलीं जातात, त्याचप्रमाणें **सूर्योदय, माध्यान्ह, सूर्यास्त व मध्यरात्र** हें दिवसाचे चार मुख्य विभाग अत्यंत महत्वाचे आहेत. दिवसाचे चार विभाग केल्यास, ते असंबध्द खास नाहीं. कारण हे विभाग नैसर्गिक रीत्या रवि ज्या वेळीं केंद्रामध्यें असतो तेव्हांच होतात. व या प्रत्येक पादांमध्यें सात ग्रहांचे होरे आहेत असें मानल्यानंतर पुन्हा प्रत्येक होऱ्याचे सात पोट विभाग याप्रमाणें रचना केल्यास, माध्यान्हा पासून सुर्यास्तापर्यंत सातही ग्रहांचे होरे क्रमानें येतात. होऱ्यांचा क्रम ग्रहांना सूर्याभोंवती प्रदक्षिणेला लागणाऱ्या काळाच्या प्रमाणें घेतलेला आहे. म्हणजे सर्वांत दूरचा व अतिमंद ग्रह शनि त्यानंतर गुरु, नंतर मंगळ, रवी, शुक्र, बुध व चंद्र असे अनुक्रमानें एका मागून एक नेहमीच्या पध्दतीप्रमाणें होऱ्यांचे अधिपति ते ते ग्रह मानावे.

माध्यान्हापासून पहिल्यानें सूर्यास्तापर्यंत काल घेऊन त्याचे सात विभाग करावे. माध्यान्हापासून पहिल्या होऱ्याचा अधिपति वाराधिपति असणारा ग्रह होतो व मा त्यानंतर येणाऱ्या दुसऱ्या होऱ्याचा अधि-

पति त्या वारापासून येणाऱ्या साहाव्या वाराचा अधिपति याप्रमाणें पुढील होऱ्याचें अधिपति घेणें.

" ग्रहांचे नंबर "

	मुख्य	अनुषंगिक
रवी.	१	४
चंद्र.	२	७
मंगळ.	९	५
बुध.	५	९
गुरु.	३	६
शुक्र.	६	३
शनी.	८	१ किंवा ४

" वारपरत्वें ग्रहांचें होराकोष्ठक "

	रवि.	सोम.	मंगळ.	बुध.	गुरु.	शुक्र.	शनी.
१	र.	चं.	मं	बु.	गु.	शु.	श.
२	शु.	श.	र.	चं.	मं	बु.	गु.
३	बु.	गु.	शु.	श.	र.	चं.	मं.
४	चं.	मं.	बु.	गु.	शु.	श.	र.
५	श.	र.	चं.	मं.	बु.	गु.	शु.
६	गु	शु.	श.	र.	चं.	मं	बु.
७	मं.	बु.	गु.	शु.	श.	र.	चं

स्थानिक माध्यान्हकाल प्रत्येक ठिकाणीं उपयोगी पडेल असा रा. ना. स. मराठे यांच्या स्पष्टग्रहांचे पंचांगांत दिलेला असतो. रेसेस माध्यान्हानंतर व सूर्यास्तापूर्वी होतात. म्हणून फक्त सूक्ष्म सूर्यास्त काढण्याची जरूर असतें. पंचांगांतील सूर्योदयास्त कांहीं ठिकाणीं चुकलेले असतात.

म्हणून सुर्यास्त नॉटीकल अल्मानकवरून घ्यावा किंवा खालील पध्दतीनें तयार करावा. लागर्थम पध्दतीनें गणित करणें सोपें जातें, परंतु ते सर्वांस सहज समजण्यासारखें नसल्यामुळें साधी गणित पध्दती दिली आहे.

$$\frac{\text{सूर्यक्रांती} \times \text{अक्षांश}}{५} = \text{चरपळें}$$

यांस २॥नें भागून मिनिटें करावीं. माध्याह्नामध्यें सहा तास मिळवून मध्यम सूर्यास्त करावा. क्रान्ती उत्तर असतां, मध्यम सूर्यास्तांत वरील चरमिनिटें मिळवावीं. व क्रान्ती दक्षिण असतां वजा करावीं. व किरणवक्री भवनाबद्दल २ मिनिटें मिळवावीं उदाहरण ता. २८ जुलै १९२३.

रवीक्रान्ती. १९--१२ उत्तर

पुणें अक्षांश. १८--३०

$$\frac{९६}{५} + \frac{३७}{२} + \frac{१}{५} = \frac{१७७६}{२५}$$

=७१ चरपळें म्हणजे २८ मिनिटें व २४ सेकंड.

माध्यान्ह १२-६-०

+ ६-०-०

६-६-०

चरमिनिटें. २८-२४

६-३४-२४

+ ३५-० ते + ३५, ०

पुणे येथें स्टॉ. प्रमाणें सूर्यास्त ७-९-२४

पुणें व मुंबईचे रेखांशामध्यें एक अंशाचें अंतर असल्यामुळें पुण्यास सूर्योदयास्त चार मिनिटें अगोदर होतो. म्हणून स्टॅं. टाईम ३९चे ऐवजीं ३५ मिनिटें मिळविली असतां पुणें स्टॅं. टा. होईल.

ता. मि. से.

पुणें स्टँ. टाईम ७--९--२४

"स्टँ. माध्यान्ह १२--४१----०

माध्यान्ह सूर्यास्तां ६--२८--२४

यांस ७नें भागिले असतां मि. ३० से. मुख्य होण्याचा भाग येतो. व यांस पुन्हा ७नें भागिलें असतां, ७मि. ५६ से. म्हणजे जवळ जवळ ८ मिनिटें एक अंतर होरा येतो. दहापांच सेकंद पोटहोऱ्यास विचारांत घेण्याची जरूर नाहीं.

आतां पुणा सीझनचो पहिली रेस शनवार तां. २८ जुलै सन १९२३ची वरील गणितानें सोडवून पाहूं.

ता. मि. से.

पुणें. स्टा. माध्यान्ह. १२-४१-०

पर्यंत शनीचा होरा ०-५५-३०

गुरूमध्यें शेवटचा ०-५५-३०

शनीचा पोटहोरा, २--३२--०

पहिली रेस

शनीचा नं.८ White Rose नं. ८ वीन झाला.

दुसरी रेस

ता. मि. से.

मुख्य मंगळाचा होरा चालू. २--३२--०

पोटहोरा मंगळ ०--८--०

" " रवी ०--८--०

" " शुक्र ०--८--०

" " बुध ०--८--०

३--४--०

बुधाचा नंबर ५ व ९ Arman नं. ९ वीन आला.

तिसरी रेस

ता. मि. से.

२--३२--०

०-५५-३०

पर्यंत मंगळाचा मुख्य होरा. ३-२७-३०

रवीचा होरा. ०-८-०

३-३५-३०

रवीचा नंबर १ व ४ Muzyed नं. २२=२×२=४ नंबर प्लेसमध्यें आला.

चवथी रेस

रवी. ३-३५-३०

शुक्र. ०--८--०

बुध. ०--८--०

चंद्र. ०--८--०

३-५९-३०

चंद्राचा नंबर २ व ७ Steel Blue नं. २ वीन आला.

पांचवी रेस

रवीचा मुख्य होरा. ४-२३-०

शुक्र ०--८--०

४-३१-०

शुक्राचा नं. ६९ व ३ Dugald Dalgetty नं. ६ प्लेस आला.

सहावी रेस

५ ता. ३ मि. पर्यंत गुरूचा पोट होरा. ही रेस अजिबात चुकली.

सातवी रेस:-५ ता. ३ ४ मि. ३ ०से. पर्यंत चंद्राचा होरा. चंद्राचा नंबर २ व ७ Canterbury Lamb नं. २ वीन झाला.

आठवी रेस:-६ ता. ६ मि. ३ ० से. पर्यंत रवीचा होरा. रवीचा नं. १ व Fudorette नं. १ वीन आला.

नववी रेस-गुरूच्या होऱ्यामध्यें सुटली. गुरुचा नं. ३ Samayet नं. १२=१+२= ३ नंबर प्लेस मध्यें आला.

अशा रीतीनें नऊ रेसेसमध्यें पांच वीन व तीन प्लेस मिळाले. ह्यावरून प्रचलित पध्दतीपेक्षां, ही पध्दत कितीतरी सुलभ असून ज्यास्त फल देणारी आहे याची कल्पना वाचकांनां सहज करतां येण्यासारखी आहे. या विषयावर आणखी पुष्कळ विचार करण्याच्या गोष्टी आहेत व त्या सर्वांचा विचार केल्याखेरीज अत्यंत सूक्ष्म ज्ञान होणार नाहीं. परंतु तूर्त स्थलाभावामुळें प्रस्तुतचा लेख येथेंच पुरा करणें बरें. पुढेंमागें याविषयावर आणखी लिहिण्यांत येईल.

॥ श्रीगुरुगणेश ॥

फलज्योतिषशास्त्रदृष्ट्या घोडयांच्या शर्यतींचा विचार.

[लेखक:—**यशवंत केशव प्रधान**]

प्रस्तुत विषयाकडे इ. स. १९१४--१९१५ पासून सहजासहजीं लक्ष लागलें गेलें. व त्यासंबंधानें जो कांहीं थोडाबहुत अनुभव घेण्यास मिळाला आहे, त्याचसंबंधीं प्रस्तुत लेखामध्यें विवेचन करण्याचें योजिलें आहे. रा. रा. घनश्याम रामचंद्र शहा यांचा लेख याच विषयासंबंधानें आमच्याकडे छापण्यास सप्टेंबर १९२३ मध्यें आला व त्याच सुमारास श्रीयुत ना. स. मराठे यांच्या ज्योतिषविषयक लेखमालेमध्यें किंवा "हर्शल" मध्यें याच विषयासंबंधानें एक **रेसरचा** लेख आला आहे. राजेश्री शहा यांचा लेखही त्यांचे मालेमध्यें ज्योतिर्मालेमध्यें येण्यापूर्वीच प्रसिध्द झाला आहे. अशा वेळीं यासंबंधानें थोडाबहुत चर्चात्मक विचार केला असतां चिकित्सक ज्योतिर्विद्यार्थ्यांचें लक्ष वेधून त्यांतून कांहीं चांगलें उपयुक्त नियम बाहेर पडून ज्योतिषशास्त्र हें धनोत्पादक साधन आस्ते आस्ते करितां येईल असें वाटल्यावरून आज आम्हीं कांहीं विचार वाचकांच्या पुढें ठेवीत आहों. याविषयावर एक चांगलें स्वतंत्र पुस्तक प्रसिध्द करावें या हेतूनें सन १९१८ मध्यें लिहिण्यास सुरवात केली होती व त्यानंतर अनेक अडचणी आल्याकारणानें तें काम तसेंच बाजूस ठेवावें लागलें. त्याच लेखांतील आज कांहीं भाग आम्हीं प्रसिध्द करण्याचें धाडस करीत आहों. सन १९१८ नंतर अनेक निरनिराळीं पुस्तकें या विषयावर पाहण्यास मिळालीं त्याचप्रमाणें अनेक फलज्योतिष विद्यार्थ्यांबरोबर याच विषयावर वादविवाद व विचारविनिमय करण्यास सांपडल्यामुळें मूळच्या लेखामध्यें पुष्कळच सुधारणा करण्यास मिळाली. ज्या माझ्या ज्योतिर्विदे बंधूंनीं

आपलें अंतःकरण खुलें करून माझे बरोबर विचार विनिमय केला आहे त्या सर्वांचा मी अत्यंत आभारी आहें. अशी माणसें समाजामध्यें व विशेषतः ज्योतिषविद्यार्थ्यांमध्यें फारच थोडीं आहेत. ज्या थोड्यांचें लक्ष या विषयाकडे आहे ते धंद्याच्या दृष्टीनें आपलें तोंड मुळीच उघडीत नाहींत. फारच थोड्यांना हा विषय कळला असून त्यांतून अचुक प्रमेयें बांधण्याचें सामर्थ्य फारच थोड्यांमध्यें आहे. हजार ज्योतिर्विदामध्यें १० किंवा १२ देखील या विषयावर पूर्ण विचार केलेले ज्योतिर्विद मिळत नाहींत. मात्र आम्हांला रेसच्या घोड्याचे विन प्लेसचे नंबर अचुक सांगतां येतात अशा तऱ्हेच्या भबकेबाज जाहिराती देऊन जनसमाजास किंवा अज्ञ जगास लुबाडणारेच फार दृष्टीस पडत आहेत. ज्योतिषशास्त्र धनोत्पादक केल्यास ज्योतिषाला दुसऱ्याच्या मर्जीवर राहण्याचा प्रसंग खात्रीनें येणार नाहीं. दुसऱ्याला एका दिवसामध्यें येणाऱ्या घोड्याचे नंबर सांगून त्यावर ५।१० रुपये मिळविण्यापेक्षां खरा सत्यप्रतिज्ञ ज्योतिर्विद आपले स्वताचे पदरचे पैसे खर्च करून त्यावर आपले ज्ञानानें कमाई खात्रीनें करील. व असें कांहीं गाजावाजा न करितां काम करणारे ज्योतिर्विदही आहेत. भबकेबाज जाहीराती देऊन फसविणारे ज्योतिर्विद् लोकांना कसें चकवितात याचा मासला पाहणें असल्यास आमचे बरोबर ज्या एका ज्योतिर्विदाचा संवाद झाला त्यांतील खालील वाक्यांवरून कांहीं कल्पना होईल, " मग आपण कांहीं विशिष्ट प्रमेयें व सिध्दांत अनुभवावरून बांधलीं असलीं पाहिजेत कारण तुम्हीं यासंबंधानें लोकांना सल्ला देत असून टिप्स काढून विकीत असतां त्यामुळें तुम्हीं कांहीं तरी या विषयासंबंधानें चांगले प्रयत्न केले असले पाहिजेत. " "कसले हो प्रधान !! तुम्हाला जें कळत नाहीं तें हेंच !!" "हा एक धंदा व व्यवहार आहे.. अहो रेसच्या दिवशीं अनेक टिपस्टरचीं

पुस्तकें, बुलीटीन्स वगैरे प्रसिध्द होतात त्यामध्यें ज्या टिप्स दिलेल्या असतात त्यांतील सर्वांचा विचार करून मी एक लिस्ट तयार करतों व देतों ठोकून ज्योतिषशास्त्राच्या नियमानें काढलेले घोडे म्हणून !!! अहो कोण करतो तो कुंडल्या मांडण्याचा खटाटोप व त्यांमधून काय दगड कळणार आहे " !! वरील संवादावरून ज्योतिषशास्त्राच्या नांवाखालीं काय काय सावळे गोंधळ घडतात यासंबंधानें थोडीबहुत कल्पना प्रत्येकास करितां येईल. स्वानुभव, उत्तम विचारसरणी याची जोड घेऊन फलज्योतिषशास्त्राधारें तेजी मंदीचा विचार करणारे व त्यावरून प्रमेयें प्रस्थापित करणारे ज्योतिर्विद् फारच थोडे पाहण्यास मिळतात. आपल्या पढीक पुस्तकीय ज्ञानाचें प्रदर्शन करणारे मात्र गल्लोगल्लीं भेटत आहेत. गाढवाला ज्याप्रमाणें पाठीवर वाहत असलेल्या गोणीमधील साखरेची चव कळत नाहीं त्याचप्रमाणें या पढीक ज्ञानाच्या भारवाहकांचा स्थिति आहे. शास्त्राचा साक्षात्कार व्हावा लागतो व तो सर्वांस होतो असें नाहीं. साक्षात्कारी पुरुष किंवा ज्योतिर्विद् फारच थोडे पाहण्यास मिळतात.

फलज्योतिषशास्त्राचा सट्टयाच्या किंवा रेसिसच्या व्यवहारामध्यें उपयोग करावा किंवा करूं नये यासंबंधानें सर्व ज्योतिर्विदांचें एक मत होणें शक्य नाहीं. व त्यासंबंधाचा ऊहापोह करण्याचें हें स्थलही नाहीं. **फलज्योतिषशास्त्र हें जितकें उपयुक्त, समाजास मदत करणारें व दिव्य दृष्टि किंवा ज्ञान देणारें होईल तेवढें झालें पाहिजे असें आमचें ठाम मत आहे.** सट्टा कशामध्यें होत नाहीं ? Life itself is peculation. आपलें पृथ्वीवरील जीवित हाहो एक सट्टाच आहे. मानवी प्राणी पुढील भावी आशेनें किंवा पुढील मिळणाऱ्या भावी सुखाच्या लालचीनें प्रत्येक गोष्ट करीत असतो. व हल्लींच्या व्यापारी

युगामध्यें Forward delivery ला म्हणजे पुढील अमुक एका महिन्याला अमक्या भावानें अमका माल देईन किंवा घेईन यालाच अत्यंत महत्व प्राप्त झालें आहे, म्हणजे पुढील भावी काल कळणें हेंच आज अत्यंत आवश्यक झालें आहे. याचेंच नांव सट्टा. मग तो अगदीं खऱ्या खऱ्या मालाच्या देवघेवीचा असो किंवा तोंडीं दिलें, विकलें किंवा घेतलें याचा असो.

फलज्योतिष शास्त्राचा उपयोग सर्व सट्टशाच्या व्यवहारामध्यें कसा होतो यासंबंधानें निर्भीडपणानें मराठींमध्यें जर कोणी विवेचन करण्यास सुरवात केली असेल तर ती श्रीयुत शहा यांनींच होय. व या दृष्टीनें पाहतां राजेश्री शहा यांनीं एक अप्रतिम धडा सर्व ज्योतिर्विदांस घालून दिला आहे. गुजराथीमध्यें अगोदर फलज्योतिषावर मासिकच नव्हतें परंतु हल्लीं एक मासिक निघत आहे. या मासिकाचे विद्वान संपादक इतके दिवस मराठींमधून भाषांतर करून घेतलेले लेख अमुक एका मासिकामधून घेतले आहेत असें म्हणत असत परंतु हल्लीं त्यांनी राजेश्री शहा यांचे व इतर कांहीं दुसरे ज्योतिर्विदांचे लेखांचा भाषांतरें संपादकीय* म्हणून आपले नांवाखाली देण्याचा एक नवीन स्तुत्य नजरबंदीचा चमत्कार चालविला आहे. स्वतंत्र विचार करून कांहीं नवीन तत्त्व शोधून काढण्याच्या प्रयत्नानें ज्योतिषशास्त्राचे उज्वल कीर्तीमध्यें जास्त भर पडेल किंवा असल्या क्षुद्र वृत्तीच्या प्रयत्नानें त्याला जास्त शोभा येईल याचा विचार वाचकांनीं करावा. असो, हल्लीं हळु हळु या विषयासंबंधानें ज्योतिर्विदांमध्यें चांगलो जागृती होऊं पाहत असल्याचें दृष्टोत्पत्तीस येत असल्यामुळें भावी काळामध्यें विशेष चांगली प्रगती होईल असें दिसतें.

* यासंबंधानें एक पत्र राजेश्री शहा यांचें आमच्याकडे प्रसिद्ध करण्याला आलें आहे परंतु तें शिष्टाचारामुळें तें प्रसिद्ध करणें बरें दिसत नाहीं:—संपादक.

ग्रहांच्या होऱ्यांचा* व घोडयांच्या शर्यतीचा संबंध असून त्या योगानें जिंकणारा घोडा ओळखतां येतो याविषयीं प्रथमतः पाश्चिमात्य ज्योतिर्विदांसमोर कल्पना मिस्टर एस. अहमद या गृहस्थांनीं मांडली व त्यांनीं आपल्या मिस्टरीज आव्ह् साऊन्ड ॲंड नंबर या नांवाचें पुस्तक सरासरी २५।३० वर्षांपूर्वी प्रसिध्द करून बरीच जागृती केली. आर्य वाङ्मयामध्यें असलेल्या कालाच्या होरा या विभागाचा पाश्चिमात्य प्रदेशामध्यें जर कांहीं कधीं अत्यंत जोरानें प्रसार झाला असेल तर तो याच गृहस्थांचे श्रमामुळें होय. होरे व त्यावरून घोडे कसें विन प्लेस येतात या कल्पनेचे आद्य जनक हेंच गृहस्थ आहेत.

यांनीं आरबी अक्षरें व होरे यांचा संबंध कसा काय आहे याचें फारच बारीक विवरण आपले वरील पुस्तकामध्यें केलें आहे. अगोदरच पाश्चिमात्य जनतेला रेसचें पूर्ण वेड लागलें होतें व त्याच वेळीं हें आर्थिक साधनांचें भांडवल उघडकीस आल्यामुळें या पुस्तकानें किती खळबळ उडविली असेल याची वल्पना सहज करितां येईल. हल्लीं हें पुस्तक फारच दुर्मिळ झालें आहे. यानंतर या गृहस्थांनीं याच विषयाला धरून दुसरीं २।३ लहान लहान पुस्तकें प्रसिध्द केली आहेत. याच ग्रंथानंतर होऱ्यासंबंधानें अनेक उपयुक्त कल्पना पाश्चिमात्य वाङ्मयामध्यें निर्माण झाल्या आहेत व त्यांतीलच एका कल्पनेला धरून रा. रा. शहा यांनीं विचार केला आहे.

* होऱ्या संबंधानें स्वतंत्र विवेचन ज्योतिर्माला वर्ष ३ रे अंक १ ला यामध्यें आले आहे तें पाहावें.

रेसच्या घोड्यांच्या विन किंवा प्लेसचा निर्णय करण्याच्या ज्या अनेक पध्दतींचा आज काल खल पाश्चिमात्य वाङ्मयांत होत आहे त्या सर्वांमध्यें कमी निर्दोषी अशी प्रस्तुत श्रीयुत शहा यांची पध्दत आहे असें मुळींच वाटत नाहीं. जे दोष ते इतर पध्दतींना लावूं पाहत आहेत त्यांतील कांहीं दोष त्यांचे पध्दतीला खास लागू पडतात, हें कोणाही विचारी माणसाला कबूल करा लागेलवें. ज्याप्रमाणें इतर पध्दती रेस होऊन गेल्यानंतर १०० टक्के जुळवून दाखवितां येतात असें त्यांचें म्हणणें आहे तीच गोष्ट त्यांचे पध्दतीची आहे. रा. रा. शहा यांची पध्दती कमी दर्जाचा आहे किंवा ती कांहीतरी आहे असें म्हणण्याचा आमचा मुळींच मानस नाहीं. उलट त्यांचे चिकित्सक, चौकस व शोधक बुध्दीसंबंधानें आमचें मनांत फारच आदर आहे. ते ज्या पध्दती त्याज्य आहेत असें म्हणत आहेत त्याच त्याज्य पध्दती आम्हांस विशेष शास्त्रीय तत्त्वावर बसविल्या आहेत असे वाटतं व त्यांतून प्रयत्न केला असतां आणखी सूक्ष्म व अचूक भविष्य करतां येईल असें सन १९१५ पासून आमचें ठाम मत झाल्याकारणानें याच विषयावर चर्चात्मक निबंध प्रसिध्द करण्याचें धाडस करीत आहों.

इंग्रजी भाषेमध्यें या विषयावर आतांपर्यंत आठ दहा किंवा जास्तीच पुस्तकें प्रसिध्द झालीं आहेत. त्यातील वर्गीकरणाकरितां वरील पुस्तकांमधून **होरापध्दति, वजनपध्दति,** व **रंगपध्दति, अमुक एक नंबर अचुक काढण्याची पध्दति** असे चार प्रकार पाहण्यास मिळतात. होरापध्दतीचे आद्यजनक मिस्टर एस. अहमद हे आहेत तर कुंडलीवरून सशास्त्र रंग व वजनावरून जिंकणाऱ्या घोड्याचा विचार

कसा करावा या पध्दतीचे जनक मिस्टर सफॅरीअल हे आहेत. अमुक एक वेळेला रेस सुटणार असून तीमध्यें इतके घोडे धांवणार आहेत म्हणून त्यांपैकीं अमुकच नंबरचा घोडा विन किंवा प्लेस आला पाहिजे या पध्दतीचें विवेचन करणारे गृहस्थ मिस्टर एच. ट्रेव्हायर हे आहेत. प्रस्तुत लेखकाचा व या गृहस्थाचा पत्रव्यवहार झालेला आहे व त्यामध्यें ते लिहितता कीं "मिस्टर सॅफरीअल यांनां रेसचे संबंधानें मी सन १८९६ किंवा त्या सुमारास वजन पध्दतीनें घोड्याचें कसें वर्गीकरण करावें या संबंधानें प्रथमतः सांगितलें आहे, मी ४ रेसक्लबांचा मेंबर असून आजपर्यंत कांहीं हजारांनीं रेसच्या कुंडल्या तयार केल्या असून त्यावरून माझे नियम बसविले आहेत. इंग्लडमध्यें रेस अस्ट्रालाजर म्हणून मी प्रख्यात असून माझे पुढें सॅफरीअल हे एक यःकश्चित मनुष्य रेस अस्ट्रालाजीमध्यें आहेत." यांचे सर्व नियमाकरितां त्यांना ५० पाउन्ड पाहिजेत त्याखेरीज ते कोणास शिकविण्यास तयार नाहींत. वरील हकीगत कांहीं असो, पण इतकें खास आहे कीं रेसच्या वेळेची कुंडली मांडून तीवरून रंगाचें निदान कसें करावें व धांवणाऱ्या घोड्यांचे वजन विचारामध्यें घेऊन विन किंवा प्लेसमध्यें येणाऱ्या घोड्यांचा कसा विचार करावा यासंबंधानें सन १९१२।१३मध्यें प्रसिध्द केलेलें "Silver key" "सिल्हवर की" किंवा ज्ञानभांडार व त्याचे साह्यानें पुढें द्रव्यभांडार उघडण्याची रुपेरी किल्ली हें मिस्टर सॅफरीअल यांचें पुस्तक ज्योतिर्विङ्मयामध्यें फारच महत्वाचें आहे असें आमचें प्रांजळ मत आहे. कारण या पुस्तकाचे वाचनानें व अभ्यासानें विचारी व कल्पक ज्योतिर्विदाला अनेक नवीन नियम स्वानुभावानें खात्रीनें बसवितां येतील. यानंतर याच पुस्तकाचे आधारावर, किंबहुना "त्याच सिल्हवर की" मधील गोष्टी अत्यंत फुगवून व रंगाचे पध्दतीसंबंधानें विशेष जोर

देऊन पुण्यांतील एका पार्शी किंवा यूरोपियन गृहस्थानें एरिअल या टोपण नांवाखाली सिल्व्हर कीचो नक्कल गोल्डन कीचे रूपानें सन १९१९।२० चे सुमारास जनसमाजापुढें मांडली आहे. या पुस्तकामुळें विशेष नवीन तत्त्वें कांहीं बाहेर पडलीं असतील असें कोणाचें मत असेल तर तें सर्वस्वी अविश्वसनोय आहे. फक्त मुंबई व पुणें येथील सन १९१८।१९१९ मधील सीझन रेसेसच्या हंगामामधील कुंडल्या घेऊन त्यावरून घोडे कसकसे विन, प्लेस आले आहेत याचें मात्र फारच विस्तृत वर्णन केलें आहे. प्रत्येक रेस जुळवून दाखवितांना जो ओढाताण केली आहे व शेंकडा १०० टक्के रिझल्ट बरोबर येतो हें दाखविण्याचा पाठीमागून केलेला प्रयत्न हास्यास्पद वाटतो. सध्यां इतकें मात्र खात्रीनें म्हणतां येईल कीं कोणतोह पध्दत असो **वजनपध्दति** असो, **रंगाची पध्दति** असो किंवा रा. शहा यांची **होरापध्दति** असो कोणत्याही एका पध्दतीनें अचूक ज्ञान होतें असें मुळींच वाटत नाहीं. हल्लींचे प्रत्येक पध्दतीचें ज्ञान अपुरें आहे. व त्याचमुळें एकाच पध्दतीनें सर्व सीझनभर खेळ खेळला असतां कमाई होईल असें आम्हांस मुळींच वाटत नाहीं. तूर्त ज्ञानाचें भांडवल अपुरें असल्यामुळें प्रत्येक रेसचा दोनतीन रीतीनें विचार करून त्यामधून ज्या एकदोन रेसिसमध्यें ठाम निश्चित एकवाक्यता होत असेल त्याच खेळल्या असतां खात्रीनें सांपत्तिक लाभ होईल. असा, आतां आपण निरनिराळ्या पध्दतींचा विचार करण्यापूर्वी रेसिस हें काय बंड आहे व तेथें खेळ कसा खेळला जातो या संबंधानं थोडक्यांत विचार करून नंतर आपल्या मुख्य विषयाकडे वळूं.

मुंबई व पुणें मिळून एक वेस्टर्न इंडिया टर्फ क्लब नांवाचो एक संस्था आहे तीमध्यें शर्यतीमध्यें दौडण्याकरितां प्रत्येक मालक आपापले घोडे

नोंदीत असतो. रेस हो दोन घोड्यांपासून लागेल तेवढया घोड्यांमध्यें होऊं शकते. पहिला येणाऱ्या घोड्यास अमुक इतके हजारांचें बक्षिस, दुसऱ्यास इतकें बक्षिस तर तिसऱ्याला एवढें बक्षिस अशीं टर्फ क्लबाकडून बक्षिसें देण्यांत येतात. बक्षिसें फक्त तीन नंबर पर्यंत देतात. निरनिराळ्या घोड्यांच्या जातींप्रमाणें त्यांचें वर्गीकरण करून नंतर त्यांचेमध्यें शर्यत होते. या शर्यती पाहण्याकरितां जनसमाजास ठराविक प्रवेश फी घेऊन सोडतात. आंत गेल्यानंतर तेथेंच जुगारखाना चालू होतो. प्रत्येक रेसमध्यें धांवणाऱ्या घोड्याचे नंबराचें तिकीट विकण्याकरितां एक टोटलायझर ठेवलेलें असतें. आंत गेलेला बहुशा प्रत्येकजण आपल्या आवडी नावडी-प्रमाणें अमुक घोडा जिंकेल किंवा पहिल्या तीन नंबरांमध्यें येईल असें ठरवून त्याचें तिकीट विकत घेतो. तिकोटाची किंमत फर्स्ट एनक्लोझरमध्यें रु. १० व सेकंड एनक्लोझरमध्यें रु. ५ ठेविलेली आहे. हल्लीं गरीब लोकांससुध्दा या जुगारखान्याचा लाभ घेतां यावा म्हणून थर्ड एनक्लोझर काढलें असून तेथें प्रत्येक तिकिटाची किंमत रु. ३ ठेविली आहे. घोड्यांच्या तिकीटांचे दोन वर्ग केलेले आहेत. एक **विन** व दुसरा **प्लेस. विन** म्हणून घेतलेल्या तिकिटाचा घोडा पहिलाच आला पाहिजे व **प्लेस** म्हणून घेतलेल्या तिकिटाचा घोडा पहिल्या तीन नंबरांमध्यें आला तरी चालतो. येणाऱ्या घोडयावर विकले गेलेल्या तिकिटांच्या संख्येनें एकंदर वसूल झालेले रकमे-मधून टर्फक्लबचे १० टक्के वजा जातां राहिलेल्या रकमेला भागतात व त्यायोगानें जी फाळणी पडते तो जे घोडे विन किंवा प्लेस आले असतील त्यांना वाटून देतात. व त्यामुळेंच रु. १० ला १०० तर ५० किंवा लागेल तो भाव पडतो. व फारच कमी भाव पडला तर टर्फ-क्लबचा रु. १० मधील हक्काचा एक रुपया वजा जाऊन मूळ माल-काच्या हातामध्यें कांहीं कांहीं वेळेला रु. १०चे ९ रुपयेच मिळतात.

घोडयांच्या निरनिराळ्या जातींप्रमाणें वर्गीकरण करून त्यांच्या शर्यती पांच फर्लांगच्या, सहा फर्लांगच्या, एक मैलाच्या अशा गोठवितात. व प्रत्येक रेस ठराविक वेळेला सोडतात. आपलेकडे रेसिस बहुधा बुधवार व शनिवारीं दुपारीं होतात. रेसिस दोन प्रकारच्या असतात. एक **टर्मस रेसिस** व दुसरी **हॅन्डी कॅपड रेसिस. टर्मस** रेसिसमध्यें घोडयावर बसलेल्या जॉकीखेरीज दुसरें वजन घेऊन जावें लागत नाहीं. त्यामुळें बहुशः टर्मस रेसिसमध्यें घोडयाचें पुढें दिलेलें वजन सगळ्यांचेंच सारखेंच असलेलें पहण्यास मिळतें. याचे उलट **हॅन्डी कॅपड** रेसिसचें असतें. सर्व घोडयांना सारखाच फायदा मिळावा या हेतूनें त्यांना सारखें करण्याकरितां जे घोडे वारंवार पहिले आलेले असतात त्यांना दंडादाखल प्रत्येक वेळेला थोडं थोडें वजन वाढवितात किंवा जे पहिले येत नाहींत त्यांचें वजन कमी करितात. म्हणजे त्यांचेवर बसणाऱ्या जॉकीच्या वजनाखेरीज आणखी वजनाचे तुकडे त्यांना खोगीरामधून न्यावे लागतात व यालाच हॅन्डीकॅपींग म्हणतात व त्यामुळें प्रत्येक घोडयाचे समोर निरनिराळें वजन येऊं शकतें. प्रस्तुत विषयाला इतकी माहिती पुरी आहे.

होरापद्धति किंवा **अक्षरपद्धति**:--होरापध्दतीचा कल्पना पूर्वी सांगितल्याप्रमाणें मिस्टर एस. अहमद यांनीं प्रचारामध्यें आणली. दिवसाचें सरासरी एक एक तासाचें विभागास होरा असें नांव आहे. होऱ्याचा आरंभ वाराधिपती असणाऱ्या ग्रहानें घेतात. व नंतर त्याचे पुढें ग्रहांच्या गतीप्रमाणें अनुक्रमें प्रत्येक ग्रह होराधिपति होतो याप्रमाणें २४ तासांत सात ग्रहांचे तीन फेरे पूर्ण होऊन दुसरे तीन होरे होतात व त्याचे पुढें येणाऱ्या होऱ्याचा अधिपति हा दुसऱ्या दिवशीं येणाऱ्या वाराचा अधिपति असतो. होऱ्याचा आरंभ सूर्योदयापासून मानण्याचा सांप्रदाय आर्य वाङ्मयामध्यें

आहे. रेस ज्या वेळीं सुटते त्या वेळीं कोणत्या ग्रहाचा होरा चालू आहे हें प्रथम ठरविल्यानंतर त्या कालामध्यें होणाऱ्या रेसमध्यें जेवढे घोडे धांवणार असतात त्यांचे नांवाच्या अक्षरांची किंमत ठराविक पध्दतीप्रमाणें काढून त्यानंतर रा. शहा यांच्या लेखांत ग्रहांचे जे नंबर व प्रतिनंबर दिले आहेत तेच घेऊन त्यांचा उपयोग करितात. म्हणजे रेस सुटण्याचे वेळीं रवीचा होरा चालू असतां १, ४ किंवा ८ हा ज्यांचे नांवाची संख्या असते असे घोडे पहिल्या तीन नंबरांमध्यें येतात. ही पध्दति इतकी फायदेशीर होत असेल असें वाटत नाहीं. कारण एकतर प्रत्येक अक्षराची किंमत कोणती घेणें यासंबंधानें खालीलप्रमाणें चार पांच प्रकार सांगितलेले ग्रंथांत मिळतात. (१) इंग्रजी अक्षरांची किंमत घेणें (२) उच्चार ज्याप्रमाणें होईल त्याप्रमाणें किंमत घेणें Phoenetic value (३) हिब्रू अक्षरांची किंमत घेणें (४) अरबी मुळाक्षराची किंमत घेणें. किंवा (५) पिथ्यागोरस पध्दतीप्रमाणें किंमत घेणें याशिवाय मिस्टर टालरबान्ड यांचा राशींचे अंक आहेत त्याप्रमाणें किंमत घेण्याची एक विस्तृत पध्दति आहे. याप्रमाणें घोडयाच्या नांवाच्या किंमती काढण्याच्या अनेक पध्दति झाल्यामुळें व त्यांतून तीन चार घोड्यांपेक्षां अधिक घोडे निघत असल्यामुळें या पध्दतीनें धनोत्पादन कोणी करूं म्हणेल तर आज प्रसिध्द असलेल्या ज्ञानाचे साह्यानें साधणें शक्य दिसत नाहीं. किंवा या पध्दतीसंबंधानें अजून निश्चित असें ठाम मत झालेलें नाहीं. एकंदर या **अक्षरपद्धतीचा** विचार केला असतां धांवणारे घोडे सात ग्रहांपैकीं कोण कोणत्या ग्रहांचे अंमलाखालीं आहेत हें ठरवून रेसच्या टाईमला जो ग्रह होराधिपति असेल त्याचे घोडे किंवा होराधिपति जो ग्रह असेल त्याच्या स्वग्रहासमोरच्या राशीच्या अधिपतीचे घोडे पहिल्या तीन

नंबरांमध्यें आलेले पाहण्यास मिळतात. रेसमध्यें असणाऱ्या घोड्यांची संख्या ज्या मानानें जास्त असेल त्या मानानें वरप्रमाणें दर्शित होणाऱ्या घोड्यांची संख्या वाढते. कारण ग्रह सातच असून घोड्यांची संख्या मोठी असल्याकारणानें प्रत्येक ग्रहाचे दोन दोन घोडे दर्शविले जाण्यानें देखील निवड करण्याचे घोड्यांची संख्या वाढते, व पुन्हां त्यांत अक्षरांची किंमतीबद्दल एकच पध्दति नसल्यामुळें ह्या पध्दतीनें शेंकडा १० टक्के रिझल्ट मिळेल किंवा नाहीं याबद्दल शंकाच उत्पन्न होते.

आर्य वाङ्मयामध्यें ग्रहांचे अंक कोठेंच दिलेले आढळत नाहींत. परंतु पाश्चिमात्य वाङ्मयांत जॉन हायडन यानें खालीलप्रमाणें ग्रहांचे व राशींचे अंक दिलेले आहेत.--

शनि=८; गुरु=३; =मंगळ९; रवि= १ व ४;
शुक्र=६; बुध=५; चंद्र=२ व ७.

कित्येक ज्योतिर्विद अलिकडे हर्शल=४ व नेपच्युन =७ असे अंक घेतात.

राशींकरितां कांहीं ज्योतिर्विद राश्यधिपतीचे अंक घेतात म्हणजे मेष=९, वृषभ=६, मिथुन=५, कर्क२ किंवा७, सिंह=१ व ४ राशी इत्यादि.

परंतु जॉन हायडननें जे राशींचे अंक दिलेले आहेत ते याहून भिन्न असून ते पुष्कळ ठिकाणीं अनुभवास मिळतात. ते अंक खालील प्रमाणें आहेत. वाचकांनीं त्यांचा अनुभव घ्यावा.

मेष=७: वृषभ=६; मिथुन=१२; कर्क=५
सिंह=१; कन्या=; १० तूळ=८; वृश्चिक=९
धनु=४; मकर=३; कुंभ=२; मीन=११

रवीचा अंक १ केव्हां घ्यावा व ४ केव्हां घ्यावा त्याचप्रमाणें चंद्राचा अंक ७ केव्हां घ्यावा व २ केव्हां घ्यावा या संबंधानें कोठेंच जॉन हायडन किंवा गाडफ्रे यानें उल्लेख केलेला नाहीं. परंतु अनुभवाच्या साह्यानें म्हणावयाचें असतां १ व ७ हें अंक पुरुष धर्माचे किंवा धन प्रवृत्तीचे

आहेत. २ व ४ हें स्त्री धर्माचे किंवा ऋण प्रवृत्तीचे आहेत. रवि पुरुषधर्माचे राशीमध्यें असतां १ अंक दर्शवितो व स्त्रीराशीमध्यें असतां ४ अंक दर्शवितो; त्याचप्रमाणें चंद्राचें आहे. चंद्र स्त्रीराशीमध्यें असतां २ अंक दर्शवितो व पुरुष राशीमध्यें असतां ७ अंक दर्शवितो.

आर्य वाङ्मयामध्यें ग्रहांचे किंवा राशींचें अंक नाहींत असें पूर्वींच सांगितलें आहे. परंतु कित्येक ज्योतिर्विद् राशि संख्येइतकेच प्रत्येक राशीचे अंक मानतात व त्यांवरून त्या राशीचे स्वामीला ते ते अंक देतात जसें मेषेचा अंक १ व मंगळाचे अंक १ व ८ हो त्यांचा अंक मानण्याचा पध्दति बरोबर आहे किंवा नाहीं यासंबंधानें अनुभवाचे अभावामुळें कांहींच सांगतां येत नाहीं.

होऱ्यांचा व अक्षरांचा संबंध न घेतां रेसकालीं चालू असलेल्या होराधिपतीच्या अंकानें दर्शित होणारे नंबराचें घोडे पहिल्या तीन नंबरामध्यें येतात हें आम्हांला सन १९१५।१६ मध्येंच पाहण्यास मिळालें. व विशेषत: **टर्मस** रेसिसमध्यें किंवा जेव्हां एकाच वजनाचे घोडे **वजन** पध्दतीनें दर्शविले जातात त्या वेळीं निवड करण्याचे कामीं याच होराधिपतीच्या अंकांचा उपयोग चांगला होतो. होरापध्दतीच्या अंकांचा उपयोग घोड्यांच्या अनुक्रम नंबरांमध्यें करावा अशा तऱ्हेची कल्पना पाश्चिमात्य वाङ्मयांत कोठेंच आलेली पाहण्यास मिळाली नाहीं.

रंगपद्धति.—रेसच्या दिवशीं प्रसिध्द होणाऱ्या रेसबुकामध्यें घोड्यावर बसणाऱ्या जॉकीचे कपडे, टोपी वगैरेंचे रंग दिलेले असतात. घोडेही कोणत्या रंगांचे, काय वयाचे, म्हणजे तरुण किंवा म्हातारे, घोडा किंवा घोडी, त्यांना कोणी शिकविलें, व त्यांचे कोण मालक आहेत या सर्वांची माहिती दिलेली असते. स्वत: घोड्यांचे रंग पाहूं गेलें असतां

३।४ च दिसतात, किंबहुना एकाच रंगाचे घोडे अनेक आढळतात. याचमुळें रेसकाळची कुंडली मांडून किंवा त्या वेळेचा होरा पाहून किंवा इतर कोणत्याही साधनानें घोडयांचेच रंगावरून पहिल्या तीन नंबरांमध्यें येणाऱ्या घोडयाचें निदान अचूक करितां येईल असें कोणा ज्योतिर्विदांचें मत असेल तर अनुभवाच्या दृष्टानें तें आम्हांस मान्य होत नाहीं. याचे उलट घोडयावर बसणाऱ्या जॉकीचे कपडयाचे, टोप्यांचे रंग फारच चित्रविचित्र व निरनिराळें पाहण्यास मिळतात व त्याचेच साह्यानें बरेंच चांगलें निदान करितां येतें असा आमचा स्वानुभव आहे.

रेसिस ह्या घोडयांच्या होत असतात व पैसेही त्यांचेच नंबरांचे तिकीटावर मिळत असतात ही गोष्ट जरी अक्षरशः खरी आहे तरी घोडे हे स्वैरगतीनें लागेल तसे धांवत नाहींत त्यांचेवर जॉकी असतो व तोही घोडा पहिला आणण्याकरितां व कित्येक वेळेला पहिल्या तीन नंबरांमध्यें न आणण्याचा प्रयत्न करीत असतो. घोडा व जॉकी मिळून एक व्यक्ति मानली असतां जॉकीचे कपडयाचे टोपीचे वगैरे रंग घेण्यास मुळींच हरकत नाहीं असें आमचें मत आहे. जसा अमुक घोडा पहिला आला, तसाच अमुक जॉकीनें अमुक घोडा पहिला आणला असा त्याला तात्पुरता थोडा काळ मान मिळतो. रेसिसमध्यें घोडयाइतकेंच जॉकीचें महत्व आहे. विशिष्ट घोडयांच्या पहिल्या येण्यानें ज्याप्रमाणें त्याला मान मिळतो त्याचप्रमाणें जॉकी व मालक यांनाही मान मिळतो. म्हणून विचाराअंतीं रेसमध्यें घोडा, जॉकी, व मालक हे तीन्ही अनुक्रमाप्रमाणें महत्वाचे आहेत. म्हणजे या तिघांना अनुकूल ग्रहस्थिति असतां तोच घोडा पहिला येईल हें म्हणणें विशेष धारिष्टाचें आहे असें वाटत नाहीं.

घोडयांचे रंगावरून तो कोणत्या ग्रहांचें अंमलाखालीं आहे, हें ठरविण्याचें काम चेहरा मांडून कुंडली मांडण्याइतकेंच खास अवघड आहे. व म्हणूनच पाश्चिमात्य ज्योतिर्विदांनीं घोडयांच्या नांवावरून तो कोणत्या ग्रहांचे अंमलाखालीं आहे हें ठरविण्याचा प्रयत्न **अक्षरपद्धती**मध्यें केला आहे त्याचा उपयोग होतो किंवा नाहीं हें अनुभवाचे अभावामुळें येथें सांगतां येत नाहीं. यासंबंधानें जें कांहीं आम्हांस विचार सुचले आहेत ते आम्हीं कुंडलीवरून घोडयांचे **नामनिर्णय पद्धती**मध्यें मांडणार आहों. आचार्य वराहमिहिरानें आपल्या बृहत्जातकमध्यें वियोनिजन्म अध्यायामध्यें चतुष्पाद प्राण्यांचा रंग, त्यांचे अंगावरील पट्टे वगैरे संबंधीं सांगितलें आहे त्याचा कांहीं उपयोग होईल किंवा काय हें अनुभव घेऊन ठरविलें पाहिजे.

अनुभवजन्य दृष्टानेंच या पध्दतीविषयीं बोलणें झाल्यास जॉकीनें धारण केलेला पोषाख हा **रंग निर्णयपद्धती** मध्यें अत्यंत महत्वाचा आहे. प्रत्येक मालकाचे ठरलेले निरनिराळे रंगाचेच पोषाख जॉकी रेसच्या वेळला धारण करीत असतात. जॉकीचे कपडे, त्यांचे रंग व घोडयांचे रंग यांचा तुलनात्मक विचार प्रत्यक्ष रेसकोर्सवर जाऊन पाहिल्याखेरीज चांगलासा खास करितां येणार नाहीं. व त्याखेरीज आम्ही म्हणतों त्या विधानाची सत्यताही पटणार नाहीं. कांहीं असो, घोडयावर बसणाऱ्या जॉकीच्या कपडयांच्या रंगावरून आपणांस पहिल्या तीन नंबरांमध्यें कोणत्या रंगाचा कपडा धारण करणारा जॉकी आपला घोडा आणणार आहे याचा रेसच्या वेळेच्या कुंडलीवरून विचार करणें आहे तर तो कसा करावा याचा विचार करूं. या विषयाच्या प्रथमतः अंगभूत लागणाऱ्या मूलतत्त्वाचें विवेचन सॅफरोअल यानें आपल्या "सिल्व्हर को" मध्यें केलें आहे व त्याच

विषयाचें विस्तृत विवेचन एरिअल यांनीं आपल्या गोल्डन कोमध्यें दिलें आहे. तींच तत्त्वें आम्हीं वाचकांपुढें ठेवीत आहों.

मेष राशि व **लग्न** यांचा अंमल सर्व ज्योतिष ग्रंथांमध्यें शिरावर असल्याचें सांगितलें आहे. व त्याचमुळें जॉकीचें शिरोभूषण ऊर्फ टोपी जी कधींकधीं चित्रविचित्र असते तिचा विचार रेसकाळच्या लग्नीं उदय पावणाऱ्या राशि किंवा लग्नांत उदय पावणाऱ्या ग्रहांच्या धर्मावरून होतो. म्हणजे **जॉकीनें धारण केलेल्याटोपीचा रंग वगैरे रेस होण्याच्या काळीं पूर्वक्षितिजावर उदय पावणाऱ्या राशीवरून व त्या राशीमध्यें उदय पावणाऱ्या ग्रहांवरून करितात. जॉकीनें धारण केलेल्या पोषाखाचा विचार त्यापासून १२० अंश किंवा पंचमस्थानांत असलेल्या राशि व त्या राशीमध्यें असलेल्या ग्रहांवरून करितात. मेष** राशिहें कालपुरुषाचें शिर दर्शविते तर **सिंह** राशि काल पुरुषाचीं पाठ दर्शविते व म्हणूनच अंगावर किंवा **जॉकीचे पाठीवर असणाऱ्या कपड्यांच्या रंगाचा बोध रेसकाळच्या कुंडलीच्या पंचमामध्यें असणाऱ्या राशि किंवा त्या राशीमध्यें असणाऱ्या ग्रहांवरून होतो.** म्हणजे **रंग निर्णय** करते वेळीं **लग्न, पंचम** व **दशमस्थानाचा** मुख्यत्वानें विचार करणें जरूर आहे. पंचमस्थानावरून सट्टे, जुगार, यांचा विचार होतो म्हणून ते अवश्य विचारांमध्यें घेतले पाहिजेत. दशमस्थान हें मान, सन्मान, कीर्ति यांचें द्योतक असून माध्यान्हीं असणारा ग्रह अत्यंत प्रबल असतो व त्यामुळें तो आपल्या अंगचा प्रभाव दर्शवितो. रस ज्या वेळेला सुटते त्या वेळेच्या कुंडलांमध्यें जे जे ग्रह विशेष बलवान असतात त्यांचे रंग आलेले पाहण्यास मिळतात. रेसच्या दिवशींचा **चंद्र**

कोणत्या राशीमध्यें आहे तो कोणाबरोबर दृष्टियोग करीत आहे, चंद्र राशीचा अधिपति केन्द्रांत, पंचमांत, लग्नांत, नवमांत आहे किंवा काय याचा विचार अवश्य केला पाहिजे. कारण बहुशा चंद्र हा ज्या राशीमध्यें असतो त्या राशीचा रंग तो दर्शवितो, त्याचप्रमाणें त्याचे ज्या ग्रहाबरोबर बलवान दृष्टियोग होत असतात त्यांचे रंग तो दर्शवितो.

खालीलप्रमाणें ग्रहांचे व राशींचे रंग पाश्चिमात्य ज्योतिर्वाङ्मयामध्यें सांगितले असून ते अनुभवास येतात.

रवि---नारिंगी किंवा सोनेरी. हा ग्रह सिंह राशीचा अधिपति असून मेषेमध्यें उच्च असतो. व हा नेहमी पुरुषवर्गाचा द्योतक असल्यामुळें दर्शविणारा घोडा पुरुष लिंगाचा दर्शवितो. त्याचप्रमाणें हा अधिकारी, राजे इत्यादि वर्गाचा द्योतक असल्यामुळें पुष्कळ वेळां घोड्याचे नांवामध्यें तद्बोधक शब्द आढळतो जसें 'रायल बॅन्ड,' 'रायल ड्यूक,' 'गोल्ड किंग,' 'ओरमुझ' इत्यादि.

चंद्र.—पांढरा, रुपेरी, समुद्रासारखा हिरवट, हिरवा, गवतासारखा किंचित पिंवळा; चंद्र हा जल राशीमध्यें असतां व विशेषतः कर्क व मीन राशीमध्यें हिरवा रंग दर्शवितो; चंद्र हा ज्या राशीमध्यें असतो त्या राशीचा रंग पुष्कळ वेळां धारण करितो. हा स्त्रीवर्गाचा, राणीवर्ग वगैरेचा द्योतक असून कर्क राशि त्याची स्वगृह राशि असून वृषभेमध्यें तो आपल्या उच्च राशीमध्यें असतो. हा ग्रह स्त्रीवर्गाचा द्योतक असल्यामुळें तो पहिल्या तीन नंबरांमध्यें 'घोडी' आणतो. व पुष्कळ वेळां "सिल्व्हर क्वीन" "मून;" "सिल्व्हरबाम" "लेडी लो" अशा तऱ्हेचीं नांवें असलेल्या घोड्या दर्शवितो. चंद्रामुळें जॉकीचा कपडा पांढरा असून त्यावर हिरवे मोठाले ठिपके किंवा

चंद्र काढलेले पाहण्यास मिळतात. जॉकीची टोपी पांढरी असते व अंगावरील रंग फिकट पिवळा असून त्यावर एक हिरव्या रंगाचा जानव्या सारखा तिरकस पट्टा असतो. कांहीं वेळेला कपडा पिंगट Brown रंगाचा असून बाह्यांचा रंग पांढरा असतो.

मंगळ.—लाल; तांबडा रक्तासारखा रंग; किरमीजी रंग दर्शवितो. मेष व वृश्चिक राशि मंगलाच्या स्वगृह राशि आहेत व तो मकर राशीमध्यें उच्च असतो. हा ग्रह सेनापति, लढवय्ये, युध्दप्रिय लोक यांचा द्योतक ज्योतिर्वाङ्मयामध्यें सांगितला असल्यानें हा ग्रह येणारा घोडा पुरुषलिंगी व ज्याचें नांव त्याचे स्वभावधर्माप्रमाणें आहे असा दर्शवितो. "नाईट" "रुबी;" "हन्टस्मन" कमेंन्डर" "बेयॉनेट" "बॅटलएक्स" "रेज" इत्यादि. मंगळानें दर्शविलेले घोडे चांगल्या दमाचे व तारुण्यानें मुसमुसलेले असतात.

बुध—हा ग्रह जात्याच तृतीय प्रतीचा असल्यामुळें याचा निश्चित अमुक एकच रंग असेल असें सांगवत नाहीं. चंद्राप्रमाणें हा ग्रह ज्या राशीमध्यें असतो व तो ज्या इतर ग्रहाबरोबर बलवान दृष्टियोग करीत असतो त्यांचे रंग धारण करितो. बुधानें दर्शविले जाणारे घोडे 'कुमार' अवस्थेमधील घ्यावे. हा अमुक एक पुल्लिंगी किंवा स्त्रीलिंगी घोडा दर्शवाल असें सांगवत नाहीं. तसेंच या ग्रहामुळें कोणत्या तऱ्हेचीं नांवें पाहण्यास मिळतील यासंबंधानें अद्याप निश्चित असें मत करितां आलें नाहीं. हा ग्रह कन्या व मिथुन राशीचा स्वामी असून कन्येमध्यें उच्च असतो. बुधामुळें मिश्र रंग पाहण्यास मिळतात. बुध किंवा हर्शलनें दर्शविले जाणारे घोडे सिडसिडीत बांध्याचे व अति चपळ व चंचळ वृत्तीचे आढळतात. बुधानें त्यास तांबड्या पांढऱ्याचें मिश्रण

असलेला रंग किंवा फिकट शेंदरी, फिकट जांभळा असे रंग घेण्यास सांगितलें आहे. परंतु यावर किती भरंवसा ठेवावा यासंबंधानें निश्चित असें कांहींच सांगतां येत नाहीं. पुरुष राशीमध्यें तो घोडा दर्शवील तर स्त्री राशीमध्यें घोडी दर्शवील.

गुरु—गुरूनें दर्शविले जाणारे जॉकी व घोडे मध्यम वयाचे व साधारणपणानें स्थूल देहाचे आढळतात. गुरूच्या अंगीं स्थूलता व भव्यपणा हे गुण विशेष पाहण्यास मिळतात म्हणून तद्योतक नांवें असलेले घोडे तो दर्शवितो. जसें "जस्टिस" "साउथ स्टार" "मिनिस्टर" "कानफिडन्स" "बँकर" "नॅशनल" ह्या ग्रहाच्या धनु व मीन या स्वगृह राशि आहेत व कर्क ही त्यांचा उच्च राशी आहे. गुरु हा जांभळा (Violet,) पाटल, नील, लोहित--Pale, Blue, Full Blue, Purple रंग दर्शावितो.

धनुराशि व घोडे यांचा निकट संबंध खास आहे व त्यामुळें रेसिसचा विचार करतांना धनुराशि व गुरु यांचा अवश्य विचार केला पाहिजे असें आम्हांस वारंवार वाटतें परंतु हा संबंध कसा काय जोडावा यासंबंधानें अद्यून कांहींच निश्चित मत झालें नाहीं. जॉकीचा धंदा व धनुराशि हिचा खास कांहीं संबंध आहे.

शुक्र—हा दिसण्यांत सुंदर मोहक व स्त्रीवर्गाचा कारक ग्रह आहे. यामुळें या ग्रहानें दर्शविले जाणारे घोडे स्त्रीलिंगी असतात; सुन्दरपणा, नाजुकपणा व मोहकता हे जॉकी, यां मध्यें पहाण्यास मिळतात. घोडे व जॉकीचे कपड्याचा रंग भडक कधींच नसतो. त्यांत एक प्रकारचें मार्दव असून कपडयांचे रंगांचे मिश्रण फारच मोहक झालेलें असतें. वृषभ व तुला या त्याच्या स्वगृह राशि असून मीन हो त्याची उच्च राशि आहे. या ग्रहानें फिकट निळा रंग,

नीलकमलासारखा रंग, श्यामल, अस्मानी, मेघवर्ण, पिरोजी रंगाचा बोध होतो. या ग्रहानें दर्शविलीं जाणारीं घोडयांचीं नांवे 'एमिटी', 'मेडन पाम' इत्यादि सारखीं असतात.

शनि.—सर्व ग्रहांमध्यें हा ग्रह गतीनें मंद असून सर्व जड वस्तूंचा व काळ्या पदार्थांचा द्योतक मानतात; व या ग्रहानें वृध्दावस्थेचा बोध होतो व त्यामुळें या ग्रहानें दर्शविले जाणारे जॉकी व घोडे अनेक रेसींसमध्यें धावून वृध्द झालेले असतात. व त्यांचे कपाळीं नेहमी जास्तच वजन चिकटलेलें असतें. या ग्रहानें काळा; गर्द नीलवर्ण दर्शविला जातो. तांबडा रंग जेव्हां अत्यंत तांबडा होऊन काळसरपणावर येऊं लागतो त्या वेळीं तो शनीचे अंमलाखालीं येतो. **मकर** व **कुंभ** या याच्या स्वगृह राशि असून **तुला** ही त्याची उच्च राशि आहे. या ग्रहानें "ब्लॅकगिनी" "ब्लॅक फ्रेअर" "डिसकारडेड" "रेकारड टाईम" अशा तऱ्हेच्या नांवांचा बोध होतो.

हर्शल.— विद्युल्लतेप्रमाणें चंचलता जर कोणत्या ग्रहामध्यें असेल तर ती हर्शलमध्यें खास आहे. रेसच्या प्रसंगीं सर्वांना चकवून जें तिसरेंच, ज्याच्याबद्दल कधींच कोणाला कल्पना झालेली नसते असे जे घोडे येतात ते याच ग्रहामुळें असा आमचा खास समज आहे. व त्याचमुळें रेसेसच्या प्रसंगीं हर्शल या ग्रहाकडे अत्यंत लक्ष दिलें पाहिजे कारण असें जे नवीन भलतेच घोडे येतात तेच फाळणी जबरदस्त देतात. हा ग्रह अत्यंत लहरी व विचित्र स्वभावाचा मानला गेला असून जॉकीच्या कपड्यामध्यें व घोड्यांच्या नांवांमध्यें सर्वच विचित्रता पाहण्यास मिळते. जसें " वाईल्ड बाय " " लायटनिंग फ्ल्यास " " इलेकट्रीक शॉट " " टारपेडो ", 'ऍटम'

'बोल्ट अवे' हा ग्रह नेहमी **हलकें** वजन दर्शवितो. हर्शल हा ग्रह चित्रविचित्र रंग हर्शवितो. काळे पांढरे, काळे तांबडे, पट्टे असलेले जॉकीचे कपडे नेहमी दर्शवितो. मुख्यतः या ग्रहानें जॉकीचे कपड्यावर निरनिराळ्या रंगांचे पट्टे दर्शविले जातात. व या पट्टयांची कल्पना म्हणजे पट्टे कोणत्या रंगांचे असतील यासंबंधानें विचार हर्शल हा ज्या ग्रहानें युक्त किंवा दृष्ट असेल त्याच्या रंगाप्रमाणें घ्यावें असें आमचें मत आहे. उदाहरणार्थ हर्शल जेव्हां शनीबरोबर संबंधित असेल तेव्हां काळ्या रंगाच्या पट्टयाचें प्राबल्य पाहण्यास मिळेल, मंगळाबरोबर संबंधित असतां तांबडया रंगाचे पट्टे तर गुरूबरोबर संबंधित असतां जांभळ्या रंगाचे पट्टे आढळतात. रवीनें संबंधित असतां सोनेरी रंगाचे पट्टे पाहण्यास मिळतील तर शुक्राबरोबर संबंधित असेल तर निळ्या रंगांचे पट्टे पाहण्यास मिळतील. चंद्रामुळें हिरव्या रंगाच पट्टे येतील व ते फिकट असे असतील. परंतु बुध व हर्शलचा संबंध होत असतां पट्टयामध्यें फारच विचित्रता पाहण्यास मिळेल, एक तांबडा तर दुसरा निळा याप्रमाणें जाणावें.

नेपच्युन.—हा साधारणपणें शुक्राचेच रंग दर्शवितो. नेपच्युनमध्यें घोटाळे किंवा भ्रम उत्पन्न करण्याची शक्ति फार तीव्रपणानें जागृत असलेली पाहण्यास मिळते. हा आंजिरी, मर्जित जांभळा किंवा निळा रंग दर्शवितो. या ग्रहानें दर्शविले जाणारे रंगांचे मिश्रण फारच मोहक झालेलें असतें. हर्शलमध्यें अत्यंत उग्रता तर नेपच्युनमुळें अत्यंत सौंदर्य किंवा लावण्य दर्शविलें जातें. मोहनी ही तर एक प्रकारची नेपच्युनची विशिष्टता आहे. या ग्रहानें घोडया दर्शविल्या जाऊन त्या फारच सुंदर व देखण्या असतात. नांवामध्यें सुधा, माधुर्यता व मोहकता असते. जसें " ब्लु लो, " " डॅन्डेलिआन. "

खालीलप्रमाणें द्वादश राशींच निरनिराळे रंग ज्योतिषशास्त्रामध्यें सांगितले आहेत.

मेष:--रक्तवर्ण; **वृषभ**.--लिंबाच्या वर्णासारखा किंवा फिकट नीलवर्ण; **मिथुन** पीत; किंवा पिंवळ्या रंगामध्यें लालरंगाची झांक असल्यासारखा; **कर्क**.--हिरवा; समुद्रासारखा हिरवट; **सिंह**.--नारिंगी; सुवर्णासारखा; **कन्या**.--काळसर, निळसर रंगाचे ठिबके किंवा निळसर रंगानें चित्रित. **तुला**.--किरमिजी; **वृश्चिक**.--लालभडक, बदामी, तपकिरी बभ्रु, उदी; **धनु**.--पिंवळसर; **मकर**.--काळसर; राखेसारखा करडा; **कुंभ**.--आकाशासारखा नीळसर; **मीन**---एंढरा माशासारखा चकचकणारा.

वर दर्शविलेले राशींचे रंग हे मूळ रंग आहेत परंतु ज्या वेळीं एखाद्या राशीमध्यें ग्रह असतो त्या वेळीं त्या ग्रहाच्या रंगानुरोधानें मूळ राशीच्या रंगामध्यें फरक होतो. राशीचा रंग व ग्रहाचा रंग एकच असल्यास तो रंग जास्त प्रज्वलित किंवा ठळकपणानें पाहण्यास मिळतो. उदाहरणार्थः मेषेचा रंग तांबडा आहे व याच राशीमध्यें रक्तवर्णाचा द्योतक मंगळ असतां तांबडा भडक रंग दर्शविला जाईल.

जरी **लग्न, पचम** यांमध्यें जी **राशि** किंवा जो **ग्रह** असेल त्या अनुरोधानें टोपीचा किंवा जॉकीच्या पोषाखाच्या रंगाचा विचार करण्यास सांगितलें आहे तरी कित्येक प्रसंगी असें आढळण्यांत आलें आहे कीं कुंडलीमध्यें एखादाच ग्रह लग्नाचे **उदित** अंशावरोबर असतो तर कित्येक प्रसंगीं तो **सप्तमांत** किंवा **माध्यान्हीं** असतो, अशा प्रसंगीं उदय पावणारा किंवा माध्यान्हीं असणारा ग्रह आपले उच्च अथवा स्वगृह राशीमध्यें असला, तर इतर ग्रहानें दर्शविले जाणारे रंग न येतां त्या त्या ग्रहाच्या बलवान स्थितीप्रमाणें जिंकणाऱ्या घोडयाच्या जॉकीच्या कपडयाचा रंग पाहण्यास मिळतो.

रस कालच्या कुंडलीवरून जॉकीच्या कपडयाच्या रंगाचा निर्णय करणें हें काम फारच कुशलतेनें केलें पाहिजे व हें निदान कसें करावें या संबंधानें एरिअलतें आपल्या गोल्डन कीमध्यें जे नियम दिलेले आहेत ते येथें वाचकांच्या उपयोगाकरितां देत आहों.

(१) रेस कालची म्हणजे प्रत्येक रेस ज्या वेळेला सुटेल त्यावेळेची भावचलित कुंडली मांडून घ्यावी.

(२) या कुंडलीची खालील स्थानें फारच महत्वाचीं आहेत. **लग्न, दशम** किंवा **माध्यान्ह अस्त केन्द्र** किंवा **सप्तमस्थान, पंचमाचा भावारंभ** व **पंचमाचा शेवट** किंवा **षष्ठस्थानाचा** भावारंभ.

या पांच महत्वाचे स्थानांचे अधिपति कोण ग्रह आहेत तें पाहावें.

(३) नंतर या पांच मुख्य स्थानांबरोबर कोण कोणते ग्रह दृष्टियोग करीत आहेत याची एक नोंद करावी. ग्रहांचें दृष्टियोग पाहाते वेळीं दीप्तांश फारच थोडे घ्यावे म्हणजे ३ किंवा ४-अंश दीप्तांश घ्यावे.

(४) चंद्र राशीचा अधिपति कोण आहे हें पाहावें म्हणजे रेस ज्या दिवशीं होणार आहे त्या दिवशीं चंद्र कोणत्या राशीमध्यें आहे त्या राशीचा स्वामी कोण ग्रह आहे त्याचे कोणते रंग आहेत व तोच रंग इतर वरील स्थानाबरोबर ग्रहांच्या दृष्टियोगानें दर्शविला जात आहे किंवा काय या सर्व गोष्टींचा विचार करावा.

(५) विशेषतः पंचम स्थानामधून जो ग्रह जात असतो त्यावर विशेष लक्ष ठेवावें कारण विन येणाऱ्या घोड्याचे जॉकीचे कपडे त्याचे रंगाचे पाहण्यास मिळतात.

(६) रेसच्या कुंडलीमध्यें दृष्टीसंबंधानें विचारकरितां शुभ किंवा पाप दृष्टि यांचा विचार करण्याचें मुळींच कारण नाहीं. **फक्त बवलान दृष्टियोग आपलें कार्य घडवीत असतात. त्याचप्रमाणें होऊन गेलेल्या योगापेक्षा नुकताच घडत असलेला दृष्टियोग अत्यंत महत्वाचा आहे** असें आमचें ठाम मत झालें आहे. युति, प्रतियोग, क्रांतिसाम्य, केन्द्र, सार्धकेन्द्र योग; १३५ अंशाचा दृष्टियोग किंवा सार्धचतुष्टय राश्यंतर योग हे फार बलवान जाणावे त्यानंतर त्रिकोण दृष्टियोग व त्रिरेकादश योग जाणावा.

रेसच्या विचारामध्यें अत्यंत सूक्ष्म असे दुसरे दृष्टियोग जे जार्ज वाईल्ड नांवाच्या ज्योतिर्विदानें कल्पिलें आहेत तें घ्यावे व हे योग घेतले असतां एक दीतांश अंशांपेक्षां जास्त देऊं नये असें. आमच्या एका ज्योतिर्विद बंधूंचें मत आहे. परंतु अनुभवाच्या अभावामुळें त्यासंबंधानें आज निश्चित असें कांहींच सांगतां येत नाहीं.

(७) वरील पांच महत्वाच्या स्थानांबरोबर होत असलेल्या ग्रहांचे दृष्टियोग काढल्यानंतर त्यांतील ज्या ग्रहांचे दृष्टियोग फारच पूर्ण असतील त्यांचे रंगाप्रमाणें ते कोण कोणत्या घोड्यांच्या जॉकीला बरोबर मिळत आहेत हें पाहावें. अशाप्रमाणें रंगावरून घोड्याची निवड करावी.

ही निवडकरतेवेळीं **तिथि केन्द्र पद्धतीनें** येणाऱ्या घोड्यांची **वजनें** अवश्य लक्षांत घ्यावीं म्हणजे निवड करण्याचें काम फारच सोपें होतें.

उदाहणार्थ शनि लग्नाचे उदित अंशाबरोबर १ किंवा २ अंशांत असून उदय पावत आहे व चंद्र वरील पांचस्थानांपैकीं एका स्थानाबरोबर दृष्टियोग करीत आहे तर काळ्या रंगाची टोपी असून पांढऱ्या हिरव्या किंवा पिवळट रंगाचा अंगरखा असलेल्या जॉकीची निवड करितां येईल. किंवा काळ्या रंगाचा डगला असून त्याच्यावर हिरव्या रंगाचा आडवा पट्टा असून पांढऱ्या हाताच्या बाह्या ज्याच्या आहेत अशा जॉकीची निवड करितां येईल. व दृष्टियोग ज्या मानानें बलवान असेल त्या मानानें येणारा घोडा विन येईल किंवा प्लेस येईल.

आपलकडे प्रत्येक घोड्याचे मालकाचे जॉकीचे रंग एकच ठरलेले असतात व त्याचे ३।४ घोडे असल्यास ते एका खालीं एक असे कंसांत देण्याची चाल आहे. अशा वेळीं या रंगपध्दतीनें ४ घोडे एकाच रंगाचे जॉकीच कपडे असलेले येतात, येथें **तिथि केंद्र** पध्दतीनें वजनें घेऊन त्या वजनाजवळ ज्या घोड्याचें वजन असेल तोच निवडावा. रंग एक असले तरी प्रत्येक घोड्या पुढें असणारें वजन निरानिराळें असतें.

(८) लग्नावर उदय पावत असणारा ग्रह आपले रंग दर्शवीत असतां **हलके वजना** कडील असणाऱ्या घोड्याची निवड करावी.

(९) दशमांत असणारा ग्रह आपलें रंग दर्शवीत असतां अगदीं हलके व मोठे या वजनाची बेरीज करून त्याचें **मध्यम वजन** २ नें भागलें असतां निघेल त्या वजनाजवळ असणारा व जे रंग येत असतील तसे रंग ज्या जॉकीचे दिलेले असतील अशा घोड्याची निवड करावी.

(१०) कित्येक वेळां **तिथि केंद्र** पध्दतीनें व रंगाचे पध्दतीनें दोन घोडे सारखेच दर्शविले जातात. अशा वेळीं कोणत्या घोड्यावर पैसे लावावे असा प्रश्न साहजीकच उत्पन्न होतो अवेळीं त्या दोहों पैकीं ज्याच्यावर जनसमाजाचा पुष्कळ भरंवसा असतो अशा **फेव्हरीट**वर पैसे न लावतां जो दुसराच कोणाच्या लक्षांत न येणारा **ऑऊट-सायडर** असतो त्याचेवर पैसे लावावे कारण **आऊटसायडर** येण्याचा पुष्कळच संभव असतो व तो आला असतां १० चे १०० तर २०० हो मिळतात परंतु फेव्हरीट आला असतां १० चे २० मिळण्याची पंचाईत होते. असो, इतकी माहिती तुर्त रंग पध्दतीची पुरी आहे. जागेच्या अभावामुळें कांहीं उदाहरणें निरुपायामुळें सोडून दाखवितां येत नाहींत.

घोड्याच्या नांवावरून विन, प्लेस काढण्याची पद्धती.-- घोड्यांच्या ठेविलेल्या नांवाचा शर्यतीच्या वेळेच्या कुंडलीवरून कांहीं बोध होतो किंवा काय, किंवा रेसच्या वेळेच्या कुंडलीमध्यें असणारा बलवान ग्रह घोड्यांचे जॉकीचें नांव दर्शवितो किंवा काय याचाच विचार चालू पध्दतीमध्यें करणें आहे. एखाद्या प्राण्यास किंवा व्यक्तीला जें नांव प्राप्त झालें त्याचा व त्याच्या आयुष्यामध्यें होणाऱ्या एकंदर घडामोडीचा विशेष संबंध आहे असें Kabalistic Astrology **अंकज्योतिष** किंवा **स्वरज्योतिष** यामध्यें पुष्कळच उहापोह केलला असून तें एक स्वतंत्र शास्त्रच आहे. येथें त्यासंबंधानें विवेचन करण्याचें योजिलेलें नाहीं. अशा-प्रकारचे **स्वरज्योतिष** किंवा **सांख्यज्योतिषशास्त्र** आपल्यामध्यें खास असलं पाहिजे असें कांहीं कांहीं उपलब्ध पुस्तकांवरून दिसतें; परंतु यासंबंधाने अद्यापि पुष्कळच शोध झाले पाहिजेत. आर्यपध्दतीप्रमाणें विचार

करणारा **स्वरज्योतिर्विद** किंवा **सांख्यज्योतिर्विद** अद्याप पर्यंत आमच्या पाहण्यामध्यें आला नाहीं. पाश्चिमात्य पध्दतीनें विचार करणारें पुष्कळ भेटतात व याच पाश्चिमात्य स्वरशास्त्राचे पुस्तकामध्यें वरील कांहीं पध्दती आम्हांस हिंदुस्थानामध्यें एका सन्याशानें सांगितल्या वगैरे प्रकारचे उल्लेख आढळतात व त्यावरून पूर्वी हें शास्त्र आपणामध्यें खास असलें पाहिजे. वेदांतांत येणारीं सांख्य प्रमेये किंवा सांख्य तत्त्वज्ञान हें प्रथ-मच्या **स्वरशास्त्रावरून** किंवा **सांख्यशास्त्रावरून** झालेलें तर नसे-लना ! कारण असेंच हिब्रुकबालामध्यें झालेलें आहे. युरोपखंडामध्यें कबाला किंवा सांख्यशास्त्र प्रथम हिब्रूवरूनच गेलेलें आहे. फ्रेंचमध्यें या विषयावर अनेक उत्तमोत्तम ग्रंथ आहेत व या पध्दतीनें विचार करणारे अनेक उत्तम ज्योतिर्विद होऊन गेले. अरबीभाषेमध्यें असेंच **जफर** नांवाचें फारच उत्तम शास्त्र असल्याचें कळतें व त्याचा थोडा थोडा उल्लेख कांहीं इंग्रजी ग्रथां-मध्यें मिळतो. आमच्यामधील कांहीं ज्योतिर्विद या विषयाकडे लक्ष देऊन परकीय भाषेमधील माहिती मराठीमध्यें आणण्याचा प्रयत्न करतील तर त्या पासून महाराष्ट्र वाङमयामध्यें खात्रीनें भर पडेल.

प्रस्तुत आपल्याला या विभागामध्यें अमुक घोड्याचें किंवा व्यक्तीच्या नांवाच्या अक्षराच्या संख्येवरून अमुक एका ग्रहाच्या अंमलाखालीं तो घोडा किंवा ती व्यक्ति येते याप्रमाणें विचार करावयाचा नाहीं. त्यासंबंधानें स्वतंत्र विवरण इंग्रजी ग्रंथांमध्यें पाहण्यास मिळेल; व तें एक स्वतंत्र शास्त्र आहे. वाचकांनीं त्या करितां Kabalistic Astrology **अंकज्योतिष स्वरज्योतिष** किंवा **सांख्यज्योतिष**वरील इंग्रजी पुस्तकें पाहावींत. तूर्त आपणास

घोड्याचें किंवा एखाद्या व्यक्तीचें **नांव** म्हणजे त्यास ठेविलेले विशिष्ट नांव व त्यावरून बोध होणाऱ्या सद्गुण दुर्गुणाचा किंवा विशिष्ट भावांचा जो बोध होतो त्याचा विचार करणें आहे. उदाहरणार्थ **राम** या विशेष नामाचा उच्चार केला असतां त्याचे एक पत्नीव्रत, वचन पाळण्याची तत्परता, पितृभक्ति इत्यादि अनेक पुराणांतरगत सद्गुणांचा बोध होऊन हें विशेष नाम **सूर्याचें** द्योतक जे अनेक गुण सांगितले आहेत त्याचें दर्शक असल्याकारणानें हें नांव सूर्याच अंमलाखालचें आहे किंवा त्याचे कुंडलीमध्यें सूर्य बलवान आहे असें वाटणें साहजीक आहे. व त्याच न्यायानें एखाद्या वेळीं राम आणि गंगाधर यांची पळण्याची शर्यत लागली असून त्या वेळेच्या शर्यतीच्या कुंडलीमध्यें रवि बलवान असतां राम या माणसास त्या पळण्याचे शर्यतीमध्यें यश आलें पाहिजे असें जर एखाद्या ज्योतिर्विदानें भविष्य कलें व त्याप्रमाणें तें घडून आलें तर तें नैसर्गिक नियमाविरुध्द झालें आहे असें कोणासही म्हणतां येणार नाहीं. व याच दृष्टीनें घोडयांच्या शर्यतीमध्यें नांवाचा विचार करणें आहे.

मागील विभागामध्यें कांहीं कांहीं नांवे जीं निरनिराळ्या ग्रहांच्या अंमलाखालीं येतात असें आम्हांस वाटले तीं दिलीं आहेत व त्या धोरणानें घोडयांच्या नांवाचे नऊ ग्रहांच्या खालीं सहज वर्गीकरण करतां यईल. कित्येक वेळां दोन ग्रहांचे संयोगानें एक नांव बनतें. उदाहणार्थ.--रेडकिंग येथें रेड--लाल म्हणजे मंगळ व किंग--राजा म्हणजे रवि याप्रमाणें हें नांव मंगळ व रवि यांचे अंमलाखाली आहे. **सिल्हवर किंग** हे नांव रवि-चंद्राचेखालीं येईल तर **डार्क प्रिंस** हें नांव शनि रवि यांच खालीं येईल. वरील विवेचनावरून वाचकांच्या सहज ध्यानामध्यें येईल कीं विशेष

नांवाच्या अर्थावरून व त्या नांवानें दर्शविल्या जाणाऱ्या विशिष्ट सद्गुण-दुर्गुणादि गुणांवरून तीं नांवें कोणकोणत्या ग्रहांचे अंमलाखालीं आहेत हें प्रथमतः ठरवितां आलें पाहिजे व हें काम संवयीनें सहज करतां येण्या-सारखें आहे. **रेस कालच्या कुंडलीमध्यें जे ग्रह बली स्थानबली किंवा राशि बली असतात ते आपले नांवानें दर्शविणारे घोडे पहिल्या तीन नंबरांमध्यें आणतात व त्याचप्रमाणें ते आपआपले रंगही आणतात. ग्रह जे रंग दर्शवितात ते कित्येक वेळां नांवामध्येंही आढळतात.** जसें मंगळानें लाल रंग दर्शविला जातो तर घोडयाचे नांवामध्यें लाल ह्या अर्थाचा शब्द "रेड" हा शब्द येतो. चंद्रानें पांढरा "व्हाईट," "सिलव्हर" असे शब्द पाहण्यास मिळतात. शनीमुळें काळा "डार्क" "ओल्ड" असें शब्द येतात तर रवीनें भगवा नारिंगी रंग दर्शविला जातो तर "ब्राऊन" "गोल्ड" असे रंगदर्शक शब्द येतात.

कुंडलीमधील कोणकोणतीं स्थानें बलवान आहेत यासंबंधानें पाहतां ६ वें, ८ वें व १२ वें हीं क्रमानें कमी बलवान स्थानें आहेत. म्हणजे सर्वात कनिष्ठ ६ वें त्यानंतर ८ वें याप्रमाणें. ९,४,३,२,५,११,७, १, व १० हीं क्रमानें बलवान स्थानें आहेत. सर्वात दशम स्थान हें फार बलवान आहे. त्यानंतर लग्न, त्यानंतर सप्तम याप्रमाणें जाणावें. स्वराशीमध्यें किंवा स्वोच्चामध्यें असणारे ग्रह फारच बलवान असतात. बलवान ग्रह आपले रंग, आपलें नांव व आपले नंबर आणतात.

अवकहडा ह्या चक्राचा रेसिसमध्यें उपयोग होतो काय? आर्य ज्योतिष ग्रंथांमध्यें अवकहडा ह्या चक्रास बरेंच महत्व दिलेलें आहे, त्याचा रेसिसमध्यें कांहीं उपयोग होईल किंवा नाहीं हें प्रस्तुत विभागामध्यें पाहणें आहे. विचाराअंतीं हेअवकहडा चक्र फार महत्वाचें असून त्याचा उपयोग

व्हावा असें आम्हांस वाटतें. हें अवकहडा चक्र कांहीं विशिष्ट स्वरावर बसविलेलें आहे. त्यासंबंधांत जितकी अवश्य माहिती पाहिजे तेवढी आज उपलब्ध नाहीं. परंतु हेच आर्य पध्दतीचे स्वरोच्चार मिस्ट्रीज ऑफ दो सॉउन्ड ॲन्ड नंबर या पुस्तकाचे कर्ते मिस्टर एस. अहमद यांनीं उपयोगामध्यें आणले आहेत असें त्यांच्या दुसऱ्या एका पुस्तकावरून वाटतें. वरील गृहस्थांचें सदरहू पुस्तक मिळत नसून तें आम्हांस वाचावयास मिळालें नाहीं त्यामुळें त्यासंबंधानें कांहींच बोलतां येत नाहीं. अवकहडा चक्रावरून भारतीय पूर्वज आपआपल्या मुलामुलींचीं नांवें ठेवीत असत. जन्मकाळीं ज्या राशींमध्यें चंद्र असेल त्या राशीचीं जीं अक्षरें त्या अक्षरांपैकीं एखादें अक्षर घेऊन त्या अक्षरानें होणारें नांव ठेवीत असत. हा प्रचार हल्लीं सुधारक लोकांमधून नष्ट होत असून अनाडी खेडवळ लोकांमध्यें पूर्णपणें चालू आहे. प्रत्येक व्यक्तीच्या नांवास विशिष्ट महत्व आहे व नुसत्या नांवावरून त्या प्राण्याचा स्वभाव, भाग्य वगैरे अनेक गोष्टीं सांगतां येतात. अवकहडा चक्राचा रेसिसमध्यें उपयोग होईल किंवा नाहीं यासंबंधानें विचार करीत असतां कित्येक वेळां असें पाहण्यामध्यें आलें कीं रेसच्या टाईमचा चंद्र ज्या राशीमध्यें असतो तद्योतक राशींची जीं अक्षरें किंवा त्या राशीपासून सातव्या राशीचीं जीं अक्षरें त्या अक्षरानें ज्या घोडयांच्या नांवांचा आरंभ झाला असेल ते घोडे कधीं कधीं पहिल्या तीन नंबरांमध्यें आलेले पाहण्यास मिळाले आहेत. त्याचप्रमाणें त्याच नांवाचे जॉकी किंवा मालक यांचे घोडयांनीं ती रेस जिंकलेली असते परंतु हा प्रकार विशेष चांगला असून त्यावर सर्वस्वी अवलंबून राहतां येईल असें आज आम्हांस वाटत नाहीं. फक्त कांहीं अशीं घोडयांची निवड करीतांना या चक्राचा उपयोग होईल. फार फार झालें तर ह्या पध्दतीनें २० ते २५ टक्के अनुभव येईल.

खालीलप्रमाणें राशींचीं अक्षरें आर्य ग्रंथांमध्यें सांगितलीं आहेत.

मेष.---अ,ल,इ.	**तुला.**--र,त.
वृषभ.-ब,व,उ.	**वृश्चिक.**--न, य.
मिथून.--क,च,घ.	**धनु.**--फ,भ.
कर्क.--ड,ह.	**मकर.**--ख,ग.
सिंह.--म,ट.	**कुंभ.**--ग.स.
कन्या.--प.	**मीन.**--झ.

या अक्षरांचा कसा उपयोग करावा यासंबंधानें वर सांगितलेंच आहे परंतु स्पष्ट करण्याकरितां एक उदाहरण घेऊं.

तारीख १६ जानेवारी १९१५ या दिवशीं रेसीस झाल्या त्या काळीं चंद्र सायन कुंभ राशीमध्यें आहे. पूर्वी सांगितल्याप्रमाणें या दिवशीं कुंभराशीमध्यें चंद्र असल्यामुळें कुंभराशीनें दर्शित **ग, स** व सिंह राशीची **म, ट** ह्या अक्षरानें आरंभ होणाऱ्या नांवांचे घोडे पहिल्या, दुसऱ्या किंवा तिसऱ्या नंबरांमध्यें आले पाहिजेत. या दिवशीं एकंदर रेसीस सात झाल्या आहेत. त्यांपैकीं तिसऱ्या रेसमध्यें **मजबूर** हा पहिला आला आहे; चवथीमध्यें **मालस्टर** व **मसाल** हे दुसरे व तिसरे आले आहेत. पांचवीमध्यें **स्लायकोस** तिसरा, **लेडीम्युरेल** पहिली आली आहे. साहवीमध्यें **स्पॅरोहॉक** पहिला आला आहे. सातवीमध्यें **टेनेब्रुस** हा दुसरा आला आहे.

वरील दिवसाच्या सातही रेसीच्या निकालावरून पाहतां ही पध्दत पुष्कळ टक्के अनुभव देते असें म्हणतां येत नाहीं परंतु इतर पध्दतीनें घोडे काढले असतां त्यांमध्यें निवडानिवड करण्याचे कामामध्यें तिचा बराच उपयोग होईल असें वाटतें. ज्या दिवशीं चंद्र बलवान शुभदृष्ट

गुरूनें किंवा शुक्रानें युक्त असून रेसच्या कुंडलीमध्यें स्थानबली असतां तो ज्या राशीमध्यें असेल त्या राशीचे द्योतक अक्षराचे नांवाचा घोडा पहिल्या तीनमध्यें येणें विशेष संभवनीय आहे. व तो दिवस त्या राशाच्या अक्षरानें दर्शित होणाऱ्या मालकांस अनुकूल असतो व म्हणून त्यांचे घोडे विन किंवा प्लेस येणें शक्य असतें.

या अवकहडा चक्राप्रमाणें विशिष्ट रेसच्या दिवशीं कोणता घोडा, जॉकी व मालक यांस तो दिवस महिना शुभ किंवा अशुभ आहे हें ठरवितां येऊन त्यावरून घोडयांची निवड करितां येईल असें वाटतें. परंतु वेळेच्या अभावामुळें या पध्दतीचा आम्हांस अनुभव घेतां आला नाहीं; फक्त आम्हांस सुचलेलें विचार वाचकांपुढें मांडीत आहों. ज्या एखाद्या वाचकास या पध्दतीनें प्रयत्न करून पाहणें असेल त्यानें खालील नियमाप्रमाणें प्रयत्न करून पाहावा. त्याचे सर्वच श्रम फुकट जातील असें आम्हांस वाटत नाहीं कारण हा प्रकार जुन्या रूढ असलेल्या पध्दतीस धरून असून ज्योतिषशास्त्रांतील तत्वास धरून आहे.

प्रश्न विचारणाराचें नुसतें नांव विचारून त्यावरून ठरविलेल्या राशीस अमुक ग्रह अनिष्ट किंवा अमुक ग्रह चांगले आले आहेत, अमुक घातचंद्र, अमुक घातवार आहे वगैरे पाहतात; त्याचप्रमाणें येथें पाहावयाचें आहे. ज्या मालकास, जॉकीस किंवा घोडयास शुभ योग चालले असतील त्यांसच बक्षिस मिळणें शक्य आहे किंवा मिळालें पाहिजे असें कोणाही विचारी माणसास कबूल करावें लागेल.

प्रथमतः घोडे, जॉकी, व मालक यांची अवकहडा चक्राप्रमाणें राशि व नक्षत्रें व त्यांचे चरण ठरवून नंतर त्यांस गोचरीचे म्हणजे रेस ज्या दिवशीं सुटणार आहेत त्या दिवसाचे ग्रह कसें आहेत तें पाहावें.

त्या दिवसाचा चंद्र, नक्षत्र व तिथी घातचतुष्टयाप्रमाणें आहेत किंवा काय त्याचप्रमाणें रेस सुटणार त्या वेळेचें लग्न त्याच्या राशीपासून अशुभ स्थानाचे ६,८,१२,४,७ किंवा शुभस्थानाचे ३,२,१,९ किंवा १० या स्थानामधील राशीचें आहे किंवा काय हें पाहावें. शुभ योगाचें प्राबल्य जास्त असतां यशप्राप्ती जाणावी व अशुभ योगाचें बल जास्त असतां अपयश जाणावें.

धांवणारा घोडा, जॉकी, व मालक या तिघांनाही तो रेसचा दिवश शुभ असतां तो घोडा पहिला येईल; दोन गोष्टी अनुकूल असतां दुसरा किंवा तिसरा येईल याप्रमाणें निर्णय करावा.

अमुक राशीला अमुक ग्रह चांगला किंवा वाईट, त्याचप्रमाणें अमुक चंद्रास कोणता चंद्र वाईट हें जाणण्याकरितां प्रचारामध्यें असलेल्या पध्दतीचा उपयोग करावा. परंतु यापेक्षां सुक्ष्म जाणणें असतां नांवाच्या अक्षरावरून नक्षत्र चरण ठरवावें व त्यावरून स्थूलपणानें राशीचे अंश काढावेत व नंतर गोचर ग्रह अनुकूल अगर प्रतिकूल आहेत हें सहज जाणतां येईल. उदाहरणार्थ एखाद्याचे नक्षत्र मूळ येत असून पहिला चरण येत आहे व हल्ली गुरुही त्याच चरणांत असल्यामुळें त्या अक्षरानें दर्शविल्या जाणाऱ्या व्यक्तींचा चालू काळ फारच चांगला आहे. **संपत मित्र** वगैरे शुभ नक्षत्रामध्यें नाक्षत्र गोचरीप्रमाणें गोचर ग्रह बसत असले तर काल अनुकूल असून यश मिळालें पाहिजे परतु याचे उलट शुभ नक्षत्रामध्यें शनि, मंगळ आहेत किंवा **विपत्, नैधन** वगैरे नक्षत्रांमध्यें पापग्रह असून शुभ योग कमी आहेत अशा काळामध्यें अपयश आलें तर त्यांत नवल नाहीं. याप्रमाणें अवकहडा चक्राचा रेसच्या कामीं महत्वाचा उपयोग होईल असें वाटतें. अनुभवाच्या अभावामुळें जास्त लिहितां येत

नाहीं. ज्या कल्पना सुचल्या त्या वाचकांपुढें मांडल्या आहेत. त्याचा वाचक वर्ग उपयोग करून पाहतील व त्यांना सुचणारे निरनिराळें विचार ज्योतिर्मालेच्या द्वारें प्रगट करतील अशी आशा आहे.

तिथिकेंन्द्रपद्धति अथवा मिस्टर सफेरिअल यांची **सिल्व्हर** किल्ली ही पध्दति मुख्यतः रेसच्या कुंडलीमध्यें असणाऱ्या **रवि व चंद्र** यांचे स्थितिवर व त्या दोघांमध्यें असणाऱ्या अंतरावर (Elongation) बसविलेली आहे. या पध्दतिमध्यें घोडयांची जी निवड करावयाची असते ती घोडयांच्या नांवाच्या समोर जे त्यांना हॅन्डी क्यॉपींगमध्यें जें वजन मिळालेलें असतें त्यावरूनच करावयाची असल्याकारणानें या पध्दतीला पुष्कळजण वजतन पध्दति या नांवानें संबोधितात.

प्रत्येक कार्याला चंद्रबल पाहण्यास भारतीय आर्य पूर्वजांनी सांगितलेलें आहे व तेंच तत्त्व या पध्दतिमध्यें गोवविलेलें आहे. आपण पंचांग हातांमध्यें घेतलें असतां त्यामध्यें पंचांग श्रवणाचे जें फल वाचतो "**तिथेश्च श्रीकरं प्रोक्तं**" त्याचेच ही पध्दति मुर्तिमंत दृष्य आह. रविचंद्रामधील अंतरावरून रेसमध्यें अर्थिक लाभ कसा करून घ्यावा किंवा विन किंवा प्लेस यणारा घोडा कसा ओळखावा याचे या पध्दतिमध्यें विवेचन केलेलें असल्यामुळें या पध्दतीला आम्ही तिथिकेंन्द्र पध्दति असें नांव दिलें आहे. रविचद्रामध्यें जेव्हां १२ अंश अंतर पडते त्या वेळीं एक तिथि पूर्ण होते. व हेंच रविचंद्रामधील अंतर **दैव सहम** किंवा **लक्ष्मीसहम** (Part of Fortune) काढण्यामध्यें उपयोगामध्यें आणावयाचे असते. रविचंद्राच्या आकर्षणानें समुद्राला भरती येते किंवा रविचंद्रामुळें समुद्राचे पाणी ओढले जातें व तें कोठे, केव्हां व कितो ओढलें जाईल हें जसें

रविचंद्रामध्यें होणाऱ्या दैनिक अंतरावरून व ते ज्या स्थळीं किंवा प्रदेशांत माध्यान्हीं, लग्नीं, सप्तमकेन्द्रामध्यें किंवा इतर स्थितीमध्यें येतात त्यावरून ठरवावयाचें असतें. **त्याच भरती ओहंटीच्या नियमाच्या आधरानें प्रस्तुत विषयांमध्यें किती वजन ओढलें जाईल हें ठरवावयाचें आहे.**

जर रविचंद्राच्या आकर्षणानें पाणी ओढलें जाते तर त्याच आकर्षणाचा परिणाम इतर स्थूल वस्तुवर कां होऊं नये ? व हा परिणाम सर्व वस्तुवर होतो असें शास्त्रज्ञानाचे मत आहे. पाणी हा प्रवाही पदार्थ असल्यामुळें त्याचेवर होणाऱ्या आकर्षणाचा परिणाम भरतीनें व ओहटीनें दृष्य होतो तर येथें ज्या घोडयाचे वजन ओढलें जाते त्या घोडयास वजन नसल्यामुळें त्याच्या बरोबर धांवणाऱ्या इतर घोड्यापेक्षां त्याला धांवण्यामध्यें जास्त सवलत मिळते व तो त्यामुळें पहिल्या तोन नंबरामध्यें येतो. असो, आतां आपण या पध्दतीचा कसा उपयोग करावा याकडे वळूं.

(१) प्रथमतः रेस ज्या वेळीं सुटणार असेल त्या वेळेचो व त्या दिवसाची भावचलित स्पष्टग्रहासह कुंडली मांडून घेणें. रेस कार्डमध्यें किंवा रेस प्रोगराममध्यें ती केव्हां सुटणार हें स्टान्डर्डट टाईम मध्यें दिलेले असतें. हा काल प्रथम स्थानिक किंवा लोकल टाईम करून घेणें. नंतर रेस ज्या ठिकाणी धांवणार आहे तेथील म्हणजे, कलकत्ता, पुणा, मुंबई किंवा ग्वालेर इत्यादि ज्या ठिकाणीं होणार असेल त्या स्थलाचे अंक्षास लक्षांत घेऊन स्पष्ट भावचलित कुंडली करून घ्यावी.

(२) कुंडलीमध्यें द्वादश भाव स्पष्ट करून भरल्य नंतर स्पष्ट ग्रह भरावेत. सायन पध्दतीमध्यें जशी भावचलित कुंडली मांडतात तशी मांडणें. निरयण भावचलीत कुंडली मांडण्याची पध्दति शास्त्रोक्त नाहीं. ग्रह भरल्यानंतर कुंडलीमध्यें **दैव सहम** (Part of Fortune) मांडवा.

दैवसहम किंवा लक्ष्मी सहम(Part of Fortune)खालीलप्रमाणें काढावा.

लग्न + चंद्र--रवि = दैवसहम किंवा लक्ष्मी सहम

प्रथमतः लग्नाचे राशि अंश कलेमध्यें चंद्राचे राशि अंश कला मिळवाव्यात. बेरीज बारा राशिपेक्षां जास्त आल्यास त्यातून बारा राशि काढून टाकणें. नंतर या बेरजे मधून रविची राशी अंशे कला वजा कराव्यात. येईल तो **दैव सहम** कुंडलीमध्यें मांडावा. अमावास्येच्या दिवशीं दैवसहम लग्नांत असतो परंतु पौर्णिमेच्या वेळीं तो सप्तमामध्यें येतो. शुक्लपक्षामध्यें दैव सहम अनुदित गोलार्धामध्यें म्हणजे कुंडलीच्या १ तें ७ पर्यंतच्या भावांत येतो व कृष्णपक्षामध्यें तो उदित गोलार्धामध्यें म्हणजे ७ तें १ पर्यंतच्या स्थानामध्यें येतो.

(३) रवि चंद्रा मधील अंतर मोजावे. व हे अंतर १८०अंशापेक्षां जास्त असतां त्या मधून १८० अंश काढून टाकावेत. रवि चंद्रामधील जें अंतर येतें तेंच अंतर लग्नापासून किंवा पूर्व क्षितिजापासून दैवसहमाचे शुक्ल पक्षामध्यें असते, परंतु कृष्ण पक्षांमध्यें तें अस्त केन्द्रा पासून किंवा सप्तम स्थानापासून असते.

(४) घांवणाऱ्या घोड्या मधील सर्वांत जास्त वजन (टॉप वेट) ज्याचे असते व सर्वांत ज्याचे कमी वजन (बॉटम वेट) असते तें घेऊन दोहामध्यें किति अंतर आहे ह काढावें. यालाच वजनाचे प्रमाण--(स्केल ऑफ वेट)--असें म्हणतात.

(५) रेसच्या कुंडलीचे लग्न किंवा पूर्वक्षितिज हलके वजन (बॉटम वेट) दर्शविते तर अस्त केन्द्र--सप्तमस्थान मोठे वजन--(टॉपवेट) दर्शविते. व खगोलस्तिक मधले वजन -(मिडलवेट)--दर्शविते. साधारणपणें जे

वजनाचेप्रमाण (स्केल ऑफ वेट) असेल त्याचा $\frac{9}{६}$ भाग घेऊन तो द्वादश, एकादश, दशम, नवम, व अष्टम यावर वाढवित वाढवित ठेविला असतां प्रत्येक भावारंभी कोणते वजन येतें तें दर्शविले जाईल. म्हणजे लग्नते सप्तकेंद्रापर्यंत असणाऱ्या १८० अंशाबर धावणाऱ्या घोड्यांचे स्केल वाटतां येते. लग्नावरचे वजन व सप्तम केन्द्रावरचे वजन यांची बेरीज टॉप व बॉटम वेट यांचे इतकी होते. म्हणजे लग्नावरचे बजन सप्तम केन्द्रावर असणाऱ्या वजनाचे पुरक वजन (कॉम्पलीमेन्टरी वेट) होऊ शकते. किंवा सप्तमावर असलेले वजन लग्नावर असलेल्या बॉटम-वेटचे पुरक वजन होऊ शकते. व याप्रमाणें आपणास प्रत्येक भावावरचे पुरक वजन काढता येईल. टॉप व बॉटम वेट यांचो बेरीज करावी व ज्या वजनाचे पुरक वजन काढणें असेल तें त्या बेरजेमधून वजा करावे व शिल्लक येईल ते कॉम्पलीमेन्टरी वेट किंवा पुरक वजन जाणावे. व याप्रमाणें षष्टस्थानावर येणारे वजन द्वादशस्थानाचे वजनाचे पूरक वजन होत. एकादशस्थानाच पूरकवजन पंचमस्थानावर असलेले वजन होईल तर नवमस्थानावर असलेल्या वजनाचे पूरकवजन धनस्थानावर पाहण्यास मिळेल याप्रमाणें आपणाला स्केल ऑफ वेटच्या आधारानें सर्व घोडे कुंडलीवर बसविता येतील. या पध्दातमध्यें निरनिराळी वजनें हेंच घोडें असें मानले आहे.

(६) पुष्कळ वेळां भावारंभी उदय पावण्यास येत असलेलें ग्रह त्या भावानें दर्शित होणारे वजन किंवा पूरकवजन घेऊन धावणारें घोडें पहिल्या तीन नंबरामध्यें आलेले पाहण्यास मिळतात. करितां भावारंभी कुंडलीमधील कोणकोणते ग्रह येत आहेत याकडे लक्ष असू द्यावे.

(७) रेसच्या कुंडलीमध्यें रवि चंद्र व दैवसहम किंवा लक्ष्मी-सहम जेथें जेथें असतात तेथील वजन किंवा त्या वजनाचे पूरकवजन घेऊन धांवणारें घोडें ८० टक्के पहिल्या तीन नंबरामध्यें येतात म्हणून प्रथमतः या वरील रेसच्या तीन कारकांनीं कोणकोणती वजनें व पूरक वजनें दर्शविली आहेत याचे टांचण करावें व ते वजन घेऊन कोण कोणते घोडे नियम ६ मध्यें सांगितल्याप्रमाणें धांवत आहेत याची यादि करावी. व या वजनास दुसरा एखादा ग्रह कुंडलीमधील आपल्या स्थितीनें किंवा भावारंभी येण्यानें तेंच वजन किंवा पुरक वजन दर्शित करून जोर देत असल्यास त्याकडे विशेष लक्ष द्यावें. निवड करतें वेळीं हीं वजनें घेऊन धांवणारें घोडें सहसा सोडू नयेत कारण पुष्कळ वेळा ते पहिल्या तीन नंबरामध्यें आलेलें पाहण्यास मिळतात.

(८) वर वजन काढण्याची जी पध्दति सांगितली आहे ती स्थुल प्रमाणानें आहे. सुक्ष्म वज काढणें असतां खालीलप्रमाणें गणित करावें.

रवि, चंद्र किंवा दैवसहम यांचे म्हणजे लग्न किंवा सप्तम केंद्रापासून ज्या केंद्रापासून ते विशेष जवळ असतील त्यापासून अंतर मोजावें. व त्रैराशिकानें १८० अंश अंतराला इतके पौऊन्ड वजन तर इतके अंशाला किती याप्रमाणें काढावें. येणारें उत्तर टॉप वेटमध्यें वजा करावें व बॉटम वेटमध्यें मिळवावें. उदाहणार्थ तारीख ७ डिसेंबर १९२३ चवथी रेस दुपारीं ३-३० स्टॅं. टा.

टॉपवेट ९-१३--बॉटमवेट ७-१३ = वजनाचेंप्रमाण (स्केल ऑफ वेट) १ स्टोन ४ पौन्ड म्हणजे १४ पौन्ड = १ स्टोन या प्रमाणें १९ पौन्ड स्केल आफवेट येतें आतां चंद्राचें अंतर पश्चिम क्षितिजापासून ३० अंश आहे. म्हणजे १८० अंश अंतराला जर १९ पौन्ड

तर ३० अंशाला किति या हिशोबानें पाहतां सरासरी ३ पौन्ड येतात. हें टॉपवेट मधून काढले असतां ९ स्टो. १ पौ. वजन येतें व बॉटमवेटमध्यें मिळविले असतां ८ स्टो. २ पौन्ड येतात. येथें ८-२ वजन घेऊन धांवणारा घोडा नाहीं. परंतु ९-१ वजन घेऊन धांवणारे ४ घोडे आहेत त्या पैकीं एक Aquilegia ऍक्वीलेजिआ हा पहिला आला आहे. दैव सहम लग्नापासून सरासरी १० अंश अंतरावर आहे. व त्याचें वरप्रमाणें वजन काढले असता १ पौन्ड येते व हे टॉप वेट मधून काढले असतां ९-३ व बॉटम वेटमध्यें मिळविलें असतां ८-० अशी दोन वजने येतात. या पैकीं ८-० हें वजन घेऊन धावणाराच घोडा नाहीं. परंतु ९-३ चे जवळ ९-४ हें वजन घेऊन धांवणारें ४ घोडें आहेत या पैकीं दोन दुसरें व तिसरें नंबरामध्यें आले आहेत. वर करून दाखविलेल्या उदाहरणाकरून वजन कसें काढावें हें सहज कळेल.

वर दर्शविल्याप्रमाणें वजनाचें गणित केल्यानंतर वरील दर्शित केलेल्या तान कारका पैकीं कोणाकडे जास्त लक्ष द्यावें व कोणती वजनें जास्त महत्वाचीं आहेत याचा विचार करते वेळीं मागे वर्णन केलेल्या पध्दति उपयोगामध्यें आणाव्यात. वजन, रंग, नांव, अनुक्रम नंबर, होरा या पध्दतिप्रमाणें किंवा इतर दुसऱ्या कोणत्या पध्दतीनें ज्या घोड्याला जास्त मार्क बसत असतील तो शेकडा ८० ते ९० टक्के पहिला येण्याचा संभव आसतो. तुर्त सध्याच्या ज्ञानाच्या परिस्थितींमध्यें कोणत्याच एका पध्दतीवर अवलंबून राहता येणार नाहीं.

चंद्रचे वजनानें दर्शित होणारा घोडा किंवा ते वजन घेऊन धांवणारा घोडा ४० टक्के विन किंवा प्लेसमध्यें आलेला दिसतो. दैव सहमानें दर्शित होणारें वजन घेऊन धावणारा घोडा ३० टक्के विन प्लेसमध्यें

येतो. रवीने दर्शित होणारे वजन घेऊन धांवणारा घोडा २० टक्के विन प्लेसमध्यें येतो. परंतु इतर भावारंभी उदयपावत असणाऱ्या ग्रहानें दर्शित होणारें वजन घेऊन धांवणारा घोडा १० टक्के विन प्लेसमध्यें येतो.

खालीलप्रमाणें कांहीं गोष्टी आमच्यां अनुभवास आल्या आहेत त्याचा वाचकांनीं अनुभ घेऊन पाहावा.

(१) जेव्हां चंद्र, किंवा दैवसहम किंवा रवि हा येखाद्या ग्रहानें युक्त असतो म्हणजे कारक ग्रहाजवळ दुसरे ग्रह असतां त्या कारकाचे कुंडलीमधील स्थितीनें दर्शविले जाणाऱ्या वजन व पूरक वजनाला जास्त महत्व येतें अशा वेळीं दुसऱ्या दोन कारकांचा विचार केला नाहीं तरी चालेल.

(२) वर सांगितल्याप्रमाणें या तीन कारकांपैकीं जे कारक येखाद्या ग्रहानें युक्त असून दशमाच्या उदित अंशाबरोबर किंवा लग्नाच्या उदित अंशाबरोबर दृष्टियोग करीत असतील तर त्या कारकानें दर्शविले जाणारें वजन घेऊन धांवणारा घोडा शेकडा ८० टक्के विन येतो. मात्र हा दृष्टियोग होणारा असावा होऊन गेलेला असतां अनुभव मिळणार नाहीं.

(३) जें वजन **चंद्र** किंवा **दैव सहम** दर्शवीत असेल व तेंच वजन दुसरा एखादा ग्रह किंवा रवि दर्शवीत असेल तर त्या वजनाचा घोडा विन प्लेस किंवा मध्यें येतो.

(४) ज्या रेसच्या दिवशीं चंद्र शुभ ग्रहानें--गुरु किंवा शुक्रानें--युक्त किंवा दृष्ट असतो त्या दिवशीं बहुतेक शेकडा ६० टक्के **फेव्हरीट** घोडे विन आलेले पाहण्यास मिळतात. हे दृष्टियोग जें व्यावयाचे ते शुभ दृष्टियोग व्यावेत. युति, त्रिकोण, ३६ अंश, ७२ अंश, १४४ अंश

तृतीय एकादश, समक्रांति दृष्टियोग, व विशेषतः जेव्हां चंद्र पापग्रहाबरोबर करीत असलेले दृष्टियोग म्हणजे हर्शल, नेपच्युन, मंगळ, शनि यांचेबरोबर होत असलेले त्याचे दृष्टियोग सुटून तो रवि, बुध, गुरु व शुक्र यांचेबरोबर शुभ सबंध युति, समक्रांति दृष्टियोग, तृतीय, एकादश, किंवा त्रिकोण दृष्टियोग करण्यास जात असेल तर त्या दिवशीं खात्रीनें फेव्हरीट विन येतो. व ज्या रेसच्या कुंडलीच्या केन्द्रामध्यें गुरु, शुक्र, बुध, रवि येतात व वरप्रमाणें चंद्राची स्थिति असते त्या रेसमध्यें हे फेव्हरीट विन येण्याचा शेकडा ८० टक्के संभव असतो. **फेवहरीट** घोडा हा नेहमी टॉपवेट कडील असतो म्हणजे त्याचा अनुक्रम नंबर पहिल्या ३ नंबरांमध्यें असलेला पाहण्यास मिळतो व हा घोडा सर्व टिपस्टरच्या पुस्तकांमध्यें दिलेला पाहण्यास मिळतो.

(५)परंतु याचे उलट चंद्र शुभ ग्रहाबरोबर करीत असलेले दृष्टियोग सोडून पापग्रहाबरोबर हर्शल, नेपच्यून, शनि, व मंगळ याचेबरोबर अशुभ सबंध करण्यास जात असेल; रेस कालच्या कुंडलीमध्यें पापग्रह बलवान असून केन्द्रामध्यें बसत असतां व चंद्र राशीनें, स्थानानें व दृष्टियोगानें निर्बली असतां खात्रीनें, आउट सायडर शेकडा ८० टक्के विन आलेला पाहण्यास मिळतो.

याखेरीज दुसऱ्या कांहीं बारीक गोष्टी आहेत परंतु जागेच्या अभावामुळें त्या सर्वांचा येथें खुलासा करणें शक्य दिसत नाहीं. तसेंच कुंडलीवरून घोडयाचे नंबर--कार्ड नंबर कसे काढावेत याचाही खुलासा करितां येत नाहीं. असो तूर्त या अंकामध्यें प्रसिध्द केलेल्या सर्व माहितीचा विचार करून जर कोणीही नीट रीतीनें विन किंवा प्लेसड घोडे शोधून काढण्याचा प्रयत्न करील तर त्यास खात्रीनें ६० ते ७० टक्के यश प्राप्त होईल.

व तूर्तच्या एवढया ज्ञानानें देखील खात्रीनें धनोत्पादन करितां येईल. कारण घोडयांचे ज्ञान, त्यांची जातकुळी, धांवणें इत्यादि गोष्टी लक्षांत घेऊन घोडयांची निवड करण्याचा प्रघात आहे. किंवा टिपस्टर ज्या गोष्टी आपआपल्या रेसकार्डमध्यें टिप्पस देतात त्यापेक्षां फलज्योतिषशास्त्राधारानें घोडयांची निवड केली असतां खात्रीनें जास्त धनोत्पादन करितां येईल. बहुशा जे घोडे जास्त फाळणी देतात ते ज्योतिषशास्त्राधारानें काढलेल्या घोडयांच्या निवडणूकींमधून सुटत नाहींत असा आमचा वानुस्भव आहे. यासबंधानें एखाद्यास विशेष जास्त माहिती पाहिजे असल्यास त्यानें आम्हांस समक्ष भेटावें किंवा पत्रोव्यवहारानें खुलासा मागवावा.

\+ \+ \+ \+

वर्गणीदारांस विनंति.

प्रस्तुतचा ५२ पानाचा तीन महिन्याचा अंक वाचकांच्या हातामध्यें देऊन आम्हीं वर्गणीदारांच्या ७ व्या वर्षाच्या ऋणामधून मुक्त होत आहों. अनेक अडचणीमुळें आम्हांस या वर्षी दरमहा अंक प्रसिद्ध करितां आला नाहीं. तरी पण तीन महिन्यानें ४८ पानांचा म्हणजे तीन अंकचा एक अंक याप्रमाणें चार अंक प्रसिद्ध करून वाचकांच्या हातामध्यें दिलेले आहत ज्योतिर्माला चालू ठेवण्याचा आमचा निर्धार कायम आहे. व पुढील सालापासून म्हणजे ८ व्या वर्षापासून अंक नियमानें दर दोन महिन्यानें काढण्याविशयीं आमची पूर्ण खटपट चालू आहे. व लवकरच मालेचा अंक दर महिन्यास काढतां येईल असें दिसत आहे. वर्गणीदारांनीं आपला आश्रय कायम ठेऊन आम्हांला फल ज्योतिषशास्त्राचें संशोधन कार्यामध्यें आजपर्यंत जशी मदत केली तशीच करून हें कार्य अव्याहत चालूं ठेवण्याचे श्रय व्यावे अशी त्यांस नम्र विनंति आहे. चालू सालामध्यें आम्हांला **श्रीमंत राजेसाहेब सितामहू** यांच कडून जो आश्रय मिळाला आहे त्यामुळें फलज्योतिष संशोधन कार्य करण्यास जास्तच उमेद प्राप्त झाली आहे. व राज साहेब सितामहू यांचे उदाहरण इतर संस्थानाधिपति घतील तर या शास्त्राचा जिर्णोधार होण्याच्या कामामध्यें फार महत्वाची मदत होणार आहे. व या कार्याकडे आमच्या संस्थानाधिपतीचें लक्ष जाईल तो सुदीनच समजला पाहिजे.

॥ श्रीसद्गुरवे नमः ॥

ज्योतिर्माला

आग्राचः कामरूपादुहिणसुतनदप्लावितादाप्रतीचो
गान्धारात् सिंधुसार्द्रद्रुवररचितादाचसेतोरवाचः।
आकेदारादुदीचस्तुहिनगहनतः सन्तिविद्वत्समाजा
ये ये तानेष यत्नः सुखायतु समजान्कश्चमत्कर्तुमीष्टे॥ १॥

अभिनवाऽऽवृत्ति वर्ष ८ वें अंक १ ते २.

"ईश प्रार्थना"

[रा. रामचंद्र राजाराम मोकाशी. ठाणें]

पद–(रा० भूप ता० दादरा)

लागत हें वर्ष नवें ! देवि अंबिके ॥
रक्ष सकल विश्व तया नांदुदे सुखें ॥ धृ ॥
व्यसनासुर छळि संप्रति ।
पापग्रह अवनति युति ।
राशीला बसली तो ।
विकति ना पिकें ॥ १ ॥ ला०
खळ त्यांचा बेत फसो ।
भाग्याचा अरुण दिसो ।
सौख्यशांति ही विलसो
गमत सारिखें ॥ २ ॥ ला०

नाच पुरे हे भैरवि ।
इष्टहेतु सबल रवि ।
चमकूं दे तेजस्वी ।
विनति, चंडिके ॥ ३ ॥ ला०

पद-(चाल साध्य नसे मुनिक०)

वंदन तुजला भावें ॥ अयि जगदंबे अभय असावें ॥
॥ धृ० ॥

झंझा-जल-दव प्रलय न यावे ।
उलकाभव भूकंप नसावे ।
रक्षचि " ज्योतिर्माला " ॥
नव वत्सर हें सुखकर व्हावें ॥ १ ॥ वं०

(शा०वि०)

अप्रत्यक्ष असेंचि शास्त्र अवघें ज्योतिष्यशास्त्रा तुला ।
यावच्चंद्र दिवाकरौ बुधजनीं " प्रत्यक्ष " शेरा दिला ॥
आहे वादविवाद कारण म्हणूं शास्त्रांस अन्यांस हो ॥
साक्षीदार तुला न अन्य-रवि हा, शीतांशु आणीक
हो ॥ १

मोरांचे शिरिं ते तुरे विलसती: प्राधान्य ते पावले ॥
माथां नागविभूषणा मणि तरी लोकांस ठावें भलें ॥
वेदानें भरलें जरी दिसतसे सच्छास्त्र हो गोमटें ॥
आहे " ज्योतिष " हें शिरोमणि तया हें धन्य ? हो
एकटें ॥ २ ॥

(मंदाक्रांता)

" ज्योतिर्माला " प्रगटत गुणी बालिका नव्रभावें ॥
प्रेमें तेव्हां शशि रसिक तो डोलतो सुस्वभावें ॥
साहीना हो खळ तिमिर तो अन्य उत्कर्ष कांहीं ॥
कौतुकानें स्फुरतचि अहा ! सिंधु तो बंधु पाहीं ॥ १ ॥

(मालिनी)

बुधजनगुण लोकीं मान्य अत्यंत होवो ॥
दुरित सकल जावो: राहणें बंधुभावो ॥
जन रत निजधर्मीं मंगलातें वरूं दे ॥
बलधन अभया दे: देवते, त्वत्प्रसादें ॥ २ ॥

नवग्रह नमस्कार.

(माधव कृष्ण देशपांडे)

रवीतेज जेसें प्रकाशोनि राही ॥
मिळें राज्य ऐश्वर्य तैसें सदाही ॥
असे अन्न चैतन्यदाता जिवासी ॥
नमस्कार त्या सूर्य नारायणासी ॥

(२)

जशी इंदुची कौमुदी शांति देई ॥
गृहीं सौख्य नानापरी होत राही ॥
कल षोडषें वाढवी सृष्टि बाला ॥
नमस्कार तारांगणीं त्या शशीला ॥

(४)

(३)

बहू रक्तवर्णी धरापुत्र आहे ॥
जरा रुष्ट होतां चुराडाच राहे ॥
मिळें इंद्रसामर्थ्य ज्याच्या कृपेला ॥
नमस्कार साष्टांग त्या मंगळाला ॥

(४)

असे बुद्धिदाता तसा द्रव्यदाता ॥
भ्रमाचा निरस्ता सुखाचा पुरस्ता ॥
कृपासिंचनें सर्व उत्कर्ष ज्याच्या ॥
नमस्कार पादारविंदीं बुधाच्या ॥

(५)

अती तीव्रबुद्धी अती द्रव्यजोर ॥
अती मानसन्मान आचार थोर ॥
कृपेनें मिळे ब्रह्मविद्या विशाला ॥
नमस्कार साष्टांग त्या सद्गुरुला ॥

(६)

बहू गूढ संजीवनी काव्य गाणें ॥
मृदू हास्य लीला कला सर्व जाणे ॥
गृहीं इंदिराही रतीभोग नाना ॥
नमस्कार त्या शुक्र-पादांबुजांना ॥

(७)

असंख्यात विघ्नें उभीं राहतातीं ॥
क्रिया निष्फला होय ही आळ येती ॥
कृपा होय चातुर्य वैराग्य देशी ॥
नमस्कार त्या सूर्यपुत्रा शनीसी ॥

(९)

(८)

क्षणीं लोकमान्यत्व लक्ष्मी अपार ॥
कुशाग्रामति कल्पनेच्याहि पार ॥
बहू धूत जिंकी कथी जातकाला ॥
नमस्कार त्या श्रेष्ठ प्राजापतीला ॥

(९)

असे योगिराणा करीं घेइ वीणा ॥
गिरीकंदरीं सागरीं वास जाणा ॥
मिळें योग सामर्थ्य ज्याच्या प्रसादें ॥
नमस्कार त्या श्री वरूणास मोदें ॥

(१०)

शशी सूर्य किंवा छळी राहु जेवीं ॥
जनीं मान लक्ष्मी लया जाय तेवीं ॥
कृपेनें परी संकटें सर्व हाळी ॥
नमस्कार त्या राहुसी सर्वकाळीं ॥

(११)

अती नीचवृत्ती करी जो मनाची
बहू थोर हानी तशी ही धनाची ॥
कृपेनें परी मुक्ति देई स्वभावें ॥
नमस्कार त्या केतुसी सर्वभावें ॥

फलज्योतिष.

(लेख १ ला.)

(एम. डी. सगणे, एम्. ए., एल एल. बी.)

फलज्योतिष हें शास्त्रच नव्हे, तें विश्वसनीय नाहीं. तें दैववादी बनवितें, त्याचा ऐहिक किंवा पारलौकिक असा कोणताच उपयोग नाहीं, अशा तऱ्हेचे उद्गार, किंबहुना सिध्दांत-स्वरुपी वचनें वेळोवेळीं ऐकावयास मिळतात, आणि तींहि वास्तविक ज्याच्या तोंडून निघूं नयेत अशा म्हणजे कांहीं सुशिक्षित लोकांकडून ऐकावयास मिळतात, हे सर्व आक्षेप व्यर्थ आहेत आणि ते कसे हें क्रमाक्रमानें पाहूं.

अशा तऱ्हेचे आक्षेप घेणारास बरींचशीं कारणें असतील त्याचा ऊहापोह योग्य स्थळीं केला जाईल. तूर्त हें सांगून ठेविलें पाहिजे कीं 'भूतखेत सब झूट है' 'स्वर्ग नरक म्हणून कांहीं नाहीं,' इत्यादि विधानें करण्यांत आजकाल समाजांत दर्जा वाढतो, निदान सुधारक (reformer) असा छाप तरी बसतो अशी कल्पना बरीच रूढ झाली आहे. ह्या रूढीस--थोडा भिन्न पण इंग्रजी शब्द वापरावयाचा म्हणजे--ह्या (superstition) ला बळी पडलेल्या लोकांपैकींच वरील तऱ्हेचे आक्षेप घेणारे बहुतेक लोक असतात. हे आक्षेपक 'जुने तेवढें खोटें व कुचकामाचें' ह्या पंथाचे अनुयायी असतात. त्यांना कांहीहो प्राचीन व पुरातन, सैतान व बार्बेरिक वाटतें. नवें कांहीहि असलें तरी त्यांचा त्यावर चटकन् विश्वास बसतो. ढळढळीत ज्याला लांबीरुंदी आहे असा कागदावरील बिंदु पाहूनही, व ज्याला कोणत्याच तऱ्हेचें परिमाण नाहीं असा बिंदु मानवी हातानें काढणें अशक्य असतांहि त्यांना भूमितींतील बिंदूची व्याख्या ग्राह्य असते, पण ज्योतिषांतील तत्सम कल्पनेचा त्यांना

विटाळ होत असतो, H2 आणि S04 हे निरनिराळे किंवा संलग्न स्वतः पाहिले नसतांहि, लाटा कशा उत्पन्न होतात व कोणत्या प्रकारच्या असतात हें माहीत नसतांहि, किंवा प्रपितामह मर्कटेश्वराला हा मनुष्यावतार, कसा, केव्हां व कोणत्या दैत्याचें निर्मूलन करण्याकरितां घ्यावा लागला ह्याचा आदिअंत दृक्प्रत्ययानें किंवा वाचून माहित नसतांनाहि, तेजाब (Sulphuric Acid) म्हणजे H2 S04 च आहे, बिनतारी संदेश हवेच्या लाटांनीं जातात, किंवा मनुष्य हा प्राणी माकडाचें स्थित्यंतर आहे, इत्यादि विधानें हेच लोक बेधडक करीत असतात. अशा तऱ्हेचीं विधानें केलीं जातात म्हणून ते सिध्दांत जसे खरे किंवा खोटे म्हणतां येत नाहींत, तद्वतच फलज्योतिषावरील आक्षेपांची स्थिति आहे.

वस्तुतः अशा किंवा इतर आक्षेपकांनीं त्या त्या विषयाचा अभ्यास मुळींच केलेला नसतो, तरीपण त्या विषयावर मत देण्याचा, मत देऊन लोकमत कलुषित करण्याचा, तेणें करून एखाद्या गरीब बिचाऱ्या शास्त्राचा खून पाडण्याचा त्यांना जन्मसिध्द हक्क आहे असें त्यांना वाटतें. ज्योतिषशास्त्र खोटें आहे असें ते तुतारी रवाने. आरावत असतात, मत देण्यापूर्वी त्या विषयाचा थोडा तरी सहवास करून त्यांतील सत्यासत्य काय आहे हें पाहण्यास, व प्रतिपक्ष काय म्हणतो हें ऐकण्यास त्यांना फुरसदच नसते. व अशिक्षित माणसांचीं गोष्ट निराळी पण ज्यांचा बुध्दि सुसंस्कृत समजली जाते, ज्यांना तुलनात्मक विचार करण्याची शक्ति प्राप्त झाली आहे त्यांनीं योग्य तें निरीक्षण न करतां, त्या शास्त्राची मूळतत्त्वेंहि समजाघून न घेतां नालस्ती करणें म्हणजे प्रगति कीं अवनति हें त्यांचें त्यांनींच पहावें.

जे फलज्योतिष झूट आहे असें म्हणतात त्यांनीं, ज्याचा जन्मकालचा चंद्र शुभसंबंधित नाहीं व पीडित आहे अशाला साडेसाती सुखा-

वह गेली, ज्या व्यक्तीच्या सप्तमांत अगर द्वितीयांत पापग्रह आहे, सप्तमेष दूषित आहे आणि रविचंद्र बलहीन आहेत त्या व्यक्तीला पति अगर पत्नीसुख चिरकाल व यथेच्छ मिळालें, ज्याच्या जन्मकाळीं हर्शल रवीशीं केंद्र करतो त्याला वयाचे ४५ वर्षाच्या सुमारास कोणत्याच प्रकारची आपत्ति भोगावी लागली नाहीं, किंवा गुरु, रवि, मंगळ, शुक्रांपैकीं एक ग्रह दशमांत असणारा मनुष्य जगांत पुढें आला नाहीं किंवा प्रसिध्दी पावला नाहीं, अशी कांही उदाहरणें दाखवून मग ज्योतिषशास्त्र खरें नाहीं असें म्हटलें असतां चालेल पण असा कोणीच पुढें आलेला दिसत नाहीं.

आक्षेपकांनीं फलज्योतिषाचा थोडा जरी परिचय करून घेतला तरी अशी खात्री वाटते कीं ते थोडयाच अवकाशांत त्या शास्त्राचे कट्टे पुरस्कर्ते बनतील. फलज्योतिषशास्त्र जरी गहन असलें तरी त्याचें स्वरूप अनुभवात्मक आहे. आंत फार खोल न जातां त्याचा वरवर जरी अनुभव घेतलला तरी त्या शास्त्रांत विश्वास उत्पन्न होण्यास पुरेसें आहे. त्याच्या प्राकृत स्वरूपाचे ज्ञानानें देखील विश्वास बसल्याशिवाय रहाणार नाहीं. आक्षेपकांनीं इकडे नजर दिल्यास त्यांत त्यांचाच फायदा होण्यासारखा आहे.

सन १९२४ साल कसें जाणार.

चालू साल कसें जाईल या संबंधानें सविस्तर भविष्य मालेचे सहाध्यायी संपादक श्रीयुत रामनारायण यांनीं **" वर्ष प्रबोध "** नांवाचें पुस्तक काढून त्यामध्यें प्रसिध्द केलेलें वाचकांचे समोर आहे. पूर्वसांप्रदायाप्रमाणें आम्हीं थोडक्यांत मालेमध्यें भविष्य प्रसिध्द करावें असें पुष्कळ वाचकांकडून सांगण्यांत आल्यामुळें चार शब्द लिहिण्याचें योजिलें आहे. सन १९२४ संबंधानें सविस्तर ग्रह स्थितीचें वर्णन ' वर्षप्रबोध ' मध्यें

असल्याकारणानें तिचा उल्लेख येथें करण्याचें मुळींच कारण दिसत नाहीं. ज्या कोणास यापेक्षां सविस्तर भविष्य पाहणें असेल त्यांनीं तें श्रीयुत रामनारायण यांचे पुस्तकांत पाहावें.

मेदिनीय ज्योतिषशास्त्रामध्यें अमुक एक वर्ष कसें जाईल याचा विचार संक्रमण काळच्या कुंडल्या व पौर्णिमा अमावास्या यांच्या कुंडल्यांवरून करण्याचा प्रघात आहे. व त्याच परंपरेला धरून चालू वर्षाचें भविष्य केलें आहे. हल्लींच्या काळामध्यें राष्ट्राच्या उपयोगी पडणारे भविष्याचीच फार जरूर आहे. व्यक्तिविषयक भविष्यें फक्त त्या त्या व्यक्तीसंबंधानें सुखदुःख दर्शवील याचे पेक्षां राष्ट्रीय भविष्याचा दर्जा श्रेष्ठ आहे. व तें करणें तितकेंच कठीण आहे.

सन १९२४ मध्यें मंगळामध्यें रवीचें साल येणार आहे. सौरवर्षाचा आरंभ मेषसंक्रमणानें होतो; व याच संक्रमणावरून येणाऱ्या वर्षामधील घडामोडीचा विचार करण्याचा पूर्वसांप्रदाय आहे. संक्रमणकाळीं रवि तृतीयस्थानामध्यें बसत असून चक्राधिपति जो मंगळ त्याचेबरोबर केन्द्रयोग करीत आहे. मंगळ व्ययस्थानामध्यें आहे. चंद्र अष्टमामध्यें असून धनस्थानामध्यें असलेल्या बुधाबरोबर प्रतियोग करीत आहे. अब्दाधिपति व चक्राधिपति हे दोन ग्रह चालू वर्षी उच्चीचे आहेत. परंतु त्यामध्यें होत असलेला केन्द्रयोग चांगला नाहीं. नेपच्युन सप्तमस्थानामध्यें असून शुक्र हा वृषभेच्या चतुर्थामध्यें आहे व तो नेपच्युनबरोबर केन्द्रयोग करीत आहे. माध्यान्हीं शनि आहे. मार्गाल वर्षी असाच शुक्र चतुर्थामध्यें होता परंतु या वर्षापेक्षां जास्त पीडित असा असल्याकारणानें अत्यंत वृष्टि होऊन पुष्कळ ठिकाणीं जलप्रलयानें भयंकर नुकसानी झालेली आहे. व

त्या दृष्टीनें विचार करितां यंदा एकंदर वृष्टि जास्तच होईल असें म्हणण्यास हरकत नाहीं.

यंदा ही नद्यांस पूर येऊन नासाडी झालेली पाहण्यास मिळेल. जुलाई, आगस्ट, सप्तेंबर, अक्टोबर व नव्हेंबर या महिन्यांमध्यें पाऊस पुष्कळ पडल्यानें घरें दारें यांचा नाश झाल्याचें पाहण्यास मिळेल. एकंदर या महिन्यामध्यें नेहमीपेक्षां जास्त पाऊस पडेल व पूर येतील. परंतु यंदा निसर्ग देवता आमच्यावर कृपा करील असें वाटतें व पीकपाणी उत्तम येईल.

लोकपक्षाचा कारक ग्रह चंद्र अष्टमामध्यें असून तो बुधाबरोबर प्रतियोग करोत आहे ही स्थिति चांगली नाहीं. त्यामुळें लोकपक्षाचे पुढाऱ्यामध्यें मृत्यु घडतील. चंद्र हा राणिवंश देशांतील मोठाल्या उच्च दर्जाच्या स्त्रिया, राजकारणामध्यें किंवा जनसमाजामध्यें भाग घेणाऱ्या स्त्री वर्गाचा द्योतक असल्यामुळें यंदा त्यांच्यामध्यें मृत्यु खास घडतील. देशांत रोगराई विशेष वाढून मृत्युसंख्या उग्र रूप धारण करील. यंदा कॉलरा किंवा संग्रहणीच्या विकारापासून जनता जास्त त्रस्त होईल, सन १९२४ चा नव्हेंबर महिना मृत्यूसंबंधानें विशेष संस्मरणीय जाईल.

दशमाचे अगदीं उदित अंशाजवळ शनि आहे ही स्थिति राजकुलें, मांडलिक संस्थानें यांना चांगली नाहीं व त्यामुळें त्यांची काय तारांबळ उडते तें पाहणें आहे. कायदे कौंसिलामध्यें सरकारच्या पराभवाचे प्रसंग अनेक वेळां येतील.

पोस्ट, टेलिग्राफ, टेलिफोन रेलवे यांसंबंधानें चालू वर्षामध्यें पुष्कळच सुधारणा किंवा फेरफार होतील. व एखादा मोठा रेलवेचा अपघात जुलाई किंवा सप्तेंबर महिन्यामध्यें होईल. चालू वर्षामध्यें दाणा, गल्ला किंवा धान्यें पाबसानें बिघडतील व त्यामुळें देशामध्यें रोगराई पसरेल.

अमेरिका येथून उत्तम हवेचे रिपोर्ट येऊं लागल्यामुळें जून महिन्यापासून कापसाचे भाव पडण्यास लागून नंतर एकदम मोठी मंदी येईल असें म्हणण्यास मुळींच हरकत दिसत नाहीं. एकंदर चालू वर्षामध्यें सर्वत्र व्यापारधंद्याची स्थिति मोठी चांगली राहील असें वाटत नाहीं. लवकरच प्रत्येक गोष्टीमध्यें मंदी किंवा स्वस्तपणा आलेला पाहण्यास मिळेल. सन १९१७ ते १९१९।२० पर्यंत मालाच्या किंमती किंवा भाव भयंकर वाढले ते आतां चांगलेच खालीं येऊं पाहत आहेत.

परराष्ट्रीय हुंडणावळीचे भावामध्यें अजून स्थिरता प्राप्त होण्याचे योग आलेले दिसत नाहींत. वर्षकुंडलीच्या धनस्थानामध्यें हर्शल असून संपत्तिकारक ग्रह गुरु हा चालूवर्षामध्यें बराच पीडित असल्याकारणानें हिंदुस्थान सरकारच्या कौंसिलामध्यें पैसा, व्यापार, कर्ज, कर, हुंडणावळ यासंबंधानें चालू साल संस्मरणीय होईल. सरकारी खजिन्यामध्यें पैशाची ओरड व तूट वाढत जाईल. सोन्याचे भावामध्यें चालू वर्षामध्यें बरेच फेरफार दिसतात. एकंदर सुवर्णनिधी व गंगाजळी यांना ओहटच दिसत आहे. कागदी चलनी नाणें सुकाळाचें होईल व याचमुळें सुवर्ण व चांदी यांच्या किंमती तेजींतमध्येच राहतील. यंदा एकंदर शेअर मार्केट अत्यंत खालीं गेलेलें पाहण्यास मिळेल व त्यामुळें ज्यांना मिल शेअर्स किंवा इंडस्ट्रिअल शेअर्स घेणें असतील त्यांनी आपलें नाणें आतां गुंतविलें असतां त्यापासून खात्रीनें पुढें लाभ होईल. सरकारी प्रामिसरी नोटांचे जे भाव आज दिसत आहेत ते पुढें सन १९२५।२६ नंतर दिसतील किंवा नाही यासंबंधानें शंकाच वाटते. करितां चालू उंच असलेल्या भावामध्यें प्रामिसरी नोटा विकून त्याचें नाणें दुसऱ्या गोष्टीमध्यें गुंतविलें असतां जास्त हितकर होईल.

सन १९२४ साल हें सांपत्तिक बाबतीमध्यें भयंकर घडामोडी दर्शविणारें दिसत आहे. या सालामध्यें मोठमोठाली दिवाळीं निघतील, बँका किंवा पेढ्या बुडतील व जिकडे तिकडे नाण्यांची तीव्र टंचाई भासू लागेल. व्याजाचे दर भयंकर वाढलेले पाहण्यास मिळतील व सर्वत्र व्यापार धंदे मंदीमध्यें येऊन डबघाईस आलेले पाहण्यास मिळतील. व्यापारी वर्गानें फार जपून वागावं. व या दृष्टीनें पाहतां मे महिना फारच विचित्र आहे. शिक्षणसंस्था, प्रेस, वर्तमानपत्रें यांना सन १९२४ साल चांगलें जाईल असें वाटत नाहीं. एखाद्या उत्तम ग्रंथकार व ग्रंथकर्त्रीचा मृत्यु घडेल. विशेषतः वर्तमानपत्राची संपादिका कालवश होईल.

चालू सालामध्यें तारीख २१ जून रोजीं कर्क संक्रमण होणार आहे. हेंही संक्रमण मोठें चांगलें बसत नाहीं. सप्तमामध्यें नेपच्युन बसत असून लग्नामध्यें चंद्र मंगळाची युति बसत आहे. यामुळें या संक्रमणानंतर अग्नीपासून त्रास विशेष होईल. फ्रांटिअरवर अत्याचार घडून बरोच गडबड उडेल. ही चंद्रमंगळांची युति तारीख २० फेब्रुवारीच्या चंद्रग्रहणकाळच्या रवीवर होत आहे. हें फार भयंकर आहे. हा योग अनेक प्रकारें तापदायक होईल. जूनचा शेवटचा आठवडा व आगस्ट या काळामध्यें या अनिष्ट योगाचा तीव्रपणा नजरेला येईल.

तारीख २३ सप्तेंबर १९२४ रोजी दुपारी १२ वाजून ४९ मिनिटांनीं सायन तुळ संक्रमण होणार आहे. या संक्रमण काळची कुंडली ही विशेष चांगली बसत नाहीं. दशमाधिपति व पंचमाधिपति शुक्र अष्टमामध्यें बसत असून तो नेपच्यूननें युक्त असून धनस्थानामुळें असलेल्या मंगळाबरोबर प्रतियोग करीत आहे. अर्थात या संक्रमणानंतरही व्यापारची स्थिति सुधारेल असें वाटत नाहीं. संपत्ति नाशकारक असे अनेक योग झाले आहेत त्यामुळें सट्ट्याचे व्यवहार, शेअरबाजार वगैरेंची बरीच तारांबळ उडेल. एखाद्या चांगल्या ग्रंथकाराचा किंवा कवीचा मृत्यु होईल. या संक्रमणानंतर रेलवे स्ट्राईक किंवा अशीच कांही तरी पोस्ट टेलीग्राफ संबंधानें भानगड किंवा मोठा रेलवे अपघात ११ अक्टोबर नंतर वाटतो. २० नव्हेंबर नंतर रेलवे, वर्तमानपत्रें, पोस्ट ऑफीस यांसंबधानें भानगड उत्पन्न होईल. एखाद्या बड्या आफीसरचा किंवा राजकुलामधील पुरुषाचा मृत्यु अक्टोबर १४ तारखेच्या सुमारास होईल. अक्टोबर तें डिसेंबर पर्यंतचा काळ अनेक दृष्टीनें अनिष्ट भासत आहे. या काळामध्यें दिवाळीं काढणारांची संख्या भयंकर वाढेल. ऑक्टोबर नंतर पिकासंबंधानें जास्तच ओरड होईल. चालू वर्षामध्यें बुध पुष्कळ वेळां पीडित दिसत आहे. त्यामुळें वाङ्मयसेवक लेखकवर्ग, वर्तमानपत्रें, टपाल, टेलीग्राफ, रेलवे किंवा वाहातुकीचीं साधनें यांसंबंधाने वर्ष वाईटच जाईल. शिक्षण खातें, हें प्रगती करील असें मुळींच दिसत नाहीं.

चालू सालीं तीन सूर्यग्रहणें व दोन चंद्रग्रहणें होतील त्यांपैकीं दोन चंद्रग्रहणें आपलेकडे दिसतील. तारीख १४ ऑगष्टचें चंद्रग्रहण फार महत्त्वाचें आहे. ग्रहणकाळीं चंद्र नेपच्यूननें युक्त असून हें ग्रहण मुंबईशहराचे दशम बिंदूवर उदित असणाऱ्या सिंहेच्या २२ व्या अंशाजवळ होणारें आहे. बुध हर्शलचा प्रतियोग ग्रहणकाळचे चतुर्थ दशमामधून होत आहे. एकंदर विचार करितां या ग्रहणानंतरचा काळ व्यापार, राजकारण यांसंबंधानें बराच अनिष्ट दिसत आहे. देशामध्यें मोठी खळबळ उडेल. परशिआ जपान वगैरे प्रदेशामध्यें भूकंपाचे उत्पाद घडतील.

तारीख २६ जानेवारी सन १८४२ सालीं जो शनिगुरुची मकर राशीच्या ८ अं. ५४ कलेमध्यें युति झाली त्या युतिकाळचे चंद्राचे केंद्रामधून चालू वर्षीं शनीचें भ्रमण होणार आहे. युतिकाळीं शुक्र चंद्र प्रतियोग करीत होते हल्लीं चलित रवि हा शुक्राबरोबर प्रतियोग करण्यास आला असून लवकरच म्हणजे १९२६।२७ मध्यें तो चंद्राबरोबर केन्द्रयोग करणार आहे. व हे चालू असलेले योग चालू वर्षीं शनि आपल्या गोचर भ्रमणानें उत्तेजित करीत आहे. त्यामुळें सन १९२४ सालामध्यें दैन्य दारिद्रता विशेष वाढेल. लग्नचलित होऊन शनि गुरुबरोबर प्रतियोग करण्यास आले आहे. ही स्थिति फारच भयंकर वाटते. मूळच्या दशमामध्यें असलेले ग्रह आतां चलित लग्नाबरोबर प्रतियोग करणार आहेत. त्यामुळें दशमस्थान द्योतक गोष्टीमध्यें अनेक घडामोडी झाल्या पाहिजेत.

या शनि गुरुचे कुंडलीवरून पुष्कळच विचार करण्यासारख्या गोष्टी दिसत आहे. त्या सर्वांचा थोडक्यांत सार म्हणजे चालू १९२४ साल हें सर्व जगाला फारच विलक्षण क्रांतिकारक जाईल. जिकडे तिकडे दैन्य, दारिद्र्यता वाढून मृत्युसंख्या भयंकर कमालीची होईल. मकर राशीमध्यें जो प्रथमच शनि गुरूची युति सन १८४२ सालीं झाली ती किती महत्वाची आहे यासंबंधानें थोडीबहुत कल्पना येण्याकरितां, लंडन येथें १८४२ सालीं झडकील्स लिगसी नांवाचे जें पुस्तक पहिला झडकोल यानें प्रसिध्द केलेलें आहे, त्यातील हिंदुस्थान संबंधाचा एक उतारा आम्ही वाचकांस सादर करून सन १९२४ साल कसे जाईल हा लेख आटोपता घेतों. "शनि गुरुची युति ही नवमांत म्हणजे दशमस्थानाचे द्वादश स्थानामध्यें अर्थात् ज्या स्थानावरून राजकर्त्यांचे गुप्त शत्रुत्वाचा विचार करण्यांत येतो त्या स्थानामध्यें वसत आहे. चंद्र चतुर्थ स्थानामध्यें म्हणजे दशमस्थानाचे प्रतिस्पर्ध्यांचे द्योतक स्थानामध्यें वसत आहे. त्यावरून हिंदुस्थानामध्यें राजकर्त्यांच्या विरुध्द कारस्थानें व उघड बंड करण्यांत येईल. या बंडामध्यें सामान्य जनता, धर्मगुरु किंवा आचार्य (ब्राह्मणवर्ग) दोघेही भाग घेऊन प्रस्थापित असलेली राजसत्ता उलथून टाकण्याचा प्रयत्न मोठ्या हिमतीनें व धारिष्ट्यानें करण्यांत येईल. व जरी या बंडखोरीमुळें सरकारला आपली सत्ता प्रस्थापित करण्यास अनेक संकटें व भयंकर खर्च सोसावा लागेल तरी बंडखोर यशस्वी होतील असें मुळींच वाटत नाहीं; किंबहुना फार दीर्घ काळ पर्यंत हिंदी लोकांना या चळवळीमध्यें यश येईल असें दिसत नाहीं. परंतु या युतीचा अंमल असलेल्या कालमर्यादिमध्यें (१८४२ ते २०८०) हिंदुस्थानामध्यें फार मोठमोठाल्या घडामोडी होतील व या घडामोडीमधून ज्या राजपध्दतीमध्यें जनसमाजाला पुष्कळच भाग घेतां येईल असल्या तऱ्हेची लोकनियुक्त राजकीय संस्था हिंदुस्थानाला खास लवकर मिळेल असें माझें मत आहे"*

सर्वे वै सुखिनः संतु । सर्वे संतु निरामयाः
सर्वे भद्राणि पश्यंतु । नकश्चिद् दुःखभाग् भवेत् ॥

---

* " The position of Saturn and Jupiter in the 9th House, which is that of secret enmity to the Government, and the moon in the 4th, in opposition to the 10th speak strongly of plots and conspiracies, and also of open insurrections against the rulers of India. The priests and the people combine to overthrow the existing order of things, and will display great boldness therein. But althongh they will cause the Government to expend much money in defending its power, they

will not succeeed, at least for a considrable period. Yet a vast change will take place during the rule of this Mutation and I am of opinion that a representative Government in which the people will have great influence very soon be established." (Zadikel's Legacy 1842 London.)

शनिमंगळाची युति.

तारीख १ ली डिसेंबर १९२३ रोजी प्रिन्स विच टाईम सकाळी ८ वाजून ६ मिनिटे व १५ सेकंद या वेळीं शनि मंगळाची युति तुला राशीच्या २८ अं. ५४ कलेंमध्यें झाली होती. हो युति लंडन शहराच्या दशमांत बसत आहे. किंबहुना लंडन तें मध्य युरोप खंडामध्यें ही बाब्यान्ही बसत आहे. याच युतीवरून इंग्लडमधील त्या वेळीं असलेलें प्रधानमंडळ (मिनिस्टरी) मोडेल असे झडकील यानें आपल्या सन १९२३ च्या पंचागामध्यें खालील स्पष्ट शब्दांमध्यें म्हटले होते "It threatens the Government with unpopularity and a speedy overthrow" "या युतीमुळें गव्हर्मेन्टचा नाचक्की होईल व लवकरच मिंत्रमंडळ मोडेल."

ही युति मध्य युरोप वगैरे खालील ठिकाणीं माध्यान्हीं येत आहे.

रोम	तुला	२४.५८;	स्टॉकहोम	वृश्चिक	०-५५
कोपनहेगन	तुला	२५.९;	केपटाऊन	,,	१-२१
व्हीएना	तुला	२९.७;	अथेन्स	,,	६-४७

वर जे राशीचे अंश दर्शविले आहेत ते अंश या निरनिराळ्या ठिकाणीं युतिकाळीं दशम भावारंभी उदय पावत आहेत. वर दर्शविलेल्या ठिकाणीं हो युति माध्यान्हीच येत असल्याकारणानें दशमस्थानदर्शक गोष्टींमध्यें

भयंकर घडामोडी व फेरफार झाले पाहिजेत. मेदिनीय ज्योतिषशास्त्रामध्यें दशमस्थानावरून राजे, प्रेसिडन्ट, सरकार व अंमल करणाऱ्या माणसांचा बोध होतो त्यामुळें वरील ठिकाणीं वर दर्शविलेल्या गोष्टीपैकीं फारच खळबळाट झाला पाहिजे, राजकारणाचे धोरणामध्यें घोड चुका घडतील, मंत्री मंडळें मोडतील, मोठाले अधिकारी, राजकार्य धुरंधर पुरुषाचे किंवा राजांचे मृत्यु घडतील, सरकारचे पराजय होतील, मिनिस्टरस--प्रधान मंडळें यांना राजीनामे देंण्याचे प्रसंग येतील. जिकडे तिकडे असंतोष, संप मारामाऱ्या होण्याचा संभव राहील. व विशेषतः अधिकारूढ पक्षा विरुध्द जोराचा हल्ला होईल.

ही युति चायनाच्या नैऋत्येकडील प्रदेशामध्यें सप्तमामध्यें बसत आहे; तोकडे बरेंच अत्याचार व भानगड उत्पन्न होईल. आपलेकडे हो युति युतिकाळचे अष्टमस्थानामध्यें बसत आहे व व्ययस्थानामध्यें असलेल्या हर्शल बरोबर १३५ अंशाचा दृष्टियोग करीत आहे. युतिकाळचा चंद्र षष्ट स्थानामध्यें असून वरील शनिमंगळाबरोबर ४५ अंशाचा अशुभयोग करण्यास जात आहे. त्याच प्रमाणे हा चंद्र व्ययस्थानी मधील हर्शलबरोबर प्रतियोग करीत आहे. हे सर्व योग अत्यंत अनिष्ट झाले आहेत व या युति नंतर लवकरच देशांत असंतोष, बेरोजगारपणा, तुफान, मारामाऱ्या, संप, बंडे वगैरे होऊन मृत्युसंख्या जास्त दर्शवित आहे. कामकरी वर्गामध्यें भयंकर असंतोष उत्पन्न करणारी ग्रहस्थिति या युतीकाळच्या कुंडलीवरून दर्शविला जात आहे. ही युति सन १९२३ च्या मार्चच्या २१ तारखेस झालेल्या मेषसंक्रमण कालचे लग्नाचे उदित अंशाजवळ होत असून तारीख २३ डिसेंबर रोजी जे मकर संक्रमण झालें त्यावेळीं उदय पावत आहे. हें फारच भयंकर होत

आहे. म्हणून लवकर मकर संक्रमणानंतर देशांत संप, मारामाऱ्या, खून दरवडे या सारखी परिस्थिति उत्पन्न होणे साहजीकच आहे. फ्रॉन्टीअर कडील प्रदेशामध्यें फारच बेबंदशाही माजेल.

ही युति झाल्या नंतर तारखीख ४ जानेवारी १९२४ रोजीं नेपच्यून मंगळाचा केन्द्रयोग झाला आहे. हा केंन्द्रयोग मुंबईच्या लग्न-दशमा मधून होत आहे. [मुंबईचे लग्न वृश्चिक २० अंश, दशम सिंह २२ अंश, असं प्रसिध्द ग्रंथकार सफेरिअल मानतो] व याच सुमारापासून मुंबई येथील गिरण्याच्या हरताळास सुरुवात झाली. त्याचप्रमाणें मुंबई, दिल्ली, नागपूर, बेंगांल वगैरे वगैरे ठिकाणचे कौंसिलामध्यें सरकारचें पराभवाचे अनेक प्रसंग प्राप्त झाले. या युति नंतर झालेल्या यावरील गोष्टी विचार करण्यासारख्या आहेत.

ही युति जपान शहराची राजधानी जी टोकी ओ शहर त्याचे दशम बिंदुचे जे अंश मिस्टर सफेरीअल [दशम-तुला २९, लग्न मकर७] यानें दिलें आहेत त्याचें जवळच होत आहे. त्यामुळें जपानचे राजकारणामध्यें भयंकर गोंधळ माजावा किंवा राजघराणें, राजकर्ते पुरुष यांचेवर आपत्ति यावी हे उघडच आहे. ही युति होण्यापूर्वीच ता.१ ली सप्टेंबर १९२३ रोजीं जपानवर भुकंपाचे अरिष्ट ओढवले व भयंकर प्राणहानी व सांपत्तिक नुकसान झाले आहे. जपानवर या युतिचे सुमारास अरिष्ट कोसळेल असें आम्हास १९२३ सालीं वाटत होतें. व हो गोष्ट पूर्वी घडल्यामुळें वरील अंश जपानचे राजधानीचे घ्यावे किंवा नाहींत या संबंधानें ज्योतिर्विदामध्यें त्याचा खल होणे अत्यंत जरूरीचे आहे.

तारीख १९ एप्रिल १९२४ रोजीं होणारी पौर्णिमा या शनि मंगळाचे युतिवर होत आहे, शनिही वक्र गतीनें युतिकालचे ठिकाणी येत आहे त्यामुळें वर दर्शविलेल्या देशामध्यें या समुरास बरीच भानगड उत्पन्न व्हावी. जुलई १६ ते २२, ऑगस्टचा शेवटला आठवडा, सप्टेंबर ७ तें ९ व अक्टोबर २० तें २३ हें दिवस बरेंच भानगडीचें व महत्वाच या युति काळचे कुंडली वरून वाटतात.

हिज एक्सलन्सी लेसी ऑरम विलसन मुंबईचे गव्हरनर

यांची कारकीर्द कशी जाईल ?

आपले मुंबईचे नवीन गव्हरनर साहेब हे मुंबईच्या किन्याऱ्यावर तारीख १० डिसेंबर १९२३ रोजीं सकाळीं ८ वाजून १५ मिनिटांनीं उतरले व त्यांनीं राज्य संकटाची सुत्रें त्याच दिवशीं सकाळीं ११ वाजतां धारण केली असल्याचें जाहीर झालें आहे. या कालावरून ही कारकिर्द कशी काय होईल या संबंधानें आज विचार करणें आहे. कोणत्याही कार्याच्या आरंभ कालच्या ग्रह स्थितिवरून पुढें त्या कार्यासंबंधानें कसें काय घडून येईल इत्यादि गोष्टी ज्योतिष शास्त्राद्वारानें जाणता येतात. फलज्योतिषशास्त्रामध्यें जन्मकाल, प्रश्नकाल किंवा एखाद्या कृत्याचा आरंभ काल हें फारमहत्त्वाचे आहेत. व या मुल सिध्दाताचा आधार घेऊन आपणाला आपल्या नवीन गव्हरनर साहेबांचा कारकिर्द कशी काय जाईल याचा आज विचार करणें आहे. फलज्योतिषशास्त्रामध्यें आरंभ कालाचे महत्व किती मानिले आहे याची कल्पना मुहूर्तावरून सहज करितां येईल. प्रत्येक कार्याचा शेवट गोड होऊन कार्यकर्त्याला यश मिळावे म्हणूनच मुहूर्त पाहण्याची पध्दत प्रचारामध्यें आली; परंतु या विषयाकडे आमचे फारच दुर्लक्ष होत

आहे. शनि चंद्र युतिचे दिवशीं मुंजीचे मुहूर्त, रवि हर्शल युतीच्या दिवशीं लग्नाचे मुहूर्त आमचे हल्लीचे पंचांगांमधून दिलेलें पाहण्यास मिळतात. फलज्योतिषशास्त्रामधील मूलतत्वांची अशारीतीनें आमचे पंचांगकार फारकत करूं लागले तर याचा दोष शास्त्राचे माथीं मारतां येईल काय ? असो, गव्हर्नरसाहेब यांनीं राज्यसूत्रे धारण करण्याचा विधीच्या वेळीं जी शपथ घेतली त्यावेळेचीच कुंडली विचारामध्यें घेणें महत्वाचे आहे. आरंभ काळापासून शपथ घेण्याचे विधीपर्यंत सरासरी १५ मिनिटें लागली असें गृहीत धरून ११ वाजून १५ मिनिटांची कुंडली मांडली आहे.



यावेळीं पूर्व क्षितीजावर कुंभ राशीचा १९ वा अंश उदय पावत असून माध्यान्ही वृश्चिक राशीचा २९ वा अंश उदयपावत आहे. स्थिर राशि केन्द्रामध्यें उदयपावत असून लग्नाधिपति शनि हा नवम-भावामध्यें आहे. गुरु दशमामध्यें आहे. यावारून एकंदर कारकिर्दीचे धोरण फारच स्थिर व चांगले चिकाटीचे असें प्रथमारंभीं पाहण्यास मिळेल. माध्या-न्हामध्यें गुरु आहे ही एकच गोष्ट या कारकिर्दीमध्यें अनेक चांगल्या गोष्टी घडवून आणणारी आहे व नेक नामदार गव्हरनर साहेब लेसी ऑरम विलसन यांची कारकिर्द गुरूच्या धर्माप्रमाणें प्रथमारंभी सरासरी दोन अडीच वर्षें यशस्वी होईल असें वाटत आहे. राशीचक्रामधील कुंभ ही शास्त्रीय धर्माची राशि असून, विद्या, विश्वाविद्यालें, सुसंस्कृतता, जनसमाज, संस्था व म्युनिसिपालिटया यांची द्योतक किंवा कारक राशि अस-ल्याकारणाने म्युनिसिपालटया, सर्वप्रकारच्या संस्था, कौन्सिलें, विश्वविद्यालयें, व शिक्षण संस्था यासंबंधानें फारच प्रगतीपर धोरण स्विकारण्यामध्यें येईल. या कारकिर्दीमध्यें कौन्सिल संबंधानें अत्यंत झपाटयानें प्रगती दर्शक सुधारणा खास होतील. आरंभ काळचा चंद्र मकर राशीमध्यें व्यवस्थानामध्यें असून तो लग्नेश शनि बरोबर व मंगळ बरोबर केन्द्रयोग करणार आहे. हा योग विशेष सुख समाधान देणारा मुळींच वाटत नाहीं. जनसमाजामध्यें किंवा मकर राशीनें दर्शित होणाऱ्या देशामध्यें--**हिंदुस्थानामध्यें**--आरोग्य व शांतता नांदेल असें दिसत नाहीं. तुरुंग कैदखानें यासंबंधानें फारच गडबड उडेल. जनता रोग, गुप्तशत्रुत्व डिटेक्टीव्ह खाते यानें त्रस्त होईल. या कारकिरदीचे सप्तमस्थानामध्यें नेपच्युन आहे व तो सप्तेमश जो रवि या

बरोबर शुभसंबंध करीत आहे त्यामुळें परराष्ट्रीय व्यापारी धोरण साधारण चांगल राहिल. हिंदि राष्ट्राच्या महत्वाकांक्षा व आशा याना पुष्टी देणारी अशी जरी कुंडली आहे तरी या कारकिर्दीमध्यें पुढें पुढें फारच लहरी धोरण स्विकारण्यांत येईल. अक्टोबर १९२४ पर्यंत गुरुचे भ्रमण कारकिर्दीचे आरंभ कालच्या रविजवळ होणार असल्यामुळें तेथपर्यंत अनेक चांगल्या गोष्टी घडतील. सन १९२४ च्या डिसेंबर नंतरचा काळ या कुंडलीवरून फारच विचित्र दिसत आहे. सन १९२६ पासून काळ फारच अनिष्ट असा येत असून दशमस्थान दर्शक गोष्टी संबंधानें--मानसन्मान, कीर्ति, राजदरबार इत्यादि संबंधानें खालीं पाहाण्यास लावणारे प्रसंग उत्पन्न होतील व त्यामुळें गव्हरनर साहेबांना अत्यंत विकट परिस्थिती उत्पन्न होऊन राजीनामा देण्यासारखी परिस्थिती निर्माण होईल. सन १९२५ मध्यें गुरुचे भ्रमण मुळच्या चंद्रावरून होणार असून चलीत चंद्र शनी व मंगळाचा केन्द्र-योग सोडून रवि बरोबर शुभयोग सन १९२७ मध्यें करण्यास जाणार आहे त्यामुळें जनता या सुमारास खात्रीने अधिकारी वर्गापासून महत्वाच्या सुधारणा किंवा हक्क प्राप्त करून घेईल. कारकिर्दीचा चतुर्थाधिपति बुध व शुक्र एकादश स्थानामध्यें असून ते षष्टेशाबरोबर युति करण्यास जात आहेत. चतुर्थेश बुध व शुक्र हे मकर राशीमध्यें असून ते दृशि बरोबर शुभ संबंधीत असून चंद्र चतुर्थस्थानाचे उदित अंशाबरोबर शुभ योग करण्यास जात असल्यामुळें या कारकिर्दिचा शेवट जनसमाजाच्या दृष्टीने हितावह असाच होईल. खाणी, शेतकी, घरें, कालवें या संबंधानें अनकुल अस्याच गोष्टी घडतील. देशा-मधील खनीज संपत्ति संबंधानें ज्यास्त उपयुक्त सुधारणा व कायदे अमलात

येतील माध्यान्हाच्या जवळ गुरु असल्यामुळें एकंदर कारकीर्द चांगली जाईल. कर, सांपत्तिक स्थिति, कौन्सिलें देशातील आरोग्य, तुरुंगखाने, हासपांटलस, दानसंस्था, प्रेस य संबंधानें हा कारकीर्द फारच महत्वाची जाईल. बुध हा या कुंडलीमध्यें विशेष चांगला बलवान व शुभ संबंधीत असल्यामुळें राजकारणा-संबंधानें खळबळ करणारे असें पुष्कळच जहाल वाङमय व कडाक्याचे वादवि-वाद पाहण्याय मिळतील. प्रेस व शिक्षण संस्था या कारकिर्दीमध्यें उत्तम प्रगति करतील. वाहनाची साधनें, पोस्ट, टेलीग्राफ, टेलीफोन, रेलवे या संबंधानें या कारकिर्दीमध्यें पुष्कळच चांगल्या गोष्टी पाहण्यास मिळतील. हाऊसिंग स्किम किंवा लॅन्ड डेव्हलोप मेन्ट या संबंधानें तीव्र-मतभेद, वादविवाद याना उत येईल. कारकिर्दीमध्यें अफगाणीस्थान, वगैरे फ्रॉन्टीअरकडून फारच त्रास होऊन उत्तर हिंदुस्थानामध्यें त्रास होईल.

माजी गव्हर्नर एच इ. सर जार्ज लाईड यांनी तारीख १६ डिसेंबर १९१८ रोजीं संध्याकाळीं ६--३० वाजतां (स्टॉ. टाईम) चार्ज घेतला. या काळावरून माजी गव्हरनर साहेबाचे कारकेर्दीचा कसा काय बोध होतो इत्यादि गोष्टीचा तुलनात्मक विचार करतां यावा म्हणून त्या कारकेर्दीची कुंडली देत आहों.

या कारकिर्देच्यावेळीं गुरु लग्नांत उदय पावत होता ही गोष्ट खरी आहे परंतु षष्टेश लग्नांत, रवि षष्ठामध्यें चंद्र व्ययस्थानामध्यें व षष्टस्थानामध्यें अनेक ग्रह असल्यामुळें या कारकिर्दीमध्यें शत्रुत्व व तुरुंग भरून जाण्यासा-रख्याच अनेक गोष्टी झाल्या. षष्टस्थानामध्यें चतुर्थेश पडला असून षष्ठामध्यें

अनेक ग्रह असल्यामुळें तद्योतक गरीब लोकांचे राहण्यासंबंधानें अनेक हाऊसिंग स्किमस तयार होऊन अखेरीला डेव्हलपमेन्ट डिपार्टमेन्ट निर्माण झालें आहे हें विशेष विचार करण्यासारखें आहे. सत्याग्रह व तुरंगात जाणें याचा जणू काय या कारकिर्दीमध्यें उतच आला होता. व या गोष्टी



षष्ट व व्ययस्थान दर्शक झाल्या नाहींत असें कोण म्हणेल? याच कारकिर्दीमध्यें दशमस्थान दर्शक अत्यंत महत्वाची सुधारणा किंवा हिन्दुस्थानास पार्लमेन्टकडून कौन्सिल संबंधानें नवीन हक्क दशमेश सुरगुरु उच्च असून उदित असा असल्यामुळें प्राप्त झाला आहे.

॥ श्रीसद्गुरवे नमः ॥

ज्योतिर्माला

आप्राचः कामरूपाद्द्रुहिणसुतनदप्लावितादातीचो
गान्धारात् सिंधुसार्द्राद्रघुवररचितादाचसेतोरवाचः ।
आकेदारादुदीचस्तुहिनगहनतः सन्तिविद्वत्समाजा
ये ये तानेष यत्नः सुखयतु समजान्कश्रमत्कर्तुमीष्टे ॥ १ ॥

अभिनवाऽऽवृत्ति वर्ष ८ वें अंक ३ ते ४.

इसिस ओसिरीस वगैरे अप्रकाशित ग्रह विचार.

(लेखक:—यशवंत केशव प्रधान.)

आर्य फलज्योतिष वाङमयामध्यें ज्याप्रमाणें धूमादि अप्रकाशित ग्रह किंवा क्षणिक ग्रहासंबंधानें सांगितले आहे तशाच कांहीं कल्पना अप्रकाशित ग्रहासंबंधानें पाश्चिमात्य ज्योतिर्वाङमयामध्यें चालू आहेत. आपलेकडे धूमादि अप्रकाशित ग्रह जन्मकालच्या रवीच्या स्पष्ट स्थितीवरून तयार करण्यास सांगितले असून त्यांचा स्थानफलें वर्णन केलेली ग्रंथांत पाहण्यास मिळतात. हें अप्रकाशित ग्रह खरोखर जड द्रव्याचे बनले असून दिसत नाहींत किंवा काल्पनिकच आहेत या संबंधानें आपलें ज्योतिर्वाङमयांत स्पष्ट असा कोठेंच खुलासा नाहीं. पाश्चिमात्य वाङमयांत सांगितलेल्या **इसिस** व **ओसिरोस** वगैरे नेपच्यूनच्या कक्षें पलिकडोल ग्रहासंबंधानें निरनिराळ्या ज्योतिर्विदांच्या निरनिराळ्या कल्पना आहेत. व सर्वजण हें अप्रकाशीत ग्रह जड द्रव्यांचे बनलेले असून आपल्या सूर्यमाले पैकींच असून तें नियमाने बध्द आहेत असें मानतात. व जस जशी दुर्बिणी वगैरे साधन सामुग्रीचो

ज्यास्त सुधारणा होत जाईल त्या मानानें हे ग्रह आपल्या दृष्टिगोचर होतील असें त्यांचे मानणें आहे. मिस्टर चारुबेलसारख्या गुढ अध्यात्म वादी व उन्नत माणसाचे मते या आपल्या सूर्य मालेंत नेपच्यूनच्या कक्षें पलिकडे आणखी अनुपलब्ध, साध्या दृष्टोला न दिसणारे असें कांहीं ग्रह आहेत; व या संबंधानें अनेकांनीं आपले विचार पुष्कळ निरनिराळ्या ठिकाणी प्रसिध्द केले आहेत. या विषयावरील सन १९०६ साला पासून आज तागाईत जें निरनिराळें लेख व माहिती इंग्रजी पुस्तकामध्यें प्रसिध्द झालेली पाहण्यास मिळाली आहे त्यावरूनच प्रस्तुत लेख लिहिण्याचा प्रयत्न केला आहे.

आमचेमध्यें दिव्य दृष्टि (Clairvoyant Power) असलेली माणसे नाहीत असें मुळीच नाहीं, फक्त त्यांना या शक्तींचा शास्त्राचे उन्नतीला कसा उपयोग करितात हें अद्यापी खास शिकावयाचे आहे. आमचा सर्व भर जगत मिथ्या या एका वेदान्त तत्वामध्यें गुंतलेला असून आम्हीं ऐहिक गोष्टीकडे फारच दुर्लक्ष करीत आहोत. आम्हांला या विषयीं निदान थोडे बहूत पाश्चिमात्याचे अनुकरण खास केलें पाहिजे. एखाद्या माणसाला थोडी जरी अधिदैविक शक्ति प्राप्त झाली तरी तीनें शास्त्र संशोधन कार्यामध्यें किती मदत होतें याची साक्ष आजचे पाश्चिमात्य वाङमय चांगली देत आहे. वाचकांनीं चारुबेलचे डिग्रजो ऑफ दि झोडीयाक सिम्बोलाइजड हें पुस्तक अवश्य पाहावे. क्रांतिवृत्तामधील ३६० अंशापैकीं प्रत्येक अंशाचे निरनिराळें स्वरूप या दिव्यदृष्टी असणाऱ्या माणसानें कोणते पाहिलें, त्याचे वर्णन या पुस्तकामध्यें असून प्रत्येक अंशाचे काय फल अशु शकेल याचे त्यानें फारच उत्तम वर्णन केलें आहे. अशी अंश वर्णनें पाश्चिमात्य वाङमयामध्यें ४।५ उपलब्ध आहेत. परंतु आमचे फलज्योतिवाङमयामध्यें असलें एक देखील पाहण्यास मिळत नाहीं. भृगुसंहितादिक ग्रंथामधील किंवा सत्याचार्यकृत संहिताग्रंथामध्यें फारच सुक्ष्म अंश वर्णन आहे असे म्हणतात. परंतु यावर स्वतंत्र ग्रंथ संस्कृत वाङमयामध्यें आज खास उपलब्ध नाहीं.

सन १९०६ सालामध्यें मिस्टर जी इ. सटलीफ या ज्योतिर्विमानें माडर्न अस्ट्रालाजीमध्यें **नेपच्युन किंवा वरूणाच्या कक्षेपलिकडील चार ग्रह** या नांवाचा एक लेख प्रसिध्द केलेला आहे. त्यांत त्यानें नेपच्यूनच्या कक्षे पलीकडे खालील प्रमाणें चार अदृश्य ग्रह असल्याचे ध्वनीत केले आहे.

(नं १)**इसिस** Isis हा नेपच्यूनच्या कक्षे पलिकडे असून पृथ्वीपासून सूर्याचे अंतर १ मानले असतां याचे सूर्यापासून अंतर ५०.६०६ आहे. हा आपली सूर्या भोंवतालची प्रदक्षिणा ३६० वर्षामध्यें पुरी करतो. याची वार्षिक सूर्यमध्यस्त गति १ अंश आहे. व १ ली जानेवारी सन १९०६ रोजी याची सूर्यमध्यस्त स्पष्ट स्थिति मेषेच्या ०.४६ कलेमध्यें होती. या ग्रहाचे भूमध्यस्थ स्पष्ट स्थिति व सूर्यमध्यस्त स्पष्ट स्थिति साधारण सारखीच आहे. व हल्ली सन १९२४, १ ली जानेवारीला तो मेष राशीच्या १८ अं ४६ कलेमध्यें आहे.

या ग्रहाची **मिथून** व **धनु** राशोबरोबर ज्यास्त सादृश्यता आहे. व हा ग्रह सर्व प्रकारचे नवलाई, नाविन्य, विलक्षणता, अलौकिकपणा, व अपूर्व स्वरूप जसें ग्राफोफोन, टाईपरायटर, वर्तुलगति भ्रमणावर चालणारी एक चाकाची आगगाडी याचा द्योतक आहे. हा ग्रह अपूर्व व विलक्षण

गोष्टी घडवितो. कित्येक ज्योतिर्विदांचे मते स्त्रियांचे कपडयालत्याचे पयाशनवर याचा बराच अंमल आहे. चारूबेलचा **ल क्रा** व हा ग्रह एकच असावा, असें विचार केले असतां वाटते.

या ग्रहाचा **मिथून** व **धनु** राशिबरोबर जास्त सादृश्यता असल्या कारणानें या राशीनें दर्शविलेल्या सर्व गोष्टीबरोबर या ग्रहाचा सहजासहजीच संबंध येतो; तसेंच कुंडली मधील धनु व मिथून राशींची द्योतक **नवम व तृतीय** या स्थानानें दर्शित होणाऱ्या गोष्टीचाही तसाच संबंध येऊं शकतो. याप्रमाणें कल्पनेच्या जोरावर आपणाला या नवीन ग्रहाचा कोणाबरोबर कसा संबंध बांधावा व तो कोणकोणत्या गोष्टींचा कारक बनेल यासंबंधानें पुष्कळच कल्पनाकरितां येईल. या ग्रहाची फलें पाहण्यास सोईचे पडावे म्हणून त्याच्या पाठीमागिल व पुढील स्थितींचे कोष्टक वाचकांच्या सोईकरितां देत आहों.

सन १५४६ व १९०६	जानेवारी १ ली		मेष	०--४६
,, १५७६ व १९३६	,,		वृषभ	०-४६
,, १६०६ व १९६६	,,		मिथुन	०--४६
,, १६३६ व १९९६	,,		कर्क	०--४६
,, १६६६ व २०२६	,,		सिंह	०--४६
,, १६९६ व २०५६	,,		कन्या	०--४६
,, १७२६ व २०८६	,,		तुला	०--४६
,, १७५६ व २११६	,,		वृश्चिक	०--४६
,, १७८६ व २१४६	,,		धनु	०--४६
,, १८१६ व २१७६	,,		मकर	०--४६

,, १८४६ व २२०६	,,		कुंभ	०--४६
,, १८५६	१ ली जानेवारी		कुंभ	१०--४६
,, १८६६	,,	,,	कुंभ	२०--४६
,, १८७६	,,	,,	मीन	०--४६
,, १८८६	,,	,,	मीन	१०--४६
,, १८९६	,,	,,	मीन	२०--४६
,, १९०६	,,	,,	मेष	०--४६
,, १९१६	,,	,,	मेष	१०--४६
,, १९२६	,,	,,	मेष	२०--४६
,, १९३६	,,	,,	वृषभ	०--४६
,, १९४६	,,	,,	वृषभ	१०--४६
,, १९५६	,,	,,	वृषभ	२०--४६

या ग्रहाचा वार्षिक गति १ अंश असल्याकारणाने आतां वरील कोष्टकाचे साह्यानें लागेल त्या वर्षाची स्पष्ट स्थिति सहज काढतां येईल.

(नं. २) **ओसिरीस** पृथ्वी पासून सूर्याचे अंतर १ तर याचे अंतर ९९.३४०; सूर्या भोंवतालचा प्रदक्षिणा करण्याम९९०.११३९६ वर्षे लागतात. वार्षिक गति० अं. २१ कला. १ ली जानेवारी १९०६ रोजीं हा तुला राशीच्या ३ अं. १ कला व ४९ विकलेमध्यें होता. जानेवारी१ ली १९२४ रोजीं तो तुलाराशीच्या ८ अं. २० कलेंमध्यें आहे.

कुंडलीमध्यें **ओसिरस** मांडता येऊन त्याचे फलाचा विचार सहज करितां यावा म्हणून खालील कोष्टकामध्यें त्याची पाठीमागिल व पुढील स्पष्ट स्थिति देत आहों.

१ ली जानेवारी १८३६ **ओसिरीस** हा कन्या ७ अं. ३४ क. ३९ वि.
" १८४६ " " कन्या ११ अं. १२ क. ४९ वि.
" १८५६ " " कन्या १४ अं. ५० क. ५९ वि.
" १८६६ " " कन्या १८ अं. २९ क. ९ वि.
" १८७६ " " कन्या २२ अं. ७ क. १९ वि.
" १८८६ " " कन्या २५ अं. ४५ क. २९ वि.
" १८९६ " " कन्या २९ अं. २३ क. ३९ वि.
" १९०६ " तुळा ३ अं. १ क. ४९ वि.
" १९१६ " तुळा ६ अं. ३९ क. ५९ वि.
" १९२६ " तुळा १० अं. १८ क. ९ वि.
" १९३६ " तुळा १३ अं. ५६ क. १९ वि.
" १९४६ " तुळा १७ अं. ३४ क. २९ वि.
" १९५६ " तुळा २१ अं. १२ क. ३९ वि.
" १९६६ " तुळा २४ अं. ५० क. ४९ वि.
" १९७६ " तुळा २८ अं. २८ क. ५९ वि.
" १९८६ " वृश्चिक २ अं. ७ क. ९ वि.

या ग्रहाची वार्षिक गति. ० अं. २१ कला व ४९ विकला आहे. व ही गति लक्षांत घेऊन या कोष्टकाचे अधारे कोणासही लागेल त्या वर्षाची स्पष्ट स्थिति सहज काढता येईल.

नं. ३. (नांव दिलेलें नाहीं) अंतर १६९.१७१; सूर्याभोंवतीं भ्रमण करण्यास लागणारा काळ २२००.३३७६८ वर्षें. वार्षिक गति ० अंश ९ कला व ४९ विकला. १ ली जानेवारी १९०६ रोजीं मीन राशीच्या २८ अंश ९ कला व ४९ विकलेमध्यें होता.

नं. ४. (नांव दिलेलें नाहीं) अंतर ३१७.५४७; सूर्याभोंवतीं भ्रमण करण्यास लागणारी वर्षें ५६५८.६३१५८; वार्षिक गति ० अंश ३ कला व ४९ विकला. १ ली जानेवारी १९०६ रोजीं कन्या २२ अंश ५ कला व ४९ विकलेमध्यें होता. असो, याप्रमाणें मिस्टर सटलीफ यांची या चार अप्रकाशित ग्रहां संबंधानें माहिती आहे.

इसिस याचे इंग्रजीमध्यें Isis असें स्पेलिंग आहे. " इज " हा शब्द पुन्हा पुन्हा लिहिला गेला असल्यामुळें त्यास ' आवर्त ' दशांश अपुर्णांकांचे भागाकारामध्यें तीच तीच बाकी उरूं लागून तेच तेच भाग लागतात व हे कळण्याकरितां " आवर्त " नांवाची एक खूण त्या आकड्यावर करण्याचा सांप्रदयाय आहे किंवा त्या संखेला आवर्त संख्या म्हणतात. म्हणून या ग्रहाला महाराष्ट्रभाषेमध्यें ते नांव देणें योग्य होईल किंवा याला " आवर्त ग्रह " म्हटला असतां चालेल असें वाटत नाहीं. कोणत्याही गोष्टीला नांव देतेवेळीं तो मध्यें असलेल्या विशिष्ट धर्माचा व गुणाचा बोध व्हावा लागतो. व वर दर्शविल्याप्रमाणें या ग्रहामध्यें तीच तीच गोष्ट पुन्हा पुन्हा करण्याचा तर मुळींच धर्म नाहीं. मग हें नांव या ग्रहाला शोभेल काय ? आपल्या मुलाचे नांव दगडया, धोंडया इत्यादि ठेवण्याचा बापाला खास हक्क आहे व त्या न्यायानें प्रजापतिला वरूण, वरूणाला इंद्र तर इसिसला आवर्त, काय लागेल तें म्हणावे. परंतु हा शास्त्र संमत मार्ग नव्हे. हा हे कडपणाचा मार्ग आहे. मिस्टर सटलीफ यांनीं या ग्रहाला इजिप्त पुराणामध्यें असलेल्या **इसिस** देवतेचे नांव दिलेले आहे. इसिस ही कोण आहे वगैरे सविस्तर माहिती मॅडम ब्लाव्हटस्की यांचे इसिस अनव्हेल्ड या पुस्तकामध्यें पाहण्यास मिळेल.

प्रसिध्द क्लेरव्हायन्ट चारूबेल हा फार उच्च दर्जाचा किंवा अधिकारी मनुष्य होता. यानें अप्रकाशीत ग्रहासंबंधानें व इतर पुष्कळच माहिती दिली आहे. नेपच्यूनच्या कक्षें पलिकडे हा ज्योतिर्विद **ओ ओ** व **ल क्रा** असें दोन ग्रह असल्याचं म्हणतो; व त्यांचे भ्रमणकाळ स्पष्ट स्थिति वगैर संबंधानें खालील प्रमाणे त्याचें मत आहे.

ल क्रा La croix-the Mundane cross मेदनिय क्रुस-- या ग्रहाची कक्षा. नेपच्युनच्या पलिकडे आहे. हा आपली सूर्याभोंवतालची प्रदक्षणा ३४० वर्षें ४ महिन्यात करतो व याची मध्यम वार्षिक गति १ अंश ३ कला व २८ विकला आहे. हा सन १९०५ च्या नव्हेंबर महिन्यामध्यें मेषेच्या ५ अंश ३३ कला व २ विकलेंमध्यें होता. या ग्रहाचे दिन स्वगृह मकर; रात्रा स्वगृह मेष; उच्चराशि धनु. या ग्रहामध्यें तीन भाग जलतत्वाचे व एक भाग वायुतत्वाचा आहे. हा स्वभावानें शनि आणि मंगळ व काहीं गुरुच्या धर्माचा आहे. मिस्टर सटलोफ यांनीं दर्शविलेला इसिस व ल क्री हे एकच ग्रह असावेत.

La croix is the Spritual counterpart of Mars and gives Spiritual victory **ल क्रॉ** हा दैवि सामर्थ्य किंवा विजय देतो. या ग्रहामध्यें मंगळामध्यें असलेलें सर्व दैवि सामर्थ्य एक वटलेलें आहे.

ओ ओ Ov-O यालाच दुसरा टी. एल हॅरीस नांवाचा ग्रंथकार **मेलोडिआ** Melodia या नांवानें संबोधितो. हा ग्रंथकार नेपच्युनच्या कक्षे पलिकडे तीनच अप्रकाशित ग्रह असल्याचे मानतो. **ओ ओ** किंवा **मेलोडिआ** हा ग्रह **ल क्रॉ**च्या पलिकडे असून तो आपली सूर्याभोंवतालची प्रदक्षणा २९७ वर्षांमध्यें करीतो. याची वार्षिक गति १ अंश १२ विकला

व ४४ कला आहे. व १९०५ च्या नव्हेंबर महिन्यामध्यें कुंभेच्या १७ अंश ४५ कला व १६ विकलेमध्यें होता. दिन गृह वृषभ; रात्री गृह धनु; उच्च राशि सिंह. या ग्रहामध्यें दोन भाग तेज तत्वाचें व एक भाग वायुतत्वाचा असून स्वभाव धर्मानें गुरु आणि शुक्र व कांहींसे रवीचे धर्म असणारा ग्रह आहे. हा ग्रह दिर्घायुषत्व व आकर्षण शक्ति यांचा कारक आहे. हा शुभ असून समृद्धिकरणारा आहे. The nature of Ov-O is to give longivity and magnetic power it is of the nature of this Earth fertile and grand benefic.

अगदीं अलीकडे मिस्टर डंकन मॅकनाटन या प्रसिध्द संशोधक ज्योतिर्विदानें खालीलप्रमाणें दोन नुतन ग्रह सुचविले आहेत.

(१) **जसन**:—हा ग्रह शनि आणि युरेनेस किंवा प्रजापति यांचेमध्यें आह, हा १०० वर्षामध्यें८०१ अंश चालतो. व सरासरी सूर्याभोंवतालची आपली प्रदक्षणा ४५ वर्षामध्यें पुरी करतो. **हा ग्रह धनुराशीचा अधिपती आहे.** खालीलप्रमाणें इसवी सन १८०० पासून प्रत्येक दशकातील याचा सूर्यमध्यस्त स्थिति आहे.

जानेवारी १ ली सन	१८००	कर्क	२.७	अंश
,,	१८१०	कन्या	२२.८	,,
,,	१८२०	धनु	१२.९	,,
,,	१८३०	मीन	३.०	,,
,,	१८४०	वृषभ	२३.१	,,
,,	१८५०	सिंह	१३.२	,,
,,	१८६०	वृश्चिक	३.३	,,

जानेवारी १ ली सन	८६५	धनु	१३.३५	अंश
"	१८७०	मकर	२३.४	"
"	१८७५	मीन	३.४५	"
"	१८८०	मेष	१३.५	"
"	१८८५	वृषभ	२३.५५	"
"	१८९०	कर्क	३.६	"
"	१८९५	सिंह	१३.६५	"
"	१९००	कन्या	२३.७	"
"	१९०५	वृश्चिक	३.७५	"
"	१९१०	धनु	१३.८	"
"	१९१५	मकर	२३.८५	"
"	१९२०	मीन	३.९	"
"	१९२५	मेष	१३.९५	"

वर दिलेले अंश हे सूर्यामध्यस्त पध्दतिप्रमाणें आहेत व हे स्थूल रीतीनें भूमध्यस्थ करून घेणें असतां खालीलप्रमाणें संस्कार देऊन घेणें.

या ग्रहाची सूर्याबरोबर युति किंवा प्रतियोग होत असतां जी क्रांतिवृत्ताध्यें स्थिति असते तीं भूमध्यस्थ व सूर्यमध्यस्त सारखीच असते म्हणून भूमध्यस्थ ग्रह करून घेण्याकरितां

युतिनंतर एक महिन्याची स्थिति पाहिजे असतां १.३२ अंश सूर्यमध्यस्थ स्थितिमध्यें मिळविणें.

युति पूर्वी एक महिन्याची १.३२ अंश कमी करणें.

युति नंतर दोन महिन्यांची स्थिति पाहिजे असतां २.३८ अंश सूर्यमध्यस्त स्थितिमध्यें मिळविणें.

युति पूर्वी	दोन महिन्याची	२.३८	वजा करणें	"
युतिनंतर	३ महिन्यांची	३.८	मिळविणें	अंश
" पूर्वी	३ "	३.८	अंश	कमी करणें
" नंतर	४ "	२.४५	अंश	मिळविणें
" पूर्वी	४ "	२.४५	अंश	कमी करणें
" नंतर	५ "	१.४१	अंश	मिळविणें
" पूर्वी	५ "	१.४१	अंश	कमी करणें

उदाहरणार्थ आपणाला **जसनची** १९२३ च्या पहिल्या जानेवारीची भूमध्यस्त स्थिति पाहिजे आहे. हा ग्रह १९२० च्या पहिल्या जानेवारीला सूर्यमध्यस्त स्थितिप्रमाणें मीन राशीच्या ३.९ अंशामध्यें होता. याची वार्षिक गति ८.०१ अंशाप्रमाणें तीन वर्षाची २४.०३ अंश होते व तीवरील १९२० च्या जानेवारीच्या १ ल्या तारखेच्या स्थितीमध्यें मिळवितां मीन २७.९३ = मीन २७ अंश ५६ कला असा सूर्य मध्यस्त आला. आंता येवढाच रवि ज्या दिवशी होईल तेव्हांच त्याची रविबरोबर युति होईल. व रवि मीन २७ अंश ५६ कले मध्यें मार्च महिन्यामध्यें होता व या तीन महिन्यामधील या ग्रहाची गती लक्षांत घेता याची रविबरोबर युति मीन राशीच्या २९ अं. ४२ कलेमध्यें तारीख २१ मार्च रोजी सकाळी होते. १ ली जानेवारी ही तारीख या युतिपूर्वी सरासरी २ महिने २० दिवसांनी येत असल्यामुळें आपणाला सरासरी

३ अंश कमी केले पाहिजेत. म्हणजे १ ली जानेवारी १९२३ रोजीं **जसनचो** भूमध्यस्त स्पष्ट स्थिति सरासरी मीन राशीच्या २५ अंशामध्यें येते.

(२) **प्लुटो**:----हा ग्रह **कर्क** राशीचा अधिपती असून सन १९२२ मध्यें सरासरी सिंह राशीच्या २५ व्या अंशामध्यें होता. याची वार्षिक गति .२६३५ अंश आहे. खालीलप्रमाणें याची निरनिराळ्या वर्षामधील स्पष्ट स्थिति आहे. व ही अंश कला विकला याप्रमाणें न देतां अंशाचे दशांश विभागानें दिलेली आहे.

सन	१८००	जानेवारी १ ली.	सिंह	०.७८५ अं.
,,	१८१०	,,	,,	३.४२० अं.
,,	१८२०	,,	,,	६.०५५ अं.
,,	१८३०	,,	,,	८.६९० अं.
,,	१८४०	,,	,,	११.३२५ अं.
,,	१८५०	,,	,,	१३.९६० अं.
,,	१८६०	,,	,,	१६.५९५ अं.
,,	१८७०	,,	सिंह	१९.२३० अं.
,,	१८८०	,,	,,	२१.८६५ अं.
,,	१८९०	,,	,,	२४.५०० अं.
,,	१९००	,,	,,	२७.१३५ अं.
,,	१९१०	,,	,,	२९.७७० अं.
,,	१९२०	,,	कन्या	२.४०५ अं
,,	१९३०	,,	,,	५.०४० अं.

असो; या प्रमाणें पाश्चिमात्य ज्योतिर्वाङ्मयामध्यें असलेला अप्रकाशीत ग्रहासंबंधाची माहिता एकत्र करून वाचकांचे पुढें मांडला आहे व तीच्यावर ते विचार करून आपापला मतें मालेमध्यें प्रसिध्द करतील अशी आशा आहे.

रा. रा. सगणें यांचा हर्शल, नेपच्यून, इसिस व ओसरीस यांच्या निज--उच्च---नीच राशीवरील एक लेख आजच्या अंकामध्यें प्रसिध्द करण्यात येत आहे त्यावरून आपणाला या नुतन ग्रहासंबंधानें आणखी पुष्कळच नवीन कल्पनाकरितां येतील. रा. सगणें याचा लेख फारच महत्वाचा असा आहे. चालू अंकामध्यें प्रसिध्द होत असलेलें अप्रकाशीत ग्रहांसंबंधाचे दोन लेख वाचकांना पुष्कळच नवीन माहिती देतील. **इसिस** संबंधानें मराठी ज्योतिर्वाङ्मयामध्यें एक लेख रा. ना. स. मराठे यांनीं योगमालेमध्यें सन १९१८ सालीं प्रसिध्द केला आहे. त्यातील पहिल्या दोन प्यारिग्राफ मधील मजकूर पुष्कळच विसंगित व चुकलेला आहे असें आज प्रसिध्द होत असलेल्या लेखावरून सहज कोणाच्याही लक्षांत येईल.

ताजिक पध्दतीचें वर्ष कुंडलीमध्यें जन्म कुंडलीमधील लग्न कोठें पडतें हें दाखविण्याकरितां उपयोगामध्यें आणलेल्या "**मुंथेचा**' किंवा 'मुंथा' या शब्दाचा व इसिसच्या संबंध खास नाहीं. इसिस हा ग्रह जड द्रव्याचा आहे. तो अद्यापि दृष्टिगोचर झालेला नाहीं. जन्मकालचे पूर्वक्षितिजावर उगवत असणारा क्रांतिवृत्ताचा भाग किंवा अंश वर्ष कुंडलीमध्ये लग्न कोठें येतो याचाच बोध मुंथेवरून होतो. यापेक्षां मुंथा या शब्दामध्यें एखाद्या अप्रकाशीत ग्रहाचा बोध होत असेल असें वाटत नाहीं.

———o———

फलज्योतिष.

लेखांक २ रा.

(लेखकः—एम. डी. सगणे.)

फलज्योतिषशास्त्र खरें आहे, त्याचा थोडाबहुत अभ्यास केल्यानें आक्षेपकाना त्याचे सत्यत्व पटेल यात शंका नाहीं हें आम्ही मागें सांगितलेंच आहे. फलज्योतिषाचे सत्यच पटविण्यास अनेक दाखले देतां येतील व पुढें ते देऊंहि. पण सध्या एवढें सांगून ठेवलें पाहिजे कीं, अगदी अर्वाचिन हिशेबानें जरी पाहिलें तरी हें शास्त्र कमीतकमी ४६०० वर्षांपूर्वी निर्माण झालेलें आहे असें निश्चत म्हणता येतें. तेव्हां पासून तें अस्तित्वात आहे, जवळ जवळ ५००० वर्षें तें जिवंत आहे, मृत झालें नाही. हाच एक त्याच्या सत्यत्वाचा, सर्वस्वी जरी नव्हे तरी, बराच सबळ पुरावा आहे. ज्यांत सत्य नाहीं तें इतकें चिकाटीनें टिकणे शक्य नाहीं. आक्षेपकांनीं या शास्त्राचा अभ्यास केल्यास, आमच्या नुकत्याच वाचण्यांत आलेल्या वाक्यांतील अनुभव त्यांनां खात्रीनें येईल.

"No one who has gone to the trouble of seriously studying & testing Astrology have ever remained a scoffer & unbeliever for although many have investigated with the hope of mocking they have always remained to pray."

असो; इतर आक्षेपाकडे वळण्यापूर्वी असे आक्षेप--विशेषतः फलज्योतिष सत्य नाहीं असें--कां येतात ह्यांकडे वळू. प्रथम हें सांगणें इष्ट आहे कीं, जें ज्योतिषशास्त्र खोटें आहे असें म्हणतात त्या सर्वांनाच तसें म्हणण्यास किंचितहि वास्तवीक कारण नाहीं असा आमचा आशय नाहीं बरीचशीं कारणें आहेत व असतील; पण त्यांचा त्यांनीं नीट विचार केलेला दिसत नाहीं.

आज फलज्योतिषशास्त्रास कोणत्याच प्रकारचा आश्रय नसल्यामुळें त्याची बरीच अवनति झाली आहे. ज्या विशिष्ट वर्गात ह्या विषयाचें ज्ञान असेल असें समाजास साहजिक वाटते त्यांत तें ज्ञान फारसें शिल्लक राहिले नाहीं. किंबहुना त्याला ते संपादन करून घेण्याची संधी मिळत नाहीं ज्याचे घराच्या चौदिवालीपलिकडे विश्वाचें ज्ञान जाऊ शकत नाहीं, ज्याना पोटाची खळगी 'येनकेन' प्रकार भरावी लागते, यजमानाला ह्यावेळीं अमुक भविष्य सांगण्यांत आपलें कल्याण आहे असें प्रामाणिकपणें ज्याना वाटतें, अगर फाटक्या पंचांगावरील ग्रह राशी बोटावर मोजून टिचकी सारखें भविष्य सांगून आपली दिडदिडकी वसूल करणाऱ्याचें भविष्य कसें व कोटपर्यंत खरें ठरणार! अर्थात भविष्यें खोटी ठरतात व समाजाचा फलज्योतिषावरील विश्वास डळमळूं लागतो. पण यांत दोष कोणाचा ? शास्त्राचा खास नव्हे हे कोणीहि कबूल करील.

पुरतेपणी अभ्यास केलेला ज्योतिषी अगदी ततोतंत भविष्य सांगूच शकेल असेंहि पण आमचें म्हणणें नाहीं. ज्या गोष्टी आपण व्यवहारात प्रत्यक्ष पाहतो व ज्याचा आपल्यास आपल्या इच्छेप्रमाणें वाटेल तसा अनुभव घेता येतो असे आपण म्हणतो असल्या सर्वच गोष्टींत आपला निर्णय अगदीं बरोबर असतों असें नाहीं. एकाच वेळीं एकाच वस्तूविषयीं दोन किंवा अधिक मते अथवा निर्णय असू शकतात. कोणी सोनें Element आहे असें म्हणतो तर तितकाच विद्वान पुढें येऊन ते compound आहे असें म्हणतो. एक परमाणूक वादाचे (atomic theory चें) गोडवें गातो तर लगेच दुसरा Electron चें घोंडे पुढें ढकलतो. कायद्यामध्यें तरबेज असलेले जज्य ज्याला देहांत प्रायःश्चिताचो शिक्षा ठोठावतात त्याला वारेल कोर्ट निर्दोषी म्हणून मृत्युमुक्तच नव्हे तर

बंधमुक्तहि करतें. एकाच दर्ज्याचे लोकांतहि असाच मतभेद होतो. आणि Decenting notes निर्माण होतात. अशा एक नाहींत हजारो गोष्टी होतात. आणि सत्य कांहीं निराळेंच असतें असें असून ह्या सर्व लोकांचा मानमरातब राहून त्या त्या शास्त्राची इभ्रत--आज खरें मानलेलें उद्या खोटें होत असताही--यत्किंचितहि कमी होत नाहीं. व सर्व व्यवहार आहेत तसे चालचात. मग लाखो मैल दूरवर असलेल्या ग्रहतारांगणांचा गोष्ट कशी असूं शकेल? त्याचा आपल्यास इच्छेस येईल तसा अनुभव घेता येत नाहीं. मेष राशींत असलेल्या एखाद्या ग्रहास ताडकन वक्री करून कुंभेत आणता येत नाहीं. हजार वर्षांपूर्वीची ग्रहमालेची स्थिती तशीच कायम आहे असें म्हणतां येत नाहीं. सूर्यासारख्या गोलातहि काल मानानें उष्णता इत्यादि गुणांत फरक पडत आहे. क्रांतिवृत्ताचा कोन स्थीर नाहीं. संपात चलन पावतो. ज्याना आपण स्थीर समजतो त्याहि ताराचालत पावतात. * म्हणून १००० वर्षांपूर्वी निश्चित केलेल्या फलांत थोडाबहून फरक पडणार आपल्या ताब्यांत नसलेल्या वर दर्शित केलेल्या गोष्टी सारख्या कारणामुळें जर कांहीं वेळां किंवा काहीं ज्योतिषाच्या फलादेशांत किंवा मतांत फरक पडला तर इतर शास्त्राना क्षमा करणारी टीका त्राटिका फलज्योतिषाच्या मागेच कां. एकसारखो हात धुवून पाठीस लागावी हे समजत नाहीं. कंटकात जसा बोचण्याचा जन्मस्वभाव असतो तसाच कंटक काढण्याचाही असतो. हें मात्र विसरूं नये.

कोणत्याहि शास्त्रात मतभेद असतात व मानवीशक्ति अपुर्ण असल्यामुळें ते राहणारच; ज्योतिर्विदांच्या मतात फरक आहेत. ते पाश्चात्त देशांत, आहेत हिंदुस्थानांतहि आहेत. हिंदुस्थानांत सध्यां विशेष मत भिन्नता म्हणजे सायन निरयणाविषयीं आहे. सायन निरयन भेदानें दृष्टी व स्थान-

* अर्थात ह्यापैकीं कांहीं फरक इतके थोडे असतात कीं हजार दोनहजार वर्षांनींच त्यांचा स्पष्ट मागमूस लागतो.

फलें (म्हणजे कमीत कमी शेकडा ६० ते ७० फलें) सारखी यावयाची पण जेथें फलें राशीवरून व स्थानाधिपतिवरूनच वर्तविण्याचा प्रसंग येतो तेथें राहिलेल्या शेकडा ३० ते ४० पैकीं जवळ जवळ $\frac{2}{3}$ फलें अगदी भिन्न येतात. असे किंवा वर दिलेले कांहीं फरक येतात म्हणून ज्योतिषशास्त्र गर्ह्य आहे असें ठरले काय? अथवा असें फरक पडूं अगर येऊं नयेत म्हणून त्या बिचाऱ्या संबंध शास्त्राच्याशास्त्राला उचलून त्याला दफनविधी देणें बरोबर व समंजत पणाचे हाईल काय? अर्थात नाहीं. वाजवी व संमत मार्ग म्हणजे त्या शास्त्राचे संशोधन हा होय.

प्रत्यक्ष शास्त्र संशोधन केव्हांहि ज्योतिर्विदाकडेच राहील व त्यांनीं तें अवश्य केलें पाहिजे. बाकीचे मुद्दे जसें हातात घ्यावयाचें तसेच सायननिरयन वाद पक्षाभिमान सोडून हातात घेतला पाहिजे. दोन्ही मतांतील कमीतकमी ३८ ज्यतिर्विदांनीं प्रत्येकीं निदान शंभर कुंडल्यांचा दोन्ही दृष्टीनें विचार करून चांगला खल केल्यास खरें काय तें निष्पन होईल. (अर्थात कुंडल्या घ्यावयाच्या त्या होऊन गेलेल्या पुरुशांच्या व ज्यांत राशि व स्थानाधिप बदलतात अशा घेतल्या पाहिजेत.) वारंवार खल करण्याकरितां बैठकी केल्या पाहिजेत. ह्याप्रमाणें सर्व विषयांचा पंथाभिमान अथवा मताभिमान सोडून सविस्तर उपापोह केला पाहिजे.

ज्योतिर्विदांनीं काय केलें पाहिजे हें सांगितलें. तें ते करतात व करतीलहि आक्षेपकांनी व इतर देशहितेच्छुनोहि या कार्यास मदत केली पाहिजे. मग तो मदत विचारविनिमयाची, अंगमेहनतीची किंवा द्रव्याची किंवा कशीहि असो. शास्त्रसेवा अमुकच तऱ्हेनें केली पाहिजे असें नाहीं. पण आज कालची स्थिती पहावी तर ती फारच निराशाजनक दिसते. सुशिक्षित वर्ग ह्या शास्त्रास वर सांगितल्याप्रमाणें मानतात व सर्वसाधारण

जनता इतर बाबतींप्रमाणें ह्याहि बाबतींत उदासीन आहे. आज दक्षिणेंत नाहीं म्हणायला ज्योतिषविषयक ५-६ मासिकें आहेत. पण त्याच्या वर्गणीदारांची संख्या बोटावर मोजण्याइतकी चिमुकली दिसते. मग शास्त्रोन्नति कशीं बरें होणार ! हा प्रश्न आक्षेपकांनी हातीं घेतल्यास किती तरी फायदा होण्यासारखा आहे !

———:o:———

हर्शल नेप्च्यून इसिस् आणि ओसिरिस् व त्यांच्या निज-उच्च-नीच राशी.

(लेख १ ला.)

(लेखक:—एम्. डी. सगणे एम्. ए. एल्. एल्. बी.)

विश्व हें अगाध आहे, तरीपण त्यांतील व्यवहार विविक्षित नियमानुसार चालत आहेत असें दृष्टीस पडतें. वरवर अवलोकन करणाऱ्याला देखिल त्यांत संख्या गणिताचे, किंवा भूमितीचे कांहीं तरी आखांडे बसले आहेत असें दिसल्यावांचून राहणार नाहीं. ह्या विविक्षीत नियमांचे सूक्ष्म अवलोकन करूनच तज्ञांचा "God geometrizes" असा सिध्दांत काढला आहे. संसारातील प्रत्येक बाबतींत, आणि सर्व शास्त्रांत हा सिध्दांत लागूं पडतो. फलज्योतिष ह्या सिध्दांताला अपवाद होऊं शकत नाहीं. ह्या सिध्दांतात अंतर्भूत असलेल्या कल्पनेची मदत घेऊन हर्शल नेप्च्यून इसिस आणि ओसिरिस ह्या ग्रहांच्या निजउच्च--नींच राशी व त्या प्रमाणेंच त्यांचे गुणधर्म प्रस्थापित करण्याचा प्रयत्न ह्या लेखांत केला आहे.

वर दिलेल्या तत्वाच्या दृष्टानें खाली दिलेली श्रेढी फार महत्वाची व विचार करण्यासारखी आहे.

चं.	र.	बु.	शु.	मं.	गु.	श.
४	५	६	७	८	९	१०

ग्रहांचा अनुक्रम त्यांच्या गतींच्या अनुक्रमाप्रमाणें आहे. व त्यांच्या खालीं दिलेले अंक त्यांच्या स्वराशी दर्शवितात, चंद्र व रवि हे फलज्योतिषाचे आधारबिंदु आहेत, म्हणून ह्या व पुढील श्रेढींत त्यांना निश्चित व कायम धरले आहेत.

वर दिलेली श्रेढी अतिशय सार्वी गणितश्रेढी (arithmeitalcal progression) आहे. हें स्पष्ट दिसत. ह्या श्रेढींत अर्थात बु. शु. मं. गु. श. ह्याच्या दोन स्वराशींपैकी एकच स्वराशी घेतलेला आहे. पण चंद्र व रवीच्या डाव्या बाजूला हे ग्रह दिलेल्या अनुक्रमांत मांडून त्यांच्या राहिलेल्या स्वराशी जर त्यांच्या खाली मांडल्या तर वर निर्दिष्ट केलेली गणितश्रेढी राहिलेल्या स्वराशींनाहि लागूं पडते हें तक्तांच दिसून येईल. जसें

श.	गु.	मं.	शु.	बु.	चं.	र.	बु	शु.	मं.	गु.	श.
११	१२	१	२	३	४	५	६	७	८	९	१०

ह्या वरून असें स्पष्ट निष्पन्न होते कीं जर चंद्र व रवीच्या दोन्ही बाजूस इतर ग्रह त्यांच्या गतींच्या क्रमानें मांडले तर त्याच्या स्वराशी गणित श्रेढीच्या क्रमानें असतात. व तो क्रम एका राशीनें वाढत असतो. ही श्रेढी जर दोन्ही बाजूला अशीच वाढवीली व हर्षल, नेपच्युन, इसिस, ओसिस, हे ग्रह त्यांच्या गतीच्या क्रमानें मांडले तर त्या ग्रहांच्या स्वराशी ओघानेच निश्चित झाल्याच पाहिजत व होतात. तें असें:--

ओ.	इ.	ने.	ह.	श.	गु.	मं.	शु.	बु.	चं.
७,	८,	९,	१०,	११,	१२,	१,	२,	३,	४,
र.	बु	शु.	मं.	गु.	श.	ह.	ने.	इ.	आ.
५,	६,	७,	८,	९,	१०,	११,	१२,	१,	२,

शेवटीं हे प्रस्थापित झाले कीं

हर्शलच्या स्वराशी १० व ११. इसिसच्या स्वराशी १व८

नेपच्यूनच्या ,, ९, व १२. ओसिरिसच्या ,, २व७ आहेत.

ग्रहांच्या उच्च राशीमध्यें असाच कांहीं तरी क्रम असला पाहिजें अशी कल्पना करणें व त्या कल्पनेप्रमाणें त्या उच्च राशी शोधून काढणें शक्य दिसते. वर दिलेल्या गतीक्रमानें शनिपर्यंत ग्रह मांडून त्यांच्या खाली त्यांच्या उच्च राशी मांडल्या म्हणजे पुढील श्रेढी तयार होते.

श. गु. मं. शु. बु. चं. र. बु. शु. मं. गु. श.
७, ४, १०, १२, ६, २, १, ६, १२, १०, ४, ७,

चंद्र व रवि कायम व निश्चित म्हणून सोडले म्हणजे बुधा पासूनच्या ग्रहांच्या उच्च राशित ६,२,६,३, असा राशींचा फरक दृष्टीस पडतो. आपणास आतां अशी कल्पना करतां येईल कीं श्रढी वाठविली असतां हा फरक ६,४,६,५ राशींचा किंवा पुन्हां ६,२,६,३ राशींचा असू शकेल.

खरोखरी श्रेढी कोणत्या प्रकारें वाढेल हें निश्चित करण्याकरितां आपण पुढें दिलेल्या चमत्कारिक श्रेढींचा उपयोग करूं ह्या श्रेढींनें मागच्या ५ उच्च राशींवरून पुढची सहावी उच्च राशी कोणती असेल हें काढतां येईल. राशि फक्त बाराच असल्याकारणानें आलेलें उत्तर १२ पेक्षां ज्यास्त असल्यास त्यांतून १२ वजा केले पाहिजेत हें सांगावयास नको. तें असें:----

ग्रह	उच्च राशि			ग्रह	उच्च राशि		
बु.	६			शु.	१२		
	=६				=२		
शु.	१२	=८		मं.	१०	=८	
	=२	=१६			=६	=१७	
मं.	१०	=८		गु.	४	=९	
	=६	=१७			=३	=१८	
गु.	४	=९		श.	७	=९	
	=३	=१८			६=	=१९	
श.	७	=९		ह.	१	=१०	
	=६				=४		
जे उत्तर पाहिजे-ह.	१३			ने.	९		

अर्थात हर्शलचो उच्च राशि मेष १ (१३-१२ झाली.)

अर्थात नेपच्युनची उच्च राशि सिंह ५ झाली.

ह्याप्रमाणें फरकाचा क्रम ६,४,६,५ झाला. ह्या फरकान्वयें व वरील चमत्कारिक श्रेढीप्रमाणें इसिस व ओसिरिसच्या उच्च राशी अनुक्रमें ११ व ४ येतात. म्हणजे आपणास पुढीलप्रमाणें उच्च राशींचा श्रेढा मिळते.

ओ. इ. ने. ह. श. गु. मं. शु. बु. चं. र. बु. शु. मं. गु. श. ह. ने. इ. ओ.
४, ११, ९, १, ७, ४, १०, १२, ६, २, १, ६, १२, १०, ४, ७, १. ९, ११, ४.

(अर्थात वरील ग्रहांची नीच राशि पाहिजे असतां वरील उच्च राशि समोरील सातवी राशि घेणें.) एकंदरीत

हर्शलचो	उच्चराशी १,	नीचराशी	७.
नेपच्यूनची	,, ५,	,,	११.
इसिसची	,, ११,	,,	५.
ओसिरिसचो	,, ४,	,,	१०.

वर दिलेली रीत उत्पन्न होणाऱ्या किंवा शोधल्या जाणाऱ्या ग्रहास लागूं पडेल यांत शंका नाहीं. स्व--उच्च--नीच राशींवरून ग्रहांच्या गुणधर्माचा बऱ्याच अंशी कयास करतां येतो. ह्याविषयीं पुढें लिहूं व अनुभवात्मक फलेंहि देऊं.

बुधकृत सूर्यग्रहण

ग्रहणाचा चत्मकार कसा घडतो वगैरे संबंधानें माहिती ज्योतिर्मालेच्या वाचकांस असेल असें गृहीत धरून चालू मे महिन्याच्या ८ व्या तारखेच्या सुमारास सूर्यबिंबावरून बुधाचे अधिक्रमण होणार आहे यासंबंधानें चालू अंकामध्यें चार शब्द लिहोण्याचा विचार आहे.

सूर्याभोवतीं जे ग्रह फिरतात त्यांत **बुध** हा सूर्याच्या अगदीं जवळ आहे. **बुध** आणि **शुक्र** हे आपण (पृथ्वी) आणि सूर्य यांचेमध्यें आहेत. आणि म्हणून यांस **अंतर्वर्ती ग्रह** म्हणतात. इतरांस----

मंगळ गुरु शनि, हर्शल, व नेपच्युन यांस **बहिर्वर्ती ग्रह** म्हणतात. बुध आणि शुक्र, आपणास नेहमीं सूर्याच्या जवळ दिसतात. सूर्यापासून बुध फार तर १८ पासून २७ अंशपर्यंत दूर गेलेला असतो.

या दूरजाण्यास **इनापगम** म्हणतात्. परम इनापगमाच्या वेळीं बुध किंवा शुक्र वस्तुतः सूर्यापासून किंवा आपल्या पासून परम अंतरावर असतात असें नाहीं. ते आपापल्या कक्षेंत उच्चीं असतात तेव्हां सूर्यापासून फार दूर असतात.

सूर्यापासून बुध सरासरी ३॥ कोटी मैलांवर आहे. तो सूर्याभोंवती ८८ दिवसांत फिरतो. त्यांत तो कधीं सूर्य व पृथ्वी यांचेमध्यें येतो, तेव्हां बुध सूर्याचा **अंतर्योग** झाला असें म्हणतात. व तेव्हां तो आपणास फार जवळ असतो. कधीं तो व आपण यांचेमध्यें सूर्य येतो तेव्हां **बहिर्योग** झाला असें म्हणतात. तेव्हां तो आपणास फार लांब दिसतो.

बुध सूर्याचा अंतर्योग होतो तेव्हां कधीं कधीं सूर्याच्या थेट आड बुध येतो. चंद्राच्या योगानें सूर्यास ग्रहण लागतें त्याप्रमाणेंच हें ग्रहण बुधानें होते. यांस **अधिक्रमण** म्हणजे सूर्याच्या बिंबावरून जाणें असें म्हणतात. गेल्या १८९१ च्या मे महिन्याच्या १० व्या तारखेस सकाळीं बुधाचें अधिक्रमण झालें होतें. तेव्हां दुर्बिणींतून सूर्यावर एक लहान अगदी वाटोळा काळा ठिपका दिसला. बुधाचें बिंब फार लहान असल्यामुळें नुसत्या डोळ्यानीं हा चमत्कार दिसत नाहीं. असेंच एक अधिक्रमण तारीख ८ मे १९२४ रोजीं सकाळीं ६ वाजून ३३ मिनिटांनीं घडेल. फलज्योतिष वाङ्मयामध्यें ग्रहणें ही अत्यंत महत्वाची आहेत. विशेषतः राष्ट्रीय ज्योतिष किंवा मेदिनीय ज्योतिषामध्यें ग्रहणांचे महत्व कितीं आहे यासंबंधानें येथें निराळे सांगण्याची जरूरी दिसत नाहीं. चंद्र ग्रहणापेक्षां सूर्यग्रहणें हीं फार

महत्वाचीं असतात. व तसेंच हे बुधकृत सूर्यग्रहण कां मानुनये? यासंबंधानें आपले कडील जुन्या वाङमयामध्यें कांहींच विशेष माहिती मिळत नाहीं. बुधाचा उदय व अस्त होतेवेळीं हवेमध्यें मोठमोठाले फेरफार होतात असें वराहानें आपल्या बृहतसंहितेमध्यें सांगितलें आहे. बुध हा व्यापारी वर्ग व व्यापार याचा कारक असल्यामुळें वरील धोरणानेंच व्यापारी भावामध्यें बुधाचे उदय अस्ताचे वेळीं मोठे फेरफार होतात असें पुष्कळ ज्योतिर्विदांचे मत आहे. बुधाचा उदय व अस्त हें बुधाची रवि बरोबर युति होण्याचे सुमारासच घडत असतात व या सुमारास व्यापाराचे भावामध्यें पुष्कळ वेळां फरक झालेले पाहण्यास मिळतात. व या दृष्टीनें रवि बुध युति महत्त्वाची आहे. जसें सूर्यग्रहण अमावास्येच होते व चंद्र ग्रहण पौर्णिमेच्या होते तसेंच बुध कृत सूर्यग्रहण बुधाचे **अंतर्योगावर** किंवा लहान योगावर (Inferior Conjunction) वरच होते. **अंतर्योग** हा जर अमावास्येबरोबर ठरतो तर **बहिर्योग**(Superior Conjunction) पौर्णिमेबरोबर ठरतो. व जशा अमावास्या New moon आणि पौर्णिमा Full Moonकालच्या कुंडल्या मेदिनीय किंवा राष्ट्रीय ज्योतिषामध्यें महत्वाच्या आहेत तशाच तद्धेनें रविबुध युतिकालची कुंडली कां मानु नये? बुधाचा व वातवरणाचा फारच निकट संबंध आहे, रविबुध युतिवरच सर्व पावसाचे भविष्य अवलंबून आहे असें रा. रा. बापट यांनीं **नुतन पर्जन्य विचार** नामक पुस्तकामध्यें सिध्द केलें आहे. त्या दृष्टीनें विचार करितां ज्या वर्षी असें रवीवरून बुधाचे अधिक्रमण होते त्या वर्षामध्यें वातवरणामध्यें फार मोठया घडामोडी कां घड् नयेत. पावसासंबंधानेहो ते वर्ष अत्यंत महत्वाचे गेलें पाहिजें असे म्हणणें ओघानें येते. रवि बुधाचा अंतर्योग व रवीवरून बुधाचें अधिक्रमण होणें या मध्यें खात्रीनें भेद आहे. व म्हणून चालूवर्षी बुध हा

ज्या ज्या गोष्टींचा कारक आहे त्यामध्यें विशेष महत्वाचे फेरफार पाहण्यास मिळाले पाहिजेत. बुध हा वाङ्मय, लेखक वर्ग, वर्तमानपत्रें, पोस्ट, टेलीग्राफ, टेलिफोन. वाहतुकीचे साधनें, व्यापार, व्यापारीवर्ग, कागदी नाणे जसे शेअरस वगैरे यांचा द्योतक आहे. चालूवर्षी बुधाचे अधिक्रमण तारीख ८ मे रोजीं होते त्यावेळीं बुध हा नेपच्यून व मंगळाबरोबर अशुभसंबंधीत असल्यामुळें वर दर्शविलेल्या गोष्टीमध्यें अनिष्टच प्रकारच्याच घडामोडी झाल्या पाहिजेत.

खालीलप्रमाणें बुधकृत सूर्यग्रहणें किंवा रवीच्या बिंबावरून बुधाची अधिक्रमणें पाठीमागें झालीं व पुढें होतील. व त्यावरून त्यांच्या फलासंबंधानें आपणांस कांहीं कल्पना करितां यईल.

सन	महिना	तारीख	घटिका	पळें
१८९४	नोव्हेंबर	१०	४४.	७
१९०७	,,	१४	२८.	० *
१९२४	मे	८	१.	३२ *
१९२७	नोव्हेंबर	१०	११.	५५ *
१९४०	,,	११	५६.	७
१९५३	,,	१४	३९.	५३
१९५७	मे	६	०.	३७ *
१९६०	नोव्हेंबर	७	३९.	५५
१९७०	मे	९	१८.	३३ *
१९७३	नोव्हेंबर	१०	२४.	५ *
१९८६	,,	१३	८.	५ *
१९९३	,,	६	७.	३५ *
१९१९	,,	१५	५१.	५०

* ही खुण ज्यांचे पुढें आहे ती बुधकृत अधिक्रमणें आपलेंकडे दिसतील.

॥ श्रीसद्गुरवे नमः ॥

ज्योतिर्माला

आग्राचः कामरूपाद्दुहिणसुतनदप्लावितादाप्रतीचो
गान्धारात् सिंधुसार्द्राद्रघुवररचितादाचसेतोरवाचः ।
आकेदारादुदीचस्तुहिनगहनतः सन्तिविद्वत्समाजा
ये ये तानेष यत्नः सुखयतु समजान्कश्चमत्कर्तुमीष्टे ॥ १ ॥

अभिनवाऽऽवृत्ति वर्ष ८ वें अंक ९ ते ६.

फलज्योतिष

लेख ३

(लेखकः-एम्. डी. सगणे. एम. ए. एल एल बी.)

कित्येक आक्षेपक असें म्हणतील कीं 'फलज्योतिषशास्त्र' खरे आहे असें जें म्हणतां त्यांत मुळीं दोन गोष्टी अभ्याहृत घेतल्या आहेत. फलज्योतिषशास्त्र आहे ही एक आणि सत्य किंवा असत्य हीं विशेषणें ज्याना लावावयाची ते परिणाम घडवून आणण्याची शक्ति राशी--ग्रहादिकांत असणें हो दुसरी गोष्ट. ह्या दोन्हीहि गोष्टी आम्ही आक्षेपक नाकबूल करतोः ठीक आहे. वास्तविक ह्या दोन्ही गोष्टी इतक्या उघड आहेन कीं फलज्योतिषाच्या थोडयाशादेखील परिचयानें आक्षेपकांच्या संशयपरिच्छेद होण्यासारखा आहे. तत्रापि त्या संबंधी थोडासा खुलासा करणें जरूर दिसतें. या लेखांत परिणाम घडविण्याची शक्यता ग्रहादिकांत आहे कीं नाहीं यांचेंच फक्त दिग्दर्शन करावयाचें आहे परिणाम कसें व कां घडतात ह्या विषयीं वेळेनुसार लिहिण्यांत येईलच.

प्रथम आक्षेपकांना हा सवाल करावयाला पाहिजे कीं या जगतांत अशी एकहि वस्तू ते दाखवूं शकतील कीं काय--मग ती लहान असो वा मोठी असो सजीव असो किंवा निर्जीव असो----कीं जिचा परिणाम जगतावर किंवा मनुष्यजातीवर मुळींच घडत नाहीं ! अशी एकहि वस्तू ते दाखवूं शकतील काय कीं तिचा कोणत्याच प्रकारचा उपयोग नाहीं म्हणजेच तिच्यांत कोणत्याच प्रकारचा परिणाम घडविण्याची शक्ति वास करीत नाहीं ! अशा प्रकारचो वस्तू शोधून काढण्याचें आक्षेपकांचे प्रयत्न वृथा जातील हें कोणीहो निश्चयानें सांगू शकेल. परमेश्वरानें निर्माण केलेल्या प्रत्येक वस्तूंत कोणती ना कोणती तरी शक्ति वास करीत असते व प्रसंगानुसार तो व्यक्त होऊन जगतावर परिणाम घडविते. मग तो परिणाम मनुष्याच्या देहावर, त्याच्या मनावर किंवा बध्दीवर, देशासारख्या क्षेत्रविभागावर किंवा सर्वसाधारण वातावरणावर घडत असो, किंवा आणखी दुसऱ्या प्रकारें होत असो, पण परिणाम होतो, हें मात्र खास. उदाहरणार्थ गुलाबाचें फूल घ्या. तें पाहून डोळ्यांना किती तरी आल्हाद वाटतो ! व त्याचा सुवास घेतल्यानें मनाला किती तरी गारेगार वाटतें. ! वनश्रीची शोभा पाहून कविमयूर नाचावयास लागतो, त्याचा आनंद, त्याचें प्रेम इतकें उचंबळतें कीं त्यांची हृदयांत कुचंबणा झाल्यामुळें ते शब्द सृष्टींत व्यक्त होऊं लागतें. !! निखाऱ्यावर पाय पडला असतां तो पोळतो व सर्वांगाचो लाही लाही होते. सोडियम् किंवा पोटाशीअमचा तुकडा पाण्यावर टाकला असता तो कडकडाट करून शाप देत्साता स्वतःलाच भस्म करून घेतो. वनस्पति हवा स्वच्छ ठेऊन आरोग्यवर्धक औषधींचा पुरवठा करतात. व त्याच कुजल्या म्हणजे हवेंत बिघाड करून रोगवृध्दी करतात. समुद्रासारखे जलाशय हवेचें मान समशीतोष्ण करून

समीपनिवासियांना आल्हादकारक वातावरण तयार करून देतात. पर्वतासारखे जड देही ढगांचें आकर्षण करून पर्जन्य पाडतात व त्यामुळें धनधान्याची समृध्दि होतें. हिमालयानें तर शत्रूपासून हिन्दुस्थानचें रक्षण शतकानुशतकें केलें आहे. एकूण जगांतील सर्व लहानमोठ्या चलाचल वस्तू सदा सर्वदा परिणाम करीत असतात. त्यांच्यांत अनुकूल किंवा प्रतिकूल सुखदुःखादि संवेदना उत्पन्न करण्याची शक्ति आहे.

मग ज्याचा आकार पृथ्वीपेक्षां कितो तरी पटीनें मोठा आहे अशा प्रचंड गोलांत ग्रहादिकांत असल्या प्रकारची कोणतीहि शक्ति नसेल काय ? असणें असंभवनीय आहे काय ? ग्रहगोल पृथ्वीसारखे जडगोल आहेत हें तर निर्विवाद आहे. मग मातीचा, अवाढव्य ढीग जो पर्वत तो जर मानवी सुखदुःखास कारणीभूत होऊं शकतो. तर चलन पावणारे व त्या पेक्षां कोटयवधि पटीनें मोठे असणारे ग्रह ऐहिक गोष्टींवर कांहींच परिणाम करूं शकत नाहींत असें म्हणणें प्रशस्त होईल काय ? तशांत ग्रह हे केवळ मृण्मयच नाहींत. सूर्यावर लोहजस्तादि नानाविध धातू अस्तित्वांत आहेत. त्यावर नाना प्रकारचे वायू संचार करीत आहेत. अग्नी, विद्युलता इत्यादि अनेक शक्ति तेथें प्रबल आहेत. हे सर्व प्रकार सत्य आहेत असें फलज्योतिषज्ञच म्हणत नाहींत तर अर्वाचीन पदार्थ-विज्ञान-शास्त्र-वेत्ते, टेस्टटयूबमध्यें घालून पाहिल्याशिवाय सत्यासत्याची कबुली न देणारे किंवा त्याच विचारसरणीचे पंडित आपल्या अगाध यंत्र व बुध्दी सामर्थ्यानें तेंच प्रतिपादन करीत आहेत. मग ह्या अनेक द्रव्यांचा व शक्तींचा भूतलावर कांहींच परिणाम होत नसेल काय ? निरनिराळ्या ग्रहांवरील परिस्थिति निराळी पण तत्त्व एकच.

खगोलस्थ दिव्य गोलांचे इहलोकीं परिणाम होतात. अशी कबुलीहि पण वर निर्दिष्ट केलेल्या दुर्बीण व टेस्टट्यूबवाल्या पंडितांकडून मिळतें. वंसतादि ऋतु सूर्य निर्माण करतो. त्याच्याच प्रभावानें जलाचें बाष्पीभवन होतें. पुढें ढगापासून पर्ज्यन्यवृष्टि होऊन धान्यादि सामुग्री सिध्द होते. समुद्रांतील प्रवाह सूर्याच्या सामर्थ्यावरच अवलंबून असतात. निर्मल दिसणाऱ्या सूर्य प्रकाशांतच सात रंग भरलेले असतात. व त्याच रंगाच्या योगानें जगतांतील अखिल वस्तूंना निरनिराळे रंग प्राप्त होतात. चंद्राच्या आकर्षणशक्तीमुळें समुद्रलहरी उसळतात व त्याला भरती येते. ह्या प्रकारच्या किती तरी गोष्टी दाखवितां येतील. फार कशाला आज जो पृथ्वीचा आकार आपणाला दिसतो तो सूर्याचाच परिणाम आहे असें फलज्योतिषज्ञांहून भिन्न असे शास्त्रज्ञ म्हणतात. एकंदरींत इतर गोलांचा परिणाम पृथ्वीवर होतो हें निर्विवाद आहे.

इतर गोलांचे पृथ्वीवर जर परिणाम होतात, तर मग पृथ्वीचे अंगभूत असलेल्या आपणा मानवांवर त्यांचे परिणाम अवश्यमेव घडलेच पाहिजेत हें सिध्द करण्यास फारसें विकट त्रैराशिक नको. आपल्या देहाशीं, बुध्दीशीं, व सुखदुःखाशीं त्यांचा संबंध येऊन परिणाम घडलेच पाहिजेत आणि ते घडतातच. व्यापारावर आपलें सुखदुःख अवलंबून आहे. तसेंच तें पर्ज्यन्यवृष्टीवर व तेणेंकरून येणाऱ्या पिकावरहि अवलंबून आहे. निरनिराळे ऋतु आपल्या मनावर निरनिराळे परिणाम करतात. आणि ह्या सर्व गोष्टी तर सूर्यावर अवलंबून आहेत. दिवस व रात्र हेही पण सूर्याचेंच कृत्य आहे. आतांपर्यंत सांगितलेले परिणाम मनुष्याच्या सुखदुःखाशीं थोडा दूरवरचा संबंध ठेवतात, पण याहीपेक्षां लगतचे घडणारे परिणाम दाखवितां

येतात. निरभ्र नभोमंडळांत मुदित हास्य करणाऱ्या प्रियसख्याबरोबर विहार करीत असलेल्या चंद्रास पाहून कोणाच्या बरें हृदयांत क्षणभर प्रेमरस व आनंद लहरी उत्पन्न होणार नाहींत ! उलट पौर्णिमा--अमावास्या--ग्रहण--पर्वकाळीं रोग्यांची प्रकृति ज्यास्त बिघडलेली दिसते, वेडयांचा वेडाला ज्यास्त उन्माद आलेला दृष्टीस पडतो तर कित्येकांना मूर्च्छा देखील येते. आणखी एक उदाहरण द्यावयाचें म्हणजे हे किंवा इतर हजारो रोग आजकाल डॉक्टर लोक क्रोमोपाथीनें बरें करतात हें होय. ह्या पध्दतींत निरनिराळ्या रंगांच्या कांचेंतून आलेल्या सूर्यकिरणानें पाण्याचें संचारण करणें हेंच मुख्य तत्त्व आहे.

वर दिलेले त्रोटक परिणाम फक्त रविचंद्रांचे व तेहि त्यांच्या विशिष्ट परिस्थितींचे आहेत. व तें मुद्दाम तसें समजुतीच्या सौकर्याकरितां दिले आहेत हें सांगावयास नकोच. सूर्यचंद्रांच्याच अनेक परिस्थितींचें दिग्दर्शन किती तरी करतां येईल पण तें अप्रस्तुत होईल. सूर्यचंद्र जसे परिणाम करितात तसेंच अनेक द्रव्यें ज्यामध्यें आहेत असे इतर गोल-ग्रहादिकहि भिन्न तऱ्हेनें कां होईना पण परिणाम करीत असले पाहिजेत हें आपोआपच प्राप्त होतें.

सांगण्याचें तात्पर्य एवढेंच कीं आकाशस्थ ग्रहादि गोलांत जगतांत निरनिराळे प्रकार उत्पन्न करण्याची म्हणजे मनुष्याला अनुकूल किंवा प्रतिकूल परिस्थिती प्राप्त करून देण्याची एवंच परिणाम करण्याची शक्ति आहे. हें खगोलवेत्ते, भूगोलवेत्ते, पदार्थविज्ञान--रसायनशास्त्र वेत्ते, डॉक्टरादि

अनेक वेत्ते प्रत्ययानें किंवा विचारानें कबूल करून त्याचेंच प्रतिपादन करतात. मग तीच गोष्ट जर फलज्योतिषज्ञ सांगूं लागले तर बिघडतें कुठें हेंच समजत नाहीं. फलज्योतिषज्ञ ह्या अनेक वेत्त्यांच्या पलीकडे जाऊन सांगतात कीं ह्या वेत्त्यानीं मान्य केलेले परिणाम केवळ वरवरचे आहेत व सूक्ष्म निरीक्षिण केलें असतां असें दिसून येईल कीं ग्रहादिकांच्या परिणामांचा संबंध मनुष्याच्या सुखदुःखाशीं ज्यास्त निकट आहे. संपत्ति आपत्ति जन्ममरणविवाहादि सर्व प्रकारांशीं व अध्यात्मविषयांशीं त्यांचा संबंध येतो, असें ते म्हणतात. आणि असें म्हणण्याबद्दल त्यांना शिव्याशापांचें बक्षीस मिळतें. ह्यांत फलज्योतिषज्ञांची जर कोणतो चूक झालेली असेल तर ही कीं फलज्योतिष्याचें अति ओबड धोबड वाह्यांग ज्या इतर आधुनिक वेत्त्यांना कबूल आहे ते वेत्ते आणखी ५०० किंवा १००० वर्षांनीं आपल्या यंत्रायुधांच्या सामर्थ्यानें जीं तत्त्वें व जे अनुभव शोधून काढून प्रस्थापित करणार तीं तत्त्वे व ते अनुभव ज्योतिर्विदांनी हजारों वर्षांपूर्वीच नमूद केलें आहेत. ज्योतिर्विदांच्या ह्या अक्षम्य घाईचाच इतरांना तिटकारा आलेला दिसतो. बिचारे ज्योतिर्विद ! त्यांचा तरी काय अपराध. एक युरोपीय विदुषी म्हणते:----

'If Astrology is not widly known & understood it is not an indicotion of no value but it is a sign that humanity is not yet ready to make a full use of its knowledge being still possessed with very materialistic ideals etc."

———:o:———

शुक्राची परमतेजस्विता.

रात्रीं प्रकाशणाऱ्या सगळ्या आकाशस्थ ज्योतीमध्यें शुक्रासारखे तेजस्वी आणि शुक्रासारखें सुंदर असें दुसरें कोणी नाहीं. ग्रीक पुराणामध्यें **शुक्राला–व्हिनसला**--सौख्य, सुंदरता आणि रती देवता मानलेली आहे. आणि व्हिनससारखी सौंदर्यवान दुसरी कोणतीच देवता त्यांचेमध्यें नाहीं सुंदरतेमध्यें या देवतेचा--व्हिनसचा पहिला नंबर लागतो.

आपणांपैकीं पुष्कळांना शुक्रामुळे काळोख्या रात्रीं चांदणें किंवा प्रकाश पडत असल्याचें ऐकून किंवा अनुभवानें माहित असेल. या ग्रहाचे चांदणें चंद्रा इतकें पांढरें स्वच्छ नसतें. शुक्राहून चंद्र फार मोठा दिसतो व त्यामुळें त्याचें चांदणें जास्त पडतें इतकेंच. परंतु जात्या चंद्रापेक्षां शुक्राचें तेज जास्त आहे. सूर्यापासून १२ अंशांवर चंद्र जातो तेव्हां त्याचें दर्शन आपणास होतें. परंतु शुक्र तर सूर्यापासून ८ अंशावरच दिसूं लागतो. **सूर्याच्या प्रकाशाला न जुमानतां दिवसासही दिसणारा जर कोणता ग्रह असेल तर तो सर्व ग्रहांत एकटा शुक्रच आहे.** तो पश्चिमेला उगवतो तेव्हां सकाळीं ९ वाजल्या नंतर माध्यान्हीं आलेला दिसतो. सायंकाळीं पश्चिमेस दिसतो तेव्हां दिवसास सुमारें ३ वाजल्यानंतर माध्यान्हीं येतो. चंद्र त्याचे जवळ असला तर दिवसास तो सहज दिसतो. आणि एक दिवस पाहिला म्हणजे पुढें त्या खुणेवरून चंद्र जवळ नसतांही दिसतो. शुक्राचा **परम इनापगम** (Greatest Elongation) होतो, त्याच्या मागे पुढें कांहीं दिवस तर तो फार तेजस्वी दिसतो. **बुध** आणि **शुक्र**, आपणास नेहमीं सूर्याच्या जवळ दिसतात. सूर्यापासून बुध फार तर १८ पासून २७ पर्यंत अंश दूर गेलेला दिसतो. या दूर जाण्यास **इनापगम** म्हणतात. शुक्राचा परम इनापगम ४५ पासून ४७ अंश पर्यंत आहे.

ग्रह जेव्हां अतिशय तेजस्वी असतात तेव्हां त्याच निश्चयात्मक असे कांहीं तरी ठळक फल मिळत असावे असें वाटतें. व या आमच्या विचारसरणीला वराहमिहिराच्या संहितेमध्यें बृहत आधार मिळतो.

" अणुर पटुमयूखोनीच गौन्यैर्जितोवान—
सकल फलदाता पुष्टि दोतो न्यथायः ॥ "

(बृ. सं. अध्याय २०, श्लोकार्ध २२)

बारीक झालेला, अस्पष्टकिरण, नीच राशिगत व अन्य ग्रहांनीं युध्दांमध्यें निकलेला असा जो ग्रह त्याचें शुभफल असलें तरी तो शुभफल देणारा होत नाहीं. म्हणजे याहून अन्यस्थितिमध्यें म्हणजे तेजस्वी युध्दांमध्यें विजय पावलेला ग्रह शुभफल देतो. म्हणजे ग्रह जेव्हां पुष्कळ तेजस्वी असतात तेव्हां ते बलवान असून शुभ किंवा अशुभ फल जास्त तीव्रतेनें देतात. या विषयाकडे आमच्या ज्योतिर्विद् बंधुचे अद्यापा लक्ष गेलेले नाहीं. या संबंधानें अजून संशोधन झाले पाहिजे. **शुक्र** हा या दृष्टिनें विचार करण्यासारखा आहे. कारण याची तेजस्वीता सहज दृष्टिगोचर होते. इंग्रजी पंचागामध्यें शुक्राचे परम तेजस्वीतेची स्थिति Greatest brilliancy दर्शविलेली असते. हा ग्रह ज्या गोष्टींचा किंवा वस्तुचा कारक असतो तद्योतक व्यवहारामध्यें किंवा व्यापारामध्यें या सुमारास कायकाय घडामोडी होतात याकडे ज्योतिर्विदांनीं लक्ष दिलें पाहिजे.

वराहमिहिराचार्यानें बृहत संहितेमध्यें खाली गोष्टींचा कारक हा ग्रह मानलेला आहे.

" तक्षशिल मार्तिकावत बहुगिरि गांधार पुष्कलावतकाः ।
प्रस्थलमालव कैकयदाशार्णा शनिराःशिबयः ॥ १ ॥
येचपिबंतिवितस्तामिरावतींचंद्रभागसरितंच ॥
रथरजताकर कुंजर तुरग महामात्र धनयुक्ताः ॥ २ ॥
सुरभि कुसुमानु लेपन मणि वज्र विभूषणांबुरुहशय्याः ।
वरतरुण युवति कामोपकरण मृष्टान्न मधुर भूजः ॥ ३ ॥
उद्यान सलिल कामुक यशःसुखौदार्यरूपसंपन्नाः ।
बिन्नदमात्य वणिग्जन घट कृच्चित्रांडजा स्त्रिफलाः ॥ ४ ॥
कौशेय पट्टकंबल पत्रौर्णिक रौद्र पत्र चोचानि ।
जातीफलागुरुवचापिप्पल्यश्चंदनंच भृगोः ॥ ५ ॥

[बृहत्संहिता अध्याय १६ श्लोक २६ ते ६०]

तक्षशिला नगरी (ही नगरी सिंधु आणि झेलम या दोन नद्यांचे मध्यें आहे. हल्लीचे शालिधेरो) तक्षशिल राजाचा प्रदेश, ज्यामध्यें पुष्कळ पर्वत आहेत असा गांधार देश हल्लीचे कंदाहार, पुष्कलावतक--(गांधार देशाची प्राचिन राजधानी, हल्लो परांग आणि चरसहा हो गांवे त्या ठिकाणीं आहेत,) प्रस्थल, मालव--माळवा, कैकय---(पंजाबमधील बिआसनच्या पश्चिमेस असलेला प्रदेश आहे असे कांहीं म्हणतात.) दाशार्ण (हल्लोच्या मालव्याच्या उत्तरेकडील प्रदेश,) उशीनर--कंदाहर देश, शिबि (सिंधूच्या पश्चिमेकडील अत्यंत उत्तरेकडील देशाचा विभाग) हे देश, वितस्ता--पंजाबमधील झेलम नदी, इरावति--रावानदी-- पंजाब प्रांत, चंद्रभागा--चिनाब नदी--या नद्याचे पाणि पीणारे लोक किंवा या नद्याचे किनाऱ्यावर राहणारे लोक; रथ, रजत--चांदी, सुवर्ण, हिऱ्याच्या खाणी, हत्ती, अश्व, माहात, धनवान, सुगंधी द्रव्ये, पुष्पे गंधादे सुगंधी पदार्थ, पद्मरागादिमणी, हिरें, अलंकार, कमल, शय्या, उत्तम किंवा श्रेष्ठ पुरुष,

नवरा, तरुण स्त्री, कामाला उत्तेजन किंवा पुष्टी देणारे किंवा रति सौख्याची साधने, स्वच्छ अन्न सेवन करणारे, मधुर अन्नाचे सेवन करणारे, बाग, उदक, कामी पुरुष, यश, सुखऔदार्य, व रुपसंपन्न पुरुष, विद्वान, आमात्य, वाणि, उदमी लोक, कुंभार-- चित्रकार नानाप्रकारचे पक्षि, त्रिफला, रेशमी कापड, कंबल--लोकरीचे वस्त्र, धुतलेले रेशमी वस्त्र, लोध्र, तमाल पत्र, दालचिनी, जायफल, अगरु, वेखंड, पिंपळी, चंदन

या सर्व वस्तूचा स्वामी शुक्र आहे.

सर्वार्थचिंतामणिमध्यें शुक्र हा खालील वस्तूचा कारकग्रह सांगितलेला आहे.

" संगीतसाहित्यदास्यरसाद्भुतमदनयुवतिरतिकेलीविलासविचित्र चित्रकांतिः सौंदर्य युवति राजवशीकरण राजमुखवशीकरण गारुडेंद्रजाल माला वैशद्यमहदणिमाद्यष्टैश्वर्य काव्यकला संभोग कलत्रकारकः शुक्रः"

[सर्वार्थ चिन्तामणी--कारक सूत्र ५]

फलज्योतिष वाङ्मयामध्यें हा ग्रह ललितकला, सौंदर्य, विवाह, विलास, चैन, रतीसौख्य, इत्यादि विलासपर गोष्टींचा कारक मानलेला आहे. कवि, कादंबरीकार, नाटकी, शिल्पविद्या जाणणारा, कलाकुशल, चित्रकार, वादनकार, सट्टेबाज जवाहिऱ्या, चांदी वगैरे शुभ्रपदार्थांचा व्यापारी, गारूडी, फ्रेममेकर, कापडाचा व्यापार वगैरे धंदे या ग्रहांनें दर्शविले जातात. **युरोपीय ज्योतिर्विद् तांब्राकरितां हा ग्रह कारक मानतात.**

सन १९२२ च्या डिसेंबरच्या ३१ व्या तारखेला शुक्र हा परम तेजस्वी होता. तो सूर्य प्रकाशाला न जुमानतां दिवसा नुसत्या डोळ्यांनीं त्यानंतर कांहीं दिवस दिसत होता. मुंबई येथें २।३ दिवस तो पाहण्यासाठीं झुंडीच्या झुंडीं रस्त्यामध्यें गोळा झालेल्या अनेकांनीं पाहिल्या आहेत. असेंच

सन १९१४ सालीं झाले होते. त्या वेळीं प्रेक्षकामध्यें चाललेल्या चर्चेचे व या चमत्कारासंबंधीं लोकामध्यें असलेले अज्ञान हसूं येण्यासारखे होते. वर्तमान पत्रकारांना हा एक चर्चेचा विषय त्यावेळीं झालेला होता. असाच **शुक्र पुढें सन १९३० सालीं १९ अक्टोबर व २८ डिसेंबरच्या सुमारास दिसेल.**

अशा तेजस्वी शुक्राचा उदय होत असतां किंवा माध्यान्ही असतां जें बालक जन्म घेईल तें शुक्राप्रमाणेंच आपल्या गुणाचा सर्वत्र प्रकाश पाडील. चालू वर्षामध्यें २५ मे व पुन्हां ३ आगस्ट रोजीं हा ग्रह परम तेजस्वीतेमध्यें येणार आहे. ज्यांच्या धनस्थानाचा किंवा लाभाचा अधिपति शुक्र आहे किंवा धनस्थानामध्यें किंवा लाभामध्यें हा ग्रह जन्मकाळीं आहे त्यांना या काळामध्यें सांपत्तिक लाभ चांगलें झालें पाहिजेत. म्हणजे धनस्थान किंवा लाभस्थान परमतेजस्वीतेमध्यें आलें पाहिजे. तसेंच शुक्रदशमाचा काल असेल तर उद्योगधंदा परम तेजस्वीतेमध्यें आला पाहिजे. जन्मलग्नाच्या किंवा जन्मदशमाच्या किंवा चलित लग्नाच्या किंवा चलीत दशमाचे उदित अंशावर हा ग्रह परमतेजस्वीतेमध्यें येत असतां प्रगती, मानसनमान, उद्योगधंदा यामध्यें भरभराट झाली पाहोजे. एवंच कुंडलीमध्यें हा ग्रह ज्या ज्या स्थानाचा अधिपति असेल किंवा तो ज्या स्थानामध्यें जन्मकालीं असेल त्या स्थानानें दर्शीत होणाऱ्या फलाची वृध्दी त्यानें आपलें परम तेजस्वीतेमध्यें केलीं पाहिजे अशी कोणाहा विचारी ज्योतिर्विदांची कल्पना झालीं तर ती चुकीची आहे असें म्हणतां येणार नाहीं. तसाच हा ग्रह परमतेजस्वीतेमध्यें असून तो जनकालचे किंवा चलीत लग्न, दशम, रवि किंवा चंद्र यांच अंशावरून गोचरभ्रमण करीत असतां अत्यंत शुभफल त्यानें जन्म काळचे

आपले स्थानाधिपतित्वानुरोधानें किंवा तो ज्या स्थानामध्यें असेल तदनुरोधानें दिले पाहिजे. अनुभव घेण्याकरितां हा ग्रह मागे व पुढें केव्हां केव्हां असा दैदिप्यमान तेजानें झळकेल हें खालील कोष्टकावरून सहज वाचकांच्या ध्यानांमध्यें येईल.

सन १९०८ ता. २९ मे.
„ १९१० ता० ७ जानेवारी व ता० १९ मार्च.
„ १९११ ता० १० आगष्ट व ता० २२ अक्टोबर.
„ १९१३ ता० १९ मार्च व ता० ३१ मे.
„ १९१४ ता० २३ अक्टंबर.
„ १९१५ ता० २ जानेवारी.
„ १९१६ ता० २० मे व ९ आगस्ट.
„ १९१८ ता० ४ जानेवारी व ता० १६ मार्च.
„ १९१९ ता० ४ आगस्ट व ता० २० अक्टोबर.
„ १९२१ ता० १७ मार्च व ता० २८ मे.
„ १९२२ ता० २१ अक्टोबर व ता० ३१ डिसेंबर.
„ १९२४ ता० २५ मे व ७ आगस्ट.
„ १९२६ ता० २ जानेवारी व १४ मार्च.
„ १९२७ ता० ४ आगस्ट व ता० १८ अक्टोबर
„ १९२९ ता० १५ मार्च व ता० २६ मे
„ १९३० ता० १९ अक्टोबर व ता० २९ डिसेंबर
„ १९३२ ता० २३ मे व ता० ५ आगस्ट.

हा ग्रह कोणत्या **राशीमध्यें** व कुंडलीचे कोणते **स्थानामध्यें** परम तेजस्वीतेमध्यें येत आहे इत्यादि गोष्टीचा विचार अवश्य केला

पाहिजे. कुंडलीच्या ज्या स्थानामध्यें हा ग्रह परमतेजस्वीतेमध्यें येतो तद्योतक विषयासंबंधीं व मुळकुंडलीमध्यें तो ज्या स्थानाचा अधिप असेल त्या त्या व्यक्तिकडून किंवा त्या स्थानासंबंधानें शुभ फल प्रद परमतेजस्वीतेमध्यें येण्याचा सुमार होऊ लागतो असा आमचा अनुभव आहे. तो ज्या तारखेला परमतेजस्वीतेमध्यें येतो त्याचें अगोदर दहाएक दिवसा पासूनच शुभ फल प्रद होऊ लागतो.

वर दर्शविलेल्या शुक्राच्या परमप्रकाशमयस्थितीचे कोष्टक पाहतां हा ग्रह दर दोन वर्षांनी सरासरी आपल्या परम तेजस्वीतेमध्यें येतो. परंतु कधीं कधीं तो सूर्याच्या तेजाला न जुमानतां दिवसा दिसूं लागतो त्या वेळीं त्याला उत्पात रूप समजून त्याचे अनिष्टफल द्यावें असें वराहाच्या खालील श्लोकावरून दिसतें.

" दृष्टोनस्तगतेर्के भयकृत् क्षुद्रोग कृत्तमस्तमहः ।
सार्ध दिवसंचसेंदुनृपबल पुर भेद कृच्छुकः ॥ "

(बृ. सं. अध्याय ९ श्लोक २३)

सूर्याच्या अस्तापूर्वी शुक्र दिसेल तर तो भय, दुर्भिक्ष, रोग कारक जाणावा. माध्यान्हसमयीं चंद्रासह शुक्र दिसूं लागेल तर राजे सैन्य, नगरे यांचा भेद होतो. वरील श्लोकावरून येवढें खास दिसते कां वराहाच्या पूर्वी लोकांनीं शुक्राला दिवसा पाहिले असले पाहिजे. इतर ग्रह असें दिवसा कधींच दिसत नाहींत. परंतु तो ज्या अर्थी असा दिसतो व हा गोष्ट सृष्टि नियमाला धरून नाहीं त्याअर्थी ती उत्पातरूप असून त्याचे अनिष्टफल मिळाले पाहिजे ही विचार सरणी त्याकाळीं रूढ झाली असली पाहिजे. शुक्राची ही अत्यंत परमतेजस्वीतेची स्थिति उत्पातरूप नसून आपणाला तो गणितानें सहज सिध्द करितां येते त्याअर्थी त्याच्या

अशा स्थितीला उत्पात मानुन अनिष्टफल घेण्याचे मुळींच आवश्यकता दिसत नाहीं, असे आमचे प्रामाणिक मत आहे. उलट असला परम तेजस्वीतेमध्यें असलेला शुभ दृष्ट शुक्र खात्रीनें शुभ फलेच उत्पन्न करती असला पाहिजे. सन १९१४ सालीं असा शुक्र दिसत होता म्हणूनच भयंकर प्राणहानी युरोपीयन युध्दामध्यें झाली असें आम्हांस वाटत नाहीं. गेल्या महायुध्दाच्या काळीं दुसरीच अनिष्ट ग्रहस्थिति होती. परंतु प्रस्तुत त्या गोष्टीचा विचार करावयाचा नसल्याकारणानें त्या संबंधानें येथें उहापोह करण्याचे कारण नाहीं. सन १९२२ सालीं असाच शुक्र दिसला परंतु त्या वेळीं युध्दाचे ताबुत थंडे झालेले होते. सन १९३० मध्यें अशाच शुक्र दिवसा दिसूं लागेल परंतु युरोपामध्यें जर युध्दाची आग पसरावयाचो असेल तर ती यापूर्वी निदान तीन चार वर्षें अगोदर पसरेल व या सुमारास हातपाय मोडून आग विझलेली पाहण्यास मिळेल.

रावबहादुर एन्. के. केळकर.

एक्स मिनिस्टर (सि. पी. बऱ्हाड)

[लेखकः—एम. डी. बगणे एम. ए. एल्. एल्. बी.]

अत्यंत विपन्न स्थितींत असून उच्च पदास पोंचलेल्या, किंवा वैभवाच्या अतुच्च शिखरावर यथेच्छ विहार करीत असतांना कडेलोट झालेल्या पुरुषांच्या कुंडलींचे क्षणभर अवलोकन केलें असतां, ईश्वरेच्छा किती प्रबल आहे, दैव किती बलत्तर आहे, किंवा ज्योतिषशास्त्र किती सत्य आहे, याची थोडक्यांत पण खात्रीपूर्वक जाणीव तेव्हांच होते. प्रस्तुत कुंडली ह्या वर्गातली आहे. रावबहादुर मुळचे विपन्न स्थितीतले असून ते उच्चपदास गेले आहेत. त्याना प्रतिकूल परिस्थितीशी झगडून स्वत्व स्थापन करावे लागले. त्यांत त्याची कर्तबगारी, त्याचे आत्मतेज प्रगट होत आहे. ते वकील झाले, रावबहादुर झाले. त्यांनी अनेक सार्वजनीक

संस्थेंत भाग घेतले, कोआपरेटिव्ह फेडरेशनचे गव्हर्नर झाले. तीन वेळ लोक नियुक्त सभासद म्हणून प्रांतिक कौन्सिलांत गेले व शेवटी प्रधान झाले. विशेष नवल हे कीं आधुनिक कल्पनेप्रमाणें सुशिक्षित व विद्वान गणल्या जाण्यास अवश्य लागणारी डिग्र्यांची सामुग्री त्यांच्या जवळ नसूनहि त्यांनीं आज तीन वर्षें विद्या खात्याची प्रधानकी केली. हा सर्व चमत्कार कशाचा. ? ' प्राक्तन म्हणून कांहीं तरी सत्य आहे म्हणून हे असें ' हेंच थोडक्यांत उत्तर देतां येईल. प्राक्तनाचें द्योतक ज्योतिष शास्त्र आहे व तेंच याचें सविस्तर उत्तर देऊं शकेल.

सायन भावचलित कुंडली.



अशा तऱ्हेच्या गोष्टी घडण्यास चांगल्या योगांची जितकी आवश्यकता आहे तितकीच वाईट योगांचीहि आहे. अनिष्ट परिस्थिती दर्शक कुयोग असले पाहिजेत, व ते असतातच, पण ते अशा प्रकारचें असतात कीं त्यांत पुढील प्रगतीचें बीज गोवलेलें असतें. त्यांतच कर्तृत्व शक्ति स्फुरण पावत असते. प्रस्तूत कुंडलीत ते योग कोणतें व कसें फलद्रूप झालें हें पाहूं.

रावबहादुरांचें कुंडलीत रवि, चंद्र, मंगळ आणि शनि यांचे केंद्र--प्रतियोग झालेले आहेत. हे योग नानाप्रकारच्या. अडचणी व संकटे आणून आयुष्य खडतर करतात पण ह्या योगांनीं मनुष्याच्या अंगात धमक येते किंवा असते. निरोधाची किंवा प्रतिकूल मतांची फारशी परवा न करतां, कसलीहि परिस्थिती प्राप्त होवो तिला तोंड देण्याचा व दोन हात दाखविण्याची असे योग असलेल्या मनुष्याची तयारी असते. अशा मनुष्यांत पुढारीपणास आवश्यक असलेले बहुतेक गुण असतात व तो आयुष्यांत कधींना कधीं तरी पुढारी बनतो. त्याची महत्वाकांक्षा जबर असते व त्याचें आयुष्य घडामोडीचे जाते. ह्या योगाला सहाय्यक असा शनि--नेपूच्यूनचा त्रिकोण योग आहे. हा वास्तविक आध्यात्मिक योग म्हटला पाहिजे. कर्त्या पुरुषाला आवश्यक असा त्यांत एक विशेष गुण आहे. तो म्हणजे विलक्षण चिकाटी----एखादी गोष्ट करावयाची असा संकल्प केला असतां तिच्याशी तन्मय होऊन, माघार न घेतां तिच्या सिध्दी करतां प्रयत्नांची परमावधि करणें---हा होय. वरील सर्व कर्तृत्वशक्तीचे किंवा कर्ममार्गाचे योग होत. पण त्यांचे बरोबर त्याच प्रतीचे कांहीं बुध्दी योग नसते तर त्या कर्तृत्व शक्तीचा फारसा उपयोग झाला नसता. रावबहादुराच्या कुंडलीत दोन बुध्दीयोग आहेत. बुधगुरुच्या व बुधमंगळाच्या

त्रिरकादश योगानें त्यांना आत्मिक पण तीव्र बुध्दि लाभून त्यांना आपल्या ह्या सर्व योगांचें तेज ते नांवलौकिकास आले तेव्हां तर व्यक्त झालेंच पण आयुष्याच्या पूर्वार्धितहि तें चमकत होतें. तिकडे आपण वळूं.

रावबहादुरांचे कुंडलींत धनयोगाप्रमाणें दारिद्रययोगहि आहेत. धनेश रवि शनीनें व तसाच तो धनस्थ मंगळानेंहि पीडित आहे. लाभेश बुध व्ययांत आहे. ह्या योगामुळें त्यांना विपन्नास्थिति भोगणें भाग होतें. स्वतःचें कांहीं नसल्यामुळें ते लहानपणीं आपल्या चुलत्याच्या घरीं होते. अर्थात त्या वेळेस त्यांना दारिद्र्य जाणवलें नाहीं. पण जन्मकालचे अशुभ योग गोचरानें अथवा परिभ्रमणानें फलद्रुप होत असतांना त्यांच्या परिणामाचा अनुभव घेतल्याशिवाय त्यांना गत्यंतर नव्हतें. असा काळ म्हणजे गोचर शनि, रविचंद्राला साडेसाती बसवून ह्या दोन ग्रहांवरून तो व प. (परिभ्रमण) मंगळ जात असतांनाचा होय. हे योग १८८३ पासून सुरू झाले. त्या वेळेस धनेश रवि (चलिताचा) व्ययस्थानांतून भ्रमण करूं लागला. व धनस्थानांतून हर्शलचें भ्रमण चालू होतेंच, म्हणजे दारिद्र्ययोग उद्दीपित होत असतांना त्यांना हे भर घालीत होते. अशा परिस्थितींत दुःखदायक स्थित्यंतर करणारे व निधन--वियोग दर्शक च. (चलित) चंद्राचे मूळ रवीबरोबर व शनीबरोबर व च. शुक्र षडाष्टक शनि असे योग चालू असतां त्यांचे आधारभूत चुलते परलोकवासी झाले. व लगेच त्यांना घराबाहेर घालविण्यांत आले. रावबहादुर आतां उघडे पडले ! निराश्रित झाले ! आणि तेहि १४ वर्षांच्या कोवळ्या वयांत ! ! जवळ किंवा बडिलापाशीं एक पैकाहि नव्हता. ही परिस्थिति अत्यंत भयानक होती. रावबहादुर लेचे पेचे असते तर हायहाय करून आपल्या आयुष्याचा सोनेरी काळ वणवण

भटकण्यांत घालविला असतां; किंवा एखादी छोटीशी नोकरी पत्करून संसारास लागले असते. आज रावबहादूर किंवा मिनिस्टर या नावानें संबोधिलें जाण्याऐवजीं 'नारायण' फार झालें तर 'नारायणराव' येथपर्यंत मजल गेली असती. मग दशमस्थ सुरगुरूची काय बरें वाट लागली असती ? कदाचित रावबहादूर झाले असते. राजमान मिळाला असता. पण प्रत्यक्ष नलराजाची बरोबरी तसबीरींतील नलराजाचें चित्र करूं शकेल काय ? भाग्याधिपति अशा दशमस्थ गुरूबरोबर पंचमेश जो मंगळ त्याच्या झालेल्या त्रिकोण योगानें दर्शित होत असलेल्या महत्पदाच्या यथार्थ पात्रतेचे लायक झाले असते काय ? आज निष्कांचन निराधार व निराशाजनक परिस्थितींत सांपडलेले केळकरास भावी केळकरांच्या भाग्यास जोडणारा दुवा कुठें तरी असला पाहिजे. आणि तो दारुण आपत्तिदायक ग्रहयोगांतच होता. ज्या वेळेस वर निर्दिष्ट केलेले संकट योग उद्दीपेत झाले त्याच वेळेस त्यांच्यांत बीजभूत असलेल्या मनुष्यत्वास स्फुरण आलें. त्याला अंकूर फुटला. परिस्थितीला न जुमानतां रावबहादूर वडिल नाहीं नाहीं म्हणत असतां देखील तडक कोल्हापुरास गेले व तेथें ते "माधुकरी मागून व वार लावून" आपला अभ्यास क्रम चालवूं लागले. हाच त्यांच्या भाग्याचा खरा पाया ! हाच तो अशुभ योगांचा शुभ परिणाम ! ! अशा तऱ्हेचे दारिद्र्य उत्पन्न करणारे कुयोग जर हीणकस असते तर ही हिंमत, ही कर्तृत्वशक्ति ही धडाडी दिसली नसती. कर्तृत्ववान पुरुषांच्या कुंडलींत तसले नामर्द योग नसतातच. असो, कर्तृत्ववान पुरुषाचे कुंडलींत कुयोग असावे लागतात. त्याचा अर्थ हा कीं ते योग एक प्रकारची वाईट परिस्थिति निर्माण करून भावी श्रेष्ठ व भाग्य कालास, जरूरी असलेले गुण शिकविणीच्या रूपानें उत्पन्न

करितात. ज्या बड्या लोकांच्या कुंडलींत असे योग नसतात ' ते बडे बापके बडे बेटे ' असून त्यांच्यांत खरी मर्दुमकी नसते, असें माझें ठाम मत झालें आहे.

कोल्हापूरास रावबहादुरांनीं आपला अभ्यासक्रम नेटानें सुरू केला व त्यांना लौकरच चलित व गोचरीचे शुभ ग्रहयोग आले. सन १८८८ सालीं ग्रहयोग पुढीलप्रमाणें होते.---

च. दशम युति गुरु त्रिकोण मंगळ (पंचमाधिपति)

" रवि युति बुध

" चंद्र त्रिकोण च. बुध

प. (परिभ्रमणाचा) व गो. (गोचर) गुरु चंद्रास सातवा व कुंडलीच्या पंचमांत. हे सर्व वियेंत यश दर्शाविणारे योग आहेत. व म्हणूनच तें १८८८ मध्यें म्याट्रिकच्या परिक्षेंत पसार झाले. लगेच ते मध्यप्रांतांत गेले; व तेथें रा० बळवंतराव महाजन यांच्या मदतीनें कायद्याचा अभ्यास करूं लागले. येथें एवढें सांगणें जरूर आहे कीं ३-५-९-११ या स्थानांतील शनि मनुष्याला वकिली किंवा तत्सम धंदे करावयास लावतो. रावबहादुराच्या पंचमांत शनि आहे म्हणून ते वकिलीकडे वळले (व वकील झालेहि) वर नमूद केलेले योग चालूं असतां शनीची साडेसाती व इतर कुयोग हळूं हळूं कमी होऊन १८९० अखेर पार नाहींसे होऊन आकाश निरभ्र झालें. व त्यांत दैदिप्य मान ग्रहयोग १८९० च्या अखेर व १८९१ च्या आरंभी प्रकाशित होऊं लागले. ते असे---

च. चंद्र त्रिकोण च. हर्शल व शुक्र (लाभाधिपति)

चलित चंद्राच नवमांत भ्रमण भाग्यवृध्दिकारक

" रवि (धनाधिप) लाभ गुरु (भाग्येश) पैकीं पहिल्या योगाविषयीं **ॲलन लिओ** म्हणतो—

" A very prosperous and successful time when all things will go well...native will obtain his desires an epoch in career etc....

रवि धनेश व गुरु भाग्येश म्हणून हा धनोत्पादक योग होय. परिणाम असा झाला कीं रावबहादूर १८९० मध्यें लोकल फ्लीडरशिपची परीक्षा पास होऊन १८९१ सालीं एप्रिल महिन्यांत बालाघाट येथें त्यांनीं वकीली सुरूं केली. या नंतर त्यांची उत्तरोत्तर भाग्यवृध्दि झाली. त्याचें संकलितच विवरण करूं.

१८९१ पासून चलित झालेला हर्शल रवीशीं लाभ योग करूं लागला व तो योग थेट १९२० पर्यंत अमलांत होता. गुरु चलित होऊन रवीशीं अर्ध--लाभ योग १९१२ पासून करूं लागला व तो १९२४ पर्यंत अमलांत होता. अर्थात या दोन बृहत शुभ योगांचा काल सुखावह व प्रगतिपर असलाच पाहिजे हें सांगणें नको. मध्यंतरीं थोडया बहुत कौटुंबिक आपत्ति घडल्या त्याचें विवरण मागाहून करूं. वर दिलेल्या सर्व साधारण शुभ योगाला धरून नवीन कोणते योग झाले व त्यांचे दिग्दर्शन करावयाचें आहे. प्रथम हें सांगितले पाहिजे कीं आपत्ति व विपन्नावस्था सासून कां होईना पण रावबहादूर आपल्या आयुष्यांत

सरकार व प्रजा ह्या दोहींच्या दृष्टीनें शक्य त्या महत्पदास पोंचतील असें त्यांच्या जन्मकालीन ग्रहयोगावरून स्पष्ट दिसत होतें. त्यांच्या कुंडलींतील धनभागांत ११ ग्रहांपैकीं ९ ग्रह वास्तव्य करीत होते. संपत्तिमान व राजकारभारांतले मोठमोठाले मुत्सद्दी अशांच्याच कुंडलींत असल्या प्रकारचें योग दृष्टीस पडतात. एकादशांतील रवि चंद्र अनुक्रमे पदवी व राजकारणाशीं संबंध दर्शवीत होते. राजकीय पुढारी किंवा राजकारणी पुरुष यांच्या कुंडल्यांत एकादश स्थानांत बलवान् ग्रहयोग सांपडतात रविशुक्रांची युतिहि राजवैभव व राजकारणाशी संबंध दर्शविते. त्रिकोणस्थ शनि मुत्सद्देगिरी देतो. दशमांतील नेपच्यून आयुष्यक्रम विलक्षण तऱ्हेचा पण रविशनीशीं शुभयोग करीत असल्यामुळें प्रगतिपर दर्शवित होता. तोहि राजकारणाशीं संबंध आंणणाराच होता. एकंदरींत ह्या सर्व ग्रह योगांमुळें रावबहादुरांना कधीना कधीं तरी राजकारणांत पडणें अपरिहार्य होतें व म्हणूनच ते पडलेहे. त्यांच्या दशमांतील गुरु हा सर्वांत वरचढ योग होता. तो राजसन्मान व एका प्रकारचें आधिपत्य दर्शवितो. धनधान्य, गृह, वाहनादि सौख्य देतो. दशमस्थ गुरु असलेल्या मनुष्याचो जिकडे तिकडे कीर्ति होते. व तो जगांत पुढें आला नाहीं असें विरळाच दिसेल. अशा गुरूविषयीं **लिओ** म्हणतो.

'Jupiter in the tenth house denotes much success and prosperity; the moral standard is very high and the native holds a very secure and important position at some period of his life."

ह्या योगांत गुरु नवमेश म्हणून हा उच्च तऱ्हेचा राजयोग झाला होता. अशा भाग्येश राजयोग करणाऱ्या सुरगुरुशीं पंचमेश व राज्यभुवनेश मंगळाशी अत्यंत शुभ असा त्रिकोण झालेला होता. हा निःसंशय उच्चप्रतीचा राजयोग होय. हाच योग त्यांना भावी उन्नत स्थितींत नेण्यास कारणीभूत झाला. हाच तो प्रधानकीचा द्योतक योग. म्हणूनच त्यांना प्रधानकी सारखी महत्पद प्राप्ति झाली. ह्याच योगानें मूळच्या विपन्न स्थितींत चमत्कृति जन्य स्थित्यंतर केलें. जन्मकुंडलींतील कुयोगानें ज्या स्थितीकरितां रावबहादुरांना शिकवण दिली ती स्थिति दर्शित करणारा हाच योग होय. हाच तो ग्रहयोगाचा चमत्कार.

प्रधानकींत रावबहादुरांना मेडिकल व एज्यूकेशन खातीं कां आलीं याचा पुढीलप्रमाणें निर्णय होतो.

मंगळ (पंचमेश=शिक्षण विषयक)+(दशमेश=सत्ताधीश अधिकार संपन्न)=शिक्षण खात्यावर अधिकार.

गुरु=(विद्याकारक)+(दशमेशाशीं त्रिकोण=अधिकार)=शिक्षण खात्यावर अधिकार.

द्वादश स्थान जेल हास्पितळें वगैरेशीं संबंध ठेवतें. व्यवस्था बुध हर्शलशीं दशमेशाचा शुभ संबंध आहे म्हणून मेडिकल खातें त्यांचे कडे गेलें.

ह्या सर्व ग्रहयोगाला फलद्रुप होण्यास तत्सम चलित गोचर व भ्रमण ग्रहयोगांची जरूर होती. ते फलद्रुप पुढीलप्रमाणें झाले.

सन १९०८

च. चंद्र त्रिकोण च. रवि, च. हर्शल.
लाभ च. मंगळ

च. गुरु लाभ हर्शल; च. चंद्र त्रिकोण च. बुध बुध अर्धलाभ चंद्र; च. दशम त्रिकोण च. मंगळ परिभ्रमण मंगळ स्वस्थानीं येऊन मूळ गुरूशीं पुन्हा त्रिकोण करीत होता. जन्मपूर्व योगांत च. रवि बुध शुक्र गुरूशीं युति करीत होते.

डिसेंट्रलायझेशन कमिशन पुढें साक्ष झाली.

रावबहादुरीचा किताब मिळाला

सन १९१४

च. दशम युति चंद्र; च. चंद्र त्रिकोण च. मंगळ.

सन १९१७

च. दशम अर्धलाभ बुध; च रवि. लाभ चंद्र.
च. बुध लाभ च. गुरु. च. चंद्र त्रिकोण हर्शल
च. चंद्र ,, गुरु ,, ,, ,, बुध चलित.
परिभ्रमणानें गुरु स्वस्थानीं येऊन मूळ मंगळाशीं त्रिकोण करीत होता. गोचरीनें तो चंद्रास पहिला होता.

तिन्ही वेळां कोन्सिलांत निवडून आले. १९१६ सालीं इन्डस्ट्रोयल कमिशन पुढें व पी. डब्ल्यू. डी. ऑर्गनायझशन कमिटी पुढें साक्षी झाल्या.

सन १९२०

च. दशम अर्धलाभ गुरु; च. चंद्र त्रिकोण रवि.
च. बुध लाभ युति दशम च. मंगळ लाभ रवि.
चं. बुध लाभ रवि योग शेवटले तीन

१९२० सालीं मिनिस्टर झाले.

जन्मपूर्व आहेत. गोचर गुरु जन्मस्थ मंगळाच्या सन्निध होता. चलित चंद्र नवमांत व दशमांत भ्रमण करीत होता.

राजदरबारचें व राजकारणाचें विशेष वैभव व तेज मूळ दशमस्थ नेपच्यून परिभ्रमणानें लग्नांतून भ्रमण करीत असतां म्हणजे १९१४ ते १९२४ पर्यंत विशेष दृष्टोत्पत्तीस सांपडलें.

गेल्या कौन्सिल निवडणुकींत रावबहादुरांचा पराभव झाला. त्याचीं कारणें पुढीलप्रमाणें आहेत.

(१) गो. गुरु सहावा; (२) च. दशम प्रतियोग शनि.

(३) गो. शनि युति दशम (४) च. रवि केंद्र गुरु.

असो, नेपच्यूनच्या दशमस्थ फलाविषयीं थोडें विवेचन करून घरगुती गोष्टींकडे वळूं. दशमांतला नेपच्यून चमत्कारिक आयुष्यक्रम दर्शवितो. त्याचा रविशनीशीं शुभ संबंध असल्यामुळें आयुष्यक्रम चमत्कारिक खरा पण प्रगतिपर झाला. रवीशीं शुभ संबंध लोकप्रियता व आध्यात्मिक उन्नति दर्शवितो. दशमांत म्हणून राजकीय वातावरणाशींहि संबंध दर्शवितो. हा असा दशमस्थ नेपच्यून लग्नांतून भ्रमण करीत होता (सन १९१० ते सन १९२४) तेव्हां त्याचीं फलें विशेष दृष्टोत्पत्तीस आलीं. हें वरील विवेचनावरून उघडच आहे.

रविचंद्र मंगळ शनि यांच्या केंद्र प्रति योगाचा दुसरा असा परिणाम होतो कीं त्यामुळें मातृपितृसुख फार कमी लाभतें. तशासारखे पुन्हा योग होतांना तें सुख नष्ट होतें. परिभ्रमणानें व गोचरीनें असे योग १८८३--१८९० पर्यंत घडत होते. व रविचंद्राला साडेसाती बसली होती. ह्या अवधींत च. मंगळानें रवीशीं १८८६ सालीं तंतोतंत केंद्र केला त्या वेळेस पितृनिधन झालें. व पुढें १९००--१९०४ चे दरम्यान चलित चंद्र मंगळाबरोबर व शनिबरोबर अशुभ योग करीत असतां मातृनिधन झालें. त्या वेळेस हर्शल मातृ म्हणजे चतुर्थस्थानांतून भ्रमण करीत होता.

ह्या कुंडलींत एकापेक्षां ज्यास्त लग्नें होण्याचा योग उघड दिसत आहे. लग्नाधिपति चंद्र व सप्तमाधिपति शनि यांचा वियोगकारक प्रतियोग सप्तमेशाचे व रवि शुक्र चंद्राचे द्विस्वभाव राशींत वास्तव्य कुटुंब--धन स्थानांत मंगळ व त्याचा सप्तमेश शनि व लग्नेश चंद्र यांच्याशीं केंद्र; सप्तमांत केतु हे सर्व योग त्याचे द्योतक आहेत. रविशुक्राचा योगहि दोन भार्या देतो असें माझ्या बऱ्याच ठिकाणीं पाहण्यांत आलें आहे. ह्या मुळें रावबहादुरांचे दोन विवाह झालें. सन १८९० त जेव्हां

च. रवि लाभ मंगळ

च. दशम युति गुरु

च. चंद्र त्रिकोण च. शुक्र इत्यादि विवाह कारक योग चालू असतां, व गुरु सप्तमांत भ्रमण करीत असतां पहिला विवाह झाला. पण तें विवाहसुख फार काल टिकलें नाहीं. सप्तमाधिमति परिभ्रमणानें व गोचरीनें स्वस्थानीं येऊन लग्नेश चंद्राबरोबर मूळचा वियोगकारक प्रतियोग सन १८९९ मध्यें करीत असतां भार्यानिधन झालें. त्या वेळेस वियोगदर्शक पुर्ढाल योग चालू होते.

च. चंद्र (लग्नेशी) समक्रांति शनि (सप्तमेश)

च. रवि युति मूळ हर्शल.

लगेच पुढें १९०० मध्यें पुन्हा विवाह झाला. हा बहुतेक नेपच्यूनच्या शुक्रावरील परिभ्रमणाचाच प्रकार आहे.

पंचमस्थ बहुप्रसव राशीमुळें संततियोग बरा आहे; पण पंचमांत शनि असल्यामुळें व त्याचा पंचमेश जो मंगळ त्याचेबरोबर केन्द्र असल्यामुळें सर्वच मुला मुलींचे सुख मिळणें शक्य नव्हतें. पंचमेशत्व मंगळाकडे असल्यामुळें व ग्रहाधिक्य पुरुषराशींत असल्यामुळें पुरुष संततीच विशेष होणें यथार्थ होतें. पंचमेश मंगळ द्विस्वभाव राशींत, पंचमांतील शनि द्विस्वभाव राशीत व चंद्रहि द्विस्वभाव राशींत असल्यामुळें संततीपैकीं कांहीं संतती जुळी दर्शविली जाते. ह्या नियमानुसार रावबहादुरांना आज तागायत ११ अपत्यें झालीं असून त्यांपैकीं आज ५ मुलें व २ मुली हयात आहेत. त्यांत शेवटलीं दोन आपत्यें जुळी आहेत. एक अपत्य मृतावस्थेंतच निपजलें हा प्रकार बहुधा शनीचा असावा असें दिसतें (?) ज्या ज्या काळीं संतती झाली त्या त्या काळीं असें दिसतें कीं गुरु व शनि बहुधा लग्न, तृतीय, पंचम, सप्तम, नवम, एकादश ह्या स्थानांत होते. (१८९९, १९०२,४-७-८-९-११-१४-१७-२० हे ते काल होत.)

रावबहादूरांचे आयुष्यांत १८८० तें ८६ व. १८९९ ते १९०४ हे काल विशेष खडतर व कष्टदायक गेले. पैकीं पहिल्या कालासंबंधीं विवेचन झालेंच आहे दुसऱ्या कालासंबंधीं पूर्वी थोडें बहुत आलें तरी एवढें सांगणें जरूर आहे कीं ह्या वेळेस चंद्र रवीशीं शनीचा असलेला मूळचा प्रतियोग ह्या वेळेस उद्दीपित झाला होता. अष्टमांत शनीचा ह्या मूळ व चलित ग्रहांशीं व शुक्राशीं प्रतियोग वसत होता. शुक्र व हा चतुर्थेश म्हणजे माता व स्थावर दर्शक असल्यामुळें व लाभेश

म्हणजे भाऊ व (व्ययस्थान चुलत्याचें द्योतक व तेथें शुक्र म्हणून) चुलते ह्यांचा दर्शक असल्यामुळें स्थावराचा नासाडी व आई भाऊ आणि चुलते यांचे मृत्यु झाले ह्याच वेळेस हर्शलचें चतुर्थांत भ्रमण कांहीं काल चालूं होतें.

असो, आतां येथवर मागें काय झालें याचा विचार झाला. भावी परिस्थिति कशी काय आहे ह्याचा थोडा विचार करूं. आयुर्दाय निश्चित तऱ्हेनें सांगणें कठीण आहे. गणित मानानें वयोवर्ष ५९ व ह्याच्या पलिकडे गेलाच तर $\frac{६९}{७०}$ एवढा दिसतो. रवि चंद्र मंगळ शनि यांचे केंद्र प्रतियोगावरून शेवट बहुतेक असामान्य अपघातांत किंवा अशाच कोणत्या तरी प्रकारचा होईल असें दिसतें. प्रस्तुत शनि चतुर्थ स्थानांत गेला आहे तो चतुर्थांत भ्रमण करीपर्यंत व तसाच पुढें त्याचा रविचंद्राशीं प्रतियोग पूर्ण होऊन जाईपर्यंतचा काळ वाईट आहे. शनि अष्टमेश व चंद्र लग्नेश म्हणून हा प्रतियोग वाईट आहे असा काळ शनि सायन धन राशीच्या अखेर जाईपर्यंत म्हणजे जवळ जवळ १९२८ मध्यापर्यंत आहे. सध्या हर्शलचें अष्टमांतून भ्रमण चालूं आहेच. ह्या काळांत शरीर प्रकृतीविषयीं व अपघातांविषयीं विशेष काळजी घ्यावी. त्याचप्रमाणें हा काळ कौटुंबिक सुखास प्रतिकूल आहे. जवळपास चलिताचे मुख्य शुभयोग दोन घडणार आहेत ते असे च. दशम युति रवि, च. शुक्र लाभ बुध गुरु, चलित रवीचें व मंगळाचे चलित शनीशीं शुभ योगहि घडतील पण जन्मतः ते शुभकारक नसल्यामुळें त्यापासून फारसा फायदा होणार नाहीं असें वाटतें.

वरील दोन मुख्य शुभयोगांचा काळ म्हणजे १९२७ व १९२८ हीं वर्षें होत. हा काळ सांपत्तिक सुखाला मानमरातबाला चांगला जाईल. 'Increase of honour, desire for achievement, elevation as regards sphere of influnce, added breadth of view' अशीं पहिल्या योगाचीं फलें आहेत. अशाच प्रकारचीं च. रवि त्रिकोण शनि (जो योग १९२६ च्या मध्यात सुरू होईल.) ह्या योगाचीं आहेत. पण वर दिलेल्या कारणास्तव ह्या फलसिध्दीविषयीं शंका येते. १९२७ साल मात्र निःसंशय चांगलें प्रगतिपर जाईल.----पुढील दोन तीन वर्षांत चलित चंद्राचे कांहीं शुभयोग घडणार आहेत. त्याचप्रमाणें त्याचे जन्मकालीन अशुभ योगहि उद्दीपित होत आहेत. मे, जून, जुलै, अक्टोबर, नोव्हेंबर १९२४ ह्या महिन्यांत त्याचे मंगळ शनीशीं केंद्र प्रतियोग घडतील. ह्या काळांत दुःखाचे प्रसंग उद्भवतील असें वाटतें. एप्रिल १९२४ हा महिनाहि तसाच दिसतो. जानेवारी फेब्रुवारी मार्च १९२५ आक्टोबर नोव्हेंबर १९२५ हे महिने चांगले जातील. मनावरचा भार कमी होऊन कौटुंबिक व इतर परिस्थितींत शुभकारक फरक होतील, प्रवास घडतील, मंगलकार्ये घडून आनंदाचे प्रसंग येतील. हातून नवीन व जबाबदारीचीं कामें होतील. मनांतील बऱ्याचशा इच्छा व संकल्प सफल होतील; कारण ह्या वेळीं च. चंद्र रवि दशम व शुक्राशीं युति करील. ह्या नंतर 'च. रवि युति दशम' योग घडेपर्यंतचा काळ वाईट व दुःखकारक आहे. हा काळ अध्यात्माकडे लक्ष लावण्यास चांगला आहे----अस्तु शुभं भवतु.

॥ श्रीसद्गुरवे नमः ॥

ज्योतिर्माला

आप्राचः कामरूपाद्द्रुहिणसुतनदप्लावितादाप्रतीचो
गान्धारात् सिंधुसार्द्राद्रघुवररचितादाचसेतोरवाचः ।
आकेदारादुदीचस्तुहिनगहनतः सन्तिविद्वत्समाजा
ये ये तानेष यत्नः सुखयतु समजान्कश्चमत्कर्तुमीष्टे ॥ १ ॥

अभिनवाऽऽवृत्ति वर्ष ८ वें अंक ७ ते ८.

ओघानें आले म्हणून चार शब्द.

इंग्रजीमध्यें एक म्हण आहे कीं " Oh! God Save me from my friends " हे परमेश्वरा ! मला माझ्या मित्रांपासून वांचीव किंवा त्याच अर्थासारखी आपल्यामध्यें एक म्हण आहे 'ओळखीचा चोर जीवें मारी' या म्हणीची आठवण चालू मे-जून १९२४ महिन्यांच्या रा. रा. नारायण सदाशिव मराठे यांचे हर्शल मधील स्फुट विचार वाचून होते. राजेश्री मराठे हे एकीकडे मित्रत्वाच्या नात्यानें आमच्या गळ्याला मिठी मारूं पाहत आहेत तर दुसरीकडे अस्वलाच्या स्वभाव-धर्माप्रमाणें आमच्या अंगाचे वाभाडे काढण्याचा प्रयत्न करीत आहेत. बाकी हा कांहीं त्यांचा पहिलाच प्रयत्न नाहीं. अनेक बाजूनें प्रयत्न करून पाहिल्या-नंतर आतां त्यांनीं आमचेवर उघड हल्ला चढविला आहे व तो त्यांच्या शीलास साजेसाच आहे.

लिहितां येतें म्हणून लिहावयाचें किंवा तोंड दिलें आहे म्हणून कांहीं तरी बकावयाचें असें जर कोणी करूं लागेल तर त्याला आपण जसे इतर कोटींत ढकलतों तसेंच हें झालें आहे. या त्यांचे लेखासंबंधानें त्यांना रविवार तारीख ६ जुलई १९२४ रोजीं मुंबई ज्योतिर्विद मंडळाचे सभेच्या ठिकाणीं विचारतां

हातून लिहून गेलें खरें ! एवढेंच मार्पिक व मुन्सहेगिरीचें उत्तर मिळालें. आपला हात चुकून एखादें कृत्य करतो खरें, परंतु तो त्याच कृत्यामुळें कायद्याचे दणक्या-खालीं सांपडून छिन्नविछिन्न होतो हें रा. मराठे यांना आम्ही सांगितलें पाहिजे असें नाहीं.

जो लेख रा. रा. मराठे आपले हर्शलवरून अक्षरशः उतरून घेतल आहे असें म्हणतात तो मिस्टर शहा यांचा रेस वरील लेख त्यांनीं आमचेकडे छापण्यास पाठविला होता. यासंबंधानें खुलासा त्याच अंकात आहे तो त्यांनीं पुन्हा एकदा वाचावा. वस्तुतः आमचेकडे आलेला लेख हर्शलमध्ये प्रसिद्ध होण्यास गेलेला आहे असें आम्हांस हर्शलचा अंक प्रसिद्ध होऊन पाहण्यास मिळेपर्यंत ठाऊक देखील नव्हतें. ज्या वेळेला आम्हांला हर्शलचा अंक पाहाव-यास मिळाला त्या वेळीं वरील लेख ज्योतिर्मालेच्या अंकाकरितां कंपोज होऊन छापून पडला होता. व त्याचमुळें रा. मराठे यांचें विधान साफ खोटें असून तें कुत्सित बुद्धीनें लिहिलेलें आहे. लेखकाला कदाचित् आपला लेख दोन तीन निरनिराळ्या मासिकांमध्यें प्रसिद्ध व्हावा असें वाटत असतें. परंतु एकच ज्योतिषविषयक लेख उगीच दोन तीन त्याच विषयाला वाहिलेल्या मासि-कामध्यें प्रसिद्ध व्हावा असें आम्हांस वाटत नाहीं. व त्यापासून विशेष कांहीं फायदा होतो असें आम्हांला वाटत नाहीं. व त्याचमुळें जे लेख इतर मासिकांकडे गेलेले आहेत असें आम्हांस कळतात ते लेख प्रसिद्ध न होतां तसेच आमचे-जवळ पडून राहतात. व असे रा. शहा यांचे हर्शलमध्यें प्रसिद्ध होण्यापूर्वी आमचेकडे आलेले एक दोन लेख पुराव्यादाखल सहज पुढें मांडतां येतील. यांपैकीं एक लेख आतां नुकताच हर्शलमध्यें चालू अंकामध्यें प्रसिद्ध होत आहे. असाच प्रकार रा. रा. सगणे यांचे लेखाचाही झालेला आहे. फलज्योतिष लेख १ ला हा मालेनध्यें प्रसिद्ध झाला आहे व तो हर्शलमध्येंही प्रसिद्ध झालेला आहे. यासंबंधानें आम वा व रा. रा. सगणे यांचा पत्रव्यवहार चांगला तीन महिन्यां-पूर्वी झाला आहे. मूळ लेखकानें आपल्या लेखाच्या दोन तीन प्रती काढून त्या निरनिराळ्या मासिकांच्या संपादकांकडे पाठविल्यामुळें तोच लेख पुन्हा दुसरी-कडे आला असला पाहिजे अशी साधी व सरळ कल्पना करण्याचें सोडून वेडवांकडें खोडसाळपणानें लिहिण्याचें रा. रा. मराठ्यांस कांहीं कारण नव्हतें.

यानें कांहीं शास्त्रसंशोधन होत नाहीं. उलटे मित्र मित्र म्हणून वामाडे काढण्याचा प्रयत्न केल्यानें मित्रद्रोहाचें पाप माथीं येतें.

रा. रा. सगणे यांचा लेख मालेमध्यें प्रसिद्ध होऊन दोन महिने होऊन गेल्यानंतर तोच लेख 'हर्शल नेपच्यून इसिस आणि ओसिरीस व त्यांचे निज उच्च राशी' आज हर्शलमध्यें प्रसिद्ध होत आहे. किंवा ह्याच लेखाचें भाषांतर मॉडर्न अस्ट्रॉलाजीचे जून १९२४ चे अंकामध्यें प्रसिद्ध झालेलें आम्हीं आमचे-मालेवरूनच घेतलें आहे असें म्हणावयाचें काय ? किंवा हर्शलचे प्रत्येक अंकाचे आरंभीं येत असलेलें "स्फुरतु मनसि सा ज्योतिरंतःस्वरूपा" हें महा-वाक्य आमचे ज्योतिर्मालेच्या एप्रिल १९१५ मध्यें प्रसिद्ध झालेल्या नमनाच्या श्लोकामधून उतरून घेतलें आहे असें आम्हीं म्हणावयाचें काय ? इतकी अप्र-बुद्धता आमचेमध्यें खास नाहीं. आम्हांला जिकडून लेख व महावाक्य मिळालें तिकडूनच तें रा. रा. मराठ्यांस मिळालें असलें पाहिजे असें वाटतें. व हीच ती सरळ विचारसरणी; आणि म्हणूनच अमुक आमचेवरून अक्षरशः उतरून घेतलें असें म्हणण्याचें धाडस करवत नाहीं. तेंही असो जर आम्हांला एखाद्या लेखाचा अक्षरशः उतारा करावयाचा होता तर अमुक मासिकावरून उतारा असें म्हण-ण्यानें कांहीं आमच्या अब्रूचें दिवाळें निघत नव्हतें. मालेनें असे उतारे अनेक नामनिर्देश देऊन घेतले आहेत.

हर्शलनें रेससंबंधानें रा. शहा यांचे विचार मांडून ज्योतिष शास्त्राच्या ज्ञानामध्यें क्रांति केली आहे असें हर्शलच्या संपादकांस वाटत असलें तर वाटो बापडें. ज्योतिर्मालाकारांला लिहिण्याला विषयच नसतो किंवा त्यांना लिहावयाला विषयच सुचत नाहींत, काय करतील बिचारे ! हर्शलचे संपादक महाशय हे जेव्हां कांहीं स्फूर्ती देतात तेव्हां एखादें बहुमोल सिक्रेट ज्योतिर्मालेच्या संपाद-काच्या टाळक्यांतून योगनिद्रेला जागृति झाल्यामुळें बाहेर पडतें ! फारच मोठा अजब शोध ! ज्योतिषशास्त्रामधला एक मोठा शोध रा. मराठे यांनीं लावला आहे ! हो बरी आठवण झाली; त्यांनीं योगमालेमध्यें लिहिलें म्हणून तर अलीकडे ५ वर्षांनीं मालेच्या वाचकांना इसिस, ओसिरीस वगैरे नूतन ग्रहांसंबं-धानें माहिती मालेच्या ८ व्या वर्षाच्या ३-४ अंकामध्यें पाहावयास मिळाली, नाहीं तर ती कोणीकडे बेपत्ता झाली असती याचा नेम नाहीं, कारण सारे इंग्रजी ग्रंथ

जपानच्या भूकंपाच्या वेळीं अग्निनारायणाचे भक्ष्यस्थानीं पडले. मराठे महाशय चालूंद्या असाच आपला निरनिराळ्या नूतन लेखांचे द्वारें आठवण देण्याचा प्रयत्न म्हणजे ज्योतिर्मालेच्या संपादकांजवळ ज्या अनेक विषयांचे विचार मनाच्या कप्प्यांत लपून राहिले आहेत ते क्रमानें बाहेर पडून अनेक ज्योतिर्विद वांचकांची चंगळ उडेल. इतकें त्यांत आमचें भाग्य म्हणावयाचें कीं पूर्वीचे इसम प्राण गेला तरी आपली माहिती इतरांस सांगत नसत परंतु आम्हांला इतर कोणाकडून विषय पुढें आला म्हणजे आपली पुरचुंडी उघडी करून दाखविण्याची बुद्धि होते ! इतका उदारपणाचा मान तरी रा. मराठे महाशयांनीं आम्हांला दिला आहे. थ्याँक यू मिस्टर मराठे फॉर यूअर करटसी. वस्तुतः ज्योतिर्मालेच्या संपादकाच्या ज्ञानाची पुरचंडी फारच थोडी आहे व तींत मराठे महाशय म्हणतात किंवा कल्पना करतात असें कांहीं नाहीं. मालेच्या संपादकास अर्धवट माहिती प्रसिद्ध करून लोकांचा बुद्धिभेद करावासा वाटत नाहीं. किंवा जे विचार आले किंवा वाचले ते छापखान्याच्या यंत्राखालीं दाबून काढून मराठीमध्यें प्रसिद्ध करावेंसें वाटत नाहीं, यास आमचा निरुपाय आहे. आम्हांला विषय चांगला कळून त्यासंबंधानें खात्री पटल्यानंतर प्रसिद्ध करावासा वाटतो. मालेच्या संपादकाजवळ रा. मराठे महाशय म्हणतात असें खास कांहीं विशेष नाहीं. मालाकारांजवळ तें म्हणतात त्याप्रमाणें ज्योतिषविषयक ज्ञानाची पुरचंडीच सध्या आहे. त्यांना अद्यापि ज्योतिषशास्त्ररूपी ज्ञानसागर संपादकद्वय–रा. मराठे व रा. शहा–यांसारखा प्राप्त झालेला नाहीं. व म्हणूनच तर अनेक विचार मनाच्या कप्प्यांमध्यें दडून राहत आहेत. आम्हांला ज्ञानरूप सागराची प्राप्ति झाली म्हणजे त्यांतून तरून जाण्याला खास राजरोष परवानगी देऊं.

सार्वजनिक संस्थांचीं भविष्यें, रेसची माहिती, चांदीचें भविष्य, कॉटनसंबंधानें भविष्य व माहिती, शेअरची तेजीमंदी कशी काढावी वगैरे नाना तऱ्हेचे ईश्वराच्या अजबखान्यामधील गुप्त शोध रा. रा. मराठे महाशयांनीं व त्यांचे दृश्यम संपादक श्रीयुत शहा यांनीं आपले हर्शलचे द्वारें प्रसिद्ध करून ज्योतिषशास्त्राचे वाङ्मयामध्यें क्रांति करण्याचें योजिलें आहे. हर्शलचे बहुतेक वाचक व अर्थात संपादकद्वय यांचेवर आतां श्री लक्ष्मीचे थोरले बहिणीची कृपा कधींच होणार नाहीं !! कापूस जुलई १०।१२ तारखेपर्यंत ५०८–१२ राहणार आहे;

परंतु आज तारीख ७ जुलई १९२४ रोजीं ४८५ झाला आहे !! कांहीं हरकत नाहीं खरेदी करा ! पळा ! उठा ! पाहतां काय ! पुढें कापूस ७५० नव्वे चुकलों ८५० होणार आहे. केवढा फायदा. अहो, प्रत्येक १०० गांठी पाठीमागें नगद १३ हजार पासून १४ हजार रुपये मिळतील. ४००–५०० गांठी घेतल्या कीं आपल्या सारख्याच्या जन्माचेंच कल्याण !! ७५० किंवा ८५० सन १९२५ च्या मेला न होतां १९२६ च्या मेला झाला म्हणून काय हरकत ? कापूस घेववत नसेल तर चांदी घ्या. तारीख ५ जुलई १९२४ पर्यंत रु. ७८–१४ + १० ते १३ रुपयांची तेजी होणार आहे म्हणजे आज भाव कमींतकमी रु. ८९ असावयास पाहिजे परंतु आज तर भाव रु. ८२–९ आहे. फार कांहीं चुकला नाहीं फक्त ६।७ रुपयेच चुकला आहे. एकदम घ्या कारण पुढें रु. २० ची तेजी होणार आहे म्हणजे १०३–१०६ रुपये होणार आहे. असा सुवर्णनिधि उत्पन्न करणारा परीस तुम्हाला रुपया आठ आण्यामध्यें मिळूं लागल्यावर तुम्हीं दरिद्री कां राहतां !! खरोखर फार मोठाले अजब शोध व माहिती हर्शलच्या स्वभावधर्माप्रमाणें प्रसिद्धीला येत आहे.

विश्वासानें कोणी कांहीं माहिती दाखविली किंवा ती पाहण्यास मिळाली म्हणून ती आपल्या नांवाखालीं प्रसिद्ध करितां येते किंवा काय किंवा यानें Breach of trust विश्वासघात होतो किंवा नाहीं हें ज्याचें त्यांनें पहावें.

आम्हांला कोणाचाही हिरमोड करावयाचा नाहीं. परंतु श्रीयुत शहा यांच्या रेसवरच्या लेखासंबंधानें आमचें काय मत अहे हें आम्हीं वाचकवर्गापुढें ठेविलेंच आहे. त्यांना अवकहडा चक्र गांवढळ वाटतें; बोलून चालून नांव सोनुबाई हातीं कथलाचा वाळा !! खरें आहे !! तें शोधून काढणारे आर्य आचार्य मिस्टर शहा इतके ज्योतिषशास्त्रज्ञ व मंत्रशास्त्रज्ञ खास नव्हते. तसेंच आर्य व आंग्ल ग्रंथांमध्यें प्रचलित असलेली होरा पद्धति त्यांना अगदीं त्याज्य व अशास्त्रीय वाटते. नशीब बिचाऱ्या ग्रंथकारांचें !! त्यांना एवढा वाराचा व होऱ्याचा संबंध घालण्यास कोणी सांगितलें होतें !! त्यांना रा. शहांच्या लेखामध्यें आलेले सार्वे तत्त्व देखील कळलें नाहीं !! महामूर्ख बेटे !!! फक्त अलिकडे प्रसिद्ध होत असलेले श्रीयुत शहा यांचे नवीन विचार म्हणजे इंग्रजी मासिकांतील किंवा ग्रथांमधील कॉपी !! नवीनपणाचें कोडें आम्हांस कांहीं सुटत नाहीं. आमच्या-

सारखा ज्यांना सन १७०० तें चालू प्रसिद्ध होत असलेल्या इंग्रजी ग्रंथाचा परिचय आहे त्यांना त्यांच्या गोष्टी नवीन वाटत नाहींत ! रा. शहा व मराठे या दर्शलच्या संपादकद्वयांना श्रीयुत प्रधान यांच्या पुरचुंडीबद्दल विशेष कांहीं वाटण्याचें कारण नाहीं. आज संस्कृत व इंग्रजी ग्रंथ शेकडयांनीं मोजतां येतील येवढे प्रसिद्ध झालेले नीट वाचले कीं प्रधान यांच्या पुरचुंडीचे बाराच वाजले म्हणून समजा ! ! तुम्हाला दर्शलमधून सर्व साठा एक दोन वर्षांत खलास करून टाकतां येईल. प्रधानांची जी काय पुरचुंडी आहे तिचें तोंड मोकळें करण्याचा राजरस्ता सांगून आम्हांला हे चार शब्द जरा स्पष्टतर शब्दांमध्यें विनाकारण लिहिण्यास भाग पडलें याबद्दल वाईट वाटतें. केव्हांही झांकली मूठ सवा लाखाची असते असें आमचे वाडवडील म्हणत असतात या म्हणीची आठवण आम्ही संपादक महाशयांस देऊन त्यांची रजा घेतों.

यशवंत केशव प्रधान–संपादक; ज्योतिर्माला, दादर.

फलज्योतिष.

लेख ४

[लेखकः—एम. डी. सगणे, एम. ए. एल एल. बी.]

मागच्या लेखांत ग्रहादिकांत परिणाम करण्याची शक्ति आहे याचें थोडक्यांत दिग्दर्शन झालें. फलज्योतिष शास्त्र आहे, हें विधान अर्थात त्यांत गर्भित होतें. पण कित्येक आक्षेपक फलज्योतिषाला शास्त्रच म्हणावयास तयार नाहींत. तेव्हां तें शास्त्र आहे कीं नाहीं. याचा विचार करूं.

इंग्रजींत शास्त्राला Science म्हणतात. Science चा सोपा व सरळ अर्थ 'a systemised body of knowledge' असा आहे. फलज्योतिषांत राशींचे, ग्रहांचे, स्थानांचे, दृष्टींचे व योगांचे अमुक परिणाम होतात असें सांगितलें असतें, अशा प्रकारच्या गोष्टी ज्ञान ह्या नामाभिधानाखालीं येत नाहींत काय ? येत नाहींत असें कोणाकडूनच

उत्तर येणार नाहीं अशी पूर्ण खात्री आहे. आतां ज्ञान Systemised सुसंघटित नियमबध्द असतें म्हणजे त्याचें शास्त्र बनतें. फलज्योतिषांतील ज्ञान सुसंघटित व नियमबध्द नाहीं काय ? तें तसें (सुसंघटित व नियमबध्द) आहे हें सविस्तर दाखविण्यास एक ग्रंथच लिहावा लागेल. किंवहुना सबंध ज्योतिषशास्त्रच उघडें करून दाखवावें लागेल; पण तशा प्रकारचा प्रयत्न करण्याचें ह्या लेखांत प्रयोजन नाहीं. चार पांच चौफेर इशारे दिले म्हणजे पुरें होईल.

फलज्योतिषाची उभारणी व मांडणी इतर शास्त्रांप्रमाणें आहे, त्यांतील नियम इतर शास्त्रांतील नियमाप्रमाणेंच व्यापक आहेत, ते निसर्गाला व बुध्दिवादाला सोडून नाहींत, त्याचप्रमाणें त्यांतील तत्त्वें किंवा विचार इतर शास्त्रांना संमत व लोकव्यवहाराला अनुमत असेच आहेत, असें दाखविलें म्हणजे फलज्योतिष शास्त्र आहे असें कोणीहि प्रामाणिकपणें कबूल करील यांत शंका नाहीं.

कोणतेंही भौतिक शास्त्र घेतलें, किंवा कोणत्याही शास्त्राचा भौतिक विचार केला तर असें दिसून येईल कीं, तें सर्व अनुभवावर रचलेलें असतें. मूळ सोप्या साध्या व सरळ अशा गोष्टींचा दाट परिचयानें व सहवासानें अनुभव येतो. व त्यामुळें त्याचे गुणधर्म लक्षांत येऊन ते प्रस्थापित होतात. अशाच प्रकारें नाना प्रकारच्या गोष्टींच्या परस्पर संबंधाचेंहि होतें. कधीं कधीं ह्याच्या उलटहि होतें. दोहोंपैकी कोणताही प्रकार असला तरी त्यांत अनेक वेळां तेंच तें किंवा तत्सम अनुभव येऊं लागले म्हणजे त्यांतून सर्व सामान्य व सरळ असे साधे सोपे नियम तयार होतात. अनुभव जसजसे वाढत जातात व बुध्दिसामर्थ्याची जसजशी भर पडत जात तसतसे नियम बहुसंख्याक व अधिक विस्तृत

होतात. ज्ञानाचें क्षेत्र अधिक वाढतें, अशा प्रकारे बनलेल्या नियमबध्द विस्तृत ज्ञानाला शास्त्र ही संज्ञा मिळते. रसायन--पदार्थ विज्ञानादि शास्त्रें अशींच निर्माण झालीं आहेत. हें नव्यानें सांगावयास नकोच. फल-ज्योतिषहि पण असेंच तयार झालें आहे. शनि कुंडलीच्या पंचमस्थानांत असतां काय फलें मिळतात. किंवा गुरु धनुराशींत असतांना काय परिणाम होतात, अथवा मंगळबुधांचा केंद्र झाला असतां काय चमत्कार होतात, ह्या किंवा अशा प्रकारच्या अनेक गोष्टींचा अनेक वेळां दीर्घ कालपर्यंत अनुभव घेऊन त्याचीं फलें प्रस्थापित केलीं आहेत. ह्या पूर्व पीठिकेची क्रिया अत्यंत अवजड, त्रासदायक व क्लिष्ट आहे. अनुभव घेण्यास अनेक प्रकारचीं साधनें व युक्त्या योजाव्या लागतात. कारण विविधतेच्या (Plurality of causes) च्या सांपळ्यांतून शोधकाला भेदयोग (method of difference) सामर्थ्यानें आपला मार्ग आक्रमण करावा लागतो. अशा प्रकारें अत्यंत परिश्रम करून अमुक ग्रहाचे गुणधर्म काय, अमुक राशीचा स्वभाव काय, इत्यादि प्रस्थापित केलें. त्यांच्या स्वतः-बद्दलचें व परस्परांतील संबंधाचे नियम केले. दोन किंवा अधिक पदार्थ एकत्रित आले असतां कोणते परिणाम घडतील किंवा घडलेले परिणाम कां घडले, याचें विवेचन रसायन शास्त्रांतील नियमांवरून करतां येतें. तसेंच दोन ग्रह एकत्रेत आले असतां परिणाम काय घडतील वगैरे विवे-चन फलज्योतिषाच्या नियमांवरून करतां येतें.

रसायन--पदार्थ--विज्ञान--शास्त्रांत कित्येक पदार्थ एकमेकांच्या सान्निध्यांत आले असतां परस्परांचा अव्हेर करतात, तर कित्येक प्रेमालिंगन देतात. कित्येक स्वत्व राखून एकरूप झालेले (miscible liquids) पाहावयास सांपडतात, तर कित्येक स्वत्वाचा नाश करून स्वतःहून सर्व

प्रकारें भिन्न असे पदार्थ निर्माण करतात. उदाहरणार्थ मीठ व तेजाब 2 Nacl+H2 So4=Na 2 So4+2 Hcl असे प्रकार फल-ज्योतिषांत ग्रहराशी दृष्टियोगांत पहावयास मिळतात. वर्णन केलले प्रकार दिसावयास विरोधी जरी असले तर त्यांत व त्या विरोधांत कांहीं तरी सामान्य तत्त्वें व नियम दोन्हीं शास्त्रांत असतातच व आहेत. नियमांच्या व्यापकतेविषयीं सुध्दां तेंच दाखवितां येतें. रसायन शास्त्रासा-रख्या नैसर्गिक व अर्थशास्त्रासारख्या राष्ट्राय सामाजिक शास्त्रांत येणारे all things being equal, conditions being the same in all respects इत्यादि धृपदें सिध्दांताला लावलेलीं असतात. पदा-र्थाचा विशिष्ट परिणाम घडण्यास विवक्षित उष्णतामानाची व हवेच्या दाबाची गरज असते. त्याशिवाय इष्ट म्हणजे नियमानें सांगितलेले परिणाम न घडतां दुसरेच घडलेले दिसून येतात. 'वस्तूंच्या साठ्यांची वृध्दी झाली म्हणजे भाव वाढतात' हाही सिध्दांत सदासर्वकाळ व सर्व परिस्थितींत दिसणार नाहीं. त्याला 'मागणीचें समत्व' आवश्यक आहे. तसेंच पंचमां-तील शनीचें सिध्दांतवाचक फल सदासर्वकाळ व सर्वांना तेंच मिळेल काय? सिध्दांतफल केव्हांही इतर गोष्टींचा विचार वगळून दिलेलें असतें. त्यांत इतर परिस्थितींचा (फलज्योतिषांत इतर ग्रहयोग दृष्टी वगैरेंचा) भर घालून न्यूनाधिक करावें लागतें. सांगण्याचें तात्पर्य हें कीं, सर्वसामान्य नियम सिध्दांत--फल म्हणून जें दिलेलें असतें, त्याच्या कार्याची दिशा सर्वत्र असते व तो दिसतेही, पण इतर कारणांमुळें त्यांत फरक पडतो. इंग्रजींत म्हणावयाचें म्हणजे शास्त्रांतील नियम म्हणजे rules of tendencies आहेत. ह्या tendencies जेथें भरभक्कम तेथें फलाला निश्चित्व येतें. हा नियम इतर शास्त्रांत तसाच फलज्योतिषांतहि आहे.

दिलेल्या नियमांवरून झालेल्या किंवा भावी गोष्टींचा उलगडा करतां येतो हें खास. पण शनीमध्यें अमुकच धर्म कां ? शनीतच ते कां असावेत ? इत्यादि गोष्टींचें भाविक दृष्ट्या तरी विवरण करतां येत नाहीं, पण इतर शास्त्रांचे तरी मूलतत्त्वांचा उलगडा कुठें करतात. हैड्रोजनमध्यें अमुकच गुण कां असावेत ? तो उर्ध्वगामीच कां व्हावा ? ह्याविषयीं तरी कोण काय सांगूं शकतो ? अनुभव तसा आहे व तो खरा आहे. हेंच उत्तर मिळतें. तेंच उत्तर मूळ गोष्टीविषयीं फलज्योतिष देतें. वस्तुतः मूळ गोष्टींचा अनुभव हेंच शास्त्राचें बीज होय. व त्याचा उलगडा निदान भौतिकदृष्ट्या कोणी करूं शकत नाहीं.

शीत आणि उष्ण यांचा विरोध असतो, असें एक सामान्य तत्त्व आहे. शीतवाचक शनी व उष्णतावाचक मंगळ आहे. अर्थात यांचा विरोध असला पाहिजे व त्यांच्या संघट्टनानें अनिष्ट परिणाम व्हावयाला पाहिजेत व ते तसे होतात. राशींचें त्यांच्या तत्त्वानुसार वर्गीकरण केलें आहे. अग्नि, पृथ्वी, वायु व जल असे चार मुख्य विभाग आहेत. समान तत्त्वाचें साम्य व सख्य असतें. ह्या सामान्य नियमानुसार समान तत्त्वयुक्त राशींतून होणारे योग शुभप्रदच झाले पाहिजेत व ते तसे फलज्योतिषांत होतात. उदाहरणार्थ सिंह व धनु ह्या अग्निराशींच्या ह्या प्रत्येकांत एक एक ग्रह असला तर त्यांचें परस्परसंबंधी दृष्टिफल (अंशात्मक) शुभच मिळतें. समतत्त्वांच्या राशी नेहमी ४ राशींच्या अंतरावर असतात. व म्हणूनच ४ राशींच्या अंतरावरून होणाऱ्या योगाला म्हणजे नवपंचम किंवा त्रिकोण योगाला फलज्योतिष शुभत्व देतें. ह्याच्या उलट तीन राशींच्या योगांतून होणाऱ्या केंद्रयोगाला (कमीअधिक प्रमाणानें) अशुभत्व देतें.

कारण ह्या योगांत विजातीय तत्त्वांच्या राशींचा संबंध येतो. उदाहरणार्थ मेष व कर्क राशींचा संबंध म्हणजे अग्नि व जलाचा संबंध होय व तो विशेष अशुभ असणार. अर्थात सर्वमान्य व बुद्धिवादास पटणारीं तत्त्वें आहेत. तसेंच निसर्गातील माध्यान्ही नभोमंडलांत सूर्यनारायण आपल्या दीप्तीच्या पराक्रमाच्या पूर्ण वैभवांत असतो. जगांत जिकडे तिकडे लोक व्यवसायांत उपजीविकादि साधनांत गर्क असतात. जगांतील क्रिया व कर्तृत्व शक्ति जागृत असते. उलट प्रकार मध्यरात्रीं होतो. हीच परिस्थिति कुंडलीच्या दशमचतुर्थस्थानासंबंधीं व दशमचतुर्थस्थ ग्रहासंबंधीं आहे. (कारण रवि माध्यान्हीं दशमांत व मध्यरात्रीं चतुर्थांत असतो.) व दशमचतुर्थ स्थानांचीं फलें वर दिलेल्या प्रकारच्या स्वभावाचीं असतात.

शास्त्र कितपत नक्की आहे हें पाहण्याचा एक प्रकार असा आहे कीं त्याचें स्वरूप व नियम गणितशास्त्राच्या सिध्दांताच्या आटोक्यांत आहेत कीं नाहींत. त्यांचा विचार गणित दृष्ट्या होऊं शकतो कीं नाहीं. आतां वस्तुतः फलज्योतिष मुळीं आकाश ज्योतिषासारख्या सर्वमान्य शास्त्रावर बसविलें आहे. आकाश ज्योतिषांतीलच राशी, ग्रह, गति इत्यादि प्रकार जसेचेतसे घेतले आहेत. फलज्योतिष आकाश ज्योतिषाच्या पुढें जाऊन आकाश ज्योतिषांत जें दिसतें त्याचे परिणाम काय हें सांगतें, म्हणजे फलज्योतिष हें खच्चून गणितबध्द आहे. फलज्योतिषाचीं फलें कालबध्द आहेत व तीं आकाश ज्योतिषांतर्गत गतिमानावरूनच काढतात. शनिगुरूचा त्रिकोण केव्हां होईल किंवा हर्शल कुंडलीच्या नवमांत केव्हां जाईल हा काल आकाश ज्योतिषावरून निश्चित होतो व त्या कालीं शनिगुरु त्रिकोणाची किंवा नवमगत हर्शलचा जन्मकाल परिस्थितयनुरूप फलें मिळ-

तात. हे किंवा अशा प्रकारचे समस्वभावी योग ज्या ज्या वेळीं घडतात त्या त्या वेळीं तीं किंवा तत्सम फलें पहावयास मिळतात ह्यावरून काय सिध्द होतें ? अर्थात फलज्योतिषाचा पाया अत्यंत शुध्द गणितात्मक अशा शास्त्रावर जर बसला आहे, व त्यांतील नियम निदान इतर शास्त्राप्रमाणें आहेत, तर तें शास्त्रच आहे. वास्तविक फलज्योतिषाचें काम गणिताशिवाय घटकाभर देखील चालूं शकत नाहीं. त्याच्या बांधणींत देखील गणित-सिध्दांत गोवले गेले आहेत. हें आमच्या हर्शल नेप्च्यून इसिस ओसिरिस ह्या लेखांत दाखविलेंच आहे.

आक्षेपकांनां आतां हाच सवाल करावयाचा कीं रसायन गणितादि शास्त्रांच्या सिध्दांतांशीं संमत, सर्वमान्य तत्त्वांना जें अनुमत आहे. ज्यांतील मांडणी पध्दतशीर, नियम सर्वसामान्य व बुध्दिवादाला अनुसरून आहेत, तें नियमबध्द ज्ञान म्हणजे फलज्योतिष शास्त्र नव्हे काय ? कदाचित अमक्यांनीं केलेलीं भविष्यें तर चुकलीं असें म्हणाल तर इतकें सांगणें इष्ट आहे कीं शास्त्राचा अभ्यास करून त्याचें ज्ञान करणें हो एक गोष्ट आहे; व त्या ज्ञानाचा नीट उपयोग करतां येणें ही दुसरी गोष्ट आहे. फलज्योतिष शास्त्र आहे. त्यावरून भविष्य करणें हो कला आहे. पढलेलें एक आणि कढलेलें एक. तेव्हां भविष्यें चुकलीं म्हणून शास्त्र खोटें नव्हे. मतभेद असले म्हणून शास्त्र खोटें नव्हे. चुका सर्वत्र होतात. मतभेद सर्वत्र आहेत. आवडनावडहि पण सर्वत्र आहे. स्वानुभवावरून तर आम्हांला असें वाटतें कीं इतर बहुतेक शास्त्रांप्रमाणें व कांहीं शास्त्रांपेक्षां ह्यांत ज्यास्त शास्त्रत्व आहे. आमच्याच कुटुंबांत गेल्या ६ महिन्यांत दोन मृत्यु झाले. त्यांचा कयास

* 'Modern Astrology' June 1924 Page 175

(दिवस जरी नक्की नाहीं) अल्प ज्ञानानें मृत्यूच्या १२ महिने अगोदर करूं शकलों. पण डॉक्टर, हकीम एका दिवसापूर्वीच काय पण एक तास अगोदर सुध्दां करूं शकले नाहींत. वैद्यक शास्त्र खोटें आहे असें म्हणण्याचा भाव नाहीं पण ज्योतिषशास्त्र सत्य आहे हें मात्र खास.

कै. रा. रा. जीवनराव त्रिंबक चिटणीस यांचे त्रुटित लेख.

ज्योतिर्मालेचे आद्य चालक व सायन फलज्योतिषाचे जनक कै. रा. रा. जीवनराव त्रिंबक चिटणीस यांचीं भविष्यें फारच अचूक असत. सन १८९५ ते १९०९ पर्यंतच्या कालामध्यें त्यांनीं केलेल्या त्यांच्या अनेक भविष्यांचा ज्यांना प्रत्यक्ष अनुभव पाहण्यास मिळाला आहे, त्यांना आमचे विधानाची सत्यता सहज पटेल. कै. जीवनराव हे एक उत्तम ज्योतिषी होते; त्यांचो भविष्य करण्याचो पध्दती फारच अपूर्व व शास्त्रशुध्द होती. त्यांचे हातून झालेलीं भविष्यें कशीं व कितीं मिळालीं वगैरे अनुभवासह प्रसिध्द करण्याचा आम्हीं प्रयत्न करीत आहों. परंतु आतांपर्यंत आम्हांला अशीं फारशीं भविष्यें मिळालीं नाहींत. जीं कांहीं मिळाली आहेत तीं आमचे संग्रहीं आहेत. नुकताच प्रसिध्द झालेला कै. लोकमान्य टिळकांचे केसरींतील लेख भाग दुसरा [राजकीय खंड २ रा] यामध्यें असाच एका भविष्यासंबंधानें पान १०६ वर कै. लो. टिळक यांनीं खालील-प्रमाणें केलेला उल्लेख आम्हांस पाहण्यास मिळाला. हें भविष्य कसें केलें होतें व काय होतें, हें जाणण्याचो इच्छा पुष्कळांस होणें नैसर्गिकच आहे म्हणून आज रोजीं आम्हीं तें भविष्य मालेच्या वाचकांकरितां पुन्हा मुद्रित करीत आहों.

" सारांश, लार्ड सँढर्स्ट यांच्या मनाचा ओढा जात्याच प्रजापक्षाकडे अधिक आहे व ते आपल्या पांच वर्षांच्या कारकीर्दीत केवळ हॅरीसशाहीचें अनुकरण न करितां स्वतंत्रतेनें वागतील अशी बहुतेक सर्व लोकांस आशा होती. शिवाय त्यांच्या कारकोर्दीच्या आरंभींच ज्या एकदोन गोष्टी घडून आल्या त्यामुळें तर हा समज आणखी दृढ झाला. मुंबईच्या म्युनिसिपालिटीचे अध्यक्ष यांस नवीन वाढविलेल्या पोलिस खर्चाबद्दल लार्ड सँढर्स्ट यांनीं स्वतः लिहिलेलें पत्र, मध्यभागास दिलेला कायदेकौन्सिलचा निवडणुकीचा हक्क, पुण्यावर जादा पोलिस बसविण्याच्या वाटावाटीस दिलेली रजा, आणि फर्ग्युसन कॉलेज उघडण्याच्या समारंभास मुद्दाम येथें येऊन केलेलें भाषण, वगैरे लक्षणांवरून लॉर्ड सँढहर्स्ट यांची कारकीर्द हारिसशाहीपेक्षां पुष्कळ सुखावह होईल असें वाटत होतें. याविरुद्ध त्या वेळीं एकच काय तें भविष्य करण्यांत आलें होतें. ज्योतिर्मालेचे कर्ते यांनीं ज्योतिष्याच्या आधारावरूनच त्याच वेळीं वर्तविलें होतें कीं, **लॉर्ड सँढर्स्ट यांची कारकीर्द लोकांस आशा वाटत आहे त्याप्रमाणें सुखावह व्हावयाची नाहीं. रयतेवरील कराचें ओझें वाढेल, आणि अखेरीस मागलाच गव्हर्नर बरा असें म्हणण्याची पाळी येईल !! कोणाचा फलज्योतिषावर भरंवसा असो वा नसो. परंतु रा. रा. चिटणीस यांनीं वर्तविलेलें हें भविष्य अखेरीस अक्षरशः खरें घडून आलें ही मोठ्या आश्चर्याची गोष्ट होय हें कोणीहि कबूल करील. "**

लॉर्ड सँढर्स्ट यांचे कारकोर्दीचें भविष्य ज्योतिर्मालेंत पुस्तक पहिलें सप्टेंबर १८९५ अंक ५ मध्यें खालीलप्रमाणें आलें होतें. हल्लीं हें पुस्तक फारच दुर्मिळ झालेलें आहे. या पुस्तकांतील दुसरे असेच उपयुक्त लेख पुन्हां ज्योतिर्मालेंमध्यें प्रसिध्द करण्याचा आमचा विचार आहे.



कायदे कौन्सिलाच्या प्रथम बैठकीच्या वेळीं वृश्चिक ह्या गूढ राशीचा (mystic sign) तेरावा अंश उदित पावत आहे. हें लग्न स्थिर राशीचें असून त्याचा स्वामी मंगळ हा राज्यभुवनांत (१०) कन्या ह्या द्विस्वभाव राशींत आहे. लग्नांत हर्शल हा पापग्रह आहे. ह्या ग्रहाचा स्वभाव अनियमित व आकस्मिक फळें उत्पन्न करण्याचा आहे. सदरील कारणांवरून ह्या बैठकीपासून वेळ मारून नेणाऱ्या दुटप्पीपणाचीं (द्विस्वभाव राशीमुळें) व गूढपणाचीं (गूढलग्नाप्रमाणें) ह्या कारकीर्दीत रेलचेल उडेल. प्रजादर्शक चंद्र हा चतुर्थस्थानांत असून त्यावर

मंगळ ह्या पापग्रहाची पूर्ण दृष्टि आहे. राजकीय कारकीर्दीचे आरंभीं चंद्र जर चतुर्थस्थानांत असला तर प्रजाजनांस सुखाचा लाभ फारसा होत नाहीं. मंगळ हा ग्रह युद्धकलेचा दर्शक आहे, ह्यामुळें प्रजेवर लढाईचे खर्चाचा, पोलिसचे खर्चाचा आणि इतर करांचा बोजा ह्या कारकीर्दीत बराच बसेल.

चतुर्थस्थानचा (भूमिस्थानचा) अधिपति शनि हा व्यय भुवनांत असल्यामुळें, राष्ट्रीय मिळकत जी जमीन तीवर वसविलेला जास्त सारा ह्या कारकीर्दीत कमी होणार नाहीं. ह्या कारकीर्दीत शेतकरी लोकांस उपास काढण्याची पाळी येईल असें चिन्ह दिसतें. नवमस्थानांत गुरु हा ग्रह कर्क राशीचा म्हणजे उच्च असल्यामुळें विद्याखात्यांतील कौन्सिलरास अथवा महाराष्ट्रांतील एखाद्या संस्थानिकास बहुमानाचा पदवी मिळेल. विद्येचा ग्रह बुध हा सिंह राशींत असून नवमस्थानांत आहे ह्यामुळें विद्वान व अधिकारारूढ असलेल्या गृहस्थांस पदवीदानाचा अथवा राजकीय बहुमानाचा लाभ जास्त होईल. गुरु हा ग्रह चंद्राचे क्षेत्रांत आहे आणि चंद्र हा ग्रह गुरूचे क्षेत्रांत आहे म्हणजे दोन्ही ग्रह अन्योन्य क्षेत्रांत आहेत. चंद्र हा जनतादर्शक आणि गुरु विद्यादर्शक आहे. तेणेंकरून ह्या कारकीर्दीत लोककल्याणासाठीं प्राथमिक शिक्षणाला चांगली मदत होईल.

दशमस्थानांत रवि स्वगृहीचा असल्यामुळें बलिष्ठ आहे म्हणून नामदार लॉर्ड सँडर्स्ट यांचे मनांत चांगलीं कृत्यें करण्याची महत्वाकांक्षा रवीच्या स्वभावाप्रमाणें जास्त वाढेल. त्यांस दीन प्रजेची कळकळही येईल; परंतु रवीवर हर्शल ह्या पापग्रहाची वर्तुलपाद (९०) अशुभ दृष्टि असल्यामुळें प्रजाहिताचें काम त्यांच हातून पार पडणार नाहीं. ना.

एल्फिन्स्टनचें अनुकरण करून आपली कारकीर्द चांगली झाली असें दाखविण्याच्या ऐवजीं हारीस--शाई दृष्टीस पडण्याचा संभव आहे. नामदारांची प्रकृति कारकीर्दीचे मध्यभागीं अस्वस्थ राहील. सारांश ह्या बैठकींत लोकांस विद्यादानापेक्षां जास्त कांहींही दिसणार नाहीं.

मंगळाचें पृथ्वीच्या अतिजवळ येणें.

शुक्र परमतेजस्वितेमध्यें आला असतां त्याचे फलासंबंधानें कांहीं विचार करतां येणें शक्य आहे किंवा काय यासंबंधानें ज्योतिर्मालेच्या वर्ष ८ वें अंक ३ व ४ मध्यें आम्हीं आमचे विचार वाचकांचे पुढें मांडले आहेत. वरील लेखामध्यें ग्रह जेव्हां तेजस्वी दिसतात त्या वेळीं त्यांचे फलासंबंधानें कांहीं फरक होत असतो किंवा काय यासंबंधानें सविस्तर विवेचन केलें असून प्राचीन ज्योतिर्विदांचें काय मत आहे यासंबंधानेंही सांगण्यांत आलें आहे. असाच एक दुसरा चमत्कार चालू आगस्ट महिन्याचे २३ वे तारखस घडणार आहे व त्यासंबंधानें माहिती व आमचे विचार मालेच्या वाचकांस प्रस्तुत लेखामध्यें सादर करण्याचें योजिलें आहे.

तारीख २३ आगस्ट १९२४ रोजीं मंगळ हा पृथ्वीला अति नजीक असा येणार आहे. चालू शतकामध्यें याच्या इतका पृथ्वीला जवळ मंगळ असा कधींच येणार नाहीं. या वेळीं पृथ्वी व मंगळ यांचेमध्यें फारच थोडें म्हणजे ३५० लक्ष मैलांचे अंतर राहणार आहे. मंगळ पृथ्वीच्या नजीक आला असतां काय घडामोडी होतात किंवा मंगळ पृथ्वीच्या फार जवळ केव्हां येतो वगैरे गोष्टी पूर्व आचार्यांच्या लक्षांत आल्या असतील असें उपलब्ध असलेल्या माहितीवरून दिसत नाहीं. युक्त मंगळाचें बिंब कधीं कधीं मोठें व तेजस्वी दिसतें व त्याचें फल काय असूं शकेल यासंबंधानें वराहमिहिरानें आपले बृहत् संहितेमध्यें खालीलप्रमाणें उल्लेख केला आहे.

विपुल विमलमूर्तिः किंशुकाशोकवर्णः स्फुटरुचिरमयूखस्तप्तताम्रप्रभावः।
विचरति यदि मार्गं चोत्तरं मेदिनोजः शुभकृतवनिपानां हार्दिदश्च प्रजानां॥

बृ. सं. अ. ६ श्लो. १६

विस्तीर्ण (मोठा) व स्वच्छ आहे मूर्ति (–बिंब–) ज्याची असा, पळस व अशोक यांच्या पुष्पाच्या रंगासारखा म्हणजे अति आरक्त, स्पष्ट व तेजयुक्त आहेत किरण ज्याचे असा, तापवलेल्या तांब्यासारखी आहे प्रभा ज्याची असा उत्तर मार्गानें जाणारा असा भौम–मंगळ–राजांस शुभकारक व लोकांस संतोषकारक होतो.

अमक्या नक्षत्रामध्यें उदय झाल्यानंतर जर अमुक नक्षत्रामध्यें मंगळ वक्र होईल किंवा तो अमुक तारेचें भेदन करून किंवा तिच्या दक्षिण किंवा उत्तर मार्गानें जाईल तर त्याचे फल अमुक याप्रमाणें बारिक सारिक माहिती सांगणाऱ्या वराहमिहिराच्या वरील गोष्ट लक्षांत आली असतां किंवा त्याला इतर ग्रंथावरून कळली असतां त्यानें ती खात्रीनें सांगितली असती. परंतु ही गोष्ट वराहादि पूर्व आचार्यांच्या लक्षांत येणेंच शक्त नव्हतें. ग्रह सूर्याभोंवती वर्तुल मार्गानें भ्रमण करितात वगैरे कल्पना पहिल्यानें युरोपखंडामध्यें प्रसिद्ध ज्योतिर्विद कोपरर्निकस याचे मनामध्यें इ. स. १५०७ च्या सुमारास आली व त्यानंतर केप्लर व न्यूटन यांनीं हल्लीच्या सूर्यमध्यस्त पद्धतीचे सशास्त्र ज्ञान जगास करून दिले, त्याचे पूर्वी आपले प्रमाणेंच पृथ्वी मध्यभागी असून तिचें सभोंवती सर्व ग्रह वर्तुल मार्गानें फिरतात असें इ. स. १५० च्या सुमारास झालेल्या टालमीचें मत सर्वत्र प्रचारामध्यें होतें. व ही कल्पना रूढ असेपर्यंत ग्रह केव्हां अत्यंत जवळ येतात किंवा दूर जातात हें कळणें शक्य नाहीं. ग्रह सूर्याभोंवती दीर्घवर्तुल मार्गानें फिरतात व त्याच्या एका केन्द्रामध्यें सूर्य असतो असें पहिल्यानेंच केप्लर यानें इ. स. १६१९ मध्यें जगजाहीर केलें व त्याच सुमारास दूर्बिणीची युक्ति हालंडदेशामध्यें निघून ज्योतिषशास्त्राच्या शोधाकडे प्रथम दुर्बिणीचा उपयोग गॅलिलिओनें करून दाखविल्यानंतरच ग्रहांचे अवलोकन चांगले करतां यावें म्हणून ते पृथ्वीला जवळ केव्हां येतात वगैरे गोष्टींकडे ज्योतिर्विदांचे लक्ष लागले पाहिजे. व ही आमची कल्पना खरी आहे याची साक्ष मंगळासंबंधीचें शोध देत आहेत. गेल्या २०० वर्षामध्यें मंगळासंबंधानें जितके शोध उपलब्ध झाले आहेत तितके यापूर्वी जगाला माहितच नव्हते असें म्हटलें असतां तें अतिशयोक्तीचे खास होणार नाहीं.

सूर्यमालेंत शुक्रापुढें आपली पृथ्वी असून तिच्या पलिकडे मंगळ आहे. नुसत्या डोळ्यांनीं देखील मंगळ आपल्या तांबडया रंगामुळें इतर ग्रहांपासून सहज ओळखतां येतो व यांचेंयाच्या तांबुस वर्णावरून त्यास अंगारक, लोहितांग, अग्नि इत्यादि नांवें मिळालीं आहेत. फलज्योतिषशास्त्राच्या सर्व शाखामध्यें जातक, ताजक, मुहूर्त इत्यादीमध्यें त्याला क्रूर ग्रह मानिला आहे व ते त्याच्या

रक्ततेला साजेसेंच आहे. प्राचीन पाश्चिमात्य ज्योतिर्विदांनीं त्याला युद्धाची देवता Mars the war lord अशा अर्थाचें नांव दिलें आहे. व मेदिनीय ज्योतिषशास्त्रामध्यें खून, दंगल, संप, कलह, शत्रु मारामाऱ्या, चोऱ्या, जाळपोळ, अग्निप्रलय, लढाया, सेनापति, लढवय्ये लोक, डाक्तर, सर्जन, आरमारावरचे अधिकारी लोक, खाटीक, कसाई, लोखंडाचें किंवा पोलादाचे कारखाने, त्या कारखान्यामध्यें काम करणारे लोक, दंतवैद्य, लोहार, हजाम, स्वयपाकी, किंवा जे तीक्ष्ण हत्यारे वापरतात किंवा अग्नीचा उपयोग आपले धंद्यामध्यें करतात असे लोक किंवा असल्या धंद्याचा कारक मंगळ मानतात.

भारतीय युद्धाचे कालीं हा ग्रह वक्री होता. युद्धाच्या पूर्वीच ज्येष्ठांपर्यंत येऊन उलटा अनुराधांकडे वळला. अनुराधा नक्षत्राची देवता मित्र आहे. या स्थितीनें ज्येष्ठ राजा जो दुर्योधन त्याच्या मित्रांचा संहार अंगारकानें दर्शविला, असें भारत टीकाकार म्हणतात. ज्येष्ठा या नक्षत्राचा आरंभ वृश्चिक राशीच्या १६ अं. ४० कले पासून होतो; व अंत धनेच्या ० अंशामध्यें येतो. दिल्ली किंवा हस्तिनापूर याची वृषभ राशि आम्हीं आमचे मेदिनीय ज्योतिषामध्यें दिली आहे त्याचे उदित अंशाजवळच भारतीय युद्धाचे काळी मंगळ वक्री होऊन प्रतियोग करीत होता. व भारतीय युद्धाच्या वेळीं जी अनिष्ट ग्रहस्थिति होती त्यांपैकीं हें एक महत्वाचे कारण आहे. राजधानीचे शहराचे उदित अंश वकि मंगळासारख्या क्रूर ग्रहानें पीडित असतां देशांत युद्धानें संहार होणें हें ज्योतिषशास्त्राला धरून झालें नाहीं असा एखादाच माथेफिरू वेडापीर म्हणेल. भारतसाम्राज्याचे राजकारणाचे स्थल युद्धदेवतकडून पीडित असतां दुसरे काय होणार ? युद्धानें संहार !! व याच कारणपरंपरेनें आम्हांला असें वाटतें कीं जेव्हां जेव्हां सायन जेष्ठा वृश्चिक १६–४० तें धनु ०–० व याचे समोरील व केन्द्रामधील बिंदु वृषभ १६–४० सिंह १६–४० व कुंभ १६–४० पापग्रहानें पीडित होतील म्हणजे यामध्यें पापग्रहाच्या युत्या, वक्री होणें यातून पापग्रहाचें भ्रमण, ग्रहणें होणें, यायोगानें भारतवर्षामध्यें अति मोठाल्या घडामोडी, दुष्काळ रोगराई भयंकर मृत्युसंख्या झाली पाहिज असें आम्हांला वाटतें. व याच कारणावरून शनि हर्शलचा प्रतियोग सन १९१८ सालीं सिंह व कुंभ राशीमधून होत असतां भयंकर प्राणहानीचें भविष्य आम्हीं केलें होतें व हेंच कांहीं अंशानें कारण पुढल्या १९१९ मधल्या जालियनवाला बागेंतला गोळीबार वगैरे अस्वस्थतेस कारणभूत झालें असावें. जेष्टानक्षत्रामध्येंच सन १८९६ सालीं शनि हर्शलची युति झाली होती व यानंतर हिंदुस्थान देशामध्यें प्लेगचा हाहाःकार कसा

झाला याची आठवण अद्यापि सर्वत्रांचें लक्षामधून गेली नसेल. सन १९२५ मध्ये डिसेंबर महिन्यामध्यें यांच जेष्टानक्षत्रामध्यें शनिमंगळांची युति होत आहे व त्याच अंशामध्यें शनि वक्र गतीनें येऊन पुन्हा मार्गी होऊन जून १९२६ तें सप्टेंबर १९२६ पर्यन्त रहणार आहे. व याचे समोरच्या अंशामध्यें म्हणजे वृषभ राशीच्या १९।२० अंशामध्यें मंगळ वक्री होणार असून पुन्हां त्याच अंशामधून जानेवारी १९२७ च्या सुमारास जाईल. हा काल भारत भूमीच्या इतिहासामध्यें नमूद करण्यासारखा जाईल असें वाटतें. दुष्काळ, रोगराइ, अस्वस्थता, दंगेधोपे यांपासून भारतभूमि त्रस्त होणार असें दिसत आहे.

ग्रह एका नक्षत्रांमधून त्याच्या पुढच्यांत असे जावयाचे ते कधीं कधीं उलटे वळतात व तसे वळतांना कांहीं वेळ खांबासारख स्तब्ध दिसतात. त्या वेळी ते फार जोराचा आसर आपलेवर करितात. ग्रहांची स्तंभी होणारी स्थिति फार विचार करण्यासारखी आहे. मंगळ एका राशींत असतां वक्र झाला म्हणजे पुन्हा सरळ म्हणजे मार्गी होऊन त्या राशींमधून पुढें जाईपर्यंत बरेंच महिने लागतात. मंगळ ज्या वेळीं स्तंभी होतो त्या वेळी त्यास कुजस्तंभ झाला असें म्हणतात. कुजस्तंभ अनिष्टकारक किंवा हानिकारक मानतात.

हल्लीच्या एकंदर शोधावरून पाहतां मंगळाचे व पृथ्वीचे अतिनिकट साम्य असलेलें पाहण्यास मिळतें. मंगळावरील, हवामान, ऋतु, दिनमान, कालवे, त्यांच्या कक्षेचे विषुव वृत्तावरील तीर्थकत्व इत्यादि सर्व गोष्टी पृथ्वीसारख्याच आहेत. आर्य पूर्वजांनीं त्याला "भूमिपुत्र" "कुज" अशी फार प्राचीन काळीं नांवें दिलेलीं आहेत कदाचित हीं नांवें वरील सर्व गोष्टी त्यांचे ध्यानामध्यें आल्यानें देखील दिली गेली असणें संभवनीय आहे.

मंगळादि बहिर्वर्तिग्रह सूर्याजवळ नेहमी नसतात. म्हणून रात्रीं आकाशामध्यें ते पाहिजे तिकडे दिसतात. ते पृथ्वीच्या बाहेर आहत म्हणून कधीं पृथ्वीच्या एका बाजूला ते व दुसऱ्या बाजूला सूर्य असें होतें. या वेळीं त्यांचे षडभांतर (सूर्यापासून ६ राशींचे अंतर) किंवा रवीबरोबर प्रतियोग झाले असें म्हणतात. या वेळीं ते सूर्यास्ताबरोबर उगवतात. व सर्व रात्रभर दिसतात. कधीं ते व पृथ्वी यांच्यामध्यें सूर्य येतो, तेव्हां सूर्याचा व त्यांचा योग झाला असें म्हणतात. व तेव्हां त्याचा अस्त असतो. सूर्यापासून पृथ्वीचे अंतर व ह्या ग्रहांचें अंतर यांच्या बेरजे इतकें अंतर योगाच्या वेळीं पृथ्वी व ग्रह यांचेमध्यें असतें; आणि वजाबाकी इतकें अंतर षडभांतराच्यावेळीं किंवा प्रतियोगाच्या वेळीं असतें. अर्थात ते प्रतियोगाचे वेळीं किंवा षडभांतरीं पृथ्वीला अधिक जवळ

असतात. सूर्यापासून मंगळाचें मध्यम अंतर १४१० लक्ष मैल व पृथ्वीचें ९२३ लक्ष मैल आहे. यामुळें प्रतियोगाचे वेळीं किंवा षडभांतराचे वेळी पृथ्वीपासून मंगळ ४८७ लक्ष मैल असतो परंतु तोच योगाचे वेळीं २३३३ लक्ष मैल म्हणजे सुमारे पांचपट अंतरावर असतो. म्हणूनच सूर्याच्या जवळ असतो तेव्हां, म्हणजे त्याचा उदय नुकताच झाला असतो, किंवा अस्ताची संधि असते तेव्हां, तो जेवढा दिसतो, त्याचे सुमारें पंधरा वीस पट तो प्रतियोगाचेवेळीं दिसतो. तो सूर्याजवळ असतो तेव्हां आवशीस सूर्यास्तानंतर लवकरच मावळतो, किंवा पहाटे सूर्योदयापूर्वी थोडाच वेळ उगवतो. या वेळीं तो ओळखण्याची फारच पंचाइत पडते; कारण तो सुमारें रोहिणीच्या मुख्य तारेइतका किंवा कदाचित् तिच्याहूनही कमी तेजस्वी दिसत असतो. आणि प्रतियोगाचे वेळीं–षडभांतराच्या वेळीं तर तो गुरूच्या इतका जवळ जवळ तेजस्वी दिसतो. ग्रह आणि सूर्य यांच्या मध्यें तीन राशींचें म्हणजे सगळ्या आकाशाच्या चवथा हिस्सा किंवा दृश्य आकाशाचा अर्धा हिस्सा इतकें अंतर होते त्यास त्रिभांतर म्हणतात. किंवा रवीबरोबर त्या ग्रहाचा केन्द्रयोग किंवा ९० अंशांचा दृष्टियोग झाला म्हणून म्हणतात. सूर्याच्या पूर्वेस ग्रह असतां जें त्रिभांतर होतें त्यास पूर्व त्रिभांतर म्हणतात. हें योगाच्या पूर्वी होतें. म्हणजे या वेळीं ग्रह सूर्याचे पुढल्या चवथ्या राशीमध्यें असतो. या वेळीं सूर्य मावळतांना ग्रह माध्यान्हीं येतो. सूर्याच्या पश्चिमेस ग्रह असतां जें त्रिभांतर होतें त्यास पश्चात्–त्रिभांतर म्हणतात. हे योगाचे पश्चात म्हणजे योग झाल्यावर होतें. या वेळीं ग्रह सूर्यापासूनच्या पाठीमागील चवथ्या राशीवर असतो. या वेळीं सूर्योदयीं ग्रह माध्यान्हीं येतो. येथें फलज्योतिष शास्त्रामध्यें येत असलेल्या एकाच दृष्टियोगाचे दोन भेद कसे उत्पन्न होतात याचा विचार आलेला आहे पण तो विषय फारच मोठा असल्यामुळें तूर्त सोडून देऊं. पुढेमागें त्यासंबंधानें एखाद्या स्वतंत्र लेखामध्यें त्याचा विचार करण्याचा आमचा मानस आहे. भारतीय ज्योतिष चंद्रोदय नांवाचे मासिकामध्यें आम्ही जातकतत्त्वदर्शन नांवाचें एक गुजराथीमध्यें क्रमवार पुस्तक प्रसिद्ध करीत आहों त्यामध्यें आम्हीं आमचवरील दृष्टिसंबंधानें विचार वर्गापुढें मांडले आहेत. असो.

ग्रहांच्या कक्षा आकाशांतील एका तेजाचा दुसऱ्या तेजाभोंवतीं फिरण्याचा जो मार्ग त्यास कक्षा असें म्हणतात. ह्या पूर्ण वर्तुळाकार नाहींत; क्वचित् लांबट म्हणजे दीर्घवर्तुळाकृति आहेत. व म्हणून त्यांचीं अंतरें समान नसतात. कमजास्त होतात. त्यामुळें ग्रहांचीं बिंबें लहानमोठी दिसतात. कक्षेंतला जो बिंदु मध्यवर्ति ज्योतीपासून लांब असतो त्यांस उच्च म्हणतात. आणि जवळ असतो

त्यास नीच म्हणतात. कक्षेला पूर्ण वर्तुलत्वाहून जो कमीपणा असतो त्यास केन्द्रच्युति म्हणतात. ही च्युति बुधाखेरीज सर्व ग्रहांपेक्षा मंगळाची फार जास्त आहे. यामुळें मंगळ उच्ची असतो तेव्हां सूर्यापासून १५४० लक्ष मैल अंतरावर असतो. आणि नीचीं असतां १२८० लक्ष मैलांवर असतो. यामुळें षडभांतराच्या म्हणजे युतियोगाच्या वेळीं मंगळ जर नीचीं असला तर तो पृथ्वीपासून वर सांगितलेल्या ४८७ लक्ष मैलांपेक्षांही कमी अंतरावर असतो. मंगळाच्या नीचीं पृथ्वी आगस्टच्या २६ तारखेस येते. तया दिवशीं जर षडभांतर म्हणजे प्रतियोग झाला तर पृथ्वी पासून मंगळ फक्त ३४८ लक्ष मैलांवर असतो; आणि मंगळाच्या उच्ची पृथ्वी फेब्रुवारी २१ तारखेस असते तेव्हां षड्भांतर (प्रतियोग) झालें तर तेव्हां तो ६२७ लक्ष मैल असतो. यामुळें फेब्रुवारीतल्या षड्भांतरापेक्षां (प्रतियोगापेक्षां) आगष्टांतल्या षडभांतराच्या म्हणजे प्रतियोगाचे वेळीं तो सुमारें सवातीन पट मोठा व तेजस्वी दिसतो. जेव्हां मंगळरवीचा प्रतियोग होतो तेव्हां म्हणजे तो ज्या वेळीं षडभांतरीं असतो त्यावेळी त्याचे बिंबाचा त्यास कधी कधी ३०.४ विकळा मोठा झालेले पाहण्यास मिळतो. परंतु हा प्रकार जेव्हां हा ग्रह (perihelion)सूर्या पासून जवळ म्हणजे आपल्या नीचीं असून व त्याचवेळीं पृथ्वीही सूर्यापासून आपल्या अंत्यदूरच्या बिंदूमध्यें (aphelion) म्हणजे उच्चीमध्यें पाहण्यास मिळतो. सन १८७७ मध्यें या ग्रहाचे परमावधीचे किंवा सर्वांत जास्त मोठ असें बिंब पाहण्यास मिळालें होतें. २८ आगस्ट पासून ८ सप्तंबर १८७७ पर्यंत याच्या बिंबाचा व्यास २८-४ विकळा पाहण्यास मिळाला होता. चंद्राच्या बिंबाचा व्यास सरासरी ३१ कळा आणि ३४ विकळा आहे, म्हणजे यावरील मोठ्यांत मोठ्या दिसणाऱ्या मंगळाच्या बिंबाच्या व्यासापेक्षां चंद्राच्या बिंबाचा व्यास सरासरी ६३ पटीनें मोठा आहे. व म्हणून ६३ पट पदार्थ मोठा दर्शविणाऱ्या दूर्बिणींतून अस्ताकाळीं मंगळाकडे पाहिलें असतां आपणाला मंगळाचें बिंब चंद्राएवढें मोठे दिसेल. रवि मंगळ प्रतियोगाचे वेळीं तो सूर्यास्ताचे सुमारास उगवतो व मध्यरात्रीचे सुमारास माध्यान्ही येतो त्या वेळीं आपणाला त्याचें पूर्ण प्रकाशित असें बिंब दिसतें. कारण यावेळीं रवि आपले पाठीमागें असून मंगळाचे पूर्णप्रकाशित बिंब असें आपले नजरेला पडतें. व हे काल मंगळाचें निरीक्षण करण्यास व वेध घेण्यास फारच महत्वाचे असतात.

मंगळाचा अमाप्रदक्षिणाकाळ–पृथ्वीवरून पाहणारास सूर्य व दुसरें एखादे-स्वस्थ तेज हीं एकदां एके ठिकाणीं दिसल्यापासून पुन्हां दिसेपर्यंत जो त्या दुसऱ्या तेजाची प्रदक्षिणा होते तिला अमाप्रदक्षिणा म्हणतात–सुमारें ७८० दिवस आहे. म्हणून षडभांतर–प्रतियोग, त्रिभांतर–केन्द्रयोग, वक्रत्व, मार्गित्व अस्त व

उदय यांच्या एकदांच्या वेळेंत २ सौरवर्षें व ५० दिवस मिळवावे म्हणजे त्या त्या गोष्टींची पुढील वेळ सुमारानें निघते. रवि मंगळाचे सात प्रतियोग झाले म्हणजे पुन्हा एकदां हे दोन ग्रह आपल्या अत्यंत जवळच्या ठिकाणीं म्हणजे नीचीं येतात व याच वेळीं हा ग्रह पृथ्वीला फार जवळ येतो म्हणजे जवळ जवळ दर पंधरा वर्षांनीं हा ग्रह पृथ्वीला अत्यंत नजीक येऊन याचे बिंब फार मोठें व तेजस्वी दिसते. व या वेळीं याचे वेध घेणें फारच सोइस्कर पडते. पूर्वी हा ग्रह १८३०, १८४६, १८६२, १८७७, १८९२ व १९०९ सालीं पृथ्वीला फार जवळ आला होता व तो आतां पुन्हां तसाच १९२४ मध्यें येणार आहे. ज्या ज्या वेळीं हा ग्रह याप्रमाणें पृथ्वीला अंत्यत नजीक असा येतो त्या त्या वेळीं शनीचे त्याचे भोंवती असलेया वलयामध्यें फरक झालेला दिसतो व तीं दिसेनाशी होतात हा एक मोठा लक्षांत ठेवण्यासारखा चमत्कार घडत आहे.

आपल्या अंत्याजवळ असा एकटा मंगळच येतो असे नाहीं तर कधीं कधी शुक्र आपल्याला अत्यंत जवळ येतो त्या वेळीं त्याचें अंतर २६० लक्षच मैल असतें. परंतु या वेळी शुक्राची अप्रकाशित बाजू आपलेकडे वळलेली असते व त्यामुळें आपणाला शुक्रावरचें कांहीं देखील दिसत नाहीं. याचे उलट मंगळाचे असतें. तो जेव्हां आपल्याला अत्यंत जवळ येतो त्या वेळीं त्याचे संपूर्ण प्रकाशीत असें बिंब पाहण्यास मिळतें व त्याचमुळें आपणाला मंगळासंबंधानें पुष्कळच खात्रीलायक माहिती झाली आहे याचें उलट प्रकार शुक्राच्या संबंधानें आहे. शुक्र आपणाला अत्यंत जवळ येत असून देखील त्याचेसंबंधानें अज्ञान फारच थोडी माहिती प्राप्त झाली आहे.

मंगळ हा पृथ्वीपेक्षां बराच लहान आहें व याचा त्यास सरासरी ४२९० मैल आढ व परिघ १३००० मैल आहे. आकार मानानें पहतां हा ग्रह पृथ्वीपेक्षां $6\frac{1}{2}$ पटीनें लहान आहे. परंतु तो चंद्रापेक्षां सात आठ पटीनें मोठा असून बुधापेक्षां तीपट मोठा आहे. मंगळाच्या पृष्टभागावरील स्थाईक चिन्हें जशी स्पष्ट दिसतात, तशी इतर कोणत्याच ग्रहावरील दिसत नाहींत. यामुळें मंगळाचा अक्षप्रदक्षिणा काल अगदीं सूक्ष्म काढतां आला आहे. म्हणज आपल्याहून सुमारे दीड घटका मोठा आहे. व मंगळाची सूर्य प्रदक्षणा आमच्या ६८७ दिवसांत होतें इइकें त्याचें वर्ष आहे. यांत त्याचे सुमारे $66\frac{1}{2}$ दिवस होतात. त्याचा एक एक सौरमास आमच्या सुमारें ५७ दिवसाचा आहे. त्याची कक्षा आणि विषुव म्हन याचेमध्यें २४ अंश ५२ कळाचा होत आहे. म्हणजे आपल्यापेक्षां थोडासाच जास्त आहे. त्यामुळें त्यावर हवेचे फेरफार आमच्या प्रमाणेंच बहुतेक

होत असतील. मात्र तेथील एक एक ऋतुकाळ आपल्या दुपटीच्या जवळ जवळ आहे परंतु तेथें सूर्याचा प्रकाश व उष्णता आपल्या सुमारें ३।७ आहे. यामुळें कांहीं गोष्टींत परिणाम बहधासारखेच होत असतील. आपल्या पृथ्वीवरील कटिबंधासारखेच मंगळाचेही तीन उष्णकटिबंध, समशीतोष्ण व शीतकटिबंध कटीबंध असें तीन कटीबंध पडतात. उष्णकटीबंध हा मंगळाच्या विषुववृत्ताच्या दोहोबाजून २४ अं. ५२ क. आहे. समशीतोष्ण कटीबंध हा वरील २४ अं. ५२ क. पासन ६५ अं. ८ क. पर्यन्त आहे. व शीनकटिबंध हा मंगळाच्या दोन्ही ध्रुवापासून २४ अं. ५२ पर्यन्त आहे. त्याचप्रमाणें निरनिराळ्या अंक्षांसाच्या फरकामुळें व वर्षामधील निरनिराळ्या स्थितीमुळें प्राप्त होणारी दिवस व रात्रीचे प्रमाणाची भिन्नता, ध्रुवाजवळील अंत्यमोठी रात्र व अंत्यमोठा दिवस वगैरे सर्वगोष्टी जणु काय आपल्या पृथ्वीसारख्याच आहेत. जरकाय या दोन ग्रहामधील मोठा महत्वाचा भेद पाहण्यास मिळत असेल तर तो ऋतूच्या मर्यादेमध्यें पाहण्यास मिळतो. मंगळावर ऋतूचे मान पृथ्वीपेक्षां मोठे आहे. मंगळाचे वर्ष हें पूर्वी सांगितल्याप्रमाणें ६८७ दिवसांचे असल्यामुळें वसंत, ग्रीष्म, शिशिर व हेमंत हे चार ऋतु आपल्या दुपटीच्या जवळ जवळ तेथें आहेत. परंतु मंगळाची कक्षा बरीच दीर्घवर्तुळ असल्यामुळें आपल्यापेक्षां तेथील प्रत्येक ऋतुच्या मानामध्यें चांगलाच फरक आहे.

मंगळाला दोन उपग्रह असल्याचा शोध १८७७ सालीं लागला. हे उपग्रह फारच लहान आहेत. एकाचा व्यास सुमारें १५।२० मैल आहे. व दुसरा त्याच्या आंत आहे. व त्याहून बराच तेजस्वी आहे. त्याचा व्यास सुमारें ३०।४० मैल आहे. यांचीं मंगळापासून अंतरेंही फार थोडीं आहेत. व हे मंगळा भोंवती फार जलद फिरतात. बुधा खेरीज सर्व ग्रहांहून मंगळ फारच लहान आहे. तरी त्याजविषयीं आपल्यास सर्व ग्रहांहून जास्त माहिती आहें. त्याचा पृष्टभाग दुर्बिणींतून फार चांगला दिसतो. त्याचा कांहीं भाग तांबुस दिसतो आणि कांहीं हिरव्या रंगाचा दिसतो. तांबुस भाग ही जमीन असावी आणि हिरवा भाग पाणी असावें असें निरनिराळ्या प्रमाणांवरून सिद्ध झाले आहे. मंगळाच्या दोन्ही ध्रुवांभोंवतालचा भाग चकचकीत पांढरा दिसतो. तेथें बर्फ असावें असें दिसतें. ऋतुमानाप्रमाणे तो चकचकीत भाग कमी जास्त होतो. ऋतुमानाप्रमाणें बर्फ कमजास्त होऊन असें होत असावें. मंगळावर तातावरण आहे, व त्यांत कधीं कधीं आभ्रें आपल्यासारखीं येतात. यावरून मंगळावर पाणी आहे असें सिद्ध होते. आणि या गोष्टीस वर्ण लेखक यत्नानें प्रत्यंतर मिळाले आहे. आपल्या वातावरणामध्यें जी तत्वें आहेत त्याच प्रकारची तत्वें मंगळाच्या वातावरणामध्यें आहेत असें त्यांच्या वर्णलेखावरून सिद्ध झाले आहे.

गेल्या २०० वर्षांमध्यें मंगळाच्या दृश्य गोलाचे फारच सूक्ष्म निरीक्षण झाले असून त्याचे संबंधी अनेक नकाशे हल्ली उपलब्ध आहेत. यापैकीं मुख्य महत्वाची गोष्ट म्हणजे मंगळाच्या उत्तर आणि दक्षिण ध्रुवाकडे असलेले दोन पांढरे प्रदेश होत. आणि हे प्रदेश जवळ जवळ इ. स. १७१९ च्या सुमारास पाहिल्याचा दाखला मिळत आहे. व हे प्रदेश मंगळावरील ऋतुमानाप्रमाणें कमी जास्त होतात. जेव्हां मंगळाच्या उत्तर गोलार्धामध्यें हिवाळा असतो त्यावेळीं उत्तर ध्रुवाकडील हा पांढरा प्रदेशाचा पट्टा फारच मोठा असलेला पाहण्यास मिळतो. परंतु जसजसा वसंत ऋतुला आरंभ होऊं लागतो तसतसा हा भाग कमी कमी होऊं लागतो. व ग्रीष्म ऋतुच्या मध्यवर्तीच्या सुमाराचे वेळेला तर तो एखाद्या लहानशा ठिपक्या एवढें दिसूं लागतात. जणु काय हें आपल्या शेजाऱ्याचे आरटीक आणि अनटारटीक बर्फाच्छादीत प्रदेशच आहेत. जसजसे हे बर्फाचे आच्छादन वितळूं लागतें तसतसें त्याच्या सभोंवार हिरवट रंगाचे पट्टे ओढल्या सारखे दिसूं लागतात. त्यावरून हें ध्रुवाकडील बर्फाच्या वितळण्यानें उघडे झालेले समुद्र असावे असें वाटते. व मंगळावर जर कांहीं समुद्र असतील तर ते हेच होत.

मंगळावरील कालवे.

हर्शल, माडलर, डास, प्राक्टर वगैरे ज्योतिर्विदांनीं मंगळाच्या पृष्ट भागावर ज हीरवट-जांभळट प्रेद पाहिले होते ते त्यांना मंगळावरील समुद्र असावे असे वाटत होते. परंतु अलिकडील शोधान्वये ते सुपीक व जीवर कांहीं वनस्पती उगवली आहे असें जमिनीचे तुकडे असावेत असे जवळ जवळ नक्की झाले आहे. कारण ऋतुमध्यें ज्याप्रमाणें फरक होतो त्याप्रमाणें त्यांच्या रंगामध्यें व मर्यादेमध्यें फरक झालेला पाहण्यास मिळतो. या ग्रहावरील जो बराचसा तांबडट रंगाचा प्रदेश पाहण्यास मिळतात ते आपलेकडील सहाराच्या वाळवंटासारख वाळवाटांचे प्रदेश आहेत. परतु हे वाळवंटाचे प्रदेश एक सारखे रुक्ष नाहींत त्यावर एक प्रकारचे जणू काय रेघारेघांचे जाळेंच पसरलेलें पाहण्यास मिळते. हीच ती मंगळावरील कालव्यांची रचना. ह्यापैकीं प्रमुख कालव्याचा शोध हा ग्रह जेव्हां सन १८७७ मध्यं पृथ्वीला अत्यंत जवळ आला होता त्यावेळीं प्रसिद्ध इटालीयन ज्योतिर्विद शिआपरेली यानें लाविला. व त्यानंतर तर त्यानें अनेक कालव्या संबंधानें शोध लाविला असून त्यांत ल्फॉमेरीअन, लोवल, पिकरींग वगैरेनी पुष्क-

ळच भर टाकली आहे. या कालव्यापेक्षां दोन अधिक कालव्यांचा संधि होत असतां तेथें जे काळे प्रदेश दिसतात ते तर लवकरच लक्षांत येण्यासारखे अद्भुत आहेत.

वरील कालवे पाण्याचे पाट नेण्याकरितां असून त्याचे दोन्ही बाजूच्या किनाऱ्यावर गर्द झाडोरा आहे अशा तऱ्हेचे शिआपरली यांचे मत आहे. व आपणांला दिसतो हा झाडोराच असला पाहिजे कारण ग्रीष्म ऋतुमध्यें जेव्हां ध्रुवावरील बर्फ वितळण्यास लागतो त्यावेळीं हा झाडोरा चांगला तेजदार व जोराचा दिसूं लागतो व जो झाडोरा ठळक नाहीं असा आहे तो तर हेमंत ऋतुमध्यें साफ वठलेला दिसतो. मंगळावरील या कालव्याचे रचने संबंधानें अनेक तर्क वितर्क व वादविवाद चालू असून या कालव्याचा रचनें संबंधानें एक वाक्यता झालेली दिसत नाहीं.

मंगळावर वातवरण आहे, वनस्पती आहे व एकंदरींत मंगळाचे पृथ्वीशीं पुष्कळ साम्य आहे व त्यावरून त्यावर पृथ्वीप्रमाणें प्राणी असणें खास संभवनीय आहे. मंगळावरील वातावरणादि गोष्टी आपणास सुखदायक नसतील परंतु तेथील परिस्थित्यनुरुप तेथें प्राणि नसतील असें खास म्हणवत नाहीं.

असो येथपर्यंत आपण मंगळासंबंधानें काय माहिती उपलब्ध आहे या संबंधानें विचार केला. आतां हा ग्रह पृथ्वीला अत्यंत नजीक आला असतां फलज्योतिषशास्त्रामध्यें काय दर्शवितो याकडे वळूं.

मंगळाचे बिंब मोठें रक्तवर्णासारखे दिसले असतां त्याचे काय फल मिळतें या संबंधानें आलेला उल्लेख वर दिलाच आहे. यापेक्षां आपलेकडे विशेष कांहीं मंगळाच्या पृथ्वीसंन्निध येण्यासंबंधानें माहिती आढळत नाहीं. संगळ उत्तर मार्गानें गेला असतां काय फल प्राप्त होईल याचा थोडासा उल्लेख आला असून तो नक्षत्र तारांच्या उत्तर किंवा दक्षिणेकडून जात असतां किंवा त्यांचा भेद करून जात असतां काय फलादेश मिळतो यासंबंधानें वराहानें आपले बृहतसंहितेमध्यें सांगितले आहे. असेंच मंगळ हा वर्षेश असून त्याचा शर उत्तम किंवा दक्षिण असतां काय फल मिळेल याचा उल्लेख पाश्चिमात्य वाङमयामध्यें मिळत आहे. व ही माहिती आम्हीं आमचे मेदिनीय ज्योतिष नांवाचे पुस्तकांमध्यें दिली आहे.

मंगळासंबंधानें डॅन्टे, यांनीं Convito II, 14. यामध्यें खालील-

प्रमाणें म्हटलें आहे. "मंगळाची उष्णता अग्निसारखी असल्यामुळें तो वस्तु शुष्क करतो व जाळून टाकतो. आणि याचकारणामुळें तो रंगानें अग्निसारखा दिसतो; कधीं कधीं तो अत्यंत रक्तवर्ण असतो तर कधीं कधीं कमी लाल दिसतो; व ही त्याची रक्तता त्याचे मधील निघणाऱ्या वाफेच्या विरळतेवर अगर घट्टपणावर अवलंबून आहे. कधीं कधीं त्यांतून निघणारे वाफेचे फवारे स्वताच जाळूं लागतात असें उल्का पुस्तक १ लें यांमध्यें सांगितलें आहे. [आणि इणून अलबुमसर म्हणतो कीं ज्यावेळीं मंगळातून निघणाऱ्या वाफा अशा पेटलेल्या दिसतात त्यावेळीं राजांचे मृत्यु, राज्यांची परावर्तनें मंगळाचा अंमल झाल्यामुळें घडतात. आणि वरप्रमाणेंच सामराट आगस्टस् यांचे मृत्युचे वेळीं आकाशामध्यें एका तप्तवर्ण अग्निचा गोळा दिसत होता असें सिनेका म्हणतो. प्लारेन्सचा ऱ्हास होऊन त्याला अधोगती प्राप्त होण्याच्या सुमारास अस्याच तप्तवर्णाच्या मंगळामधून निघणाऱ्या वाफेचे झोतचे झोत कृसच्या आकाराचे निघालेले हबेमध्यें दिसत होते.]"

वरील विवेचनावरून पाहतां पाश्चिमात्य ज्योतिर्विदांचे मतें ज्यावेळीं मंगळाच बिंब अत्यंत रक्तवर्णाचें व मोठे दिसते त्यावेळीं पृथ्वीवर अनर्थपरंपरा प्राप्त होते व असेंच अनर्थ मंगळ पृथ्वीला अत्यंत जवळ आला असतां ओढवतात अशा तऱ्हेचा उल्लेख अमेरीकन ज्योतिर्विद डाक्टर ब्रोक्टन यानें आपाल्या एलीमेन्टस ऑफ आस्ट्रालाजी नांवाचे पुस्तकांमध्यें केला आहे. " रविमंगळाचा प्रतियोग किंवा पृथ्वीची मंगळाबरोबर आकाशांत युति होणें म्हणजे लवकरच पृथ्वीवर संकटमय स्थिति दर्शविणारा काळ प्राप्त होत आहे याची पूवसुचनाच होय असें जुन्या ज्योतिर्विदांचे मत होते. आणि या **रविमंगळाच्या प्रतियोगानें किंवा पृथ्वीची मंगळाबरोबर युति झाल्यानें लढाया, दुष्काळ ज्वाला मुंखीचे उद्रेक, भूकंप इत्यादि गोष्टी घडतात** अशी त्यांची अंधश्रद्धा होती. व ही त्यांची भीति निराधार होती असें म्हणता येत नाहीं कारण चमत्कार म्हणा किंवा कांहीं म्हणा ज्या ज्या वेळीं असा मंगळ पृथ्वीचा जेव्हां जेव्हां योग झाला किंवा रविमंगळचा प्रतियतियोग झाला तेव्हां तेव्हां वर प्रमाणें अनर्थ परंपरा पृथ्वीवर ओढवलेली पाहण्यास मिळतें. जेव्हां मंगळ पृथ्वीचा योग होतो किंवा रविमंगळाचा प्रतियोग घडतो तेव्हां तो निसंशयपणें आपले

वातावरणावर परिणाम करतो; ह्यासंबंधानें उगाच शुष्क वाद घालण्यात अर्थ नाहीं. सूर्यापासून आपणाला जे जीवन तत्व मिळत असते त्यामध्यें अडथळा उत्पन्न झाल्यानें, किंवा हा नवीनच एक उपट सुंभमध्यं आल्यानें आपल्या आकर्षक शक्तीनें सूर्यापासून आपणाला मिळत असलेली चंबुकत्व शक्ति–म्याग नॅटीझम–मध्येंच उपटु लागल्यामुळें किंवा आपल्या वातावरणामध्यें असलेल्या इतर वायुचे समप्रमाणमध्यें किंवा आपले वातावरण ज्या तत्वांचे बनलेले आहे त्यामध्यें विषमता उत्पन्न केल्यामुळें परिणाम घडतात किंवा काय यासंबंधानें जरी आज निश्चीत असें सांगता येत नाहीं तरी परिणाम घडतात ही गोष्ट खरी आहे."

"मंगळासंबंधानें पाहतां तो पृथ्वीबरोबर केव्हां युक्त होतो किंवा रविबरोबर प्रतियोग केव्हां करतो हा काळ शोधून काढणें फारच सोपें आहे. मंगळ आपल्या प्रत्येक भ्रमणामध्यें म्हणजे सरासरी दोन वर्षें आणि दोन महिन्यांनीं पृथ्वीबरोबर युति करतो किंवा रविबरोबर प्रतियोग करतो. जेव्हां आपली पृथ्वी मंगळ आणि सूर्य यांचेमध्यें येते व तो जेव्हां पृथ्वीला अत्यंत नजीक असतो त्या वेळेला वरील अनिष्टप्रकार फारच तीव्रतेनें घडतात. व अशा पृथ्वीनजीकच्या स्थळीं हा ग्रह दर पंधरा वर्षानें येतो, त्यावेळीं मंगळ भूमिनीच Perigee मध्यें आला असून रवि मंगळाचा प्रतियोग झालेला आहे असें जुने ज्योतिर्विद् म्हणत असत. कारण त्या वेळीं पृथ्वी मध्यभागी आहे असें धरल्यामुळें रवि मंगळ यांचा प्रतियोग झालेला दिसत असतो.

"मंगळ हा ग्रह असाच आगस्ट १८९२ मध्यें अशुभस्थितीमध्यें म्हणजे भूमिनीच होता आणि या त्याच्या भूमिनीच येण्यामुळें म्हणा किंवा दुसऱ्या कोणत्याही कारणानें म्हणा पेनसिलव्हानिआ, पश्चिम न्यूयार्क, तेनेसा वगैरे ठिकाणीं मजूरांचे संप झाले होते. मजूरांचे संप होणें व याचवेळीं मंगळाचे भूमिनीच येणें हे जरा विचित्र दिसते. मंगळ आपल्या दैनदिन गतीनें भ्रमण करीत करीत भूमिनीच सोडून पुढें गेला आणि इकडे युनायटेड स्टेटसमधील इतर ठिकाणचे व कारनेजीच्या कारख्यांतील मजूर लोकांचे संप हळूहळू मोडण्यास लागून प्राप्त झालेली अस्वस्था मोडली, आणि लढाईचा देव आपल्या भूमिनीच स्थितिमधून निघून जाऊन मजूर लोकांचे संप शांततेनें मिटविण्यांत आल्याबद्दल त्यांचे आपण आभार मानु या."

"यापूर्वी मंगळानें अशीच आपल्या भूमिनीच स्थितिमध्यें भेट सन १८७७ सालामध्यें दिली होती, या वेळेलाही पेनसिलव्हानिआ येथें अस्वस्थता उत्पन्न झाली. व पिटसबर्ग येथें जी बंडाळी झाली ती यावेळीं कारनेजी येथें झालेल्या संपाच्या पुढें कांहींच नाहीं असें म्हटले असतां चालेल. देशांत जिकडे तिकडे अस्वस्थता प्राप्त होऊन उद्योग धंदे अगदीं मंद झाले होते. व यावेळीं मिस्टर वेन्ह. एच. वॅन्डरबिलट यांनीं जो दूरदर्शीपणा दाखविला तो जर दाखविला नसतां तर सर्व युनाटेड स्टेटस भर रेल्वेच्या मजूरांचा जंगी संप झाला असतां; युनायटेड स्टेटस मधील निरनिराळ्या स्टेटसनीं ही बंडाळी मोडण्याकरितां बराच मोठा भौजफाटा एकत्र केला होता. याचवेळेला मंगळाच्या दोन उपग्रहाचा शोध लागला. १८७७ पासूनच्या पंधरा वर्षांच्या पाठीमागील इतिहासाकडे पाहतां आपण १८६१ तें १८६५ या भागांत येतो व यावेळीं आपला देश लढाया व रक्तपात याचे माहेरघरच झालेले होतें. आणि त्यावेळीं जी दुरदशा झाली ती मधून आतां आपण कोठें डोकें वर काढीत आहों. यावेळीं दुसरी जी अनिष्ट ग्रह स्थिति होती त्यामध्यें या मंगळाच्या भूमिनीच स्थितीमध्यें येण्यानें अग्निमध्यें तेल ओतल्यासारखाच प्रकार झाला. याचेपूर्वी असाच मंगळ १८४७–४८ मध्यें आला होता त्या वेळीं अमरिकेला मेक्सिकोबरोबर युद्ध करावें लागलें. युरोपमधील ही राजकीय वातावरण गडबडीचे होते. व युरोपमधील प्रत्येक राज्यामध्यें कांहींना कांहींतरी भानगड उत्पन्न झालेली होती. फ्रान्समध्यें लुवास फिलीफस याचा अधःपात झाला तर पोपला आपल्या सुरक्षितेकरितां रोममधून पळून जावें लागले. या सर्व चमत्कारीक गोष्टी एकसारख्या कशा जुळून येतात हेंच आश्चर्य आहे. याच्या पूर्वीच्या पंधरा वर्षांच्या कालाकडे गेलो म्हणजे आपण सन १८३२ जवळ येतो. व या वेळच्या कालऱ्याच्या किंवा महामारीच्या साथीच्या उपद्रवासंबंधानें माहिती देणारा आज काल एखादा प्राणी आपल्या भेटेल, या वेळेला सर्व उद्योग धंदे पूर्णबंद पडले होते व कालऱ्यानें ह्या देशाची जी धुळधाण उडविली तितकी फारच क्वचित झालेली पाहण्यास मिळतें. यावेळीं लंडन मध्येंही बरीच भानगड उत्पन्न झालेली पाहण्यास मिळतें."

खग्योर्विद हें(astronomers)फलज्योतिषी व त्यांचे शास्त्र याची नेहमींच टर उडविण्याचा प्रयत्न करीत असतात; कारण ग्रहानें फलादेश वर्णविणें किंवा ग्रहांचे परिणाम आपले पृथ्वीवर मानणें हें मत त्यांना पसंत नाहीं. फलज्योतिषशास्त्राच्या मुल तत्वाचा अभ्यास न करतां केव्हांही कसाही प्रसंग साधला

असतां हे सद्गृहस्थ ज्योतिषशास्त्राच्या वर कुरघोडी करण्याचा प्रयत्न करीतात. असाच एक प्रयत्न प्रसिद्ध खग्योतिर्विद मिस्टर प्राक्टर यानें १८७७ सालामध्यें या मंगळाचे भूमिनीच स्थितीच्या वेळीं केला असतां त्यांच्या तंगडया त्यांच्या गळ्यांत कशा आल्या हें सांगितल्या खेरीज प्रस्तुतचा लेख पुरा करणें बरोबर होणार नाहीं. सन १८७७ सालीं मंगळ भूमिनीच स्थितीमध्यें येऊन मोठा व तेजस्वी दिसणार होता त्यावेळीं या स्वारीनें कॉरनहील म्यागेझीनमध्यें जुलाई १८७७ मध्यें " प्लेनेट ऑफ वार " " लढाईचा ग्रह "या मथाळ्याखालीं खालीलप्रमाणें लिहिलें होतें.—

" परंतु खरोखरच जर मंगळ हा युद्धाचा ग्रह असेल; व पृथ्ववरील राष्ट्रांवर जर जबळ आल्यानें त्यांची शक्ति किंवा प्रभाव जास्त चालत असेल तर त्यानें त्यांना युद्ध व रक्तपात करण्यास जोराची प्रेरणा खास केली पाहिजे; व पुढील महिन्यांमध्यें पृथ्वीवरील बराच प्रदेश त्यामुळें उध्वस्त किंवा निर्जन झाला पाहिजे. हा ग्रह यावेळीं नुसता पृथ्वीजवळ येत आहे इतकेंच नाहीं तर तो आपल्या परम तेजामध्यें असतां आपले तेजस्वी किरण दोन वेळा खल ग्रह जो शनि त्याचे बरोबर पूर्ण युक्त करणार आहे "

वरील विधान केलें त्यावेळीं तें अक्षरशः खरें होईल असें मिस्टर प्राक्टर यांच्या स्वप्नी देखील नव्हते. ज्या अयुधाचा उपयोग दुसऱ्याचा नाश करण्याकडे केला तेच आयुध स्वतालाच अखेरीस प्राण घातक ठरले. सन १७९८ नंतर जर मंगळ अत्यंत पृथ्वीजवळ आला असेल तर ता याच वर्षी ता. १७ सप्टेंबर १८७७रोजीं आला व त्या वेळीं तो मीन १३ अं ४५ कलेमध्यें असलल्या शनिबरोबर युतियोग करीत होता. या वर्षी प्लेव्हाना हे शहर एकदम छापाघालून घेण्याचे वेळींझालेला मानवी संहारच मंगळ हा लढाईचा ग्रह आहे किंवा नाहीं याची साक्ष देत आहे. याचवरील योगावरून प्रसिद्ध ज्योतिर्विद झडकील यानें या संहाराचे भविष्य १ वर्ष अगोदर करून ठविले होतें.

असो, हा ग्रह भूमिनीच स्थितीमध्यें आला असतां ज्यास्त दैदिप्यमान व तेजस्वी दिसतो व हा या स्थितीमध्यें असतां तो दुष्काळ, रोग, लढाया, रक्तपात, संप, मारामाऱ्या इत्यादि गोष्टींचा सुकाळ करतो वगैरे गोष्टीचा उल्लेख पूर्वीच आला आहे त्यावरून विचार करतां यंदाची मंगळाची स्थिति चिंताजनक खास आहे. इतकेंच सांगून आम्हीं आमचा हा लांबलेला लेख पुरा करतो. वाचकवर्गाचे या मंगळाचे स्थितिकडे लक्ष वेधावें म्हणून सविस्तर माहिती देण्याचा प्रयत्न केला आहे व त्याकडे लक्ष जाऊन निरनिराळे ज्योतिर्विद या विषयीं आणखी शोध करून आपले अनुभव ज्योतिर्मालेच्या द्वारे प्रसिद्ध करतील अशी आशा आहे.

॥ श्रीसद्गुरवे नमः ॥

ज्योतिर्माला

आग्राचः कामरूपाद्द्रुहिणसुतनदप्लावितादाप्रतीचो
गान्धारात् सिंधुसार्द्रादधुवररचितादाचसेतोरवाचः ।
आकेदारादुदीचस्तुहिनगहनतः सन्तिविद्वत्समाजा
ये ये तानेष यत्नः सुखयतु समजान्कश्चमत्कर्तुमीष्टे ॥ १ ॥

अभिनवाऽऽवृत्ति वर्ष ८ वें अंक ९ ते १०.

फलज्योतिष

लेख ५ वा

लेखक:—(एम. डी. सगणे एम ए., एल एल. बी.)

फलज्योतिष दैववादी बनवितें ह्या आक्षेपावर लिहायचें म्हणजे नशीब व प्रयत्न, प्रारब्ध व आत्मस्वातंत्र्य किंवा ' तकदीर और तदबीर ' ह्या वादांतच पडणें होय. ह्या वादाचा विषय फार गहन तत्रापि अल्पमतीनें त्याबर जें कांही लिहितां येईल तें लिहिण्याचा पुढें प्रयत्न करूं. सध्यां ' दैववादी बनवितें ' म्हणजे काय ? मनुष्य दैववादी झाल्यास चांगलें कीं वाईट ? ह्या दोनच प्रश्नांचा विचार करूं.

' दैववादी बनवितें ' ह्याचे दोन अर्थ होऊं शकतात. एक असा कीं मनुष्याच्या बुध्दाला सर्व कांही दैवाधान दिसूं लागतें. त्याच्या मनाला सर्वत्र दैवौधच दिसतो. दुसरा असा कीं मनुष्य निष्क्रिय बनतो. त्याच्याजवळ प्रयत्न म्हणून कांहींच शिल्लक रहात नाहीं, त्याला पूर्ण कर्मसंन्यास घडतो. ह्या दोन अर्थांहून भिन्न असा तिसरा अर्थ निघणें शक्य दिसत नाहीं.

पहिला अर्थ घेतल्यास आणि त्याप्रमाणें मनुष्याच्या मनाचो वर वर्णिल्याप्रमाणें मनस्थिति होत असल्यास नडतें कुठें हेंच समजत नाहीं. खरोखर जर तशी मनस्थिति होत असेल तर तो एकप्रकारें चांगलीच आहे. संसारांत अनेक सुखदुःखाचे प्रसंग येतात. सर्वसाधारण रीत्या विचार केल्यास सुखापेक्षां दुःखाचेच प्रसंग अधिक असतात. म्हणजे संसारांत सुखापेक्षां दुःखच ज्यास्त आहे. असा, साधुसंताच्या उक्त्या घटकाभर एकोकडे ठेवून दिल्या तरी, अनेक विद्वानांचा, बराच कालपावेतों जगाचा अनुभव घेतलेल्या पुरुषांचा अभिप्राय आहे. ह्या अभिप्रायास मागें कधींही बाध आला नाहीं आणि आधि--भौतिक--सुख--साधनें कितीहि निघालीं तरी पुढें कधींहि यावयाचा नाहीं. पुढें भविष्यकालीं दुःखापेक्षां सुखच अधिक राहील असा ज्यांचा पूर्ण विश्वास असेल ते निदान एवढें तरी कबूलच करतील कीं दुःख समूळ नष्ट होणें शक्य नाहीं. मग अशा ह्या संसारांत आयुष्यांत 'जें झालें तें ओघानेंच झालें, नशिबांत होतें तें झालें माझें त्यांत कांहींच नाहीं' अशी मनस्थिति असल्यास किंवा ठेवल्यास चांगलें नाहीं काय? सुख आलें काय किंवा दुःखानें गळ्यांस मिठी मारली काय, सुख दुःखाचा त्यामुळें कांहींच परिणाम होऊं शकत नाहीं. सुखदुःख संवेदनेस जणूं काय मन बधिर होतें. आज लाखों रुपये मिळाले, पुत्ररत्न झालें, किंवा राज्यप्राप्ति झाली, त्याचा हर्ष, आणि उद्यां तितकेंच नुकसान झालें, किंवा पोटाचा एकुलता एक मुलगा कालवश झाला, किंवा राज्यापहार झाला तर त्याचा विषाद वाटावयाचा नाहीं. अशी मनस्थिति जर फलज्योतिषानें प्राप्त होत असेल तर चांगलें नाहीं काय? निदान दुःखाच्या प्रसंगीं ह्या मनस्थितीवांचून एखादें दुःख जितकें तीव्र व भीषण भासायचें तेवढें तीव्र व भीषण वाटणार नाहीं खास.

माननीय शास्त्रें, पवित्र धर्मग्रंथ आणि शुद्ध तत्त्वज्ञान काय सांगतात? ही मनस्थिति प्राप्त करून घेण्यासच शास्त्रें व धर्मग्रंथ उपदेश करितात. अशीच मनाची स्थिति रहावी हेंच तत्त्वज्ञानाचें रहस्य आहे. हीच मनुष्याच्या आत्म्याच्या उन्नतीचो एक उच्च पायरी आहे; (आत्मा नाहीं असा कोणाचा विश्वास असल्यास हीच संभावितिपणाची, धैर्याची व सुधारणेची खूण आहे.) अशा वर्धन पावत जाणाऱ्या मनस्थितींत 'मी'पणाचा, अहंकाराचा ऱ्हास होत जातो, त्यानें मायचें निरसन व्हावयाला लागतें, म्हणजेच शुद्ध परमात्मस्वरूप जवळ जवळ येऊं लागतें. दुसऱ्या शब्दांत मांडावयाचें म्हणजे शुद्ध परमात्मस्वरूपाची जाणीव होऊं लागते. तें स्वरूप, तो बनूं लागतो, किंवा प्रकट होऊं लागते. अहंकाराचा शेषांश राहिलाच तर तो 'मी तो आहे, मी परब्रह्म आहे' एवढाच रहातो, आणि शेवटीं तोहि लय पावतो. ही उच्चत्तम अज्ञेय स्थिति प्राप्त होण्यास ज्ञानभक्ति योगादि अनेक मार्ग किंवा अनेक मार्गांचा सांगाडा आहे. ते मार्ग तरी हेंच शिकवितात. ते दैववादी हो असें म्हणत नसतील पण मथितार्थ एकच असून शब्दभिन्नत्व आहे एवढेंच. कर्ता करविता परमेश्वर हा स्थिति चांगली आहे यांत शंका नाहीं.

एकूण ज्यांना शास्त्रें मान्य आहेत, किंवा धर्मग्रंथ पूज्य आहेत अथवा तत्त्वज्ञान पटतें त्यांना शब्द भिन्नत्वानें "भले महाराज आपणहि दैववादी आहांतच तर!" असा दोषारोप लागूं पडेल. 'आत्मा--नष्ट' पंथासहि त्याच मालिकेंत यावें लागेल कदाचित्! 'सुखदुःखाचे ठायीं समवृत्ति असावी' 'बुद्धि तटस्थ राखावी' हें मर्म कोणत्याहि मार्गानीं येवो, कळो आणि आचरणांत दिसो, पण तें आलें पाहिजे, कळलें पाहिजे, आणि आचरणांत दिसलें पाहिजे म्हणजे झालें. आणि असें होण्यास

कराव्या लागणाऱ्या किंवा शोधून काढण्यांत येतील त्या उपायांपैकीं कर्ता करविता परमेश्वर आहे ' ' नशिबांत होतें तें घडलें ' हा दृग्प्रत्ययास येणारा एक सुलभ उपाय आहे. व तो सर्वसाधारण मानानें सर्वांस साधण्याजोगा आहे. असो, या विषयांत आणखी लिहिण्यासारखें आहे व लिहूं पण, तूर्त एवढेंच पुरें होईल. पूर्ण उलगडा पुढें आपोआपच होईल. आतां दुसऱ्या अर्थाकडे घटकाभर वळूं. फलज्योतिषाच्या अभ्यासानें मनुष्य दैवावर हवाला ठेऊन कांहींच करीनासा होतो असा याचा मथितार्थ आहे. उलट असा सवाल निघूं शकतो कीं आज जगांत जेवढे म्हणून निष्क्रिय आहेत, बेहिंमत, आळशी (किंबहुना--मागचा विषय थोडा छेडावयाचा म्हणजे--दैवभोळे) लोक दिसतात. त्यांपैकीं किती जणांनीं फलज्योतिषाचा अभ्यास केलेला आहे ? किंवा निदान पक्षीं कितींकांचा फलज्योतिषावर भरंवसा आहे ? फारच थोडे, फारच फार थोडे. फलज्योतिषाव्यतिरिक्त व (आत्मा--असंभव पंथातले देखील) लाखो लोक तसे असूं शकतात आणि आहेत, हेंच आम्हाला सांगावयाचें होतें. पुन्हां फलज्योतिष--दैवज्ञा-पैकीं किंवा तशा तऱ्हेचा भरंवसा असणाऱ्यांपैकीं असे हतवीर्य, निष्क्रिय लोक कितीसे आहेत ? असल्यास फारच फार थोडे. लहानपणापासून जो दैवज्ञ कट्टा दैववादी तो रणवीर नेपोलियन घरांत दडून बसला नव्हता, त्यानें किंवा ज्यांचा फलज्योतिषावर पूर्ण भरंवसा व ज्यांनीं त्या शास्त्राचें वर्धन करण्याकरितां प्रयत्न केले अशा पूर्वकालीन खलिफांनीं किंवा भारत-भूतील प्रथमच्या यवन राजांनीं प्रयत्न करणें सोडलें नव्हतें. ते निष्क्रिय बनले नाहींत. बोनापार्टनें किंवा बाबरनें लढाया करून दिग्विजय करणें सोडलें नाहीं. तात्पर्य काय कीं फलज्योतिष नेभळट आणि निष्क्रिय बनवितें हें विधान वस्तुस्थितीशीं फारकत करणारें आहे.

मनुष्याचें स्वतःवर, स्वतःच्या कुटुंबावर, एकंदरींत स्वत्त्वावर इतकें प्रेम असतें कीं त्या स्वत्वाला जेणेंकरून सुख होईल त्याचें वैभव जेणें-करून वाढेल असे प्रयत्न तो सतत करीत असतो. फार कशाला ' मानव मर्त्य आहे ' हें (फलज्योतिष तसेंच) अनेक प्रकारें व वेळां माहित असतांहि आयुष्य वाढावें याची किती तरी खटपट चालली असते. लव-करच मृत्यु होणार हें ठरलें असतांहि, आतां जगण्याची बिलकूल आशा नाही असें डॉक्टराचें यमराजाचें सर्टिफिकेट व वारंट मिळालें असतांहि व फलज्योतिष सांगत असतांहि " अहो डाक्टर एकदां तरी पहा हो, औषध तरी बदलून पहा, कसेंहि करा पण प्राण वांचवाहो " इत्यादि मायाजड पाषाणासहि अनुकंपा आणणारे करुणशब्द मुक्त कंठांतून कसे निघतात. व थैलीची बंधनें मुक्त होऊन किती तरी आटोकाट प्रयत्न चालले असतात. अशा फत्तर लिखित निर्विवाद गोष्टीबद्दल जर एवढी धडपड तर संभवनीय आटोक्यांतील व सुगमतर विशेषतः वैभववर्धक गोष्टींविषयीं विचारायलाच नको. सारांश मनुष्याचे प्रयत्न चालूं असतात. किंबहुना " प्रयत्न लागेल तेवढे केले पण काय करावें नशिब फुटकें " अशीच ओरड ज्यास्त दुमदुमत असते. हें विधान केल्यास थोडीशी अतिशयोक्ति जरी झाली तरी विशेष उपरोधिक व फारसें फारकतींत जाण्यासारखें नाहीं. जे प्रयत्नच करीत नाहींत ते फलज्योतिषामुळें करीत नाहींत, किंवा फलज्योतिषानें मनुष्य निष्क्रिय बनतो, हें विधान मात्र वरील विधानापेक्षां कितो तरी उपरोधिक आणि फारकत करणारें आहे, ह्याचा साक्ष इतिहास देतच आहे.

असो हे दोन्ही विषय ह्या लेखांत अपुरेच ठेविले आहेत पण ते पुढील १-२ लेखांत पर्यायानें व विचारबंधनानें आपोआपच विषद होतील अशी आशा आहे.

सौ. अन्नपूर्णाबाई सगणे यांचा मृत्यु.

[लेखकः एम्. डी. सगणे. एम्. ए., एल् एल्. बी.]

सायन भावचलित लग्न कुंडली.



जन्म ३-८-१९०३ **मृत्यु १०-१२-१९२३**

करजगांव सूर्योदयापूर्वी २५ मिनिटें द्रग सकाळीं ९-१९.

वर दिलेली कुंडली माझ्या प्रियपत्नीची आहे. ह्या कुंडलीच्या अभ्यासानें ज्योतिषशास्त्राच्या तत्त्वांचें सत्यत्व बरेंच पटण्यासारखें असल्यामुळें तीं मी मुद्दाम प्रसिध्द करीत आहें. आयुष्य फारच थोडें लाभल्यामुळें तिचें चरित्र अर्थातच लहानसें आहे; तें निराळें न देतां कुंडलींतील योगांचा विचार करतांनाच त्याचा उल्लेख करीत जाईन. ह्या लेखांत मृत्युकालच्या

योगांचेंच संक्षिप्त पण विशेष विवरण करण्याचें योजिल्यामुळें बाकींच्या गोष्टींचा फक्त स्थूल विचार करण्याचेंच ठरविलें आहे. प्रसंगोपात्त माझ्या कुंडलींतील योगांचाही नामनिर्देश करीन.

आयुर्मर्यादा व शरीरप्रकृति

लग्नकेंद्री सिंहराशी उदित आहे. लग्नस्थ सिंहराशीच्या गुणधर्मप्रमाणें व त्यांतील रवीच्या वास्तव्यामुळें स्वाभाविकतः शरीरकाठी मजबूत होती; पण तो फार काल तशीच राहून शरीरसौख्य मिळणें शक्य नव्हतें. कारण लग्नेश रवि मंगळाच्या केंद्रांत व शनीच्या सप्तमांत असून, चंद्र मंगळाशीं अर्धकेंद्र व गुरुशीं केंद्र करीत होता. इतकेंच कीं ह्या योगाचा कक्षा थोडीबहुत लांब होती. लग्नेश रवीनें व्यक्त होत असलेली जीवनशक्ति शनीकडून ग्रासली गेल्यामुळें शनीच्या मंदत्वाला अनुसरून हळू हळू क्षीण होणें साहजिकच होतें. तशांत शनि षष्टेश व अंशपरत्वें अष्टमेशहि असल्यामुळें तसें होणें अपरिहार्य होतें. हळू हळू जीवन शक्ति कमी करणारे व दीर्घकाल टिकणारे क्षयासारखे रोग शनीचे होत व म्हणूनच तिला क्षयाचा बाधा झाली. ही बाधा वयाचे १८ वे वर्षाचे उत्तरार्धांत झाली. त्या वेळेस परिभ्रमणाचा रवि शनीशीं तंतोतंत प्रतियोग (मूळ कुंडलींत असलेला) करीत असून अष्टमस्थानाचा पूर्ण अधिपति जो गुरु तो चतुर्थस्थानांत नुकताच प्रवेश करीत होता. क्षय फुप्फुसें विवडवितो. पण सिंहराशी व त्यांतील रवि, रक्त, हाड, पाठीचा कणा इ० संबंधी रोग उत्पन्न करतात. शनीचाहि अंमल हाडावर विशेष असतो. म्हणूनच झालेल्या क्षयाच्या बाधेंत फुप्फुसें बिघडूनहि पाठीच्या कण्यांतील बरचें हाड वांकल्यासारखें होऊन बिघडलें होतें. २० महिन्यांच्या औषधोपचारानें क्षयाचा बहुतेक नाश झाला होता. फक्त

कायतें हाडांत थोडेंसें व्यंग राहिलें होतें व तें कधींही निघणें शक्य नव्हतें. परंतु त्यापासून मुळींच धोका होण्यासारखा नव्हता.

औषधोपचार व त्याचा खर्च

क्षयाच्या औषधोपचाराकरितां कुटुंबांतील मंडळीपासून व इतर आप्तेष्टांपासून ६०० मैल दूरवर पंचगणीस 'बेलएअर' सॅनेटोरियममध्यें एकटेंच सतत २० महिने रहावें लागलें. हे वीस महिने तिला सतत पलंगावर पडून असावें लागत असे. उठण्या-बसण्यास किंवा फिरण्यास मुळींच परवानगी नव्हतो. हा एक प्रकारचा वियोग, एकांतवास, व बंदिवासच होय. हा प्रकार जन्मकालच्या व्ययस्थानांतील नेप्चूनच्या वास्तव्यामुळें घडला. ह्याच वेळेस तिच्या अष्टमस्थानांतून हर्शल गोचरीनें व परिभ्रमणानें जात होता. स्त्रीचें अष्टमस्थान म्हणजे पतीचें धनस्थान होय. म्हणून त्या स्थानांतील हर्षलचें भ्रमण पतीच्या धनास ओहोटी लावतें. त्याचा परिणाम असा झाला कीं औषधोपचाराप्रीत्यर्थ एकंदरींत जवळ जवळ ६००० रुपये खर्च आला. [खरोखरच तो हर्शल माझ्या धनस्थानांतून जात होता व सध्यांहि जात आहे व नेप्चूनचें भ्रमण सप्तमस्थानांतून चालूं होतें व आहे.]

विवाह व पतिसुख

सप्तमस्थ शनीशीं मंगळाचा केंद्र आहे. हा योग आजन्म कौमार्य दर्शवितो. याला मारक असा गुरु शुक्राचा प्रतियोग नसता तर ती अविवाहितच राहिली असती. गुरु शुक्र प्रतियोगानें लग्न होतें व तेंहा लवकरच म्हणजे बाराव्या वर्षी होतें. त्याप्रमाणेंच तिचें लग्न ११ वें वर्ष संपतें न संपतें तोंच झालें. लग्न झालें पण वैवाहिक सुखाची हानी करणारे बरेच योग होते. ते असें, शुक्र आपल्या नीचांत, चतुर्थात मंगळ, शुक्र हर्शल केंद्र, षष्टेश सप्तमांत, ह्यामुळें वैवाहिक

सुख दीर्घकाल मिळणें शक्य नव्हतें. पुन्हां लग्नेश रवि व पतिदर्शक सप्तम-स्थानाधिप शनि यांचा वियोगकारक समसप्तम प्रत्यक्ष वैरा योग झालेला आहे. परिणाम हा कीं तिला वैवाहिक आयुष्य जेमतेम ९ वर्षेंच मिळालें व आम्ही उभयतां अनेक अडचणींमुळें एकत्र असें एकंदरींत २॥ वर्षांच्या वर राहिलों नाहीं. २० महिन्यांचा वर दिलेला वियोग परिभ्रमणानें रवि शनीशीं प्रतियोग करीत असतांना घडला हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे.

शिक्षण व संतति

शिक्षण मराठी चवथे इयत्तेपर्यंतच होतें. इंग्रजीचीं फक्त अक्षर ओळखच होतो असें म्हटलें असतां चालेल. आपण फार शिकावें अशी तिची भारी इच्छा होती; पण ती सफल झाली नाहीं. पंचमस्थ धनु राशींतील चंद्र व गुरूच्या पंचमेशत्वामुळें बुध्दियोग चांगला होता. बुध्दि चांगली होती. पण हर्शल पंचमांत होता. पंचमस्थ हर्शल शिक्षणांत व्यत्यय व अडथळे आणतो, तथापि त्यानें शेवटी यश दिलें असतें; पण पंचमेश गुरु वक्री होता व चंद्र त्यास केंद्र करण्यास जात होता. हेच संततिअभावाचींहीं कारणें आहेत. वक्री गुरु संतति प्रतिकूल खास असतो. पंचमस्थ हर्शल संततिप्रतिबंध करतो, व झालीच तर तो आपल्या धर्माप्रमाणें तिचा नाशहो करतो.

आयुष्यांचा शेवट

चतुर्थातील मंगळाचें वास्तव्य आयुष्याच्या शेवटचा भाग तापदायक दर्शवितो व त्याप्रमाणें तो झालाहि. तशांत तो तुलेचा म्हणून नीच असून त्याचा रवि केंद्र, गुरूशीं षडाष्टक, चंद्राशीं अर्धकेंद्र व सर्वांत वाईट असा षष्ठेश, सप्तमेष व कांहीं अंशीं अष्टमेश अशा शनीशीं केंद्रयोग होत असल्यामुळें चतुर्थस्थान अगदीं

भयदायक असें झालें आहे. शेवट दुःखपर्यवसायी, एकाकिन् व चमत्कारिक होईल हें ह्यावरून स्पष्ट दिसत होतें.

प्रकृति नोट होऊन माझी पत्नी ता. २२ आक्टोबर २३ ला परत आली व ता. १० डिसेंबर १९२३ ला सकाळीं ९--५५ ला इहलोक सोडून निजधामास परत गेली. मृत्यु क्षयामुळें झाला नाहीं हें निर्विवाद आहे. ह्या वेळीं औषध देणारे डॉक्टर व वैद्य ह्यांचेंहि तेंच मत आहे. पण मृत्यु कशानें झाला हें कोणालाच सांगतां येत नाहीं. मृत्यु सरासरी १० वाजतां झाला पण ९ वाजे पर्यंत काम करीत असलेले डॉक्टर व वैद्य म्हणत कीं रोग क्षुल्लक खोकल्या पडशा सारखा व सुसाध्य आहे. एकदोन दिवसांत सहज बरा होईल असें त्यांचें ठाम मत होतें. असो.

१९२३ सालातील ग्रहस्थिति पुढीलप्रमाणें होती.

	ता. १०-१२-२३ सकाळचे १० वाजतांचे गोचर ग्रह.	ता. १०-१२-२३ चे परिभ्रमण ग्रह.	ता. ३-८-२३ चे दिनवर्ष पद्धतीचे ग्रह.	
नेपच्यून	सिंह २०-१९	सिंह १२		
हर्शल	मीन १३-४६	मीन २२		
शनि	तुला २९---८	तुला ५---१६	मकर २९-५०	
राहू	कन्या ६---१०	वृश्चि. ९---४१	तुला ८---३७	
गुरु	धनु ३---२६	धनु ४---१४	मीन २२---९	
मंगळ	वृश्चि. ३---५४	वृश्चि. २३--१३	वृ. ९---५५	
रवि	धनु १७---६	कन्या ५-----२०	सिंह २८--५२	
शुक्र	मकर ९---५६	मेष ७-----४९	कन्या २५-४५	
बुध	धनु २९-१९	कन्या २-----१६	कन्या २४-३०	
चंद्र	मकर १६-३५	मकर १२	कन्या २---१५	

वर दिलेल्या ग्रह स्थितीवरून त्यांचे आपआपसांत व जन्मस्थ ग्रहांशीं कसकसे योग होत होते हें सहज लक्षांत येण्यासारखें आहे. प्राणहानिकारक अनेक योग दृष्टीस पडतील. मी फक्त एखाद दुसरा मोठा योग घेऊन मृत्यूचें विवरण करणार आहें.*

मृत्युकालचे दिनवर्ष पद्धती प्रमाणें होणारे योग

चलित ग्रहांच्या मूळ ग्रहाशीं झालेल्या अनिष्ट योगांत च मंगळानें रवीशीं केलेला केंद्र अति वाईट आहे. ह्या योगाविषयीं लिओ म्हणतो, ' A very evil and unfortunate period fraught with disastrous tendencies etc.....a very critical period necessitating the exercise of great care' याची रूपरेखा रवीच्या स्थानाधिपत्यावरून सहज लक्षांत येण्यासारखी आहे. रवि हा लग्नेश आहे म्हणून शरीरकष्ट व प्राणघातक योगाचा प्रकारच यांत विशेष आहे. दुसरा वाईट योग च. गुरूचा शुक्राशीं तंतोतंत प्रतियोग. गुरु अष्टमेश म्हणून निधनामुळें वियोग दर्शवीत आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. चलित ग्रहांतील आपसांतल्या योगांत महत्वाचा योग म्हटला म्हणजे च. रवीचा च. शनीशीं पूर्ण षडाष्टक योग--१५० अंश योग. रवि लग्नेश, व शनि षष्ठेश, सप्तमेश व कांहींसा अष्टमेश म्हणून हा योग पहिल्या व दुसरा योगांस दुजोरा देत आहे. ह्या योगाविषयीं लिओ म्हणतो ' Loss by death ' या तीन बृहत् योगांवरून प्राणांतिक शारीरिक कष्ट व पतीशीं निधनामुळें वियोग एकदोन वर्षांत घडावा असें

---

* ह्यापुढें ' च ' म्हणजे दिनवर्ष पद्धतीनें चलित झालेला ग्रह, स्थान, अथवा राशि,
' प ' „ परिभ्रमणानें अमुक ठिकाणीं आलेला „ „ „
' गो ' „ गोचर; अशी परिभाषा वापरणार आहें.

दिसत होतें. [माझ्या कुंडलींत कुटुंबस्थानांत राहु मंगळ असून राहु चलित होवून मंगळाशीं तंतोतंत युति करीत आहे व त्याचप्रमाणें माझा सप्तमेश रवि चलित होऊन हर्शलशीं केंद्र करीत आहे.]

परिभ्रमणद्वारां पाहिलें असतां प. रवि वार्षिक कुंडलींत (परिभ्रमण पद्धतीच्या) षष्ठस्थानांत येऊन वार्षिक षष्ठेश जो बुध त्यांच्याशीं युति, व मूळ अष्टमेश व वार्षिक व्ययेश जो प. गुरु त्याच्याशीं केंद्र करीत आहे. मूळ अष्टमेश असा प. गुरु, मूळ चंद्राच्या युतीस जात आहे व तो लयदर्शक च. चतुर्थस्थानांतून भ्रमण करीत आहे. हे योग मागच्या प्याऱ्यांतील पहिल्या व तिसऱ्या योगांत दुजोरा देत आहेत. प. शुक्र हा गुरूच्या अगदीं सन्निध आला आहे व म्हणून मागच्या प्याऱ्यांतील शेवटल्या दोन योगांस दृढ करीत आहे. ह्याचप्रमाणें आणखी कांहीं योग होत होते त्यांपैकीं कांहीं असे:---

मृत्यु व सायक्लीक योग

प. मंगळ केंद्र च. रवि
" गुरु " " चंद्र
" शुक्र युति " गुरु
" राहु केंद्र " मंगळ
" रवि " प. गुरु
" चंद्र " " शनि;

हे सर्व योग लग्नेश, षष्ठेश, अष्टमेश यांच्यामध्यें असल्यामुळें भयावहच आहेत. याशिवाय प. हर्शल मूळ अष्टमांतून भ्रमण करीत होता. हें भ्रमण साधारणतः मृत्युदर्शक असतें. एकंदरींत परिभ्रमणाच्या विचारानें मृत्यु व वियोग ह्याचवर्षीं घडावा असेंच दिसत होतें. [माझ्याहि कुटुंबस्थानांत प. हर्शल भ्रमण करीत होता; माझा सप्तमेश परिभ्रमणानें व्ययांत व अष्टमेश सप्तमांत फिरत होता.]

डायरेक्शननें आलेल्या वरील कालाचें स्थूलत्व परिभ्रमणानें सूक्ष्म झालें. त्यांत अधिक सूक्ष्मता आणण्यास या परिभ्रमणाचा थोडा जास्त विचार गोचर ग्रहांबरोबर करणें अवश्य आहे. परिभ्रमणरीतीनें डिसेंबर महिन्याची कुंडली खालीं दिल्याप्रमाणें बसते.



ह्या कुंडलींत स्पष्ट दिसणारा पहिला योग म्हणजे षष्ट, अष्टम् व व्ययस्थानांतील ग्रह ह्यांचें वर्णन निराळें नकोच. वरच्या प्याऱ्यांत आलेंच आहे. स्थानाधिपत्य मूळ व ह्या कुंडलीचें घ्यावें.

गोचरीनें शनि मूळ चतुर्थांत डिसेंबरांत आला. चतुर्थस्थान, लय व आयुष्याचा शेवट दर्शविणारें असल्यामुळें त्यांत शनीचें भ्रमण आधींच वाईट तशांत मूळचें षष्टाधिपत्य व तसेंच कांहींसें अष्टमाधिपत्य (आजार व मृत्युदर्शक) असल्यामुळें तें मृत्यु किंवा मृत्युसमपीडा दर्शवितें यांत शंकाच नाहीं. चतुर्थस्थान मंगळानें अगोदरच विघडलेलें होतें. मंगळशनींचा जन्मतःच केंद्र होता. अष्टमत्वाचें मुख्य अधिकार असलेल्या गुरूचें भ्रमण ह्या

मृत्यु व गोचर ग्रह

स्थानांतून नुकतेंच संपलें होतें. (चलित चतुर्थातून चालूच होतें.) परिभ्रमणाचा व चलित मंगळ अजून चतुर्थातच होता. गोचरीचा मंगळ पहिल्या तारखेस चतुर्थांत शिरला होता. ह्या अशा ग्रस्त चतुर्थांत ता. १ ला शनिश्चरानें प्रवेश केला व मूळ व गोचर मंगळावरून जाऊं लागला. अशा परिस्थितींतील शनीचें भ्रमण म्हणजे प्रत्यक्ष मृत्यूचेंच आगमन होय. (गोचरीचा हर्शल पत्नीच्या अष्टमांतून व माझ्या कुटुंबस्थातांतून जातच होता.) पहिल्या आठवडयाच्या अखेर अखेर हा योग अति तिव्र झाला होता व ता० १० ला अनेक प्राणनाशक कुयोग तंतोतंत होत होते, त्यांपैकीं कांहीं:--

गो. चंद्र मूळ षष्ठांत शनीच्या राशींत असून गोचर गुरु (अष्टमेशाशीं) अर्धकेंद्र.

प. रवि गुरु (लग्नेश अष्टमेश) केंद्र.

प. रा. युति च. मंगळ; च. शनि केंद्र गो. शनि.

च. रवि षडाष्टक च. शनि; परि राहू केंद्र गरु.

हे योग तंतोतंत होतांच जन्मवारीच, जन्मकालीन सप्तमस्थानचा अंश जन्म लग्नावर येतांच प्राणोत्क्रमण झालें.

आजार गोचरीचे मंगळ व शनि चतुर्थांत शिरतांच म्हणजे ता. १--१२--२३ ला आला. गो. मंगळ मूळ मंगळावरून जातांना ताप आला; तो लवकरच शमला म्हणून कांहींच वाटलें नाहीं. लगेच शनीचा शीत प्रकार सुरू झाला. पाठींत व मानेंत दुखूं लागलें. औषधोपचार चालूच होते. ता. ६ ला फार वेदना झाल्या व वात झाला. एव्हांपासून खरा आजार म्हटला पाहिजे. तशांतच (जन्मकालचे बुधावरून गो. नेपच्युन चालला होता म्हणून) मेंदूवर परिणाम होवून डिलिरियम झाला. ता. ९ ला कफ होऊन ता. १० ला प्राणोत्क्रमण झालें. आश्चर्य हें कीं कोणालाच रोगज्ञान वर सांगितल्याप्रमाणें झालें नाहीं. हा चमत्कार कशाचा ? मंगळाचा ?

पत्नीची कुंडली मी मृत्यूच्या अगोदरच्या दिवशीं पाहिली. गोचर ग्रह स्थितीमुळें दगा होणार असा जबर संशय आला; पण आपली प्रिय पत्नि जगावी ह्या साहजिक इच्छेला भौतिक शास्त्राच्या बळावर डाक्टर वैद्यांकडून मिळालेल्या आश्वासनानें पुष्टि आली. 'आतांहि औषधांच्या--प्रभावानें सायंकाळपर्यंत खात्रीनें बरा होणार ' अशा गोड कल्पनेंत रममाण होणाऱ्या पतीनें औषध देत असतांनांच आपल्या प्रिय पत्नीचें अनपेक्षित प्राणोत्क्रमण पाहिलें. त्या वेळीं त्याच्या मनाची काय बरें स्थिति झाला असेल !! काय होणार ! ' ईश्वरेच्छा रूपी प्राक्तनच सर्वश्रेष्ठ आहे ' हा महामंत्र मनांत उच्चारून नभोमंडलांत बराच वर आलेल्या सहस्रकराला पूज्यभावानें नमस्कार करून अंत्यविधीच्या तयारीस लागला.

एका मोठ्या धूमकेतूचें आगमन.

व

त्यामुळें पृथ्वीवर होणारा प्रलय.

मद्रासच्या हिंदूमध्यें मिस्टर टी. एस. शंकरआयर नांवाच्या गृहस्थानें खालोलप्रमाणें एक भविष्य तामिल भाषेमध्यें असलेल्या **काक भुजंदर** नांवाच्या नाडोग्रंथाच्या आधारें प्रसिध्द केलें आहे. हा **काक भुजंदर** नांवाचा **नाडोग्रंथ** मिस्टर एन. आर. व्ही. व्यंकटाचलपथी आयर नांवाच्या मद्रास येथें राहणाऱ्या गृहस्थाजवळ असून त्यामध्यें पुढोल विश्वघटनोपपत्तीसंबंधानें भविष्यें असून पुढें भूतसृष्टी कशी कशी उत्पन्न होत जाईल यासंबंधानें विचार आहे. हे सर्व विचार वाचले असतां वाचणाराची मति साफ गुंग होऊन जाईल. क्षुद्र कोटीपासून परणित मानवी देहापर्यंत कसकशी व केव्हां उत्क्रांती होईल यासबंधानें पण या ग्रंथामध्यें वर्णन आलेलें आहे. मिस्टर शंकरआयर म्हणतात कीं या ग्रंथामध्यें आलेल्या अज्ञात असलेल्या गोष्टींचा किंवा रहस्याचा व माझा परिचय होऊन पांच वर्षें झालीं व तेव्हांपासून घडत असलेल्या गोष्टींचा व या वर्णनाचा तुलनात्मक विचार करतां ज्या दिव्यदृष्टि माणसांनीं हा ग्रंथ निर्माण केला आहे, त्यांचे ज्ञाना पुढें हल्लींचें ज्ञान म्हणजे काजव्यासारखें भासून या उन्नत माणसापुढें आपलें शीरच नमविलें पाहिजे. **प्रजापति** (हर्शल) आणि **वरूण** (नेपच्युन) या दोन ग्रहांना अनुक्रमें **कनदकन** व **समारसन** या दोन नांवानें संबोधिलें आहे. यांच्या पलिकडे असलेल्या प्रदेशामध्यें एक धूमकेतूंचा जथा किंवा कुटुंब आहे व त्यामध्यें पांच धूमकेतु आहेत. व त्यांचे भ्रमणाचे व दिसण्याचे नियमामध्यें पांच प्रकारच्या तऱ्हा आढळत आहेत. व यांपैकीं प्रत्येकजण सरासरी दर पंधरा वर्षानें दृष्टिगोचर होतो. परंतु त्यांपैकीं सर्वांत मोठा असलेला **हॅलेचा** धूमकेतु हा सरासरी ७० पासून ८० वर्षांच्या कालामध्यें दिसतो. या वर्षी सप्तेंबर १५ ते ३१ डिसेंबर

च्या काळामध्यें वेधशाळांना एक धूमकेतु दिसू लागेल आणि तो साध्या डोळ्यांना १९२५ च्या फेब्रुवारी महिन्याच्या आंतच दिसू लागेल. या धूमकेतूचा उदय होण्यापूर्वीच्या सात महिन्याच्या आंतच पृथ्वीवर भूकंप, जलप्रलय, समुद्राच्या लाटा किंवा भरती प्रमाणाबाहेर अत्यंत मोठया आल्यानें समुद्रकाठच्या प्रदेशामध्यें जलप्रलय, भयंकर तुफानें, इत्यादि गोष्टी हा धूमकेतु आपणावर सात प्रकारच्या दृष्टीनें पाहत असल्यामुळें आणील. व त्याच सुमारास आपली पृथ्वी क्रांतिवृत्तामधून सूर्याभोंवतीं प्रदक्षिणा करीत असतां आपला आंस नेहमी विषुवद्वृत्ताला २३½ अंश तिरकस ठेवून प्रदक्षिणा करीत आहे तो कोण बदलून हा आंस ऊर्ध्व रेषेमध्यें येईल म्हणजे क्रांतिवृत्त व विषुवद्वृत्त याचेमध्यें सरासरी ९० अंशांचें तोर्यकत्व होईल व हा आंस ज्या ध्रुवाभोंवतीं प्रदक्षिणा करीत आहे तो ध्रुव बिंदु तिच्या कक्षमधील ठिकाणा मधून बदलेल व त्यामुळें तिला नव्या ध्रुवा भोंवतीं फिरावें लागेल. व ती त्या ध्रुवाभोंवतीं कुंभाराच्या चाकाप्रमाणें फिरूं लागेल. तो सूर्याच्या मदतीखेरीज स्वयंप्रकाशमय होऊं लागेल व पुढें येणाऱ्या **सूर्यसावर्णि-मनूचा** सुरवात होईल. पृथ्वीवर या वेळीं जे भूकंप होणार आहेत त्याने हल्लीच्या उत्तर व दक्षिण ध्रुवाकड असलेले सपाट प्रदेश फुगण्यास लागून नवीन जमिनी किंवा नवीन खंडें महासागराच्या वर येताल. ज्याप्रमाणें पृथ्वीचा आकार वाढेल त्याप्रमाणेंच कालाचोही मर्यादा मोठा होईल; व त्याबरोबरच नवीन **अथित ब्रह्मकल्पाचा** व **सूर्यसावर्णि मन्वंतराचा** आरंभ होईल. व या प्रमाणें श्वेतवराहकल्प व वैवस्वत मनवंतराचा शेवट होईल. या नवीन कल्पामध्यें एका वर्षाचे ४०० दिवस असतील. व एक महिना ४० दिवसांचा असून अशा १० महिन्याच एक वर्ष असेल.

प्रत्येक महिन्यामध्यें ८ दिवसांचे पांच आठवडे येतील; व ब्रह्मवर्म नांवाचा एक नवीन दिवस अस्तित्वांत येईल. पृथ्वी आपल्या हल्लींच्या आकाराच्या १$\frac{1}{4}$ पट वाढेल व त्याप्रमाणें हल्लीं २४ तासांच्या दिवसाचे बदल सवापट मोठा म्हणजे ३० तासांचा एक दिवस होईल. व ह्या तीस तासांचे दिवसाचे गणित जणुंकाय इंग्रजी भाषेमधील Day डे या शब्दामध्यें लपून राहिलें आहे. D हें चवथें अक्षर म्हणून ४. A, हें पहिलें अक्षर म्हणून १ व Y हें २५ वें अक्षर म्हणून २५ व हें सर्व मिळून डे हाच शब्द ३० तासांचा दर्शवीत आहे. व याच प्रमाणें ३० सांची Thirty या शब्दाची गणती करतां आपणाला १०० हीं संख्या मिळते व याच शतांश पध्दतीचा पुढें उपयोग होणार आहे.

या नवीन मनूच्या उदयाबरोबर सर्व पृथ्वी नवीन आनंददायक जीवन व वृत्ति दर्शवील. सर्व पापांची शुध्दी झाल्याकारणानें ती आपल्या अनुच्छिष्ट सौंदर्यानें, ध्रुवता व सुख यानें प्रकाशित होईल. पृथ्वी हाच स्वर्ग होईल कारण तें महत्तेज किंवा महातत्त्व (Great one) जो पृथ्वीचा करता करविता आहे त्याचींच पृथ्वी हे नेहमींचे मुख्य निवासस्थान होईल व आपली पृथ्वी व तींवर असणारें किंवा तोवर राहणारे कल्पनातीत कालपर्यंत सुखानें राहतील.

याप्रमाणें येणारा धूमकेतु त्या महत् विभूतीचा किंवा तत्त्वाचा जागाही देणारा ललकाऱ्या होऊन त्या विभूतीला आपले पृथ्वीवर आणील व जरी आपणाला कधीं न अनुभविलेलें असें प्रळकालचे उतपाताचे कष्ट भोगावयाचें आहेत तरी तें पुढील येणाऱ्या शुभ गोष्टींचें एक खास चिन्ह असून एक अत्यंत शुभ One good असा एक दैवी दस्या (Piston) आपल्या पृथ्वीच्या अत्यंत खोल असलेल्या उथळी (Socket) मध्यें

बसण्याकरतां व त्याचबरोबर पृथ्वीवर जी अनेक घोर पापांची घाण झाली आहे ती दूर करण्याकरितां व जाळून भस्म करण्याकरितां खालीं उतरत आहे. व जेव्हां हा तेजस्वी दंड वर उभा राहील तेव्हां सहजा व बोधक बुध्दि किंवा सहजस्फूर्तीची दिव्य चूड किंवा मशाल अशा सुंदर व दैदीप्यमान प्रकाश फेकील कीं त्यामुळें रवीला खालीं पाहण्याचा प्रसंग येऊन तो त्या दिव्य तत्त्वाच्या किंवा महतत्त्वाच्या (Great One) आड लपेल.

वरील भविष्य तारीख १३ आगस्ट १९२४च्या व्हाईस ऑफ इंडियाच्या अंकामधील " the comeing of a Big comet " एका धूम केतूचें आगमन " या लेखावरून घेतलें आहे.

प्रस्तुत लेखांत भूगर्भवेत्ते, ज्योतिष शास्त्राज्ञ, व भूकंप शास्त्राज्ञ यांचें काय म्हणणें आहे तें वांचकांपुढें ठेवून पुढील ३।४ वर्षांमधील काळासंबंधानें ज्योतिष शास्त्रदृष्ट्या आमचे काय विचार आहेत हें मांडण्याचा मानस आहे. यासंबंधानें आणखी कोणाजवळ कांहीं अनुपलब्ध अशी माहिती असल्यास त्यानें ती आमचेकडे पाठविली असतां आम्हीं ती मोठ्या प्रेमानें प्रसिध्द करूं.

प्रलयकालासंबंधानें आधुनिक शास्त्रकारांच्या कल्पना.

प्रलयकाळाची कल्पना आमच्या पुराणामध्यें दिलेली आहे. व तिचा परिचय आमच्या लोकांना फार प्राचीन कालापासून आहे. परंतु आमच्या पौराणिक कल्पनेंत व पाश्चा त्यांच्याहिम प्रलयाच्या कल्पनेंत कांहीं

महत्त्वाचे भेद आहेत. ज्या वेळीं सर्व पदार्थांचा लय होतो तो 'प्रलय' (प्रकर्षेण लीयन्ते लोना:भवंति पदार्था: अत्र इति प्रलय:) असा अर्थ व्युत्पत्तिकारांनीं दिला आहे. परंतु सर्वच पदार्थांचा लय केव्हां होतो या प्रश्नाचा विचार येथें न करतां सामान्यत: जीवसृष्टीचा लय ज्या वेळेला होतो त्या कालासंबंधानें पुराणें काय म्हणतात तें पाहूं.

अमरसिंहानें सांगितल्याप्रमाणें प्रलय म्हणजे 'नष्टचेष्टता' अथवा सर्व प्राण्यांचे व्यवहार बंद पडणें. अशा स्थितींत प्राणी जिवंतच राहूं शकत नाहीं किंवा फक्त त्यांचे व्यवहार मात्र बंद पडतात हें स्पष्टपणें सांगितलें नाहीं परंतु अशा वेळीं कांहीं मनुष्यें योगमार्गानें आपले सर्व सजीवपणाचे व्यवहार बंद ठेऊन केवळ तपश्चर्या करीत क्वचित ठिकाणीं रहात असावे. कारण प्रलयाचे वेळीं नर नारायण प्रालेयांद्रीवर (हिमालयावर) जाऊन बदरीकाश्रमाच्या तीर्थांत उत्तम तप करीत बसले होते असें देवीभागवतामध्यें सांगितलें आहे. तथापि हे अलौकिक व्यवहार सोडून सामान्यत: जगावर प्रलयकाळच्या प्रारंभीं काय काय वडामोडी होतात यांचें वर्णन आमच्या पुराणावरून पाहतां खालीलप्रमाणें मिळतें.

प्रलयकालाचा प्रारंभ व्हावयाचा म्हणजे प्रथम शेंकडों वर्षे पर्यंत पाऊस पडत नाहीं. या भयंकर अवर्षणानें त्रस्त झालेले लोक भुकेनें व तहानेनें पीडित होऊन एकमेकांस खाऊं लागतात. आणि सर्व लोकांचा क्षय होतो. समुद्र, जमीन व झाडें यांमधील सर्व पाणी व रस सूर्य आपल्या प्रखर किरणांनीं शोषून घेतो. नंतर सर्वत्र रखरखीतपणा येऊन व आगीचा भडका उत्पन्न होऊन त्यास वाऱ्याची मदत होते. अशा रीतीनें ब्रह्मांड, अग्नि व सूर्य यांच्या उष्णतेनें जळलें जाऊन तें नि:सार बनतें. यानंतर शेंकडो वर्षे भयंकर वारा सुटून त्याचा अंमल चालू राहतो. पुढें प्रचंड व

नानावर्णाचे मेघ शेंकडो वर्षेपर्यंत वर्षाव व गर्जना करून सर्व जलमय करून टाकतात. त्यामुळें अग्नीचा पराभव होऊन तो पाण्यांत प्रवेश करतो. पुढें अग्नि नाहींसा झाल्यावर पाण्यापासून मेघोत्पत्ती होऊन ते मेघ पृथ्वीवर शेंकडो वर्षे पर्यंत मुसळधार पाऊस पाडतात. हा क्रम चालू राहिल्यामुळें समुद्रांना भरती येऊन त्यांत पर्वत देखील बुडून जातात.

वरप्रमाणें आपल्या पुराणामध्यें जलप्रलयाचें वर्णन आलेलें आहे. याखेरीज अनेक कथांमधून प्रलयाचें वर्णन अप्रत्यक्षपणें आलेलें पाहण्यास मिळतें. 'प्रालेय' हा शब्द 'हिम' या अर्थी संस्कृत भाषेमध्यें रूढ आहे यावरून हिमप्रलयाची देखील कल्पना आमच्या लोकांना माहित असली पाहिजे असें म्हणण्यास हरकत नाहीं. परंतु हें अप्रत्यक्ष उल्लेख सोडले असतां आमच्या पुराणकारांच्या मतें प्रलयाचा संबंध अवर्षणाशीं व अति वृष्टीशीं पोंचतो असें म्हणतां येतें. याशिवाय ब्रह्मदेवानें सृष्टीची उत्पत्ती केल्यापासून किती वर्षे लोटलीं व हें युग संपून प्रलय होण्यास किती वर्षे राहिलीं याची कल्पना देण्यासाठीं युग, मनु, कल्प वगैरे मानें आपल्या ज्योतिषांनीं ठरविलीं आहेत. वर्षप्रतिपदेच्या दिवशीं वर्षफल देण्यापूर्वी ब्रह्मदेवाच्या कितव्या वर्षाचा, कोणता ऋतु चालला आहे यांची हकीगत दिलेली असते. परंतु तिकडे आमचें लक्ष जाईल तेव्हांना !! हो हकीगत विचारी माणसास विचाराला स्फूर्ति देण्यासारखी आहे.

पाश्चात्य ज्योतिषांनीं शोधून काढलेलें युगमान देखील आपल्या पंचांगांत दिलेल्या प्रारंभीच्या संकल्पासारखेंच आहे. निरनिराळ्या पंडितांच्या मतांत युगाच्या वर्ष संख्येबद्दल एकमत नाहीं. पाश्चात्यांच्या मतें प्रलयाचा संबंध अवर्षणांशीं किंवा अतिवृष्टीशीं नसून हिमकालाशीं आहे. 'हिमानीयुग' किंवा 'हिमप्रलयकाल' असें नांव त्यांनीं ज्या युगास दिलें

आहे त्या युगाचें मुख्य लक्षण म्हटलें म्हणजे बर्फाचे मोठमोठे पर्वत बनून ते वहात जाऊन अफाट प्रदेशाचा चुराडा करीत होते. हिमपर्वतांचीहि स्वारी चालूं होती तेव्हां कित्येक देश खरवडून जाऊन अगदीं खडकाळ बनले. खडकाळ भागांतील दगड धोंडे शेंकडो मैलांवर जाऊन पडले आणि डोंगराळ प्रदेशावरून हे अजस्र पर्वत वहात गेले तेव्हां त्यांची पाठ तासून रंधा मारल्याप्रमाणें गुळगुळीत बनली. या युगांत नार्वेमधील पर्वतावरून जे बर्फाचे डोंगर घसरत निघाले ते फिनलंड, जर्मनी, व इंग्लंड या देशांत चुरडून तेथें कित्येक हजार वर्षेंपर्यंत त्यांनीं मुक्काम केला होता. उत्तर अमेरिकेची देखील हीच अवस्था झाली होती. आल्पस, कॉकेशस, पिरिनीज व हिमालय या पर्वतावरील बर्फाचें आच्छादन देखील त्या वेळीं सध्यापेक्षां बरेंच मोठें असलें पाहिजे. सारांश सध्या जे देश अत्यंत सुधारलेले व अग्रगण्य समजले जातात ते या हिमयुगांत निव्वळ बर्फाच्या पर्वतांनीं व्यापले होते.

सुमारें पन्नास वर्षांपूर्वी इंग्लंडामध्यें ऑलफ्रेड विल्किन ड्रेसन नांवाचा एक बुध्दिमान व कल्पक ज्योतिर्विद होऊन गेला, व यानें आपल्या स्वतंत्र विचारशक्तीनें कित्येक नवीन कल्पनांची भर प्रस्तुतच्या ज्योतिर्विषयक वाङ्मयामध्यें टाकली व त्याला त्याच्या मताच्या सत्यतेबद्दल पूर्ण खात्री झाल्यानंतर तीं मतें त्यानें ग्रंथरूपानें इंग्लंडामधील विद्वानांपुढें मांडली, परंतु त्याचा व्हावा तसा उपयोग झाला नाही. व या विद्वान कल्पक ज्योतिर्विदाला १९०१ सालामध्यें अज्ञातवासामध्येंच मरण प्राप्त झालें. या ज्योतिर्विदांचें सर्व गणित व सिध्दांत त्याचे मित्रांनीं ग्रंथरूपानें जिवंत ठेवण्याचा प्रयत्न करून १९११ मध्यें 'ड्रेसोनिया' नांवाच ग्रंथामध्यें त्याचें गणित डिहार्सी यानें प्रसिध्द केलें. परंतु हल्लीं नामांकित ज्योतिषी

लोकांच्या कल्पना समशेल चुकल्या असून ड्रेसनचें म्हणणें तंतोतंत बरोबर आहे असा अनुभव येऊं लागल्यामुळें हल्लीं ड्रेसनचें म्हणणें काय आहे तें लक्षपूर्वक पाहिले पाहिजे अशी जोराची इच्छा उत्पन्न झाली आहे. ड्रेसनाच्या मताप्रमाणें युगपध्दती खालीलप्रमाणें आहे.

महायुग ३२ हजार वर्षांचें असून त्याचे चार चरण अथवा चार मनु आहेत. सध्यां चवथा मनु संपत आला असून आणखी ७०० वर्षांनीं मन्वंतर होणार. महायुग म्हणजे एक ब्रह्मदेवाचें वर्ष अशी कल्पना केल्यास सध्यां ब्रह्मदेवाचा जून महिना चालू आहे आणि इ. स. २२९५ मध्यें सायन कर्क संक्रांत होऊन पुढें आठ हजार वर्षे पर्यंत (म्हणजे इ. स. १०२९५) वर्षा ऋतु चालू राहील. त्यानंतर हिवाळ्याला प्रारंभ होऊन दिनमान कमी होत जाईल आणि शीत कटिबंधाचा मर्यादा वाढून बर्फाचें साम्राज्य वाढत जाईल. या हिवाळ्याची परमावधि आणखी आठरा हजार म्हणजे इ. स. (१८२९५) वर्षांनीं होऊन त्या वेळीं पृथ्वीवर प्राण्याच्या वस्तीस उपयोगी असा प्रदेश अत्यंत दुर्मिळ होईल. शीत प्रदेशाची मर्यादा ३५ अंशांपर्यंत व उष्ण कटिबंधाचीहि तितकीच वाढून समशीतोष्ण कटिबंध अगदीं संकुचित बनेल व त्याचाही बराच भाग हिम प्रदेशाच्या सानिध्यामुळें अतिशय थंड बनेल. यामुळें या कालांत मनुष्यप्राणी जगणें पराकाष्ठेचें कठीण आहे. नंतर हिवाळ्याचा अंमल हळू हळू कमी होऊन आठ हजार वर्षांनीं म्हणजे इ. स. २६२९५ नंतर पुन्हां मार्च महिन्याप्रमाणें वसंत ऋतूचा अंमल सुरू होईल. एकंदरींत बत्तीस हजार वर्षांच्या या चक्रापैकीं आठ हजार वर्षे मध्यप्रलय युग चालू असतें. असा प्रलय संपून पंधरा हजार वर्षें लोटलीं आहेत. आणि पुन्हां तो काल येण्यास १७ हजार वर्षें जावीं लागतील. हें ३२ हजार वर्षांचें चक्र कसें

उमटेल तिला **विषुववृत्त** म्हणतात. हें वर्तुळ पृथ्वीच्या मध्यावर पूर्व पश्चिम दिशेनें घातलेलें एक कडें आहें असें समजण्यास हरकत नाहीं. या कडयापासून उत्तरेस सहा हजार मैलांवर उत्तरध्रुव व दक्षिणेस तितक्याच अंतरावर दक्षिणध्रुव आहे. या विषुववृत्तावर राहणाऱ्या लोकांना दिवस व रात्र सारखी असते.

क्रम म्हणजे जाणें यावरून सूर्य विषुववृत्ताच्या दक्षिणेस किंवा उत्तरेस जितका गेलेला दिसेल तितकी त्याची क्रांति समजतात. ही क्रांति सध्या २३अं. २७ कलेपर्यंत होऊं शकते. हें जें क्रांतीचें जास्तींत जास्त मान त्याला **परमक्रांति** असें म्हणतात. पृथ्वीच्या विषुववृत्तावरील प्रेक्षकांस दोन प्रहरीं आपल्या थेट डोक्यावरील बिंदूपासून २३ अं. २७ कलेपेक्षां जास्त अंतरावर दक्षिणस किंवा उत्तरेस सूर्य केव्हांहीं दिसणार नाहीं, थेट डोक्यावरील बिंदूपासून क्षितिजापर्यंत ९० अंश असतात. यावरून क्रांतिवृत्त म्हणजे पृथ्वीचा आकाशामध्यें फिरण्याचा जो मार्ग त्या मार्गाला क्रांतिवृत्त म्हणतात. आपणाला या मार्गामधून सूर्य फिरत असल्याचा भास होतो. या मार्गांतले फक्त दोन बिंदु थेट पूर्व पश्चिमेस आहेत. यामुळें येथें पृथ्वी आल्यावेळीं ती विषुव वृत्तावर असते. सारांश, पृथ्वीवरचें विषुववृत्त खूप मोठें करून ते आकाशामध्यें क्रांतिवृत्ताला गांठोपर्यंत वाढविल्यास त्याचीं ज्या दोन बिंदूंत गांठ पडते त्यांना संपातबिंदु म्हणतात.

पृथ्वी सूर्यासमोर सरळ ताठ उभी असती तर विषुववृत्त आणि क्रांतिवृत्त अशीं दोन वर्तुळें माणण्याचें कारण पडलें नसतें. पण ती ताठ उभी न राहतां पिंगा घालणाऱ्या मुलीप्रमाणें सर्व काळ तिरकी उभी राहते. यामुळें तिचा कमरपट्टा (म्हणजे विषुववृत्त) थेट सूर्यासमोरच न राहतां

उत्पन्न होतें व त्याचा ज्योतिषशास्त्रावरोबर कसा काय संबंध आहे, ड्रेसनचें काय म्हणणें आहे व त्या गोष्टी नीट ध्यानांत येण्याकरितां प्रथम आपण त्यास अंगभूत लागणाऱ्या गोष्टींचा विचार करूं

क्रांतिवृत्ताच्या तीर्यकत्वामध्यें कमीअधिकपणा झाल्यानें काय घडतें?

पृथ्वीला एकंदर ११ प्रकारच्या गती आहेत. त्या पैकीं सध्या तीन गतींचाच विचार करणें आहे. एक स्वतः भोंवतालची रोजची गति व दुसरी सूर्याभोंवतालची वार्षिक गति व तिसरा संपात किंवा कदंबाभोंवतालची गति; व या तिसऱ्या प्रकारच्या गतीचाच प्रलयकालाबरोबर घनिष्ठ संबंध आहे. आपण भोंवरा फिरवल्या वेळीं ज्या तीन गति पाहण्यास सांपडतात त्यावरून पृथ्वीच्या गतींचें स्वरूप समजेल. भोंवरा स्वतः-भोंवतीं फार वेगानें फिरतो. याशिवाय सर्कशीतील घोड्याप्रमाणें कित्येक फेऱ्या करतो आणि नंतर एका ठिकाणीं थांबून डोक्यानें सावकाश पिंगा घालून दाखवितो. तेव्हां गिरकी, प्रदक्षिणा व पिंगा अशीं तीन नांवें भोवऱ्याच्या गतीस देतांत येतात. मात्र प्रत्येक गतीचा वेग कमीजास्त असतो. गिरक्या दर सेकंदास ५०।७५ होत असताल, प्रदक्षिणा .२।३ आणि पिंग्याचा एक फेरा पुरा होण्याला २ सेकंदा पर्यंत वेळ लागू शकेल. पृथ्वीची गिरकी म्हणजे तिचें रोजचें स्वतःभोंवती फिरणें. प्रदक्षिणा ही सूर्याभोंवतालची वार्षिक गति; आणि पिंगा म्हणजे संपात--गति. दोन वर्तुळें एकमेकांना ज्या दोन बिंदूंत छेदतात त्या बिंदूना संपात बिंदु म्हणण्यास हरकत नाहीं. पण आकाशामध्यें विषुववृत्त आणि क्रांतिवृत्त हीं दोन वर्तुळें जेथें एकमेकांस छेदतात त्या बिंदूनां संपात बिंदु हे शब्द लावण्याचा परिपाठ आहे.

पृथ्वी बरोबर माध्यावर कापून तिचे उत्तरार्ध व दक्षिणार्ध असे तुकडे करून ते पुनः जुळल्यास पृथ्वीच्या पृष्ठ भागावर कापल्याची रेघ

किंचित कलता असतो. यामुळें या दोन वर्तुळांची कल्पना करावी लागते. विषुववृत्ताच्या मध्यांतून काढलेल्या आसाच्या ठोंकास **ध्रुवबिंदु;** व क्रांतिवृत्ताच्या आसांच्या ठोकांना **कदंब** असें म्हणतात. या दोन बिंदूंत पृथ्वीच्या तिर्यकत्वा इतकें म्हणजे २३ अं. २७ कलेचें अंतर आहे.

पृथ्वीवरील कांहीं प्रदेशांमध्यें कडक उन्ह, कांहींत कडक थंडी व कांहींत उष्णतेचें व थंडीचें मान बेताचें असतें याचें कारण हें तिर्यकत्व आहे. व याच तिर्यकत्वाचे मुळें आपले पृथ्वीचे हवामान संबंधाचे उष्ण कटिबंध शीत कटिबंध असें भाग पडतात. विषुववृत्तापासून २३½ अंशांपर्यंतच्या प्रदेशाला उष्ण कटिबंध, उत्तरध्रुवापासून साडे तेवीस अंशांपर्यंत शीत कटिबंध आणि मधल्या प्रदेशास समशीतोष्ण कटिबंध असें म्हणतात. उष्ण कटिबंधाची मर्यादा सूर्याच्या परक्रांति इतकी असते यामुळें तेथें वर्षांतून दोन दिवस सूर्य थेट डोक्यावर येतो. समशीतोष्ण म्हणजे सौम्य कटिबंधांतील लोकांच्या डोक्यावर सूर्य कधींच येत नाहीं. परंतु चोवीस तासांत एक वेळ तरी सूर्याचें दर्शन त्यांना झाल्यावांचून राहात नाहीं. आणि शीतकटिबंधांतील लोकांना मात्र वर्षांतून चोवीस तासांत मुळींच सूर्यदर्शन नाहीं असे कांहीं दिवस घालवावे लागतात. यामुळें तेथें थंडीचा कडाका पराकाष्ठेचा असूं शकतो. निराळ्या शब्दांमध्यें सांगावयाचें असतां एका अंशास ७० मैल याप्रमाणें धरलें असतां ध्रुवावर उभें राहून चौफेर नजर फेंकली असतां तेथून चारहो बाजूला सोळाशें मैलपर्यंत जो प्रदेश दिसेल त्याला ध्रुवप्रदेश असें म्हणतां येईल. आणि कर्कवृत्तापासून ध्रुवप्रदेशापर्यंतचा भाग म्हणजेच समशीतोष्ण कटिबंध. कर्कवृत्ताचा रेषा आपलेकडे कच्छ, अहमदाबाद, माळवा, जबलपूर, छोटानागपूर व बंगाल प्रांतांतून जाते; व शीत कटिबंधाची मर्यादा उत्तर स्वीडन, सैबीरीया व

कानडा या देशांतून जाते. सौम्य किंवा समशीतोष्ण कटिबंध यांच्या उत्तर व दक्षिण मर्यादा अशा रीतीनें कायमच्या ठरून गेल्या आहेत असें मत आजपर्यंत प्रचलित आहे. परंतु हल्लींच्या ड्रेसनच्या मताप्रमाणें हें म्हणणें चुकीचें ठरतें. तसेंच भूस्तर शास्त्रज्ञांनीं जो हिमप्रलयकालासंबंधीं पुरावा पुढें आणला आहे त्यावरून कटिबंधांच्या आजच्या मर्यादा कायमच्या नसून सात आठशें मैलपर्यंत मागें पुढें होतात असें मान्य करावें लागतें. पूर्वी एका काळीं ही हल्लींची शीतकटिबंधाची मर्यादा ओलांडून बर्फाचे डोंगर सात आठशें मैल दक्षिणेस आले होते व त्यांचा तेथें हजारों वर्षें वस्ती होती असा पुरावा मिळत आहे.

हिमप्रलय होण्याचें कारण काय असा प्रश्न मागल्या पिढींतल्या विद्वानांपुढें आला तेव्हां त्याचें उत्तर शोधून काढण्याचें काम क्रोल नांवाच्या ज्योतिषाकडे सोंपविण्यांत आलें. तेव्हां त्यानें कित्येक वर्षें परिश्रम करून या प्रश्नाचें उत्तर दिलें तें असें कीं पृथ्वीचा भ्रमण मार्ग सध्या जितका चपटा आहे त्यापेक्षां तो एका काळीं अधिक चपटा होता; आणि या चपटेपणामुळें पृथ्वीवर हिमप्रलय झाला. प्रलयकाळ संपून सध्या ८० हजार वर्षें झालीं असून हा प्रलय पृथ्वीच्या उत्तरगोलार्धांत चालू असेल त्या वेळीं दक्षिण गोलार्धांत सौम्य युग चालू असतें आणि दक्षिणेकडे प्रलय असेल त्या वेळीं उतरेकडे सौम्ययुग असतें, असाहि सिध्दांत क्रोलनें मांडला होता. परंतु चार पांच वर्षांपूर्वी दक्षिणध्रुवाच्या शोधार्थ गेलेल्या मंडळींना असें दिसून आलें कीं सध्या उत्तर ध्रुवाकडे ज्याप्रमाणें बर्फाच्छादित प्रदेश संकुचित होत आहे त्याचप्रमाणें दक्षिणेसाहि घडामोड चालू आहे. या अनुभवामुळें क्रोलचें मत चुकीचें ठरून प्रलयाचें मूळ पृथ्वीच्या भ्रमण मार्गाच्या कमी जास्त चपटेपणावर सांपडण्याजोगें आहे, ही उपपत्ति देखील अग्राह्य वाटू लागली आहे.

ड्रेसनची प्रलयाची नवीन उपपत्ति क्रांतिवृताच्या कमीजास्त तिरकसपणावर रचलेली आहे. हा तिरकसपणा फारसा कमीजास्त होऊं शकत नाहीं असा आजपर्यंतचा समज होता; म्हणजे हें तिर्यकत्व कमींत कमी २१ अं. ५८ क. ३६ वि. व जास्तींत जास्ती २४ अं. ३५ क. ५० वि. होतें व याची शंभर वर्षांमध्यें $46\frac{1}{2}$ विकला गति असल्याचें मानीत असत. परंतु वरील समज चुकीचा असून क्रांतिवृत्ताचें तिर्यकत्व सध्या जें २३॥ अंश आहे तें एका काळीं ३५ अंशापर्यंत होतें असें ड्रेसनचें म्हणणें आहे. म्हणून जितकें तिर्यकत्व तितक्या अंशापर्यंत शीत कटिबंधाची मर्यादा हा नियम लक्षांत ठेवला असतां सध्या स्वीडन पर्यंत (म्हणजे ध्रुवापासून $23\frac{1}{2}$ अंशांपर्यंत) हिमपर्वत येऊं शकतात. त्याचप्रमाणें हें तिर्यकत्व ३५ अंश होतें तेव्हां बर्फाचे डोंगर स्वीडनच्या दक्षिणेस आणखी सातआठशें मैल पसरले होते. क्रांतिवृत्ताचें तिर्यकत्व सूर्याची परक्रांति आणि पृथ्वीवरील कटिबंधांची मर्यादा यांचा अशा रीतीने निकट संबंध आहे. याप्रमाणें पृथ्वीवरील घडामोडी आकाशांमधील देखाव्यावर अवलंबून आहेत. पृथ्वीच्या दैनंदिन म्हणजे रोजच्या प्रदक्षिणेमुळें दिवस व रात्र होते. तर तिच्या वार्षिक गतीमुळें उन्हाळा, हिवाळा, पावसाळा वगैरे भिन्न ऋतु उत्पन्न होऊन, फळें, व धान्यें यांच्या अस्तित्वानें व विनाशानें सृष्टीचें स्वरूप पार पालटतें येथपर्यंत सर्वांना माहिती आहे; परंतु पृथ्वीची जी संपात गति तिच्यामुळें होणाऱ्या घडामोडींची नीटशी कल्पना आजवर चांगली झालेली नाहीं. पृथ्वीचा आस क्रांतिवृत्ताच्या अक्षाभोंवतीं (कदंबाभोंवतीं) विरटया घालीत असतो यामुळें विषुववृत्ताचे ध्रुव क्रांतिवृत्ताच्या ध्रुवाभोंवतीं फिरतात आणि विषुववृत्त क्रांतिवृत्तावर सरकतें व हेंच अयन चलन होय व हा एक फेरा सरासरी २६ हजार वर्षांमध्यें होतो,

याप्रमाणें संपात व त्याचे गतीसंबंधानें आजपर्यंत मानण्यांत येत असे; परंतु हल्लींच्या ड्रेसनच्या मताप्रमाणें विषुववृत्ताचा ध्रुव क्रांतिवृत्ताच्या ध्रुवाभोंवतीं म्हणजे कदंबाभोवतीं फिरत नसून कदंबापासून ६ अंश अंतरावर असलेल्या एका निराळ्या बिंदुभोंवतीं फिरत आहे त्यामुळें संपाताचा एक पूर्ण फेरा होण्यास २६ हजार वर्षें लागतात असें समजत असत त्या ऐवजीं ३२ हजार वर्षें लागतील. आणखी दोन तीनशें वर्षें जुन्या व नव्या मतांच्या संपात गतींत फारसा फरक पडणार नाहीं. क्रांतिवृत्ताचें तिर्यकत्व म्हणजे कदंब व ध्रुव यांमधील अंतर तें दोघांच्याहि मतें सध्या जवळजवळ २३॥ अंश आहे. जुन्या मताप्रमाणें हें अंतर केव्हांही एवढेंच राहणार. पण नव्या मताप्रमाणें हें अंतर आजच्या दोडपट होणार आहे.

सूर्याची परमक्रांति आमच्या ग्रंथामध्यें २४ सांगितलेली आहे. शकापूर्वी २४०० वर्षें या कालाच्या सुमारास क्रांतिवृत्ताचें तिर्यकत्व इतकें होतें. तें उत्तरोत्तर कमी होत आहे. सन १९२५ मध्यें क्रांतिवृत्ताचें तिर्यकत्व २३ अं. २६ कला ५६. ५५ विकला होईल. टालमीच्या ग्रंथांत (सिंटाक्सिस भाग १) तिर्यकत्व २३ अं. ५ क. व २३ अं. ५२ क. ३० वि. यांच्या दरम्यान आहे, व हें त्यानें हिपार्कसच्या ग्रंथामधलें घेतलें असें प्रो० व्हिटनीचें मत आहे. हें तिर्यकत्व आमच्या ग्रंथांशीं मिळत नाहीं यावरून हिपार्कस व टालमी यांच्या ग्रंथांवरून तें आमच्या लोकांनीं घेतलें नाहीं असें सिध्द होतें. अर्थात स्वतंत्रपणानें त्यांनीं काढलें; व तें शकाच्या पूर्वी केव्हां तरी काढलें असलें पाहिजे. **यंत्रराज** ग्रंथांत क्रांतिवृत्ताचें तिर्यकत्व २३ अं. ३५ क. मानलें आहे व तितकें तें वस्तुतः शक ९०० च्या सुमारास होतें. परंतु

पुढील इतर कोणी ग्रंथकारांनीं हें स्वीकारलें नाहीं किंवा स्वतःही काढलें नाहीं.

ध्रुवतारा थेट उत्तरेस असतो व तो अचळ आहे असा सर्वसाधारण लोकांचा समज आहे. आणि याच कारणामुळें त्या नक्षत्रास ध्रुव हें नांव देण्यांत आलें आहे. परंतु बारकाईनें पाहणी केली असतां ध्रुव नक्षत्र अस्थिर आहे हें पूर्वरात्रीं व उत्तररात्रीं वेध घेऊन सिध्द करतां येतें. शके १५८० मध्यें काशी येथें राहणाऱ्या कमलाकर नांवाच्या ज्योतिषानें सिध्दांत तत्वविवेक नांवाच्या ग्रंथांत हीं गोष्ट नमूद केली आहे. तेव्हां जुन्या व नव्या वेधांवरून ध्रुव ताऱ्यास थोडीशी गति आहे असें ठरतें. याचाच अर्थ ध्रुव तारा एका काल्पनिक मध्य बिंदुसभोंवतीं प्रदक्षिणा घालीत असतो. यावरून त्याच्या सभोंवतीं सर्व नक्षत्रें प्रदक्षिणा घालीत असतात तें ध्रुवस्थान ध्रुव नक्षत्राहून निराळें आहे. ध्रुव नक्षत्र आकाशामध्यें दिसतें आणि ध्रुव बिंदु दिसत नाहीं. यामुळें ध्रुव बिंदूचें स्थान सांगण्याकरितां ध्रुव ताऱ्याकडे बोट दाखवेण्याचा चाल आहे. हा ध्रुव व ध्रुवनक्षत्र यांतील अंतर दिवसेंदिवस कमी होत आहे व कांहीं वर्षांनीं ध्रुव नक्षत्र खऱ्या ध्रुवस्थानीं येणार आहे. ध्रुवाचा प्रदक्षिणामार्ग वर्तुळाकृतीच आहे परंतु या वर्तुळाचा मध्य बिंदु कदंबापासून सहा अंश अंतरावर असल्याचें मागें सांगितलें आहे व त्यामुळें कदंब व ध्रुव यांमधील अंतर कायमं राहत नाहीं. व त्यामुळेंच क्रांतिवृत्ताचें तिर्यकत्व पण कायम न राहतां कमीजास्त होतें व त्यामुळें पृथ्वीवरील कटिबंधाच्या मर्यादेमध्यें फरक होऊन पृथ्वीवर हिमप्रलय होऊं शकतो याचें विवेचन वर आलेंच आहे. क्रांतिवृत्ताचें तिर्यकत्व २३ अंशांपेक्षां फारसें कमी होत नसल्यामुळें पृथ्वीवरील विषुववृत्ताच्या उत्तर व दक्षिणेकडील तेवीस अंशाच्या पट्टयामध्यें हवामानाच्या

दृष्टीनें फारसे फरक होत नाहींत. परंतु या पलीकडच्या १२।१५ अक्षांशाकडील प्रदेशांमध्यें बरीच चलबिचल होते. उदाहरणार्थ हिंदुस्थानामधील कच्छ, अहमदनगर, माळवा, येथपर्यंतच्या प्रदेशांमधील हवामानांत फारसा फरक पडणार नाहीं. पण पंजाब, अफगाणिस्तान, काश्मीर, तिबेट वगैरे भागांतील आजचें हवामान व दहा हजार वर्षांपूर्वीचें हवामान यांत अतिशय मोठा फरक दिसून येईल. तो इतका कीं त्या वेळच्या वनस्पती व प्राणी यांचे अवशेष शोधून काढले तर त्यांची रचना व राहणी आजच्याहून फारच निराळी असल्याचें स्पष्टपणें आढळून येईल. सध्यांच्या उष्ण कटिबंधाची मर्यादा ओलांडून उत्तरेस किंवा दक्षिणेस ध्रुव प्रदेशाकडे जावें. त्या मानानें हवामानाची उलथापालथ फार मोठया प्रमाणावर होते. हिमप्रलय व जलप्रलय वगैरे भयंकर अनर्थ पस्तीस पेक्षां अधिक अक्षांशाच्या देशांत होऊं शकतात. व ड्रेसनचा ध्रुव प्रदक्षिणामार्गाचा उपपत्ति मान्य केली म्हणजे अनेक ज्योतिषविषयक प्रश्नांचा समाधानकारक निकाल लागतो. या उपपत्तीनें ईजिप्तमधील मनोऱ्यांत Pyramids of Egypt वेध घेण्यासाठीं जी व्यवस्था केलेली आहे तिचें मर्म समजतें. ३१७५६ वर्षांच्या ध्रुव प्रदक्षिणाचक्राच्या अवधीस वर्षाची उपमा दिल्यास इ. स. २२९५ मध्यें (म्हणजे सध्यां) सौम्य युगोन उन्हाळा व ख्रि. पूर्वी १३५८३ मध्यें म्हणजे प्रलयकालीन भर हिंवाळा. या प्रचंड वर्षाच्या ऋतूमध्यें काय स्थिति असेल याचें विवेचन सायन्स प्रोग्रेस नांवाच्या त्रैमासिकाच्या १९२० च्या ऑक्टोबरच्या अंकांत आलफ्रेड बार्ला यानें करून दाखविलें आहे. त्यावरून या ऋतूंत २९ अं. ५८ कला परक्रांतीचें मान येत असून ईजिप्तमधील मनोऱ्यांत बसून वेध घेणाऱ्यास सूर्य

बरोबर डोक्यावर दिसत असला पाहिजें असे ठरतें. याखेरीज इतर ऋतूंतील माध्यान्होचा सूर्य देखील पाहतां यावा यासाठीं या मनोऱ्यांतील वेधशाळेच्या भिंतींत भोकें ठेवलीं आहेत. व या बत्तीस हजार वर्षांच्या गणिताची माहिती मनोरे बांधणाऱ्या, ईजिप्शियनांना होती असें हिरोडोटसनें म्हटल्याचें बालीनें आपल्या लेखांत विस्तारानें दाखविलें आहे. सारांश वरील भविष्यामध्यें पृथ्वीचा ध्रुव बदलणार आहे वगैरे जें भविष्य आलें आहे ते शक्य आहे किंवा काय, असल्यास कधीं यांची पुष्कळच कल्पना वरील प्रतिपादन केलेल्या **ड्रेसनच्या** मतावरून कोणासही करितां येईल. ड्रेसनच्या मताची मराठींमध्यें माहिती प्रथमतः चित्रमय जगतामध्यें सन १९२२ सालीं श्रीयुत दत्तात्रय विष्णु आपटे यांनीं प्रसिध्द केली आहे व त्यावरूनच वरील माहिती आजच्या अंकांमध्यें दिली आहे. वरील धूमकेतूच्या भविष्यामध्यें वर्णन केलेली स्थिति म्हणजे ध्रुवाची स्थिति बदलणें हो गोष्ट २।३ वर्षांमध्यें नव्हे तर आणखी शंभर वर्षांमध्यें देखील घडणार नाही व ती कां घडणार नाहीं हें सकारण आतां वाचकांस सहज कळून येईल.

वर ज्याप्रमाणें काक भुजंदर नाडीमध्यें भविष्य प्रसिध्द झालें आहे असेंच भविष्य डॉक्टर मिलटन ए. नोव्हलस नांवाच्या प्रसिध्द भूकंपविशारदानें केलेलें आहे. पुढील दहा वर्षांमध्यें त्यांचे मतानें खालीलप्रमाणें घडामोडी व्हावयाच्या आहेत. या प्रोफेसर साहेबांनीं इटली, डालमाटिआ, आशीयामनार, पराशिआ, हिन्दुस्थान, जपान व सायबिरीआ या प्रदेशांमधून जाणाऱ्या रेषेच्या आसपास एक मृत्यु कटिबंध Death Belt मानला असून त्यामध्यें भूकंपाचे अनेक उत्पात व्हावयाचे आहेत. तसेंच समुद्रामध्यें भयंकर बादळें उत्पन्न होऊन समुद्र आपली मर्यादा सोडून खालील प्रदेश जलप्रलयानें Tidal wave नें बुडवून टाकणार आहे. या वेळीं

यूरप, अर्धें आशिआ खंड, आफ्रिका खंडाचा कांहीं भाग, तसेंच उत्तर अमेरिकेचा कांहीं भाग समुतृष्यंतु होणार आहे. नवीन द्वीपें निर्माण होतील व अमेरिका, ऑस्ट्रेलिआ व न्यूझीलंड हीं नवीन उत्पन्न होणाऱ्या जमिनींमुळें एकत्र होतील. व हल्लीं पश्चिम गोलार्धामध्यें जो जमीन दृष्टीस पडत आहे त्याचे पेक्षां दुप्पट जमीन समुद्रामधून वर येईल. हल्लींच्या पृथ्वीच्या ध्रुवाची जी रेषा आहे तो बदलेल, व सायबिरीया व पूर्व ऊरलमाऊंटन यामधून जाणाऱ्या रषेच्या समोर उत्तर ध्रुव येईल. व दक्षिण ध्रुवाची रेषा प्यासिफिक महासागरामधून जाईल. व त्यामुळें पृथ्वीवरील विषुव वृत्ताची रेषा बदलेल व ती निरनिराळ्या ठिकाणांवरून जाईल. हल्लीं युनायटेड स्टेट जेथें आहे तेथून तें या नवीन विषुववृत्ताजवळ येईल व त्यामुळें हल्लीचें तेथील वातावरण बदलून हल्लीं फ्लोरिडा येथें जसें समशीतोष्ण हवामान आहे तसें तेथें होईल. तसेंच हल्लींची जी समुद्र किनाऱ्याची रेषा आहे ता बदलेल व युनायटेड स्टेटसच्या पूर्वेकडे समुद्र किनारा येईल व त्यामुळें न्यूयार्क, बोस्टन न्यू आरलेन्स, सान फ्रान्सीसको वगैरे समुद्रकिनाऱ्यावर असलेलीं गांवें मध्यभागीं येऊन त्यांचा किनारा नष्ट होईल. गल्फ ऑफ मेक्सिको जो हल्लीं समुद्राचा भाग आहे तो बदलून एक मध्येंच खारें पाण्याचा समुद्र किंवा हल्लीच्या कॅसपीअन समुद्रासारखा चोहों बाजूनें जमिनानें वेष्टण झालेला समुद्र होईल. असो, खरोखर याप्रमाणे गोष्टी घडतात किंवा काय हें पुढील दहा वर्षांच्या कालानें समजणार आहेत. पृथ्वीचा ध्रुव बदलणें हा कांहीं लहान सहान गोष्ट नव्हे. मॅडम ब्लाव्हॅट्स्की बाई--थिआसफीच्या उत्पादक जननी यांचें इसिस अनव्हेलड व सिक्रेट डाक्ट्रीन यांमध्यें हा याप्रमाणेंच पुष्कळ उल्लेख आलेला आहे. पृथ्वीवर नवीन मानववंश जेव्हां येतो त्या वेळीं अशाच घडामोडी मागें घडल्या व

पुढें घडतील असें त्यांचें म्हणणें आहे. आतां पुढें आपले पृथ्वीवर नवीन अवतार व्हावयाचा असून नवीन येणाऱ्या मानववंशाची तयारी होत आहे असें त्यांचें मानणें आहे. असो, आतां आपण सन १९२६ मध्यें किंवा त्याचे आसपास भूकंपादि उत्पात होतील किंवा काय व तें कोणत्या ग्रह-स्थतीमुळें होणें शक्य आहे याचा विचार करूं

सन १९२५ किंवा १९२६ मध्यें भूकंपाचे भयंकर उत्पात होणें शक्य आहे काय ?

स्थिर राशि--वृषभ, वृश्चिक, सिंह व कुंभ--व भूकंप यांचा कसा काय संबंध आहे याचें विवेचन मागें ज्योतिर्माला वर्ष ७ वें अंक ७ ते ९ मध्यें येऊन गेलें आहे. **शनि** व **नेपच्युन** या दोन ग्रहांची जोडी सायन वृश्चिक व सिंह या स्थिर राशींमध्यें निदान सन १९२६ च्या अखेर पर्यंत खास राहणार आहे. यांचे मदतीला आणखी गुरु हा सायन कुंभ राशीमध्यें सन १९२६ सालीं येईल. म्हणजे या वर्षी तीन बृहत् गोल स्थिर राशींमध्यें जमा होतील.

पाठीमागील दोन वर्षांचा अनुभव पाहतां सन १९२३ च्या ऑगस्टमध्यें सिंह राशीमध्यें नेपच्युन मंगळाची युति झाली व त्या युतिबरोबर गुरु त्या वेळीं केन्द्रयोग वृश्चिक राशामधून करीत होता, तेव्हांपासून अलिकडे कोठेंना कोठे तरी भूकंप झाला नाहीं असें घडतच नाहीं. यावरून विचार करितां या दोन ग्रहांच्या स्थितीकडे पुढील कालामध्यें विशेष लक्ष दिलें पाहिजे. अलिकडे सायन सिंह राशीमध्यें राहू आला असून ग्रहणें हीं सिंह आणि कुंभ या राशींमध्यें आगस्ट १९२४ पासून होऊं लागलीं आहेत. व तीं आणखी सिंह व कुंभ राशींमध्यें १९२५ सालामध्यें पण होतील व हीं पुढें होणाऱ्या शनि, नेपच्युन मंगळ व गुरु यांचे भ्रमाणनें उत्तेजित व्हावयाचीं आहेत;

त्यामुळें सन १९२५ व १९२६ हीं झालें बरींच उत्पादकारक जातींत असें म्हणण्यास हरकत नाहीं. व त्यांतलें **त्यांत १९२६ साल भूकंप ज्वालामुखींचे स्फोट वगैरे दृष्टीनें फारच भयंकर वाटत आहे.**

२२ एप्रिल १९२६ रोजीं नेपच्युन मंगळाचा प्रतियोग सिंह व कुंभ राशीच्या २३ अंशांमधून होणार आहे. लगेच दुसरे दिवशीं म्हणजे २३ एप्रिल रोजीं मंगळ गुरूची युति कुंभेच्या २३ व्या अंशामध्यें होईल. शनि या वेळीं वृश्चिकेमध्यें २३ व्या अंशामध्यें आहेम्हणजे तो या दोन योगांबरोबर केंद्रयोग करणार आहे. ही ग्रहस्थिति फारच भयंकर दिसत आहे. व ११ मे १९२६ रोजीं जी अमावास्या होणार आहे तीं शनिबरोबर प्रतियोग, नेपच्युन व गुरुबरोबर केन्द्रयोग करील. म्हणजे ही अमवास्या पूर्वीची ग्रहस्थिति उत्तेजित करीत असल्याकारणानें या सालामध्यें एप्रिल नंतर अनर्थ परंपरा ओढवणार असें दिसत आहे. या ग्रहस्थितिमुळें पूर्वरेखांश ३२ व पश्चिम रेखांश १४८ पश्चिम व पूर्व रेखांश १४३ व पूर्व रेखांश ५३ व पश्चिम रेशा ५३ यांवर येणाऱ्या देशांमध्यें भयंकर भूकंप ज्वालामुखींचे स्फोट वगैरे उत्पात घडवील. या अक्षांशावरील कांहीं देशांसंबंधानें पाहतां लिव्हान्ट, आसिया मैनार, पश्चिमेकडील गल्फ ऑफ सिड्रा, अड्रियाटीक समुद्र, पॅसिफीक महासागरामधील बेटें, सायप्रस, इजिप्त, पॅलेस्टाईन, सिरिआ व अमेरिकेमधील प्रदेश यांमध्यें फारच मोठाले उत्पात झाले पाहिजेत. एकंदर लवकरच पृथ्वावर भूकंपाचे मोठाले उत्पात होतील हा गोष्ट खरी आहे परंतु त्यामुळें ध्रुवाकडला प्रदेश वाढल्यामुळें पृथ्वीचें तीर्यकत्व एकदम बदलते किंवा काय तें पाहणें आहे. ही गोष्ट सध्या सांगणें आमच्या शक्तीच्या बाहेरील आहे. सन १९२५ मध्यें पण शनिमंगळांचा केन्द्रयोग ८ जुलई, तारीख ३० जुलईला मंगळ नेपच्युनची युति, शनिमंगळाची युति १४ डिसेंबरला तर नेपच्युन मंगळाचा केन्द्रयोग

२० डिसेंबरला होणार आहे. याप्रमाणें भुकंप प्रचूर थो. सन १९२५ मध्येंही आहेत यासंबंधानें सविस्तर विवेचन आमच्या ९ व्या वर्षाच्या १ ल्या अंकामध्यें येणार आहे.

आणखी एक अंक काढून आम्हा वाचकांचे ८ वे वर्षाचे ऋणामधून मुक्त होणार आहों. पुढील ११ व १२ अंक नव्हेंबरच्या १५ नंतर प्रसिध्द होईल व ९ व्या वर्षाचा पहिला अंक जानेवारीच्या पहिल्या आठवडयामध्यें वर्गणीदारांकडे व्हीपीनें रवाना करण्यांत येईल.

तीन नवीन पुस्तकें.—

जातक मार्गोपदेशिका—जातक खंड पृष्टें १५० तें १७५ किंमत रु. २--८० लेखक, यशवंत केशव प्रधान--संपादक ज्योतिर्माला इतका अनुभवजन्य ज्ञानानें भरलेला व उत्तमोत्तम माहिती देणारा महाराष्ट्र किंवा इतर भाषेमध्यें क्वचितच दुसरा ग्रंथ पाहण्यास मिळेल. नांव सोनुबाई व हाती कथलाचा वाळा याप्रमाणें अनेक चांगली नांवे धारण करणारी परंतु क्षुद्र, दरिद्री व टाकाऊ पुस्तकें मराठीमध्यें फलज्योतिष शास्त्रावर प्रसिध्द झालेला आहेत. ग्रंथ रचना श्रीयुत प्रधान १९१५ पासून करीत होते. त्यापैकी पहिला **जातक खंड** आतां वाचकापुढें ठेवण्यांत येत आहे. हा ग्रंथ सर्वांस घेतां यावा म्हणून किंमत अत्यंत माफक ठेविली आहे. मालेच्या नवव्या वर्षाची वर्गणी रु २--०--० व या ग्रंथाची किंमत रु. १--८--० मिळून रु. ३--८--० असें जे मनिआरडरनें अगाऊ पाठवितील त्यांना हा ग्रंथ आम्ही आमच्या खर्चानें रजिष्टर करून पाठवूं. वर्गणिदारांना हा ग्रंथ पुढें रु.२--०--० मध्यें देण्यांत येईल. इतरांस किंमत रु. २--८--० व्ही. पी. टपाल खर्च निराळा. ग्रंथ नव्हेंबर अखेर तयार होऊन वर्गणिदाराकडे रवाना करण्यांत येईल.

मॅनेजर—ज्योतिर्माला.

॥ श्रीसद्गुरवे नमः ॥

ज्योतिर्माला

आप्राचः कामरूपाद्दुहिणसुतनदप्लावितादाप्रतीचो
गान्धारात् सिंधुसार्द्रद्रुवररचितादाचसेतोरवाचः ।
आकेदारादुदीचस्तुहिनगहनतः सन्तिविद्वत्समाजा
ये ये तानेष यत्नः सुखयतु समजान्कश्चमत्कर्तुमीष्टे ॥ १ ॥

अभिनवाऽऽवृत्ति वर्ष ८ वें अंक ११ ते १२.

फलज्योतिष.

लेख ६ वा

[लेखकः—एम. डी. सगणे एम. ए., एल एल. बी.]

आतांपर्यंत फलज्योतिष्याचा बहिरंगविचार झाला. व त्यामुळें ह्या शास्त्रावरील बऱ्याचशा वरवरच्या आक्षेपांचें निरसन झालें असें आम्हांस वाटतें. कांही राहिलेत त्यांपैकीं बरेच विचाराहे नसल्यामुळें सोडून देतों. बाकीच्यांचा पुढें विचार करूं.

असा विचार होता कीं, हा व पुढील लेख कर्मस्वातंत्र्य किंवा प्रयत्न व प्राक्तन अथवा नशीब इत्यादि गूढ विषयावर द्यावेत, हेच विषय खरें पाहिलें असतां फलज्योतिषाचें अंतरंग होत, व त्यामुळेंच फलज्योतिषावरील मुख्य तात्त्विक व उच्च दर्जाच्या आक्षेपांचें निरसन होईल. पण ह्या विषयांवर लिहिण्याचें सध्या लांबणीवर टाकून आतांपर्यंत झालेल्या बाहेरंग विचारांचा समारोप करून फलज्योतिषाचा बहिरंग उपयुक्तता काय याचें थोडेसें विवरण करण्याचें योजिलें आहे. व हा प्रकार, हा लेख ज्या अंकांत येईल तो ज्योतिर्मालेचा या वर्षाचा शेवटला अंक असल्यामुळें सयुक्तिकच होईल.

फलज्योतिष हें इतर शास्त्रांप्रमाणें शास्त्र आहे, तें सत्य आहे व त्यावर येणारे आक्षेप, आक्षेपकांना त्या शास्त्राचा विशेष परिचय नसल्यामुळें, शास्त्रास अवश्य तेवढें चलन व आश्रय न मिळाल्यामुळें उत्पन्न झालेले आहेत, हें दाखविलें. हें शास्त्र मनुष्यास निष्क्रिय व बेहिमत या अर्थानें दैववादी बनवीत नाही. व ज्या अर्थानें मनुष्य दैववादी बनतो त्या अर्थानें तो दैववादी झाल्यास त्यांत कांहीं वाईट नाहीं. उलट चांगलेंच आहे, याचाहो उहापोह झाला.

आतां ह्या शास्त्राची बहिरंग उपयुक्तता पाहावयाची म्हणजे व्यावहारिक दृष्टीनेंच काय उपलब्ध होतें तें पाहूं. प्रथम कर्ता हर्ता तोच आहे अशा तऱ्हेच्या दैववादानें बुद्धि स्थिर होईल हें उघड आहे. व त्यामुळें संसारांतील अनेक विकट प्रसंगीं व सर्वसाधारणतः साम्यकवृत्तीचा लाभ जर अनायासें ह्या शास्त्राच्या अभ्यासानें होत असेल, तर ती त्या शास्त्राची उपयुक्ततेंतील एक मुख्य व श्लाघ्य गोष्ट झाली यांत शंका नाहीं.

दुसरें इतर कांहींहो होत नसलें व ह्या शास्त्राला आते कानिष्ठ जरी लेखलें तरी कोणाही आक्षेपकाला नाकबूल करवणार नाहीं अशी एक उपयुक्तता ह्या शास्त्रांत आहे. आणि ती म्हणजे मनोरंजन व करमणूक ही होय. कादंबरी, बुद्धिबळ, गायन, काव्य, नाटकादि मानसिक बौद्धिक करमणुकींचीं अनेक साधनें आहेत व त्यांवर बराच पैसा खर्च करण्यांत येतो त्यांत ह्या निरुपद्रवी शास्त्राचीं भर घातल्यास काय हरकत आहे ?

तिसरें फलज्योतिष हें ज्ञान आहे. व ज्ञान कोणत्याहो शास्त्राचें असो तें मिळविणें कांहीं वाईट नाहीं. कितेकुना निरनिराळ्या शास्त्राचें अध्ययन केलें असतां बुद्धि चौकस व प्रगल्भ होते. निरनिराळ्या तऱ्हेनें शिक्षण मिळतें, व तितकी ती सर्वांगसुंदर होते. आणि ईश्वर जर सर्व ज्ञानवान असेल व प्रत्येकाचें ईश्वरीभूत होणें हें परमध्येय असेल तर त्यानें सर्व प्रकारचें ज्ञान अवश्य अवगत केलेंच पाहिजे.

भविष्यज्ञानाविषयीं मानवी इच्छा फार बळकट आहे. कधीं कधीं केवळ जिज्ञासा म्हणून मनुष्य तें जाणण्याची इच्छा करतो. कधीं कधीं विशिष्टप्रसंगीं ' मी मरावयाचा असेन तर मरो, मोठें नुकसान व्हावयाचे असेल तें होवो, पण पुढें काय होणार तें आतांच सांगा ' असें पुष्कळ वेळां ऐकण्यांत येतें. भावी सुखदुःखाच्या विवंचनेपेक्षां पुढचें बरें वाईट भविष्य कळण्यांतच कित्येक वेळां सुख वाटतें, आणि याचा अनुभव प्रत्येकाला आहे. तेव्हां ज्ञानजिज्ञासातृप्ति, भविष्यजिज्ञासातृप्ति, तूर्त मनःशांति फलज्योतिषानें होते. म्हणूनहो त्या शास्त्राची उपयुक्तता होय.

फलज्योतिषानें दर्शविल्या जाणाऱ्या गोष्टी अटळ असल्यास प्रयत्न करूनही त्या बदलतां येणार नाहीत. तेणेंकरून कर्म--स्वातंत्र्याची मातब्बरी तेव्हांच कळून येईल. त्यामुळें वृथाभिमान जाऊन जगन्नियंत्या परमेश्वराकडे लक्ष जास्त बसेल. निदान मानवी शक्तीच्या पलीकडे नियंत्रण करणारी एखादी मोठी सर्वसत्ताक शक्ति आहे एवढें तरी खास अनुभवानें (केवळ तर्कानें किंवा युक्तिवादानेंच नव्हे) मनाला पटेल. आणि तसें पटणें ही कांहीं लहान गोष्ट नव्हे. त्या गोष्टी विवक्षित मर्यादेतच, किंवा उलट प्रयत्नाच्या अभावींच केवळ अटळ असल्यास, कर्मस्वातंत्र्यवाद्यांना फलज्योतिषासारखा दुसरा कोणी मित्रच नाहीं. कारण त्याच्या साह्यानें विपरीत परिस्थितीचा काळ अगोदर कळल्यानें प्रयत्नाची रेखा आंखून इच्छित साध्य करतां येईल.

आपल्या संस्कृतीचा फैलाव करण्याच्या अनेक गोष्टींत शासन व वाङ्मय हीं प्रमुख होत, मागचा इतिहास जाऊं द्या, पण फलज्योतिषाच्या द्वारा आर्यसंस्कृतीचा तिच्या तत्त्वज्ञानाचा पगडा पाश्चिमात्य देशांवर कसा बसला व बसत आहे, हें आधुनिक पाश्चिमात्य ज्योतिषग्रंथ वाचणाऱ्यास तेव्हांच दिसून येईल. फार कशाला पुनर्जन्मासारखी, इतर धर्माला न

पटणारीं, आर्यांच्या संस्कृतीचीं व तत्त्वज्ञानाचीं उच्च तत्वें पाश्चिमात्यांना पटूं लागलीं आहेत.

वरील गोष्टीशिवाय निरनिराळ्या देशांशी दृढतर संघट्टण व विश्वबंधुत्वाचें तत्त्व प्रस्थापित करण्यास फलज्योतिषाचा थोडाबहुत तरी सध्या उपयोग होत आहे. व तो पुढें जास्त होईल यांत शंका नाहीं.

ब्यारिस्टर रामराव
उर्फ
अण्णासाहेब देशमुख एम्. एल्. सी.
लेख १ तौलनिक

[लेखकः—एम्. डी. सगणे एम. ए. एल. एल बी.]



ग्रहांच्या कांती.

रवि २० द. ९६; चंद्र २२ द. ३०; मंगळ ९ द. १४; बुध २९ द. ३९; गुरु ४ द. ४०; शुक्र ८ द. २७; शनि १ द. ५६; हर्शल १३ द. ४८; नेप २० द. २३;

किं कुर्वन्ति ग्रहाः सर्वे यस्य केंद्रो बृहस्पतिः ।
मत्तमातंगयूथानां भिवत्येकोपि केसरी ॥ १ ॥

वरील कुंडलीचा कांहीं अशीं स्वतंत्र विचार तर केलाच जाईल, पण प्रथम तिचा आम्ही मागें प्रसिध्द केलेल्या रावबहादुरांच्या कुंडलीशीं तौलनिक विचार करण्याचें ठरविलें आहे. अर्थात हा विचार करतांना त्यांनीं आपल्या ध्येय साफल्यार्थ जे मार्ग स्वीकारले आहेत ते चांगले किंवा वाईट अथवा त्याचें वैयक्तिक महत्व किती ह्या विचारांशीं मुळींच कर्तव्य नाहीं. बहुजन समाजासमोर आणण्यास कोणते योग कारणीभूत होतात. कांहीं एक काल अथवा सर्व आयुष्यभर एकाच किंवा समान ध्ययाच्या मागें लागलेल्या, मोठमोठालीं अचाट कृत्यें करणाऱ्या पुरुषांच्या जन्म कालीं ग्रहयोग कसे असतात, ते फलद्रुप कसे होतात हें पाहून, त्यांत सर्व-सामान्य अशीं तत्त्वें कोणतीं निघतात हेंच फक्त आपणांस क्रमाक्रमानें पहावयाचें आहे. हा उद्देश तौलनिक विचारपध्दतीनें उत्तम साधतो म्हणून हा विशिष्ट प्रकार योजिला जात आहे.

अण्णासाहेब ब्यारिस्टर आहेत व राजकारणांत पडले आहेत. ते रावबहादुरांप्रमाणें अद्याप दिवाण झाले नाहींत पण महत्पदास पोंचले आहेत. प्रस्तुतकालीं ते जनतेसमोर चमकत आहेत. अर्थात त्यांचे कुंडलीत महत्पददर्शक योग असला पाहिजे व रावबहादुरांप्रमाणेंच तो योग म्हणज दशमस्थ गुरु होय. दशमस्थ गुरु मोठेपणा राजमान इ० देतो हें मागें सांगितलेंच आहे, तथापि एक गोष्ट विषद करावयाची आहे. गुरु हा समुच्चयवाचक ग्रह आहे. दशमस्थान हें कर्मक्षेत्र आहे यामुळें दश-

मस्थ गुरु कर्मक्षेत्राचा समुच्चयाशीं संबंध आणतो अशा मनुष्याचें कर्मक्षेत्र वैयक्तिक नसून त्याचा संबंध बहुजन समाजाशीं व संस्थाशीं येतो. दुसऱ्या शब्दांत म्हणावयाचे म्हणजे असा मनुष्य लोकांपुढें येतो व आपल्या मताप्रमाणें लोकहित अमुक मार्गात अगर ध्येयांत आहे हें ठरवून लोकहिताकरितां श्रम करितो. दशमस्थ गुरु मोठेपणा, राजमान समुच्चय संबंध देतो हा गोष्ट जरी खरी असली तरी त्या मोठेपणाची मातब्बरी ठेवण्यास बुध्दियोगाची, चिकाटीची व सतत परिश्रमाची जोड लागते हें मागें सांगितलेंच आहे. ती जोड रावबहादुरांच्या कुंडलीप्रमाणें हींतही आहे. गुरुबंध त्रिकोण व बुधशुक्र लाभ हे बुध्दियोग व शनिनेपच्यून त्रिकोण हा आध्यात्मिक पण व्यवहारांत चिकाटी स्वरूपानें प्रगट होणारा योग ह्याहि कुंडलींत आहेत. ह्या योगांमुळें दशमस्थ गुरूनें एरव्ही येणारा नामधारी मोठेपणाच दिसत नसून प्राप्त झालेल्या मोठेपणानें लोकांवर छाप बसविण्याची, योग्यतेनुरूप महत्वाचीं कृत्यें करण्याची, मोठेपणाचें खरें खरें सार्थक्य करण्याची शक्तिही व्यक्त होत आहे. अर्थात ही शक्ति चलित ग्रहयोग जसजसे फलद्रुप होत जातील तसतशी प्रगट व प्रखर होत जाईल यांत शंका नाहीं.

रावबहादुरांचे कुंडलींत राजकारणांत पाडणारे योग म्हणजे दशमस्थ गुरु असून, एकादशस्थ ग्रह हे होत. आंग्ल ज्योतिर्विद. राहूला शुभग्रह मानतात. तो या कुंडलींत एकादशांत असल्यामुळें अण्णासाहेबांस राजकारणांत पाडण्यास कारणीभूत झालाच असेल. तेंच पंचमेश शुक्राच्या पंचमांतील वास्तव्याविषयीं म्हणतां येईल. आमच्या मतें ह्या कुंडलींतील राजकारणाचे विशिष्ट यो. म्हणजे मूळ नक्षत्रांतील रवि, व लग्नेश (चंद्र) दशमेश (गुरु) यांचा शुभकारक लाभयोग हे होत. मूळ नक्षत्र हें राजकीय उलाढाली करणारें आहे. (रावबहादुरांचे कुंडलींत त्यांचा शनि

मूळ नक्षत्रांत नुकताच प्रवेश करीत होता.) लग्नेश दशमाचे योग राजकारणी पुरुषांच्या, पार्लमेंट अगर कायदेकौन्सिल अशा संस्थांच्या सभासदांच्या कुंडल्यांत सांपडतात. तसेंच केंद्रांतून झालेला शनि व दशमेश गुरु यांचा समसप्तम हा योग या बाबतींत महत्वाचा आहे. ह्या योगाविषयीं ज्यो. सूर्यनारायणराव म्हणतात "if Shani is in trines, quadrants or Mooltrikona is exalted or aspected by the lord of 10 the person becomes a statesman" शेवटच्या or ऐवजी and असावें असें आम्हास वाटतें. ह्यावरून जन्मकाली राजकारणाचे योग कितो बलवान होते व अण्णासाहेब कौन्सिलांत कां गेले हें स्पष्ट दिसेल.

रावबहादुरांच्या कुंडलींत प्रधानकीचा योग म्हणजे दशमस्थ गुरूशीं झालेला दशमेश व पंचमेश मंगळाचा त्रिकोण---अधिकार प्राप्तीस दशमस्थानाशीं रवीचा किंवा मंगळाचा जवळ जवळ आवश्यक दिसतो. प्रस्तुत कुंडलींत अधिकाराचे योग * मनोहर झालेले आहेत. गुरु दशमांतच तोच स्वतः दशमेश, अशा गुरूशीं चंद्राचें किरण--परिवर्तन करून (कारण तो रविगुरूच्या अगदीं मध्येमध्य आहे) रवीशीं अत्यंत शुभ असा त्रिकोणयोग घडवून आणला आहे. गुरुमंगळांच्या मेष राशींत व मंगळ गुरूच्या मीन राशींत असल्यामुळें त्यांच्या राशींचा अन्योन्य संबंध reception झाला आहे. अर्थात यांनाहि प्रधानकी अनुकूल चलित ग्रहयोग झाले असतां. मिळेल असें ज्योतिषदृष्ट्या शक्य आहे. तसें जेव्हां होईल तेव्हां दशमेश गुरु विद्यावाचक असल्यामुळें व त्याचा ऋणालयदर्शक व्यय व षष्ठ स्थानांतील नेप्च्यून बुधाशीं संबंध असल्यामुळें रावबहादुराप्रमाणेंच

* जन्मकालांत ८-९ मिनिटांचा फरक असल्यास बुध सप्तमांत येतो व मग सूर्यनारायणरावाच्या मताप्रमाणें अर्धचंद्र योग होतो. ह्या योगाचें फल "Popular, handsome, respected in, great minister or secretary to, the Goverarment" असें आहे. तेव्हां शक्यं असल्यास वाचकांनीं आधान काढून कळवावा; आमच्याजवळ सामुग्री नाहीं.

काम त्यांना मिळेल. तूर्त हें शोधून ठेवलें पाहिजे कीं ज्याचा दशमेष गुरु असतो त्याचा शिक्षणविषयक संस्थांशीं कोणत्या तरी प्रकारें निगडित संबंध येतो. अण्णासाहेबांचा नागपूर युनिव्हर्सिटीशीं आतांपर्यंत बराच संबंध आला असून ते सध्यां युनिव्हर्सिटी कोर्टाचे सभासद आहेत.

रावबहादुरांना विपन्नावस्थेंतून व ' भिक्षांदेहि ' करून वर यावें लागलें. अण्णासाहेब संपन्न श्रीमंतस्थितींत उत्पन्न झाले असून पैशाची विवंचना कधींच पडली नाहीं. यांचीं कारणें स्पष्टच आहेत. रावबहादुरांचा लग्नेश चंद्र व धनेश रवि हे शनि व धनस्थ मंगळानें त्रस्त झाले होते, पण अण्णासाहेबांचे कुंडलींत धनेश व लग्नेश चंद्र शनीशीं व सुरगुरूशीं शुभसंबंधित आहे.

आम्हीं मागें सांगितलें होतें कीं कर्तृत्वशन पुरुषांच्या कुंडल्यांत कांहीं महत्वाचे कुयोग असतातच. रवि मंगळ केंद्र हा दोन्ही कुंडल्यांत सांपडतो. शिवाय अण्णासाहेबांचे कुंडलींत स्वतंत्र असे दोन कुयोग सांपडतात ते रविनेप्च्यून व शनिगुरु यांचे प्रतियोग होत. ह्या योगांचे परिणाम म्हणजे शिकवणीच्या रूपानें येणारे अडथळे आणि विरोध हे होत. नेप्च्यून व्ययांतून तर शनि चतुर्थांतून प्रतियोग करीत आहे म्हणून हे योग अयुष्याच्या शेवटच्या भागांवर विशेषतः परिणाम करतील. चतुर्थस्थ शनि आयुष्याचा शेवट कंटाळवाणा व त्रासदायक दर्शवितो. व्ययस्थ नेपच्यून एकांतवास (मग तो शरीरप्रकृतीमुळें हास्पिटलांत असो किंवा कसाही असो) व कांहीं प्रसंगीं लोकमतविरुद्ध कामें दर्शवितो. हीं फळें अर्थात मिळतीलच पण ह्या प्रतियोगांत एक वैचित्र्य आहे. चतुर्थस्थ शनीवरील गुरूचा प्रतियोग साधुवृत्ति देतो. रविनेपच्यून प्रतियोग त्यागशील बनवितो. आणि हे दोन्ही योग कधीं कधीं ' मी संसार करूं कीं परमार्थ साधूं ' अशा विलक्षण घोंटाळ्यांत पाडतो. पण शेवटीं मायापटलाचें निरसन होऊन आध्यात्मिक जागृति विशेष होते हें खास आणि

जरी ह्या योगांतील सर्व ग्रहांचे लग्नेश धनेश चंद्राशीं मनोवेधक शुभयोग झाले आहेत व त्यामुळें संन्यासी किंवा वैरागी होण्याचें प्रयोजन राहणार नाहीं. तरी आयुष्यार्धानंतर वृत्ति संतस्वभावी व त्यागशील बनून कर्म घडायचें तें निष्काम कर्म घडेल असें दिसतें. नेपच्यून--चंद्र--शनि त्रिकोण पूर्व किंवा भावी योग्याचें लक्षण आहे असें म्हणतात.

तौलनिक विचारांत हर्शल मंगळ त्रिकोण नमुद करण्यासारखा आहे ह्या योगाचें तसेंच रविनेपच्यून प्रतियोग व नेपच्यून चंद्र त्रिकोण ह्यांचीं फलें विस्तारभयास्तव आम्हा आपल्या शब्दांत न देतां इतर मान्य ज्योतिर्विदांच्या शब्दांत देतों. *

ने. र. प्रतियोग " There is often a spiritual influence about this position, the renunciation which such native is called upon to undergo on the isolation to which he is condemned seeming to be for the purpose of refining the inner nature.....such characters often possess a peculiar individual charm that is quite undescribable." Alan Leo.

चं.ने.त्रिकोण ' कल्पना, स्फूर्ती, आत्मविश्वास दयाळू अंतःकरण.... अंगच्या सद्गुणांनीं जनतेचीं मनें आकर्षण करून घेण्याची शक्ति...' ज्यो. नवाथे.

मं. ह. त्रिकोण 'स्वतंत्रबुध्दीनें वागणारा, मोठाल्या जबाबदारीचीं काम अंगावर घेणारा, त्रास झाला तरी आपलें म्हणणें दृढ धरून बसणारा, पुढारीपणाचें महत्व पाळणारा----परिस्थितीप्रमाणें आश्चर्यजनक शक्तिप्रधान कार्यें....ज्यो. प्रधान.

असो पुढील लेखांत ह्या लेखाचा समारोप करून आयुष्यांत घडलेल्या गोष्टींचे विवरण करूं.

* फलज्योतिषाची ज्यांना आवड असेल त्यांनीं हा लेख वाचतांना अमेरिकेचे प्रे. विल्सन, हार्डिंज, दासबाबू व गांधीजी यांच्या कुंडल्या अवश्य पहाव्या.

ब्यारिस्टर रामराव

लेखांक २ रा.

(लेखकः—एम. डी. सगणे एम. ए. एलएल बी.)

मागच्या लेखांत आम्ही अनेक योगांचे वर्णन केले आहे आतां आजपर्यंत आयुष्यांत घडलेल्या ठळक गोष्टींचें योगासह दिग्दर्शन करूंया.

नवमांत म्हणजे धर्मस्थानांत मंगळ आहे. पंचमात म्हणजे उपासनास्थानांत हर्शल (व तसाच शुक्रहि) आहे. इतकेंच नव्हें तर या दोन ग्रहांचा त्रिकोणहि झाला आहे. यामुळें कोणत्या तरी देवतेची उपासना व धार्मिक उत्साह स्पष्ट होत आहेत. ह्याचा परिणाम असा झाला कीं अण्णासाहेब लहानपणीं विलायतेस जाईपर्यंत अत्यंत धार्मिक वृत्तीचे होते. ते देवपूजादि कृत्य दररोज नियमानें एकदोन तास करीत असत. मंगळहर्शलच्या स्वभावास अनुसरून एकदा असा प्रकार झाला कीं ते बुलढाण्यास असतांना सन १९०३ सालीं बालपणाच्या समजुतीप्रमाणें तपश्चर्येस वनांत जाण्याचा त्यांनीं निश्चय केला व तो लवकरच अमलांतहि आणला. पण विधीसूत्र कांहीं निराळेंच असल्यामुळें जंगलांतून तें भटकत असतांना त्याच्या ओळखीच्या एका गृहस्थाच्या दृष्टीस पडले व त्यांनीं त्यांना घरीं आणले त्या वेळेस ' चलित गुरु समक्रांति मंगळ ' (२) ' च. चंद्र त्रिकोण हर्शल ' (३) ' च. बुध लाभ गुरु ' हे योग चालू होते. हे सर्व योग जवळ जवळ एकसारखेच आहत पैकीं पहिल्या योगानें धार्मिक भावना अत्यंत उदित होतात. हाच योग तपश्चर्येस जाण्याच्या विचारास कारणीभूत झालेला दिसतो.

मंगळ जसा उतावळा तसाच हर्शल शिक्षित रुपभंजक (breaker of forms) व क्रांतिकारक आहे. तो बुध्दिस्थानांत असल्यामुळें वर सांगितलेल्या उपासनेंत व धार्मिक कल्पनांत स्थित्यंतर (नास्तिकपणा

नव्हे कारण मंगळ हर्शल शुभसंबंधीत आहेत.) होणें अपरिहार्य होते व तें तसें झालेंहि कारण आतां पूजाअर्चादि विधि सुटले असून बुध्दितत्वांतच कायते आस्तिकत्व व धर्मनिष्ठा बीजरुपानें वास करीत आहेत. ह्यावरून असे दिसतें कीं पंचमस्थ (किंवा नवमस्थ हर्शल) सगुणापासून निर्गुणाकडे बळबोत असावा. हा अनुभव इतरत्र पाहण्यासारखा आहे.

मागें सांगितलेल्या मं. गु. च्या समक्रांतिच्या काळांत पुढील योग अमलांत आले असतां त्यांचें रामेश्वर, पंढरपूर, कुंभकोणादि अनेक तीर्थ क्षेत्रांस जाणें झालें 'चं. र. त्रिकोण गुरु.''च. चंद्र लाभ नेपच्यून' 'श. त्रिकोण गुरू;' ' चं. मंगळ युति इसिस ' ' च. बुध लाभ शुक्र' हा काळ म्हणजे सन १९०५ चा होय.

सन १९१०-११ मध्यें'च. चंद्र युति गुरु; ''च. शनि त्रिकोण च. हर्शल;' असें योग होत असतां त्यांचे बडोद्यास जाणें होऊन राजेरजवाड्यांशी मुलाखती झाल्या.

नवमस्थान परदेशगमनाचें व जलपर्यटणासारख्या लांबच्या प्रवासाचें द्योतकस्थान आहे. त्यांत मंगळ हा चर स्वभावी ग्रह आणि तोहि मीन ह्या जलराशींत आहे. लग्नेश चंद्र सागरेश्वर नेपच्यूनशी सख्य ठेवीन आहे. नवमेश चरांत आहे ह्यामुळें ह्यांना लांबलांबचे प्रवास परदेशगमन व विशेषतः जलप्रवास व्हावयाचेंच होते व तसें झालेंहि. सन १९११ एप्रिलमध्यें जलप्रवास दर्शक ' च. दशम लाभ च. नेपच्यून ' योग होत असतांना त्यांचे विलायतेस शिक्षणाकरितां प्रयाण झालें. अजूनहि लांबलांबचें प्रवास चालूंच आहेत. त्यांचे कारण म्हणजे जन्मकालिन योगाला सहायक असें त्यांच्या नवमस्थानांतील हर्शलचें भ्रमण होय.

ते विलायतेस ब्यारिस्टरीकरितां गेलें ब्यारिस्टरीचे योग त्यांचे जन्मकाली स्पष्ट दिसत होते. तुलेचा शानै जसा. संपत्ति देतो तसा कायद्याचेंहि ज्ञान देतो दशमस्थ गुरु, धनेतला रवे, पंचमेश शुक्र पंचमांत हेंहि आपल्यापरी कायद्यांत प्राविण्य दर्शवीत होते. पण त्यांना ब्यारिस्टर करणारा सर्वांत प्रमुख योग म्हटला म्हणजे उपजीविकेश गुरूचा कायदे पटु धनुस्थ बुधाशी झालेला नवपंचमयोग होय. विलायतेस अभ्यासक्रम चालला असतांना लवकरच विद्येंत यश देणारे व धनोत्पादक योग १९१५--१६ चे दरम्यान आले तें असे.

'च. रवि युति बुध लाभ शुक्र;' 'च. चंद्र युति बुध लाभ शुक्र;' 'च. दशम युति गुरु;' ह्या योगावर ते ब्यॅरिस्टर झाले व स्वदेशास परत येऊन धंदा करूं लागले.

अर्थात जगाच्या दृष्टीनें आतां हें मोठें माणूस झाले व जसजसे शुभग्रह योग येऊं लागले तसतसे यश व कीर्तीची एकएक पायरी वर चढूं लागले. तें येणेंप्रमाणें---

१९१७ नोव्हेंबर
च. दशम युति गुरु; च. गुरु युति च. दशम
च.शुक्र अर्ध लाभ गुरु; च.चंद्र लाभच.मंगळ व शुक्र
} बेळगांव येथील मराठी परिषदेचे अध्यक्ष झाले.

१९२० नोव्हेंबर
च. चंद्र लाभ दशम; च. बुध समक्रांति चंद्र
च. चंद्र समक्रांति नेप. शुक्र. व बुध
} दोन्ही वेळां कौन्सिलांत आले. ऑल इंडिया कांग्रेस कमेटीचे मेंबर झाले.

१९२२ नोव्हेंबर
च. शु. युति रवि; च. चंद्र त्रिकोण शुक्र च.
च. चंद्र समक्रांति शनि च.

ह्यांचे कुंडलींतील उपजीविकेश ग्रह गुरु हा शनीकडून पीडित आहे म्हणून त्यांच्या ब्यॅरिस्टरींत मधून मधून व्यत्यय येणें साहजिक आहे आणि तसला व्यत्यय गोचरीनें शनि गुरूशीं मूळचा प्रतियोग करित असतांना आलाहिपण होता.

नवमेश व शेतीशी संबंध दर्शविणारा शनि स्थावरवाचक चतुर्थांत असून त्याचा धनेशाशीं शुभसंबंध झाला आहे. त्यामुळें यांना भूमीलाभ व शेतवाडीचें सौख्य व्यक्त होत आहे. ह्याप्रमाणें आहेहे. ह्या योगामुळें व हर्शलशुक्राचें पंचमातील व चंद्राचें अष्टमांतील वास्तव्यामुळें भूमीगत किंवा लाटरी वगैरेंत, मृत्युपत्रापत्राधारें किंवा अशाच कांहीं तरी प्रकारें अचानक द्रव्यलाभ होण्याचा संभव दिसतो. मीन राशींत मंगळ आहे. चंद्र हर्शलनें पीडित आहे. सप्तमेशाचा प्रतियोग झाला आहे हें सर्व योग लग्न उशिरा हर्शलांत होते. गुरूशुक्राचा प्रतियोग फार दूरचा असल्यामुळें तो लवकर लग्न घडवून आणण्यास समर्थ नव्हता म्हणून लग्न त्यांच्या वयाच्या ३०व्या वर्षीं झाले. सप्तमेश बलवान असून तो लग्नेशाशीं शुभ संबंधित आहे. म्हणून पत्नि उच्च कुलांतली मिळाली. पतिपत्नि प्रेम बरें राहील. विवाहकाली लग्नबाचक 'च. शुक्र युति रवि' हा योग चालू होता. लग्न मे १९२२ मध्यें झालें पंचमांत शुक्र व केतू आहेत' हे दोन्ही प्रथम कन्या संतति दर्शवितात. त्याप्रमाणें शनि गुरू पंचमात गोचरीनें येतांच त्यांना जुलै १९२३ मध्यें कन्यारत्न झालें.

पुणें न्यू इंग्लीश स्कूल अर्थात डेक्कन एज्युकेशनल सोसायटी व फर्ग्युसन कॉलेज या संबंधानें भविष्य

ज्योतिर्माला वर्ष ८ वे अंक ७ व ८ यामध्यें आद्य ज्योतिर्माला कर्ते कै. रा. रा. जीवनराव चिटणीस यांचे जुन्या ज्योतिर्मालेमध्यें प्रसिध्द झालेलें लॉर्ड सॅन्डहर्स्ट यांचे कारकीर्दीचे भविष्य प्रसिध्द केल्यानंतर पुण्याच्या

आमच्या एका हितचिंतकानें त्याच अंकांत प्रसिध्द झालेलें पुणें न्यू इंग्लीश स्कूल संबंधाचे भविष्य प्रसिध्द करण्यास विनंती केल्यामुळें आम्हीं तें भविष्य कै. चिटणीसाचे अस्सल कागदावरून पाहून आमच्या विचारासह पुन्हा चालू अंकांमध्यें प्रसिध्द करीत आहों. सध्यां ज्या कांहीं फर्ग्युसन कॉलेजसंबंधी घडामोडी होत आहेत याची अटकळ कै. चिटणीसांस त्या वेळीं झाली होती. याच संबंधानें विस्तृत परंतु प्रसिध्द न केलेलें भविष्य त्यांनीं प्रस्तुत लेखकाला सांगितलें होतें. परंतु त्यांचे कागद पत्रा मध्यें त्याची कापी पाहण्यास मिळाली नाहीं. —संपादक—



ग्राहाच्या क्रांति.

रवि २२ द ५८; चंद्र ६ उ २६; मंगळ १७ उ ५८; बुध २१ द २९ गुरु ९ द ५; शुक्र २६ द ४४; शनि १ द २६ हर्शल ८ द २९ नेपच्युन १२ उ ५४;

(कुंडलींचें वर्णन प्राच्य आणि पाश्चिमात्य ज्योतिषाचे आधारें दिलें आहे.)

पुणें न्यू इंग्लिश स्कूल (शाळा) ही संस्था पूर्वकेंद्रीं मीन लग्नाचे ८ * अंश उदित असतांना स्थापन झाली मीन हें लग्न द्विस्वभाव राशीचें आहे, त्यामुळें ह्या शाळेच्या शिक्षणक्रमांत आणि मूळ उद्देशांत पुष्कळ घडामोडी होऊन त्यांतूनच 'फर्ग्युसन कॉलेज' आणि 'डेक्कन एज्युकेशनल सोसायटी' ह्या संस्था उद्भवल्या. लग्नाधिपति आणि दशमाधिपति गुरु लग्नीं बलिष्ठ असल्यामुळें ही संस्था बरेच दिवस टिकेल, तथापि गुरूवर हर्शल (प्रजापति) ह्या पापग्रहाची पूर्ण दृष्टि असल्यामुळें संस्थेस ४२ वर्षें पूर्ण होतांच, म्हणजे हर्शल ग्रहाची अर्धवर्तुल प्रदक्षिणा होतांच उतरती कळा लागेल. शनि हा पापग्रह नीच असून धन (२) भावारंभीं आहे, त्याचप्रमाणें नेपच्यून (वरुण) हा अशुभ ग्रह धनभावांत आहे. ह्यामुळें ह्या संस्थेची सांपत्तिक स्थिति समाधानकारक असणार नाहीं. पंचम स्थानांत (सुत स्थानांत) अथवा बुध्दि स्थानांत केतु हा पापग्रह असल्यामुळें संस्थेच्या विद्यार्थ्यांत कांहीं अशीं पापबुध्दि राहील.

संस्थेच्या सप्तम स्थानांत हर्शल हा पापग्रह आहे आणि त्याचा म्हणजे संस्थेच्या ६ व्या, १८ व्या, आणि ३० व्या वर्षी ह्या संस्थेच्या

---

* दिलेल्या टाईमवरून पुन्हा कुंडली मांडून पाहतां मीन लग्नाचा ११ वा अंश पूर्व केंद्रि उदय पावत आहे. व याच लग्नाचा येणारा ११ वा अंश लग्नीं घेऊन व येणारी कुंडली येथें दिली आहे. —संपादक.—

गुरूवर पूर्ण दृष्टि आहे म्हणून गुरु कन्येंत जेव्हां जेव्हां येईल तेव्हां तेव्हां भागिदारांत कलह होतील, आणि ४२ वे वर्षी तिन्ही संस्थेंत मोठी क्रांति होईल. संस्थेच्या सप्तम स्थानचा अधिपति बुध स्वगृह-सन्मुख-क्षेत्रांत म्हणजे स्वराशीपासून सहा राशीच्या अंतरावर आहे, हा ग्रह मुद्रण कलेचा कारक आहे. हा सप्तम स्थानचा अधिपति दशमस्थानांत सबल आहे म्हणून संस्थेच्या भागिदारांतील तंटयाचीं कारणें वर्तमान पत्रांतूनही प्रसिध्द झालीं आहेत. संस्थेच्या नवम स्थानावर शिक्षक वर्गाचा विचार होतो. ह्या स्थानाचा अधिपति मंगळ, वृषभ राशींत म्हणजे शुक्राच्या घरीं आहे, आणि शुक्र हा मंगळाचें घरीं आहे म्हणजे दोन्ही ग्रह परस्पर क्षेत्रांत आहेत. शुक्र हा ग्रह भाषा व काव्यशास्त्राचा कारक होय. कै० प्रो० आपटे, आगरकर आणि केळकर हे सुप्रसिध्द भाषाभिज्ञ होऊन गेले. मंगळ हा ग्रह गणित रसायनादि शास्त्रांचा व यांत्रिकादि कलांचा कारक व धैर्यदर्शक आहे. मंगळ आणि शुक्र हे अन्योन्य क्षेत्रांत असल्यामुळें शिक्षक वर्गांत मंगळाच्या सारखे गणितादि शास्त्रांचें ज्ञान व मानसिक धैर्य आणि शुक्राचे सारखें भाषाशास्त्रांत नैपुण्य हीं सदोदित असतील.

दशम स्थानावर संस्थेच्या जनकाचा म्हणजे कैलासवासी शास्त्रीबुवांचा विचार होतो. ह्या स्थानचा अधिपति गुरु होय. भाषाशास्त्रांत शास्त्रीबुवांचें लोकोत्तर प्राविण्य, त्यांचें भव्य कपाल, गंभीर मुद्रा, शांत वृत्ति आणि तुंदील तनु हीं तनुस्थानस्थित सुरगुरूची चांगली साक्ष देतात. चतुर्थ स्थानावर उपसंस्थापकाचा विचार होतो. हें स्थान प्रो० टिळक यांचें दर्शक होय. ह्या स्थानचा अधिपति बुध अस्तंगत नसून दशमांत आहे आणि शुभ ग्रहाच्या राशींत आहे म्हणून तो बलिष्ठ आहे.

*मंगळ धनभावांत आणि बुध केंद्रांत आहे म्हणून प्रो० टिळक हे गणित विषयांत प्रविण आहेत असें आढळतें. पाश्चिमात्य ज्योतिषशास्त्रांत एकादश भुवन हे मित्रभुवन मानलें आहे. ह्या स्थानचा (११) अधिपति शनि हा पापग्रह मेषराशींत म्हणजे आपले नीच राशींत असून त्यावर रवीची वर्तुलपाद (९०) दृष्टि आहे. ह्यामुळें ह्या संस्थेस तिच्या मित्रांकडून मदत अल्प होईल. आर्यपध्दतीप्रमाणें चतुर्थ स्थानावर मित्रांचा विचार होतो, ह्या स्थानचा अधिपति बुध विद्वान् लोकांचा दर्शक महाराष्ट्राचें तनुस्थानांत आहे. म्हणून संस्थेस मदत दक्षिण महाराष्ट्रांतून अथवा संपूर्ण महाराष्ट्रांतील विद्वानांकडूनच होणारी आहे. रिपुस्थानचा (६) स्वामी व ग्रहमालेचा चालक भगवान् सहस्ररश्मि मकर राशींत असून त्यावर व्यय स्थानचा (१२) स्वामी जो शनि त्याची अशुभ वर्तुलपाद दृष्टि आहे. म्हणून हल्लीचे राजकर्त्यांकडून ह्या संस्थेस मदत तात्पुरतीच मिळेल इतकेंच नाहीं, तर ही संस्था त्यांच्या डोळ्यांतही कदाचित सलेल. शनि मूळ कुंडलींत नीच आहे. तो १५ वर्षांनीं आपले उच्चांत म्हणजे तूल राशींत जातो, तेव्हां म्हणजे सन १८९३ पासून ९५ पर्यंत संस्थेचे भांडवलांत बरीच तूट आली असेल. येणेंप्रमाणें द्वादश भावांचें त्रोटक वर्णन दिलें.

आतां वरून आलेल्या मुख्य मुख्य गोष्टी क्रमशः कशा घडून आल्या हें गणितानें पाहणें जरूरीचें आहे, म्हणून ग्रहांचे स्थूल परिभ्रमणकाल देतोः--रवि ह्या ग्रहास द्वादश राशींत पूर्ण प्रदक्षिणा करण्यास १२ वर्षें लागतात म्हणजे रवीचा परिभ्रमणकाल १२ वर्षांचा होय. ह्याप्रमाणें

*गणितज्ञो भवेज्जातो वाग्भावे भूमिनंदने ।
ससोमे बुधसंदृष्टे केंद्रे वा सोमनंदने ॥ ३६ ॥ स. चिं. अ. ३.

मंगळाचा १९ वर्षे, गुरूचा १२ वर्षे, बुधाचा १० वर्षे, शुक्राचा ८ वर्षे, चंद्राचा ४ वर्षे, राहु आणि केतूचा १८ वर्षे, शनीचा ३० वर्षे, आणि हर्शल अथवा प्रजापतीचा ८४ वर्षे होय. पुणें न्यू इंग्लिश स्कूलच्या प्रथम वर्षाचा आरंभ तनु स्थानांत होतो. द्वितीय वर्षाचा आरंभ धनभावांत होतो. तृतीय वर्षाचा आरंभ तृतीय स्थानांत होतो. येणेंप्रमाणें द्वादश स्थानें द्वादश वर्षारंभदर्शक होत. तेराव्या वर्षाचा आरंभ, व तसाच पंचविसाव्या वर्षाचा आरंभ पुनः तनुस्थानांत होऊन क्रमानें वर्षारंभ पुन्हा पुन्हां त्याच भावांत येत जातात. सन १८८३ सालीं म्हणजे संस्थेच्या चवथ्या वर्षी शास्त्रीबुवा कैलासवासी झाले. गुरु हा ग्रह दशमस्थानचा मालक म्हणजे संस्थेचा जनक असल्यामुळें शास्त्रीबुवांचा द्योतक आहे. हा ग्रह जन्मकाळींच हर्शलाकडून पीडित आहे. तो चौथ्या वर्षी परिभ्रमण करून मिथुन राशींत म्हणजे स्वगृहसन्मुखराशींत आल्यामुळें दुर्बळ झाला. हें स्थान जन्मकुंडलींत चतुर्थस्थान आहे. पाश्चिमात्य फलज्योतिषाप्रमाणें चतुर्थस्थानांत सर्व गोष्टींचा अंत होतो, हें येथें लक्षांत ठेवण्याजोगें आहे. चवथ्या वर्षाचा आरंभ चतुर्थ भुवनांत होतो, हें भुवन वार्षिक तनुस्थान होय. ह्या वार्षिक तनुस्थानापासून दशमस्थान मोजले म्हणजे मूळचें तनुस्थान वार्षिक दशमस्थान होतें, येथें जन्मकालचा दशमाधिपति आणि वार्षिक दशमाधिपति गुरु आहे. वार्षिक दशमाधिपतीवर हर्शल ग्रहाची त्रिराश्यंतर (९०) दृष्टि पडत असल्यामुळें तोहो बिघडतो, म्हणूनच त्या वर्षी शास्त्रीबुवा कैलासवासी झाले. हेंच वर्ष कोल्हापूर प्रकरणाचें होय. महाराष्ट्राचा अधिपति सुरगुरु मिथून राशींत आल्यामुळें कोल्हापुरचे राजास म्हणजे दक्षिण महाराष्ट्राचे अधिपतीस त्रास सोसावा लागला. धनुलग्न हें कोल्हापूर दर्शवितें, ह्याचे षष्ठ स्थानांत म्हणजे भृत्यस्थानांत वृषभराशि आहे. हिचा

अधिपति शुक्र हा ह्या संस्थेच्या शिक्षकस्थानीं (९) आहे. म्हणून ह्या संस्थेच्या शिक्षकांस कोल्हापुरचें महाराजास मदत व्हावी एतदर्थ कडक लेख लिहिणें भाग पडलें. महाराष्ट्राचे दशमांत कन्या लग्न आहे, हें पुण्याचें तनुस्थान होय. ह्याचा अधिपति बुध महाराष्ट्राचे तनुस्थानांत आहे, ह्यामुळें पुण्यांतील ह्या संस्थेच्या शिक्षकांनीं, मुद्रणकलेच्या साह्यानें सर्व महाराष्ट्रीयांस ह्या प्रसंगीं एकजीव करून टाकलें होतें. नवमस्थानचा अधिपति मंगळ परिभ्रमणकालमापानें सन १८८३ सालीं कर्क राशींत म्हणजे आपले नींच राशींत आल्यामुळें शिक्षकांपैकीं प्रो० टिळक आणि आगरकर यांस कारागृहवास भोगावा लागला. सन १८८४--८५ मध्ये महाराष्ट्राचा अधिपति गुरु उच्च होतांच **डेक्कन एज्ु केशनल सोसायटी** स्थापन करण्याचा बेत ठरून ती संस्था लवकरच स्थापली गेली, आणि तिचें अध्यक्षस्थान कोल्हापुरचे महाराजांकडे आलें. गुरूचीं स्वगृहें धन आणि मीन ह्या राशि असल्यामुळें छत्रपति महाराज आणि श्री० पटवर्धन हे अनुक्रमें **डेक्कन एज्युकेशनल सोसायटीचे** अध्यक्ष आणि उपाध्यक्ष झाले. सन १८९५ सालीं कर्क राशींत गुरु असतांना पुणें न्यू इंग्लिश संस्थेचे उपजनक प्रो० टिळक आणि श्री. बाळासाहेब पटवर्धन कुरुंदवाडकर हे गृहस्थ महाराष्ट्र देशाचे कल्याणार्थ कायदेकौन्सिलांत बहुमानानें निवडून गेले. डेक्कन एज्युकेशनल सोसायटीचें अध्यक्षास. म्हणजे छत्रपति महाराज कोल्हापुरकरांस ह्या वर्षी बहुमान मिळेल. हा सर्व प्रताप देवगुरूचा होय.

सन १८९२ सालीं आगष्ट महिन्यांत प्रो० आपटे कैलासवासी झाले. हें संस्थेचे १३ वें वर्ष होय. ह्या वेळीं शिक्षकवर्गाचा अधिपति आणि अग्नितत्त्वाचा मालक मंगळ परिभ्रमणकालमापानें मकर राशींत प्रबल

झाल्यामुळें प्रो० वामनराव ह्यांस तापानें देवाज्ञा झाली. ह्या वर्षांही जन्म-कुंडलींतील नवमस्थान व वार्षिक नवमस्थान एकच होतें, म्हणजे दोन्ही लग्नारंभ मीनेंतच झाले आहेत. काव्यशास्त्राचा कारक शुक्र हा परिभ्रमण-कालमापानें चतुर्थ स्थानांत येतो, म्हणजे ज्याप्रमाणें भाषाशास्त्राचा (शास्त्रीबुवांचा) कारक ग्रह गुरु मृत्युकाळीं चतुर्थ स्थानांत येतांच त्यांचा अंत झाला, त्याचप्रमाणें शुक्र ग्रह चतुर्थ स्थानांत येतांच आपटे यांचा अंत झाला. शिक्षक स्थानांत (९) हर्शल सन १८९३ पासून येतांच त्यांनीं प्रो० धारप, केळकर आणि आगरकर ह्यांच्यावर धाड आणली. हें शुभबाळ सन १८९७ अखेर पर्यंत आपले प्रताप दाखविण्यास फार बलवान् झालें आहे. म्हणून ह्या संस्थेचे शिक्षकांनीं फारच सावधपणानें वागलें पाहिजे.

सन १९०१ मध्यें म्हणजे जेव्हां गुरु मकर राशींत प्रवेश करील तेव्हां मंगळ परिभ्रमणकालमापानें कर्क राशींत येईल आणि हर्शल धन राशींत दशम स्थानांत मध्यवर्ती येईल तेव्हां ह्या अनिष्ट ग्रहास्थतांचा परिणाम, पुणें न्यू इंग्लिश स्कूलच्या शिक्षकांस, फर्ग्युसन कॉलेज्यांतील प्रोफेसरांस, डे० एज्युकेशनल सोसायटीतील लाईफ मेम्बरांस अनिष्ट होणारा असून त्यापासून संपूर्ण महाराष्ट्रीयांस हळहळ लागणार आहे. ही दुःखद स्थिति कोणती आहे ही जाणण्याची इच्छा वरील संस्थापैकीं कोणास होईल तर त्यानें यूरोपीय फलग्रंथांचें थोडे महिने अध्ययन करून ज्या मार्गानें **न्यूटन केप्लर** इत्यादि फलज्योतिषी गेले त्या मार्गानें शोध केल्यास फलज्योतिषाचें सत्यत्व आणि त्याची सामाजिक उपयुक्तता त्यांस कळून येईल. आपणावर पुढें संकटें केव्हां येतील त्यांचा सुमाराचा काळ कळल्यास तीं वेळेस अंशतः तरी टाळण्याचीं साधनें त्यांस सांपडतील.

म्हणून संस्थेच्या हितचिंतकांनीं स्वशक्त्यनुसार ह्या शास्त्राचा अनुभव पहावा.

पुणें न्यू इंग्लीश स्कूल ही संस्था स्थापन झाल्यापासून जेव्हां जेव्हां सुरगुरु धनेंत, मीनेंत आणि कर्केंत आला तेव्हां तेव्हां संस्थेस यशो-वृध्दि करून गेला आहे म्हणून ह्या संस्थेपासून लोकसमुदायांत विद्यामृतपान, विचारस्वातंत्र्य, धर्मपरायणता इत्यादि गोष्टींत चळवळ उत्पन्न होऊन ती महाराष्ट्रास पुन्हा पूर्वरूप संपादन करून देईल अशी बळकट आशा दाखवीत आहे. श्री० शिव क्षत्रपतीचें समाधिशतक ह्या नांवाचें पुस्तक बरेंच वर्षांवर प्रसिध्द झालें असतांही त्यापासून जो परिणाम व्हावयाचा तो सन १८९५ सालीं गुरु कर्केंत (उच्च राशींत येतांच) त्यानें आपला शुभ किरण केसरीवर पाडून जिकडे तिकडे **शिवनामाचा** घोष चालू केला आहे. परंतु, गुरु सप्तंबर महिन्यांत सिंह राशींत जात असल्यामुळें हा चळवळ पुढें मंद पडेलशी वाटते.

ह्या संस्थेच्या कुंडलींत शुक्र, मंगळ ग्रह परस्पर क्षेत्रीं आहेत. खेरीज ते स्वराशीसन्मुखराशींत आहेत. हे ग्रह परिभ्रमणकाल कोष्टकाच आधारें जेव्हां जेव्हां स्वराशींत आणि आपले उच्चांत आणि नीचांत येतील तेव्हां तेव्हां संस्थेस अशुभ फलें उत्पन्न केल्याशिवाय राहणार नाहींत. शनि पुढें १५ वर्षांनी नीच होईल तेव्हां, आणि मकर, कुंभ ह्या राशींत येईल तेव्हां संकटें जास्त येतील. ह्या संस्थेचा पुढे उदय होणार असून तीस अद्याप निराळें स्वरूप यावयाचें आहे. परंतु अन्य गोष्टींचा विचार करतां येथें जास्त वर्णन देणें योग्य नाहीं. परमेश्वर कृपेनें ही संस्था दीर्घायु होऊन भरभराटीस येवो ही महाराष्ट्रीयांचे वतीनें आम्ही ईश्वराजवळ प्रार्थना करतों.

चुकीची दुरुस्ती—पांचवे अंकांत कै० वि० कृ. चिपळूणकर यांचा मृत्यु सन १८८३ मध्यें दिलेला आहे तो चुकीचा आहे. मृत्यु काळ सन १८८२ आहे. ह्या वर्षीं वार्षिक दशमाधिपति शनि आणि जन्म काळचा दशमाधिपति गुरु हे बिघडतात. रवीवर शनीची जन्मकाळींच वर्तुलपाददृष्टि आहे ह्यानेंही मृत्यु येतो. तिसरें वर्षी मृत्युयोग दिसतो तसाच चवथे वर्षीही दिसतो. म्हणून मृत्युकालाचा संभव जेथें जास्त दिसेल तेथें काल निश्चित करावा. संस्थेच्या ६।८ आणि ३० ह्या साली कलह होतील असें लिहिलें आहे, तेथें हीं वर्षें पूर्ण झाल्यावर म्हणजे संस्थेच्या ७।८ आणि ३१ व्या वर्षी कलह होतील असें समजावें.

× ×
×

दिनवर्षपध्दतीनें या संस्थेच्या अलिकडील कालासंबंधानें विचार करितां बरेच अनिष्ट योग चालू असल्याचें दिसत आहे. सन १९२३ च्या सुमारास चलित दशमानें हर्शलबरोबर सार्धचतुष्टय राश्यंतर १३५ अंश नांवाचा अशुभ योग केला. चलित रवीनें जन्म काळचे शनीबरोबर अर्ध केन्द्र योग केला असून तो चलित शनीबरोबर पुन्हा हाच योग सन १९२६ सालामध्यें करणार आहे. चलित रवि नेपच्यूनबरोबर समक्रांति योग करीत आहे. व चलित मंगळ हा मूळचे रविबरोबर समक्रांति योग करण्यास आला आहे. या सर्व योगांचा विचार केला असतां संस्थेमध्यें नेपच्युनच्या स्वभाव धर्माप्रमाणें अनेक घोंटाळे माजून रवि मगळ समक्रांति योगामुळें कलह उत्पन्न होतील. शनि हा मुळ कुंडलींचे एकादशस्थानाचा म्हणजे मित्र, साह्यकर्ते व सोसायटीचें कौंसिल किंवा कौंसिलर्स यांचा द्योतक असल्यामुळें त्यांचे मृत्यु व त्यामुळें सोसायटीचे सांपत्तिक व इतर बाजूनें नुकसान झालें पाहिजे. चलित रवीनें जन्मकालचे नवमांतील शुक्राबरोबर केलेला योग नुकताच सोडला आहे.

सोसायटीचे स्थापनाकाळीं रविशनीचा केंद्र योग झालेला आहे. परंतु रवि स्थानबली असल्यामुळें सोसायटीनें आस्ते कदमानें पण प्रगतीच केली. या कुंडलीमध्यें शनि चलित होऊन त्यानें रवीबरोबर तंतोतंत केन्द्रयोग केला आहे. सोसायटीचे आयुष्यामधील अत्यंत अनिष्ट असा जो काळ १९०३ ते १९०५ याला टक्कर दिल्यानंतर तीमध्यें बरोच प्रगती झाली असली पाहिजे. सोसायटीचें कुंडलीवरून पुढील काळा संबंधानें पाहतां खालील प्रमाणें एकापेक्षां एक असे तीव्र व अनिष्ट योग बेत आहेत. (१) चलित बुध केंद्र मंगळ चलित १९२८. (२) चलित बुध प्रतियोग चंद्र जन्मकाळचा १९२९, (३) चलित बुध प्रतियोग हर्शल चलित १९३१ (४) चलित मंगळ केंद्र चंद्र जन्म काळचा १९३१, (५) चलित रवि प्रतियोग चंद्र जन्मकाळचा १९३२, (६) चलित मंगळ केंद्र मंगळ चलित १९३३ व (७) चलित रवि प्रतियोग हर्शल चलित व जन्म काळचा १९३६।३७ या योगांचें प्राबल्य चालू असतां मध्यें १९२८।२९ च्या सुमारास चलित लग्न युति नेपच्युन जन्मकालचा व चलित लग्न युति मंगळ जन्म काळचा १९३२।३३ असे आणखी दोन योग येतील या सर्व गोष्टींचा विचार करितां सन १९२८ ते १९३४ पर्यंतचा सोसायटीचा काळ तिचे इतिहासामध्यें भयंकर अनिष्ट व कष्टकारक जाईल, व अशीच स्थिति १९३६।३७ पर्यंत राहून नंतर क्रांतिकारक चळवळी व खटपटीमुळें सोसायटी नव रूप सन १९३८ नंतर धारण करील असें वाटतें. सन १९२८ ते १९३१ पर्यंत बुध हा बराच बिघडत आहे व त्यामुळें या काळामध्यें सोसाईटीला भयंकर शत्रुत्व होऊन वर्तमान पत्रांमधून वादाची तीव्र रणें माजणें शक्य वाटतें.

—संपादक—

दिल्लीची ऐक्य परिषद

ठिकठिकाणी होत असलेल्या हिंदुमुसलमानांमधील दंग्यांचे मुळें व विशेषतः कोहट येथें झालेल्या हिंदुमुसलमान यांचे दंग्यामुळें महात्मा गांधीच्या मनाला अत्यंत अस्वस्थता प्राप्त झाली. व देशामधील द्वैतभाव नष्ट होऊन जिकडे तिकडे शांतता नांदावी या सद्भावनेनें प्रेरित होऊन त्यांनी हिंदुमुसलमानांच्या दुहीच्या पापाचें उच्चाटन करण्याकरितां स्वतः २१ दिवस उपवास करण्याचें ठरवून त्याप्रमाणें तारीख १८ सप्तेंबर १९२४ पासून उपवासाला सुरवात केली. व लागलीच हिंदु-मुसलमान या उभय जातींत सलोखा घडवून आणण्यासाठी हकीम अजमलखान, स्वामी श्रध्दानंद व मौ. महंमदअल्ली यांनीं हिंदुस्थानांतील सर्वपक्षीय पुढाऱ्यांस निमंत्रणे केलीं. व त्याप्रमाणें दिल्ली येथें सर्व प्रांतांतून सुमारें तीनशें वर प्रतिनिधी सभेस हजर राहिले. व तारीख २५ रोजीं पुढाऱ्यांची प्रास्ताविक बैठक होऊन तींत कोणत्या विषयांची चर्चा व्हावी हें ठरलें.

परिषदेला तारीख २६ सप्तेंबर १९२४ रोजीं दुपारीं तीन वाजतां दिल्ली येथें संगम नाटक गृहामध्यें दे. भ. पं. मोतिलाल नेहरू यांचे अध्यक्षतेखालीं सुरवात झाली होती. ही ऐक्य परिषद होऊन आज जवळ जवळ दोन महिने होऊन गेले आहेत. परिषदेनें काय काम केलें कोणते ठराव पास केले व तिचा कितपत उपयोग होत आहे वगैरे संबंधानें जवळ जवळ आतां सर्वत्रांची कल्पना होऊन गेला आहे. ही परिषद कोणत्या ग्रहस्थितीवर निर्माण झाली व तीपासून पुढें देशाला कांहीं हित होईल किंवा काय यासंबंधानें आज ज्योतिषशास्त्रदृष्ट्या विचार करावयाचा आहे. देशांत यासारखे कांहीं प्रसंग चालू वर्षी घडून येतील याबद्दल भविष्य ज्योतिर्विद रामनारायण यांनीं आपले चालू वर्षाचे वर्ष भविष्याचे पुस्तकामध्यें पृष्ठ १३ वर केलें आहे. व असाच एक सर्व पक्ष एकत्र करण्याचा प्रयत्न पुन्हा २२ नव्हेंबर १९२४ रोजीं करण्यांत आला आहे.



पूर्व केंद्रावर विश्वबंधुत्वाची भावना दर्शविणाऱ्या विद्वताप्रचुर अशा कुंभ राशीचा १ ला अंश उदय पावत असून लग्नामध्यें मंगळ व केतु या दोन खल ग्रहांची जोडी उदय पावत आहे. वर सप्तम केंद्रामध्यें शुक्र, नेपच्युन व चंद्र अस्ताला जात आहेत. ही ग्रहस्थिति ऐक्य परिषदेचें ध्येय पूर्ण करण्यासारखी आहे असें आम्हांला मुळींच वाटत नाहीं. एकादशस्थानामध्यें गुरु स्वराशीचा बलवान असल्याकारणानें धार्मिक पक्षभेद मिटवून ऐक्य घडवून आणणारे अनेक मित्रांचा लाभ या परिषदेला होऊन त्यामुळें कांहीं काळ पर्यंत धार्मिक पक्ष भेद मिटतील परंतु हा गुरु शनिबरोबर म्हणजे लग्नेशाबरोबर व हर्शल बरोबर अशुभ संबंधित असल्यामुळें त्यापा-

सन निश्चित असें चांगलेंच फळ मिळेल असें म्हणवत नाहीं.

ऐक्य परिषद भरवून आणण्याकरितां प्रथम वाटाघाट करणारी पार्टी म्हणजे हकीम अजमलखान, मौ. महमदअल्ली वगैरे मुसलमान बंधूच्या पक्षाचा विचार लग्नांतील ग्रह व राशीवरून केला पाहिजे तर हिंदु पक्षाचा व हिंदुलोकांचा विचार सप्तमस्थान व त्यांतील ग्रह यांवरून होईल असें आम्हांला वाटतें. येथें कुंभ ही राशि व मंगळ केतु हे ग्रह मुसलमानबंधूंच्या आचारविचार वागणूक यांचे दर्शक घेतले पाहिजेत. तसेंच कुंभेचा अधिपती किंवा मुसलमान समाजाचा दर्शक या कुंडलीतील ग्रह शनि हा वृश्चिक या गूढ, मत्सरी, खुनशी व द्वाड राशीमध्यें धर्मस्थानामध्यें पडलेला आहे. म्हणून एकंदर मुसलमान समाजाचें वर्तन मंगळ, केतु व शनि यांचे धर्माप्रमाणेंच राहील. मुसलमान समाज स्थिर राशीमधील स्वभाव धर्माप्रमाणें आपले धार्मिक आचारविचार पूर्णपणे जुन्या धर्माप्रमाणें पाळण्याचा जोराचा प्रयत्न करून कोणतेंच गोष्टींमध्यें उदार मतवादीपणा दर्शविणार नाहीं असें ओघानें म्हणावें लागतें. याच उलट हिन्दूचें धोरणासंबंधानें दृग्गोचर होत आहे. नेपच्युन सारखा भलताच देखावा दणारा व फसव्या ग्रह लग्नांत उदय पावत असून लग्नाधिपति रवि हा चर व नेहमीं संलोख्यानें व प्रेमानें वागणाऱ्या अशा तुला राशीमध्यें असल्याकारणानें शक्य तेवढें सबाळ धोरण हिंदुसमाजावर लादण्यांत येईल किंवा या धोरणामध्यें त्यांना थापा देऊन नेण्यांत येईल. व वर राशीच्या स्वभाव धर्माप्रमाणें त्यांचेमध्यें कार्याची एकाग्रता व निश्चित ध्येय राहणार नाहीं.

उदित असलेला अंश शनीबरोबर लवकरच केंद्रयोग करीत असल्यामुळें महात्माजींचा उपवास सुटतो न सुटतो तोंच ऐक्य परिषदेचे विघडवडे होण्याचे प्रकार झालेले आहेत हें पाहण्यासारखें आहे. या कुंडलीवरून पाहतां सन १९२५ सालामधील दशमांतून होणारे शनीचें नव्हेंबर डिसेंबर मधील भ्रमण बरेंच अनिष्ट भासत आहे; व सन १९२५ व १९३० या सालामध्यें बरेंच तीव्र व अनिष्ट परिणाम हिंदु मुसलमान यांचे एकीमध्यें पाहण्यास मिळतील असें दिसतें.

पत्रव्यवहार.

ज्योतिर्मालाकर्ते यांस:--

सा. न. त्रि वि. ग्रहांचा सूर्यापासून अनुक्रमांक व दृष्टीचें शुभाशुभत्व या संबंधांत सुचलेली एक कल्पना आपलेकडे प्रसिध्दीकरितां पाठवीत आहें. ती प्रसिध्द करावी अशी आशा आहे.

कोणत्याही ग्रहाचा सूर्यापासून जो क्रमांक असेल त्यानें ३६० ला भागिलें असतां जी दृष्टि येईल ती त्या ग्रहाच्या उलट धर्माची असते:---

ग्रह.	क्रमांक	दृष्टि	बुध हा ग्रह जसा शुभ अथवा अशुभ
बुध	१	३६० अथवा ♂ युति	अशुभ दृष्टि असेल तसा थोडा शुभ किंवा थोडा अशुभ असतो म्हणुन युति ही अत्यंत शुभ अथवा अशुभ असते.
शुक्र	२	१८० अ. प्रतियोग	थोडा शुभ ग्रह म्हणून दृष्टि अत्यंत अशुभ
मंगळ	३	१२० अ. त्रिकोण△	मंगळ थोडा अशुभ म्हणून दृष्टि अत्यंत शुभ
गुरु	४	९० अ. केंद्र□	ग्रह फार शुभ म्हणून दृष्टि थोडी अशुभ

शनि	६	७२ अ.	Q	ग्रह फार अशुभ म्हणून दृष्टि थोडी शुभ
हर्शल	६	६० अ.	लाभयोग *	ग्रह अशुभ म्हणून दृष्टि शुभ
नेप्चून	७	५१$\frac{3}{7}$ अ.		हो दृष्टि सुध्दां नेप्चूनच्या धर्माच्या उलट असली पाहिजे

येथें थोडी व फार हे शब्द सापेक्ष आहेत.

नागपूर आपला

पी. बी. गानू.

साभार स्वीकार.

सन १९२४ सालीं खालील मासिक पुस्तकें व वृत्तपत्रें यांनीं झालेला भेट दिली आहे. मालाही प्रेमानें त्यांचे भेटीला जात असते. केसरी, स्वराज्य, साप्ताहिक ज्ञान प्रकाश, शुभसूचक, धर्मजागृति, लोकमित्र, संजीवन, भारतीय ज्योतिषचंद्रोदय पत्रिका, पुरुषार्थ, भारतमाता, महाराष्ट्रसाहित्य, विद्यासेवक, मधुकर, दैवज्ञ प्रबोधिनी, हर्शल, " the Astrological Bulletiner" Prophecy.

डॉ. वसंतराव गंगाराम रेळे एल. एम अॅन्ड एस, एफ. सि. पी. एस. गिरगांव, मुंबई यांचेकडून An Exposition of Directional Astrology of the Hindus as propounded in Vimshottari Dasa या नांवाचे पुस्तक अभिप्रायार्थ व भेटीला आलें आहे. डाक्तर साहेबांनीं आपला धंदा संभाळून हिंदु दशा पध्दतीचो उपपत्ती बसविणारें पुस्तक प्रसिध्द केलें आहे हें खरोखर त्यांस भूषणावह आहे. दशापध्दती कां व कोणत्या तत्त्वावर बसविलेली आहे, रवीला ६च वर्षें कां व चंद्राला

१० वर्षें कां तसाच विंशोत्तरीमध्यें रवि, चंद्र, मंगळ, राहु, गुरु इत्यादि क्रमानें आरंभ कां घ्यावा याचा खुलासा करण्याचा प्रयत्न कला आहे. ज्योतिषशास्त्राचा धंदा नसतांना पिढीजात ज्योतिषशास्त्राचा धंदा करणाऱ्यापेक्षां इतर फलज्योतिष शास्त्राचे प्रेमी लोक कसे चिकित्सक बुध्दीनें शोध करीत असतात याची थोडी तरी कल्पना डाक्तर साहेबांचें पुस्तक खास आणून देईल. सदरहु पुस्तक व **नाक्षत्र दृष्टिचक्र** नांवाचा चक्राचा तक्ता ग्रंथकर्त्याकडे प्रत्येकीं कि. रुपया एकला मागणी केलो असतां मिळेल. या पुस्तकाचें संपूर्ण परीक्षण पुढील एखाद्या अंकामध्यें करण्यांत येईल.

वरील पुस्तकें, मासकें व वृत्तपत्रें मालेला भेटीला पाठविणारांचे आम्ही अत्यंत आभारी आहों.

× ×
×

चालू वर्षाचा हा शेवटला जोड अंक ११।१२ आम्हीं वाचकांचे हातामध्यें देऊन त्यांचे आठवे वर्षाचें ऋणामधून मुक्त होत आहों. संकट परंपरेनें अझूनही आमचा पाठ सोडला नाहीं. जातिमत्सराचा तीव्र अनुभव येऊन अखेरीला श्रीयुत प्रधान यांना इनव्हॅलिड पेन्शनमध्यें जावें लागलें. कसेंही असो, ही गोष्ट ज्योतिषशास्त्राध्ययन कार्याच्या दृष्टीनें उत्तम झाली आहे असेंच म्हटलें पाहिजे. मानवी संकेतापेक्षां इश्वरी सूत्रें निराळीं असतात. आजपर्यंत त्यांना शास्त्राध्ययन व लेखन करण्यास जी स्वस्थता व स्वातंत्र्य नव्हतें तें आतां अनयासेंच प्राप्त झाले आहे. नोकरी मासिकाचें व इतर ज्योतिषविषयक कामें यांच्या बोजानें त्यांची प्रकृती बरीच क्षीण झाली होती. ती आतां पुष्कळच सुधारली असून आतां जोमानें त्यांना आणखी दीड तप सहज काम करितां येईल असें आम्हांला वाटतें. व त्याप्रमाणें त्यांनी कामालाही सुरुवात केली आहे. **भारतीय ज्योतिष चंद्रोदय**

नांवाचे गुजराथी मासिकामध्यें त्यांचे गुजराथी मध्येंच लेख प्रसिध्द होत असून "**जातक तवरदर्शन**" नांवाचा एक जातकांवरील ग्रंथ त्यांनीं गुजराथीमध्यें वरील मासिकामध्यें क्रमशः प्रसिध्द करण्यास सुरवात केली आहे. मराठीमध्यें "**जातक मार्गोपदेशिका-जातकखंड**" नांवाचा स्वतंत्र विचारानें परिप्लुत असलेला २०० वर पृष्ठांचा ग्रंथ छापण्याचें काम चालू आहे. हा ग्रंथ ज्योतिर्मालेच्या ९ व्या वर्षाचे वर्गणीदारांना कांहीं विशेष सवलतीनें देण्याचें योजिलें आहे. हा ग्रंथ प्रसिध्द झाल्यानंतर आणखी तयार असलेलीं एक दोन पुस्तकें सन १९२५ सालामध्यें प्रसिध्द करण्याचा विचार असून तीही सवलतीच्या किंमतीनें ज्योतिर्मालेच्या वर्गणीदारांना देण्यांत येतील.

ज्योतिर्मालेचे असेच कांहीं दिवस जोड अंक दर दोन महिन्यानें काढण्याचें योजिलें असून जरा स्वस्थता व सुस्थिति प्राप्त होतांच मालेचे अंक नियमानें पूर्वीप्रमाणेंच दर महिन्याचे महिन्याला प्रसिध्द करण्यांत येतील. वर्गणीदारांनीं आपला आश्रय असाच कायम ठेऊन आम्हांला फलज्योतिशास्त्राचे संशोधन कार्यामध्यें आजपर्यंत जशी मदत केली तशीच करून हें कार्य अव्याहत चालू ठेवण्याचें श्रेय घ्यावें अशी त्यांस आमचा नम्र विनंति आहे.

चालू सालामध्यें फलज्योतिषाध्ययनप्रेमी दुर्गचे रा. रा. **एम. डी. मगणे, एन. ए. एलएल बा.** या सद्गृहस्थानीं जो लेखनद्वारा व इतर वर्गणीदार मिळवून देणें, सांपत्तिक मदत करणें वगैरे जो मदत निःस्वार्थ बुध्दीनें आम्हांस केली ती फारच अवर्णनीय आहे व त्याबद्दल आम्ही त्यांचे फार आभारी आहों. तशीच कै० रा. रा. जिवनरावजी यांचे अमेरिका येथें असलेलें मित्र व हिंदमातेचा यांत्रिक कलेमध्यें व इतर दुसऱ्या अपूर्व शोधानें अजरामर कीर्ति वाढविणारें नररत्न **प्रोफेसर शंकरराव**

अबाजी भिसे यांनीं चालू वर्षी पत्रद्वारें व इतर अर्थिक दृष्टीनें जे आम्हांस आमचे--कै. रा. रा. जिवनरावजींचे कार्य करण्यामध्यें प्रोत्साहन दिलें त्याबद्दल आम्हीं फार आभारी आहों.

प्रत्येक वर्ष कसें जाईल, रोजचा दिवस कोणत्या कार्याला कसा आहे इत्यादि अनेक गोष्टींचें सशास्त्र विवेचन करणारें श्रीयुत **रामनारायण** यांचें **वर्षप्रबोध** नांवाचें पुस्तकाचा आमच्या कल्पनेप्रमाणें महाराष्ट्रानें सत्कार केल्यामुळें कार्य करण्यास जास्त उत्साह येऊन गेल्या सालापेक्षां यंदाच्या पुस्तकामध्यें बऱ्याच नवीन गोष्टी देऊन पुस्तक सर्वांगानें सुंदर करण्याचा श्रीयुत **रामनारायण** यांनीं प्रयत्न केला असून पहिल्या वर्षाच्या दीडपटीनें चालू **१९२५ सालच्या वर्षभविष्याची** कॉपी काढली असून किंमत तीच ठेविली आहे. हीं पुस्तकें मालेच्या ऑफीसमध्यें विक्रीला ठेविलीं आहेत. दर वर्षी अनेकांचीं प्रासादिक वगैरे बरींच वर्षभविष्यें प्रसिध्द होत असतात. हें प्रासादिक नसलेलें पण सशास्त्र पायावर उभारलेलें सन १९२४ चें भविष्य कसें तंतोतंत उतरलें आहे हें त्यांचें ह्यॉन्डबिल मागवून वाचून पाहिलें असतां सहज कळेल. चालू सालीं श्रीयुत रामनारायण यांनीं **परिभ्रमणपद्धतीचें** विवेचन करणारा आपला ग्रंथ छापण्यास दिला असून तो लवकरच बाहेर पडेल. वरील पुस्तकांना मालेचे वाचक व हितचिंतक आश्रय देतील अशी आम्हांला फारफार आशा आहे.

× ×
×

आश्रयदात्यांस विनंती.

गेल्या सालीं अनेक वर्गणीदारांनीं व्ही. पी. परत करून मालेला शें सवाशें रुपयांच्या गंडांत आणलें तसें यंदा करूं नये. ज्यांना आश्रय देणें नसेल त्यांनीं पत्रानें कळविणें. आपल्या दोन दिडक्या वांचविण्याकरितां व्ही. पी. रीफ्यूज्ड करणें किंवा अनक्लेम्ड करणें हें

आम्हीं बदमाशगिरीचें लक्षण मानतों. व या व्ही. पी. बुडव्यांचें एक स्वतंत्र लिस्ट मालेच्या आफीसमध्यें ठेविण्यांत आलें असून त्यांचे बरोबर पुढें जपूनच व्यवहार करण्यांत येतो. मालेच्या ९ व्या वर्षाच्या पहिल्या जोड अंकांच्या पुस्तकाचो व्ही. पी. जानेवारीच्या १९ किंवा २९ व्या तारखेस वर्गणीदारांकडे रवाना करण्यांत येईल, करितां येणाऱ्या व्हीपोचा स्वीकार करावा. ज्यांना शक्य असेल त्यांनीं मनिआरडरोनें वर्गणी पाठविली असतां आमच्या कामांत थोडी तरी मदत खास होणार आहे. इकडे आमचे आश्रयदाते लक्ष देतील अशी आशा आहे.

म्यानेजर—ज्योतिर्माला ऑफिस.
दादर, मुंबई. नं. १४.

" जातक मार्गोपदेशिका—जातकखंड " पृष्ठें २०० वर किंमत रु. २--८--० लेखक, यशवंत केशव प्रधान संपादक ज्योतिर्माला. या ग्रंथाचीं आतांपर्यंत १०० पानें छापून झालीं आहेत; बाकीचीं पानें छापण्याचें काम चालू आहे. ज्यानेवारी १९२५ मध्यें ग्रंथ तयार होईल असें वाटतें. ज्योतिर्माला वर्ष ८ वें अंक ९ ते १० मध्यें प्रसिध्द केलेल्या सवलतीची किंमत ज्यांचेकडून मनिआरडरनें आगाऊ आमचेकडे आली आहे त्यांना हा ग्रंथ प्रसिध्द होतांच मिळेल. ग्रंथाची पृष्ठें वाढल्यामुळें हा ग्रंथ आतां आम्हांला त्याच किंमतीमध्यें देतां येत नाहीं याबद्दल दिलगीर आहों. व म्हणून मागील सवलत बंद करावी लागत आहे. यापुढें जे ज्योतिर्मालेचे वर्गणीदार वर्ष ९ चीं मालेची वर्गणी रु. २ व जातक मार्गोपदेशिकेकरितां रु. २--०--० असे मनिआरडरनें रुपये चार पाठवितील त्यांना हा ग्रंथ रजिष्टर बुकपोस्टानें पाठविण्यांत येईल. जे ज्योतिर्मालेचे वर्गणीदार ग्रंथ प्रसिध्द होतांच मागाहून ग्रंथ व्हीपानें मागवितील त्यांना रु. २--०--० पडून व्हीपी टपाल खर्च द्यावा लागेल. ग्रंथ उत्तम कागदावर छापला असून पायका टायपाची २०० पृष्ठें एवढा मोठा होईल. जातकावर इतका व्यवस्थित लिहिलेला ग्रंथ मराठी किंवा इंग्रजी भाषेमध्यें नाहीं असा तज्ज्ञांचा अभिप्राय आहे.

म्यानेजर—ज्योतिर्माला ऑफिस, दादर.

॥ श्रीसद्गुरवे नमः ॥

ज्योतिर्माला

आप्राचः कामरूपाद् द्रुहिणसुतनदप्लावितादाप्रतीचो
गान्धारात् सिंधुसार्द्राद्रघुवररचितादाचसेतोरवाचः ।
आकेदारादुदीचस्तुहिनगहनतः सन्तिविद्वत्समाजा
ये ये तानेष यत्नः सुखयतु समजान्कश्चमत्कर्तुमीष्टे ॥ १ ॥

अभिनवाऽऽवृत्ति } वर्ष ९ वें { अंक १ ले २.

" ईशप्रार्थना. "

(लेखकः—रामचंद्र राजाराम मोकाशी, ठाणें.)

पद. चा—सुकुमार असुनि.

रवि तेज दिसे निस्तेज बावरे ध्वांत ॥
तें राज्य तयाचें कुणा न होय पसंत ॥ ध० ॥
तारका गगनदूतिका प्रगट हो शांत ।
येउनी मिळे तिस हळूच रजनी कांत ॥
जोडही गोड तम हरी शांति बहु नांदे ।
मग आनंदानें दशदिशा चराचर कोंदे ॥
क्षिति मिळे दिव्य तुजमुळें तेज पृथ्वीला ।
अयि ! जगदंबे ही तुझीच मंगल लीला ! ॥
लाचार होऊनी चोर पळो अंधार ।
हो स्वास्थ्य सहज सुजनांस; लोपणें घोर ॥
ग्रह दुष्ट होऊं दे नष्ट राहुकेतला ।
त्या धूमकेतुसह अशेष ने विलयाला ॥
गतभया करि निरामया वंद्य विश्वाला ।
अयि ! रक्ष रक्ष ही उदंड " ज्योतिर्माला " ॥
नव वर्ष घडो उत्कर्ष प्रणति साष्टांग ।
देमाय भवामी इष्ट सिद्धिचा योग ॥

फलज्योतिष.

लेख ७ वा.

[लेखकः—एम. डी. सगणे, एम. ए. एल. एल. बी. दुग]

कित्येकांना 'प्रारब्ध' या कल्पनेचेंच मुळीं हंसूं येतें. त्यांना प्रारब्ध ह्या कल्पनेचा तिरस्कार वाटतो. प्रारब्ध म्हणून कांहींच नाहीं असा त्यांचा दृढ समज असतो. दुसऱ्या कित्येकांना पहिल्यांचा फार कींव येते. त्यांना वाटतें कीं, तो वर्ग सत्यपरांङ्मुख झालेला आहे कारण त्यांचा प्रारब्धांत पूर्ण विश्वास असतो.

मग बरोबर किंवा खरे कोण ? दोघेही बरोबर असतील ! किंवा दोघेहि चुकींचे असूं शकतील ! इतर गोष्टीप्रमाणें ह्या दोघांत मध्यमान असणें संभवनीय दिसत नाहीं.

प्राक्तन आणि कर्मस्वातंत्र्य हा वाद खरोखर फार मौजेचा व मोहक दिसतो. पण तितकाच तो क्लिष्ट व मति-कुंठित करणारा आहे. आज-पर्यंत ह्या वादावर बरेंच रणकंदन झालें. महान् विद्वान व बुध्दिमान लोकांनीं अनेक द्वंद्व-युध्दें केलीं; पण विजयश्रीने कोणास माळ घातली हें सांगणें कठीण आहे. अनेक योध्दयांचे त्या रणकंदनांत बळी पडले, ते अस्तंगत झालें. पण वाद नवनीतासारखा नित्य नवाच आहे.

× × × ×

आम्हीं स्वतंत्र्यरीत्या विचार व कृत्य करतों, आम्हीं इच्छिल्या-प्रमाणेंच फल प्राप्तो होते, व करून घतों, असें म्हणजे निःसंर्गाच्या-प्रकृतीच्या नियमांचें अस्तित्व नाकबूल करणेंच होय, प्रकृतींत नियम किंवा कायदे नाहींत काय ? सर्वत्र व सर्व काळीं तिच्यात नियम दिसून येतात.

प्रकृतीच्या नियमा--विरुध्द (सर्व साधारण मानव जातीविषयीं बोलत आहोंत) कोणी कांहींही करूं शकत नाहीं. तिच्या कायद्यांत विहित नसलेले परिणाम कोणीहि वर्तवूं शकत नाहीं. जठराग्नीचें शमन करण्यास पाषाणांतून कोणीहि भाकरी उत्पन्न करूं शकत नाहीं. मग तो कितीही स्वतंत्र रीतीनें, स्वावलंबनानें प्रयत्न करो. कारण असला प्रकार निःसर्गाच्या पुस्तकांत कुठेंहि नाहीं.

जेव्हां जेव्हां आपण असें म्हणतों कीं, 'मी अशी इच्छा केली, तसा प्रयत्न केला, आणि तें मिळविलें' तेव्हां तेव्हां असेंच दिसून येईल कीं, आपण जें कांहीं इच्छिलें, जो कांहीं प्रयत्न केला, तें सर्व प्रकृतीच्या नियमानुरोधानेंच इच्छिलें गेलें व मिळविलें. आपल्या इच्छा व कृति ज्या प्रमाणानें तिच्या नियमांना अनुसरून असतील; त्या प्रमाणानें आत्मस्वातंत्र्याचें, प्रयत्नाचें श्रेय घेतों अथवा मिळतें. पण आपणांस प्रकृतीविषयीं किंवा तिचें पूर्ण ज्ञान आहे काय ? 'आ' गांवच्या 'अने' 'बा' गांवच्या 'बला' असें अभिवचन दिलें कीं, तूं जर ता. ३-३-१९०३ ला 'आ' येथें हजर राहशील, तर तुला १ मण सोनें देईन. बिचारा 'ब' अगदी शेवटच्या गाडीवर विश्वास न ठेवतां, आलेला भाग्यकाल फुकट न दवडावा म्हणून स्टेशनवर दोन गाडया अगोदर गेला; पण त्या दोन दिवसांत त्याला घेऊन जाण्याकरितां एकही गाडी आली नाहीं. कारण रस्त्यावर तूट फूट किंवा कांहीं विघ्न झालें. असें मध्येंच विघ्न येऊन 'ब' ला सोनें मिळणार नाहीं हें कुणाला बरें माहीत होतें ? पण जो तूट फूट झाली, किंवा जें विघ्न आलें तें निःसर्गनियमानुसारच आलें. आणि असें प्रसंग तर आपल्या आयुष्यांत हजारों येत असतात.

प्रकृतीचें व तिच्या नियमांचें आपल्यास जितकें जास्त ज्ञान तितका आपल्या आत्मस्वातंत्र्यास, कर्मस्वातंत्र्यास वाव मिळतो, पण जें पूर्ण ज्ञान सर्वांनां तर नाहींच, पण थोडक्यांनाहि चांगल्या तऱ्हेनें नाहीं. म्हणून कर्मी स्वातंत्र्यास निर्बंध आहे. प्रकृतीच्या ज्ञानापासून आपण तितके दूर आहोंत व तितके आपण तिच्याशीं अनुसंगम नाहीं.

म्हणजे प्रकृतिनियमाच्या अज्ञानाचें आत्मस्वातंत्र्यावर टोपण, कवच आहे. जास्त संयुक्तिक बोलावयाचें म्हणजे तिचा जेवढा म्हणून भाग आपणांस अज्ञात आहे, तेवढया भागाचें निर्बंध कवच आहे. आणि त्या कवचांतून--अज्ञात भाग्यांतून कोणत्या वेळीं आणि कोणत्या प्रकारचें, दुःखांचे तीव्र अथवा सुखाचे मृदु बाण सुटतील हें सांगवत नाहीं.

एखाद्यास प्रकृतिनियमाच पूर्ण ज्ञान झाल्यास, तो स्वतःच प्रकृति बनल्यास, अर्थात हे कवच हा निर्बंध नामशेष होईल. त्याला कर्माचें पूर्ण स्वातंत्र्य राहील पण येथें दोन प्रश्न उद्भवतात.

एक असा कीं, पूर्ण आत्मस्वातंत्र्य मिळेपर्यंत, पूर्ण प्रकृति बनेपर्यंत प्रकृतीच्या नियमांच्या आज्ञेप्रमाणेंच वागावें लागतें. त्या नियमांचें दास्यत्व करावें लागतें. तेथें 'दे-घे' चालत नाहीं. म्हणजे निसर्ग--प्रकृति बनणें, (बनण्याची क्रिया) एक दास्यत्वच होय मग ज्या कर्मस्वातंत्र्याविषयीं एवढें शब्दावडंबर तें स्वातंत्र्य कुठें व कधीं होतें, अगर आहे ?

दुसरें असें कीं, प्रकृति अथपासून इतिपर्यंत एकच व सारखी भरलेली आहे. आणि निर्बंध व स्वातंत्र्य जर एकाच प्रकृतीचे भाग, तर मग आत्मस्वातंत्र्य आणि निर्बंध अथवा नशीब एकच नव्हत कां ? कारण

आज जें अज्ञान आहे तें उद्यां ज्ञात होईल व त्यामुळें आज जो निर्बंध तोच उद्यां आत्मस्वातंत्र्य होईल, म्हणजे प्रकृतीच्या नियमांच्या अधिक परिचयानें आज जें नशीब (निर्बंध) तें उद्यां कर्मस्वातंत्र्य बनतें. अर्थात आत्मस्वातंत्र्य आणि नशीब हीं एकच नव्हत कां ? फरक आहे तो केवळ एकच नाममात्राचा व अपणच केलेला.

\+ + + + + + + +

आणि पुन्हां असें कीं, (निसर्ग) प्रकृति तरी कुठें पूर्ण स्वतंत्र आहे ? तींत नियम आहेत. ह्या गोष्टीनें एक तत्त्व प्रस्थापित होतें कीं, तिच्यामागें तिचें नियमन करणारी कोणती तरी एक अद्वैत सर्वश्रेष्ठ शक्ति आहे. मग अर्थात जो प्रकृति बनला त्याला पूर्ण स्वतंत्र म्हणतां येईल काय ? तो, शब्दाच्या खऱ्या अर्थानें पूर्ण स्वतंत्रकर्मी झाला कां ? तो स्वतंत्र खरा, पण केवळ प्रकृति पुरताच त्याला कर्मस्वातंत्र्य; पण प्रकृतीला जो निर्बंध तोच निर्बंध त्याला अजून राहतोच.

मनुष्य प्रकृतीच्या वर गेला, सर्व श्रेष्ठ शक्ति (ईश्वर) झाला म्हणजेच त्यास पूर्ण आत्मस्वातंत्र्य. सर्वशक्ति--परमेश्वर सर्वांचें नियमन करतो पण तो कोणाकडूनहि नियमित नाहीं. परमेश्वरत्त्व हेंच सर्वश्रेष्ठ आत्म--कर्मस्वातंत्र्य, सर्वश्रेष्ठ निर्बंध, सर्वश्रेष्ठ प्राक्तन--नशीब होय. प्रकृति त्या मानानें कमी दर्ज्याचें आत्मस्वातंत्र्य निर्बंध अथवा नशीब होय. कर्मस्वातंत्र्य व प्राक्तन एकच होत.

\+ + + + + + + + + + + ;

हाच संदेश फलज्योतिषाचा आहे. तो पुढें अधिक विषद करूं.

———:०:———

पश्चिम हिंदुस्थान.

ग्रहांच्या उष्णतेच्या साधनानें केलेलें पावसाचें अनुमान सन १९२५

[लेखकः—दामोदर भास्कर बापट, खेड.]

१ ग्रह लहान आहेत, परप्रकाश आहेत, इत्यादि पुस्तकी कारणें सांगून अथवा मनांत आणून त्यांजपासून मिळणाऱ्या उष्णतेकडे दुर्लक्ष्य करणारे कित्येक आहेत. पण कोणत्यातरी शास्त्रीय मार्गानें अनुभव घेऊन व विचार करून, ग्रहांपासून उष्णता मिळत नाही अथवा ग्रहांपासून मिळणाऱ्या उष्णतेनें पृथ्वीवर कांहीं एक परिणाम घडून येत नाही. असें सिध्द करणारा इसम फारसा कोणी दृष्टीस पडत नाही. बरें कोणी ग्रहांच्या उष्णतेसंबंधानें विचार केला असल्यास तो विचार काय आहे व तो पध्दतशीर आहे किंवा नाही हेंही पाहण्याकडे फारसें कोणी लक्ष देत नाही असें अनुभवांतीं मनांत येतें.

२ व्यक्तिविषयक गोष्टींत, ग्रहांच्या उष्णतेपासून परिणाम घडून येतात याचा विचार आम्ही या वेळीं सांगत नाहीं. पण पृथ्वीवरच्या वातावरणांत ग्रहांपासून मिळणाऱ्या उष्णतेनें परिणाम दिसून येतात हें अनुभवानें सांगत आहों. याविषयीं शास्त्रीय दृष्टीनें व अनुभवानें हो शंका राहिलली नाहीं.

३ पृथ्वीजवळ असलेले बुध शुक्र हो जोडी आणि मंगळ गुरु ही जोडी आणि सर्वांत जवळ असणारा चंद्र यांच्या उष्णतेचा परिणाम पृथ्वीवरच्या वातावरणांत होतो. शुक्र आणि मंगळ यांच्या पासून दरसालच उष्णता मिळत नाहीं. बुध, गुरु, व चंद्र ह्यांच्यापासून मात्र दरसाल उष्णता मिळते. चालू साली म्हणजे १९२५ सालीं गुरूशिवाय सर्वापासून उष्णता मिळत आहे.

४ शुक्र व मंगळ यांचा उष्णता पृथ्वीवर मिळणें विशेष असतें. सन १९२३ सालीं यांचो उष्णता पृथ्वीस मिळाली होती व ती पासून

बरेच उत्पात झाले. चालू साली ही शुक्र मंगळ यांची उष्णता पृथ्वीस मिळणार आहे पण १९२३।२४ प्रमाणें उत्पात फारसे जोराचे होणार नाहींत.

५. पृथ्वीवर ज्वालामुखी भूकंप, वादळें, अतिवृष्टि किंवा अनावृष्टि झाली म्हणजे मग सर्वांचें लक्ष त्यांचेकडे जातें. व जो तो आपल्या बुध्दीप्रमाणें तर्क चालवूं लागतो. पण हे सर्व प्रकार वर वर व तात्कालीन होतात. मुळाशीं जाऊन सतत विचार करणारा फारसा कोणी आढळत नाहीं. ग्रहांच्या उष्णतेमुळें कोठें आगी लागल्या असत्या अथवा वातावरणांत असह्य उष्णता झाली असती म्हणजे तिजकडे लोकांचें लक्ष सहज गेलें असतें.

६. सन १९२३ सालीं शुक्र आणि मंगळ या ग्रहांची उष्णता पृथ्वीस मिळाली होती; व तिचा परिणाम पाऊस अधिक पडण्यांत झाला. एवढ्यानेंच सदर उष्णतेचें कार्य संपलें नाहीं. पुढें पृथ्वीवर ठिकठिकाणीं वादळें भूकंप ज्वालामुखी आणे अतिवृष्टि यांनीं दंगल उडवून दिली असें आज वर्षभर चाललें आहे पण मूळकारणाकडे कोणी पाहत नाहीं. एखाद्या गोष्टीकडे लक्ष देण्यास वर दाखविलेल्या आपत्तीपेक्षां आणखी भयंकर आपत्ती कोणत्या राहिल्या हेंच समजत नाहीं.

७. चालू साली शुक्र आणे मंगळ यांचो उष्णता येत आहे म्हणून वरीलप्रमाणें चालू साली हा उत्पातांची दंगल उडेल असें कोणी मनांत आणील तर हा गोष्ट ह्या वर्षी होत नाहीं. असें होण्यास चालू साली अनेक विरोध आहेत. हें सांगण्यास शास्त्राच्या मुळांतच जावें लागेल म्हणून आतां सांगतां येत नाहीं.

८. चालू वर्षीं (१९२५) ग्रहांपासून उष्णता मिळण्याच्या गणिताच्या तारखा पुढें दिल्याप्रमाणें आहेत. ३ मार्च, २० अप्रील, २० जून,

२६ आगष्ट, १० अक्टोबर व११ दिजंबर या रवि बुध युतीच्या तारखा आहेत. रवि चंद्राचो युति प्रत्येक महिन्यास एक याप्रमाणें बारा आहेत. त्या तारखा १६ ते २० पर्यंतच्या आहेत. २३ एप्रिल रवि शुक्र युति. १३ रवि मंगळ युति.

९. चालू वर्षी बुध चंद्र यांची उष्णता मेळानें येत आहे यामुळें वातावरणांत लाट जोरानें उठून बराच वेळ राहील, अशा स्थितींत एप्रोलांत शुक्र व सप्टंबरांत मंगळ येत असल्यामुळें त्या त्या वेळी वातावरणांतील लाटांस अधिक जोर येईल व तो बराच काळ टिकेल.

१०. पावसाच्या दृष्टीनें उत्तर अक्षांश १६ च्या खाली उत्तर अक्षांश १२ पर्यंत वृष्टीचें मान अधिक चांगलें अह. मार्च अखेरीपासून पावसास सुरवात होईल, एप्रिलांत विशेष व मे महिन्यांत मध्यम मिळून वळीवांचा चांगला पाऊस लागेल. पिकाच्या दृष्टीनें याचा उपयोग नसला तरी जमिनीची मशागत करण्यास अशा पावसाचा उपयोग होईल.

११. उत्तर अक्षांश १६ वरच्या बाजूस पण सह्याद्रीचा पूर्वभाग यांत हा उन्हाळ्यांतील पाऊस बेताचा असून उत्तरेकडे फारच कमी होईल. पाण्याची कमतरता यानें भरून येईल इतका असेल.

१२. समुद्राच्या किनाऱ्यास कोंकणपट्टींत याचा उपयोग नाहींच. व पाऊसही फारसा पडणार नाहीं. भाजावळी वगैर यानें बिघडतील आणि रुजपा होण्यास अडचण होईल. पण जपलें असतां फारसा अपाय होणार नाहीं.

१३. गुजराथेंत याचा पाऊसच पडणार नाहीं. नागपूराकडे थोडासा पाऊस पडल्यानंतर मग कांहीं एक पाऊस पडणार नाहीं.

१४ खरा पाऊस सुरू होणें आणि खोटा पाऊस सुरू होणें असा चालू वर्षीं स्पष्ट भेद आहे. वेळेवर आपापलीं कामें करणें हेंच श्रेयस्कर होईल असें वाटतें. पाऊस चांगला पडल्यावर पाहूं असें म्हणणारा फसण्याचा संभव आहे.

शुक्राचा उष्णतेमुळे जून, जुलई व आगस्ट यांत कर्क वृत्ताच्या प्रदेशांत पाऊस चांगला लागेल. सप्टंबर महिन्यांत रवि मंगळ युति येत असल्यामुळें देशावर पाऊस चांगला लागेल. व याचमुळें समुद्र कांठ व गुजराथ यांत पाऊस कमी होईल.

१५ चालू वर्षीं पावसाचा खरा आरंभ व खोटा आरंभ, वळीवाचा पाऊस व शेवटचा पाऊस असे चार स्वतंत्र भाग झाले आहेत. शुक्र, मंगळ, बुध व चंद्र यांच्या विक्षित रचनेमुळें वरील प्रकार घडणार आहेत. हा प्रकार फिरवितां येणार नाहीं. ज्या काळीं पावसाची सुरवात होते किंवा व्हावयास पाहिजे त्या काळीं चंद्राचा जोर नाहीं. ज्या काळीं चंद्राचा जोर आहे त्या काळीं शुक्र जोर करीत नाहीं. यामुळें पावसाची सुरवात एकदम आणि जोरानें होऊं शकत नाहीं. जोर झालासा दिसतो व लागलाच नष्ट होतो असा प्रकार आहे. म्हणून खोटी बरसात हा प्रकार उत्पन्न होत आहे. जून १५ नंतर या वरील गोष्टी नाहीशा होऊन सरळपणानें पावसाला सुरू होईल. आतां प्रदेशानुसार ही तारीख जुलईपर्यंत ही लांबेल.

१६ समुद्रासंबंधानें भरती मोठी येणें आणि समुद्र खवळणें या दोन गोष्टी आहेत. एप्रील आणि मे महिन्यांत भरतीचें पाणी फार भरेल. ही तारीख २२।२३ ही असेल. खाजणें वगैरेस या पाण्याची बाधा आहे. एप्रिलपासून साधारणपणें समुद्र खवळलेलाच असेल पण तो तितका

भयंकर नाहीं. मे महिन्याच्या १५ तारखेपासून गलबतांस ताठ असा वारा वाहोल. दक्षिण वारा पहांटेस व सकाळीं आणि संध्याकाळीं व रात्रीं अवर्शास उत्तर वारा जोराचा असेल. या वाऱ्याची आगबोटीस भीति नाहीं. १५ जूनपर्यंत आगबोटी चालण्यास मुळींच हरकत नाहीं. धाडशी गलबतवालेही या दिवसांत समुद्रांत फेरी करण्याचें धाडस करितील अशी हवा असेल. तरी पाऊस पडून माल भिजून जाणें हा गोष्ट अवश्य घडून येईल.

१७ गोव्याच्या दक्षिणेस मलबार किनाऱ्यावर तारीख १५ मेपासून गलबतें फिरविणें अशक्यच होईल. २८ मेपासून बोटीसुध्दां फिरणार नाहींत. व मधून मधून पाऊसही चांगला पडेल. भरतीच्या बाबतींतही अप्रिल मे २२।२३ ह्या तारखा विशेष ध्यानांत ठेवणें इष्ट आहे.

१८ चालू साली थंडीचें मान प्रथम चांगलें असेल. मार्च १७ पासून एकदा ४।२ दिवस थंडी पडून पुढें अजिबात कमी होईल व उन्हाळा भासूं लागेल. तथापि आकाशांत ढग अधिक प्रमाणांत असतील. म्हणून वनस्पतींस ही हवा पोषक आहे. आंब्यांचा हंगाम यामुळें फायदेशीर होईल. फळ मोठें व चवदार येईल. दंव पडेल यामुळें फळाचा रंग किंचित कमी होईल. तथापि एकंदरींत फायदेशीर आहे.

१९ अमुक ठिकाणीं अमुक महिन्यांत अमुक इंच पाऊस अमुक तारखांस पडेल अशा प्रकारचें विशेष अनुमान आम्हीं स्वतंत्र छापलेलें आहे व कि० ८४ आहे यामुळें ठिकाणवार माहेवार इंचवार व तारीखवार माहिती येथें दिली नाहीं. वाचकांस वरील माहितीची इच्छा होणें स्वाभाविक आहे. पण अन्य प्रकारें समाधान होण्यास मार्ग आहे. इच्छित स्थळाची माहिती मिळण्याची सोय आहे.

सूचना:—वरील पावसासंबंधानें प्रसिध्द केलेलें भविष्य व त्यांत आलेलीं मतें आमचीं आहेत किंवा तीं आम्हांस मान्य आहेत असें कोणीं मानूं नये.

—संपादक—

स्फुट विचार

एखाद्या राष्ट्राला किंवा देशाला अमुक एक साल कसें जाईल याचा विचार करते वेळीं सूर्याचो संक्रमणें, पौर्णिमा, अमावास्या, निरनिराळ्या ग्रहांचे युतियोग, ग्रहणें, ग्रहांच्या निरनिराळ्या राशीमधून होणारीं भ्रमणें इत्यादि गोष्टी विचारामध्यें घ्याव्या लागतात. व या गोष्टी विचारामध्यें घेऊन भविष्य करण्याचाच आजपर्यंत सर्व आंग्ल ज्योतिर्विदांचा परिपाठ आहे. कांहीं ज्योतिर्विदांनीं निरनिराळे देश कोणते राशीचे अंमलाखालीं आहेत, तेथील व्यापाराची मुख्य ठिकाणें किंवा राजधानींचीं शहरें यांचे दशामावर व लग्नावर कोणत्या राशीचे कोणते अंश उदय पावत आहेत यासंबंधानें अनुभवानें निदान केलें असून त्यामधून ग्रहांचीं भ्रमणें कशीं होत आहेत, त्यांचा फलादेश काय मिळेल यासंबंधानें पण कांहीं कांहीं उत्तम विचार वाचकवर्गापुढें मांडलें आहेत. एखाद्या व्यक्तीच्या जन्मकाळच्या ग्रहस्थितीवरून जसें त्या व्यक्तीच्या सुखदुःखाचा जातकामध्यें विचार करितां येतो असाच राष्ट्रासंबंधानें किंवा कांहीं देशासंबंधानें करितां येईल किंवा नाहीं या संबंधानें आंग्ल ज्योतिर्विदांमध्यें तर्क वितर्क व वादविवाद चालू आहेत. गुरु शनि या दोन बृहत् ग्रहांचे युतिकाळचे कुंडलीवरून पुढील कालासंबंधानें विचार कसा करितात व त्यावरून केलेली भविष्यें कशीं जुळतात वगैरे आंग्ल ज्योतिर्विदांचे विचार मनन करण्यासारखे आहेत. सेफेरीअल नामक ज्योतिर्विदानें तर एक **वर्ल्ड हरास्कोप –पृथ्वीची जन्मकुंडली**–मांडण्याचा प्रयत्न करून तिच्या साह्यानें पुढील अनेक शतकांमध्यें होणाऱ्या घडामोडीचा--दुष्काळ, सुकाळ, लढाया, उत्पातादि अनेक गोष्टींचा स्पष्ट शब्दांमध्यें खुलासेवार भविष्य करण्याचा

स्तुत्य प्रयत्न चालविलेला आहे. व असें एक कवितावध्द भविष्य त्यानें सन १९१९-२० चे सुमारास प्रसिध्द केलें आहे. अजून हें वर्ल्ड हारास्कोपचें बंड कशावर उभारलें आहे याचा स्पष्ट शब्दांमध्यें कोठें खुलासा आलेला नाहीं. व हें गुप्त तो ज्योतिर्विद् तूर्त तरी जनसमाजापुढें मांडूं इच्छित नाहीं. परंतु ही कुंडली त्यानें कशी बसविली असेल यासंबंधानें कांहीं कल्पना त्याच्या वारंवार प्रसिध्द होत असलेल्या लेखावरून करतां येतात.

× ×
×

आपणांमध्यें जशा कलियुगादि आरंभाच्या कल्पना आहेत अशाच कांहीं महत्वाच्या काळाचीं ग्रहस्थिति मुख्य धरून त्यावरून हा ज्योतिर्विद भविष्य करीत असावा अशी कल्पना करण्यास त्याचे आजचे लेख मदत करीत आहेत. असल्या महत्वाच्या Epochs कालासंबंधानें विचार करितां आमच्या कांहीं ज्योतिर्विद् बंधूनीं इकडे लक्ष दिल्यास त्यांना कांहीं कल्पना सुचणें शक्य आहे. आपणाकडे हल्लीं प्रचारामध्यें तीन असले महत्वाचे काळ Epochs दिसत आहत व या तीन महत्वाच्या काळावरून एकाद्यानें गणित करून ग्रहस्थिति वगैरे प्रसिध्द केल्यास त्याची राष्ट्रीय ज्योतिष विभागास बरीच मदत होईल. आमचे मतें खालील कालांचो ग्रहस्थिति विचार करण्यासारखा असली पाहिजे.

(१)**कलियुगारंभः**-प्रत्येक पंचागामध्यें आतांपर्यंत कलीचीं किती वर्षें गत झालीं हें देण्याचा सांप्रदाय आहे. हींच वर्षें खरोखर खरीं झालेलीं आहेत असें मानून कलियुगारंभ कालची कुंडली ही वर्ल्ड हरोस्कोप--**जगल्लग्न कुंडली धरण.** अर्थात ही कुंडली सुर्योदयाची येईल किंवा पुराणांत

असलेल्या इतर पुराव्यावरून येणाऱ्या दुसऱ्या कालाचो असूं शकल. हा काल त्या वेळेच्या मेष-संक्रमणाचा देखील असूं शकल.

(२) **विक्रम संवत्सरारंभाची कुंडली**:--विक्रम संवत १ हा जेव्हां सुरू झाला त्या काळची म्हणज कार्तिक शुध्द प्रतिपदेच्या सूर्योदयाची किंवा ज्यास्त शास्त्रोक्त पध्दतीने मानणें असतां प्रतिपदेच्या अगोदर होणाऱ्या अमावास्येची कुंडली हा मुख्य कुंडली घेणें.

(३) **शालिवाहन शकारंभकालाची कुंडली**-शालिवाहन शक, जेव्हां सुरू झाला त्या कालची सूर्योदयाची किंवा चैत्र शुध्द प्रतिपदेची किंवा त्याचे अगोदर झालेल्या अमावास्येची कुंडली घेणें. असो, इकडे कोणाचे लक्ष जाईल काय ?

× ×
×

सौर वर्षाचा आरंभ **मेष** संक्रमणानें होतो व मेष संक्रमण कालच कुंडलीवरून त्या वर्षामधील होणाऱ्या घडामोडीचा विचार करण्याचा आज सरेरास प्रचार आहे. परंतु मेष संक्रमण कालच्या कुंडलीवरून सर्वच गोष्टी कळतात काय, तसेंच त्या कुंडलीचा अमल १२ महिनेपर्यंत खरोखर राहतो काय वगैरे अनेक विचार आज विचारी ज्योतिर्विदांपुढें आहेत, व हल्लीं उपलब्ध असलेल्या साधनानें लांबच्या काळामध्यें होणाऱ्या घडामोडी, राष्ट्राचो स्थित्यंतरें, दुष्काळ, अवर्षणें, इत्यादि अनेक गोष्टी निश्चित सांगतां येतात किंवा काय याचा प्रत्येकानें आपले मनाशीं विचार करून पाहावा. मेष संक्रमणकालाचा काळ अगदी ततोतंत काढतां येत असून देखील राष्ट्रीय ज्योतिष्यामध्यें कसा मार खाण्याचा प्रसंग यतो याची कल्पना या क्षेत्रामध्यें भविष्य करण्याचे रणांगणावर पाऊल टाकलेल्या

खेरीज इतराला कळणार नाहीं. आमचे **मेदिनीय ज्योतिष** किंवा **राष्ट्रीय ज्योतिष** नांवाचे पुस्तकामध्यें हा विषय व्यवस्थित व पध्दतशीर मांडला असून आज तो महाराष्ट्र वाचकांसमोर दहा वर्षें आहे; याचे पुढें कसें जातां येईल आणखी काय काय विचारामध्यें घेतलें पाहिजे वगैरे गोष्टींचा विचार करण्याचा हल्लींचा काळ आलेला आहे.

× ×
×

बृहत् ग्रहांचा अर्थात् नेपच्यून, हर्शल, व शनि यांचे निरनिराळ्या रांशीमधून होणाऱ्या भ्रमणानें व त्यांचे आपसांमध्यें घडत असलेल्या मोठ-मोठ्या योगानें कांहीं कांहीं ठळक भविष्यें करितां येतात हा गोष्ट खरी आहे. परंतु नुसत्या नेपच्यूनच्या भ्रमणानें--सिंह राशीमध्यें होणाऱ्या भ्रमणानें राजक्रांति होणार हें भविष्य आम्हीं अगोदर केलें होतें व तें किती तंतोतंत जुळलें आहे पहा असें म्हणून टिरी बडविण्याचा काळ आतां राहिला नाहीं. आम्हांला सुटसुटीत राष्ट्रीय भविष्य कसें करितां येईल, कोणत्या देशामध्यें कोणत्या लढाया होतील, त्या किती काळ राहतील, राजक्रांति होणार असल्यास ती कोणत्या देशांत होईल वगैरे अनेक गोष्टींसंबधानें अचुक भविष्य करितां आलें पाहिजे. व हा आमचा प्रयत्न जसजसा सफल होत जाईल तसतसें आम्हांस ज्योतिषशास्त्र जास्त उपयुक्त खात्रीनें करितां येईल. कांबळा भर अंतरावर नेम लागला असतां तो अचुक बरोबर लागला अशी फुशारकी मारण्याच्या मनूचा आतां अस्त झाला आहे.

× ×
×

चालू सन १९२५ साल कसें जाईल या संबंधाचें सविस्तर भविष्य मालेचे सहाध्यायी संपादक श्रीयुत **रामनारायण** यांनीं **वर्षप्रबोध**

वर्ष दुसरं यामध्यें केलेलें आज महाराष्ट्रापुढें गेल्या दोन तीन महिने आहेच, परंतु चालू मालेच्या जोड अंकामध्यें पूर्व संप्रदायाप्रमाणें आम्ही आमचे विचार थोडक्यांत मांडीत आहोंत व हे मांडित असतांना ज्या ज्या इष्ट सुधारणा करणें शक्य वाटत आहे त्याचाही विचार करण्याचें योजिले आहे. ज्यांनीं **वर्षप्रबोध** पाहिलें नसेल त्यांनीं तें अवश्य एक वेळ वाचून पहावे कारण त्यामध्यें अनेक गोष्टींचा सविस्तर खुलासा आलेला आहे.

× ×
×

पूर्वी सांगितलेंच आहे कीं सर्वसाधारपणें अमुक एक वर्ष कसें जाईल याचा विचार मेष संक्रमण काळचे कुंडलीवरून करितात तूर्त इतर साधना भावामुळें आम्हीं आमचे विचार रूढ असलेल्या पध्दतीला धरूनच मांडित आहोंत. चैत्र शुध्द प्रतिपदेला असलेल्या वारावरून रसाधिपति धान्याधिपति वगैरे वगैरे अनेक गोष्टी पाहण्यास आपल्या जुन्या ग्रंथांमध्यें सांगितल्या आहेत परंतु नुसत्या वाराधिपतिवरून आग्रधान्येश, पाश्चिमधान्येश, रसेश वगैरे ठरवून किती भविष्य तंतोतंत उतरेल यासंबंधानें शंका वाटते. भविष्य करण्याचे मार्ग इतके सोपें आहेत काय ? या संबंधानें चर्चा होणें अत्यंत आवश्यक आहे. जुन्या प्रकाराला धरून ठरलेल्या ठराविक साच्याचीं अनेक प्रासादिक भविष्यें प्रसिध्द होत आहेत परंतु अनुभवाचे दृष्टीनें त्यांचा विचार होणें जरूर नाहीं काय ? अमुक वारीं अमुक तिथीचा क्षय किंवा वृध्दि, तर एका महिन्यामध्यें पांच सोमवार किंवा पांच मंगळवार, अमुक संक्रात अमुक वारीं वगैर गोष्टीवरून फलादेश अचुक मिळेल काय ? त्यावरून भावाचा होणारी घडामोड कळेल काय ? वगैरे वगैरे प्रश्न विचारी ज्योतिर्विदांपुढें उभे राहणें शक्य आहेत. येथें हे सर्व प्रकार झूट आहेत

असें म्हणण्याचा आमचा मानस नाहीं तर जुन्या सर्व नियमांचा कसून विचार झाला पाहिजे असें आम्हांस वाटतें. दुष्काळ, सुकाळ, तेजी, मंदी व्यापार वाढणें, परराष्ट्राच्या निरनिराळ्या भानगडी उत्पन्न होणें, देशांत रोगराई वाढणें, मृत्युसंख्या जास्त होणें वगैरे गोष्टींचा विचार कर्तव्य असतां नुसत्या असल्या गोष्टीवर अवलंबुन राहून भागणार नाहीं.

× ×
×

राष्ट्रीय ज्योतिषामध्यें प्रत्येक निरनिराळे देशाचें भविष्य करणें असतां त्या त्या ठिकाणच्या मुख्य राजधानीच्या शहरांच्या अक्षांश रेखांशावरच्या कुंडल्या मांडून घ्याव्या लागतात किंवा याचे उलट असें निदान करितां येईल की संक्रमणें वगैरे कालच्या कुंडल्यांमध्यें येणारी अशुभ ग्रहस्थिति ज्या अंक्षाश रेखांशावर केन्द्रामध्यें येतात तरी ठिकाणीं तीव्र अनुभव देतात. म्हणजे संक्रमणादि कालच्या कुंडल्या एकाच अक्षांश रेखांशावरील मांडून सर्व जगाचें भविष्य तूर्त सध्यांतरी प्रसिध्द असलेल्या नियमानें खास करितां येत नाहीं; व म्हणून निरनिराळ्या अक्षांश रेखांशावर किंवा निरनिराळ्या स्थळीं ग्रह कसे बसतात याचा चांगला विचार भविष्य करण्यापूर्वी करावा लागतो. व म्हणूनच मुंबईच्या अक्षांश रेखांशावरून तयार केलेल्या कुंडलीवरून मद्रासकडे होणाऱ्या जलप्रलयाचे किंवा उत्तर हिंदुस्थानामध्यें होणाऱ्या दंगलीचें अचूक निदान करतां येत नाहीं. व याप्रमाणें हल्लींच्या उपलब्ध साधनानें एकटया हिंदुस्थानामधील अनेक भागांचें भविष्य करणें किती कठीण जात आहे याची थोडीबहुत कल्पना झाली म्हणजे मग जगाचें भविष्य करण्याचें काम किती दीर्घ प्रयासाचे आहे याची थोडी तरी कल्पना करितां येईल. परंतु याकडे भविष्य करणारांचें लक्ष्य आहे असें

दिसत नाहीं. स्थल व कालासह भविष्यें फारच थोडयांच वर्षभविष्यामध्य दिसतात. सशास्त्र व चिकित्सक बुध्दीनें अभ्यास करून भविष्यें केलीं तर त्यानें राष्ट्राचा व शास्त्राचा फायदा होतो.

× ×
×

मेदिनीय ज्योतिषशास्त्रामध्यें मेष संक्रमणकालाची कुंडली किंवा इतर कुंडल्या विचारामध्यें घेते वेळीं त्या प्रमुख राजधानीच्या शहराच्याच घेतल्या पाहिजेत अशासंबंधानें उल्लेख पूर्वी केलाच आहे परंतु हिंदुस्थानासंबंधानें भविष्य करते वेळीं कोणत्या स्थळाच्या कुंडलीला प्राधान्य द्यावें असा प्रश्न साहजिकच उभा राहणें शक्य आहे. आमचे मतें **दिल्ली** अगर **हस्तनापुर** हे ठिकाण फार प्राचीनकाळापासून हिंदुस्थानचे राजधानीचे मानलें गेलें असून हल्ली तर गव्हर्मेन्टसीट--**राजतक्त** तेथेंच १९११ चे डिसेंबरपासून गेलें असल्यामुळें त्या स्थलाचीच कुंडली हिंदुस्थानचे राजकीय वातावरणासंबंधानें विचार करण्यास घेतली पाहिजे असें आम्हांस वाटतें. मुंबई, मद्रास, कलकत्ता वगैरे ठिकाणच्या कुंडल्या मांडल्या असतां त्या फक्त त्या त्या इलाख्यामधील होणाऱ्या घडामोडी दर्शवितील. चालू सालापासून दिल्लीची मेष संक्रमणकालची कुंडली कशी बसत आहे व त्यावरून राजकीय परिस्थितीचा कसा काय बोध होतो याचा विचार करण्याचें आम्हीं योजिलें आहे. अर्थात् यासंबंधानें आमचे विचार पूर्ण झालेले आहेत असें नव्हे तर आम्हांला ज्या गोष्टी द्याव्याशा वाटत आहेत त्या आम्हीं प्रांजलपणानें वाचकवर्गापुढें मांडीत आहों. आम्हांला आमचे वाचकवर्गही या कामामध्यें आपले विचार कळवितील.

× ×
×

सन १९२५ साल कसें जाईल ?

या गोष्टीचा विचार करण्याकरितां हातामध्यें पंचांग घेऊन ग्रहस्थितीचें निरीक्षण करूं लागलें म्हणजे या सालांतील कांहीं गोष्टी फार प्रामुख्यानें आपल्या डोळ्यासमोर उभ्या राहतात. (१) मुंबई शहराच्या राजधानीच्या माध्यान्हींच्या उदित अंशाजवळ नेपच्यूनचें भ्रमण. (२) सिंह २१ अं. ४४ क. २५ विकळेमध्यें तारीख ३१ जुलाई रोजीं नेपच्युन मंगळाची युति; (३) मुंबई शहराच्या लग्नीं उदित असणाऱ्या वृश्चिक २० अंशामधून शनीचें भ्रमण; (४) वृश्चिक २१ अं. ४ क. ४८ वि. मध्यें तारीख १५ रोजीं शनिमंगळांचो युति घडत आहे. (५) शनिगुरूमध्यें शुभ योग. (६) गुरु हर्शलमध्यें शुभ योग. (७) मुंबईशहराच्या दशम भावारंभीं उदित असलेल्या अंशावर तारीख ९ फेब्रुवारी रोजीं चंद्रग्रहण होतें व याच ग्रहणावर नेपच्युनमंगळांचो युति होणार असून या ग्रहणाचे केंद्रामधून शनीचें भ्रमण होणार आहे. (८) मेष संक्रमणकाळीं स्थिर राशी चारी केन्द्रावर यत असून स्थिर राशींतच लग्नांत मंगळ, चतुर्थांत राहु नेपच्यून, सप्तमांत शनि व दशमांत चंद्र असे ग्रह आपले इकडे बसत आहेत. (९) कर्क संक्रमणाचे वेळीं तृतीयस्थानामध्यें मंगळ कर्क राशीचा २७ अं. १३ कला आहे व याच अंशावर तारीख २१ जुलाई रोजीं सूर्यग्रहण होणार आहे.--हें ग्रहण आपलेकडे दिसणार नाहीं.

वरील गोष्टींचा विचार केला असतां हें वर्ष तापदायक व क्षोभकारक जाईल. रोगांच्या साथी, अपघात--रेलवेचे व इतर, नद्यांचे पूर, खाणीमध्यें अपघात, भूकंप इत्यादि हानिकारक प्रसंग प्रस्तुत वर्षांत पुष्कळ वेळां येतील. विशेषतः हिंदुस्थानांतील पूर्वेकडील प्रांतांत परमावधीचें जाचक हें वर्ष सर्वप्रकारानें होईल.

× ×
×

नेपच्यून हा ग्रह " Neptune produces democratic disturbances, anarchy, chaos, confusion. It tends to schemes and plots, " rings " and rigging of the markets. " गुप्तकारस्थानें, कट, राजद्रोह, पैशासंबंधानें ठकवाठकवी, दिवाळखोरी, आणि समाजामधील अस्वस्थता याचाच कारक ग्रह आहे. व्यापारामध्यें कारनर होणें-एक हातीं माल करून भाव वर नेणें इत्यादि गोष्टी घडतात. व जेव्हां जेव्हां नेपच्यून मंगळांची युति किंवा अशुभ योग घडतो त्या वेळीं चळवळे लोकांच्या चळवळीनें देशांत अस्वस्थता वाढते. गुप्त कारस्थानें, खून, मारामाऱ्या, विषप्रयोग आणि अत्याचार घडून येतात; भयंकर स्वरूपाची रोगराई पसरते. चालू वर्षीं हिंदुस्थानामधील एका मोठ्या राजधानीचे माध्यान्हीं ही ग्रहस्थिति काय अरिष्ट ओढवून आणते हें पाहणें आहे. इतकें मात्र खास म्हणतां येईल कीं या योगानें राजकीय वातावरण बरेंच अनिष्ट आहे. जसें दशमस्थानावरून राजकीय वातावरणाचा बोध होतो तसाच अधिकारी वर्ग, देशीसंस्थानें--मांडलिक राजे यांचाही संबंध येईल व म्हणूनच वरील योगाचा विचार करितां इलाखाधिपति, अंमलदार राजे, महाराजे यांचे संबंधानें भानगडीच दिसत आहेत. राजकारभाराचे शकटामध्यें गोंधळ माजणें साहजिकच आहे. जुलाई महिन्याचा शेवटला आठवडा व डिसेंबर महिना यांमध्यें बरीच भानगड खळबळ उडेल व एखादा मोठा रेलवेचा अपघात किंवा असाच कांहीं अनर्थ कोसळेल.

× ×
×

शनीमुळें--" Saturn brings famine, failure of crops, disasters of various sorts, and national depression due to political reverses and general

want of discontent. Its effects on the market is to produce a marked depression or deflation of security values " देशांत रोगराई उत्पन्न होते, दुष्काळ, दारिद्र्य वाढतें, अस्वस्थता प्राप्त होते, देशाला अपयश मिळतें व त्यामुळें त्याचा दर्जा कमी होतो, त्यामुळें उद्योगधंदे मंदावतात व त्या देशाच्या कर्जरोख्यांची व नाण्याची किंमत कमी होते. लग्नाच्या उदित अंशावरून होणाऱ्या शनीचें भ्रमणामध्यें मंगळाच्या युतियोगानें अग्नीमध्यें तेल ओतल्यासारखें होणार आहे. हा योग अत्यंत अनिष्ट आहे. या योगामुळें अधिकारारूढ पक्षांस फार त्रास होतो. प्रजेमध्यें असंतोष व अस्वस्थता रहाते. चोऱ्या मारामाऱ्या, खून व दरवडे यांना ऊत येतो. या योगाचीं बरींच अशुभ फलें सन १९२६ सालामध्यें दृष्टीला पडतील.

वर वर्णन केलेले योगामुळें भूकंपापासून भयंकर गडबड उडेल; आपलेकडील रेखांश ७८ च्या आजूबाजूला असणारा पूर्वेकडील प्रदेश व पश्चिम रेखांश १२ व पूर्वरेखांश १४१ या प्रदेशामध्यें काय काय स्थित्यंतरें घडतात हें पाहणें आहे. ज्यालामुखीचे स्फोट, भूकंप, मोठाले उत्पात व अनेक अरिष्टें कोसळलीं पाहिजेत हें मात्र निर्विवाद आहे.

× ×
×

नेपच्युनचा व मादक पदार्थांचा बराच संबंध असल्याचें पाहण्यास मिळतें. नेपच्युन हा ग्रह पीडित होऊं लागल्यापासून मादक द्रव्यांचा खप कसा कमी होईल यासंबंधानें जास्तच वाटाघाट सुरू झालेली आहे व जिनिवा येथील अफिण परिषदेबद्दल आज काल बराच खल चाललेला आहे. व या वर्षी नेपच्यूनमंगळांची युति व पुढील वर्षी १९२६ मध्यें नेपच्युन शनीचा केन्द्रयोग जानेवारी व मे, नव्हेंबर या तीन महिन्यांमध्यें तीन

वेळां होणार आहे त्या वेळीं आणखी किती कष्टकारक बंधनें निर्माण होतात हें पाहणें आहे. बहुशा मादक द्रव्यांचे क्रय विक्रयासंबंधानें फारच कष्टकारक निर्बंध उत्पन्न होतील. त्यांची पैदास कमी होईल व त्यामुळें त्यांचे भाव देखील वाढतील.

× ×
×

नेपच्युन सिंह राशीमध्यें पीडित होण्याला लागल्यापासून सुवर्ण, चहा, यांचे भावामध्यें बरीच घडामोड झालेली पाहण्यास मिळत आहे. त्यावरून पुढें १९२६ सालामध्यें चहाबाजांची काय त्रेधा उडते हें पाहणें आहे. पूर्वानक्षत्राचा अंमल नट, गायक, शिल्पी, व्यापारी, कापूस, मीठ, मध, तेलें वगैरेवर असल्याचें आचार्य वराहमिहिराने सांगितलें आहे. म्हणजे अझून व्यापारी, गायक, नट वगैरेंची साडेसाती सुटली नाहीं असें म्हटलें पाहिजे. नेपच्युन मंगळांच्या युतियोगानें भयंकर स्फोट होऊन नाटकगृहें, सिनेमागृहें, तेलाच्या खाणींमध्यें स्फोट, भयंकर अग्निप्रलय होणें शक्य नाहीं काय ?

कापूस जीन करणारे कारखाने, कापसाचीं कोठारें यांना देखील अग्निप्रलयाची फार भीति आहे. एकंदर पुढें कापसाच्या भावाचें प्रकरण बरेंच खास रंगणार आहे. अति वृष्टीनें कापसाची हानी तर अग्नीनें नाश असा दुहेरी संहार १९२५ व १९२६ सालांमध्यें दिसत आहे.

× ×
×

पंचमस्थानावरून विद्यार्थी, विद्यागृहें, शिक्षण संस्था, नाटकगृहें, गायन वादन शिकण्याच्या शाळा, शर्यती, जुगारगृहें, सर्कसी, देशांतील लहान मुलें, जन्म नोंद करणारी खातीं व विद्याखातीं यांचा बोध होतो मग

कालपुरुषाच्या पंचमस्थानावरून सिंह राशीवरून या गोष्टीचा विचार करण्यास काय हरकत आहे ? नेपच्युनचा धर्म भरती--भरभराट देण्याचाही आहे म्हणजे जावत्काल नेपच्युन या सिंह राशीमध्यें आहे तावत्काल वरील गोष्टींना भयंकर ऊत येईल हें खास. परंतु हा ग्रह मंगळानें युक्त असतां व शनीनें पीडित असतां काय होईल हे लवकरच पाहण्यास मिळणार आहे. शुभ ग्रहांचे शुभ दृष्टियोग कोणत्याही गोष्टीला स्थिरत्व देतात परंतु पापग्रहांचे केन्द्र प्रतियोगादि अशुभ योग चांगलाच वरवंटा फिरवितात. पहावें शनिमहाराज कसा काय तडाखा देतात तो.

× ×
×

वृश्चिक राशीचा अंमल शरीरांतील मलोत्सर्गक इंद्रियावर असल्याचें सांगितलें आहे मग राष्ट्रीय ज्योतिषांत वृश्चिक राशीनें शहरांतील ड्रेनेज सिस्टीम दर्शाविली जाते किंवा या राशानें ड्रेनेज डिपार्टमेन्टचा बोध होतो असें म्हटलें असतां खास चुकीचें होणार नाहीं. सन १९२५।२६ सालामध्यें याच वृश्चिक राशामध्यें शनि असून तो हर्शल व गुरूनें शुभसंबंधित आहे म्हणून लवकरच चालू असलेला ड्रेनेज संबंधाच्या रचनेचा नाश (शनि) होऊन तीमध्यें अत्यंत हितकर (गुरु) क्रांति व आश्चर्यकारक (हर्शल) नवीन सुधारणा कां होऊं नयेत ? वृश्चिकेमधल्या (अष्टमस्थानद्योतक राशि) शनीनें--मृत्युपावलेल्या--नाश झालेल्या वस्तूपासून नवीन जीवन--पदार्थ उत्पन्न होण्याची (गुरु) सुधारणा (हर्शल) कां होऊं नये ? मानवी आयुष्याला नवीन खतें, मलाचा उपयोग, वेस्ट प्राडक्टस्चा उपयोग कसा हितकर होईल यांचेकडे जगाचें लक्ष लागेल. मृत्यूसंबंधानें (वृश्चिकेमधला शनि) जास्त

हितकर ज्ञान (गुरूचा शुभ योग) व आश्चर्यकारक माहिती (हर्शलचा शुभ योग) लवकरच पुढें येईल असें वाटतें. किंवा मेलेल्या माणसांना जिवंत कसें करितां येईल याकडे लक्ष लागेल तर ज्योतिर्विद् मृत्यु कसा व केव्हां येईल, मेलेल्या प्राण्याची स्थिति काय असूं शकेल याचा विचार करूं लागतील व ज्योतिर्वाङ्मयामध्यें या बाजूनें चांगलाच प्रयत्न होईल. किंवा मेलेला प्राणी किंवा जीवात्मा केव्हां व कसा जन्म घेतो याची वाटाघाट चांगली जोरांत येईल.

× ×
×

कर्मठपणा (मकर--कर्मठ गुरु--धार्मिक आचारविचार) किंवा कर्मकांड हेंच अंतिम मोक्षाचें साधन आहे (मौन मोक्ष त्यांतील हर्शल) किंवा अमुक प्रकारानें कर्म केलें असतां तें मोक्षदायक होईल त्यांतील आचारविचार असे सुधारले पाहिजेत वगैरे वगैरे प्रमाणें चर्चा उत्पन्न होऊन त्यांत नवमताचा प्रसार होऊन त्याला स्थैर्यत्व (शनीचा शुभयोग) प्राप्त होईल. किंवा अमेरिका येथें अध्यात्मवाद चांगला जोरानें चालून हिंदुस्थानांतील एखाद्या धार्मिक संस्थेची तेथें स्थापना होईल. मठ किंवा मंदीर. मकर ही हिंदुस्थानाची किंवा भरतखंडाची राशि असल्याचें मानतात व या राशीचा अधिपति शनि हा गुरु (संपत्ति नाणें) हर्शलनें (सुधारणा) शुभसंबंधित होत असल्यामुळें; हिंदुस्थानाच्या नाण्याच्या व्यवहारासंबंधानें किंवा एक्सचेंज संबंधानें लवकरच इष्ट अशा सुधारणा होतील असें वाटतें. नवीनच तऱ्हेचें किंवा धरतीचें नाणें किंवा सुवर्णाचें नाणें व्यवहारामध्यें येण्याचा काल फार लांब आहे असें वाटत नाहीं.

× ×
×

शनि हा वृध्द मनुष्यें, जमीनदार, शेतकरी, मजूर, घरें दारें, खाणी व खनिज पदार्थ यांचा कारक ग्रह ज्योतिर्विङ्मयामध्यें सांगितला असल्यामुळें चालू सालीं व पुढें शनीला गुरु व हर्शल या दोन गोलांचा शुभ योग मिळत असल्यामुळें शेती, जमिनदारी, घरेंदारें, खाणी, खनिज पदार्थांचे धंदे यांना नवजीवन (गुरु--हर्शल) मिळेल. हे धंदे भरभराटीला येतील. शेतकीसंबंधानें सरकार जास्त लक्ष देईल, नवीन हितकर कायदे व सुधारणा येतील. शेतीला मान मिळेल, जमीन घरेंदारें यांच्या किंमती वाढूं लागतील. खाणीचे धंदे किंवा त्या धंद्याच्या कंपन्यांना चांगला काळ येऊन त्यांच्या किंमती वाढतील. हिंदुस्थानांतील (मकर--गुरु, मकरेचा आधिपति शनि शुभदृष्ट गुरूनें) खनिज संपत्ति जास्त उपलब्ध होईल, त्यासंबंधानें व्यवहार करणाऱ्या कंपन्या भरभराटीला येतील. खनिज द्रव्यानें हिंदुस्थानाची भरभराट होईल व नवीन कारखाने निर्माण होतील.

× ×
×

मेष संक्रमणकाळीं पूर्व क्षितिजावर वृषभ या स्थिर राशीचा १५ वा अंश दिल्ली येथें उदय पावत आहे. व त्यामुळें या संक्रमणाचा अंमल वर्ष अखेर पर्यंत राहील. क्यालडी चक्राप्रमाणें चक्राधिपति मंगळ व अब्दाधिपति शुक्र हे दोन ग्रह चालू वर्षीं कुंडलीमध्यें शुभसंबंधित बसले आहेत. वर्ष लग्नाचा अधिपति शुक्र हा लाभ भावामध्यें उच्चीचा असा हर्शलच्या तंतोतंत युतीमध्यें आहे. ग्रहमालेचा चालक रवि हा व्ययस्थानामध्यें पडलेला आहे. रवि हा राजपक्षाचा द्योतकग्रह व्ययस्थानामध्यें वर्षप्रवेश काळीं असणें चांगलें नाहीं त्यामुळें राजपक्ष निर्बळ राहील व त्यामुळें राजपक्षाचे प्रगतीला वारंवार विघ्नें व अडथळे उत्पन्न व्हावेत. त्याचप्रमाणें रवि व्ययस्थानामध्यें असल्यामुळें या वर्षी इस्पितळें, वर्कहाउसेस, दानसंस्था, तुरुंग यांसंबंधानें विशेष जागृती झालेली दिसेल. व वरील संस्थांसंबंधानें महत्त्वाच्या सुधारणा झालेल्या पाहण्यास मिळतील.

व्ययस्थानामध्यें पडलेला रवि हा प्रजापक्षाचा कारक ग्रह जो चंद्र त्याचेबरोबर अशुभसंबंधित आहे. चंद्र कुंभ या एकादशस्थानदर्शक राशीमध्यें आहे. त्यामुळें कौंसिलमध्यें प्रजापक्ष व राजपक्ष यांमध्यें एकवाक्यता न राहतां तीव्र विरोध पाहण्यास मिळेल. रवि हा दशमेश व एकादशेश जो शनि त्याचेबरोबर अशुभ संबंधित असल्यामुळें राजपक्षाच्या पराभवाचें अनेक प्रश्न उत्पन्न होऊन कौन्सिलमध्यें राजपक्षाला मार खावा लागेल. अधिकारी वर्गावर किंवा राजपक्षावर, कालाची--शनीची वक्र दृष्टी आहे त्यामुळें त्यांचेमध्यें बरेच मृत्यु घडतील. सुधारणेच्या कायद्यामध्यें प्रतिगामीच धोरण राजपक्षानें स्वीकारलेलें पाहण्यास मिळेल व त्यामुळें सरकार बरेंच अप्रिय झालेलें दिसेल. व्यापारधंदा चांगला जोरांत चालणार नाहीं. मजूरपक्षाला चांगले दिवस नाहींत. किंवा कामगारवर्गाला बराच अनिष्ट काल दिसत आहे. जनसमाजाची स्थिति चांगली राहणार नाहीं. मृत्यसंख्या वाढेल, रोगाच्या साथीनें भयंकर कहर होईल व त्यामुळें जनता फारच हवालदिल होऊन देशामध्यें अस्वस्थता माजेल. वृषभ राशीचा मंगळ लग्नामध्यें उदय पावत असून लोकपक्षाचा कारक ग्रह जो चंद्र तो या मंगळाबरोबर केन्द्रयोग करण्यास जात आहे त्यामुळें लोकमतामध्यें बराच क्षोभ पाहण्यास मिळेल. देशांत बरेच अत्याचार घडतील. मुनसिपालटयांचे व्यवहारामध्यें बरीच अस्वस्थता व भानगडी पाहण्यास मिळतील. एकादशस्थानामध्यें शुक्रहर्शलची जोडी गुरूनें शुभसंबंधित असल्यामुळें स्त्री कैदी, स्त्रिया, स्त्री मजूरवर्ग यांसंबंधानें महत्त्वाची सुधारणा कौन्सिलच्या द्वारें घडून

येईल. किंवा स्त्री कैद्यांनां वागविण्याचे नियमांत चांगलीच सुधारणा घडेल. धनाधिपति बुध मेष या राशीमध्यें व्ययस्थानामध्यें असून तो चंद्र व नेपच्युन बरोबर शुभसंबंधित आहे. त्यामुळें देशामधील कामकरीवर्ग व एकंदर सांपत्तिक स्थितीसंबंधानें चालू वर्षामध्यें बरीच चांगली वर्तमान पत्रद्वारा चर्या होईल. तसेंच कर, सुवर्णनिधी, एक्स्चेंज, देशामधील बेरोजगारीपणा, पोष्ट, टेलिग्राफ, ट्रामवे, रेलवे यांचे संबंधानें सुधारणा होऊन लवकर व सुखकर प्रवास कसा घडेल याकडे सर्वांचेंच लक्ष जास्त वेधेल. बुधाचे योगानें देशामधील पोस्ट, टेलीग्राफ, प्रीटिंग--छापखाने, ने आण करण्याचीं साधनें किंवा वाहनुकीची साधनें Transport Service यांचा विचार होतो; चालू वर्षी बुध मेष या आद्य, शर, अग्नि व धाडशी राशीमध्यें असून तो कुंभ या शास्त्रीय राशीमधील चंद्राबरोबर शुभसंबंधित असल्यामुळें या वरील गोष्टींना अगदीं नवीन वळण लागेल. चालू वर्ष वाङ्मयक्षेत्रामध्यें वागणारांना चांगलें असून वर्तमानपत्रें, छापखाने वगैरेंना अनकुल काल असून वर्तमानपत्रें फारच धडाडीनें काम करतील. यंदाच्या वर्षामध्यें शास्त्रीय विषयांवर चांगलीं पुस्तकें प्रसिध्द होतील. नवमामध्यें गुरूसारखा शुभ ग्रह आहे. परंतु त्याचे बरोबर बुध व्ययस्थानामधन केन्द्रयोग करीत असून लग्नामध्यें मंगळ उदय पावत असल्यामुळें धार्मिक पंथ, व तंटे यांचे मध्यें अझून समेट होण्याचा काळ आला आहे असें वाटत नाहीं. स्त्री वर्गाचा कारक ग्रह चंद्र हा नेपच्युननें पीडित आहे तसाच शुक्र हाही हर्शलनें युक्त असल्या कारणानें इष्कावा प्याला तर बहकलेला तरुण किंवा तरुणी यांचे लीलावैचित्र्यवर्णन करणारांना बराच अनुकूलकाल मिळत आहे. स्त्रीशिक्षण व विद्यार्थिनी यांचे संबंधानें कांहीं तरी चांगल्या सुधारणा झालेल्या पाहण्यास मिळतील. नाटक, सिनेमा वगैरेंना बराच चांगला काळ जाईल व याच

ठिकाणामधून इष्काचा परिपोषक रंग बोकाळेल. स्त्रियांना फसवून अनितीपथाला लावल्याच्या बऱ्याच गोष्टी चव्हाटयावर येतील.

चतुर्थामध्यें नेपच्यून राहूची जोडी सप्तमांत वृश्चिकेचा शनि दशमांत चंद्र केतु व लग्नांत मंगळ असें खलग्रहांचें स्थिर राशींमधून साम्राज्य माजत आहे त्यामुळें चालू वर्ष १९२५ स्मृतीपटावर चांगलेंच राहील व या वर्षामध्यें होणाऱ्या अनेक घडामोडी सहसा सर्वांच्या लक्षामधून जातील असें वाटत नाहीं. दुष्काळ, रोगराई, दरवडे, बंडें, मारामाऱ्या यांचा सुकाळ होऊन अतिवृष्टीनें जलप्रलय झालेला दिसेल. अकालीं अतिवृष्टी होणें हा एक या वर्षामधला मोठा योगच आहे.

राजभुवनाचा अधिपति शनि वक्र व वृश्चिक या द्वाड राशींत परराष्ट्रीयसंबंध द्योतक स्थानांत आहे. या योगावर परराष्ट्रीय प्रकरणांत सरकारी धोरण व आचरण राष्ट्र हानीकर होणार असें वाटतें. त्याचप्रमाणें आपसांतील दुही, फाटाफूट व कलह यांचा अतिरेक होईल.

मंगळ नेपच्यूनादि ग्रहांचा अनिष्ट योग ज्या स्थानांतून झाला आहे तीं स्थानें खालील गोष्टींचीं द्योतक आहेत.

(१) सामान्य लोक, देशांतील आरोग्य व देशाचा अंतर्गत व्यवस्था

(४) शेतीं, पोकें, वातावरण, हवामान, खाणी, खनीज संपत्ति.

(७) परराष्ट्रीय संबंध व दळवळण परराष्ट्रीय व्यापार, आपसांतील यादवी, लग्नसमारंभ व घटस्फोट (१०) सरकार, अधिकारी, राजमंडळ, राजघराणी, वगैरेंचा द्योत असल्यामुळें प्रस्तुत वर्ष या गोष्टींसंबंधानें अनिष्टच असें पहावयास मिळेल.

लग्नाधिपति शुक्र उच्च लाभभुवनांत असून तो गुरूनें शुभसंबंधित आहे. या योगावरोबर गुरु--शनि व गुरु--हर्शल हे दोन शुभयोग लक्षांत घेतां प्रांतिक व वरिष्ठ कायदे कौंसिलांत महत्त्वाचीं, संस्मरणीय,

चिरकाल स्वरूपाचीं कामें होतील असें वाटतें. लाभभुवनांतील शुक्रहर्शलांच्या युतियोगावर कौन्सिलांतील कामांमध्यें विचित्रपणाही दृगोचर होईल. धार्मिक स्वरूपाच्या सुधारणा, स्त्रियांचे हक्क, न्यायखातें, प्रोव्हो कौन्सिल, संशोधन कार्य, कामकरी वर्ग व विशेषतः डिप्रेस्ड क्लासेस यासंबंधानें कायदे, ठराव किंवा चर्चा प्रामुख्यानें होईल. परराष्ट्रीय व्यापार हुंडणावळ किंवा तत्तम प्रश्न समाधानकारक रीतीनें सुटतील अगर सुटण्याच्या मार्गास लागतील अशी आशा करण्यास जागा आहे. स्थानिक स्वराज्याच्या बाबतींतही बरीच प्रगति होईल. नवमस्थानांतील मकर राशींतील गुरु धार्मिक चळवळींना उत्तेजक आहे. हिंदूंचें संघटन, धार्मिक वाङ्मयाचा प्रसार, पुराण मताभिमान्यांचे प्रबलता, धार्मिक शिक्षणाचा प्रगति वगैरे गोष्टी प्रस्तुत वर्षांत अवश्य घडून येतील.

देशांतील शिक्षणसंस्थांना या वर्षी पंचमेश बुध व गुरु यांच्या केंद्रयोगानें प्रगतिकारक काळ दिसत नाही. शिक्षकांचा हल्लाखो कायम राहील ! जी स्थिति शिक्षणाचा तीच स्थिति देशांतील व्यापाराची. बुध धन व पंचम या दोन स्थानांचा अधिपति असून व्यय स्थानांत आणि गुरूच्या केंद्रांत आहे. बुध चंद्रांचा शुभ योग आहे परंतु हे दोन्ही ग्रह दुसऱ्या ग्रहांनीं पीडित असल्यामुळें विशेष फायदेशीर होतील असे वाटत नाही.

लंडन येथें पूर्वक्षितिजावर मकर राशीचा १३ वा अंश उदय पावत असून तेथें गुरूसारखा शुभग्रह उदय पावत आहे. चंद्र केतु युति लग्नांतच बसत आहे. रवि बुध धन स्थानांत बसत असून शुक्र हर्शलची जोडी तृतीयस्थानामध्यें बसत आहे. परंतु मंगळाचा स्वारी चतुर्थामध्यें येत असून शनिमहाराज दशमस्थानामध्यें येत आहे. दशमांत असलेला शनि हा रवि व चंद्र बरोबर अशुभसंबंधित आहे, ही स्थिति जरा चिंताजनक वाटते. या योगानें इंग्लंडमध्यें राजपक्षाचा पराभव होईल व राजकीय कुटुंबामध्यें मृत्यु घडतील. अधिकारारूढ मोठ्या माणसांचे मृत्यूनें हें वर्ष संस्मरणीय जाईल. लग्नांत गुरु उदय पावत असून शनिबरोबर सुप्तसंबंधीत असल्यामुळें उद्योगधंदा सांपत्तिक स्थिति याला वर्ष चांगलें लाभकारक जाईल. खाणींतील पदार्थ कोळसा लोखंड इत्यादि खनिज द्रव्यें यांना चांगला भाव येईल. व त्यासंबंधाचे उद्योगधंदे भरभराटीला येतील. चंद्र हा शनीबरोबर केंद्रयोग करीत असून तो मंगळ व नेपच्यूनबरोबर अशुभ योग करण्यास जात असल्यामुळें इंग्लिश जनतेमध्यें असंतोष हा राहीलच. चतुर्थामधील पीडित मंगळ हा शेती वगैरे गोष्टीला चांगला नाही व हें एक धान्य कमी उत्पन्न होण्याचें मोठेंच कारण आहे. सप्तमस्थानामध्यें असलेला नेपच्यून हा परराष्ट्राबरोबर होणाऱ्या दळणवळण, तह वगैरे मध्यें अनेक भानगडी दर्शवीत आहे.

चालू वर्षी पूर्वरेखांश १० वरच्या बाजूकडे व विशेषतः रशिआ, आयरलंड, इटली वगैरे प्रदेशांमध्यें भूकंपापासून उपद्रव होईल व एटना व्हेसुविअस वगैरे ज्वाला मुखांचे पर्वतामध्यें उद्रेक पाहण्यास मिळतील.

न्यूयार्क येथें शनि लग्नांत उदय पावत असून मंगळ अस्ताला जात आहे; ही स्थिति खास चिंताजनक आहे. यंदा अमेरिकेचें परराष्ट्राबरोबरील धोरण कसें काय राहतें हें पाहणें आहे. शुक्र हर्शलची जोडी चतुर्थामध्यें बसत आहे त्यामुळें अत्यंत वृष्टी झाल्यानें पिकांची नासाडी झाल्याच्या खबरा येऊं लागतील. व त्यामुळें आपलेकडील व्यापारी धोरणामध्यें भयंकर घडामोडी होतील. एप्रिल मेच्या सुमारास अमेरिकेमध्यें कापसाकरितां यंदा पुष्कळच जमिनींत लागवड केली आहे, हवा ठीक आहे असे रीपोर्ट येऊन जूनपर्यंत कॉटन मार्केट मंदीकडे गेलेलें पाहण्यास मिळेल.

परंतु तारीख ९ जुलाई नंतर कॉटन मार्केट निराळेंच घोरण घेईल व पीक बुडालें अशा तऱ्हेच्या खबरा येऊं लागल्यामुळें आगस्ट नंतर मार्केट चांगलेंच तेजीमध्यें गेलेलें पाहण्यास मिळेल.

मेष संक्रमणानंतर

ता. २४मार्चला रवि-चंद्र संयोग होतो. या वेळीं बुध-हर्शल-शुक्र व रवि--चंद्र हे पांच ग्रह षष्ठांत व अष्टमांत मंगळ अशी ग्रहस्थिति बसते. षष्ठांतील ग्रहाधिक्यामुळें कामकरी व मागासलेल्या वर्गासंबंधानें महत्वाचे प्रश्न उद्भवतील. प्रस्तुत कुंडलीतील वक्र शनि या वेळची देशांतील सांपत्तिक स्थिति अत्यंत निकृष्ट दाखवितो. या वेळीं व्यापार मंदावेल, नाण्याचा तुटवडा पडेल, व सरकारी रोख्यांचा भाव उतरेल. कायदेकौंसिलामध्यें नेपच्यूनच्या स्वभावाप्रमाणे लोकपक्षांतून विश्वासघात केल्याचें आढळून येईल.

ता. २३ एप्रिल रोजीं होणाऱ्या रवि--चंद्र संयोग काळीं मार्गील संक्रमण काळाप्रमाणेंच धनस्थानांत शनि बसतो. धनस्थानांत होणाऱ्या या दारिद्र्यवर्धक योगाचा पुनरावृत्तीनें देशांतील सांपत्तिक स्थिति चिंताजनक होईल हें स्पष्ट दिसतें. असाच योग पुन्हां

जून महिन्यांत होणाऱ्या रवि चंद्र संयोग काळीं होत आहे हें फार अनिष्ट आहे. सारांश वर्ष--प्रवेशानंतर निदान तीन महिने तरी सांपत्तिक स्थिति सुधारण्याचा यत्किंचितही आशा नाहीं येवढेंच नव्हे तर या तीन महिन्यांत लाभस्थानही सारखें दूषित होत असल्यामुळें कौन्सिलामार्फत जनतेच्या खऱ्या हिताचें प्रश्न प्रस्तुत काळांत सुटणें दुरापास्त आहे.

कर्क संक्रमण ता. २२ जून रोजीं पहांटेस ३--४१ वाजतां रवि सायन कर्क राशींत प्रवेश करील. या वेळीं रवि, बुध, शुक्र व चंद्र कर्क राशींत धनस्थानीं असून चंद्र--हर्शल त्रिकोण व चंद्र--गुरु प्रतियोग असे दृष्टियोग होत आहेत. त्यांपैकीं शेवटचा योग जवळ जवळ तृतीयस्थानांत होत असल्यामुळें सामान्येंकरून या संक्रमणाचा अंमल असेपर्यंत देशाची सांपत्तिक स्थिति व सरकारी वसूल यांचा याच काळांतील नेहेमीच्या स्थितीपेक्षां पुष्कळ समाधानकारक राहील. चतुर्थ भुवनांतील नेपच्यून अतिवृष्टि, पूर व अनिश्चित पर्जन्य यांमुळें अत्यंत हानिकारक ठरेल. अनपेक्षित कारणांमुळें अधिकारी वर्गास हा काळ फार जाचक जाईल. रेल्वेवरील अपघात, मजुरांची हल्लाखोरी, धनाढ्य व्यक्तींचे मृत्यु व परदेशच्या व्यापाराचें प्राबल्य हीं या काळांत अधिक दिसून येतील.

जुलै महिन्याच्या ता. २१ ला होणाऱ्या रविचंद्र संयोग काळीं तृतीय स्थानानें दर्शित अशा रेल्वे, पोस्ट, तारखातें वगैरे खात्यांना दुःस्थिति प्राप्त होईल. संप, अपघात वगैरेची फार भीति आहे. प्रस्तुतकाळीं धनस्थानांत शुभसंबंधित रविचंद्र असल्यामुळें ता. २१ नंतर महत्वाच्या घडामोडी होण्याचा संभव आहे. अधिकारीवर्गाची सत्ता बळावण्याचा योग प्रस्तुत कुंडलांत चांगलाच झाला आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. जनतेस व कामकरी वर्गास कष्टप्रद असा वृश्चिक राशीचा शनि अष्टमांत स्थित आहे.

आगष्ट महिन्याच्या १९ तारखेस होणाऱ्या रविचंद्र संयोग काळीं सप्तमभुवनांत रविचंद्र नेपच्यूनच्या युतींत असून सप्तमस्थानांतच बुध मंगळांचा युतियोग होत आहे. या दोन योगांवर परराष्ट्रीय घोरण किंवा परराष्ट्रांत गेलेल्या हिंदी लोकांचे हक्क संपुष्टांत येण्याचा अत्यंत संभव आहे.

या प्रकरणांत हिंदी राष्ट्राचा विश्वासघात होणार असें दुःचिन्ह दिसतें. परराष्ट्रीय संबंध व आपसांतील यादवी यामुळें देश खळबळून जाईल. सांपत्तिक घडामोडी अनिष्ट स्वरूपाच्या होतील.

सप्टेंबर महिन्याच्या १८ तारखेस होणाऱ्या रविचंद्र संयोगकाळीं रविचंद्र मंगळाबरोबर युतियोग व हर्शल बरोबर प्रतियोग करीत असल्यामुळें प्रक्षुब्ध राजकीय वातावरण, अधिकारारूढ पक्षास विरोध, मोठ्या प्रमाणावर अपमृत्यु व बालमृत्यु, कौंसिलांतील सभासदांचें मृत्यु मायेफिरूंचे अत्याचार वगैरे प्रकार घडतील. नवे धार्मिक ग्रंथ, वाङ्मय चर्चा व लेखक वर्गास अनुकूल परिस्थिति या काळांत दिसून येईल. सट्ट्यांचे व्यवहार करणारांचीं दिवाळी वाजलेली दिसून येतील. याच सुमारास देशांतील आरोग्य बिघडेल; रोगांच्या साथींनें जनता त्रस्त होईल.

तुला संक्रमण ता. २३ सप्टेंबरला संध्याकाळीं ६ वाजून ३४ मिनिटांनीं सायन तुला राशींत संक्रमण करतों. यावेळीं प्रथम भावारंभीं मेषराशी उदय पावत असून व्ययस्थानांतील हर्शल व षष्ठ स्थानांतील मंगळ यांचा प्रतियोग होत आहे या योगावर कामकरी वर्गामध्यें संप, असंतोष व दंगे होऊन रक्तपातापर्यंतही मजल येईल. अष्टमांतील चंद्र मृत्युसंख्या जबर दाखवितो. राजभुवनांतील गुरु अधिकारी वर्ग, राजकर्ते व राजमंडळ यांस शुभावह होईल. देशामध्यें मायेफिरूंचे अत्याचार या वेळीं होण्याचा फार संभव आहे.

—:०:—

॥ श्रीसद्गुरवे नमः ॥

ज्योतिर्माला

आप्राचः कामरूपाद् द्रुहिणसुतनदप्लावितादाप्रतीचो
गान्धारात् सिंधुसार्द्राद्रघुवररचितादाचसेतोरवाचः ।
आकेदारादुदीचस्तुहिनगहनतः सन्तिविद्वत्समाजा
ये ये तानेष यत्नः सुखयतु समजान्कश्चमत्कर्तुमीष्टे ॥ १ ॥

अभिनवाऽऽवृत्ति } वर्ष ९ वें { अंक ३ ते ४.

श्रीशिवाजींची कुंडली व रा. करंदीकरांचें फलज्योतिष.

(लेखकः—राम नारायण)

श्री शिव छत्रपतीचा जन्मतिथी अनिश्चित असल्यामुळें इतिहास-संशोधकांमध्यें हल्लीं दोन तट पडले आहेत. जेथें शकावली प्रसिध्द होण्यापूर्वी शके १५४९ च्या वैशाख शुध्द पक्षामध्यें शिवाजीचा जन्म झाल्याचें निश्चित झाल्यासारखें होतें. तिथीसंबंधानें मात्र मतभेद होता. शुध्द वैशाखाची प्रतिपदा, द्वितीया, तृतीया किंवा पंचमी अशा निरनिराळ्या तिथी वखरींमध्यें नमूद केल्या गेल्या आहेत. लो. टिळकानीं वैशाख शुध्द प्रतिपदा गुरुवार उत्तर रात्र असा जन्मकाल ग्राह्य केला. सुप्रसिध्द फलज्योतिषी कै: चिटणीस यांनीं वैशाख शुध्द द्वितीया सूर्योदयात् गतघटि १० पळें १० हा काल फलज्योतिषानें उत्कृष्ट जुळतो म्हणून ग्राह्य धरिला व त्या काळाची कुंडली जुन्या जोतिर्मालेच्या १ ल्या वर्षाच्या पहिल्या अंकांत वर्णनासह प्रसिध्द केली. आठ वर्षांपूर्वी जेध्यांची शकावली प्रसिध्द झाली व तीवरून

पूर्वी प्रसिध्द झालेल्या तिथीच काय परंतु वर्ष, महिने व पक्ष हे अजोच चुकले आहेत असें कांहीं संशोधक म्हणूं लागले. या शकावलींत शिवजन्मासंबंधानें पुढें लिहिल्याप्रमाणें नोंद केली आहे.

" शके १५५१ शुक्ल संवछरे फाल्गुन वद्य त्रितीया शुक्रवार हस्त नक्षत्र घटि १८ पळे ३२ गड ५ पळे ७ ये दिवशी राजश्री शिवाजी राजे शिवनेरीस जन्मले." शिवजन्मकाल आमूलाग्र बदलण्यास जे आधार पुढें आले आहेत त्यांमध्यें वरील नोंद मुख्य आहे. तंजावर येथील बृहदीश्वराच्या देवळांतील **सन** १८०३तील शिलालेखांत जन्म शके १५५१ प्रमोद संवत्सर इंग्रजी वर्ष सन १६९८ असा दिलाआहे ! हा आधार जरी शिलालेखाचा आहे तरी त्याचें ऐतिहासिक प्रामाण्य कांडीच्या किंमतीचेंही नाहीं. संवत्सराचें नांव अजिबात चूक व इंग्रजी वर्ष तर शिवाजीच्या दुसऱ्या जन्माचें असल्यास न कळे ! संशोधक म्हणवून घेणारांनीं ह्या आधारावर भिस्त ठेवावी हें आश्चर्य आहे. जेथें शकावलीप्रमाणेंच दुसऱ्या एका शिवकालीन ग्रंथांत शके १५५१ फाल्गून वद्य ३ रात्रीं शिवजन्म झाल्याचा प्रसिध्द झाला आहे. हा ग्रंथ इतिहास ग्रंथ नसून काव्य ग्रंथ आहे. ग्रंथाचें नांव " शिवभारत " असें आहे. या ग्रंथांतील शिवजन्मासंबंधाचा एक श्लोक पूर्वी प्रसिध्द झाला होता त्यामध्यें

' भू--बाण--**रस**--चंद्राब्धैः संमिते शालिवाहने ' म्हणजे शालिवाहन शके १६५१ मध्यें जन्म झाला असें होतें परंतु आतां ही श्लोकपंक्ती हस्तदोषानें छापिली गेली व खरी पंक्ति----

' भू--बाण--**बाण**--चंद्राब्धैः ' अशी पाहिजे असें ता. ३१ मार्चच्या केसरींत प्रसिध्द झालें आहे. बहुतेक सर्व बखरकार शिवजन्म

शके १५४९ त वंशाखांत झाल्याचें लिहितात व वर उल्लेखिलेली शकावली व शिवभारत शके १५५१ फाल्गुन वद्य ३ असा काल देतात. (बृहदीश्वरीय शिलालेख जमेस धरण्याचें कारण नाहीं. कारण वर नमूद केलेंच आहे.) यांपैकीं दुसरा काळ खरा आहे म्हणून केसरीमध्यें कांहीं विद्वानांच्या सहीनें शिवजयंत्युत्सव फाल्गुनांत करण्याविषयींचें विनंति पत्र प्रसिध्द झालें होतें. उलट प्रो. यदुनाथ सरकार, राजवाडे, सरदेसाई, पांगारकर वगैरे अनेक इतिहासज्ञांस नवीन तिथि प्रमाण नसल्याचें प्रसिध्द झालें आहे. जुन्या बखरकारांनीं दिलेला शक व महिना सरकार, राजवाडे वगैरे संशोधकांनीं ग्राह्य केला तो केवळ श्रीयुत ज. स. करंदीकर म्हणतात त्याप्रमाणें जुनें मत सहसा कोणासही मोडवत नाहीं. गेलीं शेंपन्नास वर्षें जी जन्मतिथी खरी मानून आपण चाललों ती चुकीची कशी मानावी ? ह्या कारणास्तवच असेल असें वाटत नाहीं. बखरकारांसंबंधानें अविश्वसनीय म्हणून निष्ठुरपणानें लिहिणारे सरकार काय किंवा राजवाडे काय याच बाबतींत त्यांना ग्राह्य मानतात याचें कारण नवीन जन्मतिथी संबंधानें असलेला आधार इतका मजबूत नाहीं व जुन्या तिथीविषयींचा आधार तितका कमकुवत नाहीं हेंच होय. असे दोन्ही बाजूंच आधार पाहून आम्हांस वाटतें, नव्या तिथीविषयींचा मुख्य आधार जी शकावली तिच्यांतील शिवजन्माच्या नोंदीबरोबर दुसऱ्या गोष्टींचीही नोंद केली आहे. त्यांपैकीं इब्राईम आदिलशा शके १५४९ त मेला असून तो १५५१ त मेल्याचें शकावलीकार लिहितो. या चुकीसंबंधानें रा. करंदीकरांचें केसरीतील भाष्य बिलकुल समाधानकारक नाहीं. हें भाष्य वाचूनही शकावलीकारानें चुकीनें इब्राईम अदीलशहाचा मृत्यु नमूद केला आहे असा कायमचा ग्रह होतो व त्याबरोबरच शिवजन्माच्या शकाबद्दलही संशय दुणावतो. सारांश

बखरकारांच्या पदरांत खोटयाचें माप टाकण्याइतका पुरावा नवीन मतवाद्यांच्या हातीं लागला नाहीं हें निर्विवाद आहे. शके १५४९ वैशाख शुध्द प्रतिपदा, द्वितीया, तृतीया किंवा पंचमी ह्या तिथींपैकीं फलज्योतिषशास्त्रदृष्टया कोणती तिथी ग्राह्य करावी याचा ज्योतिष्यांनीं विचार करण्यासारखा आहे. ज्योतिर्मालेच्या अनेक वाचकांपैकीं एखाद्यास तरी या बाजूनें काम करण्याचा स्फूर्ति होईल काय ? ज्योतिर्मालेचा जन्म शिवाजीच्या कुंडली-वर्णनानेंच मुद्रांकित झालेला असल्यामुळें शिवजन्म कालाच्या ग्रह स्थितीची चर्चा मासिकाच्या संपादकांनीं व वाचकांनीं मोठया हौसेनें केली पाहिजे. ऐतिहासिक पुरावा कितीही असो परंतु रा. ज. स. करंदीकर यांना शिवजन्म शके १५५१ फाल्गुन व. ३ या दिवशीं झाला असें निश्चित वाटतें. विशेषतः शिवभारत काव्यामध्यें रात्रीं जन्म झाल्याचें लिहिल्यामुळें त्यांनीं सूर्यास्तानंतर १८ घटका १५ पळें या कालाची कुंडली वर्णनासह स. १९२५ च्या जानेवारीच्या चित्रमय जगताच्या अंकांत प्रसिध्द केली आहे. करंदीकरांचा हा लेख व या लेखाच्या कांहीं आक्षेपांस त्यांनीं दिलेलें उत्तर यांमध्यें आलेल्या फलज्योतिषाचें निरीक्षण प्रस्तुत निबंधांत करण्याच आम्हीं योजिलें आहे.

फाल्गुन वद्य ३ स रात्रीं जन्म झाला हें निश्चित परंतु रात्रीं कोणत्या वेळीं जन्म झाला हें जन्मोत्सव करणाऱ्यांच्या सोयीसाठीं ठरविण्याचा रा. करंदीकरांनीं आपल्या लेखांत प्रयत्न केला आहे. व या प्रयत्नाचें फळ म्हणजेच वर दिलेला काळ होय. या प्रयत्नांत फलज्योतिषाचा आधार म्हणून नमनादाखलच कीं काय पहिला आडाखा ते देतातः----

"मार्च महिन्यांत मंगळवारीं जन्मलेला पुरुष योध्दा होतो आणि शुक्रवारीं मंगळाचाच होरा असल्यानें फाल्गुन वद्य ३ शुक्रवारीं रात्रीं शिवाजीचा जन्म मंगळाच्या होऱ्यांत झाला असला पाहिजे."

मार्च महिन्यांत मंगळवारीं जन्मलेला पुरुष योध्दा होतो याला आधीं फलज्योतिषाचा आधार काय ? या वाक्यांत 'मार्च' आल्यानें हें मत एखाद्या भारतीय ऋषीचें किंवा आचार्याचें असूं शकणार नाहीं हें निर्विवाद. कदाचित रा. करंदीकरांना तसा अनुभव आला असेल परंतु हें शिवाजीच्या बाबतींत त्यांनीं अशा कांहीं खुमारीनें गोंवून दिलें आहे कीं त्यांची तारीफच केली पाहिजे. **शिवाजी** योध्दा होता पण नव्या तिथीस अनुसरून त्याचा जन्म स्त्रीकारक अशा शुक्राच्या वारीं झाला असला तरी मंगळाच्या निदान होऱ्याचा उतारा सांपडला हें ठीक झालें. शिवाजीस जन्म वेळ नक्की ठरविण्याकरितां स्वयंनिर्णित मार्चाच्या मंगळावरून भरारी मारली ती होऱ्यावर थांबली. शुक्रवारच्या--मंगळवारच्या नव्हे--होऱ्याला पकडलें. शुक्रवारीं रात्रीं मंगळाचे दोन होरे येऊं लागल्यावर पहिल्या होऱ्याच्या वेळीं लग्न सिंह किंवा कन्या येऊं लागलें " या दोघांलाही राजयोग जसा साधावा तसा साधत नाहीं आणि शिवाजी महाराजांच्या इतरही गोष्टींशीं मेळ बसत नाहीं " असें म्हणून सिंह, कन्या, तूळ व वृश्चिक या राशी बाजूला काढल्या. या चार राशींपैकीं एकीलाही शिवाजीच्या कुंडलींत तनुस्थानीं बसण्याचा अधिकार कां नाहीं याचीं मजेदार कारणें लेखकांनीं दिलीं आहेत. तीं वाचून वाचकांस निदान करमणूक तरी वाटेल हें खास.

सिंह राशीची नालायकी.

(१) जन्मलग्न सिंह मानल्यास चतुर्थांत वृश्चिक राशी येते व तेथेंच केतु येतो.

(२) चतुर्थावर कोणत्याही शुभग्रहाची पूर्ण दृष्टी नाहीं.

(३) चतुर्थ स्थानाचा कारक ग्रह चंद्र असून वृश्चिक ही त्यांची नीच राशि आहे.

(लग्नाची राशि ठरवितांना चतुर्थस्थानाचें विवेचन चतुर्थातल्या वृश्चिक राशीच्या गूढांत मग्न झाल्यामुळें तें लग्नाकडे कसें लावावें हें सांगण्याचें अजिबातच राहिलें !)

(४) **सिंह राशीला शनीचें फळ मिळत नाहीं** आणि या कुंडलींत तर शनि हा एकच ग्रह उच्च राशींत आहे.

टीप:----याचें स्पष्टीकरण केसरींत केलें आहे तें असें:----' सिंह राशीचा स्वामी रवि असून तो शनीचा शत्रु असल्यामुळें सिंह राशीस शनीचें फल मिळत नाहीं.'

(५) तनुस्थानाचा अधिपति रवि शत्रुगृहीं व सप्तमांत म्हणजे अस्तंगत होतो.

(६) रवि व चंद्र यांपैकीं एकाचीही दशमावर दृष्टी नसून त्यांचा शत्रु राहु दशमांत बसला आहे.

कन्या राशीची नालायकी.

(१) कन्या लग्नींच चंद्र असल्यामुळे लग्न कुंडली व राशि कुंडली ही एकच होतात. या पृथक् असल्यानें अशुभकारक योग टळण्यास मदत होते. व शिवाजी महाराजांच्या आयुष्यांत तसे अनेक प्रसंग आल्यानें जन्मलग्न कन्यालग्नाव्यतिरिक्त अन्य कोणतें तरी असावें असें अनुमान आहे.

(२) शिवाय सिंह रास व्ययांत जाते. ती तेथें असणें संभवनीय नाहीं.

वृश्चिक राशीची नालायकी.

वृश्चिक लग्नाविषयीं विचार करणें नको. जितके वाईट योग तितके यांत येत असून सामान्यतः वृश्चिक राशीही टाकाऊच मानली जाते.

वर लिहिल्याप्रमाणें कांहीं मोघम, कांहीं क्षुद्र व कांहीं भ्रामक अशीं कारणें नमूद करून शेवटीं रा. करंदीकर धनु लग्नावर येऊन ठेपले व हीच राशि त्यांनीं कायम केली. खऱ्या वा खोट्या कारणास्तव ज्या राशि त्यांनीं नापसंत केल्या त्यांपेक्षां धनु लग्नाचो कुंडली तरी शिवाजीच्या आयुष्यक्रमाशीं जुळते किंवा नाहीं हेंच ठरविणें महत्वाचें असल्यामुळें वरील कारणपरंपरेचा विचार करण्याचें आम्ही सोडून मुख्य मुद्याकडे वळतों.

रा. करंदीकरांच्या मतें शिवाजीची (निरयण) कुंडली.



मिति फाल्गुन कृष्ण ३ शके १५५१ सूर्योदयात् गत घटी ४७--१५ धनु लग्न ७ अंश ५१ कला.

पष्ट ग्रह.

रवि	चंद्र	मंगळ	बुध	गुरु
१०-२२-१५,	५-२६-५१,	२-१६-५१,	११-७-४३,	१०-६-५१

शुक्र	शनि	राहु	केतु
०--६--५५,	६--१९--३७,	१--२९--५१,	७--२९--५१.

वरील कुंडलींत अनेक शुभ योग असल्यानें शिवाजीमहाराज राज्यपद पावून अखंड कीर्ति करून गेले असें करंदीकर लिहितात. हे 'अनेक शुभ योग' क्रमानेंच पाहूं.

पहिला योग.—निरयण लग्न धनु राशीच्या ७ व्या अंशांत ठेऊन लग्नेश व भाग्येश रवि तृतीयस्थानीं ठेवण्यांत एक बरा योग साधला आहे. पण हा योग अंशात्मक नसून रवि--गुरूबरोबर नवमस्थ हर्शल प्रतियोग करीत आहे. रा. करंदीकर हर्शल व नेपच्यून या दोन ग्रहांना आपल्या निरयण कुंडलींत सामील करतात ते अनुक्रमें भाग्य व लाभ भुवनांत पडल्यामुळें भाग्योदयास उपकारक अशा समजुतीवरच दिसतें. परंतु रवि-हर्शल व गुरु-हर्शल यांचे प्रतियोग विशेषतः समुच्चयानें भाग्य-वृध्दीस अत्यंत अनिष्ट असतात ही सामान्य गोष्ट त्यांच्या अनुभवास आली नसेल काय ? आली नसल्यास ते हर्शल नेपच्युनांच्या भानगडींत पडले कशाला ? लग्नेश-भाग्येशांच्या योगाबरोबर हर्शल ग्रहाचा प्रतियोग आहे व भाग्येश हीन बली व शत्रुक्षेत्रीं म्हणून समुच्चयानें हा योग शिवरायांचा भाग्य दर्शक बिलकूल दिसत नाहीं. करंदीकरांनीं शक्य तितकी धडपड करून शिव छत्रपतींची जी उत्तम कुंडली मांडली व जिच्यांतील पहिल्या प्रतीचा योग म्हणून त्यांनीं ज्याला अग्रस्थान दिलें त्या योगाची मातब्बरी सामान्य प्रतीपेक्षां जास्त नाहीं हें वाचकांस कळून येईल.

दुसरा योग --" दशमस्थानांत चंद्र हा शुभ व राजयोगकारक ग्रह वर्गोत्तमीं आहे. ह्या स्थानाचा अधिपति बुध हा केंद्रांतच चतुर्थस्थानीं असून तेथून दशम भावावर त्याची पूर्ण शुभ दृष्टि आहे. चंद्र हा अष्ट-माधीश असला तरी तो वर्गोत्तमी असून दशमाधिपतीनें दृष्ट असल्यामुळें राजयोगाचा भंग होत नाहीं."

महाराष्ट्राच्या ज्ञात इतिहासांत कर्तृत्व व यश या दृष्टीनें शिव-छत्रपतीची बरोबरी करणारी व्यक्ति झालीच नाहीं असें म्हटलें तरी चालेल. अशा व्यक्तीच्या कुंडलींत दशमस्थानीं अष्टमेश ग्रह व तोही स्त्री ग्रह चंद्र व त्याला कन्या राशीसारखी स्त्रीण राशि आणि दशमेश नीच व तोही पाताल केंद्रीं अशी ग्रहस्थिति ठेवण्यांत रा. करंदीकरांनीं अजब चातुर्य लढविलें आहे यांत शंका नाहीं ! अष्टमेश दशमांत व दशमेश नीच असा ग्रहयोग घेऊन आलेल्या व्यक्तीच्या हातून पांगलेल्या मराठ्यांचें राष्ट्र बनतें हें सांगणें साधें ज्योतिष खास नाहीं ! हा योग शिवाजीच्या कर्तृत्वस्थानीं ठेवतांना करंदीकरांना कांहींच दिक्कत वाटली नाहीं याबद्दल सखेदाश्चर्य वाटतें. नव्या तिथोचा वृथा अभिमान त्यांनीं धरला नसता तर ज्योतिष-शास्त्रदृष्ट्या त्यांच्या हातून इतकी अक्षम्य चूक झाली नसती. ज्या स्थानाला **कर्मस्थान** अशी संज्ञा आहे त्या दशमावरून उद्योग, स्वातंत्र्य, महत्वाचीं कार्यें, यश, राज्यप्राप्ती वगैरे गोष्टींचा विचार करीत असल्यास शिवछत्र-पतींच्या कुंडलींत दशमेश नीच ठेऊन फळें जुळतात असें ते म्हणत असले तर त्यांची धन्य आहे ! प्रस्तुत योगांतील चंद्रग्रह मंगळाकडून पीडित ही गोष्ट तर रा. करंदीकर मुळींच लक्ष्यांत आणीत नाहींत. " कन्यायां कुजदृष्टे **मातुरनष्टं** शशी कुरुते" असें **सारावलीकार** म्हणतो. त्याचा अनुभव शिवाजीला मातृसौख्य ऊत्कृष्ट होतें असाच करा-वयाचा ना ? करंदीकरांच्या मतें चंद्र बुध नवांशांत आहे व त्यावर मंग-ळाची दृष्टि आहे. या योगांचीं फळें सारावलीकाराच्याच शब्दानें सांगतों.--

भौमेक्षितोऽतिचोर विवादकुशलं नरं **रौद्रम्** ॥

करंदीकरकृत कुंडलींतील वरील योगांचीं फळें सारावलीकारा-सारख्या मान्य ग्रंथकाराच्या शब्दांत दिलीं आहेत त्यावरून दृश्यमान होणारी

शिवमूर्ति ऐतिहासिक मूर्तीशीं ताडून पहावी. दोन्ही मूर्तींत साम्य दिसलें तर करंदीकर निर्मित कुंडली खरी नाहींतर खोटी. इंग्रज शिवाजीला नुसतेच चोर म्हणत व म्हणतात. करंदीकरांनीं काढलेल्या कुंडलीवरून जुन्या ग्रंथकारांच्या भाषेंत तो अतिचोर ठरतो. करंदीकर शिवाजीकरितां तरी या योगाचा फिरवाफिरव करतील, निदान सारावलीकाराला त्याज्य ठरवितील अशी आशा आहे.

योग ३रा. " शुक्र हा पंचम स्थानांत असून तेथून एकादश स्थानांत आपल्या राशींत लाभस्थानीं असलेल्या शनीला पूर्णपणें पहातो यामुळें लाभस्थान उत्कृष्ट फलदायक झालें आहे. पण उलट पक्षीं शनीची पूर्ण दृष्टि पंचम स्थानीं पडल्यावर संभाजीसारखा पुत्र होऊन तो व्यासनांत व संकटांत पडला. " प्रस्तुत योगाचा खुद्द शिव छत्रपतीस शुभ फलागम व त्यांच्या पुत्राला अशुभ फलागम वर्णन केला आहे. करंदीकरांचा फलागम अपुरा आहे. या योगाचा अनिष्टना रा. करंदीकरांच्या लक्ष्यांत आली नसेल हें संभवनीय नाहीं. पण या योगाचें अपुरें वर्णन देण्यांत स्वकृत कुंडलींत अनेक शुभ योग झाल्याचें आरंभीं म्हटलें आहे. त्यांस अप्रत्यक्ष रीतीनें पुष्टि मिळते. **पंचमस्थानांत शनीनें दृष्ट असा शुक्र, सप्तम स्थानांत मंगळ** (मृतदारो रोगार्तो ऽ मर्गरतो भवति दुःखितः पापः) व चंद्र मंगळांचा केंद्र-योग या तीन योगांचा समुच्चय कोणत्याही कुंडलींत भ्रष्ट नीतिमत्ता दर्शवितो या गोष्टीकडे करंदीकरांनीं

डोळेझांक

केली आहे. अशा प्रकारचा योग शिवाजीच्या कुंडलींत असणें शक्यच नाहीं. शिवजीच्या नैतिक आचारणाविषयीं त्यांच्या शत्रूनांही खोड काढतां आली नाहीं हें आबालवृद्धांस माहितीं आहेच. असले योग असलेली

कुंडली शिवाजीची म्हणून सांगण्यांत रा. करंदीकरांच्या धाडसाची तारीफ करावी तितकी थोडीच ! रा. करंदीकर हे फलज्योतिषाचे एक विद्वान् पुरस्कर्ते आहेत. हें लक्ष्यांत घेतलें म्हणजे वरील प्रकारच्या चुका त्यांच्या हातून कशा झाल्या याचेंच राहून राहून आश्चर्य वाटतें. नव्या तिथीचा अभिमान त्यांस नडला असला पाहिजे.

रा. करंदीकर कुंडलींतील योगांचें वर्णन आटोपून पुन्हा एकदां त्यांनीं ठरविलेलें धनु लग्न बरोबर असल्याचा अधिक पुरावा देतात तो असा:--

" साधारणतः (१) धनुराशि अपयशकारक समजली जाते परंतु (२) ती राशि रात्रिबलवान् असून पूर्वार्धांत बलवत्तर होते. (३) शिवाय मीन राशि चतुर्थांत व सिंह राशि नवमांत बलिष्ठ सांगितली आहे. "

(१) धनु राशि अपयश कारक मानली जाते हें करंदीकरांसच ठाऊक. यांत ग्रंथांत आधार मिळेल असें वाटत नाहीं. रा. करंदीकरांना आपल्या लेखांत आधार देण्याची सवड नाहीं. जें कांहीं लिहितात तें सिध्दांतवत् (२) **धनुराशि रात्रिबलवान् असते हें खरें नाहीं.** धनु राशीचा **पूर्वार्ध दिवसा बली** व **उत्तरार्ध मात्र रात्रीं** बली असतो. आधार:---

"मिथुन-तुला-कुंभ-कन्या दिवाबली **धन्विनश्च पूर्वार्धम्** ।" श्रीदेवकीर्ति

येथें करंदीकरकृत कुंडलीचें लग्न धनु राशीच्या पूर्वार्धांत आहे व जन्म रात्री आहे म्हणून तें बलवान होऊं शकत नाहीं. (३). नवमांत सिंह राशि बलवान असल्याचें स्पष्ट लिहितात परंतु त्यास आधार नाहीं. येथें एक गोष्ट अवश्य नमूद केली पाहिजे कीं करंदीकरांनीं शोधलेलें लग्न होनबली आहे कारण----

(१) एकतर धनूचा पूर्वार्ध रात्रिबली नसतो,

(२) लग्न, शशि किंवा लग्नेश, गुरु व बुध यांपकीं एकानेंही युक्त किंवा

दृष्ट नाहींच, परंतु

(३) शनि--मंगळाकडून दृष्टीनें पीडित आहे.

अर्थात् **लग्न हीनबली आहे.**

धनु राशि रात्रीं बलवान् असून पूर्वार्धीत बलवत्तर होते हें विधान करण्यांत आपण निर्णीत केलेलें लग्न बलवत्तर आहे असें खोटेंच भासविण्याचा उद्देश होता हें निर्विवाद. हीनबली लग्नाला बलवत्तर करण्याचा वकिली थाटाचा प्रयत्न स्तुत्य आहे ! असाच दुसरा स्तुत्य प्रयत्न पहा. सिंह राशीला शनीचें फल मिळत नाहीं. धनुराशीला शनीचें फळ मिळतें असें करंदीकर लिहितात येवढेंच नव्हे तर त्यांचें हें मत शास्त्रसंमत आहे असें केसरींत गर्जून सांगतात. करंदीकरांचें शास्त्र म्हणजे काय हें आम्हांस कळत नाहीं. त्यांनीं मेहरबानी केल्यास पुढें कळेल तूर्त आमच्या जवळचा शास्त्राचा आधार वाचकांपुढें ठेवितों. **उडूदाय प्रदीपांत** असें सांगितलें आहे कीं **धनु लग्नीं रवि-बुध शुभ फलदायी** (राजयोगकारक), शुक्र पापग्रह आणि **शनि मृत्युदायक (निहंता भास्वतः सुतः)** असतो. 'शिवाजीच्या नव्या कुंडलींत शनिग्रहच परमोच्च असल्यानें सिंह लग्नावर निष्फळ होतो म्हणून तो 'सफळ' होण्यासाठीं रा. करंदीकर धनु लग्न घेतात व शास्त्राप्रमाणें तो मृत्युदायक ठरतो. शिवाजीच्या नव्या कुंडलींत (करंदीकरकृत) **उच्च ग्रह पकच** व तोही मृत्युदायक ग्रह !! यापेक्षां जास्त शास्त्र--संपन्नता ती काय दाखवावयाची ? राज्यसंस्थापकाच्या कुंडलींत * राज्यकारक ग्रह रवि शत्रुगृहीं, चंद्र अष्टमाधिपति व मंगळानें पीडित व बलवत्तम ग्रह कोणता तर जो ग्रह धनु लग्नावर 'निहंत्याचें' काम करतो तो शनि.+

---

* 'राजनौ रवि-शीतगौ'

\+ 'प्रेष्यः सहस्रांशुजः'

नवमांश कुंडली.

रा. करंदीकर म्हणतात " धनु राशीच्या मिथुन नवमांशाला नवमांश कुंडली फारच चांगली बसते." ही चांगली कुंडली येणेंप्रमाणें आहे::---

या चांगल्या कुंडलींत दशमांत शनि मंगळ बसतात तरी पण ती चांगलीच असली पाहिजे. केसरीमध्यें याबद्दर मल्लिनाथी करतांना ते लिहितात ' नवमांश कुंडली ही मुख्यतः प्रत्येक ग्रहाची उच्च तर अवस्था ठरविण्याकरितां असते का जन्मलग्नाप्रमाणें स्थानावरून ग्रहांच्या युत्या पहाण्याकरतां असते ? ' प्रथम करंदीकरच म्हणतात की ही कुंडली चांगली आहे व पाठीमागून अशी पगडी फिरवितात याला काय म्हणावें ? असो त्यांच्या फिरलेल्या मताप्रमाणें नवमांश कुंडलींत ग्रहांच्या युत्या पहावयाच्या नसतात अर्थात या ' चांगल्या ' कुंडलीचें परीक्षण जन्मकुंडलीप्रमाणें करण्याची जरूरी राहिली नाही.

राशी कुंडली.

पण नवमांश कुंडलीपेक्षां राशि कुंडली तर करंदीकरांच्या मतें अधिक महत्याची आहे.

राशि कुंडलीच्या वर्णनाच्या आरंभीं रा. करंदीकर म्हणतात कीं त्यांनीं संशोधिलेल्या कुंडलींत " अधियोग " झाला आहे. चंद्राच्या ६, ७ व ८ या स्थानीं शुभग्रह असल्यास .अधियोग होतो असें मानून हा योग राज्यप्राप्तिकारक आहे असें लिहितात. **मुळांत करंदीकरकृत कुंडलींत अधियोग च होत नाहीं**. अधियोगाचें लक्षण **सारावलीकार** देतो तें असें:-

षष्ठं च नमथाष्टमं शिशिरगोः प्राप्ताः समस्ताः शुभाः ॥
क्रूराणां यदि गोचरे न पतिता भान्वालयाद्दूरतः ॥

" चंद्राच्या षष्ठ, सप्तम व अष्टम स्थानीं (१) सर्व शुभग्रह असून (२) या शुभ ग्रहांवर पापग्रहांची दृष्टि नसेल आणि (३) हे शुभ ग्रह रवीच्या स्थानापासून दूर म्हणजे अन्य स्थानीं असतील तर **अधि-योग** होतो." या अधि-योगाच्या व्याख्येतील पापग्रहांची दृष्टि व रवीच्या स्थानापासून दूर या दोन लक्षणांकडे करंदीकरांनीं दुर्लक्ष केलेलें आहे. त्यांच्या कुंडलींत शुभ ग्रहांपैकीं गुरु ग्रह रवीच्या स्थानीं आहे आणि शुक्रावर पापग्रहांची म्हणजे शनीची पूर्ण दृष्टी आहे म्हणून अधियोग होऊं शकतच नाहीं. पाप-ग्रहांच्य दृष्टीचा अभाव व रविस्थानापासून दूर या दोन लक्षणांना हरताळ

फांसल्याशिवाय करंदीकरकृत कुंडलींत अधियोग होऊं शकत नाहीं. स्वकृत कुंडलीच्या वर्णनांत फायदेशीर म्हणून अधियोगाच्या लक्षणांपकीं दोन लक्षणांना अर्धचंद्र देण्यांत लोकांच्या डोळ्यांत धूळ फेकण्याचा प्रयत्न रा. करंदीकरांनीं केला आहे. असो. राशि कुंडलीचें वर्णन रा. करंदीकर पुढें करतात तें असें:—

" राशि कुंडलींत रवि, बुध व शुक्र हे तीन ग्रह ६, ७ व ८ या स्थानांतून अनुक्रमें १२, १ व २ या स्थानाचे अधिपति असून त्या स्थानास पूर्ण दृष्टीनें पाहतात; आणि जन्म-लग्न कुंडलींत हेच तीनहि ग्रह याच क्रमानें तृतीय, चतुर्थ व पंचम या स्थानांतून नवम, दशम व एकादश या आपल्या स्थानांना पूर्ण दृष्टीनें पाहतात. म्हणजे राशि कुंडली व जन्म कुंडली या दोहोंत मिळून रवि, बुध व शुक्र हे बारा स्थानांपैकीं सहा स्थानांत स्वतः राहून बाकीच्या सहा स्थानांवर पूर्ण दृष्टि ठेवितात. अर्थातच यांच्या दृष्टीला अगोचर असें एकहि स्थान राहात नाहीं. असा योग क्वचितच प्रसंगीं साधतो व तो शिवाजीच्या कुंडलींत धनु-लग्न घेतलें तरच असा पूर्णपणें साधतो."

रवि, बुध व शुक्र हे राशी व जन्म कुंडल्यामध्यें सहा स्थानें व्यापून दुसऱ्या सहा स्थानांवर पूर्ण दृष्टि ठेवितात व असा अपूर्व योग दुसऱ्या लग्नावर साधत नाहीं असें करंदीकरांचें म्हणणें आहे.

या योगाची मातब्बरी काय सांगावी ? असल्या योगाची नुसती कल्पना सुध्दां पूर्वाचार्यांना झालेली दिसत नाहीं. हा योग अपूर्व आहे असें करंदीकर म्हणतात. त्यांच्या दृष्टीला हा योग प्रथमच दृष्टीस पडला असेल व या दृष्टीनें त्याला अपूर्वत्व आलें असेल परंतु ते जेव्हां म्हणतात कीं असा योग दुसऱ्या लग्नावर साधत नाहीं तेव्हां रा. करंदीकरांच्या दृष्टीला पक्षांधतेनें ग्रासले आहे असेंच म्हणणें प्राप्त होतें. त्यांनीच नालायक ठरविलेल्या सिंह लग्नाला हाच ' अपूर्व ' योग बसतो किंवा नाहीं हें पहा. सिंह लग्न धरून रा. करंदीकरांच्याच शब्दांत आपण बोलूं. राशि कुंड-

लींत रवि, बुध व शुक्र हे ६,७ व ८ या स्थानांत राहून १२।१।२ या स्वतःच्या स्थानावर पूर्ण दृष्टि ठेवितात व जन्म कुंडलींत हेच तीनही ग्रह याच क्रमानें ७,८ व ९ या स्थानांतून १,२ व ३ या आपल्या स्थानांना पूर्ण दृष्टीनें पहातात म्हणजे राशि व जन्म कुंडली या दोहोंत मिळून ते बारा स्थानांपैकीं ६ स्थानांत स्वतः राहून बाकीच्या सहा स्थानांवर पूर्ण दृष्टि ठेवतात, हा " अपूर्व " योग धनु लग्नाप्रमाणें सिंह लग्नावरही साधतो याबद्दल कोणालाही शंका रहाणार नाहीं. निराधार विधानें ठांसून सांगण्यांत रा. करंदीकरांचा हातखंडा आहे हें या " अपूर्व " योगाच्या विवेचनाबरून वाचकांच्या ठळकपणें नजरेस आल्यावांचून रहाणार नाहीं. " चंद्रापासून द्वितीयस्थानीं प्रबल ग्रह असल्यास तो सुनका योग होतो व त्याचें फल राज्यप्राप्ति असें आहे. **हा योग धनु-लग्नीं साधतो, मकर लग्नीं साधत नाहीं.**" शेवटचें वाक्य आक्षेपार्ह असल्यामुळें श्री. दा. ना. आपटे यांनीं त्यावर योग्य आक्षेप घेतला. परंतु करंदीकरांचें गणित-ज्योतिषाचें ज्ञान आपटयांच्यापेक्षां अधिक म्हणून त्यांनीं केसरींत गर्जून सांगितलें कीं ' मकर लग्नाच्या वेळीं चंद्र तुळेंत शिरतो.' करंदीकरांनीं दिलेला चंद्र धनुलग्नाचा ७ वा अंश उदय पावत असतां कन्या राशींत २६ अंश ५१ कला आहे म्हणजे त्याला तुळेंत शिरण्यास ३ अंश व ९ कला इतका मार्ग आक्रमावयाचा आहे. धनुराशीचे २३ अंश सरल्यावर मकर उदय पावणार आहे म्हणजे सरासरी १॥ तासानें मकर लग्न उदय पावूं लागेल. करंदीकर म्हणतात कीं मकर लग्नाच्या वेळीं चंद्र तुळेंत जातो. रा. आपटयांना नव्या शिव-जन्माच्या दिवसाची चंद्राची गति काय ठाऊक ? शिव-जन्म झाल्याबरोबर १॥ तासांत चंद्र ३ अंशांवर चालला ! आम्हांसारख्या अनभिज्ञांस असलें कुतूहलकारक गणित कळत नाहीं.

यास नाइलाज आहे ! उदय लग्नीं मकर राशीचें आरंभीचें अंश असतांना चंद्र कन्येंत असलाच पाहिजे हें नाकबूल करण्यास रा. करंदीकरांना हिंमत होणार नाहीं. मग त्या वेळीं तरी सुनका योग होईल ना ? मकर लग्नावर सुनका योग होत नाहीं ह्या वाक्याला दुरुस्तीच्या पुस्त्या जोडल्या पाहिजेत हें निर्विवाद आहे.

राज्याभिषेक कालावरून जन्मकाल.

रा. करंदीकर शिवाजीच्या राज्याभिषेककालाचे स्पष्टग्रह देतात व हे ग्रह स्वयंनिर्णित कुंडलींतील ग्रहांशीं जुळतात असें त्यांचें म्हणणें आहे. हे ग्रह फारच उत्तम जमतात असें ठराविक पालुपद शिरस्त्याप्रमाणें घोळण्यास ते विसरले नाहींतच परंतु जुन्या कुंडलींतील ग्रहांशीं बिलकूल जुळत नाहींत असेंही ठांसून सांगण्यास ते चुकले नाहींत. मात्र हे ग्रह कोणत्या बाबतींत जुळत नाहींत याबद्दल एक अवाक्षरही लिहीत नाहींत हें त्यांच्या पूर्ण अंगवळणी पडलेल्या पध्दतीस अनुसरूनच आहे. कोणताही आधार न देतां " मी म्हणतों तेंच खरें " अशा प्रकारच्या अरेरावी लिखाणास समंजस वाचक काडीचा सुध्दां किंमत देत नाहींत हें तें विसरल्यासारखें दिसतात.

रा. करंदीकरांनीं दिलेले राज्याभिषेकाच्या वेळचे ग्रह:---

" राज्याभिषेक काल शके १५९६ जेष्ठ शुध्द १३ सूर्योदयापूर्वी ३ घटका असा आहे. त्या वेळचे स्पष्ट ग्रह:---

रवि २-५ ५३; चंद्र ७--२--३०; मंगळ ११--१५--४४; बुध १-१७-३; गुरु ६-१९-३७; शनि ०-७-१७; शुक्र २-२१-७"

ह्या गोचर ग्रहांपैकीं ४ ग्रह मूळ जन्म कुंडलींतील पंच ग्रहांत " जो एक प्रकारचा चक्रावर" अन्योन्य योग झाला आहे त्यांच्या जागीं जाऊन बसले आहेत. 'हा प्रबळ योग' होता म्हणूनच "कोणत्याही विघ्नांस न जुमानतां शेवराय सिंहासनारूढ झाले." या एकट्या प्रबळ योगावरच जुनी १५४९ ची कुंडली खोटी ठरते एवढेंच नव्हे तर शके १५५१ फाल्गुन वद्य ३ ची धनु लग्नाची कुंडली खरी ठरते असें निव्वळ एका वाक्यांत करंदीकर एकही आधार न देतां दडपून सांगतात. अशा प्रकारची दडपून केलेलीं विधानें किती खोटीं आहेत हें आतांपर्यंत वाचकांच्या नजरेस आणलें आहेच. बाकी राहिले तें हें विधान तरी किती खरें आहे हें आपण पाहूं. ह्या गोचर ग्रहांपैकीं,----

(१) मूळ लग्नेश **गुरु** शनीवर म्हणजे मृत्युदायक ग्रहावर आला,

(२) **शनि नीच** होऊन शुक्राजवळ आला,

(३) **शुक्र** मूळ मंगळावर आला,

(४) **मंगळ** मूळ बुधावर येऊन चंद्रराशीं व दशमाशीं प्रतियोग हा अशुभ योग करूं लागला, आणि

(५) (मूळ दशमाधिपति) **बुध** रिपुस्थानांत राहूशीं युक्त झाला. **लग्नेश मारकेशाशीं युक्त, राजभुवनाचा मालक षष्ठांत व मूळ कुंडलींत जो अत्यंत प्रबल ग्रह तो नीच** अशा प्रबल योगावर शिवाजीस राज्याभिषेक झाला असें करंदीकर म्हणतात. वाचकहो ! रा. करंदीकरांच्या ज्योतिषज्ञानाची येथें परमावधी झाली असें म्हटलें पाहिजे ! इतिहास व फलज्योतिष यांचा हा अपूर्व संगम पाहून स्तिमित न होणारा वाचक विरळा ! !

रा. करंदीकरांनीं दिलेल्या राज्याभिषेककालीन ग्रहांवरून त्यांनीं ग्राह्य केलेली कुंडली साफ चुकली असली पाहिजे असें पुढें दिलेल्या कारणांवरून वाचकांची खात्री होईल.

राज्याभिषेक कालीं ग्रहस्थिति कशी असावी याबद्दल **मुहूर्त ग्रंथांत** म्हटलें आहे कीं:----

मुहूर्तमाला.

भौमार्क लग्नेश-दशेश-जन्मपैः (बलान्वितैः)*म्हणजे (१) (राजकारकत्वात्) रवि, (२) (सेनापतित्वात्) मंगळ, (३) मूळ लग्न स्वामी (४) (वर्तमान जातकीय महादशांतर्दशा स्वामिनी) दशास्वामी व (५) जन्म राशि स्वामि हे ग्रह स्वराश्यादिकांनीं बलवान असले पाहिजेत. मुहूर्त पाहून राज्याभिषेक काल ठरविला असल्यामुळें वरील गोष्टींकडे दुर्लक्ष्य झालें असेल असें समजण्याची बिलकूल सोय नाहीं.

(१) **रवि** (२) **मंगळ** (३) लग्नेश **गुरु** (करंदीकरकृत कुंडली खरी धरून) (४) महादशास्वामी **शनि** (करंदीकरकृत कुंडली खरी धरून) (५) अंतर्दशा स्वामी **बुध** (करंदीकर मतें) व (६) जन्म राशि स्वामी **बुध** (करंदीकर मतें) इतके ग्रह स्वराशि, उच्च अगर मित्रक्षेत्रीं पाहिजेत. रवि, मंगळ, गुरु, शनि व बुध या पांच ग्रहांपैकीं उच्च किंवा राशीचें बल एकासही नाहीं. जें कांहीं बल आहे तें बुध व मंगळ या ग्रहांस व तेंही मित्रक्षेत्राचें. मुहूर्ताप्रमाणें राज्याभिषेकास जे ग्रह बलवान असावे असें सांगितलें आहे त्या पांच ग्रहांपैकीं फक्त दोन ग्रहांस मित्रक्षेत्रीचें म्हणजे $\frac{१}{४}$ बल करंदीकरांच्या कुंडलीवरून

* मुहूर्त चिंतामणि, राज्याभिषेक प्रकरण १० वें.

असूं शकेंल. रवि हीन बली, गुरु शत्रु गृहीं व शनि नीच क्षेत्रीं, याच्या विरुध्द ज्या ग्रहांस बल आहे ते उच्च स्वगृहांचे नसून केवळ मित्रक्षेत्रींचें म्हणजे पुन्हां सारावलीकारांच्या भाषेंत सांगावयाचें म्हणजे " पादं शुभस्य हितभे " इतकें अल्प बल दोन ग्रहांस आहे. राज्याभिषेककालीन ग्रहस्थितींत फक्त तीन ग्रहच बलवान (मित्रक्षेत्रीं) आहेत. हे तीन ग्रह म्हणजे मंगळ, बुध व शुक्र हे होत. राज्याभिषेकाचा मुहूर्त निवडला गेला त्या वेळीं शिवाजीची जन्म कुंडली अस्तित्वांत असली पाहिजे आणि त्यावरून मूळ लग्नेश, दशान्तर्दशास्वामी व जन्म राशि स्वामी असे चार ग्रह मंगळ, बुध व शुक्र यांपैकींच (**निरयण मानानें**) असले पाहिजेत म्हणजे जे तीन ग्रह त्या दिवशीं बली आहेत त्यांच्याकडे ५ अधिकार जातील व गुरु व शनि या हीन ग्रहांकडून अधिकार निघतील, फक्त रवि सम राशींत राहून राज्याभिषेक कालीं सांगितलेले दुसरे पांच अधिकारी ग्रह मित्रक्षेत्रीं होतील व तत्कालीन शास्त्रदृष्टया अभिषेककाल शास्त्रसंमत होईल. करंदीकरकृत कुंडलीतील **मूळ लग्नेश गुरु** व **महादशास्वामी शनि हे अधिकार च्युत झाल्यावांचून मुहूर्त साधणें अशक्य आहे.** अर्थात गुरु व शनि या दोहोंपैकीं एकाकडेही मूळ लग्नेशत्व असूं शकणार नाहीं हें निर्विवाद. करंदीकरांची कुंडली ग्राह्य केल्यास राज्याभिषेक काल मुहूर्तदृष्टया दूषित होतो तो तसा असणें अत्यंत असंभवनीय आहे. अर्थात् रा. करंदीकरकृत नवी कुंडली तत्कालीन ज्योतिषांपुढें नव्हती याबद्दल कोणालाही संशय रहाणार नाहीं.

निष्कर्ष.

येथपर्यंत रा. करंदीकरांनीं ज्योतिष शास्त्रदृष्टया म्हणून नव्या तिथीप्रमाणें नव्या कुंडलीसंबंधानें जीं मतें प्रगट केलीं त्याचा विचार केला. या विचारामध्ये ग्रंथाधारावरच विशेष महत्व दिलें आहे हें वाचकांच्या

लक्षांत येईलच. एवढेंच नव्हे तर रा. करंदीकरांचीं निरयण गणनासुध्दां **तात्पुरती** मान्य केली आहे. करंदीकरांनी एकाही ठिकाणीं आपल्यां मूळच्या लेखांत अगर केसरींतील नंतरच्या लेखांत आधार दर्शविले नाहींत. अर्धवट व भ्रामक मतांवर ' येनकेन प्रकारेण ' स्वयंनिर्णित कुंडली खरी असें बिन आधारानें पुन्हां पुन्हां सांगण्याशिवाय त्यांनीं कांहींच केलें नाहीं. ज्योतिष शास्त्रांतील तत्वांच्या विरुध्द दडपलेलीं विधानें व काढलेले निष्कर्ष अर्धवट माहितीवरून ठोकून दिलेलीं मतें व जे योग त्यांच्या समर्थनाच्या विरुध्द जाण्यासारखें आहेत त्यांच्याकडे केलेली त्यांनीं डोळेझांक वगैरे सर्व प्रकार वाचकांच्या नजरेस आणून दिले आहेत. **करंदीकरकृत कुंडलींत ज्योतिष शास्त्रदृष्टया शिवछत्रपतींच्या आयुष्यक्रमाच्या तोलाचाच काय पण विशिष्टदर्जाचा राजयोगही दिसत नाहीं एवढेंच नव्हे तर भ्रष्टनीतिमत्तादर्शक योग ठळक दिसतो. असल्या प्रकारचा योग शिवछत्रपतींच्या कुंडलींत ठेवणारा शास्त्रानभिज्ञच म्हटला पाहिजे. तसेंच राज्यभिषेक काळचे ग्रह मुहूर्त शास्त्रदृष्टया करंदीकरकृत कुंडलीशीं बिलकूल जमत नाहींत असें आमचें स्पष्ट मत आहे.**

रा. करंदीकरांना श्री शिवछत्रपतीच्या कुंडलीसंबंधीचा चर्चा वाढविणें असल्यास त्यांनीं यापुढें आपल्या म्हणण्यास मान्य ग्रंथकारांचे आधार द्यावें अशी सविनय प्रर्थना करून हा लांबलेला लेख आटोपता घेतों.

दादर, ३१ मार्च १९२५ **राम गणेश गडकरी**

श्रीशिवछत्रपतीच्या कुंडलीसंबंधानें तूर्त वाद सुरू आहे. अशा वेळीं अनेकांनीं कै. चिटणीसांनीं वर्णनासह दिलेला कुंडली पुन्हां प्रसिध्द करण्याविषयीं विनंती केली आहे. त्याप्रमाणें ती कुंडली मे १८९५ सालीं जशी प्रसिध्द झाली आहे तशीच पुढें दिली आहे. शिवाजीच्या आयुष्यक्रमांशी तिचा मेळ बसतो किंवा नाहीं हें वाचकांनींच ठरवावें. सुप्रसिध्द

इतिहासकार सरदेसाई व दुसरे अनेक विद्वानांनी १५४९ वैशाख शुद्ध २ ही कै. चिटणासांची ३० वर्षांपूर्वी स्वीकारलेली तिथीच आतां मान्य केली आहे, हे लक्ष्यांत ठेवण्यासारखें आहे.

'नवा काळ' पत्राच्या तारीख १७ व १८ एप्रिलच्या दोन अंकांत वैशाख शुध्द २ च ग्राह्य असा निर्णय दिला आहे; म्हणजे फलज्योतिष-दृष्ट्या स्वीकारलेल्या तिथीला हा ऐतिहासिक दुजोराच आहे.

संपादक ज्योतिर्माला.



गुरुशुक्रशुभाधीशाः केंद्रकोणायगा यदि ।
अनेकयानसंपन्नो मंडलाधिपतिर्भवेत् ॥

ही कुंडली मराठी राज्याचे संस्थापक, श्री शिवछत्रपतींची आहे. कुंडली हा आकाशांतील ग्रहांचा नकाशा आहे. ह्या कुंडलींत ग्रह सायन-मानाचे आहेत. सायनमानाचा आरंभ मेषसंपातापासून आहे. क्रांतिवृत्त आणि विषुववृत्त ह्यांचे छेदनबिंदूस संपातबिंदु म्हणतात एकाचें नांव उत्तरा संपात अथवा वसंतसंपात आहे. व दुसऱ्याचें नांव दक्षिणसंपात अथवा शारदसंपात असें आहे. संपात चल आहे. संपाताचें गतीस अयनगति म्हणतात. पृथ्वीचे मध्य भागावर सूर्य आणि चंद्र ह्यांचें आकर्षण होतें त्यामुळें पृथ्वीचा उत्तरध्रुव प्रतिवर्षी थोडाथोडा मागें कलतो. शालिवाहन शके ४४४ चे सुमारास हें आरंभस्थान मेषसंपातांत होतें आणि मेष-संपात रेवतीचे योगताऱ्यांत होता. सूर्य सिध्दांतांत फलादेशाकरितां ग्रह रेवतीचे योगताऱ्यापासून धरावेत असें लिहिलें आहे तें संपातानुरोधें होय. सूर्यसिध्दांतांत वर्षाचें मान, सांपातिक वर्षापेक्षां, एक घटकेनें जास्त आहे ह्यामुळें आरंभस्थान प्रतिवर्षी एक कला पुढें जात जात तें हल्लीं एका मताप्रमाणें १९ अंशाजवळ व एका मतानें २३ अंशाजवळ जवळ पुढें गेलें आहे; म्हणजे मेषसंपातापासूम २३ अंशानें पुढें आहे. रेवतीचे योग-ताऱ्याशीं मेषसंपात शके ४४४ चें सुमारास जो यूति करीत होता तो मेषसंपात हल्लीं उत्तराभाद्रपदावर आहे. सूर्य मेषसंपातीं म्हणजे विषुवावर आला म्हणजे दिनमान व रात्रिमान ३० घटकेचें होते. ता० २२ मार्चचे सुमारास सर्व पंचांगांत हें मान दिलें जातें. हाच मेषसंक्रमणाचा काळ खरा असून चालू पंचांगांत मेषसंक्रमण ता० १२ एप्रिलचे सुमारास देतात. हें निरयण मेषसंक्रमण होय. पत्रिकेचें गणित सायन गणनेचें असून, पंचांगें निरयण गणनेचीं आहेत, त्यामुळें मूळ पायाच चुकला आहे. पत्रिका सायन गणनेवरून केल्यास अनुभव जास्त येईल. ह्या मालेचा उद्देश फलज्योति-

षाचा शास्त्रीय रीतीनें ऊहापोह करून सत्यता दाखविण्याचा आहे, म्हणून ह्यांत सायन गणनेचा स्वीकार केला आहे. व त्यास उपयोगीं पडणारें सायन पंचांग हेंच गणितास आधार घेतलें आहे.

महाराष्ट्र देशावर धनुराशीचा अम्मल आहे. धनुराशीची आकृति घोडेस्वाराप्रमाणें असून त्याचे हातांत तीरकमठा आहे. महाराष्ट्रांतील लोक तिरंदाज व घोड्यावर बसण्यांत कुशल आहेत. गंगा आणि भीमा ह्यांचे कांठीं घोडे बळकट आणि चपल उपजतात. धनुराशीचा अधिपति गुरु आहे. ह्या ग्रहाचे विषुवावर दोन पट्टे आहेत, महाराष्ट्राचे विषुवावर गोदा आणि कृष्णा ह्या नद्या पटयाप्रमाणें वाहत जातात. श्रीराम पत्नीचे विहार-स्थानांपैकीं पंचवटी, जनस्थान (नाशिक), त्रिंबक, हीं गोदेचे तीरावरील शहरें, सिंहस्थांत, आणि धौममहाबळेश्वर, वाई, माहुली हीं कृष्णेवरील शहरें, कन्यागत पर्वणींत सुरमंत्रीचीं साक्षच देतात. प्रतिवर्षी लाखों लोक आळंदी, देहू येथून ज्ञानदेव-तुकाराम यांचे समाधीचें दर्शन घेऊन आषाढ-कार्तिकांत पुंडलिकाचे दर्शनार्थ पंढरपुरास जातात. महाराष्ट्रीयांचा स्वभाव गुरूचे स्वभावाप्रमाणें शांत व ममताळु असून सहिष्णु आहे. राजकीय विचारांत त्यांचे विचार प्रौढ व प्रगल्भ आहेत. रामदास, वामन, श्रीधर, मोरोपंत, तुकाराम, ज्ञानदेव आणि कबीरादि संतांचे प्रेमरसानें भरलेले ग्रंथ, वेदासही मान डोलवावयास लावीत आहेत. उत्तरेस गोदावरी नदी आणि दक्षिणेस तुंगभद्रा नदी ह्या प्रदेशावर धनुलग्नाचा व गुरूचा अगदीं निकट संबंध आहे. श्री. शिवछत्रपतीचे जन्मकाळीं गुरु धनेंत होता. महाराष्ट्रांत धर्मसंस्थापना करण्यास गुरूनें शिवाजी महाराजांस जन्मास आणिलें, इतकेंच नाहीं तर त्यांची बुद्धि धर्मसंस्थेकडे वळावी म्हणून सुरगुरूनें पंचमस्थानांत वासही केला आहे. शिवाजी महाराजानें धर्मसंस्थापना

करून महाराष्ट्रीयांचें नांव अमर केलें म्हणून त्यांचे आभार ऐतिहासिक दृष्टीनें मानले पाहिजेत; परंतु अनंतगोलचालकानें देवगुरूचे शांत-सुखद किरणांकडून आम्हांवर केलेला उपकार न विसरणें हें एक मानवी कर्तव्य आहे.

शिवछत्रपतीची कुंडली जी प्रचारांत दिसत आहे तो खोटी आहे. इ० स० १६२७ मध्यें गुरु कर्क राशींत नसून त्या कुंडलींत तो कर्केंचा दिला आहे. ह्या मालेंतील कुंडलीचे ग्रह, ग्रहसाधन पुस्तकावरून केलेले आहेत. हे ग्रह एक दोन अंशांचे अंतरानें, वेधतुल्य ग्रहांशी मिळतील. गुरु वृश्चिक राशींत २९ अंश, ५६ कला ग्र० सा० पुस्तकावरून येतो. ग्र० सा० पुस्तकांतील ग्रह सुमारें दोन अंशांपर्यंत चुकीचे येतात म्हणून गुरु धनराशींत धरला आहे. शिवाजी महाराजांचा जन्म कर्कलग्नाचे ६ वे अंशांत आहे. दशमभावारंभ मीनेंत २८ अंशांत आहे. हा दशमभाव जेथें चालू कुंडल्यांत जन्मलग्न लिहितात तेथें दर्शित केला आहे. त्याचप्रमाणें जन्मलग्न जेथें चतुर्थभाव मांडतात तेथें दिला आहे. सूर्योदयाचे वेळेस पृथ्वीचे पूर्वक्षितिजावर सूर्य दिसतो. दुपारीं पृथ्वी उदयापासून ९० अंश खालीं जाते म्हणून रवि आपले डोक्यावर दिसतो. अस्तकालीं पृथ्वी उदयापासून १८० अंश खालीं जाते म्हणून जन्मलग्न आणि पूर्व-केंद्र आणि अस्तकेंद्र हीं केंद्रें भासमान स्थितीप्रमाणें मांडलीं आहेत. ही पध्दत जास्त शास्त्रोक्त आहे म्हणून मालेंत कुंडल्या ह्या पध्दतीस अनुसरून येतील.

शिवछत्रपतीचा जन्म कर्क लग्नावर झाला आहे. ह्याचा अधिपति चंद्र, आपले उच्च राशींत, म्हणजे वृषभ राशींत आहे. त्यावर

गुरूची दृष्टि आहे. त्याचा परिणाम शिवाजीचें शरीर चांगलें ठेवणें हा आहे. सर्वार्थचिंतामणींत असा आधार आहे. 'लग्नेशे स्वोच्चमित्रांशे स्वनवांशगतेपि वा । शुभग्रहयुते दृष्टे देहसौख्यं विनिर्दिशेत् ॥' धन भावारंभाचा अधिपति चंद्र उच्च आहे म्हणून शिवाजी महाराजांनीं पुष्कळ लोकांचें संरक्षण केलें. 'स्वोच्चस्थिते शोभनखेचरेंद्रे कुटुंब राशौ शुभ वीक्षिते वा ॥ अनेकसंरक्षणजातपुण्यो लग्नेश्वरे वीर्ययुते स्वतुंगे ॥' धनस्थानांत सिंहराशी आहे तिचा अधिपति सूर्य, उच्च म्हणजे मेषराशीचा असून दशमांत बलिष्ठ आहे, त्यामुळे शिवाजी महाराजांस सिंहासन प्राप्त झालें. 'स्वोच्चस्थिते वित्तपतौ च केंद्रे सिंहासनप्राप्तिमुदाहरंति' ॥ तृतीय स्थानांत सिंहराशी आहे तिचा अधिपति सूर्य सिंहासनांशांत आहे त्यामुळें छत्रपतीस युध्द करण्याची हौस होती. 'सिंहासनांशे यदि विक्रमेशे पारावते गोपुरभागयुक्ते ॥ मृद्वशके वा शुभदृष्टियोगे मनोत्सवो युध्दविशारदः स्यात्' ॥ तृतीय स्थानांत शनि आहे आणि त्यावर मंगलाची दृष्टि आहे, त्याचा परिणाम परस्पर शत्रूंत कलह लावून आपला फायदा करून घेणें हा आहे. तृतीय स्थानांत शनि असतांना मनुष्य शत्रुनाश करून पुष्कळ द्रव्यानें मनुष्यांचें पालन करून निर्भय व निरोगी असतो. 'श्रेष्ठो दृष्टः स्वसुतगृहभाक् सारभास्वांश्च राजानंदैरिष्टं भजति सशुभं क्रूरदृष्टयारिनाशं ॥ भूमीपालो बहुलबसुभिः पालयेभ्दूरि लोकान्निरोगः स्याज्जननसमये यस्य सौरिस्तृतीयः ॥' अफझुलखानास शिवाजीनें कपटानें मारले हा आरोप इंग्रज इतिहासकारानें केलेला खोटा आहे. अफझुलखानाचे मृत्यूचें वर्णन चिटणिसांचे बखरीत आहे. मे० करकरिया ह्या पारशी गृहस्थानें छत्रपतीवरील आरोप दूर केला आहे.

चतुर्थ स्थानावर ह्याचा विचार होतो. चतुर्थ स्थानाचा अधिपति बुध शुभग्रह आहे. तूळ राशीचा अधिपति शुक्र उच्च आहे. त्याचा परिणाम शिवाजी महाराजांचें अंतःकरण निष्कपटी असणें हा आहे. 'विशुध्दहृदयः शांतो हृदयेशे बलान्विते ॥ गोपुराद्यं शके वापि मृद्वंशादियुते तथा'॥ चतुर्थ स्थानावर आईचा विचार करतात. चतुर्थ स्थानचा अधिपति बुध, आणि लग्नाधिपति चंद्र, हे वृषभ राशींत आहेत. चंद्र हा बुधाचा मित्र आहे, म्हणून राजमाता जिजाबाई आणि छत्रपति ह्यांत प्रेम फार होतें. 'यदालग्नसुखेशौ वा मित्रभूतौ परस्परम् ॥ शुभेक्षितौ शुभैर्युक्तौ मातृस्नेहं विनिर्दिशेत् ॥' पंचम स्थानावर संततीचा विचार करतात. पंचम स्थानचा अधिपति मंगळ अष्टम भावाचे शेवटीं आह आणि त्यावर राहूची दृष्टि आहे त्यामुळें शिवाजी महाराजांचे शुभ्र कीर्तीवर संभाजीचें दुराचरण हा काळिमा होता. 'पुत्रस्थानेश्वरे दुःस्थे लग्नेशेनापि वांक्षते ॥ संदृष्टे कुजराहुभ्यां नित्यं पितृविदूषकः ॥'

पंचम भावाचा अधिपति नवम भावारंभीं घेतला तर मंगळ, शुक्र एकाच भावीं आहेत आणि त्यांवर गुरूची पंचम दृष्टि आहे त्यामुळें छत्रपतीकडून अन्नदान होत होतें. 'अन्नदानकरो नित्यं पंचमेशे शुभंगते ॥ शुभ ग्रहैः समायुक्ते युक्तीशे शुभसंयुते ॥' पंचम स्थानावर बुध्दीचा विचार होतो. गुरु पंचमांत असल्यामुळें शिवाजी महाराजांची बुध्दी चांगली होती; स्मरणशक्ति चांगली होती. राजगुरु दादोजी कोंडदेव आणि धर्मगुरु श्रीसमर्थ रामदास, हे अनुक्रमें पंचम व दशम स्थानसूचक होते. दोन्ही स्थानांचा अधिपति गुरु असल्यामुळें दादोजी कोंडदेवाचे उपदेशावर, रामदास स्वामींचा जास्त ठसा उमटला. त्यांतून राजमाता जिजाबाईचा प्रदर्शक जो शुक्र ग्रह

(चतुर्थ स्थानचा अधिपति), तो नवम स्थानांत म्हणजे धर्मस्थानांतील उच्च आहे. ह्यामुळें धर्मरक्षणार्थ जिजाबाईचा उपदेश, अर्थात् हा शुक्राची कृपा आणि गुरूचो कृपा ह्या दोन्ही कृपांचे मोलनानें छत्रपतीनें अतुल पराक्रम करून महाराष्ट्र देशास संकटांतून सोडविलें. पंचम आणि नवम ह्या स्थानांस त्रिकोण स्थानें म्हणतात. तेथें गुरु स्वग्रहींचा आणि शुक्र उच्च आहे, म्हणून छत्रपतीनीं जी देशसेवा केली ती परमेश्वरास आवडली असें दिसतें. विजापुरचे सरदाराचा मुलगा शिवाजी ह्यास सरदार म्हणविण्यांत हीनपणा येईल असें परमेश्वरास वाटून त्यास 'छत्रपति' हें पद देवविलें आहें. 'गुरुशुक्रशुभावीक्षाः केंद्रकोणायगा यदि ॥ अनेकयानसंपन्नो मंडलाधिपतिर्भवेत् ॥'

षष्ठस्थानावर शत्रूचा आणि नोकरांचा विचार होतो. शिवाजी महाराजांचे शत्रु दिल्लीचें बादशाहा आणि विजापुरकर हे होत. षष्ठस्थानचा अधिपति गुरु पंचम स्थानांत आहे. शिवाजी महाराजानें एक वेळ विजापुरकरावरोबर सख्य, आणि एक वेळ दिल्लीचें बादशाहाबरोबर सख्य करून अखेरीस दोघांसही जेरीस आणिलें. लग्नाधिपति चंद्र बलिष्ठ असून त्याचो दृष्टि गुरूवर आहे. गुरु स्वग्रहींचा आहे त्यामुळें शत्रु ते मित्र होत होते. 'लग्नेशाब्दलहीने तु शत्रुस्थानाधिपे यदा ॥ शुभान्विते शुभैर्दृष्टे शत्रूणां मैत्रमादिशेत् ॥' औरंगझेबासारखे शत्रूकडून शिवाजीची तारीफ झालेली आहे. शिवाजी महाराजांचे नोकर सर्व जातीचे लोक होते. वेदोक्त कर्मे करण्याचा ज्यांस अधिकार आहे असे ब्राह्मण-कायस्थ-शेणवी हे छत्रपतीस अनेक प्रसंगीं उपयोगीं पडले आहेत. महाराष्ट्र देशाचें तनुस्थान धन लग्न आहे. महाराष्ट्राचा उदय करण्यास परमेश्वराने शिवाजीस जन्मास

आणलें. नेपोलियनला उदयास आणण्यास फ्रेंच रेव्होल्युशन (राज्यक्रांति) करविली, ड्यूक ऑफ वेलिंगटन ह्यास उदयास आणण्यास नेपोलियनचा पराभव वाटरलु येथें करविला, त्याप्रमाणें महाराष्ट्रीयांचें वैभव चिरायु राहावें म्हणून श्री० शिवाजीकडून अष्टप्रधानादिक राजमंडळ अथवा हिंदुपार्लमेंट बनविलें. इंग्लंदासारखे देशांत पार्लमेंट स्थापन होण्यास बरेच राजांस लोकांकडून शह सोसावे लागले. परंतु अक्षरशून्य, बारगिरानें राजतृष्णेस न जुमानतां हिंदुपार्लमेंट केलें, हा सर्व उपकार सुरगुरूचा होय.

महाराष्ट्रांत प्रतिनिधि सचिवादिक अष्टप्रधानांच्या जहागिरी, दक्षिण महाराष्ट्रांत छत्रपतीची गादी, आणि पटवर्धनांच्या जहागिरी ह्या धन आणि मीन राशींच्या सम्यक्स्थितिदर्शक होत. महाराष्ट्र देशाचे दशमांत कन्या आहे हें पुणें शहरचें तनुस्थान होय. पेशवाईत महाराष्ट्र देशाचें वैभव जास्त चमकलें. पुण्याचे दशमांत मिथुन आहे. मिथुन हें लंदन शहरचे व विक्तोरिया राणीचें तनुस्थान होय. पेशवाईची अखेरी सन १८१८ चे नवंबर महिन्यांत झाली, आणि विक्तोरिया राणीचा जन्म सन १८१९ मध्यें मे महिन्यांत झाला. अर्थात् महाराष्ट्राचें वैभव परमेश्वरकृपेनें विक्तोरिया राणीस गर्भांतच मिळालें आणि श्रीमंत ब्रह्मावर्तास गेले !! महाराष्ट्राचे राजकीय इतिहासाचें अवलोकन करतां महाराष्ट्रास स्वतंत्रता मिळण्यार्चीत जवीज छत्रपतीचें जन्मकाळीच झालेली दिसत आहे आणि तिचा भंग जगांतील सर्व राष्ट्रें एकत्र झालीं असतांनाहो होणारा नाहीं. षष्ठ स्थानचा अधिपति गुरु हा शिवाजी महाराजांचा शत्रु होय. पिंगळे प्रधान ह्यांचें ग्रामण्य, पेशव्यांचें उद्यम वर्तन, करवीरावर पटवर्धनांचा

हल्ला, सन १८४४।४५ सालीं बाळाजीपंत नातूनें दाखविलेली कर्तबगारी हो गुरूची कृति छत्रपतीचें गादीस असमाधानाचो होती.

सप्तम स्थानचा अधिपति शनि मंगळाकडून विलोकित आहे, त्यामुळें शिवाजी महाराजांस दोन बायका होत्या. अन्य मताप्रमाणें सप्तम स्थानावर शत्रूचा विचार होतो. सप्तम स्थानांत मकरराशि आहे. मकर हें उत्तर हिंदुस्थानाचें तनुस्थान होय. शिवाजीस उत्तर हिंदुस्थानांत म्हणजे दिल्ली शहरांत कैदेंत वास करावा लागला आहे. अष्टम स्थानावर मृत्यूचा विचार होतो. मकर राशीचें स्वामित्व गुढघ्यांवर आहे. शिवाजी महाराजांस मृत्युकाळीं गुडघी रोग झाला होता. नवम स्थानावर दान-धर्म ह्याचा विचार करतात. नवम स्थानाचा अधिपति गुरु पंचम भावांत आहे हा स्वग्रहींचा आहे. नवम भावांत शुक्र मीनेचा उच्च आहे. शुक्र हा शुभ ग्रह आहे. ह्या ग्रहस्थितीच्या परिणामानें शिवाजी महाराज दानकृत्यांत नेहमीं अनंद मानोत असत. श्रीरामदास स्वामींस त्यांनीं राज्य अर्पण केलें होतें ही गोष्ट इतिहासप्रसिध्द आहे. 'दानस्थानाधिपे स्वोच्चे शुभग्रहनिरीक्षिते॥ तत्स्थाने शुभसंयुक्ते दानकृत्स नरो भवेत् ॥'

दशम स्थानावर राजकीय प्रकरणाचा विचार होतो. दशम भावारंभाचा अधिपति गुरु स्वगृहींचा पंचम स्थानांत आहे. दशम स्थानाचा अधिपति गंगळ नवम भावारंभीं आहे त्यावर गुरूची शुभदृष्टि आहे. दशम भावाचा अधिपति गुरु स्वगृहींचा असल्यामुळें शिवाजी महाराज हातांत घेतलेली गोष्ट शवटास नेल्याशिवाय ठेवीत नव्हते. 'शुभग्रहाणां संबंधमाने तन्नायकेपि वा ॥ स्वोच्चे वा स्वगृहे वापि जातो मानी दृढव्रत:' एकादश स्थानचा अधिपते मंगळ आणि शुक्र, हे नवम

स्थानांत, ह्मणजे त्रिकोणांत आहेत. शुक्र उच्च आहे त्यामुळें शिवाजी महाराजानें, मित्रांचे साह्यानें, आणि लढाऊ मित्रांचे साह्यानें, अनेक प्रकारचे लाभ संपादन करून पुष्कळ द्रव्य मिळविलें. मित्रभावारंभाचा अधिपति मंगळ हा लढाऊ ग्रह आहे. 'लाभेश्वरे केंद्रगते त्रिकोणे वा समन्विते ॥ लाभे वा पापसंयुक्ते धनलाभमुदीरयेत् ॥'

श्री शिवाजी महाराजांचे कुंडलीत पूर्वकेंद्रारंभापासून तो पश्चिम केंद्रारंभापर्यंत ६ ग्रह आहेत. ह्या सहापैकीं केतु खेरीज करून शेष पांचग्रहांत, रवि, शुक्र आणि चंद्र हे तीन ग्रह उच्च आहेत. दशम स्थानांत रवि उच्च आहे. चंद्रावर कांहीं ग्रंथकारांचें मताप्रमाणें सामान्य जनांचा विचार होता. सामान्य मनुष्यास श्री शिवाजी आवडणें हा एक गुण सर्वांत मोठा आह. लग्नापासून सप्तम स्थानापर्यंत ग्रहांत तीन ग्रह उच्च असल्यामुळें श्री शिवाजीस राजपद मिळालें. 'ग्रहा बलाढ्यायदि पूर्वषट्के स्वोच्चस्थिता: पूर्वदले नृप: स्यात् ॥.

सायनगणिताचे आधारें, श्री शिवछत्रपतीचें जन्मकालीचें ग्रहांचे संस्कार, जे शिवाजीवर, लोकसमाजावर, देशावर, आणि त्यांचे मरणानंतर, त्यांचे स्थापन कलेले गादीवर जे जे झाले ते ते सर्व ग्रंथांचे आधारें आणि फलज्योतिष्याचे नियमास अनुसरूनच दिले आहेत.

शुद्धिपत्रक

(१) पान ३७ वर ११ व्या ओळींतील शेवटच्या शब्दापासून १४ व्या ओळींतील "डलें" या अक्षरांपर्यंतच्या वाक्यांबद्दल पुढील वाक्यें वाचावीं:-"शिवाजीची जन्मवेळ नक्की ठरविण्याकरतां स्वयं-निर्णित मार्च्याच्या मंगळवारावरून मारलेली भरारी वारा ऐवजीं होत्यावरच पडली. अखेर शुक्रवारच्या-मंगळवारच्या नव्हे-होत्यालाच पकडलें!"

(२) पान ४३ शेवटच्या ओळींतील "(२) लग्न, राशि किंवा लग्नेश, गुरु व बुध" याबद्दल "(२) लग्न हें लग्नेश, गुरु व बुध" असें दुरुस्त करून वाचावें.

संपादकीय विचार.

श्री शिवाजी महाराजांच्या जन्मकाळासंबंधानें हल्लीं तीव्र मतभेद चालू आहेत. इतके दिवस शिवजन्माचें वर्ष व महिना नक्की होता परंतु जेधे शकावली उत्पन्न झाल्यानंतर आजपर्यंत मानीत आलेलें शिवरायाच्या जन्माचें वर्ष व महिना निखालस चूक असल्याचें कांहीं संशोधक म्हणूं लागले असून यासंबंधानें निश्चित एकमत होण्यापूर्वीच घिसाडघाई करून पुणेंकरांनीं शिवरायाच्या जन्माचा उत्सव चालू वर्षीं गेल्या फाल्गुनामध्यें उरकून आपली फाल्गुनी पौर्णिमेची हौस पुरवून घेतली आहे. शिवरायाचे जन्मासंबंधानें आलेली जेधे शकावलीमधील नोंद अत्यंत विश्वसनीय आहे व त्याचप्रमाणें आतां फक्त रात्रीं शिवराय कोणत्या लग्नावर जन्मले एवढेंच ठरवावयाचें बाकी राहिलें आहे व हें काम सर्व ज्योतिर्विदांनीं करून आपापली मतें पंडित रघुनाथ शास्त्री ज्योतिषी, ज्योतिर्विचारिणी सभा, पुणें यांचेकडे पाठवावीं म्हणजे सर्वांचीं मतें इतिहास संशोधन मंडळामार्फत श्रीशिवाजी महाराजांच्या जन्मकाळाबद्दल जो ग्रंथ निघावयाचा आहे त्यांत छापण्यांत येतील. अशा तऱ्हेचें विनंतिपत्र ज्योतिर्भूषणाचे संपादक महाशय पंडित रघुनाथ शास्त्री यांचेकडून प्रसिद्ध झालेलें आमचेकडे आलें आहे. या संबंधानें आम्हाला काय म्हणावयाचें आहे तें आम्हीं ज्योतिर्मालेमध्यें प्रसिद्ध करणार आहोंच व या विषयाचा श्रीयुत रामनारायण यांचा पहिला लेख आज रोजीं मालेच्या वाचकांपुढें ठेविला आहे. श्रीयुत करंदीकरांनीं ठरविलेली शिवरायाची कुंडली कोणत्या दर्जाची आहे याची कल्पना आतां वाचकांना सहज करतां येईल. डाक्टर रेळे व रा. रा. खरे यांनीं जवळ जवळ हीच कुंडली ग्राह्य धरून गेल्या एप्रिलच्या चित्रमय जगतांत एक लेख लिहिला आहे. आजचा लेख रेळे प्रभृतींच्या लेखाला पूर्ण लागू होत आहे. परंतु डाक्टर साहेबांच्या लेखाचें परीक्षण आम्हीं पुढील अंकांत करणार आहों. इतिहाससंशोधकांची शिवजन्माच्या वर्ष महिन्याच्या संबंधानें अजून एकवाक्यता झालेली नाहीं अशा काळीं शिवाजी कोणत्या लग्नावर जन्म पावला असेल यासंबंधानें घाईनें कसेतरी विचार प्रसिद्ध करणें अत्यंत घाडसाचें आहे असें आम्हांस वाटतें. श्रीशिवाजी महाराजांसारख्या राष्ट्र निर्माण करणाऱ्या अद्वितीय विभूति कोणत्या ग्रहस्थितीवर जन्म पावतात यासंबंधानें फलज्योतिषशास्त्रदृष्ट्या ऊहापोह होणें अत्यंत हितावह आहे; असले महात्मे काल्पनिक चक्राकार योग, किंवा सुतकाअतकाच्या खुलचट तत्त्वावर खास निर्माण होत नाहींत. फलज्योतिषाचे ग्रंथामध्यें यापेक्षां जास्त माहिती खास आहे व त्यासंबंधानें चर्चा व वादविवाद होणें अत्यंत आवश्यक आहे.

———२———

॥ श्रीसद्गुरवे नमः ॥

ज्योतिर्माला

आप्राचः कामरूपाद्द्रुहिणसुतनदप्लावितादाप्रतीचो
गान्धारात् सिंधुसाद्रार्द्रघुवररचितादाचसेतोरवाचः ।
आकेदारादुदीचस्तुहिनगहनतः सन्तिविद्वत्समाजा
ये ये तानेष यत्नः सुखयतु समजान्कश्चमत्कर्तुमीष्टे ॥ १ ॥

अभिनवाऽऽवृत्ति } वर्ष ९ वें { अंक ५ ते ६.

फलज्योतिष.

लेख ८ वा.

(एम्. डी. सगणे. एम्. ए. एलएल. बी.)

प्राक्तन आणि कर्म-स्वातंत्र्य हीं एकच होत. सर्व शक्तिमान परमेश्वरच सर्वश्रेष्ठ प्राक्तन व सर्व-व्यापी स्वातंत्र्य होय.

प्रत्येक मनुष्य, प्रत्येक जीवात्मा मुळांत परमेश्वर आहे. खरोखर मुळांत तो तसा आहे ! पण त्यानें रूपांत प्रकृतीच्या पटलांत अधिष्ठान केलें ! तें तसें त्यानें प्रथम कां व कसें केलें, हे आपणांस अवगत नाहीं. ती त्या परमेश्वराची लीला-माया आहे. दुसरें काय ?

तो (जीवात्मा) पर्याघहीन वर्तुळ होता. म्हणजे केवळ रेषामात्र होता. पण त्यानें स्वत:भोंवतीं स्वत:स मध्य-बिंदु धरून एक वर्तुळ काढलें. व त्या वर्तुळानें स्वत:स वेष्टित केलें. जणूं काय तो बिंदुवजा जीव रेषेवेगळा झाला. आणि स्वत:भोंवतीं बंध घातला. तो प्रकृतीच्या साम्राज्यांत यात्रा करूं लागला.

तो परत जाऊं शकेल काय ? व पूर्वस्थिति प्राप्त होईल काय ?

× × × ×

अर्थात होईल; कां नाही ? तो सर्व-सत्ताक सर्वशक्तिमान आहे. त्याला स्वनिर्मित वर्तुळाचो तृज्या दिवसेंदिवस अधिकाधिक लांब करूं द्या. प्रकृतीच्या साम्राज्याचें अधिकाधिक आधिष्करण करूं द्या. तृज्या अनंत झाली म्हणजे वर्तुळ पुन्हां परीघहीन होईल. म्हणजे जीवात्मा पुन्हां रेषा-मात्र होईल. प्रकृतीचा दृढतर परिचय झाला म्हणजे, तो तिच्या वर जाईल (सत्ता गाजवील).

अशाप्रकारें तो प्रकृतीच्या दृढ शृंखलेचा भंग करण्यास समर्थ होईल आणि मग तोच स्वतः महाबंध, सर्व-व्यापी स्वातंत्र्य बनेल.

× × × ×

तोपर्यंत त्याचें स्वातंत्र्य नष्टप्राय राहून, प्रकृतीच्या नियमांची त्याच्यावर सत्ता चालते. इच्छा, विचार आणि कृतींच्या बंधनांनीं तो बध्द आहे. आणि त्याला पूर्व-जन्मी उद्भूत झालेल्या कारणांचे परिणाम भावी जन्मांत भोगावे लागतात.

प्रकृतीचा विरळ अथवा दृढ परीघ त्याला अधिकाधिक विरळ व विस्तृत करून नष्ट केला पाहिजे.

\+ × × ×

फलज्योतिषांत सूर्य ⊙ सबिंदु-वर्तुलानें दाखवितात. ह्या संकेतानें परमात्म्याचें प्रकृतींत अवतरण अथवा त्याचें प्रकृतीशीं मेलन दाखविलें जातें. मध्यवर्ती बिंदूनें सभोंवती परिघाचे म्हणजे प्रकृतीचे, व त्यामुळें निसर्गाच्या नियमांचें परिवेष्टन घेतलें आहे. आणि तेंहि स्वेच्छेनें, अर्थात बंधन, पटल (नशीब) स्वातंत्र्यांतून (पासून) निर्माण झालें. आणि

तदनंतर स्वातंत्र्य (कर्म स्वातंत्र्य) परिघ-मर्यादित क्षेत्रांत संचार करूं लागलें (करतें). बिंदु ह्या परिघबंधनांतून मुक्त झाला पाहिजे. आणि हें तो परिघाला विस्तृत करून अगर भस्म करून करूं शकेल. अग्नि आणि उष्णता, विस्तरण व भस्म करूं शकतात. म्हणूनच मेष व सिंह ह्या अग्निराशी, सूर्याच्या स्वतः व उच्च राशी आहेत. ह्या अग्नीनेंच अधिकाधिक विरळता येऊन परिघाचें भस्म होतें. मध्य बिंदु मुक्त होतो.

\+ \+ × +

शनि ग्रह मनाच्या उच्च व तसाच नीच स्थितींचा द्योतक आहे. तो पुनर्जन्माचें उगमस्थान म्हणजे ' कारण देह ' वाचक आहे. आयुष्यांत आलेल्या अनुभवांचें गाठोडें घेऊन त्याचें तो पुढच्या आयुष्यांत जणूं काय पृथःकरण करतो. स्वोच्या वासना क्रियादिकांचा तो परिणाम असून भावी जन्मांतील स्वातंत्र्याच्या चारित्र्याचा तो कारक बनतो. प्रकृति---संघटित स्वातंत्र्याचा तो चिरंजीवी परिणाम आहे. आतां पुनश्च प्रादुर्भूत करणारें मूळ नष्ट केल्याशिवाय (म्हणजेच प्रकृतीशीं व दुष्कृत्याशीं तादात्म्य बंद केल्याशिवाय) वर सांगितलेलें पूर्ण प्रसरण किंवा दहन होणें शक्य नाहीं. हें मूळ नष्ट होईल तेव्हांच उच्च मनस्थितीचा प्रादुर्भाव सुरू होईल. आणि म्हणून जिवात्म्याच्या यात्रेंत, मध्यंतरी कुठेंतरी पापपुण्याचें समतोलन झालें पाहिजे. अर्थात् उच्च स्थिति प्राप्तीकरितां व त्यामुळें संसाराचा अंत होण्यासाठीं शनि समतोल झाला पाहिजे. म्हणूनच समतोलपणा जींत भरला आहे अशी (तराजूवाचक) तुलाराशि शनीचें उच्च होय. तेव्हां तुला न्याय, समत्व, व तुलेतला

शनि न्यायीपणा इ० दर्शवितो, हें लक्षांत ठेवण्यासारखें व विचार करण्यासारखें आहे.

रवीच्या तेजाचें परिवर्तन करणारा चंद्र, ' सूक्ष्म देह ' होय. मंगळ चळवळीचा, किंवा क्रियेचा, गुरु प्रगल्भतेचा, अथवा प्रसरणतत्वाचा, बुध स्मृति व विचाराचा घातक होय. हे सर्व ग्रह रवीचीं (जीवात्म्याची) निरनिराळीं रूपें आहेत. आणि प्रकृतीच्या साम्राज्यांतील यात्रेशीं त्यांचा निकट संबंध आहे. ते ह्या यात्रेचें तत्त्व विशद करतात. राशि, त्यांतील ग्रह, द्वादशस्थानें, आणि ग्रहांच्या दृष्टया हे सर्व परमेश्वराची अद्भुत लीला वर्णन करतात.

\+ × × +

परमेश्वर सर्व---व्यापी स्वातंत्र्य आहे. परंतु प्रगटावस्थेंत त्यानें आपलें स्वातंत्र्यक्षेत्र आकुंचित केलें. पुन्हा पूर्वस्थिति प्राप्त होण्यास, प्रकृतीचा शोध व अंत लावला पाहिजे. तेणेंकरून तिचें मिथ्यात्व दिसून येईल. त्यामुळें मन, विचार व क्रिया उच्चतम, पूर्ण व सर्वव्यापी होतील. आणि तेव्हांच ह्या अनेक तत्त्वांचे दर्शक जे ग्रह त्याचें माहात्म्य राहणार नाहीं. त्यांचें तत्त्वज्ञान तेथेंच संपेल.

परंतु तोंवर मनुष्य भौक्तिक किंवा आध्यात्मिक ऊन्नतीच्या कोणत्या पायरीवर आहे, पूर्व जन्मांत त्याच्या इच्छा व क्रिया कोणत्या व कशा होत्या. व त्यामुळें ह्या किंवा भावी जन्मांत त्याला कोणती सुखदुःखें भोगावीं लागतील, ज्याला आपण कर्म-स्वातंत्र्य म्हणतों ते कर्मस्वातंत्र्य त्याला कितपत आहें, व प्राक्तनाच्या फेऱ्यांत कितपत अडकला आहें, वगैरे सर्व गोष्टी हे आकाशस्थ दिव्य गोल दर्शविल्याशिवाय राहणार नाहींत.

त्रिगुणात्मक राशी, आत्म्याची थोरवी किंवा जात (विशेषतः) दर्शवितात, द्वादशस्थानें, त्याच्या ऐहिक वास्तव्याचें निदान व स्थिति सांगतात. आणि दृष्टया, ऐहिक व तसेंच पारमार्थिक क्षेत्रांत तो कितपत मोकळा अथवा बध्द आहे, त्याला सहायक व विधायक, किंवा निरोधक व विध्वंसक सामुग्री आहे व ती कशी आहे इत्यादि दाखवितात.

× × + ×

आधान काळ.

संग्रह १ ला.

(संग्रहकारः—श्रीयुत राम नारायण)

वादे वादे जायते तत्त्वबोधः ।

आधान काळासंबंधानें इंग्रज़ी भाषेमध्यें गेल्या तीस पसतीस वर्षांत बरोच भवति न भवति झाली व अद्यापिही होत आहे. सुप्रसिध्द आंग्ल ज्योतिषी **सफेरिअल** यानें आपल्या Manual of Astrology या पुस्तकामध्यें या पध्दतीची बरोचशी व्यवस्थेशीर मांडणी केल्यावर स. १९१६ मध्यें मि. बेलीनें Pre-Natal Epoch नामक दोन अडीचशें पृष्ठांच्या स्वतंत्र पुस्तकांत आधान काळासंबंधानें अनेक नियम स्पष्ट करून विशेष प्रगति केली आहे. सफेरिअल वगैरेंनी रेखाटलेलीं आधानकाळ-पध्दति निर्दोष किंवा पूर्ण झाली आहे असें नाहीं परंतु त्यांच्या प्रयत्नानें ती प्रगतीच्या मार्गास लागली आहे यांत बिलकूल शंका नाहीं. पध्दतींमध्यें अद्यापिही शंकास्थानें फार राहिलीं आहेत, परंतु तीं उत्तरोत्तर कमी करण्याचा कसून प्रयत्न होत आहे. कालावधीनें हीं शंकास्थानें कमी होत जाणार यांत शंका नाहीं. असो. अशा रीतीनें आज उद्यां जी पध्दति फलज्योतिषाचो एक स्वतंत्र उपशाखाच होऊं पहात आहे तिचा उगम

एका लहनशा जुन्या सूत्रापासून झाला आहे. या सूत्राचा जनक कोण हें बिलकूल निश्चित नाहीं. परंतु आपल्याकडे जसें ज्यांना गोत्र नसतें त्यांनीं काश्यप गोत्र लावावें अशी मामुली वहिवाट आहे त्याप्रमाणें ह्या जुन्या सूत्राचें जनकत्व **हर्मिस**शीं जोडण्यांत आलें आहे. " आधान-काळचा चंद्र जन्मकाळीं लग्नीं किंवा सप्तमांत असतो " हें तें सूत्र होय. ह्या सूत्रापासून आधानकाळ पध्दतीचा उगम झाला असें म्हणतात.

ह्या पध्दतींतील सूत्रबध्द नियमांची सिध्दता बव्हंशीं सफेरि-अलच्या परिश्रमानें झाली असल्याचें मि. बेली आपल्या पुस्तकांत नमूद करतो. वर दिलेलें अर्धवट सूत्र व आधान--काळ पध्दतीची झालेली आजची प्रगति यांमध्यें जमीन अस्मानाचें अंतर पडलें आहे आणि हें सर्व केवळ एका पिढींत होऊन गेलें आहे. सफेरिअलनें नियम कसे बसविले, त्यानें आधार काय घेतले, आधान--काळासंबंधानें पाश्चिमात्यां-शिवाय इतरांजवळ असलेली माहिती त्यानें किती उपयोगांत आणिली वगैरे प्रश्न साहजिकच पुढें उभे रहातात. परंतु त्यांना उत्तरें मिळण्याची आशा नाहीं. मि. बेलीच्या पुस्तकांत पध्दतीचें परिणत स्वरूप आपणांस दिसतें व पध्दतीचा आरंभींचा धागाही आपणांस सांगितला गेला आहे. मध्यंतरींचे दुवे आपणांस कळले नाहींत तरी ते मि. सफेरिअलनें कळविले हें सर्वांस कबूल आहे.

मि. सफेरिअल हे सुप्रसिध्द ज्योतिषी असून प्राच्य--विद्या-विशारद असल्याचें बेली लिहितो. हे एका काळीं थिअॅसोफिस्टही असून हिंदुस्थानामध्यें पुष्कळ वर्षें मद्रासेला राहिले होते. त्यांनीं आतांपर्यंत फलज्योतिषावर २५।३० पुस्तकें लिहिली आहेत. त्यांपैकीं Manual of

Astrology हें पुस्तक एकंदर आंग्ल ज्योतिर्वाङ्मयामध्यें उत्तमांतील उत्तम होय. या पुस्तकांतील " Hindu Astrology after Parashara " या विभागावरून त्यांचा आर्य ज्योतिषाशीं चांगलाच परिचय झालेला आहे हें स्पष्ट होतें. ज्या पुस्तकांत " हिंदुज्योतिष " आलें आहे त्यांतच आधानकाळ पध्दतीची संकलित माहिती पहिल्याने प्रसिध्द झाली आहे. सफेरिअलनें आधानकाळविषयक आपले शोध प्रसिध्द करण्यापूर्वी आर्य वाङ्मयामध्यें हर्मिसशीं जोडण्यांत आलेल्या सूत्रापेक्षां अधिक माहिती असून तो चांगली प्रसिध्द होती. अर्थातच ह्या माहितीचा उपयोग त्यानें केला असल्याचें अत्यंत संभवनीय आहे.

आधानकाळासंबधानें सध्यां स्वत: आम्हीं जी पध्दति उपयोगांत आणतों ती पध्दति पाश्चात्यच आहे. ही पध्दति अद्यापि पूर्णत्वास पोंचली नसून तिच्यामध्यें दोषही आहेत. फरक इतकाच कीं ह्या पध्दतीचा विकास इतका झाला आहे कीं तिच्या उगम स्थानाचेही आज विस्मरण पडलें आहे. या पध्दतीच्या मूलभूत सिध्दांतापकीं एखादा सिध्दांत आपल्या-कडे होता हा गोष्ट कित्येकांस खरी सुध्दां वाटत नाहीं. आधानकाळा-संबंधानें आर्य-वाङ्मयमध्यें कांहींही नाहीं असा निष्कारण समज बऱ्याच ज्योतिर्विदांचा झालेला आम्हांस माहीत आहे.

मराठी भाषेत आधानकाळासंबंधानें चर्चेला सुरुवात मात्र होऊन ती बंद पडल्यास आज बारा वर्षांवर काळ लोटला आहे ! थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे पुन्हां एकदां चर्चेला सुरुवात करणें अपरिहार्य झालें आहे. या वेळीं चर्चेला आरंभ करतांना आम्हीं स्वत:करितां व त्याच-प्रमाणें समव्यवसायी वाचकांकरितां चर्चेचा विषय आरंभींच आंखून ठेवीत

आहीं. आमच्या अल्प समजुतीप्रमाणें ही चर्चा पुढील धोरणानें व्हावयास पाहिजे:----

या पध्दतीसंबंधानें

(१) आर्य-वाङ्मयांतील उपयुक्त उल्लेख (अ) एकत्र करणें व नंतर (आ) त्यांचें गुणदोषांचें विवेचन करणें;

(२) पाश्चिमात्य पध्दतीचा गुण-दोष विवेचनासह संग्रह करणें आणि शेवटीं

(३) दोन्हीं पध्दतींचे सारग्रहण करणें.

वरील कार्यक्रमास अनुसरून आम्हीं **श्री रणवीर ज्योतिर्निबंध** नामकग्रंथांतील प्रस्तुत पध्दतीसंबंधाचा उल्लेख वाचकांस सादर करतों. हा ग्रंथ संवत् १९२९त पुरा होऊन संवत् १९३१ त म्हणजे सन १८७५ चे सुमारास शिळाप्रेसवर छापून प्रसिध्द झाला आहे. ग्रंथकार जुना नाहीं, ५० वर्षांपूर्वींचा आहे पण या ग्रंथापूर्वी आंग्ल वाङ्मयांत हर्मिसच्या नांवावर खपल्या जाणाऱ्या सूत्रापेक्षां कांहीं नव्हतें. आंग्ल वाङ्मयांतील आधानकाळ पध्दतीच्या उत्पादकत्वाचाच मान घेणाऱ्या सफॅरिअलच्या जन्माच्या सुमाराचा हा ग्रंथ असून त्याच्या पूर्वी झालेल्या दोन ग्रंथकारांचे उतारे प्रस्तुत ग्रंथांत घेतले आहेत. हे दोन ग्रंथकार म्हणजे **श्री माइदास मिश्र** व **नित्यानंद** हे होत. ह्या दोघांही ग्रंथकारांचे ग्रंथ आमच्या पहाण्यांत नाहींत किंवा त्यांच्या संबंधानें माहिती आम्हांस उपलब्ध झाली नाहीं. वाचकांपैकीं कोणास यासंबंधानें माहिती असल्यास तो आम्हांस कळविल्यास उपकार होतील. नित्यानंदाचे जे श्लोक रणवीर ज्योतिषांत घेतले आहेत त्यांपैकीं शेवटच्या दोन

श्लोकांत **निषेककालीन लग्न व चंद्र** यांचे **जन्मकालीन लग्न व चंद्र** यांच्याशीं **सांगितलेले संबंध सफॅरिअलच्या पद्धतीशीं फारच जुळत आहेत हें वाचकांच्या लक्षांत येईलच.**

श्री रणवीर ज्योतिषांत आलेला भाग अक्षरशः देऊन निव्वळ मराठी वाचकांकरितां त्याचा तात्पर्यार्थही शेवटीं जोडला आहे.

प्रस्तुत विषयासंबंधानें वाचकांपैकीं ज्यांच्या जवळ विशेषतः जी आर्य-ग्रंथांतील माहिती संग्रहीं असेल ती त्यांनीं प्रसिध्द करण्याकरितां आमच्याकडे पाठवावी. आणि ज्यांना चर्चात्मक टीका करणें शक्य असेल त्यांनीं चर्चेस हातभार लावावा. शास्त्राच्या प्रगतीस चर्चा, टीका, वादविवाद वगैरे जितके होतील तितके चांगले. शास्त्रीय विषयांची पिछेहाट उपेक्षेनें जितकी होते तितकी वादानें होत नाहीं असें आमचें स्पष्ट मत आहे.

श्रीरणवीर—ज्योतिर्महानिबंधे.

अथ जन्मसमये निषेकसमयज्ञानपूर्वकजन्मसमयज्ञानोदाहरणं लिख्यते ।

। संवत् । १७२७ जेष्ठ शुदि ९ बुधे श्रीसूर्योदयाद्गत घटी ३६ पल ४६ तत्र राश्यादिके धनुर्लग्ने ८।४।२७।१५। एवं वृषस्थे सूर्ये १।१८।४३।३९। एवं कन्या गते चंद्रे ५।९।४४।२८। जन्म सूर्यगतिः ५७।१७। चंद्रगतिः । ८१७।४२ तत्रायनांशः १९।८ चरं १४३ चक्रं १३ अहर्गणः २६३९।

अस्माज्जन्मसमयान्निषेकसमयाहर्गणो श्रीमाईदास मिश्रोक्तः ॥

व्यंगाब्जलिप्ता स्वाब्ध्यष्टांशा (८४) दध्यष्टिनगांगनवेंदु भिः १९६७१६। युक्ताः खाभ्रगजै ८०० र्भक्ता गर्भस्थांहर्गणस्थिरः ॥ १ ॥

॥ उदाहरणम् ॥

चंद्रः ५।९।४४।२८

लग्नं ८।४।२७।१५ एतदूनोब्जः ९।५।१७।१३॥

एतस्यलिप्ताः । १६५१७। द्विस्थाः॥ १६५१७॥ अस्याब्ध्य-
ष्टांशालब्धाः । १९६ अनेन त एव युता--जाताः १६७१३॥

अष्टयगांगनवेंदुभिः १९६७१६ युताजाताः २१३४२९ खाश्रगजैं ८०० भक्ता जातोऽहर्गणः जन्मसमये २६६ सावनः सप्त ७ तष्टे तलस्थे शून्य० वारः अनेन हीनो जन्मवारो बुध ४ शेषं ४ अस्मा-ज्जातो बुधवारे निषेकसमये। अथ जन्म समयादाधानतिथ्यानयनम्

व्यंगाब्जांशाः पृथक् त्रिघ्नाः खाब्ध्या ४० तो इनो १२ द्धृताः ।
खतत्त्वा २५० ढ्याद्विहितिथयो नर्भाब्जन्मावधिस्फुटाः २ ॥

चंद्रः ५।९।४४।२८॥ लग्नेन (८।४।२७।१५) हीनः

= ९---५---१७---१३

अस्यांशाः २७५।१७।१३॥ पृथक्स्थाः २७५।१७।१३

त्रिघ्नाः ८२५।५१।३९ खाब्ध्या (४०) लालब्धा

२०।३८।४७ अनेन हीनाः पृथक्स्थाः २५४।३८।२६

इनो १२ ध्दृतालब्धाः।२१।१३।१२। खतत्त्वा।२५०। ढ्याः।२७१ जातास्तिथय एतास्त्रिंश (३०) द्धक्ताः जाता मासाः ९ तिथिः १ । एतत्संख्यांकसमेन हीना जन्ममासतिथयः तद्यथा जेष्ठ शुक्ल नवम्यां जन्माऽस्य जेष्ठशुक्लांकोमासात्मकः।२।९। एते मासाद्या गर्भ-मासाद्येन ९।१ हीने कृते जातं ५।८। अतो लब्धाः शुक्लादि क्रमेण

पंचगताः षष्ठस्य भाद्रपदस्याष्टमी गता विद्यमाना नवमी ॥ तदिने औदयिकः सूर्यो मध्यमः ४।२४।५१।४८ निषेक समये सूर्यः ४।२२।५६।५६॥ चंद्रः ८।४।२७।१५॥ लग्नं ५।९।४४।२८ चक्रं १३ । अहर्गणः २३७३॥

अत्र 'जन्म चंद्र लग्नं प्रकल्प्य पुनः जन्मलग्नं चंद्रं प्रकल्पयेत्' इत्युक्तत्वात् जन्मचंद्र ५।९।४४।२८---इदं निषेकलग्नं ॥ जन्मलग्नं ८।४।२७।१५ इदमेव चंद्रो निषेकसमयें । अस्मान्निषेक चंद्रात् निषेकस्येष्ट कालानयनम्॥ जन्मलग्नकलापिंडमिति ।१४६६७। खखनागैं ८०० विभाजिते लब्धं १८। गतनक्षत्र ज्येष्ठाख्यं वर्तमानं मूलं भाजिते शेषं २६७। अत्र मूलस्य सर्वर्क्षघटिका ६०। अस्माच्छेषं षष्टिघ्नं ।१६०२०। तदुर्वरित विकलाभिः १५ युतं ।१६०३५खख नगैं (८००) भाजिते लब्धा मूलस्य मुक्तघट्यः २० प२॥ प्रातःकाले मूलस्य भुक्तघटिकाः १३।५७। एतदूनस्य मूलस्य भुक्त घट्यः जातो निषेकस्येष्ट कालः ।६।५॥ अत्र चालितो मध्यमो रविः ४।२४।५७।४८। मंदफ०ऋ० २।००।१६। संस्कृतो रविः ४।२२। ५७।३२। चरंऋणं ३६। तत्संस्कृतः स्पष्टो रविः ४।२२।५६।५६ तत्र मध्यमश्चंद्रः ८।७।३४।३२। चंद्रोच्चं ४।६।२।३५ त्रिफल संस्कृतश्चंद्रः ८।८।२९।१४। मंदफलं ऋणं ४।१४।९। संस्कृतः स्पष्टश्चंद्रः ८।४।१५।०५। गति ७५५।७॥ अयं चंद्रो जन्मसमये लग्नं पुनर्जन्मार्कनिषेकचंद्राभ्यामिष्टकलानयनम् यथा जन्मार्कः सायनः २।७।५१।३९। निषेक चंद्रः सायनः ८।२३।३३।०५। आभ्यामिष्ट कलानयनं यथा अर्कभोग्यस्तनोर्भुक्त कालान्वितो युक्तमध्योदयोभीष्ट कालोभवेदिति अर्कभोग्यकालः २२३।३६।२० तनोर्भुक्तकालः २६।९।

१६।१५ मध्योदयानि कर्कटतो वृश्चिकांता नामैक्यम् १७१७ युतानि जातं सूर्योदयादिष्टं पलात्मकं २२१०। षष्टया भक्तं जातं सूर्योदयादिष्ट घटयः ३६--५० दिनमानं ३४--४६ ऊनितो जातो रात्रीष्टकालः २।४॥ अथवा सूर्यः सायनः २--७--५०--३९ षड् राशि (६) युतः ८--७--५०--१९ यदि तनुदिननाथावेक राशौ तदंशांतरहतः उदयःस्यात् वाग्निहृत्विष्ट कालइति लग्नं ८--२३--३३--०५ तदंशांतरं १५--४२--२६ उदय पलानि ३४३ तदंशांतरेण गुणितानि ५३६--२--३८ खाग्नि ३० भक्ते लब्धः इष्टकालः १७९ षष्टि (६) भक्ते घटिकाद्यः २--५९ इदं सूर्ये षड्राशि युतत्वाद्रात्रिगत घटिकाः २--५९ अत्र सूर्य १--१८--४२--३७ लग्नं ८--४--१६--४३ चंद्र ५--९--४४--०१ अतः चंद्रेणगर्भार्केण लब्धो गर्भेष्ट--कालः ३--९ अत्र लग्नं ५--९--४०--३०॥ चंद्रः ८--३--३८--१०॥ सूर्यः ४--२२--५४--४॥ अतश्चंद्रेण जन्मार्केणच इष्टकालो रात्रिगतः २--५८ अत्र लग्नं ८--३--४८--५२ चंद्रः ५--९--४३--२६॥ अतःसाम्यता जातः शुद्धः इष्टकालः॥ अथेष्टकाल शोधनं **नित्यानंद**— कृतं तदेवोच्यते.

" व्यंगाब्ज लिप्ताःस्वाब्ध्यष्टां शाढ्याष्टि नगांगनवेंदुभिः ।
युक्ताः खाभ्रगजैर्भक्ता गर्भस्थोऽहर्गणस्थिरः ॥ १ ॥
त्रिचंद्रांगकलाः स्वाब्धि गजांशा (८४) ठ्याविहीनताः ।
त्रि--नगाक्षाष्ट--भू--पक्षा (२१८५७३) त्खखाष्टा (८००)
ताऽहर्गणः ॥ २ ॥
व्यंगाब्जांशाः पृथक्--त्रिघ्नाः खाब्धा (४०) तोना इनो
(१२) ध्दृताः। खतत्त्वा (२५०) ठ्याहिं--तिथयो
गर्भाज्जन्मावधिस्थिराः ॥ ३ ॥

जन्मतो नवमे मासे दशमे वा स्मृतौ पुरा ।
जन्मलग्नसमेऽर्केंगे जन्मेन्दु सममत्रतु ॥ ४ ॥
ग्लौसमं जन्मलग्नंस्यात्तस्मात्कालस्ततो विधुः ।
कर्मै तदसकृत्तावद्यावत्सर्वं स्थिरं भवेत् ॥ ५ ॥ "
॥ इति निषेकादीष्ट कालज्ञानम् ॥

(श्री रणवीर ज्योतिषांतील निषेककाल प्रकारचा मराठींत गोषवारा.)

जन्मकालावरून विषेककाल काढण्याची सोदाहरण माहितीः---

जन्मकालः----संवत् १७२७ जेष्ठ शुध्द ९ बुधवार सूर्योदयात् गतघटि ३६ पळें ४५.

या वेळचें लग्न--चंद्र वगैरे---

	राशि	अंश	कला	विकला
लग्न—धनु	८	४	२७	१५
चंद्र—कन्या	५	९	४४	२८
रवि—वृषभ	१	१८	४३	३९

चंद्र--गति ८१७--४२
रवि--गति ५७--१७
अयनांश १९--८
चर १४३
चक्र १४३
अहर्गण २६३९

जन्मकालावरून निषेककालीन अहर्गण काढण्याचीं रीति--

श्री माईदास मिश्रोक्त—

(१) स्पष्ट जन्मलग्न • जन्म चंद्रांतून उणेकरून येणाऱ्या संख्येच्या कला करणें---

उदाहरणांतील जन्म चंद्र ५--९--४४--२८

" " लग्न ८--४--२७--३५

९--५--१७--१३=१६५१७ कला.

(२) पहिल्या नियमानें येणारी कलांची संख्या दोन ठिकाणीं मांडून पहिल्या स्थानाच्या संख्येस ८४ नीं भागून येणारी संख्या दुसऱ्या स्थानाच्या संखेंत मिळवावी नंतर १९६७१६ ही संख्या मिळवून येणाऱ्या संख्येस ८०० नें भागिलें असतां निषेककालापासून गर्भमोक्ष काळापर्यंतचा अहर्गण येईल.

१	२
१६५१७÷८४=१९६	१६५१७+५१९६=१६७१३
	१६७१३+१९६७१६=२१३४२९
	÷८००=२६६

२६६ सावन दिन संख्येस ७ नीं भागतां ० शून्य बाकी राहते. जन्मवार बुधवार (४) त्यांतून ० वजा जातां येणार वार (४) म्हणजे बुधवार होय. हा निषेकाचा वार होय (केवळ निषेकाचा वार ठरविण्याकरितां ही रीति आहे).

जन्मकालावरून **निषेक-तिथि** आणण्याचा प्रकार:---

(३) स्पष्ट जन्म चंद्रांतून स्पष्ट लग्न उणें करून त्याचे अंश दोन जागीं निरनिराळे मांडावे;

मागील उदाहरणांतील चंद्र ५--९--४४--२८

" लग्न ८--५--२७--१५

९--५--१७--१३=२७५ अंश १७ कला

१३ विकला.

(४) पहिल्या जागीं मांडलेल्या अंशादिकांस ३ नीं गुणून ४० नीं भागावे व जो भागाकार येईल तो दुसऱ्या स्थानीं मांडलेल्या संख्येंतून उणा करून १२ नें भागावें व २५० मिळवावें, येणारी संख्या निषेककाळापासून जन्मकाळापर्यंतची तिथींची संख्या होय.

वरील ३ ऱ्या नियमाप्रमाणें अंशादिकांची संख्या:--

(१)			(२)		
अंश	कला	विकला	अंश	कला	विकला
२७५	१७	१३	२७५	१७	१३
× ३			--२० *	३८	४७
८२५	५१	३९	२५४	३८	२६
÷४०			÷ १२		
२० --	३८ ----	४७*	२१ —	१३ —	१३
			+ २५०		
			२७१ —	१३ —	१२

निषेककालापासून जन्मापर्यंतची तिथिसंख्या.

३० तिथींचा एक महिना याप्रमाणें वरील तिथींचे ९ महिने १ तिथि जन्म दिवसांतून **उणी** करितां भाद्रपदांतील (विद्यमान) नवमी ही निषेक-तिथि ठरते. तिथि निर्णय केल्यानंतर त्या दिवशीं—

(५) (अ) जन्म--कालीन चंद्रा इतकें निषेक--कालीन लग्न घ्यावें व

(आ) जन्म लग्नाइतका निषेककालीन चंद्र घ्यावा. जन्म-कालीन चंद्राइतकें निषेककालीन लग्न घेतांना येणारा काळ व जन्म लग्नाइतका निषेककालीन चंद्र ठेवितांना येणारा काळ या दोहोंच्या साम्यते-वरून इष्ट--काल ठरवावयाचा असतो.

लिलिथ—लेख १ ला.

[लेखक:—**एम्. डी. लगणे** एम. ए. एल एल. बी.]

सूर्यमालेत अनेक ग्रह व उपग्रह आहेत. त्यांपैकीं पुष्कळांचा शोध लागलेला आहे. व कांहींचा फलज्योतिषदृष्ट्या विचारहि पण झालेला आहे. दिवसांनुदिवस नवीन ग्रह व उपग्रह शोधले जात आहेत, व अनु-भवांनीं त्यांना क्रमाक्रमानें फलितांत स्थलहि पण मिळत आहे. अशा ह्या नवीन शोधल्या गेलेल्या ग्रहांपैकीं ज्यांच्या फलाचा बराचसा अनुभव आल्यामुळें ज्यांना फलज्योतिषांत कायमचें स्थल मिळालें आहे असे दोन नूतन ग्रह म्हणजे हर्शल ऊर्फ युरेनस (प्रजापति) व नेपच्यून (वरुण) हे होत. आधुनिक फलज्योतिषाचा थोडासा देखिल ज्यांना परिचय आहे त्यांना ह्या ग्रहांची फलमहति किती आहे ते सांगणें नकोच.

गेल्या ३० वर्षांत शोधल्या गेलेल्या नवीन आकाशस्थ गोलांत ज्याच्या फलाविषयीं थोडाबहुत अनुभव आला आहे असा एक उपग्रह

आहे. ह्या उपग्रहाला पाश्चिमात्य देशांत ' **लिलिथ** ' हें नामाभिधान प्रदान केलें आहे. आमच्या वाचण्यांत जें कांहीं त्या उपग्रहाविषयीं आलें तें संक्षिप्त रूपानें खालीं देत आहोंत. त्याजविषयीचें आमचें स्वत:चे विचार पुढें कधींतरी यथावकाश देऊं.

लिलिथचा शोध डॉ० वाल्टेमथ यांनीं लावला व तो त्यांनीं हँबर्गमध्यें सन १८९८ च्या जानेवारी महिन्याच्या २२ व्या तारखेला प्रसिध्द केला व त्याविषयींचे विचार ता. ७ फेब्रुवारी १८९८ च्या ग्लोबच्या अंकात प्रसिध्द झाले आहेत.

लिलिथ हा पृथ्वीचा उपग्रह आहे. त्याला एक सूर्यप्रदक्षिणा करण्यास १७७ दिवस लागतात, म्हणजे चंद्राच्या एका प्रदक्षिणेस जितके दिवस लागतात त्याच्या सहापट दिवस लिलिथच्या एका प्रद-क्षिणेला लागतात. अर्थात लिलिथच्या दोन प्रदक्षिणांचें एक चांद्रवर्ष होतें. ह्यावरून त्याची मध्यम दैनिकगति ३ अंश ठरते. म्हणजे त्याला एक राशि आक्रमण करण्यास १० दिवस व सबंध राशिचक्र आक्रमण करण्यास १२० दिवस (४ महिने) लागतात.

खालीं कांहीं वर्षांच्या जानेवारी, मे, व सप्टेंबरच्या पहिल्या तारखेची लिलिथची राश्यात्मक स्थिति दिली आहे तीस कलांच्यावर एक अंश धरला आहे.

सन	जानेवारी	मे	सप्टेंबर
१८७०	मकर २७	मकर ३०	कुंभ ११
१८७५	वृषभ २०	वृषभ २५	मिथुन ४
१८८०	कन्या १५	कन्या २०	तुला १

१८८५	मकर ११	मकर १४	मकर २५
१८९०	वृषभ ४	वृषभ ९	वृषभ १८
१८९५	सिंह २९	कन्या २	कन्या ११

लिलिथ त्याच दिवशीं, त्याच राशीच्या तितक्याच अंशांत १२६ वर्षांनीं येतो. व दर १३ वर्षांनीं सूर्ययुतीचें अंतर ३१ दिवसांनीं वाढत जातें.

आजपर्यंत ह्या उपग्रहाचा जो कांहीं अनुभव आला आहे त्यावरून तो अशुभ उपग्रह असल्याचें निश्चित दिसतें. तो शीघ्रसंस्कारी असून बऱ्याचशा उलथापालथी घडवून आणतो, त्याचे परिणाम विरोधक, संकटोत्पादक, प्राणघातक, उपसंहारक, अनपेक्षित दुर्विलासाचे, व गोंधळ उत्पन्न करणारे असतात.

लग्नांत तो आयुष्यक्रम खडतर अशुभ दर्शवितो; तृतीय स्थानांत बांधवसुखाभाव, त्यांचे मृत्यु किंवा त्यांच्यावरील प्राणघातक संकटप्रसंग दर्शवितो; पत्रव्यवहारापासून त्रास व कधींकधीं अनर्थ दर्शवितो. पंचमांत मुलाचे मृत्यु, स्त्रियांचे कुंडलीमध्यें प्रसूति कष्ट किंवा बाळंत होण्याच्या कष्टानें अथवा त्रासानें मृत्यु आणतो. तर षष्ठांत प्राणघातक धंदे किंवा धंद्यांत आकस्मिक मृत्यु दर्शवितो. दशमस्थानांत भ्रमण, धंदे बदलणें, आयुष्यांत अनेक क्रांत्या होणें इत्यादि दर्शवितो. हीं दिलेलीं फलें अर्थात एकट्या किंवा अशुभ दृष्टियोगावरुन लिलिथचीं होत.

असो याचा सविस्तर विचार पुढें करूं.

———:o:———

मंगळ नेपच्यून युति

मंगळ नेपच्यूनची युति दर दोन वर्षांनीं होते. युतियोगाचा अंमल पुन्हां त्या ग्रहांचो युति किंवा प्रतियोग होईपर्यंत राष्ट्रीय ज्योतिषांत किंवा मेदिनीय ज्योतिषामध्यें घेण्याचा सर्वसाधारण ज्योतिर्विदांचा रिवाज आहे. चालू वर्षी तारीख ३० जुलई १९२५ रोजीं सिंह राशीच्या २१ अंश ४४ कलेमध्यें होणारा नेपच्यूनमंगळांचा युतियोग फार महत्वाचा आहे. या वर्षी होत असलेला युतियोग मुंबई शहराचे माध्यान्हीं उदित असणाऱ्या सिंह राशीच्या २० व्या अंशाजवळ होणार असून तो मुंबईचे लग्नीं उदित असणाऱ्या वृश्चिकराशीच्या २२ व्या अंशाबरोबर केन्द्रयोग करीत आहे. असला योग फार क्वचितच येतो. पुन्हा अशीच सिंह राशीमध्यें नेपच्यूनमंगळांची युति सन १९२७ च्या जुलई महिन्यामध्यें होईल परंतु त्या वेळीं हा युतियोग सिंह राशीच्या २६ व्या अंशामध्यें होईल.

सन १९१४ च्या सप्टेंबर महिन्याच्या २३ व्या तारखेला सिंह राशीमध्यें नेपच्यूननें प्रवेश केला व तो या राशीमध्यें १९२८ च्या ऑगस्ट पर्यन्त राहणार आहे. सिंह राशीमध्यें नेपच्यून आला त्या दरम्यानचे काळामध्यें नेपच्यूनमंगळांची सिंहराशीमध्यें युति (१) सन १९१५ अक्टोबरमध्यें, (२) सन १९१७ सप्टेंबरमध्यें (३) सन. १९१९ सप्टेंबरमध्यें (४) सन १९२१ आगस्टमध्यें, (५) सन १९२३ ऑगस्टमध्यें याप्रमाणें पांच वेळां झाली आहे; व आतां फक्त दोन वेळां सिंहेमध्यें युतियोग होऊन त्यानंतर सरासरी १६४ वर्षांनीं म्हणजे सन २०७२ नंतर पुन्हा सिंहेमध्यें नेपच्यूनमंगळांचो युति होईल. सन १७६४ ते १९२८ च्या १६४ वर्षांमधील काळांतील

यंदा होणारा नेपच्यूनमंगळांचा युतियोग हा अत्यंत महत्वाचा आहे असें आम्हांस वाटतें. कारण एक तर तो मुंबई शहराच माध्यान्हीच उदित अंशावर होणार असून तारीख १५ ऑगस्ट १९२४ रोजीं झालेल्या चंद्रग्रहणावरच होत आहे व याचे केन्द्रामधून शनीचें भ्रमण डिसेंबर १९२५ व १९२६ मध्यें जून ते सप्तेंबर पर्यन्तच्या काळामध्यें होणार आहे. व या युतीचे केन्द्रामध्यें शनिमंगळांची युति तारीख १४ डिसेंबर १९२५ रोजीं होणार आहे, **या सर्व गोष्टींचा विचार केला म्हणजे मुंबई शहर व हिंदुस्थानचें राजकीय वातावरण यांसंबंधानें भयंकर भानगडी पुढें दिसत आहेत.** गुरुही सन १९२६ मध्यें कुंभराशीमधून या युतियोगावरोवर एप्रिल, ऑगस्ट व डिसेंबर या तीन महिन्यांमध्यें प्रतियोग करील. या सर्व गोष्टींचा विचार केला असतां या युतियोगाचीं फारच तीव्र फळें १९२६ मध्यें पाहण्यास मिळतील. फेब्रुवारी १९२६ व मे १९२६ या दोन महिन्यांमध्यें होणाऱ्या अमावास्याही याच युतियोगाच्या प्रतियोगांत व केन्द्रांत होत आहेत त्यामुळें हे महिने विशेष संस्मरणीय होतील असें म्हणावें लागतें. लवकरच प्लेगच्या किंवा इतर एखाद्या साथीमुळें भयंकर हाहाःकार उडल.

राशीचक्रांतील सिंह राशीने राजसत्ता, अधिकारीवर्ग, बादशाही जमान्यांतील लोकांचा बोध होतो तसें पंचमस्थानदर्शक शिक्षणखातें, जुगारखाने, सट्ट्याच्या जागा, एक्सचेंज हॉल, रेसकोर्स यांचाही बोध होतो. म्हणून या युतीमुळें वरील गोष्टीसंबंधानें महत्वाच्या व क्रांतिकारक घडामोडी होतील. या युतीला सन १९२६ मध्यें गुरूचा प्रतियोग व शनीचा केन्द्रयोग होईल व हा काळ चिरकाळ स्मरणांत राहील असाच महत्वाचा क्षोभकारक जाईल व या दृष्टीनें सन १९२६ साल हें फारच घडामोडीचें

व घातक असेंच आहे. अनेक अधिकारी माणसें मरतील तर कांहीं राजघराण्यांमध्यें उलटापालट होईल. व कित्येक राजमुकुट ढासळूं पाहतील.

सिंह राशि व तिचा अधिपति जो रवि तो राजसत्ता व राजघराणीं, बादशाही सत्ता, एकसत्ताक राजपध्दतीचा बोध करतो परंतु कुंभ राशीनें स्थानिक स्वराज्य, कौन्सिलें, लोकनियुक्त सभासद व नेपच्यून ऊर्फ वरुण हा प्रतिनिधिसत्तात्मक राज्य किंवा राज्यव्यवस्था, प्रजातंत्रवाद, लोकसत्ताक वाद, लोकप्रभुत्व इत्यादींचा बोध करतो. हा ग्रह सन १९१४ मध्यें सिंह या एकसत्ताक राजपध्दति दर्शविणाऱ्या राशीमध्यें शिरल्यापासून त्यानें आपल्या स्वभावधर्माप्रमाणें वरील पध्दतीला **स्लो पॉयझनचा** डोस देण्यास सुरवात करून या स्वामींनां जेव्हां शनिरूपी महाविषाचा योग सन १९१७ व सन १९१८ मध्यें झाला तेव्हां तर युरोपांतील राजसत्तेवर चांगलाच घराटा फिरवलेला दिसत आहे. ज्या खंडांत पूर्वी २१ राजघराणीं होतीं किंवा जेथें पूर्वी एकतंत्री राजसत्ता चालत होती तेथें आतां तीन लोकसत्तात्मक राज्यव्यवस्थेच्या ऐवजीं १६ प्रजातंत्रवादी देश झाले असून चार महाराष्ट्राच्या ठिकाणीं एकच महाराष्ट्र शिल्लक ठेवले आहे. शनीच्या युतियोगरूपानें सन १९१७ मध्यें सिंहेमध्यें नेपच्यूनला ऑगस्ट महिन्यामध्यें मिळालेलें महाविष सन १९२६ मध्यें शनीच्या केन्द्रयोगानें राजसत्तेच्या अंगावर चांगलेंच रक्तपितीसारखें फदफदणार आहे. व या फदफदण्यास लागणारी गरमी किंवा उष्णता चालू वर्षी मंगळ आपल्या युतियोगानें देत आहे. **मंगळ** हा लढाया, खून मारामाऱ्या, जाळपोळ, अग्निप्रळय, असंतोष, संताप, क्षोभ, भयकर भांडणें, लढाई. सैन्याच्या हालचाली, रेड रॅग=लालनिशाण किंवा बोलशेव्हिक यांचा कारक आहे. व याच गोष्टींनीं वरील प्रकरण फारच बेताल होईल.

साधारणपणें युतियोग हे ज्या राशींमध्यें होतात तद्योतक प्रदेश किंवा ज्या स्थळीं हे युतियोग लग्न, दशम, सप्तम किंवा चतुर्थ केंद्रांमध्यें उदय पावतात तेथेंच विशेष परिणामकारक असतात असें आंग्लज्योतिर्विदांचें मानणें आहे. तदनुरोधानें पाहतां सिंह राशीनें दर्शविल्या जाणाऱ्या फ्रान्स, इताली, बोहेमिया, सिसली, खाल्डियापासून बसराप्रांत, रुमानिया उत्तरभाग, अप्युलिया, आल्पस पर्वतांतील प्रदेश, इत्यादि देश व रोम, बाथ, ब्रिस्टल, पोर्टमाऊथ, फिलाडेलफिया, प्रॅग, रॅव्हेना, दमास्कस, शिकागो, ब्लॅकपूल, मुंबई वगैर शहरांवर या युतीचा अनिष्ट परिणाम पाहण्यास मिळेल.

स्थरराशीमध्यें होणारे ग्रहांचे योगप्रतियोग हे भूकंप, ज्वालामुखीचे उद्रेग, टायडलवेव्ह--समुद्राचें पाणी एकदम भरतोनें भयंकर चढून जलप्रलय होणें इत्यादि गोष्टी दर्शवितात व हे प्रलय किंवा संहार ज्या ठिकाणीं हे योग माध्यान्ही किंवा चतुर्थ केंद्रीं येतात तेथें फारच तीव्रपणानें हग्गोचर होतात. पश्चिम रेखांश ९८ येथें ही मंगल नेप्च्यूनची युति माध्यान्हीं येत आहे. व या वृत्तावर मेक्सिको, मध्य अमेरिकेंतील संस्थानें, पॅसिफिक महासागराचा कांहीं भाग व अमेरिकेंतील पोपोकाटेपटेल नांवाचा ज्वालामुखी पर्वत हे येत आहेत. या प्रदेशामध्यें भयंकर उत्पात होतील व विशेषतः मेक्सिकोमधल्या प्रदेशामध्यें फारच धांदल उडेल. पूर्वरेखांश ८२ वर ही युति चतुर्थ केंद्रीं येत आहे. या रेखांशावर हिंदुस्थानकडला पूर्वेकडील प्रदेश येत आहे. काबुल ते मद्रास पर्यंतच्या भागाकडे ही युति चतुर्थात बसत आहे. दिल्ली, मुंबई, लखनौ, अलाहाबाद, मद्रास इत्यादि ठिकाणीं ही युति चतुर्थ

स्थानाच्या आरंभीं उदित असणाऱ्या अंशाजवळच येत आहे. या युतीचा हिन्दुस्थानावर बराच अनिष्ट परिणाम घडेल. ही युति चतुर्थ स्थानामध्यें होत असल्यामुळें चतुर्थ स्थान तद्योतक गोष्टी---शेतकी, खाणी, पिकें, इमारती, जमिनी व राजकारणांमध्यें अधिकारारूढ पक्षास विरोध करणारा पक्ष या सर्वांना अनिष्ट आहे असें म्हणावें लागतें. या युतीमुळें सन १९२६ साल दुष्काळग्रस्त जाईल; खाणींमध्यें अपघात घडतील, भूकंपाचे उत्पात होतील, जमिनीच्या व घरांदारांच्या किंमती फारच खालीं येतील. सरकाराविरुध्द बरीच जोराची चळवळ होईल. अनेक लोकनायक तुरुंगांत जातील.

ग्रहांचे परिणाम कोणत्या स्थळीं परिणामकारक होतील हें जाणण्याची नुकतीच उपलब्ध झालेली भूम्याक्षांशरेखांश Geodelic पध्दतीनें पाहतां ही युति पूर्व रेखांश १४२=सिंह २१ अं. ४४ क. म्हणजे जपान व जपानच्या आजूबाजूचा प्रदेश या ठिकाणीं माध्यान्हीं असून ब्राझिलच्या अत्यंत पूर्वकडील प्रदेशामधून चतुर्थ केन्द्ररेषा किंवा पातल केन्द्ररेषा जात आहे. रशिआ, मेसापोटामिया, अरेबिया, हिन्दीमहासागर मॉरोशस वगैरे कडील रेखांशावरील प्रदेशाकडे ही युति उदय केन्द्राकडे येत आहे व प्यासिफिक महासागराचा किनारा, सानफ्रान्सिस्को वगैरे ठिकाणीं ही युति अस्तकेन्द्रीं बसेल म्हणून वरील ठिकाणीं या युतीनें दर्शविलेले अनिष्ट परिणाम व भूकंपादि उत्पात वगैरे पाहण्यास मिळतील.

मंगळनेप्च्यूनच्या युतिकालाचे कुंडलीमधील दैनिक गोचर ग्रहांचीं भ्रमणें पाहून एखाद्या कल्पक ज्योतिर्विदाला पुढील काळामधील वरील अनिष्ट गोष्टींच्या तारखा सहज ठरवितां येणें शक्य आहे. साधारण-

पणें युतीचे अंशावरोबर जेव्हां जेव्हां रवि, मंगळ व शनि हे एखादा अनिष्ट दृष्टियोग करण्यास येतात त्या त्या दिवशीं युतियोगानें दर्शविलेले अनिष्ट परिणाम उत्तेजित झालेले पाहण्यास मिळतात. खालीलप्रमाणें आपलेकडे मंगळ नेपच्यून युतिकालची कुंडली बसते.

मंगळ नेपच्यून युति

ता. ३१ जुलाई १९२५ गुरुवार रात्रीं १२ वाजून ३० मिनिटें, मुंबई.



दशमस्थान

ज्योतिर्मालेच्या प्रथम वर्षाच्या १० व्या अंकापासून **भावविचार** याखालीं द्वादश भावावर क्रमवार लेख प्रसिध्द करण्यास सुरवात केली होती, परंतु दुसऱ्या वर्षाच्या १२ व्या अंकांत दशम भावासंबंधानें विचार येऊन नंतर पुढें ही लेखमाला तशीच बंद पडली; परंतु आमच्या कांहीं आश्रयदाते व हितचिंतक यांचेकडून ही लेखमाला पूर्ण करण्या-संबंधानें सूचना आल्या असल्याकारणानें चालू अंकापासून यासंबंधाचे विचार प्रसिध्द करण्याचें योजित आहों. —**संपादक.**

"दशमात्प्रवृत्तिमाज्ञां कीर्तिं वृष्टिं प्रवासपूर्तादीन्।
मानं कर्माजीवं जानुस्थानं च निर्विशेद्दासान्॥"
(स. चि.)

"व्योम्नि मुद्रां परं पुण्यं राज्यं वृद्धिं च पैतृकं"
(ता. नो.)

दशमस्थानावरून विशिष्ट धंद्यासंबंधीं आवडनावड, आज्ञा, कीर्ति, वृष्टि, प्रवास, देऊळ, धर्मशाळा, तळें, अन्नदान इत्यादि धर्मकृत्यें मानसन्मान उपजीविकेचें साधन, गुढघे, अधिकार, पुण्यकर्में, दासदासी, नोकरचाकर वडिलोपार्जित द्रव्य इत्यादि गोष्टींचा विचार होतो.

कुंडलीतील द्वादशस्थानांपैकीं दशमस्थान हें फार महत्वाचें आहे. ह्या स्थानांतील ग्रह मानवी प्राण्याचे सुखदुःखासंबंधीं बरेच द्योतक असतात. ज्योतिर्विदांनीं ह्या स्थानास कर्म हें फारच अन्वर्थक नांव दिलेलें आहे. मानवी प्राणी आपल्या आयुष्यामध्यें जीं शुभाशुभ कर्में करितो त्यांचा या स्थानावरून चांगला बोध होतो व म्हणूनच शुभ ग्रह बलवान असतां त्या प्राण्याचे हातून गंगास्नानें, यज्ञयागादि कृत्यें घडतात

असें आर्य ग्रंथकारांनीं वर्णन केलें आहे. जीं माणसें जगांत कतृत्ववान म्हणून नांवाजलेलीं आढळतात त्यांचें दशमस्थान बलवान नाहीं, दशमांत बलवान ग्रहस्थिति नाहीं, असें क्वचितच आढळेल, व ह्या दृष्टीनें हें स्थान फारच महत्वाचें आहे.

दशमस्थानावरून सर्वसाधारणपणें बापासंबंधी सुखदुःखाची कल्पना करण्याचा प्रवात आहे. ह्या बाबतींत आर्य व युरोपीय ज्योतिर्विदांचा मतभेद असल्याचें मागेंच सांगितलें आहे. हल्लींच्या कांहीं यूरोपीय ज्योतिर्विदांस आर्य ज्योतिर्विदांचें म्हणणें मान्य आहे परंतु कांहीं त्यामध्यें थोडाबहुत फरक करून घेतात. त्यांचे मतें जर जन्मकुंडली मुलीचो असेल तर तिचे कुंडलींतील दशमस्थान मातेचा बोध करिते व पुरुषाची असतां पित्याचा बोध करिते. ह्यासंबंधानें अद्याप शोध होण्याची बरीच आवश्यकता आहे.

दशमस्थान व उपजोविकेचा धंदा यासंबंधानें बऱ्याच भ्रामक कल्पना पाहण्यास मिळतात. हल्लींच्या सुधारणेच्या काळामध्यें धंद्यासंबंधानें निश्चितपणें दशमस्थानावरून सांगतां येईल किंवा नाहीं यासंबंधानें बरीच शंका वाटते. यासंबंधी आम्हीं आमचे विचार पुढें लवकरच याच लेखांत देण्याचें योजित आहों. दशमस्थानावरून मान, सन्मान, कीर्ति किंवा जनसमाजामध्यें असलेलो मानमान्यता यांचा चांगला बोध होतो. खालीलप्रमाणें ग्रह दशमभावामध्यें असतां त्यांचीं फलें पाहण्यास मिळतात.

सूर्य दशमभावामध्यें असतां चांगल्या कुलामध्यें जन्म झालेला आढळतो, बापाची स्थिति चांगली असते, जन्मणारास मान सन्मान

मिळतो, साधारणपणें तो यशस्वी असतो, मोठ्या लोकांचा आश्रय मिळतो; बहुशा ३० वर्षाचे सुमारास हो मंडळी चांगली उदयास येतात. सूर्य बलवान असून शुभसंबंधित असतां अधिकार प्राप्त होतो, स्वतत्र धंदा रोजगार असतो, ह्या मंडळीस राजकीय नोकरी--सरकारी नोकरी यांत अधिकार प्राप्त होतो. परंतु रवि पीडित व निर्बळी असतां बरीच अशुभ फळें पाहण्यास मिळतील. ही मंडळी फारच गर्विष्ठ असतात, नोकरीमध्यें किंवा धंद्यामध्यें वारंवार अडचणी येतात.

चंद्र दशमभावामध्यें पीडित असतां अपकीर्ति किंवा बदनामी होते; एकच धंदा किंवा रोजगार पुष्कळ दिवस ठिकत नाहीं. दशमांत चंद्र बलवान व शुभसंबंधित असतां भाग्योदय सरासरी २७।२८ चे सुमारास करितो व दर ७ व्या वर्षाचे सुमारास कांहींतरी स्थित्यंतर घडतें. दशमांतील बलवान चंद्र मान सन्मान व कीर्ति दर्शवितो. ज्यांचे दशमांत बलवान चंद्र असेल त्यांनीं सार्वजनिक गोष्टी किंवा सर्व जनतेबरोबर विशेष संबंध येईल अशा तऱ्हेचा धंदा करावा. दशमांत चंद्र--मेष, कर्क, तुला किंवा मकर या चरराशीचा असतां महत्वाकांक्षा फार असते व आयुष्यांत बऱ्याच घडामोडी होतात व हीं माणसें दीर्घोद्योगी आढळतात. दशमांत स्थिरराशीचा चंद्र--वृषभ, सिंह, वृश्चिक, किंवा कुंभेचा असतां स्थिरपणा व चिकाटीनें काम करण्याची आवड विशेष पाहण्यास मिळतें. दशमांत चंद्र द्विस्वभाव--मिथुन, कन्या, धनु किंवा मीन राशीचा असतां विशेष चांगला नसतो. दशमांत चंद्र मंगळानें पीडित नसावा कारण त्यामुळें अपकीर्ति होते, सार्वजनिक कृत्यांत ठपका मिळतो व त्यामुळें पुढील जीवितक्रमांत बऱ्याच अडचणी येतात. दशमांत चंद्र शनीनें

पीडित असतां धंद्यांत नाना तऱ्हेच्या अडचणी येतात. परंतु याच्या उलट दशमांत चंद्र गुरूबरोबर शुभसंबंधित असतां धंद्यांत सुस्थिति प्राप्त होते व मोठेपणा मिळतो.

दशमस्थानामध्यें **मंगळ** माणसाला महत्वाकांक्षी व सत्ता चालविण्याची आवड दर्शवितो. दशमामधील शुभदृष्ट असतां कोणत्याही धंद्यास बरा असतो. त्यांत विशेषतः मिलटरी, पोलीस, रेव्हेन्यु खातें वगैरे-मध्यें नोकरी करणें चांगलें; त्यांत अधिकार प्राप्त होतो. कोणत्याही यांत्रिक कारखान्याचें चालकत्व हातीं घेणें चांगलें. सत्तेरहित हलक्या दर्जाच्या व्यापार नौकरीला मंगळ अनुकूल नसतो. मंगळामुळें बुध्दीपेक्षां काम करण्याचीच धमक, तडफ ज्यास्त असते त्यामुळें सहजासहजीं कोणत्याही कार्यामध्यें यश मिळतें. दशमस्थानीं नीच मंगळ असणें किंवा तो अशुभ ग्रहाबरोबर अशुभ योग करीत असणें चांगलें नाहीं. स्त्रियांचे कुंडलीमध्यें तर असा मंगळ नसावाच. दशमस्थानीं **कर्क, तुला**, किंवा **मीन** राशीचा मंगळ असेल तर अप-कीर्ति होते, ठपका येतो व कित्येक वेळां नोकरीमधून डिसमिस होण्याचा प्रसंग येतो. हा मंगळ नैतिक आचरण खराब दर्शवितो. दशमामध्यें मंगळ असून तो **हर्शल**बरोबर पापदृष्टियोग करीत असेल तर या योगावर जन्मणारा नीतिभ्रष्ट, अविचारी व तामसी असतो. व हीं माणसें केव्हां काय करतील याचा भरंवसा नसतो. धंद्यामध्यें आकस्मिक नुकसान, नोकरीमध्यें संकटें येतात. दशमामधील मंगळ **शनी**बरोबर अशुभ संबंधित असतां स्वभाव खुनशी, निंदक, अविचारी, अत्यंत रागीट, सूड उगविण्याचा इच्छा बाळगणारा व आत्मघातकी असतो. परंतु जर दशमामधील मंगळ गुरूबरोबर अशुभ संबंध करीत असेल तर उधळ्या,

अविचारी धर्मवेडा असतो. परंतु जर मंगळ गुरूनें शुभसंबंधित असेल तर भाग्यवान, उतावळा, धैर्यवान, हिमती व अधिकारसंपन्न असतो.

दशमामध्यें **बुध** असतां तो ज्या राशीमध्यें असतो तदनुरोधानें विचार केला पाहिजे. दशमामध्यें बुध पीडित नसावा, दशमामधील बल-वान बुध **वक्तृत्व, ग्रंथलेखन, वाङ्मयाचेद्वारें** कीर्ति आणि भाग्य दर्शी-वितो. दशमामधील बुध माणसाला सव्यसाची, अनेक धंदे करणारा बनवितो. पोस्ट, टेलिग्राफ, टेलिफोन, ग्रंथलेखन, प्रकाशन, कमिशन एजन्सीचे धंदे, बुकडेपो, स्टेशनरी वगैरे धंद्यांमध्यें लाभ दर्शवितो. हेडक्लार्क, सक्रेटरी, सुपरिन्टेन्डंट वगैरे प्रकारचे अधिकार तर शार्टहान्ड, टायपींग, वर्तमान पत्रासंबंधानें कामें, छापखान्याचे व्यवहार इत्यादींमध्यें कुशलता व लाभ दशमामधील बुध दर्शवितो. दशमामधील बलवान बुध हा लेखन कलेला फारच चांगला असतो. दशमामधील बुध उत्तम बुध्दिमता दर्शवितो. परंतु दशमामधील बुध जर एखाद्या दुसऱ्या ग्रहाबरोबर पाप-संबंध करीत असेल व तो जर बराच पीडित किंवा निर्बलो असेल तर लुच्चेगिरी, फसवेगिरी, खोटें बोलणें, अप्रामाणिक, वाह्यातवर्तन इत्यादि अनेक अनिष्ट दुर्गुणांचा द्योतक जाणावा व त्यापासून त्या माणसावर संकटें कोसळतात. अडल दरोडेखोर, खोटेनाटे कागदपत्र बनवणारे, लबाड, चोर, चहाड, थापाडे याप्रमाणें तो ज्या राशीमध्यें असेल त्या मानानें व तो ज्या प्रमाणानें पीडित असल त्या प्रमाणांत हे दुर्गुण कमीजास्त दिसतात. दशमामध्यें मंगळानें पीडित बुध असतां खोटें बोलणें, थापा मारणें, रागीट, वाह्यात बडबड करणारे आढळतात तर शनीनें पीडित बुध असतां भयंकर नीचकर्म करणारे, खोटे दस्तऐवज करणें, चोरी करणें, पैशाचा अफरातफर करणें इत्यादि अनिष्ट गोष्टी दर्शवितो.

दशमामध्यें **गुरू** असणें अत्यंत शुभ असतें. हीं माणसें भाग्यशाली असतात. त्यांचा उत्कर्ष लवकरच होतो, आचरण शुद्ध असतें. जगांत यश व नांवलौकिक मिळतो. गुरु दशमांत असतां ब्यारिस्टर, मुख्य अध्यापक, प्रोफेसर, न्यायाधीश, वकिलीमध्यें नांवलौकिक प्राप्त होतो. गुरु हा कायदा, विद्या व संपत्ति यांचा कारक आहे त्यामुळें फायनान्स डिपार्टमेन्ट, विद्याखातें, ब्यांका, न्यायखातें यांमध्यें यश व लाभ दर्शवितो. दशमामधील गुरु नेहमी सांपत्तिक स्थितीची भरभराट दर्शवितो. दशमामधील गुरु मंगळाने पीडित नसावा असा गुरु अनेक कायद्याचीं लफडीं, दिवाणी खटले व भानगडी दर्शवितो व त्यांत नुकसान दर्शवितो. व्यापारामध्यें व सट्ट्याचें व्यवहारामध्यें ठोकर लागते. तसेंच दशमामधील गुरु शनीबरोबर अशुभ संबंधित नसावा, शनीच्या अशुभयोगामुळें गुरूचें बल पार नष्ट होतें व त्यामुळेंच असा दशमामधील गुरु विशेष भाग्योदयकारक होत नाहीं. दशमामधील गुरु हर्शलबरोबर अशुभ संबंधित असतां सांपत्तिक बाबतींमध्यें भयंकर चढउतार होतात आणि मोठा ठोकर बसतें. दशमामधील गुरु रविचंद्रांबरोबर शुभसंबंधित असावा हें एक महत्भाग्याचें लक्षण असतें. जन्म उच्च कुळामध्यें होतो; नातेवाईकांकडून मदत मिळते व कुळाचा उदय होतो. संतति संपत्तीची भरपूर अनुकूलता असते. दशमामध्यें गुरु **कर्क, मकर, मीन** व **धनु** राशींचा सर्वांत उत्तम. त्याचे खालोखाल मेष, सिंह, वृषभ, तुला, वृश्चिक व कुंभ राशींचा जाणावा. दशमामधील **मकर** राशीमधील शुभदृष्ट गुरु कर्कें येवढें उत्तम फल देतो असा अनुभव आहे. **कन्या** राशीचा गुरु फारच नीचपणाची वाईट फलें दर्शवितो. तशींच वाईट फलें **मिथुन** राशीच्या गुरूचीं असतात.

परंतु मिथुन ही बौध्दिक राशी असल्यामुळें बलवान व शुभदृष्ट गुरु या राशीमध्य बौध्दिक उन्नतीला व भाषाविषयाला चांगला असतो.

शुक्र दशमस्थानीं असतां जगामध्यें यश सुकीर्ति मिळते. कोणताही धंदा हातीं घेतला असतां त्यांत यश मिळतें. हातांत पैसे नेहमीं खेळतात. वारंवार सांपत्तिक लाभ घडतात. सट्टा, सोन्याचांदीचे, जवाहिराचे व्यापार, कापसाचा किंवा सफेत वस्तूंच्या व्यापारापासून लाभ होतो. दशमस्थानामधील शुक्र कलाकौशल्याची आवड व त्याचे धंद्यामध्यें लाभ दर्शवितो. दशमामधील शुक्र बलवान असतां लग्नामुळें भाग्योदय, चांगल्या घराण्यामधील स्त्री मिळून त्यामुळें उदय, सांपत्तिक लाभ किंवा स्थावर इष्टेटीचा लाभ दर्शवितो किंवा लग्नानंतर भाग्योदय होतो. दशमामधील गुरूबरोबर नवमपंचम किंवा शुभसंबंधित असणारा शुक्र मान, सन्मान, अधिकार, भाग्य, सांपत्तिक सुखकारक जाणावा.

अपूर्ण.

पोंच व अभिप्राय

अस्ट्रालाजी ऑफ दि रेस कोर्स.—लेखक—आर. एल. सुतरया बी. ए. किंमत रुपये दहा—फल ज्योतिषशास्त्र हें धनोत्पादक करतां येईल किंवा नाहीं असा प्रश्न आज पुष्कळ ज्योतिर्विदांसमोर आहे. फलज्योतिषशास्त्राचे साह्यानें पुष्कळच गोष्टी कळल्या पाहिजेत व त्या कळतात असा सर्वसाधारण जनतेचा समज असून त्याप्रमाणें अनेकजण ज्योतिषाकडे जाऊन कापसाची, चांदीची किंवा अळशीची तेजीमंदी विचारतात तर रेसिस, लाटरीमध्यें कोणते नंबर येतील याचीही चवकशी करतात. पुष्कळ ज्योतिर्विद या गोष्टी आम्हांस कळतात अशी प्रौढी मिरवितात तर कित्येक यासंबंधानें जाहिर भविष्यें आपल्या नियतकालिकांमध्यें देत असतात व एखादें भविष्य बरोबर आलें कीं लगेच त्यांपुरा करण्यास मागेंपुढें पाहत नाहींत. यांपैकीं एकजण तर आमचीं आजपर्यंतचीं भविष्यें हमखास बरोबर आलीं आहेत व महाराष्ट्रामध्यें जो काय त्यासंबंधानें ज्ञानाचा गड्डा आहे तो आमच्याच वांटणीस आला आहे असें केसरीच्या दीर्घ गर्जनेनें लोकांस जाहिर

करीत आहेत. परंतु ही तेजीमंदी कशी काढतात किंवा घोड्याच्या रेसमध्यें विन प्लेसचे नंबर अमुक अशा फलज्योतिषशास्त्रांमधील प्रमेयानें नियमबद्ध आहे वगैरे गोष्टींची त्यांना स्वप्नामध्यें देखील जाणीव झालेली नसते हें पाहण्यासारखें आहे. फलज्योतिषशास्त्रदृष्ट्या या गोष्टींचा विचार करितां येतो या मूल शास्त्रसिद्ध तत्त्वाचें प्रतिपादन आंग्ल ज्योतिर्विदांकडून झालेलें पाहण्यास मिळते. व यासंबंधानें जवळ जवळ आपले इकडे अंधःकारच पाहण्यास मिळत असे. भपके-बाज पाटद्या लटकावणें व हस्तपत्रकें वाटणें या गोष्टी निराळ्या आहेत. तसेंच लोकांच्या श्रद्धेचा लाभ घेऊन विनप्लेस काढण्याच्या पद्धति तयार करून आपलें उखळ पांढरें करून घेणारे अनेक हरीचे लाल आंग्ल व आर्य ज्योतिर्विदांमध्यें आहेत व घोड्यांच्या रेसच्या सिग्नलवरोबर अशा नवीन गुप्त पद्धतींचा पण झंझावात सुटत असून त्यांत अनेकांनीं कष्टानें मिळविलेल्या सर्वस्वाचें वाटोळें होत आहे. अशा बिकट परिस्थितीमध्यें एका पदवीधरानें आपले रेससंबंधाचे विचार जनतेपुढें उदार मनानें मांडले आहेत. फल ज्योतिषशास्त्रदृष्ट्या रेसचा इतका बारीक व उत्तम तऱ्हेनें विचार झालेला ग्रंथ कोणत्याच भाषेमध्यें आज पाहण्यास मिळत नाहीं. इंग्रजी ग्रंथकारानें सचविलेल्या ओबड्धोबड कल्पना आर्य विद्यार्थ्यास किती उत्तम तऱ्हेनें पूर्णतेस नेतां येतात याचें मिस्टर सुतरया यांचें पुस्तक एक मूर्तिमंत दृश्य असून ते हिंदी फल ज्योतिष विद्यार्थ्यांचा दर्जा जगामध्यें श्रेष्ठ ठरविण्या इतक्या बहुमोल किमतीचें आहे. त्यांनीं आपले शोध उदार मनानें फल ज्योतिष विद्यार्थ्यांपुढें मांडल्याबद्दल आम्हीं त्यांचे महाराष्ट्रीय ज्योतिर्विद् बंधूतर्फे अभिनंदन करतों. ग्रहांचे रंग कोणत्या शास्त्रीय तत्त्वावर घेतले पाहिजेत तसेंच मेदिनीय ज्योतिष शास्त्रदृष्ट्या अनेक महिने अगोदर अमुक रंग धारण करणारे जोडी कधींच विन—प्लेस कां येणार नाहींत वगैरे आज जे विषय आंग्ल ज्योतिर्विदांच्या स्वप्नामध्यें आलेले नाहींत अशा विषयाचें सविस्तर विवेचन त्यांनीं आपल्या पुस्तकामध्यें फारच मार्मिकतेनें केलें आहे. रेस अस्ट्रालाजी वरील हा चालू शतकामधला ग्रंथ फार अमोल्य आहे असें आम्हांस वाटतें; विषयाची मांडणी, त्यांत आलेली बहुमोल माहिती या दृष्टीनें या ग्रंथाची दहा रुपये किंमत म्हणजे कांहींच नाहीं. इतर लोकांच्या रेसवरील गुप्त खजीने (प्रायव्हेट कीज) किंवा इतर आंग्ल ज्योतिर्विदांचे शें दोनशें रुपये पडणाऱ्या व करारमदार करून खजीने उघडे करणाऱ्या नांवानेंच मात्र, परंतु हातामध्यें लौकरच नारळाची आई देणाऱ्या अनेक किल्यांपेक्षां हें पुस्तक बहुसपटीनें चांगलें आहे असें आमचें प्रामाणिक मत आहे. अशक्या पुस्तकास आमचे सर्व ज्योतिर्विद् बंधु आपला उदार आश्रय देऊन आपली गुणग्राहकता व्यक्त करतील.

—संपादक—

॥ श्रीसद्गुरवे नमः ॥

ज्योतिर्माला

आप्राचः कामरूपाद् द्रुहिणसुतनदप्लाविताद्राप्रतीचो
गान्धारात् सिंधुसार्द्राद्रघुवररचिताद्राचसेतोरवाचः ।
आकेदाराद्दुदीचस्तुहिनगहनतः सन्तिविद्वन्समाजा
ये ये तानेष यत्नः सुखयतु समजान्कश्चमत्कर्तुमीष्टे ॥ १ ॥

अभिनवाऽऽवृत्ति } वर्ष ९ वें { अंक ७ ते ८.

फलज्योतिष.

लेख ९ वा.

(एम्. डी. सगणे. एम्. ए. एल्. एल. बी.)

मागें केलेल्या विवेचनावरून असें स्पष्ट दिसून येईल कीं मनुष्याचो जन्मकुंडली म्हणजे एक प्रकारचा चित्रपटच आहे. या चित्रपटांत त्याच्या परिस्थितीचें, अनुवंशिक व आत्मिक गुणधर्मांचें, त्याच्या शीलाचें, विचार इच्छा व कृतीचें, त्याच्या जीवन यात्रेला मदतीस असे सुलभ व घोपट अथवा सकंटक व विरोधक मार्ग कोणत असणार ह्याचें पूर्ण दिग्दर्शन असतें. आणि ह्या सर्वांची गोळा बेरीज म्हणजेच आयुष्यांत येणारीं सुखदुःखें व अनुभव होत.

प्रत्येक वस्तूत स्थित्यंतर अथवा प्रगति होते. त्याचप्रमाणें जमन्स्थ ग्रह व त्यांचे योग बदलतात आणि त्यामुळें जन्मकुंडलीस चलन मिळतें. ह्या चलनामुळेंच जन्मस्थ योग फलद्रूप होतात व त्याच प्रमाणें ते भावी जन्मांच्या चरित्राची रूपरेखा आंखून ठेवितात.

आतां प्रश्न उद्भवतात तें असेः—

" परोक्ष व अपरोक्ष रीतीनें संसारयातनेंतून मुक्त होण्याकरितां ईश्वरीभूत होणें जें आपलें अंतिम ध्येय त्या ध्येयाच्या साफल्याकरितां क्रांति करणें शक्य नाहीं काय ? तें ध्येय साध्य करण्याचा काल लघुतम करणें शक्य नाहीं काय ? अगदीं प्रथमच्या आयुष्यांतील स्वतंत्र इच्छेनें आंखून ठेविला गेलेला जो उत्क्रांतिमार्ग त्या मार्गानेंच आपली आत्मिक प्रगति होणें आहे कां ? आपल्या सर्वश्रेष्ठ इच्छास्वातंत्र्यास बुध्दिपुरस्सर चलन देणें शक्य नाहीं का ? पुनरपि जननं पुनरपि मरणं याच्या किंवा प्रकृतीच्या मूळ अंकुराला उच्चाटण देणें शक्य नाहीं काय ? ह्या गोष्टी जर शक्य नसतील तर मग शास्त्रें, धर्म, सदुपदेश यांची आत्मिक उन्नतीकरितां होत असलेली ओरड निरर्थकच म्हटली पाहिजे." मुमुक्षूच्या दिनवाणी पृच्छेपैकीं असल्या कांहीं पृच्छा आहेत. त्याला ह्या प्रश्नांचीं उत्तरें हवीत व जीं उत्तरें मिळतील त्यांच्या सिध्दीकरितां मार्ग जाणण्याचीहि त्याची इच्छा आहे.

× × × × × ×

स्फुट विचार-तरंग.

(लेखकः- एम्. डी. सगणे. एम्. ए. एल् एल्. बी.)

ग्रहमालेंत आकार मानानें मोठे, व गतीनें मंद असें जे ग्रह आहेत, ते जागतिक राष्ट्रीय फलादेशाशीं जास्त सबंध ठेवतात. देशांच्या राश्यानुरोधानें त्यांचीं भ्रमणें अथवा गोचर फलें फार स्पष्ट रीतीनें अनुभवास येतात. असे ग्रह--गोल म्हणजे **वरुण, प्रजापति, शनि** व **गुरु** हे होत. त्यांच्या सर्वसाधारण राष्ट्रीय फलाविषयीचे विचार व अनुभव खालीं देत आहों.

× × × × ×

या दहाबारा वर्षांचा हिन्दुस्थानाचा इतिहास पाहिला तर असें दिसून येईल कीं, ह्या अवधींत ज्यांचे आत्मे राष्ट्राशीं संलग्न होऊन राष्ट्रीय झाले होते अशा नामांकित विभूतींचे मृत्यु बरेच घडले आहेत. परलोकवासी झालेल्या संस्मरणीय व्यक्तींपैकीं कांहीं म्हणजे नामदार गोखले, पितामह दादाभाई नौरोजी, लोकमान्य टिळक, देशबंधू दास, सर सुरेंद्रनाथ बानर्जी, सर रामकृष्ण भांडारकर, हे होत. अष्टमस्थान हें मृत्युस्थान आहे, व हिंदुस्थानाची राशी मकर आहे. वर नमूद केलेल्या राष्ट्रीय मृत्यूचा हिन्दुस्थानाच्या अष्टम स्थानाशीं विशेष संबंध असला पाहिजे. हिन्दुस्थानाचें अष्टमस्थान सिंह राशि आहे. वरुणानें-नेपच्यूननें सिंह राशींत सन १९१४ सालीं प्रथम प्रवेश केला व तो अजून सिंहेतच आहे. घडलेलें मृत्यु अष्टमस्थ सिंह--स्थित वरुणाचें फल होय. वरुण सिंहराशीचा निखालस संबंध सन १९२९ सालीं सोडील. तेथपर्यन्त काय होईल तें पहावे.

× × × × × ×

हिंदुस्थानासारखेच संस्मरणीय बरेचसे मृत्यु इंग्लंडांत ह्या वर्षांत झाले आहत. त्याचें कारण इंग्लंडवाचक मेषेच्या अष्टम वृश्चिक राशींत सन १९२४ पासूनचें शनीचें भ्रमण होय. संस्मरणीय मृत्यूंत म्यँटेग्यू व व लार्ड कर्झनचे मृत्यु मुख्य होत. हे दोन्ही गृहस्थ हिन्दुस्थानाच्या इतिहासांत प्रसिध्द आहेत व म्हणून सिंहस्थ वरुण हाही त्यामुळें त्यांच्याशी संबंध ठेवतो हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे.

× × × × × ×

१९२८ पासून वरुण कन्येंत म्हणजे हिंदुस्थानाच्या नवमांत जाईल. अर्थात तेव्हांपासून १४ वर्षें हिंदुस्थानाच्या भाग्यांत विलक्षण फरक पडेल. परराष्ट्रीय संबंध, धार्मिक बाबी ह्यांत बरीचशी घडामोड

होईल. १९३० मध्यें वरुणाचे शनिगुरुशीं शुभयोग होतील व ते फार महत्वाचे आहेत.

× × × × × ×

१९२७ पासून प्रजापति मेषेंत म्हणजे इंग्लंडच्या राशींत जाईल. अर्थात तेव्हांपासून ७ वर्षें इंग्लंडांत एकप्रकारची विशिष्ट चळवळ उत्पन्न होऊन बऱ्याच विचित्र घडामोडी पाहण्यास मिळतील. कांहींतरी पुनर्घटना होईल. १९३० मध्यें प्रजापतीचा शनिगुरूशीं केन्द्र होईल व याचे फळ फारच तीव्र अशुभ दग्गोचर होईल.

× × × × × ×

१९२६ सालीं शनि वृश्चिकेंत, वरुण सिंहेंत, गुरु कुंभेंत, म्हणजे तीन बृहत ग्रह स्थिर राशींत राहून केंन्द्र व प्रतियोग करतील एप्रिल, मे, व आगष्ट ते डिसेंबर मंगळहि कुंभ व वृषभ ह्या स्थिर राशींत येऊन ह्या योगांना मदत करील. त्यामुळें पृथ्वीवर भयंकर उत्पात व क्रांत्या होतील व अरिष्टांवर अरिष्टें येतील. भूकंप ज्वालामुखीचे स्फोट, महापूर, राजकीय वातावरणांत घडामोडी, रक्तपात वगैरे होतील. विशेषत: आयर्लंड, इराण, पोलंड, प्रशिया, आशियामायनर, फ्रान्स, इटाली, अरेबिया, खाल्डिया त बसरा, नॉर्वे, स्वीडन, रशिया ह्यांत बराच प्रकोप होईल.

लॉर्ड कर्झन.

[लेखक:-एम. डी. सगणे. एम. ए. एलएल. बी.]



जन्म ११ जानेवारी १८५९ केडलीस्टन येथें जन्म.

मृत्यु २० मार्च १९२५ सकाळीं ९-३५.

ग्रहांच्या क्रांति.

रवि २१ द ४९; चंद्र ८ उ १४; मंगळ ६ द ३९; बुध १७ द २५; गुरु २१ उ ४९; शुक्र १७ द २५; शनि १८ उ २५; हर्शल १९ उ ५९; नेप्. ४ द ४.

ह्या कुंडलीचें फक्त ठळक वर्णनच करण्याचें ठरविलें असून, तें पुढीलप्रमाणें आहे.

राजाधिकारदर्शक योग खाली दिल्याप्रमाणें आहेत.

राजाधिकार

१ रवि हर्शल त्रिकोणयोग हा योग बहुधा सत्ता व अधिकार देतो. रवि लग्नेश आहे, हें त्यांत विशेष आहे.

२ दशमेश (राजभुवनेश) नवमांत, राजयोग--दशमेशत्व अधिकारवाचक मंगळाकडे आलें, हें त्यांत विशेष आहे.

३ दशमेश मंगळ व लग्नेश रवि यांचा लाभ योग. रवि राजत्व-वाचक आहे. तो दशमवाचक मकरेंत आहे हें विशेष.

४ दशमांत चरराशींत चंद्र, त्याचा सिंह या राजराशींत असलेल्या लग्नस्थ उदित अंशाबरोबर त्रिकोणयोग, व लाभस्थ गुरुशीं लाभयोग.

हे सर्व योग सहज लक्षांत येण्यासारखें आहेत. त्यांच्यामुळें उत्तम प्रकारचा राजाधिकार दर्शविला जातो, यांत शंका नाहीं, ह्यायोगसमुच्च-यामुळेंच ते १८९९ ते १९०४ व १९०४ ते १९०५ ह्या दोन कालावधींत, हिंदुस्थानाचे गव्हर्नर जनरल व व्हाईसरॉय झाले, व अन्यत्र राजाधिकार गाजविला. ते १८९१--९२ मध्यें अ. सेक्रेटरी ऑफ स्टेट फॉर इंडिया होते. हिंदुस्थानासंबंधी एक गोष्ट फार अर्थपूर्ण दिसते. त्यांची राशि व इंग्लंडची राशि एक (व ती मेष) आहे. त्या राशीच्या म्हणजे चंद्राच्या दशमांत म्हणजे अधिकारवाचक स्थानांत, हिंदुस्थानवाचक मकर राशींत सत्ताधारी व लग्नेश रवि आहे, व तो रवि राजत्वदर्शक दशमेश मंगळाशीं शुभसंबंधित आहे. हा योग हिंदुस्थानाचा व्हाइसरॉयल्टी व फलज्योतिषशास्त्राचें यथार्थत्व खास दर्शवितो.

लाभ व पंचम (विशेषतः लाभ) स्थानांतील ग्रह राजकारणाशीं संबंध ठेवितात. तत्संबंधी योग असे:---

राजकारण

१ लाभस्थानीं गुरु व हर्शलगुरूचा चंद्राशीं लाभयोग.

२ लाभेश बुध व शुक्र दोन्हीं पंचमांत व त्यांचा दशमस्थ चंद्राशीं शुभयोग.

३ लग्नेश दशमेश (रवि मंगळ) शुभयोग.

वरील योगांचा राजकारणाशीं व परदेशाशीं फार संबंध आला. ते १९२१ सालीं फॉरेन मिनिस्टर होते. तद्दर्शक योग:---

लाभस्थ ग्रहयोग पदव्या वगैरे देतात. त्यांत गुरूचा या बाब-तींत हातखंडा आहे. म्हणून त्यांना १८९४, १९०८ व १९११ सालीं युनिव्हर्सिटी व सरकाराकडून पदव्या मिळाल्या. १९२१ सालीं बादशहाकडून खास पदवी मिळाली. १८८६ सालीं पार्लिमेंटचें सभासद ह्याच योगामुळें झाले.

१ सहा ग्रह (त्यांत बृहत् ग्रहहि आहेत) कुंडलीच्या उदित व धन भागांत आहेत.

२ भाग्येशत्व गुरूसारख्या शुभ ग्रहांकडे आलें असून गुरु हा चंद्राशीं व धनेश शनीशीं शुभयोग करीत आहे.

भाग्य

३ धनेश शनि लग्नकेंद्री उदय पावत आहे. ह्यामुळें प्रसिध्दी, लौकिक, श्रीमंती व सद्भाग्य प्राप्त झालें हें सांगणें नकोच.

या कुंडलींत आणखी दोन ग्रह योग प्रामुख्यानें दिसतात ते असे:--

जलप्रवास

परदेशप्रवासवाचक नवमस्थानांत जलराशि, त्यांत चर ग्रह मंगळ व सागरेश्वर वरुण वास करितात. मंगळाचा चर राशींतील लग्नेश रवीबरोबर शुभ संबंध आहे. त्यामुळें सन १८९५, ९८,

९९, १९०४-५ ह्या सालीं जलप्रवास झाले.

द्विभार्यायोग

१ सप्तमेश शनि आहे त्याकडे अष्टमेशत्वहि आहे.

२ तशांत तो वक्रीहि पण आहे.

३ सप्तमेश शनीचा द्वंद राशींतल्या (मिथुन धनु) गुरु शुक्राशीं दृष्टियोग. शुक्र धनु या द्विस्वभाव राशीमध्यें असून तो नेपच्यूनबरोबर केंद्रयोग व गुरूबरोबर प्रतियोग करीत आहे. तसाच स्त्रीवाचक चंद्र रवि व हर्शलबरोबर अशुभ दृष्टियोगानें संबंधित झालेला आहे.

४ भार्यावाचक चंद्राचा द्वंद्वराशिस्थ गुरु शुक्र मंगळाशीं दृष्टियोग स्त्रीकारक ह्यामुळें त्यांना दोनदां लग्न करावें लागलें. प्रथम लग्न १८९५ सालीं झालें. पत्नी १९०६ सालीं मरण पावली. दुसरें लग्न १९१७ मध्यें झालें.

मृत्युकाला-संबंधानें विचार

मॉडर्न अस्ट्रालजीच्या एप्रिल १९२५च्या अंकांत लॉर्ड कर्झनच्या मृत्युकालच्या प्रायमरी डायरेक्शन दिल्या आहेत त्या अशा. लग्नप्रतियोग नेपच्युन राश्यात्मक (Ascendant opposition Neptune in the Zodiac). खेरीज दिनवर्ण पध्दतीप्रमाणें चलित मंगळ वृषभ ४ अंश केंद्रजलग्न, व तारीख २४ जानेवारी १९२५ रोजीं झालेलें ग्रहण कुंभ ४ मध्यें पडलें म्हणजे जन्मलग्नावरोबर प्रतियोग करीत होतें; पण हे योग मृत्यूला पुरेसें आहेत किंवा काय याबद्दल दुय्यम संपादक मिस्टर व्ही. इ. रॉबसन यांनीं थोडासा संशय प्रदर्शित केला आहे. ह्या दिलेल्या कारणांत पुढील योगांची भर दिली असतां मृत्यूचें निश्चयात्मक स्वरूप प्रगट होतें.

(१) लय व शेवट दर्शविणाऱ्या चतुर्थस्थानांतून मृत्युवाचक अष्टमेश व षष्टेश शनीचें गोचर भ्रमण.

(२) अशा शनीशीं नुकताच होऊन गेलेला गोचर मंगळाचा प्रतियोग.

(३) ह्या मंगळाची जन्मस्थ हर्शलशीं युति.

(४) लग्नेश रवीचें अष्टमांतून गोचर भ्रमण.

(५) कांहीं अंशीं अष्टमेश अशा गुरूची लग्नेशाशीं होणारी गोचर युति.

(६) गोचरीनें शनि जन्म चंद्रास आठवा व जन्मस्थ शनीबरोबर त्याचा केंद्र.

परिभ्रमण पध्दतीनें विचार करितां ६७ व्या वर्षीं दशमावर तुला राशीचा ११ वा अंश येतो व लग्नावर धनु राशीचे १० अं. ५७ क. उदय पावतात; व दोन महिन्यांनीं लग्न चलित होऊन जन्मकालचे शुक्रावरोबर---लयकारक चतुर्थेशावरोबर युक्त व मूळ जन्मकाळचे मंगळावरोबर केंद्रयोग करिते. या चलित वर्ष कुंडलींमध्यें शुक्राकडे षष्टेशत्व व मंगळाकडे चतुर्थेशत्व म्हणजे लयकारकत्व येतें.

(२) मूळ जन्म लग्नाचा मालक रवि (परिभ्रमणानें कर्क ११ अं. ४३ क.) हा कर्क या लयदर्शक जलतत्वाचे राशीमध्यें व्ययस्थानामध्यें जातो व जीवन शक्ति देणारा अग्नितत्त्वाचा ग्रह जलतत्त्वांत जाऊन निर्बल होतो.

(३) षष्टेश व मारकेश शनि परिभ्रमणानें वृश्चिक ५ अं. ४२ क. झाल्याकारणानें तंतोतंत वर्ष प्रवेशकाळीं जन्म लग्नाचे उदित अंशावरोबर केंद्रयोग करीत आहे.

(४) वर्ष लग्नाचा अधिपति गुरु परिभ्रमणानें धनु २५ अं. १९ क. येऊन तो जन्म नेपच्यूनचा केंद्र सोडून मरणसमयीं मकर राशीमध्यें शिरतो.

(५) राहूचें भ्रमण जन्मलग्नामधून होत असून मरणसमयीं तो सिंह ११ अं. २९ क. होऊन शनीवर येत असून आस्ते आस्ते लग्नाच्या उदित अंशावर येत आहे.

(६) वर्ष कुंडलीचा अष्टमेश चंद्र चतुर्थामध्यें म्हणजे व्ययस्थानामध्यें येऊन आपल्या जन्मकाळचे स्थानाबरोबरचा करीत असलेला प्रतियोग सोडून जन्मलग्नाचे उदित अंशावरोबर केंद्रयोग व वार्षिक शनीबरोबर युति व जन्मकाळचा अष्टमेश जो शनि त्याचेंबरोबर केंद्रयोग करण्यास येत आहे.

(७) वार्षिक मंगळ १९ वर्षांच्या भ्रमण काळानें घेतला असतां कन्या १५ अं. २३ कला मध्यें असून चलित मंगळ व चलित लग्न यांचा केंद्र होत आहे. परंतु मंगळाचा भ्रमण काळ १५ वर्षांचा धरला असतां मंगळ सिंह ८ अं. ५२ कला येतो, म्हणजे तो जन्मलग्नाबरोबर व जन्मशनीबरोबर युक्त होत आहे.

ह्याप्रमाणें बारीक रीत्या विचार केला असतां ६७ वें वर्ष कसें मृत्युकारक होतें याचा फारच स्पष्टपणानें बोध होतो.

दशमस्थान.

[मागील अंक ५ वा ६, वर्ष ९ वें यावरून पुढें.]

दशमामधील शुभ राशीचा शुक्र किंवा पापग्रहांबरोबर अथवा पापसंबंधित नसणारा शुक्र नैतिक आचरण चांगलें दर्शवितो, परंतु तोच अशुभ किंवा नेर्बल राशीमधील किंवा पापग्रहानें पीडित असणारा शुक्र गैरवर्तन व

खराब आचरण दर्शवितो. दशमामधील वृषभ, तुळा व मीन राशींमधील शुक्र फारच चांगलीं फलें दर्शवितो. दशमामधील शुक्राबरोबर चंद्राचे शुभ दृष्टियोग होत असावे, त्यामुळें अनेक प्रकारचे लाभ घडतात; सांपत्तिक व कौटुंबिक सुख फारच उत्तम प्रकारचें लाभतें.

शनि दशमामध्ये असणें साधारणपणें चांगले नाही. दशमस्थानानें दर्शविल्या जाणाऱ्या सर्व गोष्टींना हा ग्रह प्रतिकूल असतो. दशमामध्यें शनि तुला, मकर व कुंभ राशीचा असतां सत्ता व अधिकार देतो व उत्कर्षहो फार जलद करतो. दशमामधील शनि दिर्घोद्योगीपणा, श्रमसातत्य, ऐहिक सुखाकरितां धडपड, महत्वाकांक्षा जबर उत्पन्न करतो. दशमामधील शनि इतर ग्रहांबरोबर शुभसंबंधित असतां मनुष्य आपल्या दिर्घोद्योगानें महत् पदाला पोहंचतो. ज्या स्थितीमध्यें जन्मलेला असतो त्यापेक्षां चांगल्या वरच्या पायरीवर जातो. परंतु अशुभसंबंधित असतां जर त्यानें उदय केला किंवा अधिकार अथवा भाग्य लवकर दिलें तर तितकाच तो पुन्हा अधःपात करतो. दशमामधील शनि हा हर्शल, मंगळ, रवि, गुरु यांचेबरोबर अशुभसंबंधित नसावा, कारण अशुभसंबंधित शनामुळें स्थिति कधीं खालावेल याचा नेम नसतो. नोकरीमध्यें ठपका, अपयश, वरिष्ठाकडून त्रास किंवा बेबनाव, उच्च जागेवरून हलकें जागेवर जाणें, इत्यादि गोष्टी घडतात. दशमामधील शनि कंटाळवाणी नोकरी दर्शवितो, तर पुष्कळदां फार मेहनत करण्यास भाग पाडतो. कुंडलीमध्यें शुभसंबंधित परंतु शनि चांगलीं फलें देतो; बलवान दशमामधील पीडित शनी बेअब्रूचे प्रसंग वारंवार आणतो. व स्वतंत्र धंद्यांमध्ये अनेक अडचणी उत्पन्न करतो. दशमामधील शनाबरोबर रवि किंवा चंद्र अशुभ संबंधित असले म्हणजे संकटपरंपरेची तीव्रता कमालीची असते. अपकीर्ति, अपयश, भाग्योदयाचे

बेळेला हजार विघ्नें दर्शविणारा हा एक अत्यंत दरिद्रीपणा देणारा योग जाणावा. दशमामध्यें शनि मेष, कर्क, वृश्चिक, अथवा मीनराशीचा असतां फार अनिष्ट फळें पहावयास मिळतील. दशमामधील शनीबरोबर रवि, चंद्र शुभ-संबंधित असावेत.

हर्शल दशमामध्यें असतां नानाप्रकारचीं स्थित्यंतरें दर्शवितो. एकच उद्योगधंदा फार काळ टिकत नाहीं. हर्शल दशमस्थानीं असणारे लोक कल्पक, चमत्कारिक, लहरी, सुधारणावादी, क्रांतिकारक **घडामोडी** करणारे, प्रचलित परिस्थितीमध्यें क्रांति घडवून आणणारे असतात. हर्शल दशमाध्यें असून गुरु, रवि, चंद्राबरोबर शुभसंबंधित असतां फारच चांगले. या योगामुळें भरभराट, मानसन्मान, कीर्ति वगैरे गोष्टी प्राप्त होतात. दशमामधील हर्शलबरोबर शनि, मंगळ, रवि, चंद्र किंवा गुरूचा अशुभ संबंध होणें चांगलें नाहीं. त्यानें अनेक भानगडी व त्रास उत्पन्न होऊन हर्शलचीं फारच तीव्र फळें अनुभवास येतात; नोकरी किंवा उद्योगधंदा वारंवार बदलावा लागतो व त्यांमध्यें अखेरीला अपयश प्राप्त होतें. दशमामधील बलवान शुभसंबंधित असणारा हर्शल राजाश्रय, एदव्या किंवा किताब दर्शवितो.

दशमस्थानामध्यें **नेपच्यून** ऊर्फ **वरुण** शुभसंबंधित असला तर कलाकौशल्यामध्यें मान सन्मान कीर्ति दर्शवितो. हा ग्रह अनेक घोंटाळे व भानगडी उत्पन्न करणारा असल्यामुळें जेव्हां हा दशमांत असून इतर ग्रहांबरोबर अशुभ संबंधित असतो त्या वेळीं दशमस्थानानें दर्शित होणाऱ्या गोष्टींमध्यें अनेक भानगडी व घोंटाळे पाहण्यास मिळतात. नेपच्यून हा **जलतत्त्वाचा** कारक ग्रह असल्यामुळें शुभसंबंधित असतां त्या तत्त्वाच्या धंद्यासंबंधानें लाभ दर्शवितो. कित्येक वेळां दशमामधील नेपच्यून असलेलीं माणसें चमत्कारिक तऱ्हेनें पुढें येतात तर कित्येक टोपण नांव घेऊन

प्रसिध्द होतात.

दशमस्थानांतील नेपच्यून धंद्यासंबंधानें त्रास, कंटाळा व अडचण दर्शवितो. ह्या स्थानांत नेपच्यून बलवान व शुभदृष्ट असतां कंपन्यांतील नोकरी, कंपन्यांचे व्यवहार, जलाशीं संबंध असणारे धंदे व साधारण हलके धंदे यांपासून फायदा होतो. ह्या स्थानांतील पीडित नेपच्यून अगर **वरुण** धंद्यामध्यें अपयश, मानभंग, अपकीर्ति, सार्वजनिक लोकांमध्यें वाईटबोलवा, गृहकलह किंवा त्रास, मातृपितृनाश किंवा त्यापासून वेगळें निघणें वगैरे गोष्टी दर्शवितो.

दशमस्थानांत बलवान व शुभदृष्ट असलेला नेपच्यून गूढविद्या मंत्रशास्त्र, ज्योतिष, सामुद्रिक, मस्तिष्कपिंडविद्या, सायकिक कला--दुसऱ्याचे मनोविकार जाणणें--वगैरेंपासून लाभ दर्शवितो. त्याचप्रमाणें दशमांतील बलवान नेपच्युन कादंबऱ्या लिहिण्यामुळें, चित्रकलेमुळें, कवित्वामुळें, गायनवादन वविशेषतः तंतुवाद्यामुळें सांपत्तिक लाभ व कीर्ति दर्शवितो. दशमांत शुक्रनेपच्युनयुति असतां उत्तम चित्रकार, उत्तम गाणारी, किंवा तंतुवाद्यविशारद मंडळी असतात व सदरहु धंद्यांत त्यांस कीर्ति किंवा नांवलौकिक उत्तम प्रकारचा मिळतो. परंतु त्यांचा वागणूक किंवा खाजगी वर्तनासंबंधानें जनसमाजांत चांगलें मत पाहण्यास मिळत नाही. सदरहु दशमांतील नेपच्युनशुक्रयुति पापदृष्ट असतां फारच अशुभ फळें पाहण्यास मिळतात. कारण ही मंडळी सर्वगुणसंपन्न असून काय करतील या संबंधानें कल्पनाच करण्याचा प्रसंग येतो. ही मंडळी व्यसनी, लबाड, लफंगी असून त्यांस सामाजिक सदाचाराची किंवा धार्मिक बंधनाची मुळींच ओळख नसल्यामुळें अनन्वित, अघोर व निंद्यकृत्यें करणारी आढळतात व त्याचा शेवट शोचनीय स्थितीमध्यें झालेला पाहण्यास मिळतो.

दशमामधील **राहु** राजयोगकारक असतो असें आमचें मत आहे. दशमामध्यें राहु असून त्याचेबरोबर शुभग्रह शुभसंबंधित असतां फारच चांगलीं फलें पाहण्यास मिळतात. याचे उलट **केतु** दशमामध्यें अनिष्ट फलें दर्शवितो. अपकीर्ति, कालिमा वगैरे गोष्टी केतूमुळें प्राप्त होतात. दशमामध्यें शनिकेतु, किंवा मंगळकेतु युति फारच वाईट जाणावी.

एकंदरीनें विचारकरितां जन्मकुंडलीमधील दशमस्थान अतिशय महत्वाचें आहे. जन्मणाराचा भावी दर्जा, ऐश्वर्य, मान, सन्मान व योग्यता याचा विचार दशमस्थानावरून होतो. त्याचप्रमाणें दशमांत असणारे ग्रह मनुष्याचे शिलावर फार परिणाम करितात. जन्मकालीं अत्यंत उन्नत ठिकाणीं असणारे जें सर्व आकाशामधील स्थान तें दशमस्थान होय. **व त्यामुळेंच दशमामध्यें असणारी राशि जन्मकालच्या इतर स्थानांतील राशींपेक्षां जास्त महत्वाची असते.** व या गजबजलेल्या जगामध्यें आपलें महत्व प्रतिपादन करण्याकरितांच जणु काय तो राशि माध्यान्ही येऊन आपलें महत्व दर्शवित असते. म्हणून दशम भावारंभीं उदित असलेली राशि, दशमांत असलें ग्रह यांकडे जास्त चिकित्सक दृष्टीनें पाहिलें पाहिजे. दशम भावारंभीं उदित अंशाबरोबर कोणकोणते ग्रह कसकसे दृष्टियोग करीत आहेत इत्यादि सर्व गोष्टींचा नीट बारीकपणानें विचार करावा. दशमभावारंभीं उदित अंशावरोबर जर जन्मकाली ग्रह शुभ दृष्टियोग करीत असतील तर त्यापासून उद्योग, धंदा, मान, सन्मान या सर्वांना चांगली मदत मिळते. शुभदृष्टियोग करणारे ग्रह ज्या ज्या गोष्टींचे व ज्या व्यक्तींचे कारक असतात त्यांचेपासून खात्रीनें लाभ होतात, किंवा त्या वस्तूंसंबंधानें व्यवहार केला असतां यश प्राप्ति लवकर होते. दशमस्थानावरून निवळ उद्योग धंद्याचा बोध होतो असें आम्हांस

वाटत नाहीं. दशमावरून मान, सन्मान, यश व कीर्ति यांचा मात्र फार चांगला बोध होतो. दशमांतील ग्रहांचा व दशमभावारंभी असलेल्या राशीचा किंवा दशमावरील उदित अंशाला होणाऱ्या दृष्टीचा उद्योगधंद्यावरोबर खास संबंध कांहीं अंशानें आहे असें कांहीं कुंडल्यांच्या अवलोकनावरून दिसते. परंतु दशमामधील ग्रह किंवा दशमामधील राशीप्रमाणेंच सर्वच उद्योग धंदे करित आहेत असें पाहण्यास मिळत नाहीं. हल्लींच्या विसाव्या शतकामध्यें लागेल त्याला लागेल तो धंदा करावा लागत आहे. म्हणून धंद्याचा विचार करतेवेळीं नुसतें या स्थानाला चिटकून राहण्याचें कारण नाहीं. सर्व कुंडलींचा साग्र विचार करून नंतर धंद्याची निवड करावी. **उद्योगधंदे** किंवा **चाकरी** यासंबंधानें पुढें ऊहापोह करण्याचा विचार आहे व यावर कांहीं लेख लवकरच मालेंत येतील. इतकें मात्र खास पाहण्यास मिळतें कीं, कोणत्याही उद्योगधंद्यामध्यें मिळणारा योग्यता, कीर्ति, मान व यश याचा व दशमस्थानाचा फारच निकट संबंध आहे. आणि म्हणूनच धंद्याचा किंवा नोकरीचा विचार करतेवेळीं दशमस्थान वगळून भागणार नाहीं; कारण पुष्कळ अंशानें याच स्थानावर आयुष्यामध्यें मिळणारा अधिकार किंवा श्रेष्ठत्व अवलंबून आहे.

पुरुषार्थ.

स्वधर्माची जागृति करून स्वतःच्या पुरुषार्थानें आपली उन्नति करून घेण्याचे निश्चित मार्ग दाखवणारें मासिक. या मासिकामध्यें आरोग्य वाढवणारे सुगम योगसाधनाचे मार्गही दाखवले जातात. याच्या योगानें हजारों माणसांनीं आपलें आरोग्य वाढवलें आहे. वार्षिक वर्गणी म. आ. नें २ रु. व व्ही. पी. नें २॥ रु. नमुन्याचा अंक मागवा.

श्रीपाद दामोदर सातवळेकर.

स्वाध्याय मंडळ औंध (जि. सातारा)

विक्रम संवत १९८२ चे सायन पंचांग—कर्ता हरिहर प्राण शंकर भट्ट दक्षिणामूर्ति भवन, भावनगर, किं. ४ आणे सायन पंचांगाचा आवश्यकता कितो आहे यासंबंधानें आतां नव्यानें लिहिलें पाहिजे असें नाहीं. महाराष्ट्रामध्यें सायन पंचांग काढण्याचा दोन तीन वेळां प्रयत्न झाला परंतु द्रव्य साधन भरपूर नसल्यामुळे हे प्रयत्न निष्फळ ठरले. सायन निरयण वाद मराठीमध्यें जितका झाला तितका तो कोणत्याच भाषेंत झालेला नाहीं व या वादांतूनच हें पंचांग महात्मागांधीच्या नवजीवन कार्यालया-मार्फत गुजराथीमध्यें प्रसिध्द झालें आहे. महाराष्ट्र ज्योतिर्विदांपेक्षां गुजराथी ज्योतिर्विदांचा भरणा पुष्कळ आहे व त्यांचें लक्ष आतां या वादाकडे वळलें असून पंचांग सुधारणा करण्याची त्यांना आवश्यकता अलिकडे वाटूं लागली आहे हे एका दृष्टीनें फारच महत्वाचें आहे. एके काळीं जो जनता मुग्ध होती तिला हल्लीं वाचा फुटूं लागली असून वादाचे भरीला न पडतां त्यांनीं एकदम दृश्य कार्य करण्यास सुरवात केली आहे. हे विशेष स्पृहणीय आहे. या पचांगाचा प्रसार प्रत्येकाचे घरोघर झाला पाहिजे. या कार्यास प्रत्येक ज्योतिर्विद शक्य तेवढी मदत करील.

आमचे मतें खालीलप्रमाणें या पचांगामध्यें सुधारणा कराव्या म्हणजे त्याचा सार्वत्रिक खप होईल.

(१) पचांग देवनागरी लिपीमध्यें काढावें व तें (२) अमदाबाद वगैरे ठिकाणांचें घेण्यापेक्षां मुंबई अक्षांश रेखांशावरील असतां फारच चांगलें. (३) त्यांत करण योग वगैरे पंचांगाची पांच अंगें असावींत. (४) मराठी सायन पचांगामध्यें ताराचंद्र युति देत असत त्याप्रमाणें त्या द्याव्यात. (५) पंचांगामध्यें दैनिक स्पष्ट ग्रह असावेत त्यांत आपले कडील रवि, चंद्र, मंगळ, बुध, गुरु, शुक्र, शनि व राहु

यांचा स्पष्ट स्थिति असून नंतर अलीकडे उपलब्ध झालेले हर्शल--प्रजापति व नेप्च्यून वरुण यांची ही स्पष्ट स्थिति असावी व (६) पंचांगामध्यें प्रत्येक महिन्याचे सुटसुटीत रॅफल वगैरेच्या पंचांगामध्यें भविष्य असतें तसें भविष्य द्यावें.

चालू पंचांगामध्यें पाक्षिक ग्रह दिले असून त्यांचे शरही दिले आहेत परंतु क्रांति कां गाळली तें कळत नाहीं. तशीच पंचांगामध्यें येणारी धार्मिक माहिती चालू पचांगामध्यें दिसत नाहीं तीं देणें इष्ट आहे. वरप्रमाणें पंचांग काढलें असतां त्याचा प्रसार उपयुक्तता जास्त वाढल्या कारणानें खात्रानें जास्तच होईल असें आम्हांस वाटतें. **प्रत्येकानें निरनिराळे एकएक चोपडें काढण्यापेक्षां पांचसहा कार्यकर्त्या माणसांनी एकत्र जमून एकत्र चांगलें असणारें रॅफलच्या धर्तिवर पंचांग निर्माण करावें म्हणजे त्याचा प्रसार चांगला होऊन सर्वांच्या श्रमाचे सार्थक होईल असें आम्हस वाटतें.**

----संपादक----

नं. १८ श्री

शारीरिक शिक्षण विषयक मराठी व गुजराथी सचित्र व्यायाम मासिक.

मराठी व गुजराथी ह्या दोन्ही भाषेंतून दरमहा १५ वे तारखेस नियमानें प्रसिद्ध होते. वर्षारंभ आक्टोबरपासुन वार्षिक वर्गणी ट. खर्चासह रु. २-८-० व्ही. पी. खर्च निराळा यांत मौहानी व महीनी खेळ, कसरती, आरोग्य, ब्रह्मचर्य, सदाचार व्यायाम वगैरे विषयावर सर्व अबाल वृद्ध स्त्री पुरुषांस उपयोगी असे लेख, कविता, गोष्टी, बातम्या, चरित्रें, सचित्र दिल्यांत येतात. तरी वर्गणीदार होण्याची त्वरा करावी, रावपुरा बडोदे मुजूमदार याचा वाडा

व्यवस्थापक-व्यायाम.

गुरुवर्य कै० जिवनराव त्रिंबक चिटणीस यांचे फलज्योतिष,

सायन निरयण वाद वगैरे वगैरे विषयांवरील पूर्वी प्रसिद्ध झालेल्या लेखांचा संग्रह.

पुण्यास पंचांगैक्य सभा भरून त्या सभेचे अध्यक्ष श्रीमंत पंत प्रतिनिधी यांचा निर्णय प्रसिध्द झाल्यानंतर आतां पुढें पंत प्रतिनीधींचा पांचवा पंथ या नांवानें जिकडेतिकडे कोल्हेकुई होण्यास खात्रीनें सुरवात होईल अशा वेळीं कै. जिवनराव चिटणीस यांनीं पसतीस वर्षांपूर्वी म्हणजे (तारीख २३ नव्हेंबर १८९०) पासून इंदुप्रकाशामध्यें सतत दोन वर्षें याच विषयावर एक अत्यंत उपयुक्त अशी लेखांची माला **"नवीन अथवा पटवर्धनी पंचांगकर्ते रावसाहेब नीळकंठ विनायक ऊर्फ कोडा. पंत छत्रे व रा. रा. पांडुरंग आबा जोशी मोघे वसईकर व त्या पंचांगाचे अनुयायी व अभिमानी लोकांस विज्ञापि पत्र"** या नांवानें प्रसिध्द केली होती. ती पुन्हा प्रसिध्द करणें अत्यंत जरूरीचे आहे असें वाटल्यावरून सदरहु लेख आम्हीं मालेच्या वाचकाच्याकरितां पुन्हा मुद्रित करीत आहों. हल्ली कमेटी पंचांग अथवा टिळक पचांग हे वरील छत्रे अथवा पटवर्धनी पंचांगाचोच आवृत्ती आहे हे आतां पुष्कळांच्या ध्यानांत आलें आहे. कै. चिटणीसांनीं त्या वेळीं लिहिलेले लेख हल्लीच्याही वादविवादाचे प्रसंगीं बरेच बोधप्रद होतील. कै. चिटणीसांचे सायन निरयण वरील लेख नुसते धर्म शास्त्रें, पुराणें, गणित व इतिहास यांना धरून कै. रा. रा. लेले किंवा कै. रा. रा. दीक्षित यांचे सारखे नसून ते फलज्योतिष शास्त्राला धरून सायन खरें कां व निरयण खोटें कां या दृष्टीनें लिहिले गेले आहेत. कै. लेले, दीक्षित व चिटणीस या त्रिवर्गाच्या लेखांचा संग्रह आतां जनसमाजास पाहावयास मिळत आहे. सायन वाद्यांनीं आपली बाजू सप्रमाण रीतीने जनतपुढें ठेविली आहे. प्रत्येकानें आपल्या बुध्दिला योग्य वाटेल तो पंथ स्वीकारावा. हेकडपणानें निरयणच खरे

असें ज्यांना म्हणावयाचें असेल त्यानें त्याप्रमाणें खुशाल चालावें श्रध्दनें अंध झालेल्या व हेकड मताभिमानी लोकांना कोव्हांही सायन गणनेचे सत्य पटवून देणें शक्य नाहीं. झोंपी गेला असेल त्यालाच जागें करतां येते परंतु ज्यानीं झोंपेचें ढोंग घेतलें आहे त्यांना जागे करणें परम दुर्घट आहे. एक वेळ वाळूपासून तेल पिळून काढतां येईल परंतु किंवा ज्ञान वादविवाद याचा तिळमात्र अधश्रध्देवर परिणाम होत नाहीं, तेथें खरें किंवा खोटें हें कसें पटवितां येईल ? महाराष्ट्रामध्यें सायन निरयण वाद फार झालेला आहे म्हणून अझूनपर्यंत आमचे संग्रही असलेले लेख आम्हीं प्रसिध्द केले नव्हते, परंतु आतां सायन निरयणच्या लढाईला पुन्हां तोंड लागण्याचा प्रसंग येऊं पाहात आहे अशा वेळीं हा लेखसंग्रह उजेडामध्यें आणणें अत्यंत जरूरीचे आहे असें वाटल्यावरून त्याप्रमाणें तो आम्हीं महाराष्ट्रजनतेला प्रेमानें अर्पण करून आम्हीं आमच्या कर्तव्यांतून मोकळें होऊं पाहात आहों.

सायननिरयण वाद हा गेल्या सत्तर ऐशीं वर्षांमध्यें महाराष्ट्रामध्यें बराच कडाक्यानें झालेला आहे. परंतु त्याचो आग अझून आमच्या गुर्जर बंधूंना लागलेली दिसत नाहीं. हल्लीं कोठें थोडें थोडें तुरळक यासबंधानें गुजराथीमध्यें लेख प्रसिध्द झालेले पाहण्यास मिळत आहेत. हा वादविवाद सर्व गुर्जर बांधवांच्या कर्णरंध्रावर जोरानें आदळणें अत्यंत आवश्यक आहे, व हो कामगिरी आमचा एखादा गुर्जर बंधु आपलें ज्ञाती बांधवापुढें वरील वादविवाद गुजराथीमध्यें मांडून करील अशी फार आशा आहे. गुजराथी ही ज्यांची मातृभाषा आहे अशा पारशी ज्ञातीमध्यें फलज्योतिषशास्त्राची अत्यंत आवड आहे. त्यांना सायन निरयणचें रहस्य अवश्य पटवून दिले पाहिजे. या ज्ञातीमध्यें विद्यासंपन्न पुष्कळ स्त्रिया व पुरुष अहून त्यांना

ज्योतिषशास्त्राचें भयंकर वेड आहे. हल्लीं ते आपली तहान संस्कृतचे ज्ञान नसल्या कारणानें जी काय संस्कृत ग्रंथांची गुजराथीमध्यें भाषांतरें झालेलीं आहेत त्यावरच भागवीत आहेत. व त्यामुळें त्यांचेमध्यें फारच विचित्र कल्पना रूढ आहेत. त्या दृष्टीनें महाराष्ट्रामधील जनता बरीच पुढें गेलेली आहे. संस्कृत ग्रंथाच्या अर्धवट ज्ञानामुळें व जुन्या ग्रंथामध्यें काय सांगितलें आहे याची चांगली कल्पना नसल्या कारणानें या समाजामध्यें कशा भ्रामक कल्पना आहेत यांची कल्पना अनुभवाखेरीज होणार नाहीं. या संबंधानें आमचे अनुभव फार विचित्र आहेत व पुढें मागे ते आम्हीं आमच्या वाचकांपुढें मांडूं असें म्हणत आहों. असो, विषयप्रवेशाला वरील प्रास्ताविक शब्द पुरें आहेत.

—संपादक—

नवीन अथवा पटवर्धनी पंचांगकर्ते रावसाहेब नीळकंठ विनायक ऊर्फ कोडोपंत छत्रे व रा. रा. पांडुरंग आबा जोशी मोघे वसईकर व पंचांगाचें अनुयायी व अभिमानी लोकांस विज्ञप्ति पत्र.

रा. रा. इंदुप्रकाशकर्ते यांस:----

वि. वि. खालील मजकुरास स्थल द्याल अशी आशा आहे.

कैलासवासी रावबहादूर केरो लक्ष्मण छत्रे यांनी प्रथम वरील नांवाचें पंचांग प्रचारांत आणण्याची सुरवात केली. तीच अद्याप पावेतों चालू आहे. कै. नानांचा हेतु हिंदु लोकांत वेधतुल्य ग्रहांचें पंचांग सुरू व्हावें हाच होता. नानांनी ग्रहसाधन नामक पुस्तकांत निरयण मानाचो पंचांगें करण्याचो चाल आहे, असें म्हणून त्या चालीस अनुसरून पंचांग करण्याची प्रवृत्ती सुरू केली परंतु हिंदु लोकांत निरयण मानाचीं पंचांगें कधीं सुरू झालीं, संपातास गति आहे हें प्राचीन काळीं प्रथम कोणास

कधीं कळलें इत्यादिकांचो माहितो ग्रहसाधन नामक पुस्तकांत अवश्य देण्यास पाहिजे होतो, ती न देतां, प्रस्तावनेंत "संपातास गति आहे हें फार प्राचीन ज्योतिषांस माहित होतें असें वाटत नाहीं. कारण ब्रम्हगुप्तादिकांचे सिध्दांतांत ह्या गतोविषयीं कांहींच सांगितलें नाहीं. गोलाध्याय गोलबंधाधिकार श्लोक १७--१९ याजवरोले टीका पाहावी" (प्रस्तावना पृष्ठ ४ ग्रहसाधन) इतकाच उल्लेख केला आहे ह्यावरून प्राचीनकाळच्या गणकांस संपातास गति आहे हें माहित नव्हतें असें ग्राह्य धरल्यास नानांस निरयणमानांचें पंचांग करण्याचें कारणच नव्हतें, हें त्यांचें लेखावरूनच उघड होत आहे. जनसमूहाचे चालीस अनुसरून प्राचीन पध्दति जी श्रुतिस्मृति यांस अनुसरून आहे, ती टाकल्यामुळें यांत नवीन चालीचें अनुकरण मात्र केलेलें दिसतें.

कै. रा. ब. केरूनाना छत्रे यांनी नवीन चालीचें अनुकरण केल्यामुळें आणि नॉटिकलमधील इंग्रजी आंकडे जे ग्रीनाच मध्यम कालाचे दिलेले असतात, त्यांस देशांतर संस्कार देऊन, अयनगति वजा करून निरयण ग्रह करण्याचा चाल पाडल्यामुळें ग्रहादिकांचे प्रत्यक्ष वेध घेण्याची बुडत आलेली चाल विशेष अमलांत आणली. ग्रहसाधन नामक पुस्तकांत पृष्ठ १६६ मध्यें प्रदर्शित केलेला इष्ट हेतु "पुढें हिंदुलोक मोठमोठाले वेधकर्ते झाले आणि या गोष्टीकडे विशेष लक्ष देऊं लागले म्हणजे या ग्रंथांतील कोष्टकांपेक्षां उत्तम प्रतीचीं कोष्टकें ते छापतील आणि नवीन शोधलेलें ग्रह--हर्शल, नेपच्युत, वेस्ता इत्यादिक व हल्लीं आकाशांतील जडांविषयीं जे अद्भुत चमत्कार पाहण्यांत आले आहेत, त्या सर्वांची माहिती करून घेतील" तो तडीस कसा जावा याचा विचार केलेला

दिसत नाहीं. ग्रहलाघवाचे गणितावरून जुने चालीचीं पंचांगें, नॉटिकलवरून पटवर्धनी पंचांग, सायन पंचांग, कै० बापुदेवकृत पंचांग, अशीं अनेक पंचांगें प्रसिध्द झाल्यानें हिंदुस्थान देशांत कितपत वेधकला सुधरेल व वेधवेत्ते पुरुष होतील, हें कळत नाहीं.

आतां कोणी असें म्हणेल कीं केरोपंत नानांचा वेधशाळा पुण्यास आहे. शके १८०६ सालीं पर्वतीस दुर्बिण वगैरे लावून चंद्र ग्रहण पाहण्यांत आलें. विद्यार्थ्यांस पटवर्धनाकडून स्कालरशिपाही मिळतात. तेव्हां नानांनीं वेधकला कशी बुडविली ? त्यांस उत्तर नानांनीं वेधकला बुडविली नाहीं, किंवा बुडविण्याचा हेतुही मनांत आणला नाहीं. हें खरें परंतु पंचांग करण्याची जी पध्दत सुरू केली आहे, तिचा परिणाम मात्र विपरीत झाला आहे. युरोपांतील वेधशाळेंत बहुमोलाचीं यंत्रें दुर्बिणी वगैरे आहेत, त्यातून घेतलेला सूक्ष्म वेध साहजिक रीतीनें उत्तम असणारे आहेत. त्यावरून होणाऱ्या पंचांगावरून ते हिन्दूंस अति स्वल्प मोलानें मिळतात हें खरें, परंतु नानांचे पुण्यातील वेधशाळेपासून काय फायदा आहे, हें मात्र कळत नाहीं. नॉटिकलचा वेध बरोबर आहे किंवा त्यांत चूक असल्यास अमुक आहे असें दाखविण्यास केरोपंतासारखे चपळ गणितज्ञांसही कळण्यास बराच काळ लागणार आहे. नानांचे शाळेचें संक्षिप्त वर्णन देण्यास पुण्यांतील गायन समाजाचें उदाहरण उत्तम साजणारें आहे. पुण्यांतील वेधशाळेचे ठिकाण पूर्वी पेशवाईत नाणावलेले सरदार पटवर्धन होते, त्यांचे वंशजांचे घरांत ओसरीवरील दोन खणाचें खोलींत आहे. गायन समाजाचें ठिकाण प्रसिध्द बाळाजीपंत नातू यांचे वंशजांचे शृंगारित पांच खणी दिवाणखान्यांत आहे. वेधशाळेचे विद्यार्थी गरीब असून फलादेशाचें अध्ययन करून निर्वाह करावा ह्या हेतूनें गोलाचा

अभ्यास करीत आहेत. गायन समाजांत जाणारी शाळेंतील मुलें व्यायामादिक करण्यापेक्षां सारेगमचा अभ्यास बरा आहे, त्या समजुतीनें जाणारीं आहेत. वेधशाळेस शिक्षकच नसल्यामुळें विद्यार्थी यांस काशोल-अध्ययनास जावें लागतें; गायन समाजाचे अति खटपटी गृहस्थ गव्हरा नरादि लोक संस्थानिक लोक यांस आमंत्रणें करून ठराविक पदें मुलांकडून गांववून बराच बाह्य देखावा करतात. गायन समाजाचा भपकेदार बाह्य देखावा मनांत आणतां समाजाचे शिक्षणक्रमाचा परिणाम प्रत्यक्ष मुलांवर काय झाला हें पाहिलें असतां संपूर्ण पंधरा वर्षांत एकही विद्यार्थी म्हणण्यासारखा गवयी झाला नाहीं. त्याचप्रमाणें वेध घेणारा स्वतंत्र असा विद्यार्थी वेध शाळेंतही झाला नाहीं, इतकेंच नाहीं तर नॉटिकलावरून पंचांग करावयाचें म्हणजे आयते पाटावर जाऊन बसावयाचें असें असतांही तिथि करणादिकांचा खर्डा करण्यास सालोसाल ७०।७५ रुपयांचा रक्कम वरील मोबे यांस पोहंचत आहे. अशी स्थिति असल्यामुळें पुण्यांत वेधशाळा आहे असें मानणें म्हणजे ज्या ठिकाणीं दुरबिण असेल ती वेधशाळा किंवा तंबुरा असेल तो गायन समाज असें मानण्यासारखें आहे.

ग्रहलाघवास चालन देण्यास रा. ब. केरोपंत नाना यांचा पराङ्मुखता होता, त्याचप्रमाणें पटवर्धनी पंचांगकार व इतर पंचांगकार यांचा आहे. त्यामुळें आम्हां हिंदूंत स्वतंत्र आहेत ते ग्रंथ चालन न दिल्यामुळें बुडत जाऊन नवीन कितपत होतील याचा कल्पना करण्यापेक्षां स्तब्ध बसण्याचा काळ आला आहे, असें मानणें वावगें होणार नाहीं. ईश्वरावकृपेनें आमचा व इंग्रजांचा संबंध तुटून नॉटिकल पुस्तक आमचे विद्वान मंडळास मिळेनासें झालें तर वरील पंचांगांचा काय स्थिति होईल ती वाचकांनीं मनांत आणावी, तूर्त श्री० पटवर्धनाचे द्रव्याचा उपयोग

नॉटिकलमधील आंकड्यांचें भाषांतर करण्यांत होत आहे या पलीकड कांहींही नाहीं. नॉटिकलचें भाषांतर करून शके १८०६ चें चंद्रग्रहणाचा काल बरोबर दर्शविण्यांत आला, परंतु गणकाचे गणिताची त्यांत सूक्ष्मता वर्णन करण्याजोगी कोणतीही गोष्ट दृष्टीस पडत नाहीं. ग्रहलाघवाचें गणितावरून हल्लीं प्रचारांत असलेल्या पंचांगांत तें ग्रहण दिलें नाहीं हें खरें. परंतु तें न देण्याचें कारण तें ग्रहण अत्यंत थोडें वेळ दिसल्यास दिसेल, असें असल्यामुळें दिलें नाहीं, हें होय. तेंच ग्रहण जर ग्रहसाधन नामक पुस्तकावरून केलें असतें, तर पटवर्धनी पंचांगांत ही दिलें गेलें नसतें. चंद्रग्रहणाचा काल नॉटिकलमध्यें ग्रीनिच मध्यम वेळेचा दिलेला असतो. त्यांस देशांतरसंस्कार देतांना गणकांनीं मिळवणींत व वजाबाकींत चूक होऊं न देण्याची विशेष खबरदारी ठेवली. ह्याजपेक्षां "आमचे सूक्ष्म गणिताची सत्यता" सालोसाल पंचांगाचे प्रस्तावनेंत जी आढळत आहे, ती निराळे ठिकाणीं दिसत नाहीं. पटवर्धनी पंचांग प्रसिध्द होण्यानें अगर दुसरें इतर पंचांग प्रसिध्द होण्यानें वेधकलेचा उत्कर्ष होईल असें मानल्यास रावसाहेब सिताराम विश्वनाथ पटवर्धन बी. ए. कृत अंक लिपीचा अभ्यास वेदासारख्या नव्या ग्रंथावर टिका करणाऱ्या जाड्या विद्वानाचा जसा ओनामा होतो, त्याचप्रमाणें कोणतेंही पंचांग वेधकलेच्या गहन विद्येचा 'ओनामा' होईल, परतु पुढील संग्रह होऊन वेधशास्त्र वाढण्यास कितीक वर्षें लागतील हें कळत नाहीं. हिंदु लोकांचे मतें ग्रहादिकांचे वेधवेण्यास आरंभस्थान रेवतीचा योगतारा मानला आहे. असें ग्रहसाधन पुस्तकांत वर्णन दिलें आहे व त्यापासून हल्लो (वर्षारंभीं) संपात बिंदु १८ अंश २० कला व १९ विकला मागे गेला आहे, असें पटवर्धनी पंचांगकार (किंवा हल्लीचे कमेटि पंचांग अथवा टिळक पंचांग

वाले-संपादक.) मानतात. इंग्रजी वेधकर्ते यांचे मतानें योग तारा शून्य संपाती सन ५७२ वर्षी होता. परंतु ग्रहसाधन पुस्तकांत तो ५७४त म्हणजे शके ४९६ त होता, असें दिलें आहे, तें खरें दिसत नाहीं.

The junction-star of the group is said to be its southern most member. All authorities agree in placing it upon the ecliptic and all excepting our treatise and the Cak alaya make its po sition exactly mark the initial point of fixed sideral sphere. The star intended is, as we have already often said had occasion to notice, the faint star Piscium, of about the fifth magnitude, situated in the band which connects the two fishes. It is indeed very near to the ecliptic, having only 13'of south latitude. It coincided in longitude with the virnal equinox in the year 572 of our era. At the time of All Biruni's visit to India, the Hindus seem to have been already unable to point out distinctly and with confidence, the situation in the heavens of that most important point from which they held, that the motions of the planets commenced at the creation and at which, at successive intervals, their universal conjunction would again take place; for he is obliged to mark the asterism as not certainly indentifiable. He also assigns to it, as to Catabhishaj, onlya single Star.

Translation of the *Surya—Siddhant*.

---

* रेव्ह. एबेनेझर बरोज यांनी सूर्य सिद्धांताचें भाषांतर केलें आहे. त्याच्या १९९ व्या पानांत सदर पाद्री ज्योतिर्विदानीं असें म्हटलें आहे.

नकाशांत रेवतीच्या योगताऱ्याजवळ दोन तारे आहेत, त्यांपैकीं ग्रह लाघवकारांनीं एकादा मानला असल्यास ग्रहलाघवाचें अयनांश चुकीचे दिसत नाहींत. सूर्यसिध्दांत आणि शाकल्य सिध्दांत ह्या ग्रंथांत आरंभ-स्थान योग तारा मानला नाहीं. इ. सन १३०१ ह्या वर्षीं गिझनीचे महंमदानें हिन्दुस्थानावर स्वारी केली त्या वेळीं त्याचेबरोबर आलबुरणी नांवाचा वेधकर्ता आला होता, त्यास जो वेध तारा हिंदु लोक आरंभ-स्थान धरीत आहेत तो खात्रीपूर्वक कोणासही दाखवितां आला नाहीं. सूर्यसिध्दांताचें मतानें इ. स. १८६० चे जानुवारीचे १ ले तारखेस अयनांश आले ते २० अंश २४ कला ३८-६७ विकला आहे. गति ५४ कला आहे. म्हणजे १८९० चे अयनांश २० अंश ५१ कला ३८--६७ विकला आलें. हेच अयनाश कै. वा. बापुदेव शास्त्री यांचे आहेत. म्हणून आरंभस्थान सूक्ष्म खात्रीपूर्वक अमुकच पक्षाचें बरोबर आहे किंवा अमुक पक्षाचें चुकलेलें आहे असें म्हणतां येत नाहीं.

लेख २ रा.

क्रांतिवृत्तस्थ द्वादश राशींचें ज्ञान—

----प्रथम मिसर देशांतील लोकांस झालें, त्यांपासून ग्रीक (यवन) लोकांस झालें. ग्रीक लोकांपासून प्राचीन आर्य लोकांस राशींचें ज्ञान झालें. हिंदुस्थानचे ऋषींस ग्रीक लोकांपासून राशींचें ज्ञान होण्यापूर्वी आकाश कसें रीतीनें मोजात होते हें पाहिलें म्हणजे रेवति नक्षत्र हेंच आरंभस्थान सदोदित कायम राहत नाहीं. दिवस व रात्र समसमान ज्या वेळेस होतात म्हणजे ज्या वेळीं रवि हा विषुवावर येतो, त्या वेळेस होणाऱ्या संक्रातीला "विषुव संक्राति" असें मानलें आहे. त्या संक्रातीस राशींचीं नांवें मेष व तुला अशीं मिळालीं. विषुव संक्रातीपासून पुढें ३० अंशांचे

भागास 'विष्णुपद' असें म्हणतात. त्यास पुढें वृषभ व वृश्चिक हीं नांवें मिळालीं. "विष्णुपदा" पुढील ३० अंशांचे भागास "षडशीति" असें म्हणत होते. त्यांस पुढें मिथुन व धन हीं नांवें मिळालीं. षडशीतीपासून पुढील ३० अंशांचे भागास अयन संक्रांत म्हटलें आहे. त्यास पुढें कर्क व मकर हीं नांवें मिळालीं. शेष षडशीतीचीं नांवें कन्या व मीन, अशीं ठेवण्यांत आलीं. आतां वाचकांनीं प्रथम कल्पना करावी कीं मेष वृषभादि तारात्मक भाग आपणापुढें नाहींत, आणि विषुव संक्रांति अयन संक्रांति, विष्णुपद, षडशीति, हे भाग आपणांपुढें दिसत आहेत. आतां असे प्रकारचे विभागात्मक भागांत आरंभस्थान अमुकच म्हणून धरणें संभवत नाहीं. पृथ्वीचें ध्रुवाचें टोक प्रतिवर्षीं ५०-२ विकला ह्या सांपातिक गतीनें किंवा कांहीं कमी जास्त गतीनें विलोम मार्गानें हिंडणारें आहे. म्हणून विषुव संक्रांति ज्या एका अचल बिंदूजवळ अगर मानलेला योगताराच जरी धरला तरी तेथें सर्वदा होणाऱ्या नाहींत हें साहजिक आहे. म्हणून अचल ताऱ्यापासून आरंभस्थान धरणें कधींच संभवत नाहीं. तथापि पृथ्वीचें विलोम जाणें कळण्यास विवक्षित अचल ताऱ्याचें प्रयोजन आहे म्हणून एक रेवतीचा योगतारा मानून ठेवला आहे. म्हणून तो आरंभस्थान धरला आहे. परंतु तोच डोळे मिटून सदोदित ठेवणें इष्ट नाहीं. सांप्रत निरयण संक्रांति ज्या वेळेला धरण्यांत येत आहे त्याचे पूर्वी १८।२०।२२ दिवस अनुक्रमें रवि विषुवावर आला असतां दिनमान व रात्रमान समसमान करण्याचें स्वाभाविक लक्षण आहे तें पटवर्धनी (टिळक) पंचांगांत, बापूदेवकृत पंचांगांत व ग्रहलाघवी पंचांगांत चुकलें आहे. हें दिनमान सदरांत पाहिलें असतां कळेल. क्रांतिवृत्त हें वर्तुळ असल्यामुळें

(अपूर्ण)

सायनाचें सल.

[लेखकः—वि. गो. नवाथें.]

आम्हीं कै. चिटणीसाचे लेखाचे आरंभीं ध्वनित केल्याप्रमाणें सायनवाद्यांवर हल्ला करण्यास केसरी पत्राचे दुय्यम संपादक श्रीयुत ज. स. करंदीकर यांनीं सुरवात केली असून त्यांचीं पहिलीं मुक्ताफळें ता. १३ ऑक्टोबर १९२५ च्या केसरीमध्यें प्रसिध्द झालीं आहेत. श्रीयुत करंदीकरांच्या ज्योतिषशास्त्रसंबंधाच्या अगाध विद्वत्तेच्या भ्रमाचा भोंपळा त्यांचे शिवाजीच्या कुंडलीनें फोडला आहे व आतां केसरीच्या संपादकीय भात्यांतून फार अपूर्व लिखाण बाहेर पडत आहे. या त्यांचे प्रथमच्या लेखास गणक भास्कर विष्णु गोपाळ नवाथें यांनीं ता. २९ ऑक्टोबर १९२५ च्या स्वराज्य पक्षामध्यें उत्तर दिलें आहे तें आम्ही आमच्या वाचकांना पुन्हा उध्दृत करून सादर करीत आहों. श्रीयुत नवाथें यांचे उत्तरास आमची पुणेरी पंचांग कमटी काय उत्तर देते तें पहाणें आहे. आपली पडलेली बाजू अशा अनेक लंगड्या लुंग्या टेक्यांना खास सावरणार नाहीं ही देखील जाणीव पंचांग कमेटीस नाहीं यांचेंच दुःख वाटतें. गेल्या ७०।८० वर्षांमधील पंचांगसंशोधनाच्या वादानें हल्ली जनता चांगलीच जागृत झालेली आहे. टिळक पंचांगांत पितर स्वर्गांत अमुक दिवशीं जातील असें लिहिण्यानें किंवा अमुक दिवशीं चंद्र अमुक तारकापुंजामध्येंच आहे असें लिहिण्यानें त्यावर विश्वासून सर्व जनसमाज अंधश्रध्देनें मूर्खासारखा किंवा शेळ्यासारखा नेमळट रीतीनें वागेल असें आम्हांस वाटत नाहीं.

—संपादक, ज्योतिर्माला—

गेल्या ता. १३ आक्टोबरच्या केसरींत केसरीचे दुय्यम संपादक श्रीयुत ज. स. करंदीकर यांनीं सायनाचें समूळ उच्चाटण करण्याच्या हेतूनें एक लेख लिहिला आहे.

सायन हा एक पक्ष आहे व तो केव्हां तरी वर डोकें काढणारच, याप्रमाणें करंदीकरांनीं कबुली दिलीच आहे. पण, पंचांगैक्य मंडळाचे अध्यक्ष श्रीमंत औंधचे चीफ यांनीं अतिप्रसंग केल्यामुळें सायनाचा मुद्दा अनायासें पुढें आलेला आहे असें ते म्हणतात. पण अशीच गोष्ट पं. कमिटीचे माजी अध्यक्ष कै. लोकमान्य टिळक यांनीहो दोन वेळां केली, याची करंदीकरांना आठवण करून देण्याची जरूर आहे असें वाटत नाहीं. असो; आतां करंदीकरांच्या विधानांचा विचार करूं.

" आर्यांचीं सर्व धर्मकृत्यें सूर्यावर अवलंबून आहेत " हें अध्यक्षांनीं गृहीत धरलेलें प्रमेयच मुळीं चुकीचें साहे असें करंदीकर म्हणतात. आपण म्हणतां तें अगदीं बरोबर. पण शंका अशी येते कीं, जर धर्मकृत्यांचा सूर्याशीं कांहीं संबंध नाहीं तर सौरवर्षच कशाला पाहिजे ? त्याला जर अजिबात फाटा दिला तर काय नडणार आहे ? उलट वर्षमानाचा, आरंभस्थानाचा व अयनांशाचा तंटा आपोआपच मिटेल. केवळ चांद्रवर्ष यांचा मेळ घालण्याचा बहाणा करून एक अधिक मास म्हणजे वर्षाचे १२ महिने होतात त्या ठिकाणीं १३ महिने करून एक महिन्याचें भाडें जास्त उकळण्यासाठीं घरवाल्यांनींच हें एक बंड उभारलें असेल किंवा भटांनींच आपली तुंबडी भरण्यासाठीं याला 'पुरुषोत्तममास' म्हणून हें एक आपलें पिल्लू सोडलें असेल असें वाटतें ! कोण हा उपद्व्याप ? चांद्रवर्षाच्या जोडीला सौरवर्ष उभें करावयाचें व त्यांचा मेळ पाडण्यासाठीं अधिकमास धरावयाचा. मेळ नाहीं कां बसेना ? धर्मकृत्यें

मारीच नडून राहणार आहेत ? तीं तर करंदीकर म्हणतात चंद्रसूर्यांच्या सापेक्ष अंतरावर व चंद्र आणि तारका यांच्या संबंधावर अवलंबून आहेत. मग हें सौर वर्षाचें लोढणें कां बाळगावयाचें समजत नाहीं. करंदीकर याचा खुलासा करतील तर आमच्यासारख्या अज्ञ जनांवर मोठे उपकार होतील.

सायन पध्दतींतील दोष दाखवितांना करंदीकर म्हणतात:--"चंद्राचा नक्षत्रांशीं घडणारा योग व त्या कालीं केलेल्या कृत्यांचा शुभाशुभ परिणाम यांचा वारंवार अनुभव घेऊन फलज्योतिषशास्त्र बनत आलें असलें पाहिजे. व या अनुभवावरून प्रत्येक नक्षत्राला बऱ्या वाईट संज्ञा प्राप्त झाल्या. सायनानें पावणेदोन नक्षत्रांचा फरक पडत असल्यामुळें नक्षत्रांच्या शुभाशुभ फलाला लाथाडून भलतेंच थोतांड उभारलें जाईल."

तारकांत सायनानें पावणेदोन नक्षत्रांचा फरक पडतो ही माहिती करंदीकरांनीं कोठून मिळविली ? कीं स्वत:चाच हा शोध आहे ? रा. करंदीकर ज्या तारकांना अश्विन्यादि म्हणतात त्यांना सायनवादीहि तसेंच म्हणतात; व चंद्र जेव्हां एकाद्या ताऱ्याशीं योग करील तेव्हां तें जें फल सांगतील तेंच सायनवादीहि सांगतात मग हें थोतांड कसें ?

थोतांड आहे वास्तविक करंदीकरांचें व त्यांतून सुटण्याची त्यांनीं एक युक्तिही करून ठेवली आहे. ते म्हणतात—" हल्लींच्या निरयण पध्दतीनेंहि नक्षत्रें चुकतात असें सायनवाद्यांचें म्हणणें आहे. पण ही चूक अगदींच अल्प आहे आणि मुख्यत: ही चूक आहे असें समजून उमजून त्या नक्षत्राचीं फलें सांगितलीं असल्यानें निरयनमानांत फलज्योतिषदृष्ट्या नवीन कांही आपत्ति ओढवणार नाहीं."

तारकात्मक नक्षत्रें व विभागात्मक नक्षत्रें यांचें रा. करंदीकर जें सम्मेलन करीत आहेत तें साफ चुकत आहे. चूक अल्प आहे म्हणजे किती २७ नक्षत्रांत १ नक्षत्राची ? एकाद्याच नक्षत्राची असली तर ती अल्प आहे असें मानतां आलें असतें; पण एक नव्हे दोन नव्हे तर अकरा नक्षत्रें चुकत असतां करंदीकर म्हणतात चुकी अल्प आहे !

पंचांगांत **अश्विनी** नक्षत्र असतां चंद्र कोणत्याही नक्षत्राशीं समागम करीत नाहीं. त्याच प्रमाणें **भरणी, कृत्तिका, पुष्य हस्त, स्वाती, उत्तराषाढा, शततारका, पूर्वाभाद्रपदा व उत्तराभाद्रपदा** यांची स्थिति आहे. **चित्रा** नक्षत्र असतां चंद्र **हस्त, चित्रा व स्वाती** या तीन ताऱ्यांशीं योग करितो ! असल्या घोडचुकोला करंदीकर अल्प म्हणतात, व चंद्र आणि तारका यांचा योग न कां होईना. तो होतो अशी कल्पना करूनच फलें ठरवलेलीं आहेत असें सांगतात ! असें सांगण्याला त्यांना कोणता ग्रंथ मिळाला ईश्वर जाणे !

फलशास्त्रांत होरा, द्रेष्काण, सप्तमांश, नवमांश, दशांश, द्वादशांश, षोडशांश, त्रिंशांश व षष्ट्यंश यांचीही फलें दिलीं आहत. तींसुध्दां चंद्र व तारका यांचे योग पाहूनच असतील, नाहीं बरें करंदीकर साहेब ? मूळ नक्षत्राचे चार किंवा दहा भाग करून फलें सांगितलीं आहेत. तेथें मूळ नक्षत्रांचे कोण कोणते तारे उचलून आणले ? तारकात्मक नक्षत्रांचे पाव, अर्धा व पाऊण हे भाग कसे काय पाडावयाचे ? असे भाग पाडतां येतात व तारका नसतांही फलें ठरवतां येतात तर हा विद्या काय एकट्या करंदीकरांनाच साधली आहे असें म्हणावयाचें ? सायनवादी असलें थोतांड तरी रचीत नाहीत. ते उघड रीतीनें विभागाचोच फलें

सांगतात. करंदीकरांना अद्यापि हें कळलेलें नाहीं असें म्हणावें लागतें.

सायनपध्दतीचो विसंगतता दाखवितांना करंदीकरांनीं सायनवाद्यांना दीडशहाणे ही पदवी दिली आहे ! पण असले दीडशहाणे करंदीकरांपेक्षां कांकणभर सरस योग्यतेचे खचित होते. कै. बापुदेवशास्त्री (काशी), कै. केरूनाना छत्रे (भा. ज्यो. इ. पृ. ४२० पहा.) व कै. शंकर बाळकृष्ण यांना दीडशहाण्यांत गणतांना करंदीकरांनीं विचार करावयास पाहिजे होता.

एका काळीं झिटॉपिशिअम तारा संपातीं होता, त्या वेळीं करंदीकरांनीं एक फोटो घेतला व तीच तारा संपातापासून ९० अंशांवर असतां दुसरा फोटो घेतला. दोन्ही फोटो सारखेच आल्यामुळें त्या त्या वेळच्या सूर्याचें फल तें एकच सांगणार. दीड शहाणे सायनवादी मात्र एकदां एक सांगणार ! व दुसऱ्या वेळीं दुसरेंच सांगणार ! म्हणून करंदीकरांनीं हो सायनपध्दतीची विसंगतता ठरवली. सूर्य जेव्हां झिटापिशिअम ताऱ्याजवळ संपातांत होता तेव्हां करंदीकरांचा मेष व सायनवाद्यांचा मेष एकच होता. सूर्य मेष संपातीं असतो. तेव्हां दिनरात्रीमान सारखें असतें व वसंतऋतूचा अनुभव येतो म्हणून हें या सूर्याचें फल होय. आतां करंदीकरांचा मेष गेला संपातापासून ९० अंशावर त्या ठिकाणचा फोटो पूर्वीसारखाच असल्यामुळें त्याचें फल करंदीकरांना दिनरात्रीमान व वसंतानुभव हेंच सांगणें भाग आहे ! परंतु वस्तुस्थिति निराळीच दृष्टोस पडेल. दिवस फार वाढलेला व रात्र त्या मानानें कमी झालेली असेल व पर्जन्याचा म्हणजे वर्षाकाळाचा अनुभव मिळेल. सायनवादी त्या सूर्याला कर्कस्थ सूर्य म्हणतील व फल बिनचूक सांगतील. तेव्हा विसंगतता निरयन पध्दतींत कीं सायनपध्दतींत आहे ?

॥ श्रीसद्गुरवे नमः ॥

ज्योतिर्माला

आप्राचः कामरूपाद्द्रुहिणसुतनदप्लावितादाप्रतीचो
गान्धारात् सिंधुसार्द्राद्रघुवररचितादाचसेतोरवाचः ।
आकेदारादुदीचस्तुहिनगहनतः सन्तिविद्वत्समाजा
ये ये तानेष यत्नः सुखयतु समजान्कश्चमत्कर्तुमीष्टे ॥ १ ॥

अभिनवाऽऽवृत्ति } वर्ष ९ वें { अंक ९ ते १०.

जन्म कुंडलीचें दशमस्थान

[लेखक:—एम. डी. सगणे. एम. ए. एल एल. बी. ड्रुग.]

दशमस्थान हे कुंडलीतील अगदीं उजवीकडचें व दिशापरत्वें अगदीं दक्षिणेकडचें स्थान आहे. हें केन्द्रस्थानापैकीं एक स्थान आहे. याला कर्मस्थान, कर्मक्षेत्र, राज्यभुवन व उपजीविकास्थान इत्यादि संज्ञा आहेत. या स्थानावरून उद्योगधंद्याचा, मानमरातब्याचा, कर्तृत्वशक्तीचा, पौर्वात्य पध्दतीनें बापाचा, कांहीं पाश्चात्य ज्योतिर्विदांच्या मतें आईचा विचार होतो. तसेंच पत्नीच्या आईचा किंवा बापाचाहि विचार होतो. या स्थानांतील ग्रहांनां त्याप्रमाणेंच त्याच्या अधिपतीला विशेष महत्व आहे. अर्थात या स्थानांतील ग्रह आणि या स्थानाचा अधिपती वर निर्दिष्ट केलेल्या गोष्टींशीं संबंध ठेवतो.

हे स्थान सर्व स्थानांत अत्यंत महत्वाचें आहे असें म्हटलें असतां चालेल. तें सर्वांना सारख्याच किंमतीचें आहे. कारण सर्वसाधारण जनतेच्या दृष्टीनें विचार केला तर त्यांना मानमरातब्याची जरी फारशी गरज

नसली तरी पोटापाण्याची, व्यवसायाची घडी जशी बसली असेल त्या मानानें त्यांस सुखदुःखाची सर्वस्वी जरी नव्हे तरी बहुतांशीं जाणीव होत असते. उद्योगधंदा कोणता असेल, तो स्वतंत्र असेल कीं, नोकरीचा असेल, नोकरीचा असल्यास ती नोकरी हलकी कीं मोठी, खाजगी कीं सरकारी त्याचप्रमाणें कोणताहि उद्योगधंदा असो तो सुरक्षित चालेल किंवा नाहीं, त्यापासून आर्थिक परिस्थिति कशी काय वगैरे गोष्टी त्या वर्गाच्या मानानें फार महत्वाच्या आहेत. समाजाच्या वरच्या वर्गांतील लोकांविषयीं विचार केला तर त्यांना उद्योगधंदा तर सर्वसाधारणतः पहावा लागतोच पण मानमरातबाची, अधिकाराची आवड जास्त असते, व त्यावर त्यांच्या आयुष्याची मदार असलेली दिसते. मानमरातब मिळेल कीं नाहीं, अधिकार व कीर्ति प्राप्त होईल कीं नाहीं, मिळाल्यास दर्जा कोणता, किती काळ टिकेल, त्यांचें स्वरूप सार्वजनिक किंवा राजदरबारचें असेल यांचा विचार या स्थानावरून होतो. राजेलोकांचें राज्यस्वरूप, राज्यविस्तार, त्यांचें वैभव, शत्रूपासून पीडा, राज्यक्रांत्या किंवा राज्यविषयक फेरफार, सुधारणा इतर राजे लोकांत त्यांचा दर्जा वगैरे अनेक राजविषयक महत्वाच्या गोष्टींचा निर्णय या स्थानावरून होतो. वर सांगितलेल्या तीन प्रकारच्या लोकांना कोणत्याहि प्रसंगीं अत्यंत मौल्यवान गोष्ट म्हणजे कर्तृत्वशक्ति ही होय. दशमस्थानावरून या शक्तीचा बोध होतो. ज्या मनुष्यांत कर्तृत्वशक्ति नाहीं त्याच्या वैभवाची, राज्याची अथवा उद्योगधंद्याची किंमत नसते, त्यांच्यामध्यें खरें मनुष्यत्व नसतें. मोठेपणा, उच्चाधिकार इत्यादि जरी त्यांना प्राप्त झालें तरी ते केवळ नामधारी स्वरूपाचे असतात. कर्तृत्व शक्ति असल्यास कोणतोहि परिस्थिति असो अथवा येवो तिला न डगमगतां तोंड देण्यांचा त्यांत धमक असतें, मर्दुमकी असते. तेव्हां ही

अमोल कर्तृत्वशक्ति एखाद्यांत असेल कीं नाहीं, असल्यास कोणत्या प्रकारची असेल, ती चांगल्या अगर वाईट कामाकरितां उपयोगांत आणली जाईल. त्याचे कर्मक्षेत्र कसें असेल म्हणजे त्याचे आयुष्य समाजाशीं, संस्थांशीं किंवा देशासारख्या मोठ्या प्रदेशाशीं निगडित राहील कीं फक्त जगाच्या एका कोन्याकोपऱ्यांत एकाद्या खेड्यांत निस्सार असें जाईल, तो बहुजन समाजसागर येईल कीं मूठभर माणसांशींच त्याचें दळणवळण राहील अशा अनेक गोष्टींचा या दशमस्थानावरून विचार होतो.

× × × +

वर दिलेले विचार फक्त ऐहिक व प्रापंचिक दृष्टीचे झाले. आध्यात्मिक दृष्टीनें पाहिलें असतां इतर स्थानावरून आत्मोन्नतीची पायरी आंखतां येते तशीच यावरूनहि ठरवितां येते. मनुष्य अजून मायेच्या अमलाखालीं कितपत आहे, त्याचा स्वार्थ कोठपर्यंत सुटला, त्याच्या आत्म्याचें क्षेत्र कितपत विस्तृत झालें, हें या स्थानावरून कळतें; कारण हें स्थान कर्मक्षेत्र असल्यामुळें व मनुष्य जें कांहीं करतो त्यांत त्याच्या बुध्दीचें व इच्छेचें त्याचप्रमाणें त्याच्या मनाचें व अंतःकरणाचें प्रतिबिंब पडत असल्यामुळें त्याची बुध्दी, इच्छा, मन अथवा अंतःकरण सात्विक कीं राजस कीं तामसी आहे, त्या गुणांत त्याची कितवी पायरी आहे. या विषयांचें पर्यायानें दशमस्थावरून ज्ञान होतें. त्याचे कर्मक्षेत्र स्वतःपुरतेच असल्यास, स्वार्थी असल्यास, जगाशीं तो फारसा संबंध ठेवणार नाहीं, ठेवल्यास तो संबंध स्वार्थापुरताच असेल. त्याची प्रगति झाली असल्यास तो जनसमाजाच्या, देशाच्या, जगाच्या अस्त्याशीं लीन होण्याचा प्रयत्न करील आणि असें असल्यास जगांत दिसणारें दृश्यफल म्हणजे जनहिताचीं कार्यें करणें, त्यांत आयुष्य वेंचणें, उपकार करणें वगैरे गोष्टी

त्याचें हातून घडतात. या सर्व गोष्टी दशमस्थानाशीं संबंध ठेवणाऱ्या योगानें (ग्रहयोगानें) दर्शित होतात. मनुष्याचें कर्म कर्म म्हणूनच प्रथम उत्पन्न होत नाहीं. कर्म घडण्यापूर्वी कर्म घडण्याची इच्छा पाहिजे. कर्म केल्यानें जें कांहीं प्राप्त व्हावयाचें त्याविषयींची मग तो विषय राजा होणें असो, प्रधान होणें असो, मोठा वक्ता, कादंबरीकार, राजकारणी पुरुष, हुद्देदार, व्यापारी, विजयपुरुष अगर कांहींहि होणें असो-इच्छा असावी लागते. म्हणजे प्रथम कोणत्या तरी इच्छा उत्पन्न होऊन त्यावर मन वेधतें; आणि एकदां ही इच्छा उत्पन झाली म्हणजे तिची फलसिद्धि होणें निश्चितच असते. कारण उत्पन्न झाल्यावर कार्य निष्पन्न झालेंच पाहिजे. तें मध्येंच मोडून पडूं शकत नाहीं. प्रश्न उरतो तो कालावधीचा उरतो. कांहीं काल पावेतो अनुकूल परिस्थिति प्राप्त नसल्यामुळें ती इच्छा फलद्रूप होत नाहीं. आणि हा काल सबंधचें सबंध आयुष्यहि असूं शकतें. इच्छा फलद्रूप होण्यासारखी परिस्थिति सबंध आयुष्यभरहि कित्येकांस (पुष्कळांस) प्राप्त होत नसेल, पण कारण उत्पन्न झाल्यामुळें तें कधींना कधींतरी प्रसूत व्हावयाचें म्हणून या जन्मांत नाहीं तर पुढच्या जन्मांत-त्याच्या पुढल्या जन्मांत--ती परिस्थिती प्राप्त होऊन इच्छित कार्य प्रादुर्भूत झालेंच पाहिजे. आपलें आयुष्य इतकें लहान आहे कीं या जन्मांत उत्पन्न झालेल्या इच्छे-पैकी फारच थोड्या इच्छा फलद्रूप होतात. ज्या इच्छा फलद्रूप होत नाहींत त्या इच्छांचें प्रत्येक जन्माचे शेवटीं बरेंच मोठें गाठोडें बनतें आणि तें पुढच्या जन्माकरितां शिल्लक रहातें. आणि भावी जन्मांत त्यांतील सर्व किंवा कांहीं इच्छा फलद्रूप होऊं लागतात. इच्छा फलद्रूप होऊं लागल्या म्हणजे तशीं कर्में घडतात. मागच्या जन्मांत इच्छा चांगल्या तर पुढच्या जन्मांतील कर्में चांगलीं. अर्थात एखाद्या जन्मांत जीं कर्में घडतात तीं

पूर्व जन्माच्या इच्छावृक्षाचीं फलें होत. आणि बहुतेक आज जें आपण करतों तें मागचेंच फल असतें. आणि कर्मस्थान हें दशमस्थान असल्या-मुळें एका बाजूनें तें स्थान आपण काय करणार आहोंत, काय होणार आहोंत हें व दुसऱ्या बाजूनें आपल्या पूर्व इच्छा काय व कशा होत्या, कोणत्या दर्जाच्या होत्या हें दर्शवितें व त्यामुळें आपला आत्मा कोठपर्यंत प्रगतीस गेला आहे याची शाहानिशा करता येते. म्हणून दशम स्थानाचे दोन्ही दृष्टीनीं फारच महत्व आहे. अर्थात एकट्या दशमस्थानामुळें सर्वस्वी निकाल लागणें शक्य नाहीं. अनेक गोष्टींचा विचार करणें अत्यंत मह-त्वाचें आहे.

दशमस्थानावरून व दशमस्थानाच्या अधिपतीवरून कोणकोणत्या गोष्टींचा विचार करितां येईल म्हणजे दशमाचें कारकत्व कोणकोणत्या गोष्टींबरोबर आहे याचें विवेचन पूर्वी केलें आहे, आणि प्रस्तुतच्या लेखा-परतां तेवढा विचार पुरे आहे. आतां आपण दशमसंबंधांत राशि--ग्रह दृष्टि इत्यादि संबंधानें विचार करण्यापूर्वी दशमाला दिलेलें कारकत्व तसेंच कां असावें, व दशमाला तेंच कारकत्व कां प्राप्त झालें याचा थोडासा चिकित्सक बुध्दीनें विचार करतां आल्यास पाहूं.

कुंडलीचीं द्वादशस्थानें म्हणजे दृश्य खगोल वर्तुळाचें पाडलेले बारा भाग होत. यांचें विशेषतः केंद्राचें ज्योतिर्गणांत अग्रगणी जो रवि त्याचें व त्यापासून होणाऱ्या सृष्टिस्वरूपाचें पराकाष्टेचें नैसर्गिक साम्य आहे. आणि जणूं काय हें साम्यच कारकत्वाचें बीज असावें असें वाटतें. या विचारकल्पनासरणीनें दशमाचें कारकत्व पाहूं. त्याकरितां लग्नाच्या कारकत्वाचा विचार अनयासा होतोच.

आतां प्रथमस्थान--लग्नदर्शित--तनुस्थानदर्शित गोष्टींचा सूर्योदयाशीं कसा काय मेळ बसतो तो पाहूं. प्रथम सूर्योदयकाळचें सूर्याचे स्वरूप क्षणभर लक्षांत घ्या. सूर्य उदयाचलावर आला, लग्नस्थ झाला म्हणजे जणूंकाय त्याचा जन्मच झाला असें म्हणतां येईल. आतांपर्यंत छपलेला, लपलेला, जगार्धाच्या दृष्टीनें नाहींसा झालेला सूर्य, पूर्व दिशेस आला म्हणजे आतां वर सार्वभौमत्व गाजविणाऱ्या अंधकाराचा नाश होऊन तेज झळकूं लागतें. तेजरूपी चैतन्य अस्तित्वांत येतें. म्हणजे सूर्य ज्या अंशांत आहे, तो अंश पूर्वेशीं संलग्न झाला असतां तेज म्हणजेच चैत्यन्याचा व तेज ज्याचा आश्रय करतें त्या सूर्यबिंबाचा जन्म होतो. आतांपर्यंत एकप्रकारें निद्रावस्थेंत किंवहुना अदृश्यावस्थेंत असलेल्या चैतन्याचें व तद्युत बिंबाचे पूर्नदर्शन, पुनर्ज्जीवन व पुनर्च्चालन होतें. किंवा सूर्य बिंब पूर्वेस आलें असतां त्यांत तेज-प्राण किंवा चैतन्यसंचार होतो असें म्हणणें शोभत नसले तरी एवढें निदान खरें कीं त्याचे लौकिक अस्तित्व तेव्हांच प्रस्थापित व प्रसिध्द होतें. तेव्हांपासूनच त्या चैतन्ययुक्त बिंबाचा प्रभाव प्रादुर्भूत होतो व जगावर परिणाम सुरू होतो. पूर्व दिशा सूर्यास प्रसूत झाली, सूर्य पूर्वेस लग्नस्थ झाला, सूर्योदय झाला म्हणजे जगांत **तेज-प्राण** किंवा **चैतन्य** दृष्टीला पडतें. आतांपर्यंत निद्रित असलेलें जग खडबडून जागें होतें. ते क्षीण व आळस टाकून आतां उत्साहाप्रत धारण करतें. मनुष्यजातच नव्हे तर आतांपर्यंत अंध व स्तब्ध असलेले पक्षी पुन्हा हुशार होतात. त्यांना दृष्टि प्राप्त होते. प्रातःकाळच्या अनुपम व उल्हासदायक सौंदर्यानें त्यांचें हृदय हर्षभरित होतें. ते जगन्नियंत्या परमेश्वराचे भक्तिपूर्वक गुणानुवाद गाण्याकरितांच जणूंकाय गुंजारव करूं लागतात. सृष्टींत जिकडे तिकडे असाच प्रकार चाललेला दृष्टीला

पडतो. सूर्योदय झाल्यापासून जगांत एक प्रकारचा **प्राणसंचार** झालेला दृष्टीला पडतो. निदान आतांवर स्थितावस्थेंत किंवा निद्रावस्थेंत असलेल्या प्राणाचें पुनर्ज्जीवन किंवा पुनर्च्चालन झालेलें दृष्टीला पडतें. साधारणतः तोच प्रकार कोणाहि अर्भकाच्या जन्मास लागू पडतो. ज्यास आपण लग्न म्हणतों त्यानें म्हणजे कुंडलीच्या पूर्व दिशेनें प्रथम स्थाननामेंवर दिलेलें तत्त्व सांसर्गिक अनुषंगिक व साहचर्य संबंधानें व्यक्त होतें. म्हणजे जन्मकालच्या लग्नानें, प्रथमस्थानानें, पूर्वस्थ अंशानें (अर्भकोदय) अर्भकांत प्राणसंचार व्यक्त होतो. आतांपर्यंत त्या बालकांत प्राण चैतन्य नव्हतें असें नाहीं. मातृगर्भात वास्तव्य असेतोंपर्यंत त्याला वैयक्तिक असें जगांत (लौकिक) स्थान नव्हतें. वैयक्तिक अस्तित्व दृश्य होतांच जगाच्या वातावरणाशीं संलग्न होतांच मिळतें. वरील कल्पनासानिध्यानें त्याला एव्हांच लौकिक चैतन्य प्राप्त झालें. निदान पूर्व चैतन्याचें पुनर्ज्जीवन किंवा पुनर्च्चालन झालें. पुनर्ज्जन्म झाला. अधिक सयुक्तिक बोलावयाचें म्हणजे त्या चैतन्याचें व चैतन्ययुक्त देहाचें तेव्हांच अस्तित्व प्रस्थापित व प्रसिध्द झालें. तेव्हांपासून त्यांचा प्रभाव प्रादुर्भूत होतो व जगावर परिणाम सुरू होतो. त्याचप्रमाणें अर्भकोदयीं छोटयाशाच कां होईना पण त्या बालकाच्या जगांत त्याच्या कुटुंबांत घरच्या मंडळीला अतिष्टानां आनंद व उल्हास प्राप्त होतो. त्यांच्यांत एक प्रकारचा नवा जोम व चैतन्य संचार दृष्टीस पडतो, आनंदोत्सव होतात. एकंदरीत लग्न हें प्राणाचें चैतन्याचें देहाचें व जन्माचें द्योतक आहे.

आतां दशमस्थानाचा विचार कर्तव्य असल्यामुळें माध्यान्ह समयाच्या सूर्याकडे व सृष्टिसौंदर्याकडे पहा. ह्या वेळीं जिकडे तिकडे चक्क प्रकाश पडलेला असतो. नभोमंडलांत श्री सूर्यनारायण मध्यभागीं स्थानापन्न

झालेला असतो. त्या वेळेस तो आपल्या परमदीप्तींत--कांतीच्या पूर्ण वैभवांत विराजमान असलेला दृष्टीस पडतो. त्याचें तेज अत्यंत दैदिप्यामान व प्रखर असतें. कोणत्याही खगोलस्थ गोलाची त्या वेळेस प्रौढी चालू शकत नाहीं, तो त्या वेळेस सर्व नभोमंडलांत सार्वभौम असतो. आणि पृथ्वीच्या ज्या ज्या भागांत त्याचें हें प्रभुत्व दिसतें तेथें चैतन्य दृष्टीस पडतें. ह्या वेळेस उदरंभरणाच्या-उपजीविकेच्या व व्यवसायाच्या गोष्टींमध्यें लोक गुंतलेले असतात, व त्यानिमित्त श्रम करतात. जिकडे तिकडे गडबड व धडपड चाललेली असते. म्हणजे या समयास कर्म-क्रिया कार्यानें म्हणजे कर्तृत्वानें दशदिशा दुमदुमून गेलेल्या असतात. हा वेळ अर्थात महत्वाचा आहे. वर निर्दिष्ट केलेल्या कल्पनासरणीवरून असें वाटणें साहजिक आहे कीं कुंडलींत ज्या स्थानानें माध्यान्ह दर्शविला जातो त्या स्थानांत माध्यान्ह सूर्याश्रित कारकत्व असलें पाहिजे. दशमस्थान हें कुंडलींतील माध्यान्ह स्थान होय. (कारण दशमस्थ सूर्य माध्यान्ह दर्शवितो) त्याचें कारकत्व माध्यान्ह सूर्याश्रित गुणधर्माचे आहे. हें मागें केलेल्या विवेचनावरून वाचकांच्या ध्यानांत स्पष्टपणें आलेंच असेल. नभोमंडलांतील सूर्यबिंबाचें वैभव, त्याचें प्रभुत्व, जगांत चाललेलें कर्तृत्व इत्यादि गोष्टी दशमाच्या वैभवाचीं, प्रभुत्वाचीं, राज्यभुवनाचीं, उद्योगधंद्याचीं व कर्तृत्वशक्तीचीं पूर्ण द्योतक चिन्हें आहेत यांत शंका नाहीं. पुन्हां सूर्य व सृष्टि ह्यांत जो कार्यकारणसंबंध आहे तोच जन्मलेल्या व्यक्तीचा जगाशीं असल्यामुळें हें कारकत्व दोघांसहि लागू पडतें. कारण तो व्यक्ति स्वतःच्या वैभवानें, कर्तृत्व शक्तीनें स्वतःच्या समूहांत, समाजांत, अगर देशांत देशाचें वैभव व कर्तृत्व उत्पन्न करूं शकते. समाजाचें व देशाचें वैभव व कर्तृत्व त्याच्या घटकांच्या वैभवाचें व कर्तृत्वाचें

परिणाम बेरोज असल्यामुळें, घटकांच्या त्यांतील मनुष्यांच्या दशमस्थानावर अवलंबून राहील हे सांगावयास नकोच.

कारकत्वापैकीं वर नमूद न झालेल्या एका गोष्टीविषयीं जातां जातां विचार करणें अवश्य दिसतें. दशमावरून पित्याचा बोध होतो आणि तो कां ? विचार केला असतां असें दिसून येतें कीं मुलगा पुढें कसा निपजेल हें बहुधा पित्यावर अवलंबून असतें अशी निदान व्यावहारिक दृष्टि तरी आहे. तो नेभळट होणार कीं कर्तृत्ववान होणार, निरक्षर होणार कीं विद्यासंपन्न, त्याचें कर्मक्षेत्र कसें रहाणार इत्यादि व्यवसायादि गोष्टी पित्यानें दिलेल्या शिक्षणावर, वळणावर व स्वतः पित्याच्या अंगच्या गुणांवर अवलंबून असतें. जें कार्य व्यक्त करतें तेंच थोडेबहुत कारणही व्यक्त करूं शकतें व म्हणूनच दशमस्थानाचा पित्याशीं संबंध आसावा.

असो, वर जें कांहीं दिलें तें सिध्दांत म्हणून दिलें नाहीं किंवा दशमाचा माध्यान्ह सूर्य व सृष्टिस्वरूपाशीं असाच कांहीं संबंध निश्चित असला पाहिजे म्हणून दिलें नाहीं. पण ह्या नैसर्गिक साम्यावर विचार करण्यास जागा मिळते व त्या साम्यावर विचार थोडेबहुत झाले असून त्यांचा अनुभवहि आलेला आहे. म्हणून त्याविषयीं ऊहापोह केला आहे. कदाचित निसर्गांत हें साम्य सिध्दांत म्हणूनच वसत असेल. पण सध्यां एवढेंच सांगणें पुरें होईल कीं ह्या कल्पनेवर चालल्यास विचार करण्यास बरेंच मोठें क्षेत्र तयार होतें व त्याचा उपयोग जरूर केला पाहिजे.

सबसाधारणतः दशमस्थानांतील ग्रह, मग तो शुभ असो किंवा पापग्रह असो, मनुष्यास कोणत्याना कोणत्या प्रकारें प्रसिध्दीस आणतोच. सामान्य जनतेच्या समाज व कार्य क्षेत्रापेक्षां दशमस्थानीं ग्रह असणाऱ्या

मनुष्याचें समाज व कार्यक्षेत्र अधिक विस्तृत असतें. त्याच प्रमाणें त्याचा उद्योगधंदा व व्यवसाय अधिक महत्वाचा असतो. उद्योगधंदा कोणता असेल हें दशमस्थग्रहांच्या व राशींच्या त्याचप्रमाणें दशमेशाच्या कारकत्वावर अवलंबून असतें याविषयीं पुढें विचार करण्यांत येईलच. ज्याच्या ठायीं महत्वाकांक्षा वसत असून कर्तृत्वशक्तिहि पण भरभक्कम असते त्याचा राजदरबाराशीं, (राजकीय गोष्टीशी) राजसत्तेशीं निदान राजाधिकाऱ्यांशीं थोडाबहुत तरी संबंध येत असतो. राजसत्ता किंवा अधिकारप्राप्तीला दशमस्थ ग्रहांशीं, दशम बिंदुशीं किंवा दशमेशाशी रवीचा किंवा मंगळाचा संबंध बहुतेक असावा लागतो. दशमांत शुभ ग्रह असल्यास हातून घडणारीं कृत्यें (व धंदे सुध्दां) शुभ व सात्विक असतात; व त्यांच्या मागें सदिच्छा असते, पापग्रहांविषयीं तसें असेलच असें म्हणतां येत नाहीं. त्याच्या फलांत प्रपंच्याचा, ऐहिक सुखेच्छेचा, स्वार्थाचा थोडाबहुत तरी मायेचा, कपट युक्तीचा, आडमार्गाचा पगडा बसलेला असतो. पापग्रहांच्या वास्तव्यामुळें दशमाच्या कार्यकत्वांत खडतरपणा येऊं पहातो व पितृसुखांत लवकरच व्यत्यय येतो.

अर्थात वरील फलें राशी व दृष्टिविचारविरहित दिलीं आहेत. ग्रहांच्या दृष्टीचा विचार केला असतां, दिलेल्या फलांत न्यूनाधिक्य होतें. ग्रह शुभ असो किंवा अशुभ असो त्याची दशमस्थ ग्रहावर* शुभ दृष्टि (६० किंवा १२०

*असला शब्दप्रयोग आला असतां त्यांत पर्यायानें दशमेशाचा व दशमबिंदूचा अंतर्भाव होतो असें समजावें. अर्थात त्यांचीं फलें थोडी गौण असतात. ३० अंशांची दृष्टिही अशीच पण थोडी गौण. ग्रहांच्या दृष्टींच्या फलादेशाचा विचार श्रीयुत य. के. प्रधानकृत जातक मार्गोपदेशिका खंड १ ला या पुस्तकामध्यें उत्तम तऱ्हेनें केलेला आहे तो पहावा. ही वर्णन केलेली स्थिति शुभ संबंध ठेवणारे ग्रह पन्हां गोचरीनें शुभ संबंध करतांना व विशेषतः दिन वर्ष पध्दतीनें तेच किंवा तत्सम शुभयोग चालू असतां प्राप्त करून देतात.

अंशांची) असेल तर वर दिलेलीं फलें अधिक तीव्र व शुभ होतात. असा मनुष्य कोणत्याहि परिस्थितींत उत्पन्न होवो तो उन्नत दिशेस व नांव लौकिकास पोहंचल्याशिवाय राहात नाहीं. त्याच्या हातून जबाबदारीचीं व महत्त्वपूर्ण कार्यें घडतात व त्याचें नांव चिरंजीव होतें. समाजांत, देशांत अगर राजदरबारांत व राजकरणांत पुढारीपणा मिळतो व बहुमान प्राप्त होतो व ह्या गोष्टींशी त्याचानिकठ संबंध येऊन परिस्थित्यनुरूप लोकहिताचीं कार्यें त्याच्या हातून घडतात, त्याचा उद्योगधंदा पूर्ण भरभराटित व सुखदायक असा चालतो. जितके शुभ संबंध जास्त तितकें शुभत्व व श्रेष्ठत्व जास्त. दशमांत शुभग्रह असून इतर ग्रह त्यांच्याशीं शुभ संबंध ठेवीत असल्यास अशा मनुष्याच्या हातून पापकर्म घडणें अशक्य होतें.

दशमस्थ ग्रहावर कोणत्याहि ग्रहाची पापदृष्टि (९०,४५,१३५ १५० किंवा १८० अंशांची) असल्यास दशमाच्या कारकत्वाच्या मार्गात हजारो अडचणी येतात. पितृसुख चांगलें मिळत नाहीं. वेळोवेळीं उद्योगधंद्यांत, हातीं घेतलेल्या कार्यांत, राजदरबारांत अथवा राजकारणांत चिंतामग्न स्थिति प्राप्त होते. वारंवार संकटें येतात, अब्रूची नासाडी होऊं पहातें; व कधीं कधीं अधःपतन होतें. राशीबल चांगलें असलें तरी शुभपरिस्थिति स्थिरस्वभावी नसते, मनुष्य प्रसिध्द होईल, महत्वाचीं कामें करील पण मार्ग सकंटक राहील महात्वाकांक्षा पूर्णपणें सिध्दिस जात नाहीं. उद्योगधंदा बसूं पाहतो. कार्यक्षेत्र संकुचित करावें लागतें, माघार घ्यावी लागते. अनिष्ट योगामुळें मनुष्याचें मन कुमार्गाकडे धांव घेऊं पहातें. असा काल वरीलप्रमाणें गोचरीनें व विशेषतः दिनवर्षपध्दतीनें अशुभ योग होत असतां प्राप्त होतो.

दशमस्थ ग्रह शुभ व पापसंबंध ठेवणारा पापग्रह असल्यास मनुष्याकडून पापकर्में घडल्यास तीं विलक्षण बिकट स्थितीमुळें घडतात. जाणून बुजून क्वचित, बहुधा अशा लोकांवर दुसऱ्यांच्या कृतीमुळें संकटें येतात. पण दोन्हीं प्रकारचे ग्रह पापग्रह असल्यास (किंवहुना दृष्टि ठेवणारा ग्रह शुभ असला तरी) मनुष्य स्वभावतःच पापकर्मी असेल व नानाप्रकारचीं अघोर कृत्यें करण्यास तत्पर होईल. त्याच्यावर येणारी संकटें स्वकृतीचींच फलें बहुतेक असतात. अशा ग्रहयोगांचा पुरुष जरी प्रसिध्द व पराक्रमी असला तरी त्याचें कार्यक्षेत्र व नैतिक आचरण बहुधा किळसवाणें निदान आध्यात्मिक ध्येयावेगळें असतें.

दशमस्थ व संबंध ठेवणाऱ्या ग्रहांचें राशिबल व स्थानाधिपत्यहि फलांचा पूर्ण विचार करतांना लक्षांत घेतलें पाहिजे. अधिपत्य ज्या स्थानाचें असेल त्या स्थानाच्या कारकत्वाच्या अनुरोधनानें शुभ किंवा अशुभ फलें प्राप्त होतात. उदाहरणार्थ दशमस्थ ग्रहावर षष्ठेशाची पापदृष्टि असल्यास दशमाच्या कारकत्वांत विघात करण्यास शरीर प्रकृति, शत्रु किंवा हाताखालचा माणूस कारण होऊं शकेल. तसेंच दशमेश कोणत्या स्थानांत आहे यावरूनहि असाच बोध होतो. उदाहरणार्थ दशमेश धनस्थानांत असल्यास किंवा त्याचा धनेशाबरोबर शुभ संबंध असल्यास उद्योगधंद्यांत चांगली मिळकत होईल वगैरे वगैरे.

राशीविषयीं सांगावयाचें म्हणजे एवढेंच पुरें होईल कीं दशमस्थ राशीप्रमाणें मनुष्याचें कार्यक्षेत्र राजस, तामस किंवा सात्विक असते. दशमकेन्द्रावर चरराशि--मेष--कर्क--तुला व मकर--उदय पावत असतां मनुष्य उत्साही, पुढें येणारा, महत्वाकांक्षी, धाडशी पण लहरी व अस्थिर असतो. द्विस्वभाव राशि----मिथुन--कन्या--धनु व मीन--उदय पावत असतां तो

बौध्दिक व सात्विक असलेला पाहण्यास मिळेल. स्थिर राशि--वृषभ, सिंह, वृश्चिक व कुंभ--दशमकेन्द्रावर उदय पावत असतां त्याच्यांत धिम्मेपणा पण विलक्षण चिकाटी दिसून येईल. या चर, स्थिर व द्विस्वभाव इत्यादि राशींचे स्वभावधर्मांबरोबर आणखी दशम केन्द्रावर उदय पावणारी राशि कोणत्या तत्त्वाची--अग्नि, वायु, जल, व पृथ्वी यांची सांगड घालून व ग्रहांचें कारकत्व लक्षांत घेतलें असतां जन्म पावणाऱ्या प्राण्याचें कार्यक्षेत्र सामाजिक असेल कीं राजकीय असेल कीं स्वार्थी कीं परार्थी, व्यवसाय कोणता असेल वगैरे गोष्टींचा फारच सुक्ष्मतेनें विचार करतां येईल.

काल निर्णयाविषयीं वर थोडेंसें सांगितलें आहे. दशमाविषयीं **दिनवर्षपद्धतीची** सोपी युक्ति आहे. तो अशी---दशम उदित बिंदु दरवर्षी एक अंश चालतो. याप्रमाणें दशम चलित करून ज्या वर्षी तो जन्मस्थ ग्रहांशीं शुभयोग करील त्यावर्षी दशमविषयक शुभ फलें मिळतात. उलटप्रकार (अशुभ योग) झाला असतां उलट फलें मिळतात. जन्मतः दशमाशीं शुभ अथवा अशुभ संबंध ठेवणाऱ्या ग्रहांशी पुन्हा दशम शुभ अथवा अशुभ योग करूं लागला म्हणजे तसलीं फलें निश्चयें करून अति तीव्रपणानें मिळतात.

दशमेशाचे लग्न, पंचम व नवम या स्थानांच्या अधिपतीबरोबर होणारे योग उन्नति व राजयोगकारक व भाग्यवर्धक असतात. लग्नेश-दशमेशाची युति किंवा शुभयोग राजकीय वातावरणांत किंवा राजदरबारांत महत्व देतात. कायदे कौन्सिलांतील सभासदांच्या कुंडलींत हे योग सांपडतील. तसेच पर्यायानें इतर गोष्टींचे समजावे. लग्नकुंडलीच्या दशमस्थानांवरून जसा विचार करतात तसाच चंद्राच्या व रवीच्या दशमस्थानांवरूनही केला पाहिजे. उदाहरणार्थ रवीच्या दशमांत शनि असल्यास धंदा नोट न

चालून भयंकर त्रास होईल व तो बदलेल हे धंदे बदलण्यास दशमांतील एका पेक्षां अधिक ग्रहहि कारणीभूत होतात. धनोत्पादक व सरकारी नोकरीचे किंवा सरकाराकडून लाभदायक योग दशमाच्या धनस्थानावरून म्हणजे कुंडलीचे एकादशस्थानावरून किंवा लाभस्थानांतील ग्रहांच्या किंवा त्या स्थानाच्या अधिपाच्या वास्तव्यानें दर्शविले जातात. दशमस्थानाशी संबंध न ठेवणारे असे रवि हर्शल, गुरु शनि इत्यादि जोड्यांचे शुभयोग दशम कारक शुभ फलें देतात. शेवटीं हेंहि लक्षांत ठेविलें पाहिजे कीं द्वितीय व षष्ठस्थानांतील ग्रह आपापल्यावरी निरनिराळें धंदे दर्शवितात.

असो. सांगावयाचें एवढेंच कीं दशमाचा विचार करतांना इतर योगही लक्षांत घेतलें पाहिजेत व त्यांतले त्यांत दशमस्थानावरील उदित अंश व त्याचेबरोबर होणारे ग्रहांचे दृष्टियोग, दशमांतील ग्रह व दशमेश यांकडे फार चांगलें लक्ष दिलें पाहिजे.

———:o:———

पुरुषार्थ

स्वधर्माची जागृति करून स्वतःच्या पुरुषार्थानें आपली उन्नति करून घेण्याचे निश्चित मार्ग दाखवणारें मासिक. या मासिकामुळें आरोग्य वाढवणारे सुगम योगसाधनाचे मार्गही दाखवले जातात. याच्या योगानें हजारों माणसांनीं आपलें आरोग्य वाढवलें आहे. वार्षिक वर्गणी म. आ नें २ रु. व व्ही. पी. नें २॥ रु. नमुन्याचा अंक मागवा.

श्रीपाद दामोदर सातवळेकर.

स्वाध्याय मंडळ औंध [जि. सातारा]

परिभ्रमण पद्धतीचा अभ्यास

जन्मकुंडलीवरून पुढील घडणाऱ्या गोष्टींच्या कालाचें अचुक निदान कसें करावें या विषयाकडे ज्योतिष शास्त्राच्या उत्पत्तीबरोबरच ज्योतिर्विदांचें लक्ष लागलें असलें पाहिजे. कालनिर्णयाच्या अचुक पध्दतीखेरीज ज्योतिषशास्त्र लंगडें भासतें. जन्मकुंडलींत दृष्टोत्पत्तीस येणारे योग केव्हां फलद्रुप होतील हें जाणणें अत्यंत महत्वाचें आहे परंतु तें तितकेंच बिकट आहे. याकरितां अनेक प्रकारच्या दशा, ताजोक, गोचरी पाश्च्यात्यांच्या डायरेक्शन पद्धति वगैरे नानाप्रकार फलज्योतिष शास्त्रांत उत्पन्न झाले असून अझूनदेखील हें कोडें सुटलें आहे किंवा नाहीं असेच बिचारी ज्योतिर्विदांना वाटत आहे. कै. जिवनरावजी यांनीं त्या वेळीं जीं जीं मतें प्रचलित होतीं तीं सर्व पाहून सुलभ व सहज भविष्यकथन कसें करितां येईल याचा विचार करून एक पध्दति बसाविली. तोच हा **परिभ्रमण पद्धति** होय. कै. जिवनरावजीचे पुढें ज्या पध्दति होत्या त्यापेक्षां आतां विशेष आणखी कांहीं महत्वाच्या गोष्टी यूरोपीयन ज्योतिष शास्त्रांत किंवा आपल्याकडे निर्माण झाल्या आहेत असें मुळीच नाहीं. जी कांहीं यूरोपीयन ज्योतिष शास्त्रामध्यें या विभागाचा वाढ झालेली आहे तो फक्त विशेष स्पष्टीकरण, त्यासंबंधानें विचारविनिमय व स्वतंत्र ग्रंथरचना, हेंच होय. त्या वेळीं ज्या कांहीं गोष्टींचा नुसती कल्पना आलेली होती त्या गोष्टींना आतां अनुभवाची जोड मिळून पूर्णस्वरूप प्राप्त झालेलें आहे. यच्या उलट आमचेकडे प्रकार दिसत आहे. कै. चिटणिसांना सुचलेली पध्दति त्यांनीं उघडपणें आपल्या जुन्या ज्योतिर्मालेंतून व इतर वर्तमानपत्रांतून पुढें मांडली परंतु त्यासंबंधानें विशेष अभ्यास करून अनुभव घेण्याचें काम कोणाही ज्योतिर्विदाचे हातून झालेलें दिसत नाहीं. उलट गणभास्कर नवाभ्यासारख्या

प्रगमनशील ज्योतिष्याला ही पध्दति कंथा व भांजणी वाटत आहे. कै. जीवनरावजी व गुरुबंधु रा. रा. लक्ष्मण बाळकृष्ण राजे हे एकटया परिभ्रमण पध्दतीच्या साह्यानें किती अचुक भविष्य करीत असत याची कल्पना भराभर वर्णनानें खास होणार नाहीं. हल्लीं आम्हला व श्रीयुत रामनारयण यांना या पध्दतीच्या मूळ स्वरूपाची मूळ उत्पादकापासून माहितो असून मदतीला पाश्च्यात्य ज्योतिषशास्त्रामधील पध्दतीचें ज्ञान असून देखील त्यांचे तोडीचें भविष्य करितां येईल किंवा नाहीं अशी शंका वारंवार येते. प्रांजलपणानें म्हणावयाचें असतां ज्या कित्येक गोष्टींचा डायरेक्शननें बोध होत नाहीं त्या गोष्टींचा झटकन मेळ परिभ्रमण पध्दतीनें घालतां येतो व याला अनुभवच घेतला पाहिजे. गणिताचा व उपकरणाचा विशेष खटाटोप नसतांनाही पध्दति फारच अचुक अनुभव देतें. कै. जिवनरावजी यांचे येथें रविवारीं ज्योतिषशास्त्राचें आकंठ अन्नदान होत असे; त्या वेळीं अनेक कुंडल्यांचे ते भराभर नुसतो कुंडली हातामध्यें धरून वर्ष महिने वार व पुष्कळ प्रसंगीं तारीख वार अचुक भविष्य सांगत असत. ही स्थिति अझूनपर्यंत आमच्यापैकीं पुष्कळांस साध्य करून घ्यावयाचा आहे. जन्मकुंडली मांडून घेतल्यानंतर डायरेक्शन काढणाऱ्यांना दिनवर्ष पध्दतीचेंच कां होईना काय योग होत आहेत वगैरे वगैरे बद्दल रॅकेलचें पंचांग घेऊन ते ते योग ठरवावे लागतात. दिनवर्ष पध्दतीचे गणित फार सोपें आहे व ते सर्वांस करितां येण्यासारखें असून जन्मकालचे पंचांग हातामध्यें घेतलें असतां सहज एखाद्याला अमक्या वर्षी अमक्या महिन्यांत असे योग झाले याचें गणित करितां यईल, परंतु त्याचे फल काय ? व मिळावयाच्या फलाचा परिणाम अमुकच अमक्या गोष्टीसंबंधांत होईल असें सांगतांना काय त्रेधा तिरपिट उडते याची कल्पना अनुभवाखेरीज होणार नाहीं. जंद्राच्या

दृष्टियोगानें उत्पन्न होणारीं फलें निश्चित त्याकाळीं न मिळतां पुढें मागें चार चार महिने कां होतात, या गूढाचें कोडें सोडविण्याचा पाश्च्यात्य ज्योतिर्विदांचा अझून कसून प्रयत्न चालूं आहे. एखाद्या योगानें उत्पन्न होणारे फल शुभ आहे किंवा अशुभ आहे एवढें समजल्यानें भविष्य कालनिर्णय करण्याची तहान भागत नाहीं. अमुक योगाचें फल काय मिळेल या संबंधानें पाश्चात्य ज्योतिर्विदांनीं निदान केलेलें आहे. परंतु एका योगाखालीं दिलेल्या दहापांच फलांपैकीं पुढें आलेल्या कुंडलीला अमुकच फल अमुक काळीं मिळालें पाहिजे व तें याच वेळीं मिळेल हें सांगण्याचें काम फारच बिकट आहे व आज मो मो म्हणविणाऱ्या ज्योतिर्विदांची त्रेधा उडत आहे. याचे उलट आम्हांला कैलासवासी चिटणिसांचा अनुभव आहे. ते आपल्या सायक्लिक सिस्टिमनें----परिभ्रमण पध्दतीनें अचुक बदली केव्हां होईल, मृत्यु केव्हां होईल, पुत्र केव्हां होईल वढती केव्हां होईल, सांपत्तिक लाभ केव्हां घडतील, आजार केव्हां व कोणत्या महिन्यांत येतील वगैरे एकना हजार गोष्टींचा स्पष्ट रीतीनें उल्लेख करीत असत. आमच्यापैकीं पुष्कळांना मृत्यु अज्ञ वाटतो, भावंडांची संख्या कळत नाहीं. पुत्र किंवा कन्या किती होतील हेंही कळत नाहीं. अशा एक ना दोन अनेक गोष्टी कळत नाहीत. अशा वेळीं सन १९२१।२२ मध्यें जयमहाल पॅलेसमध्यें आमच्या समक्ष एका ज्योतिर्विदांना श्रीमंत सौ. चिमणाबाई साहेब गायकवाड यांनी सहजलीलेनें वरील विधानें श्रवण केल्यानंतर एक प्रश्न केला. "मग ज्योतिषशास्त्रानें कळविलें तरी काय ?" त्याची वारंवार आठवण होते. सर्वच गोष्टी संबंधानें निश्चित कसें सांगतां येत नाहीं मग ज्योतिषशास्त्रानें कळतें तरी काय व ज्योतिषशास्त्राचा अवतार कशा करितां ? जेथें आमच्यातील शेकडा

६०।७० टक्के ज्योतिषांची मदार गोचरीवर म्हणजे हल्लीं-ज्योतिर्विद् नवाथे वगैरे नवमतप्रवर्तक ज्योतिषी किंवा आंग्ल ज्योतिर्विद् ज्या पध्दतीला गोचर पध्दति म्हणतात ती नव्हे तर राशीला किंवा फार झालें तर लग्नाला चवथा, सहावा, आठवा, बारावा ग्रह आहे हें पाहून किंवा साडेसाती लागली आहे ही बोंब मारून ग्रहांच्या जपजाप्याचे पिंड वळणाऱ्या भिक्षुकी ज्योतिर्विदांना नवीन कल्पना सुचणें किंवा नवीन मार्ग रेखाटला गेला असतां त्या मार्गानें जाण्याचा प्रयत्न करून अनुभव घेण्याचें धाडसच करवत नाहीं. व ज्याठिकाणी विशिष्ट ठिकाणाच्या लोकाखेरीज किंवा विशिष्ट संस्थेमधल्या पंक्ति बारगिरांखेरीज इतरत्र सर्व अंधःकार आहे असें मानण्याचा प्रघात रुढ आहे त्या महाराष्ट्रांत ज्योतिषशास्त्रामध्यें विशेष शोध लागतील ही आशाच करणें वेडेपणाचें आहे. इतकेंच नव्हे तर आंग्ल ज्योतिर्विद् गोचर पध्दतीचा (Transits of Planets) उपयोग कसा करीत आहेत याचा पूर्ण अभ्यास न करतां किंवा त्यांच्यामध्यें असलेल्या पध्दतींचा विचार करण्याचें सोडून माझाच कायतो बाब्या व इतरांचा काय तो कार्टा अशी स्थिति आमच्या गणभास्कर नवाथ्यासारख्या प्रगमनशील ज्योतिर्विदाची झालेली आहे. दशा खोट्या, तात्निक खोटें व सर्व आर्य ग्रंथकारांनीं वर्णन केलेलें प्रकार खोटे अशी अरेरावी गर्जना मोठ्या अटट्हासानें करून त्यांनीं अंमलांत आणण्याचा प्रयत्न केलेली गोचर पध्दतीच कायतो खरी असें भासविण्याचा प्रयत्न आजपर्यंत आपल्या कुंडलीविज्ञान मासिकामधून केला आहे व ही पध्दति किती खरी आहे याची साक्ष त्याचा फलादेश देत आहे. श्रीयुत रामनारायण यांचें परिभ्रमण पध्दतीच्या पुस्तकाचें परिक्षण करितांना " हर्शल " च्या एप्रिल १९२५

च्या अंकामध्यें " शास्त्रे वादभयम् " या मथाळ्याखालीं जो गणकभास्करांचा एक लेख आलेला आहे तो फारच बहारीचा आहे. गणभास्कर नवाथ्यांना स्वतःच्या खेरीज दुसऱ्या ज्योतिर्विदांना अक्कलच नाहीं असें भासत असून ज्या कांहीं नवीन कल्पना किंवा पध्दति वगैरे सुचावयाच्या आहेत त्या त्यांनाच असें वाटत असतें. व ते जो काय धरसोडीचीं विधानें करतील व नवीन शोध लावतील त्यांना एक जात इतर ज्योतिषांनीं माना डुलवाव्यात असें वाटत असतें. कै. चिटणिसांची परिभ्रमण पध्दति व पाश्चात्यांच्या इतर पध्दति त्यांचेपुढें असतां त्यांनीं त्याचा मुळींच अभ्यास केला नाहीं याचें खूळ वरील त्यांच्या हट्टातच आहे. वरील विधान हें आम्ही कांहींतरी करतों असें नव्हे तर तें आम्हीं त्यांच्या गेल्या १५ वर्षांत घडलेल्या सहवासानें करीत आहों. परिभ्रमण पध्दतीचा त्यांनीं अनुभव न घेतां खरपूस समाचार वर दर्शविलेल्या लेखांत घेतला आहे **असाच समाचार त्यांना अनुभव घेऊन पाश्चात्यांच्या दिनवर्ष पद्धतीचा घेणें आहे.** परंतु समाचार घेतेवेळीं आमच्या भविष्याप्रमाणें ते दिनवर्ष पध्दतीचे दासानुदास न बनोत म्हणजे मिळविली.

असाच एक लेख श्रीयुत ज. स. करंदीकर यांनीं केसरीमध्यें परिभ्रमण पध्दतीवर लिहिलेला आहे. श्रीयुत करंदीकर यांचा लेख म्हणजे नवाथ्यांच्या लेखाचा प्रतिध्वनी होय. व श्रीयुत करंदीकर यांचें ज्योतिषशास्त्रांचें ज्ञान म्हणजे अकटोपासून विकटोपर्यंतचेंच अध्ययन !! केसरीच्या संपादकीय खुर्चीवर बसले म्हणजे कांहीं बृहस्पती होतां येत नाहीं व सर्व शास्त्रें व विद्या मुखोद्गत होत नाहींत. श्रीयुत करंदीकरांना आणखी एक तप ज्योतिषशास्त्राचें अध्ययन एखाद्या चांगल्या गुरूचे हाताखालीं केल्याखेरीज त्यांना या शास्त्रामध्यें विशेष कांहीं कळेल असें वाटत नाहीं.

ते अझून राशि गोचरी खरी का लग्नाला साडेसाती लागते ती खरी याच भानगडींत आहेत !! प्रस्तुतच्या लेखांत आम्हांला आक्षेपकांना उत्तरें देण्याचें मुळींच कारण दिसत नाहीं व त्या कार्याकरितां व्यर्थ मालेची पानें खर्च करण्यापेक्षां कैं. चिटणीस वगैरे मंडळीनीं परिभ्रमण पध्दतीला धरून जीं जीं भविष्यें वर्तविलीं व जीं आमचे संग्रहीं आहेत तीं मालेच्या वाचकापुढें अभ्यासाकरितां मांडीत आहोंत. परिभ्रमणपध्दति खरी कां खोटी किंवा गोचर पध्दति खरी याचा वाचकांनींच अनुभवानें निर्णय करावा. ज्या तत्त्वानें श्रीयुत नवाथे यांना आणखी दशा निर्माण करून दशा पध्दतीची टर करतां येते त्याच न्यायानें त्यांच्या अंगिरस पध्दतीच्या अंगभूत तत्त्वानें दुसऱ्या आणखी नऊ ग्रहांच्या नऊ पध्दति निर्माण करितां येतात. कोणत्याहि पध्दतीनें जर शेकडा २५ टक्के भविष्य मिळावयाचें असेल व याचकरितां फलज्योतिषशास्त्राचा अवतार असेल तर मुळींच फलज्योतिष शास्त्र या संज्ञेला पात्र होत नाहीं व असल्या निरुपयोगी शास्त्राचें अध्ययन करण्यांत कालाचा व्यय करण्याचें मुळींच कारण नाहीं.

—संपादक—

तारीख २२ डिसेंबर १८९३

एस्ट्रालाजिकल मगेझीनचे एडिटर साहेब

मुक्काम लंडन यांस,

मेहेरबान साहेब,

माझे मित्र सहाध्यायी व मुंबई ज्योतिर्विद मंडळाचे एक स्थापन कर्ते दिनकर बलवंत पटवर्धन यांचे निधनाची बातमी मला आज रोजीं तुम्हांला अत्यंत दुःखानें कळवावी लागत आहे. श्रीयुत पटवर्धन यांनीं प्रिन्स ऑफ वेल्स यांचे कुंडलीवर जो लेख पाठविला तो त्यांचा शेवटचाच लेख

अखेरीला ठरला. व या कुंडलीवर विचार करून लेख तयार करीत असतां जे जे विचार उत्पन्न झाले त्यांचा साग्र विचार करीत असतां ते आपले कुंडलीलाकसें काय लागू पडतात व आपला मृत्यु याच नियमानें केव्हां होईल याकडे त्यांचे लक्ष सहज वेधलें व लागलोच त्यांनीं आपल्या मृत्युचे निदान केलें व अत्यंत दुःखाची गोष्ट म्हणजे त्यांनीं ज्या वेळेला आपला मृत्यु ठरविलेला होता त्याच वेळीं तो अखेरीला घडून आला. यासोबत मी श्रीयुत पटवर्धन यांची व त्यांचे मुलाची कुंडली जोडीत आहें व त्यांवर श्रीयुत पटवर्धन यांनीं स्वतः जे जे विचार प्रदर्शित केले होते ते सर्व लिहिण्याचें योजित आहे. तसेंच या कुंडलीचा विचार करीत असतां मी प्रिन्स ऑफ वेल्स यांची कुंडली तुलनात्मक विचार करण्याकरितां घेत आहे. हें सर्व विचार पटवर्धन यांचेच आहेत. आपणांला माहितच असेल कीं या परिभ्रमण पध्दतीचा सध्या आम्ही **दोघेंच** भविष्यें करण्याच्या कामी उपयोग करीत आहों व **फक्त आम्हीं दोन माणसांनींच ही पद्धति संशोधन करून काढलेली आहे;** श्रीयुत पटवर्धन यांनीं तर स्वर्गवास पतकरला असूनही पध्दती आतां सर्वस्वी माझेजवळ आहे. व म्हणूनच माझ्या कैलासवासी मित्रानें जी जी कांहीं वादविवाद करितांना टीका वगैरे केलेली आहे ती सर्व मी सार्वजनिक उपयोगाकरितां आपणांपुढें मांडित आहें. श्रीयुत पटवर्धनाना आपण व मिस्तर लिओ यांचे बद्दल अत्यंत आदर होता. त्यांचे मनातून ॲलन लिओ व ग्रीन या दोघांच्या कुंडल्यांचे वर्णन आर्य ज्योतिष शास्त्रामध्यें सांगितलेल्या पध्दतीप्रमाणें करावयाचें होतें. परंतु परमेश्वरानें त्यांची आयुर्मर्यादा मध्येंच खुंटविली. श्रीयुत पटवर्धनाच्या मरणानें मुंबई ज्योतिर्विद मंडळाचा फारच मोठी हानी झालेली आहे. त्यांची बुध्दी फारच कुशाग्र होती व ते कोणत्याही गोष्टीचा

छाननी फारच मार्मिकतेने करीत असत. स्वभावानें ते फारच मनमिळाऊ असून फलज्योतिष शास्त्रावरील त्यांचे प्रेम अवर्णनीय होते. त्यांच्या या दुःखण्यामध्यें सर्व बडबड अफोरेल, सफारीअल, सायन गणना व परिभ्रमण पध्दती संबंधानें होती त्यांचे एक नातेवाईक एल. एम. ॲन्ड एस असल्या-कारणानें त्यांना शक्य तेवढा औषधोपचार करितां आला: मरणापूर्वी त्यांनीं आपल्या सर्व नातेवाईक व मित्रमंडळींना मी ता. २ डिसेंबर १८९३ रोजीं रात्रीं १० वाजतां मरेन अस सांगुन ठेविलें होतें व त्या दिवशीं सकाळीं ९ वाजतां सर्वांना आपले येथें गोळा केलें होतें. मरणकाळीं त्यांना त्यांच्या वृध्द पित्यासंबंधानें व एकुलत्या एका मुलासं-बंधानें वरेंच दुःख झालें परंतु तें गिळून मला म्हणाले "मी हो मुंबई ज्योतिर्विद मंडळाची संस्था तुझ्या स्वाधीन करून जात आहे व तू या सोसायटीचा अफोरेल व सफारीयल हो व असें म्हणून त्यांनीं रात्रीं ९ वाजून २० मिनिटें झालीं तेव्हां मुंबई येथें कायमचा देह ठेविला. श्रीयुत पटवर्धनाची सांपत्तिक स्थिति मोठीशी चांगलीही नव्हती तशीच अगदी गरीबीची पण नव्हती. पटवर्धनाची दृष्टी साधारण अधुच होती. शार्ट साईट व त्यामुळें डोळ्यासंबंधानें त्यांना वारंवार त्रास होत अस व त्यांना त्यामुळें वारंवार ब्लिस्टर्स मारून घ्यावीं लागत असत.

पटवर्धन यांचा लग्नाधिपति शुक्र असून तो आणखी अष्टमेश आहे व तो पुन्हा अष्टमांत १० अंश असणाऱ्या मिथून राशीचा जो अधिपति बुध त्यानें युक्त आहे. म्हणजे लग्नेश शुक्र हा अष्टमाचा सह-कारी अधिपति जो बुध त्यानें युक्त आहे. अष्टमेशत्व व लग्नेशत्व एकाच ग्रहाकडे म्हणजे शुक्राकडे आल्याकारणानें शुक्राला दोन अधिकार

प्राप्त होत असून त्याला शरीर संभाळण्याचें तसेंच शरीराचा नाश कर-ण्याचेंही काम संभाळावयाचें आहे व हे दोन्ही धर्म एकमेकांविरुध्द असेच असल्यामुळें बुधाकडे सरस्वत अष्टमेशत्वाचा किंवा शुक्राच्या मदतीनें नाश करण्याचा अधिकार दिला असतां तो विशेष सयुक्तिक होईल.



वर दर्शविल्याप्रमाणें लग्नेश शुक्र व अष्टमेश बुध हे जन्मकुंड-लीचे षष्ट स्थानांत म्हणजे रोग व आजार दर्शविणाऱ्या स्थानामध्यें लग्ना-धिपति व अष्टमाधिपति पडलेले आहेत. हिंदु ज्योतिषशास्त्राप्रमाणें लग्ना-धिपतीचा षष्ट, अष्टम किंवा व्ययस्थानांत त्यांचे अधिपतींबरोबर या

कुंडलीमध्यें घडला आहे असा योग अल्पायुषत्व निश्चयानें दर्शविणारा मानला गेला आहे. सर्वसाधारण ज्योतिर्विदांच्या मतानें अल्पायूची मर्यादा तीशीच्या सुमारापर्यंत धरतां येते; मध्यमायूची ७० पर्यंत व पूर्णायूची १०० ते १२५ वर्षांपर्यंतची मर्यादा कुंडलीमध्यें होणाऱ्या ग्रहांच्या बलाप्रमाणें व त्यांच्या योगाप्रमाणें मानण्याचा प्रवात आहे. पटवर्धन यांचे कुंडलीमध्यें आत्मकारक--जीवनकारक जो रवि तो मीन या जल तत्वाच्या राशीमध्यें आहे. रवीमध्यें असलेली उष्णता किंवा त्याचेमुळें मिळणारा जीवन शक्ति ही तो जेव्हां जेव्हां जलराशीमध्यें कुंडलीमध्यें आढळतो तेव्हां कमीच प्रमाणांत देतो. उष्णता देणारा ग्रह जो रवि तो शितता उत्पन्न करणारा ग्रह जो शनि त्याचेबरोबर प्रातियोग करीत आहे. मनाचा कारक ग्रह जो चंद्र तो मंगळाच्या गृहांत म्हणजे मेषराशीमध्यें असून तो आपले राशीचा अधिपति जो ग्रह मगळ त्याच्याबरोबर केंद्रयोग किंवा गुप्त वैरादृष्टियोग करीत आहे. हा चंद्र मंगळाचा केंन्द्रयोग शरिरामधील उष्णता पुष्कळच नाश करीत आहे किंवा खर्ची पाडीत आहे. शुभ ग्रह शिरोमणी असा जो गुरु हा षष्टेश असून आपल्या निर्बळक्षेत्रीं पडला असून व्ययस्थानामध्यें अशुभ ग्रहांचा जो राजा शनि त्यानें युक्त झालेला आहे. षष्टेश गुरु व्ययांत आहे व व्ययेश बुध षष्ट स्थानामध्यें आपल्या निर्बळ क्षेत्रीं आहे; व षष्टेश व व्ययेश याचे म्हणजे बुध गुरूचे स्थानपरत्वें व राशिपरत्वें अन्योन्य क्षेत्रसंबंध होत आहे. या सर्व गोष्टींचा विचार केला असतां ही कुंडली दिर्घायुष्याला नालायक आहे.

तसेंच जन्मकुंडलीमध्यें बुध व शुक्रांचा हर्शलबरोबर केन्द्रयोग होत आहे व आर्युमर्यादेच्या दृष्टीनें हा केन्द्रयोग अल्पायुत्व होण्यास मदत करीत आहे. बुध हा अंत्यशोग्र संस्कार ग्रहण करणारा ग्रह असल्या-

कारणानें तो ज्या ग्रहानें युक्त किंवा दृष्ट होतो त्याचे संस्कार तो ग्रहण करितो; येथें तो अष्टमेश असून पापग्रहानें विध्द (हर्शलनें दृष्ट-बुध केन्द्रयोग हर्शल) झाला असल्याकारणानें तो जेव्हां जेव्हां परिभ्रमणानें लग्नेश शुक्राबरोबर युक्त किंवा शुभसंबंधित नसेल तेव्हां त्यानें हर्शलच्या-प्रजापतीच्या स्वभाव धर्माप्रमाणेंच अशुभ फलें ग्रहण केलेलीं आहेत असेंच अनुभवास आणून देईल.

प्रिन्स ऑफ वेल्स यांचे जन्मकुंडलीमध्यें पटवर्धनांच्या असें निदर्शनास आलें होतें कीं आत्मकारक-रवि-हा वृश्चिक या जलराशीमध्यें होता; परंतु हा रवि उष्णता देणारा ग्रह जो मंगळ त्यानें शुभसंबंधित असल्याकारणानें त्याला चांगलीच मदत मिळत होती. प्रिन्स ऑफवेल्सना तिसाव्या वर्षी जें मोठें दुखणें प्राप्त झालें होतें, त्याचा परिभ्रमण पध्दतीनें विचार करीत असतां पटवर्धनांच्या असें लक्षांत आलें कीं जन्मकाळीं आत्मकारक किंवा चेतना शक्ति देणारा ग्रह रवि हा जलराशींत वृश्चिकेमध्यें असल्यामुळें उष्णतारहित होता व हो त्याचो उष्णता किंवा जीवन शक्ति मंगळानें पूरित केलेली होती अर्थात प्रिन्स ऑफ वेल्स यांचो जीवन शक्ति किंवा प्राणज्योत जन्मकाळीं मंगळानें वाढविलेलो दिसत होतो. व हाच आत्मकारक किंवा जीवन देणारा ग्रह रवि ३० व्या वर्षी परिभ्रमणानें मिथुन राशीमध्यें व षष्टस्थानामध्यें म्हणजे रोग व आजार दर्शविणाऱ्या स्थानामध्यें यत असून जन्मकाळीं प्राणज्योतीला स्थैर्यत्व देणारा अग्नि ग्रह मंगळ हा परिभ्रमणानें कर्क या विरुध्दधर्माचे म्हणजे जलतत्वाचे राशीमध्यें आल्याकारणानें तो बराच उष्णतारहित होऊन प्राणज्योत प्रदीप्त ठेवण्यास लागणारी उष्णता आत्मकारक ग्रहास म्हणजे रवीला पुरविनासा झाला; परंतु याच वेळीं सुदैवानें प्रिन्स ऑफ वेल्स यांचा

लग्नाधिपति गुरू हा लग्नातच स्वगृहीचा येत असल्यामुळें त्यानें मृत्यु-पासून रक्षण केलें. परिभ्रमण पध्दतीनें गुरु हा वर्ष लग्नांतच-सायक्की-कचे लग्नात-येत असून बुध हा धनुराशीचा सप्तमकेंद्रात कोणाकडूनही पीडित न झालेला असा होता. प्रिन्स ऑफ वेल्स यांचे कुंडलोत बुध गुरूच्या घरीं होता व वर्ष प्रवेशकाळीं बुध हा वर्ष लग्नेश होऊन पुन्हा धनुराशीमध्येंच होता. धनुराशीचे स्वामीत्व गुरुकडे असून बुध या राशी-मध्यें निर्बळी असा असून जणू काय गुरूला मृत्युबरोबर झगडावयाचे होते. जरी सुर गुरु परिभ्रमणानें निर्बळ राशीमध्यें येत होता तरी अखेरीला त्यानें मृत्युवर विजय मिळविला. राजेश्री पटवर्धन यांचेही कुंडलीमध्यें आत्म-कारक रवि हा मीन या जल राशीमध्यें असून तोहीपण प्रिन्स ऑफ वेल्सच्या कुंडलीसारखाच मंगळाबरोबर शुभसंबंधित आहे. मंगळ रवीचा ६० अंशाचा किंवा तृतीय एकादश--गुप्तस्नेहाचा दृष्टियोग घडत आहे. ज्या ज्या वेळीं पटवर्धन यांचे कुंडलीमध्यें परिभ्रमणानें मंगळ जलराशीमध्यें येत असे त्या त्या वेळीं त्यांची प्रकृति बिघडत असे. या वर्षाचे आरंभीं परिभ्रमणानें रवि आपल्या नीच राशीमध्यें--तुळेमध्यें येत असून नव्हेंबर महिन्याच्या अखेरीला तो वृश्चिक या जल राशीमध्यें येत आहे. व जन्मकाळीं रवीला उष्णता देणारा ग्रह जीवन शक्तिचा ज्योत प्रदिप्त राखणारा ग्रह मंगळ हा परिभ्रमणानें कन्येमध्यें असून तो आत्मकारक ग्रह जो रवि याला जरी तो परिभ्रमणाच्या रवीबरोबर तृतीय एकादश योग करीत आहे तरी मूळच्या जन्मकाळचे रवीवर आल्याकारणाने मुळींच मदत करूं शकत नाहीं. म्हणजे जवळ जवळ असेंच म्हणावें लागतें कीं जन्मकाळीं आत्म्याला किंवा आयुष्याला मदत करणारा मंगळ हा मूळचे रवीवर आल्याकारणानें उलट आयुष्याचा हानीच करीत आहे. जन्मकाळी रवि

शनीचा प्रतियोग होता. तोच शनि परिभ्रमणानें मूळच्या लग्नाच्या उदित अंशावर (तुळा ११ अंश.) येत असून जीवन शक्तीला मदत कर-णाऱ्या मंगळाबरोबर केन्द्रयोग करीत आहे. म्हणजे शनि जो जन्म-लग्नाच्या मूळच्या रवीबरोबर प्रतियोग--प्रत्यक्ष वैरादृष्टियोग करीत आहे त्यानें जीवन शक्ति देणाऱ्या मंगळाबरोबर प्रतियोग केला. म्हणजे उष्णता देणारे किंवा शरीरामध्यें जीवन शक्ति उत्पन्न ठेवणारे दोन ग्रह म्हणजे एक जन्मकालचा रवि व दुसरा परिभ्रमणाचा मंगळ हा शनि भ्रष्ट करीत आहे.

पटवर्धन यांचें ३२ वें वर्ष अष्टमस्थानाचें बसत असून शुक्र व बुध हे या वर्षलग्नाचे अधिपति होत आहेत. जन्मकाळाचा तसाच परिभ्रमण काळचा वर्ष लग्नाधिपति शुक्र हा जन्मकाळच्या षष्ट स्थानाचा दुस्थम अधिपति जो मंगळ त्यानें पीडित होत आहे; म्हणजें मूळ लग्नेश वर्षलग्नेश हे दोन्हीं एकाच वेळीं पीडित होत आहेत. वर्ष लग्नाचा दुस्थम अधिपति बुध हा मूळच्या अष्टम व व्ययस्थानाचा अधिपति आहे. म्हणजे परिभ्रम-णाच्या कुंडलीचा लग्नेशामध्यें जन्मकुंडलीच्या अष्टमेश व व्ययेश यांचा समावेश होत आहे व त्यांच्या दुर्बल क्षेत्रामधून अन्योन्य संबंध घडत असून त्यांची युति मृत्युस्थानामध्यें होत आहे. यावरून आपलें सहज ध्यानांत येईल कीं वर्ष लग्नेश (बुध) हा वर्षकालच्या कुंडलोचा अष्ट-मेश जो गुरु त्यानें युक्त होत आहे. हाच जन्मकाळीं घडणारा योग अल्पायुषत्व देणारा किंवा प्रकृतिविघातक असल्याचें वर प्रथमच सांगि-तलें आहे. परंतु जेव्हां कोणीही यावरील दोन जोड योगांचा विचार करील तेव्हां त्याचे सहज लक्षांत येईल कीं यापेक्षां आणखी आयुष्याचा विघात करणाऱ्या दुसऱ्या योगाची मुळींच आवश्यकता नाहीं, कारण परिभ्रमणानें

उत्पन्न होणारे योगांची फलें मूल जन्मकुंडलीला धरून असतात आणि म्हणूनच मृत्यूनें आपलें काम त्वरित अंमलांत आणलें.

आत्मकारक रवि हा परिभ्रमणानें पटवर्धनाच्या या वर्षाच्या आरंभीं वर्ष कालचे षष्ट स्थानामध्यें येत आहे. आत्मकारक रवि जन्मकुंडलींतही षष्टस्थानामध्येंच आहे. प्रिन्स आफ वेल्स यांचें ३० व्या वर्षी परिभ्रमणाचा रवि जन्मकुंडलीचे षष्ट स्थानामध्यें होता. पटवर्धन यांचे कुंडलीमध्यें जन्मकाळीं षष्टस्थानामध्यें रवि असून तो परिभ्रमणानें वृश्चिक या जल राशीमध्यें येत असून वर्ष कुंडलीचे षष्टांत बसत आहे. षष्ट-स्थानानें दर्शविले जाणाऱ्या व्याधीनें म्हणजे षष्टामध्यें ज्या राशीचा रवि आलेला होता त्याच विकारानें शुक्रवार तारीख २४ नव्हेंबर रोजीं रात्रीं साडेबारा वाजतां पटवर्धन यांचा वृषणामध्यें--अंडकोशामध्यें म्हणजे ज्या विकारानें त्यांचा अखेरी मृत्यु प्राप्त झाला त्या विकाराची सुरवात झाली. श्रीयुत पटवर्धन यांचे कुंडलीमध्यें त्या वर्षामधील तारीख २ नव्हेंबर ते २ डिसेंबर पर्यंत जो महिना येतो त्या महिन्याच्यां मासकुंडलीचे लग्नावर नवमस्थानाच्या प्रारंभी असलेले राशीचे अंश कला उदय पावत आहेत; व मासकुंडलीमधील रोग आजार वगैरे दर्शविणाऱ्या षष्टस्थानामध्यें वृश्चिक राशीमध्यें म्हणजे ज्या राशीचा वृषणावर अंमल आहे त्या राशीमध्यें रवि आहे. कित्येक असें म्हणतील कीं हा आजार येण्याचे वेळीं परिभ्रमण पध्दतीचा रवि वर्ष कुंडलीचे षष्टस्थानामध्येंच नव्हता, परंतु जन्मकाळच्या रवीची स्थिति व परिभ्रमणाच्या रवीची स्थिति व जो आजार प्राप्त झाला या सर्वांचा विचार करितां मला असें वाटतें कीं बरेंच महिन्यांपूर्वी रोगानें आपलें वास्तव्य गुह्येंद्रियामध्यें--वृषणामध्यें केलेलें होतें व ही गोष्ट श्रीयुत पटवर्धन यांचे लक्षांत आली नाहीं. **म्हणजे ज्या**

वेळीं रवि षष्ट स्थानामध्यें होता त्याच वेळीं रोगोद्भव झालेला असला पाहिजे. डाक्तर लोकांचेंही त्यांचे आजारासंबंधानें असेंच म्हणणें आहे कीं मरण होण्यापूर्वी कांहीं महिने अगोदर तरी श्रीयुत पटवर्धन यांना वृषणामध्यें विकार झालेला असला पाहिजे.

नवव्या महिन्याचा लग्नेश व मूळ कुंडलीमधील अष्टमेश बुध हा मासकुंडलीचे व्ययस्थानामध्यें बसत आहे. व नवव्या महिन्याचा दुय्यम मालक चंद्र हा षष्टस्थानामध्यें असून तो परिभ्रमणाच्या मंगळाबरोबर प्रतियोग करीत असून जन्मकुंडलीच्या षष्टस्थानामध्यें पडत आहे. दहाव्या महिन्याचा आरंभ तारीख २ डिसेंबरला होणार असून याच दिवशीं रात्रीं ९ वाजून २० मिनिटें झालीं असतां श्रीयुत पटवर्धन यांचा मृत्यु झाला; म्हणजे दहावा महिना लागून मासकुंडलीचे लग्नावर कर्क राशीचा ११ वा अंश उदय पावण्याचे कांहीं काल पूर्वी म्हणजे एक तास पूर्वी पटवर्धन याचें देहवसान झालें यावरून असें मानण्यास मुळींच हरकत नाहीं कीं मासकुंडलीचा अष्टमेश शनि ज्यानें जन्मकाळीं रवीबरोबर प्रतियोग केलेला होता तो प्रबल होऊन जन्मलग्नामध्यें येत आहे व आत्मग्रह जो रवि त्याला मदत करणारा म्हणजे जीवन शक्ति देणारा जो जन्मकुंडलीमधला मंगळ त्याबरोबर पण केंद्रयोग केल्याकारणानें व मासलग्नाचा अधिपति परिभ्रमणानें अष्टमांत गेल्यानें त्याला लग्नाला किंवा देहाला कोणत्याच प्रकारची मदत करण्याचें सामर्थ्य न राहिल्यामुळें तर या शनीला फार तीव्रपणानें नाश करितां आला; याप्रमाणें परिभ्रमण पध्दतीनें आपल्या मरणाचा काल पूर्वी निश्चित करून व तो आपल्या आप्तेष्टांना जाहिर करून बरोबर त्याच वेळीं श्रीयुत पटवर्धन यांनीं देह विसर्जन केला. तारीख २४ नव्हेंबरला प्रथम त्यांना वृषणामध्यें ठणका

सुरू झाल्या व त्या औषधोपचार करतांच राहिल्या परंतु लवकरच त्यांना ताप चढून अशुकारी संधिवाताचा आजार उत्पन्न झाला (परिभ्रमणाचा शनि केन्द्र मंगळ जन्मकाळचा) या काळीं गुढघे व कोपरांच्या सांध्यामध्यें भयंकर कळा मारीत होत्या. जन्मकाळचा मंगळ मकर--गुढघे व संधिवातप्रचुर राशींत आहे. हा त्यांचा आजार सगळा ९ दिवसांचा झाला व मृत्युस्थानामधील राशि लग्नकेंद्रावर उदय पावत असतां त्यांनीं देहविसर्जन केलें. ता. २ डिसेंबर १८९३ रोजीं जन्मकाळापर्यंत अष्टमस्थानाचा मास लग्नावर अंमल होता; व जन्मकाळ उलटून जाऊन जर नवमस्थान मास लग्नावर आलें असतें तर कदाचित हें मृत्यूचें संकट टळलें असतें. परंतु पटवर्धन पूर्वी म्हणाले होते कीं मासलग्न व दिनचर्येचें लग्न या दोघांचा अधिपति बुध हा परिभ्रमणानें वर्ष कुंडलीचा अष्टमेश जो गुरु त्यानें मासलग्नाचे व दिनचर्येच्या लग्नाचें व्ययस्थानांत म्हणजे मूळकुंडलीचे अष्टमस्थानांत युक्त होत आहे; मूळ जन्मकुंडलीचा लग्नेश मंगळाबरोबर प्रतियोग करीत आहे व रवि व चंद्र हे शनि व मंगळांबरोबर प्रतियोग व केन्द्रयोग करीत आहे म्हणून माझा मृत्यु ११ वाजण्याचे आंत व नऊचे नंतर याच दिवशीं झाला पाहिजे. या प्रमाणें पटवर्धनांना परिभ्रमण पध्दतीनें आपला मृत्यु नेमका वेळेपर्यंत सांगातां आला हें पाहण्यासारखें आहे. आपल्या मृत्यूचें निदान करण्यास त्यांनीं आणखी आपल्या धाकटया मुलाचा कुंडली मदतीला घेतली होती. वाचकांच्या सोईकरितां मी त्या मुलाची कुंडली व तीवरील केलेलें निदान या सोबत जोडीत आहें.

पित्याचें मृत्यूचें निदान शेवटल्या मुलाचे कुंडलीवरून चांगलें करितां येतें व मातेच्या मृत्यूचें निदान शेवटच्या मुलीच्या कुंडलीवरून

चांगलें जमतें व म्हणूनच श्रीयुत पटवर्धन यांनीं आपल्या मृत्यूचा विचार करण्याकरितां अगदीं धाकटया मुलाची कुंडली घेतली होती व तीच मी येथें देत आहें.



या मुलाची आई तारीख ४ जून रोजीं मेली व पित्याचा मृत्यु ता. २ डिसेंबर १८९३ रोजीं रात्रीं ९ वाजून २० मिनिटें झालीं असतां झाला; या वेळीं परिभ्रमणानें रवि मिथुन ५ अं. चंद्र मकर ७ अं. व मंगळ कर्क ५ अं. मध्यें होता.

हिंदु फलज्योतिष ग्रंथकारांच्या मताप्रमाणें पाहतां मातेचा विचार चतुर्थ स्थानावरून करितात व या कुंडलीमध्यें चतुर्थेस शनि हा मातेच्या

स्थानापासून असणाऱ्या अष्टम स्थानामध्यें निर्बल राशीमध्यें आहे. मातृकारक चंद्र म्हणजे मातेची आयुर्मर्यादा वगैरे दर्शविणारा ग्रह चंद्र हा आपल्या नीच क्षेत्रीं असून नेप्च्यूनबरोबर प्रतियोग--प्रत्यक्ष वैरा दृष्टियोग करीत आहे. दशमेश चंद्र हा वरप्रमाणें पीडित असून पितृकारक (पित्याचें आयुष्य वगैरे दर्शविणारा) रवि हा पित्याच्या अष्टमस्थानांत म्हणजे दशमापासून असणाऱ्या अष्टमस्थानांत आहे. रवि चंद्रामध्यें केन्द्रयोग घडत आहे. रवि हा मीन या जल राशीमध्यें असल्याकारणानें पित्याचे अंगामध्यें जीवन शक्ति कमी दर्शवीत आहे. तसाच दशमेश चंद्र हा नेप्च्यूनबरोबर प्रतियोग करीत असून रवीबरोबर केन्द्रयोग करीत आहे. पांचव्या वर्षाचा आरंभ पंचमस्थानाने (कुंभ १७ अं. ते मीन १८ अं.) होतो अर्थात जन्मकुंडलीमधील धनस्थान या वर्ष कुंडलीचे दशमस्थान होतें. या वर्ष दशमाचा अधिपति मंगळ हा परिभ्रमणाणें कर्क राशीच्या ५ व्या अंशांत येत असून वर्ष दशमाच्या अष्टम स्थानामध्यें येत आहे. जन्मकाळच्या दशमाचा अधिपति चंद्र हा परिभ्रमणानें मकरेमध्यें म्हणजे आपल्या निर्बल क्षेत्राच्या राशीमध्यें येत आहे व दशमापासून असणाऱ्या षष्ट स्थानामध्यें बसत आहे. व पितृकारक जीवन शक्तीला मदत देणाऱ्या मंगळाकडून जन्मकाळी रवीला कोणतीच मदत नसून तो जन्मकाळीं मीन या जल राशीमध्यें आहे व तो परिभ्रमणानें जन्मकाळचे अष्टमांत मिथुन राशीच्या ५ व्या अंशांत येत आहे व जणूं काय तो मृत्युस्थानामध्यें आल्यामुळें या मुलाच्या पितृसुखांत आतां कांहीं गडबड उडणार असें ध्वनित करीत होता. उष्णता किंवा जीवनशक्ति देणारा ग्रह व वर्ष कुंडलीचा दशमेश हा कर्क या राशींत असल्याकारणानें ही आपली जीवन शक्ति किंवा प्राणशक्ति बरीच निर्बल झालेली दर्शवीत आहे. वर्ष कुंडलीचा दुय्यम अधिपति गुरु हा परिभ्रमणानें मिथुनमध्यें

म्हणजे जन्मकुंडलीचे अष्टमामध्यें येत आहे. जन्मकुंडलीचा दशमेश चंद्र परिभ्रमणानें मकर ७ अं. व वर्ष दशमेश परिभ्रमणानें कर्क ५ अंश येतात म्हणजे जन्मदशमेश हा वर्ष दशमेशाबरोबर प्रतियोग करीत आहे.

मासकुंडलीसंबंधानें विचार करितां २२ फेब्रुवारी ते २२ नव्हेंबर पर्यंत ९ महिने ९ वे स्थानावर पुरे होतात व मृत्यु आणणाऱ्या आजाराचा आरंभ तारीख २४ नव्हेंबर १८९३ रोजीं झाला; या वेळीं जन्मकाळचा दशमेश कुंभेमध्यें म्हणजे पित्याच्या मृत्युस्थानामध्यें होता; व दशमस्थान हें मासलग्नावर उदय पावत होतें व मूळ दशमेश चंद्र हा दिनचर्येच्या लग्नाच्या व्ययस्थानामध्यें होता व या सर्व गोष्टी एकत्र केल्या म्हणजे पित्याच्या मृत्यूचें चांगलें निदान करितां येतें.

मिस्टर एच. एस. ग्रीन यांनीं सुचविल्याप्रमाणें एक राशि एका वर्षाला घेण्यापेक्षां घडलेल्या गोष्टींचा पडताळा पाहतां व पृथ्वीवरील जन्मस्थलाचा विचार करितां दर वर्षाला एक भाव घेणें हें जास्त सशास्त्र आहे. ही परिभ्रमणपध्दति ताजिकपध्दतीनें येणाऱ्या वर्ष प्रवेश कुंडलीचें काम भागविते आणि म्हणूनच माझ्या या परिभ्रमण पध्दतीमध्यें वारंवार भावारंभ बदलून घेण्याचें कारणच नाहीं व म्हणूनच एखादी नवी राशि एखाद्या भावामध्यें लुप्त झाली आहे किंवा काय याची ही भानगड घडत नाहीं. मिस्टर ग्रीन हे प्रिन्स ऑफ वेल्स यांची कुंडली आपल्या योजनेला बसेल त्याप्रमाणें सोडवीत आहेत परंतु त्यांनीं आणखी कांहीं कुंडल्या उदाहरणाकरितां घेऊन पाहण्यात म्हणजे मी जी वर पध्दति दर्शविली आहे तीच अखेरीला त्यांना खरी आहे असें वाटेल. आपला विश्वासु

जिवन त्रिंबक चिटणीस.

या पत्रामधील बराच मजकूर दि अस्ट्रालाजर्स म्यागेझीन वर्ष ४ थें अंक ९ व एप्रिल १८९४ पृष्ठ २०४ ते २०८ मध्यें प्रसिद्ध झाला आहे. प्रिन्स ऑफ वेल्स या नांवानें जो उल्लेख आलेला आहे तो बादशहा ७ वे एडवर्ड यांचे संबंधानें आहे. –संपादक-

मालेच्या वर्गणिदारांना विनंती.

हल्लीं दर दोन महिन्यानें प्रसिद्ध होत असलेले मालेचे अंक नियमित प्रसिद्ध होत नाहींत त्यामुळें बरेच वर्गणीदार आमचेवर रुष्ट झाले आहेत. यास अनेक कारणें आहेत. ज्या देशांत व्यक्तीच्या सुखदुःखावर वर्तमानपत्रें व मासिकें यांचें जीवन अवलंबून आहे तेथें असें होणारच. वर्तमानपत्रकार व मासिककार यांची सांपत्तिक स्थिति किती समाधानकारक असते याची कल्पना त्याचे कुलामध्यें गेल्याखेरीज कळत नाहीं, अनेक अडिअडचणी सोसून, घेतलेल्या वर्गणीचें पुरें माप वर्गणीदारांना आजपर्यंत आम्हीं देत आलों आहों; व शक्य असेपर्यंत तोच क्रम राहील. बऱ्याच वर्गणीदारांचे अंक पोष्टांत गहाळ होतात, यांस आमचा निरुपाय आहे. अंक मिळाले नाहींत हें कळविण्याचें सोडून शास्त्रसेवा करणाऱ्या मालेवर एकदम रुष्ट होणें हें सहृदय वर्गणीदारांना शोभत नाहीं. आम्हीं अंक बरोबर पत्ते लिहून पोष्टांत टाकतों परंतु ते मध्येंच गडप होतात याला आम्हीं काय करणार. असलेल्या चुका आमचेवर प्रेम ठेवून आमचे नजरेला आणल्या असतां त्या ताबडतोब सुधारण्याचें आम्हीं आमचें आद्य कर्तव्य समजतों. सन १९२० पासून माला हळु हळु संकटाचे भोंवऱ्यांत सांपडण्यास सुरवात झाली व गेल्या एप्रिल १९२९ मध्यें तर कळसच झाला आहे. संसार व इतर सर्व गोष्टींची आपल्या शिरावर जबाबदारी घेऊन एकनिष्ठपणानें काम करणाऱ्या संपादकाच्या बंधूचा वियोग झाल्यानें तर आमचा उजवा हात खरोखरच झाला आहे. असो पूर्व संकल्पाप्रमाणें काम करणें आमचेकडे आहे परंतु तें गोड मानून घेणें व त्याचा गौरव करणें हें सर्वस्वी जनता रूप जनार्दनाच्या हातीं आहे. हल्लींच्या जीवनकलहाच्या तीव्र झगडयांत आम्हीं ९वर्षें काढलीं आहेत व थोडें पाठबळ मिळतांच आणखी उत्तम काम मालेच्या हातून खास होईल.

आजपर्यंत मालेची वर्गणी टपाल हंशिलसह रुपये दोन होती परंतु तो आतां **या वर्षापासून रु. २-८-० अडीच रुपये करण्याचें ठरविलें आहे.** कारण पूर्वीच्या अल्प वर्गणीमध्यें खर्च भागत नाहीं व ही वर्गणीची वाढ आम्हीं आमच्या कांहीं हितचिंतकांचे सल्ल्यावरून करीत आहों.

बरेच वर्गणीदार अगाऊ मासिक बंद करण्याचें न कळवितां व्ही. पी. आली असतां रिफ्युज्ड, अनक्लेमड वगैरे करून पोष्टाचा बराच फायदा करितात. आपल्या सभ्यतेच्या शालीनतेकरितां किंवा आपला अर्धा आणा वांचविण्याकरितां अथवा आपल्या आळसानें आम्हांला मात्र दर व्ही. पी. मागें सव्वादोन आण्यांचा गडा बांधित आहेत व हा प्रकार चांगल्या सुशील म्हणविणारांकडून होत असतो. एखादें कार्य शिरावर घेऊन जनसमाजापुढें आल्याखेरीज समाजामधल्या कर्तव्यच्युत व्यक्तींची ओळख पटत नाहीं हें मात्र खरें आहे. मालेचा ११।१२ हा अंक लवकरच बाहेर पडेल करितां ज्यांना सवड असेल त्यांनीं मनिआर्डरीनें १० व्या वर्षाची वर्गणी २-८-० पाठविणें किंवा माला पुढें नको असल्यास तसें कळविणें. जे सज्जन आम्हांस अगाऊ कळवितील त्यांचे आमचेवर खास मोठे उपकार होतील करितां वाचकांनीं या विनंतीकडे अवश्य लक्ष पुरविणें.

म्यानेजर—**ज्योतिर्माला ऑफिस दादर, मुंबई नं. १४.**

॥ श्रीसद्गुरवे नमः ॥

ज्योतिर्माला

आप्राचः कामरूपाद्द्रुहिणसुतनदप्लावितादाप्रतीचो
गान्धारात् सिंधुसार्द्रादधुवररचितादाचसेतोरवाचः ।
आकेदारादुदीचस्तुहिनगहनतः सन्तिविद्वत्समाजा
ये ये तानेष यत्नः सुखयतु समजान्कश्चमत्कर्तुमीष्टे ॥ १ ॥

अभिनवाऽऽवृत्ति } वर्ष ९ वें { अंक ११ ते १२.

स्वभाव—मन—बुद्धि

लेख १ ला.

(एम. डी. सगणे. एम्. ए. एल एल. बी.)

साधारणतः जन्मलग्न स्वभाव, तृतीय स्थान मन व आर्यपंचदतीनें पंचमस्थान बुद्धि दर्शविते. ग्रहांमध्यें ह्या तीन गोष्टींचे अनुक्रमें रवि, चंद्र व बुध कारक मानले गेले आहेत. संकलित रितीनें विचार करावयाला मुख्यत्वें तृतीयस्थान व बुध हेंच लक्षांत घेतले पाहिजेत. प्रस्तुत लेखांत फक्त बुधाचाच विचार करूं.

राशिपरत्वें बुधानें दर्शविल्या जाणाऱ्या गुणांचे ठोकळ मानानें तीन वर्ग पाडतां येतील. ते तीन वर्ग म्हणजे उत्तम मध्यम व कनिष्ठ.

उत्तम

मिथुन, कन्या, तुला व कुंभ या राशींत बुधाचे उत्तम गुण दृष्टीस पडतात. ह्या गुणांचा बुध्दीशीं, वाक् किंवा लेखन चातुर्याशीं ज्यास्त संबंध असतो. ह्या राशींतील बुधानें उच्च दर्जाची बुधिमत्ता दर्शविली जाते.

बुध्दीत चौकस व शोधकपणा असतो. नवीन विचार निर्माण अगर प्रचलित करणें, बुध्दिसामर्थ्यानें कांहींतरी करामत करून दाखविणें वगैरे गुण दृष्टीस पडतात. नांवाजलेले वक्ते, प्रसिध्द ग्रंथकार अगर लेखक यांचा बुध वर दिलेल्या कोणत्या तरी राशींत बहुधा आढळतो. विशेषतः मिथुन व कन्या राशींतील बुध वक्त्यांचा व लेखकांचा कारक आहे.

मध्यम

बुध मेष, वृषभ, सिंह, वृश्चिक, धनु व मकर राशींत मध्यम प्रकारचो बुध्दिमत्ता दर्शविता. मेष किंवा धनु राशींतील बुध मनुष्यास उतावळा करतो. अशा व्यक्तींच्या अंगी अहंपणाचा ताठा असतो. वृषभ, वृश्चिक व मकर राशींत बुध असल्यास मनुष्य आपमतलबी, स्वार्थी व द्वेष्टा बनतो. त्याचें अंगी फसवेगिरी असते. म्हणजे सौजन्याच्या व नीतीच्या दृष्टीनें मेष, वृषभ वृश्चिक, धनु, मकरेचा बुध कमी दर्जाचा आहे. तसेंच मात्र सिंहेंतील बुधाचें दिसत नाहीं. सिंहस्थ--बुध--व्यक्ति बहुधा सरळ वर्तनाची व पक्या दिलाची व मताची असते.

कनिष्ठ

कर्क व मीन राशी बुधाला अनिष्ट आहेत. ह्या राशींतील बुधानें असमंजस, मठ्ठ डोक्याचा, उथळ बुध्दीचा, अल्प समजुतीचा मनुष्य दर्शविला जातो. असला मनुष्य निरर्थक बडबड करणारा, मिनिटा मिनिटानें बदलणारा असून मद्यपानाचा चाहता असतो.

अर्थात वर दिलेले गुण शुभ असल्यास शुभ दृष्टीनें वृध्दि पावतात, अशुभ असल्यास त्यांचें अशुभत्व कमी होतें. अर्थात आतां बुधाच्या दृष्टीचा विचार केला पाहिजे.

बुधाचा शुक्राबरोबर

शुभदृष्टि योग होत असतां मन प्रसन्न आनंदी व सुखलोलुप असतें, बुध्दि तीव्र होते व कलांविषयीं प्रेम किंवा आवड असते.

बुधाचा मंगळाबरोबर

शुभयोग होत असतां मन तीव्र, व उत्साही असतें. मनुष्य वादविवाद करण्यांत कुशल असतो. **अशुभ** योग होत असतां मन प्रक्षुब्ध, चिडखोर बनतें. बोलणें मर्मभेदक व मनाला धक्के देणारें असतें. खोटें बोलणें, ढोंग करणें इत्यादि अवगुणहि दृष्टीस पडतात.

बुधाचा गुरूबरोबर

शुभयोग असतां बुध्दीचा निर्णयात्मक शक्ति उत्तमप्रकारची राहून तींत तीव्रपणा येतो. **अशुभ** दृष्टियोग होत असतां उलट फलें दृष्टोत्पत्तीस येतात, बुध्दि हलक्या दर्जाचो विचार शून्यत्व, ढोंगीपणा अथवा दांभिकपणा इत्यादि दुर्गुण दृष्टीस पडतात.

बुधाचा शनीबरोबर

शुभयोग असतां मनुष्य, विचारी, प्रामाणिक व नेमस्त होतो. त्याची बुध्दि खोल असून तींत स्थैर्य येतें. चित्ताची एकाग्रता व इच्छाशक्ति प्रबल असते, मनुष्य सहनशील व धीरोदात्त बनतो. परंतु **अशुभयोग** असतां मनुष्यांत दुटप्पीपणा, फसवेगिरी, बुध्दीचा व स्वभावाचा आकुंचितपणा, लेबंदशाही किंवा जुलूम करण्याकडे कल इत्यादि दोष उत्पन्न होतात. चौर्यकर्माकडे प्रवृत्ति या योगानें दर्शविली जाते.

बुधाचा हर्शलबरोबर

शुभयोग असतां मनुष्य कल्पक, शोधक, कौतुकप्रिय, प्रौढ, तीव्र, व अद्वितीय बुध्दीचा असतो, वाङ्मयांत किंवा शास्त्रीय ज्ञानांत त्याची मति फल-

दायक होते. परंतु **अशुभ** योग असतां स्वभाव चंचल, उच्छृंखल टीकाखोर, शिरजोर व साधारणतः खुनशी असतो. बुद्धि मात्र कल्पक व तीव्र असते. स्वभावामध्यें विक्षिप्तपणा दिसून येतो.

बुधाचा नेप्च्यूनबरोबर

शुभयोग असतां कलांचा चाहता, गूढ व कोमल मनाचा व सूक्ष्म निरीक्षणाचा असतो. त्याच्या ठायीं अंतःस्फूर्ति जागृत असते. परंतु **अशुभयोग** असतां विसरभोळा, चंचल चित्ताचा, व्यवहारशून्य व आत्मवंचक मनुष्य दर्शविला जातो. त्याच्या कारभारांत व त्याचे विचारांत एक प्रकारचा घोटाळा किंवा गोंधळ माजलेला असतो.

बुधाचा चंद्राबरोबर

शुभयोग असतां मनुष्य हुशार विनोदी आणि बुद्धिमान असतो परंतु **अशुभयोग** असतां चुगल्या करणें, गप्पा ठोकणें, खोटें बोलणें इत्यादि दोष दिसून येतात. मनुष्य हालगरजी, दुटप्पी व टीकाखोर असतो. बुद्धि मात्र तीव्र असते. बुध **सूर्याशीं** संलग्न असतां स्मरणशक्ति चांगली असते पण स्वभाव थोडा अभिमानी व आत्मश्लाघी बनतो;

बुधाचा स्थानपरत्वें फलें खालीलप्रमाणें देतां येतील.

स्थान. **फलें.**

१ लग्न--मन सकर्मक, चपल, बौद्धिक कल, ज्ञानार्जनाकडे प्रवृत्ति; बुद्धि चांगली, वाक्चातुर्य व लेखनाचें कसब अवगत असतें.

२ तृतीय--मन खूब चपळ, विनोदी, विद्याव्यासंगी, बोलण्यांत व लिहिण्यांत हुशार.

५ पंचम--अपत्यप्रेम, साहस, कल्पनाशक्ति, बुद्धिमत्ता.

६ षष्ट--पीडित असतां मेंदूवर वाईट परिणाम होतो. आत्महत्यादि विचार मनांत घोळतात.

८ अष्टम--गूढ विद्येकडे मन वळतें.

९ नवम--मन क्रियावान, बुद्धीचा कल गुप्त व तत्त्वज्ञानाकडे, विद्यार्जनाची इच्छा.

१० दशम--वाङ्मयाकडे प्रवृत्ति, बुद्धिमान, वक्तृत्वाचा आवड.

१२--द्वादश अध्यात्म किंवा गूढ विषयाकडे प्रवृत्ति.

ह्या लेखांत बुधाचे दृष्टियोग व स्थानयोग दिले. त्यांचा सारांश पुढीलप्रमाणें देतां येईल.

बुध स्थानपरत्वें बलवान असल्यास मनुष्याची बुद्धि शीघ्रग्राही व जिज्ञासू असते. तो लेखनांत, वाचनांत वाकबगार असतो. पण निर्बल असल्यास बुद्धि कमजोर होते.

अशुभ दृष्टीनें बुद्धिमत्तेवर विशेषसा वाईट परिणाम होत नाहीं पण अनृतत्व, फसवेगिरी, कोस काढण्याची व टीका करण्याची खोड इत्यादि दोष येतात. स्वतःचे विचार बोलण्यांत लिहिण्यांत किंवा अन्य तऱ्हेनें बरोबर प्रगट करतां येत नाहींत.

बुधाच्या अनेक दृष्टियोगांपैकीं त्याचे चंद्राशीं झालेले योग फार महत्त्वाचे आहेत. चंद्राशीं चांगला अथवा वाईट कोणता तरी योग होणें बुद्धिमत्तेस चांगलें असतें.

राशिचक्रामधील कांहीं अंशांचें गुणदोषविवेचन.

फलज्योतिष शास्त्रावर इंग्रजी भाषेमध्यें जे जुने ग्रंथ उपलब्ध आहेत त्यांमध्यें राशिचक्रामधील द्वादशराशींमधील प्रत्येक अंशासंबंधानें गुणदोष दिलेले आहेत. इंग्रजीमध्यें प्रत्येक अंशांचें शील, व्रण किंवा स्वरूप Symbol व त्यांचा अर्थ अशासारखी चार पांच वर्णनांचीं स्वतंत्र पुस्तकें आहेत. व जुन्या ग्रंथांमध्यें आणखी राशीमधील ३० अंशाचें गुणदोषांचें विवेचन केलेलें आहे. हें गुणदोषांचें विवेचन वरील जुन्या ग्रंथकारांनीं अनुभवानें केलेलें आहे किंवा दुसऱ्या कोणत्या पध्दतीनें केलेलें आहे हें आज समजण्यास मुळींच मार्ग नाहीं; परंतु हें वर्गीकरण प्रत्येक जुन्या ग्रंथामध्यें पाहण्यास मिळतें. द्वादशराशीमधील प्रत्येक अंशाचा स्वतंत्रपणानें विचार करण्याच कामास ही माहिती उपयुक्त होईल असें वाटल्यावरून खालील माहिती विलसन साहेबांच्या डिक्शनरी ऑफ ॲस्ट्रालाजो या पुस्तकावरून मराठीमध्यें प्रसिध्द करीत आहों.

" अंश----कांहीं अंश किंवा क्रांतिवृत्तामधील विशिष्ट प्रदेश यांचेमध्यें कांहीं विशिष्ट काल्पनिक गुणधर्म मानलेले आहेत. फलज्योतिष-शास्त्रावरील हा कोश पूर्ण असण्याकरितां त्यांचें गुणदोष दर्शविणारें कोष्टक मी येथें देत आहें तें खालीलप्रमाणें आहे.

"मेषेच्या पुढील ८--१५ व ३० या पुरुष अंश या रकान्यामध्यें आहेत व ९ व २२ हें स्त्री अंश या रकान्यामध्यें आहेत याचा अर्थ असा की मेष राशीचे पहिले आठ अंश हे पुरुष धर्माचे आहेत. ९वाहा स्त्री अंश,

राशिचक्रामधील प्रत्येक अंशांचें गुणदोष विवेचन करणारें कोष्टक.

राशी	पुरुष अंश male degrees	स्त्री अंश Female degrees	श्रेष्ठ अंश light degrees	कृष्ण अंश Dark degrees	धूम्र अंश smokey degrees	पोकळ अंश void	खेमणें किंवा व्रण अंश. pitted or deep	अशुभ कमीपणा दाखविणारे अंश Deficient	भाग्योदय करणारे शुभ अंश Increasing Fortunes
मेष	८-१५-३०	९-२२	८-२०-२९	३-१६	०	२४-३०	६-११-१६ २३ व २९	०	१९
वृषभ	११-२१-३०	५-१७-२४	७-१५-२८	३-३०	७	१२-२०	५-१२ २४-२५	६--७--८ ९-१०	३-१६-२७
मिथुन	१६-२६	५-२२-३०	४-१२-२२	७-२७	०	१६-३०	७-१२-१७ २६-३०	०	११
कर्क	२-१०, २३-३०	८-१२-२७	१२-२८	१४	२०	१८-३०	१४-१७, २३-२६-३०	९ ते १५	१-३-२-४ व १५
सिंह	७-१५-३०	८-२३	३०	१०	२०	२५	६-१३-१५, २२-२३-२८ व २८	१८-२७	४-५-७ १९
कन्या	१३-३०	८-२०	८-१६	५-३०	२२	१०-१७	८-१३-१५ २१-२२	०	३-१४-२०
तुला वृश्चिक	५-२०-३० ४-१७-३०	१५-२७ १४-२१	५-१८-२७ ८-२२	१०-२१ ३-३०	० २४	३० १४-२९	१७ २०-३० ९-१०-२२ २३ व २७	० १९-२०	३-१५-२७ ७-१८-२०
धनु	२-१२-३०	५-२४	९-१८-३०	१२	२३	०	७-१२-१५ २९-२७३०	१-७-८ १८-१९	१२ २०
मकर	११-३०	१०	१०-१९	७-२२-३०	१५	२५	७-१७-२२ २४ व २९	२६-२७ २८-२९	१२-१३ १४-२०
कुंभ	५-२१-२७	१५-२५-३०	९-२१-३०	१३	४	२५	१-१२ १७ २२-२४-२९	१८-१९	१७-२०
मीन	१०-२३-३०	३०-२८	१२-२२-२८	६-१८-३०	०	२५	४-९-२४-२७-२८	०	१३-१०

तेथून पुन्हा पंधरापर्यंत पुरुष अंश; याचप्रमाणें पहिले ३ अंश कृष्णवर्णाचे अंश, आणि त्यापुढें २० अंशांपर्यंत शुभ्र वर्णाचे अंश. २८ वा अंश हाही शुभ वर्णाचा अंश आहे व बाकी राहिलेले अंश धड कृष्ण नाहींत व धड शुभ्र नाहींत असें आहेत. मेष राशीमध्यें धूम्र वर्णाचा अंश नाहीं. २१ वा व ३० वा अंश हे पोकळ (Void) अंश आहेत. ६ वा ११ वा, १६ वा, २३ वा, व २९ वा हे अंश व्रण किंवा खोमणा (Pitted) दर्शविणारे आहेत. या राशीमध्यें अशुभ किंवा कमीपणा असणारे (Deficient) असा कोणताच अंश नाहीं व १९ वा अंश हा अत्यंत शुभ अथवा भाग्योदय करणारा अंश आहे.

" जर लग्नावरील उदित अंश किंवा लग्नेश या वर दर्शविलेल्या अंशामध्यें असेल तर वर जे अंशाचे गुणदोष वर्णन केलेले आहे त्याप्रमाणें जन्मणाऱ्याचा चेहरा, भाग्य इत्यादीमध्यें त्या त्याप्रमाणें गुणदोष आढळतात. उदाहरणार्थ जर जन्मकालचा उदित अंश किंवा लग्नेश पुरुष अंशामध्यें असेल तर जन्मणारामध्यें पुरुषी स्वभाव धर्म विशेष दृग्गोचर होतात. परंतु स्त्री अंशामध्यें लग्नेश किंवा जन्मलग्नाचे अंश असतील तर जन्मणारामध्यें स्त्रीत्व किंवा मार्दव अथवा बायकीपणा पाहण्यास मिळेल. तसेंच कृष्ण किंवा शुभ्र यांमध्यें लग्नेश किंवा लग्नाचे उदित अंश असतील तर वर्ण त्याप्रमाणें कृष्ण किंवा शुभ असेल. धूम्रवर्णाचे अंशांत असतां साधारण बभ्रुवर्णासारखा वर्ण असेल व जन्मणारामध्यें बुध्दिमांद्यत्व दिसेल. जे नष्ट अंश किंवा पोकळ अंश दर्शविले आहेत, त्यांमध्यें जन्मलग्नेश किंवा जन्मलग्नावर ते अंश उदित असणें चांगलें नाहीं; ते बुध्दिमांद्यत्व व बुध्दीची पोकळता व अज्ञानत्व दर्शवितात. जे

व्रणांश आहेत त्या योगानें शरीरावर देवीचे व्रण, खुणा व व्यंगत्व दर्शवितात; तसेंच वाणीमध्यें किंवा इतर शारीरिक व्यंगत्व--मुकेपणा, लुलेपणा, वगैरे दर्शवितात किंवा अत्यंत मोठालीं संकटें किंवा अरिष्टें म्हणजे ज्यांमध्यें जन्मणारा गडपच होईल अशीं दर्शवितात; अशुभता किंवा कमीपणा दर्शविणारे अंश ते ज्या राशीमध्यें आहेत त्या राशीनें दर्शविल्या जाणाऱ्या इंद्रियांमध्यें कमजोरपणा, लुलेपणा, वक्रत्व किंवा व्यंग दर्शवितात. परंतु शुभ किंवा भाग्योदय करणारे अंश धन भावारंभीं किंवा धनेश अगर दशमेश अथवा गुरु या अंशांमध्यें असतां ते भाग्योदय करणारे असतात. या असल्या खुळसट माहितीवर टीका करण्याचें मुळींच कारण नाहीं. "

----विल्सनसाहेब----

अशाच तऱ्हेचे मृत्युसूचक अंश व पुष्कर अंश या नांवानें राशीमधील कांहीं अंशाचें वर्णन आपलेकडे जातकपारिजातक ग्रंथांमध्यें सांगितलेलें पाहण्यास मिळतें.

नफाः शरीरारि खराः किरीटिनो ।
घना गुरुर्हेयनखा नरानुकाः ॥
शशांक भागा यदि तुंबुरादिके ।
मुहुर्तजन्मादिषु मृत्युसूचकाः ॥ ५७ ॥

जन्मकाळीं किंवा मुहूर्तकाळीं जर चंद्र मेष २०, वृषभ २५, मिथुन २२, कर्क २२, सिंह २१, कन्या १, तुला ४, वृश्चिक २३, धनु १८, मकर २०, कुंभ २० व मीन १० या अंशांत असेल तर तो **मृत्युसूचक** असतो किंवा वरील या राशींमधील अंशांना मृत्युप्रद अशी संज्ञा आहे म्हणून जन्मकाळीं किंवा मुहूर्तकाळीं चंद्र वरील राशींच्या अंशांमध्यें नसावा.

पुत्रो बटुर्दिव्यजनाधिको धनी ।
विराट योगोत्र वयोधिकोऽधुना ॥
मेषादिके पुष्कर भागसंज्ञिकाः ।
मुहूर्तजन्मादिषु शोभनप्रदाः ॥ ५८ ॥

जन्मकाळीं किंवा मुहूर्तकाळीं चंद्र मेष २१, वृषभ १४ मिथुन १८, कर्क ८, सिंह १९, कन्या ९, तुला २४, वृश्चिक ११, धनु २३, मकर १४, कुंभ ९ व मीन ९ अंशांत असतां तो शुभप्रद असतो किंवा वरील राशीमधील अंशांना **पुष्कर** अशी संज्ञा असून ते शुभफल देणारे आहेत.

विलसन साहेब किंवा इतर कोणाही ग्रंथकारास कांहीं म्हणावयाचे असेल ते त्यांनीं खुशाल म्हणावें वाचकांनीं आपलें मत अनुभवानें ठरवावें. वर दर्शविलेल्या अंशांच्या साह्यानें कुंडलीचा विचार केला असतां पुष्कळ गोष्टींची न सुटणारीं कोडीं सुटतील असें आम्हांस वाटतें.

जन्मकाळीं मृत्युअंशांत लग्न, रवि, चंद्र किंवा लग्नेश असणें किंवा पापग्रहानें ते वरील अंशांत विध्द होणें चांगलें नाहीं. त्यायोगानें खात्रीनें आयुर्मर्यादेला धोका पोहोंचेल. नष्ट किंवा व्रण अंश तसेच अशुभ अंशामध्यें अथवा कमीपणा दर्शविणाऱ्या अंशांमध्यें लग्नेश, रवि, चंद्र, दशमेश, धनेश किंवा लग्नावर, धनस्थानावर, लाभावर दशमस्थानावर हे अंश उदित अस् नयेत किंवा या अंशांमध्यें रवि, चंद्र, दशमेश धनेश, लक्ष्मीसहम, लाभेश पीडित नसावा. साधारणपणें ज्या ज्या भावारंभी हे अंश उदित असतील किंवा ज्या ज्या भावाचे अधिपति वरील अंशांमध्यें पीडित असतील ते द्योतक भावजन्य फलामध्यें वरील अंश आपल्या स्वभावधर्माप्रमाणें व्यंगें, कमीपणा, नष्टता, मृत्यु किंवा अशुभता उत्पन्न करतील.

प्रसिद्ध व्यक्तीच्या कुंडल्यांचा संग्रह.

ज्योतिर्विद कॅमेली फ्लेमेरिअन.

गेल्या तारीख ३ जून १९२५ रोजीं खगोल शास्त्र विशारदांचा मुकुटमणी कॅमेली फ्लॅमेरीअन हा दिवंगत झाला. " मेमॉअरस वायोग्राफिक ए फिलासफीक द अ अस्ट्रानमे " या पुस्तकामध्यें या प्रसिध्द पुरुषाचा जन्मकाल दिलेला आहे त्यावरून या पुरुषाची कुंडली मालेच्या वाचकांपुढें ठेवीत आहों. २६ फेब्रुवारी १८४२ रोजीं माध्यान्हानंतर (A. M.) १ वाजण्याचे सुमारास **माटेनी ले रा** नांवाच्या गांवीं या पुरुषाचा जन्म झाल्याचे वरील पुस्तकामध्यें सांगितलें आहे. आधान काल कुंडलीवरून जन्मकालाचा विचार करितां या पुरुषाचा आधान काल तारीख ३ जून १८४१ रोजीं माध्यानानंतर० ता. ५३ मि. स्थानिक वेळीं झाला अथवा ग्रीनिच मध्यकालाप्रमाणें० ता. ३३ मिनिटें झालीं त्या वेळीं आधान झाले व या वेळीं चंद्र वृश्चिक राशीच्या २९ अं. २२ कलेमध्यें होता. यावरून जन्मकाल घेतां तो मानतेनो--ले--रा येथील स्थानिक वेळेप्रमाणें रात्रीं १ वाजून ३ मिनिटें झालीं त्यावेळेचा येतो. या वेळची कुंडली खालीलप्रमाणें आहे.

फ्लेमेरिअन याचा जन्म झाला त्या वेळीं त्याचे आइवाप कापड व परचुटण किरकोळ नित्य उपयोगाला लागणाऱ्या वस्तूंचा व्यापार करीत असत. व सन १८९१ फ्लेमेरीअनचा पिता ऐतिन् जुले--फ्लेमेरीअन हा मरण पावला. हा तरुणएणापासून शेतकोच करीत असे. फ्लेमेरीअनची आई फ्रान्सिक्वा लेमन हो साधारण सरदारी बाण्याची बाई होती व हो १९०५ सालामध्यें मरण पावली व आपला मुलगा फ्लेमेरीअन याला गरीबांच्या मुलामध्यें खेळूं देत नसे. चार मुलांपैकीं फ्लेमेरिअन हा सर्वांत वडील होता. याला शेवटलें भावंड १८५६ सालामध्यें झालें. कॅमेली



फ्लेमेरीअन हा पुढें एक तेजस्वी हिरा निपजणार आहे अशी त्याच्या आईची पूर्ण खात्री असल्यानें तिनें त्याला उत्तम शिक्षण दिलें. त्याचे चवथे वर्षींच त्याला घडघड वाचतां येत असे व पांचवें वर्षाचे सुमारास तो गणित व व्याकरण शिकला. सहावे वर्षीं त्याचा वर्गांत पहिला नंबर असे व जवळ जवळ त्याला नवा करार नवें बायबल तोंड-पाठ म्हणतां येत असे व त्याचें जें नवा कराराचें बायबलचें पुस्तक आहे त्यावर १३ नोव्हेंबर १८४८ असें त्याचे स्वतःचें हस्ताक्षरामध्यें लिहि-लेलें आहे. या पुरुषाला खगोलविद्येचा नाद--किंवा यानें खगोल विद्येचा

पहिला वेध ९ आक्टोबर १८४७ रोजीं म्हणजें ज्या वेळीं हा पांच वर्षांचा होता त्या वेळीं घेतला. घराच्या पूर्वेकडील बाजूला एका थाळीमध्यें पाणी ठेवून त्यामध्यें जें सूर्याचें प्रतिबिंब पडलेलें होतें त्यावरून सूर्यग्रह-णाचा चमत्कार कसकसा घडत गेला हें त्याच्या आईनें त्याला व त्याच्या तीन वर्षांच्या बहिणीला दाखविला. असेंच तारीख २८ जुलई १८५१ रोजीं झालेलें खग्रास सूर्यग्रहण त्यानें पाहिलें. या वेळीं फ्लेमेरीअन हा अवघा नऊ वर्षांचा होता पण हा आमचा भावी खगोलवेत्ता ग्रहण कसें लागतें व तें कसें लागलें यांमध्यें पूर्ण गाढून गेला व त्यानें त्याच वेळीं आकाश ज्योतिषावरील एक पुस्तक जरी त्याला तें कळलें नाहीं तरी तें साग्र वाचलं. ज्योतिषाला ग्रहणें, ग्रहांचे चमत्कार इत्यादि अचुक सांगतां येतात हें पाहून त्याच्या बालवयानें त्याला या विषयाची पक्की आवड लागली. त्याचे आईचे मनांतून त्यानें धर्माची बाजू घेऊन पाद्री व्हावें असें होतें पण ईश्वरी संकेत निराळाच होता. तो अकरा वर्षांच्या वयाच्या होता त्या वेळीं दिसत असलेला धूमकेतू असा दिसेल तो कसा असेल इत्यादि सर्व सांगत असे. त्याला सृष्टिनिरीक्षणाचा अत्यंत आवड लहान-पणापासूनच होती व त्याचें अंतःकरण एखाद्या लहान अर्भकासारखेंच मृदु होतें, व त्यानें आपलें सर्व आयुष्य सृष्टिनिरीक्षणांतच घालविलें.

आपण त्याचे कुंडलीकडे पाहिलें असतां आपणाला असेंच दिसेल कीं एकतर केमेली फ्लेमेरीअन हा ज्योतिर्विद झाला पाहिजे किंवा त्यानें सृष्टीशास्त्राचा अथवा प्राणिशास्त्राचाच अभ्यास केला पाहिजे. किंब-हुना हे दोन विषयच त्याला उत्तम अवगत झाले पाहिजेत. पूर्ण असा चंद्र माध्यान्ही असून तो शनि गुरुवरोवर प्रत्यक्ष स्नेहा--नवमपंचम दृष्टियोग करीत आहे. गुरु शनिची मकर राशीमध्यें नुकतीच एक महिन्यापूर्वी

मकर ८ अंश ५१ कलेमध्यें युति झाली असून या वेळीं अझूनदेखील ते युतियोगाचे दीप्तांशांमध्यें आहेत. माध्यान्हावर असलेल्या कन्या राशीचा व चंद्र राशीचा अधिपति बुध हा मीनेमध्यें चतुर्थामध्यें हर्शल-बरोबर युक्त आहे हो एकच गोष्ट याला प्रजापतीच्या अथवा युरेनेसच्या हर्शलच्या विषयाची आवड दर्शविण्यास पुरेसें आहे. असाच योग प्रसिध्द ज्योतिर्विद केपलर याचे कुंडलीमध्यें होता. बुध हर्शल युतीनें दर्शविलें जाणारें फलज्योतिषशास्त्र यावर फ्लेमेरीअन याचा विश्वास होता व ही गोष्ट त्यानें **डले स्टार** नांवाचे पुस्तकाला जी प्रस्तावना जोडली आहे त्यामध्यें विषद करून सांगितली आहे.

यानें अनेक विषयांवर ग्रंथ लिहिले आहेत व याची बुध्दिमत्ता फारच शीघ्रसंस्कार ग्रहण करणारी होती. सन १८८२ मध्यें फ्लेमेरीअ-नच्या ग्रंथाचे भोक्ते बोरोडो येथील श्रीमान गृहस्थ मानस्युअर मेरे यांनीं पूमेरोअन याला ऑरग नदीजवळ असलेल्या ज्युव्होसी गांवीं मोठी जागा दिली व येथेंच त्यांनीं एक वेधशाळा व आपलें कबरस्तान बांधलें. कॅमेली फ्लेमेरीअन यांचा तारीख १८ आगस्ट १८७४ रोजीं म्याडम म्याथ्यु याचेबरोबर विवाह झाला. व मिसेस फ्लॅमेरीअन या २३ फेब्रुवारी १९१९ रोजीं वारल्या. हल्लीं या ज्योतिर्विदांचें शव जेथें आहे त्याच वेधशाळेच्या भव्य बागेमध्यें म्याडम फ्लेमेरीअन याचो कबर आहे. गृहव्यवस्था सर्वस्वी त्यांच्या सुशील व अत्यंत प्रेमळ पत्नीच्या हातामध्यें असल्यामुळें, या ७७ व्या वर्षाच्या सुमारास झालेल्या पत्नीच्या हानीनें त्यांचें मन बरेंच व्यग्र झालें. अशा वेळीं रेनागेबाई त्यांच्या मदतीला आल्या व या बाईला मिळालेल्या शिक्षणाकडे त्या फ्लेमेरीअन साहेबांना त्यांचे अप्रसिध्द लेख व ग्रंथाचो जुळवाजुळव करण्यास फारच उपयुक्त झाल्या. या बाई फ्लेमेरीअन साहेबाच्या सेक्रे-

टरीचें काम करीत असत व पुढें त्यांनीं १९ सप्टेंबर १९१९ रोजीं फ्लेमेरीअन साहेबाबरोबर विवाह केला. फ्लेमेरिअन साहेबांची प्रकृती अलिकडे पादांगुष्टवातानें (Gout) बरीच त्रस्त झालेली होती परंतु त्यांची हृदयाची क्रिया बिघडलेली आहे असें कोणाच्या लक्षांत आलें नव्हतें असो अखेरीला त्यांचा मृत्यु हृदयक्रिया एकाएकीं थांबल्यामुळें झाला. हार्टफेल्युअर वर दर्शविलेल्या दिवशीं (३ जून १९२५) कांहीं दुःखणे किंवा आजार नसतां, आपल्या अभ्यासाचे खोलीमधील या खिडकीमधून त्या खिडकीकडे जाऊन सियेन नदीच्या खोऱ्यांतील वनश्रीची शोभा पहात असतां "आजचा दिवस कितो चांगला आहे ! माझा बागबगीच्या किती सुंदर दिसत आहे" ! असें म्हणत आहेत तोंच ते आपल्या कुटुंबाच्या बाहुपाशांत पडले व त्यांचें प्राणोत्क्रमण झालें.

मानसुअर कॅमेली फ्लॅमेरीअन हे १८६७ मध्यें अक्याडमी विद्या-लयाचे ऑफिसर होते. १८८२ मध्यें पबलीक इन्स्ट्रक्शनचे ऑफिसर होते; १८ जानेवारो १८८१ मध्यें ते लिजान ऑफ आनरचे शेव्हेलीअर झाले; १९१२ मध्यें लिजानचे अधिकारी झाले व १९१२ मध्यें लिजा-तचे कमानडर झाले. आकाशामधील तारका गोलांबरोबर नेहमी वावरणारा कॅमिली फ्लामरीअन इतका फ्रान्समध्येंच काय परंतु जगांत दुसरा पुरुष झालेला नाहीं.

फ्लामेरीअनची जन्मकुंडली भयंकर बुध्दिमत्ता व मोठें भाग्य दर्शवीत आहे.

शनि गुरुची युति धनस्थानामध्यें--संपत्ति पैसा दर्शविणारें स्थाना-मध्यें होत असून चतुर्थामध्यें मालमिळकत स्थावर इष्टेट याचा लाभ व पेन्शन नोकरी पूर्ण बजावल्यावर मिळणारें वेतन किंवा कायमचे शेवटचे

वेतन दर्शविणाऱ्या स्थानामध्यें प्रजापतीबरोबर शुभसंबंधित आहे. तृतीय स्थानामध्यें असलेल्या नेपच्युननें त्यांना अध्यात्म विद्येसंबंधानें गोष्टी देऊन मनुष्य प्राण्याचा आत्मा आला कोठून पुढें त्याचें काय व्हावयाचें इत्यादि विषयासंबंधानें विचार करण्यास लावलें व याविषयावर त्यांचे हातून अत्यंत महात्वाचे ग्रंथ निर्माण केले. मीन राशीमध्यें असलेल्या रवि शुक्राचे युतिमुळें त्यांना काव्य, सृष्टिसौंदर्याची आवड मिळाली व मिनेमधील बुध हर्शल युतिमुळें त्यांना खगोल विद्या, ज्योतिषशास्त्र व फलज्योतिषशास्त्राची गोडी दिली. गुरु व मंगळ हे लग्नाचे अधिपति असून या दोघांचे स्वभावधर्माप्रमाणें त्यांचे मनाची रचना होती; हे निघड्या छातीचे कोणाला न भिणारे व स्वतंत्र विचार करणारे होते. दशमांत पूर्ण चंद्र असून तो धनस्थानामध्यें असलेल्या शनि गुरु शुक्राबरोबर शुभसंबंधित असल्यामुळें त्यांच्या सर्व कार्यामध्यें त्यांना यश येऊन त्यांमध्यें अनेक तऱ्हेनें सांपत्तिक लाभ झालें. तसेंच चंद्र हा आयुष्यकारक असून शुभसंबंधित असल्यामुळें त्यांना दीर्घायुष्यत्व प्राप्त झालें. परंतु हा चंद्र चतुर्थामध्यें हर्शलबरोबर प्रतियोग करीत असल्याकारणानें म्हणजे लयस्थानामधील ग्रहानें चंद्र पीडित असल्यामुळें त्यांचा शेवट एकदम झटक्यासरसा झाला पाहिजे असें ध्वनित करीत होता परंतु मृत्यु जरी एकदम होणार होता तरी तो अपघातामुळें येणार नव्हता, कारण रवि चंद्र दोघेही पापग्रहानें सिध्द झालेले नसून चतुर्थामधील हर्शल हा शनि गुरुबरोबर शुभसंबंधित आहे. दशमांतील पूर्ण चंद्राच्या बलामुळेंच मॅनस्युअर फ्लॅमेरीअन हे अत्यंत लोकप्रिय झाले. सप्तमांत द्विस्वभाव राशि, शुक्र द्विस्वभाव राशीनें चंद्र ही द्विस्वभाव राशी व याचमुळें त्यांचे एकापेक्षां अनेक विवाह झाले. सप्तमेश बुध हा हर्शलनें युक्त व चंद्र हर्शलचा प्रतियोग हे प्रथम

स्त्रीचा नाश करण्यास कारणीभूत झाले. या पुरुषाचा स्वभावधर्म गुरु, हर्शल व चंद्राच्या स्वभावधर्माप्रमाणें होता. हर्शल व चंद्र हे केंद्रामधून प्रतियोग करीत आहेत व गुरु हा लग्नेश असून तो क्षितिजाबर उदय पावण्यास येत आहे. द्विस्वभाव राशीमध्यें बरेंच ग्रह असल्याकारणानें याचा स्वभाव अत्यंत शीघ्रसंस्कार ग्रहण करणारा असून याला अनेक विषयांची आवड होती. लग्नकेंद्रावर वृश्चिक राशीचा अत्यंत थोडा भाग उदित आहे परंतु लग्नावरील उदित राशीचा अधिपति या दृष्टीनें लग्नेश मंगळ हा बलवान अशा केन्द्रामध्यें असल्याकारणानें त्याला वृश्चिक राशीनें दर्शविलेा जाणारी शोधक, चौकस, विचिक्षणायुक्त व सृष्टीचीं गुह्यें जाणण्याची बुध्दी प्राप्त झाली व त्याच्या बुद्धिमत्तेमध्यें धनुराशीनें व्यक्त होणारा धडाडी, दूरदृष्टि व धार्मिकता दिसून येते.

केमेलो फ्लेमेरीअन हा फारच मोठा मनुष्य होता; याची काम करण्याची धमक फारच मोठी होती. आचारविचार, महत्वाकांक्षा, ज्ञान व सौजन्य या सर्वांनीं तो खरोखराच एक वंदनीय पुरुष होऊन गेला.

मरणकाळीं याचें वय ८३ वर्षें व चार महिन्यांचें होतें व या कालाची प्रायमरी डायरेक्शनची आर्क-- भविष्यकालमापन क्षेत्र किंवा मर्यादा- ८२ अं. ४ क. येते व यांवरून घेतलेलें. दशमस्थान किंवा हें भविष्यकालमापन (arc) मुळच्या दशमस्थानामध्यें मिळविलें असतां दशमावर धनुराशाचे १२ अं. ३४ क. येत असून लग्नावर कुंभ राशाचा २१ वा अंश उदय पावत आहे. तारीख ८ फेब्रुवारीमध्यें जें चंद्रग्रहण सिंह राशीच्या २० व्या अंशांत झालें तें या चलित लग्नाचे अंशाबरोबर

प्रतियोग करीत आहे व दैनिक नेपच्युनचें गोचर भ्रमण चलित लग्नाचे समोरच्या अंशामधून होत असून ग्रहणकालचा चंद्र हाही नेपच्युनें युक्त झालेला असल्यामुळें हें ग्रहण अत्यंत अरिष्ट सूचकच असें होतें. चलित रवि हा वृषभ राशीच्या २९ अं. ८ कलेमध्यें येत आहे म्हणजे त्यानें नुकताच जन्मकालच्या राशीवरोवर केलेला १३५ अंशांचा अशुभ योग सोडला असून तो गुरूवरोवर १३५ अंशांचा अशुभ दृष्टि करण्यास जात आहे व जन्मलग्नावरोवर प्रतियोग करीत आहे.

मृत्युकालाचा **परिभ्रमण** पध्दतीनें विचार करितां ८४ व्या वर्षाचे वर्षलग्नीं व्ययस्थानामध्यें असलेल्या वृश्चिक राशीचा ११ वा अंश उदय पावत आहे. व परिभ्रमण पध्दतीच्या पुस्तकामध्यें सांगितल्याप्रमाणें दशमचलन करून घेतल्यास वृश्चिक २ अं. वर्षलग्नीं येत आहे. व वर्षकुंडलीचे अष्टमांत रवि, चंद्र व शुक्र बसत आहेत. परिभ्रमण पध्दतीनें शनि वृश्चिक ४ अं. २७ क. आल्याकारणानें तो वर्षलग्नावरोवर युक्त होण्यास येत आहे. जन्म लग्नेश गुरु हा मकरेमध्यें २ अं. ३० क. आल्याकारणानें जन्म शनोवरोवर म्हणजे मारकेशावरोवर युक्त होत आहे. परिभ्रमणपध्दतीचे रवि, चंद्र व शुक्र ह चतुर्थामध्यें म्हणजे लयस्थानामध्यें असलेल्या जन्मकालचे हर्शलवरोवर केन्द्रयोग करीत आहेत. हाच योग मृत्यु किंवा शेवट आकस्मिक व एकदम होण्यास कारणीभूत झाला. **सिंह राशीवा व रवीचा** Heart **हृदय यावेवर अंमल आहे.** (कर्क राशीचा छातीवर अंमल असल्याचे जुन्या ग्रंथांत आहे; परंतु छातीवर असलेले स्तनद्वय यांचाच फक्त कर्क राशीनें बोध होतो. या संबंधानें एखादे वेळीं स्वतंत्र विचार करितां येईल.) सिंह राशीमध्यें

परिभ्रमण पध्दतीनें ८४ व्या मंगळ व नेपच्यूनची युति होत आहे. राहूही याच राशीमधून भ्रमण करीत असल्याकारणानें या वर्षीत होणारीं ग्रहणें सिंह व कुंभ राशींमध्येंच होत आहेत. **कुंभ राशीचा अंमल शरिरांतर्गत जी रक्ताभिसरणाची क्रिया आहे तीवर आहे.** या सर्व गोष्टी विचारामध्यें घेतल्या म्हणजे ८४ व्या वर्षींच एकदम हृदयक्रिया बंद पडून केमेलो पलेमेरोयन याचा मृत्यु कां झाला याचा चांगला मेळ बसतो. आमची खात्री आहे कीं व्यवस्थित रितीनें विचार करीत गेलें असतां ज्या गोष्टी आज अज्ञेय वाटत आहेत त्याच ज्ञेय होतील. व ज्योतिष शास्त्रानें खात्रीने मृत्यूचें अचुक निदान करितां येईल.

आधान काळ.

संग्रह २ रा

(संग्रहकार—श्रीयुत राम नारायण.)

आर्य--फल--ज्योतिष--वाङ्मयांतील आजमितीला जे ग्रंथ विशेष प्रचलित आहेत त्यांमध्यें जन्मकालावरून आधान काळ काढण्यासंबंधाची स्पष्ट माहिती आढळत नाहीं. मात्र निषेक अगर आधान काळच्या ग्रहस्थितीवरून कांहीं फलादेश वर्णन केलेला आढळतो. उदाहरणार्थ, बृहज्जातकांतील निषेकाध्यायामध्यें अशा प्रकारचा फलादेश आलेला आहे. हा फलादेश निषेक-काळ माहितो असल्यावरच उपयोगी पडणारा आहे. निषेक काल माहितो असणे हे प्रायः अशक्य. बृहज्जातकानंतर झालेल्या अनेक ग्रंथांत निषेकाध्याय आढळतो परंतु त्यामध्येंही जन्मलग्नावरून

निषेक काळ कसा काढावा याची माहिती दिलेली नाहीं. आम्हांस फक्त एकाच * ठिकाणीं अशी माहिती आढळली तो आम्हीं पहिल्या संग्रहांत दिली आहे. असो. प्रचलित ग्रंथामध्यें लग्नावरून निषेक काळ कसा काढावा हें जरी समजत नाहीं तरी निषेक काळावरून कोणत्या लग्नावर जन्म होईल याचा विचार केलेला आढळतो. निषेक व जन्म या वेळांच्या सापेक्ष ग्रहस्थितीची कल्पना उपरिनिर्दिष्ट निषेकाध्यायांत आलेली आहे. पूर्वाचार्यांच्या या कल्पनेचा विचार प्रस्तुतच्या संग्रहांत दाखल करीत आहों. ही कल्पना आचार्य वराहमिहिरानीं पुढील श्लोकांत सांगितली आहे:---

तत्कालभिंदुसहितो द्विरसांशको यः ॥
तत्तुल्य राशिसहिते पुरतः शशांकः ॥
यावानुदेति दिन--रात्रि--समानभागः ॥
तावद्गते दिन निशोः 'प्रवदंति' जन्म ॥ २१ ॥

बृहज्जातक अध्याय ४

टीकाकार भट्टोत्पल यांस वरील श्लोकाचा मान्य असलेला अर्थ असा आहे:----(१) **चंद्र आधान काळीं ज्या द्वादशांशांत**

*'संकेतनिधि' नामक ग्रंथांतील जातक संग्रहांत घेतलेल्या श्लोकांवरून जन्मवरून निषेक काल काढण्याची माहिती दिली आहे ती आम्हीं दिलेल्या १ ल्या संग्रहांतील उताऱ्यासीं मिळती आहे असें दिसतें. 'संकेतनिधि' हा ग्रंथ आमच्या पहाण्यांत नाहीं त्यामुळें त्यासंबंधानें अधिक कांहींच लिहितां येत नाहीं.'

असेल त्या द्वादशांश संख्येइतक्या तत्कालीं द्वादशांश राशीच्या पुढें जन्मकालीं असतो.*

उदाहरणार्थः—आधानकालीं चंद्र कुंभ राशीमध्यें ८ व्या म्हणजे कन्या राशीच्या द्वादशांशांत आहे. कन्येच्या पुढची राशी तूळ म्हणजे जन्मकालीं चंद्र तुला राशीपासून ८ व्या राशीवर अर्थात् वृषभ राशीवर असेल.

(२) आधान कालीन उदयकेंद्रीं दिन अगर रात्रि राशीचा जितक्या प्रमाणांत उदय झाला असेल तितक्या प्रमाणांत दिवसा अगर रात्रीं जन्म होतो.

उत्पलाचा वरील अर्थ संभवनीय व मान्य होण्यासारखा आहे. तसेंच त्यानें उद्धृत **भ**गवान् **गा**र्गीच्या श्लोकावरून **व**राह मिहिराच्या पूर्वी प्रस्तुत मुद्यासंबंधानें अशाच अर्थाचें आधारभूत वचनही पहाण्यास मिळतें. मात्र आधानकाळापासून "दशमे मासि" म्हणजे दहाव्या महिन्यांत असाच अर्थ आचार्यांच्या अगर भगवान् गार्गीच्या वचनांतून निघूं शकत नाहीं. आधान काळापासून सामान्यतः १० व्या महिन्यांत जन्म होतो हें खरें परंतु हा निरपवाद नियम नाहीं. वराहाच्या श्लोकांत तसे शब्दही नाहींत. करतां उत्पलोय जो अर्थ वर दिला आहे त्यांतून "दहाव्या महिन्यांत" हे शब्द गाळले आहेत.

आधानकाळीं चंद्र ज्या द्वादशांशांत असेल त्या द्वादशांश संख्येप्रमाणें **मेषे**पासून पुढच्या राशींत जन्मकाळीं चंद्र असतो असा श्लोकाच्या पूर्वार्धाचा अर्थ कांहींच्या मतानें असल्याचें **उ**त्पल लिहितो. वरील उदाहरणांत कुंभ राशीच्या ८ व्या द्वादशांशांत चंद्र आहे. तेव्हां

*आधानकाले यत्र राशौ चंद्रमा व्यवस्थितः तत्र तावत् संख्यो द्वादशभागो वर्तते तस्मात् द्वादश-भाग-राशेः तावत्संख्योय एव पुरतो राशिस्तत्रस्थे चंद्रमसि दशमे मासि प्रसवो वक्तव्यः एषैव सांप्रती व्याख्या ।

जन्मकाळीं मेषेपासून ८ व्या म्हणजे वृश्चिक राशीवर चंद्र असेल असें अन्य मतानें ठरतें. परंतु हें मत उत्पलास मान्य नाहीं. श्लोकाच्या उत्तरार्धासंबंधानें 'उदित पावलेल्या **राशीचा** भाग किंवा **नवांशाचा** भाग यासंबंधानेंही मतभेद दिसतो परंतु केवळ शब्दार्थाकडे पहातां असा मतभेद होण्यास जागा आहे असें आम्हांस वाटत नाहीं. उत्पलानें केलेला अर्थच ग्राह्य आहे व त्याप्रमाणें न. चिंदंबरं ऐय्यर बी. ए. व स्वामी विज्ञानानंद (पूर्वाश्रमीचे श्रीयुत हरिप्रसन्न चतर्जी बी. ए. एल्. सी. ई) यांनीं बृहज्जातकावरील आपआपल्या टीकांमध्यें केला आहे. परंतु गणक भास्कर विष्णु गोपाळ नवाथे यानीं तिसराच पंथ स्वीकारला आहे. जातक पारिजात पुस्तकांत बृहज्जातकांतील ज्या अनेक श्लोकांचा संग्रह दृष्टीस पडतो त्या मध्यें प्रस्तुत श्लोकही आला आहे. श्री. नवाथ्यांनीं जातक पारिजाताचे भाषांतरांत याही श्लोकांचे भाषांतर केलें आहे. हें भाषांतर येणेंप्रमाणें:----

"आधान काळचा स्पष्ट चंद्र **द्वादशांश कुंडलींत ज्या राशींत असेल त्या राशींत** दहाव्या महिन्यांत जेव्हां तो असतो तेव्हां प्रसूती होते व आधान लग्न दिवस किंवा रात्रि संज्ञक जितक्यावा अंश असेल तितक्यावा अंशावर दिवसास अगर रात्रीस जन्म होतो." वर दिलेल्या उदाहरणांतील चंद्र कुंभ राशींतील कन्या द्वादशांशांत आहे तेव्हां श्री. नवाथ्यांच्या अर्थाप्रमाणे जन्मकाळीं चंद्र कन्या राशींत असेल. श्लोकाच्या पूर्वार्धाचा श्री. नवाथ्यांचा अर्थ कदाचित मतभेद या सदरांत पडेल परंतु त्यांच्या उत्तरार्धाच्या 'अर्थाला' कांहींच अर्थ नाहीं. समजा रात्रिसंज्ञक धनु राशीचा २५ वा अंश आधानकाळीं उदित आहे तर नवाथ्यांच्या अर्थानें "तितक्यावा अंशावर रात्रीस जन्म होतो" पण तो 'तितकावा' अंश कोणत्या राशीचा ? प्रस्तुत उदाहरणांत तो धनु राशीचा

समजावयाचा ? वराहाच्या वाक्याचा सरळ अर्थ स्पष्ट आहे कीं आधान काळचें लग्न जर दिवस संज्ञक राशीचें असेल तर जन्म दिवसास होईल आणि आधान लग्नाच्या उदित भागाच्या प्रमाणांत दिवस व्यतीत झाला असेल. म्हणजे राशीचे ३० अंश=जन्म दिवसाचें दिनमान किंवा रात्रिमान. याप्रमाणावरून दिवसाचा अगर रात्रीचा वेळ नक्की करण्याविषयींचो कल्पना स्पष्ट शब्दांत वरील श्लोकार्धांत सांगितलेली आहे. प्रस्तुत श्लोकासंबंधानें जे हे मतभेद नमूद केले आहेत ते लक्ष्यांत ठेऊन त्यावरून कोणतीं अनुमानें निघूं शकतात व त्यांचा कितपत अनुभव येतो हें पाहिलें पाहिजे.

या श्लोकांत दोन कल्पना सांगितल्या आहेत:----

(१) आधानकालीन **चंद्राच्या** स्थितीवरून जन्म-कालीन **चंद्राची** स्थिति; व

(२) आधानकालीन **लग्नावरून** जन्म दिवसांतील **इष्टकाळ.**

निषेक व जन्म यांचा दुवा वरील श्लोकांत सांगितल्याप्रमाणें जर खरोखरच असला तर जन्मावरून निषेक काल बसविणेंही शक्य होईल. श्लोकांतील 'प्रवदंति' या शब्दावरून येथें वराहमिहिरांनीं स्वतःचें मत दर्शविलें नसून पूर्वग्रंथकारांचें मत सांगितलें आहे असें वाटतें. उत्पलानें उद्धृत केलेल्या भगवान् गार्गीच्या श्लोकावरून प्रस्तुत श्लोकांतील मत पूर्वाचार्यांचें किंवहुना भगवान गार्गीचें असणें संभवनीय आहे. वराहमिहिरांनीं" ज्योतिषमागमशास्त्र विप्रतिपत्तौ न योग्यमस्माकम् |.....

.....किंतु बहूनां

मतं वक्षे||या धोरणानें पूर्वाचार्यांच्या मताचा अनुवाद केला असेल. असो. प्रत्यक्ष अनुभवास प्रस्तुत श्लोकांतील नियम कितपत उतरतात हें पाहूं.

साधारणपणें जन्मकाळाप्रमाणें आधानकाळ अगर निषेककाळ कोणी नमूद करून ठेवीत नाहीं. निषेककाळ मुद्दाम नमूद केल्याचें फारच

क्वचित आढळतें. गर्भ संभवाच्या पूर्वीचा निषेक काळ अमुकच असें निश्चयानें सांगणें अशक्य नसलें तरी बरेंच कठीण आहे. त्यामुळें प्रस्तुत श्लोकांतील नियमांचा खरेखोटेपणा ठरविणें हें सोपें नाहीं. इंग्रजी व मराठी मासिकांतून निषेक व जन्म हे दोन्ही काळ नमूद करून ठेवल्याचीं थोडीशीं उदाहरणें प्रसिध्द झालीं आहेत. हीं उदाहरणें प्रस्तुत विषयास उपयोगी पडण्यासारखीं आहेत. या बाबतींत निषेक काल जितका निःसंशय असेल तितका पाहिजे आहे. अशाप्रकारचें उदाहरण जें आम्हांस उपलब्ध आहे तेंच प्रथम येथें देत आहों. त्यानंतर इतरांनीं दिलेलीं उदाहरणें सवडीनुसार पाहूं.

(१) **निषेककाल.**—ता. २३ आक्टोबर १९२४. वेळ रात्रौ ९ वाजून ३० मिनिटांनीं. (स्टं. टा.) स्थळ श्रीक्षेत्र नाशिक.



(२) **जन्मकाल.**—ता. २९ जुलै १९२५ सकाळीं (स्टं. टा.) ८ वाजतां. स्थळ श्रीक्षेत्र नाशिक.



वर दिलेला निषेक काळ पांच-सहा मिनिटांच्या फरकानें बरोबर असून जन्मकाळ मात्र तंतोतंत आहे. निषेक काळापूर्वीं कित्येक आठवडे समागम झाला नव्हता; त्याचप्रमाणें निषेकापासून पुढें जन्मकाळापर्यंत समागम झाला नाहीं. अर्थात् वर नमूद केलेल्या निषेकानंतरच गर्भसंभव झाला आहे.

निषेककालीन चंद्र कन्या राशीच्या १ ल्या अंशांत आहे म्हणजे कन्या राशीच्या १ ल्या द्वादशांशांत आहे. उत्पल मताप्रमाणे जन्मचंद्र

कन्या राशीच्या पुढच्या राशीपासून म्हणजे तूळराशीपासून १ ल्या राशींत अर्थात तूळ राशीत असला पाहिजे. प्रत्यक्ष उदाहरणावरून हें सिध्द होत नाहीं. उत्पलानें उद्धृत केलेल्या अन्य मतानें चंद्र १ ल्या द्वादशांशांत असल्यामुळें मेषेपासून १ ल्या राशींत अर्थात् मेषेमध्येंच जन्मकाळीं असावयास पाहिजे. वस्तुस्थिति तशी नाहीं. श्री. नवाथ्यांच्या अर्थाप्रमाणें निषेककालीन चंद्र कन्या द्वादशांशांत असल्यामुळें जन्मकाळीं तो कन्या राशींत असावयास पाहिजे. तसा अनुभव येथें येत नाहीं.

निषेक कालीं मिथुन राशि उदय केंद्रीं आहे ही राशि रात्रि-संज्ञक आहे. श्लोकाच्या उत्तरार्धांत दिलेल्या नियमाप्रमाणें जन्म रात्रीं व्हावयास पाहिजे. परंतु तो दिवसा झाला आहे. रात्रिसंज्ञक राशी लग्नीं असतां निदान रात्रीं जन्म झाला असतां तर राशीचा कितवा भाग व्यतीत व्हावयास पाहिजे व तो तसा नियमाप्रमाणें झाला आहे किंवा नाहीं हें पाहिलें असतें पण येथें सर्वच कांहीं उलट अनुभवास येत आहे. जन्मकाळीं उदय राशीच्या प्रमाणांत अगर नवांशांच्या प्रमाणांत दिन-रात्रि भाग व्यतींत होतो असाही या बाबतींत मतभेद आहे परंतु जेथें रात्रीस जन्म व्हावयास पाहिजे तेथें दिवसा होतो तेव्हां पुढचा इष्ट कालाचा विचारच रहात नाहीं !

आमच्या आढळण्यांत जें निषेककालाचें निःसंशय उदाहरण आहे त्यावरून पूर्वाचार्यांच्या निषेकविषयक पूर्वोक्त श्लोकांत ग्रथित केलेल्या नियमांचा अनुभव येत नाहीं असें म्हणणें प्राप्त आहे ! मात्र एका उदाहरणावरून पूर्वाचार्यांचे नियम त्याज्य ठरविण्याचें धाडस आम्हीं करीत नाहीं. इतरत्र त्यांचा अनुभव कदाचित मिळेलही. प्रस्तुत श्लोकांतील (पूर्वाचार्य) 'म्हणतात' या शब्दानें आचार्य वराहमिहिरांनीं

स्वतःचें मत म्हणून नव्हे तर दुसऱ्यांचें असें मत आहे एवढेंच सांगितलेलें दिसतें. असो. वाचकांनीं वरील नियम आणखी अनुभवाच्या कसोटीस लावून पहावेत हें उत्तम.

२

निषेक-काले चर-राशिगेऽर्के ॥
गर्भ-प्रसूतिर्दशमे च मासे ॥
एकादशे च स्थिर-राशि-संस्थे ॥
स्याद् द्वादशे मास्युभया श्रिते च ॥ ४४ ॥
गर्भाधाने चरे राशौ दशमासैः प्रसूयत ॥
स्थिरेणैकादशे मासे उभये द्वादशे भवः ॥ ४५ ॥

सारावली अध्याय ८

सारावलोकारानें निषेककाळीं रवि ज्या राशींत असेल त्याप्रमाणें गर्भकालाचो मर्यादा पहिल्या श्लोकांत सांगितलो आहे ती अशोः---

निषेककालीं रवि **चर** राशींत असतां प्रसूति १० व्या महिन्यांत
" " **स्थिर** " " " १० व्या "
" " **द्विस्वभाव** " " " १२ व्या "

दुसऱ्या श्लोकांत निषेककालच्या लग्नावरून गर्भकालाच्या मर्यादा येणें प्रमाणें:---

निषेककालीन लग्न **चर** राशीचें असतां प्रसूति १० व्या महिन्यांत
" " **स्थिर** " " " ११ व्या "
" " **द्विस्वभाव** " " " १२ व्या "

वरील दोन श्लोकांत सांगितलेल्या गर्भकालाच्या मर्यादा अनुभवास न येण्यासारख्या आहेत. ११ किंवा १२ महिन्यांचा गर्भकाळ असंभवनीय नाहीं परंतु कमीप्रमाणांत आढळणारा आहे. राशिचक्राच्या १२ राशींपैकीं ४ स्थिर व ४ द्विस्वभाव मिळून आठ राशींचें लग्न किंवा रवि

असतां फारच मोठ्या प्रमाणांत ११ किंवा १२ महिन्यांचा गर्भकाळ सामान्यतः अनुभवास आला पाहिजे परंतु तसा अनुभव नाहीं. 'नवमास' पुरे होणें ही सामान्य गोष्ट आहे. गर्भकालाचे १० महिने पुरे होणें ही सामान्य गोष्ट नसून अपवाद समजला जातो. अपवादाचो संख्या केव्हांही झालें तरी कमीच असावयास पाहिजे परंतु **सा**रावलोकाराच्या मतानें गर्भवास १० महिन्यांपेक्षां अधिक असणें हा नियम होईल. सकृद्दर्शनीं हा मोठा आक्षेप वरील श्लोकांवर येतो.

गर्भकालाचो मर्यादा ठरविण्यास **सा**रावलीकारानें निषेककालीन रवि व लग्न हीं विचारांत घेतलीं आहेत. हो बाब लक्ष्यांत ठेवण्यासारखी आहे. आंग्ल ज्योतिर्विद गर्भकालाची मर्यादा केवळ चंद्राच्या स्थितीवरून ठरवितात. **सा**रावलोकार चंद्राचो स्थिति बिलकूल लक्ष्यांत घेत नाहीं. या बाबतींत निषेककालाचीं बरींच उदाहरणें लक्षपूर्वक पहाणें जरूर आहे.

(३)

आधानाज्जन्मर्क्षं दशमं वांछंति केचिदाचार्याः ॥ ४६ ॥

सारावली अध्याय

अर्थः----'कांहीं आचार्य जन्मनक्षत्र आधान-नक्षत्रापासून १० वें असतें असें म्हणतात' **सा**रावलीकारानें कांहीं आचार्यांचें हें मत दिलें आहे परंतु त्यासंबंधानें स्वतःचें मत नमूद केलें नाहीं. आम्हीं वर दिलेल्या निषेक-कालच्या कुंडलींत चंद्र **उत्तरा** नक्षत्रीं असून जन्मनक्षत्र **अनुराधा** आहे तें वरील नियमाप्रमाणें **फळ** असावयास पाहिजे.

वरील आर्यार्धापुढें **सा**रावलीकार या बाबतींत **बा**दरायणाचें मत नमूद करतो तें असें:---

आधानोदय-शशिनोः सप्तमभं बादरायणो ब्रूते ॥ ४७ ॥

आधानकालीन लग्न व चंद्र यांच्या सप्तम राशीवर जन्मकाळीं (अनुक्रमें) लग्न व चंद्र असतात असा अर्थ दिसतो. या आर्यार्धावरून **बा**दरायणाचा मूळ अभिप्राय काय असेल हें स्पष्ट होत नाहीं. आधान लग्न व आधान चंद्र यांचा व्यत्यय करून त्यांच्या सप्तमांतील राशींत जन्म लग्न व जन्म चंद्र असतात असा मूळचा अभिप्राय असल्यास "निषेककालीन लग्न व चंद्र जन्मकाळीं अनुक्रमें चंद्र व लग्न असतात" या मूळ सिध्दांताला **बा**दरायणाचें वरील मत म्हणजे अनुभवसिध्द पुरवणी होय असें यूरपीय (Pre-Natal Theory) गर्भ-संभवकाल मिमांसे वरून म्हणणें प्राप्त होतें. **बा**दरायणाच्या अस्सल उताऱ्या शिवाय या बाबतींत निश्चयात्मक विधान करतां येण्यासारखें नाहीं.

सारावलीकारानें यानंतर आधान-कालविषयक पुष्कळ आचार्यांना संमत असलेलें मत दिलें आहे. हें मत आरंभींच दिलेल्या **व**राह मिहिराचार्यांच्या श्लोकांत पूर्णपणें आले आहे व त्याचा अनुभवही एका उदाहरणावरून वाचकांस सादर केला आहे.

(४)

(दशमं जन्म नक्षत्रात् कर्म नक्षत्रमुच्यते ।)

एकोनविंशतिंचैव गर्भाधानकमुच्यते ॥ ५ ॥

अथर्वण ज्योतिष—'नक्षत्रप्रकरण'

(जन्मनक्षत्रापासून १० वें नक्षत्र नक्षत्र कर्म) व **१९ वें नक्षत्र गर्भाधान नक्षत्र.** अथर्वण ज्योतिषांतील हा नियम पूर्वी दिलेल्या उदाहरणांतील स्थितींशीं अनुभवास येत नाहीं.

॥ श्रीगुरुगणेश ॥

ज्योतिर्माला-मासिक-पुस्तक

वर्ष ९ वें

पृष्ठें १ ते १२

अप्रत्यक्षाणि शास्त्राणि विवादस्तेषु केवलम् ।
प्रत्यक्षं ज्योतिषं शास्त्रं चद्रार्कौ यत्रसाक्षिणौ ॥ १ ॥
यथा शिखा मयूराणां नागानां मणयो यथा ।
तद्वद्वेदांग-शास्त्राणां ज्योतिषं मूर्द्धनि स्थितम् ॥ २ ॥

"The wise man rules his stars, the fool obeys them.

संपादक—यशवंत केशव प्रधान

वार्षिक वर्गणी ट. ख. सह रु. २--८

॥ श्रीगुरुगणेश ॥

ज्योतिर्मालेच्या ९ व्या वर्षाची अनुक्रमणिका

विषय		अंक
१.	आधानकाल संग्रह १ व २	५।६ व ११।१२.
२.	ईशप्रार्थना	१।२.

विषयानुक्रमणिका.

३.	कै. चिटणीस यांचे लेखांचा संग्रह १ ला.	७।८.
४.	दशमस्थान	५।६,७।८ व ९।१०.
५.	परिभ्रमण पध्दतीचा अभ्यास	९।१०.
६.	प्रसिध्द व्यक्तींच्या कुंडल्यांचा संग्रह---	
	कॅमेली फ्लॅमेरी अन	११।१२
	लार्ड कर्झन	७।८
७.	फलज्योतिष लेख ७ वा, ८ वा व ९ वा.	१।२,५।६ व ७।८
८.	मंगळ नेपच्यूनयुति.	५।६
९.	लिलिथ पृथ्वीच्या दुसऱ्या चंद्रासंबंधानें विचार.	५।६
१०.	सन १९२५ साल कसें जाईल ?	१।२
११.	सन १९२५ चे ग्रहाच्या उष्णतेच्या साधनानें केलेलें पावसाचें अनुमान	१।२
१२	स्फुट विचार.	१।२ व ७।८
१३	श्री शिवाजीची कुंडली व रा. रा. करंदीकरांचें फलज्योतिष.	३।४
१४	श्री शिवछत्रपति जन्मवर्णन	३।४

:o:

मालेच्या आश्रयदात्यांस विनंती

आज रोजीं ९ व्या वर्षाचा ११।१२ वा हा जोड अंक वाचकांच्या हातामध्यें देऊन आम्हीं त्यांचे ९ व्या वर्षाचे ऋणामधून मुक्त होत आहों. मालेचे अंक नियमित प्रसिध्द करून जमल्यास दरमहाचे दरमहा अंक प्रसिध्द करण्याचें १० व्या वर्षापासून योजित आहों. ज्योतिर्माला मासिकाच्या अभिनवावृत्तीच्या जन्मकाळचे दशमावरून तसेंच कुंभेमध्यें माध्यान्ही असलेल्या बुधावरून या वर्षामध्यें होत असलेले सुरगुरूचें गोचर भ्रमण खात्रीनें यशकारक होईल असें आम्हांस वाटत आहे. ज्योतिर्मालेच्या जन्मकाळीं बुध कुंभेमध्यें होता; परंतु तो वक्री होता. हल्लीं बुध मार्गी गेल्या दोन तीन वर्षापासून झाला असून चलित लग्न त्रिकोण योग हर्शल जन्मकालचा (नवमस्थानामवील) व चलित दशम युति रवि व गुरु जन्मकाळचा व सुर गुरूचें भ्रमण १९२६ व १९२७ मध्यें या जन्मकाळचे हर्शल, बुध, मंगळ, रवि व दशमस्थानावरून होणार असल्यामुळें पुढें येणाऱ्या भावी काळामध्यें ज्योतिर्मालेच्या हातून ज्योतिशास्त्ररूपी विद्या देवीची चांगलीच सेवा होईल व अनेक नूतन रत्नांचा लाभ ज्योतिर्मालेच्या द्वारें महाराष्ट्रास व्हावा असें वाटत असल्यामुळें १० वे वर्षापासून प्रथमतः अंक नियमानें दरमहाचे दरमहा प्रसिध्द करून आजपर्यंत जे विषय मराठीमध्यें आलेले नाहींत असे विचार व विषय क्रमवार मालेमध्यें देण्याचें योजित आहों. ज्योतिर्विद्‌मयाची सेवा करण्याचें काम आमचें आहे; व आजपर्यंत जसा वाचकांनीं मालेला उदार आश्रय दिला तसाच तो यापुढें देऊन आम्हांस शास्त्रसेवेच्या कार्याला मदत करावी हीच आमची त्यांना विनंती आहे.

आजपर्यंत मालेची वर्गणी, ट. ह. सह रुपये दोन होती परंतु तो आतां १० वे वर्षापासून अडीच रुपये करण्याचें योजिलें आहे.

NOT TO BE ISSUED

SMT. HANSA MEHTA LIBRARY BARODA
RARE BOOK COLLECTION
UNIVERSITY LIBRARY

NOT TO BE ISSUED

SHML
M2133

ENTERED

M. 2133

13 MAY 1961

NOT TO BE ISSUED

7 BF
1651
.J9-3
M 2133